म. ग्रं. सं. पुणे
विषय
क्र. नं. ५७६२
१९७३

बंधुद्वेष.

(मनोरंजक व बोधपर कादंबरी)

(भाग १-२ संपूर्ण)

लेखक

श्रीयुत गोविंद नारायण दातार.

लिकामूर्ति, इंद्रभुवनगुहा, विलासमंदिर, अधःपात इत्यादि पुस्तकांचे कर्ते.

९६१३६
वाचनालय

प्रकाशक

दामोदर सांवळाराम आणि मंडळी

रॉयल प्रिंटर्स, पाब्लिशर्स आणि कमिशन-एजंटस्, नं० ४३४ ठाकुरद्वार-मुंबई.

सन १९१३ इ०.

किंमत २॥ रुपये.

हें पुस्तक, नं. ४३४ ठाकुरद्वाररोड, मुंबई, येथें 'इंदुप्रकाश' छापखान्यांत दामोदर सांवळाराम यंदे यांनीं छापून प्रासिद्ध केलें.

(या पुस्तकासंबंधानें सर्व हक्क प्रकाशकांनीं आपणाकडे ठेविले आहेत

प्रकाशकाचे दोन शब्द

गेल्या कांहीं वर्षांपासून श्रीसयाजीविजय पत्रांतून एक मनोरंजक कादंबरी देण्याची आम्ही व्यवस्था केली आहे. त्या व्यवस्थेप्रमाणें आजपर्यंत कालिकामूर्ति, इंद्रभुवनगुहा, विलासमंदीर अशा तीन कादंबऱ्या पूर्ण झाल्या; आणि आज ही चवथी कादंबरी पूर्ण होऊन वाचकांच्या हातीं पडत आहे. ह्या सर्व कादंबऱ्या आमचे मित्र रा० गोविंद नारायण दातार यांनींच लिहिल्या आहेत. प्रस्तुत कादंबरी प्रसिद्ध आंग्ल कादंबरीकार **रेनाल्डस्** यांच्या 'मेसेकर ऑफ ग्लेंको' नामक कादंबरीचें रूपांतर आहे. पूर्वीच्या तिन्ही कादंबऱ्याही रेनाल्डस् यांच्या लोकमान्य झालेल्या ब्रॉंसस्टाचु, लेला व कॉनिन्बरी हाऊस, या कादंबऱ्यांचें रूपांतर असून त्यांस मराठी वाचकांकडून चांगला आश्रय मिळाला आहे. त्याप्रमाणें या कादंबरीसही सूज्ञ वाचकांकडून योग्य आश्रय मिळेल अशी उमेद आहे.

बंधुद्वेषामुळें कसे अनर्थ घडतात याचें चित्र या कादंबरींत दाखविलेलें असल्यामुळें ही अर्धवट शोकपरिणामीं झाली आहे. या कादंबरीमध्यें मुख्यत्वेंकरून चार स्त्रीपात्रें आलीं आहेत. प्रियंवदा ही नायिका असून तिचें प्रेम सात्त्विक आहे. आनंदी हें गौण पात्र असून तिचें प्रेम राजस् आहे, व दमयंती हें एक बऱ्याच महत्त्वाचें पात्र असून तिचें प्रेम तामस् आहे. चवथी मथुरा; हिच्या सात्त्विक प्रेमाचा विकास कसा होत गेला, हें जरी या कादंबरींत दाखविलेलें नाहीं, तरी तिचें प्रेम आर्य स्त्रियांच्या सामान्य आपलीकडे गेलेलें नाहीं.

दृढसंधाचा सत्याविषयीं आग्रह, चूडामणीचा दुष्ट, तामसी व क्रूर स्वभाव, जांघिलची देशप्रीति व स्वामिभक्ति, हेमचंद्राचें गूढ प्रेम, निंबराजाचें खोल कारस्थान, सुंदरसेन व देवशर्मा ह्या रत्नाकर राजाच्या प्रधानांची द्रव्यलोलुपता, रत्नाकराचा तेपणा, इत्यादि गोष्टी या कादंबरींत विशेष लक्ष्यांत ठेवण्यासारख्या आहेत. मधून मधून अद्भूतरसाच्या जागाही पुष्कळ आहेत. नायक शेखर या पात्राचें स्वभावचित्रण तर या कादंबरींत फार उत्तम साधलें आहे. आपला बंधु आपला द्वेष करतो, त्यास उघड उघड माहीत असूनही, त्यानें त्याच्या अपराधांवर पांघरूण घालून

त्याच्याविषयीं दृढसंधाच्या मनांत फारसा विकल्प येऊं दिला नाहीं. चूडामणीनें त्या कसा छल केला, व आपला द्वेष कसा साधून घेतला, हा प्रकारही विस्तारानें दाखवि- असल्यामुळें चूडामणीच्या दुष्ट स्वभावाचें चित्रही या कादंबरींत फार उत्तम दि येईल. तसेंच प्रेम विकृत झालें असतां त्याचें रूपांतर होऊन मनुष्य किती वे होतो, याचें दमयंती हें उत्तम चित्र आहे. सऱ्या स्वामिभक्तांच्या हातून प्रसंगवि मूर्खपणा झाला तरी, त्यांचीं मनें खरोखरच सदय असल्यास त्यांस पश्चात्ताप आणि नंतर ते आपल्या सान्या जन्मांत आपल्या हातून चूक होऊं देत नाहींत या कथेंतील जांघील या पात्राच्या स्वभावावरून लक्ष्यांत येईल. जांबिल हें या का- बरींतील एक दुय्यम पात्र असलें तरी, तें मोठें महत्त्वाचें आहे. सारांश, या कादं- मध्यें मानवी-स्वभावांतील बऱ्याच प्रकारांचें चित्र पाहावयास सांपडेल. सामान्यनीति आणि राजनीति या दोन्ही एकच नसून त्यांत किती फरक आहे, हेंही या कादंबरीत दृष्टीस पडेल. पूर्वग्रह, पिशाचकल्पना, शकून, शाप, इत्यादि 'लोकभ्रम' या सभो- खालीं येणाऱ्या गोष्टींवर सामान्यलोकांचा विश्वास किती असतो, हेंही या कथानकांत मधून मधून वाचकांस चांगलें आढळून येईल, व त्यापासून बराच बोध घेतां येईल.

सूज्ञ वाचक हंसक्षीरन्यायानें यांतील गुणांचा स्वीकार करतील अशी विनंती करून हें प्रास्ताविक दोन शब्द येथें पुरे करितों.

प्रकाशक.

बंधुद्वेष.

(मनोरंजक व बोधपर कादंबरी.)

भाग पहिला.

प्रकरण १ लें.

प्रवासी.

सुमारें हजारबाराशें वर्षांपूर्वी सौराष्ट्र देशांतील वल्लभी नांवाच्या नगरांत रत्नाकर या नांवाचा एक राजा राज्य करीत असे. तो फार विक्षिप्त, जुलमी आणि मूर्ख असल्यामुळें, त्याची प्रजा त्याला कंटाळून गेली होती; त्यामुळें राज्यांतील कित्येक प्रमुख गृहस्थांनीं गुप्त कारस्थानें चालवून रत्नाकराला पदच्युत करून निंबराज नामक त्याच्या पुतण्याला राज्यपदावर बसवावें, असा बेत योजिला होता

सध्यांच्या नाशिक जिल्ह्याचा उत्तरभाग व खानदेशचा दक्षिणभाग यांचा समावेश ज्या प्रदेशांत होतो, त्या प्रदेशास प्राचीन काळीं बागलाण असें म्हणत. बागलाणांत लहान लहान संस्थानें पुष्कळ होतीं. तेथील संस्थानिक जरी आपणास सौराष्ट्राधिपतींचे मांडलिक असें म्हणवीत, व प्रतिवर्षी त्यास खंडणी देत, तरी ते आपल्या ताब्यांतील मुलखाचा राज्यकारभार आपल्या इच्छेप्रमाणें करीत. इतकेंच नव्हे, तर ते प्रसंगविशेषीं आपसांत लढायाही करीत. यांपैकीं बरींच संस्थानें सह्याद्रीच्या लगत्यास असून त्यांमध्यें भिल्ल, कोळी वगैरे रानटी लोकांची वस्ती असे. ते लोक शेतकी बेताचीच करीत. ते आपली उपजीविका बहुधा शिकारीवर करीत असत. त्यामुळें रांकटपणा, चपलता, शौर्य, साहस वगैरे गुण निसर्गतःच त्यांच्या अंगीं वास करीत असत.

या बागलाणांतील डोंगराळ प्रदेशामध्यें असलेल्या एका पठारावर एक भव्य असें प्राचीन शिवालय होतें. या शिवालयापाशीं एक मोठी थोरली दगडी धर्मशाळा होती. आम्हीं ज्या वेळची हकीकत लिहीत आहों, त्यावेळीं या धर्मशाळेमध्यें मणिभद्र या नांवाचा एक गृहस्थ आपल्या पत्नीसह राहत असे. त्यानें वाटसरांच्या सोयीसाठीं धर्मशाळेच्या एका खोलींत एक लहानसें दुकान घातलें होतें. जे कोणी वाटसरू त्या धर्मशाळेंत वस्तीसाठीं रहात असत, त्यांस या दुकानांत शिधासामग्री मिळत असे. यामुळें त्यांची मोठी सोय होई. शिवाय जेव्हां कधीं या वाटेनें सुखवस्तु गृहस्थ प्रवास करीत, त्यावेळीं मणिभद्र त्यांजपासून अल्पस्वल्प मोबदला घेऊन, त्यांच्या भोजनाची व्यवस्था करीत कसे. एके दिवशीं सायंकाळीं मणिभद्र आपल्या स्त्रीसह धर्मशाळेपुढील ओट्यावर गप्पा मारीत बसला असतां, दोन प्रवासी त्या धर्मशाळेपाशीं येऊन दाखल झाले. ते दोघेही उत्तम प्रकारच्या सज्या घोड्यावर बसलेले होते. त्यांच्या पोषाकांवरून एकजण धनी असून दुसरा सेवक असावा, असें चटकन ध्यानीं येत होतें.

या दोघांपैकीं ज्याचा पोषाक वरिष्ठ प्रतीचा होता, त्याचें वय अजमासें चाळीस वर्षांचें असावें. त्याचा बांधा सडपातळ पण

मजबूत होता. त्याची मुद्रा जरी भव्य होती तरी तिजवरून तो उदार अंतःकरणाचा पुरुष असावा, असें वाटत असे. त्याचें नाक सरळ असून डोळे तेजस्वी होते. पण त्यांत मार्दवापेक्षां क्रौर्याची छटा अधिक उमटलेली दिसे. त्याचा भालप्रदेश विस्तीर्ण होता. त्याच्या अंगावरील वस्त्रें मध्यम प्रतीच्या गृहस्थास शोभण्यासारखीं होतीं. त्याच्या कमरेस एक पल्लेदार तरवार लोंबत होती, आणि ती ज्या पट्ट्यामध्यें अडकविलेली होती, त्याच पट्ट्यामध्यें एक जंबीया आणि एक तमंचा अशीं दोन हत्यारें खोंचलेलीं होतीं. त्याच्या मुद्रेवरून आणि वेषावरून तो बागलाण किंवा त्याच्या लगत्यास असलेल्या देशांतील रहिवासी नसावा, ही गोष्ट मणिभद्राच्या ध्यानीं यावयास अगदीं वेळ लागला नाहीं.

या गृहस्थाच्या सेवकाचें वय सुमारें तीस वर्षांचें होतें. त्याचा बांधा उंच असून, तो चांगला धष्टपुष्ट होता. त्याची छाती रुंद होती. त्याचे हात पाय मजबूत होते, व त्याचा वर्ण काळा सांवळा होता. त्याचा चेहेरा जरी फारसा सुंदर नव्हता, तरी त्याची गणना कुरूप मनुष्यांमध्यें झाली नसती. त्याच्या अंगावर सध्यां जीं वस्त्रें होतीं, त्यांहून अधिक मोलाचीं वस्त्रें व कांहीं अलंकार जर त्याच्या अंगावर असते, तर तो सध्यांपेक्षां स्वार्‍यांनें अधिक सुंदर दिसला असता. त्याच्या यजमानाच्या अंगावर असलेल्या वस्त्रांपेक्षां त्याच्या अंगावरील वस्त्रें कमी किमतीचीं असल्यामुळें तो सामान्य प्रतीच्या नोकराप्रमाणें दिसत असे. त्याच्या पोषाकाची तऱ्हा जरी त्याच्या धन्याच्या पोषाकाप्रमाणेंच होती, तरी त्याच्या मुद्रेवरून तो मूळचा बागलाणांतील रहिवासी असावा, असें अनुमान करतां येत होतें.

हे दोघे प्रवासी धर्मशाळेजवळ आल्याबरोबर ते घोड्यांवरून खालीं उतरले. नोकरानें आपला व आपल्या धन्याचा असे दोन्ही घोडे देवळाच्या मागच्या बाजूला मणिभद्रानें दाखविलेल्या जागीं नेऊन बांधले; आणि धर्मशाळेंतील एका खोलींत गाशे पसरले. नंतर मणिभद्रानें पुढें होऊन पाहुण्यांस कांहीं हवें-नको याची चौकशी केली. परंतु आलेल्या गृहस्थांस कांहींच नको असल्यामुळें त्यांनीं तसें सांगतांच मणिभद्र तेथून निघून गेला. तो त्या खोलींतून बाहेर येत असतां, कधींच माहीत नसलेल्या अशा एका चमत्कारिक भाषेमध्यें त्या धनी-चाकरांचीं एक दोन प्रश्नोत्तरें झालेलीं त्याच्या कानावर आलीं.

वेळ सायंकाळची असल्यामुळें, ते प्रवासी रात्रभर त्याच धर्मशाळेंत वस्तीस राहावयाचे होते. नोकरानें चूल-चौका करून कंठाळींतून प्रवासी साहित्य काढून स्वयंपाकास प्रारंभ केला. त्या नोकरापाशीं सर्व साहित्य तयार होतें. मणिभद्राच्या दुकानांतून कांहीं तरी जिन्नस खरेदी करणें हें शिष्टाचाराचें आहे, असें समजून त्यानें कांहीं जुजबी जिन्नस भरपूर किंमत देऊन खरेदी केले.

या वेळीं अर्थातच त्या दोघांचें थोडेसें संभाषण झालें. मणिभद्रानें प्रवासी कोठून आले, आणि जावयाचें कोठें, याची चौकशी केली. त्यांचें तें संभाषण प्रस्तुत कथानकास अवश्य असल्यामुळें, त्यांतील महत्त्वाचा भाग तेवढा आम्हीं येथें देतों.

मणिभद्र म्हणाला,—'प्रतापपुराकडे जाण्याचा 'पिशाच-सोपान' नामक घांट येथून अगदीं जवळ आहे, हें आपणांस माहीत नाहीं यावरून आपण या प्रदेशांत पूर्वी कधीं आलां नसाल, हें अगदीं उघड दिसत आहे.'

सेवकानें उत्तर केलें,—'होय; आपला तर्क खरा आहे. मी जरी याच देशचा रहिवासी आहें, तरी मी कधीं इकडच्या डोंगराळ प्रदेशामध्यें प्रवास केलेला नाहीं. या प्रदेशाखेरीजच्या बागलाणांतील इतर मुलखांतला खडान्‌खडा मला माहीत आहे.'

मणिभद्रानें विचारलें,—'तर मग तुमच्या बरोबरच्या या पाहुण्यांची आणि तुमची

कडेच कोठें तरी गांठ पडली, आणि तुम्ही यांच्या नोकरीस राहिलां असें मला वाटतें.'

सेवकानें सांगितलें,–'होय; असें खरें. आम्ही कोण, कोठून आलों, जाणार कोठें, ही माहिती तर तुम्हाला समजलीच आहे. यासाठीं मी आतां जें आपल्यास विचारतों तेवढें मला सांगा म्हणजे झालें.' असें म्हणून जवळच असलेली द्रव्याची पिशवी हातीं घेत तो सेवक पुढें म्हणाला,–'मी जी माहिती विचारीत आहें, ती तुम्ही सांगाल, तर त्यांत तुमचा फायदाच आहे. तर सांगा, प्रतापपुरच्या दरींत उतरण्यास जवळचा मार्ग कोणता?'

मणिभद्रानें सांगितलें,–'या धर्मशाळेच्या उत्तरेकडे जो मोठा थोरला मळलेला रस्ता जातो, त्याच रस्त्यानें सुमारें तीन कोस पुढें गेलां, म्हणजे तुम्ही या पठाराच्या अगदीं कडेवर जाऊन पोंचाल. तेथें उजव्या बाजूस जो कडा आहे, त्याला त्रिशूल असें नांव आहे. या कड्याच्या बाजूनें जो रस्ता जातो, त्यालाच 'पिशाच-सोपान' असें नांव आहे. पण खरेंच सांगतों, तो रस्ता इतका अवघड आहे–'

सेवक मध्येंच म्हणाला,–'रस्ता कितीही बिकट असला, तरी त्याची आम्हीं बिलकुल पर्वा करीत नाहीं. अशा प्रकारचे बिकट मार्ग आम्हीं पुष्कळ पाहिले आहेत. फक्त त्या घांटानें आम्हांस दरींत उतरतां येईल, इतकें आम्हांस समजलें, म्हणजे पुरे. त्या घांटाच्या नांवाला भिऊन जाण्याइतके आम्हीं कच्चे नाहीं, अशी आमची खात्री आहे.'

मणिभद्रानें सांगितलें,–'पिशाच-सोपानावर तुम्हीं पाय ठेविला, म्हणजे तुम्हीं प्रतापपुरच्या हद्दीमध्यें गेलांत. त्या घाटांतून तुम्ही खालीं गेलां, म्हणजे थेट प्रतापपुराच्या दरींत जाऊन दाखल व्हाल. तेथून आणखी पुढें गेलां, म्हणजे आपण थेट किरातांधिपति दृढमंध महाराजांच्या राजवाड्यापाशीं जाऊन पोंचाल.' सेवक म्हणाला,–'ठीक आहे. आतां तो रस्ता माझ्या चांगला ध्यानांत आला.'

असें म्हणून त्या सेवकानें थैलींतून बरेंच द्रव्य काढून तें त्यानें मणिभद्राला दिलें. तें घेऊन मणिभद्रानें आनंद प्रदर्शित केला; पण झालेल्या द्रव्यप्राप्तीनें आनंदित होऊन, मणिभद्रानें चाललेलें बोलणें तेवढ्यावरच थांबविलें नाहीं. तर आपली जिज्ञासा तृप्त करण्यासाठीं तो जरा अधिक सलगी दाखवीत पुढें सरला. त्यानें आपली मुद्रा अगदीं गंभीर केली, आणि विश्वासदर्शक अशा नाजूक स्वरानें तो म्हणाला,–'तुम्हाला मीं प्रतापपुरचा मार्ग सांगितला, त्याचा तर तुम्हाला उपयोग होईलच; पण जेथें आपण जाणार तेथील लोकांसंबंधानें जर आपणांस मीं कांहीं अधिक माहिती सांगितली, तर तिचा आपणांस जास्त उपयोग होईल कीं नाहीं?'

किंचित् बेपर्वाईनें तो सेवक म्हणाला,–'आम्ही जेथें जाणार आहों, त्या जागेसंबंधानें आम्हाला जितकी माहिती पाहिजे होती, तितकी आम्हाला पूर्वीच मिळालेली आहे.' तथापि हें भाषण करीत असतां, या माणसाकडून कांहीं अधिक माहिती मिळाल्यास तिचा आपणांस अधिक उपयोग होईल, असा विचार त्याच्या मनांत येऊन तो म्हणाला,–'तरी पण, आपण जें कांहीं सांगाल, तें ऐकून घेण्यास मी तयार आहें.'

मणिभद्र बोलला,–'आपण कसे झालां तरी आमच्या प्रांतांतील रहिवासी आहां, हें आपल्या भाषणावरून माझ्या स्पष्टपणें ध्यानीं येत आहे. अर्थात् आपल्या देशबंधूवर पुढें संकट येऊं नये, म्हणून त्याला अगोदर सूचना देऊन सावध करणें, हें प्रत्येकाचें कर्तव्यकर्म आहे, असें मी समजतों. आपण जर परकी देशांतील रहिवासी असतां, तर आपल्या संबंधानें मला विशेष काळजी वाटली नसती.'

सेवक म्हणाला,–'माझे विचार आपल्या इतके कोते नाहींत. प्रत्येक मनुष्यानें प्रत्येक

मनुष्यास साह्य करणें हा सर्वांचा धर्म आहे असें मी ससजतों. एका मनुष्यानें दुसऱ्या मनुष्याला साह्य करताना हा आप्त आणि हा परका, असा भेद ठेवणें हें असमंजसपणाचें लक्षण आहे.

मणिभद्र म्हणाला,–' आपण बोलतां, हें जरी खरें आहे, तरी मनुष्यानें प्रत्येक कृत्य देश-कालाकडे नजर देऊनच केलें पाहिजे. सध्यांचा काल मोठा नाजूक आहे. सध्यां जीं राज्यकारस्थानें चाललीं आहेत, त्यांसंबंधानें विचार करतां आपली दृष्टि जग आकुंचित करणें आपणांस भाग आहे.'

मणिभद्राच्या या भाषणाचा रोंख जरी त्या सेवकास पूर्णपणें समजला होता, तरी तसें न दाखवितां तो म्हणाला,–' आपण काय म्हणतां, तें नीटसें माझ्या ध्यानीं आलें नाहीं,'

परंतु मणिभद्र मोठा वस्ताद मनुष्य होता. अनेक प्रकारच्या लोकांशीं व्यवहार करण्याचे प्रसंग त्याला नेहमीं येत असल्यामुळें माणसाचा रागरंग त्याला तेव्हांच ओळखतां येत असे. तो त्या सेवकास म्हणाला,–' असें कसें होईल ! आपणां उभयतांच्या पोषाखावरून आपण नुकतेच चंपावर्तीहून आलां आहोंत, असें स्पष्ट दिसत आहे. असें असतां चंपावर्तीमध्यें काय काय कारस्थानें चाललीं आहेत, हें आपणास अगदींच समजलें नसेल, असें कसें होईल ! '

तो धूर्त सेवक यासंबंधानें स्पष्ट असें कांहींच उत्तर न देतां स्मितपूर्वक बोलला,–' सध्या आपण मला ज्या सावधपणाच्या सूचना देणार आहां, तेवढ्याच मला ऐकावयाच्या आहेत.'

मणिभद्रही स्मितपूर्वक बोलला,–' मीं आतां ज्या गोष्टीचा उल्लेख केला, ती गोष्ट तुम्हांस माहीत असो कीं नसो, तिच्या संबंधानें मला जें काय माहीत आहे, तें मी स्पष्ट बोलून टाकतों. मी जें सांगणार तें माझ्या समजाप्रमाणें खरें आहे. मीं असें ऐकलें आहे कीं, सध्या सौराष्ट्राच्या गादीवर असणाऱ्या रत्नाकर महाराजांवर त्यांचा पुतण्या निंवराज स्वारी करणार आहे. आणि त्या सिंहासन आपण बळकाविणार आहे. ह आमच्या वागळाणांतील बहुतेक संस्थानिकांचा ओढा रत्नाकर महाराजांकडे आहे. या संस्थानिकांचें म्हणणें असें आहे कीं, सौराष्ट्राचें राज्य केवल आमच्या मदतीवर चालले आहे. दरसाल आम्ही नियमित खंडणी देत असतों, आणि जेव्हां कधीं त्या राज्यावर परशत्रु येतो, तेव्हां सौराष्ट्राच्या वतीनें आम्ही युद्धास सिद्ध होत असतों. अर्थात् सौराष्ट्रावर राज्य करणारानें आमच्या विचारानें वागलें पाहिजे. रत्नाकरमहाराजांचा इकडील बहुतेक संस्थानिकांस अभिमान आहे, आणि त्यांतल्या त्यांत प्रतापपुरकर दृढसंध राजाला तो विशेष आहे. अशा प्रसंगीं तुमच्या यजमानांसारखे परकी गृहस्थ आपल्या प्रदेशांत आलेले दृष्टीस पडल्यास दृढसंधचा त्यांचा विश्वास धरील असें मला वाटत नाहीं. तुमच्या धन्यासंबंधानें मी असें बोलतों, याचें तुम्हाला वाईट वाटूं नये. समजा, तुम्ही हेर आहां, असें जर दृढसंधाच्या मनानें घेतलें, तर कसें होईल ! तो तुम्हाला जिवंत सोडील काय ! हे दृढसंधमहाराज किती करड्या स्वभावाचे आहेत, हें तुम्हाला माहीत नसेल ! नेहमीं मिल्ललोकांमध्यें वागत असल्यामुळें त्यांना त्या कडव्या जातीचे पुष्कळ गुण लागले आहेत. एकदां त्यांचें मन कलुषित झालें, म्हणजे ते काय करतील याचा नेम नाहीं.'

त्या सेवकानें माणिभद्राचें हें सर्व भाषण अगदीं संथपणें ऐकून घेतलें. हें भाषण ऐकत असतां त्याच्या मनावर या गोष्टीच्या सत्यतेचें प्रतिबिंब उठल्यावेरीज राहिलें नव्हतें. थोडा वेळ आपल्याशींच विचार करून तो म्हणाला,–' तुमचें भाषण जरी खरें असलें, तरी दृढसंध महाराज. आम्हीं नुसते परकी आहोंत म्हणून आमच्यावर शस्त्र धरतील, असें मला वाटत नाहीं. जे शूर आणि करडे पुरुष असतात, ते दिलदारही असतात.'

मणिभद्र म्हणाला,–' दृढसंध महाराज काय करतील आणि काय करणार नाहींत, हें मी काय सांगूं ? आपल्याला सूचना देऊन सावध करणें हें माझें काम होतें, तें मीं केलें. आणखी एक गोष्ट सांगतों, कीं आपले यजमान येथें आल्यापासून अगदीं एकांतीं बसून राहिले आहेत; त्यांनीं आपलें नांव-गांव वगैरे आम्हास अगदीं समजूं दिलें नाहीं; पण हा प्रकार प्रतापपुरामध्यें खपावयाचा नाहीं. ते जर तेथें अधिक मोकळ्या मनानें वागतील तर बरें. '

सेवक हंसून म्हणाला,–' माझे यजमान येथें–या धर्मशाळेंत अशा रीतीनें राहिले, म्हणून ते कोठेंही गेले तरी असेच वागतील, अशी तुमची कल्पना असल्यास ती साफ चुकीची आहे. त्यांच्यासारख्या थोर गृहस्थांनीं अशा ठिकाणीं याहून मोकळेपणानें कसें वागावयाचें ? आमचीं नांवें तुम्हाला समजलीं नसल्यामुळें, तुमचा आमच्याविषयीं गैरसमज झालेला दिसतो. तो जर तसाच राहूं दिला, तर तुम्हीं आमच्या संबंधानें लोकांस कांहीं तरी सांगत सुटाल, म्हणून आमचीं नांवें मी तुम्हांस सांगून ठेवितों. माझ्या यजमानांचें नांव सरदार हलधर असें असून माझें नांव सत्यरथ असें आहे. आतां तरी तुमचें समाधान होईल ना ! '

मणिभद्रानें विचारलें,– ' सरदार हलधर हे कोण आहेत !

सत्यरथानें उत्तर केलें,–' ते चंपावतीचे एक सुखवस्तु गृहस्थ आहेत. '

मणिभद्रानें आश्चर्यानें विचारलें,–' काय ! चंपावतीचे ! म्हणजे प्रत्यक्ष निंबराजाच्या राजधानीचे रहिवासी ? तर मग, अहो सत्यरथ, तुम्ही प्रतापपुरीं मोठ्या सावधपणानेंच गेलें पाहिजे. '

सत्यरथ स्मित करून म्हणाला,–' परंतु आमचे यजमान जर निंबराजाच्या विरुद्ध पक्षांतील असले तर ? '

मणिभद्र म्हणाला,–' हें जर तुम्हाला सिद्ध करून देतां आलें, तर प्रतापपुरच्या राज्यांत तुमचा मोठा सन्मान होईल, पण जर कां तुम्हीं निंबराजाच्या विरुद्धपक्षाचे आहां अशी प्रतापपुरकरांची खात्री पटली नाहीं, तर तुम्हाला फार कठीण पडेल. कारण निंबराजाचें नांव ऐकलें, कीं प्रतापपुरकरांच्या पायांची आग मस्तकास चढते ! '

सत्यरथ म्हणाला,—' तुम्ही यासंबंधानें मला वेळींच सूचना देऊन सावध केलें, हें फार चांगलें झालें. असो, स्वयंपाकाची सर्व तयारी झालीच आहे. आतां गोष्टींत वेळ घालवून उपयोग नाहीं. यजमान जेवणाची वाट पाहत असतील. '

त्या रात्रीं सांगण्यासारखी विशेष गोष्ट घडली नाहीं. जेवणें आटोपल्यावर ते धनीचाकर स्वस्थपणें झोंपी गेले. मोठ्या पहांटेस उठून सत्यरथानें घोड्यावर खोगीर चढविलें, आणि पुढील प्रवासाची तयारी केली.

उजाडण्यापूर्वीच त्या उभयतांनीं तीन कोसांचा प्रवास संपवून ते त्रिशूल नांवाच्या टेंकडीपाशीं येऊन पोंचले. यावेळीं सरदार हलधर थोडा पुढें होता, म्हणून त्यानें आपला घोडा तेथें उभा केला; हें पाहून सत्यरथानें आपल्या घोड्यास टांच मारिली आणि तो आपल्या धन्यापाशीं येऊन उभा राहिला.

नंतर हलधरानें त्यास विचारलें,– 'सत्यरथा, तुझें काल त्या मणिभद्राचरोबर जें भाषण झालें, त्यावरून तुला कांहीं विशेष गोष्टी समजल्या आहेत काय ?,

सत्यरथानें उत्तर केलें,–' होय; आपण प्रतापपुरीं जातांना मोठ्या सावधपणानें गेलें पाहिजे. कारण, सध्यां चालू असलेलीं कारस्थानें इकडील लोकांस बरीच समजलीं आहेत, अशी माझी खात्री झालेली आहे. ,

हलधरानें विचारलें,–' आम्ही या प्रदेशांतील लोकांसंबंधानें जी हकीकत ऐकिली होती, ती खरी कीं खोटी ? ,

सत्यरथ म्हणाला,–'आपण जें ऐकिलें तें अक्षरशः खरें आहे. या प्रांतांतील सर्व लोक रत्नाकराच्या पक्षांतील आहेत, आणि दृढसंधाला तर रत्नाकराच्या गादीचा पूर्ण अभिमान आहे.'

हलधर म्हणाला,–'या ओसाड मुलखाचा राजा तो दृढसंघ इतका मोठा बलाढ्य आहे, आणि त्याच्या एकट्याच्या बळावर इकडील सर्व संस्थानिक इतके अवलंबून आहेत. याचें मला फार आश्चर्य वाटतें.'

सत्यरथ म्हणाला,–'या दृढसंधाच्या मुलखांत शेतकीचें उत्पन्न जरी फारसें नसलें, तरी घोडे, गाई, म्हशी, मेंढरें, बकरीं वगैरे जनावरांची निपज या मुलखांत फार चांगली होते. या दरीमध्यें जिकडे तिकडे भिल्लांचीं झोंपडीं आहेत, आणि नुसत्या सूचनेबरोबर पांच हजार शूर भिल्ल आपल्या शस्त्रांसह युद्धास सिद्ध होतील असें त्याचें सामर्थ्य आहे. यामुळें भोंवतालचे संस्थानिक त्याला फार वचकून असतात.'

यानंतर सत्यरथानें मणिभद्राच्या मुखानें ऐकलेल्या हकीकतीचा आपल्या धन्यापाशीं पाढा वाचला. हलधरानेंही ती सर्व हकीकत अगदीं शांतपणें ऐकून घेतली. या वेळीं तो ती हकीकत इतक्या शांतपणें ऐकत होता कीं, त्याच्या स्वभावाची माहिती नसणाऱ्या गृहस्थानें जर यावेळीं त्याला पाहिलें असतें, तर तो सत्यरथाचें भाषण ऐकत नसून त्याचें मन दुसरीकडेच कोठें आहे, असें त्यास वाटलें असतें. सगळी हकीकत ऐकून घेतल्यावर 'ठीक आहे; पाहून घेऊं.' इतकेच शब्द त्यानें उच्चारिले.

यानंतर ते उभयतां मोठ्या सावधपणानें घांट उतरूं लागले. तो घाट अतिशय खडकाळ होता; आणि त्याच्या दोन्ही बाजूंस झाडी किर्र माजलेली होती. रस्त्याच्या भयानक स्वरूपावरूनच त्याला 'पिशाच-सोपान' असें विलक्षण नांव प्राप्त झालें होतें. कित्येक ठिकाणीं रस्ता इतका खडकाळ होता कीं, तेथें त्यांना घोड्यांवरून खालीं उतरून मोठ्या सावधपणानें आपापल्या जनावरांस संभाळून न्यावें लागत होतें. हा प्रवास त्यांना फारच कंटाळवाणा वाटत होता, तरी ते मुकाट्यानें एकेक पाऊल पुढें टाकीत होते. त्यांना आणि त्यांच्या घोड्यांना किती ठिकाणीं ठेंचा लागल्या असतील, आणि टोकरा बसल्या असतील, याची गणतीच नाहीं. रस्त्यांतील दगड, झाडांचे खुंट, बाजूच्या झुडपांच्या रस्त्यावर आडव्या आलेल्या फांद्या, यांना न जुमानतां ते एक एक पाऊल पुढें पुढें घालीत सावधपणानें घांट उतरत होते. या प्रवासामध्यें त्यांना स्वतःच्या शरीराच्या काळजीपेक्षां आपापल्या घोड्यांच्या शरीराची काळजी अधिक घ्यावी लागत होती. जर त्यांजपाशीं घोडे नसते, तर त्यांना इतकें आपटतफुटत ठेंचा खात जावें लागलें नसतें.

सरदार हलधराचा बांधा जरी नाजूक होता, तरी तो या श्रमांस न जुमानतां मोठ्या नेटानें पुढें चालला होता. या प्रवासामध्यें त्यानें सहनशीलता, आत्मसंयमन, दीर्घप्रयत्न वगैरे आपल्या अंगचे गुण व्यक्त केले होते; त्यावरून याहून अधिक महत्त्वाच्या कृत्यांमध्यें त्यानें हे गुण पुष्कळ पटीनें दाखविले असते, असें अनुमान करावयास हरकत नव्हती. सत्यरथ तर, अंगापिंडानें रांकट होता. त्यानें या प्रवासांतील दुःखें अगदीं सहज सहन केलीं होतीं. अशा प्रकारें मोठ्या सावधपणानें प्रवास करीत असतां, भर दोन प्रहरच्या सुमारास ते प्रतापपुरच्या भयंकर दरींत येऊन दाखल झाले.

प्रकरण २ रें.

प्रतापपुरची दरी.

ज्या दरीमधून ते दोघे सध्या प्रवास करीत होते, ती दरी अत्यंत भयानक होती, यांत शंका नाहीं. या दरीसारख्या खोल भयंकर

आणि गंभीर दऱ्या पृथ्वीच्या पाठीवर विरळाच दृष्टीस पडतील. सह्या पर्वताचे दोन विशाळ बाहू कित्येक कोस एकसारखे आडवे समांतर पसरलेले असल्यामुळें त्या दोन डोंगरांमध्यें असलेल्या या दरीस मोठें भव्य स्वरूप प्राप्त झालेलें होतें. या प्रत्येक पर्वतावरून मोठमोठाले ओढे कड्यावरून खालीं धडाधड उड्या घेत होते, आणि त्यांचा मेघगर्जनेला लज्जित करणारा प्रचंड ध्वनि दशादिशा दणाणून सोडीत होता. ह्या सर्व ओढ्यांचें पाणी दरीच्या तळाशीं एकत्र जमून त्याची एक मोठी थोरली नदी बनली होती, आणि ती आपल्या उदकानें तटप्रदेश जर्जर करीत त्या दरींतून मोठ्या सोसाट्यानें वाहात होती. या नदीला तिच्या कांठीं वास करणाऱ्या भिल्लांनीं सोना असें नांव दिलेलें होतें. पर्वताच्या सपाटीपासून ही दरी कमींत कमी एक हजार हात तरी खोल असावी. यामुळें दोन प्रहरची वेळ खेरीज करून तिच्यामध्यें बहुधा सूर्यकिरणांचा प्रवेश होत नसे. फक्त दोन प्रहरीं ज्या वेळीं भगवान् सूर्यनारायण आपल्या दैदिप्यमान् किरणांनीं आकाशाच्या मध्यभागीं प्रकाशमान् होत असे, त्यावेळींच काय तो सूर्यकिरणांचा त्या दरीमध्यें प्रवेश होत असे, व त्याच वेळीं काय तो त्या दरींतील उदासीनता उत्पन्न करणारा देखावा थोडासा कमी भासत असे.

कित्येक ठिकाणीं तर दरी अगदीं अरुंद होती. त्या ठिकाणीं दरीच्या एका बाजूच्या तटापासून पलीकडचा तट दोनशें हातही असेल नसेल. पण प्रवाश्यांना पिशाचसोपानावरून जातांनां या तटांपैकीं एका तटावरून जावें लागे. हा तटप्रदेश फारच भयंकर दिसत असे. कित्येक ठिकाणीं प्रवाश्याच्या बाजूला साफ तुटलेला कडा आढळे, तर कित्येक ठिकाणीं रस्त्याचा भाग दरीकडे झुकलेला आहे, असें आढळून येई. आणि जर का आपल्या पायांखालचा कडा एकाएकीं कोसळला, तर आपली एका क्षणार्धांत गढडी वळून आपणांस सोनानदीच्या गंभीर पात्रांत गटंगळ्या खाण्याचा प्रसंग येईल असें वाटसराच्या मनांत येऊन त्याच्या उरांत धडकी भरे. अशा प्रकारच्या वाटेनें तो कांहीं पुढें जातो न जातो, इतक्यांत आपल्या डोक्यावर पर्वताचे विशाल कडे लोंबत आहेत, असें त्यास आढळून येई, आणि जर दुर्दैवानें यांतील एक लहानसा दगड सुटून तो जर आपल्या अंगावर पडला, तर त्याखालीं आपला चेंदामेंदा उडून जावयास क्षणाचाही विलंब लागणार नाहीं, असें मनांत येऊन त्याच्या अंगावर कांटा उभा रहात असे. कित्येक ठिकाणीं कडे एकमेकांवर रचल्याप्रमाणें दिसत असत. एखाद्या राक्षसानें प्रचंड पर्वत एकमेकांवर ठेवून त्यांची त्या ठिकाणी जणुंकाय तटबंदी उभारली असावी असा तेथें भास होत असे. कित्येक ठिकाणीं उदकप्रवाहानें मोठमोठे बोगदे जमले होते. त्याजागीं दोन बाजूंस दोन प्रचंड शिळा उभ्या असून त्यावर एक लांब शिळा आडवी असल्यामुळें नैसर्गिक पुलाचा भास होत असे. कित्येक ठिकाणीं दरीच्या दोन्ही बाजूस असलेल्या डोंगरांच्या कड्यांच्या वेगवेगळ्या आकृति बनलेल्या दिसून येत असत. कित्येक ठिकाणीं ते कडे प्रचंड किल्ल्याच्या तटासारखे, कित्येक ठिकाणीं बुरुजांसारखे व कित्येक ठिकाणीं जंग्यांप्रमाणें दिसत असत. जणूंकाय प्राचीनकाळीं निसर्गदेवता आपल्या बाल्यावस्थेमध्यें आपल्या आवडीचे अनेक प्रकारचे खेळ एकत्र करून ती तेथें खेळत बसली असतां एकाएकीं त्या खेळांवरून तिचें मन उडाल्यामुळें ती ते सर्व खेळ जागच्या जागीं तसेच टाकून देऊन घाईघाईनें तेथून उठून गेली; व त्यानंतर तिला पुनः आठवण झाली नाहीं म्हणून ते तिचे सर्व खेळ जिकडे तिकडे विखरून पडले होते, असा त्याठिकाणीं भास होत असे.

सोना नदीच्या तीरावरून ते दोघे प्रवासी जसजसे पुढें चालले, तसतसा त्यांचा रस्ता

अधिकाधिक चिकट होत होता. जरी त्या वेळीं भर दोन प्रहरची वेळ होती, तरी देखील ते सध्या ज्या ठिकाणी आले होते, त्या ठिकाणीं टळटळीत संध्याकाळच्या वेळे प्रमाणें काळोख पडलेला होता. कारण दरीच्या दोन्हीं बाजूंचे पर्वतांचे कडे या ठिकाणीं फारच झुकलेले असून ते एकमेकांवर चढले असल्यामुळें त्याची छाया खालच्या दरींत पडलेली होती. या कडयांकडे दृष्टी जातांच त्या प्रवाश्यांच्या डोळ्यांपुढें काजवे चमकूं लागले. ते ज्या ठिकाणीं उभे होते, तेथून पांचशें हात उंचीवर पर्वतांच्या झुकत्या कडयांची प्रचंड कमान बनलेली होती. परंतु सोना नदीच्या शुद्ध प्रवाहामध्यें या कमानीचें जें प्रतिबिंब पडलें होतें, त्यामुळें तेथील औदासिन्यजनक देखाव्यालाही एक-प्रकारचें किंचित् रमणीय स्वरूप प्राप्त झालें होतें. त्या ठिकाणीं सूर्यकिरणांचा प्रवेश कधींही होत नसल्यामुळें तेथें मोठमोठ्या वनस्पति अगदीं नव्हत्या; कित्येक लहान लहान झुडपें मात्र तेथें उगवलेलीं होतीं, पण त्यांच्यावर तेज अगदीं नव्हतें. तीं झुडपें अगदीं फटफटीत पांढरीं दिसत; त्यामुळें त्यांच्या दर्शनानें माणसाच्या चित्तास उदासीनता येत असे. पाऊस पडून नदीचें पात्र रक्तासारख्या लालभडक उदकानें भरून गेलें आहे, सोसाट्याचा वारा सुटला आहे, आणि तो आपल्या तडाक्यांत सांपडलेलीं झाडें पिळवटीत पुढें आडव्या आलेल्या कडयावर वेगानें आपटत आहे, भयंकर मेघगर्जना होत आहे, विजा चमकत आहेत, अशा वेळीं जर एकादा प्रवाशी या ठिकाणीं येऊन पोंचला, तर जणुंकाय आपण प्रळयकालचा भयंकर देखावा पहात आहों, असा त्याला भास होऊन आपण सध्या प्रत्यक्ष मृत्युमुखांत पडलों आहों, असें त्याला या ठिकाणीं वाटल्याखेरीज राहिलें नसतें. अशाप्रकारचा प्रसंग जरी सध्या नव्हता, तरी देखील हलधरासारख्या सहासिकाच्या मनांत तेथील भेसूर देखाव्यांच्या दर्शनानें भीतिप्रद विचार उत्पन्न झाल्याखेरीज राहिले नाहींत.

ह्या दरीच्या बाजूचे डोंगर सर्वच ठिकाणीं तुटलेले होते असें नाहीं. पुष्कळ ठिकाणीं त्यांच्या उतरणी फार चांगल्या होत्या, व त्यांवर उत्तम प्रकारचें गवत उगवलेलें होतें. या उतरणींवरून माणसांस सहजपणें फिरतां येत असे; इतकेंच नव्हे, तर प्रतापपुरच्या हद्दींतील गुरेंढोरें या उतरणींवर आनंदानें चरत असत. कित्येक ठिकाणीं मोठमोठालीं कुरणें देखील वाढलेलीं होतीं. अशा प्रकारच्या कुरणांच्या आजूबाजूस सोईवार जाग्यांवर दृढसंधाच्या प्रजेपैकीं कित्येक भिल्लांच्या झोंपड्या होत्या. ह्या झोंपड्या म्हणजे ऊन व पाऊस यांपासून सरासरी रक्षण व्हावें, अशा प्रकारच्या होत्या. झांवळ्या आणि इतर्‍या कित्येक प्रकारच्या झाडांच्या फांद्या, यांनीं शाकारून त्या झोंपड्या बनविलेल्या होत्या; त्या झोंपड्यांस दगडमातीच्या भिंती वगैरे मुळींच नसून त्यांऐवजीं झाडांच्या फांद्या एकत्र करून त्यांचे जागजागीं कूड बांधिलेले होते. बहुतेक झोंपड्याभोंवतीं बरींच सपाट जागा असे; तीं मध्यें पुष्कळ प्रकारची शाकभाजी व फळफळावळ झोंपडींतील रहिवाशी भिल्ल पिकवीत असत; व त्यामुळें त्या झोंपड्याजवळच्या प्रदेशास शोभा येत असे. त्याचप्रमाणें या प्रदेशामध्यें गाईम्हशींचे मोठमोठाले कळप आनंदानें फिरतांना आढळून येत, त्यामुळें त्या बिकट वाटेनें येणाऱ्या जाणाऱ्या प्रवाशाच्या मनाला थोडेसें समाधान वाटे; आणि तेवढ्या मानानें त्याला भोंवतालचा देखावा जरा कमी उदासीन दिसूं लागे. या उतरणीच्या माथ्याकडे नजर टाकल्यास रानचकरी या कडयावरून त्या कडयावर निर्भयपणें उड्या मारीत हिंडत आहेत, असें आढळून येई. त्या दरींत पक्षी अतोनात होते; इतके कीं, तेथील जुन्या डोंगराच्या माथ्यावर एसादे

असल्यामुळें त्यांना एखाद्या गरुडपक्षी असावयाचाच; आणि त्याच्याकडे थोडावेळ नजर टाकल्यामुळें तो एकाद्या करड्यावर झेंप घालीत आहे; असें आढळल्यासारखेंच व्हावयाचें नाहीं.

तथापि त्या दरीमध्यें मधून मधून दृष्टीस पडणाऱ्या झोंपड्या, कुरणें, गुरेंढोरें, बाग, वगैरे ग्रामसंबंधी देखाव्यांमुळें त्या दरीची उदासीनता पूर्णपणें नाहींशी झालेली नव्हती. या भयानक दरीच, सरदार हलधरानें पूर्वी बऱ्याच प्रसंगीं वर्णन ऐकलेलें होतें, पण तेथील प्रत्यक्ष स्थिति पाहिल्यावर आपण ऐकलेलें वर्णन कांहींच नव्हे, असें त्यास आढळून आलें आणि त्याचें मन अतिशय उदास झालें. उत्तरोत्तर त्या दरींतील उदासीनता त्याला अभद्रसूचक वाटूं लागली. वधस्थळाकडे जात असलेल्या अपराध्याच्या अंत:करणांत जशा प्रकारचे विचार उत्पन्न होतात, तशा प्रकारचे विचार त्याच्या अंत:करणांत येऊं लागले! कड्यांवरून खालीं पडणाऱ्या ओढ्यांचा गंभीर ध्वनि आणि प्रतिध्वनि, गरुडपक्ष्याचा शब्द आणि प्रतिशब्द व सोनानदीचा खळखळाट, हीं एकसारखीं कानीं पडत आल्यामुळें त्या प्रवाश्यांचीं मनें अकल्पित भयानें भेदरल्यासारखीं झालीं होतीं. या प्रदेशांतून प्रवास करणारा पुरुष कितीही निधडया छातीचा असला, तरी येथील भव्य पण कंटाळवाणा आणि भयानक देखावा पाहून त्याच्या हृदयांत धडकी भरल्याखेरीज राहिली नसती. मोठमोठाल्या कडेकपारी असलेल्या भव्य डोंगरांच्या रांगा दोन बाजूंस आडव्या पसरलेल्या आहेत, मधून मधून कांहीं उतरण असून त्यांच्यावरून मोठमोठे ओढे वाहत आहेत, समोरासमोर असलेले दोन्ही डोंगरांचे कडे पुढें झुकले असून त्यांची कमान बनली आहे, अशा प्रकारचा तो देखावा मोठा [illegible] यानक होता.

ही दरी त्रिशूळ नांवाच्या टेकडीपासून प्रतापपुरापर्यंत पसरलेली असून, तिच्या एका कडेवरून जी दगडी घांटी चढिलेली होती तिलाच 'पिशाच-सोपान' असें नांव होतें. ही दरी सुमारें पांच कोस लांब होती. आमच्या प्रवाश्यांस दृढसंधगजाच्या भेटीसाठीं प्रतापपुरास जावयाचें असल्यामुळें त्यांस या दरीच्या प्रारंभापासून शेवटापर्यंत असलेला सर्व बिकट मार्ग क्रमावयाचा होता. हा त्यांचा प्रवास मध्यें एक मोठें संकट आल्याखेरीज पार पडला नाहीं, हें पुढील हकीकतीवरून वाचकांच्या लक्ष्यांत येईल.

दरीच्या कांठानें ते उभयतां प्रवास करीत असतां, सुमारें चार कोस रस्ता मागें टाकल्यावर ते एका सुपीक अशा उतरणी पाशीं येऊन पोंचले. या ठिकाणीं भिल्लांच्या कित्येक झोंपड्या असून त्यांभोंवतीं लहान लहान फळबागा होत्या. या बागांपलीकडे असलेल्या कुरणांमध्यें भिल्लांची सर्व संपत्ति अशीं जीं गुरेंढोरें आणि मेंढरें तीं आनंदानें क्रीडा करीत होतीं. या उतरणीपाशीं रस्ता जरा बरा असल्यामुळें हलधर आणि सत्यरथ सध्यां घोड्यावर बसून सावकाशपणें चालले होते. इतक्यांत आपल्यास उद्देशून कोणी उच्चारलेला दरडावणीचा शब्द त्यांच्या कानीं आला. प्रथमत: हा शब्द कोणा तरी रानटी जनावराचाच असावा, असें त्यांना भासलें, म्हणून त्यांनीं दरीच्या दोन्ही बाजूंच्या डोंगरावर सावकाशपणें नजर टाकली. कारण हा शब्द आपल्या जवळूनच निघालेला असावा, अशी त्यांच्या मनांत मुळींच कल्पना आलेली नव्हती. बाजूच्या डोंगरांवर कित्येक माणसें होती, पण त्यांचा शब्द इतक्या दूर ऐकूं येणें शक्य नव्हतें. अशा रीतीनें ते गोंधळांत पडले आहेत, इतक्यांत आपल्या उजव्या बाजूच्या उतरणीवरून एक धिप्पाड आणि अतिशय उंच माणूस आपणाकडे मोठ्या वेगानें धांवत येत आहे, असें त्यांस आढळून आलें. कड्यावरून सुटलेला दगड ज्याप्रमाणें मोठ्या वेगानें गडगडत खालीं येत असतो;

त्याप्रमाणें तो माणूस मोठ्या वेगानें त्यांजकडे येत होता. तो मनुष्य जेव्हां त्यांच्याजवळ येऊन उभा राहिला, तेव्हां त्याची ती अवाढव्य उंची पाहून त्यांस फार आश्चर्य वाटलें. हा मनुष्य जातीनें भिल्ल होता, हें त्याच्या वेषावरून तत्काल ध्यानीं येत होतें. त्याच्या मस्तकाचे काळेभोर केश त्याच्या खांद्यावर अस्ताव्यस्त विखरलेले होते. त्याचें नाक, डोळे वगैरे अवयव जरी सुरेख होते, तरी त्याची मुद्रा फार उग्र आणि भेसूर दिसत होती. त्या माणसाच्या एकंदर देखाव्यावरून तो या भयानक दरीला शोभेल असा रहिवासी आहे, असें त्यांच्या मनांत आल्याखेरीज राहिलें नाहीं.

ह्या भिल्लाची उंची वाजवीपेक्षां पुष्कळ फाजील होती. माणसांची मध्यम उंची जवळजवळ साडेतीन हात मानण्याचा प्रघात आहे, पण त्या भिल्लाची उंची जवळजवळ साडेचार हात होती. अशाप्रकारची विलक्षण मूर्ति आपल्यापाशीं उभी पाहून सरदार हलधराला सुद्धां थोडीशी भीति वाटल्याखेरीज राहिली नाहीं. त्याचा सेवक सत्यरथ तर आश्चर्यानें गुंग होऊन त्या धिप्पाड रानटी भिल्लाकडे टक लावून पहातच उभा राहिला! त्या भिल्लाच्या हातीं एक मोठी थोरली अवजड तरवार असून, तो किंचित् तीक्ष्ण नजरेनें या प्रवाश्यांकडे पहात होता; त्यामुळें सरदार हलधराचा हात आपोआप आपल्या कमरेस ठेवलेल्या तमंचाकडे वळला.

हलधराच्या घोड्याचा लगाम धरून त्या भिल्लानें तो घोडा उभा केला. या वेळीं त्या उंच भिल्लाचें डोकें घोड्यावर असलेल्या हलधराच्या डोक्याइतक्या उंचीवर आलेलें होतें. त्या भिल्लानें त्यांस दरडावून विचारलें,–'तुम्हीं कोण अहां, आणि या दरींत येण्याचें कारण काय?'

सरदार हलधरानें उत्तर केलें,–'आम्हीं प्रवासी असून आम्हांला दृढसंध महाराजांची भेट घ्यावयाची आहे.'

त्या भिल्लानें म्हटलें,–"असें काय? पण तुम्ही या देशांतील रहिवासी दिसत नाहीं. तुमचा देश कोण?,'

सरदार हलधरानें न भितां उत्तर केलें "मी चंपावतीचा रहिवासी आहें." असें उत्तर केल्यावर त्या भिल्लाच्या मनावर आपल्या भाषणानें काय परिणाम होतो, हें पाहण्यासाठीं त्यानें त्याच्या चेहऱ्यावर आपली तीक्ष्ण दृष्टि रोखून धरिली.

सरदार हलधराच्या उत्तरानें त्या भिल्लाची मुद्रा अधिक उग्र दिसूं लागली. त्यानें पूर्वीहून अधिक जोरानें विचारलें,–"काय? तुम्हीं चंपावतीचे रहिवासी आहां? तुम्ही त्या निंबराजाच्या पक्षांतील आहां कीं काय?"

सरदार हलधरानें उत्तर दिलें,–"नाहीं. आम्ही त्याच्या शत्रुपक्षांतील आहों!'

हें उत्तर खरें आहे, कीं लबाडीचें आहे, हें पाहण्यासाठीं त्या भिल्लानें आपली नजर सरदार हलधराच्या मुखावर कांहीं वेळ रोखून धरिली, परंतु त्या सरदारानें अगदीं न डगमगतां आपली नजर त्याच्या नजरेस भिडवून ठेविली होती; म्हणून तो भिल्ल म्हणाला,–"निंबराजाचे शत्रु ते आमचे मित्र आहेत, असें आम्ही समजतों. त्यांचें स्वागत करण्यास आम्हीं तयार आहोंत. पण त्यांचे मित्र ते आमचे कट्टे शत्रु. त्यांना आमच्या येथें थारा व्हावयाचा नाहीं. तुम्हीं निंबराजाचे शत्रु असाल, तर पुढें व्हा!,'

असें म्हणून तो पहारेकरी भिल्ल घोड्याचा लगाम सोडून डोंगरामध्यें निघून गेला. या घाटांतून जे कोणी जात येत, त्यांची चौकशी करण्याचें काम या दांडग्या भिल्लाकडे असून तो त्या कामासाठीं एका कड्यामध्यें बसून तेथून सर्व घाटांची पहाणी करीत असे. ज्याप्रमाणें त्या डोंगराच्या माथ्यावर घरटीं करून राहणाऱ्या गरुडपक्ष्यांची नजर तीव्र होती, त्याप्रमाणें त्या दांडग्या भिल्लाची नजर तीक्ष्ण असून गरुडपक्षी ज्या प्रमाणें आपल्या भक्ष्यावर वेगानें

झडप घालीत असतो, त्याप्रमाणेंच त्या रस्त्यानें जाणारा कोणी माणूस नजरेस पडतांच तो राक्षसी भिल्ल मोठ्या वेगानें धावून त्यांजपाशीं येत असे.

त्या ठिकाणापासून ते पुढें जात असतां वाटेंत त्यांना आणखी पुष्कळ भिल्ल भेटले; पण त्यांपैकीं एकानें सुद्धां त्यांना विचारिलें नाहीं. कारण, वाटसरांच्या चौकशीसाठीं मुद्दाम पहाऱ्यावर नेमलेल्या त्या दांडगेश्वराला भेटल्याखेरीज ते पुढें येऊं शकले नसतील, अशी प्रत्येक भिल्लाची समजूत होती. हे भिल्ल जरी रानटी होते, तरी त्यांचीं तीं कमाविलेलीं मजबूद शरीरें पाहून त्या प्रवाश्यांला आश्चर्य वाटल्याखेरीज राहिलें नाहीं. त्यांना पूर्वी भेटलेला भिल्ल अतिशय उंच होता, हें तर खरेंच; पण हे बाकीचे भिल्लसुद्धां कमी उंच नव्हते. त्यांचीं उंच आणि धिप्पाड शरीरें, त्यांचे पुष्ट आणि पिळदार दंड, त्यांच्या रुंद आणि भरगोल छात्या, दांडगे शरीरावयव पाहून, हे लोक युद्धकर्मांमध्यें मोठे कंटक असावेत, असें सरदार हलधराच्या मनांत आल्याखेरीज राहिलें नाहीं; आणि अशा प्रकारचे जवान ज्याच्या सैन्यामध्यें आहेत, त्याला इतरांनीं नमून वागावें, यांत अगदीं आश्चर्य नाहीं, अशी त्याच्या मनाची एका क्षणार्धांत खात्री पटली. वाटेनें जात असतां कित्येक भिल्लिणीही त्यांच्या नजरेस पडल्या. त्यांचींही उंच शरीरें, गोंडस अवयव आणि आपापल्यापरी सुंदर मुखें पाहून त्यांस गोठा चमत्कार वाटला; आणि त्यां स्त्रियांचीं तीं मर्दानी बाण्याचीं धष्टपुष्ट शरीरें पाहून, वेळ पडल्यास युद्धास सिद्ध होऊन आपल्या मुलाबाळांचें आणि गुरांढोरांचें रक्षण करण्यास त्या कमी करणार नाहींत, असें त्यांच्या लक्षांत आलें.

ते आणखी थोडे पुढें गेले. ते प्रतापपुरापासून सुमारें एक कोसावर आले, इतक्यांत एक विलक्षण प्रकार घडून आला. त्यामुळें भिल्लांहून उच्च दर्जाच्या अशा दोन व्यक्तींशीं त्यांची ओळख झाली. सध्यां ते ज्या ठिकाणीं आले होते, त्या ठिकाणीं डोंगराचा एक कडा नदीपर्यंत येऊन पोंचला होता, व त्या ठिकाणीं त्या कड्याच्या बाजूनें सुमारें चार हात रुंदीचा रस्ता मोठ्या मेहनतीनें तयार केलेला होता. या रस्त्यानें पुढें जात असतां कोणा तरी स्त्रीच्या मुखांतून निघालेली एक हृदयभेदक किंकाळी त्यांना ऐकूं आली. या अरुंद रस्त्यानें ते प्रवास करीत असतां सरदार हलधर पुढें होता, म्हणून पुढील प्रकार प्रथम त्याच्याच नजरेस पडला. त्या रस्त्याच्या बाजूला एक सुंदर तरुणी आणि एक सुंदर तरुण अशीं दोघें उभीं होतीं. त्यांच्यापासून दहापांच पावलांवर एका प्रचंड गरुडपक्ष्यानें झेंप घालून, –उपजून पांचचार दिवस झाले असतील नसतील,–इतकें लहान व गोजिरवाणें असें एक कोंकरूं आपल्या चोंचींत धरिलें. या कोंकराच्या गळ्यास बांधलेली बारीक दोरी तेथें असलेल्या तरुणीनें आपल्या हातीं धरली होती, पण गरुडानें त्यावर झडप घातलेली पाहतांच तिनें ती सोडून दिली होती. गरुडपक्ष्याला भिऊन त्या तरुणीनें किंकाळी फोडली होती. पण इतक्यांत एक मोठा थोरला आवाज झाला, आणि तो उडता गरुडपक्षी त्या तरुणीच्या पुढें पडला. सरदार हलधरानें आपला तमंचा झाडला, त्यामुळें त्यांतील गोळी नेमकी गरुडपक्ष्यास लागून तो गतप्राण झाला, पण त्यानें चोंचींत धरलेल्या कोंकरास अगदीं इजा झालेली नव्हती.

हा सर्व प्रकार अगदीं एका क्षणामध्यें घडून आला होता. या कृत्यासंबंधानें सरदार हलधराच्या समयसूचकतेचें वर्णन करावें कीं त्याच्या नेम मारण्याच्या कौशल्याचें वर्णन करावें, हा मोठा प्रश्न होता. पूर्वी कल्पना नसतां तमंचाचा आवाज एकाएकीं कानीं पडल्यामुळें, दचकून जाऊन त्या

जूंस कित्येक भिल्लांच्या झोंपडया तरुणांनें अ झोंपड्यांच्या अंगण्यांतून सुडसु- तथापि ग पण बळकट असे शिकारी कुत्रे बांधून आलठेवलेले नजरेस पडत होते. अशा प्रकारच्या इ मार्गानें कांहीं वेळ पुढें गेल्यावर ते राजवा- ड्याच्या देवडीवर जाऊन पोंचले. देवडीवरील पहारेकऱ्यांनीं राजकुमारास नमन करून त्यानें आज्ञा केल्यावर प्रवाश्यांचे घोडे त्यांनीं तबेल्यांत नेऊन बांधिले. वाड्यांत गेल्यावर पाहुण्यांची भेट घेण्यास योग्य अशा एका भव्य दिवाणखान्यांत दोघां प्रवाश्यांस बसवून आपल्या पित्याला त्यांच्या आगमनाची वर्दी देण्यासाठीं राजपुत्र शेखर तेथून निघून गेला. तितक्या अवधींत त्या राजवाड्याची रचना पाहण्याची त्या दोघां प्रवाश्यांस संधि सांपडली, आणि तीं त्यांनीं व्यर्थ दव- डिली नाहीं.

प्रकरण ३ रें.

गरुडपक्षी.

सध्यां ते प्रवासी ज्या दिवाणखान्यांत बसले होते, तो दिवाणखाना मोठा प्रशस्त व मजबूत होता, पण त्यामध्यें कारागि- राच्या कुशलतेचा पूर्णपणें अभाव होता. त्या वाड्याच्या भिंती जवळजवळ चार चार हात रुंद असून, त्यांच्या मध्यभागीं मोठ्या मजबूत व लोखंडी गज मारलेल्या खिडक्या होत्या. जमिनीवर एक भली जाड सतरंजी पसरलेली होती. भिंतीच्या खुंट्यांस अनेक प्रकारचीं हत्यारें टांगून ठेवलेलीं होतीं. शिर- स्त्राणें, चिलखतें, ढालीं, तरवारी, धनुष्यें, बाण वगैरे आयुधांचे निरनिराळे नमुने तेथें व्यवस्थित रीतीनें खुंट्यांस टांगून ठेविलेले होते. लहान मोठ्या चकमकींच्या बंदुका, तमंचे वगैरे अग्न्यस्त्रेंही तेथें होतीं. एका कोंप- ऱ्यांत भाले, बरच्या, परशु वगैरे शस्त्रें उभीं केलेली होती ही आयुधें तेथें इतकीं विपुल होतीं, कीं त्यामुळें दिवाणखान्याच्या चारी बाजूंच्या भिंती आच्छादून गेल्या होत्या, असें म्हणावयास हरकत नाहीं.

ते दोघे सभ्यां ज्या दिवाणखान्यांत बसले होते, त्या दिवाणखान्याच्या दोन्ही अरुंद बाजूंस दोन दरवाजे होते. यांपैकीं ज्या दर- वाज्यानें ते आंत आले होते, त्या दरवाज्या- खेरीज जो दुसरा दरवाजा तेथें होता, तो दरवाजा उघडून थोड्या वेळानें आपल्या दोन पुत्रांसह दृढसंधराजा त्या दिवाणखान्यांत आला. यानंतर तेथें जो प्रकार घडला तो सांगण्यापूर्वी दृढसंध राजा आणि त्याचा वडील पुत्र यांचा वाचकांस परिचय करून देणें जरूर आहे. लहान पुत्र शेखर याची वाचकांस मागील प्रकरणांत ओळख झाले- लीच आहे. दृढसंधराजाचें वय, सुमारें पंचावन वर्षांचें होतें. तो जरी जांघिळ मामा इतका उंच नव्हता, तरी त्याच्या इतके उंच गृहस्थ क्वचितच आढळले असते. त्याच्या उंची- प्रमाणें त्याचें शरीरही मजबूद होतें. छाती रुंद असून दंड पीळदार होते. वयाला इतकीं वर्षें झालीं असूनही त्याचे कैस पिकले नव्हते किंवा शरीराचा कोणताही अवयव कमजोर झालेला नव्हता. त्याच्या बरोबरीच्या मंड- लींत त्याच्या इतका बळकट माणूस सांपडणें कठीणच होतें; फारतर काय, त्याच्या- हून निमे वयाच्या माणसांत त्याच्या इतकी ताकद असलेलीं माणसें थोडींच सांपडलीं असतीं ! तो मोठा शूर पुरुष होता. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे तो ज्या भिल्लांचा अधिपति होता; त्या भिल्लांवर अंमल गाजविण्यास पुरे इतकें सामर्थ्य त्याच्या अंगीं होतें. त्यानें मोठी थोरली दाढी ठेविली असल्यामुळें, त्याची मुद्रा फार भव्य दिसे; आणि त्याचे डोळे जरा बारीक व तेजस्वी असल्यामुळें, त्याचा चेहरा उग्र भासे. त्याची रूपरेषा वळणदार होती. त्याला पाहतांच साधारणपणें तो तापट, अभिमानी, दृढनिश्चयी, शूर व साहसी पुरु- षाचा, अशी भावना पाहणाराच्या उत्पन्न

होत असे. तो मोठा अभिमानी पुरुष होता, आणि त्यानें आतांपर्यंतचे आयुष्याचे दिवस कोणास हार न जातां काढिले होते.

दृढसंधाच्या वडील मुलाचें नांव चूडामणि असें होतें. शेखराच्या आणि त्याच्या स्वभावांत जमीन-अस्मानचें अंतर होतें. त्याचें वय तेवीस वर्षांचें होतें. तो आपल्या बापाप्रमाणें उंच आणि धट्टाकट्टा होता. पण त्याच्या वडिलाच्या मुखावर जें एक प्रकारचें तेज दिसत असे, तें मात्र त्याच्या अंगीं नव्हतें. त्याची मुद्रा कपटी आणि क्रूर भासत असे. त्याचा स्वभाव अगदीं तुसडा होता. तथापि यांपूर्वी शेजाराच्या संस्थानिकांशीं झालेल्या एक दोन चकमकींत त्यानें आपली तरवार गाजविली असल्यानें बापाचें त्याजवर विशेष प्रेम होतें, आणि त्यामुळें त्या दरींतील भिल्ल लोक त्याला मोठा मान देत असत.

दृढसंध राजा त्या दिवाणखान्यांत आला, त्यावेळीं सरदार हलधरानें त्याजकडे एकदां बारीक नजरेनें पाहून घेतलें, आणि मोठ्या नम्रतेनें त्यास प्रणाम केला. दृढसंधानें मोठ्या आढ्यतेनें त्याच्या मानाचा स्वीकार केला; तथापि तिकडे विशेष लक्ष्य न देतां सरदार हलधर त्यास म्हणाला,–'महाराज, मी आपल्या पाहुणचाराची आणि मित्रत्वाची अपेक्षा करतों!'

यावर कांहीं उत्तर न देतां मोठ्या अभिमानानें त्याजवर आपली तीव्रदृष्टि रोंखून त्याजकडे पहात उभा राहिला आहे, हें पाहून शेखर म्हणाला,–'अहो बाबा, या सरदारांच्या विनंतीस आपण मान दिला पाहिजे.'

दृढसंधानें त्या सरदाराच्या सर्व शरीराकडे एकदां आपली नजर फिरवून घेतली; आणि उदासीनपणानें कांहीं स्वागतसूचक शब्द उच्चारिले. यावेळीं जांधिल मामा प्रमाणेंच दृढसंधानें आपली तीव्र नजर कांहीं वेळपर्यंत त्या सरदारावर रोंखून धरली होती; पण त्या सरदारानेंही न डगमगतां त्याच्या नजेरस नजर भिडविली असल्यामुळें तेवढ्यानें दृढसंधाचा संशय बराच कमी झाला, आणि तो म्हणाला,–'अहो सरदार, तुम्हांला माझ्या नजरेस नजर भिडवितांना भीति वाटत नाहीं, यावरून तुमच्या मनांत कपट नसावें, असें मी मानतों. जर का तुम्हीं माझ्या समोर कचरलां असतां, तर या माझ्या तरवारीनें तुमची गर्दन केव्हांच उतरून टाकिली असती, यांत संशय नाहीं.'

सरदार हलधर म्हणाला,–'महाराज, आपल्या भाषणांतील उत्तरार्ध जरी अपमानकारक आहे, तरी सध्यांच्या प्रसंगाकडे लक्ष देऊन मी तिकडे दुर्लक्ष्य करितों. जर इतर प्रसंगीं कोणी असें बोलता, तर माझ्या तरवारीचें पाणी कसें आहे हें तत्काल त्याच्या दृष्टीस पडलें असतें!'

दृढसंध म्हणाला,—'शाबास, तुमच्या अंगीं इतका स्वाभिमान आहे हें पाहून मला आनंद होत आहे! बरें असो. तुम्ही त्या निंबराजाचे शत्रु आहां, असें हा आमचा शेखर सांगत होता; तुम्हीं त्याचें शत्रुत्व कां करतां हें सांगा पाहूं!'

सरदार हलधर म्हणाला,—'मीच काय, पण माझ्यासारखे दुसरे कित्येक सरदार त्याचा द्वेष करीत आहेत. मी पूर्वी त्या राजाचा एकनिष्ठ सेवक होतों; पण माझा उत्कर्ष सहन न होणाऱ्या कित्येक आपमतलबी लोकांनीं मजविरुद्ध खोट्या नाट्या चहाड्या सांगून त्या राजाचें मन कलुषित केलें, आणि त्यानेंही अगदीं विचार न करतां माझा अपमान करून मला चंपावतींतून हद्दपार करविलें. मी सौराष्ट्राच्या गादीवर असणाऱ्या रत्नाकर महाराजांना फितुर आहें, असा त्यानें मजवर विनाकारण दोषारोप केला होता!'

दृढसंधानें विचारिलें,–'तर मग तो निंबराज आमच्या रत्नाकर महाराजांची गादी बळकाविण्याची खटपट करीत आहे, असें जें वर्तमान आमच्या कानीं आलें आहे, तें खरें आहे, असें दिसतें.'

सरदार हलधरानें उत्तर दिलें,–' होय; हें वर्तमान अगदीं खरें आहे, आणि त्या-संबंधानें– '

यापुढें तो कांहीं बोलणार इतक्यांत राज-वाड्या बाहेर मोठा गलबला झालेला तेथें ऐकूं आला. हा गलबला कसला असावा, यासंबंधानें दिवाणखान्यांत असलेल्या लोकांस तर्क काढीत फार वेळ तिष्ठत बसण्याची जरूर पडली नाहीं. कारण तेथील दरवाजा मोठ्या जोरानें उघडून दहा वीस भिल्लांसह जांघिळमामा आंत घुसला. पुढें करून धरलेल्या त्याच्या लांबलचक हातामध्यें एक मेलेला गरुडपक्षी होता. या वेळीं त्याची मुद्रा इतकी रागीट आणि भेसूर दिसत होती कीं, कांहीं तरी विशेष गोष्टी घडून आल्या-मुळें तो रागानें खवळून गेलेला आहे, असें सरदार हलधर आणि सत्यरथ यांच्या एकदम मनांत आलें. जांघिळमामाचरोबर आलेले भिल्लही क्रोधानें खवळलेले दिसत होते. त्यांस क्रोध येण्यास काय कारण घडलें असावें, याचा ते दोघे पाहुणे आपल्या मनाशीं विचार करूं लागले; पण त्यांना कांहींच अंदाज करतां येईना. पण त्यांस फार वेळ विचारतां पडावें लागलें नाहीं. मुठीमध्यें पाय धरल्या-मुळें ज्याचें डोकें खालीं लोंबत आहे, असा तो गरुडपक्षी ताठ हातानें पुढें धरून जांघिळ-मामा गर्जना करीत म्हणाला,–' महाराज, हा पहा गरुडपक्षी ! आम्ही ज्यांस अत्यंत पूज्य समजतों, त्यांपैकीं एका पक्ष्याचा या दुष्ट मनुष्यानें प्राण घेतला आहे, या नीच कृत्याबद्दल या अधमाचा सूड घेतलाच पाहिजे ! '

जांघिळमामाचें हें भाषण संपण्यापूर्वीच त्याच्या बरोबर आलेल्या भिल्लांनीं ' सूड ! सूड ! ! सूड ! ! ! ' अशा आरोळ्यांनी तो दिवाणखाना दणाणून सोडिला. जांघिळ-मामाच्या तेवढ्या त्रोटक भाषणावरून देखील गरुडपक्ष्याचा प्राण घेणें हें अशुभ आहे, असें सरदार हलधर आणि सत्यरथ यांच्या एकदम ध्यानीं आलें.

गरुडपक्ष्याचा सरदार हलधरानें प्राण घेतला, म्हणून त्या भिल्लांस इतका त्वेष कां आला, याचें कारण येथें सांगितलें पाहिजे. त्या दरींतील भिल्ल लोक गरुडपक्ष्याला फार पूज्य मानीत असत; आणि अशा रीतीनें कोणी मुद्दाम गरुडपक्ष्याला ठार मारिलें म्हणजे राजघराण्यावर मोठें संकट येतें, अशी त्यांची समजूत होती. ज्या कोणाच्या हातून गरुडाचा प्राण जाईल, तोच मनुष्य राज-घराण्यावर संकट आणण्यास कारण होतो, असा त्या भिल्लांस कित्येक वेळां अनुभव आलेला होता. यासंबंधानें ज्या आख्या-यिका त्यांना माहीत होत्या, त्या वाचकांस लवकरच समजतील.

दिवाणखान्यांत असा गलबला झालेला पाहून जांघिळमामा आणि त्यांच्या भोवतीं असलेले भिल्ल यांस उद्देशून दृढसंध राजा मोठ्या खणखणीत आवाजानें म्हणाला,–' गलबला बंद करा ! चूप रहा ! ज्या-अर्थीं हे सरदार मजकडे पाहुणे म्हणून आले आहेत, त्या अर्थीं शिष्टाचारास योग्य असेंच वर्तन आम्ही ठेविलें पाहिजे. या गृहस्थाच्या मनांत कपट आहे, हें सिद्ध झाल्याखेरीज आपण यांच्याशीं गैरशिस्त वर्तन करणें हें अगदीं योग्य होणार नाहीं ! '

जांघिळमामा तितक्याच जोरानें गर्जना करीत म्हणाला,–" महाराज, या ठार झालेल्या गरुडाकडे पहा ! ज्यानें गरुडाचा प्राण घेतला, तो आपला शत्रु आहे, असेंच आपण समजलें पाहिजे. या अपशकुनावर सावध होऊन आपण त्यास आपणांमध्यें थारा देतां कामा नये ! "

त्या अगडबंब माणसाचें हें भाषण संपतें न संपतें, तोंच त्या भिल्लांनीं [illegible] ओरड करून एकच कल्लोळ सोडिला. यावेळीं दृढसंध राजाची पालटली असून, तो विचारांत पडल्याप्र

दिसत होता, परंतु त्याचा वडील पुत्र चूडामणि डोळे लाल करून रागानें सरदार हलधर आणि त्याचा सेवक यांजकडे टवकारून पाहत होता. जर त्याचा पिता तेथें नसता तर त्यानें पाहुण्यांवर एकदम हल्ला करून त्या दोघांचा एका क्षणांत प्राण घेतला असता, असें त्यावेळच्या त्याच्या अविर्भावांवरून स्पष्ट दिसत होतें. शेखराची स्थिति यावेळीं मोठी चमत्कारिक झाली होती. त्याचें अंतःकरण जात्या दयाळु असल्यामुळें अशा रीतीनें परकी गृहस्थावर गहजब झालेला पाहून त्याला फार वाईट वाटत होतें. म्हणून तो म्हणाला,–' आहो बाबा, आपण या परकी गृहस्थांवर आणि आपल्याकडे पाहुणे म्हणून आलेल्या गृहस्थांवर अशा रीतीनें उलटून पडणें योग्य होणार नाहीं. या गृहस्थांच्या हातून गरुडपक्ष्याचा प्राण गेला, ही गोष्ट खरी आहे; पण यांनीं समजून उमजून हें कृत्य केलेलें नाहीं. अशी माझ्या मनाची खात्री आहे. गरुडपक्ष्याच्या मरणाच्या दंतकथा या गृहस्थांनीं कधीं जन्मांत देखील ऐकलेल्या नसतील. हा प्रकार माझ्या समक्ष घडून आला असल्यामुळें यासंबंधानें मी काय म्हणतों, तें आपण ऐकून घेतलें पाहिजे. प्रियंवदा एका गोजिरवाण्या कोकराबरोबर खेळत असतां त्याच कोंकरावर गरुडानें झेंप घातली, हें पाहून ती भयानें ओरडली. तिची किंकाळी या गृहस्थाच्या कानीं पडतांच तिच्यावर कांहीं संकट आलेलें आहे, असें समजून या पक्ष्यांवर नेम धरून त्यांनीं आपला तमंचा झाडला. या पक्ष्याचें हें साहस पाहून मला सुद्धां त्यावेळीं त्याचा ाग आला होता, आणि त्यावेळीं जर मजाशीं शस्त्र असतें, तर कदाचित् मीच याचा ाण घेतला असता! '

हें त्याचें भाषण ऐकून सरदार हलधराला जरा धीर आला, आणि तो म्हणाला,–' महाराज, हा प्रकार कसा घडून आला, हें प्रत्यक्ष आपल्या कुमारानीं आपणांस निवेदन केलें, हें एका अर्थीं फार चांगलें झालें. मी हा पक्षी मारला, त्यावेळीं माझ्या मनामध्यें विशेष अशा हेतु कोणताही नव्हता. त्यावेळीं या पक्ष्याएवजीं त्या कोंकरावर एकाद्या वाघानें किंवा लांडग्यानें झडप घातली असती, तर मी त्या हिंस्र पशूचा याचप्रमाणें प्राण घेतला असता. '

यावर कुमार चूडामणि उर्मटपणानें म्हणाला,–' अहो सरदार, तुम्हीं एकाद्या विशेष उद्देशानें हा पक्षी मारला, असें कोणाचें म्हणणें नाहीं. ज्यांच्या मनांत कपट असतें, तीं माणसें ज्यावरून दुसऱ्याला संशय येईल असें कृत्य मुद्दाम कधींही करीत नसतात. तुम्हीं या पक्ष्याचा मुद्दाम प्राण घेतला नसेल, हें खरें; परंतु ज्या अर्थीं तुमच्या हातानें अपघातानें हा पक्षी मृत्युमुखीं पडला आहे, त्या अर्थीं या बाबतींत आम्हांला योग्य विचार करणें जरूर आहे. आम्हांस ह्या पक्ष्याच्या मरणानें मोठा अपशकुन झाला आहे. '

इतक्यांत जांघिळमामा मोठ्यानें ओरडला,–' हा पांढऱ्या पायांचा माणूस येथें आला आहे तरी कशाला! याला येथें कोणी बोलाविलें होतें! '

या भाषणास जोर देत कित्येक भिल्ल एकदम ओरडले, ' हा कोण आहे, आणि हा येथें कशासाठीं आला आहे, हें आम्हांस प्रथम समजलें पाहिजे. '

इतका वेळ दृढसंधराजा स्वस्थ बसला होता, पण भिल्लांनीं एकदम गलबला केलेला पाहतांच तो म्हणाला,–' आम्हीं तरी आतां या गृहस्थास हेंच विचारणार होतों, पण तितक्यांत तुम्हीं सर्वजण एकाएकीं येथें आल्यामुळें तो प्रश्न मागें पडला. काय हो हलधर, तुम्हीं येथें कशासाठीं आलां आहां, हें आम्हांस उघड करून सांगा पाहूं! '

अत्यंत अभिमानपूर्वक परंतु गंभीर मुद्रेनें आणि शांत स्वरानें सरदार हलधर म्हणाला,–' महाराज, मी ज्या महत्त्वाच्या कामासाठीं

मुद्दाम येथें आलों आहें, तें काम फारच गुप्त असल्यामुळें मला तें इतक्या लोकांसमक्ष सांगणें इष्ट वाटत नाहीं. फक्त आपणांस आणि आपल्या या दोघां कुमारांस मात्र मी येथें कां आलों आहें. हें सांगेन—,

हें ऐकून सर्व भिल्ल एकदम गलबला करून म्हणाले,—' नाहीं, नाहीं ! हा मनुष्य कपटी आहे ! हा मोठा लुच्चा आहे ! याच्यावर आमचा कधींही विश्वास बसणार नाहीं. कौल लावा ! कौल ! कौल ! कौलाशिवाय आमचें समाधान होणार नाहीं. अहो जांघिळमामा, तुम्हींच कौल लावा ?,

हे शब्द आम्ही येथें एकापुढें एक लिहिले आहेत; पण हे सर्व शब्द एकापुढें एक त्या वेळीं ऐकूं येत नव्हते. त्या भिल्लानें कौलाचें नांव काढतांच सर्वजण एकदम 'कौल ! कौल !,' असें ओरडत आणि एकानें 'तो सरदार कपटी आहे, असें म्हटलें, कीं याकीचे ' तो लुच्चा आहे, तो पाजी आहे, तो नीच आहे,' असें मोठ्यानें ओरडत. त्यामुळें तेथें सगळाच गोंधळ उडाला. इतक्यांत सरदार हलधरानें—' कौल हें काय प्रकरण आहे ?,' असा आपल्या सेवकास हळूच प्रश्न केला.

त्यावर सत्यरथ म्हणाला,—' कौल ही एक या लोकांची दैवी कल्पना आहे. एका माणसास एका ताज्या मारलेल्या बकऱ्याच्या रक्तानें स्नान घालतात, आणि गांवाबाहेर एखाद्या झाडाखालीं देवीचें स्थान असतें, तेथें त्यास एका पोत्यांत बांधून ठेवितात. रात्रीचे वेळीं पिशाचें किंवा देवी त्या माणसाजवळ जाऊन त्याला जें काय समजावें अशी इच्छा असेल, तें प्रत्यक्ष सांगतात, अशी या लोकांची समजूत आहे. या प्रकारास ते 'कौल लावावयाचा' असें म्हणतात.

हें त्यांचें भाषण चाललें असतां सर्व भिल्लांची " कौल ! कौल ! कौल ! " अशी ओरड चालली होती. कारण गरुडाच्या मरणानें प्रतापपुरच्या राजावर भयंकर संकट यावयाचें अशी त्या भिल्लांची ठाम समजूत असल्यामुळें, सरदार हलधर हा लबाड आहे, अशी त्यांची पुरी कल्पना झालेली होती. त्यांच्या समजुतीप्रमाणें कौल लावून त्यामध्यें जर तो लबाड नाहीं असें समजलें असतें, तर गोष्ट निराळी. पण जर तो लबाड आहे, असें समजलें असतें, तर त्या कडव्या लोकांनीं त्याचा प्राण घेतला असता !

पण इतक्यांत दृढसंधराजानें मोठ्यानें गर्जना करीत म्हटलें,—'मूर्खांनों गप रहा ! मी येथें हजर असतां माझ्या समक्ष तुम्ही असा गलबा करावा, हें फार वाईट आहे ! ज्या अर्थीं मी तुमचा राजा आहें, त्या अर्थीं तुमच्या कल्याणाची मला पूर्ण काळजी आहे ! मी काय बोलतों तें नीट ऐकून घ्या. हे गृहस्थ आपच्याकडे पाहुणे आले आहेत, त्या अर्थीं यांच्याशीं आपण शिष्टाचाराप्रमाणें वागलें पाहिजे. नुसत्या संशयावरून मी या गृहस्थांस कधींही लबाड म्हणणार नाहीं. यासाठीं प्रथम ते काय म्हणतात, तें मला ऐकून घेणें जरूर आहे. या गृहस्थांच्या लाघवी भाषणांस फसण्याइतका मी साधाभोळा नाहीं, ही तुमची खात्री असेलच. यासाठीं यांचें म्हणणें मी ऐकून घेईपर्यंत तुम्ही सर्वजण येथेंच स्वस्थ बसा. अहो हलधर, तुम्हीं मजबरोबर जरा पलीकडच्या दिवाणखान्यांत चला. ज्या अर्थीं माझ्या दोघां कुमारांसमक्ष तुमच्या आगमनाचें कारण सांगण्यास तुम्ही कबूल आहां, त्या अर्थीं मी त्यांसही बरोबर घेतों. मुलांनों, चला पुढें व्हा.'

यानंतर दृढसंध, हलधर, चूडामणि शेखर असे चौघेजण त्या दिवाण मागच्या दरवाज्यानें निघून गेले. ए दालनें मध्यें टाकून ते एका प्रशस्त खान्यांत आले. त्या ठिकाणीं त्यांचें क संभाषण झालें, तें पुढील प्रकरणांत सांगू.

प्रकरण ४ थें.

खलबत.

मागील प्रकरणांत वर्णिलेला घोर प्रसंग घडून येत असतां, सरदार हलधर अत्यंत शांत व गंभीरपणानें बसला होता. त्याची त्या वेळची शांतवृत्ति दृढसंध राजाच्या पूर्णपणें ध्यानीं आली होती, आणि एवढा प्रसंग गुदरला असतांही सरदार हलधर गडबडला नाहीं, यावरून त्याचे अंगीं शौर्य आणिं धैर्य हीं वास करीत आहेत, अशी त्याच्या मनाची खात्री पटली. दृढसंध राजा स्वतां शूर असल्यामुळें, शौर्य आणि सचोटी हे गुण नेहमीं साहचर्यानें वास करीत असतात, ही गोष्ट त्याला माहीत होती; म्हणून सरदार हलधर कपटी नसावा, असें त्याच्या मनांत येऊं लागलें होतें. तथापि दृढसंध राजा त्या काळच्या अल्पंशिक्षित लोकसमाजाच्या बहुमताप्रमाणें बराच देवभोळा होता, त्यामुळें गरुडपक्ष्याच्या मरणानें आपल्या कुलावर कांहीं तरी संकट येणार आणि गरुडपक्ष्याच्या मरणास कारणीभूत झालेला हा गृहस्थच त्या संकटांस कारण होणार, ही गोष्ट त्याच्या मनांतून दूर होईना, त्यामुळें त्याचें मन द्विधा झालेलें होतें. तो सरदार सच्चा मनुष्य असावा असें जरी त्याच्या मनांत येई, तरी झालेल्या अपशकुनामुळें त्याच्यानें विश्वास ठेववेना.

राजकुमार शेखराचें सरदार हलधराविषयीं चांगलें मत झालेलें होतें, हें वाचकांस विदितच आहे. त्या काळीं संपूर्ण महाराष्ट्राची मुख्य राजधानी व विद्येचें माहेरघर असलेल्या प्रतिष्ठानामध्यें तो कांहीं दिवस विद्यार्जनासाठीं राहिलेला असल्यामुळें, शेखराचीं मतें सामान्यजनसमूहाच्या मतांपेक्षां अधिक संस्कृत झालेलीं होतीं, आणि त्यामुळें भुतांस्नेतांवर किंवा शकुन-अपशकुन यांजवर त्याचा फारसा विश्वास नव्हता. अर्थात् गरुडासंबंधीं दंतकथेवर विश्वास ठेवून सरदार हलधराला कपटी मानण्यास तो बिलकुल तयार नव्हता. पण शेखराच्या उलट चूडामणीची स्थिति होती. त्याला शस्त्रविद्येखेरीज इतर विद्यांचा अगदीं गंधसुद्धां नव्हता. त्याचा स्वभाव जितका तापट तितकाच कपटी आणि जितका दुराग्रही तितकाच खुनशी होता. याशिवाय लोकभ्रमकारक कारणांवर त्याचा पूर्ण विश्वास होता, म्हणून तो सरदार हलधरांविरुद्ध असून, त्याच्या नाशाविषयीं अत्यंत आतुर झालेला होता. याखेरीज सरदार हलधरासंबंधानें चूडामणीच्या अंतःकरणांत तेढ उत्पन्न होण्याचें आणखी एक कारण होतें; आणि सरदार हलधराविरुद्ध ग्रह त्याच्या मनांत उत्पन्न करण्यास तेवढेंच कारण पुरें होतें. चूडामणि आपल्या लहान भावाचा द्वेष करीत असे. अद्यापि हा द्वेष नजरेस येण्यासारखा नव्हता. तथापि प्रसंगविशेषीं तो आपल्या लहान भावासंबंधानें वांडिलांच्या मनांत विपरीत ग्रह उत्पन्न करण्याचा झटून प्रयत्न करीत असे. शेखर हा स्वभावानें उदार, बुद्धिमान् आणि सर्व कामांमध्यें हुशार होता, म्हणून लोक त्याची नेहमीं स्तुति करीत असत. शेखराची लोक जशी स्तुति करतात, तशी आपली कोणी करीत नाहीं, हें मनांत येऊन त्याला वाईट वाटे. या कारणांमुळें शेखराशीं चूडामणि द्वेषबुद्धीनें वागत असे. याखेरीज त्याच्या द्वेषाला आणखी एक कारण होतें, पण तें आम्ही आतांच सांगत नाहीं. कथानुशंगानें तें आपोआपच कळून येईल. जेव्हां जेव्हां म्हणून मतभेदाला थोडा तरी अवकाश मिळेल, तेव्हां तेव्हां चूडामणीचें मत शेखराच्या मताच्या अगदीं विरुद्ध असावयाचें, हें ठरलेलें होतें; आणि सध्यांचा प्रसंगही त्यांतलाच होता. या वेळीं जरी सरदार हलधराचें शत्रुत्व करण्यास चूडामणीला दुसरें एकादें सबळ कारण मिळालें नसतें, तरी शेखराचा आणि त्याचा स्नेह आहे, एवढें एकच कारण त्याला पुरें होतें!

एवढ्या खुलाशावरून सरदार हलधर सध्यां कोणत्या प्रसंगांत सांपडला होता, हें वाचकांच्या लक्ष्यांत आलेंच असेल. तो सध्या आरोपी असून तीन न्यायाधीश त्याचा न्याय करावयास बसले होते, अशी कल्पना केली असतां ती सध्याच्या प्रसंगास ठीक जुळेल. सध्यां तो ज्या तीन व्यक्तींसमोर बसला होता, त्यांपैकीं एक पूर्णपणें आपल्या बाजूची आहे, दुसरी पूर्णपणें आपल्या विरुद्ध आहे, व तिसरीचें मन द्विधा झालेलें आहे, ही गोष्ट त्या चाणाक्ष सरदाराच्या ध्यानीं आलेली होती.

ते सध्या ज्या दिवाणखान्यांत आले होते, तेथें बरींच आसनें मांडलेलीं होतीं; त्यांतील मुख्यासनावर राजा दृढसंघ विराजमान झाल्यावर तो सरदार हलधराला उद्देशून म्हणाला,–'अहो चंपावतीकर, तुम्ही जें काय सांगणार आहां, तें सांगा पाहूं!'

अत्यंत गंभीर, शांत आणि विश्वासयुक्त वाणीनें सरदार हलधरानें आपली हकीकत सांगण्यास प्रारंभ केला. तो म्हणाला,–'महाराज, मी पूर्वी त्या निंबराजाच्या विश्वासांतील एक सरदार होतों, पण मी कित्येक कारणांनीं त्याचा शत्रु बनलों आहें, हें आपणांस पूर्वीच सांगितलें आहे. सौराष्ट्र देशावर स्वारी करून तेथें सध्यां गादीवर असलेल्या आपल्या चुलत्याचें राज्य बळकावावें, असें निंबराज्याच्या मनांत आहे, ही गोष्ट आतां गुप्त नसल्यामुळें, ती आपल्या कानीं आलीच असेल. ज्या वेळीं निंबराजानें ही आपली इच्छा आम्हा दरबारी लोकांस कळविली; त्यावेळीं, एकदा विभाग होऊन जें राज्य त्याच्या चुलत्याला मिळालें होतें, तें राज्य तो हयात असतां दंडेलीनें त्याजपासून हिरावून घेणें ही गोष्ट अन्यायाची आहे, असें मी मोठ्या जोराने प्रतिपादन केलें. माझ्या मताला दुजोरा येणारे असे आणखी पांच चार सरदार त्या वेळीं दरबारांत होते. आमचें बोलणें न्यायाचें असूनही ते त्या जुलमी निंबराजास आवडलें नाहीं, आणि त्यानें त्याच्या मताविरुद्ध वागणारे आम्ही सौराष्ट्राधिपति रत्नाकरमहाराजांना फितूर आहों, असा आम्हांवर आरोप ठेविला. त्यानें भर दरबारामध्यें आमचा अपमान केला, आणि आमचे सर्वांचें मानापान आणि नेमणुका त्यानें कमी केल्या. त्यानें केलेल्या या जुलमानें आम्हाला त्वेष आला, व रागाच्या सपाट्यांत 'आजपासून आम्ही निंबराजाशीं शत्रुत्वच करूं,' अशा भयंकर शपथा आम्ही वाहिल्या. ही गोष्ट त्या राजाला समजली, आणि त्यानें एके दिवशीं भर मध्यरात्रीं आमच्या घरांवर छापे घालून आम्हांला कैद केलें, व आम्हांस एका तुरुंगामध्यें कोंडून ठेविलें. यावेळीं मोठ्या मिनतवारीनें मीं एक सेवक बरोबर घेण्याची परवानगी मिळविली होती. कांहीं दिवस तुरुंगांत ठेवून आमचा छळ केल्यावर त्या दुष्ट राजानें आम्हां सर्वांना एका गलबतांत घालून सौराष्ट्राधिपतीच्या ताब्यांत असलेल्या भृगुकच्छ नामक बंदरामध्यें आणून सोडिलें. गलबतावरील अधिकाऱ्यानें आम्हांस हद्दपार करतांना, जर आम्हीं पुनः चंपावतीच्या राज्यांत पाऊल घातलें, तर आम्हांला देहान्त शिक्षा होईल अशी निंबराजाची आज्ञा कळविली असल्यामुळें आम्हीं सर्वजण स्वदेशास पारखे झालों! रत्नाकर महाराजांच्या राज्यांत आम्हीं सर्वजण आलों असल्यामुळें, आणि निंबराजाशीं शत्रुत्व करण्याच्या शपथा वाहिल्या असल्यामुळें, आम्हीं रत्नाकर महाराजांस साह्य करण्याचा बेत योजिला. परंतु रत्नाकर महाराजांचा पक्ष किती बळकट आहे, आणि बागलाण देशांतील किती संस्थानिक त्यांना अनुकूळ आहेत, हें प्रथमतः समजून घ्यावें, असा आम्हीं विचार केला; व प्रत्येकानें कोणकोणा संस्थानिकांकडे जावयाचें यांचा आपसांत ठराव करून आम्हीं भृगुकच्छ नगर सोडलें. मी या देशांत आलों आहें, आणि माझ्या बरोबरचे दुसरे सरदार निर

निराळ्या संस्थानिकांकडे गेले आहेत. येथें येण्यापूर्वीच आपण रत्नाकर महाराजांचे पूर्ण अभिमानी अहां, आणि निंबराजाचा आपण द्वेष करितां असें मला समजलें, आणि मोठ्या आनंदानें मी आपल्या दर्शनास आलों आहें.'

असें बोलून सरदार हलधर थोडा वेळ स्तब्ध राहीला. हें आपलें भाषण त्या राजाला मानवेल अशी त्याची खात्री होती, आणि त्याप्रमाणें झालेंही. राजाचें मन पूर्वीहून आपणाकडे अधिक वळलें आहे, अशी त्याच्या मनाची खात्री झाली. त्या सरदारानें हें भाषण अगदीं धिटाईनें आणि न डगमगतां केलें असल्यामुळें, चूडामणीच्या मनाचा मोठा गोंधळ उडाला; पण सरदार हलधरानें आपल्या आगमनाचे हेतु इतक्या स्पष्ट रीतीनें उघड करून सांगितले, म्हणून शेखराला फार आनंद झाला.

सरदार हलधर पुढें म्हणाला,–'यावरून मी या प्रतापपुरामध्यें कां आलों आहें, हें आपल्या ध्यानीं आलेंच असेल. आपण रत्नाकर महाराजांचे अभिमानी आहां, म्हणून त्यांचा विजय व्हावयासाठीं आपण जे जे प्रयत्न कराल, त्या त्या प्रयत्नास माझें पूर्ण साहाय्य आपणांस मिळेल. माझी ही तरवार आपल्या व रत्नाकर महाराजांच्या सेवेस सिद्ध आहे. आतां, मी निंबराजाचें फार दिवस अन्न खाल्लेलें असूनही त्याजवर फिरून पडलों, हें आचरण विश्वासघातकीपणाचें आहे, अशी कदाचित् आपल्या मनामध्यें शंका येण्याचा संभव आहे. पण मी विचारतों, राजानें प्रजेचा विनाकारण छळ केला, तर तो प्रजेनें निमूटपणें सहन करावा काय ? त्या दुष्ट राजानें मला माझ्या वडिलोपार्जित घरांतून–माझ्या मुलांबाळांतून–माझ्या आप्त-इष्टांतून आणि माझ्या सोयऱ्या धायऱ्यांमधून ओढून काढून देशोधडीस लाविलें असतांही अमेषपात्र बनून कपाळास हात लावून राहिप्रमाणें नुसतीं बोटें मोडीतच बसावें य. असा जुलूम करणाऱ्या राजाचा आम्ही मान का मीं केलेला असल्यामुळें परिस्थितीमध्यें मंत्रामासंबंधानें कांहींच समम्हणून आपण मला कुमार शेखराला उत्तमजर त्याचें शत्रुत्व पुं येत असल्यामुळें—, अंगीं पुरुषत्वाचा अला,–'मी आतां हे आपण म्हणाल ! आजपर्यंत दाखवितों.' असें वार कित्येक वेळां निंबराजाच्या हातीं घेतलें. डतांना म्यान्यांतून बाहेर पडली होती, तुम्ही यापुढें ती प्रत्यक्ष त्याच्याशीं झगडतानाही बाहेर पडेल; आणि ज्याप्रमाणें युद्धप्रसंगीं आपण आपलां शत्रु आपला शेजारी आहे, असें न समजतां आपलें हत्यार निष्ठुरतेनें चालवितां, त्याचप्रमाणें निंबराजाच्या वतीनें लढणारे लोक आपले देशबंधु आहेत, हें लक्षांत न घेतां माझी तरवार रत्नाकर महाराजांसाठीं म्यानांतून बाहेर पडेल !'

या भाषणापैकीं शेवटचीं वाक्यें मोठ्या वीरश्रीयुक्त स्वरानें उच्चारून सरदार हलधरानें थोडा विसावा घेतला. त्या तिघां श्रोत्यांपैकीं एकजण सुद्धां यावर बराच वेळ पर्यंत कांहीं बोलला नाहीं. दृढसंध राजा विचारांत निगम्न झाला होता. त्या सरदाराच्या भाषणानें चूडामणीच्या मनाची त्या सरदाराच्या निष्कपटीपणासंबंधानें जरी खात्री पटलेली होती, तरी तो बाहेरून तसें अगदीं दाखवीत नव्हता. कारण, त्या सरदाराच्या भाषणानें शेखराचें पूर्णपणें समाधान झालें आहे, असें त्याच्या मुद्रेवरून स्पष्ट दिसून येत होतें. तथापि आपल्या वडिलांचा मान राखण्यासाठीं तो प्रथम कांहींच बोलला नाहीं. आपला पूज्य पिता काय बोलतो, हें ऐकण्यासाठीं तो उत्सुकतेनें त्याजकडे पाहत बसला होता.

बऱ्याच वेळानें दृढसंध राजा म्हणाला,–'आपलें सर्व भाषण मीं ऐकलें, परंतु माझ्या मनांत अजून एक दोन शंका राहिल्या आहेत. तुम्हीं आतां आम्हांस जी ही हकीगत सांगितली, ती तुम्हीं पलीकडच्या दिवाणखान्यांत जमलेल्या मंडळीसमक्ष सांगण्यास कां हरकत घेतली ?'

एवढ्या खुलाशावरून सरदार हलधर सध्यां कोणत्या प्रसंगांत सांपडला होता, हें वाचकांच्या लक्ष्यांत आलेंच असेल. तो सध्या आरोपी असून तीन न्यायाधीश त्याचा न्याय करावयास बसले होते, अशी कल्पना केली असतां ती सध्याच्या प्रसंगास ठीक जुळेल. सध्यां तो ज्या तीन व्यक्तींसमोर बसला होता, त्यांपैकीं एक पूर्णपणें आपल्या बाजूची आहे, दुसरी पूर्णपणें आपल्या विरुद्ध आहे, व तिसरीचें मन द्विधा झालेलें आहे, ही गोष्ट त्या चाणाक्ष सरदाराच्या ध्यानीं आलेली होती.

ते सध्या ज्या दिवाणखान्यांत आले होते, तेथें बरींच आसनें मांडलेलीं होतीं; त्यांतील मुख्यासनावर राजा दृढसंघ विराजमान झाल्यावर तो सरदार हलधराला उद्देशून म्हणाला,–'अहो चंपावतीकर, तुम्ही जें काय सांगणार आहां, तें सांगा पाहूं!'

अत्यंत गंभीर, शांत आणि विश्वासयुक्त वाणीनें सरदार हलधरानें आपली हकीकत सांगण्यास प्रारंभ केला. तो म्हणाला,–'महाराज, मी पूर्वी त्या निंबराजाच्या विश्वासांतील एक सरदार होतों, पण मी कित्येक कारणांनीं त्याचा शत्रु बनलों आहें, हें आपणांस पूर्वीच सांगितलें आहे. सौराष्ट्र देशावर स्वारी करून तेथें सध्यां गादीवर असलेल्या आपल्या चुलत्याचें राज्य बळकावावें, असें निंबराज्याच्या मनांत आहे, ही गोष्ट आतां गुप्त नसल्यामुळें, ती आपल्या कानीं आलीच असेल. ज्या वेळीं निंबराजानें ही आपली इच्छा आम्हा दरबारी लोकांस कळविली; त्यावेळीं, एकदा विभाग होऊन जें राज्य त्याच्या चुलत्याला मिळालें होतें, तें राज्य तो हयात असतां दंडेलीनें त्याजपासून हिरावून घेणें ही गोष्ट अन्यायाची आहे, असें मी मोठ्या जोराने प्रतिपादन केलें. माझ्या मताला दुजोरा येणारे असे आणखी पांच चार सरदार त्या वेळीं दरबारांत होते. आमचें बोलणें न्यायाचें असूनही ते त्या जुलमी निंबराजास आवडलें नाहीं, आणि त्यानें त्याच्या मताविरुद्ध वागणारे आम्ही सौराष्ट्राधिपति रत्नाकरमहाराजांना फितूर आहों, असा आम्हांवर आरोप ठेविला. त्यानें भर दरबारामध्यें आमचा अपमान केला, आणि आमचे सर्वांचें मानापान आणि नेमणुका त्यानें कमी केल्या. त्यानें केलेल्या या जुलमानें आम्हाला त्वेष आला, व रागाच्या सपाट्यांत 'आजपासून आम्ही निंबराजाशीं शत्रुत्वच करूं,' अशा भयंकर शपथा आम्ही वाहिल्या. ही गोष्ट त्या राजाला समजली, आणि त्यानें एके दिवशीं भर मध्यरात्रीं आमच्या घरांवर छापे घालून आम्हांला कैद केलें, व आम्हांस एका तुरुंगामध्यें कोंडून ठेविलें. यावेळीं मोठ्या मिनतवारीनें मीं एक सेवक बरोबर घेण्याची परवानगी मिळविली होती. कांहीं दिवस तुरुंगांत ठेवून आमचा छळ केल्यावर त्या दुष्ट राजानें आम्हां सर्वांना एका गलबतांत घालून सौराष्ट्राधिपतीच्या ताब्यांत असलेल्या भृगुकच्छ नामक बंदरामध्यें आणून सोडिलें. गलबतावरील अधिकाऱ्यानें आम्हांस हद्दपार करतांना, जर आम्हीं पुनः चंपावतीच्या राज्यांत पाऊल घातलें, तर आम्हांला देहान्त शिक्षा होईल अशी निंबराजाची आज्ञा कळविली असल्यामुळें आम्हीं सर्वजण स्वदेशास पारखे झालों! रत्नाकर महाराजांच्या राज्यांत आम्हीं सर्वजण आलों असल्यामुळें, आणि निंबराजाशीं शत्रुत्व करण्याच्या शपथा वाहिल्या असल्यामुळें, आम्हीं रत्नाकर महाराजांस साह्य करण्याचा बेत योजिला. परंतु रत्नाकर महाराजांचा पक्ष किती बळकट आहे, आणि बागलाण देशांतील किती संस्थानिक त्यांना अनुकूळ आहेत, हें प्रथमतः समजून घ्यावें, असा आम्हीं विचार केला; व प्रत्येकानें कोणकोणा संस्थानिकांकडे जावयाचें यांचें आपसांत ठराव करून आम्हीं भृगुकच्छ नगर सोडलें. मी या देशांत आलों आहें, आणि माझ्या बरोबरचे दुसरे सरदार निर-

निराळ्या संस्थानिकांकडे गेले आहेत. येथें येण्यापूर्वीच आपण रत्नाकर महाराजांचे पूर्ण अभिमानी अहां, आणि निंबराजाचा आपण द्वेष करितां असें मला समजलें, आणि मोठ्या आनंदानें मी आपल्या दर्शनास आलों आहें.'

असें बोलून सरदार हलधर थोडा वेळ स्तब्ध राहीला. हें आपलें भाषण त्या राजाला मानवेल अशी त्याची खात्री होती, आणि त्याप्रमाणें झालेंही. राजाचें मन पूर्वीहून आपणाकडे अधिक वळलें आहे, अशी त्याच्या मनाची खात्री झाली. त्या सरदारानें हें भाषण अगदीं धिटाईनें आणि न डगमगतां केलें असल्यामुळें, चूडामणीच्या मनाचा मोठा गोंधळ उडाला; पण सरदार हलधरानें आपल्या आगमनाचे हेतु इतक्या स्पष्ट रीतीनें उघड करून सांगितले, म्हणून शेखराला फार आनंद झाला.

सरदार हलधर पुढें म्हणाला,–'यावरून मी या प्रतापपुरामध्यें कां आलों आहें, हें आपल्या ध्यानीं आलेंच असेल. आपण रत्नाकर महाराजांचे अभिमानी आहां, म्हणून त्यांचा विजय व्हावयासाठीं आपण जे जे प्रयत्न कराल, त्या त्या प्रयत्नास माझें पूर्ण साहाय्य आपणांस मिळेल. माझी ही तरवार आपल्या व रत्नाकर महाराजांच्या सेवेस सिद्ध आहे. आतां, मी निंबराजाचें फार दिवस अन्न खाल्लेलें असूनही त्याजवर फिरून पडलों, हें आचरण विश्वासघातकीपणाचें आहे, अशी कदाचित् आपल्या मनामध्यें शंका येण्याचा संभव आहे. पण मी विचारतों, राजानें प्रजेचा विनाकारण छळ केला, तर तो प्रजेनें निमूटपणें सहन करावा काय? त्या दुष्ट राजानें मला माझ्या वडिलोपार्जित घरांतून–माझ्या मुलांबाळांतून–माझ्या आप्त-इष्टांतून आणि माझ्या सोयऱ्या धायऱ्यांमधून ओढून काढून देशोधडीस लाविलें असतांही मेषपात्र बनून कपाळास हात लावून राहिप्रमाणें नुसतीं बोटें मोडीतच बसावें असा जुलूम करणाऱ्या राजाचा आम्ही मान का परिस्थितीमध्यें मं. म्हणून आपण मला जर त्याचें शत्रुत्व अंगीं पुरुषत्वाचा अ आपण म्हणाल! आजपर्यंत वार कित्येक वेळां निंबराजाच्या डतांना म्यान्यांतून बाहेर पडली होती, यापुढें ती प्रत्यक्ष त्याच्याशीं झगडताना बाहेर पडेल; आणि ज्याप्रमाणें युद्धप्रसंगीं आपण आपलां शत्रु आपला शेजारी आहे, असें न समजतां आपलें हत्यार निष्ठुरतेनें चालवितां, त्याचप्रमाणें निंबराजाच्या वतीनें लढणारे लोक आपले देशबंधु आहेत, हें लक्षांत न घेतां माझी तरवार रत्नाकर महाराजांसाठीं म्यानांतून बाहेर पडेल!'

या भाषणापैकीं शेवटचीं वाक्यें मोठ्या वीरश्रीयुक्त स्वरानें उच्चारून सरदार हलधरानें थोडा विसावा घेतला. त्या तिघां श्रोत्यांपैकीं एकजण सुद्धां यावर बराच वेळ पर्यंत कांहीं बोलला नाहीं. दृढसंध राजा विचारांत निमग्न झाला होता. त्या सरदाराच्या भाषणानें चूडामणीच्या मनाची त्या सरदाराच्या निष्कपटीपणासंबंधानें जरी खात्री पटलेली होती, तरी तो चाहेरून तसें अगदीं दाखवीत नव्हता. कारण, त्या सरदाराच्या भाषणानें शेखराचें पूर्णपणें समाधान झालें आहे, असें त्याच्या मुद्रेवरून स्पष्ट दिसून येत होतें. तथापि आपल्या वडिलांचा मान राखण्यासाठीं तो प्रथम कांहींच बोलला नाहीं. आपला पूज्य पिता काय बोलतो, हें ऐकण्यासाठीं तो उत्सुकतेनें त्याजकडे पाहत बसला होता.

बऱ्याच वेळानें दृढसंध राजा म्हणाला,–'आपलें सर्व भाषण मीं ऐकलें, परंतु माझ्या मनांत अजून एक दोन शंका राहिल्या आहेत. तुम्हीं आतां आम्हांस जी ही हकीगत सांगितली, ती तुम्हीं पलीकडच्या दिवाणखान्यांत जमलेल्या मंडळीसमक्ष सांगण्यास कां हरकत घेतली?'

'त्याचेंही कारण पानामध्यें आपल्या गांठ पडली, त्या शत्रु आहें असें आणि तीं भिल्ल मंडळी पणांसही तसेंच सांगितलें मी निंबराजाचा शत्रु आहें, ही चारचौघांत बोलण्यास भीत नव्हतों, उघड आहे. पण अशा प्रकारच्या राजकारणासंबंधी गोष्टी चारचौघांत उघड उघड बोलण्याचा कोठेंही संप्रदाय नाहीं. कारण असल्या गोष्टींची एकदा चर्चा सुरू झाली, म्हणजे त्यावेळीं कित्येक नाजुक प्रश्न उपस्थित होतात, आणि त्यांचीं उत्तरें मोठ्या सावधपणानें आणि चतुराईनें द्यावीं लागतात; इसकेंच नव्हे तर, कित्येक नाजूक प्रश्नाचीं चारचौघांत विशेष चर्चा झाल्याच्या योगानें कार्याचा नाश होण्याचाही बुष्कळ संभव असतो. महाराज, मीच आपणांस नम्रपणें असें विचारतों कीं, आपण जेव्हां एकाद्या कारस्थासाचा विचार करतां, त्यावेळीं फक्त आपल्या पूर्ण विश्वासांतील मंडळी मात्र जवळ घेतां; नाजूक गोष्टी वाटेल त्याच्याजवळ उघड करीत नाहीं; तशांतलाच हा संध्यांचा प्रसंग नाहीं काय ?'

अत्यंत गंभीरपणानें आणि एकाद्या महान् मुत्सद्याला शोभेल अशा मुद्रेनें दृढसंध राजा म्हणाला,–'हें तुमचें उत्तर समाधानकारक आहे, हें मी कबूल करतों. बरें मी अणखी असें विचारतों कीं, तुम्ही आतां जी हकीकत सांगितली, ती सिद्ध करून दाखविण्याचीं साधनें तुम्हापाशीं आहेत काय ? प्रत्यंतर पुरावा असल्याखेरीज केवळ तुमच्या भाषणावर आम्हीं विश्वास कसा ठेवावा ? मी असें विचारतों, म्हणून तुम्हास राग येण्याचें कारण नाहीं. कारण संध्याचा काळ मोठा नाजूक आहे. या वेळीं एकाद्या गोष्टीबद्दल आपल्या मनाची पूर्ण खात्री पटल्याखेरीज तिचा स्वीकार करणें हें फार अविचाराचें कृत्य होईल, हें मी आपणांस सांगितलें पाहिजे, असें नाहीं.'

या वर चूडामणी अभिमान पूर्वक बोलला,–'या प्रसंगीं जर आपण अविचारानें एकादी गोष्ट केली, तर मोठा बिकट प्रसंग येईल. निंबराजा मोठा कपटी आणि विश्वासघातकी मनुष्य आहे, असें मीं ऐकिलें आहे. तो तुमच्या सारख्या हुषार गृहस्थास अशारीतीनें बोलावयास पढवून आमचा भेद काढण्यासाठीं हेर म्हणून पाठविण्यास कमी करावयाचा नाहीं. तुम्हीं त्याचे हेर असून असें अस्खलित खोटें भाषण करीत असाल, असें आम्हीं कां समजूं नये ?'

हें वडिल बंधूचें भाषण शेखरास जगदीं आवडलें नाहीं. तो टोंचून बोलण्याच्या स्वरानें चूडामणीला म्हणाला,–'तूं भलत्याच शंका काढून चालू विषयास मुद्दाम भलतेंच रूप आणूं पाहात आहेस ? प्रत्येक गोष्टीसंबंधानें जर आपण अशा कुशंका घेत बसलों, तर जगांतील व्यवहार बंद पडतील !'

चूडामणी मोठ्या आढ्यतेनें म्हणाला,–'तुला पोराला या राजकारणांच्या आणि युद्धाच्या गोष्टींत काय समजतें ? तूं तीं हितोपदेशाची पोथी घेऊन एकाद्या भटजीचावाप्रमाणें वाचून दाखवावीं.!'

वडील बंधूचे हें अपमानकारक भाषण ऐकून शेखराच्या भुवया चढल्या खेरीज राहिल्या नाहींत. तथापि तो आपला राग आवरून शांतपणें म्हणाला,–'तूं माझ्याहून वडील आहेस, आणि माझा भाऊ आहेस, म्हणूनच मी हें तुझें भाषण सहन करतों. जर कां दुसऱ्या कोणी हे शब्द उच्चारिले असते, तर त्याला याच क्षणीं माझ्या तरवारीचें पाणी दाखवितिलें असतें. मी आजपर्यंत कोठें तरवारगाजविलेली नाहा हें खरें, पण यापुढें जेव्हां प्रसंग येईल, तेव्हां मी स्वस्थ घरीं राहावयाचा नाहीं. ज्यावेळीं शत्रूशीं सामना देण्यासाठीं आमच्या राज्यांतील वीर आमच्या

निशाणाखालीं एकत्र होतील, त्यावेळीं मी सर्वांच्या पुढें आहे, असें आढळून येईल !'

आपल्या मुलाकडे अभिमानपूर्वक पाहून दृढसंधराजा म्हणाला,–'शाबास, शेखरा शाबास ! या वेळीं तूं आपल्या कुलास शोभेल असें भाषण केलेंस, याचा मला फार आनंद होत आहे. परंतु तुम्ही दोघां भावांनीं अशा रीतीनें कलह करावा, हें मात्र पसंत नाहीं.'

शेखरानें उत्तर केलें,–'आणि माझीही तशीच इच्छा नाहीं.'

इतक्यांत सरदार हलधर म्हणाला,–'महाराज; हा विषय सध्या राहूं दे. आपण सध्या मला प्रत्यंतर पुराव्यासंबंधानें प्रश्न केला होता, त्या संबंधानें मी कांहीं आपल्या पुढें ठेवितों.' असें म्हणून त्यानें आपल्या अंगांतील अंगरख्याच्या खिशामधून एक कागदांचें पुडकें काढलें, आणि तें आपल्या पुढें उघडून त्यांतून एक कागद हातीं घेऊन तो म्हणाला,–'हा एक कागद वाचून पहा. या कागदावरील मिति एक वर्षापूर्वीची असून मी आपल्या इनामाच्या गांवीं राहत असतां तेथून मला निंबराजानें चंपावतीस नेऊन आपल्या प्रधान मंडळांत मला असामी दिल्याचा मजकूर या कागदांत आहे. हा दुसरा कागद पहा. हें सुमारें तीन महिन्यां पूर्वीचें एक पत्र आहे. यामध्यें मी राजाच्या इच्छेविरुद्ध आपलें मत प्रदर्शित केलें, म्हणून राजानें मला किती दोष दिला, तो मजकूर यामध्यें आपणांस आढळेल. तिसरा कागदही दुसऱ्या प्रमाणेंच ज्यामध्यें मला दोष दिला आहे, असें एक पत्र आहे. पहिल्या पत्रानंतर सुमारें आठ दिसांनीं हें पत्र त्यानें मला लिहिलें होतें. हा चवथा कागद ज्यावेळीं माझ्या घरावर छापा घालून मला कैद केलें, त्यावेळीं मला कैद करावयास आलेल्या अधिकाऱ्याच्या—देखतहुकूम—स्वाधीन होण्याबद्दींच्या मजकुराचें हें आज्ञापत्र आहे.'

दृढसंध राजा मोठ्या आढ्यतेनें म्हणाला, 'शिपाई गडी आहे ! तरवार मात्र धरण्याचा अभ्यास मीं केलेला असल्यामुळें मला या कारकुनीकामासंबंधानें कांहींच समजत नाहीं. तथापि कुमार शेखराला उत्तमप्रकारें लिहितां वाचतां येत असल्यामुळें—' शेखर आनंदानें म्हणाला,–'मी आतां हे कागद आपणास वाचून दाखवितों.' असें बोलून त्यानें ते कागद आपल्या हातीं घेतले.

इतक्यांत चूडामणि म्हणाला,–'तुम्ही अशा प्रकारचा मजकूर त्या कागदामध्यें असेल हें, ते कागद शेखारानें वाचून दाखविण्यापूर्वीच मी कबूल करतों. परंतु अशा-तुमच्यावर पूर्ण भरंवसा ठेवावा, असा प्रकारचे कागद तुमच्यापाशीं आहेत असें मात्र मला वाटत नाहीं. कारण, मी आतां शंका घेतल्या प्रमाणें तुम्हाला जर त्या निंबराजानें हेर म्हणून इकडे पाठविलें असलें, तर त्याला अशा प्रकारचे कागद तुमच्यापाशीं देतां यावयाचे नाहींत कीं काय ? म्हणून मी म्हणतों, लेखणी, कागद आणि शाई यांच्या उपयोगानें बनविलेल्या या पुराव्याचा आपली सचोटी सिद्ध करण्यास माझ्या दृष्टीनें तरी कांहीं उपयोग नाहीं !'

यावर सरदार हलधरानें कांहींच उत्तर दिलें नाहीं. तथापि दृढसंध राजाला आपल्या पुत्राच्या अंतःकरणाची ही अनुदारता पसंत न पडल्यामुळें,त्यानें त्याजकडे तुच्छतेनें अवलोकन केलें. या वेळीं शेखर अगदीं लक्ष्यपूर्वक ते कागद वाचीत होता. ते कागद वाचून झाल्यावर तो म्हणाला,–'मीं हे कागद लक्ष्यपूर्वक तपासून पाहिले. हे अस्सल आहेत. प्रत्येक कागदावर निंबराजाचीं मोर्तबें आहेत, अर्थात् या कागदाच्या खरेपणाबद्दल संशय घेणें रास्त नाहीं.'

दृढसंध म्हणाला,–'असें आहे, तर या लेखी पुराव्यापेक्षां दुसरा कोणता पुरावा आम्ही मागावा ! तथापि—'

इतक्यांत चूडामणी बोलला,–'अहो तात, सध्याची वेळ मोठी आणीबाणीची आहे, म्हणून आपण यासंबंधानें पूर्ण विचार करूनच

आपलें मत बनविलें पाहिजे. जर आम्हीं या सरदारावर विश्वास ठेविला, आणि ते ज्या कांहीं गुप्त गोष्टी सांगतील त्या आपण ऐकून घेतल्या, तर उलट आम्हालाही मोकळ्या मनानें सर्व गुप्त गोष्टी याजपाशीं उघड कराव्या लागतील. आमच्या गोष्टी यांना समजल्यावर मागाहून हे सरदार अविश्वासू आहेत, असें आम्हांस समजलें, तर केवढा घरें अनर्थ होणार आहे? म्हणून आपल्या मनाची पूर्ण खात्री झाल्याखेरीज या सरदारावर विश्वास ठेवूं नये, असें मी साफ सांगतों.' असें बोलून चूडामणीनें त्या सरदाराकडे अत्यंत तुच्छतादर्शक दृष्टीनें पाहिलें.

दृढसंध राजा म्हणाला,–'अहो सरदार, हा चूडामणी या वेळीं जरी किंचित् उद्धटपणानें बोलत आहे, तरी त्याच्या बोलण्यांत बराच तथ्यांश आहे, असें आपणांस मुद्दां कबूल करावें लागेल. सध्याच्या स्थितींत मी आपणांस शत्रुही मानीत नाहीं, आणि मित्रहि मानीत नाहीं. जसा अधिक काळ लोटेल, व तुमचा आमचा सहवास अधिक होईल, तसातसा तुमचा स्वभाव कसा आहे, हें आमच्या आपोआपच अनुभवास येईल.'

हें दृढसंध राजाचें भाषण ऐकून शेखराला फार वाईट वाटलें, व ती गोष्ट ध्यानीं येऊन चूडामणीला अतिशय आनंद झाला, आणि त्या मत्सरग्रस्त वडिल बंधूनें मोठ्या विजयश्रीयुक्त मुद्रेनें आपल्या लहान भावाकडे पाहून आपल्या मनाचा दुष्टपणा व्यक्त केला.

दृढसंध राजा पुनः म्हणाला,–'अहो, चंपावतीकर, मी आपणावर पूर्ण विश्वास ठेवावा कीं नाहीं, हें आपणास उद्यां सांगेन, आणि सध्याच्या राजकारणासंबंधानें आपले विचार काय आहेत, तेही ऐकून घेईन.'

सरदार हलधरानें विचारलें,–'काय उद्यां! इतक्या थोड्या अवकाशांत माझ्या खरेपणाबद्दल तुमची कशी काय खात्री होणार, हें मझ्या लक्षांत येत नाहीं.'

अत्यंत गंभीरमुद्रेनें दृढसंध राजानें उत्तर दिलें,–'या संबंधानें मी सध्या अधिक बोलूं इच्छित नाहीं.'

चूडामणि म्हणाला,–'तथापि या सरदाराच्या मनांत थोडीशी कल्पना यावी, म्हणून मी सांगतों कीं, ज्या गृहस्थासंबंधानें आमच्या मनांत संशय येतो, त्या गृहस्थासंबंधानें सर्व प्रकारची खात्री पटवून घेण्यासारखी साधनें आमच्यापाशीं तयार आहेत. त्या साधनांचा उपयोग केल्यावर ज्याला सध्या आम्ही मोठ्या मानानें वागवीत आहों, त्याला आपल्या विश्वासांत घ्यावा, कीं त्याचें आचरण कपटीपणाचें आहे म्हणून त्याला देहांत शिक्षा करावी, याचा उलगडा आपोआपच होईल!'

दृढसंध म्हणाला,—'हा मुलगा अगदीं मोकळ्यामनाचा आहे. याला जें काय वाटेल, तें हा मोकळ्या मनानें उघड उघड बोलून सोडतो. यासाठीं तुम्हीं त्याचें बोलणें मनास आणूं नये.'

सरदार हलधर म्हणाला,–'मी त्यांच्या बडबडीकडे मुळींच लक्ष्य देत नाहीं. तुमच्यापाशीं कोणत्याही प्रकारचीं साधनें असोत तुम्हीं खुशाल त्यांचा उपयोग करा. ज्याला कर नाहीं त्याला डरही नाहीं. पण मला मोठें आश्चर्य वाटतें, कीं एकाद्याच्या मनाची परिक्षा करण्याचें असें कोणतें साधन आपल्यापाशीं असावें?'

दृढसंध म्हणाला,–'तें साधन गुप्त आहे, असें नाहीं. त्या पलीकडच्या दिवाणखान्यांत जमलेले भिल्ल 'कौल, कौलः' असें ओरडत होते, तें तुम्हीं ऐकिलें आहे, व कौल म्हणजे काय हें आपल्या सेवकानें आपणास सांगितलें आहे. या प्रश्नाचा निकाल देवाला कौल लावून आम्हीं करून घेणार.'

आपल्या विश्वासूपणासंबंधानें आलेली शंका अशा रीतीनें फेडून घेण्यास त्या राजानें तयार व्हावें, या गोष्टीची सरदार हलधराला फार चीड आली, आणि क्रोधामुळें त्याच्या

भुंवया किंचित् वर चढल्या. हें पाहून दृढसंध राजा म्हणाला,–'अहो सरदार, यांत आपणास वाईट वाटण्याचें अगदीं कारण नाहीं. आजपर्यंत आमचे वाडवडिल देवास कौल लाऊन आपल्या शंका फेडून घेत आले, तोच मार्ग आम्हीही धरणार. देवावर आमचा भरंवसा आहे, आणि ती जो कौल देईल तो खराच असणार, अशी आमच्या मनाची खात्री आहे. ज्या अर्थी आज तुम्हीं आमच्या घाड्यांत पाहुणे आहां, त्या अर्थी आतांच्या या पहिल्याच बैटकीस तुमच्या आमच्यामध्यें तोंड वाजू नये, अशी माझी इच्छा आहे.'

असें म्हणून दृढसंध राजा आसनावरून उठून उभा राहिला, त्यावरून हें खलबत संपलें, असें समजून त्याचे पुत्र आणि सरदार हलधर हेही आपापल्या जाग्यावरून उठले, आणि ते सर्वजन पुनः पूर्वीच्या दिवाणखान्यांत आले.

प्रकरण ५ वें.

कौलाची तयारी.

मागील प्रकरणांत सांगितलेलें खलबत दुसरीकडे सुरूं असतां पूर्वीच्या दिवाणखान्यांत काय चालले होतें तें आपण पाहूं. त्या दिवाणखान्यामध्यें सत्यरथ, जांधिळमामा आणि बरेच भिल्ल इतकी मंडळी उरली होती. त्या मंडळींमध्यें सत्यरथ हा परकी असून ज्यानें गरुडाचा प्राण घेतला, त्याचा सेवक असल्यामुळें त्याच्या जवळ जाऊन बोलत राहण्याची कोणाची इच्छा नव्हती; हें उघड असल्यामुळें तो तेथें एकटा पडला होता. त्या दिवाणखान्यांत असलेल्या लढाईच्या व शिकारीच्या हत्यारांकडे पाहून तो आपल्या मनाची करठिक करून घेत असल्याप्रमाणें दिसत होता; असें दिवाणखान्यांतील मंडळीचीं काय बोलणीं चालीं आहेत, इकडे त्याचें पूर्ण लक्ष होतें. याशिवाय इतर भिल्ल मंडळी आपापल्या वयाप्रमाणें व योग्यतेप्रमाणें चार चार पांच पांच जणांचे घोळके करून सरदार हलधरासंबंधानें अनेक प्रकारचे तर्क काढीत बसली होती. हें संभाषण जरी भिल्लांच्या हेंगाड्या भाषेमध्यें चाललें होतें, तरी सत्यरथाला ती भाषा अवगत असल्यामुळें, त्या भाषणांतील प्रत्येक अक्षर त्याला समजत होतें.

मेलेला गरुडपक्षी त्या दिवाणखान्याच्या अगदीं मध्यभागीं ठेविलेला असून, त्याच्या भोंवतीं गंभीर मुद्रा धारण करून जांधिळमामा पांच सहा भिल्लांसह बसला होता. आज ना उद्यां केव्हां तरी दरींतील रहिवाशांवर मोठें संकट गुजरणार अशी त्याच्या मनाची खात्री होती. त्यांच्या दृष्टीनें हें संकट निभावण्याचा फक्त एकच उपाय होता. तो उपाय म्हणजे ज्यानें त्या गरुडाचा प्राण घेतला, त्याचा प्राण घेणें हाच होय. अशी त्यांच्या मनाची कल्पना असल्यामुळें, ते सरदार हलधराचा प्राण घेण्यास अगदीं हपापलेले दिसत होते. त्यांचें जें भाषण सत्यरथाच्या कानीं पडलें, तें असें.

जांधिळमामा आपल्या भोंवतीं जमलेल्या भिल्लांस उद्देशून म्हणाला,–'आम्हांवर जें संकट पुढें यावयाचें त्याची अशा रीतीनें देवानें पूर्वी सूचना दिली असतां, आम्ही तिकडे दुर्लक्ष केलें, तर तो आमचाच गाढवपणा नव्हे काय ? पिढ्यान पिढ्या आपण ज्या गोष्टी ऐकत आलों, आणि पाहत आलों, त्या खोट्या कशा म्हणाव्या ? अशा प्रकारें आपणांस सूचना मिळाली असून, आपण जर येणारें संकट टाळण्यासाठीं वेळींच बंदोबस्त केला नाहीं, तर देवाचा आम्हांवर कोप होणार नाहीं काय ! मला माझ्या लहानपणची चांगली आठवण आहे. माझा म्हातारा आजा होता, तो मला लहानपणीं आपल्या बरोबर सोनानदीवर घेऊन जात असे. आमच्या मेंढ्या चरूं लागल्या, म्हणजे आमचा आजा एका धोंडीवर बसे, आणि मी त्याच्याजवळ खेळत बागडत असें. त्यावेळीं जवळ एकादा गरुडपक्षी नजरेस पडला, कीं 'तो पहा देव-

बापा' असें मला दाखवून माझा आजा मला त्या पक्ष्याला हात जोडून नमस्कार करावयास सांगे. हे गरुडपक्षी म्हणजे सामान्य नसून देव आहेत, आणि ते या समोरच्या डोंगरावर बसून तेथून आमच्या दर्याचें रक्षण करीत असतात, असें माझा आजा मला सांगे, त्या गोष्टीची मला अजून पक्की आठवण आहे.'

दुसरा एक भिल्ल म्हणाला,—'तुमचे आजोबा तुम्हालाचं काय, पण आमचे वडील सुद्धां आम्हांला असेंच सांगत, आणि आम्हीं सुद्धां आपल्या लेंकरांस असेंच सांगतों!'

इतक्यांत दुसऱ्या एका घोळक्यांतील एक भिल्ल ओरडला,—'अहो मंडळी, हे म्हातारे पटुकर्ण मोठी गमतीची गोष्ट सांगत आहेत, ती जर तुम्हीं सर्वांनीं ऐकली, तर गरुडपक्ष्याचा जीव घेणारांची काय दशा होते, व त्यामुळें कशीं संकटें येतात, हें तुमच्या ध्यानांत येईल.'

पटुकर्ण हा एक अत्यंत वृद्ध भिल्ल होता. त्याचें वय जवळ जवळ नव्वद वर्षांचें होतें, तरी अद्यापि त्याचा कोणताही अवयव विगलित झालेला नव्हता. त्याच्या डोक्यास भलें मोठें टक्कल पडलें होतें; तथापि त्याचे सर्व दांत शाबूत असल्यामुळें त्याचा वर्णोच्चार अगदीं स्पष्ट होत असे. हा वृद्ध भिल्ल मोठा हुशार व गमत्या असल्यामुळें, त्याचें भाषण सर्व जण मन देऊन ऐकूं लागले. तो म्हणाला,—'अरे मी इतका म्हातारा झालों आहें खरा, पण अजून कांहीं माझी आठवण नाहींशी झालेली नाहीं. माझ्या लहानपणापासून ज्या ज्या गोष्टी घडून आल्या आहेत, त्या सगळ्या मला अगदीं खडानखडा आठवत आहेत. माझ्या आठवणींत गरुडपक्ष्यांचा पांचचार वेळां अशा रीतीनें जीव गेलेला आहे, व त्या प्रत्येक वेळीं कांहींना कांहीं तरी अनर्थ घडून आलेला आहे. मी अगदीं लहानसुमारें दहा वर्षांचा होतों, तेव्हां एकदां काय झालें, या पलीकडच्या डोंगरावर शिकार करण्यासाठीं म्हणून हातीं तिरकमठा घेऊन एक गृहस्थ आला होता, आणि त्यानें टेंबलाईच्या चिंचेवर बसलेल्या गरुडावर नेम धरून त्याला खालीं आणलें. तो गरुडपक्षी नेमका सोनानदीच्या डोहांत पडला. आणखी काय चमत्कार सांगावा? या गोष्टीस पुरते आठ दिवस लोटले नसतील, तोंच आमच्या त्यावेळच्या महाराजांचा वडील मुलगा म्हणजे या आमच्या दृढसंध महारांजांचा चुलता नेमका त्याच ठिकाणीं सोनानदींत पडून मरण पावला. एवढ्यानें निभावलें असें समजूं नका! या गोष्टीस एक दोन महिने होतात, तोंच एकाएकीं कोणाच्या ध्यानीं मनीं नसतां, या आमच्या प्रतापपुरावर छापा आला. त्यावेळीं आमच्या झोंपड्या जळल्या किती, आमचे लोक मेले किती, आणि आमचीं मेंढरें बकरीं शत्रूंनीं नेलीं किती, कांहीं विचारूं नका! हा छापा कोणीं घातला होता, तें आलें का तुमच्या ध्यानांत? जो शिकार करण्यासाठीं दरींत आला होता, आणि ज्यानें गरुडाचा प्राण घेतला होता, तोच दुष्ट रतनपुरचा राजा पिंगलाक्ष!' ही त्याची गोष्ट ऐकत असतां त्याचे श्रोते अगदीं एकाग्र मनानें त्याजकडे डोळे व कान देऊन बसलेले असल्यामुळें त्या म्हाताऱ्यास हुरूप येऊन त्यानें दुसरी गोष्ट सांगण्यास प्रारंभ केला. तो म्हणाला,—'मी लहान असतांच दुसरी एक गोष्ट घडून आली. याच दरींत राहणाऱ्या एका म्हातारीच्या पोराला वेड लागलें होतें. तो वेडा पोरगा एके दिवशीं वेडाच्या लहरींत एका झाडावर चढला, आणि त्यानें त्या गरुडपक्षाचें घरटें खालीं पाडलें. त्या घरट्यांत सात पिल्लें होतीं. त्यानें त्या पिलांच्या मानां मुरगळून तें घरटें आपल्या झोंपड्यांत नेलें; आणि चमत्कार काय सांगावा! [illegible] घरट्यांत बरोबर सात पिलें होतीं, त्यांचा [illegible] पोरानें प्राण घेतला, त्यानंतर बरोबर सातच [illegible] सांनीं त्याच्या झोंपड्यावर वीज पडली, [illegible] त्या झोंपड्याची राख रांगोळी उडा[illegible] ती

ह्मातारी ठार झाली. झालें; आणखी सात दिवस गेले, आणि तो वेडा पोरगा ज्या झाडावरून त्यानें पिलें काढलीं होतीं, त्याच झाडावरून खालीं पडून त्याचा चुराडा झाला. त्यानंतर दर आठवडयास एक, अशीं पांच माणसें सोना नदींत बुडून मेलीं. आणखी एक गोष्ट सांगतों. सुमारें तीस वर्षांपूर्वी आह्मीं सुंदरपुरावर हल्ला केला होता, व त्या वेळीं आह्मांस माघार घ्यावी लागली होती. हें तुमच्यापैकीं पुष्कळांस स्मरत असेल, त्या स्वारीपूर्वी आमच्या दरीमध्यें एक लंबकर्ण ह्मणून मोठा शूर पुरुष होता, तोही तुह्मांला आठवत असेल. तो जरी मोठा शूर होता, तरी तो दारूबाज आणि अविचारी होता. त्यानें एके दिवशीं दारूच्या निशेमध्यें गरुडपक्षी धरला, आणि त्याचीं पिसें उपटून तीं त्यानें आपल्या बाणाच्या पिसाऱ्यास लाविलीं; पण याचा परिणाम काय झाला ! जेव्हां आह्मीं सुंदरपुरावर चालून गेलों, आणि तेथें चकमकीस आरंभ झाला, तेव्हां त्या लंबकर्णानें तो बाण आपल्या शत्रूवर टांकला; पण तो बाण कोणासही न लागतां शत्रु सैन्याच्या मध्यें जाऊन पडला. शत्रुसैन्यांतल्या एका लढवय्यानें तोच बाण आपल्या धनुष्यास लावून परत आमच्या सैन्यावर टांकला, त्या वेळीं अगदीं नेमका तो बाण लंबकर्णाला लागून प्रथमतः त्याचा बळी पडला ! एवढ्यानेंच कोठें भागलें ! त्या स्वारींत आह्मांला हार खावी लागली, आणि सुंदरपुरकरांची नुकसानी भरून देतांना नाकीं नऊ आले ! हा नुसता गरुडाचीं पिसें उपटल्याचा परिणाम ! ! ! '

असें बोलून तो वृद्ध पटुकर्ण उगाच बसला. या वेळीं तेथील सर्व भिल्लांचे चेहेरे अगदीं उदासीन दिसत होते. त्या ठिकाणीं उदासीनतेचें साम्राज्यच पसरलें होतें असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

कांहीं वेळानें जांघिळमामा ह्मणाला,— ' यांनीं सांगितलेल्या सर्व गोष्टींहून विलक्षण अशी प्रत्यक्ष माझ्या वडील बंधूच्या संबंधाची गोष्ट तुह्मांस माहीत असेलच. तो किती शूर आणि धाडसी होता, हें मीं सांगितलें पाहिजे असें नाहीं. त्यानें एके दिवशीं याच वाडयाच्या देवडीवर बसणाऱ्या गरुडपक्षावर सहजगत्या एक लहानसा दगड फेंकला; पण माझ्या त्या भावाच्या दुर्दैवानें तो दगड त्या पक्ष्याच्या वर्मीं लागून तो पक्षी मेला ! ही गोष्ट सकाळींच घडली, त्याच दिवशीं सायंकाळीं विराध नांवाच्या एका आमच्यांतल्याच भिल्लानें त्याचा खून केला ! '

वृद्ध पटुकर्ण ह्मणाला,— तेवढ्यावरच कोठें निभावलें ! खूनाबद्दल त्या विराधाला तर फांशीची शिक्षा झालीच, पण त्याच दिवशीं दृढसंध महाराजांचा पहिलाच मुलगा अंथरुणावर मेलेला सांपडला. या गोष्टीस निदान ४० तरी वर्षें झालीं असतील. त्यानंतर पुष्कळ वर्षांनीं त्यांची पहिली स्त्री मरण पावली. तो मुलगा जर हयात असता, तर दृढसंध महाराजांच्या बरोबरीचा दिसूं लागला असता. तात्पर्य काय, कीं ज्या ज्या वेळीं या आमच्या दरींतील गरुडांचा जीव अपघातानें जातो, त्या त्या वेळीं राजघराण्यांतलें एकादें माणूस तरी मृत्युमुखीं पडतें. देवी चामुंडे ! सध्यांचा प्रसंग मोठा बिकट आलेला आहे, यांतून तूं दृढसंध महाराजांस आणि त्यांच्या पुत्रांस पार पाड ! '

असें ह्मणून त्या वृद्ध भिल्लानें हात जोडून नमस्कार केला, हें पाहतांच इतर भिल्लांनींही त्याचें अनुकरण केलें. सत्यरथ तेथील शस्त्रांकडे पहात उभा राहिल्याप्रमाणें दिसत होता, तरी त्याचें चाललेल्या गोष्टींकडे पूर्ण लक्ष होतें. गरुडाच्या मरणासंबंधाच्या जसजशा एकामागून एक गोष्टी त्याच्या कानांवर पडत चालल्या, तसतशा त्याच्या मनांत अधिकाधिक भीति उत्पन्न होऊं लागली. तथापि तो निधड्या छातीचा माणूस असल्यामुळें, त्यानें बाह्यात्कारीं

तसें अगदीं दाखविलें नाहीं. या सर्व गोष्टींवरून भिल्लांच्या मनामध्यें गरुडाविषयीं आणि आपल्या राजाविषयीं किती प्रेम वसत जाहे, हें त्याच्या पूर्णपणें ध्यानीं आलें, व आपण सध्यां ज्या प्रसंगांत आहों, तो प्रसंग मोठा आणीबाणीचा आहे, अशी त्याच्या मनाची खात्री होऊन चुकली. आपला धनी ज्या कामासाटीं गेला आहे, त्या कामांत त्याला जसें यश-अपयश येईल, त्याप्रमाणें पुढें परिणाम होणार. जर का आपल्या धन्यासंबंधानें राजाचें मत विपरीत झालें, तर आपल्या धन्याबरोबरच आपणास प्राणांस मुकावें लागणार, ही गोष्ट त्याच्या डोळ्यांपुढें मूर्तिमंत उभी राहिली !

अशा स्थितींत थोडावेळ गेला. नंतर दृढसंध राजा आपल्या पुत्रांसह आणि सरदार हलधरासह त्या दिवाणखान्यांत येऊन दाखल झाला. त्याबरोबर सर्व भिल्ल एकदम उठून उभे राहून त्यांच्या भोवतीं गोळा झाले, व राजा त्या सरदारासंबंधानें काय सांगतो, हें ऐकण्यास उत्सुक होऊन ते त्याच्या तोंडाकडे पाहूं लागले. सत्यरथाच्या मनाची यावेळीं काय स्थिति झाली असेल बरें !

अत्यंत गंभीर मुद्रेनें, व छाती पुढें काढून दृढसंधराजा ताठ उभा राहिला, आणि त्यानें बोलावयास प्रारंभ केला. तो म्हणाला,- 'या सरदार हलधरार्शी आम्हीं बराच वेळ खलबत करीत बसलों होतों, म्हणून तुम्हांला आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. या खलबतामध्यें पुष्कळ नाजूक प्रश्न उपस्थित झालेले होते; तथापि प्रत्येक गोष्टीसंबंधानें या सरदारांनां अगदीं मोकळ्या मनानें व विश्वासानें भाषण केलें, त्यावरून या गृहस्थांचे हेतु शुद्ध असावे, असें आम्हांस वाटतें. मनामध्यें कपट असतां इतक्या रीतीनें मोकळेपणा दाखविणें हें काम फार कठीण आहे; अशा रीतीचें दुटप्पी वर्तन ज्याला चोख साधेल, त्याच्या स्वभावाचें कौतुकच केलें पाहिजे. हे गृहस्थ जर लबाड असतील, तर यांच्यासारखा ढोंगी पुरुष आजपर्यंत निर्माण झाला नसेल व पुढें होईल कीं नाहीं, याची शंकाच आहे. यांनीं जो खुलासा केला आहे, तो माझ्या मनास पटला नाहीं, असें जर मी म्हणेन, तर मजकडे खोटें बोलण्याचा दोष येईल. तथापि माझ्या मनाची पूर्णपणें खात्री पटली आहे, आणि हे गृहस्थ विश्वासघात करण्याच्या बुद्धीनें येथें आलेच नसतील, असें सांगावयास मात्र मी तयार नाहीं. अशा प्रकारची मोठी नाजूक स्थिति असल्यामुळें या प्रश्नाचा विचार आपण स्वतां न करितां, आमच्याहून सर्व प्रतीनें श्रेष्ठ, आमचें रक्षण करण्याविषयीं तत्पर आणि दुष्टांचा नाश करणें हेंच ब्रीद, अशा त्या देवी चामुंडेला या प्रसंगीं शरण जावें, आणि तिचें साह्यत्य मागावें, असा मीं विचार ठरविला आहे.'

राजाचा हा विचार त्या भिल्लांस मनापासून आवडल्यामुळें, त्यांनीं आनंदानें आरोळ्या मारून तो दिवाणखानाच काय पण तो सर्व राजवाडा दणाणून सोडला. त्याचप्रमाणें कौल घेण्यास एकटा जांघिळमामाच योग्य आहे, असें सर्वांचें एकमत असल्यामुळें, प्रत्येकजण त्यांचेंच नांव घेऊन ओरडूं लागला.

राजानें मोठ्यानें ओरडून म्हटलें,-'कौल घ्यावयाचा, हें तर ठरलेंच. चला तर आतां येथें गलबला करूं नका. कौलाच्या तयारीस लागा.' राजानें असें निक्षून सांगतांच तेथें जमा झालेले सर्व भिल्ल एकामागूनएक निघून गेले. जातांना मेलेला गरुडपक्षी जांघिळमामानें आपल्या बरोबर नेला, आणि अशाप्रकारें अपघातानें मेलेला गरुडपक्षी पुरण्यासाठीं जी जागा नेमलेली होती, तेथें तो पुरून टाकला.

राजवाड्यामधून भिल्ल निघून गेले, त्यावेळीं सुमारें सहा घटका दिवस उरला होता. संध्याकाळपर्यंतचा वेळ कसा तरी घालविला पाहिजे होता, म्हणून सरदार हलधर आपल्या

सेवकांसह दृढसंध राजाच्या संमतीनें फिरावयास बाहेर पडला. सरदार हलधराला यावेळीं त्या दरीचा देखावा दोनप्रहरपेक्षां अगदीं निराळ्या प्रकारचा भासूं लागला होता. दोनप्रहरीं दरीमध्यें थोडें तरी ऊन पडलें होतें, पण यावेळीं तेथें सूर्यकिरणांचा अगदीं अभाव असल्यामुळें, ती अतिशय उदास व भयाण दिसत होती. तशांतून त्यावेळीं आकाश अभ्राच्छादित झालें होतें. सरदार हलधराचें मन यावेळीं अनेक प्रकारच्या विचारांत गढून गेलें होतें. सुमारें एक प्रहरपर्यंत मुखावाटे एकही अक्षर न काढतां त्या दरीमध्यें तो फिरत होता. जरी त्या वेळीं दोन अडीच घटका दिवस उरलेला होता, तरी दरीमध्यें अगदीं टळटळीत तिनसांजांच्या वेळेप्रमाणें काळोख पडला असल्यामुळें, तिचें स्वरूप अधिकच भयाण दिसत होतें. सरदार हलधर परत येत असतां त्याला अनेक प्रकारचे चमत्कारिक आवाज ऐकूं येऊं लागले, आणि जसजसा काळोख अधिकाधिक पडत चालला, तसतसे अनेक प्रकारचे विलक्षण देखावे त्याच्या नजरेसमोर भासूं लागले. तथापि त्या सरदाराचें धैर्य असामान्य असल्यामुळें, या आवाजामध्यें कांहीं अलौकिकपणा आहे, किंवा आपणांस जे विलक्षण देखावे दिसतात, ते एकाद्या अगम्य शक्तीचे केले आहेत, असें मात्र त्याच्या मनामध्यें आलें नव्हतें. कारण रात्रींचें ओरडणें, कड्यांवरून कोसळणाऱ्या ओढ्यांचा दणदणाट आणि आपापल्या घरट्याकडे वेगानें चाललेल्या गरुडपक्ष्यांच्या पंखाचा झणकारा यांच्या मिश्रणानें तेथें चमत्कारिक आवाज ऐकूं येत, आणि दरीमधील झाडें झुडपें दूर असल्यामुळे त्यांचे वेगवेगळे आकार काळोखामुळें दिसत, त्या झाडीपासून जसें अधिक उणें अंतर प्रेक्षकामध्यें असतें, तसतसें ते आकार अधिक उणे स्पष्ट दिसत, तथापि या एकंदर देखाव्यानें सरदार हलधराच्या मनाला बरीच उदासीनता आल्याखेरीज राहिली नाहीं.

संध्याकाळपर्यंत विशेष प्रकारें सांगण्यासारखी गोष्ट राजवाड्यांत घडून आली नाहीं. दिवे लागल्यावर थोडयाच वेळानें राजवाड्यांतील जेवणेंखाणें आटोपलीं. कौलासंबंधीं विशेष गोष्टी रात्रींच करावयाच्या असल्यामुळें राजाज्ञेवरून त्या दिवशीं जेवणें लौकर आटोपण्यांत आलीं होतीं. जेवणें झाल्यावर सरदार हलधराला दृढसंध राजानें आपल्या समोर बोलावून आणून पाहुण्याच्या आदरसत्कारास योग्य असें थोडेसें भाषण केले आणि वाड्यांतील जे दोन दिवाणखाने नेहमीं पाहुण्यांसाठीं राखून ठेविलेले असत, त्या दिवाणखान्यांत शय्या तयार करवून तेथें त्याला पोंचवून राजा आपल्या नेहमीच्या बैठकीवर दिवाणखान्यांत येऊन बसला. थोड्याच वेळानें त्याचे पुत्रही त्याजपाशीं आले. त्यांस दृढसंध राजा म्हणाला,– 'मुलांनों, आतां लवकरच कौल घ्यावयास जावयाचें आहे; तुमची तयारी आहे ना!'

चूडामणि म्हणाला,–'माझी तयारी आहे. हा शेखर तिकडे येणार आहे कीं नाहीं, हें मात्र त्याला विचारा. तो आपणांस मोठा विद्वान् म्हणवितो, तेव्हां हे एवढे जाडे विद्वान् गृहस्थ असल्या देवभोळ्या गोष्टी पहावयास येतील, असें मला वाटत नाहीं.'

यावर शेखरानें कांहीं जबाब दिला असता कीं नाहीं हें आमच्यानें सांगवत नाहीं. कारण तितक्यांत दिवाणखान्याचें दार उघडून कित्येक भिल्ल तेथें आले. या भिल्लांपैकीं एक जांघिळमामा खेरीज इतर सर्व भिल्लांच्या हातीं मशालीवजा मोठे कांकडे असून त्यामुळें दिवाणखान्यांत चकचकाट झाला होता. यावेळीं बहुतेक भिल्लांनीं मद्यपान केलें असल्यामुळें त्यांचे डोळे तारवटलेले दिसत होते; व ते ज्या कामासाठीं आणि ज्या ठिकाणीं जाणार होते, त्या कामाच्या आणि स्थलाच्या महत्त्वामुळें त्यांच्या मुद्रा भेसूर, गंभीर आणि उदास दिसत होत्या. या भिल्लांपैकीं मुख्य भिल्लानें दृढसंध राजाला कौलाची सर्व तयारी

झाली असल्याची वर्दी दिली. राजानेंही आपली तयारी असल्याचें सांगितलें, आणि तो जुजबी पोषाक करून चामूंडेच्या देवालयाकडे जावयास सिद्ध झाला.

तितक्यांत शेखर पोषाक करण्याच्या निमित्तानें तेथून निघाला, आणि त्यानें सरदार हलधराची गांठ घेऊन, कौल घेऊन परत आल्यावर पुनः भेटण्याचें त्यास वचन देऊन तो परत आपल्या पित्यापाशीं आला.

कांहीं मशालवाले भिल्ल पुढें, दोघां पुत्रांसह राजा मध्यें आणि बाकीचे मशालवाले मागें, अशा रीतीनें ती सर्व मंडळी राजवाड्यांतून बाहेर पडली. राजवाड्याकडून सोनानदीकडे जाण्याचा उतरणीचा मार्ग उतरून ती सर्व मंडळी त्या नदीच्या कांठानें जाणारा पिशाच सोपान घाट चढूं लागली. या घांटानें ते सुमारें एक घटकाभर पुढें गेल्यावर तेथें डोंगरांत जाणारा दुसरा एक मार्ग फुटत होता, त्या मार्गापाशीं ते येऊन पोंचले. हा मार्ग अत्यंत अरुंद व बिकट असल्यामुळें त्या मार्गानें फक्त एकाच माणसास जातां येत असे. म्हणून या ठिकाणीं एकामागून एक अशा रीतीनें तेथून पुढें जावें लागलें. त्यामुळें तेथें मशालींची एक लांबच लांब रांग लागली होती. ही पाऊल वाट जेथें होती, तेथें वांकण असून ती जागा सोनानदीच्या अगदीं जवळ असल्यामुळें या सर्व मशालींचें प्रतिबिंब त्या नदीच्या उदकामध्यें पडून तिचें उदक ज्वालामय दिसत होतें ! या वेळीं त्या मंडळींत कोणीं सुद्धां तोंडावाटे शब्द उच्चारीत नव्हतें; व त्यामुळें त्या कृत्यास अधिकच गंभीरपणा आलेला होता. आणखी एक घटका डोंगर चढल्यावर ते सर्वजण एका देवळापाशीं येऊन पोंचले.

त्या जाग्याहून आणखी भयाण जागा त्या सगळ्या दरींमध्यें दुसरी कोणतीही सांपडली नसती. ह्या भयाण जागेचें यथास्थित वर्णन करणें आमच्या शक्तीच्या बाहेरचें आहे. ह्या ठिकाणीं एक जुनाट वृक्ष होता. ह्या वृक्षाचा बुंधा जरी अतिशय मोठा म्हणजे पांच सहा माणसांच्या वेंघांमध्यें न सांपडण्यासारखा होता, तरी त्यावर त्या-मानानें विस्तार मुळींच नव्हता, त्यामुळें तो बोडका दिसे. त्या वृक्षावर वीज पडून त्याच्या फांद्या जळून गेलेल्या असल्यामुळें तो वृक्ष अतिशयच उदासवाणा दिसे. शिवाय कोणास फांशीं चढविण्याचा प्रसंग आल्यास त्याला याच वृक्षाच्या एका आडव्या खांदीस फांशीं देत असत. दरींतील भयंकर गुन्हेगार, आणि ज्यावेळीं प्रतापपुरकरांची जवळच्या एकाद्या संस्थानिकाशीं लढाई जुंपे, त्यावेळीं दरींतील भेद काढण्यासाठीं येणारे शत्रूचे हेर, यांस फांशी देण्याचे बरेच प्रसंग तेथें येत असत.

ह्या देवळापाशीं उभें राहून समोरच्या डोंगराकडे नजर दिल्यास काळोखामध्यें त्या डोंगरावरील झाडाच्या आकृति अकराळ विकराळ राक्षसांप्रमाणें दिसत असत. या देवळाच्या बाजूला एक ओढा मोठ्या जोरानें वाहत असे, आणि देवळाजवळच त्याचा धबधबा पडत असल्यामुळें, त्याच्या खोंताखालीं मोठा डोह बनलेला होता. या डोहामध्यें आजपर्यंत शेंकडों माणसांनीं जीव दिलेले होते. अपघातानें मरण पावलेलीं माणसें भुतें होतात, ही आपल्या देशांत चोहींकडें कल्पना आहे; त्याचप्रमाणें या दरींतील लोकांचीही कल्पना असल्यामुळें, कौल घेण्यास त्यांनीं हीच जागा पसंत केलेली होती. मध्यरात्रीच्या शांत, उदास व भयंकर वेळीं धबधब्यांत जीव दिलेलीं माणसें भुतांच्या रूपानें वर येतात, आणि तीं तेथें असलेल्या चामुंडादेवीच्या भोंवतीं नृत्य करितात, अशी त्या भिल्लांची समजूत होती. कौल घेण्यासाठीं जो पुरुष विधिपूर्वक रक्तस्नान करून चामुंडेच्या देवळामध्यें बसतो, त्याला तीं भुतें भेटतात व त्याच्या मनांतील गोष्टींचा उलगडा करतात, अशी त्या भिल्लांची कल्पना असल्यामुळें त्यांनीं कौल घेण्यासाठीं चामुंडेचें देवालय हीच जागा निश्चित केलेली होती.

ज्या ठिकाणीं ती सर्व मंडळी येऊन थांबली, तें स्थान अशा प्रकारचें भयंकर होतें. ह्या ठिकाणीं जें देऊळ होतें, त्यास दरवाजा मुळींच नव्हता. त्या देवळाला फक्त तीन बाजूंनीं भिंती असून एक बाजू साफ उघडी होती. सर्व मंडळी देवळापाशीं आल्यावर त्यांनीं प्रथमतः देवळास तीन प्रदक्षणा घातल्या. नंतर ते देवळामध्यें गेले. त्या देवळामध्यें खुंट्यांस लाविलेले पांच प्रचंड ढोल होते, ते ढोल खालीं काढून पांच जवानांनीं ते वाजविण्यास प्रारंभ केला. बाकीच्या भिल्लांनीं आपल्या हातांतील मशाली खालीं न ठेवतां त्या ढोलवाल्या भिल्लांभोंवतीं फेरा धरून नृत्य करण्यास सुरुवात केली. त्यावेळीं ते तोंडानें एक गाणेंही म्हणत होते. हें नृत्य चाललें असतां ते आपल्या हातांतील मशाली तालांवर हालवीत असत. जर कोणी एकाद्यानें तो त्यांचा नाच लांबून पाहिला असता, तर तीं माणसें नसून हातीं मशाली घेतलेलीं प्रत्यक्ष पिशाचेंच तेथें नाचत आहेत, असा त्याला भास झाला असता. हें नृत्य चाललें असतां जांघिळमामा देवीपुढें असलेल्या मोठ्या थोरल्या धुपाटण्यांत मुठी भरभरून धूप घालीत होता, आणि तोंडानें देवीच्या स्तवनाचें एक गाणें म्हणत होता. धुपाचा धूर सर्व देऊळभर इतका पसरला होता कीं, त्या धुरामुळें मशालीच्या ज्योतींचा तांबडेपणा नाहींसा होऊन त्या ज्योति पांढुरक्या दिसूं लागल्या, धुपाच्या धुरांमुळें, मशालींच्या चकचकाटामुळें, ढोलाच्या दणदणाटामुळें, मद्याच्या कैफामुळें आणि चाललेल्या कृत्याच्या भेसुरपणामुळें तेथील सर्व भिल्लांचीं डोकीं अगदीं भणाणून गेलीं होतीं, आणि त्यांचे डोळे एक प्रकारच्या अलौकिक तेजानें चमकूं लागले होते.

हें नृत्य संपल्यावर एका भिल्लानें आपल्या बरोबर आणिलेल्या मद्याच्या घटांतून एक भांडें भरून काढिलें, आणि त्याचा चामुंडेला नैवेद्य दाखविला. नंतर पुनः तें भांडें त्यानें त्या घटांत ओतलें. देवीच्या प्रसादाच्या मिश्रणानें प्रसादमय झालेल्या त्या मद्य घटांतून एक भांडें भरून काढून तें त्यानें प्रथमतः जांघिळमामास प्यावयास दिलें. नंतर तो प्रसाद सर्वांस वांटण्यांत आला. फक्त शेखरानें मात्र देवीच्या प्रसादाचा मान करण्यासाठीं त्या मद्याचा वास घेऊन तें भांडें परत केलें. राजासुद्धां सर्वांनीं मद्यप्राशन केल्यावर एक भिल्ल देवळांतून बाहेर गेला. व देवळाबाहेर एका झाडाला एक मोठा थोरला बोकड बांधून ठेवलेला होता, तो त्यानें सोडून देवळांत आणला, आणि तेथें देवीच्या समोर देवळाच्या मध्यभागीं जो एक चौक बांधलेला होता, त्या चौकावर तो बोकड उभा केला. नंतर दृढसंध राजानें पुढें होऊन आपली तरवार म्यानांतून बाहेर काढली, ढोल जोरानें वाजूं लागले, आणि सर्व भिल्लांनीं चामुंडेचा जयजयकार केला. हा प्रचंड ध्वनि देवळामध्यें घुमत असतां राजानें आपल्या तरवारीच्या एका फटक्याबरोबर त्या बोकडाचें शिर धडापासून वेगळें केलें. त्याबरोबर खालचा चौक रक्तप्रवाहानें लाल भडक होऊन गेला. जांघिळमामा जवळ उभा होता, त्यानें एका क्षणाचाही विलंब न करतां त्या रक्तामध्यें लोळून तें आपल्या सर्वांगास माखून घेतलें, आणि एका भिल्लानें रक्ताचा प्रवाह वाहत असलेलें बोकडाचें धड त्याच्या अंगावर उलटें धरलें. सर्वांग रक्तानें माखलेला असा तो जांघिळमामा एकाद्या भयंकर राक्षसाप्रमाणें दिसूं लागला. त्याचे आधींच तीक्ष्ण व विलक्षण तेजस्वी असलेले डोळे, मद्यपानानें लालभडक झालेले होते. तशांतच हा रक्तस्नानविधि झाल्यामुळें, आणि यापुढें आपणास पिशाचांचें दर्शन होणार, अशी त्याच्या मनाची ठाम कल्पना असल्यामुळें, त्याचे डोळे अलौकिक तेजानें चमकूं लागले होते. यावेळीं जर तेथील मंडळींखेरीज दुसऱ्या कोणीं त्याला पाहिलें असतें, तर–भली उंच, व भव्य, रक्तानें

पूर्ण माखलेली, मद्याच्या धुंदीमुळें बेफाम बनलेली, आणि आसुरीवृत्तीचें तेज जिच्या-नेत्रामध्यें चमकत आहे, अशी ती त्याची मूर्ति पाहून आपल्या समोर कोणी पिशाच किंवा मूर्तिमंत राक्षस उभा आहे, असें वाटून त्याची भयानें बोबडीच वळली असती!

रक्तस्नान आटोपल्यावर जांधिळमामा एका पोत्यांत शिरला. या पोत्याच्या कांठांशीं एक भोंक होतें, त्यांतून त्यानें फक्त उजवा हात मात्र बाहेर काढला. हें पाहतांच दोन भिल्लांनीं मोठमोठ्या दोऱ्या घेऊन त्या दोऱ्यांचे पोत्याभोंतीं पायांपासून गळ्यापर्यंत चांगले वेढे दिले, आणि त्याला तेथें देवीपुढें आडवें ओनलें. या वेळीं डोकें आणि उजवा हात इतकाच त्याच्या शरीराचा भाग पोत्या-बाहेर होता. दोऱ्या गुंडाळून झाल्यावर राजानें आपल्या कमरेची कट्यार काढून ती जांधिळ-मामाच्या हातीं दिली. इतकें झाल्यावर आणखी कांहीं करावयाचें नव्हतें, म्हणून भिल्लांनीं पुनः आपल्या पेटलेल्या मशाली हातीं घेतल्या आणि ते परत जावयास सिद्ध झाले.

तसल्या भयंकर जागेमध्यें तशा स्थितींत पडून रहाणाऱ्या त्या पुरुषाचें काळीज उलटें होतें, यांत शंका नाहीं. सर्व मंडळी जावयास सिद्ध झाली, तथापि त्या निधडया छातीच्या पुरुषाला भीतीचा लेशही शिवला नाहीं. किंवा ज्या हातीं त्यानें कट्यार घेतली होती, तो हात यत्किंचित् कंपित झाला नाहीं! सर्व मंडळी जावयास सिद्ध झालेली पहातांच अगदीं खण-खणीत स्वरानें त्यानें त्रिवार चामुंडेच्या नांवाचा जयजयकार केला; आणि त्या भिल्लांनींडी मोठ्यानें तीच गर्जना करून तो डोंगर दणाणून टाकिला.

इतकें झाल्यावर एकट्या जांधिळमामा-खेरीज सर्व मंडळी तेथून निघून गेली. जांधिळमामा या वेळीं स्वतांला या जगांतील मनुष्य समजत नसावा, तर आपण कोणीं पिशाच आहों, असें त्याला वाटत असावें, असें त्याच्या मुद्रेवरून दिसून येत होतें. अशा रीतीनें आपल्या कल्पना-शक्तीच्या जोरावर नवीन सृष्टि निर्माण करून त्या सृष्टीचें साम्राज्य करण्यासाठीं त्याला तेथें एकटा टाकून सर्व मंडळी निघून गेली.

प्रकरण ६ वें.

हलधर आणि शेखर.

सरदार हलधराची शय्या ज्या दिवाणखान्यांत घातलेली होती, तो दिवाणखाना मोठा भव्य असून त्याच्या लगत असलेल्या एका लहाशा खोलींत सत्यरथाच्या निजण्याची सोय केलेली होती. या दोन्ही जागांस खिडक्या वगैरे मुळींच नसून आंत हवा येण्यासाठीं बाजूच्या भिंतींना तिरपीं भोकें राखलेलीं होतीं. मोठ्या दिवाणखान्यामध्यें एक मोठा थोरला पलंग होता. त्याजवर मच्छारदाणी टाकलेली होती. एका कोपऱ्यांत एक मोरी असून तिच्यापाशीं पाण्याची एक मोठी थोरली घागर भरून ठेवि-लेली होती. खोलींत जो दिवा होता, तो अगदीं मिणमिणीत होता; त्याच्या अंधुक प्रकाशामुळें तो भव्य दिवाणखाना उदासवाणा दिसत होता. सध्या हे प्रवासी ज्या परिस्थि-तींत होते, त्या परिस्थितींत तो दिवाणखाना त्यांना सुखदायक वाटण्यासारखा मुळींच नव्हता.

सरदार हलधर हा फार मितभाषी होता. तो आपल्या सेवकांबरोबर देखील फार वेळ बोलत बसत नसे. पण सध्या त्यानें आपला नेहमीचा स्वभाव बाजूस ठेऊन, दृढसंधाशीं झालेलें खलबतखान्यांतलि भाषण आपल्या सेवकास अक्षरशः सांगितलें. त्याजप्रमाणें सत्यरथानें पहिल्या दिवाणखान्यांत ऐकलेलें भिल्लांचें भाषण आपल्या धन्यास इत्थंभूत निवेदन केलें. सत्यरथानें सांगितलेल्या गरुड-पक्ष्यांच्या गोष्टी ऐकून प्रतापपुरच्या दरींतील भिल्लांना गरुडपक्ष्यांचें किती महत्त्व वाटतें हें सरदार हलधराच्या पूर्णपणें लक्ष्यांत आलें;

आणि त्यांचा देवभोळेपणा आपणास किती घातक होईल, यासंबंधाचे सर्व विचार त्याच्या मनांत एकदम उभे राहिले.

सरदार हलधर आपल्या सेवकास म्हणाला,–'तो जांघिळमामा कौल घेऊन उद्यां सकाळीं इकडे आला, म्हणजे तो आम्हांविरुद्ध गोष्टी सांगेल, यांत शंका नाहीं. गरुडपक्ष्याचा माझ्या हातून प्राण गेला, म्हणून आधींच त्याचें मन मजाविषयीं कलुषित झालेलें आहे. अशा प्रकारचे त्याचे पूर्वग्रह असल्यामुळें 'मनीं वसे तें स्वप्नीं दिसे' या न्यायानें त्याच्या मनांत आमच्याविषयीं अनुदार विचार उत्पन्न झाल्याखेरीज राहणार नाहींत. अशा प्रकारची त्याच्या मनाची स्थिति बनलेली असल्यामुळें त्या ओसाड आणि भयाण प्रदेशांत त्याला जे कांहीं भास होतील, ते आम्हांला प्रतिकूल असेच असतील. यासाठीं सत्यरथा, सकाळीं आपणांवर जो प्रसंग बेतेल त्याला टक्कर देण्यास आपण तयार असलें पाहिजे!'

सत्यरथ म्हणाला,–'महाराज, तरी मी आपणांस या साहसासंबंधानें पूर्वीच विनंति करीत होतों. या प्रांतांतील भिल्ल लोक किती दुराग्रही आहेत–'

सरदार हलधरानें झटलें,–'पुरे पुरे, त्यासंबंधानें आतां बोलून काय उपयोग आहे? तूं मला वेळींच सूचना देऊन सावध केलेंस होतेंस हें मी प्रांजळपणानें कबूल करतों. या साहसाचा जर कांहीं भलताच परिणाम झाला, तर स्वतःपेक्षां मला तुह्याबद्दल फार खेद होईल. कारण मीं आपल्या आग्रहीपणामुळें तुह्यावर हें संकट आणिलें आहे.'

सत्यरथ म्हणाला,–'महाराज, सध्यांच्या प्रसंगीं माझ्यासारख्या यःकश्चित् सेवकाबद्दल आपण विचार करणें हें अगदीं योग्य नाहीं. आपण हजारों लोकांचे पोशिंदे आहांत. आपल्यावर संकट आल्यास त्यामुळें मोठा अनर्थ होणार आहे; म्हणून सध्यांच्या या प्रसंगामध्यें आपण धैर्य सोडितां नये. हा प्रसंग खात्रीनें निभावेल. त्या दुष्ट जांघिळमामाचें भविष्यज्ञान कितीही असो, आपण कोण आहों, हें त्याला उमगणें अगदीं अशक्य आहे.'

सरदार हलधरानें विचारलें,–'तर मग तुझा या कौलावर अगदींच विश्वास नसावा असें दिसतें. तुझ्या देशबांधवांच्या समजुतींहून तुझ्या समजुती निराळ्या दिसतात.'

सत्यरथानें उत्तर केलें,–'कौलावर माझा अगदीं विश्वास नाहीं. अर्थात् त्या जांघिळमामाला आपल्यासंबंधानें विशेष ज्ञान होणार नाहीं, अशी माझ्या मनाची खात्री आहे. या भिल्लांचा स्वभाव निसर्गतःच सत्यप्रिय आहे, म्हणून तो जांघिळमामा आपण होऊन एकादी गोष्ट रचून सांगेल, असें मला वाटत नाहीं. हे लोक देवभोळे असल्यामुळें, असत्याचरण करण्यास फार भितात. कारण, जर आपल्या मनाची पूर्णपणें खात्री पटल्याखेरीज एकादी गोष्ट आपण केली, तर आपल्या वर्तनाचा देवास राग येऊन तो आपणांस आपल्या अविचाराबद्दल शिक्षा केल्याखेरीज राहणार नाहीं, अशी त्यांची ठाम समजूत असते. अर्थात् आपल्यासारख्या पाहुण्यांना प्रथम आश्रय देऊन नंतर त्यांजवर आग पाखडणें त्यांच्या हातून केव्हांही व्हावयाचें नाहीं.'

सरदार हलधर म्हणाला,–'तर मग आपण सध्यां ज्या स्थितींत आहों, त्या स्थितीबद्दल पूर्ण विचार करूनही तुझ्या मनांत निराशा उत्पन्न होत नाहीं, असें म्हटलें पाहिजे.'

सत्यरथानें उत्तर केलें,–'सध्यां आपण किती भयंकर प्रसंगांत सांपडलों आहों, हें जरी मला स्पष्टपणें कळत आहे, तरी या प्रसंगांतून देखील आपण पार पडून जाऊं अशी माझ्या मनाला खात्री वाटते. मी निःसंशय सांगतों, कीं उद्यां तो जांघिळमामा

कौल घेऊन परत आला, म्हणजे आमच्या विरुद्ध कांहीं देखील सांगणार नाहीं ! '

हलधरानें सांगितलें,–'तथापि त्या राक्षसाच्या मनांत रात्रीं जे काय विचार येतील किंवा जे कांहीं त्याला भास होतील, त्यांवर आपलें जीवित अवलंबून आहे, ही गोष्ट मात्र खोटी नव्हे. त्याचें मन भरकटून जाऊन जर त्याला कांहीं भलते सलते भास झाले, तर आमच्या जिवावर मोठा कठीण प्रसंग गुजरणार आहे. तूं म्हणतोस त्याप्रमाणें जर तो खरोखरच सच्चा माणूस असला, आणि आज त्या भयंकर स्थळामध्यें रात्र घालवितांना जर त्याच्या मनाची समता बिघडली नाहीं, तर मात्र आमच्या जिवासंबंधानें काळजी करावयास नको. या प्रसंगांतून आपण निभावूं अशी आशा बाळगण्यास दुसरें मात्र एक कारण आहे. तो शेखर मोठा उदार दिलाचा मुलगा आहे. त्याची मैत्री आपल्या उपयोगी पडेल. मघांशीं त्यानें कौलास जाण्यापूर्वी हळूच येथें येऊन मला आज रात्रीं झोंपीं जाण्यापूर्वी पुनः भेटण्याचें वचन दिलें आहे.'

याप्रमाणें त्या दोघांचें कांहीं वेळ भाषण चाललें असतां मध्येंच सरदार हलधराच्या मनामध्यें एक शंका आली. तो म्हणाला,–'सध्यां आपण अगदीं मोकळ्या मनानें येथें बोलत बसलों आहों, हें खरें; पण आपलें भाषण कोणी ऐकत नाहीं, अशी आपण आपल्या मनाची प्रथम खात्री करून घेतली नाहीं, हें कांहीं बरें झालें नाहीं. आपण अजून तरी सावध झालें पाहिजे. '

सत्यरथ बोलला,–'यासंबंधानें काळजी करण्याचें कारण नाहीं. सध्यां आपलें ज्या भाषेमध्यें भाषण चाललें आहे, ती भाषा इकडच्या प्रदेशांत कोणाला अवगत असेल, असें मला वाटत नाहीं. '

सरदार हलधर म्हणाला,–'तथापि आपण सावध रहावें हें बरें. ज्याप्रमाणें तूं आमच्या नगरींत नोकरीसाठीं पुष्कळ वर्षें घालवून ही भाषा शिकलास, त्याप्रमाणेंच दुसरे कोणी ही भाषा शिकले नसतील कशावरून! कांहीं असो, आपण जर एकदां या दोन्ही जागांची बारकाईनें तपासणी केली, तर त्यांत कांहीं बिघडत नाहीं, हें उघड आहे.'

असें बोलून सरदार हलधरानें हातीं दिवा घेतला, आणि त्या दोन्ही जागांची सूक्ष्मदृष्टीनें तपासणी सुरू केली. खिडक्यांऐवजीं हवा येण्यासाठीं जीं भोकें राखिलेलीं होतीं, त्या भोकांवरून भिंतींच्या जाडीचा अंदाज करतां येत होता. त्यावरून आपलें भाषण त्या भिंतीच्या पलीकडे असणाऱ्या माणसांच्या कानीं जाणार नाहीं, अशी सरदार हलधराच्या मनाची चटकन खात्री झाली. त्या खोलीच्या भिंतीसुद्धां त्यानें आपल्या तरवारीच्या मुठीनें ठोकून तपासून पाहिल्या, परंतु त्या सर्व अगदी भरींव आहेत, असें त्याला आढळून आलें; त्यामुळें भिंतींत असलेल्या पोकळींतून आपलें भाषण कोणी ऐकत असेल, अशीहीं शंका उरली नाहीं. त्या दोन्ही जागांमध्यें कपाटें, कोनाडें किंवा फडताळें अगदीं नसल्यामुळें, त्यांमध्यें कोणी लपून राहण्याची सोयच नव्हती. मोठ्या दिवाणखान्यांत जो पलंग मांडलेला होता, त्याला मात्र मच्छरदाणीचें आच्छादन असून तें भुईपर्यंत आलेलें होतें. या पलंगाखालीं किंवा त्याच्या आड कोणी लपलेला नाहीं, अशी त्यानें आपल्या मनाची खात्री करून घेतली. इतकेंच नव्हे, तर त्या दिवाणखान्यामध्यें एका कोपऱ्यांत खुंट पुरून त्यावर एक शिरस्त्राणासह चिलखत ठेविलेलें होतें, त्या चिलखताची सुद्धां त्यानें तपासणी करून आपल्या मनाचा संशय फेडून घेतला.

याप्रमाणें त्याचें तपासणीचें काम संपल्यावर सत्यरथ म्हणाला,–'इतक्या रीतीनें आपण तपासणी केली असतां यांतूनही चुकून कोठें एकादी जागा राहिली असेल आणि तेथें बसून कोणीं आपलें भाषण ऐकलें असेल, असें मानण्याचें कारण नाहीं.'

सरदार हलधर बोलला,–' ही तपासणी सुरू करण्यापूर्वीच आपलें भाषण कोणी ऐकत नसावें अशी माझ्या मनाची खात्री होती; पण न जाणो, कदाचित् आपली कल्पना चुकीची असल्यास पुढें घोटाळा होऊं नये, म्हणून इतकी काळजी घेणें मला रास्त वाटलें. आपले शत्रु आपणांस फसविण्यासाठीं काय युक्त्या योजतील त्याचा प्रथम विचार करून आपण सावध रहावें हें आपलें कर्तव्य आहे. या वाड्यामध्यें असणारे सर्व लोक जरी आपलें शत्रुत्व करीत नसले तरी निदान एक माणूस तरी आपला कट्टा शत्रु आहे, अशी माझ्या मनाची खात्री पटलेली आहे. मीं हें त्या चूडामणीसंबंधानें बोलतों, हें तुझ्या ध्यानीं आलेंच असेल. '

सत्यरथ म्हणाला,–'हें आपलें म्हणणें अगदीं खरें आहे. मला त्या चूडामणीची मुद्रा अगदीं आवडत नाहीं. त्या दोघां भावांच्या स्वभावांत असलेला विरोध त्यांच्या मुद्रेवरून उघड उघड दिसून येतो. शेखर हा सौजन्याचा आणि औदार्याचा मूर्तिमंत पुतळा आहे, तर तो चूडामणि दुष्टपणा आणि निर्दयपणा यांची खाण आहे ! '

सत्यरथानें अशा रीतीनें त्या दोघां भावांच्या गुणावगुणांचें तुलनात्मक वर्णन बराच वेळ चालविलें असतें; पण आपल्या यजमानाचें आपल्या भाषणाकडे लक्ष्य नसून तो कांहीं निराळ्याच विचारांत निमग्न झाला आहे, असें त्यास आढळून आल्यामुळें, तो आपलें भाषण थांबवून स्तब्ध राहिला. कांहीं वेळ विचार करून झाल्यावर सरदार हलधर आपल्या त्या एकनिष्ठ सेवकास म्हणाला,–' सत्यरथा, तुला झोंप येत असली तर खुशाल जाऊन नीज. मला त्या शेखराची भेट घेणें भाग असल्यामुळें, तो येईपर्यंत मी जागत बसतों.'

सत्यरथ म्हणाला,–' आपली परवानगी असेल, तर मीही येथें आपल्या जवळच जागत बसतों; पण आपणांस एकांतच हवा असेल, तर तो शेखर येईपर्यंत आपल्या खोलींत जाऊन बसेन, आणि तो आल्यावर मात्र मी इकडे येईन. कारण मलासुद्धां त्या शेखराची भेट घेणें जरूर आहे. '

सरदार हलधरानें विचारलें,-'ती कशासाठीं?'

सत्यरथानें उत्तर दिलें,–' त्याच्या साह्यानें मला एक महत्त्वाचें काम पार पाडावयाचें आहे.'

सरदारानें विचारलें,–' तें कोणतें काम ? '

सत्यरथानें हात जोडून अत्यंत नम्रतेनें म्हटलें,–' महाराज; माझ्या मनांत जें कांहीं आहे, तें तडीस जाण्यापूर्वी कृपा करून आपण मला कांहींच विचारूं नये. अशी मी आपणांस विनंति करितों. '

सरदार हलधराचा आपल्या नोकरावर पूर्ण विश्वास होता, त्यामुळें त्या नोकराला अधिक प्रश्न विचारण्याची त्याला जरूर वाटली नाहीं; म्हणून तो म्हणाला,–' बरें तर पण तुला सांगतों, जर त्या भोळ्या शेखराच्या सहाय्यानें या वाड्यांतून पलायन करून जाण्याचा कांहीं विचार तुझ्या मनांत असला, तर तो मात्र निदान आज रात्रीं तरी साध्य होणें शक्य नाहीं हें ध्यानांत ठेव ! जरी दृढसंधराजानें आपणांस तसें सांगितलें नसलें, तरी आपण येथें बंदींत आहों, यांत शंका नाहीं; आणि तो राजपुत्र शेखर जरी कितीही उदार अंतःकरणाचा असला, तरी तो आपल्या सुटकेसाठीं स्वतःचा प्राण धोक्यांत घालील, असें मानण्याचें कारण नाहीं. '

यावर सत्यरथानें कांहींच उत्तर दिलें नाहीं. सरदार हलधर पुनः आपल्या मनांत विचार करूं लागला. एकामागून एक घटका लोटत चालली. शेवटीं मध्यरात्रही उलटून गेली; त्यानंतर कांहीं वेळानें सरदार हलधराच्या दिवाणखान्याचा दरवाजा हळूच उघडला, आणि राजपुत्र शेखरानें तेथें प्रवेश केला.

कबूल केल्याप्रमाणें शेखर तेथें आला, हें दृष्टीस पडतांच त्या नेहमीं गंभीर मुद्रा धारण

करणाऱ्या सरदाराची कळी थोडी उमलली व तो म्हणाला,–'अहो शेखर, तुम्ही कबूल केल्याप्रमाणें येथें आलां, हें पाहून मला फार समाधान वाटत आहे. पुढें तुमचें आमचें भाषण कांहींही होवो, परंतु आपण सायंकाळीं खलबतखान्यामध्यें माझा पक्ष धरिला होता, ह्यासंबंधानें मी आपला फार ऋणी आहें, हें मी प्रांजळपणें कबूल करितों.

राजपुत्र शेखर अगदीं मोकळ्या मनानें बोलला,–'अहो सरदार, आपण त्या वेळीं जें कांहीं आपल्यातर्फे सांगितलें, तें अगदीं खरें आहे, असें जर माझ्या मनास वाटलें नसतें, तर मीं स्पष्टपणें तसें बोलून दाखविलें असतें. महाराज, एकाद्या माणसासंबंधानें संशय घेण्यास पूर्णपणें कारण घडून आल्याखेरीज नुसत्या अनुमानावरून किंवा शकुनावर भरंवसा ठेवून त्या माणसाला लचाड म्हणणें हें अन्यायाचें आहे, असें मी समजतों. तथापि या दरींतील अडाणी भिल्लांचा गरुडपक्ष्यांसंबंधानें कसा विलक्षण समज आहे, हें आपल्या ध्यानीं आलेंच आहे. आज सायंकाळीं माझ्या वडील बंधूनें आपल्यासंबंधानें भाषण करतांना जो मनाचा अनुदारपणा व्यक्त केला, तो आमच्या कुलांतील पुरुषांस शोभण्यासारखा नव्हता, याचें मात्र मला फार वाईट वाटतें.'

सरदार हलधरानें उत्तर केलें,–'तुमचा स्वभाव उदार आहे, व तुम्हाला तुमच्या वडील बंधूचें आचरण पसंत नाहीं. हें पाहून मी तो गोष्ट अगदीं विसरून जातों. पण मी विचारतों, आज तो तुमचा सेवक कौल घेणार आहे, त्यासंबंधानें तुम्हाला काय वाटतें? पहा, माझी अब्रू सध्यां त्या माणसाच्या एका शब्दावर अवलंबून आहे! तुमचे हे देशबांधव जसे फाजील देवभोळे आहेत, तसे तुम्ही नसाल, अशी माझ्या मनाची खात्री आहे.'

राजपुत्र शेखर गंभीरपणानें म्हणाला,–'यासंबंधानें मी आपलें कांहींच मत देऊं इच्छित नाहीं. परंतु आपली अब्रू त्या अडाणी माणसाच्या हातीं सांपडली आहे, त्याबद्दल मात्र मला फार फार खेद होत आहे. तथापि तो जांघिळमामा भला माणूस आहे. तो उद्यां सकाळीं परत आल्यावर रात्रीं त्याला जें काय कळलें असेल, तेंच तो सांगेल; उगीच कांहीं तरी बनवून सांगणार नाहीं, याबद्दल मला खात्री आहे. लोक म्हणतात, त्याला भविष्यज्ञान आहे, आणि कौल घेत नसला, तरीसुद्धां कित्येक वेळां अचूक भविष्यें सांगतो. माझ्यासंबंधानें म्हणाल तर मला समजूं लागल्यानंतर माझे प्रतिष्ठानामध्यें जितके दिवस गेलेले आहेत, तितके कांहीं या दरींमध्यें गेलेले नाहींत. यामुळें या कौलाच्या बाबतींत काय अनुभव येतात, हें मला पक्कें माहीत नाहीं. तथापि आपण वाईट गोष्ट गृहीत धरूनच विचार करून पाहूं या. समजा, उद्यां सकाळीं परत आल्यावर त्या जांघिळमामानें आपल्या संबंधानें वाईट गोष्टी सांगितल्या, तर आपल्या अब्रूचीच काय, पण आपल्या प्राणांची देखील हानि होण्याची वेळ येणार आहे! हे भिल्ल लोक मोठे विलक्षण आहेत. जर उद्यां त्या जांघिळानें आपल्याला अनुकूल असें वर्तमान आणिलें तर हे लोक सर्व द्वेषभाव विसरून जाऊन आनंदानें आपलें स्वागत करतील. पण जर कां त्यानें कांहीं भलतें सलतें सांगितलें, तर त्यांच्या द्वेषास पारावार राहणार नाहीं, आणि ते आपल्याच काय, पण आपल्या सेवकाच्या जिवावरही तिळांजुळी देण्यास कमी करणार नाहींत! ईश्वर करो आणि असें न होवो! आपल्यावर सध्यां काय प्रसंग येऊन गुदरला आहे, हें अगदीं मोकळें मन करून आपणांस कळविण्यासाठीं मी मुद्दाम अशा अपरात्रीं येथें आलों आहें.'

सरदार हलधर म्हणाला,–'तुम्ही माझ्यासाठीं इतके श्रम घेतले, हे तुमचे मजवर फार फार उपकार आहेत. परंतु ज्या माण-

साचें मन आमच्याविषयीं प्रथमच कलुषित झालेलें आहे, आणि ज्यानें यथेच्छ मद्यपान करून त्या भयंकर स्थळामध्यें आणि चमत्कारिक परिस्थितीमध्यें रात्र घालविली आहे, ज्याचें मन अनेक प्रकारच्या आसुरी विचारांनीं भ्रमिष्ट आणि क्रूर बनलें आहे, अशा एका अविचारी माणसाच्या शब्दावर माझें जीवित अवलंबून रहावें, ही मोठी लांच्छनास्पद गोष्ट आहे!'

अत्यंद खेदपूर्वक राजपुत्र शेखर म्हणाला,-'होय; असें झालें आहे खरें!'

सरदार हलधर म्हणाला,-'अहो राजकुमार, मी मरणाला भितों असें मात्र तुम्ही समजूं नका. ज्या ठिकाणीं मृत्यूनें आपलीं सहस्रावधि मुखें पसरून ठेविलीं आहेत, अशा अनेक भयंकर प्रसंगांमधून मी कित्येक वेळां पार पडलों आहें. ज्या ठिकाणीं शत्रूंचे बाण कानांजवळून सूं सूं करीत जात आहेत, अशा घोर युद्धांमध्यें मी निर्भय अंतःकरणानें लढलों आहें; इतकेंच नव्हे, तर असल्या घोर युद्धांमध्यें आपल्या शिपायांस धीर देण्यासाठीं इकडून तिकडे हिंडत असतां मला ज्या कित्येक भयंकर जखमा लागल्या, त्यांचे वण अजून सुद्धां माझ्या अंगावर आहेत! ज्या शहरांच्या तटांवरील तोफांमधून अग्नीचा वर्षाव होत आहे, अशा शहरांच्या दरवाज्यावर हल्ला भिडवून मीं तीं शहरें हस्तगत करून घेतलीं आहेत. कित्येक वेळां नदी भरलेली असतां पलीकडच्या बाजूला आपलें सैन्य न्यावें म्हणून मीं स्वतः पुढें होऊन नदींत घोडा घातला आहे, आणि पलीकडच्या तीरावरील शत्रुपक्षाचे लोक मजवर नेम धरून तीर मारीत आहेत, असे प्रसंग मीं मोठ्या धैर्यानें पार पाडले आहेत. कित्येक वेळां मूठभर लोकांसह मी हजारों शत्रूंच्या वेढ्यांत सांपडलों आहें, परंतु त्यावेळीं न डगमगतां आपल्या तरवारीच्या साह्यानें तेवढ्याही शत्रूंची फळी फोडून मी पुनः आपल्या सैन्यास येऊन मिळालों आहें. अशा प्रकारचे शेंकडों प्रसंग मीं निभावून काढले असल्यामुळें, मी प्रत्यक्ष मृत्यूची हजारों वेळां गांठ घेतली आहे, असें म्हटलें, तर त्यांत मी आत्मप्रशंसा करीत आहें, असें माझें मलासुद्धां वाटणार नाहीं! कारण खऱ्या गोष्टी सांगितल्यास आत्मस्तुति होते, असें कोणीच म्हणणार नाहीं. पण लढाईमध्यें शत्रूशीं झगडत असतां मृत्यु येणें हें वीरपुरुषास जितकें भूषणास्पद आहे, तितकेंच लोकांनीं आपणांस विश्वासघातकी समजत असतां त्यांनीं केलेल्या नीच शिक्षेमुळें मृत्यु येणें हें अपमानास्पद आहे! ही गोष्ट मनांत येऊन मला फार खेद होत आहे.'

त्या विम्या सरदारानें आपली नेहमींची वहिवाट सोडून हें लांचलचक भाषण केलें होतें; इतकेंच नव्हे, तर हें भाषण त्यानें एकाद्या वीर पुरुषाला योग्य अशा आवेशानें केलें असल्यामुळें त्या भाषणाचा सरळ मनाच्या शेखरावर योग्य परिणाम झाल्यासेरीज राहिला नाहीं. आपल्या वक्तृत्वाचा असा परिणाम होईल अशी त्या सरदाराच्या मनाची पूर्ण खात्री होतीच.

राजपुत्र शेखर म्हणाला,-'महाराज, या वेळीं आपल्या मनाला किती खेद होत असेल, याची पूर्ण कल्पना माझ्या मनास करतां येत आहे, आणि म्हणूनच तुमच्यासारखे शूर आणि उदार अंतःकरणाचे थोर गृहस्थ आमच्या घरीं पाहुणे आले असतां त्यांचा योग्य सत्कार आमच्याकडून होत नाहीं; इतकेंच नव्हे, तर उलट आम्हीं त्यांच्या नाशास प्रवृत्त झालों आहों, याबद्दल माझ्या अंतःकरणास फार खेद होत आहे. आपण त्यावेळीं केवळ दयेनें प्रेरित होऊन माझ्या प्रियेच्या कोंकराचा प्राण वचावला, म्हणून आपल्यावर हा प्रसंग ओढवला आहे, याचें मला फार वाईट वाटतें. आपल्यावरचें हें संकट टळण्यासाठीं माझ्याकडून जें कांहीं होण्यासारखें असेल, तें करण्यास मी अगदीं माघार घेणार नाहीं. आपल्यावर असा प्रसंग

आला असतां मी जर स्वस्थ बसलों तर तें अगदीं अन्यायाचें व भित्रेपणाचें कृत्य होईल. यासाठीं आपल्या वर्तनें पुढें सरून आपलें रक्षण करण्याचा मीं निश्चय केला आहे. माझ्या या वर्तनामुळें मजवर वडिलांचा रोष झाला, तरी तो मी आनंदानें सहन करीन. आणि आपल्या एका केसास धक्का लागण्यापूर्वी मी आपली मान पुढें करीन. या माझ्या निश्चयांत कधींही अंतर पडणार नाहीं. यासांठीं मी जें कांहीं आतां सांगणार आहें, तें आपण लक्ष्यपूर्वक ऐकून घ्यावें, अशी माझी आपणांस विनंति आहे.'

हेमचंद्र म्हणाला,–'माझें पूर्ण लक्ष्य आहे!'

शेखर बोलला,–' जर उद्यां त्या जांघिळमामानें आपल्यासंबंधानें अपमानकारक भविष्यकथन केलें, तर पुढें काय करावयाचें याचा विचार आपणांस प्रथम कर्तव्य आहे. जर त्यानें सांगितलेला मजकूर खोटा आहे, असें आपलें म्हणणें पडलें, तर आपणांस द्वंद्वयुद्धानें या प्रश्नाचा निकाल करून घेण्याचा अधिकार आहे!'

हें ऐकून त्या सरदाराला फार आनंद होऊन त्याची मुद्रा प्रफुल्लित दिसूं लागली, आणि त्याचे नेत्र वीरश्रीनें चमकत असतां तो म्हणाला,–' तर मग मला आपल्या तरवारीचें पाणी त्या दांडगेश्वराला दाखविण्याची संधि मिळेल, ही आनंदाची गोष्ट आहे.—'

शेखर मध्येंच म्हणाला,–' महाराज, जर द्वंद्वयुद्ध करण्याचा प्रसंग आला, तर खुद्द आपणांस त्याच्या बरोबर युद्ध करतां येणार नाहीं. आपल्या वतीनें कोणा तरी योद्ध्यानें आपण होऊन पुढें झालें पाहिजे.'

सत्यरथ म्हणाला,–' तर मग मौक्षी त्या गोष्टीस तयारी आहे. माझी तरवार कांहीं बेगडीची नाहीं!'

शेखरानें उत्तर केलें,–' तुम्हालाही त्याजबरोबर युद्ध करावयास परवानगी मिळणार नाहीं. कारण आजचा जो कौल घेतलेला आहे, तो तुम्हां उभयतांसंबंधानें ही शंका उत्पन्न झालेली असल्यामुळें घेतलेला आहे; म्हणून जें यांच्यासंबंधानें घडून येईल तेंच तुमच्यासंबंधानें घडून येणार हें उघड आहे. असा प्रसंग आल्यास तुम्हां उभयतांच्या वतीनें युद्ध करण्यास मी आनंदानें पुढें होईन.'

सरदार हलधर आनंदानें म्हणाला,–'शाबास, राजपुत्रा, शाबास! आपल्यासारखें औदार्य दुसऱ्या कोणाच्याही अंगीं सांपडणार नाहीं! अरेरे, पण जर माझ्या दुर्दैवानें असा प्रसंग आला, आणि तुमची व त्या प्रत्यक्ष राक्षसाप्रमाणें क्रूर असलेल्या जांघिळमामाची समरांगणांत गांठ पडली, तर तुमचा त्याजपुढें किती निभाव लागेल यासंबंधानें माझें मन कचरतें!'

शेखर प्रखर वीरश्रीच्या योगानें खवळून म्हणाला,–'अहो सरदार, ती शंकाच सोडा. मी जरी शरीरानें व वयानें लहान असलों, तरी वीराचा बच्चा आहें! अधिक कशाला बोलूं! वेळ आली म्हणजे माझें कौशल्य आपल्या नजरेस पडेलच. जर आपल्यासंबंधानें त्या जांघिळानें विरुद्ध सांगितलें, तर आपण खुशाल द्वंद्वयुद्धास आह्वान करा, म्हणजे मी आपल्या वतीनें युद्धासाठीं आनंदानें पुढें होईन. हें आपणास अगोदर सुचविण्यासाठीं मुद्दाम संधि साधून आपली मी आतां भेट घेतली आहे. मला जें कांहीं करावयाचें होतें, तें मीं केलें आहे. आतां मी आपली रजा घेतों.'

असें म्हणून शेखर उठला, आणि दरवाज्याकडे निघाला, हें पाहून सत्यरथ त्याजपाशीं येऊन म्हणाला,–' महाराज, माझी आपल्यापाशीं एक विनंति आहे. आपल्यासारख्या राजपुत्रांशीं मी इतकी सलगी करावी हें जरी गैर आहे, तरी सध्यांचा प्रसंगच तसा बिकट असल्यामुळें मी मर्यादेचा अतिक्रम करतों, असें आपण मानणार नाहीं, अशी मला आशा आहे.'

शेखर म्हणाला,–' तसें काहीं मी समजत नाहीं. तुम्हाला मी माझा पाहुणाच समजतों.

जें काय तुम्हाला विचारावयाचें असेल, तें तुम्हीं खुशाल विचारा. परंतु पलायनासंबंधानें जर आपल्या मनांत कांहीं आशा असेल तर ती पूर्ण करणें मात्र माझ्या हातीं नाहीं. कारण ज्या दिवशीं कौल घेतात, त्या दिवशीं एका विवक्षित मर्यादेपलीकडे जावयास कोणासही परवानगी नसते, आणि जर कोणी बाहेर जाण्याचा प्रयत्न करील तर त्याला मोठी शिक्षा होते, हें ध्यानीं घेऊन जें विचारावयाचें असेल तें विचारा.'

सत्यरथ म्हणाला,–'पळून जाण्याची माझी मुळींच इच्छा नाहीं. फार काय, आपल्या या प्रतापपुरच्या वेशीचे सर्व दरवाजे अगदीं उघडे असते आणि दरीमध्यें एकही पहारेकरी नसता, तरी देखील मीं पळून जाण्याचा विचार आपल्या मनांत आणिला नसता. माझें जें कांहीं काम आहे, तें वेगळेंच आहें.'

हें त्याचें बोलणें ऐकून शेखर आणि हलधर ह्या दोघांसही फार विस्मय वाटला. कारण सत्यरथाच्या मनांत काय आलें असावें, याचा त्यांस अंदाज करतां येईना. तथापि त्यानें पूर्वी जें कांहीं करावयाचें आहे, असें आपणांस सुचविलें होतें, त्यासंबंधानें त्याची ही शेखरापाशीं विनंति आहे, असें हलधरानें ताडिलें होतें.

सत्यरथ शेखरास उद्देशून म्हणाला,–'महाराज, माझ्या मनांत सध्यां काय करावयाचें आहे, त्यासंबंधानें कृपा करून आतांच कांहीं विचारूं नका. जर शक्य असेल, तर आपण माझी एक इच्छा पूर्ण करावी, अशी माझी विनंति आहे. मी विश्वासघात करणार नाहीं, अशी हे माझे धनी आपल्यास खात्री देतील. आणि समजा, जरी माझ्या मनांतून कांहीं लचाडी करावयाची असली, तरी मी एकटा आणि या तुमच्या प्रदेशांत गैरमाहीत असतां ती कशी करूं शकणार ? छेः छेः, मी विश्वासघाताचें वर्तन प्राणान्तींही करणार नाहीं; फक्त मला दोन घटका–फार तर तीन घटका–या वाड्याबाहेर जाऊन यावयाचें आहे. मी बरोबर तीन घटका लोटण्यापूर्वी येथें परत येईन. यासाठीं मला एवढी संधि साधूत द्या.'

शेखर म्हणाला,–'मी तुमच्यावर विश्वास ठेवितों आणि तुमच्या म्हणण्याप्रमाणें कबूल करितों. सध्यां मध्यरात्र उलटून गेली आहे. थोड्याच वेळानें पहांट होईल. यासाठीं जलदी करून मजबरोबर बाहेर चला.'

सरदार हलधर म्हणाला,–'सत्यरथा, तूं माझ्यासाठीं आपला जीव धोक्यांत घालूं नये, अशी माझी तुला आज्ञा आहे.'

सत्यरथ हात जोडून म्हणाला,–'महाराज, मी आपल्या आज्ञेचा कधींही भंग करीत नाहीं, ही आपल्या मनाची खात्री असेलच; परंतु सध्यां मीं जें काय योजिलें आहे, तें करण्यास आपण मला आज्ञा द्यावी, अशी माझी आपल्या पायांपाशीं विनंति आहे!'

सत्यरथ बाहेर जाण्यास अत्यंत उत्सुक झालेला आहे, हें ओळखून हलधरानें त्याला अधिक हरकत घेतली नाहीं. फक्त–'जें काम करशील तें विचार करून कर,' एवढेंच त्यानें म्हटलें.

नंतर सत्यरथ आणि शेखर असे उभयतां त्या दिवाणखान्यांतून बाहेर पडले, आणि हलधरानें दरवाजा लावून घेतला. वाटेंत काळोख असल्यामुळें सत्यरथाचा हात धरून शेखर त्याला वाड्याच्या मागल्या भागांत घेऊन गेला. तेथें असलेला एक लहान दरवाजा उघडून शेखर त्याला,–'बरोबर दोन घटका लोटतांच मी पुनः या दरवाज्यापाशीं येऊन तुमची वाट पहात उभा राहीन, तुम्हीं फार वेळ बाहेर राहूं नये, असें माझें तुम्हांस निक्षून सांगणें आहे.' असें म्हणाला.

सत्यरथ म्हणाला,–'अहो उदार मनाचे राजपुत्र, आपण माझी विनंति मान्य केली, हे मजवर आपले फार उपकार आहेत. आपण

जें हें औदार्याचें कृत्य केलें आहे, तें ईश्वराचे घरीं रुजू आहे; आणि तो या कृत्याबद्दल आपणावर कृपा केल्याखेरीज कधीं राहणार नाहीं.'

इतकें बोलून सत्यरथ बाहेर पडला, आणि त्यानें एकदम सोनानदीकडे जाणारा मार्ग धरिला. पण तो कोठें गेला; हें काळोखामुळें शेखराच्या दृष्टीस पडलें नाहीं. तो निघून गेल्यावर आपण त्याला अशा रीतीनें अपरात्रीं बाहेर जाऊं दिलें, हें बरें केलें नाहीं, असें एकवार त्याच्या मनांत आलें. परंतु तो स्वभावतःच मोकळ्या मनाचा असल्यामुळें, त्यानें सत्यरथाचा विश्वास धरून आपल्या मनांत अधिक कुत्सित विचार येऊं दिले नाहींत. तो आपल्या शयनमंदिराकडे चालता झाला.

प्रकरण ७ वें.

कौल.

ती रात्र काळोखी असल्यामुळें भयंकर तर होतीच, पण तिचा भयंकरपणा अधिक वाढविण्यासाठींच कीं काय, मध्यरात्र उलटून गेल्यावर एकाएकीं वादळाला प्रारंभ झाला. एक घटकाभर सोसाट्याचा वारा वाहल्यावर एकदम जोराच्या पावसास प्रारंभ झाला. विजा चमकूं लागल्या. प्रचंड मेघगर्जना ऐकूं येऊं लागल्या, आणि एका घटकेच्या आंतच ओढ्याचे वेग वाढून त्यांच्या गंभीर नादानें दशदिशा दुमदुमून गेल्या. वायु आणि पर्जन्य या दोन देवतांच्या क्षोभानें भूमि दुभंग होते कीं काय, असें वाटूं लागलें.

मध्यरात्रीच्या शांत वेळीं भक्ष्याच्या शोधार्थ हिंडत असलेल्या कोल्ह्यांना आपल्या मनांतील उद्देश सफल होण्यापूर्वीच आपल्या निवासस्थानाकडे धांवा घ्याव्या लागल्या, म्हणूनच कीं काय त्यांनीं मोठमोठ्यानें कुई घालण्यास प्रारंभ केला. भालू विकराल स्वरानें रडूं लागल्या. मध्येंच एका उंच वृक्षावर वीज पडून तो जळून जात असतां त्याच्या वृक्षावरील गरुडपक्ष्यांनीं आपल्या तीक्ष्ण व कर्कश स्वरानें केंकावण्यास आरंभ केला ! विजेच्या चकाकीमध्यें एक क्षणमात्र-पुरता एक क्षण सुद्धां नव्हे-जो त्या दरीचा विलक्षण देखावा नजरेस पडत असे, तो तर एकाद्याचे हातपाय थंड पडण्याइतका विकराल होता. या वेळीं जर एकाद्या कवीनें तो देखावा पाहिला असता, आणि त्याचें मन गोंधळून गेलें नसतें, तर प्रलयकालाचा स्वामी महारुद्र रथामध्यें बसून मृगयेसाठीं या गिरिकंदरामध्यें आला आहे, मेघगर्जना म्हणजे त्याच्या रथचक्रांचा घडघडाट आहे, कोल्हे हे त्याचे शिकारी कुत्रे असून ते श्वापदांना भयभीत करण्यासाठीं ओरडत आहेत, गरुडपक्षी हे त्याचे ससाणे आहेत, अशा रीतीचें त्यानें छानदार रूपक केलें असतें.

वादळ म्हटलें म्हणजे तें कोठेंही होवो, त्याचें स्वरूप भयंकरच असावयाचें. परंतु सह्याद्रीं तें ज्या दरींत सुरू होतें तो दरीही भयंकर असल्यामुळें, त्याचें स्वरूप दुप्पट भयंकर भासत होतें. मेघगर्जनेचा प्रतिध्वनि पुष्कळ वेळ टिकण्यासारख्या अनेक जागा दरीमध्यें होत्या, आणि विद्युत्प्रकाशानें अत्यंत मेसूर दिसतील असे पुष्कळ देखावेही या ठिकाणीं होते. वादळाचे वेळीं जे अनेक प्रकारचे ध्वनि उत्पन्न होतात त्यांमध्यें भर घालण्यासाठीं तेथें मोठमोठे ओढे उड्या घालीत होते. प्रवाहाच्या जोरानें उत्पन्न होणारे भोंवरे, वादळानें उठणाऱ्या लाटा, भोंवऱ्यांनीं खालीं जाणारें व पुनः मोठ्या जोरानें उसळी मारून वर येणारें लाल भडक आणि क्षणोक्षणीं चमकणाऱ्या विद्युल्लतेच्या प्रतिबिंबानें तेजस्वी दिसणारें असें उदक जिच्या पात्रांतून वहात आहे अशी लहानच पण नागिणीप्रमाणें फूत्कार करीत जाणारी सोना नदी तेथें वाहत होती. ज्या ठिकाणीं भुतासेतांची

वस्ति आहे, असा लोकापवाद होता, अशी टिकाणेही त्या दरीमध्ये कमी नव्हती.

याप्रमाणें त्या भयानक दरीनें रौद्र स्वरूप धारण केलें असतां सर्वांग पोत्यामध्ये गुंडाळून घेऊन जो माणूस त्या भयाण व निर्जन प्रदेशामध्यें एकटा पडलेला होता, त्याच्या मनाची स्थिति या प्रसंगीं कोणत्या प्रकारची झाली असावी, हें वर्णन करण्याचें कोणाला तरी सामर्थ्य असेल काय ? ज्या ज्या वेळीं विजेच्या तीक्ष्ण प्रकाशानें त्याचे डोळे दिपून जात, आणि ज्या ज्या वेळीं भयंकर गडगडाट त्याच्या कानीं पडे, त्या त्या वेळीं आपणास साक्षात्कार देण्यासाठीं नभोमंडलांतून यक्ष, राक्षस, भूमीवर अवतीर्ण होत आहेत असें त्याच्या मनांत येई; आणि किंचित् भीतियुक्त आश्चर्यानें व उत्कंठेनें तो आसमंतांत अवलोकन करी. तेथें जवळच मारून टाकलेल्या बोकडाच्या मांसावर झडप घालण्यासाठीं एकादा गरुडपक्षी पंख फडफडावीत येत असतां कोणी तरी पिशाच आपणापाशीं येत आहे, असें वाटून त्याच्या सर्वांगावर शहारे उभे राहत, पण दुसऱ्या क्षणीं विद्युल्लतेच्या तेजानें, बोकडाच्या मांसावर ताव मारीत असलेला गरुडपक्षी त्याच्या दृष्टीस पडतांच खरा प्रकार त्याच्या ध्यानीं येऊन त्याचें मन किंचित् उदास होई. तो सध्यां ज्या ठिकाणीं होता, तेथें जवळच विजेनें जळून अर्ध मेलें झालेलें झाड होतें आणि त्या झाडाच्या फांद्यांला कित्येक अपराध्यांस फांशीं दिलेलें होतें; यामुळें जेव्हां एकादें भलें लट्ट वाघूळ आपले पंख फडफडावीत त्या वृक्षाच्या आडव्या खांदीपाशीं येऊन आपले पाय खांदीस अडकवून आपणास उलटें टांगून घेऊन लटकत राहत असे, त्या वेळीं त्याच खांदीवर फांशी दिलेल्या कोणाचें तरी त्या जांधिळमामास स्मरण होऊन तो मेलेला अपराधी पिशाचरूपानें पुनः आपल्यास त्याच खांदीला टांगून घेत आहे, असा त्याच्या मनांत विचार आल्यावेरीज रहात नसे. तितक्यांत एकाद्या श्वापदाचें खसखसणें त्याला ऐकूं यावें, आणि ज्यांनीं कोणीं देवळाजवळच्या धबधब्यांत जीव दिला होता, त्यांची आकृति आपल्याकडे येत असावी, असें त्यास वाटून त्याचें मन अधिर व्हावें, असा प्रकार एकसारखा चालला होता. अशा स्थितींत तो जांघिळमामा अगदीं न डगमगतां स्वस्थ पडून राहिला होता. यावरून त्याचें मन किती खंबीर होतें, त्याची कल्पना वाचकांनींच करावी.

अशा स्थितीमध्यें तो तेथें पडलेला असतां मध्यरात्र उलटून आणखी दोन घटका गेल्या. अनेक प्रकारच्या विलक्षण कल्पना त्याच्या मनांत घोळत असतां त्याला हळुहळु एक प्रकारची गुंगी येऊं लागली. पण तितक्यांत एकसारख्या प्रमाणांत पडत असलेल्या पावलांचा ध्वनि त्याला ऐकूं येऊं लागला. पूर्वीप्रमाणें हाही भ्रम असेल, असें पांच चार पळांत दहादां तरी त्याच्या मनांत आलें; पण पावलांचा शब्द उत्तरोत्तर अधिक स्पष्ट ऐकूं येऊं लागल्यामुळें, आपणांकडे कोणी तरी येत आहे, अशी त्याच्या मनाची पक्की खात्री होत चालली. ज्या दिवशीं कौल घेत त्या दिवशीं एकदां सर्व त्या देवालयांतून परत गेल्यावर पुनः कोणीं कौल घेणाऱ्यापाशीं येऊं नये; असा त्या दरींतील भिल्लांचा दंडक असल्यामुळें, दरींतील गृहस्थांपैकीं कोणी आपणांकडे यावयाचा नाहीं, अशी जांघिळाची खात्री होती. त्याचप्रमाणें कौलाच्या रात्रीं दरींतील प्रत्येक मार्गावर खडा पहारा असे, त्यामुळें बाहेरचा कोणी माणूस तेथें येणें शक्य नव्हतें. अर्थात् ही पायचळ जिवंत माणसाची नसून एकाद्या समंधाची किंवा राक्षसाची असावी, आणि तो आपल्या संशयाची निवृत्ति करण्यासाठीं आपणाकडे येत असावा, असेंच त्या जांघिळाला वाटलें. उत्तरोत्तर ती पायचळ अधिकाधिक जवळजवळ ऐकूं येऊं लागली, त्यावरून तर जांघिळाच्या मनांत शंका

उरली नाहीं. तो एवढें साहस ज्या गोष्टी-साठीं करावयास सिद्ध झालेला होता, ती गोष्ट साध्य होण्याची वेळ समीप आली, म्हणून त्याचें अंतःकरण एक प्रकारच्या अवर्णनीय आनंदानें व भीतीनें भरून राहिलें होतें. त्यानें आपलें डोळे शक्य तितके ताणून आपणाकडे येणाऱ्या व्यक्तीचें निरीक्षण करण्याचा प्रयत्न केला. पण त्यावेळीं काळोख अगदीं मिट्ट पडलेला असल्यामुळें त्याला त्या प्रयत्नांत यश आलें नाहीं. पण तितक्यांत एकदां वीज चमकली, त्यामुळें सर्वांग कृष्णवस्त्रानें आच्छादून केलेला असा कोणी काळपुरुष आपणाकडे येत आहे, असें त्यास आढळून आलें, आणि त्याच्या सर्वांगावर एकदम शहारे उभे राहिले! तितक्यांत त्या काळपुरुषानें एक विक्राळ आरोळी मारिली आणि तिच्या प्रतिध्वनीनें ती सर्व दरी भरून गेलेली आहे, असा जांघिळमामास भास झाला.

जांघिळमामानें विगलित झालेलें आपलें सर्व धैर्य मोठ्या प्रयत्नानें एकत्र केलें, आणि शक्य तितक्या खणखणीत शब्दानें विचारलें,—'अरे काळपुरुषा, तूं कोण आहेस? तूं पिशाचयोनींतील आहेस कीं मनुष्ययोनी-तील आहेस तें सांग?'

काळपुरुष फुटक्या कांशाच्या घंटेप्रमाणें कर्कश आणि भेसूर अशा स्वरानें म्हणाला,—'मी पिशाच आहें! तुला काय पाहिजे तें बोल!'

जांघिळानें न डगमगतां पूर्ववत् स्वस्थ मनानें आणि खणखणित स्वरानें विचारलें,—'तर मग ज्या हेतूनें मी आज तुझा प्रसाद मागत आहें, त्यासंबंधानें तुला मी असें विचारतों कीं, आमच्या दरींत आज दोन प्रहरीं जे दोन पाहुणे आले आहेत, ते आमचे शत्रु आहेत कीं मित्र आहेत?'

काळपुरुषानें उत्तर दिलें,—'ते तुमचे मित्र आहेत!'

पुनः जांघिळानें विचारलें,—'त्यांनीं आज दोन प्रहरीं दृढसंध महाराजांना ज्या गोष्टी सांगितल्या, त्या सर्व खऱ्या आहेत, कीं त्यांत कांहीं खटपट आहे?'

काळ पुरुषानें गंभीर स्वरानें उत्तर केलें,—'त्या सर्व गोष्टी अगदीं खऱ्या आहेत!'

या संवादानें जांघिळाच्या मनांतील सर्व प्रकारची भीति अगदीं नष्ट झाली असल्या-मुळें त्याला त्या काळपुरुषाशीं अधिक चोला-वयास धैर्य येऊन तो म्हणाला,—'बरें आणखी एक विचारतों. गरुडपक्षाच्या अपघातानें झालेल्या मरणामुळें राजघराण्यावर संकट येतें, अशी जी या दरींतील सर्व भिल्लांची समजूत आहे, ती खरी आहे कीं खोटी! ती समजूत जर खरी असेल, तर ज्यानें गरुडाचा प्राण घेतला त्याचा प्राण घेतल्याखेरीज राज-घराण्यावरचें संकट टळावयाचें नाहीं.'

काळपुरुषानें किंचित् कठोर वाणीनें उत्तर केलें,—'त्या पाहुण्यांच्या एका केसा-लाही धक्का लागतां मये. जर तुम्ही त्या पाहुण्यास पीडा द्याल, तर तुमच्यावर भयं-कर संकटें ओढवतील!'

जांघिळानें विचारलें,—'तर आमचे बाप-दादा आजपर्यंत ज्या गोष्टींवर विश्वास ठेवित आले, त्या सर्व गोष्टी खोट्या म्हणावयाच्या कीं काय?'

काळपुरुष पूर्ववत् कठोरवाणीनें बोलला,—'प्रत्येक नियमास अपवाद असतात; सध्यांचा प्रसंग नेहमींहून निराळा आहे.'

परंतु हे त्याच्या मुखांतील शब्द पुरते संपण्यापूर्वीच विद्युल्लतेच्या देदीप्यमान प्रका-शानें त्या देवळांत लख्ख उजेड पडला. एका-मागून एक चार पांच वेळां वीज सारखी चमकल्यामुळें तेवढा वेळ तेथें भर दोन प्रह-रच्या वेळेप्रमाणें प्रकाश पडला होता. या वेळीं जांघिळमामाचें मन अगदीं शांत झालेलें असल्यामुळें त्यानें तितका वेळपर्यंत आपली नजर त्या काळपुरुषावर रोखून धरिली होती. काळपुरुषाकडे पाहण्यास त्याला जितका वेळ मिळाला, तितका वेळपर्यंत विद्युल्लतेचा प्रकाश लख्ख पडलेला असल्या-

मुळें जांघिळमामाच्या मनाची त्या व्यक्तीसंबंधानें पुरी खात्री झाली; आणि 'विश्वासघात!' असें तो जोरानें ओरडला.

दुसऱ्या क्षणीं तो तटकन् उभा राहिला. या वेळीं जरी जांघिळाचा एकच हात मोकळा होता, तरी सुद्धां तो त्यानें वर उठतांना जमिनीस टेंकला नव्हता. त्याला आलेल्या त्वेषामुळेंच तो तटकन् उभा राहिला होता! या वेळीं चमकलेल्या विद्युल्लतेच्या मागून साहजिक असणारा प्रचंड गडगडाट सुरू असतांही आपल्या जवळची व्यक्ति आपल्यापासून दूर जात आहे कीं काय, हें तो लक्ष लावून ऐकत होता, परंतु ती व्यक्ति आपल्यापासून दूर गेली असें त्याला वाटलें नाहीं, आणि त्यानें आपल्या उजव्या हातांत असलेल्या खंजिराचा त्या व्यक्तीवर जोरानें प्रहार केला व दुसऱ्या क्षणीं तो स्वतः जमिनीवर पडला. इतक्यांत आकाशामध्यें भयंकर मेघगर्जना होऊन त्या शब्दानें दशादिशा भरून गेल्या; आणि त्या जांघिळमामाच्या अंगीं आलेलें विलक्षण अवसान एकदम कमी झालें. त्याच्या डोळ्यांपुढें कीजवे चमकल्याचा त्याला भास होऊं लागला, आपल्या अंगांतील सर्व रक्त मोठ्या वेगानें मस्तकाकडे धांव घेत आहे, असें त्याला वाटलें, आणि त्याच्या एकेक इंद्रियांची शक्ति कमी कमी होऊन तो दुसऱ्या क्षणीं मूर्छित पडला.

* * * *
* * * *

पूर्वी दिलेल्यावचनाप्रमाणें अडीच घटका लोटण्याच्या सुमारास शेखर राजवाड्याच्या मागच्या दारापाशीं सत्यरथाची वाट पाहत उभा राहिला होता. त्याला तेथें उभें राहून फारसा वेळ झाला नाहीं, तोंच त्या दारावर हळूच थाप बसलेली त्याला ऐकूं आली. त्यानें दरवाजा थोडासा उघडून हळूच 'कोण आहे?' असा प्रश्न केला.

'मी, सत्यरथ.' असें म्हणत सत्यरथ आंत शिरला, आणि शेखरानें पुनः दरवाजा लावून घेतला. नंतर तो सत्यरथास म्हणाला,–'वाटेंत पुष्कळ अडचणी असल्यामुळें तुम्हास रस्ता उमगणार नाहीं, यासाठीं तुमचा मी हात धरतों.' हें ऐकून सत्यरथानें आपला डावा हात पुढें केला. हें उमगल्यामुळें शेखर म्हणाला,–'तुमचा उजवा हात धरिला असतां तें अधिक सोईचें होईल.'

हें ऐकून सत्यरथ म्हणाला,–'चला. पुढें व्हा, हात धरण्याची विशेष आवश्यकता नाहीं, तुमच्या मागोमाग मी सहज येईन!'

हें सत्यरथाचें भाषण शेखराला फार चमत्कारिक वाटलें. कारण आपण त्याजवर उपकार करीत असतां त्यानें असें तुटकेपणाचें व अडाण्यासारखें उत्तर द्यावें, याचा त्याला थोडा रागही आला. तथापि शेखराचें मन स्वभावतःच उदार असल्यामुळें त्यानें त्या गोष्टीकडे विशेष लक्ष्य न देतां सत्यरथाचा डावाच हात आपल्या हातीं धरून तो त्यासह पुढें निघाला. ते दोघे कोणत्याही प्रकारची नड न येतां सरदार हलधराच्या दिवाणखान्यापाशीं आले; सरदार हलधर जागा असून आपल्या विश्वासु सेवकाच्या चमत्कारिक वर्तनासंबंधानें विचार करीत बसला होता. सत्यरथाला त्याच्या धन्यापाशीं सोडून देऊन शेखर आपल्या शयनमंदिराकडे निघून गेला.

तो गेल्यावर सत्यरथ आपल्या धन्यास म्हणाला,–'महाराज, आपणाला येथें काळजी करीत पुष्कळ वेळ तिष्ठत रहावें लागलें, याचें मला फार वाईट वाटतें.'

हलधर म्हणाला,–'तें असो, पण तूं अपरात्रीं बाहेर कशासाठीं गेला होतास, तें मला सांगितलें नाहींस?' असें विचारून हलधरानें आपल्या सेवकाच्या मुद्रेकडे रोखून पाहिलें, पण त्याची मुद्रा नेहमींप्रमाणें टवटवित दिसत नसून ती अगदीं निस्तेज दिसत आहे, असें त्यास आढळून आलें. म्हणून तो पुढें म्हणाला,–'सत्यरथा, तूं असा कां दिसतोस? जें काय तुझ्या मनांत आहे,

तें तूं सर्व मला सांगितलें पाहिजे, अशी माझी तुला आज्ञा आहे.'

सत्यरथ हात जोडून म्हणाला,–'महाराज, मी आपणास सर्व कांहीं उद्यां सांगेन. सध्यां मला बरें वाटत नाहीं. मी आतां आपल्या बिच्छान्यावर पडून विश्रांति घेतों. मला सध्यां अगदीं थकल्याप्रमाणें वाटत आहे. चार घटका मीं विश्रांति घेतली, म्हणजे मला हुषारी येईल.' असें बोलून आपल्या धन्याच्या परवानगीची वाट न पहातां सत्यरथ एकदम आपल्या खोलींत शिरला, आणि त्यानें तिचा दरवाजा एकदम बंद करून घेतला. या त्याच्या विलक्षण वर्तनाचा त्याच्या धन्याला मोठा चमत्कार वाटला; परंतु हलधराचा आपल्या सेवकावर पूर्ण विश्वास असल्यामुळें त्यानें सध्यां आपली उत्कंठा मनांतल्या मनांत दाबून टाकली. उजाडलें, आणि त्या दरींत जितका प्रकाश पडणें शक्य होतें, तितका प्रकाश पडला. वादळ संपलें, आकाशांतील अभ्रें उडून गेलीं, आणि तें अगदीं स्वच्छ झालें. सरदार हलधर आपल्या शय्येवरून उठला; त्याची चळवळ कानांवर पडल्यामुळें सत्यरथानेंही आपलें अंथरूण सोडलें, आणि तो आपल्या धन्यापाशीं आला. सत्यरथाचा चेहरा यावेळीं अगदीं फिक्कट दिसत होता. तो आपल्या मुद्रेवर प्रसन्नता दाखविण्याचा शक्य तितका प्रयत्न करीत होता, तरी त्या प्रयत्नांत त्याला अगदीं यश येत नव्हतें. आपल्या सेवकाचें मन आणि शरीर हीं दोन्हीं नादुरुस्त आहेत, हें सरदार हलधरानें तेव्हांच ताडलें. आपल्या अस्वस्थतेचें कारण आपण होऊन सत्यरथ सांगेल, अशा विचारानें हलधरानें त्याला प्रश्न विचारला नाहीं, आणि आपल्या धन्यानें विचारल्याखेरीज एकादी गोष्ट आपण होऊन बोलण्याची सत्यरथाची वहिवाट नसल्यामुळें तोही कांहीं बोलला नाहीं; मिळून दोघेही कांहीं वेळ स्तब्धच राहिले!

इतक्या अवधींत सत्यरथानें जीं कांहीं एक दोन लहान सहान कामें केलीं, तीं त्यानें उजव्या हातानें न करतां डाव्या हातानें केलीं. ही गोष्ट हलधराच्या ध्यानीं आली. म्हणून त्यानें थोडा वेळ सत्यरथाकडे शोधकदृष्टीनें अवलोकन करून त्यास विचारलें,–'सत्यरथा, तुझ्या उजव्या हातास काय झालें? तो कोठें दुखावला आहे कीं काय?'

सत्यरथानें शांतपणें उत्तर दिलें,–'महाराज, गेल्या रात्रीं मीं जें काय केलें, तें यापुढें आपणापासून चोरून ठेवणें योग्य नाहीं.' असें म्हणून त्यानें आपल्या अंगावरील वस्त्र बाजूला करून आपला उजवा हात उघडा केला. त्या हाताच्या मनगटास पट्टी बांधलेली होती.

ती पट्टी पाहून सरदार हलधर म्हणाला,–'सत्यरथा, ही जखम तुला कशी लागली सांग सांग पाहूं! काल रात्रीं तूं कोठें गेला होतास! सध्यां आपल्यावर गुदरलेल्या प्रसंगांतून निभावण्यासाठीं तुझे कांहीं प्रयत्न चालले असावे अशी माझी खात्री आहे, म्हणून मी कांहीं तुजवर रागावणार नाहीं.'

या भाषणानें थोडा धीर येऊन सत्यरथ म्हणाला,–'महाराज, मी सर्व कांहीं सांगतों; परंतु हें माझें कृत्य अडाणीपणाचें झालें, म्हणून आपण मला क्षमा केली पाहिजे. सध्यांच्या प्रसंगीं आपलें जीवित त्या अडाणी माणसाच्या हातीं असल्यामुळें त्या माणसाच्या मनांत आपणासंबंधानें अनुकूल ग्रह उत्पन्न केल्यास आपले प्राण वांचतील, इतकेंच नव्हे, तर आपण जे हेतु मनांत धरून येथें आलों, तेही साध्य होतील, अशी माझ्या मनाची खात्री असल्यामुळें, मी–'

सरदार हलधर म्हणाला,–'आतां माझ्या ध्यानांत आलें. तो जांघिळमामा फाजील देवभोळा आहे, म्हणून कोलाच्या वेळीं आपणास कोणी सगी भूतपिशाच भेटणार, अशी मनाची खात्री असल्यामुळें त्याच्या मानसिक

दुर्बलतेचा फायदा घेण्यासाठीं तूं काल रात्रीं तिकडे गेला होतास.'

सत्यरथ म्हणाला,-'होय; मी तिकडे गेलों असतां सर्व गोष्टी अगदीं सुयंत्र चालल्या होत्या; पण एकाएकीं वीज चमकून त्या देवळांत मोठा प्रकाश पडला, आणि माझा सर्व बेत आयत्या वेळीं फसला. विजेच्या प्रकाशामुळें जांघिळानें मला ओळखलें, आणि एकदम मजवर हल्ला करून त्यानें मला जखम केली.'

सरदार हलधर शांतपणानें म्हणाला,-'जें झालें तें झालें. त्याबद्दल मी तुला दोष देत नाहीं. तूं जें केलेंस तें तुझ्या स्वामिभक्तीस योग्य असेंच होतें, हें मी प्रांजळपणें कबूल करतों. पण मला कळूं दे, तुझी जखम भयंकर तर नाहीं ना!'

सत्यरथ म्हणाला,-'छे छेः, अगदीं नाहीं. जखम जरी बरीच खोल आहे, तरी आंतील हाड शाबूद आहे. त्यावेळीं रक्त बरेंच गेलें, म्हणून मला जरा अशक्तपणा आला आहे. हें कृत्य करण्यापूर्वी जर मीं आपणांस विचारलें असतें, तर फार बरें झालें असतें. तथापि या कामीं आपली आज्ञा मिळणार नाहीं, असें मला वाटत असल्यामुळें मी आपणांस पूर्वी विचारलें नव्हतें. माझी युक्ति जर सफळ झाली असती, तर आपलें मोठेंच काम झालें असतें. माझी युक्ति फसणार नाहीं, अशी माझी खात्री होती; पण मध्येंच विजेनें घोटाळा केला. त्याबद्दल मला देहदंड तर होणारच, पण त्यामुळें आपणावर मात्र अधिक संकट ओढवणार यांत शंका नाहीं!"

सरदार हलधरानें विचारलें,-'त्यावेळीं जांघिळानें तुला ओळखलें, याबद्दल तुझी खात्री आहे का!'

सत्यरथ म्हणाला,-'त्यानें मला ओळखिलें असावें, यांत संशय नाहीं. कारण त्यावेळीं 'विश्वासघात' असे शब्द त्याच्या तोंडावाटे निघाले होते.'

सरदार हलधरानें विचारलें,-'या तुझ्या कृत्यावरून तो जांघिळ आपल्या विरुद्ध कांहीं तरी सांगणार अशी तुझ्या मनाची खात्री होती, हें उघडच दिसत आहे. पण त्या शेखरानें आमच्यासाठीं द्वंद्वयुद्ध करावयाचें कबूल केलें आहे, त्यासंबंधानें तुला कां शंका आली!'

सत्यरथ म्हणाला,-'महाराज, शेखर मोठा धैर्यशील आणि शूर आहे, त्याचें मन मोठें उदार आहे, या सर्व गोष्टी खऱ्या; तरी त्या जांघिळमामाच्या सामर्थ्याचा विचार केला, म्हणजे त्या राक्षसाबरोबर युद्ध करतांना त्या चिमुकल्या राजपुत्राचें काय होईल, हें ठरविण्यास फारसा विचार करण्याचें कारण नाहीं. सशानें सिंहाशीं लढाई केली असतां परिणाम काय होईल, हें काय सांगितलें पाहिजे!'

इतकें संभाषण झाल्यावर सरदार हलधरानें दृढसंध राजाच्या भेटीसाठीं जाण्याच्या उद्देशानें आपला दरवाजा उघडला. त्यावेळीं आपल्या दिवाणखान्याच्या दारावर एक सशस्त्र पाहरेकरी पहारा करीत आहे, असें त्यास आढळून आलें. 'म्हणून तो सत्यरथास म्हणाला,-'सत्यरथा, त्या जांघिळानें कांहीं भलतें सांगितलें, यांत शंका नाहीं. सध्यां आम्ही या वाड्यांतं पाहुणे नसून बंदिवान आहोंत!'

सरदार हलधरानें अशा प्रकारचे उद्गार काढिले, तरी त्याच्या मुखावर निराशा किंवा भीति यांचें चिन्ह अगदीं दिसत नव्हतें. तथापि हें वर्तमान ऐकून सत्यरथाची मुद्रा मात्र खिन्न दिसूं लागली. कारण आपण गेल्या रात्रीं जें साहसकर्म केलें, त्यामुळें आपल्या धन्यावरचें संकट कमी न होतां उलट त्यामध्यें भर पडली, याचें त्याला फार वाईट वाटत होतें.

यानंतर सुमारें एक घटकेनें एक सेवक त्या ठिकाणीं आला, आणि थोरल्या दिवाणखान्यांत दृढसंध आपल्या पुत्रांसह आणि

अनुयायांसह बसले असून ते आपणांस बोलावित आहेत, असा त्यानें निरोप कळविला.

'माझी तयारी आहे, मार्ग दाखीव,' असें बोलत सरदार हलधर निघाला.

त्या ठिकाणीं ते उभयतां येऊन पोंचले त्यावेळीं त्यांनीं एकवार तेथील मंडळींकडे पाहिलें, त्याबरोबर सर्व पारडें आपल्या उलट फिरलेलें आहे, हें तत्काल त्यांच्या लक्ष्यांत आलें. तेथील मुख्यासनावर दृढसंध राजा बसला असून त्याचे दोघे पुत्र त्याच्या दोन्ही बाजूंस बसले होते, व राजाच्या उजव्या बाजूस जीं कित्येक आसनें मांडिलेलीं होतीं, त्यांवर कित्येक भिल्ल बसलेले होते. हे दोघे त्या दिवाणखान्यांत आलेले पहातांच त्या भिल्लांच्या मुद्रा अधिक क्रूर दिसूं लागल्या आणि त्यांनीं आपसांत कुजबुजण्यास प्रारंभ केला. जांघिळमामा मात्र त्यावेळीं त्या मंडळीमध्यें नव्हता, ही गोष्ट त्या दोघांच्याही तत्काल लक्ष्यांत आली.

ते दोघे त्या दिवाणखान्यांत येऊन उभे राहिल्यास बराच वेळ झाला. तरी कोणी त्यांचें स्वागत केलें नाहीं, कीं त्यांस बसावयास आसन दिलें नाहीं. फक्त शेखरानें मात्र किंचित् मान हालवून आपल्या मनांतील त्यांजविषयींचा आदर व्यक्त केला. अशा चमत्कारिक स्थितींत दहापांच पळें गेल्यावर एका भिल्लासह जांघिळमामानें तेथें प्रवेश केला. जांघिळाची मुद्रा यावेळीं फारच भयंकर दिसत होती. त्याच्या मस्तकावरील लांबलचक केस रक्तानें माखलेले असल्यामुळें, त्यांच्या चमत्कारिक रंगाच्या जटा बनून त्या त्याच्या मस्तकाभोंवतीं अस्ताव्यस्त लोंबत होत्या. त्याच्या सर्वांगावर रक्ताचे डाग पडलेले होते, आणि त्याच्या अंगावर जें एक वस्त्र होतें, त्यावर वाळलेल्या रक्ताचे आणि मांसाचे ओघळ भरलेले होते. या बाह्य वेषामुळें तो अगदीं गलिच्छ नर दिसतच होता, पण त्यामुळें त्याच्या उपजत क्रूर मुद्रेमध्यें अधिकच भर पडत होती. जांघिळमामा सभास्थानीं येतांच सर्व भिल्लांनीं त्याच्या स्वागतार्थ चामुंडा देवीच्या नांवाचा जयघोष करून तो दिवाणखाना दणदणून सोडला.

जांघिळानें पुढें होऊन दृढसंधराजाला प्रणाम केला, आणि तो सत्यरथ आणि हलधर यांच्या समोर उभा राहून, मोठ्यानें ओरडून म्हणाला,–'हे दोघेही गृहस्थ लबाड आहेत, हें मीं महाराजांना प्रथमच कळविलें आहे. पण आतां या गृहस्थांच्या समोर उभा राहून मी पुनः सांगतों, कीं हे गृहस्थ लबाड, कपटी आणि विश्वास-घातकी आहेत, अशी माझ्या मनाची पूर्ण खात्री पटली आहे.'

हे त्या राक्षसी पुरुषाच्या तोंडचे शब्द ऐकतांच 'त्यांना ठार करा!' 'त्यांचा प्राण घ्या' 'त्यांना फांशीं चढवा!' अशा अनेक प्रकारच्या भयंकर आरोळ्यांनीं तेथील भिल्लांनीं आकाशपाताळ एक करून सोडिलें!

हें पाहून दृढसंध राजा म्हणाला,–'थांबा! गडबड करूं नका! जांघिळाला काय सांगावयाचें आहे, तें पुरें ऐकून घ्या; त्याच्या मनांतून आणखी कांहीं सांगावयाचें आहे!'

सर्व भिल्ल एकदम म्हणाले,–'आम्ही तें ऐकावयास सिद्ध आहों! जांघिळा, सांग काय तें लवकर!'

हे त्या भिल्लांच्या मुखांतील शब्द संपतांच पुनः त्या दिवाणखान्यांत शांतता पसरली. आपणांस जो गोष्ट सांगावयाची आहे, ती नीट जुळवून सांगतां यावी म्हणून जांघिळमामाही थोडा वेळ स्वस्थ राहिला, आणि मन शांत केल्यावर त्यानें बोलावयास प्रारंभ केला. तो म्हणाला,–'महाराज, कोल घेण्यासाठीं चामुंडेच्या देवालयांत पोत्यां[illegible] पडून राहण्याचा काल[illegible] लाच प्रसंग नव्हे. अ[illegible] पर्यंत कर्मात कर्म[illegible] घालविलेल्या आ[illegible] अशारीतीनें त्या दो[illegible] पोरखेळ नव्हे, हें [illegible] महाराज,

अनुभव घेतला आहे, त्यांस पुरें माहीत आहे. कौल घेणाऱ्यांच्या डोळ्यापुढें किती भयंकर देखावे दिसत असतात, हें मीं जरी तोंडानें कितीही सांगितलें, तरी तें पुरें पडणार नाहीं. त्या ठिकाणीं काळोख जरी कितीही मिट्ट पडलेला असला, तरी तेथें राहणाराच्या दिव्य-दृष्टीस अनेक प्रकारचे अद्भुत देखावे आढळून येतात. असा खरा प्रकार असल्यामुळें, कौल घेणारा माणूस त्यासंबंधानें खोटें बोलेल, हें अगदीं मनांतसुद्धां आणावयास नको! म्हणून मी म्हणतों, मीं जें कांहीं बोलेन तें खोटें म्हणण्याची कोणाची छाती आहे काय?'

सर्व भिल्ल एकदम म्हणाले,–'तुझ्या बोलण्यावर आमचा पूर्ण विश्वास आहे. तूं खोटें सांगणार नाहींस, अशी आम्हां सर्वांची पूर्ण खात्री आहे.'

या वेळीं एकाद्या अगम्य शक्तीचा जांघिळाच्या अंगीं प्रवेश झाल्याचा भास होऊं लागला; त्याचे डोळे तारवटल्यासारखें दिसूं लागले, त्याचा विशाल छाती फुरफुरूं लागली, त्याच्या सर्वांगास दरदरून घाम सुटला, त्याचें सर्वांग थरारूं लागलें, आणि त्याचा शब्द अत्यंत गंभीर झाला. तो म्हणाला,–'दृढसंध महाराज, मी जें काय सांगतों, तें नीट लक्ष्य देऊन ऐका! कालची रात्र किती भयंकर होती, याची आपणांसारख्या राजवाड्यांत राहणाऱ्यांस पूर्ण कल्पना येणें शक्य नाहीं. काल रात्रीं वारा सोसाट्यानें वाहत होता; आकाश मेघांनीं आच्छादित होऊन गेलें होतें; विजा चमकत होत्या; गडगडाटांनीं [illegible] होती. भालू [illegible] तिकडे विल-[illegible] अशा वेळीं [illegible]साठीं चामुंडा-[illegible]कट होईल अशा [illegible] झालें असतां [illegible]ठिकाणीं आला. [illegible]त्या ठिकाणीं येऊन माझ्या एकाग्रतेचा भंग केला; पण त्याच्या त्या दुष्ट कृत्याचें प्रायश्चित्त त्याला मीं दिलें आहे. माझ्या या कट्यारीनें त्या माणसाच्या उजव्या हातास चांगलीच जखम लागली आहे. महाराज, ज्या माणसानें रीति-विरुद्ध वर्तन करून चामुंडेच्या देवळांत प्रवेश केला, तेथें येऊन आपण चामुंडेचा सेवक आहें असें मला भासविलें, आणि माझ्याशीं भाषण करून माझ्या मनांत खोट्या गोष्टी भरवून देण्याचा यत्न केला, तो लबाड आणि कपटी मनुष्य सध्यां आपणासमोर हजर आहे. माझ्या कट्यारीनें त्याच्या उजव्या हातास जखम लागली आहे. हा मनुष्य शोधून काढून त्याला शिक्षा करणें, हें महाराज आपलें पहिलें पवित्र कर्तव्य आहे!'

याप्रमाणें आवेशानें भाषण करून तो जांघिळमामा स्तब्ध राहिला; आणि त्यानें उजवा हात ताठ पुढें करून सत्यरथाच्या उजव्या हाताकडे आपली नजर रोंखून धरिली. सर्वांच्या दृष्टी सत्यरथाकडे वळल्या आणि त्याच्या त्या हातास पट्टी बांधिलेली आहे, असें त्यांस आढळून आलें. आपणाकडे सर्वांचे डोळे लागले आहेत, हें दृष्टीस पडतांच एक क्षणभर सत्यरथ गांगरल्यासारखा झाला, पण दुसऱ्या क्षणीं त्यानें पूर्ण अवसान धरून तो छाती पुढें काढून मोठ्या ऐटीनें उभा राहिला. आपण एकादा अपराध केला नसून जें कांहीं केलें तें अगदीं योग्य केलें, आणि त्याबद्दल जर आपणास कोणी शिक्षा केली, तर ती सोसण्यास आपण अगदीं तयार आहों, असें त्याच्या मुद्रेवर स्पष्टपणें दिसत होतें.

जांघिळानें सांगितलेलें वर्तमान ऐकून दृढसंध राजाला अनावर क्रोध आला होता, व त्यामुळें त्याची स्वभावतः उग्र दिसणारी मुद्रा अतिशय क्रूर दिसूं लागली होती. तो म्हणाला,–'काय म्हणतोस? कौलामध्यें विघ्न करण्यासाठीं कोणी हरामखोर तेथें गेला

होता! ठीक आहे! या कर्मांचें प्रायश्चित्त त्याला पूर्णपणें मिळाल्याखेरीज राहणार नाहीं.'

राजाचें हें भाषण ऐकतांच तेथें जमलेल्या भिल्लांनीं मोठा कोलाहल केला. तितक्यांत चूडामणि शेखरास म्हणाला,—' शेखर, तूं काल यांचा पक्षपात करीत होतास! आतां या हरामखोरांसंबंधानें तूं कशी काय तरफदारी करतोस तीं कर पाहूं!'

जांघिळाचें भाषण ऐकूनच आधीं शेखराला फार वाईट वाटत होतें; त्यांत वडील भावाच्या या भाषणाची भर पडतांच त्याला अतिशय दुःख झालें, आणि त्यानें मान खालीं घातली. गेल्या रात्रीं जेव्हां त्यानें सत्यरथाला वाड्यांतून बाहेर काढून दिलें, तेव्हांच तो कोलाच्या ठिकाणीं जात असावा, अशी शंका त्याच्या मनांत आली होती, पण तो मनाचा उदार असल्यामुळें त्यानें त्या शंकेस थारा दिला नव्हता; परंतु आतां हें वर्तमान ऐकल्यामुळें आपण काल केलें तें गैर केलें असें त्यास वाटूं लागलें. तथापि एकदां गोष्ट होऊन गेली असल्यामुळें ती सुधारून घेण्यास मार्ग नव्हता, म्हणून आतां आपण मुकाट्यानें सर्व प्रकार पहावा यांतच शहाणपणा आहे, असा विचार करून त्यानें कांहींच भाषण केलें नाहीं.

भिल्लांचा गलबला चालू असतांच सत्यरथ जोरानें म्हणाला,—' महाराज, या जांघिळानें सांगितलें तें अगदीं खरें आहे. गेल्या रात्रीं मी चामुंडेच्या देवळांत गेलों होतों, यासंबंधानें माझें काय म्हणणें आहे, तें आपण स्वस्थपणें ऐकून घ्यावें, अशी माझी आपणास नम्रपणाची विनंति आहे.'

हें त्याचें भाषण ऐकलांच सर्व भिल्लांनीं एकच कल्होळ करून त्याचें भाषण बंद पाडलें, आणि राजानें त्याचें बोलणें ऐकून घेऊं नये, अशी ओरड केली. परंतु अपराध्याला शिक्षा देण्यापूर्वी आपण त्याचें भाषण ऐकून घेणें हें न्यायाचें आहे, असें सांगून दृढसंध राजानें त्या भिल्लांस गप्प केलें आणि सत्यरथाला आपल्या तर्फे भाषण [illegible] चा हुकूम केला.

सत्यरथानें दृढसंधराजाला नमन केलें, आणि ठांसून पण मर्यादेचा अतिक्रम न करतां त्यानें भाषणास प्रारंभ केला. तो म्हणाला,—' महाराज, मला जें कांहीं सांगावयाचें आहे, तें मी अगदीं थोडक्यांत सांगतों. जांघिळानें सांगितल्या प्रमाणें मी काल रात्रीं चामुंडेच्या देवालयांत गेलों होतों, तेथें त्याच्याशीं भाषण करून त्याच्या मनावर आपल्या इच्छेप्रमाणें ठसा उमटविण्याचा मी प्रयत्न केला, आणि त्याच्या कट्यारीनें माझ्या हाताला जखम लागली, या सर्व गोष्टी खऱ्या आहेत; परंतु ही गोष्ट मीं आपल्या धन्याच्या संमतीनें केली, हें गृहीत करून त्यावरून माझा धनी आपला शत्रु आहे, असें अनुमान काढणें हें अगदीं रास्त होणार नाहीं. माझा ईश्वरावर भरंवसा आहे, आणि आपल्या पापपुण्याचा मृत्यूनंतर ईश्वरापुढें झाडा द्यावा लागेल, ही गोष्ट माझ्या डोळ्यांपुढें असल्यामुळें मी ईश्वरसाक्ष सांगतों कीं, मीं जें कांहीं केलें, तें माझ्या एकट्याच्या विचारानें केलें. मी काय करणार हें माझ्या धन्याला मुळींच ठाऊक नव्हतें. दुर्दैवानें माझा प्रयत्न फसून जर मला ही जखम लागली नसती, तर मीं काल रात्रीं काय केलें, हें माझ्या धन्याला कधींही कळलें नसतें. आतां मी असें कां केलें, हेंही सांगतों. आमच्या मनांत कपट आहे, म्हणून भिऊन जाऊन मीं हें कृत्य केलें, असें मात्र [illegible] आणि कोल घेण्यासाठीं जर [illegible] दुसरा कोणी पुढें झाला [illegible] कालरात्रीं वाड्यांतून पाऊल [illegible] नसतें. माझ्या धन्याच्या [illegible] प्रसंगानें गरुडपक्ष्याचा प्रा[illegible] जांघिळमामाचें चित्त [illegible] होतें, हें मीं सांगावें [illegible] महाराज,

आपल्या मनाची ज[redacted] स्थिति असेल तशा प्रकारचीं [redacted] पडतात. आपल्या मनांत एकदां [redacted] झालेल्या संशयाचें वेळींच निराकरण [redacted] झाल्यास तो संशय बलिष्ट होऊन आपलें मन व्याप्त करून सोडतो, आणि कावीळ झालेल्या माणसास जसें सर्व जग पिंवळें दिसूं लागतें, किंवा स्वतांचे डोळे भ्रमिष्ट झाले असतां ज्याप्रमाणें सर्व जग भ्रमत आहे असें दिसतें, त्याप्रमाणें संशययुक्त मनास कोणतीही गोष्ट संशयाला पुष्टि देणारी वाटते. या जांघिळाचें मन आमच्यासंबंधानें पूर्णपणें कलुषित झालें असतां तशा स्थितींत तो कोल घेण्यास सिद्ध झाला असल्यामुळें, त्याच्या दूषित नेत्रांला आमच्या संबंधानें चांगल्या गोष्टी आढळून येणें शक्य नव्हतें. अशा प्रकारचे विचार माझ्या मनांत उत्पन्न झाल्यामुळें आपल्या हातून होतील तितके प्रयत्न करून या जांघिळाच्या मनांतील आमच्याविषयींचे दुष्ट पूर्वग्रह नाहींसे करून टाकणें हें माझें कर्तव्यकर्म होतें. माझ्यावर पूर्ण प्रेम करणाऱ्या धन्याच्या हिताकरितां मीं हा प्रयत्न केला, यासंबंधानें मला अगदीं वाईट वाटत नाहीं. मीं स्वामिनिष्ठेनें प्रेरित होऊन जी ही गोष्ट केली, ती गैर केली, असें आपणांस वा[redacted] असेल, तर आपण जी शिक्षा कराल ती निमूटपणें सहन करण्यास माझी मान तयार आहे.'

सत्यरथाचें हें भाषण जर कोणीं पूर्णपणें स्वस्थचित्तानें ऐकून घेतलें असेल; तर फक्त नें, सरदार हलधर आणि राजपुत्र शेखर यांनींच ऐकून घेतलें होतें. हें भाषण संपलें न संपतें, तोंच जांघिळमामा मोठ्या त्वेषानें पुढें सरला, आणि आपले [redacted] सारखे लाल डोळे सत्यरथावर रोखून [redacted] दुष्टसंधास म्हणाला,– 'महाराज, आपण [redacted] भाषण करण्याची पाळी आहे. या नीच सत्यरथानें जरी मध्यें घोटाळा घालण्याचा प्रयत्न केला, तरी काल रात्रीं चामंडेनें जो [redacted] कौल द्यावयाचा तो आहे. मीं काल रात्रीं जें काय [redacted] फारच भयंकर आहे. देवीनें जो [redacted] विला आहे, त्याजकडे जर [redacted] लें, तर आपणां सर्वांचा [redacted] मीप आलेली आहे, [redacted] र्वी हा नीच मनुष्य जखमा[redacted] ॅ तोंड घेऊन निघून गे[redacted] लें, आणि पुनः जिकडे [redacted] सुमारें चार घटका रात्र[redacted] ा सुमारास अतिशय [redacted] लागण्यासारख्या मंजुळ [redacted] आपल्या समोर दिसणारा दे[redacted] र्च आज्ञा केली. या आज्ञेप्रमाणें [redacted] भाकि शांत पाहूं लागलों असतां, [redacted] एक काळा कुट्ट ढग तेथें माझ्या दृष्टीस पडला पहातां पहातां त्यां ढगामध्यें जिकडे तिकडे घनघोर युद्ध सुरू झालें आहे, असें मला आढळून आलें. आमच्या दरीवर हल्ला करणारे शत्रु कोण आहेत, हें मी पाहूं लागलों; पण मला त्यांची ओळख पटेना. सर्व शत्रूंचीं अंगें चिलखतांनीं आणि त्यांचीं मुखें शिरस्त्राणांनीं आच्छादिलेलीं होतीं. याशिवाय आणखी एक गोष्ट माझ्या नजरेस पडली आमच्या या दरीपासून फार दूर अंतरावर- किती दूर याचा कांहीं मला तर्क करतां आला नाहीं–फारच दूर अंतरावर एक पुरुष उभा असून तो तेथून आमच्या शत्रूंस प्रोत्साहन देत होता पहातां पहातां त्या युद्धाला मोठें भयंकर स्वरूप प्राप्त झालें. शत्रूनें आमच्या दरींतील पुरुषांचींच नव्हे, तर बायकांची व पोरांचीं सुद्धां निर्दयपणानें कत्तल केली! कत्तल करून झाल्यावर आमचे शत्रु मोठ्या विजयोत्साहानें त्या दूर अंतरावर उभ्या असलेल्या पुरुषापाशीं गेले आणि त्याला प्रणाम करून त्याजपाशीं उभे राहिले. त्या पुरुषानें त्या लढवय्यांस मोठमोठीं बक्षिसें दिलीं. 'महाराज, ही कत्तल करविणारा पुरुष कोण हें आपणांस सांगूं

काय ? ज्यानें आपल्या हातानें गरुडपक्ष्या[illegible] प्राण घेतला, त्याखेरीज असें कर्म[illegible] दुसरा कोण असणार ? महाराज[illegible] डेनें जो भयंकर प्रकार मला [illegible] भविष्यकाळीं खरा होऊं [illegible] रहिवाश्यांची आणि [illegible] सांची कत्तल होऊं [illegible] आपली खरोखरच [illegible] दृढसंध महाराज, [illegible] च्या साक्षानका ! जो सध्यां [illegible] न आमच्या गोटांत [illegible] ज्यानें गरुडपक्ष्याचा अ[illegible] प्राणघात केला आहे, तोच [illegible] दूर गहून आमची कत्तल करविल आहे, ही गोष्ट ध्यानीं घेऊन आजच या विश्वासघातक्यास देहान्त शासन करा ! देवीनें दाखविलेले भाकीत चुकविण्याचा हा एकच मार्ग आहे.'

जांघिळाचें हें तुफानी वाऱ्याची साम्यता करणारें भाषण सुरू असतां जिकडे तिकडे अगदीं शांतता पसरलेली होती. ज्या वेळीं जांघिळानें दरीवर शत्रूंनीं हल्ला केल्याचें वर्तमान सांगितलें, त्या वेळीं कित्येक भिल्लांच्या दंडांतील कडीं सैल होऊन जमिनीवर पडलीं व त्यांच्या तरवारी आणि कट्यारी सळ सोडून बाहेर पडल्या. जांघिळ ज्या कत्तलीचें वर्णन करीत होता, ती कत्तल आतांच तेथें होणार कीं काय, असा भास होऊं लागला; आणि जणूं काय वीरश्रीनें तेथें मूर्तिमंत आगमन केलें आहे, असें वाटूं लागलें !

दृढसंध राजाची मुद्रा पूर्वीहून अधिक गंभीर आणि कठोर दिसूं लागला. चूडामणीच्या क्रूर वृत्ति एकदम जागृत झाल्या व रक्तपाताची इच्छा प्रबल झाल्यामुळें त्याचे डोळे रक्तासारखे लाल, आणि चेहरा अत्यंत भेसुर दिसूं लागला. शेखराच्या वृत्तीमध्यें तामसी विचारांचा उद्भव झाला नव्हता, तरी त्याची स्वभावसिद्ध सात्विक वृत्ति किंचित् [illegible] त्या मानानें राजस विचारांस [illegible] काश मिळाला होता.

[illegible] आपल्या भाषणानें श्रोत्यांच्या मनावर [illegible] परिणाम होईल, तो कदाचित् त्यांच्या चित्तवृत्तींचा क्षोभ करण्यास अपुरा होईल, असें मनांत येऊनच की काय, एकाद्या वीररसाचा आविर्भाव करणाऱ्या नाटकपात्राप्रमाणें छाती पुढें काढून, डोळे लाल करून, स्थिर परंतु भयचकित नेत्रांनीं सरदार हलधराकडे तुच्छ मुद्रेनें पहात जांघिळमामा कित्येक पळें अगदीं स्थिर उभा राहिला होता. त्यानें आपल्या एका हातांत खंजीर घेतला असून तो हलधराच्या छातींत भोंसकण्यास सिद्ध झाला आहे, असें त्याच्या आविर्भावावरून दिसत होतें. क्रोधातिरेकामुळें आणि भविष्यकाळीं ओढवणाऱ्या संकटाच्या अस्पष्ट भीतीमुळें त्याचें सर्वांग थरथर कांपत होतें. अशा स्थितीमध्यें त्यानें सरदार हलधराकडे क्रोधपूर्वक हस्तक्षेप करून " हाच तो नीच कपटी ! विश्वासघातकी ! " असे शब्द उच्चारून धाडकन् आपला विशाल देह धरणीवर टाकला.

अंगांत संचरलेलें भूत निघून गेल्यावर जशी ' झाडाची ' स्थिति होते, तशी सध्यां जांघिळाची स्थिति झालेली होती. तो निपचित पडलेला पाहून दोन चार सशक्त भिल्ल त्याजपाशीं आले, आणि त्यांनीं प्रेतवत् पडलेलें जांघिळाचें शरीर तेथून उचलून पलीकडच्या एका मोकळ्या दिवाणखान्यांत नेलें. तेथें त्याच्या मस्तकावर थंड पाणी घालून व दुसऱ्या कांहीं उपचारांनीं त्याला सावध करण्याचे त्यांनीं प्रयत्न सुरू केले.

कौल घेऊन परत आलेला जांघिळ काय सांगतो, हें ऐकण्याची जशी पुरुषांस इच्छा होती, तशी ती स्त्रियांसही होती, हें अगदीं साहजिक आहे. ही उत्सुक इच्छा तृप्त करण्यासाठीं दृढसंध राजाची राणी मेधावती आणि शेखराची माता चंद्रा प्रियंवदा या आपल्या दासींसह [illegible] कित्येक भिल्ल

स्त्रियांसह जवळच्याच एका दिवाणखान्यांत वसल्या होत्या. जांधळाचें भाषण ऐकून त्यांच्या अंगावर रोमांच उभे राहिले आणि त्यांनीं भीतीनें किंकाऱ्याही फोडल्या. म्हणून शेखर आपल्या जागेवरून उठला आणि त्यानें प्रथम आपल्या मातेपाशीं दोन शब्द बोलून तिला धीर दिला. नंतर आपल्या प्रियेपाशीं येऊन तो म्हणाला,—' प्रिये, भिऊं नको. आतांचा प्रसंग मनामध्यें भीति उत्पन्न करणारा आहे, यांत शंका नाहीं.'—

प्रियवंदा बोलली,—' आपण माझ्या दृष्टीसमोर असलां म्हणजे मला कसलीही भीति वाटणार नाहीं; पण मी विचारतें, या जांधिळानें जें आतां भाकीत सांगितलें, तें खरें का?'

अगदीं स्पष्टपणें पण फक्त तिलाच ऐकूं येईल अशा स्वरानें शेखर म्हणाला,—' छेः छेः माझा असल्या भोळ्या प्रकारांवर मुळींच विश्वास नाहीं. हा सरदार हलधर विश्वासघातकी असेल, असें माझें मन मला सांगत नाहीं. माझा कौलावर अगदीं विश्वास नाहीं; हें मी आतां आपल्या कृतीनें उघड करून दाखविणार आहें. '

प्रियंवदेनें विचारलें,—' तें कसें काय ? '

' तें सध्यां सांगण्यासारखें नाहीं. तुला तें आपोआप समजून येईल. ' असें म्हणत शेखर पुनः पहिल्या दिवाणखान्यांत परत आला.

या वेळीं दृढसंध राजा अतिशय विचारांत पडला होता. सरदार हलधरासारख्या प्रतिष्ठित गृहस्थाशीं तुटकेपणाचें वर्तन करण्याची गोष्ट त्याच्या जिवावर आली होती; म्हणून तो गंभीर मुद्रेनें आणि गंभीर स्वरानें म्हणाला,—' अहो सरदार; त्या जांधिळानें आतां काय सांगितलें, हें तुम्हीं ऐकलेंच आहे. जांधिळावर आमचा पूर्ण विश्वास आहे, आणि आमचा कौलाचा तोडगा कधींही चुकावयाचा नाहीं, अशी आमची खात्री आहे. '

सरदार हलधरही अत्यंत शांत आणि गंभीर स्वरानें बोलला,—' आपला विश्वास या गोष्टींवर असणें साहाजिक आहे. या जांधिळानें आपल्या समजाप्रमाणें ऱ्या गोष्टी सांगितल्या नसतील, असें म्हणणें नाहीं. पण असल्या भ्रमिष्टाने नलेल्या गोष्टींवर राजकार्यकुशल मुत तपन विश्वास ठेवावा, हा मात्र म

हें त्यां सरदाराचें भा मणीला फारच त्वेष आ पाय भूमीवर दाणकन आप ' अरे कपटी गृहस्था ! गप रहा वर आम्हा सर्वांचा पूर्ण विश्वास कौलाची अशी आम्हांसमोर निंदा क तुला शरम वाटली पाहिजे ! ' '

कित्येक भिल्लही तितक्यांत ए म्हणाले,—' या हरामखोरांना चा फासांवर लटकविलें पाहिजे !'

दृढसंधराजाही म्हणाला,—' या हीच शिक्षा योग्य आहे. अरे मरणास तयार व्हा ! आज स खाबरोबर तुम्हांस देवीपुढें येईल ! तोंपर्यंत तुम्हाला इष्ट करण्यास मी संधि देतों ! '

राजाच्या मुखांतील हे शब्द पु न होतात, तोंच जांधिळास ज्या दि न्यांत ठेविलें होतें, त्या दिवाणखान्या वाजा धाडकन उघडला, आणि हातीं तरवार असलेला तो राक्षसी पुरुष क्रोध फूत्कार करीत दृढसंधासमोर येऊन उभा राहिला. तो जरासा सावध होतांच त्याला हुषारी येण्यासाठीं थोडेंसें मद्य प्यावयास दिलेलें असल्यामुळें, तो त्या मद्याच्या अमलानें या वेळीं तुफान झाला होता. कौलावर विश्वास नाहीं, असें ठरल्यास द्वंद्वयुद्धास आव्हान करण्याचा प्रतिपक्षास हक्क असल्यामुळें या प्रसंगीं सरदार हलधरानें आव्हान केल्यास आपली किती तयारी आहे, हें दाखविण्यासाठीं तो ईर्ष्येनें नंगी तरवार हातीं घेऊन तो पुनः तेथें आलेला होता.

जांघिळाच्या गैरहजिरींत इकडे काय झालें
हें त्याला ंगण्यासाठीं एक भिल्ल ओरडून
म्हणाला. ंधिळा, या हरामखोरांना महा-
राजांनीं ी शिक्षा फर्मावलीच आहे;
आज ं यांच्या मानेस फांस घुसेल
ंच्या मांसाची आमच्या
ानीं मिळेल !'

आनंदानें गर्जना करीत
ेकान्त शिक्षा दिली, तरच
होणार आहे ! त्यांस जिवंत
माझें भाकीत चुकावयाचें नाहीं.'

ध म्हणाला,–' यांच्या नशीबीं काय
ं, तें ठरलेंच आहे. यांना आतां येथून
न चंदिखान्यांत बंदोबस्तानें कोंडून ठेवा.'

नाच्या आज्ञेप्रमाणें कित्येक भिल्ल
न पकडण्यासाठीं पुढें सरसावले, हें
रदार हलधर म्हणाला,–' राजा,
बोलावयाचें आहे !'

म्हणाला,–' आम्ही कांहीं-
ेकत नाहीं. बरें, पण मी मात्र
ारतों, हा तुझा लफंग्या साथी-
रात्रीं वाड्यांतून बाहेर कसा
णि पुनः परत कसा आला, या
अजून उलगडा पडला नाहीं.'

थ चटकन म्हणाला,–' यांत कांहीं
गौप्य नाहीं. दरवाजे कसे उघडावे,
ते पुनः कसे बंद करावे, ही कला
साध्य करून घेतली आहे. या कलेच्या
साह्यानें मी वाटेल तें दार उघडूं शकतों.'

हें सत्यरथाचें भाषण अस्खलित खोटें असून तें त्यानें शेखराचें नांव पुढें येऊं नये, या हेतूनें केलें होतें, हें वाचकांच्या ध्यानीं आलेंच असेल.

या भाषणावर अधिक 'भवति न भवति' होण्यास फुरसद सांपडूं नये, म्हणून सरदार हलधर पुनः जोरानें म्हणाला,—'राजा, मला सांगावयाचें म्हणून इतकेंच, कीं या कोलावर माझा विश्वास नाहीं, आणि माझ्या या एकनिष्ठ सेवकाच्या मुखानें मला असेंही समजलें आहे कीं, ज्यांचा कौलावर विश्वास नसेल, त्यांना वादाचा निकाल द्वंद्वयुद्धानें करून घेतां येतो.'

चूडामणि मध्येंच म्हणाला,–' होय; तूं म्हणतोस हें खरें आहे; परंतु तुझ्या वतीनें जांघिळाशीं द्वंद्व करावयास या प्रतापपुरामध्यें कोणी योद्धा पुढें सरसावेल, ही आशा व्यर्थ आहे !'

सरदार हलधर म्हणाला,–' असें होईल, तर तुमच्या मधून आजच शौर्याचा आणि औदार्याचा लोप झाला, असें मी समजेन ! म्हणून मी विचारतों, मला द्वंद्वयुद्धानें या प्रश्नाचा निकाल लावून घेण्याची सवड मिळेल कीं नाहीं ?'

दृढसंध राजा म्हणाला,–' होय; अवश्य मिळेल. पण ज्या अर्थीं तुम्हीं दोघेही अपराधी ठरला आहां, त्या अर्थीं तुम्हा स्वतःला द्वंद्वयुद्ध करण्याचा अधिकार नाहीं, व तुमच्यातर्फे येथें कोणीं योद्धा युद्धास सिद्ध होईल असें आम्हास वाटत नाहीं. म्हणून जें कांहीं तुमच्या नशिबी आलेलें आहे ते भोगावयास तुम्ही तयार व्हा, हेंच खरें. अरे पाहतां काय ? यांना घेऊन चला !'

राजाची ही आज्ञा ऐकतांच कित्येक भिल्ल सरदार हलधराला धरण्यासाठीं पुढें झाले. त्यांस दरडावीत हलधर म्हणाला,–' थांबा; माझ्या तर्फे कोणी योद्धा द्वंद्वयुद्धास सिद्ध होत नाहीं, हें ठरल्याखेरीज मला केद करण्याचा अधिकार नाहीं ! राजा, तुमच्या प्रांतांतील शिरस्त्याप्रमाणें मी या कौलावर तोड म्हणून आमच्या वतीनें लढण्यास येथें हजर असलेल्या मंडळींत कोणी तयार आहे काय ? असा प्रश्न विचारतों !'

चूडामणी म्हणाला,–' तुला आमच्या वतीनें ' असें म्हणण्याचें कारण नाहीं. कारण तुझ्या या सेवकानें जो अपराध केला आहे, त्या अपराधाच्या शिक्षेवर तो लागू नाहीं; म्हणून तूं आपल्या एकट्यासंबंधानें पाहिजे तर हा प्रश्न कर !'

दृढसंध म्हणाला,–'चूडामणीचें म्हणणें अगदीं बरोबर आहे. या सत्यरथाचा अपराध अगदीं वेगळ्या प्रकारचा आहे, आणि तो अपराध त्यानें केला अशाबद्दल आतां कोणाच्या मनांत शंका नाहीं. शिवाय सत्यरथही आपला अपराध नाकबूल करीत नाहीं. अर्थात् त्याला आम्ही जी शिक्षा दिली आहे, ती त्यानें भोगिलीच पाहिजे. तुमच्याबद्दल द्वंद्वयुद्धास आव्हान करण्याचा तुम्हाला पूर्ण अधिकार आहे हें खरें, पण तुमच्या वर्तानें लढावयास कोणी पुढें येईल, असा या प्रसंगीं संभव दिसत नाहीं.'

सरदार हलधर म्हणाला,–'तथापि मी पुनः एकदां प्रश्न करून पाहतों. जमलेल्या मंडळींत माझ्या तर्फे लढण्यास कोणी तयार आहे काय?' हा त्या सरदाराचा प्रश्न ऐकतांच आपली तरवार म्यानांतून सरकन बाहेर काढून शेखर पुढें झाला, आणि म्हणाला,–'अहो सरदार हलधर, तुमच्या सचोटीबद्दल माझ्या मनाची पूर्ण खात्री झाली आहे. तुमच्यासारख्या उदार मनाच्या क्षत्रियाच्या हातून कपट व्हावयाचें नाहीं, असें माझें मन मला सांगतें, म्हणून मी तुमच्यावर आरोप करणाऱ्यापाशीं द्वंद्वयुद्ध करण्यास तुमच्यातर्फे तयार आहें!'

शेखराचें हें अनपेक्षित भाषण श्रवण करून सर्वांच्या मति अगदीं गुंग होऊन गेल्या! त्यामुळें कोणाच्याही मुखांतून शब्द निघेना. तेथें असलेले सर्वजण आश्चर्यानें एकमेकांच्या मुखाकडे टकमका पाहूं लागले. शेवटीं वृद्ध भिल्ल पटुकर्ण गंभीरस्वरानें बोलला,–'चामुंडादेवी सत्पक्षाचें रक्षण करील!'

प्रकरण ८ वें.

शेखरावर गहजब.

शेखराचें हें धाष्टर्य पाहून सर्वांस मोठें आश्चर्य वाटलें हें तर खरेंच; पण अशा रीतीनें तो सरदार हलधराच्या साह्यास सिद्ध झाला, हें पाहून चूडामणीला क्रोध आला, आणि क्रोधानें त्याचें सर्व शरीर थरारूं लागलें! शेखराची माता पलीकडच्या दिवाणखान्यांत होती, तिच्या मुखांतून 'असें होईल तरी कसें?' असे उद्गार बाहेर पडले, आपला भावी पति अशा रीतीनें मोठ्या शौर्यानें युद्धास सिद्ध झाला, म्हणून प्रियंवदेच्या अंतःकरणांत त्याच्यासंबंधानें वसत असलेलें प्रेम द्विगुणित झालें, हें खरें; पण त्याच वेळीं जांघिळासारख्या राक्षसाशीं युद्ध करतांना आपल्या सुकुमार प्रियकराचा निभाव कसा लागेल, ही शंका मनांत येऊन तिचें अंतःकरण उद्विग्न झालें. शेखराचें भाषण ऐकून जांघिळाच्या मनाची स्थिति फारच चमत्कारिक झाली होती, व आपण कांहीं भलतेंच तर ऐकलें नसेलना! असा भ्रम त्याच्या मनांत झाला होता. दृढसंध राजाचा पहिला आवेश शांत होण्याबरोबर प्रथमतः शेखराची खरडपट्टी काढावी असें त्याच्या मनांत आलें. परंतु त्याची त्या वेळची ती वीरश्रीयुक्त मुद्रा, छाती पुढें काढून निर्भयपणें ताठ उभें राहण्याची ऐट, त्याच्या मनाचा उत्साह आणि त्याचा स्वाभिमान हीं सर्व एकदम दृढसंध राजाच्या दृष्टीस पडल्यामुळें, त्याला आपल्या मुलाचें मोठें कौतुक वाटून त्याचा राग पार विरळून गेला! तथापि आपल्या मुलासंबंधानें आपल्या मनांत उत्पन्न झालेले विचार उघड करण्याची ही वेळ नव्हे, असें समजून तो स्वस्थ बसला. हें पाहून त्या धूर्त हलधरानें ह्या संधीचा फायदा घेण्याचा विचार ठरवून शेखरासंबंधानें आपलें मत काय आहे, हें सांगण्यास एकदम प्रारंभ केला.

सरदार हलधर म्हणाला,–'शाबास! राजकुमारा शाबास! हें तुझें औदार्य पाहून तूं खरा क्षत्रियकुमार आहेस, याबद्दल माझ्या मनास तिळमात्र शंका वाटत नाहीं! मी परदेशांतील रहिवासी असल्यामुळें मला तुमची भाषा चांगली बोलतां येत नाहीं, हें खरें; तथापि तुझ्यासंबंधानें मला काय वाटतें, हें उघड करून दाखविण्याचा मी साधेल तितका

यत्न करून पहातों. तुझ्यासारखा वीरपुत्र आपल्या उदरीं जन्माला आला, म्हणून तुझ्या वीरमातेला फार धन्यता वाटत असेल ! तुझे हे पूज्य वडील तुझ्या या औदार्यानें आणि धैर्यानें प्रसन्न होऊन तुला अनेक अशीर्वाद देत असतील; आणि पलीकडच्या दिवाणखान्यांत बसलेली वीरकन्या प्रियंवदा आपण लवकरच वीरपत्नी होणार असें समजून तुजकडे आपल्या प्रेमपूर्ण नेत्रांनीं पहात असेल ! तुझ्यासारखे धैर्यशाली, सत्याभिमानी, वीर आणि उदार पुरुष ज्या कुलांत जन्म घेतात, तीं कुलें धन्य होत आणि त्यांचा उत्कर्ष व्हावयास अगदीं विलंब लागणार नाहीं; अशी माझ्या मनाची पूर्ण खात्री आहे !

हलधरानें ज्यावेळीं प्रियंवदेचें नांव घेतलें त्यावेळीं शेखराची नजर आपोआप तिजकडे वळली, आणि ती प्रेमपूर्ण नयनांनीं आपणावर अमृताचा वर्षाव करीत आहे, असें मनांत येऊन त्याचें अंतःकरण प्रेमानें भरून जाऊन त्याची मुद्रा आणखी सतेज दिसूं लागली. त्या धूर्त हलधरानें शेखराच्या मातेला आपल्या भाषणांत वीरमाता असें म्हटलें असल्यानें तिला आपल्या पुत्राचें सध्यांचें आचरण गैर आहे, या गोष्टींचा अगदीं विसर पडला; आणि तीहि मोठ्या प्रेमानें आपल्या पुत्राकडे पाहूं लागली.

याप्रमाणें एका बाजूनें जरी शेखराला उत्तेजन मिळत होतें, तरी त्याच्या आनंदांत विरजण घालण्यासाठीं दुसऱ्या बाजूला चूडामणि अगदीं तयार होऊन बसलेला होता. तो एखाद्या चिडलेल्या कृष्णसर्पाप्रमाणें फूत्कार करीत शेखरास म्हणाला,–'अरे निर्लज्जा, अधमा, मूर्खा ! तुझी अक्कल गेली कोठें ? या एका यःकश्चित् माणसासाठीं तूं प्रत्यक्ष आपल्या पित्यानें केलेला न्याय अमान्य करून असें उद्धटपणाचें वर्तन करावें, हें तुला अगदीं शोभत नाहीं. या तुझ्या अडदांडपणाच्या वागणुकीस कोणी उत्तेजन देणार नाहीं.'

चूडामणि अशाच रीतीनें आणखी कांहीं बोलला असता, पण दृढसंधराजा मध्येंच म्हणाला,–'चूडामणि, चुप रहा ! तुझ्या लहान भावाचें सध्यांचें वर्तन जरी आम्हांस आवडणारें नसलें तरी तें अगदीं न्याय्य आहे, हें स्पष्टपणें कबूल करणें कोणालाही भाग आहे. असें असतां तूं माझ्या समक्ष त्याची इतकी निंदा करावी, हें तुला अगदीं शोभत नाहीं.'

हें त्या पिता-पुत्राचें भाषण चाललें असतां मेधावतीनें आपल्या पुत्रास जवळ बोलावून त्याच्या अंगावर प्रेमानें हात कुरवाळून त्यास म्हटलें,–'शेखर, तूं त्या जांघिळाचरोबर खरोखरच लढणार कीं काय ? तूं युद्धास सिद्ध झाला असतां मीं तुला नको म्हणावें, हें जरी माझ्या वीरमातृत्वास उचित नसलें, तरी हें मातृवात्सल्याविरुद्ध नाहीं, हें तुझ्या ध्यानीं आलेंच असेल.'

शेखर म्हणाला,–'माते, भिण्याचें कारण नाहीं. तुझ्या आशीर्वादानें मी प्रत्यक्ष काळाशीं लढण्यास सुद्धां भिणार नाहीं !'

इतक्यांत वृद्धत्वामुळें सर्वांस मान्य असलेला पटुकर्ण सर्व भिल्लांस उद्देशून म्हणाला,–'मित्रहो ! सत्य हें आपणां सर्व भिल्लांचें बीद आहे; यासाठीं आपण सर्वांनीं सत्यास स्मरून आपलें आचरण ठेविलें पाहिजे. ज्याअर्थीं हलधरानें द्वंद्वयुद्धास आव्हान केलें आहे, आणि त्यास योद्धाही मिळाला आहे, त्याअर्थीं आपल्या संप्रदायास अनुसरून या द्वंद्वयुद्धाचा परिणाम काय होतो, हें पाहणें आपणास अवश्य आहे ! मीं लहानपणापासून अशाच रीतीचे प्रश्न उत्पन्न झालेले पुष्कळदां पाहिलेले आहेत. इतकेंच नव्हे, तर कौलामध्यें जें कांहीं आलें तें द्वंद्वयुद्धानें बदललें. असेही प्रसंग मला आठवत आहेत. यासाठीं कुमार शेखराकडे असें रागानें पहाणें योग्य होणार नाहीं. इतक्या लहान वयामध्यें याच्या अंगीं इतकें धाडस आहे, या गोष्टीचें आपण कौतुकच केलें पाहिजे !

यावर एक भिल्ल म्हणाला,–'हे वृद्ध पण कर्ण म्हणतात, तें अगदीं बरोबर आहे. या साहसाबद्दल आम्हीं सर्वांनीं राजपुत्राची स्तुतीच केली पाहिजे. जो वीर एका परकी गृहस्थासाठीं युद्धास सिद्ध झाला, तो वीर प्रत्यक्ष आमच्यावर संकट आलें असतां मागें घेणार नाहीं याबद्दल शंकाच नको.'

या भाषणांनीं सर्व भिल्लांच्या मनांत शेखराविषयीं आदरबुद्धि उत्पन्न झाली, हें पाहून चूडामणीच्या अंगाचा अगदीं तिळपापड उडाला. आपल्याप्रमाणेंच बाकीचे भिल्ल शेखरास मूर्ख समजतील, असें प्रथम त्याला वाटलें होतें, पण हा सर्व प्रकार अगदीं विरुद्ध झाला; इतकेंच नव्हे, तर ते भिल्ल उलट शेखराची स्तुति करूं लागले, ही गोष्ट त्याच्या अगदीं काळजाला झोंबली.

इतका वेळ जांघिळमामा कांहींच बोलला नव्हता. द्वंद्वयुद्धासंबंधानें सर्व भिल्लांचें ऐकमत झालेलें पाहतांच त्यानें मोठ्या त्वेषानें भाषणास प्रारंभ केला. तो म्हणाला,–'ज्या दिवशीं या दुर्जन माणसाचा आमच्या दरींत प्रवेश झाला, त्या दिवसाचा आपण धिक्कारच केला पाहिजे! ज्या घडीस गरुडपक्ष्याचा प्राण गेला, ती घडी मोठी दुःखाची होती, ह्यांत शंका नाहीं. गरुडपक्ष्याच्या मरणानें जीं संकटें सूचित झालीं आहेत, त्या संकटांचा अनुभव यावयास एव्हांपासूनच प्रारंभ झाला, असें म्हटलें पाहिजे! दृढसंध महाराज, आपल्या या कोंवळ्या मुलाच्या तरवारीनें माझा पराजय होईल, ही गोष्ट तर अगदीं अशक्यच आहे; पण उलट ही माझी तरवार या तुमच्या लाडक्या मुलाच्या हृदयांतील रक्ताचें प्राशन करील, यांत मात्र बिलकुल संशय नाहीं. म्हणून म्हणतों, या नीचानें ज्या वेळीं या राज्यांत प्रवेश केला, ती वेळ मोठी वाईट होती. या द्वंद्वयुद्धाचे वेळीं मी आपली तरवार आवरून धरीन, आणि आपला पराजय या कोंवळ्या मुलाच्या हातून करून घेईन, हें मनांत सुद्धां आणूं नका! असें जर मीं केलें, तर माझ्या फजितीस पारावार उरणार नाहीं, हाय! हाय! काय मजवर प्रसंग आला आहे पहा! माझ्या परमपूज्य धन्याच्या पुत्राच्या मृत्यूला मी कारण होणार! धिक्कार असो मला!'

शेखर म्हणाला,–'जांघिळा, तूं अगदीं भिऊं नको! मजबरोबर युद्ध करतांना तूं अगदीं कसूर करूं नको. एकाद्या सुंदरपुरकरावरोबर किंवा नारायणपुरकरांबरोबर युद्ध करतांना तूं जितक्या त्वेषानें आपली तरवार चालवितोस, तितक्याच त्वेषानें, इर्षेनें व कुशलतेनें तूं मजवर आपली तरवार चालीव. या युद्धांत तूं म्हणतोस त्याप्रमाणें माझा घात झाला, तरी त्याबद्दल तुला कोणी दोष देणार नाहीं. तथापि हें मात्र लक्ष्यांत ठेव; कीं 'जिकडे सत्य तिकडे जय,' हा ईश्वरी सिद्धांत आहे. मी सत्याकरितां युद्धास सिद्ध झालों आहें, म्हणून मी तुझ्या दृष्टीनें कितीहि दुर्बल दिसलों, किंवा तूं आपल्या शरीरावर भरंवसा ठेऊन आपणास बलाढ्य असें मानीत असलास, तरी माझ्या पाठीशीं माझें रक्षण करणारें सत्य तयार असल्यामुळें, माझा जय होईल, हें खूप लक्ष्यांत ठेव. तुझ्या तरवारीला माझें रक्त तर मिळणारच नाहीं, पण तुझा मीं पराजय केल्यावर तुला मी जीवदान देईन; तुझा प्राण घेणार नाहीं!'

ह्या भाषणानें क्रोधास चढून तो अवाढव्य पुरुष गर्जना करीत बोलला,–'मूर्खा! मला जीवदान! युद्धामध्यें हा जांघिळ, कोणाला जीवदान देत नसतो, आणि कोणाजवळ जीवदान मागतही नसतो समजलास!'

हें ऐकून दृढसंध राजा निष्ठुरतादर्शक स्वरानें म्हणाला,–'थांबा! तुम्ही दोघेही चूप रहा! हातानें स्फूर्ति करून दाखविण्याचा प्रसंग अगदीं जवळ आलेला असतां अशा वल्गना कां करतां! ज्या अर्थी सरदार हलधरानें द्वंद्वयुद्धास आव्हान केलें आणि त्याला योद्धाही मिळाला, त्याअर्थी आतां युद्ध हें

आलेंच पाहिजे. उद्यां सकाळीं सूर्योदयानंतर चार घटकांनीं हें द्वंद्वयुद्ध व्हावें, असें मी ठरविलें. अहो सरदार हलधर, तोंपर्यंत तुम्हाला बांदखान्यामध्येंच राहिलें पाहिजे. तुमच्या या सेवकानें जो अपराध केला आहे, त्या अपराधाला आम्हीं देहान्त शिक्षा फर्माविलीच आहे; पण ती शिक्षा आज अमलांत न आणितां त्याला उद्यां संध्याकाळपर्यंत आम्हीं जिवंत ठेवणार आहों.'

धनी आणि चाकर या दोघांच्या प्राणरक्षणासाठीं आतुर झालेल्या चूडामणीला आपल्या पित्याच्या या भाषणानें वाईट वाटलें. तो म्हणाला,–' काय ! या नीचाला आपण उद्यांपर्यंत जिवंत ठेवणार ! मला वाटलें होतें कीं, त्याचें मेत आजच गरुडपक्ष्यांना खावयास मिळेल ! या नीचावर आपण इतकी दया कां करावी हें मला समजत नाहीं.

आपल्या त्या उद्धट पुत्राकडे तीक्ष्ण दृष्टीनें पहात दृढसंध राजा म्हणाला,–' तें कांहीं नाहीं. आम्हीं जी आज्ञा केली, ती अगदीं विचारपूर्वक केली आहे. आम्ही त्याला उद्यां सायंकाळींच फांशीं देणार. उद्यां वधस्थानाकडे जातांना आयती सोबत मिळेल आणि आपल्यालाही दोन दोनदां तयारी करण्याचे श्रम घ्यावे लागणार नाहींत. '

दृढसंध राजानें हे शेवटचे शब्द सरदार हलधरास उद्देशून उच्चारिले होते, हें उघड आहे. अर्थात् उद्यांच्या युद्धांत जांघिळाचा विजय होऊन शेखराचा त्याच्या हातून अंत होणार, असें राजाचें मन त्याला सांगत होतें. तथापि दृढसंध राजाला द्वंद्वयुद्धास मनाई करतां येईना. तो खरा वीर आणि देशाचार व कुलाचार यांस मान देणारा असल्यामुळें, पूर्वापर चालत आलेल्या रूढीप्रमाणें आपण वर्तन ठेवणें हें आपलें कर्तव्य आहे, असें तो समजत होता; आणि याच कारणासाठीं लहान मुलाच्या जिवावर प्रसंग आलेला प्रत्यक्ष दृष्टीस पडत असतांही त्यानें भावी द्वंद्वयुद्धास कांकूं न करतां संमति दिली होती.

राजाच्या हुकुमाप्रमाणें कित्येक भिल्लांनीं सत्यरथाच्या मुसक्या बांधिल्या आणि त्याला ते बंदिशाळेकडे घेऊन गेले. सरदार हलधरावर जरी प्रत्यक्ष मुसक्या बांधून घेण्याचा प्रसंग आला नव्हता, तरी तेथून परत जातांना आपल्या भोंवतीं शस्त्रधारी भिल्लांचा खडा पाहरा आहे, ही गोष्ट त्याच्या ध्यानीं आल्याशिवाय राहिली नाहीं. सरदार हलधराला पूर्वीच्याच दिवाणखान्यांत पोंचवून पटुकर्ण, जांघिळ वगैरे सर्व भिल्ल वाड्यांतून निघून गेले; आणि वाड्यांतील नेहमींच्या रहिवाशांखेरीज कोणी तेथें राहिलें नाहीं.

नंतर दृढसंध राजा शेखरास म्हणाला,–' शेखर तूं हें काय केलेंस ! ज्याच्या संबंधानें तुला तिळमात्र सुद्धां माहिती नाहीं, त्याच्यासाठीं तूं जिवावर उदार होऊन लढण्यास तयार झालास हें काय म्हणून ! देवी चामुंडेनें दिलेल्या कौलावर तुझा विश्वास नाहीं काय ! '

शेखरानें उत्तर केलें,–' त्याची माझी पूर्वीची ओळख नाहीं, हें जरी खरें असलें, तरी तो मनुष्य विश्वासघातकी नाहीं, असें माझें मन मला सांगतें, म्हणून मी त्याचा पक्ष घेऊन युद्धास सिद्ध झालों आहें. ज्याअर्थीं आपल्या पूर्वजांनीं कौलावर तोड म्हणून द्वंद्वयुद्धाची सवड ठेविली आहे, त्याअर्थीं कौलावरून जो निकाल झाला, तो सर्वांनीं मानिलाच पाहिजे, अशी त्यांची देखील समजूत नसावी, हें उघड दिसत आहे. कौल हाच वादाचा शेवटचा निकाल समजावयाचा, त्यावर शंका घ्यावयाची नाहीं, अशी जर आपल्या पूर्वजांची कल्पना असती, तर त्यांनीं द्वंद्वयुद्धाची सवड कधीं ठेविलीच नसती.'

शेखराचें हें भाषण दृढसंधराजाला पटलें. परंतु हें त्याचें समर्पक उत्तर ऐकून चूडामणीच्या अंगाची लाही झाली, आणि तो म्हणाला,–' आमच्या पूर्वजांच्या कल्पना काय होत्या आणि काय नव्हत्या, याचद्दल

आम्हीं वाद किंवा तंटा करीत बसणें हें योग्य नाहीं. आमच्या पूर्वजांनीं जरी कौलावर द्वंद्वयुद्धाची सवड ठेविली असली, तरी द्वंद्वयुद्धामुळें कौलावरून केलेले ठराव रद्द झाले, असें क्वचितच घडून येतें. बहुधा देवीच्या कौलाप्रमाणेंच सर्व गोष्टी घडून येतात. माझ्या हातीं जर आज अधिकार असता, तर मीं त्या दोघां हरामखोरांना आतांच्या आतां फासावर लोंबविलें असतें!'

दृढसंध म्हणाला,–' हें तुझें अविचाराचें भाषण मला अगदीं पसंत नाहीं. कोणतीही गोष्ट योग्य मार्गानें आणि विचारपूर्वक केली पाहिजे. नाहीं तर मागाहून पश्चात्ताप करीत बसण्याचा प्रसंग येतो.' नंतर तो आपल्याशींच भाषण करण्याच्या स्वरानें म्हणाला,– 'मी जें कांहीं करणार आहें, तें अगदीं विचारपूर्वक करणार आहें.'

सर्व भिल्ल निघून गेल्यावर राणी मेधावती पलीकडच्या दिवाणखान्यांतून आपल्या पति-पुत्रांपाशीं आली होती. तिनें पतीस विचारलें,–' आपल्या मनांत कांहीं विचार आला आहे, असें दिसतें. खरेंच, मीं म्हणतें, आलेलें हें संकट निवारण्याची आपण कांहीं तरी युक्ति काढली पाहिजे.'

दृढसंध म्हणाला,–' होय; युक्ति सुचेल तर खरी. पण अजून कांहीं मला एखादी विनतोड युक्ति सुचलेली नाहीं.'

राणी मुलास म्हणाली,–'शेखरा, आजचें हें तुझें करणें कांहीं मला आवडलें नाहीं. वीरांनीं युद्ध करावयाचें हें खरें, पण तें शत्रूबरोबर करावयाचें. आपल्या एकनिष्ठ सेवकाशीं युद्ध करणें हें कांहीं मोठें पुरुषार्थाचें कृत्य नव्हे. अजून माघार घेणार असलास तर सांग; म्हणजे आम्हीं तुझा अपमान होऊं न देतां हें युद्ध टाळण्याची कांहीं तरी युक्ति काढूं.'

शेखर म्हणाला,–' माते, हें तुझें भाषण जरी पुत्रवात्सल्यानें युक्त असलें, तरी तें माझ्या हृदयास शल्याप्रमाणें शोचित आहे. कारण माझ्या युद्धकौशल्यासंबंधानें तुझ्या मनांत संशय आलेला दिसतो.'

दृढसंध म्हणाला,–' शेखर, तूं आतां अधिक कांहीं बोलूं नको. यासंबंधानें अधिक चर्चा व्हावी, अशी माझी अगदीं इच्छा नाहीं. यासाठीं तूं येथून दुसरीकडे कोठें तरी जा कसा! तूं येथें असलास तर या गोष्टी कांहीं थांबावयाच्या नाहींत. यासाठीं तूं चार घटका कोठें तरी एकांतीं असावेंस, अशी मी तुला आज्ञा करितों.'

शेखर म्हणाला,–'आपली आज्ञा प्रमाण.'

शेखर निघून गेल्यावर दृढसंध राजा आपल्या पत्नीस म्हणाला,–' मीं त्या सत्यरथाला आजच फांशीं दिलें नाहीं, यांचें कारण अगदीं निराळें आहे. त्या दोघांनीं आजची रात्र एकत्र घालवावी अशी माझी मनापासून इच्छा आहे.'

राणीनें विचारलें,–' असें का बरें! यांत आपला हेतु काय असावा, याची मला कल्पना करतां येत नाहीं.'

दृढसंध म्हणाला,–' ते दोघेजण आज रात्रीं एकाजागीं असले, म्हणजे ते जें कांहीं बोलतील, त्यावरून आपणास त्यांच्या हेतुसंबंधानें बरोबर कल्पना करता येईल. आमचा शेखर मोठा हुषार आहे. तो कांहीं त्याच्या मनाची खात्री पटल्याखेरीज त्या सन्दारावर इतका विश्वास ठेवणार नाहीं. त्याला लिहितां वाचतां येत असल्यामुळें त्याची बुद्धि मोठी तीव्र झालेली आहे.'

चूडामणि म्हणाला,–' तो पुस्तकें वाचून आपणांस शाहणा समजत असल्यामुळेंच त्याची धर्मावरची श्रद्धा अगदीं नाहींशी झाली आहे. त्याची जर देवधर्मावर श्रद्धा असती, तर तो त्या कपटी माणसावर विश्वास ठेवून लढावयास कधींच तयार झाला नसता.'

राणी म्हणाली,–' चूडामणि, आम्ही एका गोष्टीसंबंधानें बोलत असतां तूं मध्येंच दुसरी गोष्ट काढावी, हें अगदीं योग्य नाहीं.' नंतर ती आपल्या पतीस उद्देशून म्हणाली,

' आपली ही युक्ति साध्य होऊन तो सरदार कपटी आहे असें ठरलें, तर पुढें आपण काय करावयाचें योजिलें आहे ? '

दृढसंध म्हणाला,–' तसें ठरल्यास पुढें काय करावयाचें ते अगदीं उघड आहे. तो सरदार कपटी आहे असें ठरलें, म्हणजे द्वंद्वयुद्ध बंद करून त्या सरदाराला आणि त्याच्या नोकराला एकदम देहान्त शिक्षा देण्यास कोणतीच हरकत नाहीं. '

राणी म्हणाली,–' या युक्तीनें जर तो सरदार कपटी आहे असें ठरलें, तर शेखराला आपला जीव धोक्यांत घालण्याचें कारणच उरणार नाहीं. तेव्हां ही युक्ति फार चांगली आहे. '

चूडामणि कपाळास आंठ्या घालून म्हणाला,–' ही युक्ति मोठी उत्तम आहे, पण ही तडीस कशी जाईल, एवढीच शंका आहे. ही युक्ति साध्य होण्यास मध्यें जी एक अडचण आहे, ती कशी दूर होणार ? '

राणीनें विचारलें,–' ती कोणती अडचण ?

चूडामणि म्हणाला,–' अडचण एवढीच, कीं ते दोघे हरामखोर जेव्हां एकत्र असतात, तेव्हां ते जी भाषा बोलतात, ती भाषा ज्याला समजेल असा मनुष्य कोठून आणावयाचा ! '

दृढसंध राजा म्हणाला,–' मूर्खा, ही अडचण माझ्या ध्यानीं आली नसेल, असें का तुला वाटतें ! तूं आपणास मोठा शहाणा म्हणवितोस, पण तुला काडीची देखील अक्कल नाहीं, हें मला कधींच कळून चुकलें आहे. मला अजून म्हातारचळ लागला नाहीं समजलास. ज्याला त्यांची भाषा समजेल असा मनुष्य आपण कोठून आणावयाचा हें मीं अगोदरच ठरवून ठेविलें आहे. तुझे आजोबा वृषपति यांच्या आश्रयास–'

राणी मध्येंच म्हणाली,–' होय; माझ्या माहेरीं तो हेमचंद्र पंडित मोठा विद्वान् आहे खरा. त्याला कित्येक भाषा अगदीं उत्तम बोलतां येतात. त्याला आपण आज त्यांचें भाषण ऐकण्यासाठीं कोठें तरी लपवून ठेवणार कीं काय ! '

दृढसंध म्हणाला,–' होय; असाच माझा विचार आहे. यासाठीं, चूडामणि, तूं आतांच्या आतां घोडयावर बसून वत्सपुरास जा, आणि हेमचंद्राला इकडे घेऊन ये. पण त्याला वाडयांत आणशील तो अगदीं गुप्तपणानें आण. कारण तो वाडयांत आला आहे, हें योग्य वेळ येईपर्यंत शेखरास किंवा दुसऱ्या कोणास समजतां कामा नये.'

चूडामणि तिरसटपणानें बोलला,–'आपल्या आज्ञेप्रमाणें मी हेमचंद्रास घेऊन येतों; त्या हेमचंद्राला जरी पुष्कळ भाषा अवगत असल्या, तरी जाडजाड भिंतीपलीकडे चाललेलें भाषण ऐकण्याची कला त्याला साध्य असेल कीं काय, याची मात्र मला मोठी शंका आहे ! मी मूर्ख आहें हें तर खरेंच, पण ज्या खोलींत त्या हरामखोरांस ठेविलें आहे, त्या खोलींत हेमचंद्राला लपून बसण्यासारखी जागा कोठें आहे कीं नाहीं, याचा विचार तुम्ही केलाच असेल ! नाहीं म्हणायला तेथें पलंगाखालीं लपण्यासारखी जागा आहे; पण तेथें लपलेला माणूस जर का त्या नीच सरदाराला उमगला, तर तो त्याचा प्राण घेतल्यावांचून राहणार नाहीं. '

दृढसंध म्हणाला,–' मीं तुला मूर्ख म्हटलें, याचा तुला मोठा राग आलेला दिसतो; पण तूं किती मूर्ख, अविचारी आणि उद्धट आहेस, हें आतांच्या तुझ्या भाषणावरून स्पष्ट होत आहे. माझ्यापेक्षां तुला अधिक अक्कल आहे, असें समजून तूं मला उलट्या गोष्टी सांगूं लागला आहेस, पण हें मला अगदीं सहन होणार नाहीं. तूं ज्या अडचणी म्हणतोस त्यांचा मीं पूर्ण विचार केला आहे; आणि त्यांतून पार पडण्याचे मार्गही मीं शोधून ठेवले आहेत. यासंबंधानें तुला पंचाईत करण्याचें अगदीं कारण नाहीं. माझ्या आज्ञेप्रमाणें तूं फक्त वत्सपुरास जाऊन

त्या हेमचंद्राला घेऊन ये. म्हणजे पुढें काय करावयाचें तें मी पाहून घेईन!'

यावर अधिक भाषण केल्यास वडिलांशीं आतांच खटका उडेल, असें समजून चूडामणि रागानें फणफणत तेथून बाहेर पडला, आणि तबेल्याकडे जाऊन त्यानें आपल्या आवडत्या घोड्यावर जीन कसण्याचा मोतद्दारास हुकूम केला. प्रतापपुरापासून वत्सपुर सुमारें चार कोस होतें. घोडा तयार होतांच चूडामणीनें एकदम वत्सपुराचा मार्ग धरिला.

प्रकरण ९ वें.

चूडामणीचा प्रवास.

सोनानदीच्या मुखाकडून दरींतून बाहेर पडण्याचा जो मार्ग होता, त्या मार्गानें चूडामणि दरींतून बाहेर पडला. तथापि त्याला ज्या प्रदेशांतून प्रवास करावयाचा होता, तो प्रदेश डोंगराळ असल्यामुळें दरींतून बाहेर पडतांच एक लहानसा डोंगर त्यास चढावा लागला. या डोंगराच्या शिखरावर येतांच आपल्या घोड्यास थोडी विश्रांति द्यावी म्हणून तो घोड्यावरून खालीं उतरला. नैसर्गिक सौंदर्यानें ज्यांना आनंद होतो, अशांपैकीं जर चूडामणि असता, तर त्याला त्या डोंगरावरून दिसणाऱ्या आसमंतात्–भागांतील देखाव्यानें आनंद झाल्याखेरीज राहिला नसता. परंतु चूडामणि हा एक कठोर मनाचा पुरुष असल्यामुळें त्याचें या देखाव्याकडे अगदीं मन वेधलें नव्हतें. घोडयास पुरेशी विश्रांति दिल्यावर तो पुनः त्यावर स्वार झाला, आणि त्यानें पुढील मार्ग क्रमावयास प्रारंभ केला. प्रतापपुरापासून सुमारें दोन कोस गेल्यावर त्याला आपल्यापुढें दुसरा एक घोडेस्वार त्याच रस्त्यानें जात आहे, असें आढळून आलें. पुढील घोडेस्वार आपला घोडा फार सावकाश चालवीत होता, आणि चूडामणि आपला घोडा भरधांव पिटाळीत असल्यामुळें त्या दोन स्वारांची गांठ लवकर पडली. पुढील स्वाराच्या [illegible] प्रकारच्या वेषावरून तो सुंदरपुरकर [illegible]. हें चूडामणीनें तत्काल ओ[illegible] त्याच्या आणखी जवळ गेल[illegible] स्वार दुसरा तिसरा कोणी [illegible] धिपति बृहद्रथ हाच आहे, [illegible] ओळख पटली.

प्रतापपुरकर आणि सुंदरपु[illegible] जाद वैर होतें; हें मागील एक[illegible] वरून वाचकांच्या ध्यानीं आलेंच [illegible] दोन संस्थानिकांमध्यें अगदीं अ[illegible] वरून देखील वारंवार खटके उडत [illegible]. किंवा कित्येक प्रसंगीं लढाईची खुमखुमी जिरवून घेण्यासाठीं अगदीं क्षुल्लक कारणें सुद्धां या दोघां संस्थानिकांकडून पुढें करण्यांत येत असत. तथापि आम्ही सध्यां ज्यावेळची गोष्ट सांगत आहों; त्यावेळीं दृढसंध आणि बृहद्रथ यांमध्यें समेट झालेला होता. चूडामणीचा स्वभाव मूळचाच खुनशी आणि रक्तपातप्रिय असल्यामुळें या दोन संस्थानांचा जरी सध्यां समेट होता, तरी बृहद्रथाला पाहिल्याबरोबर चूडामणीची वैरबुद्धि जागृत झाली, आणि त्यानें आपली तरवार अर्धी बाहेर खेंचली. पण तितक्यांत त्याला समेटाचें स्मरण होऊन तो म्हणाला,–'आज शत्रूबरोबर उघड्या मैदानांत दोन हात करण्याची सोन्यासारखी संधि आपोआप मिळाली असून ती व्यर्थ घालवावी लागत आहे, ही मोठी खेदाची गोष्ट आहे.'

इकडे आपल्या मागून येणाऱ्या घोड्याच्या टापांचा खणखणाट ऐकून बृहद्रथानेंही मागें वळून पाहिलें, आणि ज्यावेळीं त्यानें चूडामणीस ओळखलें, त्यावेळीं त्याच्याही मनांतील शत्रुबुद्धि जागृत झाल्याखेरीज राहिली नव्हती. चूडामणीनें आपल्या तरवारीस हात घातला, हें पाहतांच बृहद्रथाचा हात आपोआपच आपल्या तरवारीकडे वळला आणि

त्यानेंहि आपली तरवार थोडीशी म्यानांतून बाहेर खेंचली. पण चूडामणीनें आपली तरवार पुनः [illegible] घातली हें पाहतांच त्यानेंही आपली [illegible] घेतला, आणि शांत व गंभीर [illegible] उदासीन वृत्तीनें तो [illegible] लागला. सभ्यांच्या भेटी[illegible] निष्फळत्वाचा झाला किंवा [illegible] नाही, तरी बृहद्रथाला त्याची [illegible] नव्हती, असें त्याच्या मुद्रेवरून दिसत होतें.

[illegible] हा सरासरी चाळीस बेचाळीस [illegible] एकट्टा पुरुष होता. त्याची उंची [illegible] असून त्याचें शरीर बांधेसूद होतें. त्याची मुद्रा तेजस्वी आणि सभ्य दिसत असे. त्याचा चेहरा सुरेख होता व प्रथमदर्शनीच त्या पुरुषाविषयीं त्याला पहाणाऱ्याच्या मनांत आदरबुद्धि उत्पन्न होत असे. तथापि पहाणारा चाणाक्ष असल्यास त्याला त्याच्या किंचित् वक्र भुंवया, आणि त्याचे घट्ट मिटलेले ओष्ठ यांवरून त्याच्या मानी स्वभावाचें अनुमान करतां येणें कठीण नव्हतें. त्या प्रदेशामध्यें जितके संस्थानिक होते, तिलक्यांमध्यें तो अधिक श्रीमान् होता, आणि त्यामुळें त्याचें सर्वांवर एकप्रकारचें वर्चस्वही होतें. त्याचें राहण्याचें मुख्य ठिकाण सुंदरपुरामध्यें असून तें गांव कालीनदीच्या तीरीं वसलेले होतें. तो सध्यां विधुर होता; त्याची पुनः लग्न करण्याची इच्छा असून तो शेजारच्या संस्थानिकांपैकीं एकाद्याच्या मुलीला मागणी घालण्याच्या विचारांत आहे अशी लोकवार्ता होती, व ती खरीही होती. त्यानें गुप्तपणानें वत्सपुरकर वृषपतीपाशीं त्याच्या नातीस मागणी घातली होती, पण तिचा उपयोग झाला नव्हता.

चूडामणीशीं ज्याची गांठ पडली, तो संस्थानिक अशा प्रकारचा होता. ते दोघे सध्यां ज्या रस्त्यानें प्रवास करीत होते, तो रस्ता एका डोंगराच्या कडयावर असल्यामुळें फक्त पांच चार हात रुंदीचा होता. यामुळें त्या उभयतांनीं मनांत आणिलें असतें, तरी त्यांना परस्परांची भेट टाळल्यावांचून तेथून जातां येणें शक्य नव्हतें. ह्या प्रसंगीं चूडामणीनें त्या संस्थानिकास शिष्टाचाराप्रमाणें नाइलाजानें नमन केलें, पण त्यावेळीं त्याचें अंतर्यामि क्रोधानें जळतच होतें, आणि त्याची मुद्राही उग्र दिसत होती; परंतु बृहद्रथ राजाच्या मुद्रेवरून त्याच्या मनांत काय चाललें असावें, याचा अंदाज करतां येणें त्यावेळीं शक्य नव्हतें; कारण त्यानें आपल्या मुद्रेंत फरक पडूं दिला नव्हता.

पहिला शिष्टाचार संपल्यावर चूडामणि म्हणाला,–'बृहद्रथ महाराज, सध्यां आपणांमध्यें तह झालेला नसता, तर आपापल्या आयुधांचें पाणी कसें आहे, हें परस्परांस दाखविण्याची संधि नामी आलेली होती.'

बृहद्रथ राजा हास्यमुखानें बोलला,–'होय, सध्यां आपणां उभयतांमध्यें तह झालेला आहे हें खरें आहे. तुझी लढण्याची इच्छा पूर्ण करण्यासाठीं मी तो मोडूं इच्छित नाहीं. यावरून मी तुझ्याशीं लढण्यास भितों असें जर तूं समजत असशील तर ती तुझी चूक आहे. कारण सुंदरपुरकरांना भीति हा काय पदार्थ आहे, हें मुळीं माहीतच नाहीं. आणखी अशा एकांत स्थळीं आपण लढून एकमेकांचे प्राण घ्यावे, हें योग्य होणार नाहीं. कारण लोकांना खरा प्रकार न समजल्यानें एकानें दुसऱ्याला अडचणींत गांठून तेथें त्याचा खून केला, असें म्हणावयास लोक चुकावयाचे नाहींत. यासाठीं सध्यांच्या प्रसंगीं आपल्या तरवारी म्यानांतच असाव्या हें बरें. बरें, मी एवढें विचारितों, ज्या अर्थीं सध्यां आपण एकाच मार्गानें एकाच दिशेला जात आहों, त्या अर्थीं उभयतांनीं आपआपला मार्ग फुटेपर्यंत परस्परांच्या संगतीनें पुढें जावें, हें तुला प्रशस्त वाटतें काय! कीं जरी आपण तहामुळें शत्रुत्व विसरलों आहों, तरी तें विसरलों नाहीं, असेंच मानून कट्या शत्रु-

प्रमाणें परस्परांपासून शक्य तितकें दूर रहावें हें बरें, असें तुला वाटतें ?'

बृहद्रथ राजाची इच्छा ओळखून चूडामणि म्हणाला,–'महाराज, आपल्या संगतीं मार्गक्रमण करावयास मला मुळींच हरकत वाटत नाहीं. पण मी प्रथम विचारितों, लवाजमा बरोबर घेतल्याखेरीज आज सडी स्वारी इकडे कोठें झुकली होती !'

आपल्या मुद्रेवर अधिक सभ्यपणा आणून स्मितपूर्वक बृहद्रथ राजा बोलला,–'चूडामणि, मीसुद्धां तुला अगदीं हाच प्रश्न विचारणार होतों. तथापि ज्या अर्थीं तूं मला प्रश्न केलास, त्या अर्थीं मीच प्रथम उत्तर द्यावें हें रास्तच आहे. मी आज कित्येक दिवस नागपणपुरच्या राजाकडे पाहुणचार घ्यावयास गेलों होतों. परंतु आज आमच्या सुंदरपुरमध्यें एक निकडीचें काम उद्भवल्यामुळें मला माझ्या अमात्याचा निरोप आला, म्हणून मी घोडयावर बसून तत्काल पुढें झालों. माझे सेवक मागून रमत रमत येत आहेत.'

बृहद्रथानें आपल्या प्रश्नाचें सरळ उत्तर दिलें, हें पाहून चूडामणीलाही त्याच्या प्रश्नाचें उत्तर देणें जरूर होतें. म्हणून तो म्हणाला,–'मलाही एका महत्त्वाच्या कामासाठीं वडिलांच्या आज्ञेवरून वत्सपुराला जावयाचें आहे. मी ताबडतोबीनें कामास निघालों, म्हणून आपल्या बरोबर नोकर घ्यावयास फुरसद मिळाली नाहीं, हें खरें; पण वास्तविक पाहिलें तर बरोबर सेवक घेऊन आपण मोठ्या आडव्यतेनें मिरवत जावें, हें मला आवडत नाहीं.'

बृहद्रथ म्हणाला,–'तुझा आजा वृषपति हा मोठा थोर मनाचा पुरुष आहे, हें मी प्रांजल मनानें कबूल करितों. तो तुमच्याप्रमाणेंच आमचा शत्रु आहे, कारण जेव्हां तुमची आमची लढाई जुंपते, तेव्हां तो तुमचा नातेवाईक असल्यामुळें तुमच्या साह्यास धांवून येत असतो; हें जरी खरें आहे, तरी त्यामुळें आम्ही त्याचे गुण घेऊं नये, असें नाहीं. आणि त्याचप्रमाणें मी मोकळें मन करून सांगतों, दृढसंध महाराज सुद्धां मोठे थोर पुरुष आहेत.'

बृहद्रथ राजाच्या मुखांतून अशीं ही स्तुतिपर भाषणें ऐकून चूडामणीला मोठें आश्चर्य वाटलें, आणि बृहद्रथाच्या मनांत कांहीं तरी कावा साधावयाचा असावा, अशीही शंका त्याच्या मनांत आली. म्हणून आपण व्याजस्तुति करीत आहों हें बृहद्रथाच्या पूर्ण लक्ष्यांत यावें, अशा तऱ्हेचा स्वर काढून चूडामणि म्हणाला,–'आपण ज्या अर्थीं माझ्या वडिलांची अशी स्तुति करीत आहां, त्या अर्थी आपणही मोठे उदार मनाचे पुरुष आहां असें म्हणणें मला भाग आहे.'

बृहद्रथ म्हणाला,–'चूडामणि, तुझ्या बोलण्यांत किती डावपेंच आहेत, हें माझ्या ध्यानीं आलें नसेल, असें मात्र तूं समजूं नको. तूं हें भाषण कपटानें करीत आहेस, पण मी जें बोललों तें अगदीं सरळपणानें बोललों. चूडामणि, तूंच सांग, एकादा माणूस आपला शत्रु असला, तरी त्याचे गुण घ्यावयास काय हरकत आहे ! दोन तीन चकमकींत तूं आपलें शौर्य दाखविलें आहेस, त्यावरून तूं आतां वीर आहेस; आणि जे खरे वीर असतात, ते आपल्या शत्रूचे गुण घेण्यास अगदीं अनमान करीत नाहींत, हें तुला स्वानुभवावरून देखील सांगतां येईल. खरें शौर्य जेथें असेल, तेथें खरें औदार्य हें असावयाचेंच.'

चूडामणि म्हणाला,–'हें तुमचें भाषण अगदीं रास्त असल्यामुळें तें कबूल करणें मला भाग आहे. तथापि आपण मनामध्यें कांहीं उद्देश न धरतां अगदीं मोकळेपणानें हें भाषण केलें असतें, तर तें मला अधिक गोड वाटलें असतें.'

बृहद्रथ अगदीं मोकळेपणा दाखवीत म्हणाला,–'मी मनामध्यें एकादा विशिष्ट हेतु धरून हें बोलत आहें; असें तुला वाटतें, यास माझा नाइलाज आहे. खरेंच सांगतों, आपण आपसांतील वैर विसरून जाऊन आपल्या

शक्तीचा उपयोग जर दुसऱ्या एकाद्या दोघांच्याही हिताच्या गोष्टीकडे केला असता, तर आपला उभयतांचाही किती बरें फायदा झाला असता?'

चूडामणि म्हणाला,–'हें तुमचें भाषण अगदी बरोबर आहे. पण मला आठवण आहे तेव्हांपासून मी पाहत आहें कीं, जेव्हां जेव्हां तुमच्या आमच्यांत चकमकी झडतात, तेव्हां प्रत्येक वेळीं आंगळीक तुमची असते. आजपर्यंत तुम्हीं सुंदरपुरकरांनीं आणि नारायणपुरकरांनीं आम्हां प्रतापपूरकरांचें आणि वत्सपुरकरांचें किती नुकसान केलें आहे, याचा तुमचा तुम्हींच विचार करा म्हणजे झालें.'

बृहद्रथ म्हणाला,–'चाचारे, एका हातानें टाळी कधींच वाजत नाहीं. दोन्ही पक्षांची आगळीक असल्याशिवाय तंटा कधींच व्हावयाचा नाहीं. असो; आजपर्यंत झाल्या त्या गोष्टी झाल्या. आजपर्यंत आम्हीं परस्परांशीं वैर धरून आपलें नुकसान करून घेतलें, म्हणून यापुढें सावध होऊं नये, कीं काय!'

चूडामणि म्हणाला,–'अहो बृहद्रथ महाराज, आपण आपल्या उभयतांच्या शक्तीचा उपयोग दुसऱ्या एकाद्या हिताच्या गोष्टीकडे करावा, असें आपण आतां म्हटलें, पण ज्या गोष्टींत आपलें उभयतांचें हित एकवटलेलें आहे, अशी गोष्ट मला दिसत नाहीं. आजपर्यंत आपणां उभयतांच्या घराण्यांत वैरभाव जागृत असल्यामुळें, ज्या एकाच गोष्टींत दोघांचेंही हित असेल अशी एकादी गोष्ट असणें संभवनीयच दिसत नाहीं.'

बृहद्रथ म्हणाला,–'आजपर्यंत कदाचित् आपणांस अशी एकादी संधि लाभली नसेल म्हणून पुढेंही लाभणार नाहीं, असेंच समजावयाचें कीं काय? मला तर असें वाटतें कीं, सध्यां या प्रांतांतील आम्ही सर्व संस्थानिक एकविचारानें वागलों, तर आम्ही आपलें अत्यंत कल्याण करून घेऊं.'

चूडामणि स्वर चढवून म्हणाला,–'हां हां! आतां आलें माझ्या ध्यानांत. आपण सध्यां चंपावतीमध्यें आणि गुर्जर देशामध्यें सुरू असलेल्या राजकारणासंबंधानें बोलत आहां. चंपावतीचा राजा निंबराज हा गुजराथेवर स्वारी करून रत्नाकर महाराजांचें राज्य हिसकावून घेणार आहे, अशी जी सध्यां एक बातमी पसरली आहे, तिच्यासंबंधानें हें आपलें भाषण असावें.'

बृहद्रथ म्हणाला–,'होय, मी त्याचसंबंधानें बोलत आहें. ही बातमी जर खरी असेल, तर आपल्या या बागलाणामध्यें मोठीच खळबळ उडून जाईल. आपला प्रदेश त्या दोन राज्यांच्या मध्यभागी असल्यामुळें पहिला आघात आमच्यावर होईल. यासाठीं आमच्या प्रांतांतील सर्व संस्थानिकांनीं एकत्र जमून आपण कोणता पक्ष स्वीकारावयाचा, हें वेळींच ठरवून ठेवावें, हें फार उत्तम; असें मला वाटतें.'

चूडामणि म्हणाला,–'उद्यां जर खरोखरच लढाई सुरू झाली, तर आम्ही प्रतापपुरकर कांहीं रत्नाकर महाराजांचा पक्ष सोडणार नाहीं. आपण त्या निंबराजाच्या पक्षाला साह्य करणार, असें माझ्या कानीं आलें आहे, तें जर खरें असेल, तर या बाबतींत देखील तुमचें आमचें सख्य होणें दुरापस्तच आहे. यावरून असें दिसतें कीं, तुमच्या आमच्या घराण्यांचें सख्य नमून तुमच्या आमच्या मध्यें पूर्वापरच चालत आलेलें वैर उलट अधिक वृद्धिंगत होण्याचा समय अगदीं जवळ आलेला आहे.'

यावर बृहद्रथानें कांहींच उत्तर दिलें नाहीं. ते दोघे स्वार कांहीं भाषण न करितां मुकाट्यानें कित्येक पळें मार्ग क्रमीत होते. कांहीं वेळ गेल्यावर बृहद्रथानें विचारलें,–'निंबराज गुजराथेवर स्वारी करणार अशी जी सध्या बातमी उठली आहे, तिच्यामध्यें कांहीं तथ्यांश असेल; असें दृढमंधु महाराजांस वाटतें काय?'

चूडामणि म्हणाला,'–'ही बातमी खरी आहे. इतकेंच नव्हे, तर गेल्या आठ प्रहरांत

ज्या कांहीं गोष्टी प्रतापपुरीं घडून आल्या, त्यांवरून ही बातमी खरी आहे, याबद्दल आमच्या मनाची पूर्ण खात्री पटली आहे. आज मितीस प्रतापपुरामध्यें एक चंपावतीकर सरदार आला आहे; आणि त्याच्या एकंदर वर्तनावरून तो निंबराजाचा हेर असावा, अशी आमची कल्पना झालेली आहे. तो सरदार लबाडच आहे, अशी आमची खात्री होईल व उद्यां रात्रीं आमच्या देशांतील गरुड-पक्ष्यांस त्याच्या मांसाची मेजवानी मिळेल !'

बृहद्रथानें आश्चर्यानें विचारिलें,–' काय म्हणतोस ? कोणा चंपावतीकर हेर प्रतापपुरीं आला आहे ? बरं पण त्याचें नांव काय, आणि तो कोणत्या निमित्तानें तेथें आला आहे, हें सांगशील काय ?'

चूडामणि म्हणाला,–'ज्या अर्थीं तुम्हीं त्या निंबराजाचे पक्षपाती आहां असें माझ्या ऐकण्यांत आहे, त्या अर्थीं यासंबंधानें तुम्हीं अधिक कांहीं विचारूं नये, आणि मीं कांहीं सांगूं नये, हेंच बरें. तथापि मी तुम्हांला इतकेंच सांगतों कीं, सरदार हलधर सध्यां प्रतापपुरामध्यें आमच्या बंदींत आहे, आणि उद्यां सायंकालापूर्वीच त्याला फांशीं दिल्याची बातमी तुमच्या कानावर येईल. बरें, असो, तुमची वाट ही येथेंच फुटत आहे. मला पुनः गत्र होण्यापूर्वी प्रतापपुरीं परत गेलें पाहिजे, यासाठीं आतां गमून उपयोगी नाहीं.'

सध्यां ते दोघे ज्या जागीं येऊन पोंचले होते, तेथें तीन रस्ते फुटत होते. त्यांतील एका बाजूचा वत्सपुरास, मधला नारायणपुरास, आणि दुसऱ्या बाजूचा सुंदरपुरास असे तीन रस्ते तीन बाजूंस जात होते. चूडामणीचें भाषण ऐकून बृहद्रथ राजानें लागलाच आपला मार्ग धरिला नाहीं. तो थोडा वेळ तेथेंच घुटमळत राहिला होता. यावेळीं जर चूडामणीनें त्याच्याशीं आणखी बोलण्याची आपली इच्छा प्रदर्शित केली असती, तर थोडा वळसा पडला असता, तरी तो पत्करून नारायणपुराचा रस्ता धरण्याची बृहद्रथ राजानें चूडामणीस सूचना केली असती. पण बृहद्रथाच्या मनांत काय आहे, याचा अगदीं विचार न करितां चूडामणीनें आपला मार्ग धरिला, आणि घोड्यास टांच मारिली. त्यामुळें बृहद्रथालाही आपल्या मार्गानें जाणें भाग पडलें. जा[illegible] वेळीं शिष्टाचारास अनुसरून [illegible] मोठ्या कुरेबाजपणानें बृहद्र[illegible] केला, आणि बृहद्रथानेंही [illegible] करून त्याच्या प्रणामाचा [illegible] थोडयाच वेळानें ते दोघे, [illegible] आल्यामुळें एकमेकांस दिसत नाहीं [illegible]

प्रकरण १० वें.

सुंदरपूर.

चूडामणि दृष्टीआड झाल्यानंतर [illegible] आपल्या घोड्यास टांच मारि[illegible] आणि तो झपाट्यानें प्रवास करूं लाग[illegible] आपल्या गांवीं जाऊन पोंचण्या[illegible] सुमारें सहा कोस प्रवास करा[illegible] त्यानें आपल्या घोड्याला टांच [illegible] तरी रस्ता चांगला नसल्याम[illegible] आपला वेग पूर्णपणें दाखविण्यास सवड नव्हती. तथापि घोडा मोठा उमदा आणि वरील स्वार खंबीर असल्यामुळें तशाही रस्त्यांतून त्यांचा प्रवास बऱ्याच जलदीनें होत होता. शिवाय बृहद्रथ राजा त्याच्या प्रदेशाचा पक्का माहीतगार असल्यामुळें वळणें चुकवून तो अगदीं जवळच्या मार्गानें चालला होता, लवकरच तो पायउतारानें वाटेंत लागणारी एक लहान नदी उतरून सुंदरपुरास जाऊन दाखल झाला.

बृहद्रथाचा किल्लेवजा मजबूद वाडा इरावतीच्या पश्चिम किनाऱ्यावर बांधलेला होता. त्या वाड्याचें बांधकाम सुबक असून तो फार दर्शनीय होता. त्याच्या एका बाजूला एक मोठा डोंगर असल्यामुळें त्या

डोंगरावरून शत्रूचा प्रवेश होणें कठिण होतें, आणि वाड्याभोंवतीं विस्तीर्ण खंदक खणून त्यामध्यें इरानदीचें पाणी अडवून ठेवल्यामुळें त्याही बाजूंनीं शत्रूचा प्रवेश होण्यासारखा नव्हता. वाड्याच्या तटाला मोठमोठे बुरुज असून त्याशिवाय कित्येक [illegible] उत्कृष्ट जागा होत्या. खंदकाभोंवतीं [illegible] असून त्यांत मोठमोठे वृक्ष [illegible] वाड्याचा तट आणि जंगल यांच्या प्रतिबिंबांनीं त्या [illegible] असलेला जलपूर्ण खंदक [illegible] दिसत असे.

[illegible] उलटून आणखी चार घटका [illegible] बृहद्रथ राजा आपल्या वाड्यांत [illegible]. वाड्यांत प्रवेश केल्यावर [illegible] नोकर त्याच्यापुढें आले, [illegible] तो म्हणाला,–'तर मग [illegible] आला एकदांचा!'

[illegible] सेवकानें उत्तर दिलें,–'होय [illegible] आज सकाळींच येथें घेऊन [illegible] यांना प्रवासाचे बरेच श्रम [illegible] पडतात. आपल्या आज्ञेप्रमाणें ते [illegible] पोंचतांच मीं आपल्याकडे दून [illegible] ना.'

[illegible] सेवकाचें नांव पिंगलाक्ष असें होतें. त्याला बृहद्रथ म्हणाला,–'पिंगलाक्षा, तूं त्यांच्या आगमनाचें वर्तमान मला ताबडतोब कळविलेंस हें फार चांगलें झालें. बरें तो दमलेला भागलेला आहे, असें तूं म्हणतोस त्याअर्थीं आम्हींच त्याच्यापाशीं जाऊन त्याची भेट घेऊं. चल, तो कोणत्या दिवाणखान्यांत बसलेला आहे?'

देवदत्त ज्या दिवाणखान्यांत बसला होता, तेथें बृहद्रथास पोंचवून पिंगलाक्ष आपल्या कामास निघून गेला. त्यामुळें देवदत्त आणि बृहद्रथ यांस एकांत मिळाला.

देवदत्ताचें वय सुमारें पन्नास वर्षांचें होतें. तो मोठा शांत, गंभीर, विचारी आणि राजकारणी पुरुष असावा, असें त्याच्या मुद्रेवरून स्पष्ट दिसत असे. तो मोठा हुषार माणूस असून प्रत्येक काम मोठ्या दक्षतेनें आणि सावकाशपणें विचार करून करीत असे. तो जेव्हां भाषण करूं लागे, तेव्हां त्याच्या भाषणांत उतावळेपणा किंवा अस्पष्टता यांचा गंधही नसे. त्याचीं उत्तरें स्पष्ट आणि विचारपूर्वक शब्दयोजना करून दिलेलीं असत. तो कित्येक वर्षें बृहद्रथ राजाची एकनिष्ठपणें सेवा करीत असे, पण त्याला त्याच्या सेवेबद्दल नेमकें वेतन कधींच ठरवून दिलेलें नव्हतें. तो राजाच्या अगदीं अंतरंगांतील असल्यामुळें, त्याचा वाड्यांत मानमरातब मोठा होता. तो फार शहाणा व विचारी आहे, अशी सर्वांची समजूत असल्यामुळें तो सर्वांस आवडता होता. एकादी महत्त्वाची गोष्ट करावयाची असली, तर बृहद्रथ राजा ती देवदत्ताकडे सोंपवी, म्हणजे ती उत्कृष्ट रीतीनें पार पडत असे. बृहद्रथ राजा स्वतः मोठा राजकारणी पुरुष होता; म्हणून त्याला देवदत्ताचें प्रत्येक बाबतींत मोठें साहाय्य होई. ते दोघे जी गोष्ट हातीं धरीत, तींत त्यांना अपयश क्वचितच येत असे. देवदत्त इतका हुषार होता, तरी तो आपमतलबी नव्हता; त्यामुळें त्याचें सर्व शहाणपण बृहद्रथाच्या उपयोगी पडे, आणि बृहद्रथही त्याचा सन्मान राखी.

आपलें भाषण कोणी ऐकत नाहीं अशी आपल्या मनाची खात्री करून घेऊन बृहद्रथानें विचारलें,–'गेला होतास त्या कामाचें काय झालें? आणखी तूं असा अगदीं एकाएकीं परत कसा आलास?'

देवदत्तानें उत्तर केलें,–'मी ज्या गृहस्थास भेटावयास गेलों होतों; त्या गृहस्थाच्या मनांत या प्रदेशांत स्वतांच यावें, असें आल्यामुळें मला इकडे येणें भागच पडलें. तो सध्यां या प्रांतीं आला आहे.'

अत्यंत आश्चर्यानें आपल्या सेवकाकडे पाहून बृहद्रथ राजा म्हणाला,–'असें होईल तरी कसें?'

देवदत्त म्हणाला,–'महाराज, ही गोष्ट सरुद्दर्शनीं आश्चर्याची, किंबहुना अशक्य अशी वाटते खरी, परंतु ती घडून आली, यांत चिलकुल शंका नाहीं. तो गृहस्थ इकडे यावयास निघाला, हें मला समजतांच मी त्याचा माग काढीत त्याच्या मागोमाग निघालों. तो ज्या गलबतांतून आला, त्याच गलबतांतून मीही आलों. तो ज्या बंदरांत उतरला, त्याच बंदरांत मीही उतरलों. तो ज्या घांटानें कोंकणांतून घांटावर आला, त्याच घांटानें मीही आलों; आणि आपल्या बागलाणाच्या सरहद्दीपर्यंत मीं त्याचा बरोबर माग काढला. पण कशी ती नकळे, त्याची–माझी अगदीं आयत्या वेळीं चुकामुक पडली.'

बृहद्रथ म्हणाला,–'तूं सांगतोस ही हकीकत मोठी विलक्षण दिसते. या बाबतींत तुझी कोठें चूक तर होत नसेल ना?'

देवदत्त गंभीरपणानें बोलला,–'महाराज, मी आपली आज जवळ जवळ पंधरा वर्षें सेवा करीत आहें; पण इतक्या अवधींत माझ्या हातून एकादी मोठी चूक झाली, असें मला स्मरत नाहीं. मी जी गोष्ट करतों, ती बरोबर आहे, अशी माझ्या मनाची पुरी खात्री झाल्यावांचून मी तिला हात घालीत नाहीं. सध्यां मी जें काय सांगत आहें, तें अगदीं खरें आहे, अशी माझ्या मनाची पक्की खात्री पटलेली आहे. महाराज, मीं त्या गृहस्थाचा माग काढतांना किती सावधपणा केला आहे, हें जेव्हां आपल्या लक्ष्यांत येईल, तेव्हां आपण माझ्या अकलेची तारीफच कराल.'

बृहद्रथ म्हणाला,–'तुझ्या शहाणपणाबद्दल माझी आतां खात्री पटावयाची राहिली आहे, असें मला [illegible]. पण मी म्हणतों, असें क[illegible]याच्या मनांत तरी कसें अ[illegible]र्य आहे!'

देव[illegible]आश्चर्य तर खरेंच, पण [illegible]एकीं माग लागत नाहींसा झाला, याचें मला त्याहून आश्चर्य वाटत आहे.'

बृहद्रथानें विचारलें,–'अशी कशी बरें त्याची तुझी चुकामूक पडली?'

देवदत्तानें सांगितलें,–'त्याची माझी अगदींच चुकामुक पडली, असें मी म्हणत नाहीं. बंदरांत उतरल्यापासून मोठ्या सावधपणानें आणि त्या गृहस्थाच्या अगदीं लक्षांत येणार नाहीं; इतक्या खबरदारीनें मीं बागलाणाच्या सरहद्दीपर्यंत त्याचा पाठलाग केला; पण सरहद्दीवर आल्यानंतर तो कोठें शिरला हें मात्र मला उमगलें नाहीं. तो सध्यां बागलाणांत आहे, याबद्दल मला तिळमात्रही शंका नाहीं.'

बृहद्रथानें विचारलें,–'काय? म्हणतोस तरी काय? तो सध्यां बागलाणांत आहे? बरें त्याच्याजवळ लवाजमा किती आहे?'

देवदत्तानें सांगितलें,–'लवाजमा कुठचा? त्याच्याबरोबर त्याचा फक्त एक सेवक मात्र आहे. त्या सेवकासह तो सध्यां बागलाणांत आहे. इतकेंच नव्हे, तर तो येथून जवळच कोठें तरी दहा पंधरा कोसांच्या आंत असावा!'

बृहद्रथानें अत्यंत आश्चर्यानें विचारलें,–'तो इतका जवळ येऊन पोंचला आहे! तर मग आधीं मला सांग, तो सध्यां कोणत्या नांवानें इकडे प्रवास करीत आहे?'

देवदत्त म्हणाला,–'सध्यां त्यानें सरदार हलधर असें नांव धारण केलें आहे.'

बृहद्रथानें मोठ्या आश्चर्यानें म्हटलें,–'काय! सरदार हलधर! तर मग आतां माझ्या मनांत जी भीति उद्भवली आहे, ती खरी आहे, यांत शंका नाहीं. त्या दुष्ट चूडामणीनें मला जेव्हां त्या सरदाराचें वर्तमान सांगितलें, तेव्हांच मला थोडी शंका आली होती.'

देवदत्तानें आपल्या नेहमींच्या स्वभावास अनुसरून शांतपणानें विचारलें,–'चूडामणीनें आपणांस काय सांगितलें?'

बृहद्रथ म्हणाला,–'अरे बाबा, माझा जीव भीतीनें इतका उडत असतां तूं अगदीं शांतपणें मला प्रश्न विचारीत आहेस, हें मोठें आश्चर्य आहे! अरे गृहस्था, सध्यां तो सरदार हलधर वाघाच्या जबड्यांत सांपडला आहे. तो सध्यां प्रतापपुरच्या बंदिखान्यांत पडला आहे. त्याचा प्राण आतां अगदीं गळ्यांशीं आला आहे.

गंभीरपणानें मान हालवीत देवदत्त म्हणाला,–'ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे! पण मी विचारितों ही गोष्ट एका अर्थी आपल्या हिताचीच झाली, असें म्हणावयास काय हरकत आहे? महाराज, आपण जर या प्रसंगाचा बरोबर उपयोग करून घेतला, तर मी जें कांहीं करण्यासाठीं इतक्या लांबचा प्रवास करून हात हालवीत परत आलों आहें, तें येथच्या येथेंच नाहीं कां आपल्यास साध्य करून घेतां येणार?'

बृहद्रथ म्हणाला,–'ही तुझी सूचना अगदीं योग्य आहे. जर माझ्या साह्यानें सरदार हलधराची दृढसंधाच्या हातून मुक्तता झाली, तर माझें कार्य तर साधलेंच, पण त्यांतल्या त्यांत त्या दृढसंध राजाचें नाकही ठेंचल्यासारखें होईल.'

अत्यंत गंभीर मुद्रेनें आणि एखाद्या मुत्सद्यास साजेल अशा तऱ्हेनें देवदत्त म्हणाला,–'या प्रसंगीं आपण जर प्रतापपुरावर स्वारी केली, तर तिचा फारसा उपयोग होईल, अशी आशा बाळगणें व्यर्थ आहे. हा दृढसंध राजा युद्धकलेमध्यें प्रवीण असल्यामुळें त्यानें आपल्या मुलखाचा बंदोबस्त फारच उत्तम ठेविला आहे. सध्यां त्याची जितकी तयारी आहे, तितकी गेल्या वीस वर्षांत नव्हती, अशी माझी कल्पना आहे.'

बृहद्रथ म्हणाला,–'असें खरें. सध्यां लढाईची कल्पना बाजूस ठेवणें जरूर आहे. बरें तूं काय युक्ति सुचविनोस? तुला बरोबर विचार करतां यावा, म्हणून आज चूडामणीची व माझी गांठ पडली असतां जें काय वर्तमान घडलें, तें मी तुला प्रथम सविस्तर सांगतों. तें ऐकून घेतलेंस म्हणजे तुला चारी बाजूंनीं विचार करून एकादी युक्ति काढतां येईल.' असें बोलून बृहद्रथ राजानें चूडामणीशीं झालेलें भाषण देवदत्तास अक्षरशः सांगितलें. हें सर्व भाषण देवदत्त एकाग्र मुत्सद्यामणें निर्विकार मुद्रेनें ऐकत होता.

हें भाषण ऐकून घेतल्यावर तो कार्यकुशल मंत्री बृहद्रथास म्हणाला,–'महाराज, आपल्या सांगण्यावरून चूडामणि सध्यां वत्सपुरास गेला आहे, आणि तो आजच्या आज पुनः प्रतापपुरीं परत जाणार आहे, असें दिसतें. हें जर खरें असेल तर त्याच्यावर वाटेंत हल्ला करून त्याला कैद केल्यास आपले हेतु अगदीं सोळा आणे तडीस जातील. सरदार हलधराच्या सुरक्षितपणासाठीं चूडामणीस ओलीस ठेवणें या प्रसंगीं अत्यंत जरूर आहे.'

बृहद्रथ म्हणाला,–'ही युक्ति फार उत्तम आहे, परंतु ही युक्ति आपण योजिली असतां एक मोठें संकट उत्पन्न होण्याचा संभव आहे. चूडामणीला आपण कैद केलें, हें वर्तमान कानीं पडतांच दृढसंध राजा आपलें सर्व सैन्य एकत्र करून आमच्याशीं युद्ध करावयास आल्याखेरीज राहणार नाहीं. दृढसंधराजा युद्धास निघाला कीं, वत्सपुरकर वृषपति त्याच्या साह्यास येणारच. त्या दोघांचरोबर टक्कर देण्याइतकें आमचें सामर्थ्य आहे, असें मला वाटत नाहीं.'

देवदत्त म्हणाला,–'ह्या गोष्टीचा मीं अगदींच विचार केला नाहीं असें नाहीं. दृढसंध राजाला जर वत्सपुरकरांनीं साह्य केलें, तर पूर्वीच्या करारमदारांप्रमाणें आम्हाला रत्नपुरकरांनीं साह्य करणें जरूर आहे; आणि वेळ [illegible] ते साह्य करणार नाहींत, असें मानण[illegible] कारण दिसत नाहीं.'

बृहद्रथ म्हणाला [illegible] रत्नपुराधीश विधु[illegible] सध्यां जांच्या दरबारीं क[illegible] महारा-
[illegible] गेले

आहेत. ते स्वतः राज्यामध्यें नसतांना त्यांचे कारभारी यजमानाच्या आज्ञेवांचून आमच्या साह्यास येतीलच अशी खात्री धरल्यास ऐन्या वेळीं आपली फसगत होण्याचा संभव आहे; तूं आज बरेच दिवस इकडे नव्हतास यामुळें हें तुला माहीत नाहीं.'

देवदत्त म्हणाला,–'असें असेल तर आपण दुसरी कांहीं तरी युक्ति योजूं.'

बृहद्रथानें विचारलें,–'तर मग तूंच काय ती दुसरी युक्ति काढ. प्रसंग मोठा बिकट असून, वेळ तर फार थोडा आहे. चूडामणीनें जें कांहीं सांगितलें, त्यावरून हलधर हा हेर असावा, अशी दृढसंध राजाची समजूत झालेली असून, तो त्याला उद्यां फांशीं देणार आहे; यासाठीं काय ती युक्ति लवकर५ काढली पाहिजे.'

देवदत्त बोलला,–'प्रतापपुरकर आणि वत्सपुरकर एक झाल्यास त्या दोघांशीं सामना देणें ज्या अर्थीं अशक्य आहे, त्या अर्थीं आपण वत्सपुरकरांची नांगी मोडून टाकण्याचीच एकादी युक्ति काढिली पाहिजे. आपणांस वत्सपुरकरांस स्वस्थ बसवितां येणार नाहीं काय? मी गेले सहा महिने इकडे नसल्यामुळें, इकडची स्थिति आजमितीस काय आहे, हें मला माहीत नाहीं, अर्थात् मी एकादी युक्ति योजण्यास सध्यां असमर्थ आहें.'

बृहद्रथ म्हणाला,–'माझ्या मनांत एक युक्ति सुचली आहे, ती मी तुला सांगतों. मी हल्लीं कित्येक दिवस रत्नपुरीं रहावयास गेलों होतों. तेथें मीं जी एक बातमी ऐकली ती खरी असल्यास आपला कार्यभाग साध्य होण्यासारखा आहे. वत्सपुरकर आपली मुलगी दृढसंधाच्या धाकट्या मुलास–शेखरास–देणार आहे; चूडामणीचें लग्न दुसऱ्या एका कोणाच्यातरी मुलीशीं ठरलेलें आहे, ही गोष्ट कदाचित् तुला माहीत नसेल. सध्यां शेखराची भावी पत्नी प्रियवंदा ही आपल्या आत्याकडे किंवा भावी सासूकडे रहावयास आली आहे. शेखर प्रियवंदेसह नेहमीं प्रतापपुरच्या दरीमध्यें फिरावयास जात असतो, असें मीं ऐकलें आहे. यासाठीं मी म्हणतों,–प्रतापपुरच्या दरींत आपले विश्वासु जवान पाठवून त्या पोरीलाही आजच्या आजच पकडून आणल्यास मोठी बहार होईल. प्रतापपुरावर हल्ला करून सरदार हलधरास दृढसंधाच्या कैदेंतून मुक्त करणें जरी अशक्य असलें, तरी त्या पोरीस गुपचुप माणसें पाठवून पळवून आणणें कांहीं फारसें कठीण पडणार नाहीं, असें मला वाटतें. ही युक्ति तुला कशी वाटते?'

देवदत्त म्हणाला,–'ही युक्ति कांहीं वाईट नाहीं. वेळ तर थोडा उरलेला आहे, यासाठीं या युक्तीचा शेवट काय होईल ह्याचा विचार करीत बसून उपयोग नाहीं. मात्र सावधपणा इतकाच ठेविला पाहिजे कीं, हा प्रयत्न फसल्यास हल्ला करणारे कोण होते, याची ओळख पटूं नये. जर का हे दोन्ही प्रयत्न साधून चूडामणि आणि प्रियंवदा हीं दोन्ही तुमच्या हातीं लागलीं, तर तुमचे सर्व हेतु सहज साध्य होतील, यांत शंकाच नाहीं. मी म्हणतों, ती पोरगी जर नेहमीं शेखराबरोबर असते, तर त्या दोघांसही पकडून आणल्यास अधिक चांगलें होईल. एका ऐवजीं दृढसंधाचे दोन पुत्र ओलीस तुमच्या हातीं असले, म्हणजे तो तितका लवकर वठणीस येईल, आणि जर कदाचित् चूडामणि आपल्या हातचा निसटला, तर निदान शेखर तरी हातीं लागेल.'

बृहद्रथ राजा म्हणाला,–'तेंही खरेंच. एकाऐवजीं दोन ओलीस असलेले चांगलेच. आमचा प्रयत्न साध्य होऊन जर तीं तिघें आमच्या हातीं लागलीं, तर त्या वृषपतीच्या आणि दृढसंधाच्या अंगाचा क्रोधानें तिळपापड होईल. अशा वेळीं जर ते आपलीं सैन्यें घेऊन लढाईस आले, तर मी तटावर वधस्तंभ उभे करून त्या दोघां पोरांच्या

मानेस फांस घालून त्यांस तेथें उभे करून ठेवीन, आणि मग मी सांगेन त्या अटी ते कबूल करतात कीं नाहींत. तें पाहून घेईन.'

देवदत्तानें विचारलें–' बरें, नुसती स्त्रियंवदाच हातीं लागली तर तुम्ही काय कराल?

बृहद्रथ म्हणाला,–' ती पोरगी मोठी सुरेख आहे असें ऐकतों. वत्सपुरकरांचें आणि आमचें जर पिढीजाद वैर नसतें, तर मी तिला कधींच मागणी घालून त्या शेखराच्या तोंडास पानें पुशिलीं असतीं. '

देवदत्त बोलला,–' ह्या आपल्या युक्त्या जर साधतील, तर आपले किती तरी हेतु तडीस जाणार आहेत. दोन मुलांचे प्राण वांचविण्यासाठीं दृढसंध सरदार हलधराला एकदम सोडून देईल, हें ठरलेलेंच आहे. आणि त्याचप्रमाणें आपल्यासारख्या मोठ्या राजानें आपल्या मुलीस मागणी घातल्यास त्यांत वृषपतीला वाईट वाटणार नाहीं.'

बृहद्रथ म्हणाला,–' पुढें काय होईल तें होवो; ठरल्याप्रमाणें करण्याच्या उद्योगास मी जातों. योग्य माणसें निवडून तीं या दोन्ही कामांसाठीं रवाना करतों.' असें बोलून राजा त्या उद्योगासाठीं निघून गेला.

प्रकरण ११ वें.

हला.

पूर्वीच्या प्रकरणांत ज्या डोंगरावर चूडामणि आणि बृहद्रथ यांची गांठ पडली असें सांगितलें आहे, त्याच डोंगराच्या जवळपास पंडित हेमचंद्राला बरोबर घेऊन चूडामणि येऊन पोहोंचला असतां सूर्यास्त झाला.

पंडित हेमचंद्र हा मोठा विद्वान् पुरुष होता, आणि त्याच्या मुखावर त्याच्या विद्वत्तेचें तेज पूर्णपणें दिसून येत असे. तोही सध्यां एका उमद्या घोड्यावर बसून चूडामणिबरोबर प्रतापपुरीं चालला होता. त्याचें वय सुमारें तीस वर्षांचें होतें. त्याची उंची मध्यम प्रतीची असून त्याचें शरीर फारसें पुष्ट नव्हतें. तरी पण कृशपणामुळें देहाची शोभा नष्ट होण्याइतका तो कृश नव्हता. त्याचा पोषाक अगदीं साधा होता. डोकीस पागोटें, अंगांत एक रूंदार अंगरखा, त्यावरून एक हिरवी शालजोडी, नेसावयास शुभ्रकांठीं धोतर आणि पायांत जोडे, इतका त्याचा पोषाख होता. त्याच्या मुखावर गांभीर्य, बुद्धिमत्ता, सुशीलता इत्यादि गुणांचें तेज चमकत असल्यामुळें तो पुरुष मोठा भव्य दिसत असे. त्याचे डोळे टपोरे आणि पाणीदार होते, हें खरें; तथापि त्याच्यामध्यें जी शांतता होती, ती केवळ विद्वत्तेनें आलेली होती, असें नाहीं. पण त्याच्या हृदयांत कांहीं तरी जन्माचें दुःख असावें, असें अनुमान करण्यास जागा होती. तो जरी सुंदर नव्हता, तरी त्याची कुरूप माणसांत गणना झाली नसती.

पंडित हेमचंद्राचें पूर्वचारित्र अगदीं थोड्या शब्दांत सांगतां येण्यासारखें आहे. त्याचा बाप प्रतिष्ठान नगरांतील एक धनाढ्य व्यापारी होता, पण त्यानें तारुण्याच्या भरांत आपली संपत्ति उधळून टाकून तो दरिद्री झाला होता. हेमचंद्राचा जन्म झाल्यावर थोडयाच दिवसांनीं त्याचा पिता मरण पावला, आणि पुढें एक दोन वर्षांनीं त्याची माताही इहलोकाचा त्याग करून आपल्या पतीपाशीं गेली. हेमचंद्र उघडा पडला. प्रतिष्ठानामध्यें एक मोठा विद्वान् परंतु निपुत्रिक गृहस्थ राहत असे; त्यानें या मुलाला आपला समजून त्याचें रक्षण केलें. हेमचंद्र मोठा बुद्धिमान् मुलगा असल्यामुळें त्यानें आपल्या पालनकर्त्याची मर्जी संपादन करून पुष्कळ शास्त्रांचें अध्ययन केलें. हा सुमारें आठदहा वर्षांचा झाला, तेव्हां त्याच्या पालनकर्त्यालाही दैवयोगानें एक पुत्र झाला. हेमचंद्र सुमारें सोळा वर्षांचा झाला, त्यावेळीं त्यानें आपल्या गुरूला आणि पालनकर्त्याला

जितकी विद्या येत होती, तितकी त्यानें त्यांजपासून संपादन करून घेतली, पण तेवढ्यानें त्याची तृप्ति झाली नाहीं. आणखी विद्या संपादन करण्यासाठीं तो एकदम काशीयात्रेस निघून गेला. वाराणशी क्षेत्रामध्यें पुष्कळ वर्षें वास्तव्य करून मनसोक्त विद्यामृत प्राशन केल्यावर तो पुनः यात्रा करण्यास निघाला. सर्व भरतखंडांत त्यानें पायीं प्रवास केला असल्यामुळें त्याला कित्येक भाषा अवगत झाल्या होत्या. देशपर्यटन करीत असतां तो बागलाणांत आला. तो ज्यावेळीं वत्सपुरीं आला; त्यावेळीं वृषपतीनें त्याची विद्वत्ता ओळखून त्याला आपल्या आश्रयास ठेविलें. त्याचा सन्मान करण्यासाठीं, आणि त्याला ओशाळेपणा वाटूं नये म्हणून वृषपतीनें त्याला आपल्या राज्यांतील न्याय करण्याची कामगिरी दिली होती. दिवसांतून नेमलेल्या वेळीं तो न्यायासनावर बसत असे, आणि बाकीचा वेळ तो विद्याव्यासंगांत घालवी. त्यानें वृषपतीची कन्या नियंवदा हिची हुषारी पाहून तिला प्रथम लिहावयास व वाचावयास शिकविलें, आणि व्यवहारोपयोगी अशा पुष्कळ गोष्टींची त्यानें तिला समजूत करून दिली. आम्ही ज्याकाळची हकीकत लिहीत आहों, त्याकालीं विद्वत्तेस मोठा मान असे; कारण ती संपादन करण्यास महत्प्रयास करावे लागत, यामुळें विद्वान् पुरुष थोडेच निपजत. विद्वान् पुरुषांस आश्रय देण्यांत राजेरजवाड्यांना मोठें भूषण वाटे, आणि त्यांच्या विद्वत्तेचें चीज होई. राजेरजवाडे विद्वानांस आश्रय देणें हें जरी भूषण मानीत, तरी शस्त्रास्त्रविद्येखेरीज इतर विद्यांचा ते स्वतां अभ्यास करीत नसत. लिहितां वाचतां येणें, हें कारकुनांचें काम, तें राजेलोकांनीं केल्यास त्यांत कमीपणा आहे, असं त्यांस वाटे, यामुळें ते बहुधा अक्षरशून्य असत.

पंडित हेमचंद्र दयालु असून त्याला गर्व अगदीं नव्हता. त्यानें सर्व भरतखंडांत प्रवास केला होता. अनेक प्रकारचीं वैभवें पाहिलीं होतीं, अनेक ठिकाणीं अनेक वेळां त्याच्या विद्वत्तेमुळें त्याचा सन्मान झाला होता, तरी त्याच्या अंतःकरणांत महत्त्वाकांक्षा उत्पन्न झालेल्या नव्हत्या. त्यानें जर मनांत आणलें असतें, तर त्याला एकाद्या राजाधिराजाच्या दरबारीं आश्रय मिळून तो पालखीपदस्थ झाला असता. पण साधेपणा त्याला फार आवडत असल्यामुळें तो वृषपतीसारख्या एका लहान संस्थानिकाकडे आनंदानें राहिला होता. तो स्वतः उदार अंतःकरणाचा पुरुष असल्यामुळें आपल्या प्रमाणेंच सर्व लोक सुस्वभावी आहेत, असें मानीत असे. एकादा माणूस लबाड आहे, अशी त्याच्या मनाची पक्की खात्री झाल्याखेरीज तो त्याच्यासंबंधानें कधींही वाईट बोलत नसे. अर्थात् एकादा माणूस परकी आहे, किंवा त्याची मुद्रा आपणांस आवडत नाहीं, म्हणून त्याचा तिरस्कार करावा, असें कधींही त्याच्या मनांत देखील येत नसे. यामुळें तो सर्वांस आवडत असे. दुसऱ्याला साह्य करावयास तो नेहमीं अगदीं तत्पर असे. राव्यापासून रंकापर्यंत सर्वांशीं त्याचें वर्तन समबुद्धीचें असल्यामुळें त्याला कोणी शत्रु नव्हते. अशाप्रकारें तो जरी अगदीं साधा पुरुष होता, तरी तो मोठा शूर होता. त्याला जितक्या कुशलतेनें पुस्तकें उघडतां येत, किंवा लेखणी चालवितां येई, तितक्याच कुशलतेनें त्याला तरवार चालवितां येत असे. त्यानें पूर्वी जेव्हां प्रवास केला, तेव्हां प्रवासांत त्याला तरवार धरण्याचे प्रसंग आले होते, आणि ते त्यानें सर्व मोठ्या शौर्यानें पार पाडलेले होते. तथापि आपल्या शौर्याच्या गोष्टी त्यानें कधीं आपल्या मुखानें कोणास सुतत्या सांगितल्या देखील नव्हत्या. अशा प्रकारच्या पुरुषाला प्रतापपुरकर व वत्सपुरकर या जवळजवळ असलेल्या दोघां संस्थानिकांनीं मोठा मान द्यावा, यांत विशेष आश्चर्य तें कसलें ?

सध्यां चूडामणीबरोबर जो गृहस्थ चालला होता तो अशाप्रकारचा होता. ते सध्यां निम्मेहून अधिक मार्ग चालून आले होते, तथापि त्यांना अजून दोन कोसांहून अधिक मजल कंठावयाची होती, आणि सूर्यास्त तर होऊन गेला होता. चूडामणि हा प्रांत सोडून आपल्या सान्या जन्मांत दुसरीकडे कोठेंच गेलेला नव्हता, त्यामुळें त्याला इकडील प्रदेशाची फार उत्तम माहिती होती. सध्यां ते ज्या मार्गानें प्रवास करीत होते, तो मार्ग जरी फार चिकट होता, तरी चूडामणीच्या त्या मार्गानें आजपर्यंत शेंकडों खेपा झाल्या असल्यामुळें त्याला त्या वाटेंतील खांचखळगासुद्धां माहित होता, म्हणून तो निर्भय अंतःकरणानें आपला घोडा चालवीत होता.

दोनप्रहरीं वृषपुरास जातांना चूडामणीला बृहद्रथ ज्या ठिकाणीं भेटला होता, त्या ठिकाणचे जवळपास येऊन पोंचल्यावर चूडामणि पंडितास म्हणाला,–' पंडितजी, सूर्यास्त होऊन आतां काळोख पडूं लागला आहे, व तशांतच आकाशांत अभ्रें जमत आहेत, यामुळें आतां लवकरच पायांखालीं दिसत नाहींसें होईल. आपणास मुक्कामावर पोंचावयास अजून दोन अडीच घटका तरी पाहिजेत. हा रस्ता तुमच्या माहितीचा नाहीं, यासाठीं तुम्हीं अगदीं माझ्या बाजूनें आपला घोडा चालवा, आणि रस्ता जेथें अरुंद असेल, तेथें तुम्हीं माझ्या मागें, पण मध्यें अंतर न ठेवतां आपला घोडा घ्या, म्हणजे बरें पडेल.'

हेमचंद्र म्हणाला,–'चूडामणि, मी या रस्त्याची इतकी पर्वा करीत नाहीं. मीं नुसत्या पायांनीं याहून भयानक अशा विंध्यपर्वताच्या दऱ्याखोऱ्यांतून आणि त्याहूनही बिकट अशा बर्फमय हिमालयांतून नुसत्या पायांनीं प्रवास केलेला आहे. शिवाय हा रस्ता माझ्या अगदींच माहितीचा नाहीं असें नाहीं. तुझ्या वडिलांनीं मला पूर्वी एकदां आपल्या पाहुणचाराचा लाभ दिला होता.'

चूडामणि म्हणाला,–'आपण फारतर एकदोनदांच या रस्त्यानें गेलां असाल; एक दोन खेपांनीं कांहीं असल्या बिकट मार्गांतील खांचाखोंचांची माहिती व्हावयाची नाहीं. आणखी मला वाटतें, आपल्यासारख्या नेहमीं पुस्तकें चाळीत बसणाऱ्या माणसांना घोड्यावर बसण्याचें किंवा तरवार चालविण्याचें कौशल्य बहुधा साध्य असणें शक्य नाहीं.'

हेमचंद्र हंसून म्हणाला,–'या दोन्ही कलांमध्यें मी तुमच्यासारख्या लढाईत कसलेल्या वीराइतका प्रवीण नसेन, हें मी मांजलपणें कबूल करितों. पण कायरे चूडामणि, तुझे जर कोणी डोळे बांधून तुला येथें सोडून दिलें, तर तूं अगदीं न डगमगतां सरळ प्रतापपुरीं जाशील काय ?'

चूडामणि म्हणाला,–'त्यांत काय कठीण आहे ? मला या प्रदेशाची इतकी पुरी माहिती आहे कीं, जेथें माझे पाय लागले नसतील, अशी जागा या प्रदेशांत चार अंगळेंसुद्धां सांपडणार नाहीं ! मी खरेंच सांगतों, एकाद्या रानडुकराचा किंवा चित्त्याचा पाठलाग करीत रानावनांतून हिंडतांना मला जो आनंद होतो, तो आनंद तुम्हांला कांहीं मोठमोठ्या पोथ्या वांचतांना होत नसेल !'

पंडित हेमचंद्र म्हणाला,–' तुझें म्हणणें तुझ्यापुरतें अगदीं खरें आहे. ज्या माणसाला ज्या गोष्टीची आवड असते, त्या माणसाला त्या गोष्टीपासून आनंद होतो. या जगांत असें रुचिवैचित्र्य आहे; ही फार चांगली गोष्ट आहे. असें रुचिवैचित्र्य जर नसतें, आणि सर्वांची आवड जर एक प्रकारचीच असती, तर जगामध्यें जिकडे तिकडे औदासीन्यच पसरलें असतें. 'भिन्नरुचिर्हि लोकः' असा प्रकार असल्यामुळेंच जगतामध्यें अनेक प्रकारचे उद्योगधंदे सुरू झाले असून माणसांस अनेक प्रकारचें ज्ञान प्राप्त झालें आहे.'

सध्यां ते दोघेजण ज्या ठिकाणीं आले होते, त्या ठिकाणीं रस्त्याच्या दोन्ही बाजूंस मोठमोठ्या दरडी असून त्यांच्यामधून रस्ता

बोळासारखा पुढें जात होता. तेथें येतांच लगाम खेंचून चूडामणीनें आपला घोडा एकदम उभा केला, आणि तो हेमचंद्रास म्हणाला,–' पंडितजी, या बोळाच्या शेवटीं आतां कोणी माणूस या बाजूनें त्या बाजूस गेलें, असें माझ्या दृष्टीस पडलें. तुम्हाला कोणी पुढें दिसलें काय ? '

हेमचंद्र म्हणाला,–' नाहीं, मला कोणी माणूस दिसलें नाहीं. माझें लक्ष्य समोर नसून मी बाजूची शोभा पाहत होतों. '

चूडामणि म्हणाला,–' तुमची तरवार तुमच्यापाशीं आहे, हें एका अर्थी बरें आहे. तुम्हाला तरवारीचाही चांगला उपयोग करतां येत असावा असें दिसतें. '

हेमचंद्रानें शांतपणानें विचारलें,–' आतां इतक्यांत तरवारीचा उपयोग करावा लागेल, असें म्हणतोस कीं काय ? '

चूडामणि म्हणाला,–' मी खात्रीनें कांहींच सांगत नाहीं. मी जो माणूस समोर पाहिला तो खरोखरच माणूस असेल, तर तो अशा अवेळीं येथें कशाला आला असावा, ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे. पण तें जर भूत असेल किंवा मला उगीच भास झाला असेल, तर मग कांहीं तरवारींस हात घालण्याची जरूर पडणार नाहीं. तथापि भिण्याचें कारण नाहीं. अलीकडे कित्येक वर्षांत या बाजूला चोरांचा उपद्रव झालेला ऐकिवांत नाहीं. तथापि आपण सावध असावें हें उत्तम. न जाणो, तसा प्रसंग नाहीं येणार, असें तरी आपण कां समजावें ? तुम्ही असे माझ्या बाजूला या, आणि तुमच्या तरवारीचा बंद सोडलेला असूं द्या. जर कोणी आपणांवर हल्ला करणार असेल, तर आपण त्याला चांगलाच हात दाखवूं.'

चूडामणीच्या सूचनेप्रमाणें हेमचंद्रानें आपली तरवार म्यानांतून काढिली, आणि त्यानें आपला घोडा चूडामणीच्या घोडयास भिडविला. चूडामणीनेंही आपली तरवार हातीं घेतली होती. अशा रीतीनें ते दोघे त्या बोळाच्या टोंकापर्यंत येऊन पोंचले. चूडामणीचे कान मोठे तिखट होते, त्यामुळें आपल्यापासून थोडया अंतरावर कांहीं खसबसल्याचा त्याला चांगलाच भास झाला, व दुसऱ्या क्षणीं तरवार दगडावर आपटली असतां जसा शब्द निघतो, तसा शब्द चूडामणीच्या कानीं पडला. [illegible] इतर कोणी मंद कानाचा [illegible] असता, तर त्याला [illegible] नसता; किंवा ऐकूं आ[illegible] शब्द कसला आहे, हें त्या[illegible]

तो पंडितास हळूच म्हणाला,–' माझा तर्क बरोबर आहे. आतां तुम्हीं जरा [illegible] घेऊन देान घोडयांमध्यें फक्त आपली हत्यारें सफाईनें फिरतील, इतकें अंतर ठेवा. फारदूर घोडा नेऊं नका. आतां आपणासस सावध राहिलें पाहिजे. हा समोर झुकलेला कडा दिसत आहे, तेथें आपण गेलों कीं, आपल्यावर हल्ला येईल. हा माझा तर्क अगदीं चुकणार नाहीं; म्हणून सावध असा. '

हे शब्द चूडामणीनें अगदीं हळू उच्चारिले असल्यामुळें ते त्यानें दाखविलेल्या जागेकडे ऐकूं जाण्याचा संभव नव्हता. हे शब्द उच्चारतांना त्याचा शब्द घोगरा झाला नव्हता, कीं त्यांत कंप उत्पन्न झाला नव्हता; यावरून तो भावी संकटाची यत्किंचितूही दरकार करीत नव्हता, ही गोष्ट हेमचंद्राच्या पूर्णपणें लक्ष्यांत आली. इतकेंच नव्हे, तर आपली तरवार चालविण्याचा आपणांस लवकरच प्रसंग येणार म्हणून त्याला मोठा उत्साह वाटत होता. चूडामणीचा इतर बाबतींत कसाही स्वभाव असो,तो निधडया छातीचा वीर होता, यांत मात्र शंका नव्हती. हेमचंद्रानें जरी डाव्या हातीं घोडयाचा लगाम धरिला होता, तरी त्यानें आपला घोडा आपल्या काबूंत राखिला होता, आणि उजव्या हातामध्यें त्यानें आपली तरवार बळकट धरिली होती. तो

मोठ्या बारीक नजरेनें समोर पहात सावधपणानें आपला घोडा पुढें नेत होता.

अशा सावधपणानें ते त्या खिंडीच्या शेवटापाशीं आले तोंच त्यांच्यावर एकदम सहा सशस्त्र जवानांनीं हल्ला केला. या सहांपैकीं तीन रस्त्याच्या एका बाजूनें आणि तीन दुसऱ्या बाजूनें असे त्या दोघांवर तुटून पडले होते. या हल्लेकऱ्यांच्या एकंदर झोकाला[illegible] प्राण घेण्याची त्यांची इच्छा [illegible] उघड दिसत होतें. [illegible] मार न करतां प्रथम [illegible] लगामच धरिले होते.

[illegible] यांपैकीं एकजण त्यांच्यावर सुरुवात [illegible] म्हणाला,–' मुकाट्यानें आमच्या क[illegible] बाधा न्हा, नाहींतर प्राणास मुकाल. ' हें तो ओरडावून सांगत आहे, तोंच बाकीच्यांनीं बाकीच्या दोघांस घोडयांवरून खालीं ओढण्याचा प्रयत्न सुरू केला.

तों हेमचंद्र आणि चूडामणि हे कांहीं गाफील नव्हते, त्यांनीं आपल्या तरवारींच्या एकेका वाराबरोबर दोन इसमांस रक्तबंबाळ करून जमिनीवर लोळविलें. हल्ला करणारे जमिनीवर आणि ते दोघे घोडयांवर असल्यामुळें त्यांना आपलीं हत्यारें चालविण्यास उत्तम संधि मिळालेली होती. हल्ला करणारांना आपल्यावरील वार चुकवून त्या दोघांना केद करावयाचें होतें; पण तसें करणें अशक्य आहे, अशी त्यांची लवकरच खात्री झाली. आणि त्या दोघांना घोडयावरून खालीं ओढण्याचा यत्न सोडून देऊन आत्मरक्षणाकडे विशेष लक्ष्य पुरविणें हल्लेवाल्यांस भाग पडलें.

इतक्यांत चूडामणि ओरडला,–'पंडितजी, सावधपणें हत्यार चालवा, हा पहा माझ्या तलवारीनें आणखी एक जमिनदोस्त केला. '

हेमचंद्रानें तसें बोलून मात्र दाखविलें नव्हतें. पण त्याजवर हल्ला करीत असलेल्या दोघांपैकीं आणखी एकजण जमिनीवर लोळूं लागलाच होता. आपल्यापैकीं चौघांची अशी अवस्था झालेली पाहतांच उरलेले दोघेजण पलायनाचा मार्ग स्वीकारून आपला प्राण वांचविते झाले. हा झालेला प्रकार वर्णन करावयास आम्हास जितकीं पळें लागलीं आहेत, तितकीं कांहीं तो घडून येण्यास लागलीं नसतील; फार फार तर पांच चार पळांतच हा सर्व प्रकार संपला. हल्ला करणाऱ्या सहांपैकीं चौघे धूळ खात पडले होते, आणि उरलेले दोघे पळून गेले होते.

आपल्या घोडयावरून उडी टाकीत चूडामणीनें विचारलें,–' पंडितजी, आपणास जखम तर झाली नाहींना ? '

हेमचंद्र म्हणाला,–' जखम तर राहोच, पण नुस्ता ओरखडा सुद्धां उठलेला नाहीं. ' नंतर तोही आपल्या घोडयावरून उतरून म्हणाला,–' देवाच्या दयेनें आपले प्राण तर वांचलेच आहेत; पण हे जे चार असामी येथें पडले आहेत, त्यांतील कोणी जिवंत असल्यास त्यांच्या जखमा आपण तपासल्या पाहिजेत, व कोणाचे प्राण वांचवितां आल्यास त्याबद्दल प्रयत्न केले पाहिजेत. भूतदयेसाठीं आमचें हेंच कर्तव्य आहे.'

चूडामणि गुरगुरत म्हणाला,–' कसली भूतदया आणि कसलें काय ! या हरामखोरांचीं खांडोळीं करा, आणि कडयाखालीं फेंकून द्या, कीं कटकटच संपली ! '

हेमचंद्र म्हणाला,–'छेः छेः असें भाषण करणें योग्य नाहीं. यांपैकीं जर कोणी जिवंत असेल, तर त्याची पुढची कांहीं तरी व्यवस्था केली पाहिजे. '

इतक्यांत त्या मारेकऱ्यांपैकीं ओळख पटल्यामुळें चूडामणि ओरडून म्हणाला,–'अरे ! हा तर बृहद्रथाचा सेवक ! अरे नीच बृहद्रथा ! तूं आतां असें कपट आरंभिलें आहेस काय ? पण याद राख, या तुझ्या कृत्याचा सूड घेतल्याखेरीज मी कधींही स्वस्थ बसणार नाहीं. हा एक आणि हा दुसरा ! हे दोघेही माझ्या तरवारीला चक्री पडले आहेत. माझ्या

ह्या तरवारीचा प्रभाव असाच कठीण अ[illegible] [illegible]ातां तूं आपलें कसं रक्षण वरें तुमच्या शत्रूंची काय अवस्था आहे ?

किंचित् खेदयुक्त वाणीनें हेमचंद्र म्हणाला,–'माझ्या शत्रूंचीही तीच अवस्था झालेली आहे ! अरेरे ! आज माझ्या हातून दोन माणसें मृत्युमुखीं पडलीं, ही फार वाईट गोष्ट झाली.'

हेमचंद्राला आपल्या शत्रूंचा प्राण गेला म्हणून इतकें वाईट वाटलें, ही गोष्ट चूडामणीला मुळींच आवडली नाहीं. तो बेपर्वाईनें म्हणाला,–'वाः छान झालें ! आज आमच्या गरुडपक्ष्यांला यथेच्छ मेजवानी मिळणार ! हे पळपुटे जेव्हां परत जाऊन हें वर्तमान बृहद्रथाला सांगतील, तेव्हां त्याच्या अंगाचा तिळपापड होईल.'

हेमचंद्रानें विचारलें,–'बरें, पण हें कृत्य करण्यांत बृहद्रथाचा हेतु काय बरें असावा ?'

चूडामणि म्हणाला,–'मी एकटा या वाटेनें परत जाईन, अशी त्याच्या मनाची कल्पना असावी, म्हणून त्यानें हें घानकी कृत्य करविलें असावें.'

हेमचंद्र म्हणाला,–'या हल्लेकऱ्यांच्या मनांत आमचा प्राण घेण्याचा हेतु नसावा, असा माझा तर्क आहे. जर आमचा प्राण घेण्याचा त्यांचा हेतु असता, तर एकेकट्याचा प्राण त्या तिघांतिघांनीं सहज घेतला असता !'

चूडामणि म्हणाला,–'त्या हरामखोरांच्या मनांत आमचा प्राण घ्यावयाचा असो, कीं आम्हांस केद करावयाचें असो, त्या गोष्टीचा फारसा विचार करीत बसण्याचें कारण नाहीं. बृहद्रथराजानें हें नीचपणाचें काम केलें आहे, यांत शंका नाहीं ! या कर्माचें त्याला योग्य प्रायश्चित्त मिळेल ! त्यानें माझा प्राण घेण्याचा प्रयत्न केला आहे, याचा मोबदला मी असा तसा घेणार नाहीं ! त्याचा सर्व मुलूख जाळून पोळून बेचिराख करून टाकीन, तरच मी नांवाचा चूडामणि ! त्याच्या वाड्यास वेढा घालून त्याला आंत उपाशीं कोंडून ठेवीन !

[illegible]चारलें,–'बृहद्रथाच्या [illegible]च प्रजेला पीडा होणार हा फा[illegible]'

चूडामणि [illegible]ला,–'पंडितजी तुम्ही आतां [illegible]विलें, तें ! माझ्या दृष्टीस प[illegible]णि ते. असे उद्गार का[illegible]मुळें तुमच्या उद्गारांवर [illegible]ड ! जर गणना केली अ[illegible]त्यांना बोलत बसतां [illegible]त्रुरीतां चालली, य[illegible]वगानें चाल विले पाहि[illegible]

[illegible]या घोडयांवर स्वार झा[illegible]प्रतापपुराचा मार्ग धं[illegible]स जात आहेत, तों- प[illegible]एक गोष्ट वाचकांस सांगावयाची आहे.

प्रकरण १२ वें.

डोंगरांतील मार्ग

मागील प्रकरणांत सांगितलेली हकीकत घडून आली, त्याच सुमारास प्रतापपुरच्या दरीच्या दक्षिणेस असणाऱ्या पर्वताच्या पायथ्याशीं बृहद्रथ राजाचे चार स्वार घोडयांवरून खालीं उतरले. हे स्वार प्रतापपुरच्या दरींत उतरले असतील अशी कोणाची कल्पना होण्याचा संभव आहे, म्हणून येथें हें स्पष्ट सांगितलें पाहिजे कीं, दरीच्या एका बाजूस भिंतीसारखा जो मोठा थोरला पर्वत आडवा होता, त्याच्या बाहेरच्या बाजूला हे स्वार उतरले असून त्यांना दरीमध्यें प्रवेश करावयाचा होता.

या स्वारांतील टोळीचा मुख्य पिंगलाक्ष या नांवाचा बृहद्रथ राजाचा विश्वासु, साहसी आणि हुषार पुरुष होता. हा पिंगलाक्ष मोठा

धाडसी शिकारी होता. त्या[illegible] सर्व डोंगरामधील खांचा[illegible] क्या माहीत होत्या, [illegible] कोणालाही माहीत न[illegible] कित्येक वर्षें प्रवास[illegible] ल्यामुळें त्या दरी[illegible] तीयाच्या डोळ्यां[illegible] दुमऱ्कारीचें [illegible] पडले नसते. त्यामुळें त्याला झोंकासच्या [illegible] इ[illegible] होती.

[illegible] आरंभीं [illegible] दरीचें जें वर्णन दिलें आहे, [illegible] प्रवेश करण्याचे सुगम मार्ग [illegible] त्यांपैकीं एक त्रिशूल पर्व[illegible] नांवाच्या घाटानें आ[illegible] जेथून सोनानदी वाहे[illegible] होता, हें वाचकांच्या लक्षांत [illegible] दोन मार्गांमध्यें नेहमीं पहारा असल्यामुळें तो चुकवून दरींत प्रवेश करावयाचा असल्यास प्रवेश करणाराला आपल्या देहाची फारशी पर्वा न करतां एकाद्या कडेकपाटांतूनच प्रवेश करणें जरूर होतें.

पिंगलाक्ष आणि त्याचे साथीदार यांना जें काम करावयाचें होतें, त्या कामाला दरींत जावयाच्या दोन्ही मार्गांतील एकही मार्ग उपयोगी पडण्यासारखा नव्हता. ही सर्व दरी म्हणजे आपला किल्ला आहे, अशी दरींतील रहिवाशांची समजूत असल्यामुळें तिच्यामध्यें प्रवेश करण्याच्या दोन्ही रस्त्यांवर मात्र पहारेकरी ठेविलेले होते. या पहारेकऱ्यांच्या प्रश्नांचे योग्य जबाब दिल्याखेरीज कोणाचाही दरींत प्रवेश होत नसे. ही जर दिवसाची वेळ असती, तर त्या स्वारांस शिकारीचें निमित्त सांगून दरींत प्रवेश करतां आला असता; पण सध्यांची वेळ फुटक्या तीनसांजांची असल्यामुळें नें कारण सांगतां येण्यासारखें नव्हतें. यासाठीं त्यांना सध्यां[illegible]डवाटेनें आणि चोरून दरींत प्रवेश करणें भाग झालें होतें.

त्या दरीच्या दोन बाजूंस ज्या दोन डोंगरांच्या रांगा होत्या, त्या रांगांतून कित्येक ओढे नेहमीं वाहत असत आणि त्यामुळें त्या डोंगरांस कित्येक मोठमोठीं भगदाडें पडलेलीं होतीं, हें आम्हीं पूर्वी सांगितलेंच आहे. सृष्टि निर्माण झाल्यापासून आजपर्यंत जगामध्यें मानवी प्राण्यांच्या हजारों पिढ्या उलटल्या असतील, आणि त्यांचीं कित्येक स्थित्यंतरें झालीं असतील; पण त्या डोंगरांतील प्रवाह एकसारखे वाहतच होते. त्यांच्या स्थितींत फारसा बदल झालेला नव्हता. या ओढ्यांतील उदकाच्या सतत प्रवाहामुळें त्या डोंगराला मोठमोठ्या फर्टी पडल्या असल्यामुळें कित्येक ठिकाणीं माणसांचा प्रवेश होण्यासारख्या जागा बनलेल्या होत्या. तथापि मेंढरें किंवा बकरीं जितक्या निर्भयपणानें कड्यांवरून फिरत असतात, तितका निर्भयपणा आणि तितकें चापल्य मानवी प्राण्याच्या अंगीं नसल्यामुळें अशा जागांमध्यें विनाकारण प्रवेश करण्यास ते धजत नसत, आणि यामुळेंच अशा प्रकारच्या जागा दरींतील लोकांस निर्भय वाटत असत. ज्याला आपल्या जिवाची आशा आहे, असा माणूस या जागेंतून दरींत येण्याचा प्रयत्न करणार नाहीं, अशी दरींतील लोकांची खात्री असल्यामुळें ते त्या जागांवर विशेषसा बंदोबस्त ठेवीत नसत. फक्त लढाईच्या प्रसंगीं जिवावर उदार झालेले लोक असल्या बिकट मार्गांचा आश्रय करण्यास कचरत नाहींत; असा साधारण समज असल्यामुळें शांततेच्या दिवसांत या अवघड प्रवेशद्वारांवर पाहरा नसे, यांत आश्चर्य नाहीं.

दोन राजरस्ते बंद असतांना त्या दरींत प्रवेश करण्याची मनीषा असल्यास त्याला कोणत्या तऱ्हेच्या भीतिप्रद मार्गांचें अवलंबन करणें भाग होतें, याची साधारण कल्पना आतां वाचकांच्या मनांत आली

असेल. सध्यांच्या प्रसंगीं चार जवान जिवावर उदार होऊन असल्या अवघड जागांपैकीं एकादींतून दरींत उतरण्याचा दृढ निश्चय करून त्या पर्वतापाशीं आलेले होते. हे चारी जवान अगदीं फटिंग होते. या प्रयत्नांत जर त्यांचे देह खर्ची पडले असते, तर त्यांच्या मागें रडावयास बायकापोरें मुळींच नव्हतीं; आणि जरी असतीं, तरी या प्रयत्नांत यश आल्यास किंवा मरण आल्यास बृहद्रथ राजानें ज्या रकमा त्यांना देऊं केल्या होत्या, त्या रकम एखाद्याच्या तोंडास पाणी सुटावयास लावून त्याला जिवावर उदार होण्यास प्रवृत्त करण्याइतक्या मोठ्या होत्या. साहसी आणि अनुभवी अशा पिंगलाक्षाबरोबर दुसरे तिघे जवान जिवावर उदार होऊन दरींत उतरावयास सिद्ध झाले होते, आणि सर्व अवघड जागांमध्यें जी कमी अवघड आहे, अशी पिंगलाक्षाच्या मनाची खात्री होती, तिकडे ते जात होते. तरीसुद्धां पिंगलाक्षानें सोपी म्हणून पसंत केलेली वाट किती भयंकर होती, हें वाचकांस आपोआप कळून येईल.

पिंगलाक्ष आणि त्याचे साथीदार यांनीं आपापले घोडे डोंगराच्या उतरणीवर असलेल्या पुष्कळ झुडपांपैकीं एकाला बांधून ठेविले; आणि त्यांनीं आपल्या बरोबर भल्या लट्ट दोऱ्यांचीं जीं दोन गुंडाळीं आणिलीं होतीं, तीं बरोबर घेऊन, आपल्या उद्दिष्ट स्थलाकडे जावयास त्यांनीं प्रारंभ केला. त्या बाजूचा उतार फारसा बिकट नसल्यामुळें ते पर्वताच्या मस्तकावर थोड्याच वेळांत आणि आणि फारसे श्रम न पडतां येऊन दाखल झाले. इच्छित ठिकाणीं येऊन पोंचल्यावर त्यांनीं बरोबरच्या दोरखंडांचीं टोकें एका मोठ्या झाडास बांधिलीं. पिंगलाक्ष सर्वांच्या पुढें झाला. त्यानें दोरखंडाचें एक वेटोळें आपल्या डाव्या हातामध्यें अशा रीतीनें अडकविलें होतें कीं, तो जसाजसा पुढेंपुढें जाई, तसतसे त्या दोरखंडाचे वेढे आपोआप उलगडत जावे. त्याच्यामागें जो इसम होता, त्यानें दुसरें दोरखंड तशाच रीतीनें आपल्या उजव्या हातांत अडकविलें होतें. ते दोघे जसजसे पुढें जात चालले, तसतशा त्या दोन्ही दोऱ्या दोन बाजूनें सुमारें एकेक हाताच्या सारख्या अंतरानें दोन बाजूंस उघळूं लागल्या. शिल्लक राहिलेले दोन इसम त्या दोघांच्या मागून चालले होते. त्यांच्या दोन्ही बाजूंस दोऱ्या असल्यामुळें त्या अवघड जागेमधून जात असतां जर केव्हां त्यांचा तोल गेला असता, तर त्यांना त्या दोऱ्या धरून आपला तोल सांवरितां आला असता.

सुमारें पन्नास हात पुढें जाईपर्यंत त्यांचा मार्ग फारसा कठीण नव्हता, पण तेवढें अंतर संपल्यावर त्यांचा खरा बिकट प्रवास सुरू झाला. या ठिकाणापासून एक ओढा सुरू झाला असून त्याच्या एका बाजूला सुमारें हातभर रुंदीची भिंतीसारखी दरड असून तिच्या पलीकडच्या बाजूस खोल दरी होती. या भिंतीवरून पुढें गेल्याखेरीज त्या डोंगराच्या दुसऱ्या बाजूला जातां येण्यासारखें नसल्यामुळें, सध्यां त्यांना त्या भिंतीवरून पुढें जावयाचें होतें.

ज्याप्रमाणें घोड्यावर बसतांना दोन्हीकडे दोन पाय टाकावे लागतात, त्याप्रमाणें सध्यां ते ज्या भिंतीवर बसले होते. त्या भिंतीच्या एका बाजूस सुमारें तीनचारशें हात खोल दरी असून दुसऱ्या बाजूस सरासरी पन्नास हात खोल असा खळगा होता. या भिंतीच्या दोन्ही बाजूंस पाण्याचे मोठमोठे डोह भरलेले होते. अशी स्थिति असल्यामुळें त्या भिंतीवरून तोल सांवरून सरकत सरकत पुढें जाणें हें फार धोक्याचें काम होतें. तेथून जात असतां जर त्यांचा एकमेकांस धक्का लागता, किंवा मोठा जोरदार वारा आला असता, तरी सुद्धां त्यांचा तोल जाण्याचा संभव होता; परंतु अशा जागेवरूनही ते भर तिनसांजांच्या काळोखाच्या वेळीं चालले होते, यावरून

त्यांची छाती किती निधडी असली पाहिजे, याचा विचार वाचकांनींच करावा. ते जसजसे पुढें जात होते, तसतशा दोन्ही बाजूंच्या दोऱ्या उलगडत चालल्या होत्या. ते सध्यां आपल्या बरोबर ज्या दोऱ्या नेत होते, त्या दोऱ्या त्यांच्या स्वतांच्या उपयोगाकरितां नसून त्यांना परत येतांना त्यांचा उपयोग व्हावयाचा होता. ते सध्यां कोणत्या उद्देशानें दरींत उतरत होते, हें वाचकांच्या लक्ष्यांत आलेंच असेल. त्यांचा उद्देश सफल होऊन प्रियवंदा जर त्यांच्या हातीं लागली तर तिला परत नेतांना या दोऱ्यांचा उपयोग व्हावा, म्हणून त्यांनीं त्या दोऱ्या बरोबर घेतल्या होत्या.

ते सध्यां ज्या बाजूनें उतरत होते, ती बाजू पूर्वेकडची होती आणि त्या बाजूच्या सभोर पण दरीच्या पलीकडच्या बाजूस जो डोंगर होता, तो डोंगर–म्हणजे पश्चिमदिशेचा डोंगर–उंच असल्यामुळें सध्यां ते उतरत होते तेथें अतिशय दाट काळोख पडला होता. यामुळें त्यांचा प्रवास फारच धोक्याचा झाला होता. सर्वांपुढें पिंगलाक्ष असल्यामुळें त्याला फारच सावधपणें पुढील भाग हातांनीं चांचपून पहात सरकत जावें लागत होतें. अशा रीतीनें चांचपून पाहत असतां पिंगलाक्षाच्या हातानें एकादा सैल झालेला धोंडा गडगडून खालीं पडला कीं पिंगलाक्षच खालीं पडला, आतां त्याची किंकाळी आपल्याला ऐकूं येईल, असें बाकीच्या तिघांस वाटावें आणि त्यांच्या उरांत धडकी भरावी, असा प्रकार एक दोनदां झाला, पण अफाट समुद्रांतून रात्रीच्या वेळीं कुशल नावाडी ज्याप्रमाणें मोठ्या सावधपणानें आपलें गलबत चालवीत असतो, त्याप्रमाणें पिंगलाक्ष त्या काळोखांतून पुढें चालला होता. यावेळीं त्या चौघांपैकीं एकाच्याही तोंडांतून कोणत्याच प्रकारचा शब्द बाहेर निघत नव्हता. फक्त या प्रसंगांतून पार पाडण्यासाठीं ते मनांत ईश्वराची प्रार्थना करीत होते.

ते त्या भिंतीच्या मधोमध येऊन पोंचले; त्यांच्या दोन बाजूंस दोन दोऱ्या उघळत चालल्याच होत्या. इतक्यांत एकाएकीं गरुडपक्ष्यांच्या पंखांचा सणसणाट त्यांना ऐकूं आला. जणूं काय आपल्या दरीवर हें अकल्पित संकट येत आहे, असें त्यांना भविष्यज्ञान होऊनच ते या वेळीं धडपड करीत असावे ! ते सुंदरपुरकर जवान जरी इतके साहसी होते, तरी आपल्या बाजूनें ते अजस्र गरुडपक्षी फिरत असलेले पाहून, त्यांनीं जर यावेळीं आपल्यावर झडप घातली, तर आपला प्राणांत होण्यास एका क्षणाचाही विलंब लागणार नाहीं, असें त्यांच्या मनांत येऊन त्यांच्या अंगावर शहारे उठल्याखेरीज राहिले नाहींत. पण गरुडपक्ष्यांनीं त्यांजवर झडप घातली नाहीं, ते आपल्या वाटेनें दूर निघून गेले.

इतक्यांत आणखी एक संकट त्यांजवर ओढवलें. ते त्या भिंतीच्या मध्यापासून आणखी पांच चार हात पुढें गेले असतील नसतील तोंच, पिंगलाक्षाला कोणाच्या तरी पावलांचा आवाज ऐकूं आला. पण त्या कसलेल्या शिकाऱ्यानें तो एका रानवकऱ्याच्या पावलांचा आवाज आहे, असें तत्काल ओळखलें, आणि आपण ज्या दिशेकडे चाललों आहों, त्याच दिशेनें तो आपणाकडे येत आहे, हेंही त्याच्या ध्यानीं आलें. पिंगलाक्ष सर्वांच्या पुढें असल्यामुळें त्याला तोल संभाळण्यास दोरीचा आधार नव्हता. अशा स्थितींत त्या चोकड्यानें जर आपल्यावर हल्ला केला, तर आपली निभावणूक नाहीं, असें त्याच्या मनांत आलें. रानचोकड किती धीट असतात, हें त्याला चांगलें माहित होतें. म्हणून मोठ्या सावधपणानें डोळे ताणून पिंगलाक्ष समोर पाहूं लागला. त्या चोकड्यानें आपल्या मार्गांत विघ्न आलेलें पाहतांच पुढें काय करावें याचा क्षणभर विचार केल्यासारखें दिसलें. चोकड मागें परतण्यास राजी नव्हता. त्यानें पवित्रा करून पिंगलाक्षावर हल्ला करण्याचा बेत केला, आतां त्याचीं

अणीदार शिंगें आपल्या पोटांत घुसणार हें मनांत येऊन पिंगलाक्षाची भयानें गाळण उडाली, आणि तो मोठ्यानें ओरडला देखील. पण तो उपजत धीट असल्यामुळें त्यानें आपलें सर्व अवसान एकत्र केलें, आणि आपल्यावर चाल करून आलेल्या बोकडाचीं दोन्हीं शिंगें दोन हातांत धरून त्यानें त्याची मान जोरानें पिळवटली. पिंगलाक्षाची ताकद मोठी आणि सध्यांचा प्रसंग आणीबाणीचा असल्यामुळें त्याला आपली सर्व शक्ति एकदम दाखविणें भाग पडलें होतें. पिंगलाक्षानें जोरानें मान पिळवटून बोकडास खालीं पाडलें, आणि तो पुनः वर उठण्यापूर्वीच त्यानें त्याला खालच्या खोल दरींत लोटून दिलें ! दरींत पडत असतां अंतकाळच्या वेदना जिच्यामध्यें स्पष्ट उमगत आहेत, अशी एक किंकाळी त्या बोकडाच्या तोंडांतून बाहेर पडली, आणि दुसऱ्या क्षणीं खालच्या पाण्याचा आवाज ऐकूं आला. ती अस्पष्ट, विक्राळ व जणुं काय मानवी शब्दांचें अनुकरण करणारी किंकाळी, आणि तिच्या पाठोपाठ झालेला पाण्याचा आवाज, हीं कानीं पडतांच पिंगलाक्षच खालीं कोसळला असें मागील तिघांच्या मनांत येऊन त्यांची पांचावर धारण बसली; व आपल्या मनाची खात्री करून घेण्यासाठीं त्यांनीं त्यास हाक मारली. पिंगलाक्षानें उच्चारलेला एक शब्दच त्यांच्या अंतःकरणाचें समाधान करण्यास पुरे होता. या नैसर्गिक भिंताडावरून प्रवास करीत असतां फक्त एवढेच कायते शब्द त्यांच्या मुखांतून बाहेर पडले होते.

हा प्रसंग निभावल्यावर ते पुनः सरकत सरकत पुढें चालले, व आणखी पाव घटकेनें ते एकदांचे त्या नैसर्गिक भिंतीवरून दरीच्या आंतल्या बाजूस येऊन दाखल झाले. ही भिंत फार तर पन्नास साठ हात लांब होती. सरळ मार्गानें एवढी जागा मागें टाकावयाची असती, तर ती केव्हांच मागें पडली असती आणि ती गोष्ट कोणाच्या लक्ष्यांत देखील आली नसती. पण तेवढ्या साठ हात भिंतीवरून पलीकडे आल्यावर त्यांना आपण एकाद्या मोठ्या समुद्रांतून प्रवास करून त्यांतून निभावून पार पडलों, असा आनंद होत होता. ते चौघेही दरींत येऊन दाखल झाल्यावर त्यांनीं तेथें असलेल्या एका झाडास त्या दोऱ्या बांधून टाकल्या, आणि दरींत उतरावयास प्रारंभ केला. आतां त्यांचा प्रवास अगदीं सुगम होता.

ते चौघे दरींत उतरत आहेत, तोंपर्यंत ते ज्यांना पकडण्याची इच्छा करीत आहेत तीं दोघें–शेखर आणि प्रियंवदा हीं काय करीत आहेत, तें आपण पाहूं.

दृढसंधराजानें शेखरास दुसऱ्या कांहीं उद्योगास निघून जाण्याची आज्ञा केली, असें आम्हीं मागील प्रकरणांत सांगितलेलें वाचकांच्या ध्यानीं असेलच. पित्याच्या आज्ञेप्रमाणें शेखरानें त्या दिवाणखान्यांतून बाहेर पडल्यावर आपल्या प्रियेची गांठ घेतली, आणि तिला बरोबर घेऊन नेहमींच्या वहिवाटीप्रमाणें तो दरीमध्यें फिरावयास गेला. दुसऱ्या दिवशीं त्याला जांघिळाबरोबर द्वंद्व युद्ध करावयाचें होतें. त्या युद्धामध्यें काय होईल, यासंबंधानें त्या उभयतांचीं मनें थोडींबहुत शंकित असल्यामुळें चालत आहे तीं घटका आपली, असें त्यांस वाटून तीं परस्परांच्या समागमाचें सुख आज जितकें घेतां येईल तितकें घेऊं पहात होतीं, यांत आश्चर्य नाहीं.

ती शुद्ध अंतःकरणाची कुमारिका आणि तो उदार अंतःकरणाचा शेखर हीं दोघें दरींतील निर्जन प्रदेशांत हिंडत असतां त्यांचीं मनें प्रेमरसानें थबथबलीं होतीं. ह्या पृथ्वीवर स्वर्गसुखाची बरोबरी करणारा असा जर एखादा पदार्थ असेल, तर तें निर्मल अंतःकरणाच्या कुमारिकेच्या हृदयांत वास्तव्य करणारें प्रेमच होय! त्या प्रेमाला जर कसली उपमा द्यावयाची असेल, तर भ्रमरानें स्पर्श न केलेल्या अर्धोन्मीलित कमल-

कलिकेचीच उपमा त्याला योग्य होईल. कुमारिकेच्या अंतःकरणांत प्रथमच उत्पन्न झालेलें प्रेम हें अत्यंत शुद्ध असतें. ती कुमारिका ज्याच्या प्रेमाची अपेक्षा करते, त्याच्या गुणावगुणांचा ती विचार करीत नाहीं; तर फक्त त्याच्या प्रेमाचीच ती अपेक्षा करीत असते. तें प्रेम सुखोपभोगाच्या पदार्थांनीं वृद्धिंगत होत नाहीं, किंवा दुःखदायक गोष्टींनीं कमी होत नाहीं. त्यामध्यें आपलपोटेपणाचा गंधहीं नसतो; किंबहुना स्वसुखाचा त्याग करूनही आपल्या इष्ट प्रियकराला सुख देण्याविषयीं तें प्रेम सदैव तत्पर असतें. प्रियंवदेच्या अशा प्रकारच्या प्रेमाचा अनुभव घेत असतां शेखराला काळावेळाचें भान राहिलें नसलें, तर त्यांत नवल कसलें? शेखराला तिच्या प्रेमाची खरी किंमत समजत होती, म्हणून तोही आपल्या सुखाची पर्वा न करितां तिला प्रसन्न करण्यासाठीं झटत होता. याप्रमाणें तीं दोघें जरी परस्पर प्रेमाच्या आनंदाचा उपभोग घेत होतीं, तरी एक गोष्ट त्यांच्यापुढें एकसारखी दत्त म्हणून उभी असल्यामुळें त्या दोघांच्याही मुद्रा किंचित् उदासीन दिसत होत्या.

मनाला आलेली उदासीनता घालविण्यासाठीं डोंगरामध्यें हिंडत असतां तीं दोघें आज नेहमींपेक्षां अधिक दूर आलीं होतीं. त्या ठिकाणीं एका विस्तीर्ण शिलातलावर बसून तीं प्रेमाच्या गोष्टी बोलत होतीं. त्यांच्या भाषणाचा थोडासा मासला येथें देतों.

शेखर म्हणाला,–"प्रिये ही उदासीनता सोडून दे. उद्यां मला द्वंद्वयुद्ध करावयाचें आहे, त्यांत मला विजय खात्रीनें मिळेल. पण तुझी मनोहर आणि आनंदी मूर्ति माझ्या हृदयांत ठसली पाहिजे. तुझी आनंदी मूर्ति माझ्या ज्ञानचक्षूपुढें उभी असली, म्हणजे तिच्या दर्शनानें माझ्या अंगांत अद्वितीय सामर्थ्य येईल, आणि मी काळाशीं देखील झगडण्यास तयार होईन. पण तूं जर दुःखी आहेस असें माझ्या मनाला वाटलें, तर माझीं अंगें शिथिल होतील, आणि एकादें लहान पोरसुद्धां माझ्या हातांतील तरवार काढून घेईल!'

आनंदी आणि उत्साहदर्शक स्वरानें प्रियंवदा म्हणाली,–'प्रियकरा, ह्या देहाचे आपण स्वामी आहां, आणि मीं हा देह आपणांस वाहिला आहे. आणीबाणीची वेळ आली असतां मी धैर्य सोडीन, असें कधींही होणार नाहीं. आपण शूर अशा क्षत्रियकुलांत जन्म घेतला आहे; इतकेंच नव्हे, तर आपण स्वतः खरे वीर आहां, ही माझ्या मनाची खात्री आहे. आपण जर भ्याड असतां तर माझ्या प्रेमाचा ओघ आपल्याकडे वळलाच नसता. ज्या अर्थीं आपण क्षत्रियकुलांत जन्म घेतला आहे, त्या अर्थीं आपणांस लढाईचे प्रसंग वारंवार येणार हें मला माहीत आहे. हे प्रसंग आपणांस कधींही टाळतां यावयाचे नाहींत, अशी माझ्या मनाची खात्री असल्यामुळें आपण द्वंद्वयुद्धास तयार झालां या गोष्टीचें मला अगदीं दुःख होत नाहीं, कीं भयही वाटत नाहीं. मी स्वतः वीरकन्या आहें, आणि क्षात्रधर्म म्हणजे काय, हें मला माहीत आहे.'

या तिच्या भाषणानें शेखराचा उत्साह वाढला आणि तो तिजकडे प्रेमपूर्ण दृष्टीनें अवलोकन करीत म्हणाला,–'प्रिये, सध्यां तुझ्या मनाची कशी अवस्था झाली आहे, हें मी जाणतों. कारण माझें तुझ्यावर असलेलें प्रेम तुझ्या हृदयांत काय चाललें आहे, हें मला सांगत आहे. तूं असें भाषण करशील, अशी माझ्या मनाची खात्रीच होती तरी पण, उद्यांच्या युद्धामध्यें दुर्दैवानें किंवा एकादी आकस्मित गोष्ट घडून आल्यामुळें जर माझा पराजय झाला, तर माझ्या मागें तुला किती दुःख होईल, ही कल्पना केव्हां केव्हां माझ्या मनांत आल्याखेरीज राहनच नाहीं. प्रिये, हें काय? तुझ्या नेत्रांत अश्रु आलेले दिसतात!'

आपले [illegible] प्रियंवदा म्हणाली,–'होय; माझ्या [illegible] अश्रु आले खरे, पण ते आपल्या [illegible] आले होते. प्रियकरा, [illegible] आहां आणि आपण वीराच्या [illegible] आहे, त्याप्रमाणें [illegible] जरी आपल्या [illegible] गुजरला,' [illegible] कधींही [illegible] दृढसंध [illegible] पुत्र क्षात्रधर्मापासून भ्रष्ट झाला असें आपण कोणालाही म्हणूं देणार नाहीं, त्याचप्रमाणें प्रियंवदा ही क्षत्रियकुमारिका असून तिचें वर्तन भ्याडपणाचें होतें, आणि तो आपल्यासारख्या क्षात्रियकुमारास योग्य पत्नी नव्हती, असा अपकीर्तीचा कलंक मी आपल्या नांवास कधींही लागूं देणार नाहीं!'

शेखर आनंदानें म्हणाला,–'शाबास! वीरकन्ये शाबास! खऱ्या क्षत्रियाच्या कन्येला अनुरूप असे हे शब्द तुझ्या मुखांतून बाहेर पडत आहेत, हें ऐकून मला मोठी धन्यता वाटते! आजपर्यंत ज्या खऱ्या क्षत्रियकन्या होऊन गेल्या, त्या शौर्याच्या अशाच मोठ्या अभिमानी होत्या. प्राचीन काळच्या क्षत्रिय स्त्रियांचे भ्रतार युद्धास निघाले असतां त्या स्त्रिया मोठ्या आनंदानें त्यांस उत्तेजन देऊन त्यांचीं शस्त्रास्त्रें त्या स्वतः सिद्ध करून देत असत. आपला पती युद्धामध्यें दुर्दैवानें मृत झाला असतां त्यांस जे दुःख होई, त्याहून शतपट अधिक दुःख आपला पति रणामधून पलायन करून आला, असें त्यांच्या कानावर आल्यास त्यांस वाटत असे. अशा पतीची त्या निर्भर्त्सना करीत, आणि कित्येक पुनः त्याचें मुखावलोकनही करीत नसत.'

प्रियंवदा म्हणाली,–'रणामध्यें शत्रूशीं झगडत असतां स्वर्गलोकीं गमन करणाऱ्या आपल्या पतीसह सहगमन करण्यांत त्यांना आनंद वाटत असे, आणि पराभूत पतीचा त्या तिरस्कार करीत; ह्या गोष्टीमुळें त्यांची कीर्ति अजरामर होऊन राहिली आहे. आणि अजून सुद्धां ज्यांना आपल्या क्षात्रकुलाचा अभिमान आहे, त्या स्त्रियासुद्धां तोच मार्ग धरल्याखेरीज राहणार नाहींत.' असें भाषण [illegible] करास दृढ [illegible] म्हणाला,– [illegible] पाऊलाच्या भाषणानें [illegible] वर जणुं काय अमृताचा वर्षाव होत आहे. मी आनंदसागरांत निमग्न झालों आहें. फार तर काय माझा सर्व देहच आनंदमय झाला आहे, असें मला सध्यां वाटत आहे. त्या सरदार हलधराच्या वर्तनानें मी द्वंद्वयुद्धास सिद्ध झालों, हें फार चांगलें झालें, असें आज मला वाटत आहे. आधीं त्या सरदाराच्या खरेपणाबद्दल माझ्या मनाची खात्री होती, म्हणून मी त्याचा पक्ष घेऊन द्वंद्वयुद्धास सिद्ध झालों ही गोष्ट खरी. तरी तूं माझ्या हेतूविरुद्ध वर्तन न करतां मला उत्तेजन देत आहेस, ही ज्यास्तच आनंदाची गोष्ट आहे. शिवाय माझ्या वडील भावानें वडिलांसमक्ष माझ्या पराक्रमासंबंधानें शंका घेतली होती, त्या शंकेचें निवारण करण्याचा प्रसंग मला इतक्या लवकर लाभला, याही गोष्टींचें मला समाधान होत आहे. माझ्या वडील भावाच्या शंकेचें निवारण करण्यासाठीं जर दुसरी एकादी संधि आली असती, आणि प्रत्यक्ष आमच्या प्रजेपैकीं एका माणसाबरोबर युद्ध करावें लागलें नसतें, तर बरें झालें असतें; असें जरी माझ्या मनांत वारंवार येतें, तरी जांघिळासारख्या प्रचंड योद्ध्याशीं सामना करून जय मिळविणें ही गोष्ट कांहीं सामान्य नव्हे, असें मनांत येऊन मला एक प्रकारचें समाधानच वाटतें. शिवाय तुझ्यासारख्या क्षत्रियकन्येशीं माझ्यासारख्या क्षत्रियकुमाराचें लग्न होण्यापूर्वी माझ्या अंगीं पराक्रम आहे, आणि मी तुझ्या पाणिग्रहणास पात्र आहें, ही गोष्ट जगाच्या

प्रत्यक्ष निदर्शनास आणून देण्याचा हा सुयोग आला, याही गोष्टीचा मला फार आनंद होत आहे. आणखी त्या जांघिळानें आज सकाळीं सर्वांच्या अंगावर शहारे उत्पन्न करणारी जी भविष्यवाणी उच्चारिली, ती खरी नसून तो [redacted] शक्तीचा [redacted] वेळ इतक्या [redacted] माझें मन [redacted] युद्धाचा प्रश्न जर उपस्थित झाला नसता, तर जांघिळाची भविष्यवाणी खरी मानून तीवर विश्वास ठेवणें सर्वांस भाग होतें. परंतु उद्यांच्या द्वंद्वयुद्धांत जांघिळाचा पराभव झाला, म्हणजे त्याचें सर्व भाषण खोटें होतें, ही सर्वांची नीट समजूत पडेल, आणि त्या विचाऱ्या हलधरावरील प्राणसंकटही टळेल!'

प्रियंवदा म्हणाली,–' आपल्यासारख्या वीराला अशीं शौर्याचीं कामें करण्यांत आनंद वाटावयाचाच. बरें, मला आणखी एक विचारावयाचें होतें. आज भल्या दोन प्रहरींच आपले बंधु घोडयावर बसून कोठें बरें गेले असावे! हें मी आपणांस केव्हांची विचारीन म्हणत होतें, पण यासंबंधानें विचारण्याची संधिच सांपडली नाहीं. आपलीं प्रेमाचीं भाषणें बोलतां बोलतां वेळ केव्हांच निघून गेला!'

शेखरानें उत्तर दिलें,–' तो कोठें गेला हें मला समजलें नाहीं. पण तो कांहीं तरी महत्त्वाच्या कामासाठींच गेला असावा, हें उघड आहे. आपण वाडयांत गेलों म्हणजे आपणांस सर्व कांहीं समजेल. आतां काळोख बराच पडूं लागला आहे, यासाठीं आपण मागें फिरावें हें बरें. आपण बोलतां बोलतां आज फारच दूर आलों आहों.'

असें बोलून शेखर उठला, आणि प्रियंवदेचा हात धरून निजसह चालूं लागला. तीं दोघें सुमारें दहावीस पावलें चाललीं असतील, इतक्यांत आपल्या मागें कोणाचे पाय वाजत आहेत, असें शेखरास वाटलें; म्हणून तो मागें वळून पाहूं लागला [redacted] क्षणांत जवळच्या झाडींतून उडया [redacted] चार जवान त्यांजवर धांवून आ[redacted] सांनीं एका निमिषार्धांत शेखरास [redacted] लोळविलें. आपल्यावर [redacted], या गोष्टीची [redacted] त्याचे [redacted] असल्यामुळें [redacted] पण [redacted] सोडा [redacted] त्यास संधि मिळाली नव्हती. [redacted] जमिनीवर पाडतांच एकानें त्याची तरवार काढून घेतली आणि त्याला पुनः वर उठविलें. नंतर त्याचे दोन्ही दंड दोघांनीं धरिले, आणि दुसऱ्या दोघांनीं प्रियंवदेचे हात धरून त्या दोघांना डोंगराच्या शिखराकडे ओढीत चालविलें.

आपल्यावर असा जुलूम झालेला पाहतांच शेखराच्या मुखांतून क्रोधाचे उद्गार बाहेर पडले, आणि प्रियंवदेनें तर घाबरून आरोळीच ठोकली. पण तीं सध्यां मनुष्यांच्या वस्तीपासून फार दूर असल्यामुळें त्यांच्या ओरडण्याचा कांहींच उपयोग होण्यासारखा नव्हता, ही गोष्ट त्यांच्या ध्यानांत आल्यामुळें त्यांनीं पुनः मुखांतून शब्द काढला नाहीं. एकाएकीं हल्ला झाल्यामुळें शेखराचें धैर्य प्रथम सुटलें, पण पांच चार पळांच्या आंतच त्यानें आपलें मन ताब्यावर आणिलें.

पिंगलाक्ष त्यांना उद्देशून म्हणाला.–'तुम्ही अगदीं भिऊं नका; आम्ही नेऊं तिकडे खुषीनें याल, तर तुमच्या एका केसास देखील आम्ही धक्का लावणार नाहीं.'

शेखर म्हणाला,–' तुमच्या या पेहेरावावरून तुम्ही सुंदरपुरकरांचे सेवक आहां, ही गोष्ट माझ्या ध्यानीं आली आहे. बृहद्रथानें एकाच वेळीं प्रतापपुरकर आणि वृषपुरकर यांची आगळीक करावयास सिद्ध व्हावें, ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे. या नीचपणाबद्दल त्याला केवढें प्रायश्चित्त मिळेल याची कल्पनाही त्याच्या मनांत आली नाहीं, असें दिसतें.'

यावर पिंगलाक्षानें कांहींच उत्तर दिलें नाहीं. फक्त तो त्या दोघांस घेऊन डोंगर चढूं लागला. थोडयाच वेळामध्यें ते त्या भयंकर नैसर्गिक भिंतीपाशीं येऊन पोंचले. या जागीं सध्यां काळोख अगदीं मिट्ट पडलेला होता. तरी शेखरानें आतां आपण कोणत्या जागीं आलों आहों, आणि पुढें कोणत्या मार्गानें जावयाचें आहे, याचें अनुमान केलें. तो अलीकडे या डोंगरांत नेहमीं फिरत असे, त्यामुळें त्याला त्या डोंगराची चांगली माहिती झालेली होती. सध्यां आपणांस कोणत्या मार्गानें जावयाचें आहे, या गोष्टीचें स्मरण झाल्याबरोबर त्याच्या अंगावर कांटा उभा राहिला !

ज्या ठिकाणीं पिंगलाक्षानें झाडास दोऱ्या बांधून ठेविल्या होत्या तेथें आल्यावर तो शेखरास म्हणाला,–'सध्यां आपणांस ज्या मार्गानें जावयाचें आहे, त्या मार्गाचें वर्णन करण्याची आवश्यकता आहे, असें मला दिसत नाहीं. तुम्ही धाडसी अहां ही माझी खात्री आहे; तुम्ही या कडयावरून सावधपणानें आमच्या बरोबर याल‌च. या बाईसाहेबांस आम्ही संभाळून नेऊं. या अवघड जागेमधून जातांना तोल सांवरतां यावा, म्हणून आम्ही या दोऱ्या बांधून ठेविल्याच आहेत.'

या जागीं जरी अंधार बराच होता, तरी शेखराचे डोळे निवळले असल्यामुळें त्याला त्या दोऱ्या कशा बांधलेल्या आहेत, हें साधारणपणें दिसलें. ज्या कडयावरून त्यांना जावयाचें होतें, त्या कडयावर सुमारें दोन हात उंचीवर त्या दोऱ्या असून त्या, त्या कडयाच्या दोन्ही बाजूंनीं जात आहेत, हें त्याच्या लक्ष्यांत आलें. त्या कडयावरून किंवा भिंतीवरून येतांना पिंगलाक्षाच्या मागें जो जवान दोरखंडाचें वेटाळें आपल्या उजव्या हातांत अडकवून आला होता, त्यानें व पिंगलाक्षानें शेखरास, आणि दुसऱ्या दोघांनीं प्रियंवदेस धरिलें होतें. प्रियंवदेस धरणारांनीं तिला अगदीं पीडा होणार नाहीं, अशा रीतीनें धरून ठेविलें होतें; पण शेखरास धरणारांनीं मात्र त्याला अगदीं समाचून धरिलें होतें. शेखरानें त्यांच्या हाताचा जोर कमी होण्याची संधि साधून त्यांना मुकांडी देण्याचा विचार केला असता, तरी तो सध्यां साधला नसता. ते दोघे पूर्ण सावध होते, आणि त्यांनीं आपल्या चिकाटीचा जोर एक क्षणमात्रही कमी केला नव्हता.

भिंतीवर चढावयास आरंभ करण्यापूर्वी पिंगलाक्ष शेखरास म्हणाला,–'एकाद्या सामान्य गुन्हेगाराप्रमाणें आपल्यासारख्या राजपुत्राचे हातपाय बांधून त्याला कैद करून न्यावें ही गोष्ट माझ्या मनाला प्रशस्त वाटत नाहीं. यासाठीं निमूटपणें आमच्या बरोबर येण्याचें तुम्हीं आम्हांस वचन द्याल, तर तुमच्या वचनावर विश्वास ठेवून आम्ही तुम्हांस मोकळें ठेवूं.'

या अपमानकारक शब्दांनीं क्रोधास चढून राजपुत्र शेखर म्हणाला,–'अरे नीचांनो! तुम्हांला काय करावयाचें असेल तें खुशाल करा, मी तुम्हास वचन देत नाहीं.'

पिंगलाक्ष म्हणाला,–'तर मग आमचा नाइलाज आहे.' असें बोलून त्यानें पूर्वीच तयार करून ठेविलेला दोरीचा फांस शेखराच्या उजव्या हातांत अडकविला.

हातांत फांस घालतेवेळीं त्यांची मिठी ढिली पडली आहे, हें पाहून शेखरानें मोठा जोर करून त्यांच्या हातांतून निसटण्याचा प्रयत्न केला. परंतु पिंगलाक्ष सावध होता, इतकेंच नव्हे, तर शेखर असें कांहीं करील, असें त्यानें पूर्वीच ताडलें होतें. त्याची शक्ति असामान्य असल्यामुळें त्याच्या पुढें शेखराचें कांहीं चाललें नाहीं. पिंगलाक्षानें त्याला घट्ट धरून तर ठेविलेंच, पण तिसऱ्यांत चपळाईनें त्याच्या डाव्या हातालाही दोरीचे एकदोन वळसे गुंडाळून त्यानें त्याचे दोन्ही हात त्याच्या पाठीकडे खिळून टाकिले.

आपल्या प्रियकराची ही अवस्था लक्ष्यांत येतांच प्रियंवदा मोठ्यानें ओरडून म्हणाली,–

• अरे दुष्टांनो ! हें तुम्ही आरंभिलें आहे तरी काय ? ' त्याहून मोठ्यानें किंकाळी फोडित ती म्हणाली,–'अहो धांवा हो धांवा ! कोणी तरी लवकर धांवून यांना सोडवा !'

पिंगलाक्ष किंचित् जोरानें म्हणाला,–'बाईसाहेब, ओरडूं नका. तुमच्या एका केसालाही आम्ही धक्का लावणार नाहीं, असें आम्हीं तुम्हांला पूर्वीच वचन दिलें आहे. '

शेखरानेंही तिला सांगितलें,–' प्रिये, विनाकारण ओरडून काय उपयोग ? माझ्यासाठीं तूं अगदीं कष्टी होऊं नको.'

प्रियकराच्या या भाषणानें तिच्या अंतःकरणांत थोडा विश्वास उत्पन्न होऊन ती ओरडावयाची थांबली. कारण त्याच्या भाषणाचा स्वर अर्थपूर्ण होता. तो आपली उभयतांची मुक्तता करून घेण्याची कांहीं तरी कल्पना योजीत असावा, असें तिला त्याच्या स्वरावरून वाटलें होतें.

शेखराला हवें तितकें जखडल्यावर पिंगलाक्ष आपल्या सोबत्यांस म्हणाला,–'तुम्ही प्रथम वर चढा. तुमच्यापैकीं एकानें तिला उचलून घ्यावें हें बरें.'

अर्ध्या अभिमानानें आणि अर्ध्या तुच्छतेनें प्रियंवदा म्हणाली,–' नको नको ! मला उचलून घेण्याचें कारण नाहीं. ज्या जागेवरून दुसरीं माणसें जातात, त्या जागेवरून जातांना मला अगदीं भीति वाटणार नाहीं कीं मी अडखळणार नाहीं.'

शेखर उत्साहयुक्त स्वरानें म्हणाला,–'शाबास, प्रिये, शाबास. तुझें हें धाडस पाहून मला अशाही स्थितींत समाधान होत आहे. ' हें त्याचें भाषण कानीं पडतांच प्रियंवदेलाही मोठी धन्यता वाटली.

नंतर पिंगलाक्ष आज्ञादर्शक स्वरानें म्हणाला,–'माझ्या साहसी मित्रांनो, चला; आतां आपण आपला रस्ता सुधारावा हें बरें. तिला तुम्ही उचलून घ्यावें हें जरी तिला पसंत नसलें, तरी तिचा तोल चुकूं लागल्यास तुम्हीं तिच्यावर लक्ष्य ठेविलें पाहिजे. यासाठीं तीं तुम्हां दोघांच्या मध्यें असेल तर बरें. वाटल्यास तुम्ही तिचे हात धरा.'

प्रियंवदा म्हणाली,–'माझ्या अंगास बोट सुद्धां लावण्याचें कारण नाहीं. मी न डगमगतां या भिंताडावरून तुमच्याबरोबर येईन. मी मध्येंच पळून जाईन अशी तुमच्या मनांत शंका येत आहे कीं काय ?'

" बरें तर ' असें म्हणून पिंगलाक्ष उगीच राहिला. कारण ती आतां पळून जाईल अशी कल्पना करणें हें मूर्खपणाचें होतें; तथापि हें तिचें धैर्य पाहून त्याच्या मनांत आश्चर्य वाटल्यावांचून राहिलें नाहीं. त्या भयानक भिंताडावर चढतांना प्रथम एक पिंगलाक्षाचा सोबती, त्याच्यामागें प्रियंवदा, तिच्या मागें दुसरा जवान, त्याच्यामागें तिसरा इसम, त्याच्यामागें शेखर आणि सर्वांच्या मागें पिंगलाक्ष असा अनुक्रम होता. शेखराच्या दंडास बांधलेल्या दोऱ्या जरी त्याच्या मागें असलेल्या पिंगलाक्षानें आपल्या हातीं धरिल्या होत्या, तरी प्रसंगीं तोल सांवरावयास हात दोरखंडांस पुरावे; इतके त्याचे हात मोकळे होते. भिंताडावरून जात असतां शेखरानें दांडगाई करूं नये,म्हणून त्याच्या पुढच्या जवानानें एक व पिंगलाक्षानें दुसरा असे त्याचे दोन्ही दंड आपल्या दोन हातांनीं घट्ट धरून ठेविले होते. या वेळीं काळोख तर मी म्हणत होता, ही गोष्ट एका अर्थीं फार उत्तम होती. कारण या वेळीं शेखराच्या मनांत काय विचार चालले आहेत, हें कोणाच्याही ध्यानीं येत नव्हतें. त्याच्या दंडास ज्या दोऱ्या बांधल्या होत्या, त्यांच्या गांठी घट्ट बसलेल्या नसून त्या सैल होत्या. ही गोष्ट प्रथमपासून त्याच्या ध्यानीं आलेली असल्यामुळेंच त्यानें प्रियंवदेशीं भाषण करतांना तिला विश्वास येईल असा स्वर काढला होता; आणि त्या चाणाक्ष तरुणीनें त्याचा हेतु ओळखिलाही होता. ते भिंतीवर चढल्यानंतर काळोखामध्यें आपल्या हातांस बांधलेल्या दोऱ्या हळु-

हळु अधिक सैल करण्याचा प्रयत्न शेखरानें मोठ्या सावधपणें सुरू केला होता.

सुमारें अर्ध घटिकेच्य आंतच ते त्या भिंताडाच्या मध्यभागीं येऊन पोंचले. सध्यां ते ज्या जागीं आले होते ती जागा फारच अवघड होती. या ठिकाणीं बाजूला बांधलेलीं दोरखंडें त्यांच्या स्वतांच्या भारानें अगदीं भिंताडाबरोबर आलेलीं असल्यामुळें तोल सांवरावयास त्यांचा अगदीं बेताचा उपयोग होत होता. प्रियंवदेच्या मागें पुढें असलेल्या दोघांजणांनीं दोरखंडें ताणून धरलेलीं असल्यामुळें बाकीच्या सर्वांचा तोल त्या दोरखंडें ताणून धरण्यावर अवलंबून होता. शेखराच्या मागें पुढें असलेल्या दोघांचा एकेक हातच काय तो दोरखंडावर ठेवलेला होता. सध्यां आपली स्थिति कोणत्या प्रकारची आहे, हें शेखरानें ओळखून आपल्या उजव्या हाताचा फांस काढून टाकून त्यानें तो हात मोकळा करून घेतला. त्याच्या हालचालींवर काळोखामुळें पिंगलाक्षाचीं किंवा त्याच्या सोबत्यांची नजर पोंचत नव्हती. शेखरानें या वेळीं जें कर्म करावयाचें योजिलें होतें, तें जरी अत्यंत भयंकर होतें, तरी तें करण्यास योग्य संधि आलेली आहे, हें मनांत येऊन त्याला अतिशय आनंद झाला होता.

तथापि आपणांस धरून ठेवणारांवर आपण एकाएकीं हल्ला केला, तर काळोखामध्यें खरा प्रकार न उमगल्यामुळें प्रियंवदेला भीति वाटून तिचें धैर्य गलित झाल्यास भलतेंच होईल, अशी शंका त्याच्या मनांत आली. आपण कांहीं तरी बेत मनांत योजिला आहे, हें तिला कळलेलें असावें, हें तिच्या पूर्वीच्या भाषणावरून व उत्साही वर्तनावरून शेखराच्या ध्यानीं आलेलें होतें, आणि ती आपण पुढें काय करणार यांची वाट पहात असावी, असें त्याला वाटत होतें. अशावेळीं तिला सावध करण्यास आपला एकादा शब्द देखील पुरे होईल, असें त्याची मनोदेवता सांगूं लागली. म्हणून तो म्हणाला,–' प्रिये, तूं दोऱ्या घळकट घरल्या आहेस ना ? नीट तोल संभाळून धर, ही जागा फार भयंकर आहे.'

पिंगलाक्ष मध्येंच ओरडून म्हणाला,–' अहो शेखर, विनाकारण गडबड करणें हें चांगलें नाहीं.'

तथापि त्याच्या दरडावणीकडे लक्ष्य न देतां प्रियंवदा बोलली,–'मी सावध आहें, मला अगदीं भीति वाटत नाहीं !'

या तिच्या उत्तरावरून ती सावध आहे, आणि आपण कांहीं तरी करणार आहों, याची तिच्या मनांत कल्पना आलेली आहे, हें शेखरानें पूर्णपणें जाणिलें.

नंतर शेखरानें अगदीं सावकाशपणें डाव्या हातानें आपल्या कमरेच्या तरवारीचा बंद सोडला. तो बंद त्यानें इतक्या सावधपणानें सोडला कीं, तो त्या हातानें कांहीं करीत आहे, अशी शंकासुद्धां पिंगलाक्षाच्या मनांत आली नाहीं. बंद सोडल्यानंतर उजव्या हातानें तरवार सटकन् म्यानांतून काढता येईल, अशी मनाची खात्री झाली. आतां मात्र मोठी आणीबाणीची वेळ आली! आणखी एकदां प्रियंवदेला आपण सूचना द्यावी, असें त्याच्या मनांत आलें; पण आपण आतां कांहीं बोलल्यास पिंगलाक्ष सावध होईल; अशी त्याच्या मनास शंका वाटली. म्हणून प्रथम तोंडांतून एक अक्षर देखील बाहेर न काढतां त्यानें आपला उजवा हात एका हिसक्याबरोबर मोकळा करून घेतला, आणि निमिषार्धामध्यें त्यानें आपली तरवार म्यानांतून बाहेर खेंचली. नंतर तो गर्जना करीत म्हणाला;–' प्रिये, दोऱ्या घट्ट धर.'

इतक्यांत ज्याच्या हातांतून शेखरानें आपला उजवा हात सोडवून घेतला होता, तो मनुष्य " घात ! घात ! " असें ओरडला, पण ते शब्द त्याच्या तोंडांतून पुरते बाहेर पडण्यापूर्वीच तो शेखराच्या तरवारीच्या

वारानें जायबंदी होऊन किंकाळी फोडीत कड्यावरून खालीं कोसळला !

यावेळीं त्या सर्वांच्या मनांचा जो गोंधळ उडाला तो सांगतां सोय नाहीं ! काळोख मिट्ट असल्यामुळें कड्याखालीं कोण पडलें, हें चटकन् कोणाच्या लक्ष्यांत आलें नाहीं. म्यानाबाहेर पडतांना तरवारीचा झालेला आवाज, त्यानंतर " घात धात " असे त्या माणसानें उच्चारलेले शब्द, यामागून किंकाळी आणि शेवटीं तो माणूस पाण्यांत पडतांना झालेला आवाज, हीं सर्व इतक्या त्वरेनें त्या सर्वांच्या कानांवर आलीं कीं, खालीं पडलें कोण, हेंच प्रथम त्यांच्या लक्ष्यांत येईना. काळोखामुळें प्रियंवदेच्या अंत:करणांतही अशींच शंका उत्पन्न झाली. इतक्यांत दोरीस मोठा हिसडा बसला, त्यामुळें कड्यावरून चालणाऱ्या सर्वांनीं आपलें सर्व अवसान खर्ची घालून दोरखंडें गच्च आवळून धरिलीं. असें होईल, हें शेखरानें पूर्वीच ताडिलें असल्यामुळें त्यानें, या संधीचा पूर्ण फायदा घेण्याचा बेत अगोदरच योजून ठेविला होता. एवढा मोठा साहसी पिंगलाक्ष, पण त्यानें सुद्धां शेखराचा धरलेला हात सोडून दिला, आणि त्यानें आपल्या बाजूस असलेलीं दोन्ही दोरखंडें गच्च दोन्ही हातांनीं धरिलीं.

शेखर पूर्ण सावध असल्यामुळें त्यानें या संधीचा फायदा घेऊन आपल्या मागें असलेल्या पिंगलाक्षावर आपल्या तरवारीनें जोरानें वार केला. त्या बरोबर पिंगलाक्षाच्या मुखांतून एक विकाळ किंकाळी बाहेर पडली, आणि त्याचा विशाल देह दरींत कोसळला. पण यावेळीं शेखराला मोठा जोर करावा लागला होता त्यामुळें त्याचा थोडासा तोल गेला. तथापि तो सावध असल्यामुळे त्यानें चटकन डाव्या बाजूचें दोरखंड हातीं धरिलें, आणि आपला तोल सांवरिला. यावेळीं जर त्याचें प्रसंगावधान लटपटलें असतें, तर त्यानें आपल्या उजव्या हातांतील तरवार टाकून देऊन त्या हातानें दोरी धरण्याचा यत्न केला असता; परंतु तसें झालें नाहीं. आपल्या मागच्या-पुढच्या दोघांची अशी व्यवस्था केल्यावर त्यानें क्षणमात्र विलंब न करितां आपल्या पुढें व प्रियंवदेच्या मागें असलेल्या माणसाला आपल्या सोबत्यांच्या भेटीसाठीं तत्काल दरींत ढकलून दिलें. आतां त्या भिंताडावर फक्त तीनच माणसें राहिलीं होतीं. सर्वांपुढें बाकी उरलेला एक सुंदरपुरकर, त्याच्या मागें प्रियंवदा व तिच्या मागें शेखर !

आपल्या प्रियेला धीर देण्यासाठीं शेखर म्हणाला,-' प्रिये, भिऊं नको. तीन इसमांस तर मी यमसदनीं पोंचविलेंच आहे. आतां फक्त एकच राहिला, तो जर कांहीं गडबड करील, तर मला सांग म्हणजे मी त्याचाही एका क्षणार्धांत निकाल पाडतों !'

आतां जो फक्त एकच इसम उरला होता, त्याची तर या समयीं भयानें बोचडीच वळली होती ! त्याच्या तोंडांतून धडपणें शब्दही निघणें मुष्कील झालें होतें. तो बिचारा काय करणार ? त्यानें मोठा जोर करून म्हटलें,-' महाराज ! मला जीवदान द्या ! मी अगदीं गडबड करणार नाहीं. मी आपल्या पायां पडतों !'

शेखर हांसून म्हणाला,-' अरे नीचा ! जा ! मी शरण आलेल्यावर कधींहि शस्त्र धरीत नसतों. जा, आपल्या धन्याला जाऊन सांग, कीं या त्याच्या जुलमी कृत्याचें त्याला या शेखराच्या हातून योग्य प्रायश्चित्त लवकरच मिळेल. हें कृत्य त्या नीच बृहद्रथाच्या आज्ञेनेंच झालें असावें, अशी तर माझ्या मनाची खात्री आहेच, पण एकदां तुझ्या तोंडानें स्पष्ट समजलें म्हणजे शंका उरणार नाहीं. '

तो माणूस सध्यां अगदीं दीन असल्यामुळें त्याला खोटें बोलण्याचें किंवा उगीच बसण्याचें सुद्धां धैर्य उरलें नव्हतें. म्हणून तो चटकन म्हणाला,-' होय; आम्ही आपल्या


धन्याच्या आज्ञेनेंच तुम्हांस कैद करण्यासाठीं आलों होतों; पण त्यांनीं हें कृत्य कां योजिलें होतें, हें मात्र मला माहीत नाहीं.'

शेखर म्हणाला,–' बस ! पुरें झालें. आतां तुला तुझा जीव हवा असेल तर आपलें हत्यार माझ्या स्वाधीन कर, आणि मुकाट्यानें येथून चालता हो !'

अशा रीतीनें तीं दोघें एकदांची आपल्या शत्रूंच्या भीतींतून मुक्त झालीं. तीं अद्यापि त्या भयंकर कडयावरच होतीं. आपल्या राहिलेल्या एका शत्रूला पुढें जाऊं देऊन आपण येथून मागें परतल्यास मोठा घोंटाळा होईल, ही गोष्ट शेखराच्या एकदम ध्यानीं आली. कारण तो माणूस पलीकडे गेला, आणि त्यानें तेथें झाडास बांधून ठेवलेल्या दोऱ्यांचीं टोकें जर सोडून टाकलीं, तर आपणास त्या भिंताडावरून जातांना महाप्रयास करावे लागतील, किंवा कदाचित् आपला सर्व तोल दोरखंडावर असतांनाच त्यानें तीं सोडलीं, तर आपल्या जिवावर प्रसंग गुदरेल यांत शंका नाहीं, असें त्यास वाटत होतें. म्हणून तो प्रियंवदेला म्हणाला,–' प्रिये या भयंकर जागेवरून मा[illegible] परत जाण्यापेक्षां आपण पुढेंच जावें हें [illegible] तें. यासाठीं दोरीवर फा[illegible] तशी[illegible] घाबरण्याचें मुळींच कारण[illegible] आपण या भयंकर जागेतू[illegible] म्हणजे, पुढें काय करावया[illegible]'

प्रियंव[illegible] आपण मजपाशीं असतां मी [illegible] णार नाहीं.'

असें ति[illegible] मोठ्या धैर्यानें कड्यावरून [illegible] एकदांची धड जमिनीवर उ[illegible] तिनें संकटकालीं जें धैर्य [illegible] तें संकटांतून मुक्त झाल्यावर [illegible] रलें नाहीं. कशी झाली त[illegible] आपल्यावरचें आणि आप[illegible] वें संकट टळलें, अशी तिच्या मनाची तिचीं इंद्रियें विकल झालीं, सर्वांग थरथर कांपत असतां कराला मिठी घातली व ती झाली ! पहिल्यानें ती मेली अशी शंका शेखराच्या मनांत लवकरच ती सावध होऊं लागतीं दोघें पर्वताच्या शिखराव तेथून सरळ मार्गानें राजवाड्ः एक कोश जमीन चालून जाणे होतें, म्हणून शेखरानें तिला उ खांद्यावर टाकिलें आणि मोठ्या सावधपणानें मार्गा सुरुवात केली.



[illegible]च्यावर प्रि[illegible]च्या [illegible]ांत श[illegible]ांत [illegible]ा- [illegible] [illegible]वदेनें सांगतल[illegible]यें राजानें हा [illegible] असावा, हें तिच्या [illegible] प्रियंवदेला जुलुमानें हरण करून [illegible] राक्षसी विवाह करावा, अशी जर त्याची इच्छा होती असें म्हणावें, तर तिच्याबरोबर शेखराला पकडून नेण्याचें मुळींच कारण नव्हतें. बरें शेखराला पकडून नेण्याचा हेतु असावा असें म्हणावें, तर त्याच्याबरोबर प्रियंवदेला नेण्याचें कारण काय आसावें, याचा तिला उलगडा करतां येत नसल्यामुळें तिचें मन बुचकळ्यांत पडलें होतें. शेवटीं आपल्या पतीला या बृहद्रथाच्या जुलमी कृत्याचा सूड घेण्याचा आपण आग्रह करावयाचा, असें तिनें आपल्या मनाशीं ठरवून ठेविलें.

आपल्या मातेच्या स्वाधीन
खरानें आपल्या पित्याची गांठ
ंध राजा यावेळीं आपल्या
ासु सेवकांसह आपल्या खानगी
ा बसला होता. त्याला शेखरानें
ग्र सर्व प्रकार निवेदन केला.
साऱ्या गोष्टी सांगत असतांही
ी शांतता ढळली नव्हती. तो
त इतक्या शांतपणानें सांगत
हून त्याच्या मनाच्या गंभीरतेचें
श्चर्य वाटल्याखेरीज राहिलें नाहीं.

त्राचें हें शौर्याचें आणि धाड-
ेकून दृढसंध राजाला जरी
ग, तरी त्याला यावेळीं बृह-
ा या जुलमी कृत्याचा मोठा
संपतांच तो
ाला,–' मी
, प्रतिज्ञा
ल्यांचा, या
ल्याचा
न पुरा
ही
ाही.
स्तीचा
झाला
तुझ्या
डोळ्यांचा
-ह्मशी
आणि शेऱ्या-मेंढ्यांच्या
तापपुरच्या
दरींत येतांल ! या अपशकुनी सरदार हल-
धराच्या प्रकरणांतून मी मोकळा झालों कीं,
तुझ्या समाचारास आलोंच म्हणून समज !
आणखी दोनच दिवसांत प्रतापपुर आणि
वत्सपुर हीं दोन्ही स्थळें सैनिकांनीं गजबजून
गेलीं आहेत, असें दृष्टीस पडेल ! आमच्या
फार दिवस तृषित असलेल्या तरवारींस
आतां तुझें रक्त लवकरच प्राशन करावयास मिळेल !'

हें भाषण करीत असतां दृढसंध राजाच्या मस्तकावरील शिरा ताठ फुगल्या होत्या; आणि ज्याप्रमाणें क्रुद्ध झालेला सिंह अत्यंत उग्र दिसतो, त्याप्रमाणें त्या वीराची मुद्रा अतिशय उग्र दिसत होती. त्याच्यापाशीं जे त्याचे विश्वासु सेवक बसले होते, त्यांच्या मुद्राही वीरश्रीनें तेजस्वी दिसूं लागल्या. हें भाषण संपल्यावर तो शेखराला म्हणाला,–' शेखर, बैस ! त्या नीचानें तुझा जरी असा अपमान केला आहे, तरी तूं आपला पराक्रम दाखवून त्याच्या डोळ्यांत झणझणीत अंजन घातलें आहेस, या गोष्टीचा मला फार आनंद होत आहे. पुढें काय करावयाचें याचा आपण विचार करूं या.'

शेखरानें वडिलांच्या आज्ञेप्रमाणें एका आसनावर बसून म्हटलें,–' विचार कसला करावयाचा हें तर ठरलेलेंच आहे. उभयतांमध्यें असलेला संधि मोडून बृहद्रथानें जें हें कपटाचरण केलें आहे, त्याची शुद्धि रक्तपातानेंच केली पाहिजे; परंतु जो काय विचार करावयाचा तो उद्यां करावा, हें बरें. कारण मी सध्यां दमलों आहें, आणि उद्यां प्रातःकाळीं मला द्वंद्वयुद्ध करावयाचें आहे. यासाठीं आज मला विश्रांति घेऊन उद्यांच्या सत्कर्मांत यश यावें म्हणून ईश्वराचा प्रार्थना करण्याची अत्यंत जरूर आहे, हें आपल्या ध्यानीं असेलच !'

शेखरानें हें भाषण
होतें, आणि उद्यांच्या
होईल, असें त्याचें
ल्यामुळें वीरश्रीच्या
सुंदर असलेली
होती. ही त्याची
युद्धकलेमध्यें निष्णात
राजाला आपल्या
हें अगदीं साहसिक
वेळ बसवून
ल्याखेरीज
वानगी दिली.
खान्यांत

शेखर
पोंचतो

केलें
जय
असदरच
दिसत
पाहून
या दृढसंध
मान वाटावा,
खराला फार
इष्ट नस-
घेण्याची पर-
आपल्या दिवाण-

खान्यांत जाऊन
राजवाड्याच्या

अंगणांत घोड्यांच्या ह्रेषा ऐकूं
थोड्याच वेळानें चूडामणि आणि
हेमचंद्र हे दृढसंधापाशीं येऊन पों-
संधाला पुनः बृहद्रथ राजाच्या
दुसरी कहाणी ऐकण्याचा
आपल्या दुसऱ्या मुलावर बृह
पणानें हल्ला केलेला ऐकू-
अंगांतील सर्व रक्त गरम
त्यानें त्याचा सूड घेण्याची प
तो म्हणाला,—'सध्यां ए
चमत्कारिक घडून येत आ
राजाशीं जें युद्ध करावें
आरंभ तर मो-
चूडामणीनें जेला-
शेखरानें या दरीमध्यें आप-
ल्या तरवारीचें पाणी आणि
धाडस हीं कशीं आहेत,
चांगलें अनुभवास आणू
त्याचप्रमाणें, अहो पंडितजी,
आपली तरवार चांगली चालविली,
मला फार आनंद होत आहे. कारण
वत्सपुरकरांच्या आश्रयास असल्यामुळें
बजाविलेला पराक्रम वत्सपुरकरांचाच
जला पाहिजे. आपल्या सारख्या विद्व
शूर पुरुषाचें माझ्या वाड्यांत आगमन
म्हणून मी अत्यंत धन्य मानितों.
स्वागत असो."

राजानें शेखरासंबंधाचा आपल्या
णांत जो उल्लेख केला होता, त्यासं
चूडामणीला काहींच माहिती नसल्
त्यानें त्याबद्दल अधिक चौकशी
शेखराच्या साहसकर्मासंबंधाची सर्व ह
जेव्हां चूडामणीला समजली, आणि त्
धाडसाची जेव्हां दृढसंधानें स्तुति
त्यानें ऐकली, तेव्हां त्याला आ
वाटलेंच, पण त्याच्या मनांत क्षुद्र मत्
मत्सराग्नीत अधिक तेल मात्र पड

तो म्हणाला,—'त्या उद्
असा विश्वासघातकीपणा

ड्डा वेळ तेथेंच सोडून दृढसंध राजा
घून गेला. राजा तेथून निघाला तो
दिवाणखान्यांत सरदार हलधराला
हें होतें, त्या दिवाणखान्यांत
दिवाणखान्याच्या दरवाज्यावर
भा होता, त्यानें राजाला तो
दिला. राजा आंत आलेला
र हलधरानें त्याला आदर-
दिलें. राजा आपल्यापाशीं
सरदार हलधराची नेहमीं
द्रा अधिक गंभीर आणि
े
ार हलधरास
सरदार, मी योजलीं येथें
लीं, याचें तुम्हांस आश्चर्य
नाहीं. ज्या गोष्टीचा निकाल
धारेवर व्हावयाचा असें
गोष्टीबद्दल आतां वादविवाद
... माझी इच्छा नाहीं. मला जें कांहीं
वयाचें आहें, तें येथें बोलण्यासारखें
रामुळें तुम्ही मजबरोबर खलबतखान्या-
यावें, अशी माझी इच्छा आहे.'

सें बोलून दृढसंध राजानें सरदार हल-
आपल्याबरोबर येण्याची खूण करून
: त्या दिवाणखान्यांतून बाहेर आला.
यानें स्वतां हातीं दिवा घेतला, आणि
हलधराला पुढें व्हावयास सांगून तो
डघामध्यें असलेल्या एका बोळांत
. हा बोळ सुमारें दोन हात रुंद असून
एका खोलीच्या चारी बाजूंनीं गेलेला
या बोळांत येतांच राजानें तेथील
जा लावून घेतला, आणि त्या बोळांतून
ा खोलीस एक प्रदक्षिणा घालून तो
खोलींत शिरला. या खोलीचें नांव
ना. या दिवाणखान्यांत चाललेलें
ेर ऐकूं जाऊं नये, म्हणून मुद्दाम
राखलेला होता. या खलबत-
लहानशी देवळासारखी रचना
, एक भव्य मूर्ति

स्थापन केलेली होती. या जागीं ज्या कांहीं गुप्त गोष्टीची चर्चा होई, त्या गोष्टी बाहेर न फोडण्यासाठीं खलबत संपलें म्हणजे या देवीच्या पायांवर हात ठेऊन शपथ घेण्याची वहिवाट असे.

या स्थळीं आल्यावर राजा हलधराला म्हणाला,–'मीं तुम्हांस या जागीं कां आणिलें हें तुमच्या ध्यानीं आलेंच असेल. उद्यां तुमच्यावर जो प्रसंग येणार आहे, त्यांतून निभावण्यासाठीं परमेश्वराची करुणा भाकावी असें जर तुम्हांस वाटत असेल, तर ही आमच्या कुळस्वामिनीची मूर्ति येथें आहे. मी तुम्हांस अशी संधि आणून दिली याबद्दल तुम्ही माझें अभिनंदन केलें पाहिजे. आतां कदाचित् तुम्ही विष्णूचे किंवा शिवाचे भक्त असाल; परंतु ज्यांचे ईश्वरविषयक विचार प्रगल्भ झालेले आहेत, त्यांना देवामध्यें आणि देवीमध्यें भेदभाव दिसत नाहीं. तुम्हाला येथें एक घटकाभर देवीपाशीं सोडून मी तुम्हांस एकांत मिळावा म्हणून येथून निघून जातों. तुम्ही आपलें मन मोकळें करून देवाची करुणा भाका!'

दृढसंध राजाच्या या कृतीचें हलधराला खरेंच आश्चर्य वाटलें होतें. परंतु त्यानें तसें दाखविलें नाहीं. दृढसंध राजानें खरेपणानें हें कृत्य केलें आहे, कीं त्याच्या मनांत कांहीं दुसरा हेतु आहे, हें पाहण्यासाठीं आपली तीक्ष्ण दृष्टि त्याच्यावर रोखून धरून सरदार हलधर त्यास म्हणाला,–'महाराज, आपला हा उदार स्वभाव पाहून मला फार आनंद वाटत आहे. उद्यां माझ्या वतीनें आपला जयकुमार द्वंद्वयुद्ध करणार आहे, [illegible] करणें प्राप्त व्हावी, म्हणून देवीची [illegible] अत्यंत जरूर आहे.'

गंभीरपणानें दृढसंध [illegible] जर त्या युद्धाचा परिणाम [illegible] तर तुमच्या दैवीं जें [illegible] भोगावयास तुम्हांस धैर्य [illegible] तुम्हीं देवीची उपासना [illegible] खंबीर करून ठेविलें पाहिजे. सध्यां जीवित आणि मरण, या दोन अवस्थांमध्यें तुम्हीं लोंबत आहां, म्हणून तुम्हाला या स्थितींतून निभावण्यासाठीं ईश्वराचें साह्य अवश्य पाहिजे आहे.'

असें म्हणून खलबतखान्याचा दरवाजा बंद करून दृढसंध राजा पुनः आपल्या खासगत दिवाणखान्यांत परत आला, आणि हेमचंद्राला बोलला,–'तो सरदार सध्या खलबतखान्यांत बसला आहे, यासाठीं तुम्ही मजबरोबर चला.'

राजाज्ञेप्रमाणें हेमचंद्र राजाच्या मागून चालूं लागला. दृढसंधानें आपल्या मनाप्रमाणें सर्व व्यवस्था केली, आणि तो पुनः खलबतखान्यांत परत आला. यावेळीं सरदार हलधराची मुद्रा अत्यंत गंभीर दिसत होती. जणुं काय तो देवीची प्रार्थना संपवून नुकताच मोकळा झाला आहे, असें त्याच्या मुद्रेवरून दिसत होतें. राजा खलबतखान्यांत आला; त्यावेळीं सरदार हलधर शांतपणानें इकडून तिकडे खेपा घालीत होता.

पूर्वीप्रमाणेंच गंभीर मुद्रेनें दृढसंध म्हणाला,–'मी आपलें भजन संपण्यापूर्वीच येथें आलों नाहींना!'

सरदार हलधरानें कांहीं न बोलतां फक्त मान हालविली, आणि तो दृढसंधामागून खलबतखान्याबाहेर आला. वाटेनें दृढसंध त्याला म्हणाला,–'अहो सरदार, सध्यांच्या प्रसंगीं मी आपल्याशीं कोणत्या रीतीनें वागावें, ही मोठी विचाराची गोष्ट आहे. उद्यांच्या द्वंद्वयुद्धाचा शेवट गोड झाला, तर ठीकच आहे. मी तुमच्यासंबंधानें शंका घेऊन जी वर्तणूक केली आहे, ती तुम्ही मनांत ठेवूं नये, कारण सध्यांची वेळच मोठी आणीबाणीची आहे. मीही पुढें तुम्हास मोठ्या सन्मानानें वागवीन, पण जर का दुर्दैवानें उद्यांच्या द्वंद्वयुद्धाचा परिणाम कडू झाला, तर तुमच्याशीं वर्तन करतांना जितकी सौम्यता धरणें आमच्या राज्यांतील नियमांस

अनुसरून योग्य होईल, तिनकी सौम्यता धरावयास मी अनमान करणार नाहीं. यासाठीं मला दैतां येईल असें कांहीं तुमच्या मनांतून मागावयाचें असेल तर मागून घ्या, मी तें देण्यास अगदीं कांकूं करणार नाहीं.'

सरदार हलधरानें शांतपणानें उत्तर दिलें,-'मला आपल्यापाशीं कांहीं मागावयाचें नाहीं.'

दृढसंध म्हणाला,-'पहा, विचार करा. तुमच्या सेवकाला देहांत शिक्षा झालेली आहे. त्याच्याशीं कांहीं बोलावें, असें तुम्हाला वाटत असेल. कारण तो तुमचा विश्वासु सेवक आहे. शिवाय उद्यांच्या द्वंद्वयुद्धाचा शेवट कांहींही होवो, त्याला जी शिक्षा दिलेली आहे, ती त्याला भोगणें भाग आहे.'

हलधरानें थोडा वेळ विचार करून म्हटलें,-'सध्यांच्या प्रसंगीं आपण मजपाशीं इतक्या औदार्यानें वागलां, हें पाहून मला फार समाधान होत आहे, आणि ज्या अर्थीं आपण मनांत होऊन मला माझ्या सेवकाची भेट घेऊं देत आहां, त्या अर्थीं मी आपल्या देणगीचा स्वीकार करतों. मी आपल्या सेवकाची गांठ घेण्यास तयार आहें.'

दृढसंध म्हणाला,-'ठीक आहे; आतां लवकरच आपली व आपल्या सेवकाची गांठ पडेल.' असें बोलून हलधराला त्याच्या दिवाणखान्यांत सोडून तो तेथून निघून गेला.

दृढसंधानें ज्या ठिकाणीं सत्यरथाला कोंडून ठेविलें होतें, तेथील दरवाजा पहारेकऱ्याकडून उघडवून त्यानें त्यास बाहेर यावयाची आज्ञा केली. तो बाहेर आल्यावर दृढसंध त्याला म्हणाला,-'अरे सत्यरथा, तुझ्या धन्याच्या विनंतीवरून मी तुला त्याच्या बरोबर दोन घटका संभाषण करण्याची परवानगी देत आहें!'

सत्यरथ म्हणाला-'महाराज, हे आपले मजवर फार उपकार आहेत. मी त्यांची भेट घेण्यास तयार आहें.'

दृढसंध बोलला,-'तरमग चल मजबरोबर.' असें बोलून तो त्याला बरोबर घेऊन हलधराच्या दिवाणखान्यापाशीं आल्यावर तेथील पहारेकऱ्यानें त्या दिवाणखान्याचा दरवाजा उघडला, आणि सत्यरथ आंत गेल्यावर पहारेकऱ्याकडून दरवाजा बंद करवून दृढसंध तेथून निघून गेला.

आपल्या धन्यापाशीं सत्यरथ मोठ्या नम्रतेनें उभा राहिला. त्याला आपल्या जन्मभाषेमध्यें हलधर म्हणाला,-'सत्यरथा, ये, सध्यां तुजवर जो प्रसंग आला आहे, त्याबद्दल मला फार खेद होत आहे.'

सत्यरथ म्हणाला,-'मी आजचा दिवस ज्या जागेंत घालविला ती जागा जरी या जागेपेक्षां अधिक वाईट आहे, तरी आम्ही उभयतांही एकाच स्थितींत आहों, याचें मला फार वाईट वाटतें. आपण स्वतंत्र असून माझे एकट्याचे कितीही हाल झाले असते, तरी त्यांत कांडीमात्र दुःख झालें नसतें. मी मोठ्या आनंदानें आपली शिक्षा भोगिली असती.'

नेहमींच्यापेक्षां अधिक जलदीनें आणि विशेषप्रकारच्या परंतु हलक्या स्वरानें हलधर त्याला म्हणाला,-'आपणा उभयतांला दोन घटका एकत्र संभाषण करण्याची संधि मिळाली आहे, ती आपण अशा प्रकारच्या निरर्थक गोष्टी बोलून व्यर्थ घालविणें रास्त नाहीं. यासाठीं आपण प्रथम कालच्यासारखी या दोन्ही जागांची तपासणी करून आपलें भाषण कोणी ऐकत नाहीं, अशी आपली खात्री करून घेऊं.'

सत्यरथही त्याच स्वरांत म्हणाला,-'इतका सावधपणा ठेवण्याची कांहींच गरज नाहीं. कारण आपली जन्मभाषा ज्याला [illegible] कोणी मनुष्य प्रतापपुरांत [illegible] मला वाटत नाहीं.'

[illegible] म्हणाला,-'तुझें बोलणें [illegible] तरी गृहीत धरिलें, तरी [illegible] नाची खात्री करून घेतली [illegible] नाहीं. यासाठीं हा दिवा [illegible] रोबर मुकाट्यानें त्या पलं-

कडच्या-काल तूं निजलेल्या-जागेंत चल; आपण प्रथम तेथपासूनच प्रारंभ करूं या.'

आपल्या धन्यानें ही आज्ञा अगदीं मनापासून केली आहे, हें त्या धूर्त सेवकानें एकदम ओळखिलें आणि तो एकही शब्द न बोलतां हातीं दिवा घेऊन त्याच्याबरोबर निघाला. ते दोघे पलीकडच्या जागेंत जातांच हलधरानें आपल्या ओठावर बोट धरून आणि अर्थसूचक दृष्टीनें सत्यरथाकडे पाहून त्याला सावध रहाण्याची खूण केली. त्यावेळची सरदार हलधराची विलक्षण मुद्रा पाहून त्याचें मन ताळ्यावर नसावें, असें प्रथम सत्यरथाच्या मनांत आलें. आपल्या सेवकाला आपल्या खुणेचा अर्थ समजला [redacted] नंतर [redacted] चळांथेला पाहिजे, हे नीट ध्यानांत ठेव, आणि सावधपणानें आपण कर!'

आतां मात्र सत्यरथाच्या मनांत झक प्रकाश पडला, आणि त्यानें अर्थदर्शक मुद्रेनें आपल्या धन्याकडे पाहिलें. नंतर त्यांनीं मोठ्या काळजीनें त्या खोलीची तपासणी करण्याचा अभिनय केला.

कांहीं वेळ तपासणी करून झाल्यावर सरदार हलधर म्हणाला,-' मला फक्त याच जागेबद्दल शंका होती. पण येथें कोणी नाहीं अशी माझ्या मनाची खात्री झाली, हें बरें झालें. आतां आपणास जो दोन घटका वेळ दृढसंधमहाराजांच्या कृपेनें मिळाला आहे, तेवढ्याचा आपण उपयोग करून घेऊं या!'

असें म्हणून ते दोघे बाहेरच्या मोठ्या दिवाणखान्यांत आले. त्याठिकाणीं फक्त पलंगाखालींच कायतो त्यांनीं शोध केला, कारण तेथें माणूस लपून बसण्यासारखी दुसरी जागाच नव्हती. नंतर हलधर एका आसनावर बसला आणि म्हणाला,-' सत्यरथा, तूं माझा सेवक तर [redacted] तुला याक्षणीं आपला मित्र [redacted] कारण यापुढें तुझी माझी [redacted] आणि आपण पुनः एकमे[redacted] हें अशक्यच दिसत आ[redacted] तांचाही उद्यांचा भरंवसा [redacted] एकानें आपण धनी आ[redacted] आपण सेवक असें मानणें [redacted] आहे. ज्या नौकेंत आप[redacted] त्या नौकेला एक भोंक पड[redacted] जोरानें पाणी येत आहे, अ[redacted] उसपून टाकण्यास दोन [redacted] आहे. अशा वेळीं एकानें [redacted] असें समजून मेहनत न [redacted] आणि यजमान या उभयतांपैकी एकच परिणाम व्हावयाचा. ही गोष्ट नेहमीं ध्यानीं धरली पाहिजे.'

[redacted] हणून हलधरानें सत्यरथाला आपल्या आसनावर बसविण्यासाठीं त्याला जवळ ओढलें. पण सत्यरथ त्या आसनावर न बसतां खालीं जवळच जमिनीवर बसला.

अत्यंत गंभीर आणि शांत स्वरानें सरदार हलधर म्हणाला -' मित्रा सत्यरथा, आपणा उभयतांनीं ज्यावेळीं या दरींत पाऊल ठेविलें ती वेळ कोणती होती नकळे! आम्ही जरी अगदीं शुद्ध आणि पवित्र हेतु मनांत धरून या दरींत आलों आहों, तरी हे येथील मूर्ख लोक आम्हांस कपटी हेर मानीत आहेत, हें आश्चर्य नव्हे काय? ज्या ठिकाणीं मूर्ख भिल्लांचें इतकें वर्चस्व आहे, त्याठिकाणीं असा प्रकार व्हावयाचा यांत कांहीं आश्चर्य नाहीं. माझ्या हातून तो गरुडपक्षी मेला; त्यामुळें आमच्यावर हा भलताच प्रसंग ओढवला आहे! उद्यांच्या द्वंद्वयुद्धाचा परिणाम कांहींही होवो. दृढसंधराजानें आमच्याशीं जें हें वर्तन केलें आहे, त्याबद्दल त्याला आज ना उद्यां, केव्हां तरी पश्चात्ताप झाल्याखेरीज रहाणार नाहीं. असो! सध्यां त्यानें तुला तर देहान्त शिक्षा दिलीच आहे!'

सत्यरथानें [illegible] उत्तर दिलें,–' धनी[illegible], मी [illegible] अगदीं भीत नाहीं. आपल्या [illegible] हातांमध्यें मीं तरवार गाजविली [illegible] मृत्यूचीं अनेक स्वरूपें मीं [illegible] तथापि उघड्या मैदानांत [illegible] वीराप्रमाणें मरण आलें [illegible] आनंदच वाटला असता, [illegible] कारक मरण येणार, याचा [illegible] आहे ! '

पूर्ववत् गंभीर स्वरानें [illegible] –' सत्यरथा, ज्या अपराधा[illegible] ही शिक्षा सांगितली आहे [illegible] तूं आपला उगीच त्यांना [illegible] किंवा तुझ्या स्वतांच्या लाभ[illegible] नाहींस. संकटांत सांपडलेल्या आपल्या [illegible] मानाला सोडविण्यासाठीं केवळ स्वामि[illegible] प्रेरित होऊन तूं नी गोष्ट केलींस ही [illegible] मनाची खात्री आहे. आपली पू[illegible] कल्पना होती, तसे हे बागलाणांतील संस्थानिक जर खरे शूर आणि दिलदार असते, तर त्यांनीं तुला ही अशी भयंकर शिक्षा कधींच सांगितली नसती ! आमच्यासंबंधानें त्यांच्या मनांत शंका उत्पन्न झाल्या ही त्याची चूक आहे, असें मी म्हणत नाहीं; पण आपल्या मनांत आलेल्या शंकेचें निरसन त्यांनीं योग्य मार्गानें करून घेतलें नाहीं, याबद्दल मला वाईट वाटतें. सध्यांची स्थिति कशी आहे ? आम्ही अगदीं उच्च आणि पवित्र हेतु मनांत धरून ते साध्य करण्याचे कामीं या बागलाणांतील संस्थानिकांचें साह्य संपादन करावयास इकडे आलों; जर या संस्थानिकांनीं आम्हांस योग्य रीतीनें वागविलें असतें, तर त्यामुळें त्यांचा केवढा फायदा झाला असता ? ज्या निंबराजाची मी आजपर्यंत इतक्या मनोभावानें सेवा केली, त्याच निंबराजानें आम्हांस हद्दपार केलें यामुळें त्या निंबराजाचा सूड घ्यावा, आणि त्यानें योजलेले बेत सिद्धीस जाऊं नयेत, म्हणून माझ्यासारख्या दुसऱ्या कित्येक सरदारांच्या संमतीनें मी इकडे आलों. आम्ही हद्दपार झालेले लोक निंबराजाला नकोसे झालों होतों, याचें कारण जर या लोकांच्या पुरतें ध्यानीं येतें; तर यांनीं आम्हाला अशा अपमानकारक रीतीनें वागविलें नसतें. आमच्या मुखानें निंबराजानें योजलेले बेत या संस्थानिकांस समजते, तर ते फसविण्यास यांस विलंब लागला असता काय ! आमचे हेतु अशा प्रकारचे असल्यामुळें आमचें येथें आगतस्वागत फार उत्तम झालें पाहिजे होतें; पण माझ्या हातून गरुडपक्षी मरतो काय ! आणखी तेवढ्यासाठीं हे मला कपटी समजतात काय ! सगळाच वेडेपणा ! [illegible] स्वतः आपल्या तोंडानें सर्व खरी खरी [illegible] चरे ऱ्या कोलावर [illegible] काठें आहे ! आतां द्वंद्वयुद्धावर काय तो आमचा सोक्षमोक्ष ठरलेला आहे ! सत्यरथा, तुला आपल्या धन्याच्या कीर्तीचा अभिमान वाटला, आणि माझी अब्रू त्या धर्मिष्ठाच्या हातीं आहे असें जाणून तूं त्याच्या मनांत माझ्याविषयीं चांगले विचार भरवून देण्यासाठीं देवीच्या देवळांत गेलास. यांच्या नियमांप्रमाणें जरी हा तुझ्या हातून मोठा अपराध घडला असला, तरी असें करण्यांत तुझे हेतु काय होते, याचा त्यांनीं विचार करावयास हवा होता. त्यांनीं देवभोळेपणानें आमचीं मनें कशीं आहेत, हें कोलावरून पारखण्याचा बेत योजला. हा बेत आपणास फायदेशीर व्हावा, आणि यांचें नुकसान होऊं नये, म्हणून तूं त्या जांघिळाच्या मनावर योग्य परिणाम उत्पन्न करण्यासाठीं तिकडे गेलास, यांत माझ्या दृष्टानें गैर असें कांहीं नाहीं. या देवभोळ्या लोकांबरोबर चुलिवाद करून निभाव लागावयाचा नाहीं, अशी तुझी खात्री असल्यामुळें तूं ती युक्ति

योजिली होतीस. हाच काय तो तुझा अपराध ! खरेंच सांगतों, या अपराधासाठीं जर यांनीं तुझा प्राण घतला, तर प्रतापपुरकरांच्या नांवास जो कलंक लागेल,तो कधींही नाहींसा होणार नाहीं. '

सत्यरथ म्हणाला,–' माझ्या अंतकाळीं आपलें मन मजविषयीं निर्मळ आहे, हें समजून आल्यामुळें मला फार समाधान होत आहे. मी जी कांहीं आपली सेवा केली तिचें महत्त्व आपल्या लक्ष्यांत आलें, यांतच मी आपणांस धन्य मानून घेतों. वास्तविक पाहिलें, तर आपली स्थिति मोठी चमत्कारिक झालेली आहे. त्यांच्या दृष्टीनें पाहिलें, तर मी अपराध केला आहे, म्हणून माझ्याशीं संबंधाचें त्यांचें वर्तन क्षम्य होईल, पण ते आपल्यावर इतका गहजब करतात, तो काय म्हणून ? आपण जाणूनबुजून या प्रतापपुरकरांनां पीडा केली आहे, किंवा त्यांची आगळीक केली आहे, असें त्यांस सिद्ध करून देतां येईल काय ! आपलें कोंकरूं गरुडपक्ष्यानें नेलें, म्हणून ती प्रियंवदा ओरडूं लागली असतां आपण धाडसीपणानें पुढें होऊन त्या उडत्या पक्ष्यावर बरोबर नेम धरला, याबद्दल यांनीं आपली तारीफच करावयास हवी होती. आपला सोक्षमोक्ष काय तो उद्यांच्या द्वंद्वयुद्धावर अवलंबून आहे. आतां मला अशी शंका येते, कीं उद्यांच्या द्वंद्वयुद्धानें होणाऱ्या निकालावर तरी यांचा विश्वास बसेल कीं नाहीं ! कीं कौलावर विश्वास नाहीं म्हणून जसें द्वंद्वयुद्ध, तसें द्वंद्वयुद्धावर विश्वास नाहीं म्हणून आणखी एकादी क्लृप्ति निघणार नाहीं कशा वरून ? आपण म्हणतां, कीं त्यांनीं माझा प्राण घेतला तर त्यांच्या नांवाला कलंक लागेल; पण मी म्हणतों, कीं त्यांनीं जर आपल्यासारख्या सर्वस्वी त्यांच्यावर विश्वास ठेवून त्यांच्या वाड्यांत राहत असलेल्या पाव्हण्याचा जीव घेतला, तर त्यांच्या नांवास जो कलंक लागेल तो माझ्या मृत्यूनें लागणाऱ्या कलंकापेक्षां अधिक अक्षय्य होईल ! उद्यांच्या युद्धांत जर त्या शेखराला यश आलें, तरी त्यांची कीर्ति कायम राहील; यासाठीं आपण त्या उदार स्वभावाच्या राजपुत्राला यश मिळावें आणि त्याच्या कुळाला कलंक लागूं नये, म्हणून ईश्वराची मनोभावानें प्रार्थना केली पाहिजे. '

सरदार दलधर म्हणाला,–' सत्यरथा, आपणास परस्परांची भेट घेण्याची जी ही संधि मिळाली आहे, ती अशी झाल्या गेल्या गोष्टींचा खेद करण्यांत घालवून उपयोग नाहीं. आतां हें मात्र खरें आहे, कीं ज्यांनीं कोणत्याही प्रकारें दुसऱ्यांस पीडा दिलेली नाहीं, किंवा दुसऱ्याचें अकल्याण चिंतिलें नाहीं, त्यांना अशा संकट समयीं आपल्या पूर्वीच्या शुद्ध वर्तनाच्या स्मरणानें समाधान होत असतें. आपण जर खरोखर अपराधी असतों, तर आपल्या मनाला आज असें समाधान वाटलें असतें काय ? आपल्या हातून कोणाचा अन्याय घडलेला नाहीं, ही केवढ्या समाधानाची गोष्ट आहे बरें ! '

सत्यरथ म्हणाला,–' अविचारी मनुष्याचें हित कधींही होत नाहीं, याचें उदाहरण पहावयाचें असल्यास या प्रतापपुरकरांचेंच पहा ! त्यांनीं जर असा अविचार केला नसता, तर त्यांना त्या निंबराजाचीं तीं कारस्थानें समजलीं नसतीं काय ? कारस्थानें जर त्यांना समजलीं असतीं, तर त्यांत रत्नाकर महाराजांचें आणि या बागलाणांतील सर्व संस्थानिकांचें किती हित झालें असतें ! निंबराजानें ज्यांना अविचारानें हद्दपार केलें, त्याला त्यांचीं सर्व कारस्थानें माहीत आहेत, आणि त्यांचे हितचिंतक अद्यापि निंबराजाच्या दरबारीं असून ते गुप्तपणानें हद्दपार झालेल्यांना कशी इत्थंभूत माहिती देतात, तें यांना काय माहीत ? दुर्दैवानें उद्यांच्या द्वंद्वयुद्धाचा निकाल आपल्याला प्रतिकूल झाला, आणि त्यांनीं आपला उद्यां घात केला, तरी पुढेंमागें लवकरच त्यांना आपली चूक आढळून येईल,

आणि पश्चात्तापानें हळहळत बसावें लागेल हें उघड आहे. पश्चात्तापानें मनाला एकसारखी तळमळ लागलेली असावी, याहून अधिक शिक्षा ती कोणची !'

सरदार हलधर म्हणाला,–'होय; आपल्या अविचाराच्या कृत्यांबद्दल या दृढसंघ राजाला पुढें लवकरच तळमळत बसावें लागेल, यांत शंका नाहीं. बरें, पण आतां आपण असें झाल्या–गेल्या गोष्टींचें वर्णन करीत बसून वेळ घालविणें बरोबर नाहीं. दृढसंघ महाराज तुला परत घेऊन जाण्यासाठीं लवकरच येथें येतील. त्यापूर्वी माझें एक कर्तव्य मला केलें पाहिजे. माझ्यामुळें तुजवर हें प्राणांताचें संकट ओढवलें आहे, म्हणून मीं तुझ्याजवळ मोकळ्या मनानें क्षमा मागितली पाहिजे. म्हणून मी–

सत्यरथ मध्येंच म्हणाला,–' धनीसाहेब, हें काय भलतेंच बोलतां आपण ? आपण माझी क्षमा मागावयाची ! छे छे ! असें कधीं होतां नये ! जेव्हां एक मनुष्य दुसऱ्याची सेवा करावयास सिद्ध होतो, तेव्हां आपल्या धन्याच्या उत्कर्षाच्या योगानें आपला लाभ होईल, असें समजत असतो. जर त्याला आपल्या धन्याच्या संपत्तीचा वांटा घ्यावयाची इच्छा असते, तर त्यानें त्याच्या विपत्तीचा वांटा घेण्यास तितक्याच मानानें तयार असलें पाहिजे ! सेवाधर्म हा अशा प्रकारचा असल्यामुळें सेवकानें धन्यासाठीं आपला प्राण देणें हें त्याचें कर्तव्यच आहे. हें कर्तव्य त्यानें केलें, तर त्यांत त्यानें आपल्या धन्यावर उपकार केले, असें होत नाहीं. आणि त्याबद्दल धन्यानें नोकराची क्षमा मागण्याचें बिलकुल कारण नाहीं. उलट आजपर्यंत माझ्या हातून अज्ञानानें जे अपराध घडले, त्यांबद्दल आपण मला कधींही दोष दिला नाहीं, आपण पित्याप्रमाणें माझे सर्व अन्याय सहन केले, आणि माझें आपण पुत्रवत् पालन केलें, हे आपले मजवर अनंत उपकार आहेत. पण हें काय ? बाहेर कोणाचीं पावलें वाजत आहेत. आतां लवकरच ताटातूट होईल. यासाठीं मीच आपल्या पायां पडून आपल्यापाशीं क्षमा मागतों !'

सरदार हलधर चटकन् उभा राहून आणि त्याला वरचेवर उभा करून म्हणाला,–'कदाचित् आपली उद्यांही गांठ पडेल !'

सत्यरथ म्हणाला,–' ईश्वर करो, आणि तसें न होवो ! कारण उद्यां आपली गांठ त्या राजकुमाराचा पराभव झाल्याखेरीज पडण्याचा संभवच नाहीं. म्हणून म्हणतों, ईश्वर आपणास सुखी ठेवो !'

त्याला कडकडून आलिंगन देऊन सरदार हलधर म्हणाला,–' माझ्या रक्षणकर्त्या, माझ्या मित्रा, ईश्वराच्या मनांत आलें, तर अजूनसुद्धां तो आपलें उभयतांचेंही रक्षण करील !'

ते दोघेजण परस्परांच्या बाहुपाशांत बद्ध झाले असतां त्यांना एकाएकीं कोणी स्फुंदत असल्याचा ध्वनि ऐकूं आला ! तथापि त्यांनीं अत्यंत आश्चर्य झाल्याप्रमाणें मुद्रा करून एकमेकांकडे अवलोकन केलें. कारण हा ध्वनि कोठून आला हें त्यांस पक्कें माहीत होतें.

सरदार हलधर हळूच म्हणाला,–' सत्यरथा, ऐक. तुला कांहीं ऐकूं आलें नाहीं ?'

सत्यरथ म्हणाला,–' होय; मला कांहीं चमत्कारिक शब्द ऐकूं आला खरा.' असें बोलून त्या उभयतांनी संशयित दृष्टीनें आपल्या भोंवतीं अवलोकन केलें.

नंतर हलधर म्हणाला,–' मला आवाज ऐकूं आला, यांत कांहीं शंका नाहीं. पण मला वाटतें, तो ध्वनि तुझ्याच कंठांतून बाहेर पडला असावा. या आपल्या शेवटच्या भेटीच्या वेळीं तूं स्फुंदत असावास अशी माझी कल्पना आहे !'

सत्यरथ म्हणाला –' धनीसाहेब, माझें अंतःकरण इतकें दुर्बल नाहीं. आणि जरी कदाचित् आपणावरील संकटामुळें मीं याचा अंतःकरण कळवळून त्यांतून असें स्फुं ती येऊ पडूं लागलें असतें, तर मीं

दाबून टाकलें असतें. मला वाटतें, महाराज, आपल्याच मुखांतून–'

हलधरानें उत्तर केलें,–'तुझ्यासंबंधानें माझा अंतरात्मा तिळतिळ तुटत आहे, ही गोष्ट खरी; तरी मी आपल्या मनाची दुर्बलता व्यक्त करून तुला आणखी खेद होऊं दिला नसता. मला वाटतें आपणास कांहीं तरी ऐकूं आल्याचा भ्रम झाला असावा!'

इतक्यांत त्या दिवाणखान्याचा दरवाजा उघडल्यामुळें त्यांचें भाषण तितकेंच थांबलें. आपल्या दोन सेवकांसह दृढसंध तेथें आला, तोंच आणि त्यानें त्यांच्या भेटीचा प्रसंग संपला नसल्यास आणखी वेळ देण्याची आपली इच्छा प्रदर्शित केली.

तेव्हां हलधरानें उत्तर केलें,–'महाराज, आतां आम्हास आणखी कांहीं बोलावयाचें नाहीं. ज्या प्रसंगामुळें सध्यां या माझ्या विश्वासु सेवकाचा जीव धोक्यांत पडला आहे, त्या प्रसंगासंबंधानें आम्हाला जें काय बोलावयाचें होतें तें आम्हीं बोलून सोडलें आहे. कृपा करून आपण आम्हांस ही परस्परांस भेटावयाची संधि दिली, हे आपले आम्हावर मोठे उपकार आहेत. आम्ही परस्परांची शेवटची भेट घेतली आहे, आतां आम्हांस कांहीं बोलावयाचें नाहीं.'

दृढसंध बोलला –'सत्यरथा, तर मग तूं या माझ्या सेवकांबरोबर जा. ते तुला तुझ्या पूर्वीच्या जागीं नेऊन पोंचवितील.'

सत्यरथ आपल्या धन्याकडे पाहून म्हणाला,–'महाराज, येतों तर मी आतां या गरीब सेवकाचें स्मरण ठेवा!' बोलून तो अगदीं धिम्या पावलांनीं सह त्या दिवाणखान्यांतून बाहेर प

तो निघून गेल्यानंतर दृढसंध तेथेंच घुटमळत उभा राहिला तो त्या सरदारास म्हणाला, अनेक कारणांमुळें तुम्हांला खान्यांत ठेवणें मला इष्ट व साठीं मी तुमच्या शयनाची प्रशस्त अशा एका [illegible] उग्र आणि क्रूर ठेवविली आहे.' [illegible] सध्यां काय

त्या दिवाणखान्याच्या दरवाजांतून कलून आपली दृष्टि फिरवीत सरदारानं खंबीर म्हणाला,–'मला कोंडून ठेवण्याइतकाला-दिवाणखाना भक्कम नाहीं, असें तुम्हांस वाटतें कीं काय!'

दृढसंध संथपणानें म्हणाला,–'तसें नाहीं कांहीं, माझ्या वाडयांतील सोई–गैरसोईंचा विचार करणें हें माझें कर्तव्य आहे. म्हणून मीं पूर्ण विचार करून तुमच्यासाठीं दुसऱ्या एका दिवाणखान्याची योजना केली आहे.'

सरदार हलधर म्हणाला,–'ठीक आहे. मला काय! कोठेंही डोकें टेंकण्यास जागा असली, म्हणजे पुरे! मी आपल्याबरोबर आपण न्याल तिकडे येण्यास सिद्ध आहें.'

हें ऐकतांच दृढसंधानें एका दुसऱ्याला हांक मारली, आणि पूर्वी योजून ठेवलेल्या दिवाणखान्यांत सरदार हल[illegible] नेऊन पोंचविण्याचा त्यानें त्याला

सरदार हलधर बरा[illegible]
दृढसंधानें त्या दि[illegible]
लावून घेतला, [illegible] तेथें
असलेल्या चि[illegible] म्हणाला,–
'अहो पंडि[illegible] या अवघड
जागे[illegible] ण नाहीं.'

[illegible] लपून असलेला
[illegible] होय; अशा रीतीनें
[illegible] करितां आपणच आप-
[illegible] धरून राहणें फारच कठीण
[illegible] शंका नाहीं. असें बोलत त्यानें
[illegible] रखाण काढून टाकलें, आणि
[illegible] हावरेपणानें बाहेरील ताज्या हवेमध्यें
[illegible] सास घेऊं लागला.

दृढसंध त्याच्या चिलखताचे बंद सोडीत असतां म्हणाला,–'पंडितराय, आधीं सांगा, तुम्हीं जें ऐकलें, त्यावरून हे मनुष्य कसे [illegible] काय आहेत!'

आणि पश्चात्तापानें पण गंभीरपणानें उत्तर हें उघड आहे. ' भले माणूस आहेत. '
सारखी तळहळसंधानें पुनः कांहीं विचारले अधिक किंवा आपणास जें काय वाटत होतें,

आपल्या मुद्देवरून त्या पंडिताच्या व्यानांत येऊं दिलें नाहीं. त्यानें भराभर बंद सोडून त्याला चिलखतांतून बाहेर काढलें.

नंतर तो त्यास म्हणाला,–' तर मग आतां मजबरोबर चला. ' असें बोलून दृढसंध राजा त्या पंडितांसह तेथून निघाला, आणि ज्या दिवाणखान्यांत त्याची पत्नी मेधावती आणि वडील पुत्र चूडामणि हीं दोघें त्याची वाट पहात बसलीं होतीं, त्या दिवाणखान्यांत येऊन दाखल झाला.

त्याला पहातांच राणीनें मोठ्या आतुरतेनें आपल्या युक्तीचा परिणाम काय झाला याची चौकशी केली. त्यावेळीं त्यानें चमत्कारिक गर्वानें निराशेनें मान हालवून म्हटलें,–' ह्या पंडितराजांच्या सांगण्यावरून ते भले गृहस्थ [illegible] समजलें. '

[illegible] एकून राणी मेधावतीचा [illegible] कारण आतां कांहीं [illegible] नाहीं, अशी तिच्या मनाची [illegible]. आतां द्वंद्व-युद्धाचा [illegible] हलधराला एकदम [illegible] पुढें आणतां येण्यासारखा [illegible].

दृढसंध राजानें [illegible] ' पंडितराय, तुम्हा [illegible] गाहिलां असता जें [illegible] आणि जें कांहीं तुमच्या [illegible] सर्व सांगा पाहूं ! '

हेमचंद्र बोलला,–' त्या दोघां[illegible] आपल्या दिवाणखान्याची आणि [illegible] पलीकडे असलेल्या जागेची सावकाश[illegible] तपासणी करून आपलें भाषण कोणी ए[illegible] नाहीं, अशी आपल्या मनाची पक्की खा[illegible] करून घेतली; आणि नंतर ते दोघे अर्धो[illegible] आसनांवर बसले. नंतर ते बोलूं लाग[illegible]

त्यावेळीं प्रथम त्यांनीं आपणांवर आलेल्या सर्व संकटांसंबंधाच्या गोष्टींचा पाढा वाचला. यावेळीं ते अगदीं मोकळ्या मनानें आणि अगदीं सत्यास स्मरून बोलत होते, यासंबंधानें माझ्या मनांत अगदीं शंका नाहीं. त्यांनीं तुमच्यासंबंधानें बोलतांना गैरशिस्त भाषण अगदीं केलें नव्हतें. फक्त आपण त्यांच्याशीं संशयानें वर्तन केलें, याबद्दल त्यांनीं खेद प्रदर्शित केला. जर आपण त्यांच्याशीं योग्य वर्तन केलें असतें, तर त्यांच्यापासून तुम्हांला पुष्कळ गुप्त गोष्टी समजल्या असत्या; असें ते म्हणत होते. ते आपल्या जन्मभोपेमध्यें जें कांहीं बोलत होते, त्यावरून ते भले माणूस असून त्यांनीं या दरींत पाऊल ठेवल्यापासून त्यांच्याविषयीं आपल्या मनांत विपरीत ग्रह उत्पन्न झालेला आहे, अशी माझी समजूत आहे. आपल्याला काय सांगूं ? त्यांनीं जेव्हां शेवटची भेट घेतली, तेव्हां त्यांचीं अंतःकरणें परस्परांवरील प्रेमानें अगदीं उचंबळून आलीं होतीं. तो करुणाजनक देखावा अवलोकन करून मला मोठा गहिंवर आला, आणि माझ्या मुखांतून स्फुंदनाचा ध्वनि बाहेर पडला. हा ध्वनि त्यांना ऐकूं गेला, पण आपल्याखेरीज 'येथें कोणी तिसरें माणूस नाहीं, अशी त्यांच्या मनाची खात्री असल्यामुळें त्यांनीं त्या स्फुंदनाचा परस्परांवर आरोप केला. इतक्यांत आपण दरवाजा उघडला म्हणून बरें झालें. नाहीं तर माझी फजिती होण्याचा वेळ आली असती ! '

दृढसंध नें विचारलें,–' तर मग त्यांचें [illegible]आपण काय झालें, तें विस्तारपूर्वक [illegible]केंद्र प्रकार मोठा विलक्षण दिसतो. [illegible]णावरून ते तर सच्चे गृहस्थ [illegible]हें जर खरें, तर आजपर्यंत आ-[illegible]नांवर आणि दैविक गोष्टींवर [illegible] आले, तें व्यर्थच कीं काय ? [illegible]ा द्विधा झालें आहे. यासाठीं

त्याच्या मुद्रेवर अणुमात्र देखील दिसत नव्हतें. आपणास जें कृत्य करावयाचें आहे, त्याची त्याला बिलकुल दरकार नव्हती. तो नेहमींप्रमाणें आपल्या भव्य व तेजःपुंज दृष्टीनें सिंहासारखा आसमंतात् अवलोकन करीत अस्खलित गतीनें हेमचंद्राबरोबर चालला होता. राजकुटुंबांतील मंडळी दृष्टीस पडतांच जमलेल्या भिल्लांनीं त्यांच्या जय-जयकारानें आकाश दुमदुमवून सोडिलें, रण-वाद्यें वाजूं लागलीं, आणि त्यांच्या उत्साह-वर्धक स्वरानें युद्धकर्मैकनिष्ठ भिल्लवीर–समूहांचे भुजदंड वीरश्रीनें स्फुरण पावूं लागले. भिल्ल स्त्रिया आणि मुलें, यांनांही हा रण–वाद्य–ध्वनि अश्रुतपूर्व नव्हता. त्यामुळें त्या ध्वनीच्या प्रभावानें त्यांचीं अंतःकरणेंही उत्साहयुक्त झालीं, त्यांच्या मुद्रा उल्लसित दिसूं लागल्या; त्यांनीं विजय–शब्दोच्चारानें रणवाद्यांच्या ध्वनीमध्यें आणखी भर घातली.

रणवाद्यगजर दुमदुमत असतांच दृढसंध राजा त्याजसाठीं सिद्ध करून ठेवलेल्या आसनावर विराजमान झाला. त्याचे भिल्ल-मानकरीही मोठ्या आदबीनें आपापल्या योग्यतेप्रमाणें आसनांवर अधिष्ठित [illegible] होत्या, आणि [illegible] कातडयाचा ढाल [illegible] अशी गेंड्याच्या [illegible] आपणांस विजयप्राप्ति होईल, असें त्यांस वाटत होतें. द्वंद्वयुद्धामध्यें मनाची खात्री असल्याशिवाय अशी शेखरोत्साही आणि प्रसन्न [illegible] त्याची गंभीर मुद्रेनें आपल्या प्रतिस्पर्धी होतेंत उभा राहिला असतां त्याची [illegible] कडेक्त मुद्रा पाहून त्याच्या मातें–पितरांस वीरप्रसविनी झाल्याबद्दल धन्यता वाटली, आणि आपला [illegible] मोगजे प्रत्यक्ष मदनाची मूर्तिच [illegible] पतिवंदेला वाटूं लागलें.

जांघिळाची मुद्रा अत्यंत उग्र आणि क्रूर दिसत होती. त्याच्या मनांत सध्यां काय चाललें असावें, हें त्याच्या मुद्रेवरून कळून येणें शक्य नव्हतें. त्यामुळें त्याचें मन खंबीर होतें, कीं तो युद्धास कचरत होता, हें कळावयास मार्ग नव्हता. या प्रसंगीं जांघिळाचें यथार्थ वर्णन करणें जरी बिकट आहे, तरी पिंजऱ्यामध्यें बरेच दिवस कोंडून ठेवल्यामुळें क्षुधित झालेल्या वाघाची उपमा त्याला दिली असतां त्याच्याविषयीं बरीच योग्य कल्पना वाचकांच्या ध्यानीं येईल. त्याचें तें धिप्पाड शरीर, आणि कसलेले अवयव, व शेखराचें कृश शरीर आणि नाजूक अवयव, हीं त्या-वेळीं एकदम स्पष्ट दिसून येत असल्यामुळें, शेखराच्या वामनमूर्तीचा पराभव करावयास त्या राक्षसाला आपल्या अंगची अर्धी शक्ती-सुद्धां खर्च करावी लागणार नाहीं, असें कोणाच्याही मनांत आलें असतें.

अशा प्रकारें अगदीं असमान दिसणारे योद्धे रणांगणांत उभे राहिलेले पाहून कोणीही आनंद प्रदर्शित केला नाहीं. कारण ते दोघेही जमलेल्या सर्व मंडळींचे आवडते होते. एकाला उत्तेजन दिल्यास त्यांत दुसऱ्याचा [illegible] होईल, असें त्यांस वाटत होतें. [illegible] सर्व भिल्लांमध्यें 'सशक्त आणि [illegible] प्रसिद्धि असल्यामुळें त्याचा [illegible] मान होता; आणि [illegible] असून आपल्या अंगच्या [illegible] स भिय झालेला अस-[illegible] भिल्ल मान राखीत असत.

[illegible] उतरल्यावर एका टोंकास [illegible] राहिला व दुसऱ्या टोंकास [illegible] राहिला. युद्धासंबंधानें कांहीं प्रश्न [illegible] त्याचा निकाल करण्या-[illegible] प्रमाणें पंच नेमून झाले. दृढ-[illegible] ईश्वराची शपथ घेऊन निष्पक्ष-[illegible] काल करण्याची प्रतिज्ञा केली, [illegible] सरपंच झाला. रणवाद्यें वाजा-[illegible] घलीं, सर्व लोकांचें आखाडयाकडे

आणि पश्चात्तापानें पण गंभीरपणानें उत्तर हें उघड आहे. ' भले माणूस आहेत. '

सारखी तळहळसंधानें पुनः कांहीं विचारले अधिक झिवा आपणास जें काय वाटत होतें,

आपल्या मुद्रेवरून त्या पंडिताच्या ध्यानांत येऊं दिलें नाहीं. त्यानें भराभर बंद सोडून त्याला चिलखतांतून बाहेर काढलें.

नंतर तो त्यास म्हणाला,–' तर मग आतां मजबरोबर चला. ' असें बोलून दृढसंध राजा त्या पंडितांसह तेथून निघाला, आणि ज्या दिवाणखान्यांत त्याची पत्नी मेधावती आणि वडील पुत्र चूडामणि हीं दोघें त्याची वाट पहात बसलीं होतीं, त्या दिवाणखान्यांत येऊन दाखल झाला.

त्याला पहातांच राणीनें मोठ्या आतुरतेनें आपल्या युक्तीचा परिणाम काय झाला याची चौकशी केली. त्यावेळीं त्यानें चमत्कारिक रीतीनें निराशेनें मान हालवून म्हटलें,–' ह्या पंडितराजांच्या सांगण्यावरून ते भले गृहस्थ [illegible] समजलें.

[illegible] ऐकून राणी मेधावतीची [illegible] कारण आतां कांहीं [illegible] नाहीं, अशी तिच्या मनाची [illegible]. आतां द्वंद्वयुद्धाचा [illegible] हलधराला एकदम [illegible] पुढें आणतां येण्यासारखा [illegible].

दृढसंध राजा [illegible] ' पंडितराय, तुम्ही [illegible] गाहिलां असता जें [illegible] आणि जें कांहीं तुमच्या [illegible] सर्व सांगा पाहूं ! '

हेमचंद्र बोलला,–' त्या दोघां[illegible] आपल्या दिवाणखान्याची आणि [illegible] पलीकडे असलेल्या जागेची सावकाश तपासणी करून आपलें भाषण कोणी ऐकत नाहीं, अशी आपल्या मनाची पक्की खात्री करून घेतली; आणि नंतर ते दोघे अदबीनें आसनांवर बसले. नंतर ते बोलूं लागले.

त्यावेळीं प्रथम त्यांनीं आपणांवर आलेल्या सर्व संकटांसंबंधाच्या गोष्टींचा पाढा वाचला. यावेळीं ते अगदीं मोकळ्या मनानें आणि अगदीं सत्यास स्मरून बोलत होते, यासंबंधानें माझ्या मनांत अगदीं शंका नाहीं. त्यांनीं तुमच्यासंबंधानें बोलतांना गैरशिस्त भाषण अगदीं केलें नव्हतें. फक्त आपण त्यांच्याशीं संशयानें वर्तन केलें, याबद्दल त्यांनीं खेद प्रदर्शित केला. जर आपण त्यांच्याशीं योग्य वर्तन केलें असतें, तर त्यांच्यापासून तुम्हांला पुष्कळ गुप्त गोष्टी समजल्या असत्या; असें ते म्हणत होते. ते आपल्या जन्मभाषेमध्यें जें कांहीं बोलत होते, त्यावरून ते भले माणूस असून त्यांनीं या दरींत पाऊल ठेवल्यापासून त्यांच्याविषयीं आपल्या मनांत विपरीत ग्रह उत्पन्न झालेला आहे, अशी माझी समजूत आहे. आपल्याला काय सांगूं ! त्यांनीं जेव्हां शेवटची भेट घेतली, तेव्हां त्यांचीं अंतःकरणें परस्परांवरील प्रेमानें अगदीं उचंबळून आलीं होतीं. तो करुणाजनक देखावा अवलोकन करून मला मोठा गहिंवर आला, आणि माझ्या मुखांतून स्फुंदनाचा ध्वनि बाहेर पडला. हा ध्वनि त्यांना ऐकूं गेला, पण आपल्याखेरीज येथें कोणी तिसरें माणूस नाहीं, अशी त्यांच्या मनाची खात्री असल्यामुळें त्यांनीं त्या स्फुंदनाचा परस्परांवर आरोप केला. इतक्यांत आपण दरवाजा उघडला म्हणून बरें झालें. नाहीं तर माझी फजिती होण्याचा वेळ आली असती ! '


दृढसंध नें विचारलें,–' तर मग त्यांचें [illegible]भाषण काय झालें, तें विस्तारपूर्वक [illegible]कर प्रकार मोठा विलक्षण दिसतो. [illegible]भाषणावरून ते तर सच्चे गृहस्थ [illegible]ण हें जर खरें, तर आजपर्यंत आ[illegible]नांवर आणि दैविक गोष्टींवर [illegible] आले, तें व्यर्थच कीं काय ? [illegible]ला द्विधा झालें आहे. यासाठीं

त्याच्या मुद्रेवर अणुमात्र देखील दिसत नव्हतें. आपणास जें कृत्य करावयाचें आहे, त्याची त्याला बिलकुल दरकार नव्हती. तो नेहमींप्रमाणें आपल्या भव्य व तेजःपुंज दृष्टीनें सिंहासारखा आसमंतात् अवलोकन करीत अस्खलित गतीनें हेमचंद्राबरोबर चालला होता. राजकुटुंबांतील मंडळी दृष्टीस पडतांच जमलेल्या भिल्लांनीं त्यांच्या जय-जयकारानें आकाश दुमदुमवून सोडिलें, रण-वाद्यें वाजूं लागलीं, आणि त्यांच्या उत्साह-वर्धक स्वरानें युद्धकर्मैकनिष्ठ भिल्लवीर–समूहांचे भुजदंड वीरश्रीनें स्फुरण पावूं लागले. भिल्ल स्त्रिया आणि मुलें, यांनांही हा रण–वाद्य–ध्वनि अश्रुतपूर्व नव्हता. त्यामुळें त्या ध्वनीच्या प्रभावानें त्यांचीं अंतःकरणेंही उत्साहयुक्त झालीं, त्यांच्या मुद्रा उल्लसित दिसूं लागल्या; त्यांनीं विजय–शब्दोच्चारानें रणवाद्यांच्या ध्वनीमध्यें आणखी भर घातली.

रणवाद्यगजर दुमदुमत असतांच दृढसंध राजा त्याजसाठीं सिद्ध करून ठेवलेल्या आसनावर विराजमान झाला. त्याचे भिल्ल-मानकरीही मोठ्या आदबीनें आपापल्या योग्यतेप्रमाणें आसनांवर अधिष्ठित [illegible] इतर गलचला होत्या, अशी [illegible] कातडयाचा ढाल द्वंद्वयुद्धामध्येंपणांस विजयप्राप्ति होई अशी शेखरा मनाची खात्री असल्या त्याची म उत्साही आणि प्रसन्न दि होत ता गंभीर मुद्रेनें आपल्या प्रतिस्प कडेहात उभा राहिला असतां त्याची वीरयुक्त मुद्रा पाहून त्याच्या माता–पिता मो धन्यता वाटली, आणि आपला पति म्हणजे प्रत्यक्ष मदनाची मूर्तिच अ प्रियवंदेला वाटूं लागलें.

जांघिळाची मुद्रा अत्यंत उग्र आणि क्रूर दिसत होती. त्याच्या मनांत सध्यां काय चाललें असावें, हें त्याच्या मुद्रेवरून कळून येणें शक्य नव्हतें. त्यामुळें त्याचें मन खंबीर होतें, कीं तो युद्धास कचरत होता, हें कळावयास मार्ग नव्हता. या प्रसंगीं जांघिळाचें यथार्थ वर्णन करणें जरी बिकट आहे, तरी पिंजऱ्यामध्यें बरेच दिवस कोंडून ठेवल्यामुळें क्षुधित झालेल्या वाघाची उपमा त्याला दिली असतां त्याच्याविषयीं बरीच योग्य कल्पना वाचकांच्या ध्यानीं येईल. त्याचें तें धिप्पाड शरीर, आणि कसलेले अवयव, व शेखराचें कृश शरीर आणि नाजूक अवयव, हीं त्या-वेळीं एकदम स्पष्ट दिसून येत असल्यामुळें, शेखराच्या वामनमूर्तीचा पराभव करावयास त्या राक्षसाला आपल्या अंगची अर्धी शक्ती-सुद्धां खर्च करावी लागणार नाहीं, असें कोणाच्याही मनांत आलें असतें.

अशा प्रकारें अगदीं असमान दिसणारे योद्धे रणांगणांत उभे राहिलेले पाहून कोणीही आनंद प्रदर्शित केला नाहीं. कारण ते दोघेही जमलेल्या सर्व मंडळींचे आवडते होते. एकाला उत्तेजन दिल्यास त्यांत दुसऱ्याचा [illegible] होईल, असें त्यांस वाटत होतें. [illegible] सर्व भिल्लांमध्यें सशक्त आणि [illegible] प्रसिद्धि असल्यामुळें त्याचा [illegible] मान होता; आणि [illegible] असून आपल्या अंगच्या [illegible] स प्रिय झालेला अस-[illegible] भिल्ल मान राखीत असत. [illegible] वंक [illegible] यांनीं उत्तरल्यावर एका टोंकास [illegible] राहिला व दुसऱ्या टोंकास [illegible] राहिला. युद्धासंबंधानें कांहीं प्रश्न [illegible] त्या चा निकाल करण्या-[illegible] प्रमाणें पंच नेमून झाले. दृढ-[illegible] ईश्वराची शपथ घेऊन निष्पक्ष-[illegible] काल करण्याची प्रतिज्ञा केली, [illegible] सरपंच झाला. रणवाद्यें वाजा-[illegible] घलीं, सर्व लोकांचें आखाड्याकडे



लक्ष वळलें, आखाड्यांत उभे असलेल्या वीरांनीं आपापलीं वस्त्रें सांवरलीं, व शस्त्रें हातीं घेऊन ते युद्धास प्रारंभ करण्याचा खूण केव्हां होते, याची वाट पहात दृढसंधराजाकडे टक लावून निश्चल उभे राहिले.

उच्चासनावर बसलेल्या दृढसंधराजानें द्वंद्वयुद्धास प्रारंभ करण्याची खूण म्हणून आपल्या हातांतील तरवार उपसली, आणि तिचें म्यान जमिनीवर टाकलें. ही खूण होतांच आखाड्याच्या दोन टोंकास उभे असलेले वीर परस्परांवर चालून गेले. यावेळीं जांघिळाला युद्धाची मोठी त्वरा झालेली असल्यामुळें तो सपाट्यानें पुढें झाला, पण शेखराची धिमेपणानें युद्ध करण्याची इच्छा असल्यामुळें तो अगदीं गंभीरपणानें कित्येक पावलें पुढें सरला. यामुळें त्या दोघांची पहिली सलामी आखाड्याच्या बरोबर मध्यभागीं न होतां ती ज्या बाजूस शेखर होता त्या बाजूकडे झाली. ह्या पहिल्या सलामीबरूनच जांघिळ आपल्या शक्तीच्या गर्वानें फुगला असून तो त्वेषानें आणि अविचारानें युद्धास प्रवृत्त झाला आहे, आणि शेखर हा अगदीं सावध असून शांत मनानें आणि धिमेपणानें युद्धास सिद्ध झाला आहे, हें चाणाक्ष प्रेक्षकांच्या [illegible] द्वंद्व- [illegible] ल्यानंतर [illegible] धराला [illegible] आला. [illegible]

त्या दोघांचीं [illegible] जो आवाज [illegible] वदा दृढसंधराजाच्या [illegible] कारण तो युद्धक[illegible] पहिल्या सलामीच[illegible] ओळखीळ, अशी [illegible] आली होती. ही नि[illegible] बर होती. त्या दोघां[illegible] सान पाहून दृढसंध[illegible] धानाची छटा निला[illegible] आणि ती पाहून [illegible] झाला. जांघिळाची ती [illegible] शेखराची सावधानता पाहून [illegible] भावी युद्धपरिणामाचें [illegible]

आलें होतें. आपल्या पुत्राचें मन शांत असल्यामुळें आपल्या प्रतिस्पर्ध्याचे प्रहार चुकविण्यास तो समर्थ आहे, आणि जांघिळाचें मन क्रोधानें बेहोष झालें असून आपण करतों काय आणि करावयाचें काय, यांचें त्याला अगदीं भान नसल्यामुळें आपल्या प्रतिपक्षाचे प्रहार चुकविण्यास तो असमर्थ आहे, ही गोष्ट दृढसंधराजाच्या तेव्हांच लक्ष्यांत आली.

जांघिळ क्रोधानें बेभान होऊन शेखरावर आपल्या तरवारीचे एकसारखे प्रहार करीत होता, आणि शेखर विजेसारख्या चापल्यानें रणमंडळांत गरगर फिरून ते प्रहार आपल्या ढालीवर सांवरीत होता, किंवा आपल्या तरवारीनें त्यांचें निवारण करीत होता. अशा प्रकारें त्यांचें युद्ध बराच वेळ चाललें होतें; पण तितक्या अवकाशांत जांघिळावर प्रहार करण्याला शेखराला संधि सांपडली नाहीं.

आपले प्रहार चुकविण्यांतच शेखर जेरीस आला आहे, असें वाटून प्रचंड गर्जना करीत जांघिळ ओरडला,–'पहा, शेखरा, वेळींच सावध हो! आपलें हत्यार टाकून शरण [illegible] नाहींतर माझ्या आतांच्या प्रहारानें तूं भाइया [illegible] न मुकशील.'

पडला. [illegible] तरुण वीरानें [illegible] कोणा[illegible] आपल्या [illegible] मनाचा[illegible] मुळे [illegible] नाचा[illegible] गेप [illegible] आपण[illegible] जाऊन [illegible] या [illegible] पोरा, गडबड किती [illegible] करतोस? हा [illegible] मेलासे।' असें म्हणून त्या [illegible] सत्तें शेखरावर [illegible] त्वेषानें खड्ग प्रहार केला. [illegible] चें [illegible] परंतु आपल्या हातांतील ढाले-तलवार तो [illegible] सांवरून घेऊन शेखर स्मितपूर्वक [illegible] ६ [illegible] ला,–'पहा अजून सावध हो, शुद्धीवर [illegible] क्रोधानें खवळला आहेस, पण हा तुझा [illegible] तुझ्या नाशास कारण होईल!' [illegible] ११ [illegible] ! [illegible] ांघिळ अगदीं चिडून जाऊन ओर- [illegible] मूर्खा, तूं मला शिकविण्याची मुळींच

गरज नाहीं. तुला पुनः सांगतों, शरण ये; तुझ्यासारख्या नाजूक राजकुमाराचा मीं प्राण घेतला, ही गोष्ट माझ्या अगदीं जिव्हारीं लागून राहील.'

शेखर गर्जना करून म्हणाला,–'जांघिळा, अजून तरी शुद्धीवर ये; आतांपर्यंत तीन वेळां मीं तुझें रक्षण केलें आहे; पण आतां चवथ्यानें तुला जड जाईल!'

क्रोधाचा अतिरेक होऊन तोंडांतून फेंस येत असलेला जांघिळ गर्जना करीत बोलला,–'शेखरा, तूं माझ्या राजाचा पुत्र म्हणून मी आतांपर्यंत तुजवर प्रेम करीत होतों, पण या क्षणीं मी तुझा द्वेष करतों.'

तोंडानें त्यांचा असा संवाद सुरू होता, तरी हातानें ते परस्परांवर शस्त्रप्रहार करीतच होते. यावेळीं युद्धास पूर्ण रंग चढला असल्यामुळें सर्व प्रेक्षकांचे जीव अगदीं डोळ्यांत येऊन बसले होते. शेखराच्या माता–पितरांचीं हृदयें धडाडत असून तीं दोघें अगदीं उत्कंठेनें त्या लढवय्यांकडे पहात होतीं. जांघिळाचा क्रोध यावेळीं परमावधीस जाऊन पोंचला होता, पण शेखराच्या मनाची शांतता ढळली नव्हती. युद्धाला प्रारंभ झाल्यापासून आतांपर्यंत एकसारखा जांघिळच हल्ला करीत होता, आणि शेखर त्याचे सर्व प्रहार चुकवून सांधि साधून त्याजवर मधूनमधून एकादाच वार करीत होतां. त्यामुळें आणि क्रोधातिशयामुळें जांघिळाचे हातपाय पहिल्याप्रमाणें जलदीनें उठतनासे झाले, आणि त्याचें बोजड शरीर त्याला घातक होऊं लागलें. शेखर शांत मनानें आपल्या शक्तीचा व्यय करीत असल्यामुळें दमला नव्हता, आणि त्याचें शरीर कृश व हलकें असल्यामुळें तो रणमंडळांत विजेसारखा तळपत होता. इतका वेळ चाललेल्या युद्धामध्यें शेखरानें आपल्या प्रतिस्पर्ध्याला चीत करण्याचे तीन प्रसंग जाणून बुजून व्यर्थ घालवून त्याचे प्राण वांचविले होते. पण वर सांगितल्याप्रमाणें त्यानें जांघिळास सावधतेची सूचना दिल्यावर त्याचें मात्र त्याच्या मुद्रेवरून लागली, आणि तो म्हणाला, 'अहो हलधर, त्याचें जांघिळावरील आनंदाचें वर्तमान आपकला. त्याचरोबरीं मी येथें आलों आहें. जयश्री शेखराला मा ही गोष्ट आपणास दिसूं लागलें. जांघिळाच माझ्या प्रतियोद्धाचा आणि त्याची अद्वितीय पला प्राण मला उपयोग होणार नाहीं, अशा मला फार मनाची खात्री झाली, आणि राम मर्धील रामचंद्राची गोजिरवाणी मूर्ति चराचा कर्णाचरोबर लढून ल्याच्या कथा कित्येक प्रेक्षकांस

अशा अर्ध घटका लोटली; अ अगडबंब शरीर रक्तबंबाळ शेखराच्या अंगावर एक लहा उठला नव्हता! जांघिळास खमा झालेल्या होत्या. त्या दरदरून घाम सुटला होता; वरील घर्मबिंदु नेत्रांत जा सेनासेही झालें होतें. शेखरा धीरश्रीनें अत्यंत प्रफुल्लित झाली या देवकुमाराप्रमाणें शोभा !

हत्यारें ण आपटतच होतीं. रागानें तांधिळ माजलेल्या पोळासम तसून शेखरावर तुटून शेखर मोठ्या चपलतेनें सावधपणानें आपल्यावरील चुकवून मोठ्या शौर्यानें जांघिळास जखमी करीतच होता. सरतेशेवटीं आपल्या निभाव लागत नाहीं, ही गोष्ट जांघिळाच्या पूर्णपणें लक्ष्यांत आली; आणि त्यानें आपलें सर्व बल एकत्र करून मोठ्या निकरानें शेवटचा हल्ला केला. यावेळीं त्यानें आपले दांत इतक्या जोरानें चाविले कीं, हत्यारांच्या खणखणाटाला न जुमानतां त्याचा करकराट सर्वांस स्पष्ट ऐकूं आला. त्याची मुद्रा अत्यंत भेसुर दिसूं लागली; तो लालभडक होऊन त्यांतून ठिणग्या

लक्ष वळलें, आखाड्यांत उभे असलेल्या वीरांनीं आपापलीं वस्त्रें सांवरलीं, व शस्त्रें हातीं घेऊन ते युद्धास प्रारंभ करण्याची खूण केव्हां होते, याची वाट पहात दृढसंधराजाकडे टक लावून निश्चल उभे राहिले.

उच्चासनावर बसलेल्या दृढसंधराजानें द्वंद्वयुद्धास प्रारंभ करण्याची खूण म्हणून आपल्या हातांतील तरवार उपसली, आणि तिचें म्यान जमिनीवर टाकिलें. ही खूण होतांच आखाड्याच्या दोन टोंकास उभे असलेले वीर परस्परांवर चालून गेले. यावेळीं जांघिळाला युद्धाची मोठी त्वरा झालेली असल्यामुळें तो सपाट्यानें पुढें झाला, पण शेखराची धिमेपणानें युद्ध करण्याची इच्छा असल्यामुळें तो अगदीं गंभीरपणानें कित्येक पावलें पुढें सरला. यामुळें त्या दोघांची पहिली सलामी आखाड्याच्या बरोबर मध्यभागीं न होतां ती ज्या बाजूस शेखर होता त्या बाजूकडे झाली. ह्या पहिल्या सलामीवरूनच जांघिळ आपल्या शक्तीच्या गर्वानें फुगला असून तो त्वेषानें आणि अविचारानें युद्धास प्रवृत्त झाला आहे, आणि शेखर हा अगदीं सावध असून शांत मनानें आणि धिमेपणानें युद्धास सिद्ध झाला आहे, [illegible] चाणाक्ष प्रेक्षकांच्या [illegible] ध्यानांत [illegible] गला

त्या दोघांचीं [illegible]
जो आवाज [illegible]
वदा दृढसंधराजाच्या [illegible]
कारण तो युद्धकौशल्यांत [illegible]
पहिल्या सलामीवरून [illegible]
ओळखील, अशी [illegible]
आली होती. ही [illegible]
बर होती. त्या दोघां[illegible]
सान पाहून दृढसंध[illegible]
धानाची छटा तिला [illegible]
आणि ती पाहून [illegible]
झाला. जांघिळाची ती [illegible]
शेखराची सावधानता पाहून [illegible]
भावी युद्धपरिणामाचें [illegible]

आलें होतें. आपल्या पुत्राचें मन शांत असल्यामुळें आपल्या प्रतिस्पर्ध्याचे प्रहार चुकविण्यास तो समर्थ आहे, आणि जांघिळाचें मन क्रोधानें बेहोष झालें असून आपण करतों काय आणि करावयाचें काय, याचें त्याला अगदीं भान नसल्यामुळें आपल्या प्रतिपक्षाचे प्रहार चुकविण्यास तो असमर्थ आहे, ही गोष्ट दृढसंधराजाच्या तेव्हांच लक्ष्यांत आली.

जांघिळ क्रोधानें बेभान होऊन शेखरावर आपल्या तरवारीचे एकसारखे प्रहार करीत होता, आणि शेखर विजेसारख्या चापल्यानें रणमंडळांत गरगर फिरून ते प्रहार आपल्या ढालीवर सांवरीत होता, किंवा आपल्या तरवारीनें त्यांचें निवारण करीत होता. अशा प्रकारें त्यांचें युद्ध बराच वेळ चाललें होतें; पण तितक्या अवकाशांत जांघिळावर प्रहार करण्याला शेखराला संधि सांपडली नाहीं.

आपले प्रहार चुकविण्यांतच शेखर जेरीस आला आहे, असें वाटून प्रचंड गर्जना करीत जांघिळ ओरडला,–'पहा, शेखरा, वेळींच सावध हो! आपलें हत्यार टाकून शरण [illegible] नाहींतर माझ्या आताच्या प्रहारानें तूं [illegible] मरशील.'

[illegible] तरुण वीराचें [illegible] गर्जना [illegible] ऐकून [illegible] ओरडला,–'पोरा, गडबड किती करतोस? हा [illegible] सलाम।' असें म्हणून त्यानें शेखरावर [illegible] त्वेषानें खड्ग वहार केला.

परंतु आपल्या हातांतील ढालेवर तो सांवरून घेऊन शेखर स्मितपूर्वक [illegible] ला,–'पहा अजून सावध हो, शुद्धीवर [illegible] क्रोधानें खवळला आहेस, पण हा तुझा [illegible] तुझ्या नाशास कारण होईल!'

[illegible] जांघिळ अगदीं चिडून जाऊन ओरडला,–'मूर्खा, तूं मला शिकविण्याची मुळींच

गरज नाहीं. तुला पुनः सांगतों, शरण ये; तुझ्यासारख्या नाजूक राजकुमाराचा मीं प्राण घेतला, ही गोष्ट माझ्या अगदीं जिव्हारीं लागून राहील.'

शेखर गर्जना करून म्हणाला,–'जांघिळा, अजून तरी शुद्धीवर ये; आतांपर्यंत तीन वेळां मीं तुझें रक्षण केलें आहे, पण आतां चवथ्यानें तुला जड जाईल!'

क्रोधाचा अतिरेक होऊन तोंडांतून फेंस येत असलेला जांघिळ गर्जना करीत बोलला,–'शेखरा, तूं माझ्या राजाचा पुत्र म्हणून मी आतांपर्यंत तुजवर प्रेम करीत होतों, पण या क्षणीं मी तुझा द्वेष करतों.'

तोंडानें त्यांचा असा संवाद सुरू होता, तरी हातानें ते परस्परांवर शस्त्रप्रहार करीतच होते. यावेळीं युद्धास पूर्ण रंग चढला असल्यामुळें सर्व प्रेक्षकांचे जीव अगदीं डोळ्यांत येऊन बसले होते. शेखराच्या माता–पितरांचीं हृदयें धडाडत असून तीं दोघें अगदीं उत्कंठेनें त्या लढवय्यांकडे पहात होतीं. जांघिळाचा क्रोध यावेळीं परमावधीस जाऊन पोंचला होता, पण शेखराच्या मनाची शांतता ढळली नव्हती. युद्धाला प्रारंभ झाल्यापासून आतांपर्यंत एकसारखा जांघिळच हल्ला करीत होता, आणि शेखर त्याचे सर्व प्रहार चुकवून सोधि साधून त्याजवर मधूनमधून एकादाच वार करीत होतां. त्यामुळें आणि क्रोधातिशयामुळें जांघिळाचे हातपाय पहिल्याप्रमाणें जलदीनें उठतनासे झाले, आणि त्याचें बोजड शरीर त्याला घातक होऊं लागलें. शेखर शांत मनानें आपल्या शक्तीचा व्यय करीत असल्यामुळें दमला नव्हता, आणि त्याचें शरीर कृश व हलकें असल्यामुळें तो रणमंडळांत विजेसारखा तळपत होता. इतका वेळ चाललेल्या युद्धामध्यें शेखरानें आपल्या प्रतिस्पर्ध्याला चीत करण्याचे तीन प्रसंग जाणून बुजून व्यर्थ घालवून त्याचे प्राण वांचविले होते. पण वर सांगितल्याप्रमाणें त्यानें जांघिळास सावधतेची सूचना दिल्यावर त्याची लागली, आणि त्यानें जांघिळाव केला. त्याचरोबर जयश्री शेखराला मा दिसूं लागलें. जांघिळाच आणि त्याची अद्वितीय उपयोग होणार नाहीं, अ मनाची खात्री झाली, आणि राम मधील रामचंद्राची गोजिरवाणी मूर्ति कर्णाचरोबर लढत असल्याच्या कथ कित्येक प्रेक्षकांस [illegible] लें.

अशा [illegible] अर्धा घटका लोटली; अ[illegible] अगडबंच शरीर रक्तबंबाळ [illegible] शेखराच्या अंगावर एक लहा[illegible] उठला नव्हता! जांघिळास [illegible] खमा झालेल्या होत्या. त्या[illegible] दरदरून घाम सुटला होता, [illegible] वरील घर्मबिंदु नेत्रांत जाऊ[illegible] नासेंही झालें होतें. शेखरा[illegible] धैर्यानें अत्यंत प्रफुल्लित झाला[illegible] या देवकुमाराप्रमाणें शोभा[illegible] ता!

हत्यारें [illegible] पण आपलीच होतीं. रागानें [illegible] जांघिळ माजलेल्या पोळ्याप्रमा[illegible] सरून शेखरावर तुटून [illegible] शेखर मोठ्या चपलतेनें [illegible] सावधपणानें आपल्यावरील [illegible] चुकवून मोठ्या शौर्यानें जांघिळास जखमी करीतच होता. सरतेशेवटीं आपला निभाव लागत नाहीं, ही गोष्ट जांघिळाच्या पूर्णपणें लक्ष्यांत आली; आणि त्यानें आपलें सर्व बळ एकत्र करून मोठ्या निकरानें शेवटचा हल्ला केला. यावेळीं त्यानें आपले दांत इतक्या जोरानें चाविले कीं, हत्यारांच्या खणखणाटाला न जुमानतां त्याचा करकराट सर्वांस स्पष्ट ऐकूं आला. त्याची मुद्रा अत्यंत भेसुर दिसूं लागली; डोळे लालभडक होऊन त्यांतून ठिणग्या

सा भ्रम होऊं
ध होता. त्यानें
ोळसलें आणि
यास तो मोठ्या
. आपली ढाल सज्ज
ोग्य वेळीं पुढें करून
चंड प्रहार चुकविला.
प्रहार इतका भयंकर आणि
ा कीं, त्या प्रहारानें शेखराच्या
ढालेचीं दोन खंडें होऊन तीं दोहों-
जूकेडे पडलीं!

ह्या प्रसंगीं माधवाच्या जीविताच्या-संबंधानें सर्वांस शंका [illegible] झाली होती; पण तितक्यांत शेखरानें प्रसंगावधान राखून जें कौशल्य केलें, त्या योगानें त्याचें रक्षण झालें; इतकेंच नव्हे, तर त्या द्वंद्वयुद्धाचाही शेवट झाला. जांघिळाच्या प्रहारानें शेखराची ढाल तुटली खरी, पण त्या प्रहारानें जांघिळाचा हात मिळाला, आणि त्याला तो हात वर उचलण्याला [illegible] लागलां; तितक्यांत शेखरानें [illegible] केला, त्यामुळें जांघिळाचा उजवा हात [illegible] बंदी होऊन त्या हातांतील तलवार [illegible] खाली पडली, आणि तो राक्षस [illegible] झाला! त्याबरोबर चित्र्याप्रमाणें शेखरानें [illegible] उडी घालून त्याला जमिनीवर [illegible], आणि आपला डावा पाय त्याच्या [illegible] ठेवून विरश्री-युक्त मुद्रेनें त्या [illegible] तीन वेळां आपल्याभोंवतीं फिरविला.

शेखराचा पूर्ण विजय झाला!

रणवाद्यें पुनः वाजूं लागलीं आणि शेखराच्या जयजयकारानें आकाश दुमदुमून गेलें. जांघिळाच्या जखमा बांधण्यासाठीं आणि त्याला तेथून घेऊन जाण्यासाठीं कित्येक भिल्ल आखाड्यांत आले. तो राक्षस यावेळीं मूर्च्छित पडला होता; पण त्याच्या जखमा भयंकर नसल्यामुळें त्याच्या जिवाला अपाय नाहीं, असें सर्वांस समजलें आणि त्यांस मोठा आनंद झाला.

विजयी शेखराला त्याच्या माता-पितरांनीं दृढालिंगन देऊन त्याचें अभिनंदन केलें. लोकोपचारार्थ शेखराचें अभिनंदन करणें चूडामणीला भाग होतें, पण अशा रीतीनें त्याचा उत्कर्ष झाला, ही गोष्ट त्याला अगदीं सहन झाली नाहीं. तो मनांतल्या मनांत मत्सरानें अगदीं जळत होता!

शेखराच्या विजयानें आनंदित झालेली सर्व मंडळी आपापल्या घरीं निघून गेली. शेखर राजवाड्यांत आला, त्यावेळीं मंगल-वाद्यें वाजूं लागलीं, आणि दासींनीं त्यांस पंचारती ओंवाळून निंबलोण उतरलें.

सरदार हलधर जरी मोठा धिमा मनुष्य होता, तरी शेखराचा विजय झाला, या गोष्टीचा त्याला आनंद झाल्यावांचून राहिला नाहीं. सध्यां तो राजवाड्यांत कैदी होता. त्याला ज्या दिवाणखान्यांत कोंडून ठेविलें होतें, त्या दिवाणखान्याच्या खिडकींतून त्याला राजवाड्यांतून शेखरासह कित्येक माणसें रणांगणाकडे जातांना दिसलीं; तेव्हांपासून त्याचें मन एकसारेखें संशयामध्यें बुचकळ्या खात होतें. द्वंद्वयुद्धाचे वेळीं रणवाद्यें वाजूं लागलीं. तेव्हां त्यांचा ध्वनि त्यास ऐकूं आला, आणि द्वंद्वयुद्धास प्रारंभ झाला, ही गोष्ट त्याच्या ध्यानीं आली. रणवाद्यें एकदां थांबून पुनः वाजूं लागलीं, त्यावेळीं द्वंद्वयुद्ध संपलें, ही गोष्टही त्याच्या ध्यानीं आली. यानंतर थोडयाच वेळानें कित्येक भिल्ल एका माणसाला उचलून घेऊन वाडयाकडे येत आहेत, हें त्याच्या दृष्टीस पडलें, तेव्हां त्याचा जीव खालीं-वर होऊं लागला. पण तो घोळका लवकरच वाडयापाशीं येऊन पोंचला त्यावेळीं ज्याला उचलून आणिलें तो जांघिळच आहे, असें स्पष्टपणें त्याच्या दृष्टीस पडलें, आणि त्याची उदासीन मुद्रा आनंदानें खुलून गेली. जांघिळाला उचलून आणणाऱ्या भिल्लांच्या मुद्रा फारशा दुःखी दिसत नव्हत्या, त्यावरून जांघिळ मेला नाहीं, हें त्याच्या सहज ध्यानीं आलें. जांघि-

ळाच्या जखमांवर उपचार करण्यासाठीं त्यांनीं त्याला राजवाडयांतच आणिलें होतें; त्याला घेऊन येणाऱ्या भिल्लांच्या मुखानें शेखराच्या विजयाचें वर्तमान राजवाडयांतील अवशिष्ट मंडळींस समजतांच त्यांनीं शेखराचें स्वागत करण्याची धांदल केली, व राजवाडयांत मंगलवाद्यें वाजूं लागलीं. त्यावरून तर हलधराच्या मनांत शंकाच उरली नाहीं. "राजकुमार मोठा शूर आणि उदार पुरुष आहे," असे उद्गार हलधराच्या मुखानें आपोआप बाहेरसुद्धां पडले, पण ते ऐकावयास तेथें कोणींच नव्हतें. हलधर मोठा धिमा मनुष्य असल्यामुळें तो कधीं कोणाची स्तुति करून आपला आनंद प्रकट करीत नसे, पण या प्रसंगीं त्याच्या मनाची स्थिति मोठी विलक्षण झाली असल्यामुळें आनंदाचीं चिन्हें त्याच्या मुद्रेवर दिसूं लागल्याखेरीज राहिलीं नव्हतीं. पण आकाशांत वीज जशी एक क्षणमात्र चमकते, आणि दुसऱ्या क्षणीं तिचा सर्व आकाशांतू कोठें मागमूस देखील नाहींसा होतो, त्या प्रमाणें हलधराच्या मुद्रेवर आ[illegible] एकदां क्षणमात्र दिसलीं [illegible] मुद्रा अव्यंग [illegible].

आपल्य[illegible] राजवाडयाकडे येत[illegible]स पडतांच सरदार हलधर खिडकींतून मागें आला. कारण द्वंद्वयुद्धाचा परिणाम काय होतो, हें पाहण्यासाठीं आपण खिडकीपाशीं येऊन बसलों होतों, हें कोणाच्या लक्षांत आल्यास आपल्या मनाची दुर्बलता लोकांच्या ध्यानीं येईल, असें त्याच्या मनांत आलें होतें. थोडयाच वेळानें त्याच्या दिवाणखान्याचें दार उघडलें, आणि राजपुत्र शेखर त्याजपुढें येऊन उभा राहिला.

यावेळीं विजयश्रीच्या आनंदानें शेखराची मुद्रा अत्यंत प्रसन्न दिसत होती, यांत त्याचें आश्चर्य नाहीं. तथापि त्याच्या स्वाभाविक [illegible]हार मनाला या विजयानें अभिमान वाटत होता, असें मात्र त्याच्या मुद्रेवरून दिसत नव्हतें. तो म्हणाला, 'अहो हलधर, आपल्या मुक्ततेचें आनंदाचें वर्तमान आपणास कळविण्यासाठीं मी येथें आलों आहें. माझा विजय झाला, ही गोष्ट आपणास पूर्वीच कळली असेल. माझ्या प्रतियोद्ध्याचा प्राणघात केल्याखेरीज आपला प्राण मला वांचवितां आला, या गोष्टीचा मला फार आनंद होत आहे.'

अत्यंत गंभीरतेनें हलधरानें शेखराचा हात धरून तो मोठ्या प्रेमानें दाबिला, आणि तो त्याला म्हणाला, 'राजकुमारा, तुमच्या बद्दल माझ्या अंतःकरणांत जी भावना या झाली आहे, ती व्यक्त करून दाखविण्यास माझी वाणी अगदीं असमर्थ आहे.'

शेखरही गंभीरता धारण करून; माझी [illegible]या आज्ञे-
'अहो सरदारसाहेब, [illegible]
मुखानें आपली [illegible] चूक
कांहीं [illegible] नाहीं.
[illegible] त्याजकडे
[illegible] होतो. आपल्या
[illegible] बसावयास आपण
[illegible] नाहीं. थोरल्या दिवाणखान्याच्या
[illegible]राज बसले असून त्यांनीं आपणांस
तिकडे बोलाविलें आहे. या द्वंद्वयुद्धाचा परिणाम आपणांस अनुकूल झाला असल्यामुळें, आपल्यासंबंधानें जे कांहीं प्रश्न उपस्थित झाले होते, त्यांचा निकालही आपल्या वतीनें झाला आहे, हें सर्व भिल्लांसमक्ष सांगावयाचें असल्यामुळें महाराजांनीं आपणांस तिकडे बोलाविलें आहे. या दरींतील भिल्ल जरी अडाणी असले, तरी ते स्वभावानें मोठे उदार आहेत. ज्या कारणांनीं पूर्वी ते तुमच्याकडे क्रुद्ध दृष्टीनें पहात होते, तीं कारणें आतां त्यांच्या मनांत राहिलीं नसल्यामुळें ते सध्यां तुमचें आनंदानें स्वागत करतील, ही मी आपणास खात्री देतों.'

हलधरानें विचारलें,—'बरें, पण माझ्या सेवकासंबंधानें काय समजावयाचें?'

लक्ष्य वळलें, आखाड्यांत उभे असलेले आपापलीं वस्त्रें सांवरलीं, व घेऊन ते युद्धास प्रारंभ कधीं केव्हां होते, याची वाट पहात टक लावून निश्चल उभे रा

उच्चासनावर बसण्योग्य वेळीं पुढें करून द्वंद्वयुद्धास प्रारंभ झगचंड प्रहार चुकविला. आपल्या हातांतील प्रहार इतका भयंकर आणि तिचें म्यान ा कीं, त्या प्रहारानें शेखराच्या होतांच ढालेचीं दोन खंडें होऊन तीं दोहों- असलूकडे पडलीं!

वेळीं ह्या प्रसंगीं म[illegible]च्या जीविताच्या- अनुबंधानें सर्वांस [illegible] झाली होती; पण तितक्यांत शेखरा[illegible]न राखून जें कौशल्य केलें, [illegible]याचें रक्षण झालें; इतकेंच न[illegible]या द्वंद्वयुद्धाचाही शेवट झाला. जांघि[illegible]ारानें शेखराची ढाल तुटली खरी[illegible]ारानें जांघि- ळाचा हात भि[illegible]ाण त्याला तो हात वर उचलण्या[illegible]ाधि लागला; तितक्यांत शेखरानें [illegible]ला, त्यामुळें जांघिळाचा उ[illegible]ापंवदी होऊन त्या हातांतील [illegible]ाऊन पडली, आणि तो राक्षस [illegible]ाला! त्याचशेजर चित्र्याप्रमाणें शे[illegible]र उडी घालून त्याला जमिनीव[illegible], आणि आपला डावा पाय त्या[illegible]र ठेवून विरश्री- युक्त मुद्रेनें त्या[illegible]र तीन वेळां आपल्याभोंवतीं फिरविला.

शेखराचा पूर्ण विजय झाला!

रणवाद्यें पुनः वाजूं लागलीं आणि शेखराच्या जयजयकारानें आकाश दुमदुमून गेलें. जांघिळाच्या जखमा बांधण्यासाठीं आणि त्याला तेथून घेऊन जाण्यासाठीं कित्येक भिल्ल आखाड्यांत आले. तो राक्षस यावेळीं मूर्च्छित पडला होता; पण त्याच्या जखमा भयंकर नसल्यामुळें त्याच्या जिवाला अपाय नाहीं, असें सर्वांस समजलें आणि त्यांस मोठा आनंद झाला.

विजयी शेखराला त्याच्या माता-पितरांनीं दृढालिंगन देऊन त्याचें अभिनंदन केलें. लोकोपचारार्थ शेखराचें अभिनंदन करणें चूडामणीला भाग होतें, पण अशा रीतीनें त्याचा उत्कर्ष झाला, ही गोष्ट त्याला अगदीं सहन झाली नाहीं. तो मनांतल्या मनांत मत्सरानें अगदीं जळत होता!

शेखराच्या विजयानें आनंदित झालेली सर्व मंडळी आपापल्या घरीं निघून गेली. शेखर राजवाड्यांत आला, त्यावेळीं मंगलवाद्यें वाजूं लागलीं, आणि दासींनीं त्यांस पंचारती ओंवाळून निंबलोण उतरलें.

सरदार हलधर जरी मोठा धिमा मनुष्य होता, तरी शेखराचा विजय झाला, या गोष्टीचा त्याला आनंद झाल्यावांचून राहिला नाहीं. सध्यां तो राजवाड्यांत कैदी होता. त्याला ज्या दिवाणखान्यांत कोंडून ठेविलें होतें, त्या दिवाणखान्याच्या खिडकींतून त्याला राजवाड्यांतून शेखरासह कित्येक माणसें रणांगणाकडे जातांना दिसलीं; तेव्हांपासून त्याचें मन एकसारखें संशयामध्यें बुचकळ्या खात होतें. द्वंद्वयुद्धाचे वेळीं रणवाद्यें वाजूं लागलीं. तेव्हां त्यांचा ध्वनि त्यास ऐकूं आला, आणि द्वंद्वयुद्धास प्रारंभ झाला, ही गोष्ट त्याच्या ध्यानीं आली. रणवाद्यें एकदां थांबून पुनः वाजूं लागलीं, त्यावेळीं द्वंद्वयुद्ध संपलें, ही गोष्टही त्याच्या ध्यानीं आली. यानंतर थोड्याच वेळानें कित्येक भिल्ल एका माणसाला उचलून घेऊन वाड्याकडे येत आहेत, हें त्याच्या दृष्टीस पडलें, तेव्हां त्याचा जीव खालीं-वर होऊं लागला. पण तो घोळका लवकरच वाड्यापाशीं येऊन पोंचला त्यावेळीं ज्याला उचलून आणिलें तो जांघिळच आहे, असें स्पष्टपणें त्याच्या दृष्टीस पडलें, आणि त्याची उदासीन मुद्रा आनंदानें खुलून गेली. जांघिळाला उचलून आणणाऱ्या भिल्लांच्या मुद्रा फारशा दुःखी दिसत नव्हत्या, त्यावरून जांघिळ मेला नाहीं, हें त्याच्या सहज ध्यानीं आलें. जांघि-

ळाच्या जखमांवर उपचार करण्यासाठीं त्यांनीं त्याला राजवाडयांतच आणिलें होतें; त्याला घेऊन येणाऱ्या भिल्लांच्या मुखानें शेखराच्या विजयाचें वर्तमान राजवाडयांतील अवशिष्ट मंडळींस समजतांच त्यांनीं शेखराचें स्वागत करण्याची धांदल केली, व राजवाडयांत मंगलवाद्यें वाजूं लागलीं. त्यावरून तर हलधराच्या मनांत शंकाच उरली नाहीं. "राजकुमार मोठा शूर आणि उदार पुरुष आहे," असे उद्गार हलधराच्या मुखानें आपोआप बाहेरसुद्धां पडले, पण ते ऐकावयास तेथें कोणींच नव्हतें. हलधर मोठा धिमा मनुष्य असल्यामुळें तो कधीं कोणाची स्तुति करून आपला आनंद प्रकट करीत नसे, पण या प्रसंगीं त्याच्या मनाची स्थिति मोठी विलक्षण झाली असल्यामुळें आनंदाचीं चिन्हें त्याच्या मुद्रेवर दिसूं लागल्याखेरीज राहिलीं नव्हतीं. पण आकाशांत वीज जशी एक क्षणमात्र चमकते, आणि दुसऱ्या क्षणीं तिचा सर्व आकाशांत कोठें मागमूस देखील नाहींसा होतो, त्याप्रमाणें हलधराच्या मुद्रेवर आनंद एकदां क्षणमात्र दिसला, आणि मुद्रा अत्यंत [illegible]

आपल्या [illegible] राजवाडयाकडे येत [illegible] दृष्टीस पडतांच सरदार हलधर खिडकींतून मागें आला. कारण द्वंद्वयुद्धाचा परिणाम काय होतो, हें पाहण्यासाठीं आपण खिडकीपाशीं येऊन बसलों होतों, हें कोणाच्या लक्षांत आल्यास आपल्या मनाची दुर्बलता लोकांच्या ध्यानीं येईल, असें त्याच्या मनांत आलें होतें. थोडयाच वेळानें त्याच्या दिवाणखान्याचें दार उघडलें, आणि राजपुत्र शेखर त्याजपुढें येऊन उभा राहिला.

यावेळीं विजयश्रीच्या आनंदानें शेखराची मुद्रा अत्यंत प्रसन्न दिसत होती, यांत त्याचें आश्चर्य नाहीं. तथापि त्याच्या स्वाभिमानी सरदार मनाला या विजयानें अभिमान वाटत होता, असें मात्र त्याच्या मुद्रेवरून दिसत नव्हतें. तो म्हणाला, 'अहो हलधर, आपल्या मुक्ततेचें आनंदाचें वर्तमान आपणास कळविण्यासाठीं मी येथें आलों आहें. माझा विजय झाला, ही गोष्ट आपणास पूर्वीच कळली असेल. माझ्या प्रतियोद्ध्याचा प्राणघात केल्याखेरीज आपला प्राण मला वांचवितां आला, या गोष्टीचा मला फार आनंद होत आहे.'

अत्यंत गंभीरतेनें हलधरानें शेखराचा हात धरून तो मोठ्या प्रेमानें दाबिला, आणि तो त्याला म्हणाला, 'राजकुमारा, तुझ्या बद्दल माझ्या अंतःकरणांत जी भावना झाली आहे, ती व्यक्त करून तुला माझी वाणी अगदीं असमर्थ आ[illegible]

शेखरही गंभीरता धारण [illegible]
'अहो सरदारसाहेब, [illegible]
मुखानें आपली [illegible]
कांहीं [illegible]
[illegible] होता.
[illegible] यावयास आप[illegible]
[illegible] नाहीं. थोरल्या दिवाणखान्याला महाराज बसले असून त्यांनीं आपणांस तिकडे बोलाविलें आहे. या द्वंद्वयुद्धाचा परिणाम आपणांस अनुकूल झाला असल्यामुळें, आपल्यासंबंधानें जे कांहीं प्रश्न उपस्थित झाले होते, त्यांचा निकालही आपल्या वतीनें झाला आहे, हें सर्व भिल्लांसमक्ष सांगावयाचें असल्यामुळें महाराजांनीं आपणांस तिकडे बोलाविलें आहे. या दरींतील भिल्ल जरी अडाणी असले, तरी ते स्वभावानें मोठे उदार आहेत. ज्या कारणांनीं पूर्वीं ते तुमच्याकडे क्रुद्ध दृष्टीनें पहात होते, तीं कारणें आतां त्यांच्या मनांत राहिलीं नसल्यामुळें ते सध्यां तुमचें आनंदानें स्वागत करतील, ही मी आपणास खात्री देतों.'

हलधरानें विचारलें,—'बरें, पण माझ्या सेवकासंबंधानें काय समजावयाचें?'

शेखरानें सांगितलें,–'त्याच्या संबंधानेंसुद्धां आतां काळजी करावयास नको, अशी माझी समजूत आहे. आपण फक्त मजबरोबर तिकडे चला, म्हणजे झालें.'

सरदार हलधर शेखराबरोबर थोरल्या दिवाणखान्याकडे आला, त्यावेळीं तो सर्व दिवाणखाना भिल्लांनीं अगदीं गजबजून गेला आहे, असें त्याला आढळून आलें. त्या दिवाणखान्यांतच काय, पण त्याच्या बाहेर-सुद्धां अगदीं पुढील दरवाज्यापर्यंत भिल्लांची मोठी गर्दी झालेली त्याच्या दृष्टीस पडली. [illegible] ला आंत घुसण्याचा प्रयत्न करतां येईल, [illegible] में करण्याच्या खटपटींत गढून गेलेला [illegible] दृष्टीस पडला. दिवाणखान्यांतील [illegible] दृढसंधराजा विराजमान झाला [illegible] मुखावर समाधानाचा ठसा [illegible]. त्याच्या शेजारच्या एका [illegible] चूडामणि वस- [illegible] मान- [illegible] [illegible]र्सावण्याचा प्रयत्न [illegible] [illegible]च्या शेजारीं असलेल्या दुसऱ्या आसनावर पंडित हेमचंद्र बसला असून त्याला मात्र अगदीं मनापासून आनंद होत आहे असें स्पष्ट दिसून येत होतें.

सरदार हलधराला येत असलेला पाहून भिल्लांनीं त्याला मार्ग दिला, आणि तो शेखरांसह दृढसंधराजापाशीं जाऊन पोंचला. त्याला पाहतांच दृढसंधराजानें जवळच्या एका रिकाम्या आसनाकडे हात करून त्याला म्हटलें,–'अहो हलधर, या आसनावर बैसा. आजच्या द्वंद्वयुद्धानें सर्व प्रकारच्या संशयांची निवृत्ति झाली आहे, हें मी प्रांजलपणें कबूल करतों. जर आपण द्वंद्वयुद्धाचा प्रश्न काढला असता आणि आपल्यातर्फे युद्ध करावयास शेखर पुढें झाला नसता, तर संशयानें माझ्या हातून मोठा अन्याय झाला असता. द्वंद्वयुद्धामध्यें माझा पुत्र विजयी झाला, या गोष्टीचा तर मला आनंद होतच आहे; पण त्याहूनही आपणावरील प्राणसंकट टळलें, या गोष्टीचा मला फार आनंद होत आहे. ज्या अर्थी आजच्या द्वंद्वयुद्धामध्यें सत्याचा विजय झाला आहे, त्या अर्थी जांघिळानें कोलाचे वेळीं पाहिलेलें स्वप्न म्हणजे केवळ त्याच्या पूर्व दुरायहानें कलुषित झालेल्या कल्पनाशक्तीचा नुसता खेळ होता, असें आतां आम्हांस वाटूं लागलें आहे. असें जरी आम्हांस वाटलें, तरी त्यानें आपल्या संबंधानें जें भाकीत सांगितलें तें त्यानें बुद्धिपूर्वक बनवून सांगितलें, असें मात्र आम्हांस वाटत नाहीं, हेंही आम्हीं याच वेळीं स्पष्ट बोलून दाखविलें पाहिजे. या एकंदर गोष्टींचा विचार केला म्हणजे कौलावर सुद्धां द्वंद्वयुद्धाची तोड ठोकिली; या गोष्टीनें आमच्या पूर्वजांचा दूरदर्शीपणा व्यक्त होतो. या प्रकरणाचा परिणाम तुम्हाला अनुकूल झाला, हें पाहून आम्हांला फार समाधान होत आहे, हें मी पुनः सांगतों.

[illegible] म्हणाला,–'महाराज, या [illegible]सा सुखकर झाला, [illegible]र्यंत पाऊल [illegible] कोणत्या [illegible] [illegible]सहावलोकन [illegible]करणें मला [illegible] आहे. एका वेळीं तर या सर्वांनीं मी एक दिवससुद्धां जिवंत रहावयास योग्य नाहीं, असें ठरवून टाकलें होतें. जर या आपल्या उदार पुत्रानें माझा पक्ष घेतला नसता, तर त्या मार्थोफिरूच्या बरळण्यावर विश्वास ठेवून तुम्हीं माझा प्राण घेण्यास अगदीं कांकूं केलें नसतें. ज्यांनीं लढाया करण्यासाठींच जन्म घेतला आहे, ते आपल्या किंवा दुसऱ्याच्या जिवाची फारशी पर्वा करीत नाहींत, हीं गोष्ट जरी खरी आहे, तरी तसाच आणीबाणीचा प्रसंग आल्यावांचून एकाद्या मानवी प्राण्याचा प्राण घेणें हें महत्कार्य [illegible] गोष्ट आपण नेहमीं ध्यानीं ठेविली पाहि- [illegible]

मी जें सध्यां बोलत आहें तें उगीच कांहीं तरी बोलावें म्हणून बोलत नाहीं, किंवा तुमच्या-विषयीं माझ्या मनांत द्वेष आहे तो व्यक्त करण्यासाठीं बोलत आहें, असेंही नाहीं. तथापि मी जें कांहीं—'

दृढसंधराजा म्हणाला,–'तुमच्या भाषणाचा हेतु मी समजलों. आमच्या दरींत आल्यापासून तुम्हाला जीं दुःखें सहन करावीं लागलीं, त्यांची अल्पशी भरपाई करून देण्याचें मला सामर्थ्य आहे. माझे प्रजाजन हो, मी जें कांहीं करीन तें नेहमीं विचार करूनच करीन अशी तुमची खात्री आहे कीं नाहीं ? मी तुमचें अकल्याण करीन असें जर तुम्हास वाटत असेल, तर तसें स्पष्ट बोलून दाखवा. मी तुम्हांस असें विचारतों कीं, आजच्या युद्धाच्या निमित्तानें या सरदारांचा भलेपणा स्थापित झाला आहे; यांच्या त्या मूर्ख सेवकानें जो अपराध केला, त्याबद्दल त्याला शिक्षा झालीच पाहिजे, असा कोणाचा आग्रह आहे काय !'

राजाच्या या भाषणानें तेथें जमलेल्या भिल्लांस मुळींच वाईट वाटलें नाहीं; इतकेंच नव्हे, तर त्यांच्यांपेकीं कांहीं सुस्वभावी भिल्लांनीं सत्यरथाला एकदम सोडून द्यावें असें स्पष्ट सांगितलें, म्हणून राजाज्ञेनें ताबडतोब हुकूम करून सत्यरथाला बंधमुक्त करून सभेंत आणिलें.

राजाचे सेवक सत्यरथास आणावयास गेले असतां सरदार हलधर सर्वांस स्पष्टपणें ऐकूं येईल अशा खणखणीत स्वरानें बोलला, आजचा हा आनंदाचा दिवस माझ्या दृष्टीस पडला, हे राजकुमार शेखराचे मजवर फार फार उपकार आहेत. या शेखराचा आजचा पराक्रम पाहून त्याच्या मातेला असा वीरपुत्र आपल्या उदरीं जन्मास आला म्हणून अत्यानंद होत असेल; आणि असेला असामान्य वीर आपला पति होणार म्हणून वीरकन्या प्रियवंदेला जो हर्ष होत असेल, त्याची आपणां सर्वांनीं मनानेंच कल्पना केली पाहिजे. तसेंच ज्याचें व. कसोटीला लागून जो चा दरींतील सर्वांवरील मध्यें अग्रणी आहे असें ठरलें आहे, राजूस बंधु आपल्याला परमेश्वराच्या कृपेनें लाभे व म्हणून युवराज चूडामणीच्या अंतःकरणाला मोठा आनंद होत असला पाहिजे. त्याच्या शेखर जोंपर्यंत या दरीचें रक्षण तं शंका तयार आहे, तोंपर्यंत या दरीत्यंत सुंदर दृष्टीनें पाहण्याची शत्रूची ला नसती, तरी

'म्हणजे ! आम्ही का कोणाची प्राज्ञा राच विनोदी होता, भरल्या आहेत कीं काय याची संधि मिळाली मोठ्या ईर्षेनें विचारलें. व्यर्थ दवडीत नसे तल्या मनांत कोधानें अ करीत असतां त आणि मत्सरानें त्याला रा या भूषण त्यामुळें त्याला आपले तुमच्य ठेवण्यास फारच प्रयास क यांच्

इतक्यांत सत्यरथ त्या माझी आला. त्याचें स्वा आज्ञे- हलधराचें लक्ष्य चूड मणीच्या त्या प्रश्ना नाहीं. त्यानें फक्त एकदा त्याजकडे नजर टाकली, च आपल्या हृदयांत जा बाण शिरत चूडामणीला वाटलें. जर घेण्याच्या इच्छेनेंच हलधरा केलें असलें, आणि त्या पाहिलें असलें, तर तो पूर्णपणें साध्य झाला नाहीं. चूडामणीनें आतांप हलधरासंबंधानें जो निष्क केला होता, त्याचा वक्तृ नें शेखराच्या स्तुतीनें प्र ला, यांत संशय नाहीं. ची अशी स्तुति केली, त्यामुळें चूडामणीला ज्या वेदना झाल्या तशा वेदना हलधरानें त्याच्या हृदयांत खंजीर खुपसला असता, तरी झाल्या नसत्या.

आपल्या धन्यास पाहतांच सत्यरथानें त्याचे पाय धरिले. हलधरानेंही आपल्या

शेखरानें सांगितलें,–'त्याच्या संबंधानेंसुद्धां आतां काळजी करावयास नको, अशी माझी समजूत आहे. आपण फक्त मजबरोबर तिकडे चला, म्हणजे झालें.'

सरदार हलधर शेखराबरोबर थोरल्या दिवाणखान्याकडे आला, त्यावेळीं तो सर्व दिवाणखाना भिल्लांनीं अगदीं गजबजून गेला आहे, असें त्याला आढळून आलें. त्या दिवाणखान्यांतच काय, पण त्याच्या बाहेर-सुद्धां अगदीं पुढील दरवाज्यापर्यंत भिल्लांची मोठी गर्दी झालेली त्याच्या दृष्टीस पडली. ला आंत घुसण्याचा प्रयत्न करतां येईल, में करण्याच्या खटपटींत गढून गेलेला दृष्टीस पडला. दिवाणखान्यांतील दृढसंधराजा विराजमान झाला मुखावर समाधानाचा ठसा ना. त्याच्या शेजारच्या एका [illegible] चूडामणि वस- [illegible] मान- [illegible] ासविण्याचा प्रयत्न [illegible] याच्या शेजारीं असलेल्या [illegible] आसनावर पंडित हेमचंद्र बसला [illegible] त्याला मात्र अगदीं मनापासून आनंद होत आहे असें स्पष्ट दिसून येत होतें.

सरदार हलधराला येत असलेला पाहून भिल्लांनीं त्याला मार्ग दिला, आणि तो शेखरांसह दृढसंधराजापाशीं जाऊन पोंचला. त्याला पाहतांच दृढसंधराजानें जवळच्या एका रिकाम्या आसनाकडे हात करून त्याला म्हटलें,–'अहो हलधर, या आसनावर बैसा. आजच्या द्वंद्वयुद्धानें सर्व प्रकारच्या संशयांची निवृत्ति झाली आहे, हें मी प्रांजलपणें कबूल करतों. जर आपण द्वंद्वयुद्धाचा प्रश्न [illegible] आणि आपल्यातर्फे [illegible]

गोष्टीचा तर मला आनंद होतच आहे; पण त्याहूनही आपणावरील प्राणसंकट टळलें, या गोष्टीचा मला फार आनंद होत आहे. ज्या अर्थीं आजच्या द्वंद्वयुद्धामध्यें सत्याचा विजय झाला आहे, त्या अर्थीं जांघिळानें कोलाचे वेळीं पाहिलेलें स्वप्न म्हणजे केवळ त्याच्या पूर्व दुराग्रहानें कलुषित झालेल्या कल्पनाशक्तीचा नुसता खेळ होता, असें आतां आम्हांस वाटूं लागलें आहे. असें जरी आम्हांस वाटलें, तरी त्यानें आपल्या संबंधानें जें भाकीत सांगितलें तें त्यानें बुद्धिपूर्वक बनवून सांगितलें, असें मात्र आम्हांस वाटत नाहीं, हेंही आम्हीं याच वेळीं स्पष्ट बोलून दाखविलें पाहिजे. या एकंदर गोष्टींचा विचार केला म्हणजे कौलावर सुद्धां द्वंद्वयुद्धाची तोड ठेविली; या गोष्टीनें आमच्या पूर्वजांचा दूरदर्शीपणा व्यक्त होतो. या प्रकरणाचा परिणाम तुम्हाला अनुकूल झाला, हें पाहून आम्हांला फार समाधान होत आहे, हें मी पुनः सांगतों.

[illegible] म्हणाला,–'महाराज, या [illegible] सुखकर झाला, [illegible] पाऊल [illegible] कोणत्या प्रकार [illegible] सिंहावलोकन करणें मला [illegible] आहे. एका वेळीं तर या सर्वांनीं मी एके दिवससुद्धां जिवंत रहावयास योग्य नाहीं, असें ठरवून टाकलें होतें. जर या आपल्या उदार पुत्रानें माझा पक्ष घेतला नसता, तर त्या माथेफिरूच्या बरळण्यावर विश्वास ठेवून तुम्ही माझा प्राण घेण्यास अगदीं कांकूं केलें नसतें. ज्यांनीं लढाया करण्यासाठींच जन्म घेतला आहे, ते आपल्या किंवा दुसऱ्याच्या जिवाची फारशी पर्वा करीत नाहींत. हीं गोष्ट [illegible]

मी जें सध्यां बोलत आहें तें उगीच कांहीं तरी बोलावें म्हणून बोलत नाहीं, किंवा तुमच्या-विषयीं माझ्या मनांत द्वेष आहे तो व्यक्त करण्यासाठीं बोलत आहें, असेंही नाहीं. तथापि मी जें कांहीं—'

दृढसंधराजा म्हणाला,–'तुमच्या भाषणाचा हेतु मी समजलों. आमच्या दरींत आल्यापासून तुम्हाला जीं दुःखें सहन करावीं लागलीं, त्यांची अल्पशी भरपाई करून देण्याचें मला सामर्थ्य आहे. माझे प्रजाजन हो, मी जें कांहीं करीन तें नेहमीं विचार करूनच करीन अशी तुमची खात्री आहे कीं नाहीं? मी तुमचें अकल्याण करीन असें जर तुम्हास वाटत असेल, तर तसें स्पष्ट बोलून दाखवा. तुम्हांस असें विचारतों कीं, आजच्या [illegible] द्वाच्या निकालानें या सरदारांचा भलेपणा [illegible]पित झाला आहे; यांच्या त्या मूर्ख सेवकानें जो अपराध केला, त्याबद्दल त्याला शिक्षा झालीच पाहिजे, असा कोणाचा आग्रह आहे काय?'

राजाच्या या भाषणानें तेथें जमलेल्या भिल्लांस मुळींच वाईट वाटलें नाहीं; इतकेंच नव्हे, तर त्यांच्यांपैकीं कांहीं सुस्वभावी भिल्लांनीं सत्यरथाला एकदम सोडून द्यावें असें स्पष्ट सांगितलें, म्हणून राजानें ताबडतोब हुकूम करून सत्यरथाला बंधमुक्त करून सभेंत आणिलें.

राजाचे सेवक सत्यरथास आणावयास गेले असतां सरदार हलधर सर्वांस स्पष्टपणें ऐकूं येईल अशा खणखणीत स्वरानें बोलला, आजचा हा आनंदाचा दिवस माझ्या दृष्टीस पडला, हे राजकुमार शेखराचे मजवर फार थोर उपकार आहेत. या शेखराचा आजचा पराक्रम पाहून त्याच्या मातेला असा वीरपुत्र आपल्या उदरीं जन्मास आला म्हणून अत्यानंद होत असेल; आणि अरोला असा मान्य वीर आपला पति होणार म्हणून वीरप्रियवंदेला जो हर्ष होत असेल, केली पाहिजे. तसेंच ज्याचें व. कसोटीला लागून जो या दरींतील र. मध्यें अग्रणी आहे असें ठरलें आहे, बंधु आपल्याला परमेश्वराच्या कृपेनें ला म्हणून युवराज चूडामणीच्या अंतःकरण मोठा आनंद होत असला पाहिजे. शेखर जोंपर्यंत या दरीचें रक्षण तयार आहे, तोंपर्यंत या दर दृष्टीनें पाहण्याची शत्रूची

'म्हणजे! आम्ही का भरल्या आहेत कीं काय मोठ्या ईर्षेनें विचारलें. तल्या मनांत क्रोधानें अ आणि मत्सरानें त्याला त्यामुळें त्याला आपले ठेवण्यास फारच प्रयास क

इतक्यांत सत्यरथ [illegible] आला. त्याचें स्वा[illegible] हलधराचें लक्ष्य [illegible] चूडामणीच्या त्या प्रश्ना[illegible] नाहीं. त्यानें फक्त एकदा [illegible] त्याजकडे नजर टाकली, [illegible] आपल्या हृदयांत [illegible] वाण शिरत आला, [illegible] चूडामणीला वाटलें. जर [illegible] घेण्याच्या इच्छेनेंच हलध[illegible] केलें असलें, आणि त्यां[illegible] पाहिलें असलें, तर तो [illegible] पूर्णपणें साध्य झाला हो[illegible] नाहीं. चूडामणीनें आतां[illegible] हलधरासंबंधानें जो निष्कर्ष [illegible] केला होता, त्याचा व[illegible] नें शेखराच्या स्तुतीनें प[illegible], यांत संशय नाहीं. [illegible] अशी स्तुति केली, त्यामुळें चूडामणीला ज्या वेदना झाल्या तशा वेदना हलधरानें त्याच्या हृदयांत खंजीर खुपसला असता, तरी झाल्या नसत्या.

आपल्या धन्याला पाहतांच सत्यरथानें

[illegible] सेवकाचें योग्य पण मोजक्या [illegible] समाधान केलें, नंतर सत्यरथानें [illegible] थोडक्यांत आभार मानिले.

नंतर दृढसंध राजा हलधराला म्हणाला– [illegible]हो सरदार, आपण या दरींत पाऊल [illegible]पासून आपल्यासंबंधानें आमचें [illegible] अक्षम्य झालेलें आहे, तरी तें [illegible]तां आपण आपल्या इच्छेस [illegible] येथें राहून, आपण ज्या [illegible]तो हेतु साध्य करून [illegible]ें आपणास नम्रपणाचें [illegible] आपली मर्जी!'

[illegible]णाला,–'महाराज, आतां [illegible] राहण्यांत कांहीं मजा [illegible]मी येथें राहिलों तेवढें [illegible]पा करून आमचे घोडे कस- [illegible]एांस हुकूम करावा, एवढीच [illegible]च्छा आहे.'

[illegible] भाषण ऐकून दृढ- संधाला [illegible] वाटलें, अणि त्याला त्याचा [illegible] वाटला, तरी त्यानें तसें दाखविलें [illegible].

शेखर म्हणाला, 'आम्हांस अशा प्रसंगीं येथें रहावयाची [illegible] यास आम्हांस तोंड नाहीं; [illegible] आमच्याकडून झालेले अपराध [illegible] यानेंच येथून जावें एवढी मात्र [illegible] आहे!'

चूडामणि जरासा [illegible],–'ते जर जातातच तर खुशाल [illegible] त्यांच्या- वांचून आमचें येथें [illegible] नाहीं.'

हें त्याचें भाषण [illegible] पण त्यानें तोंडानें उत्तर [illegible] नाहीं. त्यानें एकदां शेखराकडे [illegible] चित् आश्चर्यदर्शक मुद्रेनें [illegible] केलें आणि आपली मान हालविली. या त्याच्या आविर्भावाचा अर्थ तेथें जमलेल्या सर्वांच्या ध्यानांत तत्काल आला. शेखरासारख्या शूर आणि उदार पुरुषाचा भाऊ असा नीच व तिरसट असावा, हें मोठें आश्चर्य आहे, असा त्याच्या मनांतील आशय आहे, हें चूडामणीच्याही ध्यानीं आलें. आणि त्याच्या मनांतील मत्सराग्नींत अधिक तेल पडलें. सत्यरथ आपल्या व आपल्या धन्याच्या सामानाची बांधाबांध करावयास निघून गेला, आणि दृढसंधानेंही त्यांच्या प्रस्थानाची तयारी करावयास आज्ञा दिली. घोडे तयार झाल्याची वर्दी येईपर्यंत सरदार हलधर अगदीं मोकळ्या मनानें शेखराशीं संभाषण करीत बसला होता.

घोडे तयार झाल्याची वर्दी येतांच हल- धरानें अगदीं मोकळ्या मनानें दृढ- संधाचा निरोप घेतला, आणि एकाद्या जिव- लग मित्राप्रमाणें शेखराला आलिंगन देऊन त्यानें त्याचे पुनः उपकार मानिले. पण त्यानें चुडामणीकडे नुसतें पाहिलें देखील नाहीं, कीं शिष्टाचाराप्रमाणें त्यानें त्याला नुसतें नमनही केलें नाहीं. दिवाणखान्यांतून बाहेर पडतांना तेथील भिल्लांनीं मोठ्या अदबीनें त्याला वाट दिली, आणि अशा रीतीनें तो एकदांचा प्रताप- पुरच्या राजवाड्यांतून बाहेर पडला!

प्रकरण १५ वें.

पुनः एकदां शिवाळ्याकडे.

राजवाड्यांतून निघाल्यानंतर सरदार हलधर आणि त्याचा सेवक सत्यरथ हे दोघेजण थेट पिशाच–सोपान घांट चढावयास लागले. पूर्वी ते त्या दरींत आले त्यावेळीं जितका सूर्यप्रकाश होता, त्यापेक्षां सध्यां अधिक असल्यामुळें यावेळीं त्यांस दरीची शोभा पूर्वी- पेक्षां अधिक चांगली दिसत होती. पूर्वी त्यांना ज्या ठिकाणीं पहारेकऱ्यानें रोंखिलें होतें, त्या ठिकाणीं सध्यां पहारेकरी उभा नव्हता. कारण सकाळीं झालेल्या द्वंद्वयुद्धासाठीं तेवढ्या वेळेपुरती त्याला सुटी मिळाली होती. द्वंद्वयुद्ध आटोपल्यानंतर परत्या चा-

घटका लोटण्यापूर्वीच सरदार हलधर प्रताप-
पुरांतून बाहेर पडला असल्यामुळें त्याच्या
मागून प्रतापपुरांतून बाहेर पडलेला पहारेकरी
अद्यापि आपल्या नोकरीवर हजर झाला
नव्हता. पिशाच-सोपान घाटांनें जात असतां
त्यांमीं परस्परांशीं फारसें भाषण केलें नव्हतें.
आपण दृढसंधराजाच्या प्रदेशांतून बाहेर पडे-
पर्यंत कांहीं बोलूं नये, हेंच बरें; असें त्यांस
वाटत होतें. योग्य वेळीं ते आपला घांटांतील
प्रवास संपवून त्रिशूल पर्वतापाशीं आले,
आणि तेथून ते कोणत्याही प्रकारचें विघ्न न
येतां पुनः त्या पठारावरील शिवालयांत
येऊन सुखरूप पोंच शिवालयापाशीं
असलेल्या धर्मशाळेच्या खा॰ त येऊन बस-
ल्यावर मात्र त्यांच्या मनास जरा शांतता
आली, आणि त्यांनीं संभाषणास प्रारंभ
केला. त्यांतील महत्त्वाचा भाग येथें देतों.

प्रथमतः हलधर म्हणाला,–'सत्यरथा,
आपण एकदांचे त्या सगळ्या संकटांतून
कसेबसे जीव घेऊन येथपर्यंत येऊन
पोंचलों! या सगळ्या विघ्नांत तुला एक
जखम झाली व अंधार कोठडींत रहावें
लागलें, याचें मला फार वाईट वाटतें. असो!
प्राणावर आलें होतें, तें एवढ्यावरच निभा-
वलें, यांतच आपण आनंद मानला पाहिजे!'

सत्यरथ म्हणाला,–'माझी जखम कांहीं
फारशी मोठी नाहीं, आणि मी तिची पर्वाही
करीत नाहीं. बरें, माझ्या मनांत आपल्याला
कांहीं विचारावयाचें आहे, तें विचारूं का?'

हलधरानें म्हटलें,–'अगदीं मोकळ्या
मनानें खुशाल विचार!'

सत्यरथानें विचारलें,–'काल रात्रीं आपणां
उभयतांची आपण राहत होतां त्या दिवाण-
खान्यांत गांठ पडली, त्यावेळीं तेथें कोणी
लपून बसलें असून तें आपलें भाषण ऐकत
आहे, हें आपल्यास कशावरून समजलें?'

हलधरानें उत्तर दिलें,–'हा तुझा प्रश्न
बरोबर आहे. मी यासंबंधानें जरा विस्तारानें
सांगितल्याखेरीज तुझी बरोबर समजूत पडा-
वयाची सहवा
म्हाता-
मी त्याच्य.
करून ठेविला
मजपाशीं आला,
काळीं ईश्वरदर्शन
इच्छा मजपाशीं
त्या दिवाणखान्यांतून
त्याचा कांहीं तरी हेतु
माझ्या लक्ष्यांत आलें;
करतां राजाबरोबर खल
तेथें मला सोडून राजा बरा-
गेला होता. तो परत आला,
शेवटची कांहीं इच्छा असल्यास
विचारली. हा त्याचा प्रश्न साहजि-
आणि मी अशा प्रसंगीं आपल्या
सेवकास भेटण्याची इच्छा करीन, र
पूर्वीच अनुमान [illegible]
कसलीही अपेक्षा [illegible] मी प
आलें तें अनुमान [illegible] ण्न त्य.
तुझी भेट घेण्यासंबंधाचा [illegible] प्रश्न
दृढसंधराजासारखा [illegible] आणि क
माणूस मनांत [illegible] धरल्याखेरीज
आपल्याशीं इतर [illegible] वर्तन करीत
नसावा, असें [illegible] मनांत येऊन
मी त्याच्या हेतुसंबंधानें विचार चालविला.
तुला आणि मला एकत्र ठेवण्यांत त्याचा
कोणता हेतु असावा? अर्थात् आम्ही कांहीं
तरी बोलावें आणि तें त्याच्या कानावर यावें,
असाच त्याचा हेतु असला पाहिजे असें
माझ्या मनांत आलें; याशिवाय दुसरा हेतु
जुळेना. म्हणून मी तुझी भेट घेण्याचें
तत्काल वचन दिलें, आणि त्यापूर्वीच या
भेटीच्या वेळीं कसें वागावयाचें तें मी ठरवून
ठेविलें. राजाबरोबर मी जेव्हां पुनः पहिल्या
दिवाणखान्यांत परत आलों, त्यावेळीं सरु-
द्दर्शनीं तेथील चिलखताकडे माझी दृष्टि
गेली, आणि शिरस्त्राणाला असलेल्या

पाहत
ाचीही
असें
ा अगदीं
नाहीं. मला
ा काय, याची
राजानें मजकडे
पाहिलें, पण मीं
नाहीं. तो गेल्यावर
एकटाच होतों; मी
करीन असल्याप्रमाणें
ारी माझें सर्व लक्ष्य त्या
ा. थोड्याच वेळानें चिलख-
ाडा हालल्याचा मला भास
ाणि मी जेव्हां आपल्या अंगा-
ावरचे खुंटीवर ठेवण्याच्या निमित्तानें
खतापाशीं असलेल्या खुंटीजवळ
वेळीं तर चिलखतांतील माणसाचा
ासही मला चांगलाच ऐकूं आला,
ा होता, माणूस उभें आहे,
ाल्या मा[illegible] सात्री झाली,
हेतु [illegible], आणि या
ा आपण [illegible] ध्यावा, हें मीं
तत्काल ठरविलें. [illegible] तूं एक रात्र
राहिला होतास, तो [illegible] पाहण्याचें मला
अगदीं कारण [illegible], पण तुला सावध कर-
वयासाठीं मीं ती चित्रलिखित दृष्टीपली-
कडची जागा मुद्दाम योजिली आणि त्या
निमित्तानें तुला त्या खोलींत नेलें.'

सत्यरथ म्हणाला,–'आपणाला त्या माण-
साचे चिलखतांतून डोळे दिसले, म्हणून बरें
झालें. नाहीं तर आपलें भाषण भलत्याच
दिशेनें सुरू झालें असतें, आणि सगळाच
घोंटाळा उडाला असता!'

हलधर म्हणाला,–'त्या लबाड दृढसंधाची
युक्ति ध्यानांत न येण्याइतका लेंचापेंचा
माणूस आमच्याऐवजीं तेथें असता, तर तसें
झालें असतें. जो कोणी त्या चिलखतामध्यें
लपून बसलेला होता, त्यानें आमचें भाषण
अक्षरशः दृढसंधराजाला सांगितलें असावें,
यांत शंका नाहीं; आम्हीं आपल्या भाषणांत
ज्या गुप्त गोष्टींचा उल्लेख केला होता, त्या
गोष्टी आपणांस समजल्या नाहींत म्हणून
दृढसंधराजाच्या मनाला मोठी तळमळ
लागली आहे! पण सत्यरथा, तुला सांगतों,
त्या नीच दृढसंधानें आम्हाला कशा रीतीनें
वागविलें आहे, हें मी कधींच विसर-
णार नाहीं!'

आपल्या धन्याच्या मनांत काय चाललें आहे, हें ओळखून सत्यरथ म्हणाला,–'तथापि त्या उदार मनाच्या शेखरासंबंधानें आपल्या मनां[illegible]म्य असेल, असें मला वाटत नाहीं. त्या दृढसंधानें आणि त्या महा नीच चूडामणीनें आमच्याशीं जें वर्तन केलें, त्याहून त्या शेखराचें वर्तन किती निराळें होतें! अर्थात् ज्या वेळीं त्यांस शिक्षा कर-ण्याचा प्रसंग येईल, त्यावेळीं शेखरास त्यांतून वगळलेंच पाहिजे; कारण—'

हलधर म्हणाला,–'बस बस! पुरे कर! यासंबंधानें आतां अधिक बोलण्याचें कारण नाहीं. तो विचार पुढचा आहे; तो आपण पुढें करूं!'

यावेळीं सरदार हलधराच्या मनांत कांहीं निराळेच विचार सुरू झाले आहेत, ही गोष्ट सत्यरथाच्या ध्यानीं आली, आणि तो उगाच राहिला. कांहीं वेळानें सरदार हलधरानें मणि-भद्राकडे जाऊन भोजनाची तजवीज कर-ण्याविषयीं सत्यरथास हुकूम केला. आपल्या धन्याचें मन आतां प्रसन्न आहे असें पाहून त्या विश्वासु सेवकानें त्याला विचारलें,–'महाराज, या बागलाणांत आणखी कांहीं दिवस रहावयाचा आपला हेतु आहे काय?'

त्यानें सांगितलें,–'जर सध्यां बृहद्रथ सुंदरपुरामध्यें असेल, तर स्वदेशीं जाण्यापूर्वी मला एकदां त्याची भेट घेणें अवश्य आहे. सुंदरपुर येथून फारसें दूर नसावें असा माझा तर्क आहे.'

सत्यरथ म्हणाला,–' सुंदरपुर येथून थेट दक्षिणेस असणाऱ्या कालीनदीचे कांठीं आहे. तें येथून सुमारें आठ नऊ कोस असेल. '

हलधर म्हणाला,–' बृहद्रथ आपल्या राजधानींत आहे कीं नाहीं, याची बातमी कदाचित् येथेंसुद्धां लागेल. बरें, येथून सुंदरपुरचा रस्ता तुला माहीत आहे काय ? '

सत्यरथ म्हणाला,–' मी [illegible] पुरीं गेलेला नाहीं. तथापि [illegible] विचारल्यास तो बरोबर रस्ता [illegible] एकादा वाटाडयाही तो मिळवून [illegible]

हलधर म्हणाला,–' पण [illegible] वाडयांत असला, तर सगळ्या [illegible] बृहद्रथाची गांठ पडेल, तर [illegible] चीज झाल्याखेरीज राहणार [illegible]

' कांहीं बातमी निघेल तर काय [illegible] सत्यरथ मणिभद्राच्या दुकानांत [illegible] मुळें त्यांचा संवाद इतक्यावरच [illegible]

हलधर आणि सत्यरथ हे दोघे [illegible] वाडयांत कैदी असतां तेथें ज्या [illegible] आल्या त्या त्यांस समजल्या [illegible] द्रथानें चूडामणि, शेखर आणि [illegible] पकडून नेण्याकरितां जे प्रयत्न [illegible] ते कसे फसले होते, त्याचा [illegible] मुळींच मागमूस लागलेला [illegible] येथें स्पष्टपणें नमूद करून ठेवणें [illegible]

सत्यरथ मणिभद्राला भेटावयास [illegible] दुकानामध्यें गेला खरा, पण मणि[illegible] तेथें नव्हता. तरी पण मणिभद्रा[illegible] मथुरा तेथें वसलेली सत्यरथाच्या दृष्टीस पडली. या मुलीचें वय सुमारें पंधरा वर्षांचें असून ती अंगापिंडानें मजबूत होती. तरी तिचे अवयव मोठे गोंडस दिसत. मणिभद्र दुकानांत नाहीं, म्हणून जरी सत्यरथाला थोडें वाईट वाटलें होतें, तरी मथुरेला तेथें एकटी पाहून त्याच्या मनाला थोडें बरें वाटलें. सत्यरथाचें मन तिजकडे वेधलें यांत फारसें आश्चर्य नाहीं. कारण ती मुलगी दुसऱ्याचें मन वेधण्यासारखीच होती. तिचे पाणीदार चपल नेत्र आणि तिच्या मुखावरील अकारण हास्य हीं दोन भूषणें बाजूस ठेविलीं, तरी तिचें सरळ नाक, काळेभोर व तुळतुळीत केश, तिचें कुंकुम-बिंदुयुक्त विशाल-भाल, तिचा निमगोरा अंगवर्ण, हीं तिच्या स्वरूपास शोभा आणीत होतीं, यांत शंका नाहीं. त्या मुलीची जरी अत्यंत सुंदर स्त्रियांत गणना करतां आली नसती, तरी तिला कुरूप म्हणावयाची कोणाची प्राज्ञा नव्हती. तिचा स्वभाव बराच विनोदी होता, आणि थट्टा–मस्करी करण्याची संधि मिळाली असतां ती ती कधींही व्यर्थ दवडीत नसे तथापि अशा प्रकारें थट्टा करीत असतां आपल्या नैसर्गिक स्त्रीस्वभावाला भूषण णाऱ्या विनयाचें कधींही उल्लंघन कर्‍ ध्यामुळें तिचा विनोदी स्वभाव [illegible] णावहच होत असे.

तिला पाहून सत्यरथाला [illegible] येतें. दोन [illegible] र्ये [illegible] तल्य [illegible] दृढ [illegible] दी [illegible] आपल्या अनुक्रमार्चे [illegible] तां त्याला चार दोन वेळां त्या [illegible] ण झाल्याखेरीज राहिलें [illegible] कारणांमध्यें क्षणोक्षणीं प्र[illegible] राजकारणांपासून मोठें वैभव प्राप्त करून घेण्यापेक्षां मथुरेशीं विवाह करून तिच्यासह एकाद्या लहानशा झोंपडींत आनंदानें वास करणें हें शतपट अधिक चांगलें आहे, असेंही त्या प्रसंगीं त्याच्या मनांत आलें होतें. प्राणावर आलेलें संकट निभावून आपण पुनः आपल्याला इष्ट असलेल्या सुंदरीपाशीं आलों, या गोष्टीचा त्याला फार आनंद वाटत होताच, आणि त्यांतल्यात्यांत ती सध्यां तेथें एकटी आहे, या गोष्टीनें तर त्याचें मन फारच उल्लसित झालें होतें परंतु याप्रसंगीं त्याला तिच्याशीं मन मोकळें करून

वोलत बसण्यास फुरसद मिळाली नाहीं. तिच्याशीं त्याचीं दहापांच प्रश्नोत्तरें होतात न होतात, इतक्यांत मणिभद्र तेथें आल्यामुळें त्याच्या मनाचा थोडासा विरस झाला. मणिभद्राला पाहतांच त्यानें आपण दोघे भुकेले असून आपणांस भोजनाची अत्यंत अपेक्षा आहे, असें त्यास सांगितलें. हें त्यांचें भाषण सुरू असतांनाच आणखी एक घोडेस्वार त्या देवळापाशीं येऊन दाखल झाल्यामुळें त्या दोघांचेंही लक्ष्य त्या स्वाराकडे वेधलें. त्या स्वाराला पाहतांच मणिभद्र सत्यरथाशीं चाललेलें बोलणें तितक्यावरच [illegible] न त्या नवीन स्वाराच्या स्वागतासाठीं [illegible] पुढें झाला. सत्यरथही मणिभद्राबरो[illegible]नाच्या अंगण्यांत आला, त्यामुळें [illegible]ची आणि त्याची चांगली दृष्टा[illegible] सत्यरथाला पाहतांच तो स्वार त्यासारखा झाला, त्यावरून त्यानें ओळखिलें असावें, असें सत्य[illegible] काल [illegible] वाराह[illegible] आला तो [illegible] वा[illegible] ळख केव्हांचीं हें कांहीं त्या[illegible]. त्या स्वारानें सत्यरथाशीं बो[illegible]म केला नाहीं, म्हणून सत्य[illegible] [illegible]किडे निघून गेला.

आपल्या धन्यासमोर उभा राहून [illegible] रथ म्हणाला,–'महाराज, आतांच एक गृहस्थ येथें आला आहे. त्याचा चेहरा माझ्या ओळखीचा दिसतो, पण तो कोण असावा, हें नीटसें ध्यानांत येत नाहीं.'

हलधर म्हणाला,–'नीट आठवण करून पहा, म्हणजे तुझ्या तें ध्यानांत येईल. बरें हा गृहस्थ प्रतापपुराहून तर आलेला नसेल ना.'

सत्यरथानें उत्तर केलें,–'हा माणूस कांहीं बागलाणापैकीं दिसत नाहीं. त्याचा वेष, त्याची मुद्रा व त्याचा एकंदर बाणा गांवढळ दिसत नम्रत्व तो दरयाखांत वागलेला मनुष्य आहे,असें दिसतें.' नंतर एकदम स्मरण झाल्याप्रमाणें चकित मुद्रेनें तो म्हणाला,–'आतां आलें माझ्या ध्यानांत! आपण चंपावतीमध्यें असतां जो गृहस्थ पांच चार वेळां आपल्या दर्शनाची इच्छा करीत होता, आणि ज्यानें आपणाकडे देण्यासाठीं पांच चार वेळां पत्रेंही दिलीं होतीं, तोच हा गृहस्थ. त्यावेळीं आपण त्याच्या पत्रांचीं तोंडींच उत्तरें दिलीं होतीं, त्यांची भेट घेतली नव्हती, हें आतां मला [illegible] आलें!'

[illegible]धर म्हणाला,–'तर मग बृह[illegible] विश्वासु प्रतिनिधि किंवा त्याचा [illegible]दत्त तोच हा गृहस्थ. बरें, [illegible] ओळखलें काय?'

[illegible], उत्तर केलें,–'होय; त्यानें [illegible]य ओळखिलें; पण तो कांहींच [illegible]. सध्यां तो त्या मणिभद्राबरोबर [illegible] आहे. आतां माझ्या मनांत [illegible] उत्पन्न होते कीं, आपणासंबंधी [illegible] गोष्टी जर तो त्या मणिभद्राजवळ [illegible]'

[illegible] म्हणाला,–'तो असें करणार [illegible] मोठा धूर्त मनुष्य आहे. तो आतां [illegible] आपणाशीं बोलावयासाठीं येथें [illegible] रहावयाचा नाहीं, मी खात्रीनें [illegible] पहा मणिभद्र इकडे येत आहे, [illegible] याचाच निरोप घेऊन येत असावा.'

[illegible]भद्र ते जेथें बसले होते तेथें आला, आणि दरबारी थाटाचें अनुकरण करीत म्हणाला,–'महाराज, हा नम्र सेवक आपल्या सेवेस येथें हजर झाला आहे. याचें कारण एवढेंच आहे कीं सध्यां या धर्मशाळेंत सुंदरपुरकर बृहद्रथ महाराजांचा विश्वासु सेवक देवदत्त येथें आला आहे. त्याला आपली गांठ घेऊन आपल्याशीं दोन शब्द बोलावयाचे आहेत. अगोदर वर्दी दिल्यासेरीज आपल्या दर्शनास येणें हें त्याला प्रशस्त वाटत नाहीं; कारण–तुमचा देव भला करो–तो मोठा थोर गृहस्थ आहे आणि तो मोठ-

मोठ्या दरबारांत वागलेला आहे. तो आज मुद्दाम आपल्यासंबंधानेंच कांहीं वर्तमान कानीं आल्यामुळें आपल्या चौकशीसाठीं येथें आला आहे. आपल्यावर प्रतापपुरीं कांहीं संकट आलें होतें व त्या संकटांतून आपण पार पडलां, याबद्दल त्याला फार आनंद होत आहे. आपली परवानगी असेल तर तो आपल्या भेटीस येईल.'

सरदार हलधरानें मणिभद्राचें तें सर्व भाषण शांतपणें ऐकून घेतलें, आणि त्याचें भाषण संपलें कीं नाहीं हें पाहण्यासाठीं थोडा वेळ तो स्तब्ध राहिला. नंतर तो म्हणाला,– 'आम्हाला आपल्यासारख्या थोर पुरुषाच्या दर्शनानें फार आनंद होईल, असें त्यांना कळवा.' मणिभद्र तेथून निघून गेल्यावर तो सत्यरथाला म्हणाला,–' एकंदरींत आपणांस सुंदरपुरापर्यंत जाऊन यावें लागणार; यांत शंका नाहीं.'

प्रकरण १६ वें.

लढाईची तयारी आणि कूच.

सरदार हलधराला तेथें देवळांतच सोडून प्रथमतः प्रतापपुराकडे वळणें जरूर आहे. सत्यरथासह सरदार हलधर प्रतापपुरच्या राजवाड्यांतून बाहेर पडला, त्यावेळीं वाड्यामध्यें दृढसंधाचे सर्व प्रजाजन एकत्र जमलेले होते. त्यावेळीं तेथें लहानसा दरबारच भरला होता, असें मानण्यास हरकत नाहीं.

सरदार हलधर निघून गेल्यानंतर दृढसंध राजा अत्यंत गंभीर मुद्रा धारण करून आपल्या आसनावरून उठला, आणि त्यानें आपल्या खणखणीत वाणीनें जमलेल्या सर्व भिल्लांस गडबड बंद करण्याचा हुकूम केला. या वेळची त्या राजाची गंभीर मुद्रा पाहून त्याच्या प्रजाजनांस मोठें आश्चर्य वाटलें, आणि ते सर्वजण अगदीं स्तब्ध राहून राजाचें भाषण ऐकावयास उत्सुक झाले. राजाच्या त्या वेळच्या एकंदर आविर्भावावरून आपणांस आतां कांहीं तरी म[illegible] गोष्ट ऐकूं येणार, अशी सर्वांच्या मनें खात्री झाली.

आपले सैनिक आणि प्रजाजन शांत होऊन आपलें भाषण ऐकण्यास उत्सुक झाले आहेत, हें पाहून राजा म्हणाला,–' अहो प्रजाजन हो! काल संध्याकाळीं त्या नीच बृहद्रथराजानें जें विश्वासघातकीपणाचें वर्तन केलें आहे, तें तुमच्या सर्वांच्या कानावर आलेंच असेल, नसेल तर सांगतों. युवराज चूडामणि आमच्या कांहीं महत्त्वाच्या कामासाठीं वत्सपुरास जाऊन या हेमचंद्रासह परत येत असतां, त्या नीच बृहद्रथानें या दोघांचा–या महाविद्वान् पुरुषासह तुमच्य भावी राजाचा–घात करण्यासाठीं चां[illegible] मारेकरी घातले होते! पण हे दोघेही छातीचे शूर असल्यामुळें यांनीं मारेकऱ्यांपैकीं चौघांना यम[illegible] दोघांचा पूर्ण पराजय करून [illegible] माहूनही या बृहद्रथा[illegible] जर तुमच्या कानीं येई[illegible] पणाचें त्याला योग्य [illegible] तुमचे बाहु स्फुरण पाव[illegible] नाहींत! काल अगदीं भर[illegible] नीचाचे कित्येक सेवक एका[illegible] दरींत उतरून आले, आणि [illegible] व त्याची भावी पत्नी प्रियंव[illegible] झडप घातली. पण या तेजस्वी शूर [illegible] त्यांची पक्की खोडकी जिरविली व हल्ला[illegible] णाऱ्यांपैकीं तिघांना प्राणावेगळें करून फक्त एकाला मात्र आपल्या पराभवाचें वर्तमान निवेदन करण्यासाठीं बृहद्रथराजाकडे पर[illegible] जाऊं दिलें! केवढा हा नीचपणा! प्रत्य[illegible] आमच्या बायका–मुलांवर असा [illegible] झालेला पाहून आम्ही स्वस्थ बसावें [illegible] त्या नीच बृहद्रथानें आमच्याशीं जे[illegible] जाणूनबुजून मोडला आहे! अ[illegible] हड्डी नरम करून त्यानें केले[illegible] वाडयात प्रायश्चित्त त्याला आम्हीं [illegible]

बोलत बर आमच्या बायका-मुलांवर केलेला
तिच्याशीं आम्ही नामदीप्रमाणें सहन केला, तर
न स्वर्गीं आमच्या शूर पितरांना माना खालीं
मे घालाव्या लागतील ! आणि तो बृहद्रथ
आणखी नीचपणाचीं कृत्यें करण्यास प्रवृत्त
झाल्याखेरीज राहणार नाहीं; यासाठीं आतां
दिरंगाई करण्यांत अगदीं हांशील नाहीं.
आजच्या आज सर्व सैन्य गोळा झालें पाहिजे.
आम्ही युद्धास सिद्ध आहोंत, हें त्या नीचास
दूत पाठवून कळविण्याची जरूर अगदीं उर-
० लेली नाहीं. कारण त्यानें आपण होऊनच
आमची कुरापत काढिली आहे. या युद्धा-
मध्यें मा स्वतः हातीं तरवार धरणार आहें.
यासाठीं तुम्ही सर्वजण आपापलीं फार दिवस
न असलेलीं हत्यारें आजच्या आज घांसू-
तयार करा. या मोहिमेसंबंधाच्या
ना मीं आपल्या मनांत पूर्णपणें
ा आहेत; मी केव्हां तुम्हांस
वा नेम नाहीं. मी काय
च्या सर्वांच्या लक्षांत

भल्ल-वीरांना हें राजाचें
उत्साह वाटला, आणि
करून आकाश-पाताळ एक
आपल्या सैनिकांचा हा आवेश
राजाला फार आनंद झाला,
श्रीनें त्याची मुद्रा अधिक सतेज
गली. आपल्या सैनिकांवर त्याचा
विश्वास होता, आणि एकदां सज्ज
झालेलीं त्यांचीं हत्यारें शत्रूच्या रक्ताचें प्राशन
केल्याखेरीज विश्रांति घ्यावयाचीं नाहींत,
अशी त्याच्या मनाची पूर्ण खात्री होती.
कृपाताविषयीं सदा आतुर असणाऱ्या चूडा-
ीला तर हें भाषण अमृताहून प्रिय
, आणि जर राजानें आतांच कूच
चा हुकूम केला असता, तर त्यानें
पाघाडी मारिली असती. हें युद्धाचें
न शेखराला कमी उत्साह वाटला
नाहीं; पण तो चूडामणीप्रमाणें दुष्ट नसल्यामुळें त्याच्या मुद्रेवर मात्र गंभीरता दिसत होती.

आपल्या भाषणानें सैनिकांमध्यें उडालेली चळवळ किंचित् शांत झाल्यावर दृढसंधराजा पंडित हेमचंद्राला म्हणाला,-'अहो हेमचंद्र, तुम्ही आपल्याबरोबर दहा जवान घेऊन आतांच्या आतां वत्सपुरास जा, आणि इकडील सर्व वर्तमान वृषपतीला निवेदन करा. तुम्ही शूर आहां हें मला माहीत आहे; पण तो नीच बृहद्रथ केव्हां कसें कपट करील याचा विश्वास नाहीं, म्हणून तुम्ही बरोबर दहा जवान घेऊन वेगवान् घोड्यांवर बसून वत्सपुर गांठा. आजच्या आज वत्सपुरकरांचे लोक युद्धास तयार झाले पाहिजेत. वत्सपुरकरांनीं युद्धासाठीं केव्हां कूच करावयाचें, ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची असल्यामुळें ती इतक्या लोकांसमोर मी सांगूं इच्छित नाहीं. कारण आमच्या बेतांतील थोडासा भाग जरी शत्रूला समजला, तरी तो सावध होऊन आम्हास अडथळा करील. वत्सपुरकरांनीं केव्हां कूच करावें आणि आम्हांस कोठें भेटावें, हें तुम्ही रिकिबींत पाय ठेवल्यानंतर तुम्हांस सांगेन.' नंतर तो आपल्या सैनिकांस उद्देशून म्हणाला,-'चला तर ! तुम्ही आपल्या तयारीस लागा. कूच करण्याच्या वेळीं काय खुणा ठरलेल्या आहेत त्या तुम्हांस माहीतच आहेत. वेळ दिवसाची असली, तर निशाण-काठीवर निशाण फडकूं लागेल, आणि वेळ रात्रीची असली, तर डोंगरांतील विवक्षित स्थलांवर धगट्या पेटतील. यांपैकीं एकादी खूण दृष्टीस पडल्यापासून दोन घटकांच्या आंत सर्वांनीं वाड्यापुढील मैदानांत एकत्र जमावयाचें हें तुमच्या ध्यानीं आहेच !'

हेमचंद्राची वत्सपुरीं जाण्याची तयारी झाली. तो एका उमद्या घोड्यावर बसला, आणि त्याला पोंचवावयास जाणारे दहा भिल्लही शस्त्रास्त्रांनीं सिद्ध होऊन खंद्या घोड्यांवर बसून वाड्याच्या अंगणांत येऊन उभे राहिले. त्यावेळीं राजानें हेमचंद्राला जरा

बाजूस घेऊन त्याला सांगितलें,–'अहो पंडितजी, कालचे त्या दुष्ट बृहद्रथाचे दोन्ही प्रयत्न फसले आहेत, ही गोष्ट त्याला कालच समजली असेल, आणि त्यानें केलेल्या अपराधांबद्दल मी त्याचा सूड घेतल्याखेरीज राहणार नाहीं, ही त्याची खात्री असेलच. ज्यावेळीं सुंदरपुरकर आणि वत्सपुरकर यांचें युद्ध सुरू होईल, त्यावेळीं आम्हीं वत्सपुरकरांस आणि आमचें व सुंदरपुरकरांचें युद्ध होईल, त्यावेळीं वत्सपुरकरांनीं आम्हांस मदत केली पाहिजे, असे आमचे तह झालेले आहेत आम्ही सुंदरपुरावर हल्ला करणार ही गोष्ट ते ओळखून आहेत, आणि ते आपल्या सैन्याची जमवाजमव करीतही असतील. तरी पण आम्ही निदान दोन दिवस मध्यें गेल्याखेरीज कूच करणार नाहीं; अशी त्यांची कल्पना असेल. कदाचित् त्यांचा कोणी हेर आमच्या राज्यांत असला, तर आम्ही सैन्याला एकत्र होण्याची आज्ञा केली आहे, ही गोष्ट त्याला आजच्या आज समजेल असें मानून चालले, तरी आम्ही उद्यां रात्रींखेरीज कूच करणार नाहीं, असें तो समजत असेल. पण, अरे नीचा बृहद्रथा! ही तुझी कल्पना साफ चूक आहे, असें लवकरच तुझ्या लक्ष्यांत येईल. मी हें हल्ल्याचें काम मोठ्या जलदीनें आणि शिताफीनें पार पडणार आहें. माझ्या कल्पनेप्रमाणें जर सर्व गोष्टी घडून आल्या, तर आणखी बारा प्रहर उलटण्यापूर्वीच सुंदरपुरच्या किल्ल्यावर आमचें निशाण फडकूं लागेल. मी काय [illegible] तें तुमच्या ध्यानीं आलेंच [illegible] न गेल्यावर वृषपतीची च[illegible]लून द्या, आणि आजच्या [illegible] त्वरेनें त्यांचें सर्व सैन्य एक[illegible]मचें सर्व सैन्य [illegible] होईल; आज संध्याकाळच्या [illegible] रातोरात कूच मध्यरात्र उल[illegible] दोन घटका दिवस करणार, आणि [illegible] प्रारंभ होणार! वृषपतीचें येण्यापूर्वीच युद्धास सैन्य जरी उद्यां [illegible]मिणमिणतांना बाहेर पडलें, तरी दोन घटका दिवसाच्या सुमारास तें सुंदरपुरानजीक आम्हांस येऊन मिळेल.'

पंडित हेमचंद्रानें आश्चर्यानें विचारलें,–'काय! आपण आजच्या आज कूच करणार! इतकी त्वरा?'

दृढसंध जोरानें म्हणाला,–'होय! माझ्या सैनिकांच्या बळावर माझा पूर्ण विश्वास आहे. माझ्या आज्ञेप्रमाणें आज सायंकाळपर्यंत सर्व सैन्य एकत्र होईल, ही माझी खात्री आहे; म्हणून मी आज रात्रींच कूच करणार. उद्यां सकाळीं दोन घटका दिवसाच्या सुमारास आम्ही सुंदरपुरापाशीं जाऊन दाखल होऊं, त्यावेळीं वृषपतीनें अगदीं नेमकें आम्हांस येऊन गांठलें पाहिजे. मी काय म्हणतों तें तुमच्या ध्यानीं आलेंना!'

पंडित हेमचंद्र म्हणाला,–'होय; माझी चांगली समजूत पडली आहे. आपल्या आज्ञेप्रमाणें महाराजांस निरोप सांगेन; त्याबद्दल आतां आपल्यास काळजी नको.'

दृढसंध म्हणाला,–'हें तर तुम्ही कराल च; पण ही गोष्ट अगदीं गुप्तपणानें पार पडली पाहिजे. मी जो आतां तुम्हाला बेत सांगितला आहे, तो वृषपतीवांचून दुसऱ्या कोणाच्या कानीं पडतां कामा नये. जर का यांतील एक अक्षर बाहेर पडलें, तर आमचें किती नुकसान होईल, आणि किती फजिती होईल, याचा अंदाज तुम्हाला करतां येण्यासारखा आहे. तुम्ही येथून जातांना तुम्हाला जितक्या जलदीनें जातां येईल, तितक्या जलदीनें गेलें पाहिजे; कारण एकेक क्षण मोठ्या मोलाचा आहे. तुम्ही वत्सपुराला जाऊन पोंचलां म्हणजे वृषपति आपले सर्व सैनिक एकत्र करण्यासाठीं तत्काल चोंहींकडे दूत पाठवील व उद्यां प्रातःकाळीं पायांखालीं दिसूं लागण्यापूर्वी सर्व लोक जमा होऊन ते कूच करतील बरें तुम्ही चला आतां. पण थांबा; वृषपतीला सांगा कीं, आपल्या नातीसंबंधानें काळजी करण्याचें कारण नाहीं. ती येथेंच वाडयांत

राहील. मी वाडयाच्या संरक्षणासाठीं निवडक अशा शंभर जवानांची एक टोळी येथें ठेवणारच आहें. '

हा निरोप ऐकून घेतल्यावर एका क्षणाचाही विलंब न करतां हेमचंद्र आपल्या बरोबरच्या अनुयायांसह घोडयांस टांच मारून रस्त्याला लागला.

जसजसा दिवस संपत चालला, तसतशी प्रतापपुरच्या दरीमध्यें मोठी धांदल उडाली. सूर्यास्ताचे सुमारास तर तेथील रहिवाशांची तारांबळ झाली होती. सर्व भिल्ल आपापलीं शस्त्रास्त्रें काढून तीं घासूनपुसून झक्क करीत होते. शिकलगाराला तरवारीस शिकल करतां करतां नको जीव झाला होता. भिल्लांच्या कोणत्याही झोंपडयांत यावेळीं प्रवेश केल्यास तेथें तरवारी, ढाला, भाले, बरच्या, तीरकमठे यांपैकीं कित्येक हत्यारें मोठया व्यवस्थेनें ठेवलेलीं आढळून आलीं असतीं; आणि स्वयंपाकघराकडे नजर टाकल्यास तेथें भिल्ल स्त्रिया भाकऱ्या भाजण्यांत आणि त्यांच्याबरोबर कोरडयासें तयार करण्यांत गढून गेलेल्या दिसल्या असत्या. आपला पिता, पति किंवा बंधु आतां लवकरच लढाईस जाणार; तो परत येईल कीं नाहीं याची शंका मनांत असल्यामुळें प्रत्येक स्त्री आपापल्या नात्याच्या पुरुषाच्या आवडीचा पदार्थ करण्यांत गुंग झाली होती. जरी त्यांच्या मनांत अशा प्रकारच्या शंका उद्भवणें हें साहजिक असलें, तरी त्या भिल्लिणी वीरमाता, वीरपत्नी किंवा वीरकन्या असल्यामुळें त्या आपल्या मुद्रेवर खेदाचें चिन्ह अगदीं दिसूं न देतां तोंडानें उत्साहवर्धक गाणीं म्हणून हातानें दळण कांडण व स्वयंपाक करण्यांत निमग्न झाल्या होत्या.

सायंकाळ झाली; सूर्य मावळला; दरींत जिकडे तिकडे अंधार पडला. सर्व भिल्ल शस्त्रास्त्रें धारण करून सज्ज झाले, आणि एकत्र जमण्याची खूण केव्हां होते, याचा वाट पाहत बसले. या वेळीं दरींमध्यें जिकडे तिकडे भिल्लांचे घोळकेच्या घोळके जागजागीं गोष्टी बोलत बसलेले होते. सुमारें चौदा घटका रात्र होण्याच्या सुमारास राजवाडयाचे भोंवतीं असलेल्या बुरुजांवर मोठ्या धगट्या पेटूं लागून त्यांच्या ज्वाला आकाशामध्यें पसरूं लागल्या. त्या दृष्टीस पडतांच सर्व भिल्ल आपापल्या आप्तइष्टांच्या भेटी घेऊन वृद्धांचे आशीर्वाद घेऊन राजवाडयाकडे जाऊं लागले. सुमारें दोन घटकांच्या आंत राजवाडयापुढील मैदानांत सातशें भिल्ल गोळा झाले.

त्यावेळच्या रीतीप्रमाणें राजानें मद्यानें भरलेले मोठमोठे घट त्या भिल्लांच्या स्वाधीन केले, आणि त्या भिल्लांनीं त्या स्फुरण उत्पन्न करणाऱ्या मद्याचें आकंठ सेवन केलें. रणदुंदुभी वाजूं लागल्या, आणि भिल्लही युद्धाच्या प्रसंगीं म्हणावयाचें चामुंडेचें स्तोत्र तारस्वरानें गाऊं लागले. सध्यांचा एकंदर देखावा पाहून बायकांना सुद्धां स्फुरण चढलें असतें. भिल्लांचें गायन संपण्याच्या सुमारास दृढसंधराजा शस्त्रास्त्रांनीं सज्ज होऊन आपल्या स्त्रीचा निरोप घेऊन राजवाडयाच्या अंगणांत येऊन दाखल झाला. त्याच्या मागून थोडयाच वेळानें चूडामणि आणि शेखर हे दोघे आपल्या मातोश्रीचा आशीर्वाद घेऊन आणि कुलस्वामीला वंदन करून आपल्या पित्यापाशीं आले.

सर्व सैनिक तयार झाल्यावर राजानें त्यांच्या निरनिराळ्या टोळ्या बनविल्या आणि सारख्या रांगा लावून कूच करण्यास हुकूम दिला. राजाच्या मनांतून सुंदरपुरावर अचानक छापा घालण्याचा असल्यामुळें किल्ल्यांतून बाहेर [illegible] बंद करण्याचा त्यानें हुकूम [illegible] सर्व सैन्य अगदीं शांतपणें [illegible] पडलें.

सैन्य दरींतून [illegible] त्यानें एकदम दक्षिणेचा [illegible] चूडामणि हेमचंद्राला आण[illegible] मार्गानें गेला होता, त्याच मार्गानें हें सैन्य चाललें होतें. ज्यावेळीं सैन्य दरींतून बाहेर पडलें त्यावेळीं

काळोख होता; पण थोड्याच वेळानें चंद्रोदय होऊन बराच प्रकाश पडला, त्यामुळें त्या सैन्याला उजेडासाठीं मशाली घेण्याची जरूर पडली नाहीं. तथापि प्रसंग पडल्यास तयारी असावी म्हणून त्यांनीं कित्येक भिजलेल्या मशाली बरोबर घेऊन ठेविल्या होत्या आणि आयत्या वेळीं त्या पेटविण्यासाठीं चकमकी आणि इतर ज्वालाग्राही पदार्थही त्यांच्यापाशीं होते.

सुमारें दोन घटकांनीं तें सैन्य प्रतापपुरच्या सरहद्दीवर येऊन दाखल झालें. येथून पुढें सुंदरपुरची हद्द लागली. येथें आल्यावर दृढसंधराजा आपल्या पुत्रांस उद्देशून म्हणाला,–'मुलांनो, येथून पुढें जाण्यापूर्वी आपण प्रथमतः एक महत्त्वाची गोष्ट केली पाहिजे. आपण सध्यां शत्रूच्या मुलखामध्यें आलों आहों; तेव्हां आपण मोठ्या सावधपणानें वागलें पाहिजे. न जाणो, अशा अपरात्रीच्या वेळींसुद्धां सुंदरपुरकरांचा एकादा दूत किंवा हेर या रस्त्यावर टेहळणीस असण्याचा संभव आहे. आपण सध्यां जरी चांदण्यांतून अगदीं शांतपणें चाललों आहों, तरी आमचा जमाव मोठा असल्यामुळें तो कोणाच्याही चटकन लक्ष्यांत येण्यासारखा आहे. जर शत्रूचा एकादा हेर इकडे असला, तर आमच्या हल्ल्याची बातमी त्याला लागून तो एकदम सुंदरपुरीं जाऊन शत्रूला सावध करील; आणि आम्हीं जो अचानक हल्ला करण्याचा विचार योजिला आहे, तो पूर्णपणें जरी नाहीं, तरी थोडासा फसल्यासेवीज राहणार नाहीं. यासाठीं पुढील मार्गाची टेहळणी करावयास कोणी तरी पुढें होण्याची फार जरूरी आहे.'

हें पित्याचें भाषण कानीं पडतांच शेखर एकदम म्हणाला,–'तर मग मी पुढें होऊन हें काम करतों.'

दृढसंध म्हणाला, 'ठीक आहे. तूं आपल्याबरोबर दहा बारा जवान घे आणि पुढें हो. सध्यां आपणापाशीं पांच चार तरी घोडे पाहिजे होते, म्हणजे हें काम फार चांगल्या रीतीनें पार पडलें असतें. तुम्ही पायींच पुढें होणार; अर्थात् तुमच्या आमच्यामध्यें फारसें अंतर पडावयाचें नाहीं; यासाठीं आम्ही थोडा वेळ येथें थांबतों. सुमारें अर्ध घटकेनें आम्ही येथून निघूं तोंपर्यंत तूं बराच मार्ग टेहळून ठेवशील.'

चूडामणीच्या मनांत ही कामगिरी आपण पत्करावी असें होतें. पण शेखरानें प्रथम पुढें होऊन ती आपल्या शिरावर घेतली आणि राजानेंही त्याला अनुमोदन दिलें, यामुळें त्याला उगीच बसावें लागलें. ही संधि शेखरानें आपल्यापूर्वी साधिली; याचें त्याला फार वाईट वाटलें; पण सध्यां त्याला मनांतल्या मनांत जळफळत बसण्याखेरीज गत्यंतर नव्हतें. शेखरानें आपल्याच वयाचे दहाबारा तरणे बांड जवान आपल्या बरोबर घेतले, आणि तो पुढें झाला. शेखरानें जांबिळाबरोबरच्या युद्धांत जो अद्वितीय पराक्रम दाखविला होता, त्या पराक्रमामुळें तो सर्वांचा आवडता झाला होता. त्यानें आपल्या बरोबर नेण्यासाठीं जे जवान निवडले होते, ते अतिशय आनंदानें त्याच्याबरोबर पुढें निघाले. थोड्याच अवकाशामध्यें शेखराची टोळी आणि मुख्य सैन्य यांमध्यें अर्ध्या कोसाहून जास्त अंतर पडलें. या वेळीं शेखरानें आपल्या टोळींतील जवनांचे दोन भाग करून ते रस्त्याच्या दोन्ही बाजूनें चालविले होते. व ते परस्परांपासून बऱ्याच अंतरानें जात असून सूक्ष्म दृष्टीनें आजूबाजूच्या प्रदेशाचें निरीक्षण जात होते.

सुमारें एक घटकाभर ते सावकाशपणें दोन्ही बाजूंच्या प्रदेशाचें निरीक्षण करीत चालले होते, परंतु त्यांना कोणी भेटलें नाहीं. सध्यां ते एका दरींत आले असून त्या दरीमधून एक नदीवजा मोठा थोरला ओढा पाण्यानें तुडुंब भरून वाहत होता. त्या ओढ्यामध्यें खडक पुष्कळ असल्यामुळें त्यांनीं पाणी फेसाळलें होतें, आणि त्यावर [illegible]

र शुभ्र किरण पडून तें दुधासारखें पांढरें राद्दिसत होतें. सध्यां ते ज्या स्थळीं उभे होते, त्या स्थळापासून खालच्या बाजूस खडक फार असून तेथें तर ओढ्याचा वेग फारच प्रचंड झाला होता. या ओढ्याच्या पलीकडच्या बाजूला मोठें रान असून त्या ठिकाणीं वृक्षवल्लींची मोठी गर्दी उडाली होती. अलीकडच्या बाजूस जेथें शेखर उभा होता, तेथें मोकळी आणि प्रशस्त जागा होती. हा ओढा उतरून त्यांना पलीकडे जावयाचें होतें; पण ओढ्याला खळाळी फार असून वेळही रात्रीची होती, यामुळें ते सध्यां जेथें होते, त्या जागेशिवाय जवळ कोठें सोपा पायउतार असल्यास तेथूनच आपण उतरावें, अशा विचारानें ते टोळीवाले सर्वजण तेथें जमले होते.

सध्यां त्या ओढ्याची शोभा फारच सुंदर दिसत होती. चंद्रप्रकाशानें पांढऱ्या शुभ्र दिसणाऱ्या ओढ्याच्या प्रवाहामध्यें कित्येक काळे कुट्ट खडक आपलीं काळीं डोकीं वर काढीत होते; आणि ते जेथें जेथें वर आलेले होते, तेथें तेथें त्या खडकाभोंवतीं ओढ्याचें जोरानें वाहणारें पाणी फुटत असल्यामुळें त्या काऱ्या खडकांभोंवतीं फेंसाळलेल्या पांढऱ्या पाण्याचा वेढा पडलेला दिसत होता, म्हणून त्या ओढ्यामध्यें पाण्यावर आलेला प्रत्येक खडक स्पष्टपणें नजरेस पडत होता. अशा प्रकारचें तें ओढ्याचें सौंदर्य पहात असतां एकाएकीं एक काळा पदार्थ प्रवाहामधून वाहत चालला आहे असें शेखराला आढळून आलें, आणि तो त्या पदार्थाकडे पाहूं लागला. जो काळा पदार्थ आपणास दिसत आहे, त्याचें वारंवार स्थलांतर होत असल्यामुळें तो खडक तर नव्हेच हें शेखराच्या तत्काल ध्यानीं आलें, आणि त्यानें आपल्याभोंवतीं उभे असलेल्या कित्येक भिल्लांस तो पदार्थ दाखविला; परंतु शेखराच्या डोळ्यांपेक्षां त्या भिल्लांपैकीं एकाचीही नजर अधिक तीव्र नसल्यामुळें तो पदार्थ वा-

काय आहे, याची कल्पना त्यांस कशी करतां यावी? शेखरानें मात्र आपल्या तर्कशक्तीच्या जोरावर बरोबर अनुमान केलें; आणि ओढ्याच्या पलीकडच्या बाजूनें कोणी तरी माणूस ओढा उतरून अलीकडे येण्याचा प्रयत्न करीत असावा, असा सिद्धांत ठरविला. तो काळा दिसणारा पदार्थ क्षणभर स्थिर दिसे, तर क्षणभर तो आपल्या पूर्वीच्या जागेवरून कांहीं पावलें पुढें येत असल्याप्रमाणें दिसे; पुनः स्थिर होई, पुनः चलन पावे. मध्येंच अदृश्य होई आणि तेथून जवळच पुनः तो दिसूं लागे. या सर्व प्रकारांवरून कोणी तरी तो ओढा उतरत आहे, असाच शेखरानें शेवटीं सिद्धांत ठरविला. पण त्याबरोबरच हा त्याचा प्रयत्न किती भयंकर आहे, ही गोष्टही शेखराच्या ध्यानीं आल्याखेरीज राहिली नाहीं.

थोड्या वेळ त्या माणसाकडे पाहत राहिल्यानंतर शेखर म्हणाला,–'हा मनुष्य घोड्यावर बसलेला असून घोड्यासुद्धां ओढा उतरून पलीकडे जाण्याचा यत्न करीत आहे. यावरून फक्त दोनच अनुमानें निघतात. एक तर हा माणूस या प्रदेशासंबंधानें माहीतगार नसावा, किंवा तो पुरा माहितगार आणि धारिष्टवान् असून तो एखाद्या निकडीच्या कामासाठीं चालला असल्यामुळें, ओढ्याच्या भयंकर प्रवाहाची पर्वा न करतां त्याच्याशी झगडत पलीकडचें तीर गांठण्याचा प्रयत्न करीत असावा. या पावसाळ्याच्या दिवसांत असल्या ओढ्यांतून दांडगाईनें पलीकडे जाण्याचा यत्न करणें हा शुद्ध वेडेपणा आहे. अरे! पण तो इतक्यांत दिसेनासा झाला. आपण जरा पुढें होऊन तो कोण आहे, हें पाहिलेंच पाहिजे.'

ज्याप्रमाणें एकादा हरिणांचा कळप मोठ्या वेगानें पळत सुटतो, त्याप्रमाणें ते सर्व भिल्ल ओढ्याच्या कांठानें धांवत सुटले. तथापि धांवतांना देखील शेखराची नजर ओढ्याकडेच होती. तो मध्येंच म्हणाला,–

'तो पहा घोडेस्वार आतां येथून चांगला स्पष्ट दिसूं लागला, पण हें काय! त्याच्या घोडयाचा पाय घसरला कीं काय! होय! अरे रे! दुर्दैवी बिचारा! आपण त्याला या जिवावरच्या संकटांतून वांचविलें पाहिजे.'

परंतु याचवेळीं आकाशामध्यें अभ्रें येऊन चंद्रप्रकाश अगदीं मंद झाला आणि त्यामुळें ओढयांतील स्वार त्यांच्या दृष्टीस पडेना. इतक्यांत कोणी तरी विकराल स्वरानें ओरडत आहे, असें त्यांस स्पष्टपणें ऐकूं आलें.

'मित्रांनो! चला एकदम उडया घाला! कसेंही करून आपण त्याला वांचविलें पाहिजे.' असें म्हणून शेखरानें मागेंपुढें न पाहतां एकदम ओढ्यांत उडी घातली आणि तो मोठ्या वेगानें पोहत स्वाराकडे चालला.

थोड्याच वेळानें आणखी एक [illegible] किंकाळी ऐकूं आली. ती इतकी हृदयभेदक होती कीं, ती फोडणाऱ्याचा प्राणान्त जवळ आला असावा, असें [illegible] आवाजावरून स्पष्ट लक्ष्यांत येत [illegible] किंकाळी कानीं पडतांच शेखराचें निसर्गतः [illegible] असलेलें मन तत्काल लोण्याप्रमाणें [illegible] आणि तो धनुष्यापासून सुटलेल्या [illegible] पुढें धावला. त्यामुळें [illegible] त्या सोचत्यांपासून [illegible] पुढें गेला.

आणखी एक [illegible] शेखराच्या कानांवर पडली. ही [illegible] पूर्वीपेक्षां अधिक हृदयद्रावक [illegible] नें याच वेळीं चंद्रही अभ्रांतून [illegible] असल्यामुळें ओढ्यावर प्रकाश [illegible] जेथून ती किंकाळी आली [illegible] शेखराचा तर्क होता, तिच्या ओढ्या- [illegible] गानें पोहत चालला. वेळ [illegible] दांडगा होता, परंतु प्रवाह [illegible] सल्यामुळें तो त्या चाल. [illegible] स्थलाकडे झपाट्यानें [illegible] जागीं येतांच शेख- [illegible] ओढ्याच्या तळाशीं [illegible] ती मेहनत व्यर्थ गेली. त्याला तो माणूस सांपडला नाहीं, किंवा त्याची ती किंकाळीही त्याला पुनः ऐकूं आली नाहीं. त्यानें [illegible] आसपास पांच चार बुडया [illegible] शोध केला; पण त्याला [illegible] नाहीं. शेवटीं आपण [illegible] त्याला वाटलें, आणि [illegible] कडे निघाला. परंतु [illegible] जोराचा असल्या- [illegible] ऐवजीं खालीं [illegible] जाण्या- क्यांत सुटे [illegible] ला. इत- सांपडली [illegible] ओढ्याची डहाळी विसांवा [illegible] आधारानें थोडा वेळ डहाळी [illegible] संधि मिळाली. ही [illegible] मिळाली नसती, [illegible] असतें, हें आम्हीं सांगूं [illegible]. थोडा वेळ विसांवा घेऊन [illegible] सावकाशपणें पलीकडच्या तडीस [illegible] ला, आणि एकदांचे त्याचे पाय [illegible] मनीस लागले.

ज्या वेळीं डहाळीच्या आधारानें पोहत होता, त्या वेळीं तो त्या डहाळ्याच्या आड असल्यामुळें मागून येणाऱ्या भिल्लांस दिसेनासा झाला, म्हणून त्यांची एकदम पांचावर धारण बसली. ते घाबरून जाऊन त्याला मोठमोठ्यानें हाका मारूं लागले; पण आपल्या हाकेस उलट हाक मिळत नाहीं हें पाहून शेखरासंबंधानें त्यांच्या मनास निराशा वाटूं लागली. त्या ठिकाणीं ओढ्याचा खळखळाट अतिशय असल्यामुळें त्यांच्या हाका शेखरास ऐकूं जात नव्हत्या; पण थोड्याच वेळानें त्या भिल्लांचा भ्रम दूर होऊन त्यांना मोठा आनंद झाला. ते ज्या वेळीं ओढ्याच्या पलीकडच्या तीरास गेले, त्यावेळीं आपल्यापासून खालीं शंभर पावलांवर शेखर उभा आहे, असें त्यांस दिसलें. आणि ते एकदम त्याच्याकडे धांवले.

अशा स्थितींत ते थोडा वेळ ओढ्याच्या पलीकडच्या कांठावर उभे होते. इतक्यांत एकाएकीं शेखराला कसलासा आवाज ऐकूं

आला; व ज्याला आपण ओढ्यामध्यें बुड-
तांना पाहिलें, तो स्वार तडीस लागला
[illegible] त्याच्या मनांत आलें. म्हणून
[illegible] आवाज ऐकूं आला होता,
[illegible], तो जसजसा पुढें पुढें
[illegible] आवाज त्याला अधि-
काधिक [illegible] लागला व कोणी
तरी [illegible] श्वासोच्छ्वास करीत
असावें असें [illegible] शेखराच्या
मनांत आलें. तो [illegible] पुढें गेला,
त्यावेळीं त्याला [illegible] भिजून
चिंब झालेला असा [illegible] आढ-
ळून आला. त्या घोड्याच्या [illegible] असलेलें
होतें, त्यावरून त्या घोड्यावर [illegible] पूर्वी कोणी तरी बसलेलें असावें, असें [illegible]
दिसून येत होतें. अर्थात् जो [illegible] सह ओढा उतरत होता, तो [illegible] पडला असून फक्त घोडा मात्र [illegible] तडीस लागला, ही गोष्ट शेखराच्या [illegible] ध्यानीं आली.

शेखरानें त्या घोड्याचा भिजलेला लगाम हातीं धरिला, आणि तो त्याला हळुहळु ओढ्याकडे घेऊन आला. शेखराच्या मनांत तो घोडा पलीकडे न्यावा असें होतें. पण त्या ओढ्याचें पाणी दृष्टीस पडतांच जणुं काय नुकत्याच ओढवलेल्या प्राणसंकटाचें स्मरण होऊन तो घोडा जागच्याजागीं खिळल्या-सारखा झाला. इतकेंच नव्हे, तर त्यानें जणुं काय आपल्या प्राणावर भयंकर संकट गुदरलें आहे, अशा रीतीनें मोठमोठ्यानें किंकाळण्यास प्रारंभ केला. घोड्याच्या मनांत ओढा उतरून जावयाचें नाहीं, हें शेखरानें ओळखिलें आणि त्यानें तो प्रयत्न सोडून दिला.

शेखर सध्यां ओढ्याच्या पलीकडच्या म्हणजे ज्या बाजूस रान होतें, त्या तीरास उभा होता, आणि त्याच्याबरोबर टेहळणीसाठीं आलेल्या दहा-बारा जवानांपैकीं फक्त तीन-चार काय ते त्याच्याबरोबर ओढा पोहून पलीकडे आले होते. त्याचे बाकीचे सोबती अलीकडच्या तीरावर उभे होते. ते सध्यां मोठमोठ्यानें कांहीं बोलत आहेत, असें शेखरास ऐकूं आलें, आणि त्याच्या मागोमाग तीन चार जवानांनीं ओढ्यांत उडया घातल्या, हेंही मंद चंद्रप्रकाशामध्यें त्याला आढळून आलें. तो बारीक नजरेनें त्या ओढ्याकडे पाहूं लागला. पोहणारे सर्वजण एका खडकाकडे चालले होते. त्या खडकाकडे जाण्यांत त्यांचा हेतु काय असावा, हें जाणण्यासाठीं शेखरानें त्या खडकाकडे नजर टाकिली, त्यावेळीं त्या खडकाला एक माणूस अडकलेलें आहे, असें त्यास दिसलें.

लागलीच शेखरानेंही ओढ्यांत उडी घातली, आणि पलीकडून पोहत येणारे लोक खडकापाशीं येऊन पोंचण्यापूर्वीच तो त्या खडकाजवळ आला. परंतु त्या माणसावर [illegible] नुसती नजर टाकण्याबरोबरच आपलें [illegible] उशीरां झालें, हें त्यास तत्काल आढ-[illegible]ळें. त्या माणसाचें प्रेत खडकाला [illegible] होतें. त्याच्या वेषावरून तो सुंदर [illegible] पूकर असावा, असें शेखरानें [illegible] ओळखिलें. इतक्यांत त्याचे दुसरे [illegible] तेथें येऊन दाखल झाले, आणि [illegible] प्रेत तडीवर नेलें.

ज्या तीरावर [illegible] णं प्रथम येऊन
पोंचले होते, त्याच [illegible] पुनः शेखर परत
आला. पोहण्याच्या [illegible] सर्वजण जरी
बरेच दमले होते, त [illegible] थम विसांवा
न घेतां बुडालेला सुं [illegible] नेवंत आहे
कीं नाहीं, हें ठरवि [illegible] केला.
त्यांनीं त्याला गरगर पि [illegible] मस्त-
कास ऊब आणण्यासा [illegible] पलें,
त्याचे हात पाय रगडि [illegible] त्या
चिचाऱ्याचा केव्हांच [illegible] ता.

त्याचा जीव गेल [illegible] ती
ध्यानीं आल्यावर शे [illegible] स
म्हणाला,—'आतां [illegible]
कांहींच फायदा व्ह [illegible]
ठरलेंच. पण यापुढें

अशा अ ारात्रीं हा स्वार कोठें चालला होता यासंबंधानें कांहीं सुगावा लागल्यास पहा वयाचा. हा स्वार इकडच्या प्रदेशांतील रहि वासी आहे, हें तर याच्या वेषावरून आणि रूपावरून उघड दिसतें. याला या ओढ्याच माहिती नसेल, असें म्हणतां येत नाहीं. अ असूनही हा भलत्याच ठिकाणीं उतरण्याच प्रयत्न करीत होता, यावरून याचें का कांहीं तरी तसेंच निकडीचें असलें पाहिजे माझा तर्क असा आहे कीं, हा आपल्य धन्याच्या एकाद्या अत्यंत जरूरीच्या काम गिरीवर जात असावा, किंवा तसली एकाद कामगिरी बजावून परत येत असावा. या काम अत्यंत जरूरीचें असल्यामुळें या नेहमींचा पाय-उतार सोडून, येथून उतरू गेल्यास चार पावलें हिसका चुकेल, अश कल्पनेनें ओढा उतरण्याचें साहस के असावें. सध्यांच्या प्रसंगीं बृहद्रथ राजाच्य मनांत युद्धाचेच विचार येत असले पाहिजे व त्याच गोष्टींचा या स्वाराच्या कामगिरीश संबंध जोडल्यास तो युक्तिविरुद्ध व्हावयाच नाहीं. आणि हा माझा तर्क खरा असेल, त हा स्वार बृहद्रथ राजाचा खलिता घेऊन रतनपुराकडे किंवा नारायणपुरकरांकडे जात असला पाहिजे.'

एक भिल्ल म्हणाला,-'पण नारायणपुर कर विधुसेन सध्यां आपल्या राजधानींत नाहीं. तो आपल्या नूतन विवाहित पत्नीसह आपल्या श्वशुराकडेच मजा मारीत आहे असें मीं ऐकिलें आहे.'

शेखर म्हणाला,-'तें मला माहीत आहे परंतु रतनपुरकर रणमत्त आपल्या राज धानींत आहे. हा स्वार जर त्याजकडे जात असला, किंवा त्याजकडून परत येत असल तर्री याच्याजवळ एकाद्या खलिता असणें शक्य आहे. सध्यांची वेळ मोठी नाजूक असल्यामुळें याच्या वस्त्रांचा शोध करून पाहणें हें फार अगत्याचें आहे.'

शेखराच्या इच्छेप्रमाणें त्यास होऊन बरच्या भिल्लांनीं त्या मयत स्वाराच्यं गोष्ट वरील वस्त्रें तपासण्यास प्रारंभ केला; एवढ्यांत त्या स्वाराच्या कमरेस बांधलेल्या कांच्यामध्यें एक मोहोरबंद पिशवी त्यांस सांपडली. या पिशवींत एक कागद आहे, हें तों पिशवी न उघडतांच त्यांच्या ध्यानीं आलें. शेखरानें आपल्या कट्यारीनें त्या पिशवीचें बंद तोडून आंतील कागद बाहेर काढला. हा कागद जरी पाण्यानें बराच भिजला होता, तरी त्यावरील अक्षरें खराब झालेलीं नव्हतीं. तो कागद हातीं घेऊन शेखरानें चंद्रप्रकाशामध्यें वाचून पाहण्याचा यत्न केला, पण प्रकाश अस्पष्ट असल्यामुळें त्याचा तो प्रयत्न विफल झाला. तथापि त्यांच्याजवळ विस्तव पाडून मशाली पेटविण्याचीं साधनें तयार असल्यामुळें तो कागद वाचून पाहण्यास शेखरास फारसा विलंब लागला नाहीं. तें पत्र नारायणपुरच्या रणमत्त राजाला लिहिलेलें असून त्यामध्यें पुढील मजकूर होता.

'स्वस्ति श्रीमद्राजकुलावंतस रणमत्त महाराज यांसी क्षत्रियकुलाग्रणी बृहद्रथ राजाचें अनेक प्रणिपातपूर्वक विज्ञापन असें कीं, हें पत्र पोंचतांच आपण एका क्षणार्धाचाही विलंब न करितां अभ्यारूढ होऊन सुंदरपुरच्या आमच्या वाडयावर पायधूळ झाडली पाहिजे. आज कित्येक दिवस आपण आपल्या अनुयायांसह जें राज्यकारस्थान साध्य करण्याचा अविश्रांत प्रयत्न करीत आहों, तें साध्य होण्याचा सुसमय अगदीं जवळ आला आहे. ज्या महासमर्थ पुरुषाच्या इच्छेनुरूप आपले हेतु साध्य व्हावयाचे, त्यानें आपल्या आगमनानें आम्हांवर मोठा अनुग्रह केला आहे; आणि आम्हीं योजिलेल्या कार्याच्या सिद्धतेसाठीं उद्यिक रात्रौ सर्वांनीं एकत्र बसून खल करावा, अशी त्या महावैभवशाली पुरुषाची इच्छा आहे. त्या थोर पुरुषाशीं माझें आज कांहीं घटिका संभाषण झालें, त्यावरून

आला; व [illegible]तील उद्दिष्ट फलद्रूप होईल, [illegible]ला वाटत असल्यामुळें मी आज [illegible]णास हें पत्र लिहीत आहें; आणि याच-प्रमाणें आमच्या अंतरंगांतील कित्येक राजां-कडेही अशींच पत्रें घेऊन मोठ्या त्वरेनें जासूद रवाना झाले आहेत. अर्कपुरचा राजा भीमरथ आणि मी या उभयतांमध्यें एका क्षुल्लक बाबीसंबंधानें जो लढा पडला होता, त्याचा निकालही उद्यां येथें जमणाऱ्या सर्वांच्या अनुमतीनें होणार आहे. याशिवाय आणखी एक महत्त्वाची गोष्ट आपल्या कानावर येणें अत्यंत आवश्यक आहे. गेल्या एकदोन दिवसांत कांहीं गोष्टी इकडे घडून आल्या आहेत, त्यांवरून प्रतापपुरकरांचें आणि आमचें युद्ध लवकरच जुंपणार हें अगदीं ठरल्याप्रमाणें आहे. दृढसंधराजाच्या मदतीला वत्सपुरकर यावयाचे अशी जुनी वहिवाट आहे. त्या दोघांच्या एकत्र झालेल्या सैन्याशीं झगडण्याचें आमचें एकट्याचें सामर्थ्य नाहीं; हें आपल्या पत्रांत मीं स्पष्ट-पणें लिहिलें म्हणून त्यापासून आमचा अप-मान होईल असें मानण्याचें कारण नाहीं. परंतु आपलें जर आम्हांस वेळेवर साहाय्य मिळालें, तर आम्हीं त्या दोघांच्या सैन्यास अगदीं दाद देणार नाहीं. आमचे मित्र विधु-सेन महाराज जर सध्यां आपल्या राज्यांत असते, तर ते ठरलेल्या तहाप्रमाणें आमच्या सहायास आलेच असते. ते सध्यां आपल्या राजधानीमध्यें नसल्यामुळें त्यांचे प्रधान आपल्या जबाबदारीवर आम्हांस सहाय करतील ही गोष्ट संभवनीय नाहीं. तेव्हां सर्व भरंवसा आपल्यावर ठेवून आपली मार्ग-प्रतीक्षा करीत आम्ही चातकाप्रमाणें येथें बसलों आहों. तसेंच मी भीमरथ महाराजांकडे अर्क-पुरास जें पत्र पाठविलें आहे, त्या पत्रांत त्यानीं आपणांबरोबर निदान दोनशें लोक घेऊन सुंदरपुरीं यावें असें लिहिलें आहे. हे दोनशें लोक किल्ल्यांत असतांच जर किल्ल्यावर हल्ला आला, तर ते कांहीं स्वस्थ बसावयाचे नाहींत, हें उघड आहे.

हें सर्व वर्तमान आपणास लिहून कळ-विण्याचें कारण फार निराळें आहे. आपण आपलें सैन्य आमच्या साहाय्यास तर पाठ-वालच, पण याखेरीज आपण एक महत्त्वाची कामगिरी करून आम्हांस उपकारबद्ध करून ठेविलें पाहिजे. आपण आपल्या पदरच्या एकाद्या विश्वासु योद्ध्याबरोबर निदान दोनशें तरी लोक देऊन त्यांना प्रतापपुरच्या सर-हद्दीवर टेहळणीस ठेवावें. एक दोन दिवसांत दृढसंध आपल्या सैन्यासह आमच्यावर स्वारी करणार यांत शंकाच नाहीं. तो आपलें सैन्य घेऊन आपल्या राज्यांतून बाहेर पडतांच, आपण ज्या वीरांची टेहळणीच्या कामावर नेमणूक कराल, त्यानें दृढसंध आपलें सैन्य घेऊन प्रतापपुरापासून दूर गेल्यावर एकदम प्रतापपुरावर स्वारी करून दृढसंधाचीं बायका–माणसें कैद करून न्यावीं. हें कार्य आपल्या हातून सिद्धीस गेलें, तर दृढसंधराजाचे हातपाय मोडल्यासारखे होतील आणि आपण ज्या अटी घालूं, त्या कबूल करून त्याला आमच्याशीं तह करणें भाग पडेल. हें कार्य करीत असतां जर वृषपतीची नात प्रियंवदा आपल्या हातीं लागेल, तर मोठी बहार होणार आहे. तिच्या सौंदर्यानें मला किती लुब्ध केलें आहे, हें आपणांस माहीत आहेच. याप्रमाणें सर्व गोष्टींची बरो-बर व्यवस्था लावून आपण ताबडतोब–शक्य तितक्या जलदीनें सुंदरपुरीं यावें. अधिक काय लिहिणें ही विज्ञापना. निर्देश समक्ष लेखनसीमा ' इत्यादि.

हें पत्र वाचून पाहतांच शेखरानें तत्काल आपल्याबरोबरच्या जवानांस कित्येक सूचना दिल्या, आणि तो तें पत्र घेऊन वडिलांस भेटावयास निघाला. त्यानें ज्या सूचना दिल्या, त्यांचा इत्यर्थ असा कीं, मयत स्वाराच्या अंगावरील सर्व वस्त्रें काढून घ्यावीं, आणि त्याचें प्रेत वाळवंटांत खळगा खणन

पुरून टाकावें; त्याचप्रमाणें पांच चार जवानांनीं तो ओढा उतरून पलीकडे जावें, आणि तेथें असलेला घोडा धरून त्यासह आपल्या मुख्य सैन्यास येऊन मिळावें.

अशा प्रकारच्या सूचना दिल्यानंतर शेखर पांच चार जवानांसह झालेल्या प्रकाराची वडिलांस वर्दी देण्यासाठीं मोठ्या त्वरेनें मागें परतला.

प्रकरण १७ वें.

तोडीवर तोड.

मागील प्रकरणांत सांगितलेली गोष्ट घडून येईपर्यंत बराच वेळ लोटला असल्यामुळें, दृढसंध राजा सैन्यासह पुष्कळ पुढें आला होता; म्हणून शेखराची आणि त्याची गांठ त्या ओढ्यापासून जवळच पडली. दृढसंधानें ती हकीकत ऐकून घेतल्यावर आपल्या सैन्यास तेथेंच थांबण्यास हुकूम केला. या प्रसंगीं जरी त्या सैन्यास तेथें थांबावें लागलें तरी त्यामुळें त्यांचें वेळासंबंधाचें फारसें नुकसान झालें नव्हतें. तें सर्व सैन्य पायींच चाललें होतें; म्हणून सुंदरपुरास पोंचण्यापूर्वी वाटेंत कोठेंतरी घटकाभर विश्रांति घेणें त्यांस जरूर होतें, ती त्यांनीं येथेंच घेतली.

दृढसंध, चूडामणि आणि शेखर हे तिघेजण आपलें बोलणें कोणास ऐकूं जाणार नाहीं, इतक्या अंतरावर जाऊन एका ठिकाणीं बसले. तेथें शेखरानें आपल्या पित्याला बृहद्रथ राजानें पाठविलेल्या पत्रांतील सर्व मजकूर निवेदन केला.

हा सर्व मजकूर ऐकून घेतल्यावर दृढसंध राजा थोडा वेळ विचार करीत बसला. नंतर तो म्हणाला,–'हें पत्र पुष्कळ कारणांनीं फार महत्त्वाचें आहे. या पत्रामध्यें प्रथमतःच ज्या थोर माणसाचा उल्लेख केला आहे, तो माणूस म्हणजे सरदार हलधरच असला पाहिजे, हें एकदम मनांत येतें. बृहद्रथ रत्नाकरमहाराजांशीं · · निमकहराम होऊन त्या निंबराजाला साह्य करणार, ही गोष्ट बहुतेक ठरल्यासारखीच आहे. या पत्रांतील थोर गृहस्थ जर सरदार हलधरच असेल, तर सर्व गोष्टींचा उलगडा होण्यास मुळींच विचार करण्याची जरूर नाहीं.'

चूडामणि त्वेषानें बोलला,–'तर मग तो सरदार हलधर मोठा लफंग्या असला पाहिजे, हें यावरून उघड होतें.'

किंचित् निराशादर्शक मुद्रेनें शेखर म्हणाला,–'होय; माझ्या मनांत देखील असाच संशय उत्पन्न होऊं लागला आहे. दुर्दैवानें ही गोष्ट जर खरी ठरेल, तर त्याच्यासाठीं मी द्वंद्वयुद्धास प्रवृत्त झालों, या गोष्टीचा मला फार खेद वाटेल. बरें, आपण आणखी काय म्हणत होतां?'

दृढसंध म्हणाला,–'या पत्रावरून दुसरी एक महत्त्वाची गोष्टही समजून येते कीं, अर्कपुरचा भीमरथ राजा निदान दोनशें तरी लोक बरोबर घेऊन सुंदरपुरास जाणार आहे; हे दोनशें लोक जर सुंदरपुरच्या किल्ल्यांत जाऊन पोंचले, तर बृहद्रथ राजाला मोठीच मदत होईल यांत शंका नाहीं. या भीमरथ राजाकडून येणाऱ्या लोकांस जर आपण वाटेंतच चोप दिला, तर मोठा बहार होणार आहे. या दोन गोष्टींशिवाय आणखी एक तिसरी गोष्ट-अत्यंत महत्त्वाची अशी-या पत्रांत आहे. ती गोष्ट ही कीं आमच्या राजवाड्यावर हल्ला करून आमचे कांबिले धरून नेण्याची कामगिरी बृहद्रथ राजानें रणमत्ताकडे सोंपविली आहे. शेखर, तुझ्या भावी पत्नीसंबंधानें जो या पत्रांत उल्लेख आहे, त्यासंबंधानें तूं काय विचार केलास?'

शेखरानें तत्काल उत्तर दिलें,–'मीं त्यासंबंधानें विचार केला आहे इतकेंच नव्हे, तर पुढें काय करावयाचें, तेंही मीं आपल्या मनाशीं ठरवून त्यासंबंधानें आपल्या बरोबरच्या लोकांस सूचना देऊन ठेविल्याच आहेत. माझी युक्ति काय आहे, ती मी

आपणांस सांगतों. ती आपणांस पसंत पडली तर पहा. मला असें वाटतें कीं, आमच्या सैन्यांतील कोणा तरी हुषार सैनिकाला त्या स्वाराचा वेष देऊन त्याचे घोडयावर बसवून हें पत्र देऊन रणमत्ताकडे पाठवून द्यावें. या पत्राची मोहोर फुटली आहे, याचें कारण अगदीं खान सांगतां येईल. पत्र घेऊन जाणाराचा वेष भिजलेला असणारच, आणि हें पत्रही भिजलेलेंच आहे. अर्थात् तें घेऊन जाणारानें आपण या ओढयांत पडलों, आणि पत्राची खराबी झाली, असें रणमत्तास सांगावें, म्हणजे झालें. पत्राप्रमाणें रणमत्त घोडयावरून एकटाच येऊं लागेल, त्याला आपण कैद करावें. रणमत्ताचें सैन्य त्याच्या राजधानींत एकत्र होईपर्यंत कांहीं तो नाराचण पुरामध्यें खोळंबून राहणार नाहीं. आपल्या प्रधानांस सर्कीचे हुकूम देऊन तो एकटाच सुंदरपुरास जाऊं लागेल; त्याला वाटेंत कैद केल्यास आपले हेतु साध्य होणार आहेत. आतां आपल्या कबिल्यासंबंधानें विचार करावयाचा तो इतकाच कीं, प्रतापपुरामध्यें आपले जे लोक आहेत, त्यांना सावध करून ठेवावें, आणि त्यांनीं सोनानदीच्या मुखाजवळून असलेल्या मार्गापाशीं दबा धरून बसावें. म्हणजे शत्रूचें सैन्य किंतीही असलें तरी रस्ता अडचणीचा असल्यामुळें त्यांचा पराभव होऊन त्यांस हात हालवीत परत जाणें भाग पडेल. आतां बृहद्रथानें भीमरथास जें पत्र पाठविलें आहे, त्या पत्राप्रमाणें तो जर दोनशें लोक बरोबर घेऊन येत असेल, तर त्याला आपण वाटेंतच शह द्यावा, म्हणजे झालें. माझ्या अजमासाप्रमाणें भीमरथराजा उद्यां सकाळींच आपल्या राजधानींतून बाहेर पडेल. त्याच्या जवळ फक्त दोनशेंच लोक असणार, कारण उद्यां सकाळपर्यंत दोनशेंहून अधिक लोक त्याला जमविता येणें घरींच अशक्य आहे. ही युक्ति आपणांस पसंत असेल तर ठीकच आहे. नसेल, तर आपण कायती आज्ञा करावी, ती तडीस नेण्यास मी सिद्ध आहें.'

थोडा वेळ स्वस्थपणें विचार करून दृढसंधराजा म्हणाला,–' ही तुझी योजना मला फार पसंत वाटते. तूं म्हणतोस तसें केलें असतां आपला पुष्कळ फायदा होईल यांत शंका नाहीं. ज्या अर्थीं तूं ही युक्ति काढिली आहेस, त्या अर्थीं तूंच ती सिद्धीस ने. तुला योग्य वाटेल तेथें दबा धरून रहा आणि त्या रणमत्ताला कैद कर, व प्रतापपुरचाही बंदोबस्त ठेव. '

शेखरानें उत्तर केलें,–' या दोन्ही गोष्टींपेक्षां भीमरथ राजाला वाटेंत अडवून ठेवणें हें फार अगत्याचें आहे. प्रतापपुरचा बंदोबस्त नुसत्या निरोपानें होणार आहे. आणि एकट्या रणमत्ताला पकडण्यास दहा पांच जवान हुषारांनीं दबा धरून बसले म्हणजे पुरे आहे. यासाठीं तिकडे न जातां शें दोनशें लोकांसह अर्कपुरच्या मार्गावर दबा धरून बसून भीमरथाला शह देणें हें फार महत्त्वाचें आहे. या कामासाठीं जाण्याची आपण मलाच आज्ञा करावी, अशी माझी इच्छा आहे. '

चूडामणि म्हणाला,–' नाहीं नाहीं ! ही कामगिरी मजकडेच असूं द्या. '

दृढसंध म्हणाला,–' चूडामणि, तूं माझ्याबरोबरच असलें पाहिजे. आम्ही सुंदरपुरच्या किल्ल्याला वेढा बसविण्यासाठीं निघालों असल्यामुळें तें आपलें मुख्य कार्य आहे, तें काम आपण उभयतांनीं केलें पाहिजे. यासाठीं भीमरथाला अडविण्याकरितां शेखरानेंच जावें, अशी माझी इच्छा आहे.'

चूडामणि म्हणाला,–' अशी आपली इच्छा असली तर माझा कांहीं आग्रह नाहीं. शिवाय सुंदरपुर काबीज केल्यावर त्या नीच सरदार हलधराला फांशीं चढविण्याची मोठी मजा पहावयाला सांपडेल; आणि ती गोष्टही मला फार इष्ट आहे. '

अशा रीतीनें त्यांचें संभाषण झाल्यावर दृढसंधानें एका विश्वासु भिल्लाला आपल्यापाशीं बोलावून त्यानें त्यास प्रतापपुरीं जाऊन तेथील रक्षकाला पुढें काय करावयाचें याची आज्ञा केली. त्याचप्रमाणें सुमारें दहा बारा जवानांना रणमत्त राजाला पकडण्यासाठीं त्यानें रवाना केलें. नंतर आणखी एका हुषार भिल्लाला मयत स्वाराचा पोषाख करावयाची आज्ञा करून त्याजपाशीं तें पत्र देऊन त्याला नारायणपुरीं जावयाची आज्ञा दिली. याच सुमारास शेखराच्या आज्ञेप्रमाणें त्याच्या बरोबर टेहळणी करावयास गेलेल्या भिल्लांनीं स्वाराचा घोडा धरून ठेवल्याची वर्दी दिली; त्यामुळें पत्र घेऊन जाणाऱ्या दूताला जलदीनें प्रवास करावयास उत्तम साधन प्राप्त झालें.

याप्रमाणें सर्व व्यवस्था करून झाल्यावर दृढसंधानें आपल्या सैन्यासह मोठ्या जलदीनें कूच केलें. वाटेंत सांगण्यासारखी दुसरी एखादी महत्त्वाची गोष्ट घडून आली नाहीं. पहांट उलटून पूर्व दिशा प्रकाशयुक्त दिसूं लागण्याच्या सुमारास दृढसंध राजाचें सैन्य ज्या ठिकाणीं त्यांच्या रस्त्यास वत्सपुरचा रस्ता येऊन मिळत होता, त्या ठिकाणीं येऊन दाखल झालें. याच ठिकाणीं वृषपति राजा आपल्यासह दृढसंधाच्या सैन्यास येऊन मिळावयाचा असें ठरलें होतें. या ठरावाप्रमाणें दृढसंध राजा तेथें येऊन पोंचला, त्यावेळीं वृषपति राजाचें सैन्य त्या स्थलापासून सुमारें अर्ध कोशावर असलेलें त्याच्या दृष्टीस पडलें. थोडयाच वेळांत वृषपति आणि दृढसंध या उभयतांची मुलाखत झाली. वृषपतीबरोबर पंडित हेमचंद्रही युद्धासाठीं सिद्ध होऊन आला होता.

वृषपति राजाचें जरी बरेंच उतार वय झालेलें होतें, तरी त्याची प्रकृति एखाद्या तरण्या बांडाप्रमाणें होती. तो जसा शूर होता, तसाच राजकार्यधुरंधरही होता. दृढसंधराजापेक्षां त्याचे विचार फार उदात्त होते, आणि त्याची वागणूकही त्याच्या जांवयापेक्षां अधिक चांगली होती. तथापि त्या प्रदेशांतील एकंदर लोक जसे आपल्या वाडवडिलांच्या बऱ्या वाईट समजुतींस चिकटून राहणारे होते, त्याचप्रमाणें तोही होता. आपले वाडवडील ज्यांना शत्रु समजत आले, त्यांना आपणही शत्रु अर्सेच समजावयाचें, आणि जे पूर्वापर आपले मित्र आहेत, त्यांच्याशीं कपट करावयाचें नाहीं, अशी त्याची दृढ समजूत होती. त्या उभयतांच्या गांठी पडतांच त्यांनीं मोठ्या प्रेमानें एकमेकांच्या भेटी घेतल्या. त्यांतल्यात्यांत वृषपतीची आणि त्याच्या भावी नातजांवयाची गांठ पडली, तेव्हां तर त्या वृद्ध राजाचें अंतःकरण प्रेमानें भरून गेलें.

वृषपतीबरोबर एकंदर सातशें लोक होते. हे लोक जरी शौर्यामध्यें कमी नव्हते, तरी ते प्रतापपुरच्या दरींतील भिल्लांइतके धिप्पाड व रांकट दिसत नसत. त्यांच्या अंगावरील वस्त्रें आणि शस्त्रेंही प्रतापुरकर भिल्लांच्या अंगावरील वस्त्रांपेक्षां उत्कृष्ट होतीं. त्यांच्यापैकीं बहुतेकांजवळ बंदुका, कडाचिनी वगैरे अग्न्यस्त्रें होतीं. धनुष्यबाण फारसे कोणाजवळ नव्हते; असें होतें, तरी वत्सपुरकर सैनिक प्रतापपुरकरांस आपल्याहून कमी प्रतीचे समजत नसत. किंवा प्रतापपुरकर आपल्यापेक्षां चांगलीं शस्त्रास्त्रें वत्सपुरकरांपाशीं आहेत म्हणून त्यांचा मत्सरही करीत नसत. हीं दोन सैन्यें एकत्र होऊन ज्या मोहिमेवर गेलीं, ती मोहीम फत्ते झाली नाहीं, असें आजपर्यंत कधींही झालेलें नसल्यामुळें, त्या दोन्ही सैन्यांना परस्परांविषयीं मोठा आदर वाटे, आणि अशा रीतीनें एकाद्या मोहिमेच्या प्रसंगीं त्यांची भेट होई, तेव्हां त्यांना फार आनंद होत असे.

या दोन सैन्यांची गांठ पडतांच प्रत्येक सैन्यांतील शंभर शंभर लोक निवडून काढून त्या दोनशें लोकांच्या टोळीवर शेखराला अधिकार दिला, आणि पूर्वी ठरल्याप्रमाणें दृढसंध राजानें त्याची अर्कपुरच्या सैन्याला

शह देण्यासाठीं रवानगी केली. त्या लोकांसह शेखर मोठ्या उत्साहानें आपल्या कामगिरीवर चालता झाला.

ह्या मध्यें उद्भवलेल्या नवीन प्रकरणामुळें दृढसंध राजाचा पूर्वीचा बेत थोडा लांबणीवर पडला; त्यामुळें सुंदरपुराला पोंचवावयास त्यांना पूर्वी ठरविलेल्या वेळापेक्षां थोडा अधिक वेळ लागला. ते ज्या वेळीं सुंदरपुरापाशीं आले, त्या वेळीं दिवस बराच वर आला होता.

हीं एकत्र झालेलीं मैन्यें सुंदपुरात येऊन पोंचण्याच्या अगोदर दोन घटका आपणावर हल्ला येत आहे ही बातमी बृहद्रथ राजाला लागली होती. कारण हीं दोन सैन्यें ज्या वाटेनें येत होतीं, त्या वाटेच्या दोन्ही बाजूंस सुंदरपुरच्या रयतेचीं शेतें होतीं, त्या शेतांत काम करणाऱ्या शेतकऱ्यांनीं तीं सैन्यें पाहिल्याबरोबर शक्य तितक्या जलदीनें बृहद्रथाकडे त्यासंबंधाची वर्दी पोंचविली होती, आपल्यावर हल्ला येत आहे, हें समजतांच बृहद्रथ राजानें शक्य तितके प्रयत्न करून आपल्या सैन्याची जमवाजमव केली. या उद्योगामध्यें त्याला किती यश आलें, तें पुढें समजेल. सध्यां आपण शेखराबरोबर अर्कपुराकडे जाऊन तिकडचें वर्तमान काय झालें तें पाहूं.

दोन्ही सैन्यांमधून चपल आणि शूर लोक निवडून घेण्यांत बराच वेळ मोडला असल्यामुळें सूर्योदय होऊन जवळ जवळ दोन घटका दिवस येण्याच्या सुमारास शेखरानें आपल्या टोळीसह अर्कपुराकडे कूच केलें. शेखराच्या टोळीला अतिशय जलदीनें प्रवास करून भीमरथ राजाच्या सैन्याला वाटेंत गांठावयाचें होतें; हें काम जितकें अवघड होतें, त्याहून अर्कपुराला जाण्याचा मार्ग अधिक अवघड होता. मध्यें कांहीं संकट न येतां किंवा विश्रांति घेण्यांत वेळ न मोडतां आपल्या टोळीसह शेखर मोठ्या वेगानें पुढें चालला होता. सुमारें चार घटकांनीं त्याचें सैन्य अर्कपुरच्या राज्याच्या हद्दींत शिरलें. हा प्रवास चालू असतां शेखराच्या मनांत या मोहिमेसंबंधाचे विचार घोळत होते. जसजसे त्याच्या मनांत अधिकाधिक विचार घोळूं लागले, तसतसें आपण हातीं घेतलेलें काम तडीस जावयास अगदीं कठीण पडणार नाहीं, असेंच त्याला वाटूं लागलें. पण एक अडचण त्याच्यापुढें दिसूं लागली. तो स्वतः या प्रदेशामध्यें पूर्वी कधीं आलेला नसल्यामुळें त्याला इत्थंभूत माहिती नव्हती. तेव्हां आपण कोणत्या रस्त्यानें कोठें जावें व कोठें दबा धरून बसावें, याचा त्याला निश्चय करतां येईना. परंतु ही त्याची अडचण लवकरच दूर झाली. कारण वृषपतीच्या सैन्यामध्यें अर्कपुरच्या राज्यासंबंधानें पूर्ण माहितगार असे कित्येक लोक होते. शेखरानें आपल्या सैन्याला थोडावेळ विश्रांति घेण्याची आज्ञा केली, आणि त्या प्रदेशाची पूर्ण माहिती असलेल्या लोकांस जवळ बोलावून त्यानें त्यांच्याशीं खलबत चालविलें. अर्कपुराहून सुंदरपुरास जाणाऱ्या मार्गामध्यें एक बारी असून तिच्या दोन्ही बाजूंस दाट झाडी होती, त्या झाडीमध्यें दबा धरून बसल्यास आपलें कार्य उत्तम प्रकारें साध्य होईल, असें सर्वानुमतें ठरल्यावर शेखरानें आपल्या सैन्यास त्या बारीकडे जाण्याचा हुकूम केला.

थोडयाच वेळानें ते त्या बारीपाशीं येऊन पोंचले. त्या प्रदेशाचें सूक्ष्म दृष्टीनें अवलोकन केल्यावर ही जागा आपले हेतु सिद्धीस नेण्यास उत्तम आहे, अशी शेखराच्या मनाची खात्री होऊन त्यानें मोठ्या उत्साहानें आपल्या टोळीचा व्यूह रचावयास प्रारंभ केला. त्या ठिकाणीं गेल्याबरोबर त्यानें त्या रस्त्याची बारकाईनें तपासणी केली, त्यावरून त्या रस्त्यानें आपण येण्यापूर्वी भीमरथाचें सैन्य सुंदरपुराकडे गेलेलें नाहीं, अशी त्याच्या मनाची खात्री झाली. शिवाय बृहद्रथाच्या दूतानें खलिता दिल्या-

नंतर भीमरथ किती वेळानें निघावा, आणि तो अर्कपुरांतून केव्हां निघाल्यास केव्हां कोठें पोंचावा, याचा विचार करतांही आपण येथें येऊन पोंचण्यापूर्वी भीमरथाचें सैन्य पुढें गेलेलें नाहीं, अशी शेखराच्या मनाची खात्री झाली, आणि त्याला उमेद आली.

त्यानें आपल्या टोळींतील शंभर शंभर लोकांच्या दोन तुकड्या केल्या, आणि त्यांतील एका तुकडीला बारीच्या डाव्या बाजूस आणि दुसऱ्या तुकडीला उजव्या बाजूस झाडीमध्यें दबा धरून बसविलें. या सर्व सैनिकांनीं आपलीं शस्त्रास्त्रें सज्ज ठेवून एका विवक्षित खुणेबरोबर शत्रूवर चाल करावी, अशी त्यानें त्यांस आज्ञा केली होती. बारीच्या दोन्ही बाजूंस असलेली झाडी इतकी दाट होती, आणि मधून मधून असलेल्या वृक्षांचीं खोडें इतकीं मोठीं होतीं कीं, झाडींतील रस्त्यानें जाणाऱ्या वाटसरांस आपल्या दोन्ही बाजूंस शेकडों लोक लपून बसलेले आहेत, हें अगदीं उमगलें नसतें. ही व्यवस्था झाल्यावर शेखर स्वतः बारीच्या एका बाजूच्या उंच कडयावर चढला, आणि तेथून तो मोठ्या सावधपणानें अर्कपुराकडून येणाऱ्या सैन्याची वाट पाहूं लागला. सुमारें एक घटका लोटल्यावर अर्कपुराहून सुंदरपुरास जाणाऱ्या मार्गानें बारीकडे येत असलेलें भीमरथाचें सैन्य त्याच्या दृष्टीस पडलें. हें सैन्य दृष्टीस पडतांच शेखर मोठ्या त्वरेनें कडयावरून खालीं उतरला, आणि त्यानें आपल्या लोकांस सूचना देऊन सावध केलें. नंतर भीमरथाच्या सैन्याच्या अघाडीवर हल्ला करण्याचें काम आपणाकडे घेऊन त्यानें एका कडाबीनवाल्याला आपल्या जवळ उभें केलें आणि त्यानें आवाज काढल्याबरोबर सर्वांनीं एकदम भीमरथाच्या सैन्यावर तुटून पडावें, अशी सगळ्यांस सूचना दिली.

भीमरथ राजा मोठ्या त्वरेनें अर्कपुराहून दोनशें लोकांसह सुंदरपुरास चालला होता. तो जेव्हां या बारीनजीक आला, तेव्हां तेथील जंगलांत एखादें तरी माणूस असेल, अशी त्याच्या मनांत शंका देखील नव्हती. भीमरथ राजा जवळ जवळ परतीस वर्षांचा तरुण, शूर आणि भव्य पुरुष होता. तो दिसण्यांत मोठा सुरेख आणि अभिमानी पुरुष दिसे. त्याच्या शौर्याची त्याच्या बरोबरीच्या लोकांत वारंवार प्रशंसा होत असे. सध्यां त्याचा पोषाख भपकेदार असून तो एका खंद्या घोड्यावर बसलेला होता, व त्या घोड्यावरसुद्धां पुष्कळ अलंकार घालून त्याला सजविलें होतें. त्याच्या वाडयांत नेहमीं असणारे अंतरगांतील दहाबारा नोकर त्याच्याबरोबर असून तेसुद्धां उमद्या घोडयांवर स्वार झालेले होते. बाकीचें सैन्य पायीं चालत होतें.

भीमरथ जरी घोडयावर होता, तरी तो पायीं चालणाऱ्या सैन्यापासून आपण दूर असूं नये म्हणून आपला घोडा सावकाश चालवीत होता; आणि आपल्याबरोबरच्या स्वारांबरोबर गोष्टी बोलत होता. तो त्या बारीच्या मध्यभागीं आला असेल नसेल, इतक्यांत कडाबिनीचा धडका त्याच्या कानीं पडला, आणि जिकडून आवाज आला तिकडे तो पाहूं लागला, तों आपल्या दृष्टिमर्यादेमधील सर्व प्रदेश जिवंत झाला आहे–किंबहुना झाडें–झुडपें रूपांतर पावून त्यांचीं माणसें बनत आहेत–असें त्याला आढळून आलें; त्याच्या बरोबरच्या सैन्याच्या तरवारी म्यानांतून निघण्यापूर्वीच शेखराचे लोक त्याजवर तुटून पडले. शेखराचे सैन्यानें या वेळीं अद्वितीय चापल्य प्रकट केलें होतें. दोनशेंस दोनशें असे दोन्ही पक्षांचे लोक सारखे होते, म्हणून शेखराच्या सैन्यांतील प्रत्येकाच्या वांटणीस एकेक शत्रु आला. शेखराच्या सैन्यांतील प्रत्येक सैनिकाच्या उजव्या हातीं नंगी तरवार आहे, आणि त्यानें आपल्या डाव्या हातानें आपल्या शत्रूची मानगुटी धरिली आहे, असा देखावा त्या वेळीं तेथें दिसत होता. शेखरानें तर

या वेळीं आपल्या साहसाची आणि चपलतेची कमालच केली होती. भीमरथावर त्यानें एकदम झडप घालून त्याला त्यानें घोड्यासाळीं खेंचलें आणि तो घोड्यावरून खालीं येत आहे, तोंच त्याची तरवार शेखरानें काढून घेतली. एका निमिषार्धांत असा प्रकार घडून आल्यामुळें भीमरथाचे लोक क्रोधानें खवळून आरोळ्या ठोकूं लागले, परंतु त्यांच्याहून मोठ्यानें गर्जना करून शेखराच्या लोकांनीं-शत्रूंची कत्तल करण्याचा फार तर काय, पण रक्ताचा एक थेंबसुद्धां निष्कारण पडूं द्यावयाचा आपला विचार नाहीं, असें त्यांस सांगितलें. शत्रूचे लोक तरी बिचारे अशा वेळीं काय करणार? त्यांनीं जरी युद्ध करावयाचें मनांत आणिलें असतें, तरी आपलीं हत्यारें म्यानांतून बाहेर काढण्यास त्यांस सवड कोठें होती? अर्थात् आपण मुकाट्यानें शत्रूच्या स्वाधीन होण्याखेरीज त्यांस इलाजच नव्हता. अशा रीतीनें रक्ताचा एक थेंबसुद्धा जमिनीवर गळूं न देतां शेखरानें पूर्ण विजय मिळविला.

जितक्या चपलतेनें शेखराच्या लोकांनीं आपल्या शत्रूंवर झडप घातली होती, तितक्याच चपलतेनें त्यांनीं त्यांचीं शस्त्रें काढून घेतलीं. भीमरथाची तरवार तर शेखरानें प्रथमच काढून घेतली होती; एका कोंवळ्या पोरानें आपणांस अशा रीतीनें निःशस्त्र केलें हें पाहून भीमरथ जगदीं चिडून गेला. त्यानें अशा रीतीनें आपणांवर हल्ला करण्याचें कारण शेखरास विचारलें.

शेखरानें उत्तर दिलें, 'सध्यां प्रतापपुरकर आणि सुंदरपुरकर यांचें युद्ध सुरू झालें असल्यामुळें सुंदरपुरकरांला मदत मिळूं नये म्हणून अशा प्रकारें रस्ते अडवून धरणें आम्हांस भाग पडत आहे.'

भीमरथ म्हणाला,-'तर मग तूं दृढसंधराजाच्या दोघां मुलांपैकीं एक असावास; अरे कोंवळ्या पोरा, सर्पाच्या शेपटीवर पाय देण्यापूर्वी तूं नीट विचार केलास काय?'

शेखर किंचित् हास्य करून म्हणाला,-'मी पोर तर खराच; पण पाडाव झालेल्या माणसानें अशा रीतीनें असभ्य भाषण करणें हें योग्य नाहीं. सर्पाच्या शेपटीवर पाय देण्यापूर्वी मीं नीट विचार केला होता कीं नाहीं, हें त्या सर्पाचे दांत पाडून त्याला पोतडींत भरण्यास तयार झालों आहें, यावरूनच उघड होत आहे.'

तुच्छ दृष्टीनें अवलोकन करीत भीमरथ म्हणाला,-'अशा रीतीनें विश्वासघातानें जय मिळविण्यांत मोठासा पुरुषार्थ नाहीं.'

शेखरानें उत्तर केलें,-'युद्धामध्यें अशा रीतीनें हल्ले करणें हें शिष्टाचारास पूर्ण संमत असल्यामुळें मजवर आपण विश्वासघाताचा आरोप करीत आहां, तो अगदीं व्यर्थ आहे. विनाकारण रक्तपात करणें इष्ट न वाटल्यामुळें मीं हा मार्ग धरिला. शिवाय, तुमचें आमच्याशीं शत्रुत्व नाहीं; किंवा तुमच्या आमच्या सैनिकांच्या मनांतही परस्परांविषयीं वितुष्ट नाहीं, असें असल्यामुळें प्राणहानि होऊं न देतां युक्तीनें कार्यभाग करून घेणें हें मला योग्य वाटल्यामुळें मीं समोरासमोर लढाई करण्याचें सोडून देऊन ह्या युक्तीच्या मार्गाचा अवलंब केला आहे. आमच्या शत्रूला कमजोर करण्यासाठीं त्याला साह्य मिळूं न देणें हें आमचें कर्तव्यच आहे, ही गोष्ट आंपणही कबूल कराल; मीं आपलें कर्तव्य करीत असतां भूतदयेला गुंडाळून बाजूला ठेविलें नाहीं, हेंही आपल्या ध्यानीं आलें असेलच.'

भीमरथानें विचारलें,-'बरें; तुझा पुढें हेतु काय आहे! तूं आम्हाला प्रतापपुरीं नेणारच कीं काय! कीं मी सध्यांच्या युद्धांत बृहद्रथाला साह्य करणार नाहीं, असें कबूल केल्यास माझ्या वचनावर विश्वास ठेवून मला परत जाऊं देशील?'

शेखर म्हणाला,-'मी फक्त एका अटीवर आपणांस परत जाऊं देईन.'

भीमरथानें विचारलें,-'ती कोणती अट?'

शेखरानें उत्तर केलें,–' जर तुमच्या सैनिकांचे पोषाख आमच्या सैनिकांस, आणि खुद्द तुमचा पोषाख मला देऊन आमचे पोषाख तुम्ही घ्याल, तर मी तुम्हांस तुमच्या वचनावर विश्वास ठेवून परत जाऊं देईन. '

भीमरथ किंचित् चिडून म्हणाला,–' ही तुझी अट मोठी चमत्कारिक दिसते. तूं जसा लचाडीचा कावा करून आम्हला येथें फसविलेंस, अशीच लचाडी दुसरीकडे करण्याचा तुझा विचार असावा, असें दिसतें. '

शेखरालाही हें त्याचें भाषण ऐकून जरा राग आला. तो त्यास म्हणाला,–' अरे गर्विष्ठ राजा ! तूं आपल्या भाषणामध्यें जर थोडी अधिक सभ्यता धरिली असतीस, तर बरें झालें असतें. यापुढें जर तूं असाच उद्धटपणानें मजपाशीं वागशील, तर तुला अर्कपुराला परत जाऊं देण्याऐवजीं मोठ्या बंदोबस्तानें प्रतापपुरीं पाठवून देणें मला भाग पडेल; नंतर आमचे वडील आपल्या इच्छेप्रमाणें काय तो न्याय करतील. '

हें शेखराचें भाषण ऐकून भीमरथाच्या अंगाचा अगदीं तिळपापड उडाला; त्यानें आपला खालचा ओंठ जवळजवळ रक्त येईपर्यंत चाविला, व क्रोधानें त्याचे नेत्र विस्तवासारखे लालभडक झाले. त्यानें एकदा आपल्या सैन्यावर नजर टाकून झटापट करतां येणें शक्य आहे कीं नाहीं, हें नितक्यांतच पाहून घेतलें; पण आपलें सर्व सैन्य निःशस्त्र झालें आहे, असें पाहून त्याची त्या बाबतींत अगदी निराशा झाली. त्यानें एक दीर्घ निःश्वास सोडून म्हटलें,–' तुझी अट मी कबूल करतों. '

थोड्याच वेळांत दोन्ही सैन्यांनीं आपापले पोषाख बदलले, व त्यांचा बाह्य देखावा अगदीं बदलून गेला. शेखराचें सैन्य भीमरथाच्या सैन्याप्रमाणें दिसूं लागलें. शेखराचा पूर्वीचा साधा पोषाख जाऊन त्याचे जागीं भपकेदार पोषाख झळकूं लागला. याप्रमाणें पोषाखाचा बदल झाल्यानंतर भीमरथाचे लोक आपलीं आयुधें परत मागूं लागले, परंतु शेखरानें तीं तत्काल त्यांस परत दिलीं नाहींत. तीं हत्यारें तेथून कांहीं कोसांवर एका विवक्षित ठिकाणीं ठेवावयाचीं असें शेखरानें ठरविलें.

इतकें झाल्यावर शेखर भीमरथाला म्हणाला,–' भीमरथ महाराज, आतां आपण आल्यामार्गानें परत गेलें पाहिजे. मीही आतां माझ्या मनांतील हेतु साध्य करण्यासाठीं जाणार; परंतु जातेवेळीं पुनः आपणास आपल्या वचनाचें मी स्मरण देतों; चालू लढाईमध्यें आपण वृहद्रथ राजाला साह्य करावयाचें नाहीं, हें आपल्या ध्यानीं असेलच! '

आपल्या घोड्यावर बसत असतां भीमरथ म्हणाला,–' आम्हीं एकदां जें वचन दिलें, तें कधीं मोडीत नसतों. ' असें बोलून शेखराकडे वर मान करून न पाहतां तो आपला घोडा उडवीत चालता झाला.

दोन्हीं सैन्यें आपापल्या वाटेनें चालतीं झालीं खरीं, परंतु जाते वेळीं जित झालेल्या भीमरथाच्या सैन्यानें जिंकणाऱ्या शेखराच्या सैन्याला धमक्या आणि शिव्या–शाप देण्याचा तडाका सुरू केला होता, पण दिलदार अशा प्रतापपुरकरांनीं किंवा वत्सपुरकरांनीं त्यांच्या बरळण्याकडे लक्ष्य न देतां आपला मार्ग धरिला. थोड्याच वेळानें तीं वेषांतर केलेलीं सैन्यें परस्परांच्या दृष्टीआड झालीं.

आतां आपण एकत्र झालेल्या वृषपर्ति आणि दृढसंध यांच्या सैन्याकडे वळूं. तीं सैन्यें मध्यें कांहीं हरकत आल्याखेरीज सुंदरपुरच्या किल्लयापाशीं दाखल झालीं, हें तर पूर्वीच सांगतलें आहे. या एकत्र झालेल्या दोन्ही सैन्यांचें आधिपत्य दृढसंध राजाकडे होतें. वृषपतीनें आपलें सर्व सैन्य आपल्या जामाताच्या स्वाधीन केलें असून तो स्वतः देखलि युद्धाच्या शिस्तीसाठीं दृढसंधाच्या आज्ञेंत वागण्यास तयार झाला होता. सुंदरपुरच्या बुरजावर पांचसहा तोफा होत्या. शत्रूचें सैन्य दृष्टीस पडतांच या तोफा डागण्यांत आल्या.

परंतु त्या तोफांचा मारा चांगला नसून गोलंदाजही वाकबगार नव्हते, त्यामुळें त्या तोफांनीं दृढसंधाच्या सैन्याचें कांहींच नुकसान झालें नाहीं. तोफा सुरू होतांच प्रतापपुरकरांनीं बाणांचा आणि वत्सपुरकरांनीं आपल्या कडाबिनींतून गोळ्यांचा सुंदरपुरच्या किल्ल्यावर वर्षाव सुरू केला. सुंदरपुरच्या तटावर लढाईसाठीं उभे राहिलेले लोक तीनशेंहून अधिक नसावे, असा दृढसंधानें अंदाज केला; तो अंदाज आपल्या सैन्यास कळवितांच सर्व लोकांस एकदम हुरूप आला, आणि ते मोठ्या आवेशानें युद्ध करूं लागले. दृढसंधाचें सैन्य तटापाशी येऊन भिडलें; परंतु किल्लयाभोंवतीं असलेला खंदक पाण्यानें तुडुंब भरलेला होता, आणि शत्रुसैन्य आपल्यावर चाल करून येत आहे, ही बातमी बृहद्रथाला लागल्याबरोबर त्यानेंखंदकावरील पूल उचलून घेण्याचा हुकूम केला असल्यामुळें सध्यां खंदकापलीकडे जाण्याचा मार्ग अगदीं बंद झालेला होता. या गोष्टीनें नाउमेद न होतां दृढसंध राजानें आपल्या सैन्यांतील लोकांस खंदकाच्या जवळ असलेलीं झाडें तोडण्याचा हुकूम दिला. झाडें तोडण्याचें काम लवकरच आटोपलें, पण तीं खंदकापर्यंत नेण्याचें काम अवघड आणि सावकाशीचें होतें. इकडून तोफांचे धडाके तर उडनच होते. तथापि ते न जुमानतां प्रतापपुरकरांनीं आपल्या बाणांचा शत्रूवर वर्षाव करून त्यांस जेरीस आणलें होतें; त्यामुळें तटावरून खालीं उतरून भिंतीच्या आश्रयानें राहून भिंतांच्या जंग्यांतून आपल्या आयुधांचा उपयोग करणें बृहद्रथाच्या सैन्याला भाग झालें. झाडें तोडून तीं खंदकापर्यंत आणावयाचें काम दृढसंधाला प्रथम जितकें सुकर वाटलें होतें, तितकें तें सुकर नव्हतें, असें त्यास स्पष्टपणें आढळून आलें. परंतु धीर न सोडतां त्यानें तें काम तसेंच नेटानें चालविलें होतें. सायंकाळचे सुमारास तोडलेलीं झाडें खंदकापाशीं येऊन दाखल झालीं. कित्येक साहसी भिल्ल त्या झाडांचे ताफे रचून खंदकांत शिरले, आणि आतां युद्धास खरा रंग चढणार, असें दोन्हीं पक्षांस वाटूं लागलें.

शत्रूचे ताफे खंदकांत तरंगूं लागले, हें पाहतांच बृहद्रथानें आपल्या सैन्यास सावध करून मोठ्या नेटानें युद्ध करावयाची आज्ञा केली. शत्रूचा भडिमार सहन करून कित्येक साहसी भिल्ल खंदकापलीकडे आले, आणि त्यांनीं खंदकास शिड्या लावून तेथून वर चढण्याचा प्रयत्न चालविला. त्याच वेळीं कित्येक भिल्ल मुख्य दरवाज्याजवळ जाऊन तेथें असलेला पूल खंदकावर सोडण्याचा प्रयत्न करूं लागले. खंदकावर पूल पडल्यास शत्रूचें सर्व सैन्य लगट करील आणि किल्ल्याचा दरवाजा फोडण्याच्या प्रयत्नांत त्यांस यश येईल, अशी भीमरथाला मोठी काळजी पडली आणि तो कित्येक निवडक लोकांसह दरवाज्याचें रक्षण करण्यास सिद्ध झाला. बुरजावरील तोफांचीं तोंडें फिरवून त्या दरवाज्याकडे रोंखण्यांत आलीं आणि जंग्यांतूनही दरवाज्याबाहेरच्या लोकांवर शस्त्रास्त्रांचा भडिमार होऊं लागला. ज्या लोखंडी सांखळ्यांनीं पूल बांधून ठेविलेला होता, त्या सांखळ्या फार भक्कम असल्यामुळें त्या तुटून पूल पडणें अशक्यच होतें; म्हणून त्या सांखळ्या पुलाला जेथें अडकविलेल्या होत्या तो लांकडी भाग तोडणें प्रतापपुरकरांना सोईचें वाटून त्यांनीं पुलाचा तो भाग तोडण्याचा प्रयत्न चालविला होता. एका भिल्लानें हातीं कुऱ्हाड घेऊन पुढें व्हावें, पुलावर पांच चार घाव घालावे, तोंच शत्रूचा एकादा तीर किंवा गोळा लागून तो भिल्ल जखमी होऊन मागें परतावा किंवा मरून खंदकांत पडावा; इतक्यांत दुसऱ्या भिल्लानें पुढें व्हावें, त्याचीही व्यवस्था तशीच झाल्यावर तिसऱ्यानें, त्याच्या मागून चवथ्यानें असा क्रम सारखा चालला होता.

आपला इच्छित हेतु सिद्धीस जावयास पुष्कळ बळ दिले पाहिजेत, अशी दृढसंधाची ठेवकरच खात्री झाली, आणि शत्रूचें सैन्य दुसरीकडे गुंतवून ठेवण्यासाठीं त्यानें दुसरी युक्ति काढली. खंदकांत टाकलेल्या ताफ्यांवरून त्यानें आपलें सैन्य तटापाशीं पांचचार ठिकाणीं उभें केलें, आणि त्या प्रत्येक ठिकाणीं शिड्या लावण्याचा यत्न सुरू केला. बृहद्रथ राजा आपल्या हातीं नंगी तरवार घेऊन आपल्या सैन्याची व्यवस्था राखीत होता. शत्रूनें आतां ही युक्ति केलेली पाहतांच त्याचें धैर्य थोडेसें खचल्याखेरीज राहिलें नाहीं; पण इतक्यांत त्याचा एक सेवक मोठ्या आनंदित मुद्रेनें त्याजपाशीं आला, आणि भीमरथाचें सैन्य आपल्या साह्यास येत आहे, अशी त्यानें आपल्या धन्यास वर्दी दिली.

बृहद्रथानें मोठ्या उत्सुकतेनें विचारलें,–'भीमरथ कोणत्या मार्गानें येत आहे?' कारण जर तो शत्रु आहेत त्याच दिशेनें येत असला, तर आयताच त्यांच्या तडाक्यांत सापडेल, अशी भीति त्याच्या मनांत उत्पन्न झाली. सेवकानें सांगितलें,–'ते नदीच्या पश्चिम तीरावरून येत असून त्यांनीं ही झाडें तोडून त्यांचे ताफे बनविले आहेत. ते लवकरच किल्ल्याच्या मागच्या तटावर चढून तिकडून आंत येतील.'

हें ऐकून भीमरथ आनंदानें म्हणा 'तर मग आतां किल्ल्याचा बचा यांत कांहीं शंका नाहीं.'

ह्या एकाएकीं आलेल्या मानामुळें भीमरथाला मोठा आणि त्याला मोठें स्फुरण च मोठ्या उत्साहानें आपल्य देऊं लागला. त्यानें अ थोडे लोक मुख्य द्वार ठेविले, आणि बाकीच्य चार तुकड्या करून त्या तुकडी ज्या ठिकाणीं

त्वेषानें गर्जना करून आपल्या लोकांस तटावर चढवीत होता, त्या टिकाणीं त्यानें पाठविलीं, दुसऱ्या तुकड्या दुसऱ्या जागीं पाठविल्या, आणि आपल्या मित्राच्या स्वागतासाठीं तो किल्ल्याच्या पिछाडीकडे निघाला.

किल्ल्याच्या पिछाडीस मोठी टेंकडी असून त्या टेंकडीच्या पायथ्याशीं नदी वाहत होती; ही जागा अतिशय अवघड आणि माऱ्याला मोठी सोयवार असल्यामुळें दृढसंधानें त्या बाजूकडे पूर्णपणें दुर्लक्ष करून आपला सगळा जोर किल्ल्याच्या मुख्य दरवाज्याकडेच चालविला होता. किल्ल्याच्या पिछाडीनें बृहद्रथाला आजच मदत येणें दृढसंधाच्या दृष्टीनें शक्य नव्हतें; आणि युद्ध मोठ्या झपाट्यानें आजच्या आज संपवावयाचें असा त्याचा विचार होता, हेंही पिछाडीच्या भागाकडे दुर्लक्ष करण्याचें आणखी कारण होतें. दृढसंधाचें पिछाडीकडे दुर्लक्ष्य असल्यामुळें मागच्या बाजूनें आलेले दोनशें लोक त्याच्या दृष्टीस पडले नाहींत, यामुळें तिकडून येणाऱ्या लोकांम ण स णें च उतरण्याचे प्रयत्न क बृहद्रथाभोंवतीं गराडा

आपल्यास त्यांनीं त्याला एका निमिषासमजतांच नुज केलें. बृहद्रथ राजानें किंवा अनुयायांनीं त्यावेळीं दांडगाई अगदीं अ कली नाहीं. कारण आतां दांडगाई केल्यास कांहीं फायदा व्हावयाचा नाहीं, अशी त्यांच्या मनाची पक्की खात्री होऊन चुकली होती. नंतर शेखर आपल्या लोकांस म्हणाला,–'यांच्यावर तुम्हीं वीस जणांनीं पहारा ठेवा मला प्रथमतः लढाई थांबविली पाहिजे!'

हें कृत्य झाल्यानंतर शेखर आपल्या बाकीच्या लोकांस बरोबर घेऊन मोठ्या त्वरेनें किल्ल्याच्या मुख्य द्वाराकडे आला. या वेळीं लढाई अगदीं घनचक्कर सुरू होती. किल्ल्यांतील लोकांना आपणास मदत येत आहे, असें वाटून त्यांनीं आनंदानें आरोळ्या मारून शेखराचें स्वागत केलें, एका क्षणार्धांत त्यांचा भ्रम दूर झाला. शेखरानें पुढें होऊन

मोठ्या गंभीर वाणीनें सुंदरपुरकरांस हत्यारें खालीं ठेवण्याचा हुकूम केला. हा आकस्मिक प्रकार घडून आलेला पाहून सर्वांचीं तोंडें काळीं ठिक्कर पडलीं. सुंदरपुरकरांनीं शेखराला आणि त्याच्या बरोबरच्या कित्येक भिल्लांना तत्काल ओळखिलें. सुंदरपुरकर कांहीं कमी शूर नव्हते. शेखरानें केलेली युक्ति त्यांच्या ध्यानीं येतांच त्यांना त्वेष चढला, व ते चवताळून जाऊन हल्ला परतविण्याचें सोडून देऊन शेखरावर तुटून पडले. शेखरद्वेषी बेसावध नव्हताच. त्यानें आपल्या लोकांस शत्रूंवर हल्ला करण्याचा हुकूम केला. विजयश्रीच्या उत्साहानें फुरफुरलेल्या भिल्लांनीं सुंदरपुरकरांचा खरपूस समाचार घेतला. सुंदरपुरकर हत्यारें खालीं ठेवीत नाहींत, अशी शेखराची खात्री होतांच तो तसाच मोठ्या शौर्यानें लढत लढत मुख्य दरवाज्यापाशीं आला. त्यानें मोठ्या धाडसानें दरवाजा उघडला, खंदकावर पूल टाकिला, आणि आपल्या बाहेरच्या सैन्यास मार्ग मोकळा करून दिला. मार्ग मोकळा होतांच दृढसंधराजाचें सर्व सैन्य आंत आलें.

अशा रीतीनें विजयश्री संपादन करून घेऊन शेखरानें सुंदरपुरावर निशाण लाविलें!

प्रकरण १८ वें.

चूडामणि आणि शेखर.

एकाएकीं युद्धाचा रंग बदलला, आणि किल्ल्याचा थोरला दरवाजा उघडून खंदकावर पूल टाकण्यांत आला, या गोष्टीचें प्रतापपुरकर आणि वत्सपुरकर यांच्या सैन्यांतील भिल्लांस जितकें आश्चर्य वाटलें, त्याहून आपल्या भाऊबंदांच्या अंगावर असलेले उमदे पोषाक पाहून त्यांस फारच आश्चर्य वाटलें. शेखराचा भरजरी पोषाक पाहून तर त्या भिल्लांचे डोळे दिपले. त्यांनीं प्रथमतः शेखराला ओळखलें देखील नाहीं; आणि त्यामुळें आपणांस किल्ल्याचे दरवाजे उघडणारा हा अनोळखी पुरुष कोण असावा, याचा त्यांस मोठा विस्मय वाटला. सर्वांपूर्वी हेमचंद्रानें शेखराला ओळखिलें, त्यानंतर दृढसंधानें आणि त्यानंतर वृषपतीनें त्याला ओळखिलें.

सर्व सैन्यानें आनंदानें आरोळ्या मारून शेखराचा जयजयकार केला. वृषपतीनें आणि दृढसंधानें त्याला शाबासकी दिली, आणि त्यानें केलेल्या कामगिरीबद्दल त्याची तारीफ केली. त्यावेळीं शेखराला जो आनंद वाटला, त्याचें वर्णन कोण करील! सैन्यांतील सर्व लोक किल्ल्यांत आले, पण चूडामणि मात्र कोठें दिसेना. आपला बंधु मोठ्या शौर्यानें तटावर चढून लढत असतां कामीं तर आला नसेल ना, अशी शंका शेखराच्या मनांत आली आणि त्यानें आपल्या भावाची चौकशी केली. चूडामणि हयात आहे, अशी सर्वांच्या मनाची खात्री होती, पण सध्यां तो कोठें आहे, याचा मात्र थांग लागेना. हें पाहून दृढसंधालाही मोठी काळजी वाटूं लागली, आणि त्यानें अगदीं बारकाईनें चौकशी केली; त्यावेळीं तो आपल्या हाताखालच्या वीस पंचवीस लोकांसह सरदार हलधर आणि त्याचा सेवक सत्यरथ यांचा शोध करण्यासाठीं राजवाड्यांत शिरला आहे, असें त्यास कळलें.

ही बातमी कानीं पडतांच शेखर आपल्या वडिलांस म्हणाला,–'अहो तात, ईश्वराच्या कृपेनें आज आपणांस विजयप्राप्ति झाली आहे, हें खरें; तथापि किल्ल्यावर आपलें निशाण फडकत असतां आपल्या विजयश्रीला काळोखी लावणारी अशी एकादी नामर्दपणाची किंवा क्रूरपणाची गोष्ट घडून येऊं नये, अशी माझी मनापासून इच्छा आहे. सध्यां या किल्ल्याचें स्वामित्व आपल्याकडे आलें आहे, यासाठीं यापुढें येथें ज्या कांहीं महत्त्वाच्या गोष्टी घडून येतील, त्या सर्व आपल्या आडोखेरीज जरी एकादी गैरशिस्त

गोष्ट कोणी केली असली, तरी तिचा दोष सर्वस्वी आपणांवर लादण्यास लोक कमी करणार नाहींत, हें मीं आपणांस सांगितलें पाहिजे असें नाहीं.'

शेखरानें जी युक्ति योजिली आणि जो पराक्रम गाजविला, त्यानें दृढसंध राजाला अत्यंत आनंद झाला असल्यामुळें सध्यां त्याचें मन प्रसन्न झालें होतें. त्यामुळें शेखर जें काय सांगेल त्यास नाहीं म्हणावयाचें कीं होय म्हणावयाचें याचा विचारच त्याच्या मनांतून नाहींसा झालेला होता! शेखराच्या मनाला ज्या गोष्टींनीं आनंद होईल तीच गोष्ट करावयाची, असें त्याच्या मनास वाटत असल्यामुळें तो म्हणाला,– 'शेखर, तुझें भाषण अगदीं योग्य आहे. यासाठीं तूं आपल्या हाताखालच्या लोकांसह किल्ल्यांत जिकडे तिकडे फिरून माझी अशी आज्ञा सर्वांस जाहीर कर, कीं यानंतर जो कोणी या किल्ल्यामध्यें जुलूमजबरी किंवा अन्याय करील, किंवा कोणी कोणाचा प्राण घेईल, तर तो अपराधी ठरेल; आणि शासनास पात्र होईल! शत्रुपक्षाकडचे जे लोक किल्ल्यामध्यें सांपडतील, त्यांस फक्त कैद करावें; त्यांचा न्याय सावकाशपणें आणि आमच्या सल्लामसलतगारांच्या मतानें करण्यांत येईल.'

ही आपल्या पित्याची आज्ञा अमलांत आणण्यासाठीं थोड्याशा सैनिकांसह शेखर बृहद्रथाच्या वाड्यांत निघून गेला. शेखर हा प्रतिष्ठानासारख्या राजधानीच्या शहरामध्यें वागलेला होता, तरी त्याला खुद्दां सुंदरपुरच्या राजवाड्याची शोभा पाहून आश्चर्य वाटल्याखेरीज राहिलें नाहीं. त्या वाड्याची रचना जशी शोभायमान होती, तसेंच त्या वाड्याचें कामही अत्यंत कौशल्याचें होतें. त्यांतल्या त्यांत उत्तमप्रकारच्या शिसवी लांकडावर जें वेलपत्तीचें खोदकाम केलेलें होतें, तें अवर्णनीयच होतें. शेखराला सध्यां त्या राजवाड्याची शोभा पहावयास अगदीं फुरसद नव्हती. जर त्याला हवा इतका वेळ असता, तर त्यानें त्या वाड्यांत सावकाशीनें फिरून कारागिरीच्या कुशलतेनें आपले नेत्र तृप्त करून घेतले असते. राजवाड्यांत प्रवेश करतांच त्याला प्रथम जो जिना आढळला, त्याच जिन्यानें तो दुसऱ्या मजल्यावर गेला. आणि एकामागून एक अशीं कित्येक दालनें त्यानें मागें टाकलीं, तेव्हां त्याची आणि त्याच्या बंधूची भेट झाली. शेखरानें आपल्या बंधूकडे एकवार नुसती नजर टाकली, त्याबरोबर चूडामणि सध्यां किती चवताळून गेला आहे, आणि त्याच्या नेत्रांमध्यें क्रौर्य किती सामावलेलें आहे, हें शेखराला एकदम कळून चुकलें.

शेखर आपल्याबरोबर दोनशें लोक घेऊन अर्कपुराकडे निघून गेल्यापासून आतांपर्यंत त्याची व चूडामणीची गांठ पडली नव्हती, तरी शेखर आल्यावेळीं किल्ल्यांत येऊन दाखल झाल्यामुळेंच किल्ला लवकर हातीं आला, ही गोष्ट त्याला समजलेली होती. या युद्धामध्यें आपल्या पक्षास जय मिळाला या गोष्टीचा चूडामणीला अगदीं आनंद होत नव्हता. कारण, हा जय केवळ शेखराच्या हुषारीनें प्राप्त झाला होता, ह्या गोष्टीनें त्याच्या मत्सरग्रस्त मनाला अतिशय खेद वाटत होता. आपल्या बंधूची अशा रीतीनें भेट झाली असतां, आपण जर त्याच्याशीं दोन शब्द बोललों नाहीं; तर तें आपल्या बरोबरच्या मिळांस गैर वाटेल, असें मनांत येऊन त्यानें शेखराशीं बोलावयास प्रारंभ केला. परंतु या वेळीं त्याच्या कपाळास आंठ्या पडल्या होत्या आणि त्याचा स्वर अगदीं त्रासिक असा भासत होता. तो म्हणाला,–'शेखर, तूं तर यावेळीं प्रति भीमरथ बनला आहेस!'

शेखर म्हणाला,–'तें असो, पण मी आधीं विचारतों, तूं खुशाल आहेसना? युद्धामध्यें तुला एखादी जखम तर लागली नाहींना? किल्ल्याच्या तटावर तूं फार मर्दुमकी गाजविलीस, असें मीं ऐकिलें आहे,

म्हणून विचारतों. थांब-थांब ! असा मला येथें सोडून जाऊं नको-इतकी घाई काय म्हणून ?' असें शेखरानें विचारण्याचें कारण इतकेंच, कीं शेखराचें भाषण पुरें होण्यापूर्वीच चूडामणि दहावीस पावलें दूर झाला होता.'

आपला भाऊ आपल्या मागें ओरडत येत आहे, हें पाहून चूडामणि त्याला म्हणाला,-' शेखर, मी त्या हरामखोर सरदार हलधराला आणि त्याच्या नीच नोकराला शोधीत आहें. त्या दोघांना सूर्यास्तापूर्वी फांसावर लटकलेलें पाहीन, तेव्हांच माझ्या मनाचें समाधान होईल !'

जरी केवळ अधिकारदर्शक स्वरानें नव्हे, तरी किंचित चढ्या स्वरानें शेखर म्हणाला,-' जरा थांब; यासंबंधानें नातांनीं नुकताच जो हुकूम केला आहे, तो तुला वेळींच कळविणें भाग आहे. यापुढें प्रत्यक्ष त्यांच्या आज्ञेवांचून कोणी कोणाचा प्राण घेतां नये, किंवा जुलमाचें वर्तन करतां कामा नये, अशी त्यांची सक्त आज्ञा आहे ! सध्या आपल्या विरुद्ध पक्षाचें जे लोक येथें सांपडतील, त्यांना फक्त कैद करून ठेवावें, असें त्यांचें सांगणें आहे.'

अगदीं चिडून जाऊन हातपाय आपटीत चूडामणी म्हणाला,-' त्यांची आज्ञा मी या वेळीं-निदान त्या हरामखोरांच्या बाबतीपुरती तरी-साफ धाब्यावर बसविणार ! या बाबतींत मी कोणाचेंही ऐकणार नाहीं.' नंतर तो आपल्या बरोबरच्या भिल्लांस म्हणाला,-' अरे उभे काय राहिलां ? चला माझ्या बरोबर ! आपण आपल्या हिमतीवर किल्ला सर केला आहे, अर्थात् पुढील सर्व गोष्टी आमच्या मताप्रमाणेंच झाल्या पाहिजेत, चला पुढें व्हा !'

आपल्या भावाचा हात धरून त्याला मागें फिरवीत शेखर म्हणाला,-' तूं तरी निदान असें करतां नये. आपल्या पित्याच्या आणि आपल्या राजाच्या सर्व आज्ञा आपण शिरसा मान्य केल्या पाहिजेत. त्या जर आपणच मोडूं लागलों, तर लोक कशा पाळतील ?'

शेखराच्या हातांतून आपला हात हिसकून घेऊन चूडामणि मोठ्या तिरस्कारानें त्यास म्हणाला,-' चल; ओंठ पिळला, तर दूध येईल आणि मला मोठ्या उपदेशाच्या गोष्टी सांगतो आहे ! याच दुधखुऱ्या पोरानें तातांचें कान फुंकले असतील, म्हणून त्यांनीं अशी आज्ञा केली असेल. पण ते जर चुकत असले, तर त्यांची चूक सुधारली पाहिजे !'

आपल्या बंधूच्या या आचरणानें कष्टी होऊन शेखर त्याजबरोबरच्या भिल्लांस म्हणाला,-' निदान तुम्ही तरी आपल्या राजाची आज्ञा मोडणार नाहीं, अशी माझी खात्री आहे.'

एकाद्या भयंकर राक्षसाप्रमाणें क्रोधानें खवळून जाऊन चूडामणि गुरगुरला,-' अरे पोरक्या, तूं आपल्या वडील भावाला आपल्या हुकुमांत ठेवूं पाहतोस काय ? पण याद राख; तूं जर पुनः माझ्या मार्गांत अडथळा आणशील, तर येथल्या येथें मुस्कटांत भडकावीन, व तुझी बत्तिशी रंगवून मी आपल्या उद्योगास चालता होईन. इतकी शोभा करून घ्यावयाची असेल, तर पुढें ये !' नंतर तो आपल्या अनुयायांस म्हणाला,-'अरे, असे तोंडें पहात उभे काय राहतां ? चला.'

असें बोलून तो मोठ्या त्वेषानें हातपाय आपटींत पूर्वी शोध करून झालेल्या दिवाणखान्या शेजारीं असलेल्या दुसऱ्या एका दिवाणखान्यांत शिरला. पण त्याच्या अनुयायांपैकीं एक सुद्धां त्याच्या पुढें झाला नाहीं, कीं त्याच्या मागून त्या दिवाणखान्यांत गेला नाहीं ! त्याच्या अनुयायांची यावेळीं मोठी चमत्कारिक स्थिति झाली होती. चूडामणीबरोबर जावें तरी कठीण, न जावें तरी कठीण ! चूडामणीबरोबर न जावें तर त्याला वाईट वाटणार; आणि जावें, तर प्रत्यक्ष राजाज्ञेचा अवमान होतो. अशी स्थिति असल्यामुळें ते सर्व आपल्या जागेवरून तिलमात्रही हालले नव्हते.

आपले अनुयायी आपणांबरोबर येत नाहींत, हें दृष्टीस पडतांच चूडामणीच्या तळपायांची आग मस्तकास गेली. रागानें लाल झालेले डोळे वटारून तो थरथरां कांपत असतां म्हणाला,–' अरे भित्र्यांनो, असे उभे काय राहतां? माझी आज्ञा तुम्ही अशीच पाळणार वाटतें! या कारट्याचें काय ऐकतां? महाराज तुमच्यावर रागावले तर मी जामीन!'

आपल्या अनुयायांच्या मनाची स्थिति शेखरानें ओळखलीच होती. कांहीं तरी तडजोड काढल्याखेरीज आतांचा प्रसंग निभावणार नाहीं असें त्याच्या लक्ष्यांत आलें; आणि तो म्हणाला,–' त्या दोघांचा शोध करावयाचा इतकेंच ना काय तें? चला; तर आपण दोघे बरोबरच जाऊन त्यांचा शोध करूं, म्हणजे झालें!'

ही शेखराची युक्ति सर्वांस पसंत पडली, हें सांगावयासच नको. शेखराच्या भाषणास रुकार देण्याखेरीज चूडामणीला गत्यंतरच नव्हतें. त्यानें एकवार तुच्छ आणि मत्सरयुक्त दृष्टीनें शेखराकडे पाहिलें, आणि आपला मार्ग धरिला. आपल्या वडील भावानें आपल्याशीं जें आचरण केलें, त्याच्या योगानें शेखराच्या उदार अंतःकरणास चटका बसला. परंतु आपल्या बंधूची कानउघाडणी करण्याची ही वेळ नव्हे, असें जाणून तो मनांतल्या मनांत तळमळत राहिला. तो आपल्या बंधूच्या मागून निमूटपणें चालूं लागला. चूडामणि ज्यांचा सध्यां शोध करीत होता, ते सरदार हलधर आणि सत्यरथ असे दोघेही एका मोठ्या थोरल्या दिवाणखान्यांत बसलेले आहेत, असें लवकरच त्या बंधूंस समजलें. सरदार हलधर ज्या दिवाणखान्यांत होता, त्या दिवाणखान्यांत आणखी दोन तीन संस्थानिकही बसलेले होते. प्रस्तुतच्या राजकारणाचा विचार करण्यासाठीं बृहद्रथानें ज्या कित्येक संस्थानिकांस खलिते पाठविले होते, त्यांपैकीं जवळजवळचे दोन तीन संस्थानिक युद्धास प्रारंभ होण्यापूर्वीच सुंदरपुरच्या किल्ल्यामध्यें येऊन दाखल झाले होते.

चूडामणीची आणि सरदार हलधराची दृष्टादृष्ट होतांच तो मोठ्या त्वेषानें गुरगुरत त्यास म्हणाला,–' अरे क्षात्रियकुलाधमा! तूं बरा माझ्या तडाक्यांत सांपडला आहेस! आतां या प्रसंगीं तूं माझ्या हातून कसा निसटतोस तें पाहीन!'

सरदार हलधर आपली नेहमींची गंभीरता ढळूं न देतां मोठ्यानें गर्जना करीत म्हणाला,–' अरे दुष्टा, मी सध्यां तुझ्या हातीं सांपडलों आहें, हें जरी खरें आहे, तरी मी तुझ्या मुखांतून आलेलीं असलीं नीचपणाचीं भाषणें अगदीं ऐकून घेणार नाहीं. आपली जीभ आंवर!' असें बोलत त्यानें आपल्या तरवारीस हात घातला, पण तिचा बंद मात्र त्यानें सोडला नाहीं. नंतर तो म्हणाला,–' मी जोंपर्यंत तुमच्या मार्गांत अडथळा करीत नाहीं, तोंपर्यंत माझ्या शरीरास स्पर्श करण्याचा तुम्हांस कांहींएक अधिकार नाहीं.''

चूडामणि उद्धटपणानें म्हणाला,–' होय; एका अर्थीं हें तुझें भाषण खरें आहे. तुझ्या गळ्यास फांस घालतांना तुझ्या शरीरास स्पर्श करण्याचा फक्त एकट्या मांगाला मात्र अधिकार आहे! तूं काल प्रतापपुरांतून माझ्या हातून निसटलास, पण आज या सुंदरपुरांतून मात्र तुला निसटून जातां येणार नाहीं. फार तर काय, आतां एक सोडून शंभर शेखर जरी तुझ्या साह्यास आले, तरी तुझा प्राण वांचणार नाहीं, हें पक्के लक्षांत ठेव.' असें बोलून चूडामणीनें अत्यंत तुच्छतादर्शक दृष्टीनें सरदार हलधराकडे अवलोकन केलें.

सरदार हलधराभोंवतीं जे संस्थानिक बसले होते, त्यांपैकीं एकजण म्हणाला,–' अरे चूडामणि, तूं हें काय बोलत आहेस, याविषयीं तूं विचार केला आहेस काय? तूं ज्या गृहस्थांशीं असें हें उद्धामपणाचें

वर्तन करीत आहेस, त्या गृहस्थाची खरी योग्यता काय आहे-'

चूडामणि मध्येंच ओरडला,-'या नीच माणसासंबंधानें कोणीं कितीही तरफदारी केली, तरी ती अगदीं व्यर्थ आहे. हा दुष्ट माणूस निंबगाजाचा हेर आहे, हें मला पक्कें माहीत आहे. तो आमच्या राजधानींत येऊन आमच्याशीं कपटाचें आचरण करून आम्हांस फसवूं पहात होता, हेंही आतां आम्हांस पक्कें कळून चुकलें आहे. आणि तुम्हीं त्याची इतकी तरफदारी कां करतां, हेंही माझ्या पुरतें ध्यानांत आलें आहे. तुम्हीं सर्वजण आपल्या सार्वभौमाशीं कपट करून त्या निंबराजाच्या पक्षाला मिळालां आहां, हेंही आम्हाला समजलें आहे. त्या नीच बृहद्रथाचा पत्रव्यवहार आमच्या हातीं लागला आहे, आणि आमच्या डोळ्यांपुढें आतां झक्क प्रकाश पडला आहे.'

हे चूडामणीचे शेवटचे शब्द ऐकतांच त्या संस्थानिकांच्या मनांत मोठी भीति उत्पन्न होऊन ते कावरेबावरे झाले. सरदार हलधर आपले मनोविकार आंवरून धरण्यांत अत्यंत कुशल होता, परंतु त्यावेळीं क्षणमात्र त्याच्या मनाच्या क्षोभाची छटा त्याच्या मुद्रेवर उमटल्याखेरीज राहिली नाहीं.

चूडामणि म्हणाला,-'वास्तविक प्रकार असा असल्यामुळें या नीचाला देहान्तशासन करणें हें अगदीं योग्य आहे. अरे, असें तोंडें पाहत उभे काय राहिलां? या हरामखोराला चतुर्भुज करून तटावर घेऊन चला. याला एकदां नाहींसा करून टाकला म्हणजे त्या जांघिळानें केलेलें भविष्य खरें ठरण्याचा संभवच उरणार नाहीं.' असें त्यानें भाषण केलें खरें, परंतु त्याच्या अनुयायांपैकीं कोणीही पुढें सरला नाहीं. म्हणून चूडामणि मोठ्यानें ओरडून म्हणाला,-'तुम्ही माझी आज्ञा अशीच पाळणार काय?'

शेखर मध्येंच म्हणाला,-'कोणी कोणावर जुलूम जबरी करतां नये, अशी तुमच्या राजाची तुम्हाला सक्त ताकीद आहे, ही गोष्ट तुमच्या लक्ष्यांत असेलच.' नंतर सरदार हलधर आणि त्याच्या जवळ असलेले संस्थानिक यांस उद्देशून तो म्हणाला,-'सध्यां तुम्ही आमचे बंदिवान आहां, हें तुमच्या ध्यानीं आलें असेलच; तुम्हीं मुकाट्यानें आपलीं हत्यारें आमच्या स्वाधीन करावीं, यांत तुमचा शहाणपणा आणि मोठेपणा आहे. तीं तुम्हीं जर आपण होऊन आमच्या स्वाधीन केलीं नाहींत, तर मात्र आम्हांला तीं तुमच्यापासून जुलमानें घ्यावीं लागतील.'

हें शेखराचें भाषण जरी अधिकारदर्शक होतें, तरी त्यामध्यें सभ्यतेचा अंश पुष्कळ असल्यामुळें तें ऐकणाराच्या मनास फारसें झोंबलें नाहीं. आपण पुढें काय करावयाचें हें ठरविण्यासाठीं तेथील संस्थानिक सरदार हलधराच्या मुखाकडे पाहूं लागले. आपण करूं तसें ते करणार ही गोष्ट सरदार हलधराच्या ध्यानीं येऊन तो म्हणाला,-'राजपुत्रा शेखरा, तुझ्या अंगीं शौर्याला भूषविणारें औदार्य आहे, अशी माझ्या मनाची खात्री आहे, म्हणून मी आपलें शस्त्र विनतकार फक्त तुझ्या स्वाधीन करतों!'

शेखरानें अगदीं थंडपणानें शस्त्र आपल्या हातीं घेतलें, आणि तें त्यानें मुकाट्यानें आपल्या अनुयायाच्या हातीं दिलें.

नंतर सरदार हलधर शेखराला म्हणाला,-'राजपुत्रा, माझ्याविषयीं इतरांचें मत कसेंही असो, मी त्याची अगदीं पर्वा करीत नाहीं, पण तुमचें मन माझ्याविषयीं कलुषित झालें असल्यास मात्र मला फार खेद होईल. बृहद्रथ राजाचा जो पत्रव्यवहार तुमच्या हातीं लागला, त्यावरून माझ्यासंबंधाचें तुमचें मत बदलावें असा कांहीं मजकूर त्या पत्रामध्यें नसेल, अशी माझ्या मनाची खात्री आहे. मी सध्यां तुमच्या शत्रूच्या वाडयांत तुम्हांस भेटलों, एवढ्यावरूनच जर माझ्यासंबंधानें तुमच्या मनांत विकल्प आला

असेल, तर तो निष्कारण आहे, असें मी प्रतिपादितों. मी तुमच्या शत्रूला अनुकूल आहें, अशी जर तुमच्या मनांत कल्पना शिरली असेल, तर ती अगदीं अस्थानीं आहे ! सुंदरपुरकरांशीं तुमचें युद्ध होणार ही गोष्ट जर मला माहीत असती, तर मी या राज्यांत पाऊल देखील घातलें नसतें. या-संबंधानें मला कांहींच माहिती नसल्यामुळें, बृहद्रथानें मला बोलाविल्यावरून मी अगदीं कोणत्याही प्रकारचा विशिष्ट हेतु मनांत न धरितां या ठिकाणीं आलों आहे.'

ह्या भाषणाचा शेखराच्या मनावर काडी भर देखील परिणाम झाला नाहीं. तो थंडपणानें म्हणाला,–' अहो सरदार, या तुमच्या भाषणाचा रोख माझ्या ध्यानीं आला नसेल असें मात्र तुम्ही समजूं नका. बृहद्रथाच्या पत्रव्यवहारावरून आम्हाला काय समजलें आहे, हें आमच्या पासून काढून घ्यावें, आणि तें तुम्हांस समजलें म्हणजे त्या धोरणानें पुढें आपलें बोलणें हवें तसें बदलावें, असा या तुमच्या भाषणाचा हेतु आहे, ही गोष्ट माझ्या पूर्णपणें ध्यानांत आलेली आहे. माझ्या बंधुरायानें जें कांहीं आतां सांगितलें, तें अगदीं अक्षरशः खरें आहे. मी इतकेंच सांगतों, कीं जो पत्रव्यवहार आमच्या हातीं लागला, त्यावरून तुम्ही निंबराजाचे हस्तक आहां अशी आमच्या मनाची पूर्णपणें खात्री झालेली आहे. या-गोष्टींसंबंधानें आतां आमच्या मनांत कोण-त्याही प्रकारचा संशय राहिलेला नाही. म्हणून मीच विचारतों, तुम्ही आमच्या राज्यांत असतांना जें अगदीं धडधडित खोटें भाषण केलें, तें काय म्हणून? तुम्हांस जर ईश्वराची भीति असती, सत्याची चाड असती आणि स्वतःसंबंधाचा अभिमान असता, तर तुम्हीं इतकें अस्खलित खोटें भाषण करून आमच्या गुप्त गोष्टी सम-जून घेण्यचा प्रयत्न केला नसता ! तुमच्या सारख्या वाईट माणसासाठीं मी जांबिला-सारख्या इमानीं नोकराशीं द्वंद्व युद्ध केलें, हें फार वाईट झालें, असें मला आतां वाटूं लागलें आहे. सध्याची वेळच अशी आणी-बाणीची असल्यामुळें मला इतकें स्पष्ट बोलावें लागत आहे. तुमच्या पूर्वीच्या कपटी वर्तनामध्यें जर तुम्ही आणखी भर घातली नसती, तर मलाही इतकें स्पष्ट बोलण्याची गरज पडली नसती.'

हें शेखराचें लांबलचक भाषण ऐकतांना चूडामणि अगदीं अधीर झाला होता. शेखर स्तब्ध होतांच तो आपल्या अनुयायांस म्हणाला,–' आतां या शेखराच्या भाषणावरून तरी तुमची खात्री पटली कीं नाहीं ? असल्या पाजी माणसाला योग्य शिक्षा करावयाला आपणांस तिळमात्र भिण्याचें कारण नाहीं. याला आपण आतांच्या आतां फांसावर चढ-विलें म्हणून आम्हांला कोणीही दोष देणार नाहीं!

सरदार हलधर मोठा शांत स्वभावाचा गृहस्थ होता, तरी तो या वेळीं अगदीं उतावळेपणानें शेखरास म्हणाला,–' शेखरा, तुझ्याशीं मला एकांतीं चार शब्द बोलावयाचे आहेत, तेवढे ऐकून घेशील का ?'

शेखरानें तत्काल उत्तर दिलें,–' नाहीं. ती गोष्ट व्हावयाची नाहीं. मला वडिलांच्या आज्ञे-बाहेर वागावयाचें नाहीं, आणि त्यांना जी गोष्ट पसंत पडावयाची नाहीं, ती मी कर-णार नाहीं ! ' नंतर तेथील संस्थानिकांकडे वळून शेखर त्यांस म्हणाला,–' सध्यां तुम्ही कोणत्या प्रसंगांत सांपडलां आहां, याबद्दल तुमचें मनच तुम्हाला सांगत असेल ! हे सरदार हलधर निंबराजाच्या वतीनें कार-स्थानें करण्यासाठीं इकडे आले आहेत, आणि तुम्हीं त्यांच्या विचारानें आपल्या सार्वभौम राजाची सत्ता झुगारून देण्याचा प्रयत्न करीत आहां. आतां आमचे सार्वभौम राजाधिराज रत्नाकर महाराज, यांचें आच-रण गैर असल्यामुळें त्यांच्यावर कोणाची भक्ति नसेल; परंतु ते जोंपर्यंत सार्वभौमाच्या सिंहासनावर बसत आहेत, तोंपर्यंत त्यांच्या

विरुद्ध करस्थानें करणें हा अन्याय आहे. आणि तीं कारस्थानें प्रत्यक्ष त्यांच्या शत्रूशीं करणें हा अक्षम्य असा राजद्रोहाचा अपराध आहे. हा अपराध तुह्मी सर्वांनीं केला आहे, अशी आमच्या मनाची खात्री पटण्या-इतका पुरावा आह्मांस मिळाला आहे. यासाठीं तुह्माला कैद करणें हें आमचें कर्तव्य आहे. तुह्मी कोणी या दिवाणखान्यांतून बाहेर पडतां नये. जर तुह्मी बाहेर जाण्याचा प्रयत्न करूं लागाल, तर तें तुह्मांस जड जाईल. बंधुराया, चला; आपण आतां तातांच्या पायांपाशीं जाऊन इकडील सर्व वर्तमान त्यांस निवेदन करूं या. '

या वेळीं चूडामणीनें आपल्या अनुयायां-कडे नजर टाकली, त्यावरून ते आपली आज्ञा पाळण्यापेक्षां शेखराची आज्ञा पाळण्यास अधिक उत्सुक झालेले आहेत, ही गोष्ट त्याच्या ध्यानीं आली. याउपर जर त्यांस आपण अधिक आग्रह केला, तर ते आपला उघड उघड आज्ञाभंग करतील, त्यापेक्षां आपण आतां माघार घ्यावी हें बरें, असा पोक्त विचार करून चूडामणि एकदम त्या दिवाण-खान्यांतून बाहेर पडून जिन्याकडे चालता झाला. नंतर शेखरही त्या दिवाणखान्यांतून बाहेर आला, आणि त्यानें तेथील दोन चार दालनांचें निरीक्षण केलें. यांपैकीं एका दालनांत सत्यरथ त्याच्या दृष्टीस पडला, पण शेखरानें त्याजकडे अगदीं लक्ष्य दिलें नाहीं. परस्परांशीं संबंध असलेल्या दोन तीन दालनांच्या दरवाज्यांवर शेखरानें पहारे-करी नेमिले, आणि योग्य तो बंदोबस्त करून तो तेथून जिना उतरून खालीं आला. ज्या ठिकाणीं शेखराची आणि चूडामणीची गांठ पडली, त्या ठिकाणीं जिन्याचा प्रारंभ होत होता. केव्हां जिना बंद करण्याची जरूर पडल्यास तसें करतां यावें, म्हणून त्या ठिकाणीं चारी बाजूंनीं सागवानी जाड फळ्यांची लहानशी खोली बनविलेली होती.

बंधु दृष्टीस पडतांच शेखर उत्कंठेनें त्याज-पाशीं गेला व त्यानें चूडामणीचा हात मोठ्या प्रेमानें आपल्या हातीं धरिला. आपला हात सोडवून घेण्यासाठीं चूडामणि प्रयत्न करीत होता, पण शेखरानें त्याला हात सोडवूं न देतां तो त्यास म्हणाला,–'बंधुराया, तूं माझ्याशीं असा कां बरें वागतोस? मी तुझा असा कोणता बरें अपराध केला आहे! वडिलांच्या आज्ञेचा भंग मीं तुला करूं दिला नाहीं, म्हणून का तूं माझ्यावर रागावलास!'

अगदीं तुसडेपणानें चूडामणि त्याला म्हणाला,–'होय, होय; त्यासाठीं आणि दुसऱ्या हजारों कारणांनीं मला तुझा मोठा राग आला आहे. तूं एकसारखा माझी मानखंडना करण्याचा प्रयत्न करीत आहेस. माझा अपमान करून आपली प्रतिष्ठा वाढ-विण्यासाठीं तुझें प्रत्येक कृत्य चाललेलें आहे, हें केव्हांच माझ्या ध्यानीं येऊन चुकलें आहे. थांब,–मध्यें बोलूं नको. मी काय म्हणतों, तें नीट ऐकून घे. तुझा फाजीलपणा आतां कळसाला चढला अस-ल्यामुळें मला सर्व गोष्टी उघड उघड बोलणें भाग झालें आहे. पहिली गोष्ट ही कीं माझें प्रियंवदेवर प्रेम जडलें आहे!'

अत्यंत आश्चर्यानें आपल्या बंधूकडे पाहत शेखर उद्गारला,–'काय तिच्यावर तुझें प्रेम!'

मोठ्या आवेशानें आणि शौर्यानें चूडामणि बोलला,–'होय होय; माझें तिजवर प्रेम जडलें आहे. माझें प्रेम तिजवर कां जडूं नये! तातांनीं मजसाठीं जी कुमारिका पसंत केली आहे, तिजहून प्रियंवदा अधिक सुंदर नाहीं काय? प्रेम म्हणजे काय हें मला अगदींच समजूं नये, इतका मी आडदांड आहें कीं काय? मी पुनः सांगतों, कीं माझें तिजवर प्रेम जडलें आहे. तूं आपल्या गोड गोड थापांनीं तिचें मन आपल्याकडे वळवून घेतलेंस आहेस, ही मला न आवडणारी पहिली गोष्ट.

नूं त्या प्रतिष्ठानामध्यें राहून पोथ्या-पुस्तकें वाचावयास शिकलास आणि लांचलांच गोष्टी सांगून दुसऱ्यांचीं मनें आपल्याकडे ओढून घेण्याची कला साध्य करून घेऊन आमच्या प्रजेचीं मनें मजपेक्षां तुझ्याकडे अधिक वेधावीं असा तूं बुद्धिपूर्वक प्रयत्न करीत असतोस, हा तुझा दुसरा अपराध ! आमचे भिल्ल साधे-भोळे असल्यामुळें ते तुझ्या भाषणानें फसतात; आणि ते माझें ऐकत नाहींत. याशिवाय तूं गेल्या एकदोन दिवसांत ज्या गोष्टी केल्या आहेस, त्यामुळें माझी किती पायमल्ली झाली आहे, माझा अपमान करण्यासाठीं तुझे प्रयत्न कसे सुरू आहेत, हें मीं सांगण्याचें कारण नाहीं ! '

हें भाषण ऐकून शेखराच्या नेत्रांतून अश्रुधारा वाहूं लागल्या आणि तो बोलला,– " नको नको ! बंधूराया असें भाषण करूं नको ! तुझ्या या प्रत्येक शब्दानें माझें हृदय विदीर्ण होत आहे !

चूडामणि अत्यंत तिरस्कारपूर्वक बोलला,– " आतां रडून काय उपयोग ! तुझ्या या कपटरोदनानें मी फसेन, असें तूं समजतोस ? तुझ्या लाघवानें मी फसेन, अशी जर तुझ्या मनाची कल्पना असली तर ती अगदीं खोटी आहे ! तूं काल–आज जो पराक्रम गाजविलास तेवढा मात्र लोकांना दिसेल; पण तूं हें सगळें मला ग्रहण लागण्यासाठीं–माझा अपमान करण्यासाठीं–माझा पाडाव करण्यासाठीं–केलें आहेस, हें मात्र कोणाला समजणार नाहीं. ! तूं त्या महापराक्रमी आणि बलाढ्य जांघिळाचा पराभव केलास, यावरून तूं शूर आणि पराक्रमी आहेस, एवढेंच कायतें लोकांच्या ध्यानीं आलें; पण तूं विकत श्राद्ध घेऊन असें अपसव्य कां करीत बसलास, हें त्यांच्या कधींच ध्यानीं यावयाचें नाहीं. तूं रात्रीं टेहळणीसाठीं गेलास, तूं बृहद्रथाचें पत्र वाटेंत पकडिलेंस, या गोष्टी केवळ दैवानें घडून आल्या असल्या, तरी त्यांच्या योगानें तुझी प्रतिष्ठा मात्र वाढली ! तूं त्या भीमरथाला आपल्या जाळ्यांत पकडलेंस आणि हें वेषांतर करून तूं आजही जय संपादन केलास, यावरून तुझा स्वभाव किती कपटी आहे, आणि आपले हेतु साध्य करण्यासाठीं तूं कोणताही नीचपणा करावयास मागें सरणार नाहींस, हें मात्र उघड उघड दिसून येत आहे ! तुझ्या कृतीनें जरी लोक तुझें अभिनंदन करीत असले, तरी मी तुझा पूर्ण तिरस्कार करतों–नुसता तिरस्कारच नव्हे–मी तुझा–अगदीं स्पष्ट शब्दानेंच सांगतों,–मी तुझा अगदीं द्वेष करीत आहें ! "

अगदीं गयांवयां करीत शेखर म्हणाला,–'अरे देवा ! बंधुराया, तूं हें काय बोलत आहेस, याचा अर्थ तरी तुझ्या ध्यानीं येत आहे काय ? आपला वडील बंधु म्हणजे पित्याप्रमाणें पूज्य असतो, अशी माझी भावना आहे. वडिलांनीं लहानाचा द्वेष करणें, हें किती भयंकर आहे ? मी हें कसें सहन करूं ? बंधुराया, आपला शब्द चुकून गेला असें म्हण, आणि तूं माझा सरोसर द्वेष करीत नाहींस, असें मला स्पष्ट शब्दांनीं सांग पाहूं ! '

चूडामणि तिरस्कारपूर्वक म्हणाला,–'छे छेः तो शब्द मी चुकून बोललों नाहीं ! मी पूर्ण विचार करूनच तो शब्द योजिला आहे ! मी तुझा अगदीं मनापासून द्वेषच करीत आहें ! पण याद राख ! ही गोष्ट तूं आपल्या मनांत अगदीं गुप्त ठेव. जर ही गोष्ट तूं वडिलांपाशीं किंवा मातेपाशीं सांगशील, तर मी साफ नाकबूल करीन ! मी तुझा द्वेष करतों, ही गोष्ट तुला एकान्तीं सांगण्याची मला सध्यां संधि मिळाली, याचा मला फार आनंद होत आहे. या पुढें तूं माझ्याशीं कसें वागलें पाहिजे, हें नीट ध्यानीं घे. तूं मला आपला बंधु मानतोस ही गोष्ट जरी मला पसंत नाहीं, तरी लौकिकासाठीं मला तुझ्याकडून तसें म्हणवून घेणें भाग आहे. मी तुला माझा भाऊ असें न समजतां तूं माझा वैरी आहेस

असें समजत आहें ! मी पुनः सांगतों, कीं तुझ्यासंबंधानें माझ्या मनांत पूर्ण द्वेष बाणला आहे. जर माझ्या हातून तुझा खून होऊं नये, अशी तुझी इच्छा असली, तर तूं यापुढें माझ्यापुढें बेताबेतानें वागत जा. हें मी तुला आतां बजावून ठेवितों.'

असें बोलून आणि शेखराला जोरानें ढकलून देऊन चुडामणि तेथून चालता झाला. उदार मनाच्या शेखराला या भाषणानें अत्यंत दुःख झालें, आणि दुःखावेगानें त्याचें मस्तक भ्रमण पावूं लागलें. सध्यां त्याच्या मनाला दुःखअधिक होत होतें, कीं भीति अधिक वाटत होती, याचा निर्णय करणें कठीण आहे. आपल्या समोर आपला बंधूच उभा असून, तो हें भाषण करीत आहे, कीं एकादा आपल्या बंधूचें रूप धारण करणारा राक्षस आपल्या समोर उभा राहून भाषण करीत आहे, याचा त्याच्या मनाला उलगडा करतां येईना. मनास झालेल्या खेदामुळें त्याच्या नेत्रांतून टपाटप अश्रुबिंदु गळत होते. या स्थितीमध्यें जर त्याला कोणीं पाहिलें असतें, तर सुंदरपुरच्या किल्ल्यामध्यें आपलें शौर्य दाखविणारा जवान तो हाच, किंवा ज्यानें काल जांघिळाचा पराभव केला तो वीर पुरुष हाच, अथवा अर्कपुरच्या राजाला ज्यानें पादाक्रांत केलें तो तरुण हाच, याबद्दल त्याच्या मनांत संशय उत्पन्न झाला असता !

आपलें मन ताब्यावर आणण्यासाठीं शेखराला बराच वेळ प्रयत्न करावा लागला. आपले वडील आणि आजोबा राजवाड्या पुढील मैदानामध्यें एकत्र होऊन आपल्या शिल्लक सैन्याची गणती करीत असतील, अशावेळीं आपण तेथें नसल्यास तें त्यांस चमत्कारिक वाटेल, असें मनांत येऊन शेखरानें आपलें मन ताब्यावर आणण्याचा बराच प्रयत्न केला; परंतु आपलें मन ताब्यावर आलें आहे; आणि आपण वडिलांसमोर गेल्यास आपल्या मुद्रेवर त्यांस खेदाची छटा दिसणार नाहीं, असें त्याचें मन त्याला सांगेना. म्हणून आणखी थोडावेळ तो तेथेंच घुटमळत उभा राहिला.

त्यानें आपलें मन शांत करण्याचा प्रयत्न चालविला होता खरा, पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. क्षणोक्षणीं त्याचें मन अधिकाधिक भ्रमण करूं लागल्यामुळें आपणांस चक्कर येत आहे, असा त्याला भास झाला, आणि कदाचित् आपण खालीं पडूं अशी शंका त्याच्या मनांत उत्पन्न होऊन, तो तेथील फळ्यांच्या भिंतीस ओटिंगून उभा राहिला. अशा स्थितींत तो कांहीं वेळ उभा असतां तो ज्या फळ्यांवर भार घालून उभा होता, त्या फळ्या मागें गेल्या आणि शेखर धाडकन् खालीं पडला. त्यावेळीं त्या फळ्यामागें असलेल्या दगडी भिंतीवर त्याचें डोकें ताडकन् आपटलें आणि तो त्या वेदनेनें एकदम मूर्छित झाला.

शेखराचें पुढील वर्तमान सांगण्यापूर्वीं आह्मांस प्रथम सरदार हलधर आणि त्याच्यापाशीं बसलेले संस्थानिक यांचेंकडे वळलें पाहिजे. ते ज्या दिवाणखान्यांत बसले होते, त्याच्या शेजारच्या एकदोन दिवाणखान्यांत कित्येक चाकरमाणसें होतीं, म्हणून शेखरानें त्या दिवाणखान्याच्या बाजूला दोन तीन दालनांवर मिळून पहारा ठेविला होता. जेवढ्या जागेवर शेखरानें पहारा ठेवला होता, तेवढ्या जागेमध्यें तेथून बाहेर पडण्यासारखी दुसरी वाट नसावी अशी त्याची कल्पना होती; आणि जरी एकादा रस्ता तेथें असला, व त्या रस्त्यानें राजवाडयाबाहेर पडतां येत असलें, तरी किल्ल्यांतील मार्गांचा बंदोबस्त झालेला असल्यामुळें, तेथील माणसांना आपल्या हातून साफ निसटून जातां येणें शक्य नाहीं, अशी त्याची कल्पना होती.

शेखर आणि चूडामणि दिवाणखान्यांचे दरवाजे बंद करून पहारेकरी नेमून तेथून निघून गेल्यावर हलधर आणि संस्थानिक

यांनीं परस्परांशीं संभाषण करून पुढें काय करावयाचें याचा खल चालविला. या वेळीं ते सर्वजण जरी एकाच प्रकारच्या संकटांत सांपडलेले होते, तरी तेथें असलेल्या संस्थानिकांना आपल्या प्राणांपेक्षां सरदार हलधराच्या प्राणाची अधिक काळजी वाटत होती. शेवटीं त्या सर्वांनीं मिळून एकविचारानें असें ठरविलें कीं, आपण निरोप पाठवून दृढसंध राजाला तेथें बोलावून आणावें, आणि त्याला मुद्द्याच्या एकदोन गोष्टी सांगून तो पुढें काय करणार हें त्याच्या मुखानें ऐकून घ्यावें. सरदार हलधराला हा मार्ग पसंत वाटला, परंतु या वेळीं त्याची पूर्वीची गंभीरता अगदीं नष्ट झालेली दिसत असून त्याची मुद्रा अगदीं खिन्न दिसत होती. ज्या वेळीं आपण शेखराला 'तुजपाशीं एकांतीं चार शब्द बोलावयाचे आहेत'– असें म्हटलें, त्या वेळीं आपल्या मनांत असाच हेतु होता, असें सरदार हलधरानें आपल्या सोबत्यास सांगितलें.

हा त्यांचा संवाद चालू आहे, इतक्यांत पलीकडच्या दिवाणखान्यांतून सत्यरथ तेथें आला आणि आपल्या धन्यापुढें उभा राहिला. त्याच्या मनांत आपणांस कांहींतरी सांगावयाचें आहे, हें सरदार हलधरानें तत्काल ताडिलें, आणि त्याला विचारलें,–'सत्यरथा, तुझें काय म्हणणें आहे?' सरदार हलधरानें जर त्याला असें विचारलें नसतें, तर त्याच्या नेहमींच्या शिस्तीप्रमाणें त्यानें आपण होऊन भाषणास प्रारंभ केला नसता.

सत्यरथ म्हणाला,–'महाराज, बृहद्रथ राजाचा विश्वासु सेवक रूपधर यानें नुकतेंच मला असें सांगितलें आहे कीं आपण सध्या ज्या दिवणखान्यांत बसलां आहां, त्या दिवाणखान्यांतून खालच्या मजल्यावर जाण्याचा एक गुप्त मार्ग आहे. त्या मार्गानें आपण खालीं गेल्यास आपणांस किल्ल्यांतून सहज पाय काढतां येईल. कारण सध्यां अगदीं ढलढळीत तिनसांजा झाल्या असून, शत्रुपक्षा कडील लोकांची राजवाड्याच्या अंगणांत मोठी धामधूम सुरू असेल. अशा वेळीं जर आपण वेषांतर केलें, तर आपणांस शत्रूच्या हातांतून निसटून जातां येईल.'

सरदार हलधरानें फर्माविलें,–'असें आहे, तर त्या रूपधराला इकडे घेऊन ये.'

सत्यरथ परत गेला आणि त्यानें रूपधराला बोलावून आणिलें. हा सेवक अंगा पिंडानें जवळजवळ सरदार हलधरासारखाच होता. त्यानें घाईघाईनें तेथील गुप्तरस्ता कसा आहे व तो कोणीकडून कोठें जातो हें सरदार हलधराला थोडक्यांत सांगितलें. वेळ टळटळीत तिनसांजाची असल्यामुळें या प्रयत्नांत अपयश येण्याचा संभव अगदीं कमी आहे, असें हलधराच्याही मनांत आलें. त्यानें आपल्या अंगावरील बहुमोल व सरदारी बाण्याचा पोषाक काढून टाकिला, आणि त्या रूपधरानें दिलेलीं साधीं वस्त्रें परिधान केलीं. या वेषांतरामुळें सरदार हलधराचा पूर्वीचा सरदारी बाणा नाहींसा होऊन तो एकाद्या सामान्य प्रतीच्या सेवकासारखा दिसूं लागला. या वेषामध्यें काळोखाच्या वेळीं जर एकाद्या नवीन व थोडा परिचय असलेल्या माणसानें त्याला पाहिलें असतें, तर त्याला त्याची अगदीं ओळख पटली नसती, इतकें तें वेषांतर त्याला योग्य शोभलें होतें.

वेषांतर करून झाल्यावर रूपधरानें त्या दिवाणखान्याच्या भिंतींत असलेलें एक चोरदार उघडलें आणि त्यामध्यें सरदार हलधरानें प्रवेश केला. हा गुप्तमार्ग अगदीं लहान असून त्यामध्यें काळोख मिट्ट पडला होता. या ठिकाणीं आल्यावर सरदार हलधरानें सत्यरथास हाक मारून त्याला म्हटलें,–'सत्यरथा, जर मी आणखी एक घटकेच्या आंत परत आलों नाहीं किंवा माझें पुढें काय झालें हें तुला समजलें नाहीं, तर मी या किल्ल्यांतून सुरक्षितपणें बाहेर पडलों असें तूं समज, आणि माझ्याप्रमाणेंच तूं येथून निसटण्याचा प्रयत्न कर.'

यावर सत्यरथ काय म्हणतो तें ऐकण्यासाठीं देखील न थांबतां सरदार हलधरानें रूपधराला पुढें होण्याचा हुकूम दिला, आणि तो त्याच्या मागे चालूं लागला. ते जात होते, त्या जागेंत काळोख तर होताच; पण मार्ग अगदीं अवघड होता. म्हणून रूपधरानें सरदार हलधराला सावधपणानें पावलें टाकण्याची सूचना दिली. थोडा वेळ एका बोळांतून गेल्यावर त्यांना एक उंच उंच पायऱ्या असलेला ओबड धोबड जिना लागला. तो जिना उतरून ते दोघे खालीं आले. नंतर रूपधर बोलला,–'महाराज, आणीबाणीची वेळ कायती आतांच आहे. आपण येथून आतां जिन्याच्या खोलींत जाणार आहों. त्या ठिकाणीं जर शत्रुपक्षाकडील लोक आपणांस भेटले, तर पुढें मार्गच खुंटेल. पण जर येथून बाहेर पडतांना आपणांस कोणीं पाहिलें नाहीं, तर आपण बिनधास्तपुढें चालते व्हा. सावध रहा; मी येथील चौरदार उघडतों; तें उघडतांच तुम्ही येथून एकदम बाहेर पडा; म्हणजे मग मी तें पुनः चरकन लावून घेईन.'

हे शब्द बोलत असतां रूपधरानें भिंतींत असलेली एक कळ फिरविली, त्याबरोबर दरवाजा उघडला, पण तो दरवाजा उघडतांच पलीकडच्या बाजूला दरवाज्याला टेंकून उभा असलेला शेखर, त्या उघडत्या दाराबरोबर खालीं पडला, आणि अरुंद जागेंत पडत असतां त्याचें डोकें तेथील भिंतीवर मोठ्या जोरानें आदळलें.

वास्तविक प्रकार ध्यानीं न आल्यामुळें आपली युक्ति साफ फसली, असें हलधर आणि रूपधर यांस प्रथम वाटलें, परंतु त्यांनी न डगमगतां जिन्याच्या खोलींत आणखी कोणी माणसें आहेत कीं काय हें पाहून घेतलें. तेथें दुसरें कोणी त्यांच्या दृष्टीस पडलें नाहीं. ते सध्या जिन्याच्या खोलींत असल्यामुळें तेथें उजेड बराच होता; त्यामुळें आपल्या पायाशीं उताणा पडलेला माणूस कोण आहे हें त्यांनीं पाहिलें. तो शेखर आहे, हें हलधरानें तत्काल ओळखिलें.

ही जी चमत्कारिक गोष्ट घडून आली, ती फार महत्त्वाची आहे, असें त्या दोघांच्याही तात्काळ लक्ष्यांत आलें; आणि एका क्षणार्धाचाही विलंब न करतां त्याला त्या दोघांनीं गुप्त मार्गामध्यें घेतलें. नंतर दरवाजा बंद करून त्यांनीं मूर्च्छित शेखराला गुप्त मार्गानें दुसऱ्या मजल्यावरच्या दिवाणखान्यांत नेलें. अशा स्थितींत शेखराला तेथें आणलेलें पाहून तेथें बसलेल्या संस्थानिकांस परमावधीचें आश्चर्य वाटलें. हलधरानें त्यासंबंधाची अगदीं थोडक्यांत हकीकत त्या संस्थानिकांस सांगितली, आणि या आकस्मिक गोष्टीपासून आपला फायदा करून घेण्याचा हलधरानें निश्चय केला. शेखराचीं हत्यारें आणि त्याचा पोषाक त्याच्या अंगावरून उतरून घेणें हें फक्त पांच चार पळांचें काम होतें. शेखराच्या अंगावर सध्यां भीमरथाचा पोषाक होता; तो पोषाक सरदार हलधरानें आपल्या अंगावर घातला. इतकें सर्व होईपर्यंत शेखर बेशुद्धच होता.

नंतर सरदार हलधर बोलला,–'आतां सत्यरथाला मजबरोबर यावयास अगदीं हरकत नाहीं. माझ्या अंगावर सध्यां शेखराचा पोषाक असल्यामुळें मी कोठेंही जात असलों आणि माझ्या बरोबर कोणीही असलें, तरी त्याबद्दल कोणाच्याही मनांत शंका येणार नाहीं. यासाठीं सत्यरथानें मीं टाकलेला हा रूपधराचा पोषाक अंगावर धारण करून मजबरोबर यावयास अगदीं हरकत नाहीं.'

आपल्या धन्याच्या आज्ञेप्रमाणें सत्यरथानें तत्काल आपला पोषाक बदलला. त्याचा पोषाक बदलून झाल्यावर रूपधरासह सरदार हलधर पुनः गुप्त मार्गानें खालीं आला. सरदार हलधर आपल्या सेवकासह जिन्याच्या खोलींत पोंचतांच त्याचें कल्याण चिंतून रूपधरानें गुप्त द्वार बंद करून घेतलें.

वेळ अगदीं तिनसांजांची असल्यामुळें काळोख बराच पडला होता, आणि हलधरानेंही आपला चेहरा फारसा कोणाच्या ध्यानीं येऊं नये ग्हणून आपल्या मस्तकास बांधलेल्या मंदिलाचें एक शेवट आपल्या माने खालून फिरवून दुसऱ्या खांद्यावरून पाठीवर टाकलें होतें. सत्यरथ तर स्वतः त्या प्रांतांतील रहिवाशी असल्यामुळें त्याला सध्यांचा वेष फारच खुलून दिसत होता. त्यामुळें या वेषांतरामध्यें जर त्याला कोणीं पाहिलें असतें, तर हा बागलाणी नव्हे, असें म्हणण्याची कोणाची प्राज्ञा नव्हती. अशा विलक्षण प्रकारानें त्यांच्या मनासारखा योग जुळून आला असल्यामुळें, ते दोघेजण बेलाशक जिन्याच्या खोलींतून बाहेर पडून राजवाडयाच्या अंगणांत येऊन दाखल झाले. त्या ठिकाणीं विजयोत्सवाची मोठी धामधूम चालू होती, त्यामुळें आपला हेतु आपल्या कल्पनेपेक्षां अधिक सुलभ रीतीनें तडीस जाणार अशी त्यांच्या मनाची तत्काल खात्री पटली. कित्येक सैनिक जखमी झालेल्यांस उचलून दृढसंधानें पसंत ठरविलेल्या जागीं नेत होते; कित्येक सैनिक मृतांचे देह उचलून ते पुढील व्यवस्थेसाठीं एका बाजूला नेऊन ठेवीत होते; आणि कित्येक सैनिक कैद केलेल्या लोकांस बंदोबस्ताच्या जागीं घेऊन चालले होते. या काम करीत असलेल्या लोकांखेरीज बाकीचे लोक जागजागीं घोळके करून झालेल्या लढाईंत कोणीं कसा पराक्रम केला, यासंबंधानें गप्पा मारण्यांत चूर झालेले होते, तर कित्येक आपल्या बरोबर घेतलेल्या दशम्या-भाकरी आपल्या पोटांत सांठविण्यासारखी सोईवार जागा पाहण्यांत गढून गेले होते. दृढसंध राजा स्वतः मेहनत घेऊन जखमी झालेल्यांची आणि मृतांची व्यवस्था लावीत होता; व वृषपति आपल्याबरोबर दहापांच सेवक घेऊन बृहद्रथ राजा कैदेमध्यें सुरक्षित आहे कीं नाहीं, हें पहावयासाठीं किल्ल्याच्या पिछाडीस गेला होता. सरदार हलधर आणि सत्यरथ हे वेषांतर करून सर्व सैन्यामधून जात असतां, जरी त्यांजकडे कित्येकांचे लक्ष्य गेलें आणि जरी कित्येकांसीं सुंदर पुरुषांचा वेष धारण करणाऱ्या सत्यरथाला त्याच्या मागून जात असतां पाहिलें होतें, तरी त्या गोष्टीकडे कोणीं विशेष लक्ष्य दिलें नव्हतें. कारण शेखरच आपल्याबरोबर कोणाला तरी घेऊन कांहीं कामासाठीं कोठें तरी जात असेल, असें त्यांच्या मनांत येणें या प्रसंगीं अगदीं साहजिक होतें.

अशा रीतीनें मध्यें कोणत्याही प्रकारचा अडथळा आल्याखेरीज ते दोघेजण किल्ल्याच्या थोरल्या दरवाज्यापर्यंत अगदीं मुरळीत येऊन पोंचले. दरवाज्यामध्यें जमून दिवे किंवा मशाली लावलेल्या [illegible] मुळें तेथें पुष्कळच काळोख [illegible] म्हणून तेथें जरी [illegible], तरी त्यांना सरदार [illegible] नाहीं. अ[illegible] होती. स[illegible] काय घडून [illegible] जीवित अवल[illegible] हरकत नाहीं. [illegible] धिम्या स्वभावाचे [illegible] प्रसंगीं त्याच्या हृद[illegible] राहिली नव्हती. स[illegible] धडधडतच होतें, परंतु ते [illegible] भीतीपेक्षां हलधराच्या [illegible] धडधडत होतें.

ते दरवाज्यापाशीं येऊन [illegible], क्यांत तेथील पहारेकऱ्यानें [illegible] आणि चोंहोंकडे लख्ख उजेड पाडला. तेथील पहारेकऱ्यांस शेखरच कोठें तरी जात आहे असें वाटलें, आणि त्यांनीं मोठ्या नम्रपणानें त्यास प्रणाम केला. मोठ्या ऐटीनें त्या प्रणामाचा स्वीकार करून सरदार हलधर तसाच तडाक्यानें पुढें चालला. सुदैवानें या वेळीं खंदकावर पूल टाकलेलाच होता, या

गोष्टीचा त्याला फार आनंद वाटला, पण या आनंदांत विरजण घालणारी दुसरी गोष्ट त्याच्या नजरेस पढली. दरवाज्याबाहेर पुलाच्या लांकडी कठड्याला ओटिंगून चूडामणि उभा आहे, हें पाहून सरदार हलधराच्या पोटांत धस्स झालें. या वेळीं चुडामणीची मुद्रा अत्यंत क्रूर दिसत होती. हलधरानें पूर्वी प्रतापपुरामध्यें त्याला पाहिलें होतें, पण तेव्हांच्या त्याच्या मुद्रेंत आणि सध्यांच्या त्याच्या मुद्रेंत जमीन-अस्मानाचें अंतर दिसत होतें. सध्यां त्याची मुद्रा एकाद्या राक्षसाप्रमाणें रक्तप्राशन करण्यास हपापल्यासारखी दिसत होती. सध्यां जर आपणांस यानें ओळखिलें, तर जिवाची आशाच नको, असें त्यास वाटत होतें. पण [illegible] सांगावा ? आपणां उभयतांची [illegible] लूक लागल्याबरोबर त्यानें [illegible] दृष्टी मागें घेतली [illegible] आपणांकडे पहावयाचें [illegible] असें जेव्हां त्यांस [illegible] मोठें नवल वाटलें ! या [illegible] ऊन ते तडक पुढें गेले. [illegible] गेल्यावर त्यांनीं आपली मान [illegible] वळून त्याजकडे नजर [illegible], तेव्हां [illegible] तेथून निघून पुनः किल्ल्यांत [illegible], असें त्यांस दिसलें.

या [illegible] उभयतांसही अत्यंत आश्चर्य [illegible], पण तें व्यक्त करावयास सध्यां त्यांना [illegible] म्हणून, एकही शब्द न [illegible] ते तसेच तडक पुढें चालले. [illegible] कांहीं अंतरावर जाऊन पोंचल्यावर [illegible] तेथून एकदम धूम ठोकली ! [illegible] चूडामणीच्या त्या वेळच्या वर्तनाचें जरी [illegible] हलधराला आश्चर्य वाटत असलें, तरी त्या आचरणाचें इंगित वाचकांच्या ध्यानीं आलें असेलच. आपला भाऊ आपणाकडे येत आहे, हें दुरून दृष्टीस पडतांच चूडामणीनें मुद्दाम आपली मान फिरविली होती. जिन्याच्या खोलीमध्यें त्या उभयतांचा नुकताच जो संवाद झाला होता, तो अद्यापि त्याच्या मनामध्यें ताजा असल्यामुळें मुद्दाम आपल्या बंधूला दोन शब्द बोलण्याची त्याची आतां इच्छा नव्हती; त्याचें अंतःकरण या वेळीं मत्सराग्नीनें पोळत होतें, त्यामुळें शेखराशीं भाषण करावयास तर काय, पण नुसतें त्याचें तोंड पहावयास सुद्धां त्या वेळीं चूडामणि तयार नव्हता. कदाचित आपला बंधु लवकरच परत आल्यास पुनः त्याची आपली येथेंच गांठ पडेल, असें मनांत येऊन तो किल्ल्यामध्यें चालता झाला होता.

मोठ्या धांदलीनें सुमारें एक कोशभर जमीन चालून गेल्यानंतर सरदार हलधर आणि सत्यरथ या उभयतांनीं थोडा वेळ विश्रांति घेण्याचा विचार केला; मागाहून धरणें येण्याची भीति असल्यामुळें, ते फार वेळ विश्रांति घेत बसले नाहींत किंवा फार वेळ बोलत राहिलेनाहींत. शिवाय मोठ्या धोपट मार्गानें प्रवास करण्यापेक्षां आडवाटांनीं प्रवास केल्यास पाठलागाचा संभव कमी असें त्यांस वाटत असल्यामुळें त्यांनीं अगदीं आडवाटांनीं आपला प्रवास चालविला होता. सध्यां काळोख असल्यामुळें त्यांना एका अर्थी फार बरें वाटत होतें, पण रस्ता अगदीं वाईट असल्यामुळें त्यांना वारंवार ठेंचा लागत होत्या. तथापि असल्या अडचणींस न जुमानतां ते तडक पुढें चालते झाले. आणखी कांहीं वेळानें ते एका स्वच्छ पाण्याच्या ओढ्यापाशीं आले, आणि त्यांनीं आपापली तहान त्या ओढ्याच्या उदकानें शांत करून घेतली.

पाणी पिऊन शांत झाल्यावर हलधर आपल्या सेवकाला म्हणाला,—'अशा रीतीनें आपण शत्रूंच्या हातून निसटलों, हा तरी मोठा चमत्कारच म्हटला पाहिजे. मघांशीं पुलावर जेव्हां त्या रक्तपाती चूडामणीची भेट झाली, त्यावेळीं तर मीं आपल्या जिवाची आशाच सोडिली होती !

सत्यरथ म्हणाला,–'त्या विलक्षण माणसाच्या तेव्हांच्या वर्तनाचें मला राहून राहून फार आश्चर्य वाटतें. त्यानें आम्हांला ओळखलें असून, कांहीं तरी दुष्ट हेतु साध्य करून घेण्यासाठीं तर त्यानें मुद्दाम आमच्याकडे दुर्लक्ष्य केलें नसेल ना!'

सरदार हलधर म्हणाला,–'छेः छेः असें मला अगदीं वाटत नाहीं. त्या दुष्टाला मी पूर्णपणें ओळखून आहें. औदार्याची किंवा परोपकाराची आणि त्याची पूर्ण फारखत झालेली आहे. खरा प्रकार काय आसवा, हें मीं बहुतेक ताडलें आहे. शेखराला तो पाण्यांत पाहतों, त्याचा द्वेष करतो, त्याच्याविषयीं आपल्या मनांत एकसारखा कुढत असतो, हें मीं केव्हांच ओळखलें आहे. अर्थात् त्यानें मला पाहतांच मीं शेखर असें त्याला वाटलें, आणि त्याची मत्सरबुद्धि जागृत झाली. आजच्या जयाचें सर्व श्रेय शेखराकडे आहे, ही गोष्ट निर्विवाद सिद्ध असल्यामुळें, आज तर तो आपल्या मनांत अगदीं जळत असेल; याच कारणामुळें मला पाहतांच त्यानें आपलें तोंड बाजूस केलें. पण आपण आतां येथें बोलत राहून उपयोग नाहीं, आपण अजून निर्भय झालों नाहीं. आजची सर्व रात्र आह्माला या डोंगराळ प्रदेशामध्यें भटकून घालविली पाहिजे. दुर्दैवानें जर रात्रींचे भटकत असतां दिशा भूल झाली, तर सर्व रात्रभर भटकलेले व्यर्थ जाऊन उद्यां उजाडल्यावर देखील शत्रूची भीति आहे ती आहेच, असा प्रसंग यावयाचा!'

सत्यरथ म्हणाला,–'माझ्या दुर्दैवानें माझ्या अंगावर जो हा बृहद्रथ राजाच्या सेवकाचा पोषाक आहे, तो आमच्या फार उपयोगी पडेल, असें मला वाटतें. ज्या अर्थीं बृहद्रथाचें राज्य इकडे कित्येक कोसपर्यंत एकसारखें पसरलेलें आहे, त्या अर्थीं आपण प्रथमतः ज्या खेडयापाडयांत जाऊं तें बहुधा बृहद्रथाचेंच असेल. मीं जर बृहद्रथाचा सेवक आहें असा बहाणा केला, तुमच्या आपणास सोबतीसाठीं थोडांशीं माणसें किंवा बसावयास एकाद दुसरें घोडें मिळणें फारसें कठीण पडणार नाहीं, असें मला वाटतें.

सरदार हलधर म्हणाला,–' होय; असें होण्याचा संभव खरा, परंतु आपले हेतु पूर्णपणें साध्य होण्यास माझ्या या पोषाकाचा कदाचित् अडचण येईल; मी कांहींतरी दुष्ट हेतूनें भीमरथ राजाचा पोषाक धारण केला आहे, असें कोणाच्या मनांत आल्यास आपणांस मोठा त्रास होण्याचा संभव आहे, यासाठीं प्रथम मला हा पोषाक सहज कोणास ओळखतां यावयाचा नाहीं, इतका त्यामध्यें फेरबदल केला पाहिजे, हे सर्व अलंकार प्रथम फेंकून दिले पाहिजेत; हा मंदिलाचा भरजरी पदर फाडून टाकला पाहिजे आणि अंगरख्याचे हे कलाबतूचे गोंडे कापून काढले पाहिजेत.'

असें बोलून सरदार हलधरानें आपल्या अंगावरील मूल्यवान् अलंकार काढून ते त्या ओढ्यामध्यें फेंकून दिले, बहुमूल्य वस्त्राचे पदर फाडून टाकिले व त्यांवरील कलाबतूचें कामही नखांनीं कुरतुडून टाकिले, या व्यवस्थेमुळें आतां त्याचा पोषाक मध्यम प्रतीच्या एकाद्या अर्कपुरकराप्रमाणें दिसूं लागला. नंतर त्यांनीं पुनः प्रवासास प्रारंभ केला. सुमारें चार घटका प्रवास केल्यावर त्यांना दूर अंतरावर एकाद्या तांऱ्याप्रमाणें चमकणारा दिव्याचा प्रकाश दिसूं लागला. त्या प्रकाशाच्या अनुरोधानें ते पुढें चालूं लागले; परंतु रस्ता फारच बिकट असल्यामुळें त्यांना झराझर जातां येईना. त्या प्रकाशाच्या अनुरोधानें जात असतां कित्येक ठिकाणीं त्यांना लहान लहान ओढ्यावर असलेल्या सरासरी हातभर रुंद रस्त्यावरून प्रवास करावा लागत होता, तर कित्येक जागीं कडयाच्या कांठावरून त्यांस आपला तोल संभाळून एकेक पाऊल पुढें टाकीत सावकाश जावें लागत होतें. त्यांच्या सुदैवानें त्या वेळीं आकाश

गोष्टीच्यानं; नाहीं तर त्यांना त्या भयंकर या,राळ वनप्रदेशांतून एक पाऊलसुद्धां पुढें टाकतां आलें नसतें. अशा प्रकारच्या त्या प्रदेशांमधून जात असतां एकादा डोंगर किंवा झाडी मध्यें आल्यामुळें समोरचा दिवा मध्येंच दिसत नाहींसा व्हावा, आणि तेवढें अंतर तुटल्यावर तो दिवा समोर न दिसतां डाव्या किंवा उजव्या बाजूला दिसूं लागावा; नंतर त्यांनीं पुनः आपला रोख बदलून त्या दिव्याकडे आपला मोर्चा फिरवावा, असें कितीदां तरी झालें. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे इतकेंच कीं सुंदरपुर सोडल्यापासून सुमारें दीड प्रहरानें ते दोघेजण एका झोंपडेवजा लहानशा घरापाशीं येऊन दाखल झाले.

प्रकरण १९ वें.

पडक्या घरांतील शिकारी कुत्रा.

सरदार हलधर आणि सत्यरथ हे दोघेजण सध्यां ज्या घरापाशीं येऊन दाखल झाले होते, त्या घराच्या स्वरूपाचें थोडेंसें वर्णन येथें देणें फार अवश्य आहे. ते दोघेजण जेव्हां या घरापाशीं येऊन पोंचले, त्यावेळीं नुकताच चंद्रोदय झाला होता. ते प्रथमतः त्या घराच्या मागच्या बाजूस येऊन पोंचले होते. त्या बाजूनें घराकडे नजर टाकतांच मागच्या भिंतीस तीन खिडक्या असलेल्या त्यांच्या दृष्टीस पडल्या. त्यावरून त्या घराला तीन खोल्या असाव्या, असें हलधरानें अनुमान केलें. या तीन खिडक्या ज्या भिंतीस होत्या, ती भिंत अगदीं पडावयास झाल्यासारखी दिसत होती. घराला वळसा घालून ते पुढच्या बाजूस येत असतां त्यांना त्या घराचा एक भाग पुष्कळ वर्षांपूर्वीचि पडला असावा, असें वाटलें. कारण त्या बाजूला कित्येक भिंती अर्धवट कोसळलेल्या दिसल्या. त्या भिंतीवर अललेलीं बहाळें पावसाच्या पाण्यानें कुजून गेलेलीं होतीं आणि भिंतींत असलेल्या दरवाज्यामध्यें मोठमोठे मातीचे ढीग पडलेले होते. यावरून तें घर पडल्यानंतर त्याचें लांकडी सामान काढून घेण्याची काळजी कोणी घेतली नव्हती, हें उघड दिसून येत होतें. या घराला पुढच्या बाजूस एकच दरवाजा होता. हें घर एका डोंगराच्या पायथ्याशीं असून त्या घराभोंवतीं सुमारें शंभर हातांपलीकडे दाट झाडी होती. ते दोघेजण सध्या जेथें उभे होते, तेथून त्यांची जितक्या भागांत नजर पुरत होती, तितक्या भागांत दुसरें एकादें घर किंवा मनुष्यवस्तीचें ठिकाण त्यांस आढळून आलें नाहीं. सारांश, हें घर अगदीं एकांतवास् असून जंगली प्रदेशामध्यें होतें.

ते त्या घराचे सूक्ष्म दृष्टीनें निरीक्षण करीत पुढच्या भागाकडे येत असतां दोन माणसें त्या घराच्या अंगण्यामध्यें त्यांच्या दृष्टीस पडलीं. हीं माणसें बाहेरून आलीं असून त्या घरामध्यें जाणार असावीं असें प्रथम त्यांस वाटलें; पण तीं माणसें घरांत न जातां बाहेरच निघून गेलीं. तथापि या गोष्टीकडे फारसें लक्ष न देतां सरदार हलधर घराच्या पुढच्या दरवाजापाशीं आला, आणि त्यानें त्या दरवाज्यावर जोरानें धक्की मारली. त्यानें थोडीं वेळ वाट पाहिली, पण कोणीं दार उघडलें नाहीं. म्हणून आणखी एकदोन वेळ त्यानें दारावर धक्की मारली, तेव्हां एक वृद्ध भिल्लीण घरांतून येऊन तिनें दरवाजा उघडला. ह्या भिल्ल स्त्रीच्या मस्त. काचे सर्व केश पिकून पांढरे झालेले दिसत होते, तरी तिची पाठ किंवा कंचर वांकलेली नव्हती. भिल्लीणीनें दरवाजा उघडला, त्याच वेळीं दरवाज्यापाशीं एकादा कुत्रा गुरगुरत असावा; असें हलधराला वाटलें, पण त्यांनीं आंत जाऊं नये, म्हणून हरकत सांगावयास तो कुत्रा पुढें आला नाहीं. ज्या म्हाताऱ्या भिल्लिणीनें दरवाजा उघडला तिनें त्या दोघांस गोड शब्दांनीं घरामध्यें

बोलाविलें आणि फारसा विचार न करतां ते दोघेजण आंत शिरले.

घरांत गेल्यावर तें घर बाहेरून जसें दिसत होतें, तसेंच तें आंतूनही आहे, असें त्यांस आढळून आलें. त्यांना तिव्र क्षुधा लागली होती, परंतु ती शांत करण्याचें साधन येथें उपलब्ध होईल असें चिन्ह त्यांना आढळेना. ते सध्या ज्या ठिकाणीं उभे होते, तेथील एका भिंतीच्या कोनाड्यांत एक मिणमिणीत पणती तेवत होती. एका कोपऱ्यांत एक चूल होती, व त्यां चुलींत थोड्या काटक्या पेटत होत्या. सारांश, या घरांतील आंतला देखावा पाहून सरदार हलधर आणि त्याचा सेवक ह्यांची पूर्णपणें निराशा झाली.

सकाळ पासून सुंदरपुरच्या किल्ल्यांत शह लागलेला असल्याभुळें सरदार हलधर आणि सत्यरथ यांच्या पोटांत एक घांसभर देखील अन्न गेलेलें नव्हतें, म्हणून हलधरानें त्या म्हातारीस 'आम्हांस कांहीं खावयास मिळेल काय ! ' असा प्रश्न विचारला.

म्हातारी म्हणाली,–'आमच्या गरीबाच्या घरांत आपल्या सारख्या श्रीमंताला देण्या-सारखे खाण्याचे पदार्थ कोठून असणार ! तरी पण थोडेंसें हरणाचें भाजलेलें मांस आणि वाडगाभर दूध घरांत आहे, तें मी आपणांस देतें. अहो पाहुणे, [redacted] सांगा, तुम्हीं आपल्या पोषाख[redacted] पूरचे रहिवाशी दिसतां पण तुम[redacted] चमत्कारिकच वाटते, यांचें कारण [redacted]

हलधर म्हणाला,–' तें ऐकून तुला काय करावयाचें आहे ! आम्हाला आजची रात्र येथें घालविणें भाग आहे. तूं जर आमची व्यवस्था केलीस, तर आम्ही कांहीं तुझा हात ओला केल्या खेरीज येथून जाणार नाहीं. '

सत्यरथ म्हणाला, ' माझी अशी खात्री आहे कीं, हें घर बृहद्रथ महाराजांच्या राज्यां-तच असलें पाहिजे. '

म्हातारी म्हणाली,–' होय, आम्ही त्यां-च्याच राज्यांत राहत आहों, आणि तुमच्या पोषाखावरून तुम्ही ही त्यांच्याच सेवकापैकीं असाल; असा माझा तर्क आहे. '

सत्यरथ म्हणाला,–' तुझा तर्क अगदीं बरोबर आहे. बरें मी विचारतों, तूं या भयाण प्रदेशामध्यें एकटीच राहत असशील असें संभवत नाहीं. '

म्हातारी म्हणाली,–' माझ्या सारख्या थेर डीनें येथें एकटें राहाणें शक्यतरी आहे काय ! मी येथें एकटी नाहीं. माझा एक मुलगा येथें मजपाशीं राहत असतो. आमचीं शेंपन्नास शेरडें आहेत, त्यांना येथें चराव-यास पुष्कळ रान आहे. शिवाय माझा मुलगा थोडीशी शिकार आणतो, तेवढ्यावर आम्ही आपला गुजारा करतों. माझ्यापाशीं जे खावयाचे पदार्थ आहेत, ते मी आपल्याला देतें; ते आपण गोड मानून घ्यावे. '

सत्यरथानें विचारलें,–' नुकताच या घराच्या अंगण्यांतून बाहेर निघून गेला, तोच तुझा मुलगा असेल ? '

हा त्याचा प्रश्न ऐकून ती थेरडी जरा घुटमळल्यासारखी झाली. पण नितक्यांतल्या नितक्यांत ती म्हणाली,–'छेछेः माझा मुलगा केव्हांचा बाहेर गेला आहे, तो केव्हां परत [redacted] पहाट [redacted] भाग, [redacted] [redacted] [redacted]

सत्यरथ हास्य मुख करून म्हणाला,–तुझा तर्क अगदींच खोटा नव्हे. मी नेहमी सुंदरपुरास रहात नसतों. मी बृहद्रथ महाराजांचा जिवलग मित्र आहें, म्हणून त्यांनीं मला हा पोषाक वर्षासन दिला आहे. आज सुंदरपुर येथें मोठी लढाई झाली आणि प्रतापुरकरांनीं सुंदरपुर काबीज केलें. म्हणून मी बृहद्रथ महाराजांच्या आज्ञेनें या आपल्या सोबत्यासह एका महत्वाच्या कामाला जात आहें. रात्र काळोखी असल्यामुळें आणि मी या प्रदेशाचा पुरा माहीतगार नसल्यामुळें वाट चुकून इकडे आलों. काम मोठें महत्वाचें असल्याकारणानें मला फार जलदीनें आपला प्रवास केला पाहिजे आहे. एखादा घोडा मला मिळता तरी पाहिजे होता. पण त्याचें तर येथें नांवसुद्धां काढावयास नको! म्हणून म्हणतों, तुझा मुलगा जर आम्हांस रस्ता दाखवावयास आमच्या बरोबर येईल तर त्यांत त्याचा तोटा होणार नाहीं.'

म्हातारीनें विचारलें, 'पण तुम्हाला जावयाचें कोठें हें मला मुळींच समजलें नाहीं.'

सत्यरथ म्हणाला,–' आम्हांला जेथें एकदोन घोडे मिळतील, तेथपर्यंत सोबत असली म्हणजे पुरे.'

म्हातारी म्हणाली,–' तुम्हाला घोडेच हवे असतील तर निदान येथून तीन कोस तरी दूर जावें लागेल. तुम्ही जर थोडा वेळ

[redacted]

तुम्ही तेथें बसावें. तुम्हाला कांहीं फार वेळ वाट पाहात बसावें लागणार नाहीं. तो म्हटला म्हणजे इतक्यांतच यावा. रोज कांहीं त्याला इतकी रात्र होत नाहीं. आजच इतका उशीर कां झाला म्हणून मी काळजींत पडलें आहें.'

असें बोलत त्या थेरडीनें कोनाड्यांतील दिवा हातीं घेतला, आणि तिनें तेथें असलेलें शेजारच्या खोलीचें दार उघडलें, म्हातारीनें तारीफ केल्याप्रमाणें ती खोली पूर्वीच्या खोलीपेक्षां थोडी चांगली आहे असें त्या दोघां प्रवाश्यांस आढळून आलें.

त्या खोलींत गेल्यावर ती म्हातारी त्यांस म्हणाली,–' इकडचा रस्ता बराच अवघड असल्यामुळें पुष्कळ लोक वाट चुकून इकडे येतात, त्यांची आम्ही गरीब आपल्या शक्तीप्रमाणें थोडी बहुत सेवा करितों. जातांना ते प्रवासी बहुधा थोडें तरी द्रव्य आम्हाला दिल्याखेरीज येथून जात नाहींत; त्या द्रव्यानें आम्हींही थोडीशीं जाडीं भरडीं वस्त्रें विकत घेतों आणि कसाबसा निर्वाह करितों. जर माझा वराह लवकरच परत येता, तर तुम्हांला थोडें ताजें मांस देतां आलें असतें.'

असें बोलून त्या म्हातारीनें पूर्वी सांगितल्याप्रकारचें खाद्य व पेय त्यांच्यापुढें आणून ठेविलें. त्या दोघांनाही सडकून भूक लागलेली होती, तरी त्या पदार्थांपैकीं चारचार घांस सुद्धां त्यांच्याच्यानें खाववले नाहींत. त्यांचें हें भोजन सुरू होतांच तीं म्हातारी त्या खोलीतून बाहेर पडली, आणि तिनें त्या खोलीचा दरवाजा बाहेर जातांना लावून घेतला. थोडयाच वेळानें घराबाहेरे जाऊन ती आपल्या मुलास कर्कश स्वरानें हांका मारीत असल्याचा आवाज ऐकूं आला.

[redacted] कानीं पडला त्याच वेळीं [redacted] हलधर यांनीं परस्परांकडे [redacted] न त्या उभयतांस आपल्या [redacted] च प्रकारचा संशय आला आहे आढळून आलें. त्या म्हातारीच्या आपल्या बरोबरच्या वागणुकींत कांहींतरी कपट आहे, असें त्यांना दोघांनाही एकदम वाटूं लागलें. त्यांतल्या त्यांत ' थोडया वेळापूर्वी बाहेर गेलेला तो तुझाच मुलगा कीं काय, ' असें त्या म्हातारीस विचारलें असतां तिनें प्रथम घोंटाळून नंतर जें उत्तर दिलें, तें त्या दोघांना मोठें चमत्कारिक वाटलें. शिवाय त्यांनीं घरांत येतांना एका ऐवजीं

दोन माणसें तेथून जातांना प्रथम पाहिलीं होतीं, या दुसऱ्या माणसाचा तिच्या भाषणांत अगदींच उल्लेख नव्हता, हें पाहून तर त्यांस तिच्या कपटाबद्दल अगदींच शंका उरलेली नव्हती. आतां आपण ज्या खोलींत बसलों आहों, त्याच खोलींत तिनें आपणांस कां आणिलें ! वाटसरांना जेवणखाण देऊन त्यावर निर्वाह करीत असतों, असें जें तिनें सांगितलें, तें अगदीं खोटें असावें असें त्यांच्या मनांत येऊं लागलें. कारण तेथें जर खराच तसा कांहीं प्रकार असता, तर त्या ह्यातारीच्या घरांत वाटसरांस तृप्त करण्यासारखें बऱ्या प्रकारचें अन्न तयार असतें तिनें असलें नासकें कुचकें मांस आपल्यापुढें ठेविलें नसतें, असें साहजिकच त्यांच्या मनांत आलें.

जर कोणी आपलें भाषण ऐकत असलें तर त्यास कांहीं समजूं नये, अशा उद्देशानें सरदार हलधर आपल्या जन्मभाषेंत सत्यरथाला म्हणाला,–'आपण प्रथमतः ही सर्व जागा नीट तपासून पाहिली पाहिजे.'

[redacted] ऐकतांच [redacted] होते [redacted] ल्यामुळें तें त्या [redacted] लेल्या तिसऱ्या खोलींत गेले. या खोलींत तीन खाटलीं टाकलेलीं होतीं, त्यावरून ही निजावयाची खोली आहे, तें चटकन त्यांच्या ध्यानीं आलें. त्या खोलीमध्यें त्यांनीं एकदां सहज दृष्टि फिरविली, परंतु त्यांस प्रथम दर्शनीं तेथें संशयास्पद असें कांहींच आढळून आलें नाहीं; ह्मणून ते तेथून बाहेर येण्याच्या विचारांत होते. इतक्यांत सत्यरथाची दृष्टि तेथील एका खाटल्याकडे गेली; ह्मणून तो आपल्या जन्मभाषेमध्येंच त्याला म्हणाला,–'महाराज, या खाटल्याची रचना जरा चमत्कारिक अशी वाटत नाहीं काय !'

सत्यरथाच्या या सूचनेवरून हलधरानें त्या खाटल्याकडे पुनः दृष्टि फेंकली, त्यावेळीं तें खाटलें मोठें चमत्कारिक आहे असें त्याला वाटलें. त्या खाटल्यावर सध्या एक घोंगडें व एक उशी जर ठेविलेली नसती, तर तें निजावयाचें खाटलें नसून ती एक मोठी लांबरुंद पेटी आहे, असेंच कोणालाही वाटलें असतें. त्या खाटल्याच्या चारी बाजूंस फळ्या मारलेल्या असल्यामुळें त्याच्या खालीं काय आहे हें बाहेरून दिसण्यासारखें नव्हतें.

'या खाटल्यांत कांहींतरी कपट आहे खास!' असे अगदीं मनापासून उद्गार काढून हलधर त्या खाटल्यापाशीं गेला; आणि त्यानें त्याची कसून तपासणी चालविली.

हलधरानें त्या खाटल्यावरची घोंगडी अर्धी परतली, तेव्हां त्या घोंगडीखालीं एक चामडें घातलेली आहे, असें त्यास आढळून आलें. त्यानें आपल्या पायांची ठोकर मारून खाटल्याच्या बाजूच्या फळ्यांस आपल्या पाहिल्या, त्यावेळीं त्या [redacted] चा असें त्यांनीं पोकळ असा आवाज [redacted] सत्यरथ हलधर त्या खाटल्या [redacted] आपण आतां असें [redacted] पणांस भिण्याचें [redacted]

[redacted] धया अर्थपूर्ण [redacted] होता धरून. तें [redacted] झाला [redacted] प्रयत्न केला, पण तें त्याला उचलले नाहीं. त्या खाटल्याचे खूर कशावर टेंकलेले आहेत; हें त्यानें पाहण्याचा प्रयत्न केला; पण त्याही प्रयत्नांत त्याला यश आलें नाहीं. यामुळें तर त्याचा पूर्वीचा संशय दुणावला. आणखी जरा बारकाईनें पाहाणी केल्यावर एकाद्या पेटीच्या झांकणाप्रमाणें त्या खाटल्याच्या बाजवा खालच्या उभ्या फळ्यांवर टेंकून ठेवलेल्या आहेत असें त्याला आढळून आलें. आतां तर या बाजल्यांत कपट आहे; याबद्दल त्याच्या मनांत अगदीं शंका उरली नाहीं. फक्त

या बाजल्यावर निजणारा खालीं कसा पडतो, एवढेंच काय तें त्याला समजून घ्यावयाचें होतें. खाटल्याच्या पायगताकडे जाऊन तपासणी केल्यावर तिकडील फळ्या थोडयाशा ढकलल्याबरोबर खाटलें खालीं पडूं लागलें; पण तसें होईल हें हलधराच्या पूर्वीच ध्यानीं आलेलें असल्यामुळें त्यानें तें सावधपणानें आपल्या हातानें धरून ठेविलें होतें. खाटलें कसें पडतें हें ध्यानीं घेतल्यावर त्यानें तें त्या फळ्यांवर पूर्ववत् ठेवून दिलें. सरदार हलधर जात्या धारिष्टवान् होता, तरी देखील ती खाटल्याची भयंकर रचना पाहून त्याच्या अंगावर कांटा उभा राहिला.

'आपण सध्या गळेकापू लोकांच्या तंडाक्यांत सांपडलों आहों,' असें आपल्या जन्मभाषेमध्यें बोलून हलधरानें खाटल्याखालचा खळगा किती खोल आहे हें पाहण्यासाठीं सत्यरथाला दिवा पुढें धरायला सांगितलें.

म्हाताऱ्या घामानें भिजून चिंब झालें असतां याचें कोठें हें भय, हातीं थरथर कांपत असतां सत्यरथ म्हणे, "भयंकर- दोन घोडे मिळतील म्हणजे पुरे."

म्हातारी म्हणे, "असें बोलला. असतील तर आपण ... जावें आहे. आतां धोक्याचें आहे. ती म्हातारी बहु आपल्या टोळीस सावध करावयास गेली असावी. आम्ही येथें राहिलों, आणि या भयंकर खाटल्यावर निजण्याचें नाकारलें, तर ते लोक घाला घातल्याखेरीज राहणार नाहींत. यासाठीं आपण येथून पसार झालें पाहिजे.'

असें बोलत सरदार हलधरानें आपल्या कमरेस असलेली शेखराला नागवून घेतलेली तरवार म्यानांतून बाहेर काढली, आणि आपल्या कमरेस असलेला कटयार सत्यरथाच्या हातीं दिली. नंतर ते दुसऱ्या खोलीच्या दरवाज्यापाशीं येऊन तो उघडूं लागले, पण तो उघडेना. अर्थात् त्या दरवाज्याला त्या थेरडीनें बाहेरून कडी लावून घेतली आहे, असें ध्यानीं येऊन म्हातारीच्या कपटासंबंधानें आतां त्यांच्या मनांत कोणत्याही प्रकारची शंका उरली नाहीं. त्यांनीं घाईघाईनें पुढें काय करावयाचें याचा थोडक्यांत विचार केला. दरवाजा फोडून आपण बाहेर जावें, असें प्रथम त्यांच्या मनांत आलें, पण दरवाजा भक्कम असल्यामुळें तो बेत रहित करणें त्यास भाग पडलें. नंतर त्या खोलीस असलेल्या खिडकींतून उडी घालून बाहेर पडावें असें त्यांनीं योजिलें. परंतु जर कोणी त्या खिडकीच्या बाहेर राखण करीत उभा असला तर आपण त्यांच्या हातीं लागणार, असें मनांत येऊन त्यांनीं तो बेत रहित केला.

आपल्या जन्मभाषेमध्येंच सरदार हलधर बोलला,–'मला वाटतें, जे दोन माणूस अंगणांतून बाहेर जातांना आमच्या दृष्टीस पडले, ते कदाचित् बाहेर उभे असून ते आमच्यावर पहारा करीत असतील, व ती म्हातारी टोळीस इतर लोकांस बोलावण्यास गेली असावी. [illegible] काय करावें याचा सरदार हलधरानें तात्काल विचार ठरविला. जर बाहेरून कोणी खिडकीवर पहारा करीत असतील, तर त्यांना घराच्या पुढच्या बाजूकडे काय चाललें आहे, हें कळावयाचें नाहीं; अर्थात् आपण त्या दिशेनें बाहेर पडण्याचा प्रयत्न केल्यास त्यांत यश आधिक येण्याचा संभव, असें आपल्या मनाशीं ठरवून त्यानें आपल्या तरवारीनें पुढच्या बाजूच्या भिंतींच्या कोपऱ्यांत जमिनीबरोबर भोंक पाडण्याचा उद्योग चालविला, भिंत दगडमातीचीच असल्यामुळें भोंक पाडण्यास फारसा विलंब लागला नाहीं, किंवा त्याला विशेष श्रमही पडले नाहींत. नंतर

त्यानें जमिनीवर हातपाय टेंकून त्या भोंकांत डोकें घातलें आणि त्या भोंकांतून बाहेर डोकावून पाहिलें. बाहेर चोहींकडे सामसूम होतें म्हणून तो झटकन त्या भोंकांतून बाहेर आला, आणि त्याच्या मागोमाग सत्यरथही भोंकांवाटे बाहेर पडला. बाहेर पडल्यावर त्यांनीं त्यांस जिकडे सोईचा मार्ग वाटला तिकडे धूम ठोकिला. थोडया अंतरावर गेल्यावर हलधरानें मागें डोकावून पाहिलें, तेव्हां त्याला एक बाई आणि दोन पुरुष त्या घराकडे जात आहेत असें दिसलें.

थेरडी प्रथम घरांत गेली, [illegible] लागलीच 'अरेरे घात झाला, [illegible] असें किंचाळून [illegible] कुत्रा [illegible] लचकर !' हा साडलाच पहा.' असें [illegible] वराह आंत गेला.

आपल्या अंगावर कुत्रा चालून येणार [illegible] ऐकून तर सरदार हलधराची घाबरगुंडी उडाली. आपण त्या घरांत शिरलों, त्याच वेळीं आपल्याला कुत्र्याचें गुरगुरणें ऐकूं आलें होतें, या गोष्टींचें त्यांस स्मरण झालें, आणि भीतीनें त्यांच्या अंगावर रोमांच उभे राहिले. आपल्या अंगावर चाल करून येणार तो शिकारी कुत्राच असला पाहिजे, असें एकदम त्यांच्या ध्यानीं आलें, आणि त्यांनीं जिवाकडे न पाहतां धूम ठोकली. सरदार हरघर कमी शूर होता असें नाहीं; परंतु शिकारी कुत्र्यासारख्या चलाख प्राण्यापुढें आपलें कौशल्य किती उपयोगी पडेल, याबद्दल त्याच्या मनांत संशय उत्पन्न झाला होता. भीतीनें त्यांच्या पायांस पंख फुटले होते, असें म्हणावयास हरकत नाहीं! ते पळत असतांना जेव्हां कुत्र्याचें भुंकणें त्यांच्या कानावर पडलें, तेव्हांतर जणूं काय वायुवेगानें ते पळत होते.

या वेळीं त्यांचे नेहमीचे चढाऊ जोडे त्यांच्या पायांत नव्हते, म्हणून बरें झालें. नाहींतर त्यांना जोड्यांमुळें पळतां आलें नसतें, व ते जोडे काढण्यांत गुंतते, तर तितक्या वेळांत कुत्र्यानें त्यांचा सहज पाठलाग केला असता. ते अनवाणी पळत होते म्हणून काय झालें! शिकारी कुत्र्यापुढें माणसाचे पाय किती टिकणार ? क्षणोक्षणीं. कुत्रा त्यांच्या [illegible] लेलें मधील अंतर तोडीत जवळ जवळ [illegible] हीं. चालला. आतां फक्त पळण्याकडे [illegible] ां-त्यांचें लक्ष होतें. दुसरा कोणताही [illegible] मीं [illegible] त्या त्यांच्या [illegible] पडला. [illegible] खोल [illegible] सुटला रक्त [illegible] जसजसा [illegible] लागला, तसतसा त्यांच्या [illegible] ण [illegible] ऐवजीं कमी होऊं लागला. [illegible] नें लगट केल्यास आपल्या [illegible] ाग करावयाचा असें त्यांनीं [illegible] तितक्यांतच सत्यरथ हलधरा [illegible] महाराज आपण आतां [illegible] आपणांस भिण्याचें [illegible]

[illegible] यानें एकाएकीं काढलेल्या अर्थपूर्ण उद्गारांचा हलधरास चांगलासा बोध झाला नाहीं. तथापि तितक्यांतच थोड्या अंतरावर एक वाहत्या पाण्याचा लहानसा ओढा त्याच्या दृष्टीस पडला, त्यावरून सत्यरथानें कोणत्या उद्देशानें वरील भाषण केलें त्याची थोडीशी कल्पना त्याच्या मनांत आली.

ओढ्याच्या कांठीं येतांच सत्यरथ घाईघाईनें बोलला,–'महाराज, आपण आतां विलंब न करतां ओढ्याच्या पार व्हा कसे.'

क्षणाचाही विलंब न करतां हलधरानें एकदम ओढ्यांत उडी घातली, आणि मोठ्या घाईनें पलीकडे चालला. अशा-कडे

चांगलें छातीभर पाणी होतें. हलधर ओढा उतरून पलीकडे झाला, आणि सत्यरथ आला कीं नाहीं, हें तो पाहूं लागला. पण तो ओढ्याच्या पलीकडेच अमून जमिनीवर पडून कांहीं करीत आहे, असें त्या सरदारास आढळून आलें.

हलधर त्याला ऐकूं येईल इतक्या नें बोलला,–'अरे सत्यरथा, अजून डे काय करीत आहेस! तूं अजून उतरून नाहींस, तूं वेडा तर नाहींस?'

पहा; मी आलोंच!' असें म्हणून

त्वरे

टा

मात्र नाहीं.

केलीच पाहिजे!

बोलून तो दोघेहीं पुनः मोठ्या पळत चालले. थोड्या अंतरावर त्यांनीं मागें परतून पाहिलें, त्या पाठलाग करीत असलेला कु क्षित जागेवर थांबला अमू नाहीं, असें त्यांस आढळून

याच वेळीं सरदार हलधराचें ज्या हाताकडे लक्ष गेलें. सत्यरथाने उजव्या हाताची अस्तनी मागें सारलेली असून, त्यानें तो हात आपल्या डाव्या हातानें धरिला आहे, असें त्यास आढळून आलें. म्हणून तो त्यास म्हणाला,–'सत्यरथा, कायरे झालें! तुझ्या हातांतून रक्त गळत आहे! तूं वाटेन पडलाबिडलास कीं काय?'

सत्यरथ म्हणाला,–'त्यांत फारसें सांगण्यासारखें नाहीं; आपण अजून त्वरा केली पाहिजे. जरी आतां आपणांस कुत्र्याची उरलेली नाहीं, तरी ते चोर आपला करतील असा पूर्ण संभव आहे.'

कुत्रा आपला पाठलाग करणार नाहीं, असें जें सत्यरथानें म्हटलें होतें, तें खरें होतें. ओढ्याच्या कांठीं जेथें सत्यरथ पूर्वी थांबला होता, त्याच जाग्यावर कुत्रा थांबला असून तो तेथून एक पाऊल सुद्धां पुढें जात नव्हता. त्याचे धनी त्यानें पुढें जावें, म्हणून त्यास मारूं देखील लागले, पण तो कुत्रा कांहीं जागा सोडीना. त्याला मार बसला म्हणजे तो गुरगुरे, ओरडे, जमिनीवर उताणा पडे, पण जाग्यावरून हालेना. [illegible] साह्यानें पाठलाग करणें अशक्य [illegible] दोघां लुटारूंनीं आपल्या [illegible] करण्याचें ठर-

[illegible] पाहतां त [illegible] एका जागीं पांच-चार वाटा [illegible] ल्या त्यांस दिसल्या, तेथें येऊन [illegible] थांबले, आणि त्यांपैकीं जी अगदीं लहान वाट त्यांच्या दृष्टीस पडली, त्या वाटेनें ते पुढें गेले. वराह आणि त्याचा सोबती यांनीं त्यांचा त्याच जागेपर्यंत पाठलाग केला. कारण तेथें फुटलेल्या पांच-चार वाटांपैकीं आपली शिकार कोणत्या वाटेनें गेली असावी याचा त्यांस निश्चय करतां येईना, म्हणून ते मागें फिरले.

सरदार हलधर आणि सत्यरथ हे आणखी बराच वेळ एकसारखे रस्ता तोडीतच होते. शेवटीं सत्यरथ अगदीं दमून गेला, आणि तो एका दगडावर बसला. तेथें सरदार हलधरानें आपल्या सेवकाची जखम तपासून पाहिली. जखम कांहीं भयंकर नव्हती, पण तिजमधून रक्त पुष्कळ सांडत असल्यामुळें सत्यरथाला थकवा आला होता. रक्ताच्या श्रम झाल्यामुळें रक्त जोरानें वाहात आहे, ही गोष्ट सरदाराच्या ध्यानीं आली, आणि त्यानें आपल्या सेवकास तेथेंच विश्रांति घेत चमूं

देऊन तो पाण्याच्या शोधासाठीं गेला. दिवस पावसाळ्याचे असल्यामुळें पाण्याला फार दूर जावें लागलें नाहीं. पाणी जवळच मिळालें, पण तें आणावयास त्याजपाशीं भांडें नव्हतें; म्हणून तो सत्यरथापाशीं परत आला, आणि त्याला हळु हळु पाण्यापर्यंत नेऊन तेथें त्यानें त्याची जखम धुतली, आणि ती आपल्या अंगावरील एका वस्त्राची पट्टी फाडून तिनें बांधून टाकिली. सरदार हलधराला लढायांचे प्रसंग पुष्कळ माहीत असल्यामुळें त्यानें ती जखम एकाद्या कुशल शस्त्रवैद्याप्रमाणें बांधली होती.

जखम बांधून झाल्यावर सरदार हलधरानें विचारलें,—'सत्यरथा, ही तुझी जखम कांहीं सहजगत्या दुखावलेली दिसत नाहीं. तूं मुद्दाम ह्या जखमेंतून रक्त काढलेंस, अशी माझी समजूत आहे. तूं हें कृत्य कां केलेंस हें मला सांगशील काय? तूं हें कां केलें असावेंस यासंबंधानें थोडासा तर्क माझ्या मनांत आला आहे; तो खरा आहे कीं काय, हें मला तुझ्या मुखानें ऐकून घ्यावयाचें आहे.'

आपल्या धन्यानें अशा प्रकारें ममतेनें प्रश्न विचारला असतां आपण मोकळ्या मनानें उत्तर न दिल्यास त्यांत आपल्या धन्याचा अपमान आहे, असा विचार करून सत्यरथ म्हणाला,—'महाराज, ही जखम सहजगत्या दुखावलेली नाहीं, ही गोष्ट मी प्रांजलपणें कबूल करतों. मघांशीं कुत्रा मागें लागलेला असतांना जेव्हां आम्ही त्या ओढ्यापाशीं आलों, तेव्हांच आपण बचावलों असें मला वाटलें, आणि मी तसें बोलूनही दाखविलें. परंतु वास्तविक पाहिलें तर आम्ही ओढा उतरून पार झालों म्हणजे निभावलों असा प्रकार नव्हता. आमच्या प्रांतांतील शिकारी कुत्र्यांच्या स्वभावांचें मला पूर्ण ज्ञान असल्यामुळें पुढें काय होईल हें चटकन् माझ्या मनांत आलें, आणि मी त्यासंबंधानें जो काय बंदोबस्त करावयाचा होता, तो करून टाकिला. हे शिकारी कुत्रे रक्ताचे मोठे लोभी असतात. ते ज्या प्राण्याचा पाठलाग करितात, त्या प्राण्याचें रक्त त्यांस मिळालें कीं ते तृप्त होतात. त्या प्राण्याचें रक्त त्यांस सांपडलें, म्हणजे मग पुनः त्या प्राण्याचा माग काढावयाचा असल्यास तो ते त्या रक्ताच्या वासावरून काढीत असतात. पण तें रक्त जर जमिनीवर दुसरीकडे कोठें सांडलेलें नसलें, तर त्यांस माग काढतां येत नाहीं. यासाठीं ओढा दृष्टीस पडतांच दोन दिवसांपूर्वी माझ्या हातास झालेली जखम मीं सोडिली, आणि ती आणखी थोडी खोल करून ओढ्याचे काठीं त्यांतील पुष्कळ रक्त गळूं दिलें; नंतर मी ओढ्यांत शिरलों. हा बंदोबस्त न करितां जर मी ओढा उतरून पलीकडे आलों असतों, तर त्या दोघां हरामखोरांनीं कुत्र्याला पाण्यांतून उचलून पलीकडे आणिलें असतें, आणि त्या कुत्र्यानें पुनः वासावरून आपला माग काढिला असता. यासाठीं मला आपल्या रक्तानें त्याला तृप्त करणें भाग होतें. ओढ्यापलीकडे आल्यावर मीं आपल्या रक्ताचा एकही थेंब जमिनीवर पडूं दिला नाहीं. जर कदाचित् त्या हरामखोरांनीं कुत्र्याला बळजबरीनें ओढ्यांतून पलीकडे आणलें असतें, आणि तेथें त्याला रक्ताचा वास आला असता, तर मात्र आम्ही त्या कुत्र्यांच्या तोंडांतून सुटलों नसतों.'

हें सत्यरथाचें भाषण ऐकून सरदार हलधर म्हणाला,—'सत्यरथा, याप्रसंगीं तुझ्या धैर्याची तारीफ करावी कीं प्रसंगावधानाची तारीफ करावी हेंच मला समजत नाहीं. कसेंही असो, तूं होतास म्हणून आज माझे प्राण वांचले, हे तुझे मजवर मोठे उपकार आहेत.'

सत्यरथ म्हणाला,—'ही वेळ मोठी आणीबाणीची असल्यामुळें मीं माझ्या क्षुद्र जिवाची पर्वा केली नाहीं. ही सगळी खटपट सरकारांचा प्राण वांचविण्याकरितां होती. महाराज, आपण या बागलाणामध्यें आल्यापासून आपल्यावर एकसारखीं प्राणसंकटें

गुदरत आहेत. अशा स्थितींत आपण आतां या प्रांतीं न राहतां स्वदेशीं निघून जावें, हें बरें. महाराज, अशा रीतीनें मी आपणांस विनंति करणें हें जरी योग्य होणार नाहीं, तरी आपल्यासारख्या महाथोर पुरुषाचे प्राण असे क्षणोक्षणीं संकटांत पडावे, हें मात्र माझ्यानें पाहवत नाहीं. मी माझ्या प्राणाची काळजी वाटल्यावरून बोललों असें नाहीं. ज्या दिवशीं मी आपल्या सेवेस हा देह अर्पण केला, त्याच दिवशीं तो आपला झाला. तो आपल्या सेवेंत खर्ची घालणें हें माझें कर्तव्यच आहे, असें मी समजत आहें.'

सरदार हलधर म्हणाला,—'सत्यरथा, तूं मला स्वदेशीं जाववायाची मसलत देत आहेस ती पूर्णपणें पसंत आहे. मीही आतां तोच बेत योजिलेला आहे. तो तुझा देवदत्त ज्या दिवशीं आपणास शिवालयामध्यें भेटला त्या दिवशीं जर त्यानें बृहद्रथाचें त्या थेरड्या दृढसंधाशीं युद्ध होण्याचा संभव आहे असें मला सांगितलें असतें, तर मी त्याजबरोबर सुंदरपुरास जाण्याच्या फंदांत पडलों नसतों. त्या बृहद्रथानेंही सुंदरपुरावर हल्ला येईपर्यंत मला ती गोष्ट कळविली नाहीं. एकदां शत्रूनें किल्ल्यावर हल्ला केल्यानंतर तेथून निसटून जाणें अशक्यच होतें. शिवाय फक्त चार प्रहरांतच सुंदरपुर शत्रूंच्या हातीं लागेल, अशी कोणाच्याही मनांत कल्पना आलेली नव्हती. अर्थात् सुंदरपुरास गेल्यावर जीं आपल्यावर संकटें आलीं, तीं कांहीं माझ्या आग्रहीपणामुळें आलेलीं नाहींत हें तूं कबूल करशीलच.' असें बोलून हलधरानें आपल्या नेहमींच्या सगवापेक्षां बरेंच लांब झालेलें आपलें भाषण समाप्त केलें.

सत्यरथ जरा अधिक सलगी दाखवीत म्हणाला,—'महाराज, आपल्या आयुष्यक्रमामध्यें आपणांस अनेक प्रकारचे अनुभव आले असतील, पण या बागलाणामध्यें पाऊल ठेवल्यापासून जे अनुभव आपणांस आले आहेत, ते आपल्या चरित्रांत विशेष महत्त्वाचे आहेत, असें आपणासही वाटत असेल.'

किंचित् हास्यवदन करून हलधर बोलला,—'सत्यरथा, यासंबंधानें मला जें कांहीं बोलावयाचें आहे, तें हें बागलाण सोडल्यावरच मी बोलेन. सध्या पहांट झाली आहे. आतां लवकरच उजाडेल, यासाठीं आपण थोडी जलदी करून एकाद्या मोठ्या रस्त्यास लागलें पाहिजे. या थोड्याशा विश्रांतीनें तुला अंमळ बरें वाटतें ना?'

सत्यरथ हलधराच्या वैयक्तीय शाब्दाची तारीफ करण्यासाठीं म्हणाला,—'महाराज, आपण माझा हा हात मोठ्या कौशल्यानें बांधिला आहे; यांत शंका नाहीं. आपण हा हात बांधिल्यापासून मला अंमळ बरें वाटत आहे. जरी कालच्या इतकी शक्ति आज माझ्या अंगीं नसली, तरी आपल्या बरोबरीनें मला चालतां येईल असें मला वाटतें. चालतांना मी कांहीं आपल्या मागें पडणार नाहीं.'

हलधर म्हणाला,—'आणखी माझ्या अंगीं तरी आतां तितकें अवसान कोठें उरलें आहे! सुंदरपुरच्या किल्ल्यांतून बाहेर पडल्यापासून एकसारखी धांवपळ करावी लागल्यामुळें मीही अगदीं दमून गेलों आहें.'

असें बोलून ते धनी-नोकर आपल्या जागेवरून उठले आणि पुनः मार्गक्रमण करूं लागले. सत्यरथानें तोंडानें वल्गना केली होती, पण त्याच्या अंगांत खरोखरच सामर्थ्य नव्हतें. तो कसाचसा आपल्या धन्यामागून चालला होता. आतां त्यांच्या मागें धरणें नसल्यामुळें ते सावकाश चालले होते, तरी देखील सत्यरथाचें पाऊल उचलेना, ही गोष्ट हलधराच्या ध्यानीं आली, आणि त्यानें आपला वेग आणखी थोडा कमी केला.

थोड्या वेळानें उजाडलें. त्यांनीं एकदां आपल्या भोवतीं नजर टाकून आपण सध्यां कोणत्या प्रदेशांत आहों, हें पाहून घेतलें. त्यावेळीं सध्यां आपण उजाड प्रदेशांत असून

जवळ पास एकादें खेडें किंवा शहर आपल्या दृष्टीस पडेल असें लक्षण त्यांस दिसेना. कदाचित् आपण रात्रीं वाट फुटेल तिकडे भ्रमण करीत असतां पुनः बृहद्रथाच्या शत्रूच्या मुलखांत तर आलों नसूंना, अशी शंका त्यांच्या मनांत आली, आणि त्यांचें काळीज धडधडूं लागलें. पण त्यांनीं सावकाशपणें दिशांचें अवलोकन केलें, त्यावरून आपण सध्यां सुरक्षित स्थळीं आहों, असें त्यांस वाटलें. आणखी थोडा प्रवास केल्यावर त्यांस एक झोंपडें दिसलें, म्हणून ज[illegible]

[illegible] नव्हे, तर सध्यां आपल्याशी मित्रत्वानें वागणाऱ्या भीमरथाच्या गज्यांत आपण आहों असें त्यांस समजलें, आणि त्यांस मोठा आनंद झाला. या आनंदांत आणखी भर पडण्यास त्यांना त्या ठिकाणीं खाद्य पेयही मिळालें. हलधर आणि सत्यरथ हे दोघेही कालच्या सबंध दिवसाचे उपवासी होते; म्हणून त्या शेतकऱ्याकडे जी ओली कोरडी भाकर त्यांस खावयास मिळाली, तीं त्यांस एकाद्या मोठ्या पक्वान्नाहूनही अधिक रुचकर लागली. थोडेसें अन्न पोटांत जातांच सत्यरथाला जरा दम आला, आणि त्याला बरें वाटलें. ही न्याहारी झाल्या नंतर त्यांनीं आणखी चौकशी केली, तीवरून, तेथून एक कोसावर एक खेडें आहे, तेथें गेल्यास एकाद दुसरें तट्टू भाडयानें मिळेल असें त्यांस समजलें, म्हणून त्यांनीं त्या खेड्यांत जाण्याचा विचार केला. नंतर त्या शेतकऱ्याच्या हातावर एक दोन मोहरा ठाकून ते त्या झोंपडयांतून बाहेर पडले.

ते आतां ज्या खेड्यांत जाणार होते, तें खेडें जरी त्या झोंपडीपासून एक कोसापेक्षां अधिक दूर नव्हतें, तरी ते रात्रभर चालत असल्यामुळें तेथपर्यंत जावयास त्यांना चांगल्या चार घटका लागल्या. शेतकऱ्याकडे न्याहारी वगैरे आटोपून ते जेव्हां बाहेर पडले, तेव्हां सुमारें चार घटकांहून अधिक दिवस आलेला होता, म्हणून सुमारें प्रहर-सवा प्रहर-दिवस उलटून गेल्यावर ते त्या खेडयांत जाऊन पोंचले. तेथें पोंचल्यावर त्यांनीं जी चौकशी केली, तिजवरून तेथील पाटलाकडे गेल्याखेरीज आपणांस घोडीं मिळणार नाहींत, असें त्यांस समजून चुकलें. प्रथमतः पाटलाच्[illegible] मन [illegible] नहीं, [illegible] तो आपल्या कुळांशीं गप्पा मार[illegible] होता, व पाटलीणबाई भाजी [illegible] ओटीवरच बसलेली होती. आपल्[illegible] पाहुणे आलेले तिच्या दृष्टीस पडले. [illegible] कडे तिनें एकवार नजर टाकिली, [illegible] आपलें काम सोडून उठून गेली नाहीं [illegible] नेंही आपल्या जाग्यावरून न उठत[illegible] काय काम आहे, असा प्रश्न केला.

सत्यरथानें उत्तर केलें,–'आम्ही प्रवासी असून, आम्हांस आज त्रिशूलपर्वताजवळच्या देवालयांत सायंकाळापूर्वी जाऊन पोंचावयाचें आहे; यासाठीं भाड्याचीं घोडीं मिळालीं तर आम्हांस पाहिजे आहेत.'

पाटलानें त्याच्याकडे न्याहाळून पहात म्हटलें,–'तुझा पोषाक सुंदरपुरच्या महाराजांच्या सेवकासारखा दिसतो, पण तुझी मुद्रा कांहीं मला तशी दिसत नाहीं.'

सत्यरथ उसनें हास्य करीत म्हणाला,–'माझी मुद्रा जरी तशी दिसत नसली, तरी मी सुंदरपुरच्या बृहद्रथ महाराजांचा सेवक आहें, ही गोष्ट कांहीं खोटी नव्हे.'

पाटील म्हणाला,–'तसेंच तुझ्या सोबत्याचा पोषाक अर्कपुरच्या एकाद्या सरदाराप्रमाणें दिसतो. अर्कपुरांत माझा सगळा

जन्म गेला, पण मीं कांहीं असल्या चेहऱ्याचा माणूस तेथें कधीं पाहिलेला नाहीं.'

सत्यरथ म्हणाला,–'हांहां तुमचा तर्क खरा आहे. हे गृहस्थ भीमरथ महाराजांचे मोठे दोस्त आहेत. हे नेहमीं भृगुपुरास राहत असतात. यांचें येणें जाणें इकडे फारसें नसल्यामुळें हे तुमच्या नजरेस पूर्वी कधीं पडले नसले, तर त्यांत नवल नाहीं.'

पाटील म्हणाला,–'तुम्हीं कोणी असा, मला [illegible] आहे! [illegible] म्हणाला, [illegible] तुम्हांला मुळींच शंका नको. [illegible] भागत असेल, तर आम्हीं घोडे [illegible] यावयास देखील तयार आहों.'

[illegible]न त्यानें आपल्या कमरबंदांतून [illegible] बाहेर काढून ती पाटलासमोर [illegible]वली.

[illegible]त्यरथाच्या हातांतील थैली पाहतांच पाटील जाग्यावरून उठला, आणि दोन पावलें पुढें होऊन त्यानें पाहुण्यांस आंत बोलाविलें. पाटील मोठा धूर्त मनुष्य होता; तो सध्यां आपणास आंत बोलावीत आहे, तो द्रव्यलोभानें बोलावीत आहे, असें जरी सत्यरथाला वाटलें होतें, तरी पाटलाच्या मनांत कांहीं निराळेच विचार घोळत होते. त्यानें तितक्यांत एकदां आपल्या बायकोकडे नजर टाकली, त्यावेळीं तीही आपणांकडे अर्थपूर्ण दृष्टीनें पाहत आहे, असें त्यास आढळून आलें. पाहुणे ओटीवर आले, हें पाहून बाईनें आपला पसारा सावकाशपणें आटोपिला आणि ती घरांत निघून गेली. पाहुण्यांना पाटलाच्या बोलण्यास मान देऊन ओटीवर येणें भाग झालें. ते ओटीवर येऊन बसले, तेव्हां पाटील त्यांस म्हणाला,–'तुम्ही दोघेही फार श्रमलेले दिसतां. यासाठीं दोन प्रहरची वेळ टळेपर्यंत येथें विश्रांति घ्या. दिवस पावसाळ्याचे आहेत; तरी आज ऊन मोठें कडक पडलें आहे. अशा उन्हांतून मी तुम्हांस येथून जाऊं देणार नाहीं. दोनप्रहरीं येथेंच भोजन करा, आणि नंतर जा.'

असें त्या पाटलानें निक्षून सांगितल्यावर त्यांचा नाइलाज झाला. त्यांच्या अंगांत जर ताकद असती, तर त्यांनीं घोडयांची पर्वा न करितां तेथून मार्ग सुधारला असता. पण सत्यरथ अगदींच थकलेला असल्यामुळें त्यांचा नाइलाज झाला. ते ओटीवर बसल्यावर [illegible] वेळ. गप्पा मारत पाटील [illegible] असावे असें तुम्हांस वाटतें?

पाटलानें उलट विचारलें,–'मीही तेंच विचारतों, हे गृहस्थ कोण असावे, असें तुला वाटतें?'

पाटलीण म्हणाली, 'त्यांच्याकडे नुसतें पाहिल्या बरोबर ते लफंगे आहेत, असें एकदम मीं ताडलें, त्यांचे ते विचित्र आणखी फाटके तुटके पोषाख, त्यांच्या घाबरट मुद्रा, त्यांची बोलण्यांतील आढ्यता वगैरे गोष्टी पाहून तर माझा संशय दुणावला आणि मी त्यांच्याकडे लक्ष्यपूर्वक पाहूं लागलें. ते जर आपण मोठ्या राजाचे सेवक आणि स्नेही म्हणवितात, तर त्यांच्या पायांत कांहींच असूं नये! तसेंच त्या दोघांपैकीं एकजण कांहींच बोलत नाहीं. अर्थात् आपलें एकमेकांचें बोलणें जुळतें असावें, अशी त्यांची युक्ति दिसते. या सर्व गोष्टींत मुद्द्याची एक गोष्ट माझ्या ध्यानांत आली आहे. त्या हुम्या माणसाच्या अंगांत जो अंगरखा आहे, तो मला अगदीं थेट 'भीमरथ महाराजांच्या अंगांतल्या अंगरख्यासारखा दिसतो. परवांच्याच दिवशीं ते इकडे शिकारीला आले होते, तेव्हां त्यांच्या अंगांत अगदीं असलाच अंगरखा होता. मीं मुद्दाम त्या अंगरख्या-

कडे निराखून पाहिलें, त्यावरून त्या अंगरख्यावरचें कलाबतूचें कशिद्याचें विणकाम मुद्दाम काढून टाकलेलें दिसतें. तसेंच ती त्याच्या कमरेची तरवार, तिची मूठ सोन्याची आहे. या सर्व गोष्टींवरून हे लोक भामटे असावे, असें मला वाटतें.'

पाटील म्हणाला,–'आणखी मलाही तसेंच वाटलें, म्हणून मी त्यांना मुद्दाम घरांत बोलाविलें नाहीं आतां इकडे आलों आहें, तरी आपल्या गड्याला त्यांजवर नजर ठेवावयास सांगून आलों आहें.. हो; नेम काय सांगावा? येथें सुद्धां तें हात मारून चालतें व्हावयाचे. बरें आतां पुढें कसें करावें म्हणतोस? मी मघांपासून विचार करतों आहें, पण मला कांहीं सुचत नाहीं.'

हें भाषण घराच्या मागच्या पडवींत चाललें होतें, हें वर सांगितलेंच आहे. हें त्यांचें भाषण चालू आहे, इतक्यांत एक फेरीवाला आपल्या विक्रीच्या मालाचा बोजा पाठीवर मारून पाटलाच्या घराच्या मागच्या बोळांतून जात होता. हा फेरीवाला त्या खेडयांत व्यापाराच्या निमित्तानें पुष्कळ वेळां येत असे. त्यामुळें गांवांतील बहुतेक लोकांशीं त्याची चांगली घसरण होती. त्याची आणि पाटलाची दृष्टादृष्ट होतांच त्यांनीं परस्परांस नमन केलें. पाटलानें त्याला हाक मारिली, म्हणून तो मागच्याच रस्त्यानें मागच्या पडवींत आला. हल्लींच्या कालांत फेरिवाल्याचा धंदा करणारे लोक जरी आढळत नाहींत, तरी जे कांहीं थोडेसे आढळतात, ते किती बोलके असतात, आपण एकादी ऐकलेली बातमी प्रत्यक्ष पाहिल्याप्रमाणें कशी सांगतात, पराचा कावळा करण्यांत किती तरबेज असतात, हें वाचकांस माहीत असेलच. हल्लींच्या काळांत एका ठिकाणची बातमी दुसऱ्या ठिकाणीं जशी अगदीं जलद जाऊन पोंचते, तशी पूर्वीच्या काळांत पोंचत नसे; त्यामुळें असले फेरीवाले व्यापारी गांवांत आले, म्हणजे जो तो त्यांस आपल्या घरीं बोलावून [illegible] तिकडे काय वर्तमान आहे, हें विचारून असे; परंतु ज्यांच्याकडे आपली पुष्क[illegible] विक्री होण्याचा संभव असेल, त्यांच्याकडे मात्र ते बोलत बसत; आणि त्यांसच त्यांच्याकडून विलक्षण गोष्टी ऐकावयास सांपडत असत.

फेरीवाला पडवीमध्यें येतांच त्यानें आपल्या पाठीवरचा बोजा खालीं उतरला; आणि त्या बोजाला टेंकून तो खालीं बसला. त्याला पाटलानें पुसिलें,–'कसें काय! कोठून आलांत?'

फेरीवाल्यानें उत्तर दिलें,–'मी काल अकेपुराहून निघालों; काल रात्रीं मी तेथील देवळांत वस्तीस राहिलों होतों.'

पाटलानें विचारलें,–'बरें, अकेपुरची काय बातमी आहे!"

फेरीवाल्यानें उत्तर दिलें,–"काय! अकेपुरची बातमी विचारतां! म्हणजे ती बातमी सर्व जगभर झाली असून, ती तुम्हांस अजून कळली नाहीं, याचें मला मोठें आश्चर्य वाटलें'

पाटील म्हणाला,–'तुझ्यासारख्या सारा दिवस इकडून तिकडे भटकणाऱ्या लोकांस बातम्या कळावयाच्या. आम्हांस कोठून कळणार? बरें, अशी साऱ्या जगभर झालेली बातमी तरी काय आहे! ती आम्हांस ऐकूं दे तर खरी?'

फेरीवाला म्हणाला,–'काल सकाळीं भीमरथ महाराज शिकारीसाठीं बाहेर गेले असतां तेथें त्याजवर सुमारें शेंदीडशें चोरांच्या टोळीनें एकाएकीं हल्ला केला. महाराजांपाशीं सारीं दहा माणसें होतीं.'

आपण सांगितलेलें वर्तमान ऐकून, पाटलाला फार आश्चर्य वाटलें, आणि त्यानें अर्थपूर्ण दृष्टीनें आपल्या पत्नीकडे पाहिलें, हें बघून फेरीवाल्याला थोडें चमत्कारिक वाटलें; आणि त्यानें आपला आवाज जरा चढवून म्हटलें,–'त्या वेळीं काय–'

टील! म्हणाला,–'अरे बाबा, थांब, जन्म गेला मोठ्यानें ओरडूं नको. जरा हळु बोल. ह्याचा ह्या तुझी ही सर्व बातमी ऐकलीच पाहिजे. सभला देखील या चोरांचा थोडासा सुगावा खरा लागला आहे. पण आधीं मला सगळी हकीकत मी ऐकून घेऊं दे. मग मी काय तें तुला सांगेन.'

फेरीवाला म्हणाला,–'आपणांवर चोरांनीं हल्ला केला, हें पाहतांच भीमरथ महाराजांनीही आपल्या दोन हातांत दोन तरवारी घेऊन चोरांवर हल्ला केला. त्यांच्या बरोबरच्या लोकांनीं त्यांची शिकस्त केली. त्यांनीं सुमारें शंभर चोरांना जामिनदोस्त केलें, आणि कित्येकांना जखमीही केलें. पण चोरांची संख्या फारच मोठी असल्यामुळें भीमरथ महाराजांचा त्यांच्यापुढें निभाव लागला नाहीं, यांत फारसें आश्चर्य नाहीं. चोरांनीं त्यांच्यावर मोठी लगट केली, आणि त्या सर्वांना त्यांनीं पकडलें, त्यांच्या अंगावर असलेले सर्व अलंकार चोरांनीं काढून घेतले. इतकेंच नव्हे, तर त्यांच्या अंगावरील सुद्धां वस्त्रांचें त्यांनीं हरण केलें. त्या चोरांनीं आपल्या अंगावरील फाटकीं तुटकीं वस्त्रें भीमरथ महाराजांच्या आणि त्यांच्या सेवकाच्या अंगावर टाकून त्यांचीं मूल्यवान् वस्त्रें काढून घेतलीं. अशारीतीनें त्यासर्वांना नागवून चोर पळून गेले. हे चोर बहुधा प्रतापपुरच्या दरींतील भिल्ल असावे, असा महाराजांचा तर्क आहे.'

पाटील त्यास म्हणाला,–'पुरे पुरे! आतां अधिक ऐकण्याची जरूरच नाहीं. असा कांहीं तरी प्रकार झालेला असावा, असा आम्हीं पूर्वीच तर्क केला होता! ज्या चोरांनीं काल महाराजांवर हल्ला केला म्हणून म्हणतोस, त्या टोळींतील दोन चोर सध्यां आमच्या घरांत आहेत. त्यां दोघांपैकीं एकाच्या हाताला जखम लागलेली आहे; आणि दुसऱ्याच्या अंगांत जो अंगरखा आहे, तो प्रत्यक्ष भीमरथ महाराजांचा आहे, हें मीं ओळखिलें आहे. आतां तर मला त्यासंबंधानें कांहीं शंका उरलेली नाहीं!'

फेरीवाला म्हणाला,–'असें असेल, तर मला फार सावध राहिलें पाहिजे. कारण माझ्या जवळ अगदीं नाहीं म्हटलें तरी दहावीस मोहरांचा ऐवज आहे. पण काय हो, पाटीलबुवा, तुम्ही पुढें काय करणार! तुम्ही त्या चोरांना पकडण्याची कांहींच व्यवस्था करीत नाहीं! बरा बारा लोक युक्तीनें गोळा करा, आणि त्यांच्या मुसक्या बांधा! पाहतां काय!'

इतका वेळ पाटलीण बाई मुकाट्यानें हीं सर्व बातमी ऐकत होती. ती आतां म्हणाली,–'ज्या चोरांना जर पकडावयाचें असेल, तर तें काम मोठ्या सावधपणाबेंच केलें पाहिजे. न जाणो, हे दोघे जर टेहळणीसाठीं पुढें आलेले असले तर त्यांची टोळी जवळच कोठें तरी दबा धारून बसलेली असेल; आणखी आपल्या साथीदारांस पकडलें, हें जर त्यांस समजलें, तर ते एकदम हल्ला करून येथें अनर्थ करून सोडतील!'

पाटील म्हणाला,–'हा तुझा तर्क मला बरोबर वाटत नाहीं. मला वाटतें, ते दोघे हरामखोर आपल्या टोळीला सोडून त्यांस मिळालेलें द्रव्य घेऊन पोबारा करण्याच्या विचारांत असावे. त्यांना घोडे हवे आहेत, ते याच साठीं. आपण जर यांना कैद करून महाराजांकडे नेलें, तर आपणांस मोठें बक्षिस मिळेल, यांत शंका नाहीं.'

फेरीवाला म्हणाला,–'तुम्ही जर आणखी पांच चार माणसें गोळा करीत असाल, तर माझी तयारी आहे. मी आपलें हें मालाचें गांठोडें येथेंच ठेवून त्या हरामखोरांस अर्कपुरास सुद्धां नेऊन पोंचवीन. पण तुम्हांला जें बक्षिस मिळेल, त्यांतला वांटा मला मिळाला पाहिजे.'

यानंतर पुढें काय करावयाचें हें त्या दोघांनीं ठरविलें, आणि फेरीवाल्यानें मागच्या दरवाज्यानें बाहेर पडून शेजा-

रपाजारचे सात आठ लोक गोळा केले. त्यांनीं आपल्या तरवारी कमरेस लटकविल्या, आणि ते फेरीवाल्याबरोबर पाटलाच्या घरीं आले. त्यांपैकीं चार असामी पुढच्या दरवाज्यानें आणि चार-पांच असामी मागच्या दरवाज्यानें पाटलाच्या घरांत शिरून ते सर्वजण ओटीवर हलधर आणि सत्यरथ बसले होते तेथें आले. इतकें झाल्यावर पाटलानें आपल्या पाहुण्यांस मुकाट्यानें आपलीं हत्यारें खालीं ठेवून आपल्या स्वाधीन होण्याचा हुकूम केला.

त्या वेळीं सरदार हलधर गर्जना करीत बोलला,–'अहो घरवाले, तुमचा आमच्यावर असा जुलूम काय म्हणून?'

पाटील म्हणाला,–'तें आम्ही तुला सांगण्यापेक्षां भीमरथ महाराजच सांगतील.'

इकडे फेरीवाला गांवढेकऱ्यांस म्हणाला,–'पहा; या लफंग्यांची बोली ऐकलीस? याच्या बोलीवरून हा या प्रांतांतील रहिवासी नव्हे, हें तुमच्या ध्यानीं आलें असेलच.'

सरदार हलधरानें विचारलें,–'ज्या अर्थी तुम्हीं आम्हांस भीमरथ महाराजांकडे घेऊन जाणार असें म्हणत आहां, त्या अर्थी आम्हीं आपलीं हत्यारें उचलीत नाहीं. आम्हांस तुम्हीं त्यांच्याकडे कां नेणार, हें समजलें पाहिजे.'

फेरीवाला म्हणाला,–'त्यांत एवढें समजावयाचें तें काय? तुम्ही कोणी तरी भामटे आहां, हें तुमच्या या पोषाकावरून आणि मुद्रेवरून उघड दिसत आहे!'

सरदार हलधर म्हणाला,–'या बाबतींत तुमची कांहीं तरी गैरसमजूत झालेली दिसते. आम्ही ज्या चमत्कारिक प्रसंगांत सांपडून या खेडयांत आलों, त्या प्रसंगामुळें आमचें वर्तन संशयास्पद दिसण्याचा संभव आहे, हें मलाही समजत आहे, पण–'

पाटील म्हणाला,–'पण नाहीं, आणि कांहीं नाहीं. आम्ही आतां तुमच्या मुखांतून एक शब्दही ऐकण्यास कबूल नाहीं. मुकाट्यानें आमच्या स्वाधीन [redacted] आतां शहाणपणा आहे.'

फेरीवाला म्हणाला,–'हे हरा[redacted] ऐकायचे नाहींत. कायरे, आम[redacted] होतां, कीं तुम्हांस आमच्या हत्या[redacted] पहावयाचें आहे?'

सरदार हलधर आणि सत्[redacted] त्यांस पुष्कळ सांगून पाहिलें, परंतु[redacted] अगदीं लक्ष्य न देतां पाटलाने[redacted] गांवढेकऱ्याकडून त्यांच्या मुस्क्या[redacted] आणि त्या दोघांस बळकट जख[redacted] 'या तुमच्या करण्यापासून तुम[redacted] न होतां उलट भीमरथ महाराज[redacted] रागावतील, कारण आपल्या [redacted] (हलधराचा) आणि त्यांचा [redacted] असें सत्यरथानें त्यांस सांगून [redacted] त्याच्या सांगण्याचा कांहीं उपयोग[redacted]

इतका प्रकार झाल्यावर सुमा[redacted] कांत त्या गांवढेकऱ्यांनीं आपलीं[redacted] रचीं भोजनें उरकून घेतलीं[redacted] सरदार हलधराचे आणि त्याच्या[redacted] त्यांनीं हात सोडले होते. भो[redacted] दोघांस दोन घोड्यांवर बांधून पा[redacted] लवाजम्यासह अर्कपुरच्या वाटेस[redacted]

प्रकरण २० वें

जांघिळ मामा आणि प्रियंवदा.

दृढसंध राजा सुंदरपुरावर चाल करून जात असतां वाटेमध्यें बृहद्रथ राजानें रणमत्तास पाठविलेलें पत्र शेखराच्या हातीं लागलें होतें, आणि तें पत्र आपल्या एका सैनिकास चुडालेल्या स्वाराचा पोषाख देऊन व त्याला ओढ्यापलीकडे सांपडलेल्या घोड्यावर बसवून, त्याच्या बरोबर शेखरानें रणमत्ताकडे पाठविलें होतें. हें वाचकांच्या लक्ष्यांत असेलच. बृहद्रथ राजाचा हा सेवक नारायणपुरास दोन घटका दिवसाचे सुमारास जाऊन पोंचला.

[redacted]नारायणपुरास जाऊन पोंचला तोंच इकडे लढाई सुरू झाली.

[illegible] या पत्रांत रणमत्ताला दोन गोष्टी [illegible] लिहिलेलें होतें. त्यांतली पहिली [illegible] सरदार हलधर सध्यां सुंदरपुरीं [illegible] त्याच्याशीं खलबत करण्या- [illegible] कंपूंतील लोक एकत्र झाले [illegible] त्यानें एका क्षणाचा विलंब [illegible] पुरीं निघून यावें; दुसरी गोष्ट [illegible] मत्तानें आपला पुतण्या विक्रमसेन [illegible] रूर तितके लोक देऊन त्याची [illegible] रवानगी करावी, व विक्रम- [illegible] राजाचें सैन्य दरींतून निघून [illegible] तांच प्रतापपुरावर हल्ला करून [illegible] ड्यांत जितकीं राजकुटुंबांतील [illegible] लागतील तितक्यांस कैद करून [illegible] ठेवावें; त्यांतल्या त्यांत प्रियंवदा [illegible] असा मुद्दाम प्रयत्न करावा; [illegible] गोष्टी त्या पत्रांत लिहिल्या होत्या [illegible] न्हीं गोष्टी दृढसंधराजाला पूर्वीच [illegible] न, त्यानें त्यांचा योग्य बंदो- [illegible] वेळा होता.

[illegible] बृहद्रथाच्या ताब्यांतील एक [illegible] गिरदार होता. तथापि बृहद्र- [illegible] पत्र लिहितांना तें बरोबरीच्या [illegible] न लिहिलेलें होतें. त्या पत्रांत [illegible] करण्याविषयीं त्यास नुसत्या [illegible] होत्या, तरी त्या आज्ञा आहेत आणि त्या आपण पाळल्याच पाहिजेत हें रण- मत्त जाणून होता. त्यानें पत्रदर्शनीं आपल्या पुतण्याला बोलावून पुढें काय करावयाचें त्यासंबंधानें त्याला आज्ञा देऊन ठेविल्या आणि जो दृढसंधाचा सैनिक वेषांतर करून पत्र घेऊन त्याजकडे आला होता, त्याच्याच बरोबर सुंदरपुरास जाण्याचा त्यानें निश्चय केला. त्यानें आपल्याबरोबर फक्त तीनच सेवक घेतले होते.

दृढसंधानें रणमत्तावर छापा घालून त्याला कैद करून प्रतापपुरीं घेऊन जाण्या- साठीं दहाबारा जवान पाठविले होते, ते एका अडचणीच्या जागीं दबा धरून बसले होते. रणमत्त त्या ठिकाणीं येतांच त्यांनीं त्याजवर एकदम छापा घालून त्याला सेवकांसह कैद केलें, आणि ते त्यांना घेऊन प्रतापपुरीं आले. पूर्वी प्रतापपूरच्या राजवा- ड्यांतील ज्या दिवाणखान्यांत सरदार हल- धर आणि सत्यरथ यांस कैदेंत ठेविलें होतें, त्याच जागीं सध्यां रणमत्त आणि त्याचे सेवक यांस ठेविलें होतें.

पत्रांतील दुसऱ्या गोष्टीचा बंदोबस्त कर- ण्यासाठीं दृढसंधानें एक सैनिक प्रतापपुरीं रवाना केला होता. रणमत्ताला आयत्या- वेळीं पन्नास साठांहून अधिक लोक मिळा- वयाचे नाहींत, आणि तेवढे लोकही एकत्र व्हावयास जवळ जवळ एक प्रहर तरी खास लागेल, असें दृढसंधानें अनुमान केलें होतें, तें अगदीं बरोबर होतें. त्या अनुमाना- प्रमाणें रणमत्त कैदी होऊन प्रतापपुरीं येऊन पोचेपर्यंत विक्रमसेन नारायणपुरींतून बाहेर पडला नव्हता. दृढसंधाच्या आज्ञेप्रमाणें प्रता- पपुरच्या बंदोबस्तासाठीं मागें राहिलेल्या सैन्यापैकीं सुमारें पाऊणशें लोक प्रतापपुरां- तून बाहेर पडले, आणि ज्या वाटेनें विक्रम- सेन चालून येण्याचा संभव होता, त्या वाटेवर दबा धरून बसले.

रणमत्ताला कैद करून प्रतापपुरीं आणिलें, त्याच सुमारास जांघिळ आपल्या दीर्घ झोंपेंतून जागा झाला. जांघिळाला झालेली जखम मोठीशी नव्हती; हें पूर्वी सांगितलेलें वाचकांस स्मरतच असेल, जांघिळाला त्या वेळीं जी मूर्च्छा आली होती, ती मात्र प्रबल होती. सुमारें चार प्रहरपर्यंत तो अगदीं बेशुद्ध पडलेला होता. त्यानंतर तो सावध झाला. भिल्ल लोकांना नेहमीं अरण्यांत अस- ल्यामुळें त्यांस झाडपाल्यांच्या औषधांची फार उत्तम माहिती असते, त्याप्रमाणें प्रता- पपुरच्या भिल्लांसही ती माहिती होती. जांघिळ मूर्च्छित असतांच त्याच्या जखमे-

बर उत्तम औषधोपचार पोंचले असल्यामुळें आणि तो सरासरी आठ प्रहर एकसारखा पडून राहिलेला असल्यामुळें त्याची ती जखम अर्धीमुर्धी भरत आली होती; आणि तो मूर्च्छेतून सावध झाल्यानंतर त्याला जीं औषधें मिळालीं, त्यांनीं त्याला गाढ झोंप लागली असल्यामुळें द्वंद्वयुद्धानंतर दुसरे दिवशीं जेव्हां तो जागा झाला तेव्हां त्याला पुष्कळ बरें वाटत होतें. निसर्गतःच त्याची शक्ति असामान्य असल्यामुळें, तो जागा झाला त्यावेळीं त्याला आपल्या जखमेची अगदीं पर्वा वाटत नव्हती, यांत आश्चर्य नाहीं. तो जागा झाला त्यावेळीं आपलें सैन्य सुंदरपुरावर चाल करून गेलें ही गोष्ट त्याला समजली, व आपल्यासारख्या योद्ध्याला टाकून दृढसंध महाराज मोहिमेवर गेले, याचा त्यास खेद झाला. परंतु जवळच्या भिल्लांनीं 'सैन्य मोहिमेवर गेलें, त्यावेळीं तूं मूर्च्छित होतास' असें त्याला स्मरण दिलें, म्हणून तो उगीच बसला! लवकरच एक तुकडी विक्रमसेनावर छापा घालावयास जाण्यासाठीं सिद्ध झाली आहे, हें वर्तमान त्यानें ऐकलें व त्या तुकडीबरोबर आपण जावें, असें त्याच्या मनांत आलें.

जांघिळ सध्यां देहभानावर आला होता हें जरी खरें आहे, तरी अजून त्याची विचारशक्ति मात्र पूर्वीप्रमाणें ताब्यावर आली नव्हती. त्याला जर सध्यां कोणी जरा निरखून पाहिलें असतें, तर त्याच्या डोळ्यांत एक प्रकारची अस्वाभाविक चमक दिसून आली असती. कौलाच्या वेळीं अनेक प्रकारच्या भयंकर विचारांनीं भरकटलेलें त्याचें मन अजून पूर्णपणें ताब्यावर आलेलें नाहीं, आणि त्यानंतर द्वंद्वयुद्धाच्या प्रसंगीं त्याच्या अंगीं जो आवेश भरला होता, तोही अद्यापि कमी झालेला नाहीं, हें त्याच्या एकंदर चर्येवरून स्पष्ट दिसून येत होतें. दृढसंधानें सध्यां ज्या एका भिल्लास राजवाड्याच्या रक्षणासाठीं मागें ठेविलें होतें. तो भिल्ल वृद्ध असून उदार दिलाचा होता. जांघिळ जागा झाला, इतकेंच नव्हे, तर तो मोठ्या हौसेनें युद्धास येण्यास सिद्ध आहे, असें ऐकतांच त्या वृद्ध भिल्लाला मोठा आनंद झाला. जांघिळासारखा शूर योद्धा आपल्या बरोबर आल्यास अपजयाचें नांवसुद्धां घ्यावयास नको, असें समजून त्या वृद्ध भिल्लानें आपला सर्व अधिकार जांघिळाकडे सोंपविला, आणि त्याच्यासह जवळजवळ पाऊणशें लोक बरोबर घेऊन प्रतापपुरच्या खिंडीमध्यें तो दबा धरून बसला.

दबा धरून बसल्यास चांगल्या चार घटका झाल्या, पण विक्रमसेनाचें सैन्य त्या खिंडीपाशीं आलें नाहीं. आणखी एक घटका वाट पाहिल्यावर वृद्ध भिल्ल बोलला,-'आपलें सैन्य रात्रींच प्रतापपुर सोडून गेलें असल्यामुळें तें विक्रमसेनाला अजून समजलें नसेल, आणि तो अजून आमचें सैन्य जावयाचें आहे, असें समजून स्वस्थ बसला असेल. असें जरी असलें, तरी आमचें मुख्य सैन्य केव्हांच निघून गेल्याची खबर त्याला इतक्यांत रात्रीनें समजेल, आणि तो सुमारें दोन तीन घटकांच्यां आंत येथें येईल. या पलीकडच्या टेकडीवरून नारायणपुरचा मार्ग चांगला दिसतो, यासाठीं कोणीतरी या पर्वतावर जाऊन तेथून पाहत रहावें, आणि विक्रमसेनाचें सैन्य इकडे येत असलेलें दृष्टीस पडतांच आम्हांस खबर द्यावी; म्हणजे सावध होऊन शत्रूवर तुटून पडण्यास आम्हांस बरें पडेल.'

हें ऐकून जांघिळमामा म्हणाला,-'ही कामगिरी मजकडे लागली. ही बजावण्यास माझ्या इतका योग्य माणूस मिळणार नाहीं. माझे डोळे जसे तीक्ष्ण आहेत तसे इतक्यांपैकीं कोणाचेही नसतील असें म्हणावयास काय हरकत आहे?'

वृद्ध भिल्ल म्हणाला,-'होय, तुझे डोळे गरुडपक्ष्याप्रमाणें तीक्ष्ण आहेत यांत अगदीं शंका नाहीं; परंतु सध्यां तुझ्या अंगीं नेहमीप्रमाणें ताकद आलेली नाहीं, म्हणून डोंगर चढण्याचे श्रम तूं करूं नये, अशी माझी इच्छा आहे. ही कामगिरी करावयास तूंच

गेलें पाहिजे असें नाहीं. एकादा सामान्य माणूस देखील ही कामगिरी करील. '

जांघिळ म्हणाला,–' नाहीं नाहीं; ही कामगिरी मीच करणार ! मी हा डोंगर चढूं लागलों म्हणजे तुम्ही मजकडे पहा, म्हणजे मी किती चपळाईनें पर्वतावर चढत आहें हें तुमच्या दृष्टीस पडेल, आणि तुम्हांस माझ्या शक्तीचें आश्चर्य वाटेल. '

असें बोलून त्या वृद्ध भिल्लाच्या संमतीची वाट न पाहतां जांघिळ पर्वतावर चढूं लागला. यावेळीं तो नेहमींप्रमाणें बिनदिक्कत चढून गेला, याचें दबा धरून बसलेल्या लोकांस मोठें आश्चर्य वाटलें. कालच्या युद्धाच्या श्रमामुळें, मूर्च्छेमुळें किंवा जखमेमुळें त्याच्या अंगची शक्ति कमी झाली असावी, अशी त्याच्या सोबत्यांची कल्पना होती, पण ती कल्पना चुकीची आहे, असें त्यांस तत्काल कळून चुकलें. पर्वताच्या शिखरावर पोंचल्यानंतर नारायणपुरच्या वाटेकडे डोळे लावून तो पाहूं लागला. सुमारें अर्ध्या घटकेनें विक्रमसेनाचें सैन्य प्रतापपुराकडे येतांना त्याच्या दृष्टीस पडलें. त्या सैन्याचीं शस्त्रें उन्हामध्यें चकाकत होतीं, तीं पाहून तर हे शत्रूच आहेत अशी त्याच्या मनाची खात्री झाली. त्यानें त्या सैन्यांतील लोक किती आहेत, हें मोजून पाहिलें आणि तो आपल्याशीच पुटपुटला,–' हे लोक जवळ जवळ पन्नास असावे, आमचे लोक पाऊणशेंच्या वर आहेत, अर्थात् शत्रूचा जय होईल ही शंका सुद्धां मनांत आणावयास नको. शत्रूपासून आपल्या लोकांस भीति बाळगण्याचें कारण नाहीं, हें एका अर्थीं बरें आहे, माझ्या मनांत जरी कांहीं असलें, तरी आपल्या भाऊबंदांचा नाश व्हावा, असें कृत्य मी कधींही करणार नाहीं. '

असें आपल्याशीं पुटपुटत जांघिळ तेथून एकदम मागें फिरला. पण तो पूर्वी ठरल्याप्रमाणें शत्रुसैन्याच्या आगमनाची आपल्या सैन्यास वर्दी द्यावयासाठीं पर्वतावरून खालीं उतरला नाहीं. त्यानें पर्वताच्या शिखरावरून राजवाड्याकडे जावयाचा रस्ता धरिला, आणि तो भराभर चालूं लागला. पर्वताच्या शिखरावरून जात असतां आपण कोठें जात आहों, हें दबा धरून बसलेल्या लोकांच्या ध्यानीं येऊं नये, अशी त्यानें खबरदारी ठेविली होती. तो जेव्हां राजवाड्याच्या जवळ आला, तेव्हां तो घाबरून गेल्याप्रमाणें दिसत होता. व जणुं काय स्वतःचा जीव घेऊन पळत होता. जांघिळ वाड्यांत जाऊन पोंचण्यापूर्वीच त्याला पहारेकऱ्यांनीं पळत येतांना पाहिलें असल्यामुळें त्याच्या आगमनाची वर्दी मेधावती राणीला पोंचली होती, म्हणून ती मोठ्या उत्सुकतेनें राजवाड्याच्या दरवाज्यापाशीं येऊन उभी राहिली होती. त्याची घाबरलेली मुद्रा पाहतांच आपल्या लोकांचा पराभव झाला असावा, असें त्याला पाहणाऱ्यांच्या एकदम मनांत आलें.

अतिशय खेदपूर्ण स्वरानें जांघिळ ओरडला,–' देवी, घात झाला ! शत्रुसैन्यानें आमच्या लोकांचा पराभव केला ! आमचे सर्व लोक बंदिवान् झाले ! '

राणी मेधावतीनें विचारिलें,–' काय ? आमच्या लोकांचा पराभव झाला ? त्यांनीं आपला पराक्रम अगदीं दाखविला नाहीं, असें होईल तरी कसें ? ' असें बोलत तिनें जांघिळाकडे पाहिलें, पण त्याच्या अंगावर रक्ताचा एक थेंब देखील तिला दिसला नाहीं, किंवा तो युद्धाच्या गर्दीत मिसळला असावा, असें अनुमान करतां येण्यासारखें कांहींच चिन्ह त्याच्या सर्व अंगावर दिसून आलें नाहीं.

जांघिळ पुनः पूर्ववत् खेदयुक्त स्वरानें म्हणाला,–' हाय हाय ! आपल्या सैन्याची दुर्दशा प्रत्यक्ष आपल्या नेत्रांनीं पाहून तें वर्तमान आपणांस कळविण्याचा मजवर प्रसंग आला ! धिक्कार असो माझ्या जिण्याला ! '

मेधावतीनें पुनः विचारिलें,–' अरे जांघिळा, काय झालें तें सर्व सविस्तर सांग पाहूं ? '

जांघिळानें उत्तर केलें,–'सुमारें दोनशें लोकांसह विक्रमसेन दरीमध्यें शिरला. आमचे लोक दरीच्या तोंडाशीं दबा धरून बसले होते. त्यांनीं दरीमध्यें शत्रु येत आहेत असें पाहतांच ठरल्याप्रमाणें त्यांच्यावर एकदम छापा घातला; परंतु आमच्या सैन्यापेक्षां शत्रुसैन्य सुमारें तिप्पट असल्यामुळें आमच्या सैन्याचा इलाज चालला नाहीं. थोडीशी झटापट झाली, आणि आमचे सर्व लोक शत्रूंच्या हातीं लागले! मी कसाबसा शत्रूंच्या हातांतून निसटलों आणि वायुवेगानें आपणांस सावध करण्यासाठीं आडवाटांनीं पळत पळत मोठ्या कष्टानें येथें येऊन पोंचलों. देवी, प्रियंवदा आपल्या हातीं लागावी, असा शत्रुसैन्याचा मुख्य उद्देश असल्यामुळें, ती त्यांच्या हातीं न लागेल, असा कांहींतरी उपाय योजिला पाहिजे. आतां विचार करण्यास वेळ नाहीं!'

मेधावती म्हणाली,–'होय, प्रियंवदेला वाड्यांतून दुसरीकडे पोंचविणें याप्रसंगीं फार जरूरीचें आहे, यांत शंका नाहीं.' असें बोलून ती पुनः राजवाड्यांत परत गेली, आणि तिनें प्रियंवदेला आपल्याशीं बोलावून आणिलें. ती आल्यावर मेधावती तीस म्हणाली,–'मुली तुला आतांच्या आतां वाडा सोडून कोठें तरी सुरक्षित ठिकाणीं जाणें जरूर आहे.'

प्रियंवदेनें मेधावतीच्या कमरेस मिठी घातली, आणि स्फुंदत स्फुंदत विचारलें, 'पण तुम्ही स्वतः काय करणार?'

मेधावती मोठ्या गंभीर मुद्रेनें आणि वीरश्रीयुक्त स्वरानें तिला म्हणाली,–'अशा प्रकारचे प्रसंग आले असतां वीरस्त्रिया जें काय करीत असतात, तेंच मी करणार. किल्ल्यांत अजून सैन्य पुष्कळ आहे, आणि शस्त्रास्त्रांचा संग्रह कांहीं येथें कमी नाहीं. अर्थात् मी स्वतः हातीं तरवार घेऊन अगदीं नाइलाज होईपर्यंत किल्ला सांडविणार! आणि इतकें करूनही आपला निभाव लागला नाहीं, तर क्षत्रियस्त्रियांचें शेवटचें दिव्य कर्तव्य करावयास मंत्राय ठरवील, तें करणार नाहीं,' तिच्या मनाचीं

प्रियंवदा म्हणाली,–'तर मग जसा प्रमाणें आपल्या बरोबर राहून आपणा-यद्धाच्या करणार. मीही वीरकन्या आहें, आणि मला वीरपत्नी व्हावयाचें आहे. अर्थात् अशा आणीबाणीच्या वेळीं मी आपणांस कधीं दूर सोडून जाणार नाहीं.'

मेधावती म्हणाली,–'हें तुझें भाषण ऐकून मला फार समाधान होत आहे, परंतु आजची वेळ फार चमत्कारिक आहे. तूं जर शत्रूंच्या हाती लागलीस तर ते तुझी विटंबना करण्यास कमी करणार नाहींत. मी जरी आपलें कर्तव्य म्हणून किल्ला सांडविण्यास तयार झालें आहें, तरी आजच्या प्रसंगीं जयाची आशा धरणें व्यर्थ आहे. तूं जर शत्रूच्या हातीं लागलीस तर शेखरास काय वाटेल? तूं शत्रूच्या हातीं लागल्यावर ते तुझा बृहद्रथाबरोबर विवाह करावयास क्षणाचाही विलंब करणार नाहींत. यासाठीं तूं या जांघिळाबरोबर कोठें तरी सुरक्षित स्थळीं गेलेंच पाहिजे.'

शेवटीं मोठ्या जुलमानें प्रियंवदा जाण्यास तयार झाली. मेधावती राणीनें दोन घोड्यांवर जिनें कसण्याचा आपल्या सेवकांस हुकूम केला. घोडे तयार होतांच एकावर प्रियंवदा आणि दुसऱ्यावर जांघिळ अशीं आरूढ झालीं, व मोठ्या त्वरेनें जांघिळानें पिशाच–सोपानाचा मार्ग धरिला.

जांघिळ निघून गेल्यावर मेधावतीनें आपल्या एका नोकरास बोलावून आणून राजवाड्यामध्यें शिल्लक असलेलें सैन्य एकत्र करण्याचा हुकूम केला, आणि मोठ्या धैर्यानें शत्रूच्या सैन्याशीं सामना देण्याची तिनें तयारी केली. या तिच्या तयारीची अर्थाअर्थीं अगदींच जरूर नसल्यामुळें तिचें वर्णन करण्याची गरज नाहीं. जांघिळ प्रियंवदेला घेऊन गेल्यानंतर सुमारें एका प्रहरानें राजवाड्याकडे सैन्य येत असल्याची

, आणि मेधावतीनें कांस तयारीनें रहावयाची ... राजवाड्याकडे येणारें सैन्य थोडेंसें पुढें आलें, त्यावेळीं त्या . ामध्यें प्रथम थोडेसे नारायणपुरकर,त्यांच्या मागें प्रतापपुरकर, त्यांच्या मागें पुनः नारायण-पुरकर आणि त्यांच्या मागें प्रतापपुरकर असा कम किल्ल्याच्या तटावरून टेहळणी करीत असलेल्या मारेकऱ्यांच्या नजरेस पडला. हा प्रकार पाहून आणि ऐकून सर्वांस फार आश्चर्य वाटलें. शत्रूची ही कांहीं चमत्कारिक युक्ति तर नसेलना, अशी शंका प्रथमतः मेधा-वती राणीच्या मनांत उत्पन्न झाली. सैन्य आणखी थोडें पुढें आलें, त्यावेळीं आपले सैनिक आनंदित दिसत आहेत, पराभवामुळें येणारी खिन्नता त्यांच्या मुखांवर दिसत नाहीं, हें पाहून तर तेथील सैनिकांस फारच आश्चर्य वाटलें, आणि जांघिळानें लबाडीनें खोटें वर्त-मान तर सांगितलें नसेलना, अशी शंका राणीच्या मनांत आली. शेवटीं तें सर्व सैन्य प्रतापपुरच्या वेशीपाशीं येऊन पोंचलें. त्यावेळीं जांघिळानें आपला कांहींतरी दुष्ट हेतु साध्य करण्यासाठीं अस्खलित खोटें भाषण केलें, असें सर्वांस कळून चुकलें.

शेखरानें आपला पराभव केला म्हणून चिडून जाऊन जांघिळानें त्याच्या भावी पत्नीस संकटांत लोटून सूड उगवावयाचा दुष्ट हेतु अशा रीतीनें सिद्धीस नेला, त्याबद्दल सर्वांची खात्री झाली, आणि मेधावती राणीनें आपल्या अश्वशाळेंतील अत्युत्तम घोड्यांवर हुषार भिल्लांस स्वार करून जांघिळाच्या पाठलागा-साठीं त्याची रवानगी करून दिली. तथापि तो राजवाड्यांतून बाहेर पडल्यास चांगला एक प्रहर लोटून गेला असल्यामुळें, तो आपल्या लोकांच्या हातीं लागणें कठीण आहे, असें मेधावतीच्या मनांत आल्याखेरीज राहिलें नाहीं.

पिशाच-सोपान घांटानें जात असतां जांघि-ळानें आपला व प्रियंवदेचा घोडा शक्य तितक्या त्वरेनें चालविला होता. प्रियंवदेलाही आपला पाठलाग होण्याची भीति वाटत असल्यामुळें, तिनें आपला घोडा सावकाश चालविण्याची इच्छा प्रकट केली नाहीं. ती मुकाट्यानें जांघिळामागून चालली होती. तिला उत्तम रीतीनें घोड्यावर बसतां येत असल्यामुळें पिशाच-सोपानसारख्या विकट मार्गानें प्रवास करीत असतांहि तिच्या मनास भीतीचा स्पर्श देखील झाला नव्हता. शिवाय ती ज्या घोड्यावर बसलेली होती, तें जनावर जातिवंत असल्यामुळें आपल्या पाठीवरील नाजूक स्वाराला पीडा होऊं नये अशा रीतीनें तें चाललें होतें, म्हणून तिला तो प्रवास सुखकर वाटत होता. प्रतापपुरांतून बाहेर पडल्यानंतर एक प्रहरानें तीं दोघें पिशाच-सोपान घाट चढून त्रिशूल पर्वतावर येऊन दाखल झालीं; तथापि त्यांनीं तेथें विश्रांति घेतली नाहीं. त्रिशूल पर्वतापासून शिवालया-पर्यंतचा मार्ग उत्तम असल्यामुळें जरी भरधांव नव्हे, तरी त्यांनीं आपले घोडे बऱ्याच वेगानें चालविले होते.

या रस्त्यानें पुढें जात असतां जांघिळ तिला म्हणाला,–'ताईसाहेब, आपण अजून देखील जलदीनें पाय उचलिला पाहिजे. अजून आपण भयापासून मोकळ्या झालां नाहीं.' हें भाषण करतांना जांघिळानें मोठ्या नम्रतेचा आव घातला होता.

प्रियंवदेनें विचारिलें,–'पण आपणांस जाव-याचें तरी कोठें?' हा प्रश्न करीत असतां त्या निर्मळ मनाच्या कुमारिकेच्या मनांत जांघिळाच्या स्वामिभक्तीबद्दल तिळमात्र संशय उत्पन्न झालेला नव्हता. फार तर काय, जांघिळा इतका विश्वासु आणि स्वामी-भक्त माणूस साऱ्या प्रतापपुरांत दुसरा कोणी सांपडावयाचा नाहीं, अशी तिच्या मनाची खात्री होती असें म्हणावयास हरकत नाहीं.

जांघिळानें उत्तर दिलें,–'ताईसाहेब, आ-पण त्या पिशाच–सोपानांतून सुखरूप बाहेर येईपर्यंत माझ्या मनांत एकसारखी पाठ-लागाची भीति वाटत असल्यामुळें, मला

कांहींच सुचेनासें झालें होतें. आतां आपण कोठें तरी क्षणभर आपल्या घोड्यांस विश्रांतीसाठीं उभे करूं आणि पुढें कोठें जावयाचें याचा विचार ठरवूं. वास्तविक पाहिलें तर मीं तुला एकदम वत्सपुरास तुझ्या पित्याकडे घेऊन जावें, हेंच प्रशस्त दिसतें; पण तिकडे एकदम जाण्यास माझें मन घेत नाहीं. आपणांस जर कालीनदीच्या मुखाकडील बाजूनें दरींतून बाहेर पडतां आलें असतें, तर गोष्ट निराळी होती. आपण पिशाच-सोपान मार्गानें आल्यामुळें आजच्या प्रसंगीं आपण निर्धास्तपणें पुढें जाणें योग्य होणार नाहीं. आजचा दिवस लढाईचा आहे. लढाईचे वेळीं केव्हां कोणावर कोणता प्रसंग ओढवतो, याचा विश्वास नसतो! आमचे महाराज आणि तुमचे आजोबा युद्धास गेले आहेत, पण तिकडे त्यांचा जय झालाच असेल,' असें गृहीत धरून आपण दांडगाईनें पुढें गेलों, आणि वास्तविक प्रकार भलताच असला तर? बृहद्रथाला आयत्या वेळीं भीमरथाची मदत येऊन पोंचली असेल, किंवा त्यानें अगोदरच लढाईची तयारी करून नंतर तुम्हांस पळवून नेण्यासाठीं आपले लोक पाठविले नसतील असें कशावरून? परवांचा त्याचा प्रयत्न फसला, ही गोष्ट निराळी, पण जर तो त्याचा प्रयत्न साध्य झाला असता, तर आमचे महाराज स्वस्थच बसले असते काय? अशा प्रकारचे विचार माझ्या मनांत एकसारखे घोळत असल्यामुळें पुढें काय करावें, कोठें जावें, याचा मला मोठा विचार पडला आहे; यासाठीं प्रथम आपण शिवालयापर्यंत जाऊं या. तें देवालय हमरस्त्यावर असल्यामुळें तेथें पुष्कळ लोकांचें येणें जाणें असतें. तेथें गेल्यावर मग पुढें कोठें जावयाचें याचा आपण शांतपणें विचार ठरवूं.'

हें जांघिळाचें भाषण अत्यंत सयुक्तिक असल्यामुळें त्याच्या पोटांत कपट असेल अशी शंका देखील प्रियंवदेच्या मनांत आली नाहीं. अर्थात् तो जें काय ठरवील, तें अगदीं योग्य असेल, अशीच तिच्या मनाची खात्री होती. शिवाय तिच्या समजाप्रमाणें तो केवल आपल्या रक्षणासाठीं युद्धाच्या गर्दीतून निसटून मोठ्या घाईनें पराभवाची वर्दी देण्यासाठीं राजवाड्यांत आला होता, आणि नंतरही त्यानें मोठ्या त्वरेनें आपणास सुरक्षित स्थळीं पोंचविण्याचें काम आपल्या शिरावर घेतलें, हे त्याचे आपणांवर मोठे उपकार आहेत, असें ती समजत होती; आणि अत्यंत विश्वासयुक्त अंतःकरणानें ती कुमारिका त्या राक्षसावरोबर चालली होती.

आणखी थोड्याच वेळानें तीं दोघें शिवालयामध्यें येऊन पोंचलीं. आपल्या घोड्यांस विश्रांति देण्याची त्यांस जरूर वाटत असल्यामुळें त्यांनीं थोडा वेळ त्या शिवालयांत मुक्काम करण्याचा बेत केला. मणिभद्राची गुलहौशी नात मथुरा हिनें प्रियंवदेचें मोठ्या आनंदानें स्वागत केलें. त्या दोघींची जरी पूर्वीची ओळख नव्हती, तरी प्रियंवदेच्या अंगावरील वस्त्रालंकार पाहून ती कोणा थोरा मोठ्याची कन्या आहे, हें त्या चाणाक्ष मथुरेनें ताडलें होतें. जांघिळाचें त्या वाटेनें येणेंजाणें पुष्कळदां असल्यामुळें तो तिच्या ओळखीचा होता. शेखराचें आणि प्रियंवदेचें लग्न ठरलेलें आहे, ही गोष्ट तिला माहीत होती; त्यावरून जांघिळाबरोबर येणारी राजकन्या बहुधा प्रियंवदाच असली पाहिजे, असा तिनें सहज तर्क बांधिला होता. मथुरा आणि प्रियंवदा परस्परांची ओळख करून घेत देवळाच्या गाभाऱ्यांत बसल्या आणि जांघिळानें योग्य स्थळीं घोडे बांधिले, व तो त्यांस गवतपाणी करण्याच्या उद्योगास लागला.

कांहीं वेळानें जांघिळ परत आला, आणि वत्सपुराकडे स्थिरस्थावर आहे, तिकडे जावयास आपणांस कांहीं हरकत नाहीं, असें तिला सांगून त्यानें पुनः घोड्यांवर जिनें चढाविलीं. प्रियंवदेला या प्रदेशांतून प्रवास करण्याचा कधीं जन्मांत प्रसंग नसल्यामुळें

जांघिळावर पूर्ण विश्वास ठेवून ती त्याच्या मागून चालली होती. जांघिळानें आपण वत्सपुराकडे जात आहों, असें जरी तिला सांगितलें होतें, तरी तो वास्तविक तिकडे जात नसून वत्सपुराच्या दक्षिणदिशेकडील मार्ग त्यानें धरिला होता. आपण कोठें जावयाचें आणि काय करावयाचें याचा त्यानें पूर्वीच विचार करून ठेविला असल्यामुळें तो आपल्या उद्दिष्ट स्थळाकडे चालला होता.

आणखी कांहीं घटका लोटल्या, आपण प्रवास करीत असलेला प्रदेश प्रियंवदेला अधिकाधिक वैराण दिसूं लागला, संध्याकाळ झाली, आणि प्रियंवदेला घोड्यावरून प्रवास करण्याचा कंटाळा आला. शेवटीं–वत्सपुर येथून किती दूर आहे;–असा प्रियंवदेनें जांघिळास प्रश्न केला. जांघिळानें वत्सपुर येथून जवळच आहे, असें तिला सांगितलें, आणि येथून जवळच एक लहानसें शिंपडें असून तेथें आपली चांगली ओळख आहे, यासाठीं तेथें जाऊन थोडा वेळ विश्रांति घ्यावी आणि मग पुढें जावें, असा आपला हेतु आहे, असें तो तिला म्हणाला. ह्या त्याच्या भाषणानें तिचें समाधान झालें. कारण जांघिळाच्या हेतूसंबंधानें तिच्या मनांत अजून विपरीत भावना उत्पन्न झालेली नव्हती. जांघिळाला या प्रदेशाची अगदीं खडान खडा माहिती असल्यामुळें तो मुद्दाम मनुष्यवस्ती दूर राहील अशा बेतानें घोडे चालवीत होता. या प्रवासामध्यें वाटेंत एकही मनुष्य तिच्या दृष्टीस पडलें नसल्यामुळें आपण जात आहों कोठें, आणि आपण वत्सपुरीं पोंचूं केव्हां, याची खात्री करून घ्यावयाची तिला मुळीं संधीच मिळाली नव्हती. अशा रीतीनें जांघिळानें जरी तिला कित्येक कोसपर्यंत झुलवीत झुलवीत नेलें होतें, तरी आपण भलतीकडेच जात आहों, या गोष्टीचा त्यानें तिच्या मनांत संशयही येऊं दिला नव्हता.

सूर्य मावळण्याचे सुमारास जांघिळानें एका पायवाटेनें आपले घोडे चालविले, आणि तो एका मोठ्या रानामध्यें येऊन पोंचला. या रानांतून थोडा वेळ प्रवास केल्यानंतर त्यांस एक घर आढळलें. या घरामध्यें थोडा वेळ विश्रांति घेऊन नंतर पुढें जावयाचें असें जांघिळानें तीस सांगितलें. कांहीं वेळानें त्यांस एक ओढा लागला. तो ओढा उतरल्यानंतर थोड्याच वेळांत तीं दोघें त्या घरापाशीं येऊन पोंचलीं. जांघिळानें त्या घराच्या दारावर धक्की मारतांच आंतून एक म्हातारी बाहेर आली. ही म्हातारी जांघिळाच्या ओळखीची होती. म्हातारीनें जांघिळास ओळखिल्यावर तो त्या तरुणीसह कोठें जात आहे, याची तिनें साहजिकपणें चौकशी केली.

तिच्या प्रश्नाचें उत्तर देण्यापूर्वी जांघिळानें तिला कांहीं नेत्रसंकेत केला. आपला संकेत तिनें ओळखिला, अशी त्याच्या मनाची खात्री झाल्यावर तो तिला म्हणाला,–'आजीबाई, या बाईसाहेब म्हणजे वत्सपुरकर वृषपति महाराजांच्या नात आहेत. आपल्या मुक्कामावर जाण्यापूर्वी थोडावेळ येथें विश्रांति घ्यावी, असें यांच्या मनांत आहे.'

आपलें सुरकुतलेलें मुख जितकें प्रसन्न भासवितां येईल तितकें भासविण्याचा प्रयत्न करीत ती. थेरडी म्हणाली,–'राजकन्ये, तुझें स्वागत असो. तुझ्यासारख्या राजकन्येचे पाय माझ्या गरीबाच्या उंबऱ्यास लागले, हें मी माझें मोठें भाग्य समजतें.'

जांघिळानें विचारलें,–'बाई, आज तुझा मुलगा कोठें दिसत नाहीं! तो जर येथें असता, तर त्यानें आमच्या जनावरांची योग्य तरतूद केली असती.'

म्हातारी म्हणाली,–'माझा मुलगा अजून परत आला नाहीं. तरी पण घोडे कोठें बांधावयाचे हें तुला माहितच आहे.' नंतर ती प्रियंवदेला म्हणाली,–'ताईसाहेब, हा जांघिळ घोडे बांधील आपण घरांत यावें.'

वाचकहो, जांघिळ आणि प्रियंवदा हीं [illegible] कदाचित् एकादा वाटदोघें सध्यां कोठें आलीं होतीं, यासंबंधानें [illegible] यास येण्याचा संभव होता. पण आम्ही आपणांस गूढांत घालूं इच्छित नाहीं. [illegible] घरांत आल्यापासून माझ्या पूर्वी ज्या पडक्या घरामध्यें सरदार हलधर [illegible] रती सांपडली आहेस! इतका आणि सत्यरथ हे आले होते, त्याच घरामध्यें [illegible] आपल्या कपटावर झांकण सध्या जांघिळानें प्रियंवदेला आणिलें होतें. [illegible] पण आतां यापुढें मला आपलें तथापि वाचकांना एक गोष्ट येथें सांगणें [illegible] रूप तुला दाखवावयाचें आहे! अवश्य आहे. तीं ही कीं, सध्यांचा [illegible] ड पहातेस काय! अजून तुझा प्रसंग पूर्वीच्या प्रसंगापूर्वी घडून आला होता. [illegible] हीं काय!'

कथेच्या अनुरोधानें सरदार हलधर आणि [illegible] चें उग्र स्वरूप पाहून आणि सत्यरथ यांचें वर्तमान जसें घडून आलें [illegible] भाषण ऐकून प्रियंवदेची घाबरतसें आम्ही पूर्वी सांगितलें. परंतु जांघिळ [illegible] ळी. गयांवयां करून त्याची करुणा आणि प्रियंवदा त्या घरांतून सुखरूप बाहेर [illegible] सरीज आपली धडगत नाहीं, असें पडून गेल्यानंतर हलधर आणि सत्यरथ [illegible] च्या मनांत आलें, पण तितक्यांत त्या घरामध्यें आले होते. प्रियंवदा या [illegible] भिमान जागृत झाला. तिला मध्यें आल्यानंतर जो प्रकार घडून आला [illegible] पटाचा तिटकारा आला, आणि तो आम्हीं आतां सांगतों. म्हातारीनें प्रियं- [illegible] च पुरुषापुढें आपण मान खालीं वदेला आंत नेल्यानंतर तिला तिनें [illegible] हा मोठी दुःखाची गोष्ट आहे, असें खोलींत नेलें. थोड्या वेळानें घोंगडें [illegible] न तिला सांगूं लागलें. या प्रसंगी व्यवस्था लावून जांघिळ त्या खोलींत [illegible] डतां कामा नये, आलेला प्रसंग तो आंत आलेला पाहतांच म्हातारी [illegible] च पार पाडला पाहिजे, असें तिनें खोलींतून बाहेर पडली, आणि जांघिळ [illegible] ळें, आणि ती खाडकन् बसल्या जाग्या- मोठ्या जोरानें त्या खोलीचें दार बंद [illegible] उठून उभी राहिली. खऱ्या क्षात्र- घेतलें. दाराचा धाडकन् झालेला [illegible] तेजानें तिचे नेत्र चमकूं लागले, आणि कानीं पडतांच प्रियंवदा दचकली. [illegible] णखणित आवाजानें बोलली,—'जांघिळा, तिनें सहज जांघिळाकडे नजर [illegible] , रस्ता सोड! खबरदार माझ्या वाटेंत परंतु या वेळीं त्याची मुद्रा फार [illegible] वा येशील तर! मी आतांच्या आतां झालेली तिच्या दृष्टीस पडली. [illegible] न निघून जाणार!'

इतका वेळपर्यंत मोठ्या शिकस्तीनें [illegible] एकाद्या चवताळलेल्या वाघाप्रमाणें गुरमन आंवरून धरलें होतें, त्यामुळें [illegible] त आणि तिरस्कारयुक्त दृष्टीनें तिजतिच्या ध्यानांत आलें नव्हतें; परंतु [illegible] पाहत जांघिळ म्हणाला,—'मूर्ख पोरी, त्याची राक्षसी मुद्रा पाहून प्रियंवदा [illegible] ड्या अंतःकरणामध्यें द्वेषाग्नीच्या ज्वाला मध्यें चरकली, आणि कांहीं तरी [illegible] लल्या आहेत, आणि सूड उगविण्याच्या असें तत्काल तिच्या मनांत आलें. [illegible] मन भडकून गेलें आहे, तें तुझ्या [illegible] ल, असें कां तूं समजतेस! अत्यंत तीव्र आणि [illegible] जाऱ्यांत गुरफटविण्यासाठीं स्वरानें जांघिळ गुरगुरत म्हणाला, [illegible] त्न केले आहेत, जन्मापासून आतां यापुढें तुझ्याशीं दुटप्पीपणा [illegible] बोललों नसतां या प्रसंगीं ण्याचें किंवा तुला संशयांत ठेवण्याचें [illegible] सोडून देऊन आपल्या चरि- नाहीं. इतका वेळपर्यंत तूं [illegible]

त्रास कलंक लावण्यासारखें जें [illegible] होतों. आपल्या धन्यानें आपल्याला कितीही केलें आहे, तें तुझ्या पोकळ [illegible] पीडा दिली, मारिलें, उपाशीं ठेविलें, तरी भिऊन आयत्या वेळीं माघार [illegible] इमानी कुत्रा कधींही त्याजवर उलटून पडत केलें आहे, असें तूं समजतेस ? [illegible] नाहीं; तो उलट आपल्या धन्याचे पाय काय, पण महाराजाधिराजाची क[illegible] चाटितो, आणि लाडीगोही दाखवितो, त्या- म्हणून मी या प्रसंगीं तुझी पर्वा [illegible] माणें दोन दिवसांपूर्वी मला दृढसंध महा- तुला वाटतें ? तो दोन दिवसांपूर्वी [illegible] जांनीं चाबकाखालीं झोडलें असतें, तरी हा नव्हे ! गेल्या दोनच दिवसांत [illegible] तोंडावाटे एक अवाक्षरही काढिलें नसतें. सरळ स्वभाव पार नाहींसा होऊन [illegible] आजची स्थिति फार वेगळी आहे ! मी सध्यां दुष्टपणाचा मूर्तिमंत पु[illegible] न मी पिसाळलेल्या कुत्र्याप्रमाणें बनलों आहें, यांत काय तें समजून घे ! [illegible]. कुत्रा एकदां पिसाळला म्हणजे ज्या- प्रियंवदा मनांतून जरी घाब[illegible] प्रमाणें आपल्या यजमानाच्या हाताचाही तरी बाहेरून तसें दिसूं न देतां पू[illegible] हा तोडण्यास मागें घेत नाहीं, त्याप्रमाणें गंभीरपणानें आणि अधिकारादर्शक [illegible] माझी स्थिति झालेली आहे. माझें मन ती त्याला म्हणाली.—'जाधिळा, [illegible] इतकें बहकून गेलें आहे, तरी एक गोष्ट नीच बनला असशील, तुझ्या [illegible] माझ्या हातून कधींही व्हावयाची नाहीं. एकाएकीं इतका फेर पडला असेल, [illegible] आपला प्राण देईन, पण प्रतापपुरच्या मला अगदीं वाटत नाहीं. मी [illegible] आपल्या कृतीनें अरिष्ट आणणार त्याचें उत्तर तूं सरळ मनानें खरें खरें [illegible]. आज शत्रूचा विजय झाला, असें मेधा- अशी माझ्या मनाची खात्री आहे. खें[illegible] णीस मीं अस्खलित खोटें सांगितलें खरें, नारायणपुरकरांचा खरोखरच जय [illegible] केवळ आपला हेतु सिद्धीस जाण्या- नाहीं ना ? ' [illegible] सांगितलें होतें. तसें सांगण्यापूर्वी [illegible] सैनिक शत्रूचा पाडाव करून त्यांस विकट हास्य करीत जांधिळ बो[illegible] [illegible]ील. अशी माझ्या मनाची पूर्ण 'नाहीं. त्यांचा जय झाल्याचें वर्तमा[illegible] [illegible]ती. जर त्यासंबंधानें माझ्या मनास त्यावेळीं अस्खलित खोटें सांगितलें [illegible] शंका वाटली असती, तर मी अशा प्रकारें कपटाचरण करण्याचा जरी [illegible]ड उगविण्याची इच्छा बाजूला पूर्ण तिटकारा आहे, तरी द्वेषानें म[illegible] [illegible]ठेवून मरेपर्यंत शत्रूंशीं लढलों आपला अंमल बसविला असल्यामुळे [illegible] आणि जर शत्रु प्रतापपुरच्या दरी- स्वार्थ साधण्यासाठीं त्यावेळीं निवळ [illegible] तर त्यांस माझ्या प्रेतावर पाय मारिली होती ! तीन दिवसांपूर्वी तूं [illegible] [illegible]ति शिरावें लागलें असतें ; आ- बोल, नाहींतर तुझा प्राण घेतों, असें म[illegible] [illegible]चा पराभव होणार नाहीं, अशी जरी कोणी माझ्या मानेवर तरवार [illegible] [illegible]ची बालंबाल खात्री असल्यामुळें असती, तरी मीं आपली मान खुशीनें दि[illegible] [illegible]ध्य होण्यासाठीं मी त्या वेळीं असती, पण सत्य सोडलें नसतें ! पण [illegible] [illegible]न खोटें बोललों होतों ! ' तो मनु पालटला ! माझ्या अ[illegible] [illegible]चें भाषण ऐकून प्रियंवदेच्या भयंकर बदल झाला आहे [illegible] [illegible]थोडीशी आशा उत्पन्न झाली. मी मनुष्य होतों, पण आ[illegible] [illegible]ी आणि त्याची अगदीं फारसत आहें. दोन दिवसांपूर्वी म[illegible] [illegible] असें मनांत येऊन तिला फार जांचा इमानी कुत्र्याप्रमाणे [illegible]

आनंद वाटला, आणि सध्यां जर आपण जरा दमानें घेतलें, तर अजूनही त्याची सुबुद्धि जागृत होईल अशी कल्पना तिच्या मनांत येऊन ती म्हणाली,–'अशी ती तुझी युक्ति तरी कोणती! तुझ्या मनांत आहे तरी काय? तूं माझा असा छळ कां बरें करीत आहेत! जांघिळा, ईश्वरास स्मरून सांग, मीं तुझा कोणता अन्याय केला!

जांघिळ पूर्ववत् कठोर वाणीनें बोलला,–'माझी युक्ति कोणती हें तूं विचारतेस? तुझ्यासारख्या चाणाक्ष मुलीला माझी युक्ति काय आहे, हें केव्हांच उमगलेलें असेल! पोरी, माझें मन असें दुष्ट बनावयास काय कारण घडलें, मला दुष्ट कोणीं बनाविलें, आणि तुझ्याशीं मी अशी वर्णणूक कां करतों, याचें कारण तुला मीं स्वतः स्पष्ट करून सांगितलें पाहिजे काय? जरा सावकाशपणें विचार कर! या जांघिळाविषयीं काल सकाळपर्यंत सर्व भिल्लांचें मत कसें होतें? माझा पराभव यापूर्वीं कधीं झाला होता काय? किंवा द्वंद्वयुद्धांत माझा कोणी पराभव करील, असें यापूर्वी कधीं कोणाच्या स्वप्नांत तरी आलें असेल काय! मी प्रतिष्ठेच्या शिखरावर बसलों असतां तेथून मला कोणीं खालीं ढकलून दिलें! माझा अपमान कोणीं केला! माझ्या नांवाला कलंक कोणीं लाविला? माझ्या तोंडास काळें कोणीं फांसिलें? मला धुळीला कोणीं मिळविलें? माझ्यावर विनाकारण आग कोणी पाखडिली? मला खोटा कोणीं पाडलें? आजपर्यंत या जांघिळाच्या प्रत्येक शब्दावर सर्व लोकांचा पूर्ण विश्वास होता; पण आतां यापुढें मी धडधडीत खोटें बोलणारा आहें, असें जरी लोकांनीं उघड उघड म्हटलें नाहीं, तरी मी भ्रमिष्ट आहें, आणि भ्रमामध्यें केव्हां केव्हां वरळत असतों, असें समजून माझ्या बोलण्यावर कोणी विश्वास ठेवणार नाहीं. म्हणून विचारतों, या जांघिळाचा मान, कीर्ति, विश्वास, आणि भलाई यांचा नाश कोणीं

केला? हें सर्व तूं ज्यावर प्रेम करतेस, त्या शेवरीनेंच घडवून आणिलें नाहीं काय?'

टोचून बोलण्याच्या स्वरानें प्रियंवदा म्हणाली,–'आपणास स्वामिभक्त म्हणविणाऱ्याच्या मुखांतून असले उद्गार येतात तरी कसे!'

तें जांघिळ बोलला,–'त्या दुष्टाला मी आपला स्वामी असें मुळींच समजत नाहीं! फार तर काय, त्याचें नांव माझ्या कानीं पडलें, म्हणजे शिशाचा रस कानीं ओतल्याप्रमाणें मला वेदना होत असतात. जो आपल्या सेवकाची अप्रतिष्ठा करतो, त्याला धनी कोण म्हणेल? परवांपर्यंत मी त्याला आपला धनी असें समजत होतों, आणि वेळ पडली, तर त्याच्यासाठीं प्राण देण्यास मी तयार झालों असतों; पण आतां? त्याच्या मरणानें त्याच्या मातापितरांस दुःख होईल, एवढ्यासाठींच मी त्याचा एकदम प्राण घेऊं इच्छित नाहीं. मला जो त्याचा सूड उगवावयाचा आहे, तो त्याला मरणाहून अधिक वाटेल! माझा पराभव केला म्हणून तो आपणास मोठा पराक्रमी समजत असेल! पण माझा पराभव कां झाला? द्वंद्वयुद्धाच्या वेळीं माझें मन जर थाऱ्यावर असतें, तर त्या क्रालच्या दुधखुऱ्या पोराच्या हातून माझा पराभव झाला असता काय? माझें मन थाऱ्यावर कां नव्हतें, याचें कारण तुला ऐकावयाचें आहे काय? ऐक तर! आपण आजपर्यंत ज्याला हातासांद्यावर खेळविलें, त्या कोंवळ्या पोराचा प्राण घेण्यास माझें मन सर्वस्वी धजेना. परंतु प्रसंग पडला मोठा चमत्कारिक! तो तर माझ्या कीर्तीवर पाणी सोडण्यास तयार होऊन माझा हाडवैरी बनून माझ्याशीं युद्धास सिद्ध झालेला! त्याचीं प्राण घेतला तर स्वामिभक्तीस बट्टा लागतो; न घेतला तर अपकीर्ति होते, अशा प्रकारच्या विचारांमुळें युद्धाचे वेळीं माझें मन थाऱ्यावर नव्हतें.–त्या नीचानें

द्वंद्वयुद्धाचे वेळीसुद्धां मला टोंचून बोलण्यास कमी केलें नाहीं.'

'प्रियंवदा मोठ्या अभिमानानें आणि आवेशयुक्त वाणीनें म्हणाली,–'हें तुझें भाषण साफ खोटें आहे! अशी गोष्ट त्यांच्या हातून कधींही व्हावयाची नाहीं, अशी माझ्या मनाची पूर्ण खात्री आहे!'

या वेळचा तिचा अभिमान आणि आवेश पाहून जांघिळाला थोडें चमत्कारिक वाटलें, आणि तो म्हणाला,–'तुझी खात्री असेल, पण निदान मला तरी त्या वेळीं तो टोंचून बोलत आहे असें वाटलें, यांत शंका नाहीं! तीं गोष्ट सोडली, तरी त्यानें माझी फजिती केली आहे, माझें नांव बदू केलें आहे, यांत मात्र शंका नाहीं. मी आतां पूर्वीचा माणूस राहिलों नाहीं! फक्त एक सूड-भयंकर सूड मात्र माझ्या डोळ्यांपुढें दिसत आहे! कांहीं झालें, तरी मी त्याचा सूड घेणारच!'

खालीं मान घालून केविलवाण्यास्वरानें प्रियंवदेनें विचारलें,–'हें तुझें सर्व भाषण खरें आहे, असें जरी गृहीत धरून चाललें, तरी तूं माझा छळ करावा, हें मात्र कधींही योग्य होणार नाहीं!'

जांघिळ मोठ्यानें ओरडून म्हणाला,–'कां नाहीं होणार! तूं शेखराची आवडती नाहींस काय? एक वेळ त्याचें देवदर्शन चुकेल, पण तुझें दर्शन चुकणार नाहीं, इतकी त्याची तुजवर प्रीति आहे. अबू आणि कीर्ति यांजवर जशी माझी प्रीति होती, तशी त्याची प्रीति आज तुजवर आहे. त्यानें जशी माझी अबू नाहींशी केली आहे, आणि माझ्या कीर्तीला कलंक लाविला आहे, तशी मी तुझी, अबू नाहींशी करणार, आणि तुझ्या कीर्तीला कलंक लावून सूड उगविणार!, त्यानें जशी माझ्या आवडत्या गोष्टीची नासाडी केली आहे, तशी मीही त्याच्या आवडत्या गोष्टींची नासाडी करणार, यांत वावगें तें काय आहे?

हे त्याचे शब्द ऐकून प्रियंवदेचा सर्व अभिमान नाहींसा झाला, आणि ती अगदीं घाबरून गेली. ती हात जोडून त्याला म्हणाली,–'मजवर दया कर! मी तुझ्या पायां पडतें!' असें म्हणून त्या राजकन्येनें त्याला साष्टांग नमस्कार घातला!

आपल्यापुढें एकादी स्वर्गांतील अप्सराच उभी आहे, असें त्याला वाटूं लागलें. तिचे ते सजल नेत्र, कावरीबावरी आणि दुःखयुक्त मुद्रा, आणि भीतीनें कंप पावणारें शरीर पाहून त्याचें मन थोडेंसें द्रवल्यासेवीज राहिलें नाहीं. वास्तविक म्हटलें तर जांघिळ हा कांहीं स्वभावतः दुष्ट मनुष्य नव्हता. तो मोठा सदाचरणी असून पुष्कळ चांगले गुण त्याच्या अंतःकरणांत वास करीत होते. तो जरी शूर होता, प्रसंगीं रक्तपात करण्यास त्याला जरी दिक्कत वाटत नसे, त्याच्या देहाप्रमाणें जरी त्याचें मन खंबीर होतें, तरी यापूर्वी कधीं त्यानें आपल्या शक्तीचा उपयोग अन्यायाचे कामीं केलेला नव्हता. तो जरी गनटी भिल्ल होता, तरी जन्मापासून राजकुलाशीं त्याचा संबंध असल्यामुळें सत्यविषयक आणि ईश्वरविषयक कल्पनांचा त्याच्या मनामध्यें प्रादुर्भाव झालेला होता. ज्याप्रमाणें माणकें कोळशांत निर्माण होतात, त्याप्रमाणें तो भिल्ल-कुलांत जन्माम आलेला होता. प्रियंवदेची दीन मुद्रा पाहून त्याच्या मनांतील द्वेषबुद्धीवा दयेचा पगडा बसला. आपल्यासारख्या वीरानें एका दुर्बल कुमारिकेचा अशा रीतीनें छळ करावा, हा अन्याय आहे-अपराध आहे-हें पाप आहे-असें त्याच्या मनांत आल्यावांचून राहिलें नाहीं. पण तितक्यांत त्याचें मन पालटलें, त्याच्या मनांतील द्वेषबुद्धीनें उचल केली, आणि हें पापकर्म करावयास तो पुनः प्रवृत्त झाला. आपल्या पायांपाशीं पडलेल्या त्या कुमारीचा हात धरून त्यानें तिला वर उचलिलें, आणि गुरगुरत म्हणाला,–'कारटे, तुझ्या बा असल्या

सोंगांनीं माझें मन द्रवेल असें तुला वाटत असलें, तर ती तुझी चूक आहे! मी आतां तुला अगदीं स्पष्ट सांगतों, मी तुला आपलीशी करून घेऊन त्या कारट्याचा मूड उगविण्याचा निश्चय केला आहे; मी तुला या रानांतील एकांतवासाच्या पडक्या घरामध्यें आतां भ्रष्ट करणार! यासाठीं फारशा गमजा न करतां तूं मुकाट्यानें माझ्या स्वाधीन हो!'

हें त्याचें भाषण ऐकून प्रत्यक्ष वज्रपात झाल्याप्रमाणें ती एकदम खालीं पडली! तिनें आपले दोन्ही हात आपल्या तोंडावर धरिले व पुनः त्या राक्षसाचें आपल्यास दर्शन देखील होऊं नये, म्हणून तिनें आपलें तोंड बाजूस फिरविलें!'

कांहीं वेळ तिच्याकडे निरखून पाहून झाल्यावर तो बोलला,-'कारटे, तूं माझा तिरस्कार करतेस काय? तो दुधखुळा टारगा पोर तुला मजहून अधिक आवडतो! त्या टारग्या कारट्यानें माझा पराभव केला, म्हणून तूं मला त्याच्यापेक्षां कमी समजतेस! होय; असेंच असलें पाहिजे. मला जो मोठा राग आला आहे, आणि अपमान वाटत आहे, तो याच गोष्टीचा! मला जर माझ्यासारख्या एखाद्या धिप्पाड वीरानें द्वंद्वयुद्धास बोलाविलें असतें, आणि त्यानें माझा पराभव केला असता, तर त्या गोष्टीचा मला तितका खेद झाला नसता, त्याला मोठा पराक्रमी वीर समजून तो आपल्या बरोबरीचा आहे असें मी मानिलें असतें, आणि त्याला मोठा मान दिला असता. त्यानें माझा पराभव केला, म्हणून मी त्याच्याशीं वैर केलें नसतें. पण त्या कालच्या पोरानें, त्या लिदपिट्या कारट्यानें, त्या खुजट कुकूबाळानें माझा पराभव केला, म्हणून माझा जीव एकसारखा तळमळत आहे. माझ्या मनांत वैराग्नि पेटला आहे, तो तुझी आहुति घेतल्याखेरीज शांत होणार नाहीं!'

असें बोलून जांघिळ एकदम थांबला. त्याच्या मनाचा अतिशय क्षोभ झाला असल्यामुळें त्याच्यानें अधिक बोलवेना. तो त्या खोलींत पिंजऱ्यांत कोंडून ठेवलेल्या वाघाप्रमाणें इकडून तिकडे खेपा घालूं लागला. आतां आपण पुढें काय करावें, याचा प्रियंवदेला मोठा विचार पडला. तिच्या अंगीं निनक्यांनव्या निनक्यांन धैर्य आलें आणि गेलें असें एकदोन वेळ झालें. तिनें एकवार जांघिळाकडे लक्ष्यपूर्वक पाहिलें, त्या वेळीं तो जरी अजून क्रुद्ध दिसत आहे, तरी मनांत जाचत असलेल्या गोष्टी तो भराभर बोलून गेला असल्यामुळें त्याच्या क्रोधाची पूर्वीची तीव्रता पुष्कळच कमी झाली आहे, असें तिला आढळून आलें, आणि तिला पुनः अवसान आलें. ती उठून उभी राहिली आणि त्यास म्हणाली,-'जांघिळा, तूं खरा शूर पुरुष आहेस, अर्थात् तुझ्या अंगच्या शौर्याला शोभेल असेंच असलें [illegible]

या तिच्या भाषणाचा जांघिळाच्या मनावर मोठा विलक्षण परिणाम झाला. [illegible] डून तिकडे खेपा घालीत होता, तो [illegible] थबकला, त्याची मुद्रा गोंधळल्या [illegible] सारखी दिसूं लागली, आणि [illegible] दृष्टीनें प्रियंवदेकडे पाहूं लागला.

प्रियंवदा ही मोठी चाणाक्ष [illegible] त्याचें मन ओळखलें. आपण अग[illegible] जिव्हाळ्यास झोंबण्यासारखें भाषण केलें, [illegible] तिनें ओळखलें, आणि ती पुढें म्हणाली,-"जांघिळा, जे शूर पुरुष असतात, ते अबलांचा छळ कधींही करीत नाहींत! द्वेषबुद्धीनें मन भडकल्यामुळें आपल्या हातून वाटेल तो अन्याय घडेल, असें तुला वाटलें होतें; आणि तूं या नीच कृत्यास प्रवृत्त झाला होतास; पण तुझ्यासारख्या शूराच्या हातून असलें पापकृत्य कधींही घडून यावयाचें नाहीं. असलें नीच कृत्य करण्यासाठीं तुझे हात वाहणार नाहींत, ही माझी खात्री आहे. ज्यांना आपल्या शौर्याची किंमत

समजत नाहीं, तेच असलीं नामर्दपणाचीं कृत्यें करण्यास प्रवृत्त होत असतात !'

किंचित् थंड पडून जांघिळ म्हणाला,–'जे अत्यंत शूर असतात, त्यांच्याच हातून विशेष प्रसंगीं अशीं नामर्दपणाचीं कृत्यें होत असतात. जे अगदीं जिवलग मित्र असतात, तेच विशेष प्रसंगीं हाडवैरी बनतात !'

गोड परंतु अभिमानयुक्त स्वरानें प्रियंवदा म्हणाली,–'पण तूं त्यांतला नव्हे ! तुझ्या हातून असलें कृत्य होणार नाहीं, ही माझी खात्री आहे !'

आपलें अंतःकरण द्रवत आहे, आपला क्रोध शांत होत आहे, आपला द्वेष नाहींसा होत आहे, ही गोष्ट त्याच्या ध्यानीं आली, आणि आपलें मन कठोर करण्यासाठीं तो म्हणाला,–'छे छेः; ही तुझी अगदीं चूक आहे ! तुला माझ्या स्वभावाची अगदीं परीक्षा नाहीं ! तूं माझें मन अगदीं [illegible] नाहीस ! मला सूड उगवावयाचा [illegible] मी तो उगविणार ! तथापि [illegible] तूं ऐकून घे. मी आतां [illegible] शोधी होतों, त्यांतील कोणती [illegible] पसंत केलींच पाहिजे !'

[illegible]या भाषणानें अंतःकरणांत आशा [illegible]न प्रियंवदा म्हणाली,–'बोल [illegible] काय म्हणतोस, तें मला समजूं दे !'

[illegible] चटकन बोलला,–'मी जें कांहीं [illegible] आहें, तें अगदीं सोपें असेल, असें [illegible] समजूं नको ! माझे शब्द ऐकून तुझें हृदय फाटून जाईल ! तुझ्या गोड गोड भाषणांनीं मी नरम पडलों असेन, असें मात्र समजूं नको. सूड तर मी घेणार; पण तो या नाहीं त्या कोणत्या तरी मार्गानें घेणारच ! मी तर आतां प्रतापपुराचा त्याग केलाच आहे ! माझें तोंड आतां पुनः प्रतापपुराच्या रहिवाश्यांच्या दृष्टीस पडावयाचें नाहीं, हेंही ठरलेलें आहे ! मी आपल्या जन्मभूमीचा–ज्या जन्मभूमीपुढें मी इंद्राचें नंदनवन देखील तुच्छ समजतों, त्या जन्मभूमीचा–मीं त्याग केला आहे ! आतां मला आपला सर्व जन्म पृथ्वीच्या पाठीवर भटकत फिरत घालवावा लागणार ! माझ्यावर जर आतां असा प्रसंग आला आहे, तर मी तरी आपल्या मनांतील सूड घेण्याची इच्छा दडपून कां ठेवावी ? त्या दुष्टानें केलेल्या अपराधाचें उसनें मी आतां कां फेडून घेऊं नये ? मी तें फेडून घेणार, कसें तें—'

हे त्याचे निष्ठुरतेचे शब्द ऐकून प्रियंवदेचा पुनः धीर सुटला; ती भयानें आपल्या जाग्यावरून चार पावलें मागें सरकली; व तिचे पाय थरथर कांपूं लागले.

जांघिळ गर्जना करीत म्हणाला,–'माझे सूड घेण्याचे दोन मार्ग कोणते, ते तुला सांगतों. एक मार्ग हा कीं, मी आतां येथून तडक सुंदरपुरच्या रणभूमीवर जातों, आमच्या सैन्यामध्यें मिसळून युद्धाच्या गर्दीत शेखराला गांठतों, आणि संधि साधून त्याचा तरवारीच्या एका घावाबरोबर प्राण घेतों.'

प्रियंवदा त्याच्या पायांवर लोळण घेत म्हणाली,–'नको नको ! जांघिळा, असें बोलूं देखील नको ! अरे देवा ! मी हें काय ऐकतें ? मी स्वप्नांत तर नाहींना ?'

जांघिळ ओरडून म्हणाला,–'तूं स्वप्नांत नाहींस–चांगली जागी आहेस ! आणि जें कांहीं ऐकलेंस तें अगदीं खरें आहे. सूड घेण्याचा माझा एक मार्ग मी तुला सांगितला. दुसरा मार्ग कोणता हें मीं तुला पुनः सांगण्याची जरूरच नाहीं. तो तुझ्या ध्यानांत आलेलाच आहे. तुला आपलें पावित्र्य पाहिजे असेल, तर मी शेखराचा प्राण घेईन, आणि शेखराचा प्राण वांचावा अशी तुझी इच्छा असेल, तर तुला आपल्या कौमार्यावर पाणी सोडलें पाहिजे. हे दोन मार्ग तुजपुढें आहेत, यांतला तुला कोणता पसंत आहे ? बोल !'

ती बिचारी कुमारिका काय बोलणार ? तिच्या मुखानें कोणतें उत्तर बाहेर पडणें

शक्य होतें ? तीं अगदीं गोंधळून [illegible] राच्या रक्षणासाठीं आ[illegible] गेल्या-
स्तब्ध उभी राहिली होती. एका बाजूला [illegible] पाणी सोडण्यास नाइलाज [illegible] तयार [illegible]
आड आणि दुसऱ्या बाजूला विहीर नाहीं, हीं आतां आपणांस तसे शब्द उच्चा-
अशी तिची स्थिति झाली होती. अशा त्यांचे भाषण या कल्पनेनेंच तिच्या डो[illegible]
स्थितींत थोडा वेळ गेल्यावर ती म्हणाली,– पुढें अंधेरी आली. तिच्या डोळ्यां[illegible]
'दयाकर, दयाकर ! मी तुझ्या पाय[illegible], तिचें मस्तक [illegible]
असलें निष्ठुरपणाचें कृत्य तुझ्या हा[illegible] च्छिन्न होऊन त्य[illegible]
नाहीं ! आमचें दोघांचेंही रक्षण [illegible] कन कोसळलीं[illegible]

'जांघिळ म्हणाला,–'तें कां[illegible]
दोन मार्गांपैकीं एक तूं पसंत केला पाहिजे !'

प्रियंवदेनें निराश होऊन त्याला विचारलें, 'मी
'तुला नुसता सूड उगवावयाचा आहे, की पना
रक्तपात करावयाचा आहे ? तुला रक्तपातच [illegible]चें का
करावयाचा असेल, तर तुझा तो संजीर [illegible]टीस इ
इकडे कर ! मी तो आपल्या छातींत खुप- [illegible]रें अर्ध घटिकेच्या आंतच प्रियंवदा
सून घेऊन तुझी रक्तपाताची इच्छा पूर्ण [illegible] आली. आपण एकाया भयंकर
करितें ! पण आपल्या तरवारीवर हा[illegible] असून किंवा आपल्या पुढें एकादा
शपथ घेऊन त्यांच्या एका केसासहि[illegible] देखावा दिसत असून तें स्वप्न किंवा
लावणार नाहीं, असें मला मरतांन[illegible] जागेसमोरून हळूहळू
दे ! ' असें बोलून त्यांच्या कमरेचा संजी[illegible] नाहींसा हो[illegible] तिला वाटत होतें.
काढून घेण्यासाठीं ती पुढें सरसावली. तिनें हळू[illegible] घडिले, आणि
ती आपल्या [illegible], [illegible] निरखून पाहूं
जांघिळ गुरगुरत म्हणाला,–'चलण्यास लागली. त्याच[illegible] कोठें आहों,
हो ! तुझा प्राण घेण्याची माझी इच्छा [illegible]ळें, आणि मर्च्छित पड[illegible] य चालले होतें,
मीं तुला दोन गोष्टी सांगितल्या आहेत, [illegible] स्मर[illegible]ळें आणि तिच्या
त्यांतली एक पसंत कर ? चल आटप ! [illegible]कांटा उभा राहिला. तिनें जांघिळा-
[illegible]र टाकिली, पण चमत्कार काय
प्रियंवदेनें रडत रडत विचारलें,– [illegible] तो एकाद्या पोराप्रमाणें ढळढळां
माझी अगदीं दया येत नाहीं काय ?' [illegible], असें तिला आढळून आलें !
जांघिळ बोलला,–'नाहीं ! माझ्या म[illegible] शुद्धीवर येऊन आपणांकडे पाहत
पुरा निर्धार झाला आहे ! बोल, तुला को[illegible] ध्यानीं येतांच त्या धिप्पाड पुरुषानें
मार्ग पसंत आहे ?' [illegible] पुशिले, आणि गंहिवरलेल्या
[illegible] तिला म्हणाला,–'ताईसाहेब, भिऊं
प्रियंवदा दुःखावेगानें म्हणाली,– [illegible] नको ! मी आतां यापुढें तुमच्या एका केसालाही
अर्थी या दोन गोष्टीं पैकीं एक मी [illegible] धक्का लावणार नाहीं ! मी शपथ वाहून सांगतों,
करणें भाग आहे, त्या अर्थी त्यांच्या [illegible] मीं मला आपल्या दुष्ट वर्तनाचा तिटकारा
केसासही धक्का पावणार नाहीं, अशी [illegible] ाला आहे. पश्चात्तापानें माझें अंतःकरण
तरवारीवर हात ठेऊन शपथ घेत असशील [illegible] ंत आहे. यापुढें मी आपला दासानुदास
तर–तोच मार्ग मी–'

यापुढें तिच्या मुखानें शब्द निघेना ! [illegible]
तसले शब्द तिच्या मुखानें निघणें शक्यच [illegible]
नव्हते ! फार काय सांगावें, ती आपल्या [illegible]

प्रकरण २१ वें.

जांघिळ आणि प्रियंवदा–पुढें चालू.

समजत नाहीं, [illegible] शब्द ऐकतांच [illegible] रुल्यें जिवांतजीव आला, तिला आपल्याच [illegible] शासंकट झाल्यासारखें वाटलें, अ[illegible]हणाली,- [illegible] आशा उत्पन्न झाली. [illegible]च्याच हातून [illegible]नें तो मनापासून बोलत आहे [illegible]या पोटांत कपट आहे [illegible] [illegible]तनें एकदां त्या[illegible] [illegible], [illegible]ळेळीं त्याची मुद्रा [illegible] [illegible]पयुक्त दिसत [illegible] [illegible]चा मागमूस [illegible]सला त्या वेळी त्याच्या मुद्रेवर दिसत नव्हता. हें पाह त्याचे उपकार मानावे, आणि त्याचा भला करावा, असें एकदां तिच्या मनांतल्याहीमा पण तितक्यांतच अशा वेळीं त्याची भाळा, स्तुति केल्यास त्या स्तुतीचा परिणाम कदा तो विपरीत होण्याचा संभव आहे, असें [illegible] मनांत येऊन ती उगीच बसली.

जांघिळे पुढें म्हणाला,- [illegible] आपल्याला आतां [illegible] त्राम होणार नाहीं [illegible] णक केली, [illegible] म्हणून मला [illegible] मला खरा [illegible] तुमच्या पायां [illegible] सर्व अपराधांची क्षमा [illegible]! आतां,- बोल होऊन पडलां, हे पाहून मला [illegible] वाटलें; तुमच्या धैर्याचें आणि [illegible] मोठें आश्चर्य वाटलें, अशा प्रकारच्या मनाच्या आणि प्रेमळ राजकन्येला देण्याची मला बुद्धि झाली, ही [illegible] माझ्या हातून घडली याचा मला [illegible] झाला; आणि माझें मलाच [illegible] लागलें. ईश्वरानें माझें आणि [illegible] करण्यासाठीं एक देवदूत येथें पा[illegible] आणि त्या देवदूतानें माझ्या शरीरांत भरलेल्या राक्षसाला पळवून लाविलें. खरेंच सांगतों, माझ्या अंतःकरणांतील द्वेषबुद्धि या प्रसंगानें अगदीं नाहींशी होऊन माझें मन पूर्वीप्रमाणें अगदीं निर्मळ झालें आहे.

तेव्हां [illegible] म्हणाली,- 'असें जर खरोखरच तुला वाटत असेल, तर पश्चात्तापानें तुझें अंतःकरण निर्मल होईल. परमेश्वरानें तुला सद्बुद्धि दिली, हे त्याचे आपणां उभयतांवर मोठे उपकार आहेत.'

प्रिंस म्हणाला,- 'अर्जुन माझ्याविषयीं [illegible]या मनांत संशय राहिला असेल [illegible] वाटेल ती आज्ञा करा, आणि ती [illegible] मी किती तत्पर आहें, हें पहा! याहून अधिक मी काय बोलूं?'

प्रियंवदेनें थोडा वेळ थांबून पुढें काय करावें, याचा विचार केला. तिच्यापुढें सध्यां तीन गोष्टी दिसत होत्या. पहिली गोष्ट ही कीं, आपण एकदम येथून निघून आपल्या पित्याकडे जावें; दुसरी गोष्ट ही कीं आपण परत प्रतापपुरीं जाऊन मेधावतीची [illegible] दूर करावी; आणि तिसरी गोष्ट ही [illegible]पण आजची रात्र येथेंच घालवून [illegible] उजाडल्यावर काय तें करावें. वत्सरीं मध्यां काय चाललें असेल, तेथील परि[illegible]स्थिति काय असेल, हें समजल्याशिवाय [illegible] पित्याकडे जाणें धोक्याचें आहे, म्हणाली बोलूं देवच्या मनांत आलें. त्याचप्रमाणें ज्या ऐकतें वासाच्या घरामध्यें जांघिळानें आपआस आणलें, त्या घरामध्यें जांघिळासह [illegible] रात्र काढणें हें आपल्या अब्रूस चट्टा [illegible]णारें आहे, असें तिला वाटलें; पण [illegible]ळीं-रात्रीच्या प्रसंगीं-प्रतापपुरास परत [illegible]साठीं निघाल्यास तेंही शक्य नाहीं; [illegible] आपल्या अंगांत इतका प्रवास करण्याची ताकद नाहीं, ही गोष्ट तिच्या डोळ्यांपुढे धडधडीत दिसत होती. अशा प्रकारें [illegible] मनाचा गोंधळ उडाला असल्यामुळें [illegible] कांहींच ठरवितां येईना. शेवटीं ती म्हणाली,- 'जांघिळा, तुला खरोखरच पश्चात्ताप झाला असेल, तर मी तुझ्यावरचा राग आपल्या मनांतून काढून टाकितें. आज दोन दिवस तुझ्या मनाची जी स्थिति झाली असेल, तिचा विचार करतां तुझ्या [illegible]न

अशी गोष्ट घडून आली, याबद्दल तुजवर कोप न करितां तुझी कींव करावी, हेंच योग्य आहे. जर तुला खरोखर पश्चात्ताप झाला असेल, तर आजची रात्र मी या घरांत घालविणें योग्य आहे कीं नाहीं, हें प्रथम मला सांग पाहूं ?'

जांघिळानें उत्तर दिलें,–' माझ्या समजुतीप्रमाणें या घरांत आजची रात्र आपण घालविण्यास कांहीं हरकत नाहीं. जी म्हातारी तुला थोड्या वेळापूर्वी येथें भेटली, तिचे हें घर असून ती आपल्या एका मुलासह या घरांत राहात असते. मी या प्रदेशामध्यें कधीं शिकारीस आलों असतां किंवा या प्रदेशाची टेहळणी करावयास आलों असतां याच घरांत कांहीं वेळ घालवितों, त्यामुळें माझी येथें थोडीशी ओळख आहे.'

एवढ्यावरून तिच्या मनाचें समाधान न होतां तिनें पुनः विचारलें,–' तुला जर या घराची इतकी अल्प माहिती आहे असें सांगतोस, तर ही म्हातारी आणि तिचा मुलगा तुला येथें हवें तें करावयास देतील असें तुला कशावरून वाटलें ?'

तिचा आपल्यावर अजून देखील विश्वास बसत नाहीं, याचें त्याला फार वाईट वाटलें, आणि तो म्हणाला,–' ताईसाहेब, मी अगदीं ईश्वरसाक्ष खरें तेंच सांगत आहे. हे लोक फार गरीब आहेत, हें यांच्या या झोंपड्यावरून आपल्या ध्यानीं आलेंच असेल. हो बाबा पैशाची लोभी आहे. हिच्या हातावर दोन मोहरा टाकल्यास आपल्या घरांत णारांनीं कांहीं केलें तरी ती तिकडे देणार नाहीं, अशा कल्पनेनें मी आलों होतों. ही माझी कल्पना असती, तर मी तिला कांहीं तरी मारून तिचें समाधान केलें असतें. येतांच तिला खूण केली आणि तिची समजूत पडली. या घरास आणखी कोणत्याही प्रकारची या घरांत रात्र काढाव्याची इच्छा असेल, तर मी येथें दरवाज्याबाहेर पाहरा करीत बसतों. माझा प्राण गेल्याखेरीज आपल्या एका केसालाही धक्का लागणार नाहीं, ही आपली खात्री असूं द्या !'

हें त्यांचें भाषण अगदीं मनापासून आहे, असें प्रियंवदेच्या ध्यानीं आलें; आणि तिनें त्याच्या घरामध्यें रात्र घालवून मोठ्या पहांटेस प्रतापपुरचा मार्ग धरावयाचा निश्चय केला.

मग ती त्याला म्हणाली,–' तुला रात्रभर जागें राहावें लागणार असेल, तर या घरांत राहूं नये असें मला वाटतें; पण ज्या अर्थीं हीं माणसें गरीब आहेत अशी तुझी कल्पना आहे, त्या अर्थीं तुला जागत बसण्याचें कारण नाहीं. तूं स्वस्थ झोंप घे. पहांटेस उठून आपण प्रतापपुरचा मार्ग धरूं.'

त्या खोलींतून बाहेर जात असतां जांघिळ तिला म्हणाला,–' ताईसाहेब, माझा अपराध फारच भयंकर आहे, म्हणून माझ्या [illegible] क्षमा करून आपण तो [illegible] अशी विनंति करण्यास मला [illegible] तरी त्यांमुळ्यांतील [illegible] आपलें मन मंजूर [illegible] देऊं नये,

प्रि [illegible]

जां [illegible]

म्ह [illegible]

आणि तिला थोडें समाधान वाटलें. या खोलीचें आणि तेथील खाटल्याचें वर्णन आम्हीं पूर्वी केलें आहे, तें वाचकांच्या लक्ष्यांत असेलच.

म्हातारीनें दाखविलेल्या खाटल्यावर प्रियंवदा हुंडली खरी, पण अशा प्रकारच्या परिस्थितीचा तिला कधींही अनुभव नसल्यामुळें अनेक प्रकारचे विचार-तरंग तिच्या मनांमध्यें सुरू झाले. आपण या झोंपड्यांत वस्तीस राहिलों, हें चांगलें नाहीं; यापेक्षां आपण एकदम प्रतापपुरचा मार्ग धरिला असता तर ठीक झालें असतें, असें तिच्या मनांत आलें. परंतु जरी आपण रात्रीच्या वेळीं प्रवास केला असता, तरी आपणास जांघिळाच्या सोयतीनेंच जावें लागलें असतें; त्याच्याच संगतीनें रात्र घालवावयाची, मग ती रस्त्यांत-जंगलांत घालविण्यापेक्षां निंदान ोन माणसें जेथें आहेत, अशा घरांत बरें, असें मनांत आणून तिनें कसें- ार्चें समाधान करून घेतलें. ांत विचारांचें काहूर ेळे मिसळे आणि स्थितींत हुतेक ल- ों

दरदरून घाम सुटला आणि तिची बोबडी वळली. आपण मोठ्यानें ओरडावें असें तिच्या मनांत आलें, पण तिच्या मुखांतून शब्द निघेना; इतकेंच काय, पण आपल्या अंगावर कोणी मंत्र टाकून आपणांस भारलें असल्यामुळें आपले सर्व अवयव अगदीं लटके पडले आहेत असा तिला भास झाला! आपणाकडे येत असलेल्या भयंकर आकृतीकडे आपण नुसतें पहात राहण्यास मात्र समर्थ आहों, असें तिला वाटूं लागलें. ती आकृति एकाद्या स्त्रीची आहे, कीं पुरुषाची आहे, हेंही तिला उमगेना. ती आकृति अगदीं आपल्या खाटल्यापाशीं आली असून ती आपला हात पुढें करीत आहे, असें तिला दिसलें. यावेळीं तिच्या अंतःकरणांत जी भीति उत्पन्न झाली, तिला सीमाच नव्हती! त्या आकृतीनें पुढें पसरलेला हात आपल्या मुखावर ठेविला आणि त्याचा स्पर्श अगदीं थंडगार, जणुंकाय एकाद्या प्रेताच्या हाताप्रमाणें तिला भासला. त्या प्रेतवत् हातानें आपल्या कानावर आलेल्या केंसांच्या बटा बाजूस केल्या, आणि त्याचा स्पर्श आपल्या कानांतील अलंकारास झाला, असें तिला वाटलें. त्या हातानें कानांतील अलंकार चांचपून पाहिल्यावर तो गळ्याकडे वळला आणि गळ्यांतील अलंकारही त्यानें तपासिले. नंतर तो हात आपल्या हाताशीं आला आणि तो आपल्या बोटांतील ओढीत आहे, असें तिला वाटलें. मात्र तिच्या भीतीचा कळस झाला स्वप्नामध्यें इतकी भीति वाटल्यानंतर कपणें होणारी स्थिति प्राप्त झाली. ती जागी झाली.

तिनें जो हा प्रकार पाहिला, तें सारंच नें. ती खडबडून जागी झाली, आपल्या बिछान्यापाशीं घरवाली असून ती आपलें समाधान ंतरीं पुटपुटत आहे, असें

ती म्हातारी गोंधळून गेली आहे, असें प्रियंवदेच्या चटकन लक्ष्यांत आलें आणि तिनें दरडावून तिला विचारिलें,-' बाई तूं येथें कां आली आहेस ! '

म्हातारी म्हणाली,-' नाहीं. उगीच आपली आलें होतें. माझ्या मनांतून आपल्याला दुःख द्यावयाचें नाहीं. आपल्याला कांहीं हवें नको, हें विचारण्यासाठीं मी आलें होतें-'

म्हातारीची अशी बडबड चालली आहे, तोंच आपल्या बोटांतील एक अंगठी नाहींशी झाली आहे, असें तिला आढळून आलें. स्वप्नामध्यें जो हात आपल्या अलंकारांवरून फिरत होता, तो हात याच विश्वासघातकी थेरडीचा होता, याबद्दल तिच्या मनांत शंका उरली नाहीं. लागलीच ती ताडकन् खाटल्यावरून जमिनीवर उतरली; तोंच जमिनीवर कांहींतरी चमकत आहे, असें तिला दिसलें. तिनें आपली जमिनीवर पडलेली आंगठी उचलून घेतली आणि म्हातारीकडे नजर टाकली, त्यावेळीं ती थेरडी अगदीं भेदरून गेल्याप्रमाणें तिला दिसली. खरा प्रकार तिनें एकदम ताडला. या थेरडीचा आपणांस लुटण्याचा किंवा प्रसंगीं आपला खून करण्याचा हेतु असावा आणि जेव्हां आपण जागें होऊन तिच्या हातांतून आपला हात हिसकून घेतला, तेव्हां त्या थेरडीनें काढून घेतलेली आंगठी तिच्या हातून जमिनीवर पडली, या सर्व गोष्टी एकामागून एक तिच्या ध्यानांत आल्या. क्षणमात्र थेरडीपेक्षांही तिची मुद्रा अधिक गोंधळल्यासारखी दिसूं लागली. परंतु तितक्यांत पुढें काय करावयाचें हा विचार तिच्या ध्यानीं आला आणि ती कोनाड्यांत तेवत असलेला दिवा हातीं घेऊन ती त्या खोलीच्या दरवाज्यापाशीं आली.

हें पाहून म्हातारीनें ' मुली, तूं हें काय चालवलीस ? अशी भेदरल्यासारखी कां दिसतेस ! तुला काय पाहिजे ? ' असें विचारीत प्रियंवदेचा हात धरिला.

प्रियंवदा जोरानें आपला हात सोडवून घेत म्हणाली,-'खबरदार ! माझाहात धरशील तर ! जांघिळा, अरे जांघिळा ! धांव लवकर !'

पांच चार पळें मध्यें जातात न जातात, तोंच त्या खोलीच्या दरवाज्यांतून भीमासारखा बलाढ्य असा जांघिळ आंत शिरला.

त्याला पाहून प्रियंवदा ओरडली,-' जांघेळा, माझें रक्षण कर ! जर या प्रसंगीं तूं माझें रक्षण केलेंस, तर मी तुझे मागले सर्व अपराध विसरून जाईन ! '

आपल्या भोंवतीं नजर फिरवून जांघिळानें विचारलें,-' हा जांघिळ येथें उभा असतां तुला पीडा देण्याची कोणाची आज्ञा आहे ? '

प्रियंवदा थोडक्यांत म्हणाली,-' ही पहा थेरडी ! ही मला लुटावयास किंवा माझा प्राण घ्यावयास येथें आली आहे ! '

इतक्यांत आणखी एक पुरुष त्या खोलीच्या दरवाज्यांतून आंत घुसला, आणि ओठ्यानें ओरडून म्हणाला,-' हा काय प्रकार चालला आहे ? '

ज्या मनुष्यानें हा प्रश्न विचारला, तो जुमारें तीस वर्षांचा, धट्टाकट्टा आणि चपळ जवान असून तो दिसण्यांत बराच सुरेख होता. त्याच्या मुद्रेवरून त्याच्या मनांत कांहीं दुष्ट विचार घोळत असतील असें दिसत नव्हतें.

म्हातारी म्हणाली,-' कांहीं वावगा प्रकार घडलेला नाहीं. या [illegible] नको हें पाहण्यासाठीं [illegible] त्यांची झोंप मोडली, [illegible] ओरडत सुटल्या ! '

[illegible] म्हणाली,-' जें काय झालें तें [illegible], आतां यानंतर एक पळभर [illegible] राहण्याची माझी इच्छा नाहीं ! '

[illegible] आलेल्या पुरुषाची मानगुटी धरून [illegible] म्हणाला,-' अरे वराहा, जर तुझ्या [illegible] कपट करावयाचें असेल, तर [illegible] गांठ आहे. तसें जर कांहीं

माझ्या ध्यानीं आलें, तर तुझें टाळकें फुटलेंच म्हणून समज !'

'अरे हरामखोरा, मला धमक्या देतोस काय !' असें म्हणत त्या वराहानें आपल्या कमरेचा खंजीर उपसून त्याचा जांघिळाच्या पोटावर नेम धरिला.

पण वराहाची मानगुटी बलाढ्य जांघिळाच्या हातीं होतीच. वराहाचा खंजीर आपल्या पोटापर्यंत येण्यापूर्वीच जांघिळानें त्याला तसेंच वर उचलिलें, आणि ज्याप्रमाणें एकादा चेंडू फेंकावा, त्याप्रमाणें फेंकून दिलें. त्यामुळें त्याच्या हातांतील खंजीर गळून जमिनीवर पडला, आणि त्याचें डोकें जमिनीवर आदळून त्याला एकदम मूर्च्छा आली ! हा प्रकार इतक्या थोड्या वेळांत घडून आला कीं, सध्यां काय होत आहे, हें त्या दोघींच्या मुळींच लक्ष्यांत आलें नाहीं. आपला मुलगा निपाचित पडलेला पाहून थेरडी ओरडली,–'अरे धांवा, धांवा ! खून, खून ! अरे नीचा, माझ्या मुलाचा प्राण घेतलास कीं काय ?'

जांघिळानें चटकन् उत्तर दिलें,–'मीं त्याचे प्राण वांचविलें, हें भाग्य म्हण ! मी आपल्या तरवारीनें त्याचा प्राण घेण्याइतकी त्या नीचाची योग्यताच नाहीं ! त्याला लाथेखालींच चिरडून टाकिलें पाहिजे. मी त्याचा या प्रसंगीं प्राण घेणें [illegible] आहे. या दुष्टाला–या विषारी [illegible] उपयोग नाहीं !' असें [illegible] हजगत्या आपल्या तरवारी[illegible] प्राण आपली तरवार म्यान[illegible] आढळून आलें व मोठा [illegible]

म्यान त्याच्या कमरेस [illegible] त्यांत तरवार नव्हती; आणि [illegible] बंदांत खोंचलेली कट्यारही [illegible] होती ! तेव्हां तो रागानें गुरगुरूं ला[illegible] त्यानें वराहाच्या हातांतून गळू[illegible] खंजीर उचलून घेतला.

अत्यंत कौर्यपूर्ण दृष्टीनें म्हातारीकडे पहात आणि क्रोधानें ओरडत जांघिळ तिला म्हणाला,–'थेरडे, अजून सुद्धां तुमच्या मनांतून आम्हांस लुटावयाचें नव्हतें, असें म्हणतेस कीं काय ? मी निजलों असतां माझ्या कमरेचीं हत्यारें तुम्हीं काय म्हणून काढून घेतलीं ! चल, चटकन् अपराध कबूल कर !'

याउपर लपवाछपवी करण्यांत हंशील नाहीं, असें जाणून त्या थेरडीनें जांघिळाचे पाय धरले, आणि ती त्याची करुणा भाकूं लागली. प्रियंवदेनें रक्तपात न करण्याविषयीं याला सांगितलें. त्याच्या मुद्रेवरील पहिलें क्रौर्य नाहींसें होऊन तो कोंकरासारखा गरीब दिसूं लागला.

जांघिळ म्हणाला,–'ताईसाहेब, आपण जी कांहीं आज्ञा कराल, ती मी मान्य करण्यास तत्पर आहें, हें मीं पूर्वीच सांगितलें आहे. थेरडे, या राजकन्येनें जर मध्यस्थी केली नसती, तर तुझे प्राण देहा वेगळे केव्हांच झाले असते. चल, नीघ येथून ! आणि पहिल्यानें माझीं हत्यारें कोठें आहेत, तीं माझ्या स्वाधीन कर !'

जांघिळाच्या फरमावणीप्रमाणें म्हातारीनें दिवा हातीं घेतला, आणि ती चटकन् पुढें झाली. तिच्या मागून जांघिळ पहिल्या खोलींत आला. या खोलीच्या एका कोंपऱ्यांत जळाऊ लांकडाची मोठी थोरली रास पडलेली होती; या राशीशेजारींच एका चटईच्या तुकड्यावर जांघिळ निजला होता. तो तेथें निजला असतां वराहानें त्याचीं हत्यारें काढून घेऊन तीं त्या [illegible]कडांच्या राशींत लपून ठेविलीं होतीं. [illegible]तारीनें पुढें होऊन तीं हत्यारें त्याच्या [illegible]तीं दिलीं. म्हातारीनें हत्यारें दिलीं म्हणण्या[illegible]तीं जांघिळानें तीं तिच्या हातांतून हिसकून [illegible]लीं, असें म्हणणें अधिक शोभेल. हत्यारें [illegible]तीं येतांच जांघिळाची मुद्रा क्रूर दिसूं [illegible]गली. त्याच्या मनांतील भाव ओळखून [illegible]यवदेनें त्याला जर नेत्रसंकेत केला नसता,

तर त्यानें त्या म्हातारीचा तत्काल प्राण घेतला असता.!'

हत्यारें जागच्या जागीं ठेविल्या [illegible] ळ प्रियंवदेला म्हणाला, 'ता[illegible] ली काय आज्ञा आहे ? घोडे [illegible] णूं कीं काय ?' त्या पडक्या [illegible] न आवडून प्रियंवदा म्हणा[illegible] घांवर जिनें कसण्यास तुझ्या [illegible]

असें बोलून तीं दोघें [illegible] बाहेर पडण्यासाठीं दरवाज्या[illegible] तेव्हां त्यांस कुत्र्याचें चम[illegible] ऐकूं आलें. तें ऐकून जांघि[illegible] शंकित् तो दुष्ट सावध झाल्या[illegible] मागें लागेल. यासाठीं ह[illegible] आमच्या वाटेस जाणार नाहींत[illegible] बंदोबस्त प्रथम करणें हें आपलें कर्तव्य आहे. थेरडे, चल, अशी इकडे ये, एकादी मजबूद दोरी आण, म्हणजे तिनें तुझ्या त्या पोराची गठडी आंवळून ठेवतों. अथवा इतकें तरी कशाला ? या दरवाज्याला बाहेरून कंडी आहेच. तुम्हां दोघांनाही आंतल्या खोलींत कोंडून ठेवतों, म्हणजे झालें.' असें बोलून जांघिळानें थेरडीस आंतल्या दुसऱ्या खोलींत ढकलिलें, आणि त्या खोलीच्या दाराला त्यानें बाहेरून कडी लावून घेतली.

इतकें करून तो पुनः दरवाज्यापाशीं आला, त्या वेळीं पुनः कुत्र्याचें गुरगुरणें त्याच्या कानीं पडलें. दरवाज्याच्या मागें एक लांकडी पेटी ठेवलेली असून त्या पेटीमध्यें किंवा पेटीवजा पिंजऱ्यामध्यें एक भयंकर शिकारी कुत्रा सांखळदंडानें बांधून ठेवलेला आहे, असें जांघिळाच्या दृष्टीस पडलें, आणि या कुत्र्याचें काय करावें, याबद्दल तो विचार करूं लागला. प्रियंवदा या वेळीं अंगणयांत उभी असल्यामुळें कुत्रा प्रत्यक्ष तिच्या दृष्टीस पडत नव्हता, म्हणून तिनें जांघिळास 'तूं तेथें काय पहात आहेस ?' असा प्रश्न विचारलां.

जांघिळ हळूच म्हणाला,–'हाः येथें एका पेटींत एक मोठा थोरला शिकारी कुत्रा बांधलेला आहे. तीं दोघें मोकळीं होऊन त्यांनीं जर हा कुत्रा आमच्या अंगावर सोडिला, तर प्रसंग मोठा बिकट येणार आहे. या साठीं या कुत्र्याचा निकाल पाडण्याचा मी विचार करीत आहें.'

प्रियंवदा म्हणाली,–'तूं त्या फंदांत पडूं नको. कुत्रा जर त्या पिंजऱ्यांत मोकळा असेल तर बाहेर पडतांच तुझें हत्यार तूं चालविशील, पण त्यापूर्वीच तो आपणां दोघांपैकीं एकाचा समाचार एका क्षणार्धांत घेईल, यासाठीं तूं त्या कुत्र्याच्या वाटेस मुळींच जाऊं नको.'

प्रियंवदेचें बोलणें खरें आहे, अशी जांघिळाची चटकन खात्री पटली आणि तो घरांतून बाहेर पडला. त्या दोघांनीं मोठ्या चलाखीनें घोड्यांवर सामान चढविलें, आणि मोठ्या त्वरेनें त्यांनीं घोडे पिटाळले. अशा रीतीनें तीं दोघें जीव घेऊन त्या झोंपडीमधून निघालीं, व बचावून आपल्या मार्गास लागलीं.

तीं दोघें तेथून सुरक्षित निघून गेल्यावर सुमारें चार घटकांनीं सरदार हलधर आणि सत्यरथ हे दोघेजण त्या पडक्या घरांत येऊन पोंचले होते. पण आपल्यापूर्वी कोण आलें होतें, या गोष्टीचा त्यांस गंधही नव्हता.

प्रियंवदा जेव्हां त्या पडक्या घरांत आली तेव्हांच तिच्या अंगावरील अलंकार पाहून म्हातारीच्या तोंडास पाणी सुटलें; पण हे जर खोटे असले, तर आपणांस त्यांचा कांहीं सुद्धां उपयोग होणार नाहीं, असें तिच्या मनांत आलें. जांघिळानें आपल्या बरोबर आणलेली तरुणी राजकन्या असेल, असें तिच्या मनांत यावयास कांहीं कारण नव्हतें. म्हणून प्रियंवदेला झोंप लागतांच तिच्या अंगावरच्या अलंकारांची तपासणी करण्यासाठीं ती थेरडी खोलींत गेली होती. प्रियंवदा ऐत्यावेळीं जागी झाली, म्हणून बरें झालें. नाहींतर त्या म्हातारीनें आपल्या मुलाकडून प्रथम मिंजलेल्या जांघिळाचा प्राण घेवविला असती, व नंतर त्या दोघांनीं प्रियंवदेला

बुचाडून तिला खाटल्याखालच्या विहिरींत लोटलें असतें. पण ईश्वरानें त्या दुष्टांचे हेतु पूर्ण न करतां, त्या दोघांचें रक्षण केलें.

तीं त्या पडक्या घरांतून बाहेर पडल्यानंतर सुमारें एक प्रहराच्या आंतच शिवालयापाशीं येऊन पोंचली. वाटेमध्यें त्यांजवर कोणत्याही प्रकारचें संकट आलें नाहीं, किंवा त्या दोघांचें सांगण्यासारखें भापणही झालें नाहीं. शिवालयापाशीं तीं दोघें परत आलीं, त्यावेळीं जवळ जवळ मध्यरात्र झालेली होती, त्यामुळें मणिभद्राच्या घरचीं माणसें झोंपीं गेलीं होतीं, तथापि तितक्या रात्रीं सुद्धां जांघिळानें त्यांना उठविलें. राजकन्या आपल्या येथें पाहुणी आली, हें आपलें भाग्य उदयास आलें, असें मणिभद्राला वाटलें, आणि त्यानें तशा अपरात्रीं सुद्धां तिच्या भोजनाची तजवीज केली. प्रियंवदा इतक्या लवकर परत आली, हें पाहून मथुरेला फार आनंद झाला, आणि तिनें मोठ्या आनंदानें राजकन्येला व आपल्या स्थितीला योग्य असें तिचें स्वागत केलें. भोजन झाल्यावर मथुरेनें तिला चांगली शय्या तयार करून दिली, आणि सर्व दिवसभर थकलीभागलेली प्रियंवदा तिजवर पहुडली. जांघिळानेंही प्रियंवदेच्या आग्रहाच्या सांगण्यावरून थोडेंसें अन्न खालें, पण तो झोंपी मात्र गेला नाहीं. झोंपडींत घडलेली अद्वल अजून त्याच्या डोळ्यांपुढें ताजी असल्यामुळें त्यानें राजकन्येच्या तात्पुरत्या शयनगृहावर चौकी--पहारा देण्याचें योजिलें होतें. जांघिळाच्या मनांत उत्पन्न झालेली तामसी वृत्ति पार नाहींशी होऊन गेली असून तेथें सात्त्विक वृत्तीचा अमल पूर्णपणें बसला होता. त्याचा स्वभाव अगदीं बदलून गेला होता. आपल्या हातून मत्सराच्या आणि क्रोधाच्या भरांत भलतेंच [illegible] होऊन गेलें, याचा त्याला पश्चात्ताप वाटत होता. त्याला जरी कोणीं जगाचें साम्राज्य दिलें असतें, तरी तो प्रियंवदेच्या किंवा शेखराच्या एका केंसासही धक्का लाविण्यास [illegible] तयार झाला नसता.

[illegible] प्रियंवदेला चांगली झोंप लागली, [illegible] निच्या मुद्रेवर थोडी टवटवी [illegible] जांघिळानें मात्र सान्या रात्रीं [illegible] झोंप घेतली नव्हती. वास्तविक [illegible] तर या शिवालयामध्यें त्याला [illegible] कारण नव्हतें. पण म्हणजे [illegible] तोंड पोळलें असतां मनुष्य [illegible] न पीत असतें. तशांतली [illegible] ति झाली होती. गेल्या रात्रीं [illegible] चटईवर निजला तेव्हां त्याच्या [illegible] त दगा होईल, अशी शंका [illegible] राह आणि त्याची आई हीं गरीब [illegible] मुळें थोडीं द्रव्यलोभी आहेत, इतकेंच त्याचें अनुमान होतें. परंतु त्यांच्या द्रव्यलोभाची खून करण्यापर्यंत मजल गेलेली असेल ही गोष्ट त्याच्या गांवींही नव्हती. तसें जर कांहीं त्यांला माहीत असतें, तर राजकन्या सावध झाल्याबरोबर तो तिला तेथून घेऊन लागलाच शिवालयामध्यें आला असता.

प्रातःकाळीं नित्यविधि आटोपल्यावर मथुरेच्या अत्यंत आग्रहाच्या विनंतीस्तव प्रियंवदेनें थोडा उपाहार केला, आणि जांघिळानें सज्ज करून ठेवलेल्या अश्वावर ती आरूढ झाली.

मध्यें कोणत्याही प्रकारचें संकट न येतां तीं दोघें त्रिशूल पर्वतापाशीं येऊन तेथून पिशाच-सोपान घाट उतरूं लागलीं. जांघिळानें केलेला अपराध मोठा घोर असतां तो परत आपल्या दरींत येत आहे, हें पाहून प्रियंवदेला फार आश्चर्य वाटलें. अशा आश्चर्यामध्यें तिचें मन गुंग झालें असतां ती दरीच्या अगदीं मध्यभागीं येऊन पोंचली. तेथे येतांच जांघिळानें आपला घोडा उभा केला आणि तो म्हणाला,-' राजकन्ये, मी आतां तुझा अखेरचा निरोप घेणार आहें. आतां यापुढें या जांघिळाचे पाय या दरीला

लागतील कीं नाहीं, याची वानवाच आहे ! घोर अपराधाचा कलंक माझ्या मुखास जो एकदां लागला तो लागलाच ! तो कालत्रयीं देखील निघावयाचा नाहीं. यापुढें मी आपल्या जातभाईंस आपलें लज्जेनें काळें झालेलें तोंड कधींही दाखविणार नाहीं !.'

प्रियंवदा त्यास म्हणाली,–' जांघिळा, असें म्हणूं नको ! क्रोधाच्या भरांत अनुचित गोष्ट होऊन गेली खरी; पण तिचें आतां काय उरलें आहे ? तुला पश्चात्ताप तर झालाच आहे. पश्चात्तापाएवढें दुसरें प्रायश्चित्तच नाहीं. तूं अगदीं मूर्खपणा मजबरोबर चल. तुझ्या हातून जी आगळीक घडली आहे, तिच्या संबंधानें मी भलामण करीन. महाराज किंवा राणीसाहेब, तुला सर्व अन्यायांची क्षमा करतील, अशी खात्री मी देतें; मग तर झालें कीं नाहीं ? '

जांघिळ खालीं मान घालून म्हणाला,–' ज्या अपराधाबद्दल क्षमेची अपेक्षा करावी, असा हा माझा अपराधच नव्हे ! एवढा मोठा घोर अपराध केला असतां क्षमा मागण्यास मला तोंड आहे काय ? महाराजांनीं मला क्षमा करूंही नये आणि मी आपल्या तोंडानें मला क्षमा करा असें म्हणणारही नाहीं. मी गर्वानें किंवा उद्धटपणानें क्षमा मागण्यास कबूल नाहीं, असा मात्र माझ्या बोलण्याचा आशय नव्हे ! माझा अपराधच तसा घोर आहे ! '

प्रियंवदा अगदीं मंजुल स्वरानें म्हणाली,–' जांघिळा, जी गोष्ट होऊन गेली, तिच्याबद्दल खेद करीत बसण्यांत काय अर्थ आहे ? वास्तविक पाहिलें, तर तूं माझा एकदांचा अपराध केला आहेस. तो तुझा अपराध क्षमा करण्यास जर मी तयार आहें, तर तूं इतकें कष्टी कां व्हावेंस ? माझ्या सांगण्यावरून महाराज तुला क्षमा करणार नाहींत, इतकी माझ्या शब्दास त्यांजपाशीं किंमत नाहीं, असें तुला वाटतें कीं काय ? '

जांघिळ निश्चयदर्शक स्वरानें म्हणाला,–' ती गोष्ट होणें नाहीं ! आतां मी एकदां येथून माझ्या अंतःकरणांत आनंदच उत्पन्न माझें पतित. तुझ्यामधून वांकणांवांकणांनीं वहादुर्दैवानें नदी जरी इतरांस नागिणीप्रमाणें राज्यावर वाटत असली, तरी तिचें उदक मला तर मातृप्रमाणें गोड लागतें, आणि तिच्या आपल्यानें माझ्या अंगांत विलक्षण शक्तीचा साठी होतो. हे मातृभूमि, या तुझ्या मस्तकघालीन पर्वतावर काळेकुट्ट मेघ नेहमीं वास करीत

प्रीात, आणि त्यांच्यावर विजांचें नृत्य जन्मभलेलें असतें, तें पाहून इतरांच्या अंतः-तुझ्यासांत भीति उत्पन्न होत असेल; पण मला दूर झायांची शोभा अवर्णनीय दिसते. जणुंकाय अशा मस्तकावरील काळ्याकुट्ट केशांमध्यें तूं काय लंकार धारण केले असून ते मधून मधून

ल्या अलौकिक तेजानें चकाकत असनसलें असें माझ्या मनांत येऊन मला अवआपल्य आनंद होत असतो ! हाय ! हाय ! पडेल तं मला तुझा वियोग होणारना ? हें तुझ्या मृत्युयोगाचें दुःख मी कसें सहन करूं ! अशा प्रकारचे त्याचे विचार सुरू असतां त्याला विजेचाचे वेळीं दृष्टीस पडलेल्या भयंकर कत्तयावें त्या देखाव्याचें स्मरण झालें, आणि अत्यंत बलाढ्यानें तो पुढें म्हणाला,–' जर तो दुःखाचा कांहींस खरोखरच उगवला, आणि शत्रूनीं तुजवर हल्ला केला, तर त्या प्रसंगीं स्वजनांबरोबर मानसा देह तुजवरच पडावा, अशी माझी होतापासून इच्छा आहे ! आज जरी मी लाग त्याग करून जात आहें, तरी मृत्यूनंतर आहेसा देह तुझ्याच उदरांत समाविष्ट व्हावा करूनी माती तुझ्या मातींत मिसळावी, अशी इतकी इच्छा आहें, ती तूं पूर्ण कर ! कीं नानदीच्या तीरावर उगवणाऱ्या हरळीं आलों असतां मला जर मरण आलें तर मी हेशांतील पुष्पशय्येवर आलेल्या मरणाजन्या सहस्रपटीनें अधिक प्रिय वाटेल.

मध्यें माझ्या मृत्यूनंतर माझा मृतकर जरी कोणी टोलेजंग समाधि प्रत माझ्या जीवाला त्याचें अगदीं रोधार नाहीं; पण मृत्यूनंतर म

शेखराचा विचित्र आणि अस्ताव्यस्त पोषाक व रूपधराच्या अंगावर असलेला हलधराचा पोषाक पाहून तो मोठ्या गूढांत पडला. शेखरानें त्याला थोडक्यांत असें सांगितलें कीं ' हलधर आणि सत्यरथ हे पळून गेले आहेत, आणि शत्रूंचें कांहीं तरी कारस्थान सुरू आहे. यासाठीं तूं असाच महाराजांकडे जा, आणि त्यांस इकडील वर्तमान निवेदन कर. त्या पळपुट्यांना पकडण्यासाठीं एक क्षणाचाही विलंब न करतां चारी दिशांस स्वार जाऊं देत ! सरदार हलधर व सत्यरथ हे लबाड आहेत, आणि ते आम्हांस फसविण्यासाठीं आमच्या दरींत आले होते, अशी आमची खात्री झाली असून सुद्धां आम्हीं त्यांना कांहींच शिक्षा न करितां निसटून जाऊं देणें कधींही योग्य होणार नाहीं ! हा माझा निरोप महाराजांस सांगून झाल्यावर कंठाळीसामानांतून माझ्यासाठीं वस्त्रें घेऊन परत इकडे ये.'

या मोहिमेवर आपणांस किती दिवस रहावें लागेल, याचा अंदाज अगोदर लागणें शक्य नसल्यामुळें प्रतापपुरांतून बाहेर पडताना दृढसंधानें थोडींशीं वस्त्रें आणि शिधासामग्री बरोबर घेतली होती, त्यांतून सध्यां [illegible]नें आपल्यासाठीं वस्त्रें मागविलीं होतीं, [illegible]करच त्याला मिळालीं. तीं वस्त्रें तो [illegible] करीत आहे, इतक्यांत दृढसंध राजा [illegible]ला, आणि त्यानें शेखरास झालेलें [illegible]विचारलें. शेखरानें फक्त आपल्या [illegible] झालेलें कलहाचें भाषण वगळून [illegible] सर्व वर्तमान आपल्या वडिलांस [illegible]

[illegible] ऐकून दृढसंधराजा क्रोधानें [illegible], आणि गर्जना करीत म्हणाला,– [illegible] पुर्वजांची शपथ घेऊन सांगतों [illegible]ोरीबद्दल त्या नीच हल[illegible]शिवाय मी कधींही स्वस्थ [illegible]न नो एकदां माझ्या हातीं [illegible] या उप्पर तो माझ्या हातून कसा निसटतो, तें पाहीन ! ' नंतर रूपधराची मानगुटी धरून तो त्याला म्हणाला,–' चोरा, हरामखोरा, आटप, तूं त्यांस कसें पळवून लाविलेंस तें मला कळूं दे ! खरें सांग, जर खोटें बोललास, तर तुझी मान आतांच फांसांत लटकली म्हणून समज ! '

आतां झालेली हकीकत लपवून ठेवण्यांत हंशील नसल्यामुळें रूपधरानें झालेलें सर्व वर्तमान दृढसंधास निवेदन केलें आणि त्यानें तेथील चोरजिनाही त्याला दाखविला. तो पाहून आपण या दिवाणखान्यांत कसे आलों, यासंबंधाचें शेखराला गूढ राहिलें नाहीं.

नंतर दृढसंध शेखरास म्हणाला,–' तो हरामखोर पळून गेल्याचें वर्तमान आमच्या कानीं येतांच थोडेसे लोक बरोबर घेऊन चूडामणि तर त्याचा पाठलाग करावयासाठीं गेलाच आहे. तूंही आतां थोडे लोक बरोबर घेऊन त्याच कामगिरीवर निघून जा. तुला दैव सध्यां अनुकूल आहे; तूं जें काम हातीं धरितोस, त्यांत तुला यशच आहे. या कामामध्येंही तूं यशस्वी होशील, अशी माझी खात्री आहे. यासाठीं त्वरा कर ! तूं गेलास, म्हणजे मी अधिक लोक याच कामासाठीं पाठविणार नाहीं. कारण येथें अजून पुष्कळ गोष्टी आम्हांस करावयाच्या आहेत. '

गेल्या रात्रीपासून शेखरानें जीं कांहीं साहसाचीं कर्में केलीं होतीं, तीं वाचकांसमोर आहेतच. सर्व रात्रीच्या आणि सर्व दिवसाच्या श्रमांनीं तो अगदीं थकून गेला होता, तरी देवीळ पित्याची आज्ञा होतांच तो मोठ्या उत्साहानें हलधराचा पाठलाग करण्यास सिद्ध झाला. त्यानें तत्काल बृहद्रथाच्या अश्वशाळेंतील सात उमद्या जनावरांवर जिनें कसाविलीं आणि आपल्या सैन्यांतील वेषांतर न केलेले सहा जवान बरोबर घेऊन तो या नव्या मोहिमेवर चालता झाला.

आपला पुत्र त्या दिवाणखान्यांतून निघून गेल्यावर तेथें असलेल्या संस्थानिकांकडे वळून दृढसंध म्हणाला,–' राजाधिराज रत्नाकर

महाराजांच्या दरबारांत आम्हां सर्वांचा दर्जा जरी सारखा असला, तरी आजच्या प्रसंगीं मी तुम्हांस इतके तुच्छ समजतों कीं तुमच्यासारख्या देशद्रोह्यांबरोबर आणि स्वामिद्रोह्यांबरोबर भाषण देखील करूं नये, असें मला वाटत आहे. मला पितृतुल्य असलेले वत्सपुराधीश वृषपतिमहाराजच तुमचा काय तो न्याय करतील !'

असें बोलून दृढसंध राजा त्या दिवाणखान्यांतून बाहेर पडला आणि त्यानें वृषपतीची गांठ घेऊन झालेलें वर्तमान त्याला निवेदन केलें. पुष्कळ रात्र होईपर्यंत दृढसंध आणि वृषपति हे दोघेजण खलबत करीत बसले होते. सुमारें दीड प्रहर रात्रीं प्रतापपुराहून एक दूत सुंदरपुरास आला आणि त्यानें तिकडील वर्तमान दृढसंधास कथन केलें. दूतानें मुख्य दोन बातम्या आणिल्या होत्या. त्यांपैकीं पहिली म्हणजे नारायणपुरकर चुलते–पुतणे आपल्या सत्तर लोकांसह कैदी होऊन प्रतापपुरीं येऊन पोंचले, ही होय. ही बातमी ऐकून दृढसंधाला समाधान झालें. त्या बातमीदारानें जी दुसरी बातमी सांगितली ती मात्र खेदजनक होती. जांधिळानें खोटी थाप मारून प्रियंवदेला पळवून नेलें, ही ती बातमी होती. ही बातमी ऐकून त्या दोघांसही फार खेद झाला, यांत आश्चर्य नाहीं. त्यांतल्या त्यांत वृषपतीला फारच वाईट वाटलें.

आपल्या श्वशुराचें समाधान करण्यासाठीं दृढसंध म्हणाला,–' झाली गोष्टही वाईट झाली खरी, तरी त्यांतल्या त्यांत समाधान मानण्यास थोडी जागा आहे. माझे दोन्ही पुत्र त्या नीच हलधराचा पाठलाग करण्यासाठीं गेलेच आहेत, त्यांपैकीं कोणाला तरी तिचा शोध लागण्याचा संभव आहे. शिवाय प्रतापपुराहूनही तिच्या शोधासाठीं माणसें रवाना झालींच आहेत. तिचा शोध लागल्याखेरीज राहणार नाहीं, अशी माझ्या मनाला खात्री वाटत आहे. सध्याच्या प्रसंगीं आम्ही जें काय केलें पाहिजे होतें, तें तर पूर्वीच झालें आहे. याहून अधिक आतां आम्ही काय करणार?'

ह्या त्याच्या भाषणांत सत्यांश बराच आहे असें वृषपतीलाहि वाटलें. ही बातमी ऐकल्यापासून त्याला कांहीं सुचेनासें झालें असल्यामुळें चालू असलेलें खलबत बंद ठेवून तो एकांतीं विश्रांति घ्यावयास गेला.

दुसऱ्या दिवशीं सकाळींच प्रियंवदेचें वर्तमान हेमचंद्राला कळलें, आणि तो तत्काळ तिच्या शोधासाठीं निघाला. प्रियंवदेचा शोध लावण्यासाठीं सगळा महाराष्ट्र देश पालथा घालण्याची त्याची तयारी होती. तिचा शोध लागल्याखेरीज आपण मागें परतणार नाहीं असा दृढनिश्चय करून फक्त तीन सेवकांसह तो सुंदरपुरांतून बाहेर पडला. हेमचंद्र आपल्या नातीच्या शोधार्थ गेला आहे, हें वृत्त वृषपतीला समजतांच त्याला पुष्कळ समाधान वाटलें.

बृहद्रथाकडून कोणते करार करून घ्यावयाचे हें रात्रीं बहुतेक ठरल्याप्रमाणेंच होतें. ज्या कांहीं किरकोळ बाबी उरल्या होत्या, त्या ठरविल्यानंतर दृढसंधानें बृहद्रथास आपल्यासमोर घेऊन येण्याचा हुकूम केला. थोड्याच वेळानें मागेंपुढें पहारेकरी असलेला बृहद्रथ दृढसंध आणि वृषपति यांसमोर दाखल झाला. बृहद्रथाच्या हातांपायांत या प्रसंगीं जरी बिड्या नव्हत्या, तरी त्याच्या भोंवतीं सशस्त्र पहारेकऱ्यांचा गराडा असल्यामुळें तो पक्का कैदी होता, असें म्हणावयास हरकत नाहीं. बृहद्रथ येतांच दृढसंधानें त्याला एका आसनावर बसावयास सांगितलें आणि पहारेकऱ्यांस निघून जाण्याची त्यानें खूण केली.

बृहद्रथाचा जरी पराभव झाला होता, तरी त्याच्या अंगांतील गुर्मी मात्र नाहींशी झालेली नव्हती. आंत आल्यावर शिष्टाचार संभाळण्यासाठीं देखील त्यानें त्या दोघां संस्थानिकांस प्रणाम केला नाहीं. तो तेथील एका आसनावर मुकाट्यानें जाऊन बसला.

अत्यंत गंभीर स्वरानें दृढसंध म्हणाला,–'बृहद्रथा, तुझा आणि आमचा पूर्वी तह झालेला असतां तो तूं मोडिलास, त्यामुळें आम्हांस हातीं शस्त्र धरणें भाग पडलें. झालेल्या तहाविरुद्ध तूं दोन गोष्टी केल्यास. त्यांतील पहिली गोष्ट ही कीं, तूं माझा वडील पुत्र चूडामणि आणि यांचा (वृषपर्तीचा) आश्रित पंडित हेमचंद्र यांजवर मारेकरी घालून त्यांचा प्राण घेण्याचा प्रयत्न केलास, दुसरी गोष्ट ही कीं, त्याच दिवशीं माझा दुसरा पुत्र शेखर, आणि यांची कन्या प्रियंवदा यांना पकडून आणण्यासाठीं माणसें पाठवून त्यांजवर जुलूम केलास. या दोन्ही गोष्टींत तुला यश आलें नाहीं, ही गोष्ट वेगळी. पण झालेल्या तहाविरुद्ध तूं या गोष्टी केल्यास, ही गोष्ट तुला नाकबूल करतां येणार नाहीं. ज्या अर्थीं तूं प्रथम तह मोडलास, त्या अर्थीं तुझ्यावर स्वारी करणें आम्हांस भाग पडलें. यांत आमच्याकडे काडीभर तरी दोष आहे काय?'

यावर बृहद्रथ काय उत्तर देतो, हें पाहावयासाठीं दृढसंध थोडा वेळ थांबला, परंतु त्यानें कांहींच उत्तर दिलें नाहीं. आपल्या शत्रूनें आपल्या पराजयाची आठवण देऊन आपणांस लज्जित केलें, म्हणून त्याला मोठा राग आला होता. पण करणार काय? आपले दांत ओंठ चावीत निमूटपणें सर्व कांहीं ऐकून घेण्यासेरीज त्याला दुसरा इलाजच नव्हता.

नंतर दृढसंध म्हणाला,–'आम्ही लढाईस कां प्रवृत्त झालों, याचीं कारणें तुला नाकबूल नाहींत, हें तर सिद्ध झालेंच. सध्यां सुंदरपुर आम्ही काबीज केलें आहे. आपल्याला कोठून तरी मदत येईल, आणि त्या मदतीच्या जोरावर तें पुनः आपण परत घेऊं असें जर तुझ्या मनांत येत असेल, तर त्याचीही तुला आशा करावयास नको. भीमरथानें चालू युद्धामध्यें शस्त्र न धरण्याचें वचन दिलें आहे. विधुसेन आपल्या राजधानींमध्यें हजर नाहीं, आणि ज्यांच्या साह्याची तूं यावेळीं उत्कंठेनें वाट पहात असशील, ते रणमत्त आणि विक्रमसेन सध्यां प्रतापपुरीं कैदेंत आहेत!'

हे शेवटचे शब्द ऐकून मात्र बृहद्रथाचा धीर सुटला, आणि सखेदाश्चर्याचे उद्गार त्याच्या तोंडून बाहेर पडले.

दृढसंध पुढें म्हणाला,–'तूं रणमत्ताला जें पत्र पाठविलें होतेंस, तें आमच्या हातीं लागलें आणि त्या पत्रामध्यें जी प्रियंवदेला पळवून नेण्याची तूं आपली इच्छा प्रदर्शित केली होतीस, तीही आम्हांस समजली असल्यामुळें तुझ्या मनाचा नीचपणा कोठवर जाऊन पोंचला आहे, याबद्दलही आमच्या मनाची खात्री पटलेली आहे.'

यावर बृहद्रथ काय उत्तर देतो, हें पाहण्यासाठीं दृढसंधराजा पुनः थोडा वेळ स्तब्ध बसला. परंतु त्यानें कांहींच उत्तर दिलें नाहीं.

नंतर दृढसंध म्हणाला,–'या सर्व गोष्टी तुला कबूल आहेत, हें तर सिद्ध झालेंच; आतां तुला स्वतःला, तुझ्या येथें आलेल्या संस्थानिकांला, व तुझ्या प्रजेला स्वतंत्रता पाहिजे असेल, तर मी सांगतों त्या अटी तुला मान्य केल्या पाहिजेत. या अटी तूं मान्य केल्यास तर रणमत्त आणि विक्रमसेन यांचीही मुक्तता होईल. माझ्या अटी काय आहेत त्या ऐक:—पहिली अट ही कीं, या लढाईच्या खर्चाबद्दल तूं मला आणि यांना तीन हजार मोहरा दिल्या पाहिजेत. दुसरी अट ही कीं, या पराभवाबद्दल खंडणी म्हणून एक हजार गाई आणि पांच हजार मेंढरें तूं आम्हांस दिलीं पाहिजेत. तिसरी अट ही कीं, आजच्या लढाईचा प्रसंग तूं उपस्थित केलास, असें आम्हास तूं लिहून दिलें पाहिजे. चवथी अट ही कीं, तूं स्वतः किंवा तुझ्या ताब्यांतील जाहागिरदार किंवा तुझे मित्र यांपैकीं कोणी सुद्धां आमच्यावर आजपासून दहा वर्षांच्या आंत स्वारी करणार नाहीं, आमच्या प्रजेस पीडा देणार नाहीं, किंवा

आमच्या दुसऱ्या शत्रूंनीं आमच्याशीं लढाई सुरू केली असतां त्यांस सहाय होणार नाहीं, असें आपल्या कुलस्वामीच्या शपथेवर आणि आपल्या सहीशिक्क्यानिशीं आम्हांस लिहून दिलें पाहिजे.'

ह्या अटी ऐकून बृहद्रथाला जो राग आला होता, त्याचीं चिह्नें त्याच्या मुद्रेवर स्पष्ट दिसत होतीं. त्या पराभूत झालेल्या संस्थानिकाच्या मनोवृत्ति अत्यंत प्रबळ झाल्या होत्या. काय होईल तें होवो, आपण या अटी कबूल करूं नयेत, असें एकदां त्याच्या मनांत येई, पण दुसऱ्या क्षणीं दृढसंधासारख्या क्रूर पुरुषाला अधिक चिडविण्यांत हंशील नाहीं, असेंहि त्याला वाटे. आपण या अटी नाकबूल केल्यास दृढसंधानें पुढें काय करावयाचें योजिलें आहे, याचा अंदाज काढावा, म्हणून त्यानें म्हटलें '—' या तुमच्या अटी मीं ऐकिल्या. या मीं कबूल केल्या नाहींत तर? जर मी महाराजाधिराजांचें साह्य मागितलें, आणि त्यांच्यापुढें तुमच्यावर फिर्याद चालविली, तर त्यांत मला यश येणार नाहीं, असें नाहीं.'

अतिशय उतावळेपणानें आणि क्रोधानें संतप्त होऊन दृढसंध म्हणाला,—'मूर्खा! सर्पाच्या तोंडांत सांपडलेल्या बेडकानें ज्याप्रमाणें त्या सर्पाला मारण्याची वल्गना करावी, त्याप्रमाणेंच ही तुझी वल्गना आहे! ह्या अटी जर तूं कबूल केल्या नाहींस, तर पुढें परिणाम काय होईल, हें माझ्या मुखानेंच ऐकण्याची तुझी इच्छा आहे काय?'

बृहद्रथ म्हणाला,—'तेंही एकदां ऐकलेलें असलें म्हणजे बरें!' दृढसंध गर्जना करीत म्हणाला,—'तर मग ऐक! पहिल्यानें मी तुला सुंदरपुरच्या तटावर फांशीं देईन. नंतर राजाधिराज रत्नाकर महाराजांचें राज्यावरून उच्चाटन करण्याच्या कटांत सामील झाल्याबद्दल येथें असलेल्या सर्व संस्थानिकांस मी कैद करून रत्नाकर महाराजांकडे पाठवून देईन. नारायणपुरकर रणमत्त आणि त्याचा पुतण्या यांना नरम कसें आणावयाचें हें मला चांगलें ठाऊक आहे. ज्या अर्थीं मला आज विजय प्राप्त झालेला आहे, आणि पहिली आगळीक तुजकडून घडली आहे, त्या अर्थीं तुझें राज्य माझ्या राज्यास जोडण्यास कोणत्याही प्रकारची हरकत उरलेली नाहीं, हें तुला माहीत आहेच!'

या वेळचा दृढसंधाचा स्वर आणि त्याची मुद्रा यांवरून तो सध्यां आपणांस भिवविण्यासाठीं उगीच कांहीं तरी बोलत नसून, आपण त्याचें म्हणणें नाकबूल केल्यास तो आपल्या भाषणांतील प्रत्येक शब्द खरा केल्याखेरीज राहणार नाहीं, अशी बृहद्रथाच्या मनाची पुरती खात्री झाली. आपणांस त्याच्यापुढें मान लवविण्याखेरीज इलाज नाहीं, हें त्याला पुरतें कळून चुकलें असल्यामुळें दृढसंधाच्या अटी मान्य केल्याखेरीज त्याला दुसरा इलाजच उरला नव्हता. म्हणून तो म्हणाला,—'प्रसंगाकडे लक्ष्य देऊन मला या अटी मान्य करणें भाग आहे! तुम्ही मागतां तितकी रक्कम सध्यां मला माझ्या खजिन्यांतून देतां येत नाहीं, यासाठीं मी तुम्हांस तीन महिने मुदतीची भृगुकच्छ शहरांतील एका धनाढ्य व्यापाऱ्यावर हुंडी देतों. तहनामा तयार झाला असल्यास त्यावर सही करण्यास मी तयार आहें आणि खंडणीचीं गाई-मेंढरें आणखी एका प्रहरांत तटाजवळच्या मैदानांत जमा होतील. आतां कांहीं बोलावयाचें राहिलें असेल असें मला वाटत नाहीं, अर्थात् मला येथें बसण्याचें कारण उरलें नाहीं.'

असें म्हणून बृहद्रथ राजा तेथून, उठला, आणि एकदम चालता झाला. सभ्यपणासाठीं त्यानें त्या दोघांस जातेवेळीं नमनही केलें नाहीं.

आणखी एका प्रहराच्या आंतच हुंडीपत्र, तहनामा आणि अपराधांच्या कबूलीचा लेख, असे तीन कागद दृढसंधाच्या हातीं आले, व राजवाड्यापुढील पटांगण गाई-मेंढरांनीं

भरून गेलें. आपल्या सर्व अटी मान्य झाल्या, हें पहातांच दृढसंधानें किल्ल्याच्या दरवाज्याच्या किल्या बृहद्रथाचे हवालीं केल्या. नंतर आपण परत निघालों असतां बृहद्रथानें विश्वासघात करूं नये, असा दृढसंधानें बंदोबस्त केला आणि त्यानें आपल्या सैन्यास कूच करण्याचा हुकूम केला. ते किल्ल्यांतून बाहेर पडले तेव्हां पूर्वी गोळा करून ठेवलेलीं शत्रूंचीं शस्त्रास्त्रें त्यांनीं आपल्या बरोबर नेलीं. जितांचीं शस्त्रास्त्रें जेत्यांनीं काढून घ्यावयाचीं आणि तीं विजयाची खूण म्हणून आपल्या राजधानींत नेऊन प्रदर्शनास ठेवावयाचीं, अशी पूर्वी वहिवाट असे. आपलीं शस्त्रें घेऊन शत्रु परत चालले असतां बृहद्रथाला अतिशय दुःख वाटलें आणि त्यानें प्रतापपुरकरांस आणि वत्सपुरकरांस शिव्याशापांची लाखोली वाहिली. परंतु त्यांनीं तिकडे मुळींच लक्ष्य दिलें नाहीं; फक्त त्यामुळें बृहद्रथाच्या नीच स्वभावाचें प्रदर्शन मात्र झालें.

ज्या ठिकाणीं वत्सपुर आणि प्रतापपुर यांजकडे जाणारे मार्ग फुटत होते, त्या ठिकाणीं तीं दोन्हीं सैन्यें येऊन पोंचल्यावर त्यांनीं परस्परांचा मोठ्या प्रेमानें निरोप घेतला. इतक्यांत प्रतापपुराहून मेधावती राणीनें प्रियंवदेच्या आगमनाचें वर्तमान कळविण्यासाठीं पाठविलेला दूत तेथें येऊन पोंचला. तें आनंदाचें वर्तमान ऐकून दृढसंध आणि वृषपति यांस मोठा हर्ष झाला. प्रियंवदेच्या हकीकतीनें त्यांच्या विजयानंदांत थोडें विरजण पडल्यासारखें झालें होतें, पण ती सुखरूप परत आल्याचें वर्तमान समजल्यामुळें, त्यांना विजयानंदाचा पूर्ण उपभोग घ्यावयास सांपडला. विजयी झालेल्या सैनिकांनीं मोठ्या आनंदानें परस्परांचे निरोप घेतले आणि त्यांनीं आपापल्या राजधानीचे रस्ते धरिले.

आतां आपण चूडामणि आणि शेखर ज्याच्या पाठलागास गेले होते, त्या सरदार हलधराचें पुढें काय वर्तमान झालें, तें पाहूं. तो एका खेड्यांत गेला असतां त्याला चोर समजून तेथील पाटलानें आणि फेरीवाल्यानें त्याला घोड्यावर बांधून अर्कपुराकडे चालविलें होतें, हें वाचकांच्या स्मरणांत असेलच.

अशा रीतीनें आपणांस त्यांनीं चालविलें या गोष्टीचें हलधराला फार वाईट वाटत होतें हें खरें, पण त्याला या प्रसंगीं भीतीचें मात्र कारण नव्हतें. कारण, भीमरथाची आणि आपली गांठ पडतांच आपल्या एका शब्दानें आपली मुक्तता होऊन आपल्या सर्व संकटांचें निवारण होणार आहे, अशी त्याच्या मनाची खात्री होती. म्हणून तो मुकाट्यानें पाटलाबरोबर तो नेईल त्या रीतीनें चालला होता.

अशा रीतीनें सुमारें दोन घटका प्रवास केल्यावर एक स्वारांची टोळी आपणांकडे येत आहे असें त्यांस आढळून आलें. ती टोळी जवळ येतांच सत्यरथ आणि हलधर यांनीं ते स्वार कोण आहेत हें तत्काल ओळखिलें. त्या टोळीवरील मुख्य अधिकारी राजपुत्र चूडामणि हाच असल्यामुळें त्याला ओळखावयास त्या दोघांना अगदीं विलंब लागला नव्हता. कारण गेल्या चार दिवसांत त्याचा अनुभव घेण्याचे प्रसंग त्यांवर तीन वेळ आले असल्यामुळें त्याची मुद्रा त्यांच्या हृदयांत पूर्णपणें ठसलेली होती.

त्यांची ओळख पडतांच सरदार हलधर पाटलास म्हणाला,—' बाबारे, मी काय म्हणतों तें आतां तरी ऐकून घे. हा प्रतापपुरकर चूडामणि इकडे येत आहे. सध्यां प्रतापपुरकर आणि सुंदरपुरकर यांची लढाई सुरू असल्यामुळें, आणि तुम्ही सुंदरपुरकरांचे मित्र असल्यामुळें तो दुष्ट चूडामणि तुम्हांस शत्रु समजेल, आणि तुमचे प्राणसुद्धां घेईल. यासाठीं आतां अति प्रसंग न करतां तुम्ही आमचीं दोघांचींही हत्यारें आमच्यापाशीं द्या, म्हणजे आम्ही यांस चांगला हात दाखवितों !'

फेरीवाला म्हणाला,-'खासा उद्योग ! आमच्या ध्यानीं तुझी मसलत आली नसेल असें नको

समजूं ! अशा युक्तीनें फसण्याइतके आम्ही दूधखुळे नाहीं ! '

पांच चार पळांच्या आंतच चूडामणीनें त्या टोळीस गांठलें. हलधराची आणि सत्यरथाची त्याला तत्काल ओळख पटली; आणि तो आनंदानें ओरडून म्हणाला,– " वाहवा ! फार बहार झाली ! आमची शिकार आम्हांस सांपडली. आतां हा हरामखोर कोठें पळून जातो, हें पाहतों ! '

चूडामणीला पाहतांच फेरीवाल्यानें विचारलें,–' महाराज, मी या प्रसंगीं आपणांस विनंति करीत आहें, इकडे आपण लक्ष्य द्यावें. सध्यांच्या प्रसंगीं प्रतापपुरकर आणि अर्कपुरकर यांच्यामध्यें खरोखरच वितुष्ट आलें आहे कीं काय ? जरी आलें असलें, तरी मला स्वतांला त्याची भीति नाहीं, हें खरें; कारण मी दोघांपैकीं एकाचाही प्रजाजन नव्हें. परंतु सध्यां आपला व्यापार या प्रांतांत चालविणें असेल तर तें कितपत धोक्याचें आहे ?–'

चूडामणि म्हणाला,–' बडबड पुरे कर ! सुंदरपुर आम्ही कालच काबीज केलें. भीमरथ महाराजांनीं या युद्धांत शस्त्र न धरण्याचें वचन दिलें असल्यामुळें, त्यांचें व आमचें वैर असण्याचें कारण नाहीं. पण मला समजूं दे, या नीचाला तुम्ही कोणत्या अपराधावरून कैद केलें आहे ? "

हें ऐकतांच सरदार हलधर म्हणाला,–" तूं मला नीच म्हणतोस, पण तूंच खराखरा नीच पुरुष आहेस ! तूं मला ज्या शिव्या देशील, त्या मी सगळ्या तुला परत करीन. '

चूडामणि डोळे लाल करून त्वेषानें बोलला,–' तें आतां लवकरच दिसेल ! '

सरदार हलधर बोलला,–' दिसेल यांत कांहीं शंका आहे काय ! तुझी माझी गांठ पडल्यापासून आतांपर्यंत तूं प्रत्येक वेळीं माझ्याशीं नीचपणाचेंच वर्तन केलें आहेस. लोक म्हणतात, कीं, तूं मोठा शूर आहेस, पण मी आतां तुझ्या शौर्याची परीक्षा पाहणार आहें. घोड्यावरून किंवा जमिनीवर तुझ्या मर्जीप्रमाणें आतांच्या आतां येथल्या येथें तुझ्याशीं द्वंद्वयुद्ध करण्याची माझी तयारी आहे. तूं जर खरा क्षत्रिय असशील, तुझ्या शौर्याचा तुला अभिमान असेल, आणि तुला अब्रूची चाड असेल, तर माझ्याशीं द्वंद्वयुद्ध करण्यास तयार हो; म्हणजे नीच कोण आणि उच्च कोण याचा आतांच निवाडा होईल. '

हलधराच्या स्वभावाला हें भाषण जरा अधिकच होतें, यांत संशय नाहीं. तरी पण यावेळीं त्याला खराखरा त्वेष आलेला होता, आणि त्याचे डोळे रक्तासारखे लाल भडक झालेले होते. त्याची नेहमीं फिक्कट दिसत असलेली मुद्रा यावेळीं अतिशय तेजस्वी दिसत होती, आणि तो जें काय बोलत होता, तें त्यानें अक्षरशः खरें करून दाखविलें असतें.

त्याला वेडावून दाखवीत चूडामणि ओरडला,–' मी शूर आहें कीं नाहीं हें लोकांना यापूर्वीच माहीत झालेलें आहे. लढाईचे वेळीं माझा पराक्रम पुष्कळांच्या दृष्टीस पडला असल्यामुळें आतां तुझ्याशीं लढून मी शूर आहें हें नव्यानें सिद्ध करावयाची जरूर नाहीं. शिवाय तुझ्यासारख्या राजद्रोही आणि विश्वासघातकी नीच माणसानें केलेलें द्वंद्वयुद्धाचें आह्वान मीं स्वीकारिलें नाहीं म्हणून मला कोणी दोष देतील असेंही नाहीं. आतां तुझी आणि तुझ्या या नीच सेवकाची मान फांसामध्यें अडकली, म्हणजे त्या फासांशींच तुमचें काय तें शौर्य दिसून येईल ! '

हें चूडामणीचें भाषण ऐकून फेरीवाल्यानें विचारलें,–' हे दोघेजण आहेत तरी कोण ? आम्ही तर यांना लुटारू समजत होतों ! हा पहा यांच्या अंगावरचा पोषाक ! हा पोषाक भीमरथ महाराजांचा आहे, यांत शंका नाहीं.'

चूडामणीनें उत्तर केलें,–' तुमची ही कल्पना अगदीं चुकीची आहे. हा आपणास

सरदार म्हणविणारा पाजी माणूस विश्वास घातकी व राजद्रोही आहे! हा नुसता लुटारू किंवा गळेकापू असता, तर मीं याच्याकडे मुळींच लक्ष्य दिलें नसतें. ज्या अर्थीं मीं या दोघांस देहांताशिक्षा फर्माविली आहे, त्या अर्थीं ते कोण आहेत, हें समजून घेण्याची तुम्हांस आवश्यता आहे, असें मला वाटत नाहीं. यासाठीं तुम्ही आपला मार्ग सुधरावा हें बरें. "

हें चूडामणीचें भाषण ऐकून फेरीवाल्याला मोठें चमत्कारिक वाटलें. आपल्या बंदिवानांसंबंधाचा आपला तर्क चुकला, असें त्यास वाटूं लागलें, आणि सरदार हलधराच्या बोलण्यांत खरेपणा असावा, असें त्याच्या मनांत आलें. भीमरथाचा वेष धारण करणारा माणूस त्याचा मित्र असावा, आणि याच कारणामुळें चूडामणि त्यास शत्रु समजत आहे, असें त्याच्या मनांत यावयास फारसा उशीर लागला नाहीं. पण आतां तो फेरीवाला काय करतो ? आपली चूक सुधारणें शक्य नाहीं, हें तर त्याला कळून चुकलेंच होतें; कारण चूडामणीच्या नुसत्या नेत्रसंकेताबरोबर त्याच्या बरोबरच्या सैनिकांनीं कैद्यांस वेढा देऊन त्यांस आपल्या स्वाधीन करून घेतलें होतें. फेरीवाला आणि पाटील यांच्याबरोबर जे खेडवळ होते, ते नेभळे होते, आणि सरदार हलधर व सत्यरथ यांचे हात–पाय जखडलेले होते, त्यामुळें प्रतापपुरकर सैनिकांना केदी ताब्यांत घेण्यास अगदीं अडथळा झाला नव्हता.

शेजारच्या झाडीकडे हात करून चूडामणि म्हणाला,–'ते पहा तिकडे चांगले उंच उंच वृक्ष आहेत; त्यांपैकीं एकादा वधस्तंभाऐवजीं छान उपयोगी पडेल ! ' असें बोलून त्यानें आपल्या घोड्यास टांच मारिली, व त्याच्या बरोबरच्या सैनिकांनीं कैद्यांसह आपला मोर्चा तिकडेच वळविला.

हें पाहून फेरीवाला पाटलास म्हणाला,– 'हा रंग कांहीं ठीक दिसत नाहीं हा माणूस जर भीमरथ महाराजांचा मित्र असला, तर याला प्राणसंकटांत लोटल्याचा दोष आपल्या माथीं येईल, आणि आम्ही महाराजांच्या दोषास पात्र होऊं ! ही गोष्ट कांहीं बरी झाली नाहीं. '

पाटील म्हणाला,–' आम्ही जरी संख्येनें आठ आहोंत आणि प्रतापपुरकर सातच आहेत, तरी ते रानटी, क्रूर–पशु–असल्यामुळें त्यांच्यापुढें आमचा निभाव लागावयाचा नाहीं, हें उघड दिसत आहे. तेव्हां होत आहे तसें होऊं द्यावें, यांतच आतां शहाणपणा आहे ! '

यांतच आतां शहाणपणा आहे, असें फेरीवाल्यालाही वाटलें. कारण तो कांहीं लढवय्या नव्हता. तथापि ह्या गोष्टीचा एकंदर परिणाम मात्र चांगला होणार नाहीं, असें वारंवार त्याच्या मनांत येत होतें.

कैद्यांसह सैनिक झाडीपाशीं पोंचले; तेथें त्यांनीं ज्या दोन्यांनीं कैद्यांस बांधिले होतें, त्या दोन्या सोडून त्यांस मोकळें केलें आणि घोड्यांवरून खालीं उतरिलें. त्या दोन्यांपैकीं एक दोरा हातीं घेऊन चूडामणि म्हणाला–' वाहवा ! छान ! या दोन्या खांशा मजबूद आहेत ! यांना फांशीं लटकविण्यास या फार छान उपयोगी पडतील !

आपल्यावर सध्यां एवढें मोठें संकट आलेलें पाहून सुद्धां सरदार हलधराचें धैर्य ढळलें नाहीं. किंबहुना त्याच्या मुखावर गंभीरता मूर्तिमंत वास करीत आहे, असें दिसत होतें. अगदीं न कचरतां किंवा चूडामणीच्या क्रूर दृष्टीस आपली दृष्टि भिडवावयास न भितां किंवा बोलतांना इकडचा शब्द तिकडे होऊं न देतां हलधर चूडामणीस म्हणाला,–' राजपुत्रा, तूं सध्यां जें कृत्य करावयाचें मनांत आणिलें आहेस, तें केवळ तुझ्या क्रूर वासना शमन करण्यासाठींच आहे. यांत बिलकुल शंका नाहीं. तूं मला फांशीं देणार आहेस, पण तुला एकाद्या माणसाला फांशीं देण्याचा काय अधिकार आहे ? तूं कांहीं अद्यापि स्वतंत्र नाहींस तुझे वडील

अजून हयात [illegible] आज्ञेशिवाय तुला हें [illegible] ार नाहीं! मीं तुमचा कोण[illegible] ला आहे? मीं सुंदरपूरच्या [illegible] हें खरें. पण मी या लढाईत [illegible] होतें काय? मी सुंदरपुर[illegible] पळून आलों, ही गोष्ट जी[illegible], तरी तुमचा ज्यानें कांहीं [illegible] नाहीं, त्याला कैद करण्या[illegible] धिकार नव्हता, अर्थात् आप[illegible] ठीं मी तुमच्या जुलमांतून [illegible] न मीं कोणता अपराध[illegible] ल[illegible]

चूडामणि [illegible] ळफळत ओरडत बोलला 'अरे नीचा, विश्वासघातक्या! तूं आपले अपराध लपविण्याचे कितीही यत्न केलेस तरी ते व्यर्थ आहेत. तूं आमच्या दरींत कशाला आला होतास! तूं आमच्या गुप्त गोष्टी समजून घेण्यासाठीं किंवा आमच्या राज्यांत [illegible] फंदफितूर उत्पन्न करण्यासाठीं [illegible]या निश्चयाचा [illegible]हेर म्हणून आमच्याकडे आल[illegible] [illegible]ाका नाहीं. तूं सुंदरपुरीं [illegible] होतास, तें आम्हांस समज[illegible] तूं समजत असशील तर त[illegible] आहे. बृहद्रथ आणि त्याचे [illegible] खलबतें करण्यासाठीं तूं तेथें [illegible]ी आमच्या मनाची खात्री क[illegible] असून तूं मोठ्या दिमाखानें [illegible]राध केला?' असें विचारतोस [illegible]ला शरम वाटली पाहिजे [illegible] [illegible]यासारख्या नीच, विश्वासघा[illegible]ाला अबूची चाड कोठून अ[illegible] [illegible]यपणा दाखविण्याच [illegible]आहेत! तुझ्या नाशिबीं [illegible] आहे! आतां मरण्यासा[illegible] आपली जिह्वा पिपलूं [illegible]ोणाचें स्मरण तोंन[illegible] [illegible]ला तयार हो!'

तेव्हां [illegible] पुरुष सरदा[illegible] [illegible]णाला, -' शूर [illegible]ीच मरणाला तयार असतात!'

चूडामणि ओरडला, -' तर मग आतां उशीर नको! त्याच्या गळ्यास फांस लावा आणि मरावयाचें कसें याचा धडा या नीच सेवकाला आपल्या धन्यापासून घेऊं दे!'

चूडामणीच्या सूचनेप्रमाणें त्याच्या अनुयायांनीं हलधराचे हात पाठीकडे बांधिले, त्याच्या गळयांत दोरीचा फांस टाकला आणि त्याला एका वृक्षाच्या उंच आणि बळकट अशा फांदीखालीं उभें केलें. त्या आडव्या फांदीवरून दोरी फेंकून त्या दोरीचें दुसरें शेवट दोघांतिघां सैनिकांनीं आपल्या हातांत धरिलें आणि ते चूडामणीच्या अखेरच्या खुणेची वाट पाहूं लागले.

इतकें झाल्यावर सत्यरथ म्हणाला, -' मला एकदां आपल्या धन्याचें पाय शेवटचे धरूं द्या.'

परंतु हे त्याचे शब्द तोंडांतून बाहेर निघतात न निघतात तोंच घोडयांच्या टापांचा आवाज त्यांचे कानीं पडला. अर्थात् त्यांच्या हातचें काम बंद पडून त्यांच्या सर्वांच्या नजरा त्या दिशेकडे वळल्या. पांचचार पळें लोटण्यापूर्वीच नवीन स्वारांची टोळी त्या ठिकाणीं येऊन पोंचली आणि त्या टोळीचा पुढारी शेखर आहे; हेंही त्यांस दिसून आलें. हा प्रकार काय चालला आहे, हें शेखराच्या तत्काळ ध्यानीं आलें आणि तो पुढें येत असतां त्याची तरवार म्यानांतून बाहेर पडून त्याच्या हातीं चमकूं लागली. एका क्षणाधींमध्यें त्यानें हलधराच्या मानेच्या दोरीचे दोन तुकडे करून टाकिले.

हें त्याचें कृत्य दृष्टीस पडतांच चूडामणीला अतिशय त्वेष चढला, त्यानें आपली तरवार म्यान्यांतून बाहेर काढली आणि तो शेखरावर गुरगुरत ओरडला, -' अरे मस्त्या पोरा, हें तूं काय केलेंस?'

शेखरानें शांतपणें उत्तर केलें, ' मीं आपल्या पित्याच्या आज्ञेला अनुसरून वागत आहें. हलधर आणि त्याचा सेवक यांस फक्त कैद करून आणण्याची त्यांची आज्ञा

आज्ञा आहे. त्यांचा प्राण घेण्याची आम्हांस आज्ञा नाहीं आणि तसें करण्याचा अधिकारही आपणांस नाहीं. देहांत शिक्षा करण्याचा अधिकार फक्त राजाचाच आहे!'

चूडामणि त्वेषानें जळफळत म्हणाला,—आतां यांस जिवंत ठेवतां नये. हे हरामखोर जिवंत राहिल्यास पुनः आमच्या हातून निसटून जाण्याचा संभव आहे. शेखर, मी तुझा वडील बंधु आहें, अर्थात् तूं माझ्या आज्ञेप्रमाणें वागलें पाहिजे. जर तूं आतां माझ्या कृत्यांत ढवळाढवळ करशील, तर तूं माझा बंधु आहेस हें मनांत न आणतां मी तुजवर हत्यार चालवीन!'

शेखर म्हणाला,—'तूं जरी असें बोललास, तरी भ्रातृवधाचें भयंकर पातक तुझ्या हातून घडणार नाहीं, ही माझी खात्री आहे.' नंतर तो आपल्या बरोबरच्या आणि चूडामणी बरोबरच्या भिल्लांस उद्देशून म्हणाला, 'आतां या गोष्टीचा न्याय तुम्हींच करा. राजाची आज्ञा आपण अक्षरशः पाळावयाची कीं ती मोडून आपण आपल्या मर्जीप्रमाणें वागावयाचें, हें तुम्हींच ठरवा!'

चूडामणि देखील सर्व भिल्लांस उद्देशून बोलला,—'तुम्हाला माझी, तुमच्या भावी राजाची आज्ञा पाळावयाची आहे कीं नाहीं? शेखर, तुला पुनः एकदां बजावितों, हा तुझा उद्धटपणा मी यापुढें एकक्षणभर सुद्धां सहन करणार नाहीं.'

त्या दोघां राजपुत्रांचें हें भांडण पाहून आपण पुढें कसें वागावयाचें हा सर्व भिल्लांस मोठा विचार पडला, आणि ते टकमका परस्परांच्या तोंडाकडे पाहूं लागले. आपण शेखराचें म्हणणें मान्य केलें पाहिजे असें त्या सर्वांच्या मनांत आलें होतें. त्यानें आदल्या दिवशीं शौर्याचीं कृत्यें करून विजय संपादन केला होता, म्हणूनच नव्हे, तर तो राजाज्ञेप्रमाणें वागवायास सिद्ध आहे, हें पाहून त्यांना शेखराच्या म्हणण्याप्रमाणें आपण वागलें पाहिजे, असें वाटत होतें. राजाज्ञा मोडणें हें मोठें पाप आहे, अशि[illegible] असल्यामुळें, चूडामणीच्या म्[illegible] आपण वागावें असें त्यांस वाटेना. [illegible] शेखराकडे वळलीं आहेत, [illegible] ध्यानांत आलें, आणि त्या[illegible] त्वेषामध्यें भर पडली. त्याची मुद्रा [illegible] प्रमाणें क्रूर आणि भयंकर [illegible] तडक शेखरापाशीं आला आणि [illegible] हातांतील तरवारीचा आपल्या [illegible] वावर जोरानें प्रहार केला! [illegible] होता म्हणून निभावलें, नाहीं [illegible] त्याच्या शरीराचीं दोन [illegible] असतीं! त्यानें मोठ्या कौशल्यानें [illegible] मागें खेंचला, त्यामुळें त्याचा बचाव झा[illegible] इतकें झाल्यावर शेखरानें आपली तरवार चटकन म्यानांत घातली, आणि तो रागें म्हणाला, 'आतां तुला माझा प्राण घेणें [illegible] सेल तर खुशाल घे! ही माझी मान तुझ्या स्वाधीन आहे!'

गोष्ट इतक्या पल्ल्यास[illegible] आपण स्वस्थ बसून उपयोग न[illegible] असें समजून कित्येक भिल्ल त्या दोघां[illegible] आले, आणि त्यांनीं चूडामणीचीं [illegible] शस्त्रें म्यानांत घालण्याची [illegible] अत्यंत द्वेषानें आणि तिरस्कारानें [illegible] पाहून दांत ओठ खात असतां [illegible] राजानें चूडामणीनें आपली [illegible] घातली आणि तो क्रोधानें [illegible] ओरडला, 'सर्वच मजवर [illegible] आहे! पाहून घेईन!' [illegible] घोडा फिरविला, आणि [illegible] आपल्या बरोबर येत आ[illegible] पर्वा न करतां एकदम [illegible]

हें पाहून [illegible] आणि जे कोणी त्य[illegible] फांशी त्याच्या मागून [illegible] साल आहे. या कैद्यांचा [illegible] मरण लागलें.'

चूडामणीच्या बरोबरच्या लोकांनीं चटकन बसलेल्या वेळांतून थोड्या मोहरा घोड्यांवर बसून ज्या दिशेला तो गेला, त्या पाटलाच्या अंगावर टाकल्या. आपल्या दिशेकडे ते घोडे उडत्या गतीत चालते झाले. घोड्यांची किंमत दुपटीहून सुद्धां अधिक थोड्याच वेळांत ते शेखराच्या आणि त्याला मेळाली, याचा पाटलास फार आनंद झाला व लोकांच्या दृष्टीआड झालें. नंतर शेखरानें आपल्या खेडवळांसह फेरीवाल्याबरोबर कैद्यांस घोड्यांवर बसविलें, परंतु त्यांस पुढे घेऊन चालता झाला. हा प्रकार ज्याठिकाणीं घडून आला, तें ठिकाण शिवालयापासून प्रमाणें बांधून घालण्याची त्याला जरूर वाटली नाहीं. आपण सहाजण सशस्त्र असल्यामुळें सोना नदीच्या मुखाकार दूर नसल्यामुळें त्यांच्या भोंवतीं असतां ते आपल्या हातून कडूनदर्रांत जाण्याच्या मार्गापेक्षां पिशाच निसटतील, असें त्याच्या मनांत देखील आलें नाहीं. नोपान घाटानें जाणारा मार्ग अगदीं जवळचा होता, म्हणून शेखरानें शिवालयाकडे आपला रोख धरून तो तेथून चालता झाला.

पाटील आणि फेरीवाला हे दोघेही लांब उभे असून हा सर्व प्रकार पाहत होते. आपण तेथें येण्यापूर्वी काय प्रकार घडून आला, त्याची शेखरानें त्याजपाशीं चौकशी केली, आणि त्यानें विचारलेल्या प्रश्नांच्या दोघांनीं उत्तरें दिलीं. नंतर शेखर त्यांस म्हणाला,–'पाटीलबुवा, तुमचा या दोघांशी संबंधानें अगदीं गैरसमज झाला होता. सरदार हलधराचें तुमच्या राजाचा पोषाख काढून घेण्याच्या बाबतींत मुळींच अगत्य नव्हतें. मी आपल्या दोनशें लोकांसह तुमच्या महाराजांस गांठून त्यांचे आणि त्यांच्या लोकांचे पोषाख व शस्त्रें हिरावून घेतली होतीं. या दोघांनीं राजद्रोहाची आणि विश्वासघाताचीं कृत्यें केलीं असल्यामुळें ते आमच्या वडिलांच्या क्रोधास पात्र झाले आहेत. ते आमचे अपराधी असल्यामुळें त्यांना कैद करून नेण्याचा मला पूर्ण अधिकार आहे, म्हणून तुम्ही आतां येथें थांबण्याचें कारण नाहीं. तुम्ही आतां आपल्या मार्गास लागा बरें ?'

आतां आपण येथून मुकाट्यानें परत जाण्यांतच आपुला शहाणपणा आहे, हें ओळखून ते परत निघाले, पण जातांना आपलीं दोन्ही हातचीं जातात, असें मनांत येऊन पाटलानें शेखरापाशीं तीं मागितलीं. कैद्यांस बसावयास घोड्यांची जरूर असल्यामुळें शेखरानें आपल्याजवळ

वाटेमध्यें हलधर आणि शेखर यांचें चुळींच भाषण झालें नाहीं. आपल्या प्राणावर आलेला प्रसंग शेखराच्या अकल्पित आगमनानें टळला. या गोष्टीचें हलधराला फार आश्चर्य वाटत होतें, आणि त्याला त्याबद्दल आनंदही वाटत होता; परंतु आपला प्राण म्हणून त्यरथाची मुद्रा जशी प्रफुल्लित दिसत होती तशी हलधराची दिसत नसून त्याची मुद्रा चहमी प्रमाणें गंभीरच दिसत होती.

वाटेंत सांगण्यासारखी एकादी गोष्ट घडून आली नाहीं. शेखर कैद्यांसह शिवालयापाशीं येऊन पोंचला. गेल्या दोन दिवसांत त्याला जी मेहनत पडली होती, तिचा विचार केला असतां आतां आपण देवालयांत थोडी विश्रांति घ्यावी, असें त्यास वाटावें यांत आश्चर्य नाहीं. पुण्कळसे घोडेस्वार देवालयाकडे येत आहेत, हें पाहिल्या बरोबर माणिभद्र मोठ्या उत्सुकतेनें पुढें झाला, आणि चंपुराही घरांतून बाहेर आली. आलेल्या वारांत सत्यरथ आहे, हें पाहून प्रथम तिला आनंद वाटला, पण तो कैदी आहे, हें दृष्टीस पडतांच तिचा तो आनंद नाहींसा होऊन तेला कार वाईट वाटलें, शेखरानें देवालयाच्या आवारांत शिरल्या बरोबर माणिभद्राला धर्मशाळेची एक खोली आपल्यासाठीं रिकामी करून देण्याचा हुकूम केला, आणि दुसऱ्या

आज्ञा.ठेवीमध्यें केयांना बंदोबस्तानें ठेवआधी त्याजकडून व्यवस्था करविली. इतके झाल्यावर थोडावेळ विश्रांति घेण्यासाठीं तयार केलेल्या खोलींत जाऊन पडला, तोंच त्याला झोंप लागला.

त्याला झोंप लागली असें आम्ही म्हटलें खरें, पण आपल्या भावाचें आपल्याशीं गेल्या संध्याकाळापासून दोन वेळां जें वर्तन झालें, त्याचें स्मरण त्याच्या मनापुढें ताजें असल्यामुळें त्याला गाढ झोंप लागणें शक्य नव्हतें. त्याचे डोळे मिटल्यावर त्याला स्वप्न पडण्यास प्रारंभ झाला. आपला बंधु तरवार उपसून आपल्यावर चालून येत आहे, आणि आत्मसंरक्षणासाठीं आपणही त्याच्याशीं झगडत आहों, असें त्याला वाटलें. अशा प्रकारें थोडा वेळ युद्ध झाल्यावर आपल्या भावानें आपणांवर भयंकर वार केला, व आपल्यास मोठी जखम लागली असा त्याला भास होऊन त्याच्या शरीरांतील जखमेच्या वेदनांमुळें तो दचकून जागा झाला. तथापि बराच वेळ पर्यंत हा प्रकार खराच घडून आला असावा, असें त्याला वाटून त्याला मोठा खेद होत होता; परंतु त्यानें जेव्हां डोळे उघडून आपल्या भोंवती नजर टाकली, तेव्हां त्याला आपण शिवालयांतील एका खोलींतल्या अंथरुणावर स्वस्थ पडलों आहों, असें त्यास आढळून आलें, आणि त्याला फार समाधान वाटलें. अशा प्रकारें तो कांहीं वेळ अंथरुणावर पडून राहिला असतां मणिभद्र आपल्या एका सेवकाबरोबर प्रियंवदेसंबंधानें बोलत आहे, असें त्यांस ऐकूं आलें, म्हणून त्यानें मणिभद्राला आपल्यापाशीं बोलावून तिच्यासंबंधाचें वर्तमान विचारून घेतलें.

मणिभद्रानें उत्तर केलें, ' महाराज, कालसायंकाळीं प्रियंवदा ताईसाहेब या देवळांत आल्या होत्या. त्यावेळीं त्यांची मुद्रा अतिशय व्यग्र झाल्यासारखी दिसत होती. त्या कोणत्या कामासाठीं कोठें गेल्या होत्या, हें कांहीं मला माहीत नाहीं. आपल्या राज्यातील प्रख्यात भिक्षु जांघिळ त्यांच्याघरोवर होता. काल सायंकाळीं त्यांनीं येथें घटकाभर विश्रांति घेतली आणि त्या येथून निघून गेल्या. नंतर त्या सुमारें मध्यरात्र उलटण्याच्या सुमारास परत आल्या, त्यावेळीं जांघिळही त्यांच्याबरोबर होताच. त्या आज सकाळींच येथून पुनः प्रतापपुरीं परत गेल्या.'

हीं हकीकत ऐकून शेखराला मोठें आश्चर्य वाटलें आणि ती कशासाठीं कोठें गेली असावी, याचा तो विचार करूं लागला. पण त्याला कांहींच तर्क करतां येईना. प्रियंवदा प्रतापपुरीं परत गेली असल्यामुळें त्याला काळजी करण्याचें कारण नव्हतें, तरी सुद्धां आपण फार वेळ येथें न राहतां लवकरच येथून निघावें आणि प्रतापपुरीं जावें, असें त्यानें ठरविलें.

प्रकरण २१ वें.

मथुरा.

सरदार हलधर आणि सत्यरथ यांस ज्या खोलीमध्यें कोंडून ठेविलें होतें, ती खोली ज्या खोलींत शेखर निजला होता, त्या खोलीपासून बऱ्याच अंतरावर होती. या खोलीस फक्त एकच दार होतें व दाराबाहेर एक पहारेकरी उभा होता. या खोलींत गेल्यावर सत्यरथ हलधराच्या भाषेंत बोलला,–'महाराज, कसेंही करून आपणांस येथून पळून जाणें भाग आहे.'

हलधर म्हणाला,–'बोलणें सोपें पण करणें कठीण आहे; परंतु तुझ्या मनांत एकादी युक्ति घोळत असावी, असें मला वाटतें.'

सत्यरथ बोलला,–'माझ्या मनांत एकादी युक्ति घोळत आहे, असें नाहीं; पण या मणिभद्राची नात मथुरा हिच्याशीं माझी जी थोडाचहून ओळख आहे तिचा उपयोग करून घेतां येईल असें मला वाटतें.'

हलधर म्हणाला,–'तें माझ्या लक्षांत आलें; पण त्या पोरीच्या हातून हें कृत्य कसें तडीस जाईल याची मला शंका वाटते.'

सत्यरथ म्हणाला,–'ती पोरगी मोठी हुषार आहे. आणि मीं जर एवढी गोष्ट करण्याविषयीं तिला गळ घातली, तर ती आपल्याकडून शक्य तितके प्रयत्न करण्यास कमी करणार नाहीं ! अशी माझ्या मनाची खात्री आहे. आपण सध्यां ज्या संकटांत आहों, त्यांतून आपल्याला पार पडण्यासाठीं कांहींतरी युक्ति काढलीच पाहिजे. समजा, आपली युक्ति फसली, तरी त्यांत वावगें काय होणार ?'

हें त्यांचें भाषण होऊन थोडा वेळ मध्यें लोटतो न लोटतो, तोंच दाराबाहेर पैंजणांचा मंजुल ध्वनि होत असलेला सत्यरथाच्या कानीं पडला; आणि मथुरा आपल्याकडे येत असावी, असें त्याला वाटलें. दोन प्रहरची वेळ झालेली असल्यामुळें शेखराच्या आज्ञेवरून केद्यासाठीं जेवण घेऊन ती तेथें आलेली होती. तिची आणि सत्यरथाची भेट होतांच तिच्या मुखावर प्रेमाच्या योगानें किंचित् लाली आली, आणि ती लाजेनें मान खालीं घालून उभी राहिली.

तिला सत्यरथानें विचारलें,–'मथुरे, आज पुनः आपली अशा रीतीनें गांठ पडलेली पाहून तुला काय वाटतें?'

आपलें भाषण बाहेरच्या शिपायास ऐकूं जाणार नाहीं, इतक्या हळु स्वरानें मथुरा बोलली,–'आपली भेट झाली, याचा मला आनंद होत आहे, हें जरी खरें आहे, तरी आपण ज्या स्थितींत येथें आतां आहां, ती आपली स्थिति मात्र मला फार दुःख देते. हे मेले भिल्ल आपसांत बोलत होते, त्यावरून सध्यां आपण कोणत्या संकटांत आहां, हें मनांत येऊन माझें काळीज भयानें करचरतें!

हें भाषण करीत असतां त्या प्रेमळ कुमारिकेच्या नेत्रांतून अश्रु आल्यावेरीज राहिले नाहींत.

ही तिची स्थिति पाहून म्हणाला,–'आमची ही स्थि[illegible] हळहळ वाटते, असें एक त[illegible] आहे; या गोष्टीनें मला किती[illegible] आहे म्हणून सांगूं ? बरें; पण[illegible] बोलत होते, हें ऐकूं दे तर ख[illegible]

मथुरा म्हणाली,–'ते जें[illegible] होते, त्यांतला मागचा पुढचा[illegible] ध्यानांत आला नाहीं. तरी, [illegible] पुरीं नेल्यावर दृढसंध महाराज[illegible] करतील, असा त्यांच्या बोल[illegible] दिसला. आपल्या हातून [illegible] घाणेरडा अपराध घडला नसेल[illegible] मनाची पूर्ण खात्री आहे.'

सत्यरथ म्हणाला,–'तुमें[illegible] धानें इतकें चांगलें [illegible] मोठें समाधान वाट[illegible] भिल्ल किती भयंकर [illegible] तच आहे!'

मथुरा म्हणाली,–'[illegible] त्यांचा राजा दृढसंध मु[illegible] माणसाचा जीव घेणें [illegible] खिसगणतींत मुद्धां नाहीं.'

सत्यरथ म्हणाला,–'हें जर[illegible] आहे, तर याहून आणखी जास्त [illegible] वयाचें ? आमच्या परिणाम काय [illegible] तुला स्पष्ट ऐकायाचें आहे काय ?'

मथुरेला या भाषणानें फारच वाईट [illegible] आणि पुनः तिच्या नेत्रांत अश्रु आले.

सत्यरथ पुढें म्हणाला,–'आम्ही एवढ्या त्या दुष्ट राजासमोर गेलों, म्हणजे चार घटका तरी जिवंत राहूं कीं नाहीं, याचा संशयच आहे ! आम्ही त्या भयंकर राजाच्या हातून जिवंत सुटूं, ही तर आशाच करावयास नको!'

हें त्याचें भाषण ऐकतांच ती स्फुंदून रडूं लागली. पूर्वी तिनें भिल्लांचें भाषण ऐकिलें होतें, त्यावेळीं त्यांस इतकी भयंकर शिक्षा होणार असेल, अशी तिची कल्पना न[illegible]

[illegible] सत्यरथाच्या मुखानें जेव्हां [illegible] यंकर शिक्षा होणार आहे [illegible] ली, तेव्हां तिच्या दुःखास [illegible] नाहीं. जर बाहेर पहारेकरी [illegible] केल अशी तिच्या मनांत [illegible] किंवा सरदार हलधर तेथें [illegible] तिनें एकदम सत्यरथाच्या [illegible] ोलून आकांत करून सोडला [illegible] आपल्या अश्रूंनीं त्याचें हृदय [illegible] असतें! जरी सत्यरथाची [illegible] पूर्वी फक्त दोनच वेळां गांठ [illegible] णि त्याचें तिचें अगदीं अल्प [illegible] तें, तरी तेवढ्यानें तिच्या [illegible] च्याविषयीं प्रेम उत्पन्न [illegible] सत्यरथ सध्यां कोणत्याही [illegible] तर तिचें हें प्रेम [illegible] सध्यांचा प्रसंग [illegible] ुरला असल्यामुळें [illegible] सवेना, यांत फारसें [illegible] वेळ रडून झाल्यावर तिनें [illegible] आपलें' मन आंवरलें, [illegible] करवेल तितकी शांत [illegible] करून ती म्हणाली,–'कसेंही [illegible] आपली येथून सुटका होणें [illegible]

[illegible] म्हणाला,–' मथुरे, आणि माझ्या [illegible] र येथून मुक्तता झाली असती, तर [illegible] झालें असतें! पण आमची [illegible] होणें शक्य आहे काय? मला तर [illegible] अशक्यच दिसते!'

मथुरा म्हणाली,–' कसेंही असलें, तरी आपली येथून मुक्तता झालीच पाहिजे. निदान तुमचा प्राण तरी वांचलाच पाहिजे.'

हें ऐकून सत्यरथ म्हणाला,–' मथुरे, मी काय म्हणतों तें नीट ऐकून घे. आपल्या धन्याला सोडून मी एकटा येथून अगदीं जाणार नाहीं. मी जर अशा रीतीनें त्यांना सोडून गेलों, तर तूंच काय म्हणशील? जो आपल्या उदार धन्याला संकटांत सोडून आपला जीव वांचवितो, तो इतरांशीं (आपल्या बायकोशीं) इमानानें वागेल काय?'

नंतर मथुरा म्हणाली,–' मी जातें आतां. मला येथें फार वेळ राहतां उपयोगी नाहीं. त्या लचाड भिल्लांना संशय यावयाचा. मी पुनः कांहीं तरी कारणानें लवकरच येथें येईन. आपली सुटका येथून कशी होईल, याच विचारास मी आतां लागतें. देवाच्या दयेनें वेळही अजून बराच आहे. राजपुत्र शेखर सध्या स्वस्थ निजला आहे; शिवाय यांचे घोडेही फार दमलेले आहेत. यावरून ही मंडळी निदान प्रहरभर तरी येथें राहणार हें उघड आहे.' असें बोलत ती तेथून निघून गेली.

सत्यरथ आणि हलधर यांस आपले प्राण आतां त्या तरुण कुमारीच्या युक्तीवर अवलंबून आहेत, असें वाटूं लागलें, आणि मनांतील निर्जीव झालेल्या आशेला पुनः चेतना प्राप्त झाली. ती काय युक्ति योजणार असेल, यासंबंधानें त्यांच्या मनांत अनेक प्रकारचे विचार घोळत होते, पण ती आपला हेतु कसा तडीस नेणार याचा त्यांना उमज पडेना. थोड्या वेळानें त्यांचीं जेवणाचीं ताटें परत नेण्यासाठीं ती त्या ठिकाणीं परत आली, त्यावेळीं सत्यरथानें तिच्याकडे मोठ्या उत्कंठेनें पाहिलें. तेव्हां ती त्यास म्हणाली,–' येथून गेल्यावर मीं बोलतां बोलतां बाबांचा (माणिभद्राचा) ठाव घेतला, पण त्यांचें साहाय्य या कामीं मिळेल, असें दिसत नाहीं. त्यांना या क्रूर भिल्लांची फार भीति वाटत आहे.'

सत्यरथ निराशेनें उद्गारला,–' तर मग हा प्रसंग निभावत नाहीं, असेंच म्हटलें पाहिजे!'

मथुरा म्हणाली,–' असेंच कांहीं मी अजून म्हणत नाहीं. काम जरा बिकट आहे, हें तर दिसतच आहे; तथापि आपण निराश होतां नये. अजूनही माझ्याकडून जितके प्रयत्न होतील, तितके मी करून पाहणारच. पुढें ईश्वराच्या मनांत असेल तसें घडून येईल. माझ्या मनांत एक युक्ति आली आहे, मी करून पहातें; जर ती युक्ति साध्य झाली,

तर मी पुनः येथें येईन, त्यावेळीं आपण अगदीं तयार रहा. एका क्षणाचा विलंब न करतां त्यावेळीं आपण उभयतांनीं येथून मार्ग सुधारिला पाहिजे !'

सत्यरथ म्हणाला,–'आमचें काय ? आमची तयारीच आहे ! नंतर तिच्याकडे प्रेमळ दृष्टीनें अवलोकन करीत तो म्हणाला,– 'मथुरे जर या तुझ्या प्रयत्नांस यश आलें तर तुझ्यामुळें बचावलेला हा देह सर्वस्वी तुझा आहे, असें समज ! यापेक्षां मी सध्यां कांहींच अधिक बोलत नाहीं. या संकटांतून आम्हीं निभावून गेलों; म्हणजे आमच्यावर दुसरें कोणतेंही संकट येण्याची काळजी नको. इतकेंच नव्हे, तर लवकरच असा एक दिवस येईल कीं, माझ्या धन्याच्या तेजानें जगाचे डोळे दिपून जातील, ते वैभवाच्या शिखरावर आरूढ होतील आणि मी त्यांचा एकनिष्ठ सेवक असल्यामुळें– सध्यां मी यापेक्षून अधिक कांहींच सांगत नाहीं.'—

हें त्याचें भाषण ऐकून मथुरेच्या प्रेमाला उकळी फुटून तिची कळी उमललेली दिसूं लागली. अधिक वेळ न थांबतां किंवा अधिक भाषण न करतां ती तेथून एकदम निघून गेली.

आणखी थोडा वेळ मध्यें गेला. आणि मथुरेचा शब्द पुनः त्यांच्या कानीं पडला. ती सध्यां त्या खोलीवर पहारा करीत असलेल्या भिल्लाशीं बोलत होती. तिचें आणि भिल्लाचें पुढें लिहिल्याप्रमाणें भाषण त्या उभयतांस ऐकूं आलें.

ती म्हणाली,– 'कायहो; प्रतापपुरकर जमादार साहेब ! तुम्ही तर अगदीं थकून गेल्यासारखे दिसतां !'

भिल्ल म्हणाला,–'होय, मुली, मी अगदीं थकून गेलों आहें, यांत शंका नाहीं. गेल्या दोन रात्रींत माझा डोळ्यास डोळा लागला असेल तर शपथ !'

ती म्हणाली,–'माझा जन्मापासून डोळ्यास डोळा लागलेला नाहीं, तरी मी कांहीं कधीं थकलें नाहीं.' असें बोलून ती माठ्यानें खदखदां हंसली.

भिल्ल म्हणाला,–'मुली, तुला सगळी थट्टाच वाटते. पण काल रात्रीं आम्हीं आमचें घर सोडल्यापासून लढाईच्या कारभारांत आमचा सगळा वेळ गेला. काल संध्याकाळीं लढाई संपली न संपली, तों लागलेंच हें लचांड उपस्थित झालें. रात्रभर घोड्यांवरून रानावनांतून हिंडतांना आमचे प्राण कंठाशीं आले आहेत.'

ती म्हणाली,–'तुमचे कंठाशीं [illegible] प्राण खालीं जागच्या जाग्यावर घाल[illegible] साधन तुम्हाला मिळालें, तर तु[illegible] आनंद वाटेल कीं नाहीं ?' असें [illegible] त्या भिल्लास खूण केली. तो [illegible] भिल्लाच्या मुद्देवर [illegible]

भिल्ल म्हणाला,–'तें [illegible] तर काय बहारच झाली [illegible] तूं माझ्याशीं बोलत [illegible] नांत आशा उत्पन्न करी[illegible] तूं म्हणतेस, तें स[illegible] ळण्याचा संभव आहे का[illegible]

तिनें आ[illegible] पवून ठेवि-लेला पदा[illegible] ाण म्हणाली,– 'तुझे य[illegible] आहेत यांत शंका [illegible] ाच्या लढाईत दे[illegible] ोऊन कीं काय न[illegible] हा पदार्थ पाहिजे [illegible] मच्या आजो-बांना [illegible]

[illegible] न आनंदानें ओढून [illegible] करीत भिल्ल तिला [illegible] वर तुझें कल्याण करो! [illegible] धाकटे धनीसाहेब किती [illegible] ुश्वर त्यांचें रक्षण करो!'

[illegible] झाल्यावर मथुरा तेथून निघून गेली, [illegible] सत्यरथ पुनः चिंतेमध्यें निमग्न झाला. तो त्या खोलीच्या दाराजवळ आला आपणांशी बोलल्याखेरीज किंवा आप[illegible]

युक्तीचें काय झालें, तें कळविल्यासरीज एकदम तेथून निघून गेली, या गोष्टीचें त्याला फार वाईट वाटलें. हलधर तर शून्य-दृष्टीनें आकाशाकडे डोळे लावून स्तब्ध बसला होता. तो सध्यां जागा आहे कीं निजलेला आहे, याचा एकाद्याला भ्रम पडला असता, इतका तो अगदीं निश्चळ आणि निर्विकार-मुद्रेनें आपल्या जागेवर स्वस्थ बसला होता.

आणखी थोडा वेळ मध्यें गेला; पुनः मथु-[illegible] पायांतील पैजणांच्या ध्वनीनें त्यांच्या [illegible] गुदगुल्या होऊ लागल्या आणि ती [illegible] काय सांगण्यासाठीं इकडे येत असावी, [illegible]नें त्यांचें काळीज धडधडूं लागलें. [illegible]नें खोलींत आली, आणि [illegible]ा, आतां अर्धक्षणाचाही विलंब [illegible] बाहेर पडा आणि आपला [illegible] ावरचा येथील पहारेकरी [illegible] रच्यांत बसलेला पहारे-[illegible] बेहोष होऊन पडले आहेत [illegible] ांना दांतदुखीचा उपद्रव [illegible] एका वैद्याजवळून घेतलेले [illegible] ांना मद्यांतून पाजलें आ[illegible] जोर कमी झाल्यावांचून [illegible] हींत. त्वरा करा, आणि [illegible] !'

हें घडलेलें [illegible] न करितां ने[illegible] बाहेर पडले. खो[illegible] पहारेकरी आडवा पडला [illegible] हें पाहून हलधरानें त्याच्या [illegible] सोडून घेतली. नंतर ते [illegible] गेले. तेथें समोरच जे घोडे [illegible] ले, ते त्यांनीं सोडून घेतले [illegible] घालण्याच्या भरीस न पडतां [illegible] उड्या मारिल्या, आणि ते [illegible] राच्या दरवाज्यापाशीं आले. येथील [illegible] पूर्वीच्या पहारेकऱ्या प्रमाणेंच [illegible] आहे, असें त्यांच्या दृष्टीस पडलें. मथुरेने त्या पहारेकऱ्याची तरवार सत्वरथाच्या हातीं दिली, आणि आवारांतून बाहेर पडतांच त्यांनीं आपल्या घोड्यांस टांचा मारल्या. घोड्याच्या किंवा आपल्या जिवाकडे न पाहतां त्यांनीं भरधांव घोडे सोडले. सत्यरथाला जरी प्रतापपुरच्या आसपासची माहिती नव्हती, तरी देवालयापलीकडच्या प्रदेशाची त्याला थो-डीशी माहिती असल्यामुळें, चार दिवसांपूर्वी ते ज्या रस्त्यानें आले होते, तोच रस्ता त्यानें धरिला, आणि ते जीव घेऊन पळत सुटले.

एवढ्यानें ते पुरते निभावले असें नाहीं. ते ज्यावेळीं आवाराच्या दरवाज्यामधून बाहेर पडले, त्यावेळीं त्यांच्या घोड्यांच्या टापांचा तेथील फरसबंदीवर झालेला शब्द सावध असलेल्या भिल्लांच्या कानीं पडला, आणि सरा प्रकार त्यांच्या ध्यानीं आला. त्यांनीं लागलीच ओरडाओरड केली. ती ओरड ऐकून शेखर चटकन आपल्या खोलींतून बाहेर आला, तोंच पळून जात असलेले कैदी त्यांच्या दृष्टीस पडले. त्यांचा पाठलाग करणें हें त्याचें कर्तव्य असल्यामुळें, त्यानें घोड्यावर जीन कसण्याचा हुकूम केला आणि घोडा सिद्ध होतांच बरोबर एकच भिल्ल घेऊन शेख-रानें त्यांचा पाठलाग सुरू केला. गुगी येऊन घोरत पडलेल्या पहारेकऱ्यापाशी दोन भिल्ल ठेवणें त्याला भाग होतें. अर्थात् या वेळीं एकाच सेवकासह त्याला बाहेर पडणें अवश्य झालें होतें. हलधर आणि सत्यरथ पळाल्या-नंतर त्यांचा पाठलाग सुरू होईपर्यंत मध्यें पावघटकेहून अधिक वेळ सहज लोटला असल्यामुळें तेवढ्या अवधींत ते दोघे पाठ-लाग करणाऱ्यांच्या दृष्टिमर्यादेंतून पार झाले. शेखरानें आपले घोडे पिटाळण्याची शिकस्त केली, पण त्याच्यानें कांहीं त्यांना गांठवले नाहीं. सुमारें दोन घटका जोरानें घोडा दाम-लून दमल्यावर शेखरानें मोठ्या नाइलाजानें परत फिरण्याचा निश्चय केला आणि तो अम-लांतही आणला.

शेखर देवालयाकडे येत असतां त्याच्या मनांत शिरून जर कोणी त्याचे विचार पाहते

चालले आहेत, हें पाहिले असतां [illegible]तर कैदी आपल्या हातावर तुरी दे[illegible]याचें त्याला एकापरी बरें वाट[illegible]न आढळून आलें असतें. [illegible] आपण होऊन कैद्यांना क[illegible] नसतें. आपण या कैद्यांस [illegible] नेल्यावर आपले वडील चूडामणि[illegible] वरून त्यांस देहांतशिक्षा दिल्याखेरीज [illegible] नाहींत, अशी त्याच्या मनाची पूर्ण [illegible] होती. आपण रदबदली केल्यास त्यांस जन्म भर कैदेंत ठेवण्याची शिक्षा कदाचित् आपले वडील फर्मावितील, पण तितकी शिक्षासुद्धां त्यांच्या अपराधाच्या मानानें अधिकच होईल, असें शेखराचें मत असल्यामुळें, पुढें त्यांस भयंकर शिक्षा भोगाव्या लागण्यापेक्षां ते आज अशा रीतीनें पळून गेले, याबद्दल त्यास फारसें वाईट वाटलें नाहीं. आपल्या हातून कैदी पळाले, म्हणून चूडामणि आपली अवहेलना करील आणि वडिलही आपल्या निष्काळजीपणाबद्दल आपणांस दोष देतील, या गोष्टी जरी त्याच्या डोळ्यांपुढें दिसत होत्या, तरी त्या निमुटपणें सोसणें आपणांस भाग आहे, असें त्यानें आपल्या मनाशीं ठरवून ठेविलें. अशा रीतीनें विचार करीत तो परत देवालयांत येऊन दाखल झाला.

कैदी पळून गेले याचें शेखरास मनापासून वाईट वाटत नसल्यामुळें तो परत आल्यावर त्यानें मथुरेच्या या कृत्याबद्दल तिला फारसा दोष दिला नाहीं. शेखर आपल्या एका अनुयायासह पाठलागासाठीं गेल्यावर उरलेल्या भिल्लांनीं माणिभद्राला त्राहि त्राहि करून सोडिलें होतें. आपल्या पित्याला भिल्लांनीं पीडा देऊं नये, म्हणून मथुरेनें या कृत्याचा सर्व दोष आपल्या माथीं घेतला होता, आणि ती मोठ्या धैर्यानें त्यांच्या तोंडास तोंड देत होती. कैदी पळून गेल्याबद्दल त्या भिल्लांस फारसें वाईट वाटत नव्हतें; पण आपले सोबती पुनः सावध होतील कीं नाहीं याबद्दल त्यांस फार काळजी वाटत होती. 'तुमचे सोबती गाढ निजले आहेत, औषधाचा जोर कमी होतांच तें पुनः सावध होतील, आणि दोन दिवसांचा त्यांचा शीण नाहींसा होईल, भिण्याचें कारण नाहीं,' असें मथुरेनें त्यांस पैकळ सांगितलें; पण त्यांची समजूत पडेना. माणिभद्राला आणि तिला देवळाच्या [illegible] बांधून घालून त्यांस चोप देण्याच्या [illegible]; पण तितक्यांत शेखर परत [illegible] त्यानें त्यांस तसें करूं दिलें [illegible] शेखर कांहींच शिक्षा [illegible] भिल्लांस फार वाईट [illegible] पुष्कळ आग्रह [illegible] अगदीं ऐकलें नाहीं. शे[illegible] लापपूर्वी लवकर जावें असें [illegible] गुंग होऊन पडलेल्या आप[illegible] सोडून त्याच्यानें जाववेना. [illegible] हरभर तरी तेथेंच मुक्काम [illegible] सें त्यानें ठरविलें, आणि [illegible] स- ल्यामुळें त्यानें सर्वांसाठीं [illegible] न तयार करण्याचा माणिभद्रास हु[illegible]

रात्रीं चंद्रोदय होईपर्यंत ते [illegible] लयांतच राहिले होते. चंद्र ते सर्वजण घोड्यांवर स्वा[illegible] प्रतापपुरचा रस्ता धरिला. झालेले भिल्लहि. आतां चांगल होते. इतकेंच नव्हे, तर त्यास झोंप लागल्यामुळें त्यांच्या हुषारी आली होती. पिशाचसो ते प्रतापपुरापाशीं येऊन दा त्यावेळीं प्रतापपुरच्या वेशीवरील प्रियंवदेच्या सुस्वरूप आगमनाचें शेखरास सांगितलें: जांघिळानें लग्नाडीचें वर्तमान ऐकून त्याला झाला, पण त्याला पुनः पश्चात्ताप तो प्रियंवदेला परत घेऊन आला, त्याच्या हातून तिला कोणत्याहि प्रकारचा झालेला नव्हता, हें ऐकून त्याला त्यांत मोठें समाधान वाटलें

प्रकरण २४ वें.

बंधुद्रोह आणि असत्य भाषण.

मागील प्रकरणांत सांगितलेल्या गोष्टी घ[illegible] आल्यास आणखी चार दिवस लोटले. य[illegible] दिवसांत प्रतापपुरामध्यें मोठा विज[illegible] चालू असून सर्व लोक अनेक [illegible] आनंदोपभोगांत मग्न झाले [illegible] आणि त्याचा पुतण्या [illegible] दोघे प्रतापपुर येथें [illegible] दृढसंधानें जबर खंड [illegible] होतें. या लढाईत [illegible] पर्यंत लोक कामीं आ[illegible] यें त्याचें कोणत्याही [illegible] लिं नव्हतें. त्याच्या [illegible] इतर संपत्ती-मध्यें [illegible] होती. प्रतापपुरच्या द[illegible] गुरांढोरांनीं गजबजून [illegible] दृढसंधाला त्यांच्या रक्षणा[illegible] एक नवीन नोकरीस ठेवावे [illegible] पुष्कळ भिल्लांस उद्योग [illegible] आणि त्यांनाहीं फार आनंद [illegible] त्त आणि विक्रमसेन हे दोघे [illegible] झालि होते, आणि त्यांनीं [illegible] दहा वर्षें प्रत्यक्ष कलह न [illegible] मा लिहून दिला होता. तरी असलेला वैराग्नि शांत होणें [illegible] रीरामध्यें दडपून ठेवलेला [illegible] र्णें बाहेरून दिसत नसला तरीं असतो, त्याप्रमाणेंच नारायण-मनांत असलेला द्वेष जरी तहकिल्यासारखा झाला होता, तरी [illegible] अंतःकरणांत जिवंत होता. नव्हे, तर त्यामध्यें सध्यांच्या अपभर पडली होती.

दिवशीं शेखर प्रतापपुरीं परत आला, [illegible]शीं व जवळ जवळ त्याच वेळीं, [illegible] पूर्वी चूडामणि दरीमध्यें परत [illegible]ता. त्या दोघां बंधूंची ज्यावेळीं प्रथम [illegible]डली, त्यावेळीं चूडामणि शेखरावरोध[illegible] देखील बोलला नाहीं. त्या[illegible] तीमध्यें विलक्षण शांतता [illegible] होती. पण ही शांतता [illegible] त्याच्या तामसीवृत्तीचा [illegible] असल्यामुळें फारच भयंकर [illegible] मानवी मनोधर्म जाणण्यामध्यें [illegible] अशा एकाद्या पुरुषानें त्याला [illegible] असतें, तर बाहेरून शांत दिसणाऱ्या [illegible] मनोवृत्तीमध्यें अधमपणा आणि नीचपणा ओतप्रोत भरलेला असून ती मनोवृत्ति कांहीं तरी कृष्णकारस्थान रचण्यांत निमग्न झालेली आहे, असें त्यास एकदम आढळून आलें असतें. सरदार हलधर आणि सत्यरथ हे शेखराच्या हातून पळून गेले, ही गोष्ट जेव्हां दृढसंधाच्या कानावर आली, तेव्हां त्याला फार राग आला होता; पण शेखरानें गेल्या दोन दिवसांत जी तरवार गाजविली होती, आणि त्यानें जीं शहाणपणाचीं कृत्यें केलीं होतीं,त्यांकडे नजर देऊन दृढसंधानें आपला राग गिळून टाकिला होता. शिवाय त्याच दिवशीं विजयोत्सवास प्रारंभ झाला असल्यामुळें त्या उत्साहाच्या गर्दींत त्याला त्या गोष्टीचें विस्मरणही झालें होतें.

हेमचंद्र प्रियंवदेच्या शोधासाठीं प्रतिज्ञा करून बाहेर पडला होता. त्यानें दोन दिवस आसपास फिरून पुष्कळ शोध केला; पण त्याला तिचा पत्ता लागला नाहीं. तिसरे दिवशीं त्याला प्रियंवदा प्रतापपुरीं सुखरूप परत आल्याचें वर्तमान समजलें. अर्थात तोही वत्सपुरीं परत आला होता.

सध्यां प्रतापपुरचा पूर्वीचा उदासवाणा देखावा बदलून तेथें नवीन चैतन्य आल्याप्रमाणें दिसत होतें. शहरामध्यें नाच गाणीं, मर्दुमकीचे खेळ, शर्यती वगैरे अनेक प्रकारचे आनंददायक खेळ सुरू असून रावापासून रंकापर्यंत सर्व लोक मजा मारण्यांत गढून गेले होते. राजानें भिल्ल लोकांस मद्यप्राशन करण्यास परवानगी

दिली होती. इतकेंच नव्हे; तर त्यांस त्यानें द्रव्य सहायही केलें होतें. या प्रसंगीं सर्वांस एका गोष्टीचें मात्र फार वाईट वाटत होतें. त्या दरींतील सर्व भिल्लांची जांघिळावर मोठी प्रीति होती; ज्यावेळीं अशा प्रकारचे आनंदोत्सव प्रतापपुरच्या दरींत सुरू होत, त्यावेळीं जांघिळाला मोठें स्फुरण येत असे, आणि तो आपल्या अंगच्या अचाट शक्तीचें प्रदर्शन करून सर्व लोकांस आनंदित करितं असे. तो या प्रसंगीं आपल्यामध्यें नाहीं, या गोष्टींचें सर्वांस घडिघडि स्मरण होऊन त्यांस फार वाईट वाटत असे. जांघिळ हा मोठा शूर, उदार आणि सत्य भाषण करणारा, अशी दरीमध्यें त्याची मोठी कीर्ति होती, आणि या प्रसंगाखेरीज कधींही त्याच्या कीर्तीस बट्टा लागलेला नव्हता. असें असून याच प्रसंगीं मूर्खपणाचें, नामर्दपणाचें आणि खोटेपणाचें कृत्य त्याच्या हातून कसें झालें, याचें सर्वांस मोठें आश्चर्य वाटत होतें. तें दुष्कृत्य केल्यावर जरी तो दरींत परत आला असता, तरी त्याच्या भाऊबंदांनीं, आप्तइष्टांनीं, लहान थोरांनीं त्याचे अपराध विसरून त्याचें स्वागतच केलें असतें. कारण त्यानें जें दुष्कृत्य केलें त्याचा परिणाम कोणत्याही प्रकारें वाईट झालेला नव्हता, आणि त्याला आपण केलेल्या कृत्याचा पश्चात्तापही झाला आहे, ही गोष्ट प्रियंवदेच्या मुखानें सर्वांस समजलीच होती. अशा रीतीनें सर्व लोक त्याची आठवण काढून उत्साहाचा आनंद अनुभवीत असतां उत्सवाचे तिसरे दिवशीं जांघिळाचें अशुभ वर्तमान दरींतील भिल्लांच्या कानावर पडलें; आणि सर्वांच्या मनाचा मोठा विरस झाला. त्या दिवशीं मणिभद्राच्या दुकानांतून कांहीं ऐष आरामाचे पदार्थ विकत आणण्यासाठीं एक भिल्ल तिकडे गेला होता. तो परत येत असतां वाटेंत त्रिशूळ पर्वतापाशीं जांघिळाची व त्याची भेट झाली. त्या भिल्लानें पुढील वर्तमान आपल्या बांधवांस विदित केलें. तो म्हणाला,–'मी शिवालयाकडून पिशाच-सोपान घाटाकडे येत असतां वाटेंत त्रिशूळ पर्वताच्या एका शिखरावर कोणी उंच पुरुष उभा आहे, असें दुरून माझ्या नजरेस पडलें. मी आणखी जवळ गेलों, त्यावेळीं त्याच्या असाधारण उंचीवरूनच तो जांघिळ असावा, असा मीं तर्क केला. हा माझा तर्क खरा होता. जांघिळ त्रिशूळपर्वताच्या शिखरांवरून दरीची शेवटची भेट घेत होता. मीं त्याला हाक मारिली, त्याबरोबर तो मजपाशीं घेऊन उभा राहिला. त्यावेळीं त्याची मुद्रा अगदीं दीनाप्रमाणें दिसत होती. त्या प्रचंड पुरुषाच्या नेत्रामध्यें अश्रू आले होते; आणि त्याचें शरीरही अगदीं सुकून गेल्याप्रमाणें दिसत होतें. मीं त्याची समजूत घालून त्याला दरीमध्यें घेऊन येण्यासाठीं आपल्याकडून शक्य ते प्रयत्न केले, परंतु त्याचें मन तसें करण्यास धजेना. तो मजबरोबर त्रिशूळ पर्वतापासून पिशाच–सोपान–घाटापर्यंत मुकाट्यानें चालत आला; पण घांटामध्यें पाऊल टाकण्याच्या जागेवर तो एकदम थबकला. इतका वेळ तो स्तब्ध असून माझें भाषण मुकाट्यांनीं ऐकून घेत होता, पण घाटापाशीं आल्यावर त्यानें बोलावयास प्रारंभ केला. त्यानें प्रथम दरींतील बऱ्याच भिल्लांचीं नांवें घेऊन त्यांना त्यानें शेवटचा रामराम सांगितला. नंतर दृढसंध आणि शेखर यांना आपले अपराध क्षमा करण्याविषयीं विनंति करण्याचें त्यानें मजपासून वचन घेतलें आणि नंतर पुनः त्याच्या नेत्रांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. अशा स्थितींत आणखी थोडा वेळ गेल्यावर त्यानें आपल्या अंगावरचीं वस्त्रें सोनानदीच्या उगमाजवळील कड्यावर काढून ठेविलीं, तो कड्याच्या काठांवर उभा राहिला आणि त्यानें मनोभावानें चामुंडेची स्तुति केली. नंतर पुनः एकदां सर्वांस अखेरचा निरोप सांगून त्यानें एकदम कड्यावरून खालच्या दरींत उडी घेतली!' अशा प्रकारचें वर्तमान ऐकून सर्व भिल्लांस अत्यंत खेद

झाला आणि त्यांच्या आनंदोत्सवामध्यें विरजण पडलें. दृढसंधाला आणि राजकुलांतील सर्वांना त्याच्या मरणानें फार हळहळ वाटली; त्यांनीं एकमतानें त्याचे अपराध क्षमा केले असल्याचें सर्व भिल्लांस बोलून दाखविलें.

आणखी आठदहा दिवस लोटल्यावर एके दिवशीं सायंकाळीं दृढसंधराजा आणि त्याची पत्नी मेधावती हीं दोघें राजवाड्यांतील दुसऱ्या मजल्यावरच्या एका प्रशस्त दिवाणखान्यांत बसलीं असतां तेथें त्यांचें पुढें लिहिल्याप्रमाणें संभाषण झालें.

राणी आपल्या पतीला म्हणाली,–' आज पांचसहा दिवस मी एक गोष्ट आपल्याशीं बोलेन बोलेन म्हणतें, पण वेळच होत नाहीं. पण आतां मात्र ती गोष्ट स्पष्टपणें बोलल्याखेरीज इलाज नाहीं. आपल्या मुलांचें हल्लींचें गेल्या आठदहा दिवसांतलें वर्तन–एकमेकांपाशीं कसें आहे, इकडे आपलें लक्ष्य गेलें आहे का ? '

दृढसंध म्हणाला,–' होय; तूं काय सांगणार आहेस तें माझ्या बरेंच ध्यानीं आलें आहे. त्या दोघांचें मन परस्परांविषयीं शुद्ध नाहीं, अशी माझ्या मनाची खात्री होऊन चुकली आहे आणि या गोष्टीमुळें मला फार खेद होत आहे. चूडामणि त्या लबाड सरदार हलधराला फांशीं देण्याचा प्रयत्न करीत असतां त्यांत शेखरानें दोन वेळां बखेडा केला, ही गोष्ट त्याच्या मानी मनाला रुचली नाहीं. या दोन्हीं प्रसंगीं शेखरानें माझ्या आज्ञेप्रमाणें वर्तन केलें असल्यामुळें त्याला दोष देतां येत नाहीं; तथापि शेखराच्या निष्काळजीपणामुळें किंवा हलगर्जीपणामुळें ते हरामखोर माझी शिक्षा चुकवून पळून गेले, याचा दोष सर्वस्वी शेखराकडे आहे, यांत शंका नाहीं.''

मेधावती म्हणाली,–' शेखरानें जर त्या दोन्ही प्रसंगीं चूडामणीला अडथळा केला नसता, तर फार चांगलें झालें असतें. ते दोघे हरामखोर निंबराजाचे हस्तक होते, आणि ते आमचें सामर्थ्य पाहण्यासाठींच येथें आले होते, यांत आतां तिळमात्र देखील शंका कोणाला उरलेली नाहीं. असें असून त्या दोघांस अगदीं सुद्धां शिक्षा न होतां ते पळून गेले, याचें सर्वांस फार वाईट वाटत आहे. शेखराचा स्वभाव उदार आहे, हें खरें; तरी या बाबतींत त्याचें औदार्य अनाठायीं दिसून आलें, यांत शंका नाहीं ! ते पळून गेले, याचा दोष सर्वस्वीं शेखराच्या माथ्यावर असून आपण त्याला दोन शब्द सुद्धां बोललां नाहीं, याचें चूडामणीला वाईट वाटत असलें तर त्यांत कांहीं नवल नाहीं. शेखरानें त्याचा अशा तऱ्हेनें अपमान केला असतां आपण त्याला अगदींच शिक्षा केली नाहीं, हीच गोष्ट चूडामणीच्या मनाला लागली असावी, असा माझा तर्क आहे.''

दृढसंधानें विचारलें, "त्या दोघांचीं मनें परस्परांविषयीं कलुषित झालीं आहेत, याबद्दल वाद नको. आतां पुढें काय करावें असें तुला वाटतें, तें मला ऐकूं दे.''

मेधावती म्हणाली,–" तेंच तर मला सुचत नाहीं, म्हणून मी मुद्दाम आपल्यापाशीं आज ही गोष्ट काढली आहे. चूडामणीकडे लक्ष्य दिलें, तर तो शेखरानें केलेल्या अपमानामुळें आपल्या मनांत कुढत आहे असें दिसून येतें; आणि शेखराकडे पाहिलें, तर तो प्रियंवदेजवळ गुजगुज गोष्टी सांगण्यांत सारखा निमग्न झालेला असतो; तो तिला सोडून आपल्या भावाशीं घटकाभर बोलत बसला आहे, असें केव्हांही आढळत नाहीं. मग त्यानें त्याची समजूत करावयाची गोष्टच बोलावयास नको ! यासाठीं मला वाटतें, कांहीं दिवस या दोघांना एकमेकांपासून दूर ठेवावें. म्हणजे त्यांस आपण एकटे असलों म्हणजे कसें वाटतें, तें समजेल, आणि ते दोघेही आपल्या मनांतला कुढाभाव विसरून परस्परांच्या समागमासाठीं उत्सुक होतील. निदान ते चार पावलें दूर असले, म्हणजे त्यांच्या

मनांत सध्या असलेल्या कुढेपणांत आणखी भर तरी पडणार नाहीं, असें मला वाटतें."

दृढसंध म्हणाला,-" हा तुझा विचार पोक्त आहे; ते चार पावलें एकमेकांपासून लांब असले तर कांहीं गैर नाहीं. ते जर एके ठिकाणीं असले, तर त्यांची धुसफुस रोजरोज वाढत जाईल, यांत संशय नको. शेखराचा स्वभाव जरी उदार आहे, तरी तो विशेष प्रसंगीं आपला बाणेदार स्वभाव प्रकट केल्याखेरीज रहावयाचा नाहीं."

मेधावती म्हणाली,-" माझ्या चूडामणीचा स्वभाव जरी तापट आहे, तरी तो भडभड्या आहे; तो आपल्या मनांत असेल तें भराभर बोलून सोडील. म्हणून मला त्याची भीति वाटत नाहीं. शेखर दिसण्यांत गरीब दिसतो; तो विचार केल्याखेरीज उगीच कांहीं बोलावयाचा नाहीं; असें असल्यामुळें त्याच्या मनांत काय चाललें असेल, हें आपणांस कळावयाचें नाहीं !"

दृढसंध म्हणाला,-' शेखराचा स्वभाव कपटी असेल असें माझें मन मला सांगत नाहीं. वास्तविक पाहिलें, तर कोणाचें मन कसें आहे हें कोणासही सांगतां यावयाचें नाहीं. त्यांचे स्वभाव कसेही असले, तरी त्यांच्या कल्याणासाठीं आपण सदैव झटलें पाहिजे. जर दोघांपैकीं एकाला कोठेंतरी पाठवावयाचें आहे, तर सध्यां संधि मोठी नामी आलेली आहे. परवां लढाईच्या वेळीं बृहद्रथानें जी हुंडी दिली आहे, तिची रकम वसूल करावयास कोणातरी विश्वासू माणसाची जरूर आहे. मला वाटतें, आपण चूडामणीलाच त्या कामगिरीवर पाठवावें, म्हणजे आपला हेतु साध्य होऊन त्यालाही भृगुकच्छ शहर जन्मादारभ्य एकदांतरी पाहावयास सांपडेल. साऱ्या जन्मांत तो बागलाणाच्या बाहेर कोठें गेलेला नाहीं, तेव्हां त्याला ही संधि बरी आहे.'

मेधावतीनें उत्तर केलें,-' माझ्या चूडामणीला बाहेर जाऊन प्रवास करून आणखी काय मिळवावयाचें आहे! तुम्हींच मला दोषरचा टारगेपणा आणि दिवशीं मजपाशीं आवडावयाचा नाहीं, ; पश्चात्ताप करून स्वारी आहे. आतां ऊणून मीं पुष्कळ प्रसंग स्वाचें काम उत्पन्न झ तो माझ्याशीं एक असल्या जबाबदारीच्दम ! मी त्याची पायगेलें पाहिजे असें असेनच्या चुकीबद्दल क्षमा

दृढसंध म्हणाला,हीं, एवढें मात्र खरें; त्यालाच विचारून पाहूं. तरी शब्द बोलता, खुप नसला, तर आपण सांगितलें असतें.'

असें बोलून दृढसंध ऐकून दृढसंधाला सेवकास चूडामणीला बोलंत फारसें आश्चर्य सुदैवानें चूडामणि वाड्यांतच.-' तो कारटा तो वडिलांच्या बोलावण्यास मानी वाटलें त्याजपाशीं येऊन दाखल झाला. पतो,

तो आल्यावर दृढसध त्याला म्हणाला,-' चूडामणे, तुला मी एक महत्वाची कामगिरी सांगत आहें, इकडे लक्ष्य दे. परवांच्या लढाईच्या खंडणीबद्दल बृहद्रथानें भृगुकच्छ येथील सागरदत्त नांवाच्या नगरशेटीवर हुंडी लिहिली आहे. या हुंडीची रकम वसूल करावयासाठीं कोणीतरी भृगुकच्छ येथें जाणें भाग आहे. विजयोत्साह तर आतां समाप्त झालाच आहे, हल्लींचा काळ मोठा चमत्कारिक आहे. आपला दुसऱ्याकडे येणें असलेला पैका फार दिवस ठेवण्याची सोय नाहीं. या कामावर कोणातरी विश्वासू माणसाची योजना केली पाहिजे. ज्या अर्थी आमच्या राज्यामध्यें माझ्याखेरीज सर्वांहून अधिकारानें तूंच मोठा आहेस, त्या अर्थी ही कामगिरी तूंच केली पाहिजे, हें उघड आहे ! '

अगदीं आंवट चेहरा करून चूडामणि म्हणाला,-' छे छे ! आपल्या खालोखाल सर्व प्रकारचे अधिकार माझे आहेत, असें मीं ऐकावयाचें मात्र ! पण खरा प्रकार फार निराळा आहे ! माझे अधिकार दुसराच चळकावून बसला आहे. ज्यानें माझे सर्व अधिकार हिसकून घेतले आहेत, त्यालाच ही कामगिरी तुम्हीं सांगावी, हें रास्त आहे !'

झाला आणि त्यांच्या आनंदोत्सवामध्यें विरजण पडलें. दृढसंधाला आणि राजकुलांतील सर्वांना त्याच्या मरणानें फार हळहळ वाटली; त्यांनीं एकमतानें त्याचे अपराध क्षमा केलें असल्याचें सर्व भिल्लांस बोलून दाखविलें.

आणखी आठदहा दिवस लोटल्यावर एके दिवशीं सायंकाळीं दृढसंधराजा आणि त्याची पत्नी मेधावती हीं दोघें राजवाड्यांतील दुसऱ्या मजल्यावरच्या एका प्रशस्त दिवाणखान्यांत बसलीं असतां तेथें त्यांचें पुढें लिहिल्याप्रमाणें संभाषण झालें.

राणी आपल्या पतीला म्हणाली,–' आज पांचसहा दिवस मी एक गोष्ट आपल्याशीं बोलेन बोलेन म्हणतें, पण वेळच होत नाहीं. पण आतां मात्र ती गोष्ट स्पष्टपणें बोलल्याखेरीज इलाज नाहीं. आपल्या मुलांचें हल्लींचें गेल्या आठदहा दिवसांतलें वर्तन–एकमेकांपाशीं कसें आहे, इकडे आपलें लक्ष्य गेलें आहे का ! '

दृढसंध म्हणाला,–' होय; तूं काय सांगणार आहेस तें माझ्या बरेंच ध्यानीं आलें आहे. त्या दोघांचें मन परस्परांविषयीं शुद्ध नाहीं, अशी माझ्या मनाची खात्री होऊन चुकली आहे आणि या गोष्टीमुळें मला फार खेद होत आहे. चूडामणि त्या लबाड सरदार हलधराला फांशीं देण्याचा प्रयत्न करीत असतां त्यांत शेखरानें दोन वेळां बखेडा केला, ही गोष्ट त्याच्या मानी मनाला रुचली नाहीं. या दोन्हीं प्रसंगीं शेखरानें माझ्या आज्ञेप्रमाणें वर्तन केलें असल्यामुळें त्याला दोष देतां येत नाहीं; तथापि शेखराच्या निष्काळजीपणामुळें किंवा हलगर्जीपणामुळें ते हरामखोर माझी शिक्षा चुकवून पळून गेले, याचा दोष सर्वस्वी शेखराकडे आहे, यांत शंका नाहीं.''

मेधावती म्हणाली,–' शेखरानें जर त्या दोन्ही प्रसंगीं चूडामणीला अडथळा केला नसता, तर फार चांगलें झालें असतें. ते दोघे हरामखोर निंबराजाचे हस्तक होते, आणि ते आमचें सामर्थ्य पाहण्यासाठींच येथें आले होते, यांत आतां तिळमात्र देखील शंका कोणाला उरलेली नाहीं. असें असून त्या दोघांस अगदीं सुद्धां शिक्षा न होतां ते पळून गेले, याचें सर्वांस फार वाईट वाटत आहे. शेखराचा स्वभाव उदार आहे, हें खरें; तरी या बाबतींत त्याचें औदार्य अनाठायीं दिसून आलें, यांत शंका नाहीं ! ते पळून गेले, याचा दोष सर्वस्वीं शेखराच्या माथ्यावर असून आपण त्याला दोन शब्द सुद्धां बोललां नाहीं, याचें चूडामणीला वाईट वाटत असलें तर त्यांत कांहीं नवल नाहीं. शेखरानें त्याचा अशा तऱ्हेनें अपमान केला असतां आपण त्याला अगदींच शिक्षा केली नाहीं, हीच गोष्ट चूडामणीच्या मनाला लागली असावी, असा माझा तर्क आहे.''

दृढसंधानें विचारलें, "त्या दोघांचीं मनें परस्परांविषयीं कलुषित झालीं आहेत, याबद्दल वाद नको. आतां पुढें काय करावें असें तुला वाटतें, तें मला ऐकूं दे.',

मेधावती म्हणाली,–" तेंच तर मला सुचत नाहीं, म्हणून मी मुद्दाम आपल्यापाशीं आज ही गोष्ट काढली आहे. चूडामणीकडे लक्ष्य दिलें, तर तो शेखरानें केलेल्या अपमानामुळें आपल्या मनांत कुढत आहे असें दिसून येतें; आणि शेखराकडे पाहिलें, तर तो प्रियंवदेजवळ गुजगुज गोष्टी सांगण्यांत सारखा निमग्न झालेला असतो; तो तिला सोडून आपल्या भावाशीं घटकाभर बोलत बसला आहे, असें केव्हांही आढळत नाहीं. मग त्यानें त्याची समजूत करावयाची गोष्टच बोलावयास नको ! यासाठीं मला वाटतें, कांहीं दिवस या दोघांना एकमेकांपासून दूर ठेवावें. म्हणजे त्यांस आपण एकटे असलों म्हणजे कसें वाटतें तें समजेल, आणि ते दोघेही आपल्या मनांतला कुढाभाव विसरून परस्परांच्या समागमासाठीं उत्सुक होतील. निदान ते चार पावलें दूर असले, म्हणजे त्यांच्या

मनांत सध्या असलेल्या कुढेपणांत आणखी भर तरी पडणार नाहीं, असें मला वाटतें."

दृढसंध म्हणाला,–" हा तुझा विचार पोक्त आहे; ते चार पावलें एकमेकांपासून लांब असले तर कांहीं गैर नाहीं. ते जर एके ठिकाणीं असले, तर त्यांची धुसफुस रोजरोज वाढत जाईल, यांत संशय नको. शेखराचा स्वभाव जरी उदार आहे, तरी तो विशेष प्रसंगीं आपला बाणेदार स्वभाव प्रकट केल्याखेरीज रहावयाचा नाहीं."

मेधावती म्हणाली,–" माझ्या चूडामणीचा स्वभाव जरी तापट आहे, तरी तो भडभड्या आहे; तो आपल्या मनांत असेल तें भराभर बोलून सोडील. म्हणून मला त्याची भीति वाटत नाहीं. शेखर दिसण्यांत गरीब दिसतो; तो विचार केल्याखेरीज उगीच कांहीं बोलावयाचा नाहीं; असें असल्यामुळें त्याच्या मनांत काय चाललें असेल, हें आपणांस कळावयाचें नाहीं !"

दृढसंध म्हणाला,–' शेखराचा स्वभाव कपटी असेल असें माझें मन मला सांगत नाहीं. वास्तविक पाहिलें, तर कोणाचें मन कसें आहे हें कोणासही सांगतां यावयाचें नाहीं. त्यांचे स्वभाव कसेही असले, तरी त्यांच्या कल्याणासाठीं आपण सदैव झटलें पाहिजे. जर दोघांपैकीं एकाला कोठेंतरी पाठवावयाचें आहे, तर सध्यां संधि मोठी नामी आलेली आहे. परवां लढाईच्या वेळीं बृहद्रथानें जी हुंडी दिली आहे, तिची रकम वसूल करावयास कोणातरी विश्वासू माणसाची जरूर आहे. मला वाटतें, आपण चूडामणीलाच त्या कामगिरीवर पाठवावें, म्हणजे आपला हेतु साध्य होऊन त्यालाही भृगुकच्छ शहर जन्मांतरभ्य एकदांतरी पाहावयास सांपडेल. साऱ्या जन्मांत तो बागलाणाच्या बाहेर कोठें गेलेला नाहीं, तेव्हां त्याला ही संधि बरी आहे.'

मेधावतीनें उत्तर केलें,–' माझ्या चूडामणीला बाहेर जाऊन प्रवास करून आणखी काय मिळवावयाचें आहे! रचा टारगेपणा आणि आवडावयाचा नाहीं, खात्री आहे. आतां ज त्वाचें काम उत्पन्न झ असल्या जबाबदारीच्चे गेलें पाहिजे असें असे

दृढसंध म्हणाला, त्यालाच विचारून पाहूं. खुष नसला, तर आपण

असें बोलून दृढसंध. सेवकास चूडामणीला बोल सुदैवानें चूडामणि वाड्यांतच तो वडिलांच्या बोलावण्यास मान त्याजपाशीं येऊन दाखल झाला.

तो आल्यावर दृढसंध त्याला म्हणाला,–' चूडामणे, तुला मी एक महत्वाची कामगिरी सांगत आहें, इकडे लक्ष्य दे. परवांच्या लढाईच्या खंडणीबद्दल बृहद्रथानें भृगुकच्छ येथील सागरदत्त नांवाच्या नगरशेटीवर हुंडी लिहिली आहे. या हुंडीची रकम वसूल करावयासाठीं कोणीतरी भृगुकच्छ येथें जाणें भाग आहे. विजयोत्साह तर आतां समाप्त झालाच आहे, हल्लीचा काळ मोठा चमत्कारिक आहे. आपला दुसऱ्याकडे येणें असलेला पैका फार दिवस ठेवण्याची सोय नाहीं. या कामावर कोणातरी विश्वासू माणसाची योजना केली पाहिजे. ज्या अर्थीं आमच्या राज्यामध्यें माझ्याखेरीज सर्वांहून अधिकारानें तूंच मोठा आहेस, त्या अर्थी ही कामगिरी तूंच केली पाहिजे, हें उघड आहे !'

अगदीं आंबट चेहरा करून चूडामणि म्हणाला,–' छे छे ! आपल्या खालोखाल सर्व प्रकारचे अधिकार माझे आहेत, असें मीं ऐकावयाचें मात्र ! पण खरा प्रकार फार निराळा आहे ! माझे अधिकार दुसराच बळकावून बसला आहे. ज्यानें माझे सर्व अधिकार हिसकून घेतले आहेत, त्यालाच ही कामगिरी तुम्हीं सांगावी, हें रास्त आहे !'

तादृशक आणि किंचित् दृढसंध म्हणाला,–' गप कांहींतरी बोलूं नये! मी धिकार काढून घेतला

ंच म्हणाला,–'आपण प्रत्यक्ष कमी केला र्थी माझा अपमान ासन करीत नाहीं, त्या- अधिकार कमी केला तत आहे ! आणखी ज्या- बोलावयाची वेळ आली ा मलाही आतां सर्व गोष्टी स्पष्ट भाग आहे. माझा अधिकार आहे

ाठं ? मी एक हुकूम करावा आणि शेख- गनें त्याला अडथळा करावा, असें धडधडीत सारखें चाललें आहे ! मी जर भिल्लांस कांहीं करावयास सांगितलें, तर माझ्या हुकुमाप्रमाणें करूं नका. असें धडधडीत माझ्या तोंडावर शेखर सांगतो आणि सर्व भिल्ल त्याचें ऐकतात असें झाल्याचीं उदाहरणें मी दाखवून देईन ! त्या हरामखोरांना फांशीं देण्याचा आपल्या हाताखालच्या भिल्लांस मीं दोनदां हुकूम केला, त्यावेळीं त्यांनीं दोन्ही वेळ माझी आज्ञा धाब्यावर बसविली ! त्या भिल्लांच किंवा आपल्या आतांच्या म्हणण्याप्रमाणें शेखराचें खरें कर्तव्य म्हणजे माझ्या आज्ञेप्रमाणें वागावयाचें हेंच होतें. त्यावेळीं जर त्यांनीं माझ्या आज्ञेप्रमाणें त्या हरामखोरांस फांशीं दिलें असतें, तर त्याची जबाबदारी सर्वस्वी माझ्या शिरावर होती. आपण त्याबद्दल मला जबाब विचारला असता आणि मीं तो दिला असता. शेखराला मध्यें पडण्याचें काम काय होतें ?'

दृढसंध म्हणाला,–'त्या वेळच्या शेखराच्या वर्तनानें तुला अपमान झाल्यासारखें वाटणें साहजिक असेल, पण त्यानें बुद्धिपुर्वक तुझा अपमान केला नाहीं, ही माझ्या मनाची खात्री आहे !'

चूडामणि आपली मुद्रा अत्यंत गंभीर करून म्हणाला,–' आपल्या मनाची अशी खात्री असणारच ! कारण शेखराचीं एकेक कृत्यें आपल्याला अद्यापि कळलेलीं नाहींत म्हणून आपल्याला वाटतें तें ठीकच आहे ! असो ! आपलें काय जातें! ज्याच्या कर्माचा तो मालक! त्याचीं कृत्यें आपल्याला कळूं नयेत हेंच खरें.' असें बोलून त्यानें आपली जीभ चावली आणि आपल्याकडून मोठी चूक झाली अशा प्रकारचा त्यानें अभिनय केला. तो म्हणाला,–' मी या वेळीं मनांत ठेवायाची गोष्ट भकून गेलों. तात, सध्या आपण मला या संबंधानें कांहीं विचारूं नये आणि मीं सांगूं नये. आपण जी आज्ञा कराल, जेथें जावयास सांगाल, तेथें जाण्याची माझी तयारी आहे. मी आतां जातों.'

असें बोलून तो आपल्या आसनावरून उठला आणि त्यानें एकदम दरवाज्याचा रस्ता धरला. हा त्याचा मानभावीपणा त्याला इतका हुबेहुब साधला होता कीं, त्यावेळच्या त्याच्या भाषणानें त्याचीं माता-पितरें साफ फसून गेलीं. त्यांनीं त्याला परत बोलाविलें, आणि शेखरासंबंधाची सर्व हकीकत अगदीं मोकळ्या मनानें सांगण्याचा त्याला त्यांनीं अतिशय आग्रह केला. शेवटीं त्या नीच चूडामणीनें विषवृक्षाचें बीज पेरण्यास माता-पितरांची मनोभूमि अगदीं उत्तम तयार झाली आहे असें पाहून बरेच आढेवेढे घेऊन सर्व हकीकत सांगण्याचें कबूल केलें. ज्याअर्थी तो इतके आढेवेढे घेत आहे, त्याअर्थी शेखराचें वर्तन खरोखरच गैरशिस्त असावें, असा त्यावेळीं दृढसंध आणि मेधावती या उभयतांच्या मनाचा अगोदरच विपरीत ग्रह झाला होता.

शेवटीं चूडामणि म्हणाला,–' ज्या अर्थी आपण मला इतकी निक्षून आज्ञा करीत आहां, त्या अर्थी मला सर्व कांहीं सांगणें भाग आहे. पण मागाहून मी आपल्या भावाच्या चढाइया सांगतों असें म्हणाल,

तर तें मात्र मी ऐकून घेणार नाहीं. कदाचित् शेखराचें त्यावेळचें वर्तन बुद्धिपूर्वकच झालें असेल. तो त्या दिवशीं सुंदरपुरच्या किल्ल्यांत मला जें बोलला, तें शुद्धीवर असून बोलला असेल, असें अजून सुद्धां मला खात्रीनें सिद्ध करून देतां येणार नाहीं, हें मी प्रथमच सांगतों. '

दृढसंध म्हणाला,–' असें अर्धवट काय बोलतोस ! तो त्यावेळीं काय बोलला, तें सांगशील तर खरें ! '

चूडामणि म्हणाला,–' त्या प्रसंगीं जे शब्द माझ्या कानीं आले, ते शेखराच्या–माझ्या लहान भावाच्या–तोंडूनच आले, कीं नाहींत, याची मला राहून राहून शंका सुद्धां वाटते ! मला वाटतें, तो त्यावेळीं विजयानंदानें शेंफारून गेल्यामुळेंच मला तसें बोलला असवा. तो म्हणाला,–' वडील हयात आहेत तोंपर्यंत हव्या तशा मजा मारून घे. वडिलांमागें तुझे पाय गादीस लागतील, ही आशाच सोड ! हवे ते प्रयत्न करीन पण प्रतापपूरचा राजा मी होईन हें ध्यानांत ठेव, आणि आतांपासून सावधपणानें वाग. तुला जीव हवा असेल, तर तूं कोठें तरी तोंड काळें करावें हें उत्तम ! माझा पराक्रम काय आहे आणि माझे कावे किती खोल आहेत, हें कोणासही कळावयाचें नाहीं. ' असें कांहींसें तो त्यावेळीं बोलला खरें; पण–'

मेधावतीनें मध्येंच विचारिलें,–' काय म्हणतोस ? शेखर असें म्हणाला ! आणि तूं तें सगळें मुकाट्यानें सहन केलेंस ? त्या कारट्याची बुद्धि इतकी फिरेल, असें कधीं कोणाच्या स्वप्नांत सुद्धां आलें नसेल ! असलें त्याचें भाषण मुकाट्यानें सहन केलेंस याबद्दल तुझी तारीफच केली पाहिजे ! '

चूडामणि म्हणाला,–' माझ्या मतानें यांत तारीफ करण्यासारखें कांहींच नाहीं. तो जरी मूर्खासारखें कांहींतरी बरळला, तरी त्याचें बोलणें पोटांत ठेवणें हें माझें कर्तव्यच होतें. मी अर हें त्याचें वर्तन तत्काल आपल्या कानावर घातलें असतें, तर तुम्हींच मला दोष दिला असता. त्यानें त्या दिवशीं मजपाशीं केलेल्या उद्धटपणाबद्दल पश्चात्ताप करून माझी क्षमा मागावी, म्हणून मीं पुष्कळ प्रसंग जुळवून आणले, पण तो माझ्याशीं एक शब्द बोलेल तर हराम ! मी त्याची पायधरणी करून त्याला त्याच्या चुकीबद्दल क्षमा मागावयास सांगितलें नाहीं, एवढें मात्र खरें; तो जर माझ्याशीं दोन तरी शब्द बोलता, तर मी त्याला तसें सुद्धां सांगितलें असतें. '

हें चूडामणीचें भाषण ऐकून दृढसंधाला अतिशय राग आला, यांत फारसें आश्चर्य नाहीं. तो जळफळत म्हणाला,–' तो कारटा असा निपजेल, असें मला केव्हांही वाटलें नव्हतें ! तो वरून जितका चांगला दिसतो, तितकाच आंतून नीच असेल, अशी माझी केव्हांही कल्पना नव्हती ! '

चूडामणि म्हणाला,–' आपल्या लहान भावाच्या कागाळ्या सांगून आपलें मन दूषित करणें हें माझें कर्तव्य नव्हे हें मी जाणून आहें. पण आतां आपण उभयतांनींही मला आग्रहच केला, तेथें माझा नाइलाज झाला. आतां आपण मला विचारतां त्याअर्थीं त्याच्या संबंधानें मला जें काय वाटतें, तें बोलून दाखविणें या प्रसंगीं भाग आहे. शेखराचीं कांहीं तरी कारस्थानें चालू असावीं, असा माझा तर्क आहे. त्यानें त्या हरामखोरांची बाजू इतकी सांवरून धरली, ती अगदीं शुद्ध हेतूनींच धरिली, असें आपणांस वाटतें काय? त्यांचा पक्ष धरण्यांत शेखराचा काय कावा असावा, हें अजून आपल्या ध्यानीं आलें नसावें असें दिसतें. '

दृढसंध आणि मेधावती यांनी एकदम विचारलें,–' त्यानें एकादा विशिष्ट हेतु मनांत धरून त्यांचा पक्ष उचलला असावा, असें म्हणतोस ? '

चूडामणि म्हणाला,–' मी कांहींच म्हणत नाहीं. त्याच्या एकंदर वर्तनावरून कसे तर्क माझ्या मनांत येतात, तेवढें मात्र मी स्पष्टपणें

सांगतों. माझे तर्क खोटे ठरले, तर त्यांत मला आनंदच आहे. आपणांस काय वाटतें, तें मी तुमच्या कानावर घातलें म्हणजे पुढें काय करावयाचें तें तुम्हांला ठरवितां येईल. गेल्या आठ पंधरा दिवसांत ज्या गोष्टी घडून आल्या आहेत, त्या आपण बारकाईनें पाहूं ! जांघिळानें कौल घेतल्यानंतर जेव्हां हलधर कपटी आहे असें सिद्ध झालें, तेव्हां त्या हरामखोराच्या तर्फे शेखर एकदम द्वंद्वयुद्धास सिद्ध झाला, यांचे कारण काय असावें बरें ? तसेंच जांघिळ कौल घेण्यासाठीं चामुंडेच्या देवालयांत एकटा राहिला असतां सत्यरथ त्याचा बुद्धिभेद करण्यासाठीं कसा बाहेर पडला ? शेखराचें साहाय्य असल्यावांचून त्याला इतक्या बंदोबस्तांतून बाहेर जाऊन पुनः मुकाट्यानें वाड्यांत परत येतां येणें शक्य तरी होतें काय ? त्याचप्रमाणें आपण पंडित हेमचंद्राला चिलखतामध्यें लपवून ठेवलें होतें, हें त्या हरामखोरांस कसें उमगलें ? आपलें भाषण कोणी तरी आडून ऐकत आहे, अशी त्यांच्या मनाची खात्री असल्याशिवाय आमच्या मनास पटण्यासारखें भाषण त्यावेळीं त्यांनीं करावें, ही गोष्ट संभवनीय तरी आहे काय ! ते दोघे निंबराजाचे हस्तक होते, हें तर आतां सिद्ध झालेंच आहे. त्यांनीं त्या दिवशीं आम्हांस चकविलें, यावरून त्यांस आमचे हेतु समजले असावे, हें उघड आहे; आणखी साऱ्या राजवाड्यांत त्यांचा पक्षपात करणारें जर शेखरावांचून दुसरें कोणी नव्हतें, याबद्दल आपल्या मनाची खात्री आहे, तर शेखरानेंच त्यांना सावध केलें असावें, असा तर्क सहजच मनांत येतो. आपली युक्ति शेखराला समजली असावी, आणि त्यानेंच त्यांना सावध केलें असावें. आपण हलधराला खलचतखान्यांत सोडून हेमचंद्राला लपविण्यासाठीं परत आलों, तेंव्हां त्यांना सूचना देण्याची संधि शेखराला मिळाली असावी. त्यानंतरही दोघांचें प्राण वाचविण्याबद्दल त्याची किती धडपड चालली होती, तें ध्यानांत आणा. जिन्याच्या खोलींत शेखराला एकटें उभें राहण्याचें काय कारण होतें ! त्याला तितक्यांत घेरी आली, तो पडला, आणि तो नेमका चोरदारावरच पडला, हें संभवनीय तरी दिसतें काय ! त्यानें त्यावेळीं मूर्च्छा आल्याचें ढोंग केलें असावें, आणि त्यानेंच आपल्या अंगावरील पोषाक त्या हरामखोरास देऊन त्याला पळवून लाविलें असावें. दुसरें; ते हरामखोर सुंदरपुराहून निघाल्यानंतर कोठें जाणार हें माहित असल्याखेरीज त्यांच्या शोधासाठीं बाहेर पडलेला शेखर नेमका त्या ठिकाणीं कसा आला ? माझी कल्पना अशी आहे, कीं मी ज्या रस्त्यानें त्या हरामखोरांचा पाठलाग करीत होतों, त्याच रस्त्यानें ते गेले हें त्यास माहीत असल्यामुळें शेखरानें मुद्दाम मजवर नजर ठेवून तो माझ्या मागून लपून छपून येत असावा, आणि मी त्यांना आतां फांशी देणार, ही त्याच्या मनाची खात्री होतांच तो आयत्या वेळीं पुढें आला असावा. एरव्हीं तो एकाएकीं नेमका तेथें यावा, हें संभवनीय दिसत नाहीं. शेवटीं त्यानें त्या हरामखोरांस शिवालयांत नेलें आणि तेथून पळवून लाविलें, असा माझा तर्क वाहतो. नाहींतर ज्यांची पुरती तोंडओळख सुद्धां असण्याचा संभव नाहीं, अशा परकी मुशाफरांस त्या मणिभद्राच्या कारटीनें पळवून लावण्याची काय विशाद होती ? त्यांना पळवून लावण्यास तिला शेखरानेंच फूस दिली असावी, म्हणून तिला तसें करतां आलें. जर शेखराची तिला फूस नसती, तर तिनें केलेल्या या भयंकर अपराधाबद्दल शेखरानें तिला कांहींच शिक्षा केली नसती, असें झालें असतें तरी कसें ? शेखरानें तिला स्वतः कांहींच शिक्षा केली नाहीं, इतकेंच नव्हे, तर आमचे भिल्लु-माणिभद्राचा सूड घेण्यास तयार झाले असतां शेखरानें त्यांस मनाई केली. यावरून त्यानें तिला पूर्वी अभयवचन दिलें असावें, असा तर्क करावयास काय हरकत आहे ?

ही चूडामणीची तर्कपरंपरा दृढसंधाला अगदीं संभवनीय वाटली, आणि त्याच्या मनाला फार खेद झाला. थोडा वेळ विचार करून दृढसंध म्हणाला,–'चूडामणि, तुझे हे तर्क अगदीं बरोबर आहेत, असें मलाही वाटतें. आतांपर्यंत मीं अशा दृष्टीनें शेखराच्या कृत्यांकडे पाहिलेंच नव्हतें, पण तुझ्या या भाषणानें त्याच्याविषयींचा माझा भ्रम दूर झाला आहे!'

मेधावती जळफळत म्हणाली,–'अशा प्रकारचा कुलांगार कारटा माझ्या पोटीं उपजला नसता, तरी बरें झालें असतें. चूडामणि, तूं आपल्या भावाचें हृद्गत ओळखलेंस हें फार चांगलें झालें. तूं आतां जें कांहि आम्हांस सांगितलेंस, त्यावरून त्या कारट्याच्या दुष्ट हेतूंविषयीं माझ्या मनांत आतां चिलकुल शंका उरलेली नाहीं! तो दुष्ट त्या निंबराजाच्या पक्षाला अनुकूल आहे, याबद्दल संशयच नको!'

दृढसंधालाही यावेळीं क्रोध आला आहे, असें त्याच्या मुद्रेवरून दिसत होतें. तो त्वेषानें बोलला,–'तो कारटा जर खरोखरच राजद्रोही बनला असला, तर मी पुनः त्याचें मुखावलोकनही करणार नाहीं. आमच्या पूर्वजांनीं ज्या गादीची सेवा करून प्रतापपुरचें राज्य मिळविलें, त्या गादीची सेवा एकनिष्ठेनें करणें हें आमच्या कुलांतील प्रत्येक पुरुषाचें कर्तव्य आहे. तो दुष्ट जर आपल्या कर्तव्याला चुकला अशी माझी खात्री झाली, तर त्याला मी एकदम हद्दपार करीन, अगर्पे त्याला धुळीस मिळवीन!–'

चूडामणि मोठ्या मानभावीपणानें आपल्या भावाचा कैवार घेत म्हणाला,–'तात, आपण पूर्ण विचार केल्याखेरीज एकादी गोष्ट करणार नाहीं, ही माझ्या मनाची खात्री आहे. ही फार विचाराची गोष्ट आहे. शेखराच्या मनांत काय आहे, हें कांहीं मला स्पष्ट समजलेलें नाहीं. केवळ हे माझे तर्क आहेत. मी आपले तर्क अशा रीतीनें आपणापाशीं उघड बोलून दाखविणें हें वास्तविक योग्य नव्हतें, पण वेळच आली म्हणून मला तेवढें भाग पडलें. प्रत्यंतर पुराव्यानें या गोष्टी सिद्ध होईपर्यंत आपण हा विषय गुप्त ठेविला पाहिजे. या दिवाणखान्याच्या चार भिंतींपलीकडे या विषयाची वाच्यता झाल्यास तो आपले बेत गुप्तपणें करूं लागेल, आणि आपली फसगत होईल, म्हणून आपण खबरदारी घेतली पाहिजे.'

दृढसंध म्हणाला,–'ही तुझी सूचना योग्य आहे. तूं त्याच्या या गोष्टी आमच्याशीं बोललास, ही गोष्ट खुद्द गुप्त राखणें जरूर आहे. नाहीं तर तो तुझा अधिक द्वेष करूं लागेल. मीही यापुढें त्याच्याशीं सावधपणानें वागेन. या प्रसंगीं जर त्याला त्याच्या कपटाचरणाची ओळख दिली, तर तो चाळ्यावर येण्याऐवजीं अधिक भकून जाण्याचा संभव आहे. त्याला कृतकर्माबद्दल विचार करावयास आपण फुरसद दिली पाहिजे. न जाणों, विचारांतीं आपली वर्तणूक अयोग्य आहे, असें त्याचें त्यासच वाटणार नाहीं, असें कशावरून? तूं भृगुकच्छ येथें जावयास कबूल नाहींस हेंही एका अर्थीं ठीक आहे. मी त्यालाच त्या कामावर पाठवितों. तो तिकडे एकटा असला, म्हणजे त्याला विचार करावयास आणि आपलें मन [illegible] जावयास योग्य बुद्धि सांपडे[illegible]गतों, जर तो कारटा निंब[illegible] वळला आहे अशी माझी [illegible] होईल, तर मी हें त्याचें ठरलेलें [illegible] टाकीन आणि त्याला त्या[illegible]नाबद्दल कडक शासन करीन.'

हें दृढसं[illegible]न चूडामणीला अत्यानंद झ[illegible] सभ्यां त्यानें जें सोंग घेतलें [illegible] योग्य बतावणी करण्यासाठी [illegible] मुद्रा उदासीन दाखविणें इष्ट [illegible]न अगदीं खिन्न मुद्रेनें तो म्हणाला,–'अहो तात, शेखर जर

सरोखरच कपटी निघाला, तर त्या बिचाऱ्या प्रियंवदेला मात्र विनाकारण कष्ट होणार आहेत! शेखरामुळें त्या बिचारीवर दुःखाचा प्रसंग येणार, याचें मला फार वाईट वाटतें.'

मेधावती म्हणाली,–' माझी भाची मला तुमच्याइतकीच प्रिय आहे. शेखर हा आपल्या कुलास कलंक लावणारा दुष्ट पुत्र निपजला नाहीं, अशी ज्या दिवशीं माझ्या मनाची खात्री पटेल, त्याच दिवशीं मी त्या उभयतांच्या विवाहास संमति देईन.'

चूडामणि अत्यंत गंभीर मुद्रेनें पोक्तपणाचा आव घालून म्हणाला,–' माते, मीं आपल्याला एकादी गोष्ट सुचवावी असें नाहीं; तरीपण मला यासंबंधानें एक सूचना करावीशी वाटते. प्रियंवदेची अगदीं आयत्या वेळीं निराशा करण्यापेक्षां एव्हांपासूनच युक्तीयुक्तीनें शेखरावरून तिचें मन उडविण्याचा प्रयत्न चालू करावा, हें योग्य आहे, असें मला वाटतें. प्रियंवदेवर माझें बहिणीप्रमाणें प्रेम आहे. तिच्या कोवळ्या अंतःकरणास एकदम जबरदस्त धक्का बसल्यास त्याचा परिणाम फार वाईट होईल. यासाठीं एव्हांपासूनच तिची थोडथोडी निराशा करावी हें मला बरें वाटतें.'

मेधावती म्हणाली,–' ही तुझी सूचना मोठी शहाणपणाची आहे, यांत शंका नाहीं. आमच्या कुटुंबासंबंधानें निघालेल्या गोष्टींमध्यें तूं इतक्यांदा पोक्तपणाची मसलत देत आहेस, हें पाहून मला फार समाधान वाटतें.'

दृढसंध म्हणाला, ', या प्रसंगीं सर्व बाजूंनीं शेखराला थोडे दिवस पाठवावें, हेंच मला सल्ला. त्याला भृगुकच्छ नगरीं लागू करण्यास कांहीं तरी , निदान सहा महिने तरी दूर ठेवणें जरूर आहे. हुंडी ल्यावर मी आणखी कांहीं तर ून त्याला तेथेंच राहणें भाग पाडीन. प्रियंवदेपासून तो दूर असला, म्हणजे त्याला विचार करावयास पुष्कळ वेळ सांपडेल, आणि त्याला आपली चूक कळून येईल. तो येथून गेल्यावर आणखी थोड्या दिवसांनीं त्याला दुसरें खरमरीत पत्र लिहिलें, आणि त्याच्या दुष्ट हेतूची आपणांस खबर लागल्याची त्याला चुणूक दाखविली, कीं खाडकन त्याचे डोळे उघडतील; आणि आपण आपलीं सर्व कारस्थानें सोडून दिल्यावांचून आपले पाय दरीस लागणार नाहींत, अशी त्याच्या मनाची खात्री पटेल.'

चूडामणि म्हणाला,–' पण असें करतांना माझें यांत कांहीं अंग आहे, असें त्याला अगदीं समजतां कामा नये. नाहींतर तो माझ्यावर सुद्धां कांहीं तरी कुभांड रचावयास कमी करणार नाहीं. त्याच्या मनांत असलेल्या महत्त्वाकांक्षा पूर्ण होण्यास त्याला कायतो माझाच अडथळा आहे! ईश्वरा, तूं जरी शेखराला दुष्ट बुद्धि दिली असलीस तरी त्याच्याविषयीं माझ्या मनामध्यें मात्र वैरभाव उत्पन्न होऊं देऊं नको, एवढीच माझी तुजपाशीं प्रार्थना आहे!'

दृढसंध म्हणाला,–' शेखराविषयीं आम्हांस आलेल्या सर्व प्रकारच्या शंकांचें समाधान होईपर्यंत तुझा या बाबतींत कांहीं संबंध आहे असें बाहेर दिसूं न देणें हें फार अगत्याचें आहे, यांत शंका नाहीं. या बाबतींत मला जें कांहीं करावेसें वाटेल, तें मी फार सावधपणानें आणि गुप्तपणानेंच करीन. ईश्वर करो, आणि शेखर कुलाला कलंक लावणारा न निंपजो! तो जर तसा निपजला तर– ,

इतक्यांत ' कोण आहे तें तिकडे!' असे उद्गार काढीत चूडामणी आपल्या जाग्यावरून उठला; आणि मोठ्या घाईघाईनें खिडकीपाशीं गेला.

हें संभाषण चाललें होतें ती वेळ सायंकाळची होती, आणि राजवाड्याच्या दुसऱ्या मजल्यावरील एका दिवाणखान्यांत हें संभाषण चाललें होतें, हें वाचकांस स्मरतच

असेल. हें भाषण ज्या दिवाणखान्यांत चाललें होतें, तो दिवाणखाना राजवाड्याच्या पिछाडीकडचा होता, आणि या दिवाणखान्यांतील खिडकीखालीं लहानसा बगीचा असून त्या पलीकडे तबेला, पिलखाना वगैरे इमारती होत्या. साधारण मानानें विचार केला तर प्रतापपुरच्या दरींत पूर्ण प्रकाश फारसा पडतच नसे, आणि राजवाड्याच्या पिछाडीस जी बाग होती, त्या बागेच्या भोंवती इमारती असल्यामुळें तेथें तर नेहमींच मंद प्रकाश असे. सध्या वेळ सायंकाळची असल्यामुळें तेथें बराच काळोख झाला होता. दृढसंध मेधावती आणि चूडामणि हीं ज्या दिवाणखान्यांत बसलेलीं होतीं, तेथें एक मंद दिवा तेवत होता; त्याचा उजेड बागेमध्यें पडत नव्हता. इतकेंच नव्हे तर, त्या दिव्याचें तेज डोळ्यांत भरलेल्या माणसास खालच्या बागेमध्यें चांगलाच काळोख भासत होता. चूडामणीनें खिडकीपाशीं जाऊन तेथून बागेकडे नजर टाकली, पण त्याला बाहेरच्या काळोखामुळें कांहींच दिसेना म्हणून त्यानें मोठ्यानें ओरडून विचारलें,– 'अरे ए कोण आहे रे तिकडे तबेल्यांत ? अरे ए मोतदार !–'

ह्या चूडामणीच्या हाका तबेल्यांतील मोतद्दारांस ऐकूं आल्या, आणि तेथें असलेले एक दोन मोतद्दार हातीं दिवे घेऊन बागेमध्यें आले. त्यांना चूडामणीनें बागेंत कोणी माणूस आहे कीं नाहीं, हें पहावयास सांगितलें. मोतद्दारांनीं बागेची तपासणी करून तेथें कोणी नाहीं असें उत्तर केलें. तें ऐकून चूडामणि त्यांस म्हणाला,–'कांहीं विशेष नाहीं. खालीं कोणी तरी माणूस असावें, असा मला भास झाला, म्हणून मी चौकशी केली, इतकेंच ! चला, तुम्ही आतां आपल्या उद्योगास लागा.' असें बोलून त्यानें जोरानें खिडकीचें दार बंद करून घेतलें, आणि तो पुनः आपल्या जागेवर बसला. चूडामणीच्या या वर्तनाचा त्याच्या माता-पितरांस काहीच उलगडा झाला नसल्यामुळें त्यांनीं यासंबंधानें त्याला साहजिकपणें प्रश्न केला.

चूडामणि म्हणाला,– 'बोलतां बोलतां माझी नजर सहज खिडकीकडे गेली. त्यावेळीं या खिडकींतून कोणी आंत डोकावून पहात आहे, असा मला भास झाला. मला तेथें माणसाचा चेहरा दिसला, इतकेंच नव्हे, तर या दिव्याच्या प्रकाशामध्यें त्याचे डोळे चमकत असावे, असें सुद्धां मला वाटलें; म्हणून मीं ताबडतोब चौकशी केली.'

दृढसंध म्हणाला,– 'आमचें असें एकांतीं भाषण चाललें असतां तें आडून ऐकण्याचा प्रयत्न करणारा हा दांडगा कोण आहे, याचा तपास अवश्य केला पाहिजे !'

मेधावती म्हणाली,– 'चूडामणीला उगीच तसा कांहीं तरी भास झाला असेल. अशा अवेळीं राजवाड्याची भिंत चढून खिडकीसारख्या अवघड ठिकाणीं राहून कोणी आमचें भाषण ऐकण्याचा प्रयत्न करीत असेल, हें मुळींच संभवत नाहीं.'

'दृढसंध म्हणाला,– 'तूं म्हणतेस तेंही खरेंच असेल ! चूडामणि इतक्या जलदीनें खिडकीपाशीं गेला, कीं तेवढ्या अवकाशांत तेथें कोणी असतें तर तें त्याच्या नजरेस पडल्यावेरीज राहिलें नसतें. अर्थात् याला तो भ्रमच झाला; असतांहि यावेळीं आमचीं चाकर-माणसें चोहींकडे हिंडत असतां अशा रीतीनें कोणी भिंती चढण्याचा प्रयत्न करील, हें मला शक्यच वाटत नाहीं. यासाठीं सध्यां आपण त्यासंबंधानें अधिक विचार करण्याची जरूर नाहीं. मी आतां शेखराची गांठ घेऊन त्याला भृगुकच्छास जाण्याची तयारी करावयास सांगतों. मी उद्यांच त्याला तिकडे पाठवून देणार !'

चूडामणि म्हणाला,– 'शेखराचा सेवक चतुरक हा तर त्याच्याबरोबर असणारच; पण त्याच्यावेरीज आणखी एकादा दुर्मुखासारखा विश्वासु सेवक त्याच्या बरोबर

सरोखरच व
प्रियंवदेचर होईल, असें मला वाटतें. त्याला आहेर नजर ठेवावयाची आपण आज्ञा दास तो ती योग्य रीतीनें बजावील, आणि शेखरावर चांगली नजर राहिली म्हणजे त्याचीं सर्व कृत्यें आपणांस उमगून पुढें योग्य बंदोबस्त करतां येईल.'

दृढसंध म्हणाला,–' ही तुझी सूचना योग्य आहे. दुर्मुखाइतका दुसरा विश्वासु नोकर त्याच्यापाशीं ठेवण्याच्या लायकीचा कोणी सांपडावयाचा नाहीं. '

चूडामणि बोलला,–' त्याच्यावर आपला पूर्ण विश्वास आहे, म्हणून मीं त्याचेंच नांव सुचविलें '

इतकें भाषण झाल्यावर त्यांस आणखी कांहीं बोलावयाचें उरलें नसल्यामुळें चूडामणि वमेधावती हीं तेथून निघून गेलीं. नंतर दृढसंधानें बोलाविल्यावरून शेखर आपल्या पित्यापाशीं येऊन हजर झाला.

वाचकहो, मागील कथाभाग जर तुम्ही लक्ष्यपूर्वक वाचला असेल, तर त्या नीच चूडामणीनें अस्खलित खोट्या गोष्टी सांगून आपल्या वडिलांचें मन शेखराविषयीं किती कलुषित करून ठेविलें होतें, हें तुमच्या ध्यानीं आलेंच असेल. सरदार हलधर आणि सत्यरथ हे लबाड आहेत, अशी शेखराच्या मनाची खात्री पटल्यानंतर त्यानें त्यांच्याशीं कोणत्याही प्रकारचा स्नेहसंबंध ठेविला नव्हता, हेंही आपल्या ध्यानीं आलेंच असेल. सरदार हलधर आणि सत्यरथ यांनीं प्रतापपुरच्या दरींत पाय ठेवला, त्यापूर्वी शेखराला प्रस्तुत राजकारणाची नुसती वातमीसुद्धां नव्हती, असें म्हणावयास हरकत नाहीं. सरदार हलधर प्रतापपुरामध्यें आल्यानंतर त्याच्या हेतूविषयीं बरेच वेळां चर्चा झाली, परंतु शेखरानें प्रस्तुत विषयासंबधानें विचार केला नसल्यामुळें त्यानें या बाबतींत आपलें कांहींच मत दिलें नव्हतें. आपल्या कुटुंबांतील वडील पुरुषांचें जें मत तेंच आपलें मत, त्यांचा जो पंथ तोच आपला पंथ, असें समजण्याची सर्व लोकांची सामान्य प्रवृत्ति असते, तिला अनुसरून शेखराचें या राजकारणासंबंधाचें मत रत्नाकर महाराजांच्या पक्षास अनुकूल होतें. स्वतः रत्नाकर राजा दुर्गुणी असल्याचा बोभाटा शेखराच्या कानीं आला नव्हता असें नाहीं. पण तेवढ्यावरून त्याला पदच्युत करून दुसऱ्याला त्याच्या गादीवर बसवावें ही गोष्ट शेखराला अगदीं पसंत नव्हती. सरदार हलधर हा कपटी आहे हें समजल्यानंतर सुद्धां शेखरानें त्याचा प्राण वांचविण्याचा प्रयत्न केला होता, तो केवळ आपल्या मनांतील औदार्यबुद्धीच्या प्रेरणेनेंच केला होता. सरदार हलधराचा पक्ष त्याला आवडत होता, म्हणून त्यानें त्याचा प्राण-वांचविला होता, असें नाहीं. अर्थात् चूडामणीनें केवळ आपल्या मनांतील वैर साधण्यासाठींच त्याच्यावर फितुरीचा आरोप केला होता, हें अगदीं उघड आहे.

खुद्द चूडामणीसंबंधानें विचार केला असतां सध्यां त्याच्या स्वभावांतील एकेक गुप्त गोष्ट बाहेर पडूं लागली होती. आतांपर्यंत फक्त त्याच्या स्वभावांतील कौर्य आणि अभिमान हे दोनच दोष कायते प्रकट झालेले दिसत होते; पण सध्याच्या वर्तनावरून तो कपटकर्मामध्यें निष्णात आहे, असें उघड होत होतें. तो अत्यंत अधम–नीच–वृत्तीचा मनुष्य होता. सर्व प्रकारच्या दुष्ट मनोविकारांचा तो मूर्तिमंत पुतळा होता. इतके दिवसपर्यंत त्याच्या स्वभावांतील हे दुर्गुण गुप्त होते, पण राखेमध्यें झांकलेला अग्नि योग्य इंधनें मिळतांच ज्याप्रमाणें भडकतो, त्याप्रमाणें योग्य समय प्राप्त होतांच त्याच्या नीच मनोवृत्ति हळुहळु प्रकट होऊं लागल्या होत्या. सध्यां त्याला स्वताच्या अधम वासना तृप्त करावयाच्या असल्यामुळें तो आपले सर्व व्यूह अगदीं सावधपणें रचित होता. चिडखोर आणि लापट स्वभावांचीं माणसें प्रायः मोकळ्या मनाचीं असतात, असा सामान्य नियम आहे; पण चूडामणि

हा या नियमाला अपवाद होता. तो जितका कपटी, तामसी आणि हेकेखोर होता, तितकाच पापपुण्याला न भिणारा पाषाणहृदयी मांग होता. स्वार्थासाठीं कोणतीही गोष्ट करावयास त्यानें मागें घेतलें नसतें. मनुष्य एकदा मनोभावानें पापकर्म करण्यास प्रवृत्त झाला, म्हणजे तें कर्म तडीस नेण्यासाठीं हवीं असणारीं साधनें प्राप्त करूम घेण्याचे प्रयत्न सुरू होतात, आणि चमत्कार हा कीं त्याला तीं पापकर्में सिद्धीस नेण्यास अगदीं विलक्षण युक्त्या आपोआप सुचत असतात ! आणि पापवासना, कपट, कुटिलता आणि दुटप्पी वर्तन ही त्रयी त्या वासना पूर्ण करण्यासाठीं तात्काल हजर होते. आणि पापवासना जितकी तीव्र असेल, तितक्या मानानें या तीन गोष्टीही अधिक तीव्र असतात.

अरेरे गरीब बिचारा शेखर ! सध्यां तों भयंकर सुरुंगावर उभा असून त्या सुरुंगाला बत्ती लावण्यासाठीं हातामध्यें पेटलेला तोडा घेऊन चूडामणि अगदीं सज्ज होऊन बसला होता ! त्याच्या अंगीं जे सद्गुण वास करीत होते, त्यांचा त्याला या प्रसंगीं कांडीभरसुद्धां फायदा होत नसून, तेच त्याच्या नाशास कारणीभूत होऊं पहात होते. त्याच्या सद्गुणांचें बरोबर चित्र जर कोणी त्याच्या पितरांच्या नेत्रांसमोर उभें केलें असतें, तर असला सद्गुणी मुलगा आपल्या उदरीं जन्मास आला, याबद्दल त्याच्या मातापितरांस धन्यता वाटली असती. पण त्याच्या सद्गुणांचें अगदीं विपरीत चित्र त्याच्या प्रत्यक्ष वडील भावानें मोठ्या मानभावीपणानें वडिलांच्या डोळ्यांपुढें उभें केलें असल्यामुळें तो सध्यां त्यांच्या मर्जीतून उतरला होता.त्या नीच चूडामणीला आपल्या भावाचा उत्कर्ष सहन होत नसल्यामुळें आणि प्रियंवदेसारख्या सद्गुणी आणि रूपवती तरुणीचा लाभ त्याला होणार, ही गोष्ट त्याला पसंत नसल्यामुळें, केवळ मत्सरानें तो आपल्या लहान भावाच्या तोंडांत विष कालवण्यास सिद्ध झाला होता ! चूडामणीनें सुंदरपुरच्या राजवाड्यामध्यें जें विषमय भाषण केलें होतें, त्याचा जर त्याला खरोखर पश्चात्ताप होऊन तो शेखराशीं क्षमा मागावयास गेला असता, तर शेखराचा आनंद गगनांत मावेनासा झाला असता ! चूडामणीनें त्याच्याशीं जें कठोर वर्तन केलें होतें, त्याचें शेखराला फारच दुःख होत होतें, आणि तो एकसारखा आपल्या मनांत तळमळत होता. त्याला कसलें तरी दुःख होत असावें ही गोष्ट प्रियंवदेच्या ध्यानीं आली होती, आणि तिनें त्याला परोपरीनें प्रश्न विचारले होते; परंतु त्या उदार मनाच्या शेखरानें तिला देखील आपल्या दुःखाचें कारण कळविलें नव्हतें. फक्त यासंबंधानें तो कांहीं तुरळक तुरंळक एक दोन शब्द तिच्या जवळ बोलला असेल; पण तेवढ्यावरून चूडामणीच्या नीचपणाची प्रियंवदेला पारख होण्यासारखी नव्हती. आपल्या भावाच्या कागाळ्या वडिलांजवळ सांगणें हें त्याला इष्ट वाटलें नाहीं; पण त्याचा परिणाम किती विपरीत झाला ? त्या दुष्ट चूडामणीला वडिलांचें मन कलुषित करण्यास शेखराच्या स्तब्धतेमुळें फार चांगली संधि मिळाली, आणखी त्यानें ती व्यर्थही दवडिली नाहीं.

चूडामणीच्या मानभावीपणानें दृढसंध साफ फसला होता, तथापि त्यानें शेखराविषयीं आपल्या मनांत अविश्वास आणि संशय उत्पन्न झाला आहे, ही गोष्ट त्याच्यापासून गुप्त राखण्याचा निश्चय केला होता. शेखराला कांहीं दिवस आपल्यापासून दूर ठेविलें, म्हणजे तो ताब्यावर येईल अशी दृढसंधाला आशा वाटत होती; म्हणून सध्यांच्या प्रसंगीं त्यानें शक्य तितका प्रयत्न करून आपली मुद्रा निर्विकार राखिली होती. दृढसंधाच्या निरोपाप्रमाणें शेखर त्याजपुढें उभा राहिला; पण आपल्याविषयीं पित्याच्या मनांत कांहीं काळेंबेरें आलें असेल, अशी त्याच्या मनांत शंका सुद्धां आलेली न हती.

दृढसंध नेहमींप्रमाणें शांत मुद्रेनें त्यास म्हणाला,-'शेखर, बृहद्रथानें खंडणीच्या रकमेबद्दल जी हुंडी दिली आहे, ती पटवून रक्कम वसूल करून आणावयासाठीं कोणीं तरी भृगुकच्छ येथें जाण्याची फार जरूर आहे. हें काम तूंच करावें, अशी माझी इच्छा आहे. शिवाय हें काम होईल तितकें जलदही झालें पाहिजे. यासाठीं तूं उद्यांच्या उद्यां प्रस्थान ठेविलें पाहिजे.'

शेखरानें आश्चर्यानें विचारलें,-'काय ? उद्यांच निघावयाचें ?' असें त्यानें प्रथम विचारलें खरें, पण लगेच तो म्हणाला,-'ठीक आहे. माझी तयारी आहे.'

दृढसंध म्हणाला,-'तूं या कामासाठीं उद्यांच निघावें अशी माझी इच्छा आहे. तुझ्या बरोबर तुझा सेवक चतुरक तर येईलच, पण त्याच्याशिवाय मी आणखी दुर्मुखाला तुझ्याबरोबर देणार आहें. भृगुकच्छ नगरांत वृषपति महाराजांचा एक. वाडा आहे त्याच वाड्यांत तुझी राहण्याची सोय चांगली जमेल. मी वृषपतींकडे माणूस पाठवून त्यांचें पत्र आणवितों. हुंडीची रकम वसूल झाली, म्हणजे त्यांतील निमे रकम वृषपती महाराजाच्या तेथील हस्तकाच्या स्वाधीन कर; आणि निमे रकमेचें काय करावयाचें तें मी तुला लिहून कळवीन. तोंपर्यंत तीं तूं आपल्यापाशींच मोठ्या बंदोबस्तानें ठेव. रकम पटल्याबरोबर कोणाला तरी मुद्दाम पत्र देऊन मजकडे पाठवावयास विसरूं नको. भगुकच्छ येथें माझीं आणखी पुष्कळ कामें आहेत, तीं मी तुला तेथें गेल्यावर योग्यवेळीं पत्रांतून कळवीन.'

आपल्या पित्याच्या सर्व आज्ञा अक्षरशः पाळण्याचें कबूल करून तेथून निघाल्यावर शेखरानें लागलीच प्रियंवदेची भेट घेतली, आणि त्यानें आपल्या पित्याची आज्ञा तिला कळविली. आपल्या प्रियकराचा आपणास इतक्या लवकर वियोग होणार हें समजतांच [illegible] आश्रूंना वाहूं लागल्या. हें पाहून शेखरानें तिचें समाधान केलें, आणि आपलें काम आटोपल्यानंतर एक दिवस सुद्धां आपण तेथें राहणार नाहीं, असें त्यानें तिला वचन दिलें.

दुसरे दिवशीं सकाळींच शेखराच्या प्रस्थानाची तयारी झाली. चूडामणीच्या शिफारशीवरून दृढसंधानें शेखराच्या कृत्यांवर नजर ठेवण्यासाठीं योजिलेला दुर्मुखही प्रवासाची तयारी करून शेखराबरोबर जाण्यास सिद्ध झाला. दुर्मुखाचें वय पन्नाशीच्या जवळ जवळ होतें. या माणसाकडे राजवाड्यांतील वांकनिशीचें काम होतें. प्रतापपुरच्या दरींतील लोकांच्या मुद्रेवर सामान्यतः क्रूरपणा वास करीत असे, पण याच्या मुद्रेवर क्रूरपणा ऐवजीं कांहींसा करारीपणा दिसून येत असे. तो जरी मित भाषण करीत असे, तरी त्याची रसंवंती रसाळ असल्यामुळें तो दुसऱ्याचें मन आपल्या भाषणाकडे तात्काळ वळवून घेत असे. सौम्य मुद्रा, मधुर भाषण, आणि मन मिळाऊ स्वभाव, या गुणांच्या योगानें त्याचा सहवास कोणालाही अप्रिय होत नसे.

शेखराचा सेवक चतुरक याचें वय सोळा-वर्षांचें असून त्याचा चेहरा गोंडस होता. शेखरावर त्याचें खरें प्रेम असून तो त्याची कोणतीही आज्ञा अगदीं कांकू न करतां मोठ्या हुषारीनें पाळीत असे. तो बाळपणापासून म्हणजे वयाच्या दहाव्या वर्षापासून शेखराच्या दिमतीस होता, आणि त्यानें शेखराबरोबर प्रतिष्ठानामध्यें पुष्कळ वर्षें काढिलीं होतीं. त्याचप्रमाणें शेखर पूर्वी एकदा भृगुकच्छ नगर पाहण्यासाठीं गेला असतां, तेथें चतुरकही त्याच्याबरोबर होता.

अशा रीतीनें दोघां सेवकासह शेखराची प्रवासाची तयारी झाली, आणि त्यानीं घोड्यावर स्वार होऊन दृढसंधाचा आणि आपल्या इष्ट-मित्रांचा निरोप घेतला. मेधावती आणि दृढसंध यांनीं शेखराला निरोप देत असतां आपल्या मनोवृत्ति

गुप्त ठेविल्या होत्या; त्यामुळें आपण त्यांच्या मर्जीतून उतरलों आहों, ही गोष्ट शेखराच्या ध्यानीं आली नाहीं.

परंतु चूडामणीचें वर्तन यावेळीं कशा प्रकारचे होतें? त्या नीच पुरुषानें आपल्या मनांतील दुष्ट हेतु साध्य करून घेण्यासाठीं आपलीं मातापितरें आणि प्रियंवदा हीं ऐकत असतां शेखरापाशीं जाऊन त्याला म्हटलें, 'शेखर, या पूर्वीं जें काय झालें तें झाले. तें आपण उभयतांनींही विसरून जावें, अशी माझी मनापासून इच्छा आहे. ये! हा प्रवास तूला सुखकर होवो!'

अलीकडे चूडामणीचें त्याजपाशीं ज्याप्रकारचें वर्तन होतें त्या प्रकारच्या वर्तनावरून त्याच्या तोंडांतून अशाप्रकारचे शब्द ऐकूं येतील, असें शेखराच्या ध्यानीं मनीं देखील नसल्यामुळें त्याच्या मुखांतील वरील शब्द ऐकून त्याला अतिशय हर्ष झाला; आणि समाधान वाटलें. याप्रसंगीं चूडामणीनें आपली क्षमा मागितली असल्यामुळें मागील गोष्टींचा संबंध आपल्या भाषणांत दाखविणें इष्ट नाहीं, असें शेखराच्या मनांत आलें व कांहीं न बोलतां केवळ आनंदित मुद्रेनें शेखरानें आपली संमति प्रकट केली. तो सध्या घोड्यावर असल्यामुळें त्यानें चूडामणीचा हात आपल्या हातीं घेऊन मोठ्या प्रेमानें दाबला, आणि घोड्यास टांच मारून तो निघून गेला.

हा जो प्रकार घडून आला, त्याचा अर्थ त्या उभयतां पितरांच्या दूषित मनाला अगदीं विपरीत वाटला, यांत आश्चर्य नाहीं. शेखरानें अपराध केला असून तो आपण विसरून गेलों, असें चूडामणीनें उघड बोलून दाखविलें असल्यामुळें चूडामणीचा स्वभाव अतिशय उदार आहे, असें त्यांस वाटलें. आणि शेखरानें कांहींच भाषण केलें नाहीं, यावरून त्याच्या मनांत कपट असावें, याबद्दल त्यांच्या मनाची खात्री पटली. तीं दोघे जरी त्या वेळीं कांहींच बोललीं नव्हतीं, तरी आपल्या कपटाचरणाचा योग्य परिणाम झाला, ही गोष्ट चूडामणीच्या ध्यानीं आली, आणि त्याला मोठें समाधान वाटलें.

भाग १ ला समाप्त.

धुंधुरव.

(मनोरंजक व बोधपर कादंबरी.)

भाग दुसरा.

प्रकरण २५ वें.

भृगुकच्छ.

ज्या काळची आम्ही ही कथा सांगत आहों, त्याकालीं नर्मदानदीच्या मुखापाशीं भृगुकच्छ या नांवाचें एक विस्तीर्ण नगर होतें. हें नगर समुद्रतीरीं असल्यामुळें, तेथें जलमार्गानें मोठा व्यापार चालत असे. गुर्जर-देशाच्या दक्षिणभागामध्यें एवढें मोठें दुसरें शहर त्यावेळीं नसल्यामुळें, त्या शहराची सर्व देशामध्यें मोठी प्रख्याति होती. बंदर फार सोईचें असल्यामुळें, देशोदेशींच्या हजारों व्यापाऱ्यांचीं गलबतें त्या बंदरांत नांगरलेलीं असत. जलमार्गानें आलेला माल वर घांटीं पाठवावयाचा आणि वर घाटांतून आलेला माल जलमार्गानें जावयाचा असल्यामुळें, त्या शहराची जशी जलमार्गानें तशीच स्थल-मार्गानेंही शेंकडो शहरांशीं मोठी देवघेव होत असे. व्यापाराच्या निमित्तानें आलेले, अनेक देशांतील निरनिराळ्या पद्धतीचा पोशाक करणारे आणि अनेक वर्णांचे लोक त्या शहरांत नेहमीं दृष्टीस पडत, त्यामुळें तेथें वास करणाऱ्या लोकांस अनेक देशांतील रीतिरिवाज नेहमीं पहावयास मिळत. व्यापा-राचें मोठें बंदर असल्यामुळें, सौराष्ट्राधिपति कधीं कधीं त्या [redacted] आपल्या राज्याचीं सूत्रें [redacted] मेळां धिराज सें[redacted]से; त्या नगरीं[redacted] ज-म्हणून त्य[redacted]


वाडा बांधिला होता. सौराष्ट्राधिपतीच्या मांडलिकांना राजकारणासाठीं भृगुकच्छ-नगरीं वारंवार जावें लागत असल्यामुळें, त्यांनीं सुद्धां आपापल्यासाठीं तेथें मोठमोठे भव्य वाडे बांधून ठेविले होते. या वाड्यांनीं आणि तेथील व्यापाऱ्यांच्या मोठमोठ्या इमारतींनीं त्या नगरास मोठी शोभा आली होती. याशिवाय त्या शहराला आणखी एका कारणानें महत्त्व आलेलें होतें. नर्मदानदीच्या तीरीं हें नगर असल्यामुळें, आणि पूर्वी जेथें भृगु-महर्षींचा आश्रम होता, त्या जागेपासून हें नगर फारसें दूर नसल्या-मुळें, त्याला क्षेत्र ही संज्ञा प्राप्त झाली होती. भृगुक्षेत्र, भृगुपुर, भृगुकक्ष, भृगुकच्छ, भरु-कच्छ, भरोच्छ, अशा प्रकारचीं परस्पर सादृश्य असलेलीं अपभ्रष्ट अशीं बरींच नांवें भाषाभेदानें आणि बोलणाऱ्यांच्या उच्च-नीच-वर्णाप्रमाणें त्या शहरास प्राप्त झालेलीं होतीं, यावरूनच त्या शहराचें महत्त्व लक्ष्यांत येण्यास हरकत पडणार नाहीं.

अशा प्रकारच्या त्या विस्तीर्ण आणि गजबजलेल्या नगरीमध्यें भव्य अशा वाड्यांतील दुमदार व प्रशस्त दिवाण-खान्यामध्यें दोन तरुणी बसलेल्या होत्या. त्या दोघीही आपापल्यापरी सुंदर होत्या, पण त्यांच्या सौंदर्यामध्यें पुष्कळ फरक होता त्यांतील एक तरुणी ठेंगणी दुसकी अशी असून, तिच्या मस्तकाचे केंश काळेभोर होते; तिचे नेत्र काळेभोर पण जरा मोठाले होते; आणि त्यांमध्यें एका प्रकारचें

तेज चमकत असे. तिच्या नेत्रांतील तेजाच्या योगानें ती मोठी हुषार, पाणीदार आनंदी आणि सुस्वभावी असावी, असा ग्रह तिजकडे पाहणाराच्या मनांत तत्काल उत्पन्न होत असे. तिचे ओष्ठ पोंवळ्याच्या रक्तवर्णाला लाज आणणारे असून ते आंतील शुभ्र दंतपंक्तीमुळें फारच आरक्त दिसत असत. तिच्या अंगाची कांति केतकीच्या वर्णासारखी असल्यामुळें, अंगावरील सुवर्णाच्या अलंकाराची ती स्पर्धा करीत असे, असें म्हणावयास हरकत नाहीं. तिचे गाल गुबगुबीत असून त्यांवर गुलाबी रंगाची छटा स्पष्ट दिसत असे. तिच्या अंगावर सध्या विशेष वस्त्रालंकार नव्हते, आणि जे होते ते धारण करतांना तिनें नीटनेटकेपणाकडे दुर्लक्ष केलेलें होतें. त्यामुळें तिचें नैसर्गिक सौंदर्यच सध्यां जास्त स्पष्ट दिसत होतें. तिच्या एकंदर बाण्यावरून ती एकाद्या सुखवस्तु गृहस्थाची कन्या असावी असें अनुमान करिता येण्यास हरकत नव्हती. या तरुणीचें नांव आनंदी असें होतें.

दुसरी एक तरुणी त्या दिवाणखान्यांत बसली होती, ती आनंदीपेक्षां अधिक उंच होती. इतकेंच नव्हे, तर तिच्या इतक्या उंच स्त्रिया थोड्याच सांपडल्या असत्या. ती अंगानें सडपातळ असल्यामुळें, फारच उंच दिसत असे. तथापि तिचे इतर अवयव या उंचीशीं सप्रमाणांत असल्यामुळें तिच्या एकंदर सौंदर्यांमध्यें कमीपणा भासत नसे. तिच्या मस्तकाचे केंश किंचित् पिंगट रंगाचे होते, पण त्यांची रचना करण्यामध्यें तिनें आपलें कौशल्य काळजीनें खर्च केलें असल्यामुळें तिच्या मस्तकास फारच शोभा आलेली होती. तिचें नाक शेंगेसारखें सरळ होतें, भुंवया कमानदार होत्या, ओंठ लहान होते, आणि हनुवटी वाटोळी होती. तिचे नेत्र जरी तेजस्वी होते, आणि त्यांवरून ती हुषार असावी असें अनुमान करतां येत होतें, तरी तिच्या नेत्रांवरून ती आनंदीइतकी सुस्वभावी नसावी असें वाटे. तिचा अंगवर्ण जरी गोराच होता, तरी ती आनंदीपेक्षां किंचित् काळी दिसत असे; पण तिच्या मुखावर जी तरतरी होती, तिनें तिच्या वर्णाचा कमीपणा भरून काढला होता. तिच्या मुखमंडलावर नेहमीं हास्य क्रीडत असल्यामुळें तिचे आरक्त ओष्ठ परस्परांपासून पृथक् झालेले असत, आणि त्यामुळें आंतील शुभ्र दंतपंक्तींचें प्रदर्शन होत असे. शिवाय तिच्या मुद्रेवरून तिनें उच्च कुलांत जन्म घेतलेला असावा असें लक्ष्यांत येई, आणि तिच्या अंगावरील वस्त्रालंकारांनीं तर तिच्या श्रीमंतीची खात्रीच पटे. या तरुणीचें दमयंती असें नांव असून, मागील एका प्रकरणांमध्यें वाचकांच्या परिचयाचा झालेला जो विक्रमसेन त्याची ती भगिनी होती.

या दोघी तरुणी ज्या वाड्यामध्यें बसलेल्या होत्या, तो वाडा भृगुकच्छ नगरांतील प्रख्यात सावकार आणि नगरशेट जो सागरदत्त त्याचा असून त्या वाड्यांतील भव्य दिवाणखान्यामध्यें त्याची कन्या आनंदी ही दमयंतीबरोबर गप्पा मारीत बसलेली होती. सागरदत्त हा श्रीमान् गृहस्थ असून तो खुष्कीच्या मार्गानें आणि जलमार्गानें व्यापार तर करीतच असे, पण शिवाय त्याचा हुंडीचा आणि व्याजबट्ट्याचाही व्यवहार असे. सौराष्ट्राधिपतीच्या साम्राज्यामध्यें जे अनेक संस्थानिक होते, त्यांपैकीं बहुतेकांकडे त्याचा देवघेवीचा व्यवहार नेहमीं चालू असे. पुष्कळ संस्थानिक आपली शिल्लक त्याजकडे ठेवीत, आणि वेळ पडल्यास त्याच्याकडून त्यांस गहाणावर किंवा पतीवर मोठमोठ्या रकमा कर्जाऊ सुद्धां मिळत असत. सारांश, द्रव्यप्राप्तीचे बहुतेक मार्ग त्यानें आपल्या आटोक्यांत आणून ठेवलेले होते.



अ[illegible] थोड्याच
वर्षांनी [illegible] पावली
होती, [illegible] च्या पुढें
गेलेलें [illegible] केला

नाहीं. त्याला पुत्रसंतान नव्हतें. त्याचें आपल्या कन्येवर प्राणांहून अधिक प्रेम असून, तो तिच्या सुखासाठीं कोणतीही गोष्ट करण्यास अनमान करीत नसे. त्याच्या संपत्तीचा, आणि स्थितीचा विचार केला असतां त्याची वागणूक बरीच कंजूषपणाची दिसे, तरी त्यानें आपल्या कन्येची इच्छा पूर्ण करण्यासाठीं द्रव्य खर्च करण्यास कधींही मागें घेतलें नव्हतें. आपण [illegible]पाशीं शब्द टाकला पुरे, कीं, आपल्यास उधळण्यासाठीं हवें तितकें द्रव्य मिळतें, ही तिच्या मनाची खात्री असल्यामुळें, तिला कोणी बोलणारें नसल्यामुळें आणि फाजील लाडामुळें ती बरीच स्वच्छंदी बनलेली होती. ती सध्यां उपवर झालेली असल्यामुळें, तिचें त्याच शहरांतील एकाद्या सावकारपुत्राशीं लग्न करून द्यावें, असा सागरदत्ताचा विचार होता. पण हा विचार त्या स्वच्छंदी मुलीस कसचा पटतो ? तिच्या मनांत कांहीं निराळेच विचार घोळत होते. बापानें विवाहाचा विचार करूं लागावें, आणि तिनें कांहीं तरी उडवाउडवीचीं उत्तरें देऊन तो प्रसंग टाळावा, असें कित्येक वेळां झाल्यावर शेवटीं तिनें एकदां आपला मनोदय पित्याला कळविला. आपलें विक्रमसेनावर प्रेम जडलें असून आपण त्याला विवाहाचें वचन दिलें आहे, असें तिनें पर्यायानें आपल्या पित्याच्या कानावर घातलें.

सुमारें सहा महिन्यांपूर्वी विक्रमसेन कांहीं देवघेवीच्या व्यवहारासाठीं भृगुकच्छयेथें आला असतां सागरदत्तानें त्याला आपल्याच वाड्यांत ठेवून घेतलें होतें. सागरदत्ताचा बहुतेक वेळ व्यापाराच्या घालमेलींत जात असल्यामुळें आपल्या मुलीच्या वर्तनाकडे नजर देण्यास त्यास फारसें फावत नसे; यामुळें विक्रमसेन वाड्यांत असतां त्याचें आणि आपल्या मुलीचें सख्य होत आहें, ही गोष्ट सागरदत्ताच्या मुळींच ध्यानीं आली नव्हती. सागरदत्ताची आणि त्याच्या कन्येचीं दुपारचीं भोजनें झाल्यावर थोडा वेळ गांठ पडे; नंतर तो आपल्या चोपड्यांमध्ये गढ्या होऊन गेला, म्हणजे वाड्यांत सगळें गो- आनंदीचें. तिला हवें तसें वागावयास हवा तितकी संधि मिळत असे. वाड्यांत चाकरमाणसें थोडीं होतीं असें नाहीं. पण आनंदी आपल्या पित्याची लाडकी असल्यामुळें, सागरदत्ताची मर्जी संभाळण्यापेक्षां तिची मर्जी संभाळण्याची सर्वांस ज्यास्त जरूर वाटे; म्हणून चाकरमाणसें तिच्या मर्जीप्रमाणें वागून तिच्यापासून आपला फायदा करून घेत असत. अशा प्रकारचीं गृहस्थिति असल्यामुळें, तिनें विक्रमसेनाला विवाहाचें वचन दिलें. ही गोष्ट सागरदत्ताला समजल्याबरोबर त्याला अतिशय आश्चर्य वाटलें, आणि कांहीं वेळ पर्यंत त्याच्या मुखांतून शब्द निघेना. त्याने आपल्या साऱ्या जन्मांत कधीं तिला [illegible]डक भाषणांनीं दुःखविलें नव्हतें, पण [illegible]डावेळ गेल्यानंतर त्यानें तिची खरडपट्टी काढण्यास सुरुवात केली; त्याचे ते कटु शब्द कानीं पडतांच आनंदीनें रडून रडून आकांत करण्यास प्रारंभ केला, आणि जसजसे तिच्या नेत्रांतून अश्रु जास्त वाहूं लागले, तसतसें सागरदत्ताचें तोंड बंद पडत चाललें. शेवटीं तिच्या मनाचें समाधान करण्यासाठीं त्याला तिच्या हेतूला अनुमोदन देणें भाग पडलें; व आणखी एक वर्षानंतर तिचा निश्चय कायम असल्यास तिचा विक्रमसेनाशीं विवाह करण्याचें त्यानें तिला आश्वासन दिलें.

विक्रमसेनाशीं तिचा विवाह होऊं नये, असें दोन कारणांमुळें सागरदत्ताला वाट होतें. त्यांपैकीं पहिलें कारण हें कीं. सेनाचा नारायणपुरच्या राज्य पोंचत होता, तरी सुद्धां सांप्र त्याची स्थिति समाधानकारक आणि दुसरें कारण हें [illegible] उधळ्या असून आप[illegible] साठीं तो कर्जबाजा[illegible] रत्नाकर महाराज[illegible]

तेज आसामी पत्करिली होती हें खरें, तरी स्वतः रत्नाकर महाराज उधळे असल्यामुळें, त्यांना सैन्याचा पगार वेळच्या वेळीं देण्याची मोठी पंचाईत पडे. त्यामुळें विक्रमसेनाला आपल्या हाताखालच्या शिपायांस पगार देण्यासाठीं सुद्धां केव्हां केव्हां कर्ज काढावें लागे. सागरदत्ताचा नारायणपुर संस्थानाशीं देवघेवीचा संबंध असल्यामुळें, त्या संस्थानची स्थिति काय आहे, हें त्यास पक्कें माहीत होतें. आपण त्या संस्थानिकास जें कर्ज दिलें आहे, तें सात पिढ्यांमध्यें सुद्धां परत होणें शक्य नाहीं, व संस्थानचें वार्षिक उत्पन्न व्याजांतच गडप होऊन-जात असल्यामुळें, अशा कुफल्लक बनलेल्या राजपुत्रास आपली कन्या देण्यापेक्षां एकाद्या धनाढ्य सावकाराच्या पुत्रास आपली कन्या देणें सागरदत्ताला इष्ट वाटत होतें. परंतु आपल्या कन्येचा निश्चय पालटत नाहीं, असें जेव्हां त्यास आढळून आलें, तेव्हां त्यानें लग्नाचे वेळीं विक्रमसेनाला ऋणमुक्त करून आपली सर्व संपत्ति मुलीला द्यावयाची असा विचार केला, आपली सर्व संपत्ति मुलीच्या नांवानें स्त्रीधन म्हणून दिल्यास व केवळ व्याजावर मात्र तिच्या पतीचा हक्क ठेविल्यास त्याच्या उधळपट्टीस आळा बसेल, असा त्यानें विचार ठरवून ठेविला होता.

विक्रमसेनानें कांहीं विशिष्ट हेतु मनांत धरूनच आनंदीचें प्रेम संपादन केलें होतें. तो व्यवहारासंबंधानें सागरदत्ताकडे नेहमीं जात येत असे; तो मोठा धूर्त असल्यामुळें त्यानें त्याच्या गृहस्थितीचा फायदा घेण्याचा ठरविला होता. तो स्वतः स्वरूपानें णा होता. त्याची वाणी गोड होती, त्यामुळें त्याला आनंदीच्या मन[redacted] सहज करतां आलें. [redacted] स्थिति जर चांगली [redacted] व्यापारी गृह- [redacted] करण्याचें त्यानें मनांत देखील आणिलें नसतें. यदाकदाचित् आपल्या संपत्तीच्या बळावर सागरदत्तानें त्याजपाशीं कन्येच्या विवाहाची गोष्ट काढिली असती, तर हा वाणगट आपल्यासारख्या राजपुत्राचा अपमान करीत आहे, असें मनांत येऊन त्यानें त्याचा धिक्कार केला असता. यावरून विक्रमसेनाचें आनंदीवर कितपत प्रेम होतें, याचें अनुमान सहज करतां येण्यासारखें आहे. त्याच्यासारख्या दुसऱ्या सुखाभिलाषी आणि उधळ्या माणसांचें कोणत्याही प्रकारच्या सुस्वरूप तरुणीवर जितकें प्रेम असणें शक्य होतें, तितकेंच विक्रमसेनाचें आनंदीवर प्रेम होतें. आनंदीला जगाचा अनुभव अगदींच नव्हता, आणि विक्रमसेनासारख्या धूर्त पुरुषाशींच तिचा प्रथम परिचय झाला होता, यामुळें तिच्या मनांत त्याच्याविषयीं अनन्य प्रेम उत्पन्न झालें, यांत नवल नाहीं. विक्रमसेनाच्या मधुर, मोहक आणि प्रेमव्यक्त करण्यासाठीं मुद्दाम योग्य शब्द योजून केलेल्या स्तुतिपर भाषणांनीं आनंदीच्या निष्कपट अंतःकरणास भुरळ पडली, आणि तिला विक्रमसेन देवाप्रमाणें प्रिय वाटूं लागला. त्याच्या समागमामध्यें जाणारा वेळ मात्र सुखाचा, असें तिला नेहमीं वाटत असे.

अशा रीतीनें तीं दोघें परस्परांशीं वचनबद्ध झाल्यानंतर विक्रमसेनानें आपला मुक्काम भृगुकच्छ नगरामध्येंच ठेविला, आणि आपल्या चुलत्याला सांगून त्यानें तेथें आपल्यासाठीं एक मोठा थोरला वाडा भाड्यानें घेवविला. त्यानें आपल्या बहिणीस नारायणपुराहून बोलावून आणिलें, व तिची आणि आपल्या भावी पत्नीची त्यानें ओळख करून दिली. आनंदीशीं आपल्या बंधूचा विवाह झाल्यास त्याचा आपल्या कुटुंबास फायदा आहे, या एकाच गोष्टीकडे लक्ष्य देऊन दमयंतीनें आपल्या मानी स्वभावाविरुद्ध आचरण करून तिच्याशीं स्नेह केला होता. जर आनंदीपासून कांहींच फायदा नसता, तर त्या राज

कुलाभिमानी दमयंतीनें तिच्याकडे ढुंकूनही पाहिलें नसतें. तिनें प्रथमतः फायद्यासाठीं म्हणून आनंदीशीं स्नेह संपादन केला होता, पण जसजसे दिवस लोटत चालले, तसतसें तिच्या मनांतील कृत्रिम नाहींसें होत जाऊन त्या दोघींची खरी मैत्री जडत चालली.

शेवटीं भृगुकच्छनगरांत येऊन थोडेच दिवस झाल्यावर सागरदत्ताच्या वाडयामध्यें त्या दोघींचा संवाद झाला. त्यांतील महत्त्वाचा भाग येथें आम्ही देत आहों.

आनंदी [illegible] बोलण्याव[illegible] येणार अ[illegible]

दमयंत[illegible] त्याचें पत्र आल[illegible] दिवसांच्या आंत येथें येणा[illegible] आहे. पत्र अगदीं घाईघाईनें लिहिल्या [illegible] त्यांत याहून विशेष मजकूर कांहीं नाहीं. त्यानें ही बातमी तुझ्या कानावर घालण्याविषयीं लिहिलें आहे, आणि विशेष मजकूर समक्ष भेटीअंतीं कळून येईल, असें तो लिहितो. पत्र इतक्यांत घाईनें लिहिलें आहे, यावरून आणि जासुदानें जें काय सांगितलें त्यावरून, नारायणपुरावर एकादें संकट गुदरलें असावें असें दिसतें. माझा भाऊराया कांहीं तरी राजकारणांत गुंतला असावा.'

आनंदीनें किंचित् उदासीन मुद्रेनें तिला पुसिलें,—'असें कोणतें बरें संकट त्याजवर आलें असावें ? आपल्यावर आलेल्या संकटासंबंधानें त्यानीं आपल्या पत्रांत कांहींच लिहिलें नाहीं, याचें मोठें आश्चर्य वाटतें.'

दमयंती स्मितपूर्वक म्हणाली,—'त्यांत आश्चर्य कसलें ! खरेंच; त्या पत्रांत मी सांगितलें याहून अधिक मजकूर नाहीं. तुला शंका असेल तर उद्यां इकडे येतांना मी तें पत्रच घेऊन येईन, आणि तुला प्रत्यक्षच दाखवीन, म्हणजे तरी तुझी खात्री पटेल कीं नाहीं ?'

आनंदी म्हणाली,—'तुझ्याविषयीं माझ्या मनांत शंका येईल, ही गोष्ट तूं मनांत सुद्धां आणूं नकोस. इतक्या लांब जासूद पत्र घेऊन आला, तेव्हां त्यांत कांहीं तरी अधिक मजकूर असावा, असें माझ्या मनांत येणें अगदीं साहजिक आहे. बरें त्या जासुदानें काय सांगितलें, तें तरी ऐकूं दे !'

दमयंती म्हणाली,—'जासुदाच्या सांगण्यावरून असें दिसतें कीं, नुकतीच तिकडे शेजेंशी लढाई झाली, त्यावेळीं आमचे काका व भाऊराय (विक्रमसेन) असे दोघेही शत्रूच्या हातीं लागले. पण त्यांत त्यांचें [illegible] नुकसान [illegible] शत्रूंनीं त्यांस [illegible] ठेविलें होतें; [illegible] प्रकारची [illegible] विशाल, [illegible] एकदां करा [illegible] आहे, ते इतके कीं [illegible] पत्रांहीत म्हणतेस ?' र

दमयंतीनें उत्तर केलें,—"भाऊराय कदाचित् उद्यां परवां सुद्धां येईल. त्याचा [illegible] नेम सांगावा ? त्यानें आणखी आठ [illegible] सांच्या आंत आपण इकडे येणार [illegible] लिहिलें आहे. अमक्या दिवशीं येणार अ[illegible] कांहीं नक्की लिहिलेलें नाहीं. तो नारायणपुरीं कोणत्या उद्देशानें गेला होता, हें तुला माहीतच आहे. तो ज्या कामासाठीं गेला आहे, तें काम सिद्धीस नेल्याखेरीज तो परत येणार नाहीं. आमच्या काकांचा स्वभाव कसा आहे, हें तुला माहीत आहे का ? नाहीं म्हणतेस [illegible] ते मोठे लहरी आहेत. त्यांच्याकडून एकादी गोष्ट करून घ्यावयाची असली म्हणजे अगोदर त्यांची मर्जी [illegible] आहे कीं नाहीं हें पहावें लागतें. मर्जी प्रसन्न असली तर कार्य झालेंच म्हणून समजावें. आणि जर कां ते त्रासलेले असले, अ[illegible] अशा वेळीं कोणी त्यांच्यापुढें केलें, तर मग बोलावयासच नको. शिवाय त्यांचा का[illegible]

स्वभाव आहे; त्यांनीं एकदां नाहीं म्हटलें कीं, मग प्रत्यक्ष ब्रह्मदेव येऊन त्यांच्या पुढें उभा राहिला, तरी त्यांच्या मुखांतून होय अशीं अक्षरें यावयाचीं नाहींत आणि लग्नासारख्या नाजूक गोष्टी त्यांच्याजवळ काढावयाच्या म्हणजे त्या तानमान पाहूनच काढल्या पाहिजेत. यामुळें एकदोन दिवस उशीर लागण्याचाही संभव आहे.'

हें भाषण ऐकत असतां आनंदी चिंतातुर झाल्याप्रमाणें दिसत होती. कारण कसें झालें तरी विक्रमसेनाचा राजकुलांत जन्म झालेला आहे, आणि आपण श्रीमंत असलों, तरी आपलें कुल त्यांच्या बरोबरीचें नाहीं, गोत्र तिच्या [illegible] रणमत्तार [illegible] विवाहास [illegible] आपल्या [illegible] असें जेव्हां [illegible] लग्नाचे नें [illegible] आपलें तें [illegible] विचार ही तिच्या मनाची स्थिति ओळखून दमयंती म्हणाली,—'असें जरी आहे, तरी व्याचा भाऊराया मोठा हुषार आहे. तो मोठ्या त्यानेंच तुझें वर्णन करील;- तुझ्या पित्या- संबंधाची सर्व माहिती काकांना आहे, हें तरी एका अर्थीं बरें आहे. अर्थात् ते आपणां उभयतांच्या विवाहास संमति देणार नाहींत, असें होणार नाहीं. तूं कधीं आमच्या काकांना पाहिलें आहेस काय?'

आनंदीनें उत्तर दिलें,—'माझ्या वडि- लांच्या सांगण्यावरून असें दिसतें कीं, ते हल्लीं आठ दहा वर्षांत इकडे आलेले नाहींत. त्यापूर्वी त्यांचा आमचा मोठा घरोबा असे. ते येथें आले म्हणजे आमच्या वाड्यांतच रहात असत.'

दमयंती म्हणाली,—'हें तरी एका अर्थीं फार छान आहे. तूं लहान असतां तुला पाहिलें आहे, अर्थात् तुझ्या रूपसौंदर्या- संबंधानें तरी त्यांच्या मनांत शंका येण्याचें कारण नाहीं.'

आनंदीनें मुद्दाम विषयांतर करण्यासाठीं म्हटलें,—'सखे, तूं आतां जें लढाईचें वर्त- मान सांगितलेंस, ती लढाई कोणाबरोबर झाली, हें सांगावयाला विसरलीस. तर त्या- संबंधाची सर्व हकीकत मला सांग पाहूं.'

दमयंती म्हणाली,—'जासुदाच्या सांगण्या- वरून असें दिसतें कीं, प्रतापपुरकर आणि सुंदरपुरकर यांची लढाई जुंपली असतां आमचे काका [illegible] सैन्यासह सुंदरपुरकरांच्या [illegible] आहेत, ही [illegible]नें वाटेंत [illegible] हे प्रताप- [illegible]हेत ! पण [illegible] आणि भाऊराया [illegible]तून सुटले, हें मोठें भाग्यच म्हणावयाचें !'

आनंदी म्हणाली,—'तुझ्या या भाषणा- वरून मला एका गोष्टीची आठवण झाली. परवां प्रतापपुराहून एक तरुण गृहस्थ कांहीं कामासाठीं येथें आला आहे, तो माझ्या दृष्टीस पडला, त्यावरून प्रतापपुरकरांच्या- संबंधानें लोक जें कांहीं बोलतात, तें अति- शयोक्तीचें असावें, अशी माझी कल्पना झाली आहे. त्या तरुणासारखेच लोक जर प्रताप- पुरच्या दरीमध्यें राहात असतील, तर प्रताप- पुरकर हे राक्षस नसून गंधर्व-विद्याधर आहेत, असेंच म्हणणें भाग पडेल, इतका तो तरुण सुंदर आणि मोहक आहे!'

दमयंतीनें हास्यमुद्रेनें विचारलें,—'हें तूं सांगत आहेस तरी काय! त्या तरुणानें माझ्या भावाशीं स्पर्धा तर चालविली नाहीं ना!' असें बोलून तिनें आनंदीकडे किंचित् खोंचून नजर लाविली.

आनंदीही स्मितपूर्वक म्हणाली,—'तो प्रतापपुरकर जरी कितीही सुंदर असला, तरी तो कांहीं मला तुझ्या बंधूहून अधिक प्रिय वाटणार नाहीं. प्रेमाची गोष्ट कांहीं

वेगळीच आहे. प्रेमळ स्त्रीला आपल्या प्रियकराहून रूपानें, शौर्यानें, औदार्यानें, कोणत्याही गुणांनीं अधिक असा पुरुष आढळावयाचा नाहीं, असा नियमच आहे. अर्थात् तुला शंका घेण्याचें अगदीं कारण नाहीं.'

या भाषणानें जरी दमयंतीचें समाधान झालें, तरी आपल्या बंधूहून सुंदर अशा तरुणाचें तिला दर्शन झालें, ही गोष्ट कांहीं बरी झाली नाहीं, असें तिच्या मनांत आलें. राजकुलांतील माणसांचीं मनें हलकीं असावयाचीं अशी दमयंतीच्या मनाची समजूत असल्यामुळें, प्रतापपुरकर तरुणाची स्तुति केल्याबद्दल तिनें आनंदीला दोष देऊन बोलण्यास कमी केलें नसतें. पण सध्यां तिला आपल्या मनांतील हेतु साध्य करण्यासाठीं आनंदीपाशीं तंटा करावयाचा नव्हता, म्हणून तिनें ती गोष्ट हंशावर नेली; आणि ती म्हणाली,—'मैत्रिणी, तुझ्या या भाषणावरून तो प्रतापपुरकर तरुण खरोखरच [illegible] असावा, असें दिसतें; आणि [illegible] कसा, हें पाहण्याविषयी [illegible] उत्पन्न होते! असा [illegible] यक्ष-गंधर्व आहे [illegible] तिला आठवण होऊन तो [illegible] ध्यानांत. तो कोण असावा, [illegible] ताडलें आहे, असें मला [illegible]

आनंदी म्हणाली [illegible] तरुण कोण अ[illegible]

न [illegible] आणि
अं[illegible] थोड्याच
लय [illegible] वा शिवा-
उत [illegible] चे दिवशीं मोठा
सा[illegible] तो [illegible]
माणसें [illegible]
तेथें उत्स[illegible]
सह तेथें [illegible]
आलेला होत[illegible]
मोठें आश्चर्य वा[illegible] मी तो कोणाचा

कोण याचा चौकशी केली. त्यावेळीं तो प्रतापपुरकर दृढसंध राजाचा धाकटा मुलगा आहे, असें मला समजलें. प्रतापपुरच्या दरींतील रांकट माणसांमध्यें अशा प्रकारचा सुंदर तरुण जन्मास आला, याचें मला फार आश्चर्य वाटलें. पण प्रतापपुरकरांचें आणि आमचें पिढीजाद हाडवैर असल्यामुळें मीं त्याच्या संबंधानें त्यावेळीं अधिक चौकशी केली नाहीं.'

हे शब्द बोलत असतां दमयंतीच्या मुखावर एक दोन वेळां जी मनोविकारांची छटा उमटली होती, ती आनंदीच्या ध्यानीं आल्याशिवाय राहिली नव्हती. दमयंतीचें वरील भाषण संपल्यावर हास्यमुद्रा करून आनंदी म्हणाली, 'या तुझ्या भाषणावरून मला [illegible] वाटतें, तो जर [illegible] मेलून दाखविलें, तर तूं कदाचित् म[illegible] ग्रावशील, म्हणून मी तें बोलत नाहीं.'

दमयंतीही [illegible]

[illegible] बोल पाहू.

[illegible] पहाहो, नाहीं तर

[illegible] ईर्ष्येच्या झोंकावरून, तुझ्या [illegible] मुखानें थट्टा [illegible] ठिवरून मला असें [illegible] च्या घराण्या- [illegible] प्रतापपुर- [illegible] वसली [illegible] तर [illegible] ाझ्या [illegible] प्रश्नाचें [illegible] दिलें असतेंस ? तू [illegible] म्हणतीस, को नाहीं म्हणतीस ?'

आनंदी म्हणाली,—'मी त्या तरुणासंबंधानें जें काय सांगणार आहें, तें तूं सर्व

ऐकलंस, म्हणजे मीं काय उत्तर दिलें असतें, तें आपोआपच तुझ्या ध्यानांत येईल. परवांच्या दिवशीं मोतीचौकांत राहणारा माणिकचंद्र नांवाचा जवाहिऱ्या एक कंठा विकावयासाठीं आमच्याकडे आला होता. तो कंठा त्या पलीकडच्या कोनाड्यांत ठेवलेला आहे. तो पहा हवा तर–' असें म्हणून आनंदी आपल्या जाग्यावरून उठली आणि तिनें तो कंठा हातीं घेऊन आपल्या मैत्रिणीस दाखविला. नंतर ती म्हणाली,–' त्या जवाहिऱ्याचा आणि आमचा बराच घरोबा आहे. तो परवां कंठा घेऊन आमच्याकडे आला, तेव्हां बाबा पेढीवर नव्हते. ते कदाचित् घरांत असतील अशा कल्पनेनें माणिकचंद्र आंत आला. मीं त्याला काय काम आहे, असें विचारलें, तेव्हां त्यानें हा कंठा मला दाखविला. दागिना मला आवडला, म्हणून मीं तो ठेवून

[redacted]

असें जे
लमाचे
आप
वि ही तिच्या मनाचा
नांयंतां म्हणाली,–' असें
व्या भाऊराया म्हेठा ह
स्यगुर्यानें तुझें वर्णन
संबंधाची
तरी
[redacted]
आहे ' असें विचारलें. [redacted]
दृढसंध राजाचा [redacted]
मीं पुनः एकदां [redacted]
या वेळीं त्यानें [redacted]
दोन दिव [redacted]
त्याच्या [redacted]
आणि [redacted]
मी जे [redacted]
वाज्याच [redacted]
अगदीं म [redacted]
फक्त एकदांच मजकडे माझ्या नजरेनें अवलोकन केलं. त्याचें त्या वेळचें [redacted] एकाद्या वीर पुरुषास शोभण्यासारखें होतें. [redacted]

त्या दिवशीं जो प्रकार घडून आला, तो जसाच्या तसा मीं तुला सांगितला आहे. मीं त्याला फक्त एकच वेळ पाहिलें असल्यामुळें, त्याच्याविषयीं माझ्या मनांत तेवढ्याच अवधींत विशेष भावना उत्पन्न होणें शक्य होतें, असें तुला वाटतें काय!'

दमयंतीनें विचारलें,–' तो येथें कधीं आला होता म्हणतेस? परवांना? आणखी दोन दिवसांनीं तो पुनः तुझ्या वडिलांकडे येणार होता–म्हणजे आजच! होय ना?' नंतर किंचितू विचार करून तिनें पुनः म्हटलें,–' गडे आनंदी, त्या तरुणाच्या रूपाचें जरा आणखी वर्णन कर. म्हणजे मीं पूर्वी ज्याला... शिवालयांत पाहिलें होतें, तोच हा तरुण कीं दुसरा, हें मला ठरवितां येईल.'

आनंदीनें शक्य तितक्या प्रयासानें शेखरांचें शब्दचित्र दमयंतीच्या नजरेसमोर उभें करण्याचा प्रयत्न केला. हें चित्र काढित असतां [redacted] प्रियकर विक्रमसेन, [redacted] मधून मधून तुलना [redacted] होता. सर्व वर्णन [redacted]लें,–'अशा प्रकार [redacted]ोला कीं काय!' [redacted] पाहिलेला तो हाच [redacted] मनांत आतां तिळ- [redacted]. दृढसंधाला फक्त [redacted] दोन [redacted] धाकट्याला च तूं केलेलें [redacted] अर्थात् राजकुमार [redacted] खरच [redacted] ला पाहिजे!' असें बोलत [redacted] असे कांहीं शब्द आपल्याशीच [redacted] णि कसल्या तरी विचारांत [redacted] बोलत [redacted] आनंदी तिला म्हणा- [redacted] तुझ्या हृदयामध्यें [redacted] असें दिसतें [redacted] खाची [redacted] या तरुणानें [redacted] आहे, यांत

शंकाच नाहीं. त्याची आठवण झाल्यापासून आजपर्यंत कधीं उत्पन्न झालेले नव्हते असे मनोविकार माझ्या अंतःकरणांत उत्पन्न होत आहेत, हें मी प्रांजळपणें कबूल करतें. हा प्रकार काय असावा, याचा मला उलगडा करतां येत नाहीं.'

आनंदी स्मितपूर्वक बोलली,-'याचा उलगडा जरी तुला करतां आला नाहीं, तरी तो मला करतां येईल; तुझ्या मनांत कसले विचार येत आहेत हें मी सांगूं का!'

अनुरागानें जिचे कपोल आरक्तवर्ण झाले आहेत, अशा त्या दमयंतीनें उत्तर केलें,- 'तर मग तूं मोठी मनकवडी दिसतेस! सांग तर पाहूं, सध्यां माझ्या मनांत काय चाललें आहे तें!'

आनंदी किंचित् गंभीर मुद्रा करून तिला म्हणाली,-'सखे, सध्या तुझ्या अंतःकरणामध्यें प्रेमाचे विकार उद्भवत आहेत. ते अद्यापि बाल्यावस्थेंत असल्यामुळें व्यक्त दिसत नाहींत, आणि त्या विकारांचा तुला अद्यापि परिचय झालेला नसल्यामळें त्यांची तुला ओळख पटत नाहीं. प्रेम हें काय आहे, आणि त्यामध्यें किती आनंद आहे, ह्याचा अनुभव तुला थोड्याच दिवसांत येईल.'

आनंदीचें हें भाषण ऐकून दमयंती अग [illegible] प्रियकराचे स्मरण झाले [illegible] निमग्न झाली.

वास्तविक पाहिलें तर [illegible] त्रिशूलपर्वतावरील देवा[illegible] प्रथम दर्शन झालें, त्या[illegible] पल्या तीक्ष्ण कुसुमबा[illegible] होतें. तेव्हांपासून ति[illegible] मध्यें प्रतिबिंबित झा[illegible] बाण्याची सुंदर आकृ[illegible]

वयास सांपडत असल्यामुळें त्याचें रूप तिच्या अंतःकरणामध्यें पूर्णपणें ठसून राहिलें होतें. त्याचें आपणांस असें वारंवार स्मरण होतें, म्हणून तिचा तिलाच राग येई, आणि ती त्याला विसरण्याचा प्रयत्न करी; पण व्यर्थ! ती त्याला विसरण्याचा जितका प्रयत्न करी, तितकी तिची आठवण ताजी होई. अशा स्थितींत दोन तीन महिने लोटल्यावर ती आपल्या बंधूच्या आग्रहावरून भृगुकच्छ-नगरीं राहावयास आली. येथें आल्यावर अनेक प्रकारच्या व्यवसायांत गुंग झाल्या-मुळें शेखराचें तिला थोडें विस्मरण पडलें; परंतु आनंदीच्या मुखानें त्या तरुणाचें वर्णन ऐकल्याबरोबर पुनः तिचें स्मरण ताजें झालें, आणि कित्येक दिवस गुप्तरूपानें तिच्या हृदयांत वास करीत असलेल्या प्रेमवृत्तींनीं एकदम उचल केली. [illegible] जशी जोरानें पालवी फुटने, अयोग्य [illegible] चारांनीं शमविलेला रोग जसा [illegible] जोरानें वाढूं लागतो, पर [illegible] जसा 'न' [illegible] अ[illegible]

कसेंही करून त्या तरुणाची भेट मला अवश्य घेतली पाहिजे.'

दमयंतीचें हें इतक्या निकराचें भाषण ऐकून आपण जबाब काय द्यावा, हें आनंदीच्या ध्यानीं येईना. म्हणून तिनें विचारलें,–'गडे, तूं हें अगदीं मनापासून बोलत आहेस, कीं उगाच माझें मन पाहत आहेस?'

दमयंतीनें तिच्या गळ्यास मिठी घालून उत्तर केलें,–'आनंदी, मी अगदीं तुझ्या गळ्याची शपथ घेऊन तुला सांगतें, कीं या क्षणीं त्या तरुणाच्या दर्शनाखेरीज दुसरें कांहींच मला सुचत नाहीं! प्रत्यक्ष माझ्या प्राणांवर संकट आलें तरी मी त्याची पर्वा करणार नाहीं; पण कसेंही करून एकदां तरी त्याचें दर्शन मला झालेंच पाहिजे! तुझ्या बोलण्यावरून तो तरुण आजच येथें यावयाचा आहे, असें दिसतें; कारण परवांपासून दोन दिवसांनी म्हणजे आजच त्यानें पुनः यायचें ठरविलें आहे.'

म्हणाली,–'इतकी जर तुझी [illegible] आहे, तर [illegible] कीं

[illegible] घां

स्परांशीं शरीरिसंबंध जोडून मित्र झालेलें तुझ्या ऐकिवांत मुळींच नाहींत कीं काय? प्रेमाचा जोर वैराहून शतपट अधिक आहे. तुमचें त्यांचें परस्पर वैर असलें, तरी तुम्हां उभयतांना आमच्या सारख्या तिऱ्हाइताकडे पाहुणचार घ्यावयास काय हरकत आहे?'

दमयंती म्हणाली,–'हरकत आहे तर! जर एकाद्यानें आमच्या घराण्यापैकीं कोणाला मेजवानीला बोलाविलें असलें, तर प्रथम तेथें आणखी कोण कोण येणार आहेत, याची शहानिशा करून घेतल्याखेरीज आम्हाला त्याच्या बोलावण्याला रुकार देतां येत नाहीं. आमचा नियम तुझ्या वडिलांस माहित असलाच पाहिजे. असें असतां ते त्या मेजवानीला मला बोलावणारही नाहींत, आणि मलाही येतां येणार नाहीं.'

आनंदीनें विचारलें,–'बाबांनीं तुला बोलाविलें तर?'

दमयंतीनें उलट प्रश्न केला, 'तूं माझ्या मनांतली गोष्ट आपल्या पित्यापाशीं उघड करणार कीं काय?'

आनंदी म्हणाली,–'तूं इतकी का मला मूर्ख समजतेस! अग वेडे, असल्या नाजूक [illegible]ष्टी अगदीं नाइलाज झाल्याखेरीज का [illegible]णी पुरुषांच्या कानावर घालीत असतात? [illegible]ल्ल अगदीं निर्धास्त रहा. पण [illegible]

[illegible]

[illegible]

[

त्या तरुणावर प्रेम करतें, असें जर माझ्या कुटुंबांतल्या वडीलधाऱ्या माणसांस समजलें, तर तीं मला काय म्हणतील ? तीं पुनः माझें मुखसुद्धां पहाणार नाहींत ! हाय ! हाय ! सध्यां मला कांहींच सुचत नाहींसें झालें आहे !'

आनंदीनें विचारलें,–' या बाबतींत मी सांगेन तसें वागण्याचें जर तूं कबूल करशील तर तुमच्या भेटीचा योग मी जुळवून आणतें. ज्या दिवशीं भेजवानीचा बेत ठरेल, त्या दिवशीं, तूं स्वतां आधीं आपल्या मनांतील वैरभाव विसरून, अगदीं गुंपचीप–माझ्या-वांचून दुसऱ्या कोणाच्या नजरेस पडावयाचें नाहीं, अशा व्यवस्थेनें मजकडे येशील काय ? होय म्हण; कीं पुढची व्यवस्था माझ्याकडे लागली. '

दमयंती म्हणाली,–' तसें करणें योग्य होईल असें मला वाटत नाहीं. ती पुढची गोष्ट; पण आजच तो तरुण येथें यावयाचा आहे, असें म्हणतेस, तर तो माझ्या नुसता दृष्टीस सुद्धां पडावयाचा नाहीं कीं काय ? '

आनंदीनें उत्तर केलें,–' एवढीच तुझी इच्छा असेल, तर ती मला पूर्ण करतां येईल असें वाटतें. थांब तर; मी एकदा पेढीपर्यंत जाऊन येतें, म्हणजे तो केव्हां येणार तें मला समजेल. '

असें बोलून आनंदी तेथून उठली आणि पेढीकडे निघून गेली. ती गेल्यावर दमयंतीही आपल्या जागेवरून उठली, आणि त्या दिवाणखान्यांत इकडून तिकडे येरझारा घालूं लागली. यावेळीं तिच्या मनाचा मोठा गोंधळ उडाला होता. थोड्या वेळानें आनंदीची पावलें तिला ऐकूं आलीं, आणि ती आतां आपल्यास काय सांगते तें ऐकण्यासाठीं ती मोठ्या उत्कंठेनें तिच्या मुखाकडे पाहूं लागली.

आनंदीनें आंत येतांच मोठ्या प्रेमपूर्वक आपल्या मैत्रिणीकडे पाहून म्हटलें, 'चल मजबरोबर. मी आतांच तुझी इच्छा पूर्ण करतें. '

हे तिचे शब्द ऐकतांच दमयंतीच्या अंगांत कांपरें भरलें, तिचें पाऊल जड झालें, तिच्या सर्वांगास दरदरून घाम सुटला. तिचें धैर्य सुटलें, आणि ती विचारांत गुंग झाली. अशा स्थितींत कांहीं वेळ गेल्यावर तिनें आपल्या मनाचा निश्चय केला, आणि न बोलतां ती आनंदीच्या मागून चालूं लागली.

सागरदत्ताच्या पेढीची रचना कशी होती याचें थोडक्यांत वर्णन करणें येथें जरूर आहे. स्वतः सागरदत्त ज्या दिवाणखान्यांत बसे, तेथें फक्त त्याचा मुख्य कारकून मात्र बसत असे. ज्या दिवाणखान्यापलीकडे जो दिवाण-खाना होता, त्यामध्यें घरांतील मंडळीशिवाय इतरांस येण्याची परवानगी नव्हती. त्या दिवाण-खान्यास दोन मोठाल्या खिडक्या असून त्यांवर जाळीचे पडदे सोडलेले होतें. सागरदत्ताची पत्नी हयात असतां तिला आपल्या पतीची भेट घेण्यासाठीं या दिवाणखान्याचा उपयोग होत असे. सागरदत्ताच्या पेढीवरील कारकून फार दिवसांचे जुने असल्यामुळें आनंदीला त्यांचा लहानपणापासून... परिचय होता; म्हणून तिला आपल्या पित्याच्या भेटीस जाव-यांचें असल्यास, ती ज्या दिवाण-खान्यांत इतर कारकून मंडळी कामास बसत असत, त्या दिवाणखान्यांतून बेलाशक जात येत असे. त्यामुळें सागरदत्ताच्या बैठकी-पलीकडच्या दिवाणखान्याचा अलीकडे फारसा उपयोग होत नसे. आनंदी आपल्या खासगी दिवाणखान्यांतून दमयंतीसह बाहेर पडल्या-वर ती त्या रिकाम्या दिवाणखान्यांत आली. तेथील खिडक्यांचे पडदे सोडलेले होते. त्या पडद्यांआडून त्या दोघी सागरदत्ताच्या बैठकीच्या दिवाणखान्यांतील प्रकार पाहूं लागल्या. आनंदी जेव्हां प्रथम इकडे येऊन गेली, तेव्हां शेखर नुकताच सागरदत्ताच्या दिवाणखान्यांत येऊन बसला होता. त्याचे आणि पेढीवाल्याचे प्राथमिक कुशलप्रश्न संपले असतील नसतील, इतक्या अवधींतच

त्या दोघी पलीकडच्या दिवाणखान्यांत येऊन बसल्या. त्यामुळें पुढील सर्व भाषणें त्या दोघींच्या कानीं पडलीं.

शेखर सागरदत्तानें पुढें केलेल्या आदरातिथ्य सामग्रीचा स्वीकार करीत म्हणाला,– 'शेटजी, माझें काम काय आहे, हें आपणांस माहीतच आहे. मी वृहद्रथ महाराजांचें हुंडीपत्र आणिलें आहे.'

सागरदत्त म्हणाला,– 'वृहद्रथ मोठा शहाजोग आहे.' पण इतक्यांत सुंदरपुरकर आणि प्रतापपुरकर यांचें बरें नाहीं, अर्थात् आपण केलेली स्तुति शेखरास आवडणार नाहीं, असें मनांत येऊन तो पुढें म्हणाला,– 'इतरांशीं त्यांची वर्तणूक कशीही असो, ते माझ्याशीं तरी आजपर्यंत सचोटीनें वागत आलेले आहेत.'

शेखर म्हणाला,–'आपल्या भाषणाचा श्लोक माझ्या ध्यानीं आला. एका माणसाचें दुसऱ्याशीं वैर आहे, म्हणून त्याचें सर्वांशींच वैर असावें असा कांहीं नियम नाहीं. ज्याला ज्या माणसाचा जसा अनुभव आला असेल तो त्या माणसाबद्दल आपल्या अनुभवाप्रमाणें बोलत असतो; त्यांत इतरांना वाईट वाटण्याचें कारण नाहीं.'

शेखरानें हातीं दिलेलें हुंडीपत्र सावकाश वाचून पाहून आणि त्याच्या खरेपणाबद्दल आपल्या मनाची खात्री करून घेऊन झाल्यावर सागरदत्त म्हणाला,–"या हुंडीबद्दल आपणांस दुसरी एकादी हुंडी पाहिजे, कीं रोख रक्कम हवी? किंवा ही रक्कम आमच्या पेढीवरच व्याजीं ठेवण्याची इच्छा आहे?'

शेखरानें सांगितलें,–'सध्यां आम्हांस रोकडीचीच जरूर आहे.'

सागरदत्तानें उत्तर दिलें,–'ठीक आहे, रक्कम तयार आहे. ती कोठें पोंचती करावयाची तें सांगा, म्हणजे आमचा मनुष्य आपल्या सेवेस हजर आहे.' असें बोलून सागरदत्तानें शेजारीं बसलेल्या मुनीमाकडे ती हुंडी दिली, आणि त्यास हुंडीची रक्कम मोजावयाचा हुकूम केला.

कारकून रक्कम मोजीत असतां सागरदत्तानें विचारलें,–'अहो राजकुमार, आपण कांहीं प्रथमच या शहरीं आलां नसाल. त्या डोंगरी प्रदेशापेक्षां आपणांस येथें अधिक आनंद होतो कीं नाहीं? या शहरांत आपणांसारख्यांना पाहण्यायोग्य अशा पुष्कळ गोष्टी आहेत कीं नाहींत!'

शेखरानें उत्तर केलें,–'यापूर्वीं मी एक दोन वेळां या प्रसिद्ध शहरामध्यें आलों होतों. येथें पाहण्यास योग्य असलेल्या बहुतेक गोष्टी मीं पूर्वीच पाहिल्या आहेत. आतां शहरांतील आनंदाच्या गोष्टींची आणि आमच्या खेड्यांतील आनंदाच्या गोष्टींची तुलना केली असतां माझें मत असें आहे, कीं शहरांतील आनंद कृत्रिम आहे, आणि खेडेगांवांतील आनंद नैसर्गिक आहे. मला स्वतःला शहरांत राहण्यापेक्षां खेड्यांत राहणें अधिक चांगलें वाटतें.

सागरदत्तानें विचारलें,–'आपण येथें नुकतेच आलां असाल, अर्थात् आपल्या बागलाणामध्यें नुकत्याच ज्या लढाया झाल्या त्यांची हकीकत आपण आम्हास खरी खरी सांगूं शकाल. आमच्या कानांवर या लढायांसंबंधानें ज्या उडत उडत तऱ्हा आल्या आहेत, त्यांत एकीचा एकीस मुळींच मेळ मिळत नाहीं. त्यामुळें खरा प्रकार काय आहे, हें समजणें अशक्य झालें आहे.'

शेखर स्मितपूर्वक बोलला,–'मी येथें आल्यानंतर मलाही त्या लढाईसंबंधानें कांही विलक्षणच बातम्या ऐकूं आल्या. त्या बातम्यांमध्यें आणि खऱ्या हकीकतीमध्यें जमीन-अस्मानाचें अंतर आहे, यांत शंका नाहीं. परंतु ही हकीकत सांगण्यापूर्वी मी आपणास प्रश्न करितों कीं, सुंदरपुरकर वृहद्रथ महाराजांचें आपलें सख्य आहे, हें आपल्या त्यांच्या व्यवहारावरून उघड दिसून येत आहे. तेव्हां कदाचित् त्यांचे शत्रु ते आपले शत्रु असें मानण्याकडे आपला कल नसेल

कशावरून ? आणि मी जी हकीकत सांगेन ती तुम्हांला आवडणार नाहीं, असें उघड दिसत असूनही तुम्हाला अप्रिय वाटणारें भाषण मीं कां करावें ?'

सागरदत्त बोलला,–' बृहद्रथ महाराजांशीं जसा माझा देवघेवीचा व्यवहार आहे, तसा आणखी कित्येक राजेरजवाड्यांशीं आहे. कमींत कमीं पांचचारशें लोकांचीं माझ्या पेढीवर खातीं असतील. इतक्या लोकांच्या शत्रूंला जर मी आपले शत्रु मानूं लागलों, तर उद्यांच मला पेढी बंद करावी लागेल. अशा प्रकारचे अनुदार विचार जर माझ्या मनांत असते, तर आपणांस येथें थांबवून मी आपल्याशीं गप्पा मारीत बसलों नसतों. मी व्यवहारी मनुष्य आहें. मी कोणाचें कधींही शत्रुत्व करीत नाहीं. सर्वांच्या मित्रत्वाचींच मला अपेक्षा आहे !'

शेखर म्हणाला,–' आपलें हें भाषण अगदीं यथार्थ आहे. आपलें मन कसें आहे, हें मला समजलें; आतां मला मोकळया मनानें बोलावयास हरकत नाहीं. पंधरा दिवसांपूर्वी आमच्याशीं सुंदरपुरकरांनीं अन्यायाचें वर्तन केल्यामुळें आम्हांस ताबडतोब त्यांच्यावर स्वारी करणें भाग पडलें. लढाई, वेढे, वाटा अडविणें, धरपकडी, खंडण्या वगैरे सर्व प्रकार एक दोन दिवसांतच घडून आले. ती सर्व हकीकत फारच मोठी आहे. थोडक्यांत सांगावयाचें तें इतकेंच कीं, आम्ही वत्सपुरकरांच्या मदतीनें सुंदरपुरावर स्वारी केली, आणि पुरते चार प्रहर लोटण्यापूर्वीच आम्ही सुंदरपुर काबीज करून बृहद्रथ महाराजांस कैद केलें.'

सागरदत्तानें आश्चर्यपूर्वक विचारलें,–' काय ? तुम्हीं इतक्या जलद बृहद्रथ महाराजांचा पराजय केला ? मोठेंच आश्चर्य !'

शेखर म्हणाला,–' खरा प्रकार असा घडून आला खरा. बृहद्रथ महाराजांनीं आपल्या मुक्ततेसाठीं जी खंडणी दिली, तींच वसूल करण्यासाठीं मी आपणाकडे त्यांची हुंडी घेऊन आलों आहें; यावरून मी सांगतों तें खरें कीं खोटें, हें तुम्हींच ठरवावें.'

सागरदत्त म्हणाला,–' तुमचें भाषण अगदीं खरें आहे. तसेंच कांहीं संकट गुदरल्या खेरीज बृहद्रथ महाराजांनीं तुम्हाला एवढी रक्कम दिली असेल, हें संभवतच नाहीं. यावरून ते तुमच्या कचाटींत पुरते सांपडले होते, असें दिसतें.'

शेखर म्हणाला,–' होय; असें खरें. या लढाईच्या वेळीं अत्यंत महत्त्वाच्या अशा दोन गोष्टी घडून आल्या, त्या मीं तुम्हांस सांगितल्या म्हणजे सुंदरपुरकरांचा इतका लवकर पराजय कसा झाला, हें समजेल. पहिली गोष्ट ही कीं, अर्कपुरकर भीमरथ राजा आपल्या दोनशें लोकांसह बृहद्रथमहाराजांच्या साह्यास येत असतां शह देऊन वाटेंतच आम्हीं त्याला परत घालविलें. दुसरी गोष्ट ही कीं, नारायणपुरकर त्यांच्या साह्यास जात आहेत; ही बातमी आम्हांस योग्य वेळीं समजल्यामुळें रणमत्त आणि विक्रमसेन या उभयतांसही आम्हीं कैद केलें !'

हे शब्द त्याच्या मुखांतून बाहेर पडतात तोंच पलीकडच्या दिवाणखान्यांतून एका स्त्रीची हृदयदावक किंकाळी ऐकूं आली-त्याबरोबर पहा. येथें एकदम आपापल्या आसनांवरून रवाना झाले. सागरदत्तानें तत्काल पुढें होऊन पलीकडच्या दिवाणखान्याचें दार उघडलें आणि तो आनंदी व दमयंती यांच्या पुढें येऊन उभा राहिला. यावेळीं आनंदीनें आपलें मस्तक आपल्या सखीच्या स्कंधावर ठेविलें होतें, आणि तिच्या नेत्रांतून अश्रुधारा वाहत होत्या. ही आपल्या कन्येची स्थिति कोणत्या कारणानें झाली, हें सागरदत्ताच्या तत्काळ ध्यानीं आलें. त्यानें दमयंतीकडे नजर टाकली, त्यावेळीं तिची मुद्रा अगदीं घाबरल्यासारखी दिसत होती. ती मधून मधून शेखराकडे पाहत आहे, असें सागरदत्तास आढळून आलें; पण ती केवळ द्वेषभावानेंच त्यांजकडे अवलोकन करीत

असेल, असें त्या वृद्ध व्यापाऱ्यास वाटेना. त्यानें पांचचार शब्द बोलून आपल्या कन्येच्या डोळ्यांचें पाणी आपल्या हातानें पुशिलें, आणि दमयंतीलाही आपलें दुःख आवरण्याची त्यानें सूचना दिली. आपण सांगत असलेलें युद्धाचें वर्तमानच या दोघी तरुणींच्या खेदास कारण झालें असावें, ही गोष्ट त्या त्रिवर्गांच्या मुद्रेवरून आणि आविर्भावांवरून शेखराच्या तत्काळ ध्यानीं आली.

नंतर अत्यंत गंभीर मुद्रेनें शेखर म्हणाला, 'अहो श्रेष्ट, माझ्या या वेळच्या औद्धत्याची मला क्षमा करा. लढाईचें वर्तमान सांगत असतां त्यांतील कांहीं या कुमारिकांस अप्रिय असा मजकूर माझ्या मुखांतून निघाला असावा, असें माझें अनुमान आहे. हें लढाईचें वर्तमान आपल्या या वाड्यांतील कोणाच्या कानावर गेल्यास त्यापासून कोणाला खेद वाटेल, असें जर मला माहीत असतें, तर मीं हें वर्तमान सांगितलेंच नसतें. आपण मला सर्व वर्तमान विचारलें, आणि मीं तें सांगितलें. मीं बुद्धिपूर्वक ही गोष्ट केली नाहीं, तरी माझ्यामुळें इतरांस दुःख झालें याचा मला अत्यंत खेद होत आहे!'

सागरदत्तानें त्या दोघी कुमारिकांची समजूत घालून त्यांना तेथून आनंदीच्या खासगी खोलींत जावयास सांगितलें. त्या दोघी निघून गेल्यावर शेखर आणि तो असे दोघेही पेढीवर आले. तेथें आल्यावर सागरदत्त शेखरास म्हणाला,—'अहो राजकुमार, झाला हा प्रकार अगदीं साहजिक रीतीनें घडून आलेला असल्यामुळें, त्यासंबंधानें आपल्याला कोणीही दोष देणार नाहीं, आणि आपणही त्याबद्दल खेद मानूं नये. ही हकीकत ऐकून माझ्या कन्येला इतकें वाईट वाटलें, यांचें कारण मी तुम्हांस स्पष्टपणें सांगतों. मीं आपली कन्या विक्रमसेनाला द्यावयाची असें ठरविलें आहे!'

शेखर म्हणाला,—'आतां सर्व जुळेंल! माझ्या मुखानें सरळपणानें जी गोष्ट बाहेर पडली, ती आपल्या कन्येच्या खेदास कारण कां झालीं, हें आतां माझ्या ध्यानांत आलें. आपण कृपा करून त्या दोघी कुमारिकांची माझ्या शुद्ध हेतूबद्दल खात्री पटवून द्याल, तर आपले मजवर फार उपकार होतील.'

सागरदत्त अत्यंत नम्रपणें म्हणाला,—'महाराज, आपण ही गोष्ट आपल्या मनांतून साफ काढून टाकावी, अशी माझी आपणांस विनंति आहे. हें आपलें उदार आचरण आपल्या शत्रूंना सुद्धां पसंत वाटेल, अशी माझ्या मनाची खात्री आहे. भावीपतीसंबंधाची दुष्ट वार्ता माझ्या कन्येला एकाएकीं समजल्यामुळें, तिला इतकें दुःख झालें, यावरून तिचें विक्रमसेनावर किती प्रेम आहे, हें उघडच दिसत आहे. आपल्या पतीवर प्रेम करणाऱ्या कन्येचें कौतुक करण्यामध्यें कोणत्या पित्याला धन्यता वाटणार नाहीं! असो, झालें तें झालें; आपण कोणत्याही तऱ्हेनें कष्टी न होतां मजकडून निरोप घ्यावा, अशी माझी इच्छा आहे.'

इतक्यांत रकम तयार असल्याची एका कारकुनानें वर्दी दिली. सागरदत्तानें आपल्या पेढीवरील नोकरांना त्या थैल्या घेऊन शेखराबरोबर जावयाची आज्ञा केली. नंतर त्या दोघांचे नमस्कार चमत्कार होऊन झाल्या प्रकाराबद्दल विचार करीत शेखरानें द्रव्यासह वत्सपुराधीशाच्या तेथील वाड्याचा मार्ग धरिला.

प्रकरण २६ वें.

दमयंती.

शेखर सध्यां ज्या वाड्यांत रहात होता, तो वाडा वृषपतीनें आपल्यासाठीं बांधविलेला होता भृगुकच्छ नगरांत ज्या मोठमोठ्या हवेल्या किंवा प्रेक्षणीय इमारती होत्या, त्यांमध्यें त्या वाड्याची गणना होण्याइतका तो जरी मोठा नव्हता, तरी तो वृषपती-

सारख्या इभ्रतदार राजाला राहाण्यायोग्य होता. हा वाडा दुमजली असून, प्रत्येक मजल्यावर पांच पांच प्रशस्त दालनें होतीं, आणि त्याशिवाय कित्येक खोल्याही होत्या वाड्याच्या भोंवतीं बरीच मोकळी जागा होती. त्या जागेभोंवतीं तटवजा भक्कम भिंत बांधलेली होती. तटाच्या आंतल्या बाजूस तटाला लागून तबेला होता; आणि वाड्याच्या पिछाडीस लहानशी बाग होती. या बागेपलीकडे एक लहानसा रस्ता होता. या रस्त्यामध्यें जाण्यासाठी बागेंतून एक लहानसा दरवाजा ठेविलेला होता. अर्थात् वाड्याच्या आवारांत जाण्याचे अघाडी-पिछाडीस दोन वेगळाले मार्ग होते.

या वाड्यामध्यें वृषपर्तीचीं आठदहा नोकरमाणसें राहत असत. तीं वाड्याचीं झाड-लोट करीत, आणि आपला धनी किंवा धन्याचे कोणी पाहुणे आल्यास त्यांचें स्वागत करण्यास तत्पर असत. पूर्वी एकदां शेखर त्या शहरीं गेला होता, हें आम्ही मागें सांगितलेंच आहे. त्यावेळीं तो या वाड्यांतील ज्या दिवाणखान्यांत राहत असे, त्याच दिवाणखान्यामध्यें सध्यां त्यानें आपलें वास्तव्य केलें होतें. तो तेथील सर्व नोकरांच्या परिचयाचा होता. इतकेंच नव्हे, तर त्यानें आपल्या सौजन्यानें सर्वांचीं मनें वेधून घेतली असल्यामुळें, तेथील नोकर त्याची नोकरी करावयास आनंदानें तत्पर असत त्यामुळें त्याला आपण परदेशांत आहों, असें फारसें वाटत नसे.

सागरदत्ताच्या वाड्यांतून निघाल्यावर शेखर थेट आपल्या निवासस्थळीं आला. तो आलेला दृष्टीस पडतांच पांच चार नोकर पुढें आले, आणि त्यांनीं त्याच्या-बरोबरच्या सागरदत्ताच्या सेवकांजवळच्या थैल्या माडीवर नेल्या. शेखरानें द्रव्य घेऊन येणाऱ्या माणसांस चिरीमिरी दिली, आणि ते निघून गेल्यावर तो माडीवर गेला. तेथें गेल्यावर सर्व पैका बरोबर आहे कीं नाहीं, हें पाहण्यासाठीं त्यानें थैल्या सोडून रकम मोजावयास प्रारंभ केला. दुर्मुखानेंही या कामीं त्याला मदत केली. रकम बरोबर आहे, हें पहातांच शेखरानें त्या पैक्याचे बरोबर दोन भाग केले; आणि तो आपल्या वडिलांस पत्र लिहावयास बसला. पुढें काय करावयाचें, आपण परत यावयाचें, कीं कांहीं दुसऱ्या कामासाठीं येथेंच रहावयाचें, वगैरे गोष्टी त्याला आपल्या पित्यापासून विचारून घ्यावयाच्या होत्या.

पत्र लिहून झाल्यावर शेखर दुर्मुखाला म्हणाला,–'अहो कारभारी, आपण ज्या कामासाठीं येथें येऊन राहिलों होतों, तें काम झालें असल्यामुळें, आपला मुक्काम यापुढें फार दिवस येथें होईल असें दिसत नाहीं. तुम्ही ज्या अर्थीं या खेपेस पहिल्या-नेंच या अफाट आणि रम्य नगरामध्यें आलां आहां, त्या अर्थीं तुम्हीं आणखी जितके दिवस मुक्काम होईल तितके दिवस निवांतपणें फिरून या शहरांतील प्रेक्षणीय स्थळें पाहून घेतलीं पाहिजेत; यासाठीं मी तुम्हाला प्रतापपुरीं जावयास सांगत नाहीं. परंतु हें पत्र आजच्या आज येथून रवाना झालें पाहिजे, यासाठीं एकादा जासूद मिळाल्यास पहा. एकदां हें पत्र घेऊन जासूद येथून रवाना झाला, कीं मग तुमच्या मागें कांहींच कामें राहिलेलीं नाहींत. मी चतुरकाला पाठविलें असतें, पण त्या लहान पोराला इतक्या लांबच्या व जोखमाच्या प्रवासास पाठविणें बरें दिसत नाहीं.'

सांगितलेली कामगिरी करावयासाठीं दुर्मुख निघून गेल्यावर शेखरानें खंडणीपैकीं अर्धी रकम आपल्या निजावयाच्या खोलींत असलेल्या एका फडताळामध्यें ठेवून त्या फडताळास मजबूद कुलूप घातलें, आणि किल्ली आपणाजवळ ठेविली. जासुदासाठीं शेखराला फार वेळ खोळंबावें लागलें नाहीं. आपण लिहिलेलें पत्र शेखरानें त्या जासुदाजवळ देऊन त्याची र

करून दिली. नंतर त्यानें उरलेली अर्धी रक्कम दुर्मुखापाशीं देऊन त्याला बरोबर घेऊन तो एका सावकाराकडे गेला. या सावकाराचा वृषपतीशीं देवघेवीचा व्यवहार असल्यामुळें, शेखरानें वृषपतीच्या वांटणीची अर्धी रक्कम त्या सावकारापाशीं देऊन त्याची रीतसर पावती घेतली, आणि तो पुनः आपल्या चिन्हाडाकडे परत यावयास निघाला.

सुमारें अर्धा मार्ग चालून आल्यावर वाटेंतच आपल्यापुढून एक तरुण स्त्री जात आहे, असें त्याच्या नजरेस पडलें. त्या स्त्रीच्या अंगावरील वस्त्रालंकारांवरून आपण सुमारें एक प्रहरापूर्वी सागरदत्ताच्या मुलीपाशीं जी तरुणी पाहिली, तींच ही तरुणी असावी, असें शेखराच्या एकदम लक्ष्यांत आलें. शेखराचें त्या तरुणीकडे लक्ष्य वेधलें आहे, इतक्यांत त्या तरुणीनें आपली मान मागें फिरवून त्यांजकडे पाहून किंचित् हास्य केलें, आणि आपली गति मंद करून ती चालूं लागली. तिनें आणखी एक दोन वेळां उत्कंठेनें मागें वळून त्याजकडे पाहिलें, त्यावरून आपणाशीं कांहीं तरी बोलावें अशी तिची इच्छा आहे, असें शेखरास वाटलें. पांचचार पळांतच तीं दोघें एकमेकांच्या बाजूनें रस्ता चालूं लागलीं. शेखराला त्या तरुणीशीं भाषणाचा उपक्रम कसा करावयाचा, हें मोठें कोडें पडलें होतें. तिची मर्जी मोडून तिच्याशीं भाषण न करतां आपण पुढें तडक चालतें व्हावें तरी कटीण, आणि अशाप्रकारें अनोळखी परकी तरुण स्त्रीशीं भर रस्त्यामध्यें ढवळ्या दिवसा बोलत रहावें तरीही कठीण, अशी त्याच्या मनाची स्थिति झाली होती. शेखर प्रथम भाषणास प्रारंभ करीत नाहीं, असें पाहून ती तरुणीच प्रथम म्हणाली,–'अहो राजकुमार, सुमारें एक प्रहरापूर्वी सागरदत्ताच्या वाड्यांत जो प्रकार घडून आला, तो जरी अगदीं साहजिक होता, तरी त्यामुळें माझ्या त्या अंतःकरणास चटका लागला असावा, असें माझें अनुमान आहे. पण त्यासंबंधानें आपण कष्टी होऊं नये, अशी माझी आपणांस विनंति आहे.'

शेखर म्हणाला,–'त्यानंतर सागरदत्तांनीं मला जें कांहीं सांगितलें, त्यावरून माझ्या मुखांतील हकीकत ऐकून त्यांच्या कन्येस इतकें वाईट कां वाटलें, हें माझ्या ध्यानीं आलें असल्यामुळें, झाला प्रकार अगदीं साहजिक झाला, अशी माझ्या मनाची खात्री पटली आहे.'

आपली पाणीदार परंतु तीव्र दृष्टि शेखराकडे रोखून त्याजकडे ती तरुणी मोठ्या उत्कंठेनें पाहूं लागली. या वेळचा तिचा तो धीटपणा पाहून शेखराला फार आश्चर्य वाटलें. ती जरी इतकी धिटाइनें त्याजकडे पहात होती, तरी शेखराला तिच्याकडे एकसारखें पाहवेना, म्हणून त्यानें आपली दृष्टि दुसऱ्या बाजूस वळवून आपली मान खालीं घातली.

नंतर दमयंती त्याला म्हणाली, 'अहो राजकुमार, सागरदत्ताची कन्या आनंदी ही फार थोर मनाची स्त्री आहे. तिनें तुमच्या भाषणानें झालेलें दुःख अगदीं विसरून जाऊन तुमच्याविषयीं आदरभाव व्यक्त केला होता. आपण खेदयुक्त अंतःकरणानें तेथून निघून गेलां, म्हणून मी आपल्या मैत्रिणीला सरोसरच फार दोष दिला.'

शेखर म्हणाला, 'हे तुमचे मजवर मोठे उपकार आहेत. तुम्हाला अप्रिय वाटणारें वर्तमान मीं त्या वेळीं मुद्दाम सांगितलें नव्हतें, हें तुमच्या ध्यानीं आलें असेलच.'

दमयंती अत्यंत प्रेमळ आणि मंजूळ स्वरानें शेखरास म्हणाली, 'महाराज, आपण त्या वेळीं खेदयुक्त मुद्रेनें सागरदत्तशेटच्या घरांतून बाहेर पडलां, म्हणून मला फारच वाईट वाटलें. खरेंच सांगतें, आपणांविषयीं माझ्या मनांत किती आदरबुद्धि उत्पन्न झालेली आहे, ती आपल्या मुखानें व्यक्त करून दाखविण्यास मी अगदीं असमर्थ

आहे!' असें बोलून तिनें पुनः प्रेमयुक्त दृष्टीनें शेखराकडे टक लाविली.

या तिच्या दृष्टीचा अर्थ शेखराच्या तात्काळ लक्ष्यांत आला. त्या स्त्रीचें त्या वेळचें निर्भीडपणाचें वर्तन पाहून त्याला फार शरम वाटली, आणि त्यानें पुनः लज्जेनें मान खालीं घातली. त्या तरुणीच्या मनांत आपल्यासंबंधाचे नाजूक भाव उत्पन्न झाले आहेत हें ताबडतोब त्याच्या ध्यानीं आलें. त्याला आपल्या आवडत्या प्रियवंदेचें स्मरण झालें, आणि अशा रीतीनें आपण परकी तरुणीपाशीं बोलत राहून तिच्या मनोवृत्तींस परोक्ष रीतीनें उत्तेजन देत आहों, हा आपण प्रियंवंदेचा अपराध करीत आहों, असें त्याच्या मनांत येऊन त्याला कांहीं सुचेनासें झालें.

शेखरानें आपलें मन आवरून, तिला तेथेंच सोडून झपाट्यानें पुढें जावयाचा बेत केला; पण तो बेत त्या धूर्त तरुणीच्या ध्यानीं येऊन ती पुनः त्याजवर प्रेमपूर्ण दृष्टि रोखून त्याला म्हणाली,-'अहो राजकुमार, मी खरेंच सांगतें, आपला हा अगदीं साधा स्वभाव पाहून आपल्याविषयीं माझ्या अंतःकरणांत पूज्यबुद्धि उत्पन्न झाली आहे महाराज, मी आपणास काल प्रथम पाहिलें असें नाहीं. आपणास कल्पनाही नसेल, पण मीं आपणांस कित्येक महिन्यापूर्वी पाहिलें असून तेव्हांपासून आपल्याविषयीं माझ्या मनांत आदरबुद्धि वास करीत आहे!'

हें भाषण करीत असतां शब्दाशब्दाबरोबर तिच्या स्वरामध्यें असलेली प्रेमपूर्ण कोमलता व्यक्त होत होती. उत्तरोत्तर तिचा स्वर कापूं लागला, दृष्टि जड झाली आणि तिच्या गोऱ्या गालावर गुलाबी रंग चढला. ती जणुंकाय आपल्या प्रेमपूर्ण दृष्टीनें आपला स्वीकार करण्याविषयीं त्याची प्रार्थनाच करीत होती! आणि सध्याचें आपलें वर्तन जरी अयोग्य असलें, तरी आपल्या मनोवृत्ती अनावर झाल्यामुळें आपल्या इच्छेविरुद्ध वर्तन आपणांकडून होत आहे, असेंही तिच्या नजरेवरून व्यक्त होत होतें.

हें तिचें अश्लाघ्य वर्तन पाहून शेखराला फार खेद झाला. यावेळीं जर आपण तिच्याशीं बोलत राहिलों, तर तिच्या अमर्याद वर्तनाला उत्तेजन मिळेल, आणि ती आपलें देहभान विसरून भर रस्त्यामध्यें उभयतांच्या अब्रूला बट्टा लावण्यासारखें एकादें कृत्य करील, अशी त्याच्या मनास भीति वाटून त्यानें तिला सोडून तडक आपला मार्ग धरण्याचा विचार केला, आणि तो तत्काळ अमलांतही आणिला.

हें संभाषण होण्याला दहा पांच पळें देखील पुरतीं लागली नव्हतीं. तिला सोडून शेखर झपाट्यानें पुढें झाला, आणि एक दोन गल्ल्या मागें टाकल्यावर तो एका गल्लीच्या कोपऱ्यावर दुर्मुखाची वाट पहात उभा राहिला. कारण दुर्मुख त्या शहरामध्यें नवीनच गेलेला असल्यामुळें तो रस्ता चुकेल असें शेखराच्या मनांत आलें होतें. बराच वेळ झाला तरी दुर्मुख आला नाहीं, म्हणून त्याच्या शोधासाठीं मागें परतावें असें एकदां शेखराच्या मनांत आलें, परंतु स्त्रीजातीसंबंधाच्या त्याच्या मनांत ज्या कल्पना वास करीत होत्या, त्या कल्पना अपुऱ्या ठरविणारी अशी ती उद्भट स्त्री, पुनः कदाचित् आपणास भेटेल अशी भीति वाटून तो मागें परतला नाहीं. दुर्मुख जरी वाट चुकला, तरी तो कोणाला तरी विचारीत विचारीत चिन्हाडीं येईल, अशी आपल्या मनाची समजूत घालून तो पुनः रस्ता चालूं लागला.

या प्रसंगामुळें शेखराच्या मनाचा फारच गोंधळ उडाला होता. ती स्त्री कोण असावी, हें तर त्याला माहीत नव्हतेंच, पण ती कोण असावी यार्चे त्याला अनुमान सुद्धां करतां येईना. त्यानें विक्रमसेनाला पुष्कळदां पाहिलें होतें; पण त्या भावाबहिणींच्या चेहऱ्यांमध्यें साम्य

अगदीं नसल्यामुळें आपणास भेटलेली स्त्री विक्रमसेनाची बहीण असेल, अशी शंका सुद्धां त्याच्या मनांत आली नाहीं. तिच्या बाह्य स्वरूपावरून, वस्त्रालंकारांवरून आणखी सागरदत्तासारख्या नगरशेटीच्या घरीं तिचें जाणेंयेणें असल्यावरून, ती कोणा तरी थोरा मोठ्याच्या घराण्यांतील कुमारिका असावी, एवढें मात्र अनुमान त्याला करतां आलें. दमयंती रूपानें कशी होती हें आम्हीं पूर्वीच सांगितलें आहे. तिच्या मुद्रेवर एक प्रकारची हुकमत दिसून येत असे. त्यावरून सुद्धां हाताखालीं नोकर चाकर वागविणाऱ्या श्रीमंत घराण्यांत तिचा जन्म झाला असावा, असें मानण्यास जागा होती. या सगळ्या गोष्टींचा विचार करितां इतकी रूपवान आणि उच्च कुलांत जन्मास आलेली स्त्री इतकी नादान निपजावी याचें त्याला बरेंच आश्चर्य वाटलें.

अशा रीतीनें विचार करीत करीत तो वृषपतीच्या वाड्यापाशीं येऊन दाखल झाला. आपला कारभारी लवकर परत न आल्यास, त्याच्या शोधासाठीं कोणाला तरी पाठवावें, अशा विचारानें तो देवडीपाशींच उभा राहिला होता; पण त्याला फार वेळ तेथें उभें राहावें लागलें नाहीं. दुर्मुख लवकरच त्याच्या दृष्टीस पडला. परंतु ज्या दिशेनें शेखर आला, त्या दिशेनें तो आला नसून, अगदीं उलट दिशेनें तो आला होता.

दुर्मुख जवळ येतांच शेखर त्याला म्हणाला,–'तुम्ही कदाचित् रस्ता चुकलां असाल, असें माझ्या मनांत आलें होतें.'

दुर्मुख म्हणाला,–'तुम्ही रस्त्यामध्यें त्या बाईशीं बोलत आहां, असें माझ्या नजरेस पडल्यामुळें मी पुढें आलों नाहीं. मी तेथेंच रस्त्याच्या बाजुच्या इमारती पाहत उभा राहिलों होतों. माझें लक्ष्य इमारतींच्या शोभेकडे वेधलें असल्यामुळें, आपण केव्हां पुढें झालां, तें माझ्या ध्यानीं आलेंच नाहीं.'

शेखर म्हणाला,–'तुम्ही रस्ता न चुकतां परत आलां हें आधीं बरें झालें. यापुढें जेव्हा तुम्ही कधीं बाहेर जाल तेव्हां चतुरकाला आपल्या बरोबर घेऊन गेल्यास तुम्हाला तितकें सोईचें होईल. कारण चतुरक या शहरांत कांही दिवस राहिलेला असल्यामुळें त्याला येथील रस्ते माहीत आहेत.'

दुर्मुख म्हणाला,–'होय; असें खरें. यापुढें आपल्या आज्ञेप्रमाणेंच करीन.'

शेखर वाड्यांत आला. नंतर त्यानें अल्पसा उपाहार करून घोड्यावर स्वार होऊन थोडासा फेरफटका केला. वृषपतीच्या त्या वाड्यांत पंडित हेमचंद्र पूर्वी कांहीं दिवस राहत असल्यामुळें तेथें त्याचीं कित्येक पोथ्या पुस्तकें होतीं! शेखर फेरफटका करून परत आल्यावर त्यानें त्या पुस्तकांपैकीं एक पुस्तक घेऊन रात्रीच्या भोजनापर्यंतचा वेळ वाचनामध्यें घालविला. रात्रीचें भोजन झाल्यावर नित्यप्रमाणें तो आपल्या शयनस्थलीं गेला.

तो बिछान्यावर पडला, पण त्याला लवकर झोंप येईना. त्याला प्रियंवदेचें स्मरण झालें, आणि तिची भेट झाल्यास किती दिवस लोटले याचें त्यानें गणित केलें. नंतर आपलें पत्र वडिलांस पोंचून त्याचा जवाब कधीं येणें शक्य आहे, याचा त्यानें अंदाज बांधिला. आपल्या वडिलांचें लवकरच पत्र येईल, आणि लवकरच आपण परत प्रतापपुरीं जाऊं, असें त्याला वाटत होतें. कांहीं वेळानें तिसऱ्या प्रहरीं रस्त्यांत भेटलेल्या तरुणीचें त्याला स्मरण झालें, आणि तो त्याच विचारांत निमग्न झाला. कदाचित् त्या तरुणीचें त्या वेळचें वर्तन अगदीं सरळ-भावाचें असून आपणांस त्याचा भलताच अर्थ भासला असेल, असें एकदां त्याच्या मनांत आलें, आणि तो अंथरुणावर तळमळत असतां अनेकप्रकारच्या विचारांचें त्याच्या मनांत काहूर उसळलें. मध्येंच त्याला नुकत्याच झालेल्या लढाईचें स्मरण झालें; आणि जांघिळाची आठवण होऊन त्यानें

केलेल्या आत्महत्येचें त्याला फार वाईट वाटलें. अशा रीतीनें तो अनेकप्रकारच्या विचारांमध्यें गुंग होऊन दोन घटका अंथरुणावर लोळल्यानंतर त्याला झोंप येऊं लागली; पण त्याला अगदीं गाढ झोप न येतां स्वप्नें पडूं लागलीं.

जे विचार अंथरुणावर पडल्यानंतर त्याच्या मनांत घोळत होते, त्याचसंबंधाचीं त्याला अस्ताव्यस्त स्वप्नें पडूं लागलीं. आपण सध्या बागलाणांत असून युद्धाच्या धांदलींत निमग्न झालों आहों, आपल्या पुढें पुराच्या पाण्यानें भरलेली एक नदी मोठ्या जोरानें वाहत आहे, त्या नदींतून एक स्वार अलीकडे येण्याचा प्रयत्न करीत आहे, आणि त्याला वांचविण्यासाठीं आपण नदींत उडी घालीत आहों, असें त्याला वाटलें. नंतर आपण जांघिळाशीं द्वंद्वयुद्ध करीत आहों, आणि मोठ्या जोरानें त्याजवर प्रहार करून त्याला आपण जमिनदोस्त केलें आहे, असें त्यास आढळून आलें. पण दुसऱ्याक्षणीं ज्याला आपण पाडिलें तो जांघिळ नसून, त्याचे-ऐवजीं चूडामणि आपल्या पायांशीं घायाळ होऊन पडला आहे, असें त्याला दिसलें; त्याचरोबर मोठ्यानें ओरडत तो खडबडीत जागा झाला. इतक्यांत आपल्या दिवाण-खान्यांत कोणाचीं तरी पावलें वाजल्याचा आणि दरवाज्याचीं झडपें उघडल्याचा आवाज त्याच्या कानीं पडला. म्हणून तो लक्ष्य-पूर्वक ऐकूं लागला, पण पूर्वी ऐकूं आलें त्यापेक्षा अधिक कांहींच त्याला पुनः ऐकूं आलें नाहीं. अंथरुणावर पडण्यापूर्वी त्यानें दिवा घालवून टाकला असल्यामुळें, त्या दिवाणखान्यांत अंधार पडला होता. रात्र चांदणी असल्यामुळें आणि त्या दिवाणखा-न्यांतील एक खिडकी उघडी असल्यामुळें, त्या खिडकींतून अगदीं अल्प प्रकाश आंत पडला होता. या प्रकाशांतून आपणांस कांहीं दिसतें कीं काय हें पाहण्यासाठीं त्यानें डोळे ताणून दृष्टि पोंचविण्याचा प्रयत्न केला, पण त्याला त्या दिवाणखान्यांत कांहींच दिसलें नाहीं. आपण एकदां अंथरुणावरून उठून सर्व ठिकाणीं फिरून शोध करावा, असें त्याच्या मनांत आलें; पण तितक्यांतच हा आप-णांस उगीच भास होत असेल, असें वाटून त्यानें तो प्रयत्न केला नाहीं. अशा स्थितींत कांहीं वेळ गेल्यावर त्याला पुनः झोंप येऊं लागली. पण तितक्यांत पुनः पावलांचा शब्द त्याच्या कानीं पडला, आणि कोणी एखादी मानवी आकृति आपल्या डोळ्यांपुढें हालत असावी असा त्याला भास झाला. ती आकृति आपल्या बिछान्यापासून दूर जातां जातां तेथें असलेल्या एका कपाटापाशी जाऊन अदृश्य झाली. या वेळीं आपण उठावें असें पुनः एकदा त्याच्या मनांत आलें, परंतु या वेळीं आपलें सर्व अंग जागच्या जागीं खिळल्याप्रमाणें झालें असून वर उठण्याचीं ताकद आपल्या अंगीं नाहीं, असें त्याला भासलें. तो ओरडण्याचा प्रयत्न करूं लागला, पण तेंही त्याला साधेना. आपणास सध्यां भ्रम होत आहे, कीं हा कांहीं भुताटकीचा प्रकार आहे, याचा त्याला त्यावेळीं निश्चय करतां येईना. अशा प्रकारची त्याच्या मनाची गोंधळलेली स्थिति कायम असतांच त्याला हळु हळु गाढ झोंप लागली, आणि झालेल्या किंवा भासलेल्या सर्व विलक्षण गोष्टींचें त्याला पूर्ण-पणें विस्मरण झालें.

दुसऱ्या दिवशी सकाळीं चांगलें ऊन पडण्याच्या सुमारास तो जागा झाला. त्या-वेळीं त्याला आदल्या रात्रीच्या स्वप्नांची आठवण झाली. या वेळीं त्याचे डोळे थोडे चुरचुरत होते, त्यावरून आपणांस रात्रीं गाढ झोंप लागली नव्हती, असें त्यानें अनुमान केलें. गेल्या रात्रीं अंथरुणावर पडल्यापासून जीं स्वप्नें त्याला पडलीं, त्यांपैकीं बरीच त्याला आठवलीं. रात्रीं आपणास मानवी आकृति दिसल्याचा आणि पावलें वाजल्याचा जो भास झाला, तेंही

एक विलक्षण स्वप्न असावें, असेंच त्याच्या या वेळीं मनांत आलें. तो लागलाच उठला, आणि नित्य कृत्यांस लागला.

सुमारें चार घटका दिवस येण्याच्या सुमारास त्याला आपणास आज क्षुधा बरोबर लागली नाहीं असें वाटलें, आणि त्यानें घोड्यावर बसून शहराबाहेरच्या मैदानांत थोडा वेळ रपेट करण्याचा विचार ठरविला, आणि बरोबर एकही सेवक न घेतां तो घोड्यावर बसून रस्त्याला लागला.

शेखर घोड्यावरून रपेटीस गेला होता खरा, पण त्या वेळीं अनेक प्रकारच्या विचारांत त्याचें मन गुंतलेलें असल्यानें त्याला आपल्या भोंवतीं काय चाललें आहे, याचें अगदीं भान नव्हतें. अशा स्थितींत सुमारें चार घटका रपेट केल्यावर एकदां त्यानें आपण शहरापासून किती दूर आलों आहों, हें पहाण्यासाठीं सभोंवार नजर टाकली. त्या वेळीं आपण एका टेकडीच्या पायथ्याशीं आलों आहों, रस्त्याच्या बाजूस हिरवीं चार कुरणें शोभत आहेत, ऊन हळू हळू प्रखर होत चाललें आहे, असें त्याला आढळून आलें. आपल्या भोंवतीं जिकडे तिकडे रमणीय देखावे पसरलेले आहेत–कुरणापलीकडे शेतें पिकलीं आहेत–कुरणांमधून आणि शेतांतून शेतकऱ्यांचे मुलीमुलगे आनंदानें बागडत आहेत, जवळच्या टेकडीवरून पाण्याचा एक स्वच्छ ओढा वहात आहे,–दूर नजर टाकली असतां नर्मदेचें अफाट पात्र दृग्गोचर होत आहे–समुद्रामध्यें जणुं काय डोलकाठ्यांचें आणि शिडांचें अरण्यच उगवलें आहे–असें त्याला आढळून येऊन त्याचें मन प्रसन्न झालें. हा सर्व देखावा आपण टेंकडीवर चढून तेथून पाहिल्यास अधिक रम्य दिसेल, असें त्याच्या मनांत आलें, आणि तो घोड्यावरून खालीं उतरला. टेंकडीवर चढण्याचा मार्ग खडकाळ असल्यामुळें, त्यानें कुरणांतील एका झुडपाला घोड्याची काढणी अडकवून त्याला तेथील गवत खावयास सोडून दिलें, व तो टेंकडी चढूं लागला. कांहीं वेळपर्यंत त्यानें त्या टेंकडीवरून शहराची शोभा अवलोकन केली आणि नंतर तो पुनः टेंकडीवरून खालीं आला. याच सुमारास तेथें जो एक अकल्पित प्रकार घडून आला, तो येथें सांगणें इष्ट आहे.

शेखर टेंकडीच्या पायथ्याशीं येऊन पोंचतो न पोंचतो, तोंच शहराकडून एक रथ भरधांव–अगदीं वायुवेगानें टेंकडीकडे येत आहे, असें त्याच्या नजरेस पडलें. हा रथ पाहतां पाहतां शेखराजवळ आला. त्यावेळीं रथाचे घोडे बेफाम होऊन ते पळत सुटले आहेत, आणि त्या रथांत कोणी स्त्रिया बसलेल्या असून, त्या भीतीनें आरोड्या मारीत आहेत, असें त्याला आढळून आलें. घोडे मोठे पाणीदार आणि तापट होते. त्यांना आंवरून धरण्याचें काम सारथ्याच्या ताकदीपलीकडचें असल्यामुळें, त्याला पुढें काय होतें हें मुकाट्यानें पाहण्यापलीकडे कांहीं करतां येण्यासारखें नव्हतें. तथापि रथावर लवकरच संकट येणार हें त्याला कळून चुकलें असल्यामुळें, तो शक्य तितक्या जलदीनें रथामागें पळूं लागला. शेखराच्या तर्कप्रमाणें सुमारें पांचचार पळांच्या आंतच रथ एका दगडी बांधावर आपटला, त्याबरोबर त्याचा कणा मोडला, घोडे गाडीपासून मोकळे झाले, आणि रथ कलंडला. ज्या जागीं रथ कलंडला ती जागा बरीच सपाट होती, यामुळें आंतील स्त्रियांना फारशी इजा झाली नसावी, अशा शेखराची कल्पना होती. रथ मोडल्यापासून पांचचार पळांतच शेखर त्या ठिकाणीं जाऊन पोंचला. त्या रथामध्यें ज्या दोन स्त्रिया होत्या, त्या रथ कलंडला त्यावेळीं जमिनीवर पडल्या होत्या. शेखरानें त्या स्त्रियांकडे नजर टाकिली, तेव्हां त्यांपैकीं एक सागरदत्ताची कन्या असून, दुसरी तिची मैत्रिण आहे, असें त्याला आढळून आलें, आणि त्याला परमावधीचें आश्चर्य वाटलें.

शेखर ज्यावेळीं तेथें पोंचला, त्यावेळीं त्या दोघींपैकीं आनंदी सावध असून उठण्याचा प्रयत्न करीत आहे, व तिची मैत्रीण बेशुद्ध होऊन पडली आहे, असें त्याच्या दृष्टीस पडलें. म्हणून आनंदीकडे लक्ष्य न देतां शेखर एकदम दमयंतीपाशीं आला, आणि तिची तपासणी करून ती अजून जिवंत आहे, अशी त्यानें आपल्या मनाची खात्री करून घेतली; आणि त्यानें आनंदीलाही तसें सांगितलें. तें ऐकून आनंदीला मोठें समाधान वाटलें. शेखरानें आपल्या कमरेचा शेला सोडून मूर्च्छित पडलेल्या दमयंतीला त्यानें वारा घातला. कांहीं वेळानें दमयंतीनें डोळे उघडिले, आणि ती आपल्या भोवतीं शून्यदृष्टीनें पाहूं लागली. प्रथमतः आनंदीकडे तिनें एक पळभर निश्चल दृष्टीनें पाहिलें, तेव्हां तिला तिची ओळख पटली. नंतर तिनें शेखरावर आपली दृष्टि रोखून धरिली. दमयंतीनें आनंदीला जितक्या वेळांत ओळखिलें, तितका वेळ तिला शेखराला ओळखावयास लागला नाहीं. शेखराची ओळख पटतांच तिनें पुनः आपले डोळे मिटले, आणि ती स्वस्थ पडली. त्यावेळीं मूर्च्छेमुळें फटफटीत दिसणारे तिचे गाल आणि ओठ पुनः लाल होऊं लागले, आणि तिच्या मुखमंडलावर क्षणमात्र स्मित चमकलें. ही तिची स्थिति पाहून ती शुद्धीवर येत आहे, असें आनंदी व शेखर यांस वाटून त्यांना मोठें समाधान झालें. आणखी थोडा वेळ गेला आणि दमयंती उठून बसण्याचा प्रयत्न करूं लागली. तिचीं गात्रें विगलित झालेलीं असल्यामुळें, तिला कोणा तरी सांवरून धरणें जरूर होतें. वास्तविक पाहिलें तर तें काम आनंदीचें असून तें तिनें करावयास पाहिजे होतें. पण नुकत्याच आलेल्या संकटामुळें तिच्या हृदयांत जी धडकी भरली होती, तिचा जोर अजून कमी झालेला नाहीं, हें शेखरानें पाहिलें आणि प्रसंगाकडे लक्ष्य देऊन त्यानें तिला बसती करावयाचें काम आपल्या [illegible] त्यानें आपला डावा गुडघा टेकून [illegible] पाय जमिनीवर टेकून तो [illegible] तिच्या मस्तकापाशीं बसून तर आम्ही [illegible] तिच्या मानेखालीं हात [illegible]वयास मदत केली. दमयंतीनें उत्तर दिलें,—'अहो हात जमिनीवर टेंकून जमि नाहीं. मी पुढें एक हातभर आपलें मस्तक इतर वाहन पाठविलें चांगली बसती करण्याच्या रथाचा टेका देणें जरूर वाटून, शेर हें कसें! घोडे उजव्या हातावर तिला रुचें कांय झालें, तोंच दमयंतीचें सर्व अवसान!'

तिचा सर्व भार शेखराच्या ही दोघीजणी अशा स्थितींत तिनें पुनः आपराच्या दर्शनाआणि ती त्याच स्थितींत शेखरा देवालयाच्या पडून राहिली. तिला पुनः म्ही दोघी ठेवावें असें शेखराच्या मनांत आलें,नः रथांत तो तिला हळुहळु खालीं ठेवूं लागला, तसल्यादमयंतीनें आपले नेत्र उघडिले; आणि आशापूर्ण दृष्टीनें शेखराच्या मुद्रेकडे पहात ती त्याला म्हणाली,—'महाराज, आपण मला अशा स्थितींत सोडून जाऊं नये, अशी माझी आपणास विनंति आहे. मी लवकरच सावध होईन, असें मला वाटत आहे.'

असें बोलून तिनें पुनः आपले डोळे झांकून घेतले, आणि स्वस्थ पडली. यावेळीं तिच्या चेहऱ्यावर चांगली टवटवी आलेली असल्यामुळें, ती पुनः मूर्च्छित होण्याची भीति नाहीं, अशी शेखराच्या मनाची पूर्णपणें खात्री पटली. वास्तविक पाहिलें तर दमयंती चांगली सावध झाली असून अनायासानें प्राणसंकटाचे वेळीं प्राप्त झालेलें आपल्या प्रियकराच्या स्पर्शाचें सुख अनुभवीत होती. आपल्या प्रियकराच्या अंगस्पर्शानें तिला आपण सध्यां स्वर्गसुखाचा अनुभव घेत आहों, असें वाटत होतें.

अशा रीतीनें परकी तरुणीला आपल्या मांडीवर फार वेळ राहूं देणें अयोग्य आहे, असें वाटून शेखरानें तिच्या भाषणाकडे लक्ष्य

एक विलक्षण स्वप्न असावें, असेंच त्याच्या या वेळीं मनांत आलें. तो लागलाच उठला, आणि नित्य कृत्यांस लागला.

सुमारें चार घटका दिवस येण्याच्या सुमारास त्याला आपणास आज क्षुधा बरोबर लागली नाहीं असें वाटलें, आणि त्यानें घोड्यावर बसून शहराबाहेरच्या मैदानांत थोडा वेळ रपेट करण्याचा विचार ठरविला, आणि बरोबर एकही सेवक न घेतां तो घोड्यावर बसून रस्त्याला लागला.

शेखर घोड्यावरून रपेटीस गेला होता खरा, पण त्या वेळीं अनेक प्रकारच्या विचारांत त्याचें मन गुंतलेलें असल्यानें त्याला आपल्या भोंवतीं काय चाललें आहे, याचें अगदीं भान नव्हतें. अशा स्थितींत सुमारें चार घटका रपेट केल्यावर एकदां त्यानें आपण शहरापासून किती दूर आलों आहों, हें पहाण्यासाठीं सभोंवार नजर टाकली. त्या वेळीं आपण एका टेकडीच्या पायथ्याशीं आलों आहों, रस्त्याच्या बाजूस हिरवीं चार कुरणें शोभत आहेत, ऊन हळू हळू प्रखर होत चाललें आहे, असें त्याला आढळून आलें. आपल्या भोंवतीं जिकडे तिकडे रमणीय देखावे पसरलेले आहेत–कुरणापलीकडे शेतें पिकलीं आहेत–कुरणांमधून आणि शेतांतून शेतकऱ्यांचे मुलीमुलगे आनंदानें बागडत आहेत, जवळच्या टेकडीवरून पाण्याचा एक स्वच्छ ओढा वहात आहे,–दूर नजर टाकली असतां नर्मदेचें अफाट पात्र दृग्गोचर होत आहे–समुद्रामध्यें जणुं काय डोलकाठ्यांचें आणि शिडांचें अरण्यच उगवलें आहे–असें त्याला आढळून येऊन त्याचें मन प्रसन्न झालें. हा सर्व देखावा आपण टेंकडीवर चढून तेथून पाहिल्यास अधिक रम्य दिसेल, असें त्याच्या मनांत आलें, आणि तो घोड्यावरून खालीं उतरला. टेंकडीवर चढण्याचा मार्ग खडकाळ असल्यामुळें, त्यानें कुरणांतील एका झुडपाला घोड्याची कांडणी अडकवून त्याला तेथील गवत खावयास सोडून दिलें, व तो टेंकडी चढूं लागला. कांहीं वेळपर्यंत त्यानें त्या टेंकडीवरून शहराची शोभा अवलोकन केली आणि नंतर तो पुनः टेंकडीवरून खालीं आला. याच सुमारास तेथें जो एक अकल्पित प्रकार घडून आला, तो येथें सांगणें इष्ट आहे.

शेखर टेंकडीच्या पायथ्याशीं येऊन पोंचतो न पोंचतो, तोंच शहराकडून एक रथ भरधांव–अगदीं वायुवेगानें टेंकडीकडे येत आहे, असें त्याच्या नजरेस पडलें. हा रथ पाहतां पाहतां शेखराजवळ आला. त्यावेळीं रथाचे घोडे बेफाम होऊन ते पळत सुटले आहेत, आणि त्या रथांत कोणी स्त्रिया बसलेल्या असून, त्या भीतीनें अर्धमेल्या मारीत आहेत, असें त्याला आढळून आलें. घोडे मोठे पाणीदार आणि तगडे होते. त्यांना आंवरून धरण्याचें काम शेखराच्या ताकदीपलीकडचें असल्यामुळें, त्याला पुढें काय होतें हें मुकाट्यानें पाहण्यापलीकडे कांहीं करतां येण्यासारखें नव्हतें. तथापि रथावर लवकरच संकट येणार हें त्याला कळून चुकलें असल्यामुळें, तो शक्य तितक्या जलदीनें रथामागें पळूं लागला. शेखरच्या तर्काप्रमाणें सुमारें पांचचार पळांच्या आंतच रथ एका दगडी बांधावर आपटला, त्याबरोबर त्याचा कणा मोडला, घोडे गाडीपासून मोकळे झाले, आणि रथ कलंडला. ज्या जागीं रथ कलंडला ती जागा बरीच सपाट होती, यामुळें आंतील स्त्रियांना फारशी इजा झाली नसावी, अशा शेखराची कल्पना होती. रथ मोडल्यापासून पांचचार पळांतच शेखर त्या ठिकाणीं जाऊन पोंचला. त्या रथामध्यें ज्या दोन स्त्रिया होत्या, त्या रथ कलंडला त्यावेळीं जमिनीवर पडल्या होत्या. शेखरानें त्या स्त्रियांकडे नजर टाकिली, तेव्हां त्यांपैकीं एक सागरदत्ताची कन्या असून, दुसरी तिची मैत्रिण आहे, असें त्याला आढळून आलें, आणि त्याला परमावधीचें आश्चर्य वाटलें.

शेखर ज्यावेळीं तेथें पोंचला, त्यावेळीं त्या दोघींपैकीं आनंदी सावध असून उठण्याचा प्रयत्न करीत आहे, व तिची मैत्रीण बेशुद्ध होऊन पडली आहे, असें त्याच्या दृष्टीस पडलें. म्हणून आनंदीकडे लक्ष्य न देतां शेखर एकदम दमयंतीपाशीं आला, आणि तिची तपासणी करून ती अजून जिवंत आहे, अशी त्यानें आपल्या मनाची खात्री करून घेतली; आणि त्यानें आनंदीलाही तसें सांगितलें. तें ऐकून आनंदीला मोठें समाधान वाटलें. शेखरानें आपल्या कमरेचा शेला सोडून मूर्च्छित पडलेल्या दमयंतीला त्यानें वारा घातला. कांहीं वेळानें दमयंतीनें डोळे उघडिले, आणि ती आपल्या भोवतीं शून्यदृष्टीनें पाहूं लागली. प्रथमतः आनंदीकडे तिनें एक पळभर निश्चल दृष्टीनें पाहिलें, तेव्हां तिला तिची ओळख पटली. नंतर तिनें शेखरावर आपली दृष्टि रोखून धरिली. दमयंतीनें आनंदीला जितक्या वेळांत ओळखिलें, तितका वेळ तिला शेखराला ओळखावयास लागला नाहीं. शेखराची ओळख पटतांच तिनें पुनः आपले डोळे मिटले, आणि ती स्वस्थ पडली. त्यावेळीं मूर्च्छेमुळें फटफटीत दिसणारे तिचे गाल आणि ओठ पुनः लाल होऊं लागले, आणि तिच्या मुखमंडलावर क्षणमात्र स्मित चमकलें. ही तिची स्थिति पाहून तो शुद्धीवर येत आहे, असें आनंदी व शेखर यांस वाटून त्यांना मोठें समाधान झालें. आणखी थोडा वेळ गेला आणि दमयंती उठून बसण्याचा प्रयत्न करूं लागली. तिचीं गात्रें विगलित झालेलीं असल्यामुळें, तिला कोणी तरी सांवरून धरणें जरूर होतें. वास्तविक पाहिलें तर तें काम आनंदीचें असून तें तिनें करावयास पाहिजे होतें. पण नुकत्याच आलेल्या संकटामुळें तिच्या हृदयांत जी धडकी भरली होती, तिचा जोर अजून कमी झालेला नाहीं, हें शेखरानें पाहिलें आणि प्रसंगाकडे लक्ष्य देऊन त्यानें तिला बसती करावयाचें काम आपल्याकडे घेतलें. त्यानें आपला डावा गुडघा पाय जमिनीवर टेकून तो तिच्या मस्तकापाशीं बसला तिच्या मानेखालीं हात दे वयास मदत केली. दमयं हात जमिनीवर टेंकून जमि एक हातभर आपलें मस्तक तिला चांगली बसती कर टेका देणें जरूर वाटून, शेख उजव्या हातावर तिला स तोंच दमयंतीचें सर्व अवसान तिचा सर्व भार शेखराच्या अशा स्थितींत तिनें पुनः आ आणि ती त्याच स्थितींत शेखरा पडून राहिली. तिला पुनः ठेवावें असें शेखराच्या मनांत आलें, तो तिला हळुहळु खालीं ठेवूं लागला, दमयंतीनें आपले नेत्र उघाडिले; आ आशापूर्ण दृष्टीनें शेखराच्या मुद्रेकडे पहात ती त्याला म्हणाली,–'महाराज, आपण मला अशा स्थितींत सोडून जाऊं नये, अशी माझी आपणास विनंति आहे. मी लवकरच सावध होईन, असें मला वाटत आहे.'

असें बोलून तिनें पुनः आपले डोळे झांकून घेतले, आणि स्वस्थ पडली. यावेळीं तिच्या चेहऱ्यावर चांगली टवटवी आलेली असल्यामुळें, ती पुनः मूर्च्छित होण्याची भीति नाहीं, अशी शेखराच्या मनाची पूर्णपणें खात्री पटली. वास्तविक पाहिलें तर दमयंती चांगली सावध झाली असून अनायासानें प्राणसंकटाचे वेळीं प्राप्त झालेलें आपल्या प्रियकराच्या स्पर्शाचें सुख अनुभवीत होती. आपल्या प्रियकराच्या अंगस्पर्शानें तिला आपण सध्यां स्वर्गसुखाचा अनुभव घेत आहों, असें वाटत होतें.

अशा रीतीनें परकी तरुणीला आपल्या मांडीवर फार वेळ राहूं देणें अयोग्य आहे, असें वाटून शेखरानें तिच्या भाषणाकडे लक्ष्य

बसतें केलें, व तो तिला
पडून कसें चालेल ? जरा
चा यत्न करा, म्हणजे
ीं काय हें समजेल. '

ी,–' थांबा थांबा, मी
(उठतें. मला असें दूर
सें बोलत तिनें अर्धस्मित
मय दृष्टीनें शेखराकडे
. अशा स्थितींत ती स्तब्ध
ामुळें, शेखराला तिचा तोल
भाग पडलें.

ं तिला प्रश्न केला,–'तुम्हाला
हे कीं काय ? तसें असेल
म्हणजे तुम्हाला तुमच्या घरीं
जर्वाज लवकर करतां येईल.'

ती कण्हत कण्हत म्हणाली,–' नाहीं,
ाहीं मला फारसें लागलें नाहीं. तरी
पण अंग जरा ठेंचल्याप्रमाणें वाटतें. थोड्या
वेळानें मला बरें वाटेल-अग आईग-माझ्यानें
बसवत नाहीं मला जरा असेंच स्वस्थ पडूं द्या.'

शेखर म्हणाला,–' असें जर आहे, तर
मी येथें गवत पसरून जरा मऊ जागा
तयार करतों. त्यावर तूं पडून रहा. असें
ओठंगून राहून तुला बरें वाटणार नाहीं.'
असें बोलून त्यानें दमयंतीला हळुहळु
आपल्यापासून दूर लोटलें, आणि तेथेंच
जमिनीवर निर्जीवलें. त्या वेळीं जमिनीवरचे
खडे तिच्या अंगास खुपत होते, पण घेत-
लेल्या ढोंगाची बतावणी करण्याकरितां
ने सहन करून तिला तसेंच पडून राहणें
भाग झालें. शेखर चटकन उठला, आणि
त्यानें कुरणांतील थोडेंसें गवत गोळा करून
त्यावर आपल्या अंगावरील शेला अंथरला,
आणि तिच्यासाठीं मृदु शय्या तयार केली

शेखरानें आपणास अशा रीतीनें दूर
लोटलें, म्हणून दमयंतीला थोडासा राग
आला, आणि क्षणमात्र तिच्या कपाळास
आठ्या चढल्या. आपलें कपट शेखरानें
ओळखिलें, हेंही पूर्णपणें तिच्या ध्यानांत आलें.
तिनें त्याच्या मांडीवर डोकें टेंकून पडल्या-
पासून शेखराकडे पांचचार वेळां प्रेमळ दृष्टीनें
अवलोकन केलें होतें; ही गोष्ट त्याच्या
ध्यानीं आली असल्यामुळें, त्यानें आपल्या
कृतीनें तिला उत्तेजन मिळूं नये अशी खबर-
दारी ठेवून तो तिच्याशीं अगदीं झटकून
वागत होता. हा त्याचा थंडपणा पाहून
दमयंतीला फार वाईट वाटलें. आपल्या
हुशारीवर आणि सौंदर्यावर तिचा मोठा भर-
वसा होता. आपल्या रूपानें शेखरासारखा
तरुण उल्लू होऊन आपल्या पायांशीं लाळ
घोंटीत पडून राहील अशी तिला घमेंड होती;
पण शेखराचें अशा प्रकारचें तुटक वर्तन
पाहून आपल्या सौंदर्याचा त्याजपाशीं कांहींच
उपयोग होत नाहीं, अशी तिची खात्री
होऊन चुकली. तरी एवढ्यानें ती निराश
झाली नव्हती. अजून तिला आपल्या
हुशारीचा मोठी घमेंड होती, आणि
आपण युक्तिप्रयुक्तीनें या तरुणाचें मन
वळवून घेऊं, अशी तिच्या मनाची खात्री
होती. म्हणून तिनें आपल्या मनांतील
राग दाबून टाकिला, व हास्यमुखानें ती
पुनः शेखराकडे पाहूं लागली. शेखर यावेळीं
गवत जमा करीत आहे, आणि तो आपल्या-
पासून दूर आहे, हें पाहून ती आनंदीस
म्हणाली,–' गडे, मी कोण आहें हें या तरु-
णास यावेळीं समजतां कामा नये. मी
चांगली सावध आहें, आणि मला तिळमात्र
सुद्धां दुखापत झालेली नाहीं. '

आनंदी म्हणाली,–' तुला दुखापत झालेली
नाहीं, हें ऐकून मला फार आनंद होत
आहे. प्रथम तूं बेशुद्ध पडलीस, तेव्हां तर
माझ्या तोंडचें पाणीच पळालें होतें. रथाचा
जबर धक्का लागून तुझा एकदम अंतच
झाला असावा, असें मला वाटलें. '

हीं भाषणें होत आहेत, तों शेखर त्यांज-
पाशीं आला. हें पाहून दमयंती म्हणाली,–
' हे थोर गृहस्थ या प्रसंगीं येथें होते, म्हणूनच

माझे प्राण वांचले. यांनीं जर मला सावध केलें नसतें, तर माझे प्राण वांचले असते कीं नाहीं याची मला शंकाच आहे!' हे शब्द उच्चारित असतां त्या धूर्त स्त्रीनें जणुं काय आपणांस अतिशय वेदना होत आहेत, असा स्वर काढला होता.

हें तिचें भाषण ऐकून शेखराला मोठें आश्चर्य वाटलें. कारण तिचे प्राण वांचविण्यासारखें कोणतेंही कृत्य आपण केलें नाहीं, हें तो जाणून होता. अर्थात् अशा रीतीनें आपली निष्कारण स्तुति करण्यांत त्या स्त्रीच्या मनांत कांहीं तरी हेतु साध्य करावयाचा आहे, असें त्याच्या एकदम मनांत आलें. नंतर तो आनंदीस म्हणाला,–'बाई, वास्तविक पाहिलें तर मीं कांहीं सुद्धां केलेलें नाहीं. अर्थात् यांनीं माझी इतकी स्तुति करण्याचें कारण नाहीं. आपल्यावर जें काय संकट यावयाचें तें येऊन गेल्यावर मी येथें येऊन पोंचलों.'

दमयंती म्हणाली,–'हें संकट येण्यापूर्वीच माझें देहभान सुटलें असल्यामुळें, त्या प्रसंगीं काय झालें, तें मला अगदीं स्मरत नाहीं. तथापि हे येथें होते, म्हणूनच माझा प्राण वांचला, असें माझें मन मला सांगत आहे.' असें बोलून ती हळुहळु उठून बसली, आणि पुढें म्हणाली,–'महाराज, आपले या प्रसंगीं मजवर जे उपकार झाले आहेत, ते माझ्या हातून या जन्मीं कधींही फिटणार नाहींत. या प्रसंगाचें स्मरण सर्व जन्मभर माझ्या मनांत कायम राहील, आणि आपणही मला विसरूं नये, अशी माझी आपणांस हात जोडून विनंति आहे.'

नंतर शेखर म्हणाला,–'ईश्वराच्या दयेनें कोणत्याही प्रकारें भयंकर परिणाम न होतां हें संकट टळलें, हें फार चांगलें झालें. आतां ऊन फार होत आहे, यासाठीं तुम्ही येथून परत फिरावें हें बरें. नाहीं तर तुम्ही येथेंच कोठें तरी थंड छायेंत बसा, आणि मी शहरांत जाऊन सागरदत्त शेटींस [illegible] र्न खबर कळवून दुसरें वाहन पाठवून [illegible] ावें,

दमयंती म्हणाली,–'आपण जर [illegible] सांग, शहरापर्यंत सोबत कराल, तर आम्ही [illegible] असें आपल्या बरोबर लुहहळु येऊं.' राणि

शेखरानें एकदम स्पष्टपणें उत्तर दिलें,–'अशा करणें मला प्रशस्त दिसत नाहीं. मी पुढें जाऊन दुसरी गाडी किंवा इतर वाहन पाठवून देतों. बरें, [illegible] पण तुमच्या रथाचा सारथी कोठें दिसत नाहीं, हें कसें! घोडे कसे भडकले आणि सारथ्याचें काय झालें, हें आपणांस सांगतां येईल काय!'

आनंदी म्हणाली,–'आम्ही दोघीजणी रथांत बसून येथील मुरलीधराच्या दर्शनासाठीं म्हणून चाललों होतों. देवालयाच्या दारांत रथ उभा ठेवून आम्ही दोघी देवदर्शन करून परत आलों, व पुनः रथांत बसलों. नेहमींप्रमाणें आम्ही आंत बसल्यावर सारथी देवदर्शनासाठीं देवळांत गेला. इतक्यांत एकाएकीं कसलासा मोठा आवाज झाला, त्याबरोबर घोडे बुजाले आणि वेगानें पळत सुटले. सारथी देवालयांतच राहिला.'

शेखर म्हणाला,–'असें आहे, तर विशेष काळजी करण्याचें कारण नाहीं. सारथी तुमचा शोध काढीत लवकरच येथें येऊन पोंचेल. तरी मी आपल्या वडिलांकडे जाऊन आपणांस लवकर परत नेण्याची तजवीज करतों.' असें बोलून शेखर एकदम तेथून चालता झाला. हा प्रसंग जेथें घडला, तेथून जवळच त्याचा घोडा झुडपास बांधलेला होता, त्यावर स्वार होऊन त्यानें शहरचा मार्ग धरिला. थोड्याच वेळानें सागरदत्ताचा सारथी रथाचा शोध काढीत घाईघाईने चाललेला शेखराला भेटला. त्याला त्यानें झालेलें वर्तमान थोडक्यांत कळविलें. अर्थात् त्याला सागरदत्ताकडे जाण्याचें कारण उरलें नाहीं.

सागरदत्ताचा सारथी त्या दोघीं तरुणीजवळ येऊन दाखल झाल्यावर त्यानें त्यांच्या

लें सर्व वर्तमान ऐकून घेतलें. चुराडाच झाला होता; म्हणून ाची फारशी वास्तपुस्त न करितां घोड्यांचा शोध करून ते धरून णेले, आणि नंतर त्या दोघींना त्यानें ाड्यांवर बसवून घराकडे येण्याविषयीं सांगि तलें. परंतु त्या घोड्यांची त्यांस भीति त असल्यामुळें त्यांनीं पायींच रिलें. त्यांनीं सारथ्यास न पुढें जाण्यास सांगून नंतर हळुहळु पायींच शहराकडे जावयास नि ाल्या. प्रथमतः त्या दोघी कांहीं न बोल ां मुकाट्यानें चालूं लागल्या. दमयंतीच्या नांत अनेक प्रकारचे परस्पर विरुद्ध विचार खेळत होते, आणि आनंदी दमयंतीच्या धाष्ट्यांचद्दल आपल्या मनांत आश्चर्य करी ेची.

अशा स्थितींत का ळ वेळ गेल्यानंतर दमयंतीनें प्रथम बोलावयास प्रारंभ केला. या वेळची तिची मुद्रा, तिचा स्वर, आणि तिचा एकंदर आविर्भाव पाहून आनंदीला फार आश्चर्य वाटलें. ती म्हणाली,–'मी त्या तरुणावर प्रेम करतें, हें जितकें खरें आहे, तितकेंच मी त्याचा तिरस्कार करतें, हेंही अगदीं खरें आहे!'

हे तिचे शब्द ऐकून आनंदीनें विचारलें,–'गडे, हें असें विलक्षण बोलतेस तरी काय? हे तुझे शब्द ऐकून मला फार आश्चर्य वाटतें. असें तुझें मन चमत्कारिक कां व्हावें, हें मला स्पष्टपणें सांगशील काय! तूं आपलें मन त्याजपाशीं उघड केव्हां केलेंस, आणि त्यानें तुझा तिरस्कार केव्हां केला, हें कांहीं मला समजलें नाहीं.'

प्रेम आणि तिरस्कार हे दोन्ही मनोविकार जिच्या मुद्रेवर स्पष्टपणें दिसत आहेत अशी ती दमयंती म्हणाली,–'तें जसें तुला समजलें नाहीं, तसेंच मलाही समजलें नाहीं, यामुळें माझी स्थिति फारच विलक्षण झाली आहे. जर माझ्या मनाची पूर्णपणें निराशा झाली असती, तर त्या गोष्टीचा एकपरी मला आनंदच झाला असता. काल दोन प्रहरानंतर जें काय झालें तें मी तुला सांगतें, म्हणजे माझी अशी स्थिति कां झाली आहे, हें तुला समजेल. मी काल दोन प्रहरीं आपल्या घरीं जात असतां वाटेंत या तरु णि माझी गांठ पडली. त्यावेळीं ा करून त्याच्या मनाचा ठाव विचार केला. मीं आपली शालीनता, आपला कुलाभिमान आणि आपली लाजलज्जा गुंडाळून ठेवून भररस्त्यांत त्या तरुणापाशीं बोलत उभी राहिलें. त्या तरुणाचें हृदय इतकें कठोर असेल, असें जर पूर्वी मला कळलें असतें, तर मी इतका अतिप्रसंग केला नसता. कदाचित् माझें त्यावेळचें वर्तनच त्याच्या मनांत मजविषयीं उदासीनता उत्पन्न करण्यास कारण झालें असेल! मी कोणी तरी हलक्यासलक्या कुलांतील निर्लज्ज पोरगी आहें, असेंही त्याच्या मनांत आलें असेल, आणि आपण अशा प्रकारच्या खोचरोचर रस्त्यांत बोलत उभें रहावें, हें त्याला असभ्यपणाचें वाटलें असेल! असो; झालें तें झालें. मी अजून धीर सोडीत नाहीं. मी शक्य तितके प्रयत्न करून त्याच्या पाषाणासारख्या हृदयास द्रव आणीन! अशा प्रकारचा शहाणा, अशा प्रकारचा सुंदर आणि अशा प्रकारचा तो तरुण प्रेमाला अगदींच पारखा असेल असें होणार नाहीं. आज नाहीं उद्यां, केव्हांना केव्हां तरी, मी त्याचें मन आपणाकडे वळवीनच वळवीन!'

आनंदी म्हणाली,–'गडे, या प्रेमाच्या बाबतींत फार हुषारीनें वागलें पाहिजे. हा माझा उपदेश ध्यानांत ठेव, नाहीं तर तूं भलतें सलतें कांहीं तरी करून आपल्या जन्माची माती करून घेशील!' वास्तविक पाहिलें तर साऱ्या जन्मांत सारासार विचारास अनुसरून असे एवढेच शब्द आनंदीच्या मुखांतून निघाले होते. तिच्या घरची रीतभात चांगली होती, तिच्या पित्यानें त्या

वेळच्या रीतीप्रमाणें तिला जितकें शिक्षण द्यावयास पाहिजे होतें तितकें दिलें होतें, पण त्याचा तिच्या मनावर अगदीं संस्कार झाला नव्हता. खावें, प्यावें, मजा करावी, याशिवाय तिला दुसरें कांहींच दिसत नसे. परंतु यावेळीं दमयंतीच्या मनाची जी तळमळ चालली होती, ती आनंदीच्या मनांत पुरती ठसली असल्यामुळें, भीतीनें तिच्या मुखांतून हें सोन्याचें वाक्य बाहेर पडलें होतें.

दमयंती म्हणाली,–' तूं कधीं समुद्राक[illegible] लक्ष्य देऊन पाहिलें आहेस? ज्यावेळी समुद्रामध्यें एकाएकीं तुफानास प्रारंभ असा त्यावेळीं तें तुफान किती भयंकर अ[illegible]माण तूं कधीं पाहिलें आहेस? माझ्या बा[illegible]ची यावेळीं अशाच प्रकारची स्थिति ला[illegible]ाली आहे. या प्रसंगीं माझ्या मनाचा प्र[illegible]अशी स्थिति होण्यास काय काय व पड[illegible]झालीं [illegible]तरुणाचें मी आ[illegible]कित्येक [illegible]कर व[illegible]माझ्या [illegible]पणांस [illegible]हांपासून [illegible]म्हीं घ[illegible]स्थितींत काल [illegible]होण्याचा अकल्पित योग जुळून आल[illegible]भातां मनांतील प्रेमास उमाळे अ[illegible]णि माझ्या कामदेवानें आपल्या सर्व ब[illegible]माझ्यावर वर्षाव करून मला अगदीं [illegible]चा एकदम सोडलें. माझीं इंद्रियें किंवा[illegible]ला, [illegible]हल करून माझ्या ताब्यांत नाहींसें [illegible]तं मन सध्यां थोरली वावटळ सुटली [illegible]आहे. मोठी डलेलें गवत ज्याप्रमाण[illegible]कित झाल्यें सांप- तिकडे जात असतें, त्या[illegible]काय ऐस नेईल मन कामदेवाच्या पूर्णप[illegible]ओढवलें माझें आहे. माझ्या मनांत प्रेमाच[illegible]नें शेर झालें संचार झाला असून, त्या तर[illegible]टाकिली. निवार त्याचा नुसता विटाळ देशर कांहीं याला हें आश्चर्य नव्हे काय? त्या रथांत [illegible]नये, पाषाणाहून देखील कठीण[illegible]मुळें त्यांचा मन माझा कल्पना आहे. अ[illegible]ल्या. पण सु[illegible]शी गोष्टींचा मला अनुभव झाली नाहीं.' या

त्याला अशा रीतीनें वि[illegible] माझा धिक्कार करावा, [illegible]नि माझा अपमान करा[illegible]वें, इतका अपमान मी व[illegible]सांग, बोलून ती थोडा वे[illegible]" असें नंतर म्हणाली,–' [illegible], आणि कुलांत जन्म घे[illegible]नें ज्या आणि माझ्या [illegible]कुलामध्यें आहे, हें तर [illegible]हाड वैर [illegible]. जोंपर्यंत [illegible]नव्हतें, तो- [illegible]हें वैर माझ्या [illegible]असे. प्रताप- [illegible]नीं येतांच माझ्या [illegible]वर उडत असे. हें आमचें वैर किती प्रबळ आहे, याचें ताजें उदाहरण कालच तुझ्या कानीं आलें आहे. त्या तरुणाच्या मुखानें काल तूं जें कांहीं ऐकलेंस, त्यावरून या प्रतापपुरकरांनीं आह्मांस यापूर्वी किती छळिलें असेल, त्याचें तुला चांगलें अनुमान करतां येईल. पण एवढें मोठें वैर सुद्धां ज्यानें विसरावयास लाविलें, त्या प्रेमाचा प्रभाव केवढा असेल, याचें अनुमान तूंच कर! अशा प्रकारचें प्रेम जागृत असतां त्याच अंतःकरणामध्यें द्वेष किंवा वैर यांस जागा कशी बरें मिळेल? या राजकुमाराच्या प्राप्ती- साठीं मी आपल्या बंधूचीं अप्रिय भाषणें सहन करीन, वडिलांनीं रोष केला तरी तिकडे दुर्लक्ष्य करीन, फार तर काय मी आपल्या प्राणांची देखील पर्वा करणार नाहीं. पण काय ग? मीं आतां काय म्हटलें? मी त्याचा द्वेष करतें, असें म्हटलें काय? तसे शब्द जर माझ्या मुखांतून बाहेर पडले असतील, तर ती माझी चूक आहे. माझ्या अंतःकरणांत आतां प्रेमा- खेरीज दुसऱ्या कोणत्याही मनोवृत्तीस थारा मिळणें शक्य नाहीं.'

असें बोलून ती मानी, तेजस्वी आणि सुंदर दमयंती ढळढळां रडूं लागली, आणि तिच्या नेत्रांतून सुटलेले अश्रुबिंदु तिच्या

[redacted] लागले. ही तिची [redacted] लाही फार खेद झाला [redacted] डे, असा धीर सोडूं [redacted] 'तूं उतावळी होऊं [redacted] रें, पण, त्या वेळीं [redacted] ति इतकी बेताल [redacted] ल्पनाही नव्हती.' [redacted] णाली,—'माझ्या [redacted] हें मी तुला [redacted] मनाची स्थिति [redacted] काय सांगूं? [redacted] दुःख यांखेरीज [redacted] नाहीं? ही देवा [redacted] आहे. मीं प्रेम [redacted] आहे. हा समुद्र [redacted] द्वीपांत प्रवेश करणार, कीं मध्येंच गटं-गळ्या खात माझा प्राण जाणार हें पहावयाचें आहे.'

आनंदी म्हणाली,—'मला वाटतें, तूं कोण आहेस हें त्याला माहीत असावें, आणि परंपरागत वैरामुळें तुझ्या प्रेमाचा स्वीकार करण्याचा त्याला धीर होत नसावा.'

दमयंती बोलली,—'या तुझ्या शंकेंत कांहींच तथ्य नाहीं. मी कोण यासंबंधानें त्याच्या मनांत तुसती शंका सुद्धां आलेली नाहीं. आणखी माझ्या संबंधानें कोणत्याही प्रकारची कल्पना करावयास त्याला थारा मिळूं नये, म्हणून मीं मघां तुला सूचना देऊन सावध केलें होतें. यापुढें देखील त्याचें मन मजवर आहे, अशी माझ्या मनाची खात्री पटल्यासेरीज त्याला आपली ओळख पटूं द्यावयाची नाहीं, असा मीं निश्चय केला आहे.'

ममतेनें आपल्या मैत्रिणीकडे पाहत आनंदीनें विचारलें,—'बरें, आतां तुझा बेत काय आहे? तूं पुढें काय करणार?'

दमयंती म्हणाली,—'माझें मन जेव्हां माझ्या स्वाधीन असेल, तेव्हां मी काय करणार हें मला सांगतां येईल! माझें मन आतां प्रेमाच्या स्वाधीन आहे. तें प्रेम काय तें करील. आपले हेतु साध्य करण्याच्या हजारों युक्त्या प्रेमाला माहीत असतात, असें म्हणतात. माझा प्रियकर कोठें असतो, कोठें जातो, कोठें येतो, काय करतो, ह्यावर माझ्या प्रेमानें पहारेकरी पूर्वीच नेमलेले आहेत. पुढें मी काय करणार आहें, हें आतांच सांगत नाहीं. माझी युक्ति सफळ होण्याची वेळ जवळ आली, म्हणजे मी तीं तुला सांगेन. आतां माझी तुजपाशीं एक विनंति आहे, ती तूं मान्य केली पाहिजे. माझा [redacted] आऊ एक दोन दिवसांत येथें येणार [redacted] मलेंच आहे. माझी मसलत साध्य होण्यापूर्वी [redacted] संसार तो येथें आला, तर कृपा करून [redacted] माझें प्रेमासंबंधानें तूं त्याजपाशीं एक शब्द [redacted] देखील बोलता कामा नये, अशी माझी [redacted] जोड [redacted] पाहिजे [redacted] अशी [redacted] असतां [redacted] पोंचल्या [redacted] संपविणें [redacted]

आनंदी [redacted] सोडून शेर [redacted] मोठ्या वे [redacted] वळून न [redacted] मार्गावर [redacted] रस्त्याल [redacted] घोडा [redacted] तों दे [redacted] येत [redacted] कर [redacted] वर [redacted] त [redacted]

[redacted]रण २७ वें.

[redacted]क दंतकथा.

दमयंती यांना कुरणामध्यें [redacted] पल्या घोड्यावर बसून [redacted] ाला, तो पुनः मार्गे [redacted] डक शहरापासून अर्ध्या [redacted] खल झाला. या ठिकाणीं [redacted] वांकण होतें. तेथें आपला शेखरानें मागें वळून पाहिलें, [redacted] ोठ्या वेगानें घोडे फेंकीत [redacted] सें त्यास आढळून आलें. [redacted] घी तरुणी रथाच्या घोड्यां-[redacted] येत असतील असें एकवार [redacted] आलें, पण दुसऱ्या क्षणीं [redacted] ाल्यानें घोड्यांवर चिडा

नसून पुरुष आहेत, असें त्यास स्पष्ट दिसलें; म्हणून ते स्वार पुढें जात तोंपर्यंत आपण येथेंच उभें राहावें, असा त्यानें विचार केला थोड्याच वेळांत ते दोन्ही स्वार त्याच्यापाशीं येऊन पोंचले. ते दोन्ही स्वार आपले सेवक दुर्मुख आणि चतुरक आहेत, असें त्यानें ओळखलें,तोंच त्या दोघांनीं त्याला नमन केलें.

शेखरानें त्यांस विचारलें,–'तुम्ही आज इकडे कोठें गेलां होतां ?'

दुर्मुखानें नेहमींप्रमाणें स्मित मुद्रेनें उत्तर दिलें,–'मीं या शहरीं नवखा असल्यामुळें आज या बाजूचा भाग पहावा असा विचार केला, आणि आपल्या आज्ञेप्रमाणें चतुरकाला बरोबर घेऊन वाड्यांतून बाहेर पडलों. आम्ही दोघे इकडे पुष्कळ लांबपर्यंत फिरावयास गेलों होतों. इकडचा प्रदेश फारच रमणीय आहे. आम्ही बाहेर पडल्यापासून पाहण्यासारख्या पुष्कळ गोष्टी आमच्या थोडेसे [illegible] रेस पडल्या. आपण लवकर वाड्यांत उभा करू[illegible], आणि कदाचित् [illegible]पणांस आमची न स्वार[illegible] लागेल, म्हणून आम्हीं घाईघाईनें आहेत, [illegible] चाललों होतों.'

शाचित् त्या द[illegible]खर म्हणाला,–'मीही आतां वाड्यांत बसून परत [illegible]लों आहें. आपण तिघे बरोबर तिकडे याच्या मनांत [illegible] म्हणजे झालें. बरें, नुकताच त्या थोडे जवळ [illegible]कडच्या टेंकडीच्या पायथ्याशीं असलेल्या कुरणांत जो अपघात झाला, तो तुम्हीं पाहिला का ?'

दुर्मुख आश्चर्यानें चकित झाल्याप्रमाणें मुद्रा करून म्हणाला,–'काय अपघात ? आपणांवर तर कांहीं संकट ओढवलें नाहीं ना ?' असें विचारून त्यानें शेखराच्या नखशिखान्त शरीरावर नजर टाकिली.

शेखर म्हणाला,–'माझ्यावर कांहीं संकट आलें नव्हतें. दोन तरुण स्त्रिया रथांत बसून जात असतां घोडे बुजाल्यामुळें त्यांचा रथ मोडला, आणि त्या खालीं पडल्या. पण सुदैवानें त्यांना अगदीं दुखापत झाली नाहीं.'

दुर्मुख बोलला,–'आम्हीं त्या पलीकडच्या झाडीकडे जात असतां तुम्ही सांगतां त्या कुरणामध्यें एक पुरुष एका स्त्रीला आपल्या मांडीवर घेऊन बसला आहे, असें माझ्या दृष्टीस पडलें; परंतु ती कांहींतरी आपुकमापुकांची लीला असावी, असें आमच्या मनांत येऊन आम्हीं तिकडे फारसें लक्ष्य दिलें नाहीं.

अत्यंत गंभीर मुद्रेनें आणि स्वरानें शेखर म्हणाला,–'छेः' भलतेंच कांहीं तरी ! आपुकमापुकें कसचीं ! त्या बिचाऱ्या भयानें अर्धमेल्या झाल्या होत्या ! बरें, पण तुम्ही आज तिकडे गेलां होतां तिकडे काय काय पाहिलें ? त्या बाजूला खुद्दां पाहण्यासारखीं स्थळें पुष्कळ आहेत.'

यावर दुर्मुखानें आपण पाहिलेल्या कित्येक स्थळांचें शेखरापाशीं वर्तन केलें. यावेळच्या त्याच्या भाषणांत लाघवीपणा नेहमींपेक्षां पुष्कळच अधिक होता. तो म्हणाला,–'या शहराच्या आसपास पाहण्यासारखीं पुष्कळ स्थळें आहेत, यांत शंकाच नाहीं. मला वाटतें, आपण पूर्वी या शहरांत बरेच दिवस काढले असल्यामुळें, जसा प्रतापपुरच्या दरींतील खडानखडा आपणास माहीत आहे, तसा या शहरांतील आणि आसपासच्या भागांतील सर्व प्रदेश आपणास पूर्णपणें माहीत असेल. आज आम्ही जितकीं स्थळें पाहिलीं, तितक्या सगळ्यांत आनंदमठ आणि त्याच्या जवळची विहीर पाहून मला फारच आश्चर्य वाटलें. तें स्थळ मोठें प्रेक्षणीय आहे खरें. या चतुरकानें त्या मठासंबंधानें जी दंतकथा सांगितली, तीही मोठी आश्चर्यकारक आहे.'

शेखर म्हणाला,–'मीं तो मठ आणि तेथील विहीर पुष्कळ वेळ पाहिली आहे, पण त्यासंबंधाची एकादी दंतकथा माझ्या ऐकण्यांत नाहीं.'

चतुरक म्हणाला,–'होय सरकार ! त्या मठांत शेंकडों वर्षांपूर्वीं एक विल-

क्षण गोष्ट घडून आली. ती घडून आल्यास जरी शेंकडों वर्षें लोटलीं आहेत, तरी लोकांस अजून तिचें स्मरण ताजें राहिलेलें आहे. पूर्वी मी आपल्या घरोघर येथें आलों होतों, त्यावेळीं वाड्यांतील एका सेवकासह मी तो मठ पहावयास गेलों होतों. तेथें गेल्यावर आम्ही तेथील विहीर पाहिली, आणि मठांतील एका पडक्या कमानीखालीं बसलों असतां माझ्या घरोघरच्या सेवकानें मला या मठासंबंधाची ती दंतकथा सांगितली. त्या मठापासून थोड्याच अंतरावर असलेल्या एका झोंपडींत राहणाऱ्या वृद्ध गृहस्थानें ती त्याला सांगितली होती.

त्या मठासंबंधाची हकीकत ऐकण्याची साहजिकपणें शेखराच्या अंतःकरणांत उत्कंठा उत्पन्न झाली, आणि त्यानें म्हटलें,–'तर मग ती दंतकथा मला तरी एकदां ऐकूं दे.'

चतुरक म्हणाला,–'ती दंतकथा जरी फार विलक्षण आहे, तरी ती सांगावयाला फार वेळ लागणार नाहीं. असें सांगतात कीं, पूर्वी त्या मठामध्यें कोणी एक महंत राहत असे. तो मोठा सत्पुरुष असून त्याची शिष्यशाखा फार मोठी होती. त्याच्या शिष्यांनीं तो सत्पुरुष समाधिस्थ झाल्यावर त्याच्या स्मरणासाठीं ती मोठी थोरली भव्य व सुंदर इमारत बांधिली, आणि तिच्यापाशीं एक मोठी थोरली विहीर खणली. या विहिरीचें पाणी मोटेनें वर काढून त्या पाण्यावर मोठी थोरली बागाईत करीत असत. त्या सत्पुरुषाचा एक शिष्य मठामध्यें राहून संप्रदाय चालवीत असे. भोंवतालच्या प्रदेशांतील पुष्कळ राजेरजवाडे या संप्रदायाच्या शिष्यपरंपरेमध्यें होते, आणि ते मठास मोठमोठ्या देणग्या देऊन तेथील खर्च चालवीत असत. एके दिवशीं या शिष्यमंडळींपैकीं गुहचंद्र नांवाचा एक मोठा जमीनदार घाबऱ्याघुबऱ्या मठाधिपतीपाशीं आला, आणि त्याच्या पायांशीं लोळण घेऊन त्याची करुणा भाकूं लागला. मठाधिपतीनें त्याचें वृत्त विचारतां त्यानें असें सांगितलें कीं,–'माझ्या हातून ब्रह्महत्येचें भयंकर पातक घडलें आहे, त्याला कांहीं तरी प्रायश्चित्त सांगा. मीं आपल्या सर्व जिनगीचा या मठाकडे विनियोग करण्याचें तर पूर्वीच ठरविलें आहे; आणि त्यासंबंधाचे कागदपत्र तयार करून ते आपल्या पायांपाशीं आणले आहेत. पण एवढें करून माझ्या मनाची तळमळ शांत होत नाहीं. आपण कृपा करून आणखी कांहीं तरी प्रायश्चित्त मला सांगा.' हें त्या जमीनदाराचें भाषण ऐकून घेतल्यावर मठाधिपति म्हणाला,–'गुहचंद्रा, ब्रह्महत्या हें मोठें भयंकर पातक आहे. शास्त्राज्ञेप्रमाणें या पातकाला देहांत प्रायश्चित्त सांगितलेलें आहे. परंतु तुला ज्या अर्थीं पश्चात्ताप झालेला दिसत आहे, त्या अर्थीं एवढ्या मोठ्या प्रायश्चित्ताची जरूर नाहीं, हें पातक तुझ्या हातून कसें घडलें, तें मला ऐकूं दे, म्हणजे मी विचार करून काय तें सांगेन.' हें महंताचें भाषण ऐकून गुहचंद्र म्हणाला,–'महाराज, योगा[redacted] नांवाचा एक मोठा जमीनदार येथून [redacted] दहा कोशांवरच्या एका गांवांत राहत असतो. या योगानंदाला रेणुका या नांवाची एक सुस्वरूप कन्या आहे. त्या कन्येचें आणि माझें परस्परांवर प्रेम जडलें, आणि मीं योगानंदापाशीं रेणुकेसाठीं मागणी घातली. योगानंदानें माझी मागणी कबूल केली. आणि पुढील महिन्यांतील लग्नाचा मुहूर्तही ठरला. पण तिकयांत सुचारु या नांवाचा एक लक्षाधीश सावकारपुत्र योगानंदाकडे आला, आणि त्यानें पुनः रेणुकेसाठीं मागणी घातली. योगानंद सुचारुच्या संपत्तीस भुलला; त्यानें माझ्याशीं केलेला ठराव मोडून आपली कन्या त्याला देण्याचें कबूल केलें, आणि लगेच कालचा मुहूर्त धरला. हें वर्तमान मला समजलें, तेव्हां मी योगानंदाला जाब विचारण्यासाठीं दहा बारा जवान घेऊन त्याच्या गांवीं गेलों. मीं अगदीं ऐनवेळीं तेथें जाऊन पोचलों,

मी तेथें गेलों त्यावेळीं लग्न विधी सुरू झालेला होता. मंडपामध्यें त्या गांवांतील शिष्ट मंडळी जमलेली होती. या सर्व लोकांसमक्ष योगानंदाची फजिती करावी, म्हणून मी हातीं नंगी तरवार घेऊन मंडपांत शिरलों, आणि मोठ्यानें गर्जना करून उपाध्यायास लग्नविधि थांबविण्याविषयीं दरडावून ताकीद दिली. त्यावेळचे माझे शब्द कानीं पडतांच नवरदेव सुबाहूस मोठा क्रोध चढला, आणि आपली तरवार उपसून तो मजवर चालून आला. मीही त्यावेळीं क्रोधानें खवळून गेलों होतों. आपला प्रतिपक्षी आपणावर चाल करून आला हें पाहतांच मी मोठ्या कौशल्यानें आणि चपळाईनें त्याजवर वार करून त्याचें शीर धडापासून मोकळें केलें! हें माझें कृत्य पाहतांच वरपक्षाकडील मंडळी आपापलीं हत्यारें सज्ज करून मजवर चालून आली. हा रक्तपात थांबवावा, म्हणून हो हो करीत उपाध्याय मध्यें शिरला, परंतु क्रोधानें माझी दृष्टि अंध झाली असल्यामुळें, मी त्या आवेशांत त्या उपाध्यायाचेंही शिरच्छेद केला! त्याबरोबर 'ब्रह्महत्या पुन ब्रह्महत्या!' असा एकच ध्वनि चहूंकडून उठला, आणि मी शुद्धीवर आलों. इतक्यांत योगानंदही झाल्या प्रकाराबद्दल खेद प्रदर्शित करीत पुढें आला. हा भयंकर प्रकार दृष्टीस पडतांच करवल्यांनीं वधूला प्रथमच घरांत नेलें होतें. मीं सर्व लोकांसमक्ष योगानंदाला त्याच्या कृत्याबद्दल जाब विचारला. त्यावेळीं रेणुका अजून कबूल असेल, तर तिच्याशीं माझा विवाह करण्याचें त्यानें सर्वांसमक्ष कबूल केलें. रेणुकेला तिचें मत विचारण्यासाठीं योगानंदानें एक दासी तिजकडे पाठविली. ती दासी परत आली, आणि रेणुका माझ्याशीं विवाह करण्यास कबूल नाहीं, असें सर्वांसमक्ष तिनें मला सांगितलें. अर्थात् झालेल्या सर्व प्रकारचा दोष माझ्या शिरावर पडला, आणि माझा प्राण घेण्यासाठीं सर्व लोकांनीं आपलीं शस्त्रें सज्ज केलीं. यापुढें आत्मरक्षणासाठीं जरी आपण एकाद्याचा प्राण घेतला, तरी ती हत्या आपल्या मस्तकीं बसेल, असें मनांत येऊन मीं आपल्या तरवारीस म्यान केलें, आणि [illegible] आपला प्राण बचावून मंडपांतून [illegible] नंतर आपल्या गांवीं जाऊन [illegible] व्यवस्था करून कागदपत्र तय[illegible] आणि ते आपल्या चरणीं सादर [illegible] साठीं येथें आणले आहेत. मीं एका ब्राह्मणाची सुद्धां तफावत न करितां झालेली सर्व हकीकत आपल्या चरणीं निवेदन केली आहे. माझ्या हातून ब्रह्महत्या घडली आहे; मी अघोर पातकी आहें. या पातकापासून आपण माझा उद्धार करावा'. गुहचंद्रानें सांगितलेल्या सर्व हकीगतीचा थोडा वेळ विचार करून महंत म्हणाला,–'गुहचंद्रा, तुझ्या हातून जो अपराध घडला आहे तो जरी भयंकर आहे, तरी तुझें मन भकून जाण्यास जें कारण झालें, तेंही मोठेंच होतें, यांत शंका नाहीं. ज्याअर्थीं तूं आपली सर्व मालमत्ता या मठाला अर्पण केली आहेस, त्या अर्थीं तुझ्या मार्गें कोणताच पाश उरलेला नाहीं. यासाठीं तूं संन्यास घेऊन आजन्म सर्वसंगपरित्याग करण्याची शपथ घे. त्याचप्रमाणें ज्या स्त्रीमुळें इतका अनर्थ झाला, त्या स्त्रीचें पुनः दर्शन झाल्यास तुझी मति पालटेल, यासाठीं तूं कोठें तरी तीर्थयात्रेसाठीं निघून जा. असें केल्यासेरीज तूं या पापांतून मुक्त होणार नाहींस. तुझ्यासारख्या अघोर पातक्यानें दिलेल्या देणगीचा स्वीकार करण्यापूर्वी, तूं–'मीं सांगितलेलें प्रायश्चित्त घेईन' अशी स्वामिमहाराजांच्या साक्षीनें शपथ घेतली पाहिजे. अशी शपथ घेशील तरच आम्ही या तुझ्या देणगीचा स्वीकार करूं! हें त्या महंताचें भाषण ऐकून घेऊन त्याचा क्षणभर विचार करून झाल्यावर गुहचंद्र म्हणाला;–'रेणुकेवांचून मला आतां संसार कशाला पाहिजे! तिच्या-

वांचून मला जगांतील विषय गोड कसे वाटतील ? अर्थात् संन्यास घेण्याची माझी तयारी आहे. मी गुरुमहाराजांच्या पायांची [illegible] घेऊन सांगतों, कीं मी यापुढें सर्व [illegible] करून संन्यास घेईन, आणि [illegible] यात्रा आणि देवधर्म यांच्या [illegible] देह झिजवीन. या प्रतिज्ञे- [illegible] माझ्या हातून वर्तन घडलें नाहीं, [illegible] नरक मला प्राप्त होवो ! ' गुहचंद्रानें [illegible] शपथ घेतल्यानंतर महंतानें त्याच्या दीक्षेचा स्वीकार केला, आणि त्याला संन्यासाची तयारी करण्याची आज्ञा केली. इतका प्रकार घडून येत आहे, तोंच एक स्त्री धांवत धांवत मठाच्या दरवाज्यापाशीं येऊन पोंचली. स्त्रियांना मठामध्यें जाण्याची बंदी असल्यामुळें तिला दरवाज्यांतच उभें राहाणें भाग पडलें. महंताच्या शिष्यांनीं तिच्या- संबंधानें चौकशी केली, त्यावरून ही स्त्री योगानंदाची कन्या रेणुका आहे, असें त्यांस समजलें. तिच्या विवाहाच्या वेळीं जो भयंकर प्रसंग घडून आला होता, तो गुहचंद्राच्या मुखानें या शिष्यांस समजला असल्यामुळें ते तिच्याकडे तुच्छतेनें पाहूं लागले कारण त्या सर्व अनर्थाचें मूळ हीच आहे, असें त्यांच्या मनांत आलें होतें. तिनें आपलें वर्तमान सांगितल्यावर गुहचंद्राची चौकशी केली; त्यावेळीं तो मठांत आहे, असें तिला कळलें, आणि तिला फार आनंद झाला; परंतु तिचा आनंद फार वेळ टिकला नाहीं. गुहचंद्रानें संन्यास घेण्याची शपथ घेतल्याचें वर्तमान तिला कळलें, आणि तिनें दुःखावेगानें किंकाळी फोडली. ती किंकाळी कानीं पडतांच गुहचंद्र बाहेर आला. त्याची तिची दृष्टादृष्ट होतांच ती नटकन् उठून उभी राहिली. गुहचंद्रानें तिला इकडे येण्याचें कारण विचारलें ! त्या वेळीं ती म्हणाली,--' तो भयंकर प्रसंग ओढवल्यानंतर सर्व वऱ्हाडी आपापल्या स्थळीं गेले. त्यानंतर बऱ्याच वेळानें मला मंडपांतील हकीकत समजली, आणि माझ्या मातेनें मधल्यामध्यें निरोप जिरवून मी आपल्याबरोबर लग्न करण्यास कबूल नाहीं, असें खोटेंच आपणांस कळविलें. त्या- वेळीं कांहींच न बोलतां मी स्वस्थ राहिलें, आणि काल रात्रीं जिकडे तिकडे सामसूम झाल्यानंतर मी घरांतून बाहेर पडलें. घरां- तून निघाल्यावर मी तशीच रातोरात आपल्या गांवीं गेलें, आणि तेथें आपली चौकशी केली. त्यावेळीं आपण आपल्या सर्व जिन- गीची व्यवस्था करून या मठामध्यें आला असें मला समजलें. म्हणून मी त्याच पावलीं इकडे यावयास निघालें. माझ्या पित्यानें माझ्या शोधासाठीं पाठविलेल्या माणसांच्या नजरेस न पडतां मी लपत छपत एकदांची येथपर्यंत येऊन पोंचलें. प्रियकरा, आपण खरोखरच का संन्यास घेणार ! मीं तर घरां- दाराचा त्याग केलाच आहे, आपण जर माझा स्वीकार केला नाहीं, तर मला या जगांत राहून काय करावयाचें आहे ? आपल्या हातून ब्रह्महत्या घडली आहे, आणि जगाच्या दृष्टीनें आपण पातकी आहां, हें जरी खरें आहे, तरी मी मात्र आपणांस तसें समजत नाहीं. माझ्या माता-पितरांनीं जर लोभास वश होऊन आपला विश्वासघात केला नसता, तर आपल्याहातून असें लोक- दृष्टीनें अनुचित कर्म कधींही झालें नसतें, अशी माझ्या मनाची पूर्ण खात्री आहे. तर सांगा, आपण माझा स्वीकार करणार ना ? आपण आपली सर्व संपत्ति या मठास अर्पण केली असली म्हणून काय झालें ? आपणांस पुनः आपला संसार थाटतां येणार नाहीं काय ? बरें, संसारावरून आपलें मन उडालें असेल, तरी देखील माझ्याशीं विवाह करा- वयास आपणांस काय हरकत आहे ? ज्या- प्रमाणें मोठे मोठे ऋषि आपापल्या धर्मपत्नी- सह अरण्यामध्यें कंदमुळें भक्षण करून तप- श्चर्या करीत, त्याप्रमाणें आपण कोठें तरी पर्णकुटी बांधून राहूं !' अशा प्रकारें रेणुकेनें

पुष्कळ गोष्टी सांगून त्यांचें मन वळविण्याचा प्रयत्न केला, पण तो सगळा व्यर्थ गेला. आपला प्रियकर आपलें ऐकत नाहीं, हें दृष्टीस पडतांच निराश होऊन रेणुका एकदम विहिरीकडे धांवली, आणि तिच्या मागून गुहचंद्र पळत चालला. मठांतील शिष्यमंडळी त्यांना अडविण्यासाठीं त्यांच्या मागें पळूं लागली. पण रेणुकेनें सर्वांपुढें विहिरीशीं जाऊन भयंकर किंकाळी फोडून आंत उडी घेतली, आणि तिच्या मागून गुहचंद्रानेंही तशीच किंकाळी फोडून तिचें अनुकरण केलें. विहीर अतिशय खोल असून तिच्यामध्यें पाणी देखील पुष्कळ होतें, त्यामुळें त्यांचा बचाव करणें अशक्य झालें. अशा रीतीनें त्या दोघांचा अचानक अंत झाला. तीं दोघें पिशाचयोनीमध्यें गेलीं असून रोज बरोबर मध्यरात्रीं त्या विहिरींतून बाहेर पडतात आणि मठामध्यें शिरून पुनः धांवत विहिरीपाशीं येतात. तेथें आल्यावर तीं दोघें मोठ्यानें किंकाळ्या फोडून आंत उडया घेतात. शेकडों वर्षांपूर्वी ही गोष्ट घडली, असें म्हणतात; पण अजून हा प्रकार रोजच्यारोज घडून येत असतो. मठाची अशी नासधूस होण्याचें हेंच कारण. मठांत राहणाऱ्यांना रोज असा भयंकर प्रकार दिसूं लागल्यामुळें, त्यांनीं लवकरच मठ सोडला, आणि तेव्हांपासून दुसरें कोणी तेथें वस्ती करीनासें झालें. माणसांची वस्ती नसल्यामुळें दागदुजी बंद झाली, आणि इमारतीचा एकेक भाग ढांसळत चालला. त्याचप्रमाणें विहिरीची काळजी घेण्यास कोणीच धजत नसल्यामुळें, बाहेरची माती आंत पडून विहिर आतां अर्धी अधिक बुजाली आहे.' अशा प्रकारची दंतकथा सांगून झाल्यावर चतुरक म्हणाला,–'अजून सुद्धां जर कोणी मध्यरात्रीं तेथें राहील, तर हा चमत्कार त्याच्या दृष्टीस पडेल, असें म्हणतात.'

शेखरानें विचारलें,–'अलीकडे हा प्रकार कोणीं प्रत्यक्ष पाहिला आहे काय?'

ओळखलें, आणि

दुर्मुख म्हणाला,–'आम्ही ही गोष्टी बरळूं गोष्टी बोलत असतां मेंढ्या चारीतचा कचाटींत एक धनगर आम्हांस भेटला. त्यानेंहीं लांबून हा प्रकार तेथें दृष्टीस पडतो, असें सांगितला बेश-

शेखरानें पुनः प्रश्न केला,–'त्या धनगर त्या स्वतः हा चमत्कार पाहिला आहे काय?' ाठ-

दुर्मुख म्हणाला,–'आपण सध्या आम्हांस च जसा हा प्रश्न विचारतां तसाच आम्हीं मघांशीं त्या धनगरास हाच प्रश्न केला; तेव्हां तो म्हणाला,–'मी स्वतः कांहीं हा प्रकार पाहिलेला नाहीं. कारण असल्या भयंकर भुताटकीच्या जागीं ऐन मध्यरात्रीं येण्याची आपणांस छातीच होत नाहीं. परंतु माझ्या ओळखीच्या कित्येक माणसांनीं रात्रीं मुद्दाम येथें येऊन हा चमत्कार पाहिला आहे.'

याच विषयासंबंधानें त्यांचें आणखी बरेंच भाषण झालें. नंतर ते वृषपतीच्या वाड्यांत जाऊन पोंचले. विशेष प्रकारें सांगण्यासारखी एकादी गोष्ट घडून आल्याखेरीज तो दिवस निघून गेला, आणि नित्याप्रमाणें रात्रीचीं भोजनें आटोपल्यावर शेखर आपल्या शयनमंदिरांत जाऊन शय्येवर पडला.

या वेळीं सुद्धां त्याची कालच्या सारखीच अवस्था झाली होती. तो अंथरुणावर जाऊन पडला खरा, पण त्याला लागलीच झोंप लागली नाहीं. गेल्या दोन दिवसांत झालेल्या गोष्टींचें त्याला स्मरण होऊं लागलें. आपणांस तीन वेळ भेटलेल्या अनोळखी स्त्रीचें आचरण त्याच्या डोळ्यांसमोर दिसूं लागलें, आणि तो त्याबद्दल विचार करूं लागला. त्या स्त्रीनें आपल्याशीं इतका लघळपणा कां करावा, याचा त्याला उलगडा करतां येईना. पहिल्या भेटीच्या वेळीं तिचें त्याचें भाषणही झालें नव्हतें. त्यानंतर तिनें त्याला रस्त्यांत गांठून त्याच्याशीं जो लघळपणा केला, त्या वेळीं सुद्धां आपण तिच्या तशा प्रकारच्या आचरणास उत्तेजन दिलेलें नाहीं, हें तो जाणून होता; तरी त्यानें त्या प्रसंगाचें पुनः स्मरण करून त्यावेळीं आपण

वांचून मला [illegible]लों, आणि तिच्याशीं कोणत्या वाटतील ! [illegible]गलों याचा त्यानें सावकाशपणें [illegible]ी [illegible] करून पाहिला. तरी आपल्याकडून [illegible] उत्तेजन मिळालें असें आपलें कोणतेंच [illegible]त्य त्याला आठवेना. शेवटीं एक निर्लज्ज पण उंच कुलांतील तरुणी आपणांस मोह घालण्यास तयार झाली आहे, तिच्यापासून आपण सावध राहिलें पाहिजे, असें आपल्या मनांत ठरवून त्यानें दुसऱ्या विचारांकडे आपलें मन वळविलें. गेल्या रात्रीं झालेल्या दुसऱ्या एका गोष्टीचें त्याला स्मरण झालें. आपण काल येथें निजलों असतां आपल्या खोलीचा दरवाजा उघडून कोणीतरी आंत आलें असावें असें आपणास काळ वाटलें होतें; तसें आज वाटूं नये, म्हणून दरवाजा नीट बंद करून द्यावा असें एकदां त्याच्या मनांत आलें. पण आपण नेहमीं दरवाजा बंद करीत नसतां आजच दरवाजा लावून निजावें हें भ्याडपणाचें कृत्य आहे, असा वृथा अभिमान त्याच्या अंतःकरणांत उत्पन्न झाला, आणि त्यानें दरवाजा बंद करण्याचा बेत रहित केला. अशा प्रकारच्या विचारांत कांहीं वेळ गेल्यावर त्याला गाढ झोंप लागली. या रात्रीं त्याला पूर्वीच्या रात्रींसारखीं भयंकर स्वप्नें पडलीं नाहींत.

दुसऱ्या दिवशीं चांगलें दिसूं लागल्यावर तो जागा झाला आणि चूळ भरून टाकण्यासाठीं पाणी ध्यावें म्हणून तो ज्या चौरंगावर पाण्याचा तांब्या भरून ठेवलेला होता, त्या चौरंगाजवळ गेला. त्या चौरंगावर पाण्याच्या तांब्याशेजारीं, एक स्त्रियांनीं हातांत घालावयाची अंगठी आणि तिच्या खालीं एक पत्र असे रात्रीं तेथें नसलेले दोन पदार्थ त्याच्या नजरेस पडले. हे दोन जिन्नस पाहिल्याबरोबर त्याला आपल्या मागें लागलेल्या निर्लज्ज स्त्रीचें एकदम स्मरण झालें त्यानें तें पत्र न वाचतां फाडून टाकावें आणि आंगठी फेंकून द्यावी, असा विचार करून तें पत्र हातीं घेतलें, पण तितक्यांत त्याचें मन फिरलें हें पत्र वाचून पाहिल्यास त्या अनोळखी स्त्रीचा आपणांस कदाचित् पत्ता लागेल, असें मनांत येऊन त्यानें तें पत्र वाचलें. त्या पत्रांत पुढील मजकूर होता.

' प्रियकरा, आपली माझी आतांपर्यंत तीन वेळां भेट झाली, हें माझें मोठें भाग्यच उदयास आलें, असें मी समजतें. माझ्यावर आपण जे उपकार केले आहेत, ते मी कधींही विसरणार नाहीं. मीं अशा रीतीनें आपणांस पत्र पाठविणें हें कदाचित् आपणांस योग्य वाटणार नाहीं, पण मी तरी काय करूं ? राजकुमारा, शेखरा, तुझ्यासाठीं माझा जीव कसा तिळतिळ तुटत आहे, हें मीं पत्रीं कसें लिहूं ? माझ्या प्रेमाची खूण म्हणून मी यासोबत जी लहानशी वस्तु पाठविली आहे, ती पुढील भेटीचे वेळीं आपल्या अंगावर पाहून मला किती समाधान होईल, याची आपणास सुद्धां कल्पना येईल. मी आपल्या प्रेमानें इतकी अंध झालें आहें, म्हणून आपण मला तुच्छ लेखूं नये, अशी माझी आपल्या चरणांपाशीं नम्रपणानें विनंति आहे.'

त्या पत्रामध्यें इतकाच मजकूर होता. म्हणून ज्या आशेनें शेखरानें तें पत्र वाचून पाहिलें, ती आशा तर पूर्ण झाली नाहींच; पण त्या स्त्रीच्या धाष्टर्याचा आणखी एक मासला मात्र त्याच्या नजरेस पडला. हें पत्र वाचून त्याला त्या स्त्रीचा अत्यंत तिरस्कार आला आणि रागाच्या भरांत तो पुनः तें पत्र फाडण्यास प्रवृत्त झाला; पण तितक्यांत आणखी एक विचार त्याच्या मनांत उद्भवला, आणि त्यानें तें पत्र फाडलें नाहीं.

तो आपल्याशीं म्हणाला,–' ज्याअर्थी त्या निर्लज्ज स्त्रीनें मला पत्र पाठवून आपल्या नीच स्वभावाचें प्रदर्शन केलें आहे, त्या अर्थी आतां क्षमा दया न करतां तिची चांगली खोडच जिरविली पाहिजे. माझ्याशीं पुनः लघळपणा करण्याचा तिचा विचार दिसतो ह्या गोष्टीकडे आतां कानाडोळा करून उपयोग नाहीं. ही बेशरम घायकी चार चौघांत माझा

वेअब्रू करील. त्यापेक्षां प्रथमतः आपणच तिचा बंदोबस्त करावा, हें उत्तम।'

अशा प्रकारचे विचार त्याच्या मनांत घोळत आहेत, तोंच त्याचा अंतिम सेवक चतुरक त्याजपाशीं आला. त्याला शेखरानें दुर्मुखाला ताबडतोब आपल्यापाशीं पाठवून देण्याची आज्ञा केली. या आज्ञेप्रमाणें अगदीं थोड्या वेळांत दुर्मुख शेखरापाशीं येऊन नम्रपणानें उभा राहिला.

शेखरानें त्याला दरवाजा बंद करण्याची खूण केली. त्याप्रमाणें दुर्मुखानें केल्यावर शेखर त्यास म्हणाला,–'अहो कारभारी, आपण वयानें पोक्त आणि फार हुशार आहां; सध्यां माझ्यावर जो प्रसंग गुजरला आहे, त्यांतून निभावून जाण्यास मला आपल्यासारख्या शहाण्या माणसाची फार जरूर आहे. परवांचे दिवशीं आजोबांच्या (वृषपतीच्या) वांटणीचे खंडणीचे रुपये त्यांच्या मुनीमाकडे भरून परत येत असतां वाटेंत एका स्त्रीनें मला गांठलें, आणि ती माझ्याशीं भर रस्त्यांत प्रेमाच्या गोष्टी बोलूं लागली, हें तुम्हीं पाहिलेंच आहे. मला खोटें बोलतां येत नाही, हें तुम्हाला माहीत आहे; म्हणून स्पष्ट सांगतों, ज्या स्त्रीशीं माझी कधीं साऱ्या जन्मांत सुद्धां ओळख नाहीं, तिनें माझ्याशीं इतका लघळपणा करावा याचें मला फार आश्चर्य वाटलें, आणि रागही आला; पण मीं त्यावेळीं भर रस्त्यांत असल्यामुळें आपलें मन आवरलें. हें एक झालें; दुसरें काल सकाळीं मी फिरावयास गेलों असतां जो अपघात झाला, असें तुम्हांस सांगितलें, त्या अपघातांत तीच स्त्री सांपडली होती. त्यावेळीं त्यांच्यावर भयंकर संकट ओढवलें असल्यामुळें त्यावेळीं माझ्याखेरीज जरी दुसरें कोणी माणूस तेथें असतें, तरी तें त्यांच्या साह्यार्थ धांवून गेलें असतें. त्या स्त्रियांवर संकट आलें, म्हणून मी त्यांच्यापाशीं गेलों. ती स्त्री मूर्छित झालेली असल्यामुळें मीं तिला सावध करण्याची खटपट केली. ती सावध होतांच तिनें मला एकदम ओळखलें, आणि ती पुनः परवांप्रमाणें प्रेमाच्या गोष्टी बरळूं लागली. त्यावेळीं मी कसा तिच्या कचाटींत सांपडलों होतों, हें तुम्ही दोघांनीं लांबून पाहिलेंच आहे. त्या निर्लज्ज स्त्रीच्या बेशरमपणाचा हा तिसरा मासला पहा. त्या नीच स्त्रीनें मला हें पत्र व ही अंगठी पाठविली आहे!' असें म्हणून शेखरानें पत्र व अंगठी दुर्मुखापुढें टाकली.

दुर्मुखानें तें पत्र वाचून पाहिलें; आणि अत्यंत आश्चर्ययुक्त मुद्रेनें तो म्हणाला,–'असें हें पत्र तिनें आपणांस पाठविलें? खरोखर त्या स्त्रीच्या निर्लज्जपणाची कमालच झाली असें म्हणणें भाग आहे! अशी ही बेशरम स्त्री आहे तरी कोण? अशा प्रकारच्या बेशरम स्त्रिया जगांत असतील, असें माझ्या स्वप्नांत देखील आलें नव्हतें. महाराज, मी असें बोलतों म्हणून आपणांस राग तर नाहीं ना आला?'

शेखर म्हणाला,–'मला राग? तो का यावा? तुम्ही भले मनुष्य आहां, अर्थात् अशा प्रकारच्या पत्रानें तुमच्या मुखानें अशा प्रकारचे शब्द बाहेर पडले हें अगदीं साहजिक झालें. ती स्त्री या पत्रांत प्रेमासंबंधानें जें कांहीं लिहिते, तें सर्व एकतर्फी आहे; तिच्या प्रेमाला मजकडून उत्तेजन, मिळालेलें नाहीं, अशी माझी पूर्ण खात्री आहे.

दुर्मुख म्हणाला,–'महाराज, आपल्या हातून अयोग्य वर्तन कधींही व्हावयाचें नाहीं, ही माझ्या मनाची पूर्ण खात्री आहे. त्यासाठीं आपण अशा तऱ्हेचे उद्गार काढण्याची अगदीं जरूर नाहीं. आतां फक्त यासंबंधानें मी आपली कोणती सेवा करावयाची एवढी आज्ञा करावी.'

शेखर म्हणाला,–'मी हुंडीची रक्कम वसूल करण्यासाठीं सागरदत्त शेटीच्या घरीं गेलो असतां प्रथम ती स्त्री माझ्या दृष्टीस पडली, त्यावेळीं तिचें नांवगांव मला समजलें नाहीं; कारण मला परकी स्त्रीसंबंधानें

अधिक चौकशी करण्याचें कारणच नव्हतें. यापुढें सागरदत्ताच्या घरांत पाऊल ठेवण्याची मला मोठी भीति वाटते. न जाणो त्या स्त्रीचें तेथें येणें-जाणें असल्यामुळें तिची तेथें गांठ पडावयाची! तुम्ही पोक्त, हुषार आणि अनुभवी पुरुष आहां, यासाठीं जें काय करावयाचें तें मी तुमच्यावरच सोंपवितों. तुम्ही चतुरकाला बरोबर घेऊन आतांच्या आतां सागरदत्ताकडे जा. सागरदत्त भला मनुष्य आहे, अशी माझ्या मनाची खात्री आहे. त्या अज्ञान स्त्रीनें माझ्याशीं केलेलें हें गैरशिस्त वर्तन

त्याच्या कानीं गेल्यास तो तिला आपल्या कन्येच्या सहवासाला राहूं देणार नाहीं, यांत संशय नाहीं. तेथें गेल्यावर सागरदत्ताची एकांतीं भेट घेऊन त्या स्त्रीनें माझ्याशीं केलेलें सर्व वर्तन त्याच्या कानांवर घाला. हें पत्र आणि ही आंगठी त्याच्या स्वाधीन करा, आणि हीं दोन्ही त्या स्त्रीकडे परत करावयास सांगा. किंवा त्या स्त्रीचें नांव, गांव आणि पत्ता हीं विचारून तुम्हींच त्या स्त्रीची भेट घेऊन हीं तिचीं तिला परत द्या, जर ह्या वस्तु तिला परत देण्याची तुम्हालाच संधि मिळाली, तर हें काम करतांना त्यामध्यें कांहीं गौप्य ठेवूं नका. तिच्या आप्तइष्टांदेखत तिची चांगली फजिती करून टाका. म्हणजे ते यापुढें तिच्या वर्तनावर चांगली नजर ठेवितील. मीं काय सांगितलें हें तुमच्या ध्यानीं आलें ना?'

दुर्मुख बोलला,–'होय; तेथें गेल्यावर काय करावयाचें तें पूर्णपणें माझ्या ध्यानीं आहे. मी आतांच्या आतांच तिकडे जाऊन ही कामगिरी बजावून येतों.'

असें बोलून दुर्मुखानें अंगठी आणि पत्र हीं आपल्या हातीं, घेतलीं व तो शेखराच्या शयनमंदिरांतून बाहेर पडला.

शेखरानेंही आपलीं नित्य कृत्यें आटोपिलीं आणि तो त्या वाड्यांतील मुख्य दिवाणखान्यांत जाऊन बसला. तेथें बसल्यावर त्यानें आपल्या एकंदर वर्तनाचा सावकाशपणें विचार केला. परंतु त्या स्त्रीनें अशा प्रकारचें वर्तन आपल्याशीं करावें, असें आपल्याकडून कांहीं दुराचरण घडलेलें त्याला आठवेना. अशा स्थितींत सुमारें चार घटका गेल्यावर दुर्मुख परत आला, आणि त्यानें आपण केलेल्या कामगिरीची हकीकत शेखराच्या कानीं घातली.

दुर्मुख म्हणाला,–'आपल्या आज्ञेप्रमाणें मी चतुरकाला बरोबर घेऊन सागरदत्ताच्या घरीं गेलों. परंतु चतुरकासारख्या तरण्याबांडादेखत अशा प्रकारच्या प्रकरणाचा ऊहापोह करणें योग्य नसल्यामुळें, मीं त्याला बाहेर बसवून सागरदत्ताची भेट घेतली.'

शेखर म्हणाला,–'आपलें हें करणें दूरदृष्टीचेंच होतें. बरें, पुढें काय झालें?'

दुर्मुखानें सांगितलें,–'मीं सागरदत्ताची भेट घेऊन आपण सांगितलेली सर्व हकीकत त्यांच्या कानावर घातली. माझें भाषण ऐकून त्यांना मोठें आश्चर्य वाटलें, आणि असल्या दुर्वर्तनी स्त्रीचा समागम आपल्या मुलीस घडत असतो, म्हणून त्यांस खेदही झाला. प्रथमतः माझें भाषण त्यांना खरें वाटेना; परंतु मीं तीं अंगठी आणि पत्र हीं जेव्हां त्यांना दाखविलीं, तेव्हां त्यांच्या मनाची खात्री पटली. पत्र आणि अंगठी त्या स्त्रीला परत देण्याविषयीं मीं जेव्हां त्यांची विनंति केली, तेव्हां त्या वस्तु पाहून तुम्हांस किंतीं वाईट वाटलें, हेंही मी त्यांस स्पष्टपणें सांगितलें. ही कामगिरी करण्यास प्रथमतः सागरदत्तशेटींस मोठें अवघड पडलें. कारण त्या वस्तु परत करतांना 'तूं पुनः आमच्या वाड्यांत पाऊल ठेवूं नको,' असें तिला कळविणें त्यांच्या जिवावर आलें होतें. थोडा वेळ विचार करून त्यांनीं माझी विनंति मान्य केली, आणि या वस्तु परत करतांना तिच्या मनांत जर अजून थोडी तरी लाजलज्जा शिल्लक असली, तर तिच्या डोळ्यांत

खरमरीत अंजन पालण्याचं त्यांनीं बोलून दाखविलें. '

शेखरानें विचारलें,–' तर मग तुम्हांला त्या स्त्रीचें नांवगांव समजलें नसेलच ? '

दुर्मुख म्हणाला,–' ज्याअर्थीं त्या स्त्रीचें नांव आपणांस माहीत नाहीं, त्याअर्थीं तें आपणांस पुढेंही न कळणें बरें, असें सागरदत्त शेटींनीं बोलून दाखविलें. ती स्त्री मोठ्या कुलांत जन्मली असल्यामुळें त्या कुलाच्या अब्रूसाठीं तिचें नांवगांव गुप्त राखणें हें त्यांस इष्ट वाटलें, हें साहजिक आहे; व म्हणून मीं तें सांगण्याविषयीं त्यांस आग्रह केला नाहीं आणि तिचें नांवगांव समजून घेण्याविषयीं आपणांस उत्कंठा असेल, असें मलाही वाटलें नाहीं. मला वाटतें, जर आपण स्वतां सागरदत्ता-कडे गेलां असतां, तर त्यांनीं त्या स्त्रीचें नांव-गांव आपल्यापासून गुप्त ठेविलें नसतें. सागरदत्तांनीं माझ्यासारख्या नोकरावर असल्या नाजूक प्रकरणीं पूर्ण विश्वास ठेवूं नये, यांत मला कांहीं आश्चर्य वाटत नाहीं. '

शेखर म्हणाला,–' तुमचा स्वभाव कसा आहे, हें सागरदत्तांना समजणें शक्य नसल्या-मुळें त्यांनीं तुमच्यावर विश्वास ठेवला नसेल कदाचित्, परंतु तुमच्या विश्वासुपणाबद्दल आमची पक्की खात्री आहे. असो; हें काम तुम्ही मोठ्या दक्षतेनें पार पाडलें, याचा मला संतोष होत आहे. परंतु अहो कारभारी, मला या बाबतींत आणखी थोडी चौकशी करणें जरूर आहे. हें पत्र आणि आंगठी हीं माझ्या शयनागारांत कोणीं आणून ठेविलीं, हें मला समजणें फार अगत्याचें आहे. '

थोडा वेळ विचार करून दुर्मुखानं विचा रलें,–' आपण रात्रीं दरवाजा बंद करून निजलां होतां, कीं तो उघडा होता ? '

शेखरानें सांगितलें,–' मी आजपर्यंत दर-वाजा उघडा ठेवून झोंपत होतों, पण आतां यापुढें मला निजतांना तो बंद करणें भाग आहे. परवां रात्रीं मी शय्येवर तळमळत पडलों असतां, तेथें कोणाचीं तरी पावलें वाजल्याचा मला भास झाला. इतकेंच नव्हे, तर तेथें मला अस्पष्ट अशी मानवी आकृति फिरत असावी असें वाटलें. पण तो नुसता भास असावा, अशा कल्पनेनें मी तिकडे फारसें लक्ष्य दिलें नव्हतें. पत्र व अंगठी हीं कोणीं तरी माझ्या शयनमंदिरांत आणून ठेविल्याखेरीज तेथें आलेलीं नाहींत; अर्थात् परवांच्या रात्रीसुद्धां तेथें कोणीतरी आलें असावें, असें माझ्या मनांत येऊं लागलें आहे. आतां मात्र तो भास होता, असें माझ्यानें म्हणवत नाहीं. रात्रीच्या वेळीं माझ्या शयन-मंदिरांत कोण येत असावें आणि परवां तें कां आलें असावें, याची चौकशी करणें जरूर आहे. '

अत्यंत आश्चर्ययुक्त आणि विचारमग्न मुद्रेनें दुर्मुखानें विचारलें,–' तेथें परवां रात्रीं जें कोणी आलें असेल, याची आपणांस कांहींच का कल्पना करतां येत नाहीं ! '

शेखरानें उत्तर केलें,–' त्यासंबंधानें माझा कांहींच तर्क चालत नाहीं. मात्र पत्र व अंगठी यांसंबंधानें माझा असा तर्क वाहतो कीं, त्या दुर्वर्तनी स्त्रीनें या वाड्यांतील एकाद्या नोकरास लांच देऊन त्याच्याकडून हें काम करविलें असावें. तुमचा या वाड्यां-तील बहुतेक नोकरांशीं संबंध येतो, तेव्हां तुम्हीं मोठ्या धूर्तपणानें चौकशी कराल, तर कदाचित् त्या लांचखाऊचा पत्ता लागण्याचा संभव आहे. '

दुर्मुख म्हणाला,–' खरें म्हणाल, तर मला माणसाची पारख मुळींच करतां येत नाहीं. एकाद्या माणसाशीं माझी जेव्हां पुष्कळच घसण पडेल, तेव्हां तो कसा असावा, हें थोडें माझ्या लक्ष्यांत येतें, आपल्या चतुर-काच्या हातून अशी गोष्ट होणार नाहीं, ही माझी खात्री आहे. '

शेखर म्हणाला,–' त्याच्याविषयीं, आणि त्याचप्रमाणें तुमच्याविषयीं माझ्या मनांत अगदीं संशय यावयाचा नाहीं. '

पूर्वीप्रमाणेंच विचारयुक्त मुद्रेनें दुर्मुख म्हणाला,–' एकंदरींत ही मोठी विचार करण्यासारखी गोष्ट आहे खरी! गेल्या रात्रीं आपल्या शयनागारांत कोणी तरी आलें होतें, यांत तर शंकाच नाहीं; पण परवां जें कोणी आलें असेल तें कां आलें असावें ? थोडा वेळ थांबून नंतर त्यानें एकदम विचारलें,–' महाराज, परवां आपण आणलेली रक्कम जागच्याजागीं सुरक्षितपणें आहे, अशी आपली खात्री आहेना ? '

शेखर एकदम पुढें होऊन बोलला,–' ही गोष्ट मात्र अजून माझ्या मनांत आली नव्हती ! '

दुर्मुख म्हणाला,–' आपल्या हातीं मोठी थोरली रक्कम आलेली आहे, हें या वाड्यांतील झाडून साऱ्या नोकरांस माहीत आहे. परवां आपण शेटजींकडून रक्कम घेऊन आलां, तेव्हां त्या थैल्या येथील कित्येक नोकरांनींच आपल्या शयनगृहांत नेऊन पोंचविल्या होत्या. फार तर काय, आपण निवेजण ही रक्कम वसूल करण्यासाठींच येथें आलों आहों, हेंही येथील प्रत्येक नोकराला माहीत आहे. '

शेखर म्हणाला,–' चला तर मग. आपण एकदां यासंबंधानें आपली खात्री करून घेऊं या. '

हें त्यांचें भाषण तळमजल्यावरील एका प्रशस्त दिवाणखान्यांत चाललें होतें. शेखराचें शयनस्थल दुसऱ्या मजल्यावर होतें, म्हणून ते दोघेजण माडीवर गेले. नंतर शेखरानें आपल्या कमरबंदांतून किल्ली हातीं घेतली, आणि तेथील फडताळाचें कुलूप काढलें. जेथें त्यानें थैल्या ठेविल्या होत्या, त्या जाग्यावर नजर टाकतांच तो एकदम ओरडून म्हणाला,–' हें काय ? थैल्या नाहींत ! '

दुर्मुखही आश्चर्यानें फडताळाकडे नजर टाकीत म्हणाला,–' तर मग परवां येथें कोणी आलें असें आपणास वाटलें, तो कांहीं भास नव्हे ! '

शेखर गंभीर मुद्रेनें म्हणाला,–' ही चोरी मोठी आश्चर्यानें झाली खरी ! ही चोरी करणारा चोर या वाड्यांतील नोकरांपैकींच कोणी तरी असला पाहिजे. गैरमाहितीच्या चोरानें नेमकें येथें येऊन गुपचुप चोरी करावी, हें अशक्यच आहे ! येथें जे आठ दहा नोकर आहेत, त्यांपैकीं संशय तरी कोणाचा घ्यावा ? प्रत्यक्ष माझ्या शयनमंदिरांत शिरून चोरी करणारा हा चोर उलट्या काळजाचा असला पाहिजे ! '

दुर्मुख म्हणाला;–' आतां काय करावयाचें ? मी ताबडतोब चतुरकाला कोतवालाकडे पाठवूं काय ? कोतवाल आले कीं ते एकदम वाड्याची झडती घेतील. '

असें बोलून दुर्मुख उठला; पण त्याचा हात धरून शेखर त्याला म्हणाला,–' ही गोष्ट कोतवालाच्या कानावर घालावी असें मला वाटत नाहीं. चोरी होऊन मध्यें पुरे दोन दिवस गेले आहेत, इतक्या अवधींत चोरानें द्रव्य केव्हें तरी छपविलें असेल, त्याचा पत्ता कसा लागणार ? या चोरीचा गवगवा न करतां आपण गुप्तपणानें चौकशी केली पाहिजे; सर्व नोकरांवर पाळत राखली, तर आज नाहीं उद्यां, केव्हां तरी चोराचा पत्ता लागल्याखेरीज राहणार नाहीं. ज्यानें चोरी केली असेल, तो त्या द्रव्याचा उपभोग घेण्यासाठीं वाड्यांतून वरचेवर बाहेर जाईल किंवा कांहीं चैनीचे पदार्थ खरेदी करील, किंवा नोकरी सोडून चालता होईल, किंवा कदाचित् बोलतां बोलतां आपल्या श्रीमंतीच्या बढाया मारूं लागेल; आपण जर लक्ष्यपूर्वक अवलोकन करूं लागलों, तर आज नाहीं उद्यां, केव्हां तरी आपल्याला सुगावा लागेल, हें काम मला स्वतां करतां येणें शक्य नाहीं, आणि ज्याअर्थीं माझ्याखेरीज अधिकारानें, माझ्याहून वयानें आणि शहाणपणानें तुम्हीच श्रेष्ठ आहां, त्याअर्थीं हें काम तुम्हींच आपल्या शिरावर घेऊन पार पाडलें पाहिजे. '

दुर्मुख नम्रतेनें म्हणाला,–' महाराज, मी इतक्या प्रशंसेस पात्र नाहीं; परंतु ज्याअर्थीं प्रसंगच आला आहे, त्याअर्थी मला ही कामगिरी आपल्या शिरावर घेणें भाग आहे; मला जर माणसाच्या स्वभावाची पारख चटकन करतां येत असती, तर किती छान झालें असतें ! '

शेखर म्हणाला,–' चला तर ! आतां विलंब करूं नका. एकेक पळ आपणांस आतां मोलाचें आहे. चोरी झाल्याचा बभ्रा करावयाचा नाहीं, हें तुमच्या लक्ष्यांत आहेच. '

दुर्मुख शेखराला प्रणाम करून निघून गेला. नंतर शेखरानें आपल्या मनाची पक्की खात्री करून घेण्यासाठीं फडताळाचा कोनकोंपरा धुंडाळून पाहिला; पण फडताळांत कांहींच नाहीं, अशी त्याच्या मनाची पक्की खात्री झाली; आणि त्याच्या मनाला खेद झाला चोरीस गेलेली रक्कम मोठी असल्यामुळें, त्याला फारच वाईट वाटत होतें. तो स्वतः राजपुत्र होता. मग त्याला चोरीस गेलेल्या रकमेचें इतकें वाईट कां वाटावें, अशी शंका वाचकांच्या मनांत येणें साहजिक आहे. म्हणून या शंकेचें निरसन येथें करणें अवश्य आहे. त्याचा पिता दृढसंघ हा राजा असला, तरी त्याच्या खजिन्यांत सोनें फारच कमी होतें. त्याच्या कोठारांत धान्य आणि खिल्लारांत गुरेंढोरें यांची समृद्धि असली, तरी खजिन्यांत पैका मात्र फारसा नव्हता. त्या वेळच्या रीतीप्रमाणें सरकारसारा धान्याच्या रूपानें वसूल होई, आणि नोकर-चाकरांचा पगार धान्याच्या रूपानेंच देण्याची वहिवाट असे. ज्याच्या घरीं धान्य आणि गुरेंढोरें पुष्कळ असत, त्याला श्रीमंत समजत असत. अशी स्थिति असल्यामुळें जेव्हां आपल्या मुलखापासून दूर असलेल्या प्रदेशांतून जरुरीचे पदार्थ खरेदी करण्याचा प्रसंग येई, तेव्हां त्यास सोन्या–नाण्यांची जरूर लागे. विशेषतः दारूगोळा किंवा इतर शास्त्रास्त्रें खरेदी करण्याचा प्रसंग येई, तेव्हां सोन्याची जरूर विशेष भासे. दृढसंघ राजाचा लष्करी बाणा असल्यामुळें आपलें सैन्य उत्तम असावें, आणि आपल्या संग्रहांत शस्त्रास्त्रें उत्कृष्ट प्रतीचीं असावीं, असें त्यास वाटत असे. सध्यांच्या युद्धांत विजयप्राप्ति होऊन बृहद्रथाकडून जी खंडणी मिळाली होती, तीमधून युद्धोपयोगी सुधारणा करण्याचा दृढसंध राजाचा विचार त्यानें कित्येक प्रसंगीं शेखरापाशीं बोलून दाखविला असल्यामुळें, ही रक्कम गेल्यानें शेखरास फारच वाईट वाटत होतें. आपल्या शयनगृहांत कोणी तरी शिरलें, असा आपणांस भ्रम झाला, त्या वेळींच जर आपण उठून आपल्या मनाची खात्री करून घेतली असती, तर बरें झालें असतें; असें त्याच्या मनांत आलें, आणि त्यानें आपणास दोष दिला. शेवटीं आपण या भृगुकच्छ नगरींत आल्यापासून आपल्या दैवानें माघार घेतली असावी, असें वाटून तो फारच खिन्न झाला.

ही चोरीची हकीकत पत्रामध्यें लिहून ताबडतोब वडिलांकडे जासूद रवाना करावा, असें एकवार त्याच्या मनांत आलें; पण असें आपण केल्यास या चोरीसंबंधाची शहानिशा होईपर्यंत विनाकारण आपल्या पितरांस संशयांत आणि काळजींत लोटावें लागणार, अशा विचारानें त्यानें मुग्ध राहण्याचाच निश्चय केला.


शेखरानें तो सर्व दिवस वाड्यांतच घालविला. चोरी झाली हें उमगल्यापासून त्याचें मन अत्यंत उद्विग्न झालें होतें. रक्कम गेल्याचें त्याला जितकें वाईट वाटत होतें, त्यापेक्षां आपणास निष्काळजीपणाचा दोष माथीं वाहवा लागणार, याचें अधिक वाईट वाटत होतें. ही रक्कम जर त्याची खासगी असती, तर कदाचित् घटका दोन घटका त्याला हळहळ वाटली असती; परंतु रक्कम पित्याची असल्यामुळें आपल्यावर तिच्या रक्षणाची जबाबदारी होती. ती जबाबदारी आपण

योग्य रीतीनें संभाळली नाहीं म्हणून आपल्याला वडिलांचा शब्द सहन करावा लागेल, याचा त्याला मोठा खेद होत होता. शेखरानें ती सर्व रात्र अनेक प्रकारच्या कष्टमय विचारांमध्यें लोटली, हें सांगणें नकोच.

दुसरे दिवशीं प्रहर दिवसाचे सुमारास दुर्मुख घोड्यावरून लांचचा प्रवास करून परत आला, आणि त्यानें शेखराची गांठ घेऊन चोरीसंबंधानें आपणांस या वाड्यांतील नौकरांपैकीं शंभुसेन नांवाच्या एका नोकराचा संशय आला आहे, असें सांगितलें. त्याच्या सांगण्यावरून शेखरास असें समजलें कीं, त्या शंभुसेनानें एक मूठभर होन आपल्या सोबत्यांस दाखविले असून, आणखीही द्रव्य आपल्याजवळ आहे, व आपण आपल्या सोबत्यांपेक्षां श्रीमंत आहों, अशा त्यानें बढाया मारिल्या होत्या. हें ऐकून शेखरानें दुर्मुखाला हें वर्तमान गुप्त ठेवावयास व तो ज्या ज्या वेळीं विशेषतः रात्रीं बेरात्रीं वाड्यांतून बाहेर जाईल, त्या त्या वेळीं त्याजवर पाळथ ठेवावयास सांगितलें. कारण, चोरीचें द्रव्य जेथें ठेविलें असेल, तेथें चोर वारंवार जात असतो, म्हणून एकादे वेळी तरी तो नेमका सांपडेल अशी शेखराची कल्पना होती. शेखराच्या आज्ञेप्रमाणें वागायाचें कबूल करून दुर्मुख शंभुसेनावर पाळथ ठेवण्यासाठीं निघून गेला.

विशेष रीतीनें सांगण्यासारखें वर्तमान घडून आल्याखेरीज तो दिवस आणि ती रात्र निघून गेली. दुसरे दिवशीं सुप्रभातीं शेखरानें आपल्या शय्येचा त्याग केला नाहीं तोंच दुर्मुख त्याजपाशीं आला. त्याच्या मुद्रेवरून तो आपणांस कांहीं महत्त्वाची गोष्ट सांगणार असें शेखराच्या एकदम ध्यानीं आलें. शेखरानें विचारलें,--' काय वर्तमान आहे ? '

दुर्मुख म्हणाला,--' मला जें सांगावयाचें आहे, त्यावरून मला आलेला शंभुसेनाचा संशय खरा असें दिसतें. काल रात्रीं नोकरांचीं जेवणें आटोपल्यावर सर्व सेवक एकत्र जमून गप्पा मारीत असतां आपणांस झोंप येते, असा बाहाणा करून तो तेथून उठला, आणि आपल्या खोलीकडे जाऊं लागला. यावेळीं रात्र जवळ जवळ दीड प्रहर झालेली असल्यामुळें वाड्यांतील दिवे मालविलेले होते. सर्व चाकरमाणसें ज्या खोलींत गप्पा मारीत बसलीं होतीं, तेथून शंभुसेनाची खोली बरीच दूर असल्यामुळें, काळोखांतून जाण्यापेक्षां एकादा दिवा घेऊन जा, असें त्याच्या एका सोबत्यानें त्यास सांगितलें. परंतु तिकडे लक्ष न देतां आपणांस काळोखांतून देखील उत्तम दिसतें, असें बोलून तो चालूं लागला. माझी त्याच्यावर सक्त नजर असल्यामुळें, मी तेथें जमलेल्या मंडळीस एक थाप मारून तेथून बाहेर पडलों. शंभुसेन आपल्या खोलीकडे न जातां तो पिछाडीच्या बागेंत गेला, हें पाहून माझ्या संशयास चळकटी आली, आणि मी पाऊल वाजू न देतां त्याच्या मागोमाग बागेंत गेलों. कोठें तरी या माणसानें द्रव्य पुरून ठेविलें असावें, अशी माझ्या मनांत शंका आली, आणि मीं शक्य तितकें त्याच्या जवळ राहून त्याचा पाठलाग चालविला. परंतु माझी शंका खोटी ठरली. बागेंत कोठेंही न थांबतां तो एकदम मागच्या फाटकापाशीं गेला. तें फाटक उघडून तो बाहेर आला, व त्यानें तें पुनः बंद करून घेतलें. मीही आवाज होऊं न देतां फाटक उघडून त्याच्या मागोमाग निघालों. शेवटीं कित्येक रस्ते आणि बोळ मागें टाकल्यावर त्यानें शीळ फुंकली, ती ऐकून दुसरा एक पुरुष बागेच्या कोपऱ्यावरून रस्त्यावर आला. नंतर तेथें बराच वेळ त्या दोघांचें भाषण चाललें होतें. शंभुसेनाचा स्वर माझ्या ध्यानांत असल्यामुळें, तोच कोणाशीं तरी बोलत आहे, अशी माझी खात्री होती; पण काळोखामुळें तो कोणाशीं बोलत आहे, व मी दूर असल्यामुळें तो काय बोलत आहे, हें मला समजेना वेळ मोठी आणी.



वाणीचीं होतीं. मी त्या हरामखोराच्या पाळंथीवर आहें असें जर त्यावेळीं त्याच्या ध्यानीं आलें असतें, तर त्यानें आपल्या सोबत्याच्या साहाय्यानें माझा प्राण घेण्यास सुद्धां कमी केलें नसतें. तथापि ही वेळ गमावल्यास चोर हातचा सुटेल असें वाटून प्राणाची पर्वा न करितां मी आणखी थोडा पुढें झालों. तों 'उद्यां रात्रीं-बरोबर मध्यरात्रीं-आनंदमठामध्यें तूं ये' हे शब्द स्पष्टपणें माझ्या कानीं पडले. त्यांमागून 'होनांची वाटणी' अशा प्रकारचे तुटक शब्द माझ्या कानीं आले, पण ते अगदीं हलक्या स्वरानें उच्चारिलेले असल्यामुळें, मला त्यांपासून नीटसा अर्थबोध झाला नाहीं. सुमारें पांच दहा पळांतच त्यांचें भाषण संपलें, आणि शंभुसेन आपल्या सोबत्याचा निरोप घेऊन मागें फिरला. जातांना त्यानें पुनः आपल्या सोबत्यास 'उद्यां बरोबर मध्यरात्रीं आनंदमठामध्यें मी तुझी वाट पहातों' असें सांगितलें; व त्या शब्दाचद्दल माझ्या मनांत अगदीं शंका उरली नाहीं. शंभुसेन मागें फिरल्यावर मीही मोठ्या सावधपणानें त्याच्या मागून येऊं लागलों, आणि कोणत्याही प्रकारें त्याच्या मनांत संशय न येतां आम्ही दोघेहीं वाड्यांत येऊन दाखल झालों.'

शेखर म्हणाला,—'ही तुमची बातमी महत्त्वाची आहे, आणि आपणास बरोबर सुगावा सांपडला आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. पण मला असा चमत्कार वाटतो; त्या चोरांनीं ती नेमकी वेळ आपल्या कामासाठी कशी ठरविली?'

दुर्मुख म्हणाला,—'महाराज, मला यांत मुळींच आश्चर्य वाटत नाहीं. आपणच विचार करून पाहा, म्हणजे आपल्यानीच कृत्याला तेंच स्थळ अगदीं योग्य आहे, अशी आपल्या मनाची खात्री होईल. कारण आनंदमठ शहरापासून कोसभर दूर असल्यामुळें तेथें नेहमींच माणसांची जा ये कमी असते. शिवाय त्या जागेसंबंधी जी दंतकथा प्रचारांत आहे, तिजवरून पाहतां नेमकें मध्यरात्रीच्या वेळीं तेथें इतर कोणी असण्याचा संभवच नाहीं, म्हणून त्यांनीं तीच जागा पसंत केली असावी. सात्त्विकवृत्तीच्या माणसास भुतांखेतांचें भय वाटतें, पण देवधर्मानें ज्यांना सोडलें, त्या राक्षसांस भीति कशाची!'

शेखर म्हणाला,—'हें तुमचें भाषण मला पटलें.' नंतर थोडा वेळ विचार करून तो म्हणाला,—'तर मग आपण उभयतांसही अगदीं नेमकें त्यावेळीं तेथें गेलें पाहिजे.'

प्रकरण २८ वें.

आनंदमठ.

रात्र काळोखी होती; तथापि आकाशामध्यें ढग आलेले नसल्यामुळें उघड्या मैदानांतून चालतांना कठीण पडत नव्हतें. मध्यरात्रीचा समय असल्यामुळें संपूर्ण आकाश तारकामय दिसत होतें, आणि मंदवायु सुटला असल्यामुळें अशावेळीं उघड्या जागीं फिरतांन अंतःकरण आनंदयुक्त होत होतें.

सुमारें बारा घटका रात्रीचे सुमारास शेखर आणि दुर्मुख असे दोघेजण वृषपतीच्या वाड्यांतून बाहेर पडले. ते दोघेजण ज्या महत्त्वाच्या कामासाठीं जात होते, तें काम साध्य व्हावयास गुप्तता राखणें फार जरूर होतें, म्हणून घोड्यांवर न बसतां ते दोघे पायींच चालले होते. शंभुसेन आनंदमठांत जाऊन पोंचण्यापूर्वी आपण तेथें जाऊन सोयवार जागा पाहून लपून बसावें अशी त्यांची इच्छा असल्यामुळें ते मोठ्या जलदीनें उद्दिष्ट स्थलाकडे चालले होते; आणि काळोखांतून व आडरस्त्यांनीं जरी ते जात होते, तरी सुमारें दीड घटकेच्या आंतच ते आनंदमठांत जाऊन पोंचले.

भृगुकच्छ नगराच्या पूर्व दिशेस सुमारें एक कोसावर मोठी थोरली राई होती, त्या राईच्या मध्यभागीं आनंदमठाची पडकी इमारत होती. अनेक शतकांपूर्वी तो मठ बांधलेला होता, आणि तो मोडकळीस आल्यासही कित्येक शतकें लोटलीं होतीं. परंतु मठाचें सर्व काम उत्तम प्रकारच्या दगडांनीं झालेलें असल्यामुळें, जे भाग अजून शाबूद होते, ते चांगले मजबूद होते. मठामध्यें प्रवेश करण्यासाठीं जें एक गोपुर किंवा महाद्वार बांधलेलें होतें, ती इमारत मठापासून स्वतंत्र असल्यामुळें आणि लहान असल्यामुळें तिचा अगदीं भंग झाला नव्हता. मुख्य इमारतीच्या कित्येक कमानी जरी पडल्या होत्या, तरी ज्या भागांत सत्पुरुषाची समाधि होती, तो भाग कालाच्या तडाक्यांतून वांचला होता. या समाधीजवळच एक कोठडी होती; या कोठडीमध्यें सुमारें पन्नास वर्षांपूर्वी एक महंत राहत असे. त्यानें त्या कोठडीची दुरुस्ती केली असल्यामुळें, ती एक कोठडी शाबूद होती. याशिवाय मठाच्या इतर भागांत पुष्कळ पडझड झालेली होती. कित्येक ठिकाणीं भिंतीमध्यें मोठमोठीं झाडें वाढल्यामुळें इमारतीचा नाश होत होता, तर कित्येक ठिकाणीं पडूं लागलेल्या दगडांस झाडांच्या पाळांमुळांचा आधार मिळून तेथें मजबुदी आली होती. मठाच्या आवारांत जिकडे तिकडे इमारतीचे आंतील कोरीव दगड पडलेले असून त्यांवर रान सुद्धां वाढलेलें होतें. याच आवारामध्यें एका कोंपऱ्यांत दगडांनीं बांधलेली एक विहीर होती. ही विहीर सध्यां जरी बरीच बुजालेली होती, तरी तिच्या कांठावरून फिरणारा मनुष्य अपघातानें आंत पडल्यास त्याला बरीच इजा होण्याइतकी ती अद्यापि खोल होती.

ज्या स्थळासंबंधाची हृदयद्रावक दंतकथा त्यानें नुकतीच ऐकली होती, त्या स्थळाकडे अपराह्नीं चेत असतां जरी भीतीनें नव्हे, तरी उदासीनतेनें शेखराचें मन व्याकुल झालें होतें. गोपुरांतून मठाच्या आवारांत प्रवेश करीत असतां दुर्मुख आपल्याला अगदीं लगटून चालला आहे, ही गोष्ट शेखराच्या ध्यानीं आली, आणि त्यानें दुर्मुखास विचारलें, " या जागेसंबंधानें तुम्हीं जी दंतकथा ऐकली आहे, तिजवर तुमचा विश्वास आहे काय ?"

दुर्मुखानें उत्तर केलें,-" तें कांहीं मला स्पष्ट सांगतां येत नाहीं. परंतु जर आपण माझ्याबरोबर नसतां, किंवा काम इतकें महत्त्वाचें नसतें, तर मी कांहीं अशा अपराह्नीं या भयानक स्थलीं खुषीनें आलों नसतों."

शेखर मध्येंच म्हणाला,-" थांबा; मला कोणाचीं पावलें वाजल्यासारखीं वाटतात." नंतर थोडा वेळ थांबून कानोसा घेऊन तो म्हणाला,-" छेः कोणीं नाहीं. मला उगीच भास झाला. मला वाटलें कीं ते आमच्या पूर्वीच येथें आले असतील. ते जर आमच्या अगोदर येथें आले असते, तर त्यांचें सर्व भाषण आपल्या कानीं पडलें नसतें, किंवा त्यांतील महत्त्वाचा भाग तेवढाच गळला असता; किंवा आमच्या पावलांची त्यांना चाहूल लागून ते सावध झाले असते, पण सुदैवानें येथें सामसूम आहे, हें तरी बरेंच म्हणावयाचें. आतां आपण अगदीं सावध राहिलें पाहिजे, आणि बोलावयाचें झाल्यास अगदीं हळू बोललें पाहिजे."

शेखराच्या सूचनेप्रमाणें दुर्मुख अगदीं हलक्या स्वरानें बोलला,-" महाराज, शंभुसेन आणि त्याचा सोबती हे येथें येणार खरे, पण ते येथें अमक्याच जागीं येतील हें आपणांस कोठें माहीत आहे ? आपण दोघे एका ठिकाणीं लपून राहिलों आणि ते जर आमच्या नजरेपलीकडे कोठें तरी बोलत असले, तर त्यांच्या भाषणांपैकीं एक अक्षरदेखील आमच्या कानीं पडावयाचें नाहीं आणि आमची सर्व खटपट व्यर्थ होईल !"

शेखर म्हणाला,-' तुमचें म्हणणें अगदीं रास्त आहे. अर्थात् आपण पुढें काय केलें

पाहिजे, हेंही तुमच्या भाषणावरून सहज लक्ष्यांत येण्यासारखें आहे. आपण उभयतांनीं एकाच जागीं उभें राहून उपयोग नाहीं. एकानें या भागांत आणि दुसऱ्यानें पलीकडच्या भागांत लपून राहून आपला कार्यभाग साधिला पाहिजे. '

दुर्मुखानें म्हटलें,—' असें खरें. बरें आपण कोठें राहणार ?

शेखर हंसून म्हणाला,—' ज्याअर्थीं विहिरीमधून मध्यरात्रीं भुतें येत असावीं, या गोष्टीवर आपला भरंवसा आहे, त्याअर्थीं तुम्ही येथेंच रहावें हें बरें; मी स्वतां तिकडच्या भागांत नजर ठेवितों. '

इतकें भाषण झाल्यावर ज्या कोपऱ्यांत पडकी विहीर होती, त्या कोपऱ्याकडची वाट शेखरानें धरिली आणि दुर्मुख त्याच्या विरुद्ध दिशेस गेला. दुर्मुख जिकडे गेला, त्याच भागांत महंताची कोठडी असून, ती अद्यापि शाबूद असल्यामुळें तो त्या कोठडींत गेला. या कोठडीच्या तीन बाजूंच्या भिंतींस झरोके होते, त्यांतून बाहेर काय चाललें आहे, हें चांगलें दिसण्याची सोय होती. आपण या कोठडींत राहणार असें दुर्मुखानें शेखरास कळवून ठेविलें होतें. त्या दिवशीं वद्य अष्टमी असल्यामुळें या वेळीं चंद्रोदयास नुकताच प्रारंभ झाला होता. आपली नजर जेथून पुष्कळ भागावर एकदम पडेल असें त्यास वाटलें, अशा जागीं शेखर लपून बसला. सुमारें अर्धघटिका लोटेपर्यंत सर्वत्र सामसूम होतें. तेवढ्या वेळांत शेखराच्या मनांत अनेक प्रकारच्या विचारांचा गोंधळ उडाला होता. थोड्या वेळानें त्याला कोणाचीं तरी पावलें वाजत आहेत, असा भास झाला आणि ज्या दिशेनें पावलांचा आवाज ऐकूं येत होता, त्या दिशेकडे तो मोठ्या उत्सुकतेनें पाहूं लागला. हळुहळू पावलांचा शब्द अधिकाधिक जवळ ऐकूं येऊं लागला, आणि सर्वांग काळ्या वस्त्रानें आच्छादून केलेली एक आकृति आपणाकडे येत आहे, असें त्याला आढळून आलें. ती आकृति आणखी पुढें आल्यावर तिनें आपल्या मुखावरील आच्छादन काढून टाकलें आणि ती चोहोंकडे बारीक नजरेनें पाहूं लागली. ही आकृति म्हणजे एक स्त्री आहे, असें शेखरास आढळून आलें आणि अशा भयंकर जागीं आणि अपरात्रीच्या वेळीं तेथें येणाऱ्या स्त्रीच्या साहसाची कल्पना मनांत येऊन तो अगदीं थक्क झाला ! शेखराखेरीज सामान्य धैर्याचा असा कोणा पुरुष तेथें असता, तर दंतकथेंतील पिशाचरूपानें मध्यरात्रीं संचार करणारी रेणुका ती हीच, असें मनांत येऊन त्याची भयानें गाळणच उडाली असती.

ह्याचा अर्थ काय ! ही स्त्री कोण ? शंभुसेन आणि त्याचा सोबती, यांच्या लग्नाबांध्याची तर ही स्त्री नसेलना ? कीं ती दुसरीच कोणी असून आपले दुसरेच कांहीं हेतु साध्य करण्यासाठीं तेथें आली असावी ? अशा प्रकारचे अनेक प्रश्न शेखराच्या मनांत उद्भवले, पण त्यांचें समाधानकारक असें उत्तर त्याला सुचेना. थोडा वेळ इकडे तिकडे पाहून ती स्त्री भराभर पावलें उचलीत मठाच्या पिछाडीस गेली. मठाच्या कोंपऱ्यापर्यंतच शेखराची नजर पुरत असल्यामुळें, ती लवकरच त्याच्या दृष्टिआड झाली. आणखी दहापांच पळें लोटण्यापूर्वीच एक विक्राळ किंकाळी शेखरास ऐकूं आली. आवाजाच्या ओळखीवरून ती किंकाळी दुर्मुखाची आहे, हें त्याच्या ध्यानीं यावयास अगदीं विलंब लागला नाहीं. दुर्मुखाच्या प्राणावर प्रसंग गुदरला असावा, असें शेखराच्या ध्यानीं येऊन तो तत्काल लपून बसला होता तेथून पुढें आला. तोंच दुर्मुख धांवत आपणांकडे येत आहे, आणि नुकतीच पाहिलेली कृष्णवस्त्रानें सर्वांग आच्छादित केलेली स्त्री त्याच्या मागें आहे, असें शेखराच्या दृष्टीस पडलें. त्या स्त्रीनें दुर्मुखाला गांठून त्याला धक्की मारून खालीं पाडलें, व ती एकदम शेखराकडे येऊं

लागली. शेखर पुढें जात असल्यामुळें लवकरच ती अगदीं त्याच्या अंगापाशीं येऊन भिडली आणि खणखणीत स्वरानें म्हणाली,–" घाबरण्याचें कारण नाहीं. मीं तुमच्या नोकराला अगदीं इजा केलेली नाहीं."

असें बोलत असतां त्या स्त्रीनें आपल्या अंगावरील काळा बुरखा काढून टाकला, त्याबरोबर शेखराला त्या स्त्रीची एकदम ओळख पटली, आणि निर्लज्जपणानें आपल्या मागें लागलेली तीच ही स्त्री आहे, हें ध्यानीं आल्याबरोबर त्याला तिचा मोठा राग आला. तो मोठ्या त्वरेनें दुर्मुखापाशीं चालला होता, परंतु त्या निर्लज्जेनें एकदम त्याचा हात धरून त्यास अडवून धरिलें, आणि म्हटलें,–" तुम्ही सध्यां माझें भाषण ऐकलेंच पाहिजे. तुमच्या सेवकाचद्दल भिण्याचें कारण नाहीं. तो मला पिशाच समजून घाबरला आहे. थांबा, मला ढकलून जाऊं नका-मी आपणास हात जोडतें–पायां पडतें–छेः छे–मला सोडून जाऊं नका ! "

शेखर एकदम उभा राहिला; पण तो कांहीं त्या स्त्रीच्या विनवणीकडे लक्ष्य देऊन उभा राहिला नव्हता. त्याच्या मनांत एकाएकीं जो संशय उत्पन्न झाला होता, त्याची शहानिशा करून घेणें त्याला अत्यंत जरूर वाटल्यामुळेंच तो उभा राहिला होता.

त्यानें विचारलें,–" मी सध्यां येथें असेन हे तुला कसें समजलें ? " कारण आपला बेत फक्त दुर्मुखालाच माहीत असल्यामुळें त्याच्याकडूनच या स्त्रीला तो समजला पाहिजे, अशी शंका त्याच्या मनांत उद्भवणें हें अगदीं साहजिक होतें; आणि याच संशयाची त्याला फेड करून घेणें जरूर वाटत होतें.

दमयंती म्हणाली,–' या प्रश्नाचें उत्तर जर तुम्हाला माझ्या मुखानें ऐकून घ्यावयाचें असेल, तर मी तें आपल्या मर्जीप्रमाणें देईन. तें उत्तर मिळेपर्यंत मी जें काय बोलेन तें तुम्हीं निमूटपणें ऐकून घेतलें पाहिजे. '

शेखर उतावळेपणानें बोलला,–' आटप; तुला काय सांगावयाचें आहे तें चटकन सांग पाहूं ! '

आपले काळे भोर डोळे त्याजवर रोंखून दमयंती म्हणाली,–" अशी घाई करूं नका. माझें बोलणें नीट ऐकून घ्या. तुम्हीं माझ्या प्रेमाचा अव्हेर केला आहे, वास्तविक पाहिलें तर–तुम्हीं तरुण आहां–मी ही तरुण आहें–तुम्ही सुंदर आहां. मीही स्वरूपवान् आहें–"

अत्यंत तिरस्कारानें शेखर ओरडून म्हणाला,–"माझ्या प्रश्नाचें सरळ उत्तर दे–"

दमयंती चटकन् म्हणाली,–" मी तेंच सांगत आहें. ज्या अर्थी तुम्हीं माझ्या प्रेमाचा अव्हेर केला आहे, त्या अर्थी तुमच्याविषयीं माझ्या मनाला काय वाटावें ? अर्थात् तुमचें दुसऱ्या कोणावर तरी प्रेम जडलें असावें व मला कोणी तरी स्त्री प्रतिस्पर्धी आहे, असें वाटलें. मत्सर हा किती भयंकर मनोविकार आहे ? माझ्या मनांत ईर्ष्या उत्पन्न झाल्याबरोबर मीं तुमच्या सर्व कृत्यांची मला दाद लागावी म्हणून तुमच्यावर पाळथ राखण्यासाठीं हेर ठेविले आहेत. तुम्ही वृषपतीच्या वाड्यांतून आपल्या सेवकासह बाहेर पडलां हें माझ्या एका हेरानें पाहिलें, आणि तो हेर तुमच्या मागें चाललां असतां तुमच्या दोघांच्या भाषणावरून तुम्हीं आनंदमठांत जात आहां, हें त्याला समजलें. तो माझा हेर लागलाच मजकडे आला, आणि त्यानें तुमच्या हालचालीची मला खबर दिली. त्याबरोबर मनाचा धडा करून मी एकदम येथें आलें. "

या भाषणानें दुर्मुखासंबंधानें आलेल्या संशयाची निवृत्ति होऊन शेखर म्हणाला,–" बस्स पुरे ! आतां मला अधिक ऐकण्याची मुळींच जरूर नाहीं. "

असें बोलून तो तसाच पुढें चालला होता; पण दमयंतीनें आपल्या दोन्ही हातांनीं त्याच्या पायांस मिठी घालून त्याला अडवून म्हटलें,–" प्रियकरा ! माझा आतां अव्हेर

करूं नका ! मी आपल्या पायां पडते ! निदान मी काय म्हणतें तें नीट ऐकून तरी घ्या ! ”

आपले पाय तिच्या हातून सोडवीत तो म्हणाला,–‘ छेः छेः, अशी गोष्ट मला करतां येत नाहीं-नाहीं–माझ्या हातून ही गोष्ट होणें शक्य नाहीं–चल रस्ता सोड ! ’

दमयंती तटकन् वर उठून म्हणाली,–‘ असें काय ? इतकें आपलें मन निष्ठुर झालें असेल तर–तर–तर हें पाहिलें ? ’ असें बोलत असतां तिनें आपल्या शेल्यांत लपविलेला जांबिया बाहेर काढला आणि चंद्रप्रकाशामध्यें तो तिच्या हातीं चमकूं लागला.

तिच्या हातीं हत्यार होतें, तो हात धरींत असतां शेखर म्हणाला,–‘ दुर्दैवी स्त्रिये, हें तूं आरंभिलें आहेस तरी काय ? ’

दमयंती निश्चयदर्शक स्वरानें म्हणाली,–‘ मीं काय आरंभिलें आहे, असें आपण विचारतां ! ऐका तर ! आपण माझ्या प्रेमाचा अव्हेर करून माझ्या हृदयाचा अर्धा भेद केलाच आहे आतां मी या खंजिरानें त्याचा पुरा भेद करून टाकणार ! ’

अगदीं गोंधळून जाऊन शेखर म्हणाला,–‘ असें करशील तर या मूर्खपणानें तुझा काय फायदा होणार आहे ? ’

राक्षसी क्रौर्यानें जिचे नेत्र चमकत आहेत अशी ती साहसी स्त्री बोलली,–‘ आपल्या प्रेमानें मी मूर्ख तर बनलेंच आहें. मनुष्य वेडें बनलें म्हणजे त्याच्या हातून कोणतें कृत्य होणार नाहीं ! प्रियकरा, आतां माझें सर्व जीवित तुझ्या हातीं आहे. मीं आपलें अंतःकरण तुझ्या चरणीं अर्पण केलें आहे ! तूं जर माझा अव्हेर केलास, तर मला या जगांत कसचें सौख्य उरलें आहे ? मग मला हा देह ठेवून तरी काय कर्तव्य आहे ? सोडा–माझ्या हातांतील खंजीर काढून घेण्याचा प्रयत्न कराल तर–मी शपथेवर सांगतें–’

शेखर म्हणाला,–‘ थांब–थांब–शपथ घेऊं नको–शपथ घेणें हें तामसी कृत्य आहे–’

दमयंती पूर्वीहून अधिक जोरानें बोलली, ‘ कां शपथेला इतके भितां ? होय; तुम्हीं शपथेला भ्यावें, अशीच ही भयंकर जागा आहे-नीट विचार करा–याच मठांत पूर्वी एकानें शपथ घेतली होती, त्या शपथेमुळें केवढा अनर्थ झाला ? तसाच अनर्थ–एका दंपत्याचा प्राणघात–व्हावा; अशी तुमची इच्छा असेल तर पहा–मला अडथळा करा; कीं मीं तुमचा प्राण घेण्याची शपथ घेतलीच समजा–नाहींतर मला एकटीलाच मरूं द्या–मात्र इतकें ध्यानांत असूं द्या कीं, माझ्या प्राणघाताला आपण कारण झालां असल्यामुळें मीं केलेल्या आत्महत्येचें पाप आणि स्त्रीहत्येचें पाप आपल्या मस्तकीं बसेल ! ’

शेखर बोलला,–‘ ईश्वर करो, आणि तसें न होवो ! पण मी पुनः विचारतों, मूर्खपणानें असा त्रागा करून तुझे हेतु साध्य होतील असें तुला वाटतें कीं काय ? असा मूर्खपणा कां करतेस ? ’

दमयंती जणूं काय आपल्या अंगांतील सर्व शक्ति एकत्र करून अत्यंत उंच स्वरानें म्हणाली,–‘ मी असा मूर्खपणा कां करतें असें विचारतां ? मला तुम्ही सध्यां जो प्रश्न करीत आहां, तोच प्रश्न समुद्रांत होणाऱ्या भयंकर तुफानास विचारा, नाहीं तर आपल्या गडगडाटानें कानठाळ्या बसवून सोडणाऱ्या मेघगर्जनेस विचारा–नाहींतर आपल्या प्रचंड सामर्थ्यानें मोठमोठीं अरण्यें दग्ध करून सोडणाऱ्या विद्युल्लतेस विचारा.–या प्रश्नाचें उत्तर देण्यासाठीं जर तीं एकदम शांत होतील, तरच सध्यां माझ्या हृदयामध्यें जें तुफान उसळलें आहे, तें शांत होऊन तुमच्या प्रश्नाचें तुम्हांस योग्य उत्तर मिळेल. ’ हे शब्द त्या स्त्रीनें इतक्या जोरानें, इतक्या दृढनिश्चयानें व इतक्या धिटाईनें उच्चारिले होते कीं, सध्यां त्या स्त्रीचें मस्तक फिरलें गेलें असून ती जें म्हणेल, तें

अक्षरशः खरें करील, असें शेखराच्या लक्ष्यांत पक्कें बाणलें.

सध्यांचीं वेळ आणीबाणीची असून ती शहाणपणानेंच निभावून नेली पाहिजे, असा विचार करून तो गंभीरवाणीनें तिला म्हणाला,–'तूं येथें आतां कोणत्या हेतूनें माझी भेट घेण्यासाठीं आली होतीस?' असा प्रश्न विचारीत असतांही तिच्या हातांतील खंजीर काढून घेण्यास अवसर मिळेल तर पहावा म्हणून शेखर तिच्या सर्व हालचाली अगदीं सूक्ष्मदृष्टीनें पाहत होता.

परंतु त्याचा हेतु ओळखून ती धूर्त स्त्री म्हणाली,–'मी अशी तुमच्या युक्तीनें फसेन असें समजूं नका! तुम्ही जर मोकळ्या मनानें ऐकावयास तयार असाल, तर मी बोलेन–पण जर तुम्ही माझ्याशीं कपट करण्याचा बेत करीत असाल, तर–ज्या सत्पुरुषाच्या समाधीसमोर मी उभी आहें, त्याचीच शपथ घेऊन सांगतें कीं–'

पुनः शेखर मध्येंच म्हणाला,–'थांब, अशी मूर्खपणानें भलतीच एखादी शपथ घेऊं नको–बोल; तुला काय सांगावयाचें आहे, तें लवकर सांग पाहूं? कारण अशा रीतीनें बोलत उभें राहण्यास हें स्थळ व ही वेळ हीं अगदीं योग्य नव्हेत!'

दमयंती किंचित् शांत होऊन म्हणाली,–'माझ्या मनाला थोडें तरी समाधान वाटावें असा शब्द जरी तुमच्या मुखांतून अजून माझ्या कानावर आलेला नाहीं, तरी मी माझें मन आपल्या पुढें उघडें करतें. मी काय सांगतें, तें मुकाट्यानें ऐकून घ्या. मध्यें कांहींतरी बोलून मला अडथळा करूं नका. जिनें आपलें अंतःकरण तुम्हास अर्पण केलें, अशी प्रेमानें **वेडी** झालेली स्त्री आपल्या पुढें उभी आहे. माझें आतांपर्यंतचें आचरण माझ्या इभ्रतीला व विशेषेंकरून माझ्या कौमार्याला अनुरूप नाहीं, हें मी जाणून आहें. परंतु मी कोण हें आपणांस समजलें म्हणजे मी अशा रीतीनें कां वागतें, हें आपल्या ध्यानीं येईल, आणि या माझ्या आचरणाबद्दल तुम्ही मला दोष देणार नाहीं, ही माझ्या मनाची खात्री आहे. परंतु आपण माझा स्वीकार केल्यावांचून–आपण मला विवाहाचें वचन दिल्यावांचून–माझें नांव आपणांस समजणार नाहीं. मी प्रेमानें अंध झालें आहें, मला प्रेमावांचून दुसरें कांहींच दिसत नाहीं, प्रेमावरच माझें जीवित अवलंबून आहे. आपल्या मुखांतून एखादा तरी आशेचा शब्द बाहेर पडूं द्या कीं, मी प्रेमासाठीं हवीं तीं संकटें, हवीं तीं दुःखें, हव्या त्या यातना सहन करीन! परंतु आपलें प्रेम जर मला मिळालें नाहीं, तर मी वेडी बनेन, माझें मन भकून जाईल, मला सारासारविचार राहणार नाहीं आणि हें माझें जीवित धारण करण्यास मी एक क्षणभर देखील समर्थ होणार नाहीं! आपलें प्रेम मला मिळणार नाहीं, अशी माझ्या मनाची खात्री होऊं द्या, कीं मी कोणत्या ना कोणत्या उपायानें आपल्या प्राणांचा अंत करून घेतलाच असें समजा. माझ्या कुलासंबंधानें आपणांस शंका येत असेल तर सांगतें, माझें कुल आपल्या बरोबरीचें आहे. माझ्या कौमार्यासंबंधानें आपणास शंका येत असेल, तर या जगांत माझ्या दृष्टीनें जेवढे म्हणून पवित्र पदार्थ आहेत तेवढ्यांची शपथ घेऊन सांगतें कीं, माझें कौमार्य गंगाजलाप्रमाणें निर्मल आहे. इतर कुमारिकांना आपलें प्रेम व्यक्त करण्याला जशी संधि मिळते, त्यांची परिस्थिति ज्या प्रकारची असते, तशा प्रकारची संधि आणि तशा प्रकारची परिस्थिति मला प्राप्त होणें हें अगदीं अशक्य असल्यामुळें, जगाच्या दृष्टीनें उद्धटपणाचा मार्ग धरणें मला भाग पडलें आहे. मी कोण, हें आपणांस समजलें, म्हणजे माझ्या आचरणाचें इंगित आपल्या ध्यानीं येईल, आणि आपण मला काडीमात्र दोष देणार नाहीं, हें मी आपणास पुनः सांगतें. प्रियकरा, आपल्या मुखांतून प्रेमाचा एक

शब्द तरी माझ्या कानीं पडूं दे. आपलें हास्यमुख मला एकदां तरी पाहूं दे, निदान आपल्या अल्पशा हावभावांवरून तरी आपलें मजवरील प्रेम व्यक्त होऊं दे-कीं मी आपणांस धन्य-धन्य-धन्य-समजेन !'

शेखर म्हणाला,-' पुरे पुरे ! तूं जें कांहीं मजपाशीं मागत आहेस, तें तुला देण्यास मी अगदीं असमर्थ आहें. माझ्या प्रेमाचा मी मालक नाहीं-'

दमयंती बोलली,-' छेः छेः असें आपण बोलूं नका. आपल्याजवळचें सगळेंच प्रेम आपण दुसरीला दिलें असेल असें मी कसें म्हणूं ? आपण जिच्यावर प्रेम करतां तिचा त्याग करा, असें मी तुम्हांस मुळींच सांगत नाहीं. आपण आपल्या प्रेमाचा थोडासा अंश जरी मला दिला, तरी तेवढासुद्धां मला पुरे आहे !'

शेखर बोलला,-' ही गोष्ट व्हावी तरी कशी ?' असें कांहीं तरी बोलत असतां शेखरानें मोठ्या चलाखीनें तिजवर झडप घालून तिच्या हातांतील खंजीर काढून घेतला. प्रेमाच्या भरांत आल्यामुळें तिचें यावेळीं शेखराच्या हालचालीवरचें लक्ष्य कमी झालें होतें, त्यामुळें त्याला हें कृत्य सहज करतां आलें.

हें पाहून ती स्त्री ओरडून म्हणाली,-अरेरे ! हें तुम्हीं काय केलें ?'

शेखरानें उत्तर केलें,-' एक मूर्ख स्त्री भयंकर पातक करण्यास प्रवृत्त झाली असतां तिला त्या कर्मापासून मीं परावृत्त केलें.' असें म्हणून त्यानें तो खंजीर मठाबाहेरच्या झाडीमध्यें भिरकाविला.

एखाद्या गोगलगाईप्रमाणें नरम पडून दमयंती म्हणाली,-' माझ्या मानसिक दुर्बलतेचा तुमच्यासारख्या वीरानें फायदा घ्यावा, हें कांहीं योग्य नव्हे. माझ्यासारख्या हतभाग्य स्त्रीचें रक्षण केल्यानें चांगली गोष्ट कोणतीही नसून उलट अनेक प्रकारच्या मानसिक यातना भोगण्यास मात्र तुम्ही मला 'जिवंत ठेविलें, हें तुम्हीं फार वाईट कृत्य केलें.'

इतक्यांत मठाच्या कोपऱ्याकडे कोणाचीं पावलें वाजलीं, आणि तीं दोघें तिकडे पाहतात, तोंच हातीं नंगी तरवार असलेला एक वीर पुरुष शेखरापाशीं येऊन उभा राहून म्हणाला,-' नीचा ! छाती असेल तर तरवार हातीं घे. आणि आपल्या जिवाचें रक्षण कर !'

त्या धिप्पाड व भव्य शस्त्रधारी वीराकडे क्षणमात्र नजर टाकून दमयंती ओरडली,-'घात झाला ! माझा भाऊ येथें कसा आला?' असे शब्द उच्चारून तिनें एकदम आपलें तोंड फिरविलें, आणि आपणास पडावयास होऊं नये म्हणून तिनें मठाच्या भिंतीचा आश्रय केला.

अशा रीतीनें अकस्मात् तेथें आलेला तो शस्त्रधारी विक्रमसेनच होता. त्यानें अशा रीतीनें आपणांस युद्धासाठीं आह्वान केलेलें पाहतांच शेखराची तरवार सरकन म्यानांतून बाहेर आली, आणि क्षणार्धांमध्यें दोन्ही तरवारींचा खणखणाट होऊं लागला. तरवारीच्या दहा-पांच फेकी होण्यापूर्वीच शेखरानें आपल्या प्रतिपक्ष्यास हतवीर्य केलें, आणि तो त्याचा प्राण घेण्यास प्रवृत्त झाला.

हें पाहून दमयंती ओरडत त्या दोघां लढवय्यांमध्यें घुसली. अर्थात् आपलीं हत्यारें आवरून ते दोघेही मागें सरले. परंतु विक्रमसेनानें दुसऱ्या क्षणीं आपल्या बहिणीचा बुचडा धरून तिला मागें लोटून दिलें, आणि तो ओरडत म्हणाला,-' चल कारटे, दूर हो ! खबरदार मध्यें येशील तर ! ज्यानें तुला फुसलावून घरांतून बाहेर काढून येथें आणिलें, त्याचा मला समाचार घेऊं दे !'

आपलें मन पूर्णपणें थाऱ्यावर आणून मोठ्या दिमाखानें दमयंती आपल्या बंधूस म्हणाली,-'भाऊ, हें काय भलतेंच बोलतोस ! मी तुला सांगतें कीं तं माझा भाऊ असलास,

ओरडून म्हणाला,–'चल! हो बाजूत! मध्ये येशील तर खबरदार! मला आधी या नीचाचा प्राण घेऊं दे!!!' असें म्हणून त्यानें मोठ्या त्वेषानें शेखरावर वार केला.

त्याचा वार चुकवून शेखर म्हणाला,–'तूं जे अपशब्द उच्चारतोस तेच मी तुझे तुला परत करतों.' आपला प्रतिस्पर्धी क्रोधानें जळफळत आपल्याशीं कसेंबसें युद्ध करीत आहे, या संधीचा फायदा घेऊन त्याजवर आपल्या शस्त्राचा प्रत्यक्ष प्रहार होऊं न देतां शेखर त्यास म्हणाला,–'अगोदर या तुझ्या बहिणीच्या मुखांतून काय मुक्ताफळें गळत आहेत तीं ऐकून घे, म्हणजे नीच आणि अविचारी कोण, याचा उलगडा तुझा तुलाच करतां येईल.'

अतिशय चवताळून जाऊन शेखरावर अधिक जोरानें हल्ला करीत विक्रमसेन ओरडला,–'अरे भित्र्या! आतां भिऊन माझ्या बहिणीचें नांव बद्दू करूं पाहतोस काय?' परंतु हे शब्द त्याच्या मुखांतून पुरते बाहेर पडण्यापूर्वीच शेखराच्या युद्धकौशल्यामुळें त्याच्या हातांतील तरवार निसटून भिरभिरत त्याच्यापासून दहापंधरा हातांवर जाऊन पडली.

शेखर म्हणाला,–'जा, तुला जीवदान देतों, पण तुझ्या मनांत जो संशय आला आहे, तो प्रथम आपल्या बहिणीच्या मुखानें फेडून घे!' असें बोलून आणि तुच्छतेनें त्याला त्याच्या बहिणीकडे लोटून शेखर तेथून मागें फिरला. तो तडक महाद्वारापाशीं आला. इतक्यांत त्याला दुर्मुखाचें स्मरण झालें. दमयंतीला पिशाच समजून दुर्मुख घाबरून पडला, हें शेखरानें पाहिलें होतें; म्हणून प्रथमतः त्याला सावध करणें हें आपलें कर्तव्य आहे, असें ओळखून तो तत्काल मागें फिरला, आणि ज्या ठिकाणीं [illegible] होतें. शेखरानें त्याला चालविलें, उठून बसविलें, आणि त्याचीं कानशिलें चोळलीं. आणखी थोडेसे सावध करण्याचे प्रयत्न झाल्यावर दुर्मुखानें डोळे उघडिले, आणि तो अत्यंत भयभीत दृष्टीनें इकडे तिकडे पाहूं लागला. नंतर त्याला शेखराची ओळख पटली, आणि तो त्याच्या मुखाकडे दृष्टि लावून कंपितस्वरानें म्हणाला,–'महाराज! भयंकर, फारच भयंकर!'

शेखर म्हणाला,–'भिऊं नका,–तुम्ही उगीच भ्यालां–भिण्यासारखें वास्तविक कांहींच कारण नव्हतें.'

दुर्मुख भेदरलेल्या मुद्रेनें बोलला,–'महाराज, भूत–समंध–ती काळी आकृति–'

शेखर मध्येंच बोलला,–'भूत नाहीं, आणि समंध नाहीं. ती प्रत्यक्ष हाडामांसाची चालती बोलती स्त्री होती. मी तुम्हांस पुनः सांगतों, भिण्याचें कांहीं कारण नाहीं. चला, आपण आतां येथून परत जाऊं या. अजून तुमच्या मनांतील भीति कमी होत नाहीं? मी खरेंच सांगतों, तुम्ही भूत म्हणून समजलांत ती जिवंत स्त्री होती.'

दुर्मुखानें नीट बसून विचारलें,–'खरें कीं काय?'

शेखर म्हणाला,–'होय, अगदीं खरें. चला आपण आतां परत जाऊं या. पण तुमच्या अंगांतील शक्ति कमी झाल्यासारखी दिसते. यासाठीं माझा हात धरून हळुहळु चला.'

दुर्मुख म्हणाला,–'महाराज, आपल्या भाषणावरून माझ्या मनाची खात्री झाली आहे. आतां माझी भीति गेल्यामुळें माझें मन चांगलें ताळ्यावर आलें आहे. परंतु मला माझें सर्वांग गार पडलें आहे असें वाटतें. मी येथें किती वेळ पडलों होतों? त्यावेळीं भूत माझा पाठलाग करीत आहे, असें वाटून मी भेदरून मूर्च्छित पडलों.'

शेखर म्हणाला,–' निदान अर्धी घटका [illegible] घटकेमध्यें मला सुद्धां पुष्कळ त्रास सहन करावा लागला आहे. शिवाय आपण ज्या कामासाठीं येथें आलों होतों, तें काम झालें नाहीं तें नाहींच ! '

अगदीं आश्चर्यानें दुर्मुखानें विचारलें,–' काय म्हणतां ? ते आले नाहींत ? हें मोठें आश्चर्यच म्हणावयाचें. कारण मीं काल रात्रीं त्यांचा येथें येण्याचा बेत ठरला, हें प्रत्यक्ष ऐकिलें होतें; मग असें कसें झालें ? बरें, महाराज, आपणास सध्यां जो त्रास सहन करावा लागला तो कसला ? आपली मुद्रा देखील मला अगदीं फिकट व कोमेजलेली दिसते. मला चांदण्यामुळें तर असा भास होत नसेल ना ?'

शेखरानें चटकन् उत्तर केलें,–' माझी मुद्रा अशी दिसावी यांत कांहीं आश्चर्य नाहीं. अहो कारभारी, तुम्ही जिला भूत म्हणून भ्यालां ती स्त्री दुसरी कोणी नसून मला पत्र आणि अंगठी पाठविणारी तीच नीच स्त्री आतां येथें आली होती !

हें ऐकून दुर्मुख [illegible] राहिला आणि अत्यंत अ[illegible]यानें त्यास प्रश्न केला,–' म[illegible] हें सांगतां तरी काय ? '

शेखर बोलला, [illegible] तेंच सांगतों. '

दुर्मुख म्हणाला,–[illegible]ताच्या कोठडींत लपून बसली, [illegible] येऊन मला भिवविणारी ती [illegible] मला त्यावेळीं एकाया भुताप्र[illegible] राळ भासली–किंवा अ[illegible] एकादी स्त्री आपल्या न[illegible] माझ्या मनाची कल्पन[illegible] तिला पाहून भ्यालों असेन[illegible]

शेखर म्हणाला,–' तु[illegible] चांगला जिवंत हाडामांसाची [illegible] कोण हेंही मला समजलें आहे. तिचें नांव जर मी तुम्हाला सांगेन, तर तुम्हीं आश्चर्यानें गुंगच व्हाल. सुमच्यासारख्या इमानी गृहस्थापासून तें नांव गुप्त ठेवण्याची माझी इच्छा नाहीं, म्हणून सांगतों; ती स्त्री म्हणजे नारायणपुरकर, विक्रमसेनाची धाकटी बहीण दमयंती—'

दुर्मुखानें अत्यंत आश्चर्यानें मध्येंच विचारलें,–' कोण ! दमयंती ? ती आपल्यावर प्रेम करते ? असें व्हावें तरी कसें ? हें मोठें आश्चर्य आहे, यांत शंका नाहीं. '

शेखर म्हणाला,–' ही गोष्टीच काय, पण सध्या ज्या कांहीं गोष्टी घडून येत आहेत, त्या सगळ्याच आश्चर्याच्या आहेत. खरोखर सांगतों, सध्यां ज्या गोष्टी घडून येत आहेत, त्यांचा विचार करूं लागल्यास डोकें फिरून जाईल ! या शहरांत पाऊल ठेवल्यापासून मला जो त्रास होत आहे, आणि जें दुःख होत आहे, तसें दुःख आणि तसा त्रास एकाद्याला स्वप्नांत सुद्धां होणें शक्य नसेल ! मी प्रत्यक्ष शत्रूची मुळींच पर्वा केली नसती, पण सध्यां मला जो शत्रु गुप्तपणें छळीत आहे, त्याची फार भीति वाटते. उघड शत्रु पुरवतात, पण हे घरभेदे पुरवत नाहींत. त्या दमायंतीनें आतां मला गांठून लवळपणा सुरू केला, तोंच तिचा भाऊ विक्रमसेन तेथें येऊन ठेपला, आणि आतां नुकतेच त्याचे माझे दोन हात झाले ! '

दुर्मुखानें आश्चर्यानें विचारलें,–' काय ! आपलें आतांच विक्रमसेनाशीं द्वंद्वयुद्ध झालें ? पण महाराज, आपणास एकादी जखम तर लागली नाहींना ? '

शेखर म्हणाला,–" नाहीं. मीं त्याच्याशीं दोन हात करून त्याला निःशस्त्र केलें, पण त्याला सुद्धां जखम लागूं नये अशी मीं खबरदारी ठेविली होती. विक्रमसेनाचें क्रोधानें तेथें देहभान सुटलें होतें, म्हणून त्याचें रक्षण करणें हें माझें कर्तव्यच होतें. "

दुर्मुख म्हणाला,–'हा सगळा प्रकार मोठा चमत्कारिक दिसतो! आपली बहीण अपरात्रीं अशा भयंकर स्थळीं जाणार आहे, हें त्याला कसें समजलें?'

शेखर बोलला,–'मलाही राहून राहून आश्चर्य वाटतें तें याच गोष्टीचें. त्या बहीणभांवडांनीं एकमत करून आपला एकादा दुष्ट हेतु साध्य करण्यासाठीं तर हा प्रसंग जुळवून आणिला नसावा ना? अशीही शंका एकवार माझ्या मनांत आली; पण दमयंतीचें काय, किंवा विक्रमसेनाचें काय, त्यावेळचें एकंदर वर्तन पाहिलें, तर त्यांत कपट असावें असें दिसत नाहीं. ती अगदीं मनापासून माझ्याशीं प्रेमाच्या गोष्टी बोलत होती, आणि युद्ध करीत असतां विक्रमसेनाचें देहभान सुटलें होतें, यावरून त्यांनीं तो प्रसंग मुद्दाम जुळवून आणला असावा, असें दिसत नाहीं. विक्रमसेनाच्या मनांत कपट असतें, तर युद्धाचे वेळीं तो इतका बेभान झाला नसता. दुसरा तर्क असा वाहतो कीं, आपल्या बहिणीच्या वर्तनाबद्दळ त्याला संशय आला असून तो तिच्या पाळथीवर असावा, किंवा ज्यानें आमच्या पाळथीवर राहून आमच्या इकडे येण्याचीं वर्दी तिला दिली, त्यानेंच तिचाही विश्वासघात करून विक्रमसेनाला इकडे पाठविलें असावें. खरेंच सांगतों, मला आतां या शहराचा अगदीं वीट आला आहे. माझ्या स्वाधीनचें असतें, तर मी उद्यां सुद्धां प्रतापपुरचा रस्ता धरिला असता.'

दुर्मुख म्हणाला,–'आम्ही प्रतापपुर सोडलें, तेव्हां पुढें अशा गोष्टी घडून येतील असें आमच्या स्वप्नांत तरी आलें होतें का! बरें, पण मी आतां विचारतों, चोरीस गेलेल्या रकमेसंबंधानें पुढें विचार काय करणार?'

शेखर म्हणाला,–'तो सुद्धां मोठा प्रश्नच आहे! कदाचित् आपला तर्क चुकत असेल. म्हणूनापण भलत्याचाच संशय घेत असूं? किंवा आपणपण ज्याला चोर समजतों, तोच कदातत्काल या दमयंतीचा हस्तक असेल. किंवा तो चोर असूनही तिचा हस्तक असल्यामुळें आम्ही इकडे येण्यास निघालों, हें पाहून त्या शंभुसेनानें आपल्या सोबत्याची भेट दुसरीकडे कोठें तरी घेतली असेल! हें जर खरें असेल, तर मात्र चोरीचा पत्ता लागणें कठीण दिसतें. कारण त्यांचा आम्हास संशय आला, हें त्यांच्याही लक्ष्यांत आलें असल्यास ते सावध होतील, आणि मोठ्या धूर्तपणानें वागून आम्हांस फसवितील. कसेंही असो; मी सध्यां मोठ्या पेंचांत सांपडलों आहें, आणि झालेल्या एकंदर प्रकारांवरून माझ्यावर येणारीं हीं संकटें इतक्यावरच निभावतील असें दिसत नाहीं.'

दुर्मुख म्हणाला,–'महाराज, सध्यां आपणांवर चोहोंकडून संकटें येत आहेत, हें खरें, पण ईश्वराच्या कृपेनें हीं सर्व नाहींशीं होतील. संकटकाळीं आपलें धैर्य मात्र सुटतां नये.'

शेखर उत्साहपूर्वक बोलला,–'धैर्य? माझें केव्हांही नष्ट होणार नाहीं. तथापि या बाबतींत धैर्याचा काय उपयोग होणार? उघडपणें अंगावर चालून येणाऱ्या शंभर शत्रूंशीं लढावयाचा प्रसंग आल्यास मी आनंदानें तयार होईन; पण या गुप्त शत्रूंचा बंदोबस्त [illegible] धैर्य सोडूं नये असें तुम्ही [illegible], त्याचा भावार्थ मीं आपलें मन [illegible] असा असेल, तर मी त्या [illegible], परंतु माझी मनोदेवता माझा [illegible] कीं, मी जोंपर्यंत या [illegible] आहें, तोंपर्यंत माझ्या मनाला [illegible] मिळणारच नाहीं. दुसरा [illegible] मीं या शहरांतच राहावें, [illegible] सक्त ताकीद नसती, तर [illegible] पुरीं गेलों असतों!'

[illegible],–'महाराज, आपल्या [illegible]ला आणि निराशा पाहून [illegible]न आहे. आपलें मन इतकें [illegible] आपल्याला इतका त्रास होत [illegible] सर्व चमत्कारिक गोष्टींनीं

आपल्या अंतःकरणास किती यातना होत असतील, याचें मला चांगलें अनुमान करतां येत आहे. खरेंच सांगतों, असले प्रसंग वैऱ्यावरही येऊं नयेत ! '

शेखर उद्विग्नतेनें म्हणाला,–' सध्याच्या प्रसंगीं आपलें दैव फिरलें, किंवा आपल्यास अनिष्ट ग्रह आले आहेत, असें मनांत आल्या- वांचून राहील काय ? म्हणजे पहा–चोरी तर झाली--प्रेमानें वेडी झालेली एक पोरगी तर हात धुऊन माझ्या पाठीस लागलीच आहे, तिच्या भावाला तर [illegible]लें–त्यानें तिला फुसलावण्याचा [illegible] माझ्या माथीं मारला–आणखी [illegible]प्रकार येथें घडून आला अ[illegible]यीं उजाडलें नाहीं तोंच भल[illegible] उठतील; हें तर व्हावयाचेंच आ[illegible]नंतर एक दीर्घ श्वास सोडून तो म्हणाला,–' अशाप्रकारची स्थिति प्राप्त झाली असतां माझ्या मनास सुख वाटणें शक्य तरी आहे काय ! '

यावर दुर्मुखानें कांहींच उत्तर दिलें नाहीं. त्याच्या त्या स्तब्धतेवरून आपण या विषयां- संबंधानें बोलणें आतां पुरें करावें, असें त्याच्या मनांत असावें, असें शेखरास वाटलें शेखराचा स्वभाव मोठा उदार असल्यामुळें त्यानें आपल्या मनाप्रमाणेंच दुर्मुखाचें मन कोवळें असावें असें आपल्याशींच ठरविलें आणि थोड्या वेळापूर्वी दुर्बलीची गांठ पडली तेव्हां त्याच्या मनाविषयीं आपल्या मनांत शंका आली याचें त्यास वाईट वाटलें. आपल्या विश्वासू नोकराच्या इच्छेप्रमाणें शेखरानें पुढें कांहींच भाषण केलें नाहीं. ते दोघेही आनंद मठांतून बाहेर पडले. थोड्या वेळापूर्वी घडून आलेल्या गोष्टींचा विचार करण्यांत शेखराचें मन चूर झालें होतें. त्या विचारामध्यें, विक्रमसेनानें आपणांस केलेल्या आरोपाचें पूर्ण समाधान केल्यासिवाय आपण घाईघाईनें त्याच्या जवळून निसटून आलों, ही गोष्ट बरी केली नाही, असा एक विचार त्याच्या मनांत उद्भवला. तथापि, झालेल्या एकंदर प्रकारावरून आ[illegible]दम निसटून आलों यांत[illegible]ालें, असें त्यास वाटलें ना[illegible].

उत्तरोत्तर त्याचें [illegible]क शांत होत चाललें, आणि [illegible]आलेल्या प्रसंगासंबंधानें [illegible]मनाशींच म्हणाला,–' दोघां[illegible]स्तरी होणार. ती दमयंती [illegible]झालेल्या प्रकारासंबंधानें [illegible]प्रकार निवेदन करील, किंवा [illegible]न तरी धारण करील. ति[illegible]र त्याला कळविलें, तर [illegible]ची अब्रू राखण्या- साठीं तो [illegible]ल. परंतु तिनें [illegible]असल्यास झाले[illegible]न घेतां तो [illegible]खरीज [illegible]रांशीं [illegible]सो; [illegible]। '

[illegible]चे विचा[illegible] झपाट्यानें[illegible]ळ उचलून येत होता, आणि दुर्मुख [illegible] त्याच्या मागून चालला हो[illegible]. दोघे वृषपर्ताच्या वाड्यापाशीं [illegible] कोणाच्या नजरेस पडल्या खेरीज ते[illegible] शयनस्थानाकडे गेले. शयनमंदिरां[illegible] शेखर एकदम आपल्या बिछान्यावर[illegible] त्याला मानसिक आणि शारीरिक अ[illegible] प्रकारचे अतिशय श्रम झाले होते, [illegible] निद्रा येण्यापूर्वी बराच वेळ त्याला तळ[illegible] पडावें लागलें.

बऱ्याच वेळानें त्याला झोंप लागली, पण लागलाच स्वप्नास प्रारंभ होऊन नुकत्याच घडून आलेल्या गोष्टींची स्वप्नामध्यें पुनरा- वृत्ति झाली. आणखी कित्येक त्रासदायक प्रकार स्वप्नामध्यें त्याच्या दृष्टीस पडले, पण ते सर्व येथें न सांगतां त्यांतील महत्त्वाचे भाग येथें थोडक्यांत सांगतों. त्याला आपण प्रतापपुरीं गेलों असें वाटलें. तेथें कांहीतरी दुःखानें गांजलेली प्रियंवदा त्याच्या

[redacted]पण तिच्या पुढें बराच वेळ [redacted]द्धां ती आपणाकडे पाहात [redacted]याला मोठें आश्चर्य वाटलें, [redacted]आलिंगन देण्यासाठीं पुढेंझाला, [redacted]कोणी मध्यें येऊन त्यानें त्या[redacted]ढकलून दिलें, त्यामुळें तो [redacted]आपणास अशा-रीतीनें ढकल[redacted]हें शेखर पाहूं लागला, तेव्हां [redacted]चूडामणी आपणापुढें [redacted]आहे, असें त्यास आढळून [redacted]निमग्न झाला. हळुहळू [redacted]प्रियंवदा यांच्या आ[redacted]त्याच्या डोळ्यांपुढून [redacted]प्रकारें स्वप्न सं[redacted]गाढ झोंप ला[redacted]

[redacted]त्या[redacted]नो[redacted]होतें, [redacted]होता. [redacted]होतांचि [redacted]या स्वप्नाचें स्मरण झालें [redacted]संगावर रोमांच उभे राहिले. [redacted]युद्धानंतर सुंदरपुरच्या राज-[redacted]जन्याच्या खोलींत चूडामणी-[redacted]या भाषणप्रसंगाचीही त्याला [redacted]ाली, आणि प्रियंवदेवर आपल्या [redacted]वाचेंही प्रेम आहे, ही गोष्ट ध्यानीं [redacted]याला अतिशय खेद झाला.

प्रकरण २९ वें.

बहीण आणि भाऊ.

आतां आपण जरा मागें वळून विक्रमसेन आणि दमयंती यांचें वर्तमान काय झालें, तें पाहूं. आपल्या हातांतील तरवार उडून जाऊन आपला पूर्ण पराजय झाला, या गोष्टीच्या खेदानें विक्रमसेनाचें मन क्षणभर गोंधळून गेलें, त्याचा सर्व क्रोध एका क्षणांत नाहींसा झाला आणि मानभंगामुळें तो लज्जित झाला. आपल्याहून लहान वयाच्या कोंवळ्या पोरानें आपला असा पराभव करावा, याचें त्याला मोठें आश्चर्य वाटलें. दमयंती त्याजकडे टक लावून पाहत होती, आणि झालेल्या अपमानाचें उट्टें काढण्यासाठीं तो आतां आपला पुरा छळ करणार अशी तिच्या मनाची खात्री होऊन चुकली होती. तथापि या प्रसंगास तोंड देण्यास तिची तयारी होती. तो आपली फजीति करील, [redacted]तिला अगदीं भीति वाटत नव्हती [redacted]त्याच्या तोंडास तोंड देऊन [redacted]काढल्यास ती त्याचीं वर्मे [redacted]एका पायावर तयार झालेली [redacted]कमसेनाच्या सुंदर चेहऱ्यावर मानभंगा[redacted]काय प्रेतकळा आली होती, आणि त्याच्या मनांत जे जे विकार उत्पन्न होत होते, त्यांची छटा पूर्णपणें त्याच्या मुद्रेवर उमटली होती. सुमारें पांच चार पळें अशा रीतीनें विचारमग्न होऊन जागच्याजागीं स्तब्ध राहिल्यानंतर प्रथम जेथें आपली तरवार पडली होती, तेथें जाऊन ती त्यानें उचलली आणि तिला म्यान केलें. नंतर तो आपल्या बहिणीपाशीं येऊन रागानें तिला म्हणाला,–'दमयंती, हा काय प्रकार आहे, याचा उलगडा तुझ्या मुखानें झालाच पाहिजे.'

आपल्या मुखमंडलावर विखुरलेले मस्तकावरील केश मागें सारून, मोठ्या तोऱ्यानें ताठ उभी राहून आणि अगदीं न डगमगतां धिटाईनें तिनें उलट सवाल केला,–'माझ्या मुखानें कसला उलगडा झाला पाहिजे?'

हा तिचा उद्धटपणा पाहून विक्रमसेनाला पुनः क्रोध आला, आणि तो हातपाय आपटत म्हणाला,–'मला उलट कसला उलगडा म्हणून विचारतेस? मीं काय विचारतों तें आपणास समजत नाहीं, असें ढोंग करतेस? अशा अपरात्रीं आणि अशा भयंकर स्थळीं येतांना तुला आपल्या कुलाचें

अगदींच कसें विस्मरण झालें ! ज्यांच्याशीं आमचें पिढीजाद वैर चालत आहे, त्या प्रतापपुराच्या घराण्यांतील एका कारट्याशीं गुलगुल गोष्टी सांगत असतां आपण कोण, याची तुला अगदींच कशी विस्मृति झाली ! त्या कारट्यानें आतां जातांना जे उद्गार काढले, त्यावरून काय सिद्ध होतें ? या बाबतींत त्याचा काडीमात्र अन्याय नसून तूंच बेशरमपणानें त्याच्या मागें लागली आहेस, असेंच सिद्ध होतें ! तूं इतकी निर्लज्ज होण्यापूर्वी आपण कोण, कोणत्या कुलांत आपला जन्म झाला, याचा कांहीं तरी विचार करावयाचा होतास ? ज्यांनीं नुकताच आमचा पराभव केला, ज्यांनीं आमच्याकडून खंडणी घेतली, ज्यांनीं आमच्याकडून अपमानकारक अशा तहनाम्यावर जुलमानें सह्या घेतल्या, त्या प्रतापपुरकरांपैकींच एका कारट्यावर प्रेम करतांना तुझी अक्कल गेली होती तरी कोठें ? '

अगदीं न कचरतां आपली दृष्टि आपल्या भावाच्या दृष्टीस भिडवून उद्धामपणानें दमयंती म्हणाली,–' खरी गोष्ट तुझ्यापासून लपवून ठेवण्याची माझी अगदीं इच्छा नाहीं, आणि तुजपासून खरी गोष्ट लपवून ठेवण्याची मला जरूरीही वाटत नाहीं.'

आपला क्रोध आवरण्यास अगदीं असमर्थ होऊन विक्रमसेनानें विचारलें,–' तर मग सांग तर कायतें. एकदां काय तीं मुक्ताफळें तुझ्या तोंडांतून बाहेर पडूं देत ! आजच्या रात्रीं जो हा प्रसंग घडून आला आहे, तो अगदीं क्षुल्लक आहे, अशी तर तुझी समजूत नाहीं ना ! '

दमयंती म्हणाली,–' ऐकतर ! अगदीं थोडक्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे इतकेंच कीं, माझें शेखरावर पूर्णपणें प्रेम जडलें आहे, आणि मी त्याच्याशीं असलेल्या परंपरागत वैराची बिलकुल पर्वा करीत नाहीं. '

रागानें पुनः पाय आपटीत व हात चोळीत विक्रमसेन म्हणाला,–' तुझ्यासारखी दुर्दैवी कारटी साऱ्या जगांत सांपडावयाची नाहीं ! तुझें दुर्दैव एकाच परीनें ओढवलें आहे असें नाहीं; सर्वतोपरि तूं अगदीं दुर्दैवी आहेस. तूं आपल्या शत्रूवर मन ठेवलेंस हें तुझें, पहिलें दुर्दैव ! ज्यानें आमचा नुकताच अपमान केला, आणि ज्याच्या रक्तानें आम्ही आपल्या कीर्तीवरील डाग धुवून काढण्याच्या प्रयत्नांत आहों, त्याच्यावर तूं प्रेम ठेवलेंस हें तुझें दुसरें दुर्दैव ! आणखी तूं ज्याच्यावर प्रेम ठेवलेंस त्याचें एका स्त्रीशीं लग्न ठरलें आहे, हें तुझें तिसरें दुर्दैव ! '

दमयंती मध्येंच म्हणाली,–' असा कांहीं तरी प्रकार असेल असा माझा पूर्वीच तर्क होता. शिवाय आतां शेखराशीं झालेल्या भाषणांवरूनही माझ्या त्या तर्कास बळकटी आलीच होती. खरें सांग, त्याचें लग्न खरेंच कां ठरलें आहे ? '

विक्रमसेन जळफळत म्हणाला,–' होय, होय ! त्याचें वृषपतीच्या नातीशीं–प्रियंवदेशीं–लग्न ठरलेलें आहे, व हीं गोष्ट मला माहीत असल्यामुळेंच त्याचें आतांचें भाषण मला अगदीं खरें वाटलें. '

किंचित् हलक्या आणि विचारयुक्त स्वरानें दमयंती म्हणाली,–' तर मग ती प्रियंवदा माझ्या मार्गांत अडचण आहे ! ' नंतर ती आपल्याशींच पुटपुटली,–' असें जर आहे, तर त्याला खुद्द ही गोष्ट माहीत आहे यांत शंकाच नाहीं. मग त्यानें ही गोष्ट मजपासून कशी बरें चोरून ठेविली ? '

विक्रमसेन तिच्या अंगावर खेंकरून म्हणाला,–' आतां अशी पुटपुटतेस काय ? काय तें मोठ्यानें बोल ! '

दमयंतीनें एकदम जोरानें विचारलें,–' आधीं हें सांग, मी आतां येथें आलें आहें, हें तुला कसें समजलें ? '

खरी हकीकत आपल्या बहिणीस सांगावी कीं सांगूं नये, याचा विक्रमसेनानें आपल्याशीं क्षणमात्र विचार केला; पण खरें

सांगावयास त्याला कोणतीच हरकत दिसली नाहीं. शिवाय आपली थाप जर तिला रुचली नाहीं, तर तीही आपल्याशीं मोकळ्या मनानें पुढें बोलेणार नाहीं, असें मनांत येऊन, त्यानें तिला खरी हकीकत सांगण्याचा विचार ठरविला. तो म्हणाला,–'मी आज सायंकाळीं काळोख पडण्याचे सुमारास बाहेरून वाड्यांत परत येत असतां आमच्या वाड्याच्या दाराजवळ मला एक माणूस भेटला, व त्यानें माझ्या हातीं एक पत्र दिलें. हें पत्र देणारा कोण ''असावा हें पाहण्यासाठीं मी त्याच्याकडे पाहूं लागलों, पण तो तितक्यांत नाहींसा झाला, त्यामुळें त्याचा चेहरा-मोहरा माझ्या दृष्टीस पंडला नाहीं. मी तें पत्र कोणाकडून आलें असावें हें पाहूं लागलों, पण त्याखालीं किंवा त्यामध्यें पत्र लिहिणाराचें नांव नव्हतें. फक्त तूं शैखराच्या नादीं लागून आज मध्यरात्रीं येथें, येणार आहेस, एवढाच, मजकूर त्या पत्रांत होता. तेव्हांपासून माझी तुझ्या सर्व कृत्यांवर नजर होती. तूं वाड्यांतून काळा बुरखा घेऊन एकटी बाहेर पडलीस, हें पाहिल्याबरोबर तुला मुद्यावर पकडण्यासाठीं मी तुझ्या मागोमाग येथें आलों.'

थोडा वेळ विचार करून दमयंतीनें विचारलें,–'हें पत्र आणून देणारा कोण असावा, याचा तुला कांहींच थांग लागला नाहीं ?'

विक्रमसेन म्हणाला,–'अगदीं नाहीं. मीं तें पत्र हातीं घेतलें, आणि त्यावर साहजिकपणें थोडावेळ माझी दृष्टि थांबली. नंतर पुनः मी त्या माणसाकडे पाहूं लागलों, त्या वेळीं त्याची पाठ मजकडे होती आणि काळोख बराच पडला असल्यामुळें मला तो मनुष्य कोण हें अगदीं दिसलें नाहीं.' नंतर पूर्वीहून अधिक जोरानें त्यानें विचारलें,–'पण तुझा हा प्रश्न काय म्हणून ? तुला कोणाचा संशय येत आहे कीं काय ?'

दमयंती म्हणाली,–'तें मला सध्यांच सांगतां येत नाहीं. परंतु मला वाटतें, आपण आतां वाड्यांत जावें हें बरें.'

विक्रमसेन म्हणाला,–'माझ्या मनाचें पुरतें समाधान झाल्याखेरीज मी परत जाणार नाहीं, आणि तुलाही येथून जाऊं देणार नाहीं. तुझा हा मूर्खपणा किती पल्ल्यास पोंचला आहे, हें आधीं मला पहिल्यानें समजलें पाहिजे. त्या कारट्यानें आज जो माझा अपमान केला आहे, तो मी अगदींच विसरून जाईन, असें तुला वाटतें काय ? पण कोणतीही गोष्ट करण्यापूर्वी आपण आपल्या पायांखालीं काय जळत आहे, हें पहावयास नको काय ? त्याच्याकडे जर कोणत्याही प्रकारचा अपराध नसेल, तर त्याच्याशीं तंटा करूं करतां येईल ? यासाठीं झालेलें वर्तमान तुझ्या मुखानें मला पुरतें समजलेंच पाहिजे. तूं आपल्या तोंडाला किती काळोखी लावून घेतली आहेस, आणि ही गोष्ट कितीकांना समजली आहे, याचा मला आधीं निकाल करून घेतला पाहिजे. काळतोंडे पोरी, सध्यां तुझी अब्रू त्या कारट्याच्या हातीं आहे. आणि त्याच्या एका शब्दानें आमच्या कुलाच्या कीर्तीस केवढा कलंक लागेल, याचा तिळमात्र विचार तरी तुझ्या मनास शिवला आहे काय !'

दमयंतीनें उत्तर केलें,–'माझें त्या तरुणावर प्रेम जडलें आहे, आणि जरी त्यानें माझा अपमान केला आहे, माझ्या प्रेमाचा तिरस्कार केला आहे, तरी'—

रागानें कराकर दांत खात विक्रमसेन म्हणाला,–'हे शब्द प्रत्यक्ष माझ्या बहिणीच्याच मुखांतून बाहेर पडत आहेत काय या प्रतापपुरकरांनीं आमचा पदोपदीं अपमान करावा, आणि तो आम्ही नामर्दीप्रमाणें मुकाट्यानें सहन करावा काय ? लढाईंत अपमान ! प्रेमांत अपमान ! खंडण्या, भलभलत्या अटींचे तह, कैद वगैरे बाबतींत झालेल्या अपमानावर जणूं काय शिसरच

अशा प्रकारें प्रत्यक्ष आमच्या घराण्यांतील स्त्रियांची अब्रू त्यांचे हातीं जावी ! आपली अब्रू दुष्टाच्या हातीं देण्यापेक्षां तूं मेली असतीस तरी बरें झालें असतें. तूं आमच्या कुलांत जन्म घेतला नसतास, तर कांहीं आमचें कुल नष्ट झालें नसतें ! दुष्टे, आधीं मला सांग, तूं आज येथें कां आली होतीस. तूं त्याला निरोप पाठवून बोलाविलेंस कीं त्यानें तुला फूसलावून येथें आणिलें ? हा तुझा प्रेमसंबंध आणखी किती जणांस माहीत आहे ? तुझी मान त्याच्या हातीं कितपत सांपडली आहे ? तूं त्याला प्रणय-पत्रिका लिहिल्या आहेस कीं काय ? उद्यां त्यानें तुझी अब्रू चव्हाट्यावर आणली, तर त्याला आपलें म्हणणें प्रमाणानें सिद्ध करतां येण्यासारखीं साधनें त्याच्या हातीं सांपडली आहेत कीं काय ? तुझे निरोप त्याला पोंच-विणारीं कोणी माणसें साक्षी देण्यास पुढें येण्याचा संभव आहे कीं काय ? बोल, बोल काय तें लवकर, आणि मला एकदां माझ्या मनांतलि संशय घालवूं दे ! एकदां तुझ्या मुखांतून या प्रश्नाचें नाहीं, असें उत्तर येऊं दे, कीं मी त्याला द्वंद्वयुद्धाचें आह्वान केलेंच म्हणून समज ! आजचा प्रसंग वेगळा होता. माझें मन थाऱ्यावर नव्हतें, म्हणून आयत्यावेळीं माझ्या तरवारीनें मला दगा दिला. पण मी खात्रीनें सांगतों, पुनः प्रसंग बेतल्यास माझ्या तरवारीचें पाणी त्या दुध-खुऱ्या पोराच्या अनुभवास आणल्याखेरीज राहणार नाहीं ! '

हें विक्रमसेनाचें आवेशयुक्त भाषण चालू असतां दमयंती आपल्याशींच विचार कर-ण्यांत निमग्न झालेली होती. हें त्याचें भाषण संपल्यावर ती म्हणाली,–'भाऊराया, झाल्या गोष्टींसंबंधानें अधिक घासघीस करण्यांत हांशील नाहीं. तूं म्हणतोस तितक्या सर्व गोष्टी झाल्या आहेत. शिवाय या बाबतींत माझी बरीच फसगत झाली आहे. मीं ज्याच्यावर विश्वास ठेविला, त्यानें माझा घात केला आहे. ज्या म विश्वास दाखवून माझ्यापासून द्र त्यानेंच आयत्यावेळीं आप करून घेण्याकरितां माझा गळ व म्हणूनच ही गोष्ट तुझ्या कानीं

क्रोधानें थरथर कांपत असतां आवाज घोगरा निघत असतां वि विचारलें,–'बरें, झालें इतक्यानेंच तूं येणार, कीं तुझे चाळे असेच पुढें राहणार ? '

दमयंतीनें त्याच्या क्रोधाची पर्वा न करितां उद्धटपणानें उत्तर दिलें,–' माझ्या मनास वाटेल तसें मी वागेन ! माझी पंचा-ईत करण्याची तुला जरूर काय ! '

आपल्या तरवारीस हात घालून विक्रमसेन म्हणाला,–' तोंड आटप ! अजून शुद्धीवर ये ! नाहीं तर रागाच्या भरांत माझ्या हातून भल-तेंच कांहीं तरी कृत्य घडेल ! '

एकाद्या नागिणीप्रमाणें फणफणत दम-यंती म्हणाली,–' एवढी मला भीतीशी घालतोस ? माझें तूं काय करशील ? फार फार तर माझा प्राण घेशील ! याहून अधिक तूं काय करणार आहेस ? माझा प्राण घेतलास तर तुझी कीर्ति दिगंत गाजेल, यांत शंका नाहीं ! माझ्यासारख्या स्त्रीचा प्राण घेणें हा कांहीं लहानसहान पुरुषार्थ नव्हे.'

क्रोधाची परमावधि झाल्यामुळें स्तिमित होऊन विक्रमसेन म्हणाला,–' अवदसे, तुला स्त्री म्हणेल कोण ? जिनें आपल्या कुलास कलंक लाविला, आणि आपल्या स्त्री–जातीची लाज–लज्जा भीड–मर्यादा गुंडाळून ठेविली, तिला स्त्री असें कसें म्हणावें ! निर्लज्जे, तुझा शेखराशीं विवाह होणें शक्य नाहीं हें तर ठर-लेलें आहेच; परंतु तूं आपला कुलाभिमान सोडून स्वयंवर केलास, तरी देखील तुला आपल्या सवतीची दासी बटीक होऊन राहावें लागणार याची तुला कांहींच का शरम वाटत नाहीं ? '

ाभिमानानें म्हणाली,–'सवत! ग प्राण गेला तरी मला सहन . प्रेमाचा प्रभाव किती विलक्षण वी जर तुला कल्पना असली, तोंडांतून असे शब्द निघालेच ापल्या मार्गातील अडथळे कसे दूर प्रेमाला चांगलें माहीत आहे. तेंच ार्ग साफ करून देईल! त्या प्रियं- ा मीं कधीं पाहिलें नाहीं, असें नाहीं. ज्याला म्हणून डोळे आहेत, त्याला ती सुंदर आहे कीं मी सुंदर आहें, त्याचा निवाडा करतां आलाच पाहिजे! ती माझ्यापुढें किती दिमाख करणार! शेखराच्या पूर्वीच्या भाषणा- वरून त्याचें त्या दुधखुळ्या पोरीवर मन जडलें आहे, असें दिसतें; तें त्याचें मन तिच्यावरून मागें फिरवून आपल्याकडे वळ- वून घेईन, तरच मी नांवाची दमयंती! असें माझ्या हातून झालें, तरच त्यांत माझा मोठेपणा! जोरदार शत्रूबरोबर लढून संपादन केलेला विजय तोच खरा विजय! जितके एकाद्या कामांत अडथळे अधिक, तितकेंच सर्व अडथळे बाजूला सारून तें काम करणाराचें कौशल्य अधिक! आज- पर्यंत अडथळे आले हे कांहींच नव्हत! याहून भयंकर असे आणखी सहस्रावधि अडथळे आले, तरी त्यांना न जुमानतां मी आपले हेतु साध्य करीनच करीन! भाऊ, तुला प्रेमाचा–खऱ्याच प्रेमाचा– नुसता विटाळ सुद्धां झालेला नसल्यामुळें प्रेमाचें सामर्थ्य किती अचाट आहे हें तुला माहीत नाहीं, नाहीं तर तुझ्या तोंडांतून असे उद्गार कधींच बाहेर पडले नसते!' असें बोलून ती अभिमानी स्त्री एखाद्या नागिणी प्रमाणें फूत्कार करीत आपले तेजस्वी नेत्र आपल्या भावावर रोंखून त्याजकडे पाहत उभी राहिली.

विक्रमसेन हें तिचें भाषण अगदीं शून्य अंतःकरणानें ऐकत होता. कारण यावेळीं तिचें अवसान–तिचा जोर–तिची ऐट–तिचा स्वर–ह्या सर्वांचा अतिरेक झालेला असल्या- मुळें यापुढें तिच्याशी कोणत्या रीतीनें वागावें, हें त्याला सुचेनासें झालें होतें. तिचा तापट आणि अभिमानी स्वभाव त्याला पूर्णपणें माहीत होता, पण सध्यां तो स्वभाव जि- तक्या कळसास चढलेला त्याला दिसून आला, तसा यापूर्वी त्याला कधींच दिसून आलेला नव्हता. म्हणून तो तिला म्हणाला,– 'तर मग तुझा निश्चय झालेलाच आहे! बरें; तूं त्या प्रियंवदेपेक्षां सुंदर आहेस हें मी घटकाभर कबूल करतों; पण या तुझ्या सौंदर्याचा शेखराच्या अंतःकरणावर ठसा उमटेलच असें कशावरून? आणि समज, यदाकदाचित् त्याचेंही प्रेम तुझ्यावर बसलें, तर तूं आपल्या मातेला, आपल्या चुलत्याला व आपल्या भावाला धाब्यावर बसवून त्यांच्या जळफळाटाची-त्यांच्या शिव्या–शापांची पर्वा न करितां–आपला कुलाभिमान सोडून देऊन प्रत्यक्ष आमच्या शत्रूला वरशील?'

दमयंतीनें एकदम उत्तर दिलें,–'होय! अवश्य वरीन!'

पुनः क्रोधानें दांत ओंठ खात विक्रमसेन म्हणाला,–'अवदसे! तूं इतकी शेफरलीस कशानें? मी जिवंत असून हा प्रकार डोळ्यांनीं पाहत असतां, मी तुला मनसोक्त वागूं देईन, असें समजतेस कीं काय? असें असेल तर तो तुझा भ्रम आहे! आजपासून मी तुझा कट्टा वैरी आहें, हें ध्यानांत ठेव! मलाही त्या प्रतापपुरकरांचा सूड घ्यावयाचा आहे, समजलीस?'

दमयंती दिमाखानें म्हणाली,–'फार फार झालें, तर तूं मला साह्य न करतां स्वस्थ बसशील, पण माझ्या बेतांत अडथळे घाल- ण्याची तुझी छाती नाहीं, हेंही तूं पक्कें ध्यानांत ठेव, नाहींतर विसरशील!'

दमयंतीच्या या भाषणाचा रोख काय आहे, हें विक्रमसेनाच्या एकदम ध्यानीं आलें नाहीं; म्हणून रागानें दांत–ओठ खात त्यानें विचारलें,–'काय म्हणतेस? काय

बोलावयाचें असेल तें स्पष्ट बोल! असें मुग्ध नको!'

तिनें उत्तर केलें,--'मी स्पष्ट बोलावें अशी तुझी इच्छा आहे, तर स्पष्टच ऐक. यापुढें तुला योग्य दिसेल त्या मार्गानें तूं जा; मी त्यांत अडथळा उत्पन्न करणार नाहीं. तसेंच मला जो मार्ग योग्य दिसेल तो मी धरीन त्यांत तूं अडथळा करूं नये. इतका वेळ मीं तुझें सर्व बोलणें मुकाट्यानें ऐकून घेतलें. मी उगीच राहिलें, म्हणून तूं जास्तच चढत चाललास! मलाही तुझ्यासारखें बोलतां येत नाहीं, असें तूं समजतोस? कुलाभिमानाचे एवढे दिमाख माझ्यापुढें कशाला दाखवितोस? तूं त्या आनंदीशीं विवाह करण्यास तयार झाला आहेस, तो त्या वाणगटाचें कुळ आणि तुझें कुळ बरोबरीचें आहे, म्हणूनच झाला असशील? रणमत्त काकांची संमति मिळविण्यासाठीं तूं सागरदत्ताच्या कुळासंबंधानें ज्या त्यांच्यापाशीं थापा मारल्यास, त्या सर्व खऱ्याच असतील नव्हे? या गोष्टी कोणाला सांगतोस! मी तुझ्याहून पांच चार वर्षांनीं लहान असलें, म्हणून मला या गोष्टी समजत नसतील असें समजूं नको! तुझा स्वभाव किती आपलपोट्या आहे, आणि सागरदत्ताची संपत्ति घशांत यावी म्हणूनच तूं त्याच्या पोरीशीं-आपला कुलाभिमान बाजूस गुंडाळून ठेवून-लग्न करण्यास प्रवृत्त झाला आहेस, तुझें तिच्यावर काडीभर सुद्धां प्रेम नाहीं, जुगार खेळतांना तुझे कंठ्या गोफ कितीदां गहाण पडले आहेत, या गोष्टी मला अगदींच माहीत नाहींत असें समजतोस कीं काय? थांब, मध्यें बोलूं नको-तूं यापुढें माझ्या वाटेस तर जा, कीं या सगळ्या गोष्टी सागरदत्ताच्या कानावर गेल्याच समज! माझ्या तोंडून एक शब्द निघण्याचा अवकाश, कीं तुझ्या सर्व आशा जागच्या जागींच जिरून गेल्या असें समज! तुझें खरें स्वरूप काय आहे, हें ओळखिल्यावर आपल्या एकुलत्या एक मुलीच्या जन्माची राखरांगोळी करावयास सागरदत्त कबूल होईल, असें तुला वाटत असेल तर ती तुझी अगदीं चूक आहे! आणि कदाचित् सागरदत्त कबूल झाला असें गृहीत धरलें, तरी आनंदी तुझ्याशीं विवाह करावयास तयार होईल काय? तुझ्यावर तिचें प्रेम जडलें आहे या घमेंडींत तूं असशील, पण तुझी ती घमेंड व्यर्थ आहे! प्रेम हें प्रेमाचीच अपेक्षा करीत असतें, त्याला व्यक्तीची किंवा बाह्य देखाव्याची जरूर नसते! तुझें प्रेम आपणावर नाहीं, असें तिला समजलें म्हणजे ती पुनः तुझें मुखावलोकन देखील करणार नाहीं! म्हणून तुला पुनः सांगतें, कीं तूं वाटेल तर मला साह्य करूं नको, स्वस्थ बस! पण जर तूं माझ्या मार्गांत विघ्नें आणूं पहाशील, तर मी कोणत्या ना कोणत्या मार्गानें आतां बोलून दाखविलेल्या गोष्टी प्रत्यक्ष करून दाखविण्यास मागें सरणार नाहीं! तर सांग; तूं यापुढें माझ्याशीं मित्रत्वानें वागणार कीं शत्रुत्वानें वागणार!'

हें भाषण ऐकत असतां विक्रमसेनाच्या अंगाचा क्रोधानें भडका उडाला होता; त्याचे नेत्र गुंजेसारखे लालभडक झाले होते आणि मुद्रा एकाद्या राक्षसाप्रमाणें क्रूर दिसूं लागली होती. अशा स्थितींत आपल्या तरवारीस हात घालून तो तीस म्हणाला,-'दमयंती, आपल्या हातून भलती सलती गोष्ट होऊं नये म्हणून मीं इतका वेळ आपलें मन कसें बसें आंवरून धरिलें होतें. पण आतां मात्र माझा क्रोध मला सहन होत नाहीं! मी आतां-यावेळीं-याक्षणीं तुझा शिरच्छेद करणार, तूं आतां आपलें रक्षण कसें करून घेतेस तें पहातों!'

अगदीं न डगमगतां शांतपणें दमयंती बोलली,-' तुझी विवेकशक्तीच माझें रक्षण करील! माझा प्राण घेण्यापूर्वी अनेक प्रकारचे विचार तुझ्या मनांत उद्भवतील. पहिल्यानें आपण करतों हें भयंकर पातक आणि

नाहींपणाचें कृत्य आहे, असें तुझ्या मनांत येईल. दुसऱ्यानें तुला शेखराचें भय वाटेल. कारण तूं येथें आलास तो कोणत्या उद्देशानें आला होतास, हें त्यास पक्कें माहीत आहे, व तूं जर माझा प्राण घेतलास तर हें कृत्य तुझेंच आहे, असा डंका तो साऱ्या नगरांत वाजवील. कदाचित् मला ठार मारून येथें खाडा खणून तूं माझें प्रेत पुरून टाकशील, पण तेवढ्यानें हा खून तुला जिरेल असें समजूं नको. कारण मी अमक्या दिवशीं एकाएकीं नाहींशी झालें, ही गोष्ट सहज सिद्ध होईल, आणि असें झाल्यावर तूंच माझा प्राण घेतलास, हें सिद्ध करावयास शेखरास अगदीं पंचाईत पडणार नाहीं !'

विक्रमसेन पुष्कळ शांत होऊन म्हणाला,-'मी त्या शेखराला भितों असें मात्र समजूं नको. माझ्या हातून असलें भयंकर कृत्य होणार नाहीं, हेंच खरें ! परंतु मी आतां तुला शेवटचें विचारतों, त्या शेखरासंबंधानें तुझ्या मनांत जे विचार घोळत आहेत, त्यांत फरक पडावयाचा नाहींना ? कोणत्याही गोष्टीनें तुझें मन फिरणार नाहीं काय ?'

दमयंतीनें उत्तर केलें,-'नाहीं !'

विक्रमसेन म्हणाला,-'पहा, नीट विचार कर ! मी तुझा वडील बंधु-तुझ्या पायां पडतों, तुझ्यापुढें पदर पसरतों, तुझी करुणा भाकतों, अजून विचार कर ! हें तुझें कृत्य अगदीं मूर्खपणाचें आहे. या कृत्याचा परिणाम दुःखकारक होणार, हें वज्रलेखाप्रमाणें सत्य समज ! अजून आपल्या कुलाकडे आणि स्वतांच्या कीर्तीकडे नजर दे !'

अत्यंत तिरस्कारयुक्त दृष्टीनें त्याजकडे पाहत दमयंती म्हणाली,-'आतां हा पोरखेळ पुरे नाहीं का झाला ? तुझ्या अशा प्रकारच्या विनवण्यांनीं फसावयाला मी त्या सागरदत्ताची कन्या आनंदी आहें, असें का तूं समजतोस ? आतां प्रत्यक्ष ब्रह्मदेव जरी आकाशांतून खालीं उतरला, तरी माझा बेत फिरवयाचा नाहीं. मग तुझ्यासारख्या मानवाची कथा काय ! माझा निश्चय पक्का झालेला आहे, आणि तो कालत्रयीं देखील फिरावयाचा नाहीं. शेखरावर माझें निश्चळ प्रेम जडले आहे, आणि तेंच मला पुढील मार्ग दाखवील ! मी हर प्रयत्न करीन आणि आपली इच्छा पूर्ण करून घेईन ! चल तर; आतां येथें बोलत बसण्यांत काय हंशील आहे ?' असें बोलून ती चालूं लागली.

ती कांहीं तरी उद्देशानें आपणास बोलावीत आहे, असें विक्रमसेनास वाटलें, आणि तो तिच्या मागून मुकाट्यानें निघाला. ती तेथून निघाल्यावर थेट मठाच्या अघाडीस आली, आणि आपला भाऊ आपणांबरोबर येत आहे, अशी खात्री करून घेण्यासाठीं तिनें एकदां मागें वळून पाहिलें. नंतर ती एकदम मठांत शिरली आणि समाधीपाशीं जाऊन तेथें ती हात जोडून उभी राहिली.'

नंतर दृढनिश्चय युक्त मुद्रेनें आणि स्वरानें तिनें बोलावयास प्रारंभ केला. ती म्हणाली,-'भाऊ, मी काय बोलतें तें स्पष्टपणें ऐकून घे. कित्येक शतकांपूर्वी याच मठामध्यें आणि याच समाधीसमोर एका गृहस्थानें शपथ वाहिली होती, तिचा परिणाम काय झाला, हें सर्वांस माहीतच आहे. मी आतां याच मठामध्यें, आणि याच समाधीसमोर शपथ घेणार आहें, तिला माझें मन, येथें अदृश्य रूपानें वास करणारीं पिशाचें, आणि ज्यांची ही समाधि आहे तो सत्पुरुष हे तर साक्षी आहेतच, पण यांशिवाय जिवंत साक्षीदार तूं हो ! माझी अशी प्रतिज्ञा आहे कीं, माझ्या देहांत प्राण आहे तोंपर्यंत शेखर आणि प्रियंवदा यांचा विवाह मी होऊं देणार नाहीं. आणि यदाकदाचित् झालाच तर मी प्रथम त्या दोघांचा प्राण घेईन आणि नंतर आपला प्राण देईन ! ही माझी प्रतिज्ञा पूर्ण करण्याची मी या समाधीपाशीं शपथ वाहतें. ही माझी प्रतिज्ञा पूर्ण करण्यास येथें असलेल्या अदृश्य शक्तींनीं मला साह्य करावें, अशी माझी त्यांजपाशीं विनंति आहे !'

विक्रमसेन बोलला,–' भयंकर ! फारच भयंकर ! ही तुझी प्रतिज्ञा फारच भयंकर ! '

अगदीं शांतपणें दमयंती म्हणाली,–' तसें तुला वाटणें साहाजिक आहे, आणि असें तुला वाटलें, तरच माझ्या या प्रतिज्ञेचें महत्त्व!'

विक्रमसेनही आपल्या अंगामध्यें जणुं काय अगम्य शक्तीचा संचार झाला आहे अशा रीतीनें विलक्षण हातवारे करीत म्हणाला,– ' तूं अशा प्रकारची प्रतिज्ञा करीत असतां मी अगदीं स्वस्थच बसूं काय ? छेः छे ! मी कधींही स्वस्थ बसणार नाहीं ! यापुढें मी तुझा पक्का हितचिंतक किंवा कट्टा वैरी आपणलोंच पाहिजे ! यापुढें तुझें मन फिरविण्याचा यत्न करणें हें व्यर्थ आहे. भगिनी, तूं आतां केलेली ही भयंकर प्रतिज्ञा तुला एकटीला कशी सत्य करतां येणार ? एखादे वेळीं तुझ्या प्राणावर संकट येण्याचा सुद्धां संभव आहे ! ज्याअर्थीं शेखराला वरण्याचा तुझा दृढनिश्चय झाला आहे, त्याअर्थीं तुझ्या प्राणासाठीं, तुझ्या स्वतांच्या अब्रूसाठीं आणि आमच्या कुलाच्या कीर्तिसाठीं मला या गोष्टींत मन घालणें भाग पडत आहे ! तुझ्या कल्याणासाठीं आणि कुलाच्या कीर्तिसाठीं मान–अपमान, शत्रुत्व, मित्रत्व, सदसद्विवेक वगैरे सर्व गोष्टी गुंडाळून ठेवणें मला भाग आहे. त्या शेखराचें मन आपल्याकडे वळवून घेण्याचा प्रयत्न करीत असतां तुला पदोपदीं अपमान सहन करावा लागेल आणि अनेक प्रकारचीं संकटें तुला सोसावीं लागतील; तीं माझ्यानें कशीं पाहवतील ? सख्यांचा काळच मोठा विपरीत आहे; अशा प्रसंगीं आपले सर्व मनोविकार गुंडाळून ठेवून मीही या सत्पुरुषाच्या समाधीसमोर तुझ्या साक्षीनें तुझ्या प्रमाणेंच अशी प्रतिज्ञा करतों कीं, ' आजपासून तुझ्या प्रत्येक कृत्यामध्यें मी तुला मनोभावानें साह्य करीन ! यापुढें तुझे शत्रु ते आपले शत्रु आणि तुझे मित्र ते आपले मित्र असें मी समजेन, आणि तुला कोणतेंहि उणें पडूं देणार नाहीं. '

आनंदानें आणि विजयश्रीनें जिची मुद्रा प्रफुल्लित झालेली आहे, अशी ती दमयंती उत्साहानें म्हणाली,–' आतां मात्र तूं माझा भाऊ शोभतोस खरा ! हें तुझें सयुक्तिक भाषण ऐकून मला आनंदाच्या गुदगुल्या होत आहेत. तूं मला साह्य झालास, आतां मात्र माझे सर्व हेतु सिद्धीस जाणार यांत शंका नाहीं. '

विक्रमसेन म्हणाला,–' एकदां माझा दृढ निश्चय झाला, कीं तो कालत्रयीं देखील फिरावयाचा नाहीं. आतां आपण पूर्वीचें सर्व विसरून जाऊं या पूर्वी आपण परस्परांचें शत्रुत्व करण्यास सिद्ध झालों होतों, पण आतां मित्र झालों आहों, हें फार चांगलें झालें.'

अशा प्रकारें त्या बहीण–भावंडांनीं भयंकर प्रतिज्ञा केल्या; नंतर त्या वेळीं व त्या स्थळीं त्या दोघांनाही कोणतेंच कर्तव्य उरलेलें नसल्यामुळें त्यांनीं शहराकडे जाण्याचा विचार केला, आणि तीं दोघें हातांत हात घालून आनंदमठांतून बाहेर आलीं. तेथून शहरापर्यंतची एक कोसाची मजल मारतांना त्यांचें फारसें भाषण झालें नाहीं, तीं दोघें ज्या वेळीं आपल्या वाड्यांत येऊन पोंचलीं, त्या वेळेपूर्वी बराच वेळ वाड्यांतील सर्व माणसें झोंपीं गेलेलीं असल्यामुळें कोणाच्या नजरेस न पडतां तीं दोघें आंत शिरलीं.

नंतर विक्रमसेन दमयंतीस म्हणाला,–'दमयंती, उद्यां उजाडल्यानंतर आपण पुनः भेटूं आणि आपापले हेतू साध्य करावयासाठीं कांहीं उपायांची योजना ठरवूं. '

दमयंती म्हणाली,–'ठीक आहे. आतां यापुढें मला झोंप लागेल हें तर मनांत सुद्धां आणावयास नको. पडल्यापडल्या मी बेत योजून ठेवितें, आणि ते बरोबर आहेत कीं नाहींत, यांचा आपण उद्यां खल करूं. तुला सुद्धां आज झोंप लवकर लागेल असें

मला वाटत नाहीं, म्हणून तूं सुद्धां एकादी युक्ति सुचली तर पहा.'

असें बोलून तीं दोघें पावलें न वाजवितां आपापल्या शयनमंदिरांकडे चालतीं झालीं.

प्रकरण ३० वें.

आणखी एक जोखीम.

आणखी तीन दिवस लोटले; परंतु चोरीस गेलेल्या खंडणीच्या रकमेचा किंवा चोराचा पत्ता शेखराला मुळींच लागला नाहीं. दुर्मुखानें आपल्या धन्याच्या आज्ञेप्रमाणें शंभुसेनावर पाळथ ठेविली होती, पण व्यर्थ. तसेंच दमयंती किंवा विक्रमसेन यांचें कांहींच वर्तमान शेखराच्या कानावर आलें नाहीं, म्हणून त्याही बाबतीचा शेवट झाला, असें तो आपल्या मनांत समजत होता. चोरीचा आज पत्ता लागेल, उद्यां लागेल, अशा समजावर त्यानें ती गोष्ट अजून आपल्या वडिलांस कळविली नव्हती. तो वडिलांकडून येणाऱ्या उत्तराची वाट पाहत होता. आपले वडील आपणास लवकरच प्रतापपुरीं परत बोलावितील, अशी त्याची कल्पना होती. तसें झाल्यास आपण चोरी-संबंधाची सर्व हकीकत प्रत्यक्ष आपल्या मुखानेंच वडिलांस कळवावी, हें बरें; असें त्यास वाटत होतें, आणि अशा प्रकारचें वर्तमान पत्रोपत्रीं लिहून कोणाचें समाधान व्हावयाचें नाहीं, अशी त्याची समज असल्यामुळें त्यानें इतके दिवस पत्रही लिहिलें नव्हतें. या तीन दिवसांत तो फिरावयासाठीं म्हणून बाहेर जात असे, परंतु वाड्यांतून बाहेर पडल्यावर जेथें गेल्यास दमयंतीची भेट व्हावयाची नाहीं, अथवा झाल्यास तिला आपल्याशीं बोलत बसण्याचा प्रसंग मिळणार नाहीं, अशा ठिकाणीं तो फिरावयास जात असे.

मागील प्रकरणांत सांगितलेला प्रसंग घडून आल्यावर चौथे दिवशीं प्रतापपुराहून खलिता घेऊन एक जासूद आला. त्यानें दिलेली थैली शेखरानें मोठ्या उत्कंठेनें उघडली, आणि तींत प्रियंवदेचें पत्र असेल म्हणून तो मोठ्या आतुरतेनें पाहूं लागला, पण त्याची निराशा झाली. थैलींत प्रियंवदेचें पत्र नव्हतें. थैलींत फक्त एकच पत्र असून, तें आपल्या पित्याच्या आज्ञेवरून एका कारकुनानें लिहिलेलें आहे, असें शेखरास आढळून आलें. शेखरानें मोठ्या घाईनें तें पत्र वाचून पाहिलें. प्रियंवदेचें आपणांस पत्र कां नाहीं, याचा उलगडा या पत्रावरून होईल, असें त्यास वाटत होतें, पण त्या पत्रांत तिचें नांव देखील नव्हतें. " तुझें पत्र पोंचलें, आणि खंडणी वसूल झाल्याचा मजकूर समजला. खंडणीच्या द्रव्यांतून पत्रांतील यादीबरहुकूम जिन्नस खरेदी करून ते भाड्याच्या घोड्यांवरून पाठवून द्यावे; बरोबर सुरक्षितपणासाठीं दुर्मुखाची रवानगी करावी; तूं इतक्यांत प्रतापपुरीं परत येऊं नये; आणखी कांहीं आठवडे तेथें राहून सरदार हलधरासंबंधानें आणि प्रस्तुत सुरू असलेल्या राजकारणा-संबंधानें बारकाईनें माहिती काढून ती वरचेवर प्रतापपुरीं कळवीत जावी. तसेंच भृगुकच्छ शहरांतील वजनदार लोकांचें आणि सरदार–मानकऱ्यांचें या प्रकरणा-संबंधानें कोणाचें कसें मत आहे, हें खुलासे-वार पण मोठ्या सावधपणानें लिहून कळवावें; कांहीं महत्त्वाचें इतर वर्तमान तेथें घडून आल्यास तें अगदीं विलंब न करतां आपणास लिहून कळवावें. सध्यां लोकांत बोलवा आहे त्याप्रमाणें रत्नाकर महाराजांना पदच्युत करून त्याची गादी बळका-विण्याचा निंबराजाचा खरोखरच मानस असेल, तर ह्या राज्यक्रांतीचा इष्टानिष्ट परिणाम काय होईल, याचा अंदाज करणें हें फार जरुरीचें असल्यामुळेंच तुला कांहीं

दिवस भृगुकच्छ शहरीं ठेवणें फार अगत्याचें वाटत आहे; " अशा आशयाचा मजकूर त्या पत्रामध्यें होता. या पत्रांतील शब्द-रचनेवरून आपल्या पित्यानें जसे शब्द उच्चारिले, तसेच्या तसेच ते कारकुनानें लिहिले आहेत, असें शेखराला आढळून आलें. पत्रांतील भाषेमध्यें प्रेमाचा लवले शही दिसत नसून तीमध्यें बहुतेक आज्ञा आहेत, आणि त्या आज्ञा फारशा सौम्य-पणानें केल्या नसून एकाद्या करड्या धन्यानें आपल्या सामान्य प्रतीच्या नोकराला जसें लिहावें, तशा रीतीनें तें पत्र अथपासून इतिपर्यंत लिहिलेलें आहे, हें पाहून शेखराला फार आश्चर्य वाटलें, आणि वाईटही वाटलें.

होय. अशा प्रकारचें तें पत्र वाचून शेखराला फार खेद झाला. प्रियंवदेचें पत्र कां आलें नसावें? तिनें आळसानें पत्र लिहिलें नसेल, असें त्याच्या मनांत येणें शक्यच नव्हतें. तिची प्रकृति तर बिघडली नसेल ना? किंवा कदाचित् कोणाच्या गफलतीमुळें आपलें पत्र तिला आणि तिचें पत्र आपणांस मिळालें नाहीं? कीं तिच्या-संबंधाची हकीकत लिहिण्याचें वडिलांस विस्मरण झालें? अशा प्रकारच्या शंका मनांत आल्या असतां ज्या स्वप्नांत प्रियंवदा आणि चूडामणि हीं दृष्टीस पडलीं होतीं, त्या स्वप्नाची त्याला आठवण झाली. तो जरी फाजील देवभोळा नव्हता, तरी या प्रसंगीं तें स्वप्न म्हणजे पुढील भविष्याचें दर्शक तर नसेलना, असें त्याच्या मनांत आल्या-खेरीज राहिलें नाहीं. प्रियंवदेचें कांहींच वर्तमान 'पत्रामध्यें' नसल्यामुळें त्याची निराशा होऊन त्या निराशेमुळें अनेक प्रकारच्या विपरीत कल्पना त्याच्या मनांत उद्भवूं लागल्या, आणि आतां आपण पुढें काय करावें याचा त्याला उमज पडेनासा झाला. आपल्या वडिलांनीं आपणांस जें पत्र लिहिलें, तें इतकें करड्या भाषेनें कां लिहिलें असावें? आपणांकडून त्यांच्या मनास दुःख होण्यासारखें व नसेलना? कीं आपल्या वडिल वरचें प्रेम कमी व्हावें म्हणून को चालले आहेत? अशा प्रकारचे प्रश्न मनांत उद्भवल्यावर त्याला चूडा स्मरण होणें हें साहजिक होतें; त आपल्या सख्ख्या भावासंबंधानें आपल्य मनांत कुकल्पना उत्पन्न व्हाव्या, ही गोष्ट त्याच्या सरळ आणि उदार मनास बरी वाटली नाहीं. पण तो तरी काय करणार? सुंदरपुरच्या राजवाड्यांत जो प्रकार घडून आला होता, त्याचें विस्मरण सान्या जन्मांत तरी त्याला होणें हें शक्य होतें काय! तसेंच आपणास एक दोन वेळ चूडामणि-संबंधानें जीं स्वप्नें पडलीं होतीं त्यांत कांहीं अर्थ नसेल असें त्याला कसें वाटावें? या-संबंधानें तो जों जों अधिक विचार करूं लागला, तों तों त्याचें मन अधिकाधिक भडकून तो अगदीं त्रासून गेला.

याशिवाय त्या शहरामध्यें आणखी कांहीं दिवस मुक्काम करण्याविषयीं त्याला जी पित्याची आज्ञा झाली होती, तीही त्याला फार दुःखदायक वाटली यांत नवल नाहीं. जेव्हां तो प्रतापपुराहून इकडे याव-यास निघाला, तेव्हां दृढसंधाच्या बोल-ण्यावरून आपणांस येथें बरेच दिवस काढावे लागतील असें जर त्याला समजलें असतें, तर त्याला इतकें वाईट वाटलें नसतें. व आपणास आणखी कांहीं दिवस येथें राहण्याची आज्ञा करावी, हें वडिलांस मागा-हून सुचलें असावें, कीं अशी आज्ञा कर-ण्याविषयीं त्याचे कोणीं मागाहून कान भरले असावे? तो स्वतां उदार दिलाचा पुरुष असल्यामुळें कोणी लबाडी केली असेल, अशा कल्पनेला आपल्या मनांत थारा देणें हें त्याला योग्य वाटेना. तथापि एकदां जे संशय त्याच्या मनांत उत्पन्न झाले, ते एकदम नाहींसे होणें शक्य नव्हतें. सध्यां आपण मोठ्या विलक्षण प्रसंगांत सांपडलों

कित्येक गुप्त शत्रु आंपल्या
हेत, याबद्दल मात्र त्याच्या
ची होऊन चुकली होती.

ांच्या आज्ञेप्रमाणें त्याला त्या
आणखी कित्येक दिवस राहणें भाग
, म्हणून तेथें राहून सरदार हलधराच्या
धासाठीं प्रथम आपला वेळ खर्ची घाला-
वयाचा असें त्यानें ठरविलें. हा हेतु सिद्धीस
नेण्यासाठीं त्याला त्या शहरांतील बडे
लोकांत मिसळणें जरूर होतें. पत्रांतील
दुसरी गोष्ट जी खरेदीची, ती मात्र पुरी
करणें द्रव्याच्या अभावामुळें सिद्धीस नेणें
त्याला अगदीं अशक्य होतें. आज ना उद्यां
आपल्याला कांहीं तरी सुगावा लागेल, असें
जरी त्याला वाटत होतें, तरी चोरीची
बातमी यापुढें आपल्या वडिलांस कळ-
विण्याखेरीज त्याला दुसरा मार्गच नव्हता.
म्हणून त्यानें पत्र लिहिण्यास प्रारंभ करून
अकल्पित रीतीनें चोरी झाल्याचें वर्तमान
आपल्या वडिलांस लिहिलें; इतकेंच नव्हे,
तर आपण येथें आल्यापासून आपल्या
संबंधानें दुसऱ्या पुष्कळ विलक्षण गोष्टी
घडून आल्या आहेत; परंतु त्या पत्रीं
लिहितां येत नाहींत, असेंही त्यानें
वडिलांस कळविलें. कदाचित् आपलें पत्र
भलत्याच माणसाच्या हातीं लागल्यास
त्याला त्या गोष्टी समजतील, आणि त्याचा
परिणाम फार वाईट होईल, अशासाठीं त्यानें
त्या गोष्टी स्पष्टपणें पत्रांत लिहिल्या नव्हत्या.
तसेंच आलेलें पत्र अगदीं तिऱ्हाईतपणानें
लिहिल्यासारखें दिसत होतें, या गोष्टीचा
उल्लेख त्यानें पत्रामध्यें करून आपल्यावरील
प्रेमांत व्यत्यय आला नसेल अशी त्यानें
इच्छा प्रकट केली. प्रियंवदेचें त्या पत्रांत
मुळींच नांव नसल्यामुळें त्यानें आपल्या
पत्रांत तिच्या संबंधानें थोडासा मजकूर
लिहिला. त्याशिवाय त्यानें तिला एक चिठी
लिहून ती त्याच पत्राबरोबर जासुदाबरोबर
रवाना केली. आपल्यास पत्र न लिहिल्या-
बद्दल शेखरानें तिला सौम्य शब्दांनीं थोडा
दोषहि दिला होता.

हें पत्र दुर्मुखापाशीं देऊन त्यालाच परत
पाठवावें, हें जरी याप्रसंगीं इतर गोष्टींचा
विचार करतां योग्य होतें, तरी शंभुसेनावर
पाळथ राखण्यासाठीं त्याची शेखरास जरूर
असल्यामुळें त्यानें यावेळीं त्याला प्रतापपुरीं
पाठविलें नाहीं. त्यानें भाडोत्री जासुदा-
बरोबर हें पत्र प्रतापपुरीं रवाना केलें. हें
पत्र लिहिल्यामुळें चोरीसंबंधानें एक मोठें
थोरलें आपल्या शिरावरील ओझें हलकें
झालें असें मनांत येऊन त्याला समाधान
वाटलें. आपलें पत्र प्रियंवदेला पोंचल्यावर
तिच्याकडून आपणास बरीच हकीकत सम-
जेल, अशी आशा त्याच्या मनांत
उत्पन्न झाली.

हें पत्र रवाना केल्यावर त्या दिवशीं
तिसरे प्रहरीं शेखरानें बहुमोलाचे वस्त्रालंकार
अंगावर धारण केले, आणि त्या शहरांतील
आपल्या ओळखीच्या एका थोर गृहस्थाच्या
भेटीसाठीं तो घरांतून बाहेर पडला. शेखर
ज्याला भेटावयास गेला तो गृहस्थ दृढसंध
आणि वृषपति या दोघांच्याही उत्तम
परिचयाचा असल्यामुळें, त्याच्यापाशीं
आपण आपले हेतु प्रगट केल्यास विश्वास-
घात होण्याची भीति नाहीं, अशी शेखराच्या
मनाची खात्री होती. शिवाय त्या गृहस्थाचें
शहरामध्यें पुष्कळ वजन असल्यामुळें,
त्याच्या मार्फत आणखी कित्येक राजपुरुषां-
पाशीं आपल्या भेटी होतील आणि आपला
कार्यभाग आपणाला पार पडतां येईल, असें
शेखरास वाटत होतें. या गृहस्थास दोन पुत्र
होते; ते दोघेही जवळ जवळ शेखराच्याच
वयाचे असल्यामुळें, शेखरानें त्यांचें सख्य
संपादन केलें; त्या गृहस्थाचे ते मुलगे
आजच आणखी एका मानकऱ्याकडे जाव-
याचे असल्यामुळें त्यांनीं शेखराला आपल्या-
बरोबर बोलाविलें; शेखराला आपल्या मनां-
तील उद्देश साध्य करावयाचा होता, म्हणून

त्यानें स्वतंत्र आमंत्रणाची फारशी पर्वा न करतां त्यांजबरोबर जावयाचें ठरविलें. ते तिघे तरुण ज्या गृहस्थाकडे गेले. तो फार सज्जन असल्यामुळें शेखराचें त्यानें उत्तम आदरातिथ्य केलें. शहरांतील दुसऱ्या कित्येक गृहस्थांशीं स्नेह करण्यास या गृहस्थाचा चांगला उपयोग होईल अशी आशा या भेटीनें शेखराच्या अंतःकरणांत उत्पन्न झाली. सायंकाळचे सुमारास शेखर आपल्या दोघां तरुण सोबत्यांबरोबर त्यांच्या घरीं परत आला, आणि त्यांची रजा घेऊन तो एकटाच वृषपतीच्या वाड्याकडे येऊं लागला. तो सुमारें शे दोनशें पावलें गेला असेल नसेल, तोंच दोन माणसें आपल्या मागून येत आहेत, असें त्याच्या दृष्टीस पडलें. सध्यां काळोख पडूं लाल्यामुळें, आणि तो सध्या ज्या रस्त्यावरून चालला होता, त्या रस्त्याच्या बाजूस मोठमोठे वृक्ष असल्यामुळें, आपल्या मागून येत असलेल्या माणसांचे चेहरे शेखराच्या दृष्टीस पडले नाहींत. ते दोघे आपल्या मागून येत आहेत कीं काय, हें पाहण्यासाठीं शेखरानें पुढील पांचचारशें पावलांमध्यें दहापांच वेळां मागें वळून पाहिलें; प्रत्येकवेळीं ते दोन्ही मनुष्य त्याच्या दृष्टीस पडले, आणि ते आपला पाठलाग करीत आहेत, याबद्दल त्याच्या मनांत आलेला संशय दृढ झाला. आपली खात्री करून घेण्यासाठीं शेखरानें मुद्दाम आपला सरळ मार्ग सोडून उगीच भलभलते रस्ते धरले, तरी सुद्धां आपल्या मागें असलेलीं माणसें आपल्यास सोडून जात नाहींत, असें त्याला आढळून येऊन तीं आपला पाठलाग करीत आहेत, अशी त्याच्या मनाची पक्की खात्री झाली. आपण त्या माणसांपाशीं जाऊन तुम्ही माझा पाठलाग कां करीत आहां, असें त्यांस विचारावें असें एकदां शेखराच्या मनांत आलें, पण न जाणो आपला संशय खोटा ठरल्यास रस्त्यामध्यें तंट्याचा प्रसंग यावयाचा, आणि कदाचित् आपली इच्छा नसतां आपल्या हातून रक्तपात व्हावयाचा, असें त्याच्या मनांत येऊन त्यानें आपला तो बेत सोडून दिला. अशा रीतीनें बराच वेळ रस्ता चालल्यावर तो वृषपतीच्या वाड्याच्या कोंपऱ्यावर येऊन पोंचला. त्याच सुमारास ते दोघे पाठलाग करणारे शेखराच्या अंगावरून पुढें झाले, आणि जवळच्याच एका गल्लींत शिरले. यावेळीं त्या दोन्ही मनुष्यांच्या तोंडावर काळ्या वस्त्राचीं आच्छादनें आहेत, असें शेखराला आढळून आलें, आणि त्यास परमावधीचें आश्चर्य वाटलें.

शेखर आपल्याशींच म्हणाला,—'या लुच्चांनीं आपल्या तोंडावरचीं आच्छादनें वेळींच काढून टाकलीं नाहींत, तर हे कोणातरी राजपुरुषाच्या दृष्टीस पडतांच ते यास कैद केल्याखेरीज राहणार नाहींत. व हे लचांड जर माझ्याशीं दांडगाईस आले, तर मीहि त्यांचा खरपूस समाचार घेतल्याखेरीज राहणार नाहीं. कदाचित् हे त्या दंमयंतीचे हस्तक तर नसतीलना?'

असें बोलत शेखरानें आपलीं सर्व हत्यारें आपल्यापाशीं आहेत, अशी आपली खात्री करून घेतली, व आपल्या तरवारीचा बंदही त्यानें सोडून ठेविला. या कामांत त्याचें लक्ष्य वेधलें आहे, इतक्यांत तोंडावर बुरखे घेतलेले मनुष्य ज्या गल्लींत शिरले होते, त्याच गल्लींतून कोणी कर्कश शीळ फुंकल्याचा आवाज त्याच्या कानीं पडला, आणि त्यानें आपली दृष्टि तिकडे लावून तो त्या दिशेकडे बारकाईनें पाहूं लागला. त्यानें आपला एक हात तरवारीस घातला होता, हें सांगणें नकोच; पण तितक्यांत त्याचें ज्या बाजूकडे अगदीं लक्ष्य नव्हतें, त्या बाजूनें—म्हणजे पाठच्या बाजूनें चार जवान एकदम त्याच्या अंगावर पडले. त्यानीं क्षणार्धाचा विलंब न करतां शेखराच्या हातांतील तरवार एकदम काढून घेतली, आणि त्यांनीं त्याला जोरानें आंवळून धरिलें. आपल्या मागें आणखी कोणी शत्रु असतील अशी त्याच्या मनांत

शंकासुद्धां नसल्यामुळें आपल्यावर तिकडून संकट येणार, हें लक्ष्यांत येण्यापूर्वीच तो शत्रूच्या हातीं पुरता सांपडला.

त्याला पकडणाऱ्यांपैकीं एकजण म्हणाला,–"भिऊं नका; तुम्हीं जर गडबड केली नाहीं, तर तुमच्या एका केंसालाही धक्का लागणार नाहीं."

शेखर मदतीसाठीं ओरडणार होता, पण तितक्यांत त्याला पकडणारांपैकीं एकानें त्याच्या तोंडावर एकदम रुमाल टाकून तो मागच्या बाजूला गच्च आंवळून टाकला, त्यामुळें त्याच्या तोंडांतून शब्द बाहेर येणें अशक्य झालें. इतकें झाल्यावर त्यांनीं त्याच्या डोक्यावर एक आच्छादन घालून तें त्याच्या कमरेजवळ बांधून टाकलें. त्यामुळें त्याला कांहींच दिसत नाहींसें झालें. तसेंच त्यांनीं त्याचे हातही मागल्या बाजूला बांधून टाकिले; पण ते त्याला पीडा होण्यासाठीं बांधिले नसून, त्याला आपल्या हातांचा उपयोग करतां येऊं नये, इतक्यासाठींच ते त्यांनीं बांधिले होते. त्याला पकडणारांनीं त्याच्यावर हल्ला केल्यापासून दहा पांच पळांच्या आंतच त्याला हतवीर्य केलें.

नंतर सर्वांनीं शेखराला गराडा देऊन ते त्यांला आपणांबरोबर घेऊन चालले. एक दोन गल्ल्यांतून जात असतां शेखराला आपण कोठें जात आहों याचा थोडासा अंदाज होता; पण पुढें त्याला घेऊन जाणारांनीं त्याला इतक्या आडव्या तिडव्या मार्गांनीं चालविलें होतें कीं, आपण सध्यां कोठें जात आहों, हें शेखराच्या मुळींच लक्ष्यांत येईनासें झालें. त्याला जरी त्या शहराची पुरी माहिती होती, तरी अशा स्थितींत त्याची दिशाभूल झाली, यांत नवल नाहीं. बराच वेळपर्यंत त्याला पकडून नेणारांच्या मुखांतून कोणत्याही प्रकारचा शब्द बाहेर पडला नव्हता; पण कांहीं वेळानें त्यांच्यापैकीं एकजण म्हणाला,–'ते पहा नगररक्षक इकडे येत आहेत!'

हे शब्द त्यांच्या मुखांतून बाहेर पडल्याबरोबर बाकीच्यांनीं त्वरा करून ते सर्वजण शेखरासह जवळच्या बोळांत शिरले. त्या बोळांत गेल्यावर एका काळोखाच्या जागीं त्याला उभा करून पकडणारांपैकीं एकानें त्याच्या तोंडावर आपला हात गच्च धरिला. अशासाठीं कीं, जरी शेखरानें ओरडण्याचा प्रयत्न केला, तरी त्याचा शब्द तोंडावर बांधलेल्या फडक्यांतून बाहेर पडूं नये. आपण दांडगाई केल्यास तिचा आपणांस कांहीं उपयोग ध्हावयाचा नाहीं, अशी शेखराच्या मनाची खात्री होती. आपणास पकडणारे निदान पांच असामी तरी आहेत, हें त्याच्या ध्यानीं आलें होतें. शिवाय आपणांस पकडणारे लोक दांडगे आहेत, व आपण दांडगाई केल्यास कदाचित् ते आपला प्राण घेण्यासही कमी करणार नाहींत, अशी शंका त्याच्या मनांत आली होती. परंतु ते कोण असावे, आणि त्यांनीं आपणांवर अशा रीतीनें जुलूम कां केला असावा, याचें कारण मात्र त्याच्या ध्यानीं आलें नव्हतें. हें दमयंतीचेंच कारस्थान आहे, कीं आपण या शहरीं आल्यापासून आपणांवर जीं संकटें आलीं, त्यांत भर घालण्यासाठीं हें एकादें नवीन संकट उपस्थित झालें आहे, याचा त्याला उमज पडेना. सध्यांचें संकट आपल्या प्राणांवर नाहीं, एवढें मात्र त्याला कळलें होतें. कारण आपला प्राण घेण्याची जर आपल्या शत्रूंची इच्छा असती तर त्यांनीं आपणांस जागच्या जागींच ठार केलें असतें. आपणांस पकडून इतक्या दूर आणण्याचे श्रम त्यांनीं घेतले नसते. शिवाय आपणांस अशा रीतीनें पकडणारे लोक सरकारी नाहींत, हींही गोष्ट त्याच्या ध्यानीं आली होती. कारण ते जर सरकारी लोक असते, तर त्यांना नगररक्षकांस भिऊन पळण्याचें कारण नव्हतें.

पांच चार पळांच्या आंतच नगररक्षक आपल्या मार्गानें निघून गेले, हें पाहतांच

शेखराला पकडणारांनीं त्याच्यासह पुनः आपला मार्ग धरिला. ते सध्यां जीं वळणें घेत होते, त्यांवरून आपण अद्यापि शहरांतच आहों, असा शेखरानें तर्क केला. कारण ते जर शहराबाहेर आले असते, तर त्यांना इतकीं वळणें घेण्याचें कारण नव्हतें. या तर्कावरून आणखी एक तर्क त्याच्या मनांत आला, तो असा;–त्यांनीं आपणांस ज्या ठिकाणीं पकडिलें तीं जागा शहराच्या मध्यभागीं असल्यामुळें तेथून कोणत्याही दिशेनें आपणास सरळ पुढें नेलें असतें, तर आपण यावेळीं शहरांतील कोणत्याही ठिकाणीं पोंचलों असतो. इतकेंच नव्हे; तर आपण शहरा बाहेरच्या भागांत आलों असतों. असें असतां ज्या अर्थीं अजून आपल्या मुक्कामाची जागा येत नाहीं, त्याअर्थीं आपल्यास घोटाळ्यांत घालण्यासाठीं–पुनः आपण प्रयत्न करूं लागल्यास ती जागा आपणांस सांपडूं नये म्हणूनच–त्यांनीं मुद्दाम आपणांस अशा रीतीनें चालविलें आहे; यावरून त्यांचें आपणाशीं जें कांहीं काम असेल तें उरकल्यानंतर आपणांस सोडून देण्याची त्यांची इच्छा आहे, एवढी मात्र कायती त्याच्या मनांत समाधान करावयास जागा होती. तथापि आपणांस अशा रीतीनें कोठें नेत असावे, आणि कोणत्या उद्देशानें नेत असावे, याचा मात्र त्याला तर्क करितां येईना.

आणखी थोड्या वेळानें त्यांचा प्रवास संपला. आपणांस पकडून नेणारांपैकीं कोणी तरी आपल्या हातांतील तरवारीच्या मुठीनें दरवाजा ठोठावला, असें शेखराच्या लक्ष्यांत आलें. थोड्याच वेळानें दरवाजा उघडल्याचा कर्कश ध्वनि त्याच्या कानीं आला, आणि आपले सोबती आणि आपण त्या दरवाज्यांतून आंत शिरत असून आपल्या पायांखालीं फरसबंदी जमीन आहे, असा त्यानें तर्क केला. आपण आंत येतांच आपल्या मागें दरवाजा बंद झाला, हेंही त्याच्या ध्यानांत आलें. इतक्यांत आणखी एक दरवाजा उघडला. तीन पायऱ्या चढून गेल्यावर त्या दुसऱ्या दरवाज्यांतून शेखर आंत गेला. तेथील जमीन त्याच्या पायांस फार गुळगुळीत लागली. अर्थात् आपण सध्या एका इमारतींत आलों आहों, असें एकदम त्याच्या ध्यानीं आलें. त्याच्या सोबत्यांनीं त्याला पुढें चालविलें होतें व पांचचार दरवाज्यांतून त्याला जावें लागलें, पण प्रत्येक वेळीं दरवाजा उघडण्यापूर्वी दारांवर धक्के मारावे लागले, यावरून आपण सध्यां जेथें जात आहों, तेथील सर्व कारभार गुप्तपणें चालत असला पाहिजे, असें सहजच त्याच्या मनांत आलें. शेवटीं ते सर्वजण एका ठिकाणीं येऊन कांहीं वेळ उभे राहिले. त्या वेळीं तेथील दरवाज्यावर एकानें पुनः तीन धक्के मारिले. या वेळीं जो दरवाजा उघडला, तो फार लहान होता. शेखराच्या बरोबरचे तीन इसम प्रथम त्या दरवाज्यांतून आंत शिरले, आणि नंतर शेखर आंत गेला. आंत जातेवेळीं दरवाज्याच्या दोन्ही बाजू त्याच्या अंगास लागल्या. त्यावरून त्या दरवाज्याच्या अरुंदपणाची कल्पना त्याच्या मनांत आली. या दरवाज्यांतून आंत गेल्यावर त्याला कित्येक पायऱ्या उतरून खालीं जावें लागलें. अर्थात् तळघराची कल्पना त्याच्या मनांत आली. या पायऱ्या उतरत असतां शेखराला दोघांजणांनीं धरून ठेविलें होतें म्हणून बरें; नाहीं तर त्याचे हात बांधलेले असल्यामुळें त्याला तोल सांवरतां येत नव्हता, आणि त्या पायऱ्या अगदीं ओबडधोबड, उंचसखल असल्यामुळें तेथून उतरत असतां तो कदाचित् पडला सुद्धां असता. पायऱ्या जरी दगडीच होत्या, तरी दगडांच्या कडा झिजून गेल्या असून, त्यांपैकीं बऱ्याच पायऱ्यांचे दगड साफ फुटून गेलेले होते. शेखराला संभाळून घेऊन जाणारांचे पाय

देखील तेथें चुंकंत होते. यावरून तेथें अंधार असावा, असें त्यानें ताडलें. अशा रीतीनें सुमारें पन्नास पायऱ्या उतरून गेल्यावर मध्यें थोडी मोकळी जागा लागली. या जागेवर शेखर येऊन पोंचल्यावर त्याच्या बरोबरच्या एका इसमानें त्याला उजवीकडे वळविलें, आणि तेथून त्याला आणखी पायऱ्या उतरून खालीं जावें लागलें. या पायऱ्या पहिल्या इतक्याच होत्या. या पायऱ्या उतरल्यावर तेथें एक दरवाजा लागला.

या दरवाज्यापाशीं शेखराला उभें करून त्याच्या बरोबरच्या माणसांनीं त्याच्या मुखावरचें आच्छादन काढून टाकिलें, त्रिगुणि दोऱ्या सोडून हात व फडकें तोंडून तोंड [illegible] केलें. पूर्वी तर्क केल्याप्रमाणें सध्यां आपण मिट्ट काळोखांत उभें आहों असें शेखरास आढळून आलें. त्याच्या बरोबरच्या माणसांनीं त्याचीं हत्यारें काढून घेतलीं नव्हतीं; तथापि सध्यां तो अपरिचित आणि अवघड जाग्यावर असल्यामुळें त्याला आपल्या हत्यारांचा उपयोग करतां येणें शक्य नव्हतें. शेखराला मोकळें केल्यावर त्याच्या बरोबरच्या इसमांपैकीं एकानें आपल्या तरवारीच्या मुठीनें तेथील दरवाजा ठोठाविला, हा आवाज तेथें एकसारखा घुमूं लागला, आणि त्याचा प्रतिध्वनि पांचचार वेळ शेखराच्या कानावर आला. त्यावरून आपण सध्यां एकाद्या तळघरांत किंवा जमिनीखालीं असलेल्या इमारतींत आहों, या शेखराच्या संशयास बळकटी आली. तेथील दरवाजाही अतिशय भक्कम आहे, हें शेखराच्या ध्यानीं आलें. तो दरवाजा उघडला खरा, पण दरवाज्यापलीकडे उजेड अगदीं नव्हता. त्या दरवाज्यांतून शेखराला त्यांनीं आंत नेलें. सध्यां शेखर ज्या जागीं आला होता, ती एक बरीच विस्तीर्ण खोली होती. ह्या खोलीलाही एक दरवाजा होता. हा दरवाजा उघडतांच पलीकडे उजेड आहे असें शेखरास आढळून आलें, आणि तेथें जो विलक्षण व गंभीर देखावा त्याच्या नजरेस पडला, त्यामुळें त्याचें मन गोंधळून गेलें.

तो सध्यां ज्या ठिकाणीं आला होता, तें एक तळघर होतें. या तळघराची उंची अगदीं थोडी होती, तथापि तें चांगलें ऐसपैस होतें. या ठिकाणीं आपापल्या तोंडांवर कृष्णवस्त्रांचें आच्छादन घातलेली सुमारें चाळीस एक मंडळी निरनिराळ्या आसनांवर बसलेली शेखराच्या दृष्टीस पडली. अशा प्रकारच्या भुयारामध्यें जणुंकाय पिशाचांच्या समूहाप्रमाणें ज्यांचीं मस्तकें भेसूर दिसत आहेत, अशी ती सभा तेथें जमलेली पाहून, शेखराला मोठें आश्चर्य वाटलें तो बराच वेळ काळोखांत असल्यामुळें तेथें येतांच, प्रथम त्याला तेथें प्रकाश भरपूर आहे असें वाटलें होतें, पण थोडा वेळ गेल्यावर त्या प्रकाशाचें खरें स्वरूप त्याच्या ध्यानीं आलें. त्या भुयाराच्या लांबी-रुंदीच्या मानानें जेथें निदान वीस तरी दिवे पाहिजे होते, तेथें फक्त पांचच दिवे तेवत होते. भुयाराच्या वर असलेल्या कडीपाटाच्या चार कोपऱ्यांत चार लांबण दिवे लोंबत असून, त्या जागेच्या बरोबर मध्यभागीं पांचवा दिवा तेवत होता. त्या ठिकाणीं खेळत्या वायूचा प्रवेश होत नसल्यामुळें, ते दिवे अगदीं संथपणें तेवत होते. तेथें कित्येक गाद्या, लोडें, घातलेलीं असून, त्यांवर वर सांगिल्याप्रमाणे तोंडांवर आच्छादनें घातलेले लोक बसलेले होते. शेखरानें तेथें प्रवेश करतांच तेथें असलेल्या लोकांच्या माना एकदम त्याच्याकडे फिरल्या; आणि कृष्णवस्त्रांच्या आंतून चमकणाऱ्या डोळ्यांच्या चाळीस जोडया एकाच समयीं त्याजकडे पाहूं लागल्या. शेखरानें पुनः एकदां त्यांजकडे नजर टाकिली, त्यावेळीं तेथील प्रत्येक गृहस्थानें आपापली तरवार म्यानांतून काढून ती आपल्यापुढें ठेविली आहे, सर्वांहून उंच असें एक आसन दुतर्फा असलेल्या

आसनांच्या मध्यभागीं असून, त्यावर एक पुरुष बसलेला आहे, सर्वांच्या पोषाकांहून त्याचा पोषाक अधिक मोलाचा असून त्याच्यापुढें असलेल्या तरवारीच्या मुठीस अनेक प्रकारचीं रत्नें जडलेलीं आहेत, असें शेखराच्या नजरेस पडलें. त्याच्या मुखावर जरी इतरांप्रमाणें आच्छादन होतें, तरी त्याचे पिकलेले केस त्याच्या मस्तकावरील आच्छादना बाहेर आले होते, त्यांवरून तो बराच वृद्ध आहे, ही गोष्ट शेखराच्या ध्यानीं आली.

शेखरानें त्या तळघरांत प्रवेश केल्यापासून बराच वेळ लोटेपर्यंत कोणीं भाषण केलें नव्हतें, त्यामुळें शेखराला तेथील परिस्थिति सावकाशपणें पाहून घेतां आली. कदाचित् तेथील परिस्थितीचा आपल्या मनावर परिणाम व्हावा, यासाठींच मुद्दाम ही शांतता तेथील सर्वांनीं धारण केलेली असावी, असें शेखराच्या मनांत आलें. कांहीं वेळानें त्या सभेंतील मुख्य आसनावर बसलेल्या पुरुषानें अत्यंत गंभीर वाणीनें बोलावयास प्रारंभ केला. बोलत असतांना त्या पुरुषानें आपला नेहमींचा स्वर लपविण्याचा प्रयत्न चालविला होता, हें सांगणेंच नको.

प्रथमतः त्या मुख्य गृहस्थानें आपल्या उजव्या हाताकडे असलेल्या एका आसनाकडे हात दाखवून शेखराला त्यावर बसावयास आज्ञा केली. आज्ञेप्रमाणें त्या आसनावर बसतांच त्या गृहस्थानें पुढें बोलावयास प्रारंभ केला. तो म्हणाला,–'अहो राजकुमार, तुम्ही सरदार हलधराचा यापूर्वी तीन वेळ प्राण वांचविला, ही गोष्ट आम्हांस माहीत आहे. तुम्हाला येथें आणण्याकरतां आम्हाला जो मार्ग धरावा लागला, त्यामुळें तुम्हांला बराच त्रास झाला असेल, हें आम्ही जाणून आहों; आणि आपल्यास वाजवीपेक्षां अधिक त्रास पडूं नये, अशी आम्ही आमच्या नोकरांस सक्त ताकीद देऊन ठेविलेली होती. आम्ही आज तुम्हांस कांहीं प्रश्न विचारणार आहों, त्यांचीं उत्तरें आपण आम्हांस मोकळ्या मनानें द्याल अशी आम्हांस उमेद आहे. आपण आमच्या इच्छेविरुद्ध उत्तरें दिलीं, म्हणून आम्हीं तुमच्यावर रागावणार नाहीं, किंवा आमच्या हातून तुम्हांला अधिक पीडा व्हावयाची नाहीं. हें आपणास प्रथम कळविण्याचा हेतु इतकाच कीं, आमच्या प्रश्नांचीं उत्तरें देत असतां आपणास कोणत्याही प्रकारची शंका वाटूं नये." असें बोलून तो सभेचा अधिपति थोडा वेळ स्वस्थ बसला. आपल्या भाषणावर शेखर कांहींच उत्तर करीत नाहीं, हें पाहून तोच गृहस्थ पुनः बोलला,–'तुम्हीं सरदार हलधराचे प्राण वांचविले असल्यामुळें तुम्ही आमचे मित्र आहां, असें आम्हीं समजतों.'

सरदार हलधराचें नांव अशा कल्पित रीतीनें कानीं पडल्यामुळें शेखराला मोठें आश्चर्य वाटलें. सरदार हलधरासंबंधानें अधिक माहिती मिळविण्याविषयीं वडिलांचें पत्र आलेलें असल्यामुळें तो त्याच कामासाठीं आज बाहेर पडला होता. म्हणून त्याच्यासंबंधाची माहिती कानीं घेण्याचा हा सुयोग एकाएकीं जुळून आलेला दृष्टीस पडतांच त्याला मनांतल्या मनांत थोडा आनंद वाटल्यावेरीज राहिला नाहीं, परंतु त्यानें तो आपल्या मुद्रेवर दिसूं न देण्याची खबरदारी घेतली होती.

विचारलेल्या प्रश्नाचें त्यानें उत्तर दिलें नाहीं, हें पाहून सभेचा अधिपति पुनः बोलला,–'होय; तुम्ही सरदार हलधराचे प्राण वांचाविले, हें आम्हांस माहीत आहे. ज्याअर्थीं तुम्हीं मोठ्या औदार्यानें त्याचे प्राण वांचवितांना आपले प्राण खर्ची घालण्यास तयार झालां होतां, त्या अर्थीं त्याचें कल्याण व्हावें अशी इच्छा तुमच्या अंतःकरणांत सदैव वास करीत असेल, असें म्हणावयास कांहींच हरकत नाहीं. आम्हांस ज्या गोष्टी कळल्या आहेत, त्यांवरून असें दिसतें कीं, सरदार हलधराच्या कृत्यांपैकीं कित्येक कृत्यें तुम्हांला अगदीं पसंत पडलीं नाहींत; परंतु राजकारण म्हणजे काय, याचा जर तुम्ही उदार अंतः

करणानें विचार कराल, तर सरदार हलधरांचें त्यावेळचें दुटप्पीपणाचें वर्तन क्षम्य आहे, असें तुमच्या मनाला वाटेल. इतकेंच नव्हे, तर आपले इष्ट हेतु साध्य करण्यासाठीं प्रसंग पडेल त्याप्रमाणें वर्तन करणें ही राजनीति आहे, अर्थात् सद्गृहु सरदारांच्या त्यावेळच्या वर्तनावरून त्यांना दोष देणें हें अगदीं गैरवाजवी आहे, असेंच तुमचें मन तुम्हाला सांगेल. या ठिकाणीं हे जे लोक बसले आहेत ते सर्व जण सरदार हलधराचे पक्षपाती असून हातीं घेतलेलें कृत्य तडीस नेण्यासाठीं त्यांनीं शपथा वाहिल्या आहेत. यासाठीं मी तुम्हांस प्रथमतः अशा प्रश्न करतों कीं, ज्यावेळीं तुम्ही त्या थोर सरदारांना साह्य केलें, त्यावेळीं राजाधिराज निंबगजांबद्दल तुमच्या अंतःकरणांत प्रेमभाव वास करीत असावा, असा तर्क आम्हीं कां करूं नये ! '

शेखरानें गंभीरपणें परंतु खणखणीत स्वरानें उत्तर केलें,–' या प्रश्नाचें उत्तर देण्यापूर्वी तुम्हांला कांहीं प्रश्न विचारावयाचा मला पूर्ण अधिकार पोंचतो. त्यांतील पहिला प्रश्न हा कीं, मला प्रश्न विचारणारे आपण कोण आहां, हें मला प्रथम समजलें पाहिजे. सध्याचा प्रसंग पाहिला तर येथील परिस्थिति सर्वस्वी तुम्हांला अनुकूल आहे. मी या प्रसंगीं एकाद्या चालत्या बोलत्या बाहुल्याप्रमाणें तुमच्या हातीं सांपडलों आहे. शिवाय आतां तुम्हीं मला जो प्रश्न केला आहे, त्याचें उत्तर सध्यांच्या परिस्थितीमध्यें एकदम देणें हें फार जोखमाचें आहे, हें मी होऊन सांगितलें पाहिजे असें नाहीं. येथें जमलेली सर्व मंडळी त्या सरदारांची मित्र असूं शकेल, किंवा शत्रुही असूं शकेल ! आपण सर्वजण सरदार हलधरांचे मित्रच आहां असें मीं कशावरून समजावें ? यासाठीं मी आपणां-सर्वांस असें कळवितों कीं, आपण कोणत्या पक्षाचे आहांत, याबद्दल माझ्या मनाची पुरती खात्री होईपर्यंत मी आपल्या प्रश्नांचीं उत्तरें देऊं इच्छित नाहीं.'

पूर्वीप्रमाणें गंभीर, शांत, चोरट्या स्वरानें पण यत्किंचित्ही न रागावतां सभापतीनें उत्तर केलें,–' तुम्ही अशा प्रकारचा कांहीं तरी प्रश्न विचाराल, अशी माझ्या मनाची खात्री होतीच. आम्ही येथें जमलेले सर्वजण अत्यंत पवित्र अशा शपथेनें परस्परांशीं बद्ध झालेले असल्यामुळें, परकी गृहस्थाला आम्ही आपले चेहरे दाखविणें अशक्य झालें आहे. तुम्ही आमच्या पक्षाला मिळतां कीं नाहीं, याचा उलगडा आतां थोड्याच वेळांत होणार आहे. आम्ही सर्वजण सरदार हलधराचे मित्र आहों, हें आम्ही सर्वजण आपल्या तरवारीची शपथ घेऊन आपणांस सांगूं. आमच्या सर्वांच्या शपथेवर विश्वास न ठेवण्याइतकें आपलें मन अनुदार असेल, असें आम्हांस वाटत नाहीं. यासाठीं मित्र हो, तुम्ही सर्वांनीं शपथा घेऊन या गृहस्थाची आपल्या हेतूबद्दल खात्री करा पाहूं !'

सभापतीची आज्ञा होतांच सर्व सभासद मोठ्या त्वरेनें उठून उभे राहिले. त्यांजकडे एकवार नुसती नजर फेंकल्याबरोबरच ते सर्व धिप्पाड, सशक्त आणि वीर पुरुष आहेत, अशी शेखराची एकदम भावना झाली. उठून उभे राहिलेल्या प्रत्येक गृह पुरुषानें आपली तरवार आपल्या हातीं धरली, आणि ' आम्ही आपल्या तरवारीची शपथ वाहून सांगतों कीं, आम्ही सरदार हलधरांचे मित्र आहों !' अशी शपथ प्रत्येकानें उच्चारली. हे शब्द उच्चारून होतांच, सर्वांनीं आपापल्या हातांतील तरवारीच्या मुठी मस्तकास लावून त्या तरवारींस नमन केलें ! सर्वांनीं एकदम घेतलेल्या शपथेचा ध्वनि तळघरामध्यें दुमदुमूं लागला ! हा ध्वनि शांत होण्यापूर्वीच सर्व जण आपापल्या आसनांवर बसले, आणि त्यांनीं आपापल्या तरवारी पूर्वीप्रमाणें आपापल्या समोर ठेविल्या.

नंतर सभापति त्यास म्हणाला,–' आतां आमच्या शुद्ध हेतूंबद्दल तुमच्या मनाची

खात्री पटलीच असेल. आतां तुम्हीं माझ्या प्रश्नांचीं उत्तरें मोकळ्या मनानें द्याल अशी मला उमेद आहे. तुम्हीं सरदार हलधरांना पूर्वी साह्य केलें होतें, तें केवळ एक मनुष्य संकटांत असतां दुसऱ्यानें त्याला सहाय करावें अशा सद्बुद्धीनें केलें होतें, कीं त्यांचे हेतु तुम्हाला पसंत होते, म्हणून तुम्हीं त्यांस साह्य केलें होतें?'

शेखरानें उत्तर केलें,–'ज्या वेळीं मी त्या गृहस्थाच्या सहायास सिद्ध झालों, त्यावेळीं त्याचे हेतु काय आहेत, याबद्दल मला मुळींच शंका नव्हती. त्यानें त्यावेळीं आपल्यावर निंबराजानें जुलूम केल्याची जी कल्पित गोष्ट सांगितली होती, तिजवर माझा पूर्ण विश्वास बसला होता. तो निंबराजाच्या जुलमाला कंटाळलेला एक सद्गृहस्थ असावा, इतकीच कल्पना त्यावेळीं माझ्या मनांत होती.'

सभापतीनें विचारलें,–'तर मग निंबराजानें त्यांजवर जुलूम केला ह्या गोष्टीचें तुम्हांस वाईट वाटलें, म्हणून तुम्ही त्यांच्या साह्यार्थ पुढें झालां.'

शेखरानें उत्तर दिलें,–'तसेंही म्हणतां येत नाहीं. कारण मी ज्यावेळीं त्याच्यातर्फें द्वंद्वयुद्धास तयार झालों, त्यावेळीं त्याचें पूर्ववृत्त मला समजलेलें नव्हतें. आमच्या राज्यांत देवीला कौल लावण्याची जी वहिवाट आहे, तिच्यावर माझा पूर्ण भरंवसा नसल्यामुळें, केवळ एका माणसाला जें कांहीं वाटेल, तेवढ्यावरून दुसऱ्या माणसाच्या जिवावर प्रसंग यावा, ही गोष्ट माझ्या मनाला आवडली नाहीं. एवढ्याच कारणानें मी त्यांच्या साह्यार्थ पुढें झालों.'

सभापतीनें विचारलें,–'तर ज्यावेळीं सरदार हलधरांशीं तुमची प्रथमच मुलाखत झाली, त्यावेळीं तुम्ही आपल्या चाणाक्षपणानें त्यांच्या मनांतील हेतु ओळखून त्यांच्याशीं मित्रत्वानें वर्तन केलें होतें, असें दिसत नाहीं.'

शेखर म्हणाला,–'तो गृहस्थ आमच्या राज्यांतून बाहेर जाईपर्यंत त्याच्या हेतूविषयीं माझ्या मनांत कोणत्याही प्रकारची विपरीत शंका उत्पन्न झालेली नव्हती. त्यानें निंबराजाच्या जुलमाची जी गोष्ट सांगितली, ती संभवनीय असल्यामुळें मला ती त्या वेळीं अगदीं खरी वाटली. पण मी जो त्याच्यासाठीं द्वंद्वयुद्धास सिद्ध झालों, तो कांहीं त्या कारणामुळें नव्हे. त्यांच्या ऐवजीं दुसरा कोणी जरी तेथें असता, आणि त्याच्यावर अशा प्रकारचा प्रसंग आला असता, तरी मीं तसेंच केलें असतें. दुसऱ्या कोणाच्याही हातून जरी तशा रीतीनें गरुडपक्षी मेला असता, तरी मी तेवढ्या चुकीसाठीं त्याला देहांत शिक्षा होऊं नये म्हणून शक्य ते प्रयत्न केले असते.'

आपल्या पूर्वीच्या प्रश्नांचीं शेखराच्या मुखानें जीं उत्तरें आलीं, तीं त्या सभापतीला समाधानकारक वाटलीं नाहींत. असें त्याच्या पुढील प्रश्नाचे वेळीं निघालेल्या स्वरावरून उघड होत होतें. त्यानें विचारलें,–'आपले हेतु असे होते, हें जरी गृहीत धरून चाललें, तरी आणखी एक प्रश्न उपस्थित होतो. सरदार हलधर प्रतापपुराहून निघून गेल्यानंतर लवकरच बृहद्रथ राजाचें एक पत्र तुमच्या हातीं लागलें, आणि त्या पत्रावरून त्यांनीं सांगितलेली जुलमाची गोष्ट कल्पित असून त्यांचे हेतु काय असावे, याचें तुम्हाला पूर्णपणें अनुमान करतां आलें. नंतर सुंदरपुरीं त्यांची तुमची भेट झाली; त्यावेळीं ते गृहस्थ निंबराजाचे शत्रु नसून त्यांचे खरे हितचिंतक आहेत, अशी तुमच्या मनाची पक्की खात्री झाली असतांही ज्या वेळीं तुमच्या वडील बंधूनें त्यांचा पाठलाग करून त्यांचा अपमानास्पद रीतीनें प्राण घेण्याचा प्रयत्न चालविला होता, त्यावेळीं तुम्हीं आपल्या वडील बंधूचा अपमान करून त्यांचा बचाव केला, याबद्दल काय सिद्ध होतें? रत्नाकर राजाच्या

जुलमी वर्तनाचा तुम्हाला कंटाळा आला असून राजाधिराज निंबमहाराजांसंबंधानें तुमच्या मनांत आदरभाव उत्पन्न झाला असावा, असें मानावयास काय हरकत आहे ?'

शेखर खणखणीत स्वरानें म्हणाला,—'अशी जर कोणाच्या मनांत माझ्या हेतू-संबंधानें विपरीत भावना उत्पन्न झाली असेल, तर मी तिचा पूर्णपणें निषेध करितों. त्यावेळीं मीं त्या गृहस्थाचे प्राण कां वांचविले, याचें कारण वेगळें आहे. एकाद्या माणसाचे हेतु दुष्ट आहेत असें जरी सिद्ध झालें असलें, तरी त्या माणसाच्या हातून जोंपर्यंत आपलें प्रत्यक्ष नुकसान झालेलें नाहीं, तोंपर्यंत त्याचा न्याय न करितां, किंवा त्याला आपल्या हेतूंचें समर्थन करण्याची संधि न देतां, त्याला एकदम देहांत शिक्षा देणें आणि ती एकदम अमलांत आणणें, ही गोष्ट अन्यायाची आहे, ही गोष्ट ईश्वराच्या घरीं कधींही रुजू होणार नाहीं, अशी माझी मनोदेवता मला सांगत असल्यामुळें मीं त्यावेळीं त्याचा घात होऊं दिला नाहीं. सरदार हलधर जर त्यावेळीं माझ्या हातून निसटला नसता, तर मीं वडिलांपाशीं रदबदली करून त्याच्या दुष्ट हेतूंबद्दल आणि दुटप्पी वर्तनाबद्दल त्याला थोडीशी कैदेची शिक्षा देवविली असती.

सभापति म्हणाला,—'अहो राजपुत्र, हीं तुमचीं उत्तरें ऐकून आमच्या मनाची जरी निराशा होत आहे, तरी आपण त्या वेळच्या आपल्या आचरणाचें गूढ स्पष्ट शब्दांनीं उकलिलें, याबद्दल आम्हांस आनंद होत आहे; आणि आपल्या उमद्या स्वभावाचें आम्हांस मोठें कौतुक वाटत आहे. आमच्या कानांवर ज्या कांहीं गोष्टी आल्या होत्या, त्यांवरून आपण मनांतून राजाधिराज निंबराजांचे पक्षपाती आहां अशी आमची समजूत झाली होती, आणि आतां येथें तुमच्या समोर जी मंडळी जमलेली आहे, तिच्यामध्यें तुमच्या सारख्या उदार, शूर, बुद्धिमान् आणि विचारी तरुणांची भर पडेल, अशी आम्हांस मोठी आशा वाटत होती, पण तुमचें भाषण ऐकून आतां आमची निराशा झाली, याचें आम्हांस फार वाईट वाटत आहे !'

यावर शेखर काय उत्तर देतो तें ऐकण्या-साठीं सभापति कांहीं वेळ स्तब्ध राहिला, परंतु शेखरानें कांहींच उत्तर दिलें नाहीं. त्या ठिकाणीं जमलेल्या लोकांचे हेतु काय आहेत हे शेखराच्या ध्यानीं आल्यानंतर, ते आपणांस जेवढे प्रश्न विचारतील तेवढ्यां-चींच उत्तरें आपणास योग्य वाटल्यास द्यावयाचीं, आपण होऊन कांहींच बोला-वयाचें नाहीं, असा त्यानें आपल्या मनाचा निर्धार करून ठेविला होता.

नंतर सभापतीनें पुनः बोलण्यास प्रारंभ केला. तो म्हणाला,—'अहो राजपुत्र, सध्यां आम्ही जो हेतु साध्य करण्याचा प्रयत्न करीत आहों, त्यासंबंधानें आपण आमच्याशीं वादविवाद करून आपल्या मनाची खात्री करून घेण्यास सिद्ध आहां काय ? प्रतापपुर किंवा त्याच्या आसपासचा प्रदेश—फार तर काय—सगळें बागलाण शोधून पाहिलें, तरी तुमच्यासारखा कुशाग्र बुद्धीचा तरुण क्वचितच दृष्टीस पडेल. तुमच्या-सारखा विचारी पुरुष केवळ अंधपरंपरेनें इतरांवर विश्वास ठेवील असें मानण्यास आमचें मन धजत नाहीं. रत्नाकर राजाचे जुलूम किती शिखरास पोंचले आहेत.—'

शेखर मध्येंच म्हणाला,—'अहो सभापति ! तुम्ही कोण आहां, आणि तुमचा मानमरा-तब काय आहे, हें मला माहीत नसल्यामुळें तुमच्याशीं भाषण करीत असतां मीं शब्द-प्रयोग कसे केले पाहिजेत, हें मला समजत नाहीं. म्हणून कदाचित् माझ्या सरळ भाष-णानें आपल्याला वाईट वाटण्याचा संभव आहे, यासाठीं मी आपली पूर्वीच माफी मागून ठेवितों. मी आतांपर्यंत जशीं सरळ-पणानें आपल्या सर्व प्रश्नांचीं उत्तरें दिलीं

आहेत, त्याप्रमाणें आतां याही प्रश्नाचें उत्तर देतों. मी स्वतंत्र नाहीं, हें तुम्हाला माहीतच आहे. आपणांपैकीं पुष्कळ जण माझ्या वडिलांइतकेच वृद्ध असतील, आणि त्यांना माझ्या वयाचे पुत्रही असतील. ते त्यांचे पुत्र जर आपल्या वडिलांविरुद्ध कारस्थानें करूं लागतील, तर त्यांना काय वाटेल याचा विचार करण्याचें काम मी आपणां सर्वांवर सोंपवितों. आपण सर्वजण निंबराजाचे पक्षपाती आहां, परंतु आपले पुत्र किंवा आप्त रत्नाकरमहाराजांचे पक्षपाती आहेत, असें जर तुम्हांला आढळून येईल, तर तुमच्या अंतःकरणास किती खेद होईल ! अशा पुत्राचें मुखावलोकन सुद्धां करूं नये, असें तुम्हांस वाटणार नाहीं काय ! अर्थात् माझ्या पित्याचे जे हेतु आहेत, ते पूर्ण करण्यास मनोभावानें झटणें हें माझें कर्तव्य आहे, असें मी समजतों. यापेक्षां अधिक स्पष्ट बोलण्याची जरूर उरली आहे, असें मला वाटत नाहीं. मला वाटतें, मीं आपल्या सर्व प्रश्नांचीं आपणांस योग्य उत्तरें दिलीं आहेत, यासाठीं आपण मला येथून जावयास परवानगी द्याल.' असें बोलून तो आपल्या आसनावरून उठून उभा राहिला.

निराशापूर्ण स्वरानें सभापति बोलला,– ' तुमचा हा निश्चय जरी योग्य आहे, तरी तो आमची पूर्ण निराशा करीत आहे; तुमचे विचार आमच्या विचारांस जुळतील असें आम्हांस वाटत असल्यामुळें, आम्ही तुम्हांस येथें आणलें होतें. आमच्या पक्षास अनुकूल होणें हें ज्या अर्थीं तुम्हांस योग्य वाटत नाहीं, त्या अर्थीं आमचीं मतें जबरदस्तीनें तुमच्याकडून कबूल करवून घ्यावीं हें आम्हांसही इष्ट वाटत नाहीं. मला आणखी चार शब्द बोलावयाचे आहेत. तेवढे तुम्ही ऐकून घेतले, म्हणजे तुम्हांस आम्ही परत पोंचवूं. सध्यां तुम्ही येथें जो प्रकार पाहिला आहे, किंवा आमचे हेतु काय आहेत, हें तुम्हांस समजलें आहे, तो प्रकार किंवा आमचे हेतु तुम्ही लोकांत प्रसिद्ध कहूं नयेत, म्हणून तुमच्याकडून जबरदस्तीनें शपथ घेववावी, अशी आम्हीं बिलकुल इच्छा करीत नाहीं. कारण तशी आम्हाला आवश्यकताच वाटत नाहीं. आम्ही कोण आहोंत, आणि कोठें जमत असतों, हें रत्नाकराच्या लोकांनीं जंगजंग पछाडलें, तरी त्यांस उमगावयाचें नाहीं, अशी आमच्या मनाची पूर्ण खात्री आहे. आम्ही बंदोबस्तच तसा ठेविला आहे; परंतु आम्हाला तुम्हास एक सूचना करणें अत्यंत इष्ट वाटतें. आम्ही देणार ती फक्त सूचना आहे; धमकी नव्हे. तुम्ही येथें एकटे आणि आम्ही चाळीस जण; अशा स्थितींत आम्ही तुम्हास धमक्या दिल्यास तें नामर्दपणाचें कृत्य होईल. तुम्हाला द्यावयाची सूचना ती इतकीच की, आतां तुम्ही आपल्या समोर नागव्या तरवारी ठेवून बसलेले जे वीर पहात आहां, ते सर्वजण येथें चालणारें सर्व कृत्य गुप्त राखण्याविषयीं भयंकर शपथेनें बद्ध झालेले आहेत. तुमच्यासारख्या ज्या गृहस्थास आम्ही येथें आणतों, त्या गृहस्थानें किंवा आमच्या मंडळांतील एकाद्या सभासदानें येथील हकीकत प्रसिद्ध केल्यास त्यास देहांत शिक्षा ठरलेली आहे. जो कोणी येथील प्रकाराचा बाहेर उच्चार करील, त्याचें रक्त या येथें तुमच्या डोळ्यांसमोर असलेल्या तरवारींपैकीं एखादी तरवार प्राशन करील ! ही बातमी फोडणारा बातमी फोडल्यानंतर पुरते आठ प्रहर जिवंत राहील, असें मनांत सुद्धां आणावयास नको. या गोष्टीची तुम्हास माहिती नसल्यामुळें तुम्हाला योग्य वेळी सूचना देणें हें आमचें कर्तव्य आहे.'

शेखर अभिमान पूर्वक म्हणाला,–' मला ज्या अपमानकारक रीतीनें येथें आणलें आहे, त्याहून अधिक अपमानकारक रीतीनें मला यापुढें वागविलें गेलें नाहीं, तर मी यासंबंधानें कोठें तक्रार करणार नाहीं. मला

चेयें आणतांना तुम्हाला ज्या मार्गाचा अवलंब करावा लागला, त्याबद्दल मी तुम्हाला दोष देऊं इच्छित नाहीं; आणि ज्या गोष्टीचा पक्का बंदोबस्त करण्याचें सामर्थ्य आपल्या हातीं नाहीं, त्या गोष्टीचा निष्कारण बभ्रा करणें मला मुळींच आवडत नाहीं, हेंही मी तुम्हांस कळवून ठेवितों.'

सभापति म्हणाला,–' शाबास, राजपुत्रा, शाबास ! तुझें हें शूर पुरुषाला योग्य असें भाषण ऐकून मला फारच समाधान होत आहे. तुझ्यासारखा हिंमतवान् तरुण पुरुष आमच्या पक्षाला अनुकूल होत नाहीं, याबद्दल आम्हाला फार खेद होत आहे, तो यामुळेंच ! असो; ज्या अर्थी तुमचें मन चालटत नाहीं, त्या अर्थी तुम्हाला निरोप दिलाच पाहिजे.' असें बोलत सभेचा अधिकारी आपल्या आसनावरून उठला, आणि त्यानें मोठ्या नम्रतेनें शेखराला नमन केलें. शेखरानेंही उलट नमन करून त्याच्या नमनाचा स्वीकार केला, आणि तो परत दरवाज्यापाशीं आला. त्याला ज्या तोंड झांकलेल्या लोकांनीं पूर्वी तेथें आणलें होतें, ते लोक अद्यापि दरवाज्यापाशीं उभेच होते. शेखर त्यांच्या पुढें उभा राहिल्यावर एकानें त्याच्या तोंडावर पट्टी बांधिली, दुसऱ्यानें त्याच्या डोक्यावर आच्छादन घातलें, आणि तिसऱ्यानें त्याचे हात बांधले. इतकें झाल्यावर त्या लोकांनीं त्यास हातीं धरून जिन्यापाशीं नेलें, आणि त्याचा तोल चुकूं नये म्हणून त्याला सांवरून धरून वेताचातानें वरील इमारतींत आणलें. अनेक उंचरे ओलांडून तो इमारतीच्या अंगणांत आला, आणि तेथून रस्त्यांत येऊन पोचला. पूर्वी प्रमाणेंच त्याच्या बरोबरच्या लोकांनीं त्याला आडव्यातिडव्या पुष्कळ मार्गानीं भ्रमविल्यावर ते एका ठिकाणीं उभे राहिले. एकानें त्याचे हात सोडले, दुसऱ्यानें तोंडावरची पट्टी सोडली. तिसऱ्यानें त्याच्या मुखावरचें आच्छादन काढून टाकिलें; आणि तें सर्वजण चोहोंबाजूंस पळून गेले. हा कारभार न बोलतां फारच जलदीनें झाला होता. शेखरानें आपल्या आजूबाजूस नजर टाकून आपण सध्या कोठें आहों, हें पाहून घेण्यापूर्वीच त्याला धरून आणणारे लोक त्याच्या नजरेआड झालेले होते. आपण सध्या वृषपतीच्या वाड्याच्या अगदीं समीप आहों; असें शेखराच्या चटकन् ध्यानीं आलें, आणि इकडे तिकडे न पाहतां तो एकदम वाड्यांत आला. मध्यरात्रीचा समय जवळ आला असल्यामुळें वाड्यामध्यें निजानिज झालेली होती. फक्त चतुरक मात्र आपल्या धन्याची वाट पहात जागत बसला होता. शेखराला रात्रीं इतका वेळपर्यंत बाहेर राहण्याची संवय नसल्यामुळें तो बरीच रात्र झाली तरी परत येत नाहीं, हें पाहून चतुरकाला त्याची काळजी लागली होती. शेवटीं आपला यजमान सुखरूप परत आला हें पाहून त्याला आनंद झाला. शेखरानें त्याच्याशीं दोन गोड शब्द बोलून त्याला निजावयास जाण्याची आज्ञा करून आपण आपल्या शयनमंदिरांत गेला.

शेखर शय्येवर पडला खरा, पण त्याला एकदम झोंप आली नाहीं. नुकताच घडून आलेला प्रकार त्याच्या डोळ्यांपुढें दिसत होता, आणि त्यासंबंधानें अनेक प्रकारचे विचार त्याच्या मनांत उत्पन्न होत होते. आज दृष्टीस पडलेला प्रकार आपल्या वडिलांस सायंत लिहून कळवावा, असें एकदां त्याच्या मनांत आलें, पण कदाचित् आपलें पत्र गैरविल्हेस लागल्यास किंवा तें प्रत्यक्ष आपल्या शत्रूंच्या हातीं लागल्यास अनर्थ होईल, असें त्याच्या मनांत येऊन त्यानें तो बेत रहित केला; आणि जेव्हां वडिलांची समक्ष भेट होईल, तेव्हांच हें वृत्त त्यांच्या कानीं घालावयाचें असा त्यानें निर्धार केला. तळघरांतून बाहेर पडत असतां सभापतीनें त्याला जी सुचना दिली होती, त्या सुचनेकडे दुर्लक्ष करणें धोक्याचें आहे

अशी त्याच्या मनाची खात्री झालेली होती. कारण तेथें जमून अशा रीतीनें आपल्या राजाविरुद्ध कारस्थानें रचणारे लोक आपले उद्दिष्ट हेतु सिद्धिस नेण्यासाठीं कोणतेंही भयंकर कृत्य करण्यास मागें पाहणार नाहींत असें त्याच्या मनांत येणें अपरिहार्य होतें. अशा प्रकारच्या अनेक विचारांमध्यें गढून गेलेलें त्याचें मन कांहीं वेळानें शांत होतांच झोपेनें त्याला माळ घातली.

प्रकरण ३१ वें.

धर्मशाळेमध्यें.

मागील प्रकरणांत सांगितलेली गोष्ट ज्या रात्रीं घडून आली, त्याच रात्रीं आणखी एक महत्त्वाची गोष्ट घडून आली, ती येथें सांगणें अवश्य आहे. शेखर आपल्या शयन-मंदिरांत जाऊन शय्येवर पडल्यानंतर त्या वाड्याच्या मागच्या बागेचें फाटक उघडून एका अतिशय उंच गृहस्थानें बागेंत प्रवेश केला. त्या गृहस्थानें आपलें सर्वांग अशा रीतीनें आपल्या अंगवस्त्रानें झांकून घेतलें कीं, त्याच्या चेहऱ्याची नुसती चुणूक सुद्धां कोणाला दिसणें शक्य नव्हतें. त्या गृहस्थानें बागेंत प्रवेश केल्यावर सूक्ष्म दृष्टीनें आपल्या आसपास एकवार नजर टाकिली, त्यावेळीं बागेंतील एका झुडपामागून एक माणूस आपल्याकडे येत आहे, असें त्यास आढळून आलें. थोड्याच पळांत त्या दोघांची गांठ पडली, त्यावेळीं नवीन आलेला माणूस दुसऱ्या माणसाचा हात धरून त्याला म्हणाला,–

'चतुरका, नीट ध्यानांत ठेव. उद्यां बरोबर दोन प्रहरीं-अगदीं न चुकतां-हेमचंद्राच्या धर्मशाळेंत मला येऊन भेट. विसरूं नको.'

चतुरकानें उत्तर केलें,–'त्याबद्दल तुला अगदीं काळजी नको. तुझ्या सांगण्याप्रमाणें मी उद्यां वेळेवर तुला येथें येऊन भेटतों.'

एवढीं दोनच भाषणें झाल्यावर तो उंच मनुष्य पुनः त्याच दरवाज्यांतून बाहेर पडला, आणि त्यानें एकदम रस्ता धरिला. तो इकडे तिकडे न पाहतां बराच वेळ झपाट्यानें पुढें चालला होता; पण कांहीं वेळानें तो थांबला, आणि त्यानें आपल्या भोंवतीं नजर टाकून आपण चालत आहे तोच आपला मार्ग आहे, कीं भलत्याच मार्गानें आपण जात आहों, या-संबंधानें आपल्या मनाची खात्री करून घेतली; पण आपण मार्ग चुकलों नसूं अशी त्याच्या मनाची खात्री पटेना. थोडा वेळ तेथेंच राहिल्यानंतर वाटेनें जात असलेल्या एका वाटसराला विचारून हेमचंद्राच्या धर्म शाळे-कडे जाणारा रस्ता हाच आहे, अशाबद्दल त्यानें आपली खात्री करून घेतली, आणि तो पुढें निघाला. यावरून तो गृहस्थ या शहरांत नवीनच आलेला होता, हें उघड होत होतें. थोड्याच वेळानें तो त्या धर्मशाळेंत जाऊन पोहोंचला.

ती धर्मशाळा शहरांतील एका गलिच्छ वस्तीच्या भागांत होती. त्या धर्मशाळेपेक्षा चांगल्या धर्मशाळा शहरांत पुष्कळ असल्या-मुळें त्या धर्मशाळेंत प्रवाशाची गर्दी फारशी नसे, आणि बहुधा अगदींच कंगाल लोक तेथें उतरत असत. ही धर्मशाळा शहराच्या दक्षिण वेशीच्या अगदीं जवळ होती. त्या स्थळीं येऊन पोंचल्यावर त्या गृहस्थानें आपल्या अंगावरचें अंगवस्त्र जमिनीवर पसरलें, आणि तो त्यावर आडवा झाला.

तो धर्मशाळेमध्यें आल्यास पुरती पाव घटका लोटली नाही, तोंच आणखी दोन गृहस्थ त्या धर्मशाळेमध्यें आले. त्या दोघांच्या अंगावरील वस्त्रालंकारांवरून ते उच्च कुलांतील पुरुष असावे, असें अनुमान सहज करतां येत होतें. त्या दोघांपैकीं एकाचें वय पंचवीस सव्वीस वर्षांचें असून त्याचा चेहरा सुंदर आणि पाणीदार दिसत होता. त्याच्या वेषा-वरून त्याला शहरांतील छानछोकीच्या बराच नाद असावा, असें उघड उघड दिसत होतें. दुसऱ्या गृहस्थाचें वय सुमारें पस्तीस वर्षांचें

होतें. त्याचा वर्ण काळासांवळा असून त्याच्या अंगावरील पोषाखामध्यें छिचोरपणा फारसा दिसून येत नव्हता. पूर्वी धर्मशाळेंत येऊन पडलेल्या गृहस्थानें हे दोन इसम धर्मशाळेंत आलेले पाहतांच तो उठून बसला, आणि त्यानें त्या दोघांकडे बसल्या जागेवरूनच नजर टाकिली. त्या दोघांपैकी तरुण गृहस्थास त्यानें ओळखिलें, आणि तो आपल्याशींच पुटपुटला,–'हा तर विक्रमसेन! हा भलत्याच वेळीं येथें कां बरें आला असावा?' असा त्यानें आपल्या मनाला प्रश्न केला, पण तो त्या गृहस्थांस ऐकूं गेला नाहीं, किंवा आपल्याला पाहून त्याला आश्चर्य वाटलें असेल, असें त्याच्या मनांत सुद्धां आलें नाहीं. पहिल्यानें आलेला गृहस्थ पुनः आपल्या जागेवर आडवा झाला.

आंत आल्यावर विक्रमसेनानें, आपल्या तीक्ष्ण दृष्टीनें धर्मशाळेची थोडक्यांत तपासणी केली, आणि तेथें निजलेला गृहस्थ आपल्या ओळखीचा आहे कीं नाहीं, हेंही त्यानें त्याच्या जवळ जाऊन पाहून घेतलें. तो आपल्या ओळखीचा नाहीं, अशी त्याच्या मनाची खात्री पटल्यावर तो आपल्या सोबत्यास म्हणाला,–'अहो हरदत्त, आज या धर्मशाळेंत अगदीं सामसूम दिसते! आपण ज्याला पाहण्यासाठीं येथें आलों, तो माणूस आपणास येथें भेटेल असें दिसत नाहीं. आपली खेप फुकट जाणार!'

हरदत्त म्हणाला,–'वास्तविक पाहिलें, तर या बाबतींत बराच दोष आमच्याकडे येतो. आम्ही जर त्याला तूं यावेळीं अवश्य येथें हजर रहा असें निक्षून सांगितलें असतें, तर तो खरोखर आपली वाट पहात येथें बसून राहिला असता; परंतु आमचें सांगणें तितकें स्पष्ट नसल्यामुळें तो आला नसेल. तथापि तो अजूनही येण्याचा संभव आहे; आपण थोडावेळ त्याची वाट पाहूं. तो आला तर बरेंच, न आल्यास आपण दुसऱ्या कोणाला तरी आपलें काम सांगूं. दाम करी काम, आपल्या हातीं जोंपर्यंत द्रव्य खेळत आहे, तोंपर्यंत आपलें काम करावयास कोण हवा तो पुढें सरसावेल. मला वाटतें, हा येथें निजलेला माणूस सुद्धां आपलें एवढें काम करील!'

विक्रमसेन म्हणाला,–'नेहमीं येथें दहा पांच माणसें वस्तीस असत नाहींत, असें कधीं फारसें होत नाहीं. येथें पुष्कळ माणसें असतीं, म्हणजे त्यांचे चेहरे मोहरे पाहून आपल्या कामाला कोण उपयोगी पडण्यासारखा आहे; हें लावडतोच ठरवितां आलें असतें.' नंतर तेथें निजलेल्या माणसांकडे पाहत तो म्हणाला,–'कदाचित् हा मनुष्य सुद्धां आमच्या उपयोगी पडेल!'

हरदत्त म्हणाला,–'त्याला विचारून पहावयास कोणती हरकत आहे? त्यानें आमचें काम करावयाचें कबूल केलें, तर ठीकच; बरें त्यानें नाहीं म्हटलें, तरी आमचें त्यापासून नुकसान आहे असें नाहीं. कारण आमची त्याची ओळख नाहीं, कांहीं नाहीं.'

विक्रमसेन म्हणाला,–'ज्या अर्थी आपणास आपलें काम करावयास एका माणसाची सध्यां जरूर आहे, त्या अर्थी आपणं यास विचारून पहावें, हें बरें. कारण आपलें काम लांबणीवर टाकावयाचें नाहीं; उद्यांच्या रात्रीं काय तो सोक्ष मोक्ष पुरता करून टाकायाचा असें मीं आपल्या मनाशीं पक्कें ठरवून ठेविलें आहे. तो–मी कोण म्हणतों तें तुम्हाला माहीतच आहे– उद्यां हें शहर सोडून जाणार नाहीं कशावरून?'

हरदत्त बोलला,–'आजचा आपला प्रयत्न फसला, याचें मला फार वाईट वाटतें. जर आतांचा आमचा प्रयत्न साध्य झाला असता, आणि तो आमच्या पक्षास मिळाला असता तर आपली दुसरी इच्छासुद्धां तत्काल पूर्ण झाली असती, आणि इतका खटाटोप करण्याचें आपणास प्रयोजन पडलें नसतें. तो आमच्या पक्षाला मिळाला असता, तर

कोणत्या ना कोणत्या तरी मार्गानें आपल्या इच्छा आपणास पूर्ण करून घेतां आल्या असत्या. खरेंच सांगतों, त्या दिवशीं आपण जी हकीकत ऐकिली, तिजवरून तो आपल्या पक्षाचा अभिमानी असावा, अशी तर माझ्या मनाची खात्रीच झाली होती. '

विक्रमसेन म्हणाला,–'ज्या गोष्टीचा एकदां निकाल होऊन गेला, त्याबद्दल आतां हळहळून काय उपयोग ? त्यानें जेव्हां 'मी तुमच्या पक्षाला मिळत नाहीं ' असें स[illegible] सांगितलें, तेव्हां मला त्याचा इतका संताप आला होता कीं, जर मी सभेच्या नियमांनीं बद्ध झालेला नसतों, तर त्याचे तेथच्या तेथें राईराइं एवढे तुकडे करून टाकले असते ! त्यावेळीं जर माझ्या मुखावर आच्छादन नसतें, तर मी क्रोधानें किती खवळून गेलों आहें, हें तुमच्या दृष्टीस पडून तुम्ही आश्चर्यानें गुंगच झालां असतां ! '

हरदत्त म्हणाला,–' त्याच्यासंबंधानें आमचा सर्वांचाच तर्क चुकला ! '

नंतर त्या दोघांनींही आपलें भाषण बंद करून तेथें आडव्या पडलेल्या गृहस्थाकडे अगदीं बारकाईनें पाहाण्यास आरंभ केला. इतका वेळपर्यंत ते बरेच दूर असल्यामुळें व त्यांचें भाषण अगदीं हळु चाललें असल्यामुळें, तें त्या माणसास ऐकूं गेलें नसावें, अशी त्यांची कल्पना होती, पण तेथें निजलेल्या माणसाचे कान त्यांच्या कल्पनेपेक्षां अधिक तीक्ष्ण असल्यामुळें त्यांतील बराच भाग त्याला चांगला ऐकूं आला होता. त्या माणसाकडे जेव्हां ते बारकाईनें पाहूं लागले, त्यावेळीं त्यानें आपलें डोळे मिटून ठेविले असून, तो अर्धवट झोंपी गेल्याप्रमाणें दिसत होता.

त्याला जागें करण्याच्या हेतूनें विक्रमसेनानें मोठ्यानें विचारलें,–' अरे, ए निजणार, तूं कोण आहेस ! आणि असा नुसत्या अंगवस्त्रावर येथें कां पडला आहेस ! तूं सध्यां अशा रीतीनें येथें पडला आहेस, त्यावरून तूं कट तरी असावास, वाटसरू प्रवा आणखी थोडें

त्या माणस. मी एक वाटेच मी प्रहरराज्ञीचे मला [illegible] २ [illegible] पाऊ. [illegible] वन [illegible] धंदा. [illegible] थंडी–व. कुडं [illegible] हिजेत. '

वि[illegible] ' यावरून तूं कांहीं तरी उद्यो[illegible] साठीं या शहरीं आला अस[illegible] बरें तूं काय उद्योग करणा[illegible] उद्योग करावयाचा, असें [illegible] आहेस कीं काय ? '

त्या माणसानें उ[illegible] कसें होईल महाराज ? मी [illegible] कांग. काम्या मनुष्य; पोटापु[illegible] तो सांगेल तें काम करावयास [illegible] वांचून माझा अनोळखी [illegible] शहरांत कसा निभाव लागणार

विक्रमसेनानें त्याजकडे आ[illegible] रोंखून त्याला प्रश्न केला,–' तर मग पोटासाठीं तूं पाहिजे तें करशील ? '

त्या माणसानें म्हटलें–' न करून कसें चालेल ? '

विक्रमसेनानें विचारलें,–' तुला एकादी घोंगडी, एक दोन धोतरें वगैरे अगदीं जरूरीचे पदार्थ अवश्य पाहिजेत. ते मिळविण्यासाठीं जर कोणी तुला एकादी कामगिरी सांगितली तर ती तूं करशील ? '

त्या माणसानें उत्तर केलें,–' असें विचारण्याचें कारणच नाहीं ! आपण कायती कामगिरी सांगा, म्हणजे मी ती करावयास

पण आपण
नाहींना ?'

र्ती, तुझ्या-
थट्टा करून
आहे ? पण
वितों, आम्ही
विचार कर !
या
असावें
स हा लावून
केतीही अवघड
पर्वा नाहीं.'

विक्रमसेन
बरेंच अवघड
सावधपणानें
भीति बा
नोकर
चर्या
असल्यामुळें जरा

नवख्या मनुष्यास म्हणाला,–'असें
नको. तुझ्या मनांत कसली
हें आम्हांस स्पष्टपणें कळूं दे, म्हणजे
शंका असल्यास आम्ही त्या तुझ्या शंकेचें
निवारण करूं.'

तो नवखा मनुष्य म्हणाला,–'महाराज, मी आपला एक गरीब खेडवळ अडाणी मनुष्य आहें. मला धोक्याचीं कामें करावयाची फारशी संवय नाहीं; म्हणून म्हणतों, जर ह्या कामामध्यें माझ्या जिवावर प्रसंग येणार नाहीं अशी–आपण थोर गृहस्थ-माझी खात्री करीत असाल, तर आपण कराल ती आज्ञा मान्य करण्यास मी एका पायावर तयार आहें,' नंतर तो हळूच म्हणाला,'–'द्रव्यासाठीं मी काय हवें तें करीन, मात्र फांशीं जाण्याची किंवा शिरच्छेद होण्याची भीति नसली म्हणजे झालें.'

विक्रमसेन अर्थपूर्ण हास्य करीत म्हणाला,–'आतां तुझी बरीच समजूत पडली आहे, असें दिसतें.'

तो मनुष्य म्हणाला,–'असें जरी आहे, तरी आपला बेत काय आहे, तो मला पूर्णपणें समजल्याखेरीज मी होय म्हणणार नाहीं. कारण पैसा हा काय, केव्हांना केव्हां तरी मिळेल; पण गेलेला जीव पुनः मिळावयाचा नाहीं. तुमचा बेत मला समजला तरी मी तो कोटें फोडणार नाहीं. तुम्हीं यांतली एकादी मोहोर जरी माझ्या तोंडावर मारली तरी माझें तोंड पक्कें बंद होईल. बरें; तुमचा बेत मला पसंत पडला आणि मी एकदां होय म्हटलें, म्हणजे मग माझा प्राण गेला तरी मी माघार घेणार नाहीं.'

विक्रमसेन म्हणाला,–'तुझें बोलणें रास्त आहे. तूं अगदीं सरळ माणूस दिसतोस. ठीक आहे, असा अगदीं आमच्या जवळ ये, म्हणजे तुला आमचा बेत काय आहे तो सगळा सांगतों.'

नंतर ते तिघे धर्मशाळेच्या एका कोंपऱ्यांत जाऊन बसले, आणि तेथें त्यांनीं अगदीं हलक्या स्वरानें आपला बेत त्या नवख्या गृहस्थास सांगितला. त्या माणसानें त्या दोघांचें भाषण संथपणें ऐकून घेतल्यावर तो त्यांस म्हणाला,–"एवढेंच ना काय तें ? मग यांत इतकें भिण्यासारखें काय आहे ? याहून अवघड कामें मीं मोठ्या शिताफीनें पार पाडलीं आहेत. तुम्ही सांगतां ही कामगिरी करण्याचें मी तुम्हांस वचन देतों."

विक्रमसेन म्हणाला,–'ठरलें तर ! ह्या घे मोहरा. तूं जर हें काम उत्कृष्ट रीतीनें पार पाडून दिलेंस, तर तुला आणखीसुद्धां बक्षिस मिळेल !' 'असें बोलून विक्रमसेन आणि हरदत्त तेथून गेले.

" एकंदरींत हा योगायोग मोठा विलक्षण रीतीनें जमून आला खरा! मी ज्या इच्छा मनांत धरून येथें आलों, त्या माझ्या इच्छा पूर्णपणें साध्य होणार यांत शंका नाहीं. ' असें आपल्याशींच बोलत त्या गृहस्थानें पुनः आपलें अंगवस्त्र भुईवर पसरून त्यावर लोळण घेतली.

प्रकरण ३२ वें.

चतुरक.

रात्रीं पुष्कळ वेळ जागरण झालें असल्यामुळें शेखराला दुसरे दिवशीं प्रातःकाळीं उठावयास थोडा उशीर झाला. त्यावेळीं देखील तो आपोआप जागा झाला नसून त्याच्या दरवाज्यावर कोणीं धक्की मारिल्यामुळें झोंपमोड होऊन तो जागा झाला होता चोरी झाली हें उमगल्या दिवसापासून रोज निजावयास जातांना तो आपल्या शयनस्थानाच्या दरवाज्याला आंतून कडी लावून घेत असे. अर्थात् दाराची कडी त्यानें स्वतः काढल्याखेरीज बाहेरच्या माणसाचा आंत प्रवेश होणें शक्य नव्हतें. सध्यां त्याचा सेवक चतुरक दारावर धक्की मारीत होता. शेखरानें दरवाजा उघडून त्याला आंत घेतलें, त्यावेळीं चतुरकाचा चेहरा बराच फिक्कट व गंभीर दिसत होता.

आपल्या त्या पोरसवदा सेवकाकडे एकवार नजर टाकून शेखरानें त्याला विचारलें – 'चतुरका काय वर्तमान आहे? कांहीं कमीजास्त वर्तमान आहे कीं काय!'

आपण आंत येऊन आपल्या मागें दरवाजा बंद करून घेऊन चतुरक म्हणाला, 'सरकार, मीं आपल्याला एक चिठी आणिली आहे. ही वाचून आपणास आनंद होईल, अशी माझी कल्पना आहे. '

चिठी हीं अक्षरें कानीं पडतांच शेखरानें प्रथम विचारलें,–' चिठी कोणाकडून आली आहे म्हणतोस! '

चिठी पुढें करीत चतुरक म्हणाला,–' चिठीचें अक्षर पाहिल्याबरोबरच ती कोणीं लिहिली आहे हें आपल्या ध्यानीं येईल. ' असें म्हणून त्यानें किंचित् स्मित केलें.

अक्षर पाहतांच शेखराचा कळी थोडीशी उमलली आणि तो म्हणाला,–' अरे वाः, हें तर प्रियंवदेचें पत्र! ' असें म्हणून त्यानें घाईघाईनें तें पत्र उघडिलें. त्या पत्रांत फक्त इतकाच मजकूर होताः–

" मत्प्राणवल्लभ राजपुत्र शेखर यांचें चरणीं प्रियंवदा दासीचे शतशः प्रणिपात. आपलें पत्र पोंचलें. त्या पत्राचें उत्तर मीं लवकर पाठवूं नये, अशी आत्याबाईची आज्ञा झाली असल्यामुळें माझा नाइलाज झाला. तथापि माझ्यानें राहवेना, म्हणून सांधि साधून हें वृत्तमान आपल्या कानीं घालीत आहें. दासीवर [illegible] नये, हीं चरणापाशीं विज्ञाप[illegible]

ही चिठी वांचू[illegible] प्रथमतः अवर्णनीय आनंद झा[illegible] मिला पोंचलें नसावें, किंवा [illegible] अशा प्रकारचे जे संश[illegible] येत असत, ते पार नाही[illegible] प्रेमासंबंधानें शेखराच्या म[illegible] विटाळही झालेला नसल्यामुळें[illegible] णास प्रेमानें पत्र लिहिलें; या [illegible] त्याला विशेष महत्त्व वाटलें नाहीं[illegible] प्रेमानें बद्ध झालेल्या स्त्री–पुरुषांना [illegible] वस्थेमध्यें पत्रदर्शनानें जो आनं[illegible] असतो, तो अवर्णनीय आनंद शे[illegible] झाला, यांत नवल नाहीं. परंतु हा त[illegible] आनंद फार वेळ टिकला नाहीं. लवकरच त्याच्या मनांत दुसरे विचार उत्पन्न झाले, आणि त्या विचारांनीं त्याच्या मनाचा मोठा गोंधळ उडविला. आपल्या मातेनें त्या पत्राचें उत्तर लवकर लिहूं नको, असें प्रियंवदेला कां सांगितलें असावें, याचा त्याला उमज पडेना. अर्थात् आपल्या वडिलांच्या मनांत आपल्यासंबंधानें कांहीं तरी विपरीत

भावना उत्पन्न झाल्या असाव्या असा जो त्याच्या मनांत पूर्वी संशय उत्पन्न झाला होता, तो दृढ झाला, आणि आपणाविरुद्ध प्रतापपुरीं कांहीं कारस्थानें चालली असावीं, अशी त्याच्या मनाची खात्री झाली. हीं कारस्थानें रचणारा चूडामणीशिवाय दुसरा कोण असावा, याचा त्याला उलगडा करतां येईना, आणि उदार मनाच्या त्या पुरुषाला प्रत्यक्ष आपल्या भावासंबंधानें शंका ध्यावी असें वाटेना. अशा प्रकारच्या विचारांनीं त्याचें मन भांबावून गेलें आणि आपण एकदम प्रतापपुरीं जाऊन या सर्व शंकांचा उलगडा करून ध्यावा, असें एकदां त्याच्या मनांत आलें; पण त्यानें आणखी कांहीं दिवस येथेंच राहिलें पाहिजे, अशी वडिलांची सक्त ताकीद असल्यामुळें त्याला तसें करतां येईना. आपण वडिलांची आज्ञा मोडल्यास [illegible] कलुषित झालेलें मन [illegible]; अशा प्रकारचे अनेक [illegible] मनांत उद्भवत असतां [illegible] दुसरें पत्र येईपर्यंत [illegible] नाहीं, असा त्यानें निश्चय [illegible]

[illegible] विचार अतिशय त्वरेनें [illegible] येऊन गेले. प्रियंवदेची [illegible] आणिली हें त्याला अजून [illegible] म्हणून त्यानें आपल्या लहान [illegible] विचारिलें,–'ही चिठी [illegible] आणिली ?'

चतुरकानें उत्तर दिलें,–'मला सुमारें [illegible] घटकांपूर्वी एका माणसानें ही चिठी आणून दिली, आणि तो एकदम चालता झाला.'

शेखरानें प्रश्न केला,–'ही चिठी कोणीं आणली तें सांगशील कीं नाहीं?' चिठी देणारा याशहरांतील कोणी होता, कीं प्रतापपुराहून कोणी येथें आला होता ?'

चतुरकानें घुटमळत उत्तर केलें, 'तो मनुष्य प्रतापपुरकर असेल असें वाटत नाहीं.'

आपली नजर चतुरकावर रोखून शेखरानें त्यास विचारिलें,–'चिठी देतांना तो मनुष्य आणखी काय म्हणाला ?'

चतुरकानें उत्तर दिलें,–'तो माझ्याशीं विशेष कांहींच बोलला नाहीं. त्यानें आपल्याला देण्यासाठीं हें पत्र दिलें, आणि तो एकदम चालता झाला.'

शेखर चतुरकाकडे पुनः तीक्ष्ण दृष्टीनें पाहूं लागला. यावेळीं त्याचें मन ताळ्यावर आल्यासारखें दिसत होतें. पण त्याची मुद्रा आज अगदीं निस्तेज दिसत होती. थोडा वेळ त्याजकडे पाहून शेखरानें त्यास विचारिलें,–'यावरून जरी तो तुझ्या ओळखीचा नसला, तरी तूं त्याच्या ओळखीचा आहेस हें सिद्ध होतें. वास्तविक पाहिलें तर तो मनुष्य चिरीमिरीसाठीं तरी थांबावा.'

चतुरक म्हणाला,–'तो अगदीं सुद्धां थांबला नाहीं. त्यानें माझ्या हातीं ही चिठी दिली, आणि तो एकदम चालता झाला. मी ती चिठी घेऊन लागलाच येथें आलों, आणि दरवाजा वाजविला. परंतु आपण जागे झालां नाहीं, म्हणून मी परत गेलों. त्यावर आणखी एकदां मी येऊन गेलों, पण आपली झोंप पुरी झाली नव्हती, आतां [illegible] येथें तिसऱ्यानें आलों.'

शेखरानें आपल्या सेवकाच्या मुद्रेचें सूक्ष्म दृष्टीनें निरीक्षण चालविलें होतें. कांहीं वेळानें त्याच्या मनांत कपट असावें, म्हणून तो आपल्या नजरेला नजर भिडवावयास कचरतो असें त्यास वाटलें. चतुरकाची स्पष्ट शब्दांनीं कान उघडणी करून त्याच्या मनांत काय आहे, याचा ठाव घ्यावा असें एकदां शेखराच्या मनांत आलें, पण नुसत्या संशयावरून एकाद्याचें मन दुखविणें त्याला योग्य वाटत नसल्यामुळें त्यानें आपल्या मनाची खात्री होईपर्यंत दम धरावा, हें वरें, असा विचार केला; आणि त्याला आपल्या कामास निघून जावयास सांगितलें. चतुरक गेल्यानंतर लागलाच दुर्मुख आंत आला.

प्रेमाच्या गोष्टी गुप्त राखणें हें आपलें कर्तव्य आहे, असें शेखरास वाटत असल्यामुळें त्यानें प्रियवंदेच्या पत्रासंबंधानें दुर्मुखापाशीं अगदीं सुद्धां उल्लेख केला नाहीं. तथापि आपल्या सेवकासंबंधानें आलेल्या संशयाची निवृत्ति करून घेण्याच्या कामीं या व्यक्तीचा उपयोग करून घेण्याचा शेखराचा विचार होता.

शेखरानें प्रथमतः विचारलें,–'त्या शंभुसेनासंबंधानें तुम्हाला आणखी कांहीं कमजास्त वर्तमान समजलें आहे काय?'

दुर्मुख म्हणाला,–'अलीकडे कित्येक दिवसांत विशेष सांगण्यासारखी कांहींच गोष्ट घडून आलेली नाहीं. अलीकडे तो फार सावधपणानें वागत असतो, यावरून आम्ही त्याच्या पाळतीवर आहों, असा त्याला संशय आला असावा.'

शेखर गंभीरतेनें म्हणाला,–'माझ्या मनांत चतुरकाविषयीं संशय उत्पन्न होऊं पाहतो. तो माझ्या पुढें आला म्हणजे गोंधळल्यासारखा होतो, आणि पूर्वीप्रमाणें माझ्याकडे मोकळ्या मनानें तो पाहत नाहीं. माझी त्याला भीति वाटत असावी, असें त्याच्या मुद्रेवरून दिसतें. या पोऱ्यावर माझा किती विश्वास होता, आणि मी त्याला किती इमानी समजत होतों, हें तुम्हाला माहीत आहेच. आतां थोड्या वेळापूर्वी मीं त्याच्या मनाची जी चलबिचल झालेली पाहिली, त्यावरून मला त्याचा संशय येऊं लागला आहे. तथापि त्यानेंच ही चोरी केली असेल, असें माझें मन मला अजून सांगत नाहीं. खरेंच सांगतों, चतुरकानें ही चोरी केली असें जर माझ्या प्रत्ययास आलें, तर यापुढें मी जगांतील कोणत्याही माणसावर विश्वास ठेवणार नाहीं. बरें, पण तुम्ही मजकडे असे चमत्कारिक नजरेनें कां पाहतां?'

दुर्मुख गंभीर स्वरानें म्हणाला,–'महाराज, आपल्या मुखांतील हे शब्द ऐकून माझ्या मनांतील संशय दुणावत आहे! आज पहांटेपासून ज्या गोष्टी घडून आल्या, त्यांवरून चतुरकासंबंधानें माझ्या मनांत देखील शंका आली होती.'

शेखरानें विचारिलें,–'तर मग तुमच्या मनांत काय आहे, तें चटकन सांगून टाका पाहूं. या बाबतींत आपण एकमेकांशीं अगदीं मोकळ्या मनानें बोलणें जरूर आहे.'

दुर्मुख म्हणाला,–'महाराज, चतुरकाविषयीं असें बोलण्याचा प्रसंग येईल, असें कधीं माझ्या स्वप्नांत देखील नव्हतें! पण काय करणार? ज्या अर्थीं आपणां उभयतांच्याही मनांत त्याच्यासंबंधानें एकदम संशय आला आहे त्या अर्थीं आपण परस्परांशीं मोकळ्या मनानें बोलणें जरूर झालें आहे, यांत संशय नाहीं.'

त्याच्याकडे आपलें पूर्ण लक्ष्य देऊन शेखरानें विचारिलें,–'चतुरकाविषयीं तुमच्या मनांत संशय उत्पन्न होण्यास कोणतें कारण घडून आलें?'

दुर्मुख म्हणाला,–'आज पहांटे प्रहर रात्रीचे सुमारास कोठें तरी दरवाजा वाजल्याचा शब्द मला ऐकूं आल्यामुळें मी जागा झालों. कदाचित् शंभुसेन कोठें जात असेल, असें माझ्या मनांत येऊन मी आपल्या दिवाणखान्याचें दार सावधपणानें उघडून तेथून कानोसा घेऊं लागलों. त्यावेळीं जरी काळोखच होता, तरी त्या काळोखांत सुद्धां मला एक माणूस जिन्याकडे जातांना दिसलें. कदाचित् शंभुसेनच मागच्या जिन्याचें बागेंत उतरत असेल, असा मला संशय येऊन मी पाय न वाजवितां तसाच त्याच्या मागें निघालों. मी अगदीं जपून जिना उतरून मागच्या बागेंत गेलों, तों तेथून थोड्या अंतरावर चांदण्यामध्यें दोन माणसें बोलत उभीं आहेत, असें मला आढळून आलें. इतकेंच नव्हे, तर, त्या दोन माणसांपैकीं एक चतुरक आहे, हें पाहून मी आश्चर्यानें अगदीं चकित होऊन गेलों!'

शेखर म्हणाला,–'तुम्ही सांगतां ही गोष्ट मोठी आश्चर्याची आहे, यांत शंका नाहीं. बरें ते दोघे काय बोलत होते, आणि तो दुसरा कोण होता, हें तुम्हाला समजलें काय?'

दुर्मुख म्हणाला,–'त्यांचें भाषण आपल्यास ऐकूं येईल तर पहावें, म्हणून मी तसाच पुढें गेलों. पण चमत्कार हा कीं, तें दोघेही हळुहळू चालतच होते! त्यामुळें मला त्यांचें भाषण ऐकूं येईना. मी त्यांच्या दृष्टीस पडलों, तर ते सावध होतील असें माझ्या मनांत येऊन मी आणखी पुढें गेलों नाहीं, त्यामुळें दुसऱ्या माणसाचा चेहरा माझ्या अगदीं दृष्टीस पडला नाहीं. पुढें थोड्या वेळानें ते एका जागीं उभे राहिले. तेव्हां मी जरा पुढें झालों; त्यावेळीं चतुरकाचे पुढील शब्द माझ्या कानीं पडले. 'कुमार शेखर बाहेर गेले आहेत; ते परत येत तोंपर्यंत मला त्यांची वाट पाहत जागत बसणें भाग आहे. पण आपण असें थंडीमध्यें फिरण्यापेक्षां याच पलीकडच्या खोलींत जाऊन बसलों तर काय हरकत आहे? आपणास अजून पुष्कळ गोष्टी बोलावयाच्या आहेत. तेथें आपण बोलत असलों, तरी अशा अपरात्रीं आपलें भाषण ऐकावयास कोणी जागें असेल, अशी शंका देखील घ्यावयास नको!' हे त्याचे शब्द ऐकून मला किती आश्चर्य वाटलें असेल याची आपणच कल्पना करा!'

शेखर म्हणाला,–'ही आश्चर्याची गोष्ट आहे, यांत शंकाच नाहीं. परंतु तो आणखी कांय बोलला, आणि तो कोणापाशीं बोलत होता, हें समजणें फार अगत्याचें आहे.'

दुर्मुख म्हणाला,–'मलाही त्यावेळीं असेंच वाटलें, म्हणून मी तसाच लपत छपत आणखी पुढें गेलों, परंतु त्या दुसऱ्या माणसाचा चेहरा माझ्या दृष्टीस पडला नाहीं. तो मनुष्य अतिशय उंच होता, इतकेंच काय तें त्याच्या संबंधानें मला सांगतां येईल. चतुरकाच्या सूचनेप्रमाणें ते दोघेजण जवळच्या एका दालनांत शिरले, व त्यांनीं दरवाजा लावून घेतला. मी त्या दरवाज्याबाहेर उभा राहून कानोसा घेऊं लागलों, पण मला त्यांचें सर्व भाषण ऐकूं येईना. मधून मधून एकादा शब्द मात्र माझ्या कानावर पडे. आपलें नांव त्यांनीं दोन चार वेळां उच्चारिलें, एकदां 'खंडणीची रकम' असे शब्द माझ्या कानीं आले, आणि दमयंती, प्रियंवदा, दृढसंध हीं नांवें मला एक दोन वेळ ऐकूं आलीं. याखेरीज मला आणखी कांहीं ऐकूं आलें नाहीं. त्यांचें बोलणें संपून ते जाग्यावरून उठले, हें त्यांच्या चळवळीवरून माझ्या ध्यानीं आलें, आणि मी तेथून आपलीं पावलें न वाजूं देतां मागें फिरलों.'

दुर्मुखानें सांगितलेलें हें वर्तमान शेखरानें संथपणें ऐकून घेतलें, आणि तो बराच वेळपर्यंत विचारांत निमग्न झाला. नंतर तो उद्विग्न चित्तानें बोलला,–'हें कोडें आतां अधिकाधिक कठिण होत चाललें आहे! आजपर्यंत त्या चतुरकाला मी विश्वासु समजत होतों; इतका बाहेरून गरीब दिसणारा तो पोरगा इतका लबाड असेल, अशी कधीं माझ्या मनांत शंका देखील आली नव्हती! त्या दिवशीं मध्यरात्रीचे सुमारास माझ्या शयनमंदिरांत शिरून चोरी करणारा तोच असेल काय? जर चोरी त्यानेंच केली असेल, तर आपण शंभुसेनाचा संशय घेतला तो व्यर्थच कीं काय! किंवा यापुढें त्या दोघांनीं एकमतानें हें कृत्य केलें असावें, असें समजावयाचें! बरें, तुम्ही रात्रीं जो मनुष्य पाहिला तो शंभुसेनच नसेल ना!'

दुर्मुखानें उत्तर केलें,–'तो शंभुसेन नव्हता याबद्दल माझ्या मनाची पूर्ण खात्री आहे. चतुरक ज्याच्या जवळ बोलत होता, तो मनुष्य अतिशय उंच असून अंगानें भला भक्कम पुरुष होता; यावरून तो

शंभुसेन नव्हता हें उघड आहे. खेरीज, शंभुसेन आणि चतुरक यांस खलचत करावयास मागची बागच कशाला हवी होती ? सध्यां या वाड्यांत माणसें अगदीं थोडीं असल्यामुळें दुसऱ्या मजल्यावरच्या पुष्कळ खोल्या रिकाम्या पडलेल्या आहेत. शिवाय शंभुसेन व चतुरक सध्यां ज्या खोल्यांमध्यें रात्रीं निजत असतात, त्या खोल्या समोरासमोर आहेत, अर्थात् त्यांना कोणाच्या दृष्टीस न पडतां वाटेल त्या वेळीं एकमेकांस सहज भेटतां येण्यासारखें आहे.'

शेखर म्हणाला,–' असें खरें; परंतु सध्यां आपण कोणतीही गोष्ट घाईघाईनें करतां कामा नये. तुम्ही पुनः आज रात्रीं चतुरकावर नजर ठेवा, आणि कांहीं कमी जास्ती आढळल्यास एकदम मजकडे येऊन मला वर्दी द्या. मी स्वतः येऊन या प्रकरणाचा एकदम निकाल लावून टाकीन. तुम्ही मोठ्या सावधपणानें चतुरकावर नजर ठेवा. त्याचा आम्हांस संशय आला आहे, हें त्याच्या ध्यानीं येतां कामा नये. तसेंच शंभुसेनावरही तुम्हाला नजर ठेवणें अजून जरूरच आहे. कारण त्या दिवशीं आनंद-मठांत जो प्रसंग घडून आला, त्याचा विचार करतां तो शंभुसेन माझ्याशीं शत्रुत्व करणाऱ्यांस सामील झाला आहे, याबद्दल शंका उरत नाहीं.'

दुर्मुख बोलला,–' आपलें म्हणणें अगदीं बरोबर आहे. मी म्हणतों, त्या दुष्ट व निर्लज्ज दमयंतीनें फितूर केलेला या वाड्यांतील तोच इसम असला पाहिजे, आणि आपण कोठें जातां, काय करतां, हेंही तोच तिला सांगत असावा !'

शेखर बोलला,–' किंवा हा चतुरकच घरभेद्या झाला नसेल कशावरून ! सध्यां आपण कितीही तर्क केले, तरी ते व्यर्थ आहेत ! खरा प्रकार काय आहे, याचा जेव्हां उलगडा होईल, तेव्हां खरें !'

नंतर दुर्मुख निघून गेला. शेखराला एकान्त मिळाल्या बरोबर त्याच्या मनांत पुनः विचारांची गर्दी उसळली. तो आपल्याशींच म्हणाला,–' चतुरक ज्याच्याशीं बोलत होता, त्यानेंच तर ही प्रियंवदेची चिठ्ठी आणली नसेल ना ? तसें जर असेल, तर त्यावरून चतुरकाच्या इमानासंबंधानें शंका घेण्याचें कांहींच कारण नाहीं. तो ज्याच्याबरोबर बोलत होता, तो जर शत्रुपक्षांतील असता, तर त्यानें ही माझ्या प्रियेची चिठ्ठी मला कां बरें पोंचविली असती ! उलट पाहिलें तर चतुरकानें अशा रीतीनें रात्रीच्या सुमारास चोरून मारून माणसाची भेट कां ध्यावी ? चतुरकाच्या हातून लबाडी होईल, असें माझे मन अजून सांगत नाहीं. अर्थात् दिवस वाट पाहून मगच त्याबद्दल काय तो आपल्या मनाचा निश्चय आजच्या सबंध दिवसांत चतुरकाच्या संबंधानें कांहीं अधिक माहिती आली नाहीं, तर मी उद्या विचारून या संशयाचा निकाल लावून घेईन ' नंतर थोडा वेळ पुनः आपल्याशींच बोलला,– ज्यापासून रोजच्या रोज घडून येत आहे वेड लावण्या

अशा याचें मन उद्विग्न ची चिठ्ठी पुनः नंतर तो आपल्या र आला, आणि घोड्यावर बसून गेला. त्याला आ माणें सरदार हल्ला याची असल्यामुळें र–मानकऱ्यांच्या ष्ठित सरदारानें ानें दोन प्रहरचें ले, आणि तिसरे

प्रहरीं तो पुनः वृषपतीच्या वाड्यांत परत आला. त्या वेळीं, आपला सेवक चतुरक भर दोन प्रहरीं बराच वेळपर्यंत बाहेर गेला होता, आणि तो परत आला तेव्हां त्याची मुद्रा कावरी बावरी दिसत असून तेव्हां-पासून तो आपल्या खोलींत बसून आहे, असें दुर्मुखाच्या तोंडून शेखरास समजलें.


म्हणून शेखर दुर्मुखास म्हणाला,–'मीं पूर्वी सांगितल्याप्रमाणें तुम्ही आज रात्रीं [illegible] यावर नजर ठेवा. आज रात्रीं जें काय [illegible] येईल, त्यावरून आपण पुढें काय [illegible] तें ठरवूं.'

[illegible] दुर्मुख शेखराच्या हातीं एक पत्र [illegible] म्हणाला,–'महाराज, हें एक [illegible] कोणीं पत्र दिलें आहे.'

[illegible] तें पत्र हातीं घेतलें, आणि [illegible] वाचिलें. त्या पत्रांत असा [illegible]

[illegible] दृढसंध महाराजांचे [illegible] राजकुमार शेखर यांजप्रत

'पत्र [illegible] विनंति अशी कीं, आपण
'गेल्या [illegible] गुप्त मंडळाची सभा
'पाहिली [illegible] मंडळांतील मी एक
'सभासद [illegible] चा स्वतःचा ज्यांत
'हितसंबंध [illegible] महत्त्वाची
'गोष्ट [illegible] इच्छा
'असल्या[illegible] तुमच्या
'भेटीची [illegible] दुसऱ्या
'अनेक [illegible] मला
'तुमच्या [illegible] घेतां
'येत नाहीं, [illegible] त
'आहे. आपण [illegible] वर
'मध्यरात्रीच्या [illegible]-
'पाशीं याल, [illegible].
'या कामीं [illegible]
'नाहीं. मला [illegible]
'आहे, तें अगदीं [illegible]
'आहे. परंतु जर [illegible]
'आणखी कोणास [illegible]



'होणार नाहीं, आणि आपल्या हिताच्या
'गोष्टीस आपण मुकाल. हें पत्र लिहिणारा
'आपला मित्र असून तो केवळ मित्र-
'भावानेंच आपणांस संकटांतून मुक्त
'करावयास सिद्ध झाला आहे. ही संधि
'गमवाल तर आपणांस पश्चात्ताप होईल!'

हें पत्र आपल्याशींच वाचून पाहिल्यावर शेखर चिडून म्हणाला,–'हा आणखी एक नवीन घोटाळा!' नंतर तो दुर्मुखास म्हणाला,–'हें पत्र कोणीं आणलें हें तुम्हास माहीत आहे?'

दुर्मुखानें उत्तर दिलें,–'आतांच देवडी-वाल्यानें हें पत्र आपणांस देण्यासाठीं मज-पाशीं दिलें. महाराज, आपल्या मनास खेद देणारा असा कांहीं मजकूर तर या पत्रांत नाहीं ना?'

त्याच्या या प्रश्नास कांहीं उत्तर न देतां शेखरानें त्यास उलट प्रश्न केला,–'हें पत्र ज्यानें आणलें, तो तरी देवडीवाल्याच्या ओळखीचा होता काय?'

दुर्मुखानें उत्तर केलें,–'देवडीवाल्याच्या सांगण्यावरून असें दिसतें कीं, हें पत्र आणणारा मनुष्य या शहरांत नवीनच आलेला असावा. केवळ मजुरीच्या आशेनें त्यानें हें पत्र आणून पोंचविलें.

शेखर म्हणाला,–'ठीक आहे. आतां मी जरा एकान्तीं बसून या पत्राचा विचार करून पाहणार आहें.'

आपणास ही सूचना आहे, हें दुर्मुखानें ओळखिलें, आणि तो आपल्या कामास निघून गेला. नंतर या निनांवी पत्राप्रमाणें आपण नेमलेल्या स्थळीं जावें कीं जाऊं नये, याचा आपल्या मनाशीं विचार कर-ण्यांत शेखर निमग्न झाला. केवळ या शह-रांतच नव्हे, तर आपल्या जन्मभूमीमध्यें प्रतापपुरामध्यें सुद्धां आपल्या विरुद्ध कारस्थानें चालली आहेत, अशी त्याच्या मनाची पुरी खात्री झालेली असल्यामुळें आपल्या शत्रूंनीं आपणांस पाशांत अडकविण्यासाठींच हें पत्र

पाठविलें असावें, असें सकृद्दर्शनीं त्याच्या मनांत आल्याखेरीज राहिलें नाहीं. पत्र लिहिणारा गृहस्थ गुप्तमंडळाचा सभासद होता, हें त्या पत्रांत उघड लिहिलेलें होतें, आणि त्याशिवाय कालच्या प्रसंगाचा त्यांत उल्लेख होता, यावरून तर त्याबद्दल शंकाच उरत नव्हती. यामुळें मात्र त्याचें मन अधिक विचारांत पडलें. कारण आपल्या विरुद्ध जीं कारस्थानें चालू आहेत, त्यांचा गुप्तमंडळाशीं कांहीं संबंध असेल, असें त्यास वाटेना. अर्थात् कांहीं राजकारस्थानासंबंधानें विचार करण्यासाठीं आपली कोणी तरी भेट घेऊं इच्छित असेल, असें शेखराच्या मनांत आलें, आणि आपण ज्याचा शोध करीत आहों, तो सरदार हलधरच आपली गांठ घेण्याचा प्रयत्न करीत नसेल ना, अशीही शंका त्याच्या मनांत आली. अधिक विचार करतां, हीच गोष्ट त्याला शक्य वाटली, आणि त्यानें पत्राप्रमाणें वागावयाचें असा निश्चय केला. तो स्वतः शूर असल्यामुळें आपल्यावर एकादें संकट येईल, या गोष्टीची तो मुळींच पर्वा करीत नव्हता. फक्त त्याला जी काय भीति वाटत होती, ती दमयंतीची. तिचे इतक्या दिवस बंद असलेले चाळे पुनः सुरू झाले नसतील ना, अशी शंका त्याच्या मनांत आली, आणि त्याबरोबर त्याच्या अंगावर कांटा उभा राहिला. तो शूर होता, यांत तर संशयच नाहीं. त्यानें प्रसंगीं एकट्यानें दहापांच शत्रूंबरोबर युद्ध करून जय संपादन केला असता; पण प्रबल मनोविकारांनीं उन्मत्त झालेल्या स्त्रीशीं सामना करण्याचें सामर्थ्य त्याच्या अंगीं नव्हतें. तथापि हें पत्र दमयंतीकडून आलें असेल, असें त्याला अगदीं वाटत नव्हतें, म्हणून त्यानें पत्राप्रमाणें वागावयाचें असा निश्चय ठरविला.

नित्याप्रमाणें रात्रीचीं भोजनें होऊन शेखर आपल्या शयन-मंदिरांत जाऊन पोंचला, त्यावेळीं सुमारें प्रहर रात्र झाली होती. तो आपल्या मंचकावर लवंडतो न लवंडतो, तोंच दुर्मुख त्याजपाशीं आला. शेखराच्या मनांतून पत्राप्रमाणें मध्यरात्रीच्या सुमारास दक्षिण-वेशीपाशीं जावयाचें असल्यामुळें त्यानें आपल्या शयनस्थानाचें दार बंद करून घेतलें नव्हतें. दुर्मुखाला पहातांच शेखरानें त्यास विचारलें,-'कांहीं कमीजास्ती बातमी आहे कीं काय?'

दुर्मुख म्हणाला,-'होय; चतुरक लवकर निजावयासाठीं म्हणून चाकर-माणसांतून थोड्या वेळापूर्वीं उठून गेला; आणि तो आपल्या जागीं न जातां एकटाच बागेंतील फाटकाच्या वाटेनें कोठें चालता झाला!"

ही गोष्ट ऐकून शेखर मोठ्या विचारांत पडला. आपणांस आलेल्या निनावी पत्राशीं चतुरकाचा संबंध जोडण्याचा शेखरानें प्रयत्न केला; पण ती गोष्ट त्याच्या मनास पटेना. गुप्तमंडळांतील लोक महा धूर्त असल्यामुळें, ते चतुरकासारख्या कोंवळ्या पोराला आपल्या कारस्थानांत घेतील, ही गोष्ट त्याच्या मनास योग्य वाटेना. थोडा वेळ विचार केल्यानंतर तो दुर्मुखास म्हणाला,-'एकंदरीनें पाहतां माझ्यावर कांहीं तरी संकट येणार आहे, यांत शंका नाहीं. काल ठरल्याप्रमाणें तुम्ही त्या चतुरकाच्या पाळतीवर रहाचें. तो केव्हां परत येतो तें पहा, परंतु तो आल्याबरोबर एकदम मला वर्दी देण्याचें कारण नाहीं. चतुरक कोठें गेला असावा, यासंबंधानें माझ्या मनांत एक शंका उत्पन्न झाली आहे, आणि ती फेडून घेण्यासाठीं आणखी थोड्या वेळानें मी स्वतां बाहेर जाणार आहे. यासाठीं, चतुरक माझ्या पूर्वी येथें आला; आणि मी त्या वेळीं येथें नसलों, तर त्या गोष्टीचें तुम्हाला आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं.'

हें शेखराचें भाषण ऐकून दुर्मुखाला मोठें आश्चर्य वाटलें, परंतु त्याला या बाबतींत आपल्या धन्याला अधिक प्रश्न विचारण्यास धैर्य होईना. शेखर आणखी कांहीं बोलतो

कीं काय, हें पाहण्यासाठीं तो आणखी थोडा वेळ त्याच्या समोर उभा राहिला; पण तो कांहींच न बोलल्यामुळें दुर्मुखाला तेथून निघून जाणें भाग पडलें.

आणखी कांहीं वेळानें–मध्यरात्रीच्या पूर्वी घटकाभर–शेखरानें आपला पोषाक चढविला, आपलीं हत्यारें कमरेस लटकाविलीं, आणि तो वाड्यांतून बाहेर पडला. देवडीवर आल्यानंतर तेथील पहारेकऱ्यास त्यानें आपण परत येईपर्यंत जागें राहण्याची आज्ञा केली, आणि तो दक्षिण–वेशीच्या मार्गाला लागला. रात्र स्वच्छ होती, चांदणें निर्मळ पडलें होतें, शहरांतील कित्येक भाग मागें टाकून तो दक्षिण–भागामध्यें येऊन पोंचला असतां, आपल्यापुढें थोड्याच अंतरावर एक तरुण पोऱ्या चालत आहे, असें त्याच्या नजरेस पडलें. शेखर त्याजकडे निरखून पाहूं लागला, त्या वेळीं त्या तरुणाच्या पोषाकावरून आणि त्याच्या सडपातळ देहयष्टीवरून तो आपला सेवक चतुरकच आहे, हें त्यानें ओळखिलें. आपण त्याला गांठून घेऊन एवढ्या रात्रीं शहरांत भटकत फिरण्याचें कारण काय असें हटकावें, असें शेखराच्या एकवार मनांत आलें. पण तितक्यांत, आपण थोडा वेळ त्याच्या पाळतीवर राहून तो कोठें जातो हें पहावें–तेवढ्यामुळें आपण जातों त्या कामास थोडा उशीर झाला तरी हरकत नाहीं, असा विचार करून तो त्याच्या दृष्टीस न पडतां त्याच्यामागून हळूहळू जाऊं लागला. चतुरक मागें न पाहतां सरळ आपल्या मार्गानें चालला होता. जातां जातां तो दक्षिण–वेशीच्या नजीक असलेल्या हेमचंद्राच्या धर्मशाळेपाशीं एकदम उभा राहिला. ही धर्मशाळा शेखराला माहीत होती. चतुरकाची वाट पाहत असलेला एक उंचेला मनुष्य धर्मशाळेच्या आवारांतून चटकन पुढें आला, त्याला पाहतांच चतुर कानें त्यास प्रश्न केला,–'तूं सगळी जमवाजमव बरोबर केलीसना!'

एवढेंच चतुरकाचें भाषण शेखराच्या कानीं पडलें. तो ज्या उंच माणसाबरोबर बोलत होता, त्या माणसानें आपलें अंगवस्त्र डोकीवरून पांघरिलें असल्यामुळें त्याचा चेहरा शेखरास दिसला नाहीं. त्याचें भाषण आपणास ऐकावयास मिळेल तर पहावें, अशा इच्छेनें शेखर लपत छपत धर्मशाळेच्या आवारांत शिरला, पण तो आंत जाण्यापूर्वीच चतुरक आणि त्याचा तो उंचेला साथीदार असे दोघेही तेथून निघून गेले असल्यामुळें, शेखराची ती इच्छा पूर्ण झाली नाहीं. त्यानें मोठ्या सावधपणानें धर्मशाळेमध्यें प्रवेश करून तपास चालविला. यावेळीं तेथें सुमारें आठ दहा उतारू घोरत पडलेले होते, पण त्यांमध्यें चतुरक किंवा त्यांचा साथीदार हे त्याच्या दृष्टीस पडले नाहींत. त्यावरून ते आपणास झुकांडी देऊन मागच्या वाटेनें निघून गेले असावे, असा तर्क करून तो तेथून परत फिरला. निनांवी पत्रामध्यें निर्दिष्ट केलेल्या स्थलाकडे तो चालला असतां आपल्या मागें कोणाचीं पावलें वाजत आहेत, असें त्याला भासलें, म्हणून तो मागें वळून पाहूं लागला. कदाचित् दगा झाल्यास, आपली तयारी असावी, म्हणून त्यानें आपल्या तरवारीचा बंद सोडून ठेविला. पांचचार पळें लोटण्याच्या पूर्वीच एक मनुष्य त्याच्यापाशीं येऊन उभा राहिला. या मनुष्याला शेखरानें आपल्या साऱ्या जन्मांत कधींही पाहिलेलें नव्हतें. त्याचा पोषाक सभ्य असून त्याच्या मुद्रेवरून देखील तो भला माणूस असावा, असें दिसत होतें.

या मनुष्यानें शेखरापाशीं येतांच सभ्यपणानें प्रणाम करून मोठ्या अदबीनें म्हटलें,–'अहो राजकुमार, आपण अगदीं वेळेवर आलां!'

या सौजन्ययुक्त प्रश्नानें शेखराच्या मनांतील कुशंका नाहींशा झाल्या, आणि तो

म्हणाला,–'मला निनांवी पत्र लिहिणारे आपणच काय?'

तो गृहस्थ म्हणाला,–'होय; तोच मी. आपण जर जरा असे या पलीकडच्या घरांच्या छायेंत याल, तर तेथें मी आपणांस जें काय सांगावयाचें आहे, तें सांगेन.'

शेखर क्षणमात्र–फक्त एक क्षणमात्रच–कचरला. पण दुसऱ्या क्षणीं तो न डगमगतां त्या गृहस्थाबरोबर चालूं लागला. ते सध्यां ज्या ठिकाणीं आले होते, तेथें रस्त्याच्या दोहों बाजूंस मोठमोठे उंच वाडे असल्यामुळें, त्या ठिकाणीं रस्त्यांत बराच काळोख पडला होता. तेथील एका वाड्याच्या पायऱ्या चढून दरवाज्याच्या बाजूला असलेल्या ओट्यास ओठंगून राहून तो मनुष्य शेखरास म्हणाला,–'आपण येथें कितीही वेळ बोलत बसलों, तरी आपलें भाषण कोणी ऐकेल, अशी भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं.'

शेखराचा हात जरी तरवारीच्या मुठीवर ठेविलेला होता, तरी त्याच्या मनांत यावेळीं भीतीचा लवलेशही वागत नव्हता. तो आपल्या सोबत्याच्या बाजूला उभा राहून म्हणाला,–'मी ऐकावयाला तयार आहे.'

इतक्यांत चमत्कारिक रीतीनें त्याचा हात दाबून तो गृहस्थ हळूच शेखरास म्हणाला,–'महाराज, जरा थांबा! इकडे कोणी येत आहे, असें वाटतें.'

त्या माणसाचें हें भाषण खरें होतें. ते सध्यां ज्या घरापाशीं उभे होते, त्याच घराच्या कोंपऱ्यापाशीं सध्यां दोन माणसें आलीं होतीं. ते दोघेही सध्यां मोठ्यामोठ्यानें हंसत आणि आरडत ओरडत जणुं काय दारूबाजाप्रमाणें पुढें येत होते. ते सरळ आपल्या मार्गानें जात आहेत, असें शेखराला वाटत असल्यामुळें तो संशयरहित अंतःकरणानें त्यांजकडे पाहत होता. परंतु तितक्यांत ते सिंग्याप्रमाणें दिसणारे दोन्ही इसम एकदम शेखराच्या अंगावर पडले, आणि त्याला आपली तरवार म्यानांतून बाहेर काढण्यास संधि न देतां त्यांनीं त्यास गच्च आंवळून धरिलें शेखर आपला तोल सांवरण्यासाठीं मागच्या बाजूस असलेल्या दरवाज्यास टेंकला, तोंच तो दरवाजा एकदम आंतल्या बाजूला उघडला, आणि शेखर धाडकन आंत पडला. इतक्यांत त्या दरवाज्याच्या आंत असलेल्या पांचसहा जवानांनीं त्याच्यावर हल्ला करून त्याला अगदीं जखडून धरिलें. डोळ्याचें पातें लवतें न लवतें इतक्या अवकाशांत त्या लोकांनीं शेखराचीं शस्त्रें काढून घेतलीं, आणि दरवाजा बंद केला.

शेखर मोठ्यानें ओरडून म्हणाला,–'विश्वासघात! दगा! हरामखोरांनो, तुमच्या नीचपणाचा कळस झाला!'

या प्रसंगीं शेखराला पहिल्यानें जो मनुष्य भेटला होता, आणि ज्याची सभ्य मुद्रा पाहून तो फसला होता, तो मनुष्य किंचित् कर्कश आणि अधिकारदर्शक स्वरानें म्हणाला,–'राजपुत्रा, आतां विनाकारण गडबड करण्यांत किंवा शिव्या देण्यांत काय मतलब आहे? सध्यां तुझ्यावर जो प्रसंग आला आहे, त्यांतून पार पडणें तुझ्या हातीं आहे. आम्ही आतां तुला येथून शहराबाहेर नेणार आहों. आम्ही तुला आमच्या इष्ट स्थलीं नेल्यावर तुला तेथें जें काय करावयास सांगूं, तें तूं केलेंस, तर तुझ्या शरीरास तिळभर सुद्धां अपाय न होतां तूं आनंदानें परत येशील. तूं वचनाचा सच्चा माणूस आहेस हें आम्हांस माहीत आहे; आणि आम्ही तुझ्या वचनावर विश्वास ठेवण्यास तयार आहों. आम्ही तुला शहरांतील रस्त्यांतून नेत असतां, वाटेनें गडबड न करण्याचें जर तूं वचन देशील, तर तुझ्यावर कोणत्याही प्रकारचा जुलूम न करतां आम्ही तुला आमच्याबरोबर मोकळा घेऊन जाऊं. पण तूं तसें वचन देण्यास तयार नसशील, तर तुझे हात–पाय बांधून आणि तुझ्या तोंडांत बोळा

कोंबून तुला तिकडे घेऊन जाणें आम्हास भाग पडेल.'

हें ऐकून शेखरानें एकवार आपल्या भोंवतीं नजर टाकली, त्या वेळीं पहिल्या गृहस्थासेरीज आणखी आठ पुरुष आपल्या भोंवतीं हातीं शस्त्रें घेऊन उभे आहेत असें त्यास आढळून आलें. हे सर्व लोक हलक्या कुलांत जन्म पावलेले असून, द्रव्यासाठीं कोणतेंही क्रूर कर्म करावयास कचरणार नाहींत, असें त्यांच्या मुद्रेवरूनच त्याच्या लक्षांत आलें. आपलीं हत्यारें आपल्या-पाशीं नाहींत, अशा स्थितींत आपण हट्ट धरणें वेडेपणाचें आहे, असें एकदम त्याच्या ध्यानांत आलें, आणि तो मुकाट्यानें ते नेतील तिकडे जावयास सिद्ध झाला. तो म्हणाला,–'तुम्ही शस्त्रधारी नऊ आणि मी निःशस्त्र एकटा. अशी स्थिति धडधडीत दिसत असल्यामुळें तुम्ही न्याल तेथपर्यंत मी तुमच्या बरोबर मुकाट्यानें यावयाचें कबूल करतों. परंतु तुम्ही एकदां मुक्कामा-वर पोंचलां, म्हणजे मी वचनांतून मुक्त झालों. नंतर मला जी संधि सांपडेल तिचा फायदा घ्यावयास मी अगदीं अनमान कर-णार नाहीं.'

पहिला गृहस्थ म्हणाला,–'हें तुझें बोलणें अगदीं वाजवी आहे. तेथें जाऊन पोंच-ल्यावर तूं वचनांतून मुक्त झालास.' नंतर तो एका जवानाकडे वळून म्हणाला,–'अरे, तो खेडवळ अजून कसा आला नाहीं! हें मोठें चमत्कारिक दिसतें. त्यानें आमच्या-पासून आपल्या कामगिरीबद्दलचे पैसे तर अगोदरच घेतले आणि तो आयत्या वेळीं आला नाहीं! बरें असो; चला, ठरल्या-प्रमाणें ठिकाणाकडे चालूं लागा कसे!'

नंतर ते सर्वजण त्या घराच्या मागच्या बाजूकडे गेले. त्या घराच्या मागच्या बाजूस मोठें थोरलें अंगण असून, त्या अंगणामध्यें जिनें करून तयार केलेले कित्येक घोडे बांधून ठेवलेले होते. यांपैकीं एका घोड्यावर बसावयास त्या गृहस्थानें शेखराला फर्मावि‌लें. म्हणून शेखर घोड्यावर बसला. बाकीचे इसमही घोड्यांवर बसले, आणि अंगणा-पलीकडे असलेल्या एका मोठ्या रस्त्यामध्यें आले. शेखराला मध्यें ठेवून सर्वांनीं त्याच्या भोंवतीं आपले घोडे घेतले आणि अशा व्यवस्थेनें ते शहरांतून बाहेर पडले. दक्षिण-वेशींतून बाहेर येतांच त्यांनीं आपले घोडे भरधांव सोडले. शेखराला त्या शहराची पुरी माहिती असल्यामुळें सध्यां आपण ज्या मार्गानें जात आहों, तो मार्ग थेट आनंदमठाकडे जातो, हें त्याच्या एकदम ध्यानीं आलें, आणि त्याला परमावधीचें आश्चर्य वाटलें. मात्र आपणास तेथें कोणत्या हेतूनें नेण्यांत येत आहे, हें कांहीं त्याच्या ध्यानीं येईना. अशा अप-रात्रीं त्या भयानक स्थलीं आपणास नेण्यांत त्यांचा उद्देश तसाच कांहीं तरी भयंकर असला पाहिजे, असें मात्र त्याला वाटत होतें. कदाचित् आनंदमठावरून जात असलेल्या रस्त्यानें ते आपणास जवळच्यां एकाद्या गांवीं नेत असतील, अशी शंका एकवार त्याच्या मनांत आली, तोंच त्याच्या बरोबरचे लोक राजमार्ग सोडून देऊन थेट मठाकडे जाणाऱ्या लहान मार्गाला लागले, आणि थोड्याच वेळामध्यें ते सर्वजण मठाच्या महाद्वारांतून आंत शिरले.

प्रकरण ३१ वें.

पिशाच–दर्शन.

महाद्वारांतून आंत आल्यावर त्यांनीं आपले घोडे उभे केले, आणि सर्वजण खालीं उतरले. नंतर शेखर त्यांस म्हणाला,–"ज्या अर्थीं तुम्ही येथें मुक्काम केला आहे, त्या अर्थीं मी आतां तुम्हांस दिलेल्या वचनांतून मुक्त झालों आहें. यापुढें मला योग्य संधि मिळाल्यास मी ती अगदीं

दवडणार नाहीं. पण अशा रीतीनें मला येथें आणण्यांत तुमचा हेतु काय आहे, हें मला अगोदर समजलें पाहिजे. ”

हें भाषण करीत असतां शेखरानें आपल्या आजूबाजूस दृष्टि फिरविली, त्यावेळीं त्याला तेथून थोडया अंतरावर एक दिवा दिसला. पूर्वीच्या प्रसंगीं ज्या कोठडीमध्यें दुर्मुख लपून बसला होता, त्याच कोठडीमध्यें हा दिवा होता. त्या कोठडीच्या भिंतींना जे झरोके होते, त्या झरोक्यांतून त्या दिव्याचा उजेड शेखराच्या दृष्टीस पडत होता. परंतु बाहेर जें पिठासारखें स्वच्छ चांदणें पडलें होतें, त्या चांदण्यापुढें तो तेथील लहानसा दिवा एकाद्या काजव्यासारखा दिसत होता. शेखर त्या दिव्याकडे पाहत असतां मध्येंच एकदां तो दिवा दिसत नाहींसा झाला, आणि लागलाच पुनः दिसूं लागला, यावरून त्या दिव्यापुढून कोणी तरी चालत गेलें असावें, अशी कल्पना एकदम त्याच्या मनांत आली. हा दिवा त्यांच्या बरोबर आलेल्या माणसांच्या दृष्टीस पडत होता यांत संशयच नव्हता, परंतु तो दिवा पाहून त्यांना आश्चर्य वाटलें असें ज्या. अर्थी शेखराला आढळून आलें नाहीं, त्या. अर्थी त्यांचे साथीदार त्यांच्या पूर्वीच मठांत येऊन महंताच्या कोठडींत त्यांची वाट पाहत बसलेले असावे, असा त्यानें तर्क केला.

शेखरानें केलेला प्रश्न ऐकून त्याला पकडून आणणाऱ्या टोळीचा पुढारी त्यास म्हणाला,–‘ आम्ही तुला येथें कां आणलें आहे, हें तुला लवकरच समजून येईल. मी तुला अजून सांगतों, तूं जर आमच्या इच्छेप्रमाणें वागलास, तर तुझ्या देहाला लेशमात्र अपाय न होतां, तूं येथून सुरक्षित पार पडशील. पण जर तूं भलताच हट्ट धरून बसलास, तर त्याचा परिणाम चांगला होणार नाहीं, हें मीं तुला वेळींच कळवून ठेवितों. ’

त्या माणसाच्या या भाषणावरून इतकें मात्र शेखराच्या ध्यानीं आलें कीं, आपल्या इच्छेविरुद्ध असलेली कांहीं तरी गोष्ट आपल्याकडून करून घेण्याच्या विचारानें त्यांनीं आपल्यास इकडे आणलें आहे. या दिशेनें त्यांचें मन विचार करूं लागलें असतां, गेल्या रात्रीं घडून आलेल्या प्रसंगाची ही पुनरावृत्ति असावी, निंबराजाच्या पक्षास असलेल्या कारस्थानी लोकांनीं आपण त्यांच्या पक्षाला मिळावें म्हणून हा खटाटोप केला असावा, हीच गोष्ट सरुद्धर्शनीं त्याच्या मनामध्यें आली; या गोष्टीवांचून दुसरी शक्य कल्पना त्याच्या मनांत येईना.

त्याला तेथें आणणाऱ्या लोकांनीं आपले घोडे तेथील झुडपांस अडकवून ठेविले, आणि त्याला आपल्यामध्यें घेऊन ते महंताच्या कोठडीकडे चालले. शेखरानें त्या कोठडींत प्रवेश केला, त्यावेळीं तेथें एक विलक्षण देखावा त्याच्या नजरेस पडला.

आनंदमठाच्या सर्व इमारतीपैकीं ज्या ठिकाणीं समाधि होती तो भाग, व त्याला लागून असलेली महंताची कोठडी, हे दोनच भाग काय ते अद्यापि शाबूत होते, असें आम्ही पूर्वी सांगितलें आहे, तें वाचकांच्या ध्यानीं असेलच. शेखर सध्यां महंताच्या कोठडींत आला असून त्या कोठडींतून समाधि व तिच्या आसपासचा भाग त्याला चांगला दिसत होता. समाधीपाशीं यावेळीं आणखी चार माणसें त्याच्या दृष्टीस पडलीं. त्यांपैकीं दोन त्याच्या चांगलीं ओळखीचीं होतीं. एक विक्रमसेन आणि दुसरी त्याची बहीण दमयंती. या दोघांखेरीज जीं आणखी दोन माणसें तेथें होतीं, त्यांपैकीं एक ब्राह्मण होता. त्याच्या जवळ आणखी एक गृहस्थ होता, त्याची जात कोण होती हें जरी ध्यानीं येण्यासारखें नव्हतें, तरी त्याच्या कानांत असलेली लेखणी, हातांतील दौत आणि खांकेंतील कागदांचें पुडकें, यांवरून तो कायस्थ असावा–निदान कारकुनी कर-

णारा कोणी असावा–असें अनुमान करतां येत होतें...दमयंतीच्या अंगावर यावेळीं बहुमूल्य वस्त्रालंकार पुष्कळ असून तीं जणुंकाय नव्या नवरीप्रमाणें सजलेली दिसत होती. अशा प्रकारच्या भयानक स्थलीं आणि ऐन मध्यरात्रीचे सुमारास हीं माणसें तेथें जमलेलीं पाहून, शेखराला फारच आश्चर्य वाटलें.

शेखर तेथें ओलेला दृष्टीस पडतांच दमयंती मुरका मारून बाजूला तोंड फिरवून उभी राहिली, आणि विक्रमसेन मोठ्या आढ्यतेनें शेखराला सामोरा आला; त्या काळच्या सांप्रदायाप्रमाणें विक्रमसेनानें शेखरास नम्रपणें सलाम केला, आणि तो त्यास म्हणाला,–'अहो राजकुमार, आपलें स्वागत असो. आपलें आमचें जरी कुलपरंपरागत वैर आहे, तरी तें बाजूला ठेवून मी आपला सत्कार करावयास सिद्ध झालों आहें. तुम्हीही झाल्या गेल्या सर्व गोष्टी विसरून जाऊन आम्हांस मित्र समजावें, आणि आमच्याशीं गोडीगुलाबीनें वागावें, अशी आमची याप्रसंगीं तुम्हांस विनंति आहे!'

अत्यंत निरस्कारयुक्त मुद्रेनें आणि तुच्छतादर्शक स्वरानें शेखर बोलला,–'पुरे पुरे! हा मानभावीपणा पुरे झाला! तुमच्या मनांत किती कपट भरलें आहे, हें तुमच्या कृतीवरून स्पष्ट दिसत असतां मित्रत्व संपादन करण्याच्या गोष्टी बोलावयास तुम्हाला शरम वाटली पाहिजे होती. मनांत एक, बोलण्यांत दुसरें, आणि कृतींत तिसरें, अशा प्रकारचें ज्याचें आचरण असतें, त्यांस दुष्ट–दुरात्मे–असें शहाणे समजतात.'

विक्रमसेन म्हणाला,–'तुम्ही आणखी कितीही संतापलां, तरी तुमचा तो सर्व संताप व्यर्थ आहे. कांहीं विशिष्ट हेतु साध्य करण्यासाठीं अगदीं नाइलाजानें आम्हांस तुमच्याशीं असें वर्तन करावें लागलें आहे. या आमच्या हरदत्तानें आपल्याला इकडे आणतांना जर आपल्याशीं बेअदबीचें वर्तन केलें असेल, तर त्याला तुम्ही क्षमा केली पाहिजे. आमच्या नुसत्या बोलावण्यानें तुम्ही आमची गांठ घेतली नसती, हें उघड आहे; म्हणूनच आपली गांठ घेण्यासाठीं आम्हाला असा आसुरी उपाय योजावा लागला.'

शेखरानें उत्तर केलें,–'या प्रकारासंबंधानें तुम्हीं जबाबदार असतां हरदत्ताला दोष दण्याची माझी इच्छा नाहीं. आपला धनी जी कामगिरी सांगेल ती इमानानें करणें हें सेवकाचें कर्तव्य आहे. पण आपल्या सेवकाला काय काय सांगावयाचें त्याचा विचार धन्याला करावा लागतो. अर्थात् मजवर जुलूम–जबरदस्ती केली ती तुम्हीं केली असें मी समजतों. माझ्यावर अशा रीतीनें जुलूम करण्याचें कारण काय, हें मला तुमच्या तोंडूनच समजलें पाहिजे.'

विक्रमसेनानें उत्तर केलें,–'तें आतां लवकरच तुम्हास समजेल. आम्हीं तुमच्याशीं स्नेहसंबंध जुळविण्यासाठींच तुम्हाला येथें आणिलें आहे; मी, हरदत्त आणि हे दुसरे आठ जवान–'

हरदत्त मध्येंच बोलला–'पूर्वी ठरल्याप्रमाणें आठ जवान यावयाचे, पण सध्यां येथें सातच हजर आहेत. तो हेमचंद्राच्या धर्मशाळेंतील धाटिंगण आला नाहीं.'

आपल्या समोर उभे असलेल्या सात जवानांकडे नजर टाकून विक्रमसेन म्हणाला–'यांत तो उंचेला दांडगेश्वर दिसत नाहीं खरा! हें असें कसें झालें? आमचा विश्वासघात करण्याचा तर त्याचा इरादा नसेलना?

हरदत्त म्हणाला,–'महाराज, आतां आपण आपलें काम त्वरेनें आटोपलें पाहिजे. एकदां ह्या कामाचा आपणां[illegible] 'कूल किंवा प्रतिकूल–कसाही नि[illegible] झाला, म्हणजे पुढें काय करावयाचें हें आपण पूर्वीच ठरवून ठेविलेलें आहे.'

विक्रमसेन बोलला,–'आतां मी लवकरच या प्रकरणाचा शेवट लावून टाकतो. अहो

शेखर, तुम्हाला आम्हीं येथें कां आणलें, हें तुमच्या लक्ष्यांत आलेंच असेल ? कारण या माझ्या भगिनीचें प्रेम तुमच्यावर बसलें आहे, हें तुम्हांस माहीतच आहे, पुष्कळ गोष्टींचा विचार करतां प्रतापपुरकर व नारायणपुरकर यांच्या मधील वैराचा शेवट लागावा; आणि शरीरसंबंधानें परस्पर मैत्री व्हावी, ही गोष्ट मला अत्यंत इष्ट वाटत आहे. मी तुम्हांस फक्त अर्ध्या घटकेची मुदत देतों, तोंपर्यंत विचार करून तुम्ही या दमयंतीशीं विवाह करावयास कबूल झालां, तर ठीकच आहे; नाहीं तर तुमचा परिणाम काय होईल तेंही मी अगदीं स्पष्ट शब्दांनीं तुम्हांस सांगून सोडितों. आम्ही सर्व जणांनी या कामास हात घालण्यापूर्वी भयंकर शपथा वाहिल्या आहेत. तुम्ही जर हिच्याशीं विवाह करण्यास कबूल झालां नाहीं, तर तुम्ही येथून परत जिवंत जाल, ही आशाच सोडा. तुमचा प्राण घेतल्यावर तुमच्या प्रेताची वासलाद गुपचुप रीतीनें लावतां यावी, म्हणून आम्ही हें निर्जन स्थल पसंत केलें आहे. लग्नविधि यथाशास्त्र करावयाचा तो मागाहून होईल. आज तुम्हीं येथें देवब्राह्मणांसमक्ष आम्हीं तयार केलेल्या करारपत्रावर राजीखुषीनें सही करून दिल्याखेरीज आम्ही तुम्हास जिवंत ठेवणार नाहीं. लग्नास संमति द्या, नाहीं तर मरणास तयार व्हा ! हे दोन मार्ग तुमच्या पुढें आहेत. यांतून तुम्हांस कोणता पसंत आहे, हें सांगा पाहूं ! '

हे शब्द ऐकत असतां शेखराच्या शरीराचा जो भडका उडाला होता, आणि तो ज्या तुच्छ दृष्टीनें त्या दोघां भावंडांकडे पाहत होता, त्याचें यथार्थ वर्णन करावयास आमची लेखणी समर्थ नाहीं. विक्रमसेनाचें हें, कर्णकटु भाषण सुरू असतां शेखरानें त्याला अडथळा केला नाहीं; त्यानें विक्रमसेनाला शेवटपर्यंत बोलूं दिलें. आपले दोन्ही हात आपल्या छातीवर स्वस्तिकाकार ठेवून ओंठ रागानें फुरफुरत असतां, डोळे लालभडक झाले असतां, मस्तकावरील शिरा फुगून ताठ झाल्या असतां आणि अंगावर रोमांच उभे राहिले असतांही - जणुं काय क्रोधाच्या किंवा अभिमानाच्या निर्जीव मूर्तीप्रमाणें तो आपलें मन आंवरून अगदीं स्तब्ध उभा राहिला होता. विक्रमसेनाचें भाषण संपलें, त्यावेळीं शेखरानें आपल्या भोंवती एकवार नजर फेंकली. त्यावेळीं आपल्या भोंवतीं हरदत्त आणि त्यानें जमा केलेले सात मारेकरी हातीं नंगी शस्त्रें घेऊन विक्रमसेनाच्या आज्ञेची वाट पाहत आहेत, असा देखावा त्याच्या नजरेस पडला. हरदत्त आणि ते मारेकरी यांच्या मुद्रा एकाद्या क्रूर-मांसभक्षक-पशूंप्रमाणें भेसूर आणि रक्तपातासाठीं हपापलेल्या दिसत होत्या. त्या सर्वांच्या अंतःकरणास त्यांच्या साऱ्या जन्मांत कधीं भूतदयेचा विटाळ देखील झाला नसेल, इतक्या त्यांच्या मुद्रा उग्र दिसत होत्या. एकामागून दुसऱ्याकडे, अशा रीतीनें त्यानें त्या सर्वांकडे एकवार तुच्छतेनें अवलोकन केलें. मारेकरीच ते ! भूतदया-मानापमान-सदसद्विवेक वगैरे गोष्टींचा त्यांच्या अंतःकरणांत लवलेशही नसल्यामुळें आपण इतके अशा एका लहानशा निःशस्त्र मुलावर उठलों आहों, ही मोठी शरमेची गोष्ट आहे, असें एकाच्या देखील मनास वाटलें नाहीं, यांत नवल नाहीं.

शेखराला जरी यावेळीं इतका संताप चढला होता, तरी त्याच्या अंतःकरणास भीतीचा लेशही शिवला नव्हता; म्हणून तो क्षणक्षणित मर्दानी स्वरानें अगदीं न कचरतां किंवा अगदीं न अडखळतां बोलला,- ' विक्रमसेन ! तूं केलेल्या प्रश्नाचें उत्तर देण्यास मला अवकाश मुळींच नको. मला या गोष्टीचा विचार करण्याची अगदीं जरूर नाहीं. मी काय उत्तर देणार याचा अंदाज तुला पूर्वीच करतां आला असेल ! तूं आपल्यास मोठा वीर पुरुष म्हणवितोस, पण हें

नामर्दपणाचें कृत्य करावयाची तुला अगदीं सुद्धां लज्जा वाटला नाहीं, यांचें मला आश्चर्य वाटतें. तसेंच या साथीदारांसारखे नीच पुरुष ही भूमि कशी प्रसवते; यांचेंही मला आश्चर्यच वाटतें. अशा प्रकारचे स्वार्थासाठीं स्वकर्तव्य आणि स्वाभिमान विसरून जाणारे पुरुष ज्या भूमीमध्यें निर्माण झाले, त्या भूमीला धिक्कार असो ! तूं नीच आहेस, हें तुझ्या वर्तनावरून उघड दिसत आहे; पण तुझ्याहूनही तुझी बहीण अधिक नीच आहे ! ही शुद्ध राक्षसी आहे, याबद्दल माझ्या तरी मनाला तिळमात्र संशय नाहीं. ही मजवर आपलें प्रेम आहे, असा बहाणा करीत आहे ! परंतु मीं जर हिचा स्वीकार केला नाहीं, तर माझा जीव घेण्याला हिची तयारी आहे ! धिक्कार असो अशा प्रकारच्या प्रेमाला, आणि अशा प्रकारच्या मानभावी स्त्रियेला ! अशा प्रकारच्या स्त्रीचा संसर्ग घडण्यापेक्षां देहपात झाला तर त्यांत वाईट काय आहे ? आजचा हा अमानुष प्रकार पाहून असलीं नीच माणसें ज्या जगांत आहेत, त्या जगांत जिवंत राहण्यापेक्षां मरण आलेलें बरें, असें मला वाटूं लागलें आहे ! ' नंतर तो अत्यंत गंभीरपणानें म्हणाला,–' तुम्हाला जें कांहीं करावयाचें असेल तें खुशाल करून घ्या ! '

ह्या वेळचें त्याचें तें वीरश्रीयुक्त सणसणीत भाषण ऐकून विक्रमसेनाच्या मनाची स्थिति मोठी विलक्षण झाली. त्याला शेखराच्या या भाषणानें लाज वाटली आणि क्रोधही आला. परंतु या प्रसंगीं जर आपण माघार घेतली, तर आपल्या नामर्दपणाचा डंका वाजल्याशिवाय राहावयाचा नाहीं, आणि आपण आपल्या प्रतिज्ञेप्रमाणें शेखराचा प्राण घेतल्यास आपल्या मनांतील सर्व महत्त्वाकांक्षा जागच्या जागीं थंड होतील, अशा प्रकारच्या विचारांनीं त्याचें मन द्विधा झालें होतें. म्हणून आपला सर्व क्रोध आवरून आणि अपमान सहन करून तो शेखरास म्हणाला,–' शेखर, पुनः विचार कर ! हा कांहीं पोरखेळ नव्हे ! तुझ्या जिवावरचा प्रसंग आहे. यावेळीं जो विचार करशील त्यावरच तुझा सोक्ष–मोक्ष अवलंबून आहे. मी तुला आणखी तीन वेळ हाच प्रश्न विचारीन. माझ्या प्रश्नाचें जर तूं अनुकूल उत्तर दिलेंस, तरच तुझा निभाव लागेल. पहिल्यानें प्रश्न करतों,–तूं आमच्या इच्छेप्रमाणें करार करून देतोस कीं नाहीं ! '

शेखरानें पूर्ववत् खणखणीत आवाजानें उत्तर केलें,–' नाहीं ! '

विक्रमसेनानें पुनः विचारलें,–' मी तुला दुसऱ्यानें विचारतों,–' तूं आमचें म्हणणें मान्य करतोस कीं नाहीं ! –सध्यां तुझ्यावर जो प्रसंग गुजरला आहे, तो बिकट आहे, हें मी तुला पुनः बजावून सांगतों. आमच्या मनाप्रमाणें गोष्टी जुळून न आल्यास तुझा प्राण घेण्याच्या आम्हीं शपथा वाहिल्या आहेत ! आतां जरी तुझा देव येथें आला, तरी तुझी मुक्तता होणें शक्य नाहीं ! '

शेखर पूर्वीहून अधिक आवेशानें बोलला,–' अरे नीचा ! देवाच्या पवित्र नामाचा उच्चार करावयास तुझें हें असद्भापणानें विटाळलेलें मुख अगदीं पात्र नाहीं ! ईश्वराची करणी किती अगाध आहे, हें तुला मशकाला कशानें कळणार ! ईश्वराच्या मनांत येण्याचा अवकाश, कीं तुझ्यासारख्या अधमाधमाच्या तोंडून शब्दोच्चार होण्यापूर्वीच तो आपली कृति करून दाखवील ! त्याच्याच इच्छामात्रेंकरून सर्व जगाचे व्यवहार चालले आहेत, त्याचीच इच्छा असेल तर मात्र माझे प्राण जातील, एरव्हीं तुमच्यासारखे सहस्रावधि नीच पुरुष जरी माझ्यावर तुटून पडले, तरी माझ्या केसालाही धक्का लागणार नाहीं ! '

विक्रमसेन चिडून म्हणाला,–' वटवट पुरे कर ! तुझ्या या वेदांताची मला अगदीं जरूर नाहीं ! माझ्या प्रश्नाचें उत्तर मला पाहिजे ! पहा ! जर तूं या दुसऱ्या प्रश्नाचें उत्तर दिलें नाहींस, तर पहिल्या वेळेप्रमाणें

तुझें नकारार्थी उत्तर आहे, असें समजून मी तुला फक्त आणखी एकदां शेवटचें विचारीन!'

हें त्याचें भाषण चाललें असतां शेखराचे नेत्र दुसरेंच काम करीत होते. जरुरीच्या वेळीं आपणांस एकदम कोणाच्या हातांतील शस्त्र काढून घेतां येईल, आणि तें शस्त्र हातीं आल्यावर आपण कोणत्या स्थळाचा आश्रय केला असतां आत्मसंरक्षण होईल, · याचें तो सूक्ष्मदृष्टीनें निरीक्षण करीत होता. तथापि विक्रमसेनाच्या भाषणाकडे त्याचें मुळींच दुर्लक्ष होतें असें नाहीं. विक्रमसेनाचें भाषण संपतांच त्यानें एकदम उत्तर दिलें, तो म्हणाला, 'तूं आणखी एकदां विचार कीं दहादां विचार, माझा निश्चय बदलावयाचा नाहीं. '

विक्रमसेनानें पूर्वीहुन अधिक निश्चयपूर्वक विचारलें,–' अजून विचार कर ! मी आतां पुनः तिसऱ्यानें तुला तोच प्रश्न विचारतों ! यावेळीं जर तुझें अनुकूल उत्तर आलें नाहीं, तर तुझें आयुष्य संपलें असें समज ?'

शेखरानें पूर्वीप्रमाणेंच दृढनिश्चयानें ठांसून उत्तर केलें,–' माझें पहिलें उत्तर कायम आहे! ' हे शब्द त्याच्या मुखांतून पुरते बाहेर पडण्यापूर्वीच त्यानें चित्त्याप्रमाणें जवळच असलेल्या हरदत्तावर झडप घातली, आणि त्याच्या उजव्या हातावर जोरानें मुष्ठिप्रहार केला. त्यामुळें त्याच्या हातांतील तरवार ढिली पडली, आणि ती दुसऱ्या क्षणीं शेखराच्या हातीं चमकूं लागली. हातीं तरवार आल्याबरोबर शेखरानें दुसऱ्या एका मारेकऱ्यावर हल्ला करून त्याला जखमी केलें, आणि त्याच्याही हातांतील तरवार काढून घेतली. शेखराच्या दोन हातांतील दोन्ही तरवारी विजेप्रमाणें चमकूं लागल्या, आणि त्याच्यावर वार करण्यास प्रवृत्त झालेल्या सहाजणांच्या तरवारी त्या दोन तरवारींवर आपटूं लागल्या. शेखराच्या मुखांतून शेवटचें उत्तर बाहेर पडल्यानंतर पांच चार पळांतच इतका प्रकार घडून आला.

शेखराचें शौर्य आणि धैर्य असामान्य असल्यामुळें, असल्या बिकट प्रसंगीं तो तिळमात्र डगला नाहीं. आपल्या भोंवती पडलेला सहा जवानांचा वेढा फोडून आत्मरक्षणार्थ झगडत झगडत तो मठाच्या दरवाज्यापर्यंत आला. इकडे दमयंती एकाद्या राक्षसीप्रमाणें विकराळ स्वरानें ओरडून शेखराचा प्राण घेण्यासाठीं मारेकऱ्यांस व आपल्या बंधूस उत्तेजन देत होती ! हरदत्त तर पराभवानें खिन्न होऊन मान खालीं घालून जागच्या जागींच उभा राहिला होता. आपण ज्या कामासाठीं येथें आलों, त्याचा अशा रीतीनें अकल्पित परिणाम झालेला पाहून, निःशस्त्र झालेला मारेकरी, कायस्थ आणि वाङ्निश्चय करण्यासाठीं उपाध्याय म्हणून आलेला ब्राह्मण यांनीं पलायनाचा मार्ग स्वीकारण्याचा निश्चय करून ते मठांतून बाहेर पडूं पाहत होते; पण दरवाज्यापाशीं येतांच त्यांची गति कुंठित झाली. कारण त्यावेळीं शेखर दरवाज्यापर्यंत आलेला असून तो मोठ्या वीरश्रीनें सहाजणांबरोबर युद्ध करीत असतां बाहेर पडण्याची संधि पहात होता.

शेखर शूर होता, आणि न भितां मोठ्या कुशलतेनें तो आपलीं हत्यारें चालवीत होता, हें खरें; पण जिवावर उदार होऊन लढणाऱ्या सहा इसमांबरोबर युद्ध करून विजय संपादन करणें हें कृत्य त्याच्या आटोक्याबाहेरचें होतें. विक्रमसेनाचें आचरण जरी एकाद्या वीरास शोभण्यासारखें नव्हतें, तरी तो युद्धकलेंत कमी निष्णात होता असें नाहीं. शेखराला आत्मसंरक्षण करीत असतां किती श्रम होत आहेत, हें तो जाणून होता. म्हणून तो मोठ्यानें ओरडून म्हणाला,–' मूर्खा ! अजून तरी हा दुराग्रह सोड, आणि आमच्या म्हणण्याप्रमाणें वागावयास तयार हो. तूं जरी मोठा योद्धा अस-

लास, तरी आम्हां सहाजणांबरोबर तुझा एकट्याचा निभाव लागणें शक्य नाहीं, हें ध्यानांत घे, आणि आपला जीव वांचीव ! अशा रीतीनें तूं शौर्यानें लढत असतां प्राणास मुकलास तरी त्यापासून तुझी कीर्ति होईल असें जर तुझ्या मनांत येत असलें, तर ती तुझी कल्पना चुकीची आहे. आम्ही सर्वजण मयंकर शपथांनीं बद्ध झालेले असल्यामुळें, तुझा अशा रीतीनें परिणाम झाला ही गोष्ट कोणालाही समजणार नाहीं. आणि तूं एकाएकीं नाहींसा झालास म्हणून तुझीं माता-पितरें शोक करीत बसतील ! यासाठीं अजून तरी कांहीं विचार कर ! '

हे शब्द विक्रमसेनाच्या तोंडून पुरते बाहेर पडण्यापूर्वीच ज्याप्रमाणें आकाशामध्यें वीज चमकावी, त्याप्रमाणें तेथें कसला तरी लख्ख उजेड पडला आणि त्याचे मागोमाग एक भयानक किंकाळी ऐकूं आली ! या किंकाळीचा नाद इतका तीक्ष्ण होता कीं, जणुं काय आपल्या कानांत एकादा बाणच प्रवेश करीत आहे, असा त्या सर्वांस भास झाला ! लढत असलेल्या सर्व लोकांचे हात लुळे पडल्यासारखे झाले; आणि त्यांच्या सर्वांच्या दृष्टि एकदम त्या किंकाळीच्या उगमस्थानाकडे वळल्या. ही किंकाळी मठाच्या मागच्या कोपऱ्यावर असलेल्या विहिरीकडून आली, ही गोष्ट त्या सर्वांच्या एकदम ध्यानांत आली,आणि एका शेखराखेरीज बाकीच्यांच्या मुखावर प्रेतकळा आली. त्यांचीं तोंडें पांढरीं फटफटीत झालीं, आणि त्यांच्या अंगांस एकदम दरदरून घाम सुटला. दरवाजा रिकामा झाला, व शेखर एकदम बाहेर पडला. दमयंती आपल्या भावाच्या अंगास बिलगली आणि ब्राह्मण व कायस्थ यांनीं मागें न पाहतां एकदम महाद्वाराकडे धूम ठोकिली. विक्रमसेन, हरदत्त, दमयंती, आणि मारेकरी भयचकित दृष्टीनें विहिरीकडे पाहत असतां सर्वांसमक्ष त्या विहिरींतून एक धिप्पाड व असामान्य उंची असलेली आणि विचित्र वेष धारण केलेली आकृति वर आली. ही आकृति पुरुषाची होती. तिच्या मागून आणखी एक आकृति बाहेर आली, ही स्त्रीची असून ती त्या पुरुषाच्या मानानें कितीतरी नाजूक दिसत होती. पुरुषाकृतीच्या हातीं लांब व पल्लेदार तरवार असून ती परजीत असतां त्या आकृतीच्या मुखांतून भयंकर किंकाळ्या बाहेर पडत होत्या. या भेसूर आणि कर्कश किंकाळ्यांमध्यें स्त्रीच्या आकृतीच्या किंकाळीची भर पडून त्यांच्या योगानें संपूर्ण मठप्रदेश दणाणून गेला. या दोन्ही आकृति थेट मठाकडे चालून येत आहेत, हें दृष्टीस पडतांच गलित धैर्य झालेल्या विक्रमसेनाच्या लोकांनीं इतरांच्या जिवाची पर्वा न करतां जिकडे वाट फुटेल तिकडे धूम ठोकिली, आणि मठामध्यें सामसूम झालें ! शेकडों वर्षांपूर्वीं ज्यांनीं त्या विहिरींत जीव दिला होता, तींच माणसें भर मध्यरात्रीच्या समयास भयंकर किंकाळ्या फोडीत पिशाचरूपानें प्रगट होतात, अशी जी एक दंतकथा भृगुकच्छ नगरांतील आबालवृद्धांस माहीत होती, तिच्या सत्यत्वाविषयीं विक्रमसेनाला शंका असल्यामुळें, त्यानें आपल्या मनांतील भयंकर बेत सिद्धीस नेण्यासाठीं हेंच स्थल पसंत केलें होतें. परंतु दंतकथेप्रमाणें सर्व प्रकार अक्षरशः प्रत्यक्ष घडून आलेला दृष्टीस पडतांच त्याची पांचांवर धारण बसली. विक्रमसेनाचें शौर्य जरी शेखराच्या शौर्याहून पुष्कळ कमी प्रतीचें होतें, तरी त्याच्या अंगीं शौर्य होतें यांत संशय नाहीं; पण त्या शौर्याला सदाचरणाची जोड नसल्यामुळें तें निरुपयोगीं झालें होतें. आपण जें पापकृत्य करीत आहों, त्याचा दंड करण्यासाठीं हीं पिशाचें प्रकट झालीं असें त्याच्या पापी मनास वाटत होतें. पण शेखराचें आचरण सत्याला धरून असल्यामुळें त्याच्या मनास भीतीचा स्पर्शही झाला नाहीं, ' तूं जर कोणतेंही पापकर्म केलेलें नाहीं, तर तुला

पीडा करण्यास पिशाचें समर्थ होणार नाहींत,' असें त्याचें मन त्याला सांगत असल्यामुळें तो अगदीं डरला नाहीं. उलट अशा अकल्पित रीतीनें परमेश्वरानें आपलें रक्षण केलें, ही गोष्ट त्याच्या मनांत येऊन त्याला ईश्वराच्या अगाध कर्तृत्व शक्तीचें मोठें आश्चर्य वाटलें. आतां यापुढें येथें राहण्यांत मतलब नाहीं, असा विचार करून तो सावकाशपणें मठांतून बाहेर पडला, आणि त्यानें पूर्वीच्या घोडे बांधलेल्या ठिकाणाकडे जाऊन त्यांतील एका चांगल्या जनावरावर तो आरूढ झाला. त्याच्या हातीं दोन तरवारी होत्या, त्यांपैकीं एक टाकून देऊन त्यानें एकदम भरधांव घोडा पिटाळला. दक्षिण वेशीजवळ येईपर्यंत त्यानें घोड्याचा वेग कमी केला नाहीं, कीं मागें वळून पाहिलें नाहीं. वेशींतून आंत शिरल्यावर शेखराच्या मनाला थोडी स्वस्थता मिळाली आणि तो सावकाशपणें नगरांत शिरला.

कोणत्याही प्रकारचा अडथळा न येतां तो वृषपतीच्या वाड्यापाशीं येऊन पोंचला, तेथें जागत असलेल्या देवडीवाल्याला शेखर घोड्यावरून परत आला या गोष्टीचें मोठें आश्चर्य वाटलें, कारण तो जातांना जसा पायीं गेला, तसा येतांना तो पायींच परत येईल अशी त्याची कल्पना होती. तो देवडीवाला शेखराकडे आश्चर्यानें पाहूं लागला असतां शेखराच्या मुखमंडलावरील नेहमींचें तेज अगदीं नष्ट झालें असून त्याची मुद्रा अगदीं फिकट दिसत आहे, ही गोष्ट त्याच्या ध्यानीं आल्याखेरीज राहिली नाहीं.

शेखर देवडीवाल्यास म्हणाला,—' तूं हा घोडा तबेल्यांत नेऊन बांध. हा घोडा ज्याचा आहे तो उद्यां येथें येऊन तो घेऊन जाईल. ' असें बोलून घोड्याचा लगाम देवडीवाल्याच्या अंगावर फेंकून शेखर तडक वाड्यांत शिरला, आणि कोणा चाकर माणसांस हाका न मारतां तो एकदम आपल्या शयनमंदिरांमध्यें गेला. तेथें गेल्यावर त्यानें आपलें अंग पलंगावर टाकले, अर्थात् गुप्त नुकत्याच घडून आलेल्या एकंदर गोष्टीचे बुरखे विचार करूं लागला. शेखर फारस आणि भोळा नव्हता. ही गोष्ट वाचकांच्याल शेखआलीच असेल. प्रतापपुरच्या व गोष्टींइतर लोकांचा शकुन, कौल, राहिली कीं, इत्यादि भ्रमकारक किंवा मोहजन्य मागावर पूर्ण भरंवसा होता, परंतु शेखें येऊन गोष्टींस बिलकुल महत्व देत नसे, हें वाचकांस माहीत आहेच. त्यानें सरदार हलधराचे बायतींत देवीस लाविलेल्या कौलावर अगदीं विश्वास ठेवला नव्हता; आणि त्यानें आनंदमठा संबंधाची दंतकथा जेव्हां चतुरकाचे मुखानें प्रथम ऐकली, तेव्हां सुद्धां त्याला त्या दंतकथेंतील भुतांच्या गोष्टींत कांहीं तथ्यांश असेल, असें अगदीं वाटलें नव्हतें. पण आजचा तो प्रत्यक्ष देखावा पाहून त्याचें मन द्विधा झालें होतें. त्याला या प्रकाराचा उलगडा करतां येईना. झालेला विलक्षण प्रकार त्यानें आपल्या डोळ्यांनीं प्रत्यक्ष पाहिला असल्यामुळें तो खोटा म्हणतां येईना. आणि भुतांखेतांवर त्याचा विश्वास नसल्यामुळें त्याला तो खराही म्हणतां येईना ! त्याला आपल्या मनाचा कांहींच निश्चय करतां येईना तो जसजसा अधिकाधिक विचार करूं लागला, तसतसे त्याचें मन अधिकाधिक भांबावूं लागलें. अशा रीतीनें त्याचें मन गोंधळून गेलें असतां, आपण ईश्वराच्या कृपेनेंच जिवावरच्या संकटांतून मुक्त झालों, हा विचार एकदम त्याच्या मनांत आला, आणि ज्या परमकृपाळु ईश्वरानें आपलें अशा अगम्य गोष्टीनें रक्षण केलें, त्याची मनोभावानें प्रार्थना करणें हें आपलें कर्तव्य आहे, असें वाटून त्यानें तात्काल हात जोडिले, आणि आपल्यास पाठ येत असलेलीं कित्येक स्तोत्रें म्हणून त्यानें परमेश्वराची मानसिक पूजा केली. इतका वेळपर्यंत त्याच्या विचारांचा गोंधळ उडून त्याला कांहीं सुचेनासें झालें

लास, तरी या रीतीनें थोडावेळ परमेश्वराचा नुवाद गाईल्यावर त्याच्या मनास ध्यान शांतता प्राप्त झाली.

अशा मन हळुहळु ताब्यावर येत चाललें मुकलाइतक्यांत त्याच्या शयनमंदिराचा असें जर घडला, आणि दुर्मुखानें तेथें तुझी का. इतका वेळपर्यंत शेखराला चतुमयंत्रा संबंधानें घडलेल्या गोष्टींचें अगदीं रण नव्हतें, पण दुर्मुखाला पाहतांच त्याला त्या गोष्टींची आठवण झाली, आणि त्यानें प्रश्न केला,–' तुम्ही कां आलां होतां ? तुम्हीं कांहीं सांगणार आहां कीं काय ?'

अत्यंत गंभीर मुद्रेनें शेखराकडे पहात दुर्मुख म्हणाला,–'महाराज, माझ्या चौकसपणाबद्दल माफी करा, पण खरेंच सांगतों, आपली मुद्रा मला आज कशीशीच दिसते. आपल्यावर नुकतेंच एकादें संकट ओढवलें असावें, असें मला वाटतें. आतां नुकताच घोड्यांच्या टापांचा ध्वनि माझ्या कानांवर पडला, त्यावरून आपण परत आलां असाल, अशी कल्पना करून मी लागलाच आपल्या भेटीस आलों आहें. आपण ज्या कामास गेलां होतां, तिकडे आपला पुष्कळच वेळ मोडला, असें दिसतें. '

कांहींशा उतावळेपणानें शेखर म्हणाला,–'अहो कारभारी, तुम्ही कृपा करून यासंबंधानें मला अधिक कांहीं विचारूं नका ! आज ज्या कित्येक विलक्षण गोष्टी घडून आल्या आहेत, त्यांमुळें माझें मन अगदीं भडकून गेलें आहे. यासाठीं सध्यां तरी मला यासंबंधानें तुम्ही कांहीं विचारूं नये. '

या त्याच्या भाषणानें आपणांस अतिशय खेद झाला आहे, असें दर्शवित दुर्मुख म्हणाला,–'आपल्यासारख्या वीर पुरुषाच्या मुखांतून अशा तऱ्हेचे उद्गार बाहेर पडलेले पाहून मला फार आश्चर्य वाटत आहे !'

शेखर म्हणाला,–'तुम्हाला जरी कितीही आश्चर्य वाटत असलें, तरी यावेळीं तुम्हीं मला अधिक कांहींच विचारूं नये. कारण ज्या कांहीं गोष्टी आज घडून आल्या आहेत, त्या थोडक्यांत सांगतां यावयाच्या नाहींत, आणि त्या सांगण्याइतकी माझ्या मनाला सध्यां स्वस्थताही नाहीं. कदाचित् उद्यां बरें, पण तुम्ही कां आलां होतां ? मला सध्यां एकांताची जरूर आहे.'

सध्यां शेखराला एकांताची अत्यंत जरूर होती, यांत शंकाच नाहीं. कारण त्याचें मन फार अस्वस्थ झालें असल्यामुळें, दुसऱ्याशीं बोलतांना आपल्याकडून प्रमाद होण्याची भीति वाटत होती, आणि जर चुकून भलतेच शब्द आपल्या तोंडून बाहेर पडले, तर त्यांपासून भयंकर अनर्थ ओढवेल असें त्याच्या मनास वाटत होतें.

अत्यंत खिन्न मुद्रेनें शेखराकडे पहात दुर्मुख बोलला,–'मी इकडे कां आलों होतों, तें आपणांस सांगतों. आपल्या आज्ञेप्रमाणें मी चतुरकाची वाट पाहात बसलों आहें, पण तो कांहीं अजून परत आलेला नाहीं.'

शेखर बेपर्वाईनें म्हणाला,–'ठीक आहे. तुम्ही आतां विश्रांति घ्या. मी उद्यां त्याची गांठ पडल्यावर त्याला छेडीन. मी तुम्हांस सध्यां येथून जावयास सांगतों, म्हणून तुमच्यावर मी रागावलों आहें, असें समजण्याचें कारण नाहीं. पण सध्यां मला कांहींच सुचत नसल्यामुळें, मी तुम्हाला जावयास सांगत आहें.'

शेखरानें इतकें निक्षून सांगितलें तरी दुर्मुख तेथून एकदम निघून गेला नाहीं. तो शेखराच्या मनाचा ठाव घेण्याच्या इच्छेनें कांहीं वेळ तेथें घुटमळत उभा राहिला होता. पण आतां आपण आणखी थोडावेळ येथें राहिल्यास शेखर आपणावर गरम होईल, अशी त्याची शेखराच्या बाह्य मुद्रेवरून जेव्हां खात्री पटली, तेव्हां त्यानें शेखराला नम्रतेनें प्रणाम केला, आणि तो तेथून बाहेर पडला.

शेखरानें दारापर्यंत जाऊन दुर्मुख बाहेर पडल्यावर तें कडी लावून घेऊन बंद केलें, आणि तो पुनः आपल्या मंचकावर पहुडला.

पुनः त्याचें मन अस्वस्थ झालें, आणि त्याच्या विचारशक्तीचा पूर्णपणें ऱ्हास झाला. तो क्षुब्धांतःकरणानें आपल्या शयनमंदिरांत येरझाऱ्या घालूं लागला. अशा स्थितींत आणखी थोडा वेळ गेल्यावर आपण आतां स्वस्थ पडून झोंप लागते का पहावी, असा विचार करून तो आपल्या बिछान्यावर लवंडला, पण सध्यां त्याच्या अंगांत ज्वराचा प्रादुर्भाव झाला असल्यामुळें बिछान्यांतील वस्त्रें त्याला अगदीं थंडगार लागलीं, आणि त्या वस्त्राच्या स्पर्शानें त्याच्या शरीरावर रोमांच उभे राहिले. आनंदमठांत जो देखावा आपल्या नजरेस पडला, तो खरा-खुरा पिशाचांचा खेळ असावा, कीं आपल्या मनाला त्या वेळीं तसा उगाच भ्रम झाला असावा, याचा उलगडा करतां न आल्यामुळें त्याच्या अंतःकरणास फार पीडा होत होती. पिशाच-चेष्टांवर त्याचें मन विश्वास ठेवावयास तयार होईना,. आणि झालेल्या प्रकाराचा त्याला दुसऱ्या रीतीनें उलगडा करतां येईना. अशा प्रकारच्या विचारांत गुंग झाल्यावर हळुहळु त्याचा डोळा लागला, आणि त्याला पुनः भयंकर स्वप्नें पडूं लागलीं. उजाडण्याचे सुमारास तो नित्याप्रमाणें जागा झाला, तोसुद्धां भयंकर स्वप्नामुळेंच जागा झाला होता.

जागा झाला, तरी तो अंथरुणावरून उठला नाहीं; तो तसाच पुढें काय करावें या विचार करीत लोळत पडला होता. जर पिशाचदर्शन झालें नसतें, तर त्या मारेकऱ्यांनीं आपला खून केला असता, ही गोष्ट त्याच्या मनांत सलत असल्यामुळें झालेली हकीकत सरकारांत जाहीर करून दाद मागावी असें एकदां त्याच्या मनांत आलें. तसेंच दमयंतीच्या प्रेमविषयक गोष्टींत तिच्या भावानें मन घालून तिला साहाय्य करावें ही गोष्टही त्याला फार विलक्षण वाटली. आपणास गुप्तमंडळामध्यें नेलें होतें, ही गोष्ट हरदत्त आणि विक्रमसेन यांना माहीत आहे, हें त्याला आलेल्या निनांवीं पत्रावरून उघड होत होतें. अर्थात् गुप्त मंडळामध्यें जे लोक तोंडावर काळे बुरखे घेऊन बसलेले होते, त्यांत हरदत्त आणि विक्रमसेन हे दोघेही होते, याबद्दल शेखराच्या मनाची खात्री होती. या सर्व गोष्टींमुळें त्याच्यापुढें अशी नड उभी राहिली कीं, जर आपण सरकार-दरबारांत न्याय मागावयास गेलों, तर दक्षिण-दरवाज्यापाशीं येऊन भेटण्याविषयीं लिहिलेलें तें निनांवी पत्र आपणास पुराव्यांत दाखल करावें लागणार, आणि तें पत्र पुराव्यांत दाखल केल्यास त्यांत उल्लेख असलेल्या गुप्त-मंडळासंबंधानें आपणास माहीत असलेली सर्व हकीकत न्यायाधिशापुढें सांगावी लागणार. जर आपण ही गोष्ट प्रसिद्ध केली, तर चाळीसपासून पन्नासपर्यंत नवीन शत्रु आपल्या मागें लावून घेतल्यामुळें आपण होऊन मृत्यूला आमंत्रण दिल्यासारखें होणार ! शेखर जरी शूर होता, तरी, आपण एका शत्रूचा बंदोबस्त करण्यासाठीं पन्नास शत्रु आपल्या मागें लागून घ्यावे, ही गोष्ट त्याला पसंत वाटणें अगदीं शक्य नव्हतें. कदाचित् तो इतक्या शत्रूंशीं टक्कर देण्यासही तयार झाला असतां, पण प्रियंवदेवरील प्रेमामुळें त्याला तसें करतां आलें नसतें. आपलें तिच्यावर जसें निष्कपट प्रेम आहे, तसें तिचेंही आपणांवर आहे, ही गोष्ट त्याच्या अंतःकरणासमोर नेहमीं जागृत असल्यामुळें, आपला अंत झाल्यास तिला किती दुःख होईल, ही कल्पना त्याच्या मनांत आली, आणि त्यानें केवळ तिच्या प्रेमाखातर फिर्यादीचा विचार सोडून दिला.

फिर्यादीच्या बाबतींत आणखीही एक अडचण होती. शेखरानें झालेली सर्व हकीकत जशाच्या तशीच अधिकाऱ्यांस सांगितली असती, तर तिजवर त्यांचा विश्वास बसलाच असता, असें नाहीं. शेखरापाशीं मुख्य पुरावा म्हणजे तें विनंतिपत्र. त्या पत्रावरून काय निष्पन्न होणार होतें ? फार फार तर कोणी तरी त्याला दक्षिण द्वारापाशीं

बोलाविलें इतकेंच सिद्ध झालें असतें. पण पुढें जें काय झालें, हें त्याला कसें सिद्ध करतां आलें असतें ? गेल्या रात्रीं जो कांहीं प्रकार घडून आला होता, तो केवळ स्वप्नवत् असल्यामुळें त्याची सिद्धता करणें अशक्यच होतें. तसेंच शेवटीं जो भुताटकीचा प्रकार घडला, त्यावर विश्वास ठेवून तो खरा मानण्याऐवजीं ऐकणारांनीं शेखराला मूर्ख ठरवून उलट त्याची थट्टाच केली असती, व आपलें काम साधाण्यासाठीं तो विक्रम सेनावर नसतें कुभांड रचीत आहे, असेंच सर्वांस वाटलें असतें. या सर्व गोष्टींचा विचार करतां आपलें सर्व प्रकारें हंसें करून घेण्यापेक्षां आपण झालेला प्रकार गुप्त ठेवावा, यांतच शहाणपणा आहे, असें शेखरानें आपल्या मनाशीं ठरविलें. त्या शहरांत आल्यापासून त्याच्यावर जे प्रसंग गुजरले होते, त्यांमुळें आपण येथून एकदम चालतें व्हावें, असें त्याच्या मनांत वारंवार येत असे. रात्रीं घडून आलेल्या प्रसंगामुळें तर आपण आतां या शहरांत एक क्षणमात्रही राहूं नये, असें त्यास वाटूं लागलें. आतां आपल्या वडिलांचें कोणत्याही प्रकारचें पत्र आलें तरी आपण येथें न राहातां प्रतापपुरीं निघून जावयाचें, असा त्यानें आपल्या मनाशीं निश्चय ठरविला.

अंथरुणावरून उठल्यावर नित्यकृत्यें करून तो आपल्या बैठकीच्या दिवाणखान्यांत जाऊन बसला. थोड्याच वेळानें दुमुख तेथें आला, त्यानें हळूच एकदां त्याच्या मुद्रेचें निरीक्षण केलें, त्यावेळीं रात्रीपेक्षां सध्यां त्याची मुद्रा पुष्कळ शांत दिसत आहे, असें त्यास आढळून आलें.

रात्रीच्या भेटीचा उल्लेख न करतां शेखरानें त्यास प्रश्न केला,–' चतुरकाचें काय वर्तमान आहे ? '

दुर्मुख बोलला,–' रात्रीं मी आपली भेट घेऊन परत गेल्यावर सुमारें दोन घटकांनीं चतुरक परत आला; तो अगदीं गुपचुप आपल्या खोलींत जाऊन निजला. '

शेखर म्हणाला,–' तर मग त्याला इकडे पाठवून द्या, किंवा तुम्हीच त्याला आपल्याबरोबर घेऊन या. त्याला जें कांहीं विचारावयाचें आहे, तें मी तुमच्या समक्षच विचारीन, म्हणजे त्याला तुमच्यासंबंधानें संशय येणार नाहीं. '

शेखराच्या आज्ञेप्रमाणें दुर्मुख तेथून बाहेर गेला, आणि थोड्याच वेळानें चतुरकाला घेऊन परत आला. यावेळीं चतुरकाची मुद्रा निस्तेज आणि सचिंत दिसत असून त्याचे हात पाय गळून गेल्यासारखे दिसत होते.

शेखरानें त्याला प्रश्न केला,–' चतुरका काल रात्रीं तूं कोणालाही न सांगतां वाड्यांतून कोठें गेला होतास ? '

ह्या प्रश्नानें चतुरक अगदीं गोंधळून गेला. आतां आपण उत्तर काय द्यावें हें त्याला सुचेना. त्याच्या मुखावर एकदम काळोखी आली. शेखर करड्या नजरेनें आपणाकडे पहात आहे, हें दृष्टीस पडतांच त्या तरुणाचे हात-पाय थरथर कांपूं लागले. अशा स्थितींत एक दोन पळें गेल्यावर त्यानें आपलें मन आंवरलें, आणि जितकें अवसान आणवेल तितकें आणून तो बोलला,–' होय, मी रात्रीं वाड्यांत नव्हतों, हें खरें आहे.'

शेखर बोलला,–' यावेळीं तुला खरें बोलणें भाग आहे, कारण गेल्या रात्रीं मीं स्वतः तुला प्रत्यक्ष पाहिलें होतें. '

चतुरकानें अत्यंत आश्चर्यचकित मुद्रेनें प्रश्न केला,–'महाराज, आपण मला पाहिलें ? आपण मला कोठें बरें पाहिलें ? '

शेखर म्हणाला,–' काल रात्रीं दक्षिण वेशीजवळच्या रस्त्यांत तूं प्रथम माझ्या दृष्टीस पडलास; नंतर तूं हेमचंद्राच्या धर्मशाळेंत गेलास; नंतर तुला तेथें तुझा सोबती भेटला; त्याला तूं सर्व तयारी झालीं कीं नाहीं, हें विचारलेंस; नंतर तुम्हीं दोघे-

जण धर्मशाळेच्या मागच्या बाजूनें बाहेर पडलां, मी त्या बाजूला गेलों होतों, पण तुम्ही माझी नजर चुकवून कोठें नाहींसें झालां.' चतुरकाकडे तीक्ष्ण दृष्टीनें पाहत शेखरानें विचारलें,-'यावरून रात्रीं तूं कोठें होतास, आणि काय केलेंस, हें सर्व मला खरें खरें समजणें किती अवश्य आहे, याचा विचार तूंच कर!'

हें शेखराचें भाषण चतुरक मोठ्या आश्चर्यचकित अंतःकरणानें ऐकत होता. आपण या प्रसंगीं खरें बोलणें अवश्य आहे, असें त्याच्या मनांत आलें, पण दुर्मुखासमक्ष खरें बोलण्याचें त्याला धैर्य होईना, म्हणून थोडा वेळ विचार करून तो म्हणाला,-'महाराज, मी रात्रीं कोठें गेलों होतों, आणि काय केलें, हें एकान्तीं सांगेन.'

शेखर म्हणाला,-'तें कांहीं नाहीं. हे आमचे कारभारी मोठे विश्वासु आहेत; हे कांहीं कोणी परकी नव्हेत. जें कांहीं तुला सांगावयाचें असेल तें यांच्या समक्ष तुला सांगितलें पाहिजे.'

चतुरकानें एकदां विलक्षण प्रकारानें दुर्मुखाकडे पाहिलें; तो काकूं करूं लागला. त्याच्या मनाचा गोंधळ उडाला आणि तो केविलवाण्या दृष्टीनें शेखराकडे पाहूं लागला.

शेखर किंचित् क्रोधयुक्त स्वरानें बोलला-'चतुरका, आटप! माझ्या प्रश्नाचें उत्तर दे. तुझ्याशीं हुजत घालीत बसावें, असें मला वाटत नाहीं.'

चतुरक म्हणाला,-'धनीसाहेब, त्या-संबंधानें मला या वेळीं कांहीं सांगतां येत नाहीं. मी आपल्या पायां पडतों, पण आपण कृपा करून या वेळीं तरी मला कांहीं एक विचारूं नये!'

शेखर म्हणाला,-'ध्यानांत ठेव, तूं जितके आढेवेढे घेशील, तितका तूं अपराधी आहेस, अशी आमची अधिक खात्री होईल.'

चतुरक मोठ्यानें ओरडून म्हणाला,-'काय! मी अपराधी!' नंतर थोडा वेळ विचार करून तो म्हणाला,-'सध्याच्या माझ्या वर्तनावरून मी अपराधी आहें असें तुम्हांस वाटण्याचा संभव आहे, यांत शंका नाहीं. असें जरी आहे, तरी मी काल कोठें गेलों होतों, आणि काय केलें, हें मला आतांच सांगतां येत नाहीं. असें मी स्पष्ट बोलतों. याबद्दल मला माफी असावी.'

शेखर बोलला,-'चतुरका, या तुझ्या भाषणानें तर तुझ्या वर्तनाचें महत्त्व आम्हांस अधिकच वाटूं लागलें आहे. मी आतां जें बोलणार आहें तें मुकाट्यानें ऐकून घे. त्यांत मध्यें तोंड घालूं नको. माझ्या शयन-मंदिरामध्यें मी निजलों असतां कोणी तरी येत असे, अशी माझ्या मनाची पक्की खात्री झालेली आहे. एके दिवशीं मी निजल्यावर कोणीं माझ्या शयनमंदिरांत एक पत्र आणून ठेविलें, दुसऱ्या दिवशीं मला कोणी अंधेरामध्यें तेथें वावरत असावें असा भास झाला. मी ज्या खंडणीच्या रकमेसाठीं येथें आलों, ती रक्कम चोरीस गेली आहे. आणखी दुसऱ्याही कित्येक त्रासदायक गोष्टी घडून आल्या आहेत. मी कोठें जातों, काय करतों, याच्या पाळतीवर कोणी तरी रहात असून, तो माझ्या सर्व हालचाली माझ्या शत्रूंस कळवितो, अशी माझ्या मनाची खात्री पटली आहे. अशा परिस्थितीमध्यें तूं परकी गृहस्था-बरोबर रात्रीं बेरात्रीं भटकत असतोस, आणि त्याचें कारण विचारलें तर तें तूं सांगत नाहींस, यावरून तुझ्या वर्तनासंबंधानें मीं काय कल्पना करावी, याचा विचार तुझा तूंच कर, आणि मीं विचारल्या प्रश्नाचीं झटकन् उत्तरें दे.'

शेखराचें हें भाषण चतुरक मोठ्या गंभीर-तेनें ऐकत होता. नंतर अगदीं खणखणित स्वरानें तो म्हणाला,-'महाराज, अशा स्थितींत आपल्या मनांत माझ्याविषयीं संशय येणें हें अगदीं साहजिक आहे. पण ईश्वरसाक्ष सांगतों, आपण सध्यां ज्या गोष्टीचा उल्लेख

केला; त्यांपैकीं एक देखील माझ्या हातून घडलेली नाहीं. महाराज, आपण कृपा करून मला सध्यां कांहीं विचारूं नये. मी आपणास पुनः विनंति करतों कीं, आपण विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें देण्यास सध्यां मी समर्थ नाहीं; आणि माझी बाजू पूर्णपणें ऐकून घेतल्याखेरीज आपण मला दोषीही ठरवूं नये.'

शेखर किंचित् चिडल्याप्रमाणें बोलला,–'चतुरका, हें तुझें बोलणें किती उद्धटपणाचें आहे, हें तुला समजत नसेल असें नाहीं. असला तुझा उद्धटपणा मी अगदीं सहन करणार नाहीं.' असें शेखर बोलला, हें खरें. पण यावेळीं चतुरकाच्या भाषणांत सत्यांश बराच असावा, असें त्याच्या मनास वाटत होतें. हा प्रकार इतर प्रकारांइतकाच गूढ आहे, असें एकदम त्याच्या मनांत आलें. आणि त्यानें आत्मसंयमन करून अधिक भाषण केलें नाहीं.

चतुरक म्हणाला,–'महाराज, मी आपणास माझ्यातर्फे सध्यां एकच गोष्ट सांगतों. मी जरी वयानें लहान आहें, तरी आपल्या सेवेमध्यें माझ्या वयाचीं अर्ध्याहून अधिक वर्षें गेलीं आहेत; इतक्या अवधींत मी आपली सेवा कोणत्या रीतीनें केली आहे, हें आपण जाणतच आहां. माझ्या आज पर्यंतच्या सेवेकडे जर आपण लक्ष्यपूर्वक पहाल, तर मला दोष देण्याला आपणाला तिळमात्रही जागा मिळणार नाहीं, अशी माझ्या मनाची खात्री आहे इतकें माझें मन शुद्ध आणि निर्दोष आचरण असल्यामुळें, आपल्या मनांत मजविषयीं जो विनाकारण संशय आला आहे, त्याची मी अगदीं पर्वा करीत नाहीं. हें माझें भाषण आपणांत उद्धटपणाचें वाटेल, हें मी जाणून आहें, पण सध्यांच्या प्रसंगीं माझा नाइलाज झाला असल्यामुळें, मला असें बोलणें भाग पडत आहे, याबद्दल आपण मजवर कोप करूं नये, अशी मी आपणास पुनः विनंति करतों!'

शेखरानें हें चतुरकाचें भाषण शांतपणें ऐकून घेतलें. पण त्याच्या मनाचें समाधान झालें नाहीं, इतकेंच नव्हे, तर आपला अपराध छपविण्यासाठीं चतुरक ढोंग करीत आहे, असें त्याच्या मनांत आलें; म्हणून शेखर त्याला म्हणाला,–'तूं काल रात्रीं काय करीत होतास हीच गोष्ट मला विचारावयाची आहे, असें नाहीं; परवां रात्रीं तूं वाडयामध्यें एका परकी माणसाला आणून त्याच्याबरोबर गुप्तपणानें खलबतें करीत बसला होतास, त्याचाही जाब मला विचारावयाचा आहे.' हे शेखराचे शब्द ऐकून चतुरकाच्या मुद्रेवर काळोखी आली, आणि तो अगदीं गोंधळून गेला, हें पाहून शेखर त्यास म्हणाला,–'परवां रात्रीं तूं ज्याच्या बरोबर खलबत करीत होतास, त्यालाच भेटण्यासाठीं तूं काल रात्रीं गेला होतास; परवां रात्रीं खंडणीच्या रक्कमेबद्दल आणि दुसऱ्या एका खींबद्दल अथवा इतकें चोरून तरी कशाला, दमयंतीबद्दल तुमच्या गोष्टी चालल्या होत्या, असें माझ्या कानावर आलें आहे!'

चतुरक म्हणाला,–'ज्यानें कोणी आमच्या गोष्टी आडून ऐकिल्या त्यानें एवढें ऐकिलें, कीं आणखी अधिक कांहीं ऐकिलें?'

हा त्यानें केलेला प्रश्न ऐकून शेखरास फार संताप आला; आणि तो डोळे वटारून चतुराकडे पहात त्यास म्हणाला,–'मूर्खा, माझ्या प्रश्नाचीं उत्तरें तूं द्यावयाचीं तीं न देतां तूंच मला प्रश्न विचारतोस? आतां तुझ्या उद्धटपणाची कमाल झाली! अजून विचार कर, आणि खरें बोलून आपले सर्व अपराध कबूल कर!'

यावर कांहींच उत्तर न देतां दुर्मुखाकडे तिरस्कारानें पाहून चतुरक म्हणाला,–'दुसऱ्याचें बोलणें आडून ऐकत राहणारी नीच माणसें या वाड्यांत असतील, असें मला वाटलें नव्हतें!'

मराठी ग्रंथ संग्रहालय
पुणे ३१३

हें संभाषण सुरू झाल्यापासून आतांपर्यंत शेखराचा राग प्रत्येकक्षणीं वाढत होता. प्रथमतः आपल्या नोकरासंबंधानें त्याच्या मनांत जो थोडाबहुत भरंवसा होता, तो सध्या अगदीं नाहींसा झाला होता; त्यामुळें सध्याचें चतुरकाचें भाषण जरी यथार्थ होतें, तरी तें शेखरास रुचलें नाहीं, म्हणून तो म्हणाला,–'लोक काय करितात किंवा कसे वागतात, यांची पंचाईत करण्याची तुला अगदीं जरूर नाहीं. तूं प्रथम आपल्या पायांखालीं काय जळत आहे तें पहा, आणि नंतर दुसऱ्याच्या उठाठेवी कर. मी तुला एकदां शेवटचें विचारतों, तूं माझ्या प्रश्नाचीं सरळ उत्तरें देणार आहेस कीं नाहीं, हें मला समजूं दे!'

शेखराचें हें निकराचें भाषण ऐकून चतुरकाच्या नेत्रांतून अश्रुधारा वाहूं लागल्या आणि तो हात जोडून विनवण्या करीत म्हणाला,–'महाराज, मला फक्त दोन घटका अवकाश द्या, आणखी दोन घटकांनीं मी आपणांस सर्व कांहीं खरें खरें सांगेन!'

हें चतुरकाचें उत्तर ऐकून शेखराला थोडें बरें वाटलें, आणि तो म्हणाला,–'दोन घटकांनीं कां होईना, पण तूं आपण होऊन येथें येऊन सर्व हकीकत स्पष्टपणें सांगितली पाहिजे.'

'होय.' असा जबाब देऊन चतुरक तेथून निघून गेला. या प्रसंगीं त्याची मुद्रा अगदीं गांगरलेल्या माणसासारखी दिसत होती, आणि त्याच्या अंतःकरणास कसली तरी जबरदस्त पीडा होत असावी, असें तत्काल लक्ष्यांत येत होतें.

चतुरक निघून गेल्यावर शेखरानें,–'झालेल्या प्रकारावरून त्याच्या संबंधानें तुमचें काय मत झालें आहे?' असें दुर्मुखास विचारलें.

गंभीरपणानें दुर्मुख म्हणाला,–'झालेल्या प्रकारावरून त्याच्याबद्दल संशय येण्यासारखा आहे हें खरें, पण नुसत्या संशयावरून मी एकाद्याला अपराधी समजणार नाहीं. मी जर एवढ्यावरून त्याला अपराधी समजूं लागलों, तर ईश्वरोच्या घरीं मी दोषी ठरेन.'

शेखर म्हणाला,–'तुमचें म्हणणें खरं आहे, म्हणून आतां आपण दोन घटका वाट पाहूनच कायतो निकाल करूं.'

दोन घटका उलटल्या, पण चतुरक आला नाहीं. इतकेंच नव्हे, तो कोठें आहे याचाही कोणास पत्ता लागेना!

शेखर ज्या घोड्यावरून परत आला होता, तो घोडा एका मोतद्दाराबरोबर देऊन शेखरानें त्याला दक्षिणवेशी जवळच्या घरीं जावयास सांगितलें. त्याप्रमाणें तो मोतद्दार घोडा घेऊन गेला. तो परत आला, त्यावेळीं शेखराला आपल्या अजमासाप्रमाणें तो वाडा सरदार हरदत्ताचाच आहे, असें आढळून आलें. त्या दिवशीं सायंकाळीं शेखर वाड्याबाहेर गेला नाहीं. तो चतुरकाची वाट पाहत होता; पण चतुरक परत आला नाहीं. रात्रीं दुर्मुखाची गांठ पडली तेव्हां शेखर त्यास म्हणाला,–'अहो कारभारी, झाल्या गोष्टींचा विचार करतां चतुरकाच्या अपराधासंबंधानें आमच्या मनांत शंका उरण्याचें कारण नाहीं. चोरी त्यानेंच केली असावी. खरेंच सांगतों, चतुरकासारखा साळसूद दिसणारा पोऱ्या इतका लफंगा निघाला, याचें मला जितकें वाईट वाटतें, तितकें आमचा रकम चोरीस गेल्याचें देखील मला वाईट वाटत नाहीं! खरेंच सांगतों, आतां यापुढें कोणत्याही मनुष्यावर विश्वास ठेवण्यास माझें मन कचरेल! मानवी जातीवरचा माझा विश्वास उडाला, असें म्हणावयास हरकत नाहीं.'

दुर्मुखानें विचारलें,–'महाराज, आपण आतां यापुढें कोणता मार्ग धरणार? सरकारांत वर्दी देऊन त्याच्या शोधासाठीं राजदूत पाठविल्यास त्यापासून कांहीं फायदा होईल, असें आपणास वाटतें काय?'

शेखर म्हणाला,–'त्यापासून कांहीं उपयोग होईल असें मला वाटत नाहीं. तो हें शहर सोडून यावेळीं किती तरी दूर गेला असेल, अशी माझ्या मनाची खात्री आहे. सरकार-दरबार करूं लागल्यास आपणांस येथें गुंतून पडावें लागणार; आतां यापुढें आणखी कांहीं दिवस येथें काढावे, हें मला अगदीं पसंत नाहीं. मी पांच दिवसांतच येथून परत प्रतापपुरीं जाणार आहें. त्या मूर्खानें जें कृत्य केलें आहे, त्याचें शासन करणार परमेश्वर समर्थ आहे. आज ना उद्यां त्याच्या अपराधाचें प्रायश्चित्त त्याला मिळाल्यासेरीज राहणार नाहीं!'

अगदीं तिऱ्हाईतपणाचा आव घालून दुर्मुख म्हणाला,–'या गोष्टीचा आपणच जो काय विचार कराल तो खरा. बरें पण मी एक असें विचारतों, काल रात्रीं आपणांस पुष्कळच त्रास झाला असावा, असें आपल्या मुद्रेवरून स्पष्ट दिसत होतें; याचें कारण काय, हें आपण मला सांगून आपण माझ्या मनाची तळमळ शांत कराल काय! खरोखर सांगतों, कालची आपल्या मनाची तशी स्थिति पाहिल्यापासून मला दुसरें कांहींच सुचत नाहींसें झालें आहे.'

शेखर म्हणाला,–'त्यासंबंधानें मला आज कांहीं सांगता येत नाहीं. आपण हें शहर सोडून एकदां प्रतापपुरीं जाऊन पोंचलों, म्हणजे तेथें सर्व हकीकत तुमच्या कानावर येईल.'

दुर्मुखानें अधिक कांहीं न विचारतां तो शेखरास प्रणाम करून तेथून निघून गेला.

या गोष्टीस आणखी पांच चार दिवस लोटले; इतक्या अवधींत चतुरकाचा किंवा चोरीचा पत्ता लागला नाहीं, किंवा सांगण्यासारखी एकादी गोष्ट घडून आली नाहीं. सहावें दिवशीं प्रतापपुराहून दृढसंधराजाकडून थैली घेऊन एक जासूद आला, आणि त्यानें ती थैली शेखराच्या हातीं दिली. या थैलींत प्रियंवदेचें पत्र असेल असें त्याला वाटत असल्यामुळें त्यानें मोठ्या उत्सुकतेनें ती थैली उघडली, पण त्याची निराशा झाली. थैलींत फक्त एकच पत्र होतें, व तें दृढसंधाच्या सांगण्याबरहुकूम एका कारकुनानें लिहिलें होतें. पत्रांत पुढील मजकूर होता:–

'खंडणीची रकम चोरीस गेल्याचा तूं लिहिलेला मजकूर वाचून मला फार खेद होत आहे. चोरीस गेलेल्या रकमेबद्दल मला वाईट वाटत नाहीं, तर तुझ्या आचरणासंबंधानें ज्या गोष्टी माझ्या कानीं आल्या आहेत, त्यांचा विचार करतां प्रत्यक्ष आपल्या पोटच्या पुत्रावर विश्वास ठेवण्यास माझें मन कचरतें, या गोष्टींचें मला फार वाईट वाटतें. तूं सुपुत्र निपजशील असा थोड्या दिवसांपूर्वीपर्यंत मला मोठा भरंवसा होता, पण आपल्या आचरणानें तूं माझ्या अंतःकरणांत पूर्ण निराशा उत्पन्न केली आहेस! तुझें जें आचरण आमच्या कानीं आलें आहे, त्यामुळें, तुझ्या मातेला, आणि तुझ्या बंधूलाही अत्यंत खेद होत आहे, तुझ्या आचरणासंबंधानें मी या पत्रामध्यें उघड असें कांहींच लिहीत नाहीं; कारण तुझीं कर्में तुझ्या मनाला पूर्णपणें माहीतच आहेत!'

'आतां या पुढें तूं प्रियंवदेच्या प्राप्तीची आशा सोडून दे. वास्तविक पाहिलें तर मी पत्रीं असें लिहिण्याची जरूरच नाहीं. प्रियंवदेवर तुझें खरें प्रेम असतें, तर ज्या कित्येक गोष्टी आमच्या कानीं आल्या आहेत, त्या तुझ्या हातून घडल्याच नसत्या! प्रियंवदेसारख्या सुशील मुलीचे पाणिग्रहण करण्याची पात्रता तुझ्या अंगीं उरली नाहीं. वडिलांच्या आज्ञेला मान द्यावा, असें जर तुला वाटत असेल, तर तूं हें पत्र पोंचल्यानंतर विलंबकारण विलंब न करतां एकदम सुरथपुरास निघून जावें, अशी माझी आज्ञा आहे. सुरथपुरास गेल्यानंतर तूं तेथें आपला सर्व बडेजाव

सोडून देऊन अज्ञातवासामध्यें दिवस काढले पाहिजेत. तुझ्याबरोबर फक्त दुर्मुख आणि चतुरक या दोघांस जाण्याची परवानगी आहे. तेथें राहिल्यावर तुला खर्चासाठीं जी रक्कम लागेल ती मी योग्य हिशेबानें वरचेवर पाठवीत जाईन. तुला चैनीसाठीं उधळावयास माझ्याकडून एक कपर्दिक सुद्धां मिळणार नाहीं.'

'तुझ्या वर्तनासंबंधानें जों जों अधिक विचार करावा, तों तों तुझ्या मनांतील कपट अधिकाधिक स्पष्ट दिसून येऊन मनास फार खेद होतो. मागील पत्र मीं इतकें स्पष्ट लिहिलें नव्हतें, पण तेवढयावरून तूं सावध होऊन आपले ढंग सोडून दिले नाहींस म्हणून मला हें पत्र अशा रीतीनें लिहिणें जरूर झालें. अजून विचार कर! तुझें मन अजून पूर्ण भकलें नसल्यास तें ताळ्यावर येण्याचा संभव आहे. मी सध्यां जरी तुला दूर करीत असलों, तरी तुला कधींच जवळ करणार नाहीं, असें नाहीं. तूं ताळ्यावर आलास अशी माझ्या मनाची खात्री होतांच मी तुला तुझ्या सर्व अपराधांची क्षमा करीन. पण हें सगळें तुझ्या कृतीवर अवलंबून आहे. तुला मी इतक्या दूर ठेवीत आहें, त्यामुळें तुझें वर्तन माझ्या कानीं येणार नाहीं, असें तूं समजत असशील तर ती घमेंड बाळगूं नको. तुझें दररोजचें वर्तन नेमकें माझ्या कानीं पडेल. तुला आपल्या वडिलांच्या प्रेमास पात्र व्हावयाचें असेल तर आपलें वर्तन सुधार, हें मी तुला शेवटचें कळवून ठेवितों. यानंतर जर तूं भृगुकच्छनगरीं राहशील, तर तूं माझा अपमान केलास असें समजून मी तुला पत्र देखील पाठविणार नाहीं.'

अशा मजकुराचें पत्र वाचून त्या दुर्दैवी राजपुत्राला किती खेद झाला असेल, याची कल्पना वाचकांनींच करावी. हें पत्र वाचल्याबरोबर प्रथम त्याला अत्यंत आश्चर्य वाटलें, व कांहीं सुचेनासें झालें. नंतर त्याच्या मनांत हजारों विचारांची गर्दी उडाली. आपल्या विरुद्ध मोठें घोरलें कृष्णकारस्थान चालू आहे; अशी जी शंका त्याच्या मनांत उत्पन्न झाली होती, ती शंका नसून खरोखरच आपल्या विरुद्ध कारस्थानें सुरू आहेत, अशी त्याच्या मनाची खात्री पटली. हें सर्व चूडामणीचेंच कृत्य असावें असें तर त्याच्या मनांत आलेंच, पण त्यासेरीज या शहरीं आपले कोणी शत्रु असून आपल्यासंबंधानें त्यांनीं खोट्या नाट्या गोष्टी आपल्या वडिलांस कळविल्या आहेत, यावद्दल त्याला शंका उरली नाहीं. दमयंतीचें आपल्याशीं जें वर्तन झालें, त्याचा विपरीत अर्थ करून ती गोष्ट कोणी तरी दुष्टानें आपल्या वडिलांस कळविली असावी, असें त्याच्या मनांत आलें. या पत्रानें त्याच्या कोंवळ्या अंतःकरणास इतकें वाईट वाटलें कीं, त्यानें आपल्या हातांनीं आपलें तोंड झांकून घेतलें, आणि एकाद्या अर्भकाप्रमाणें तो ढळढळा रडूं लागला. डोळ्यांतून बरेंच पाणी गेल्यावर त्याचें मन थोडें ताळ्यावर आलें, आणि तो आपल्याशींच म्हणाला,–'खरोखरच जर मी निरपराधी आहें, तर मला भिण्याचें काय कारण आहे? माझा असा वैरी कोण आहे, हें मला पाहून ठेविलेंच पाहिजे. ज्या अर्थी वडिलांनीं माझ्यावर रागावून मला सुरथपुर येथें जाण्याची आज्ञा केली आहे, त्या अर्थी मी त्या आज्ञेप्रमाणें वागणार नाहीं. मी प्रथम प्रतापपुरीं जाईन, वडिलांची भेट घेईन, त्यांच्या मनांतील राग काढून टाकीन आणि नंतर त्यांनीं सांगितल्यास सुरथपुरींच काय, पण त्या भरतखंडांत कोठेंही जाईन! मी जर कोणत्याही प्रकारचा अन्याय केलेला नाहीं, तर मुकाट्यानें शिक्षा कां सोसावी? मुकाट्यानें शिक्षा सोसल्यास अपराध कबूल केल्यासारखें नाहीं का होणार? आतां माझें येथें कोणतेंही काम करावयाचें उरलेलें नाहीं. यासाठीं

आपण एका क्षणाचा विलंब न करतां एकदम प्रतापपुरचा मार्ग धरावा, हें ठरलेंच!'

असें बोलून शेखरानें दुर्मुखाला हाकमारून बांधाबांध करावयाचा हुकूम केला. तो हुकूम ऐकून दुर्मुखानें विचारलें,-'महाराज, आपण इतक्या घाईनें प्रतापपुरी जावयाचें म्हणतां, म्हणून शंका वाटते. प्रतापपुरची सर्व मंडळी सुखरूप आहेत ना!'

शेखरानें उत्तर केलें,-'काळजी करण्याचें कारण नाहीं. पण खरेंच सांगतों, आतां एक घटकेचा सुद्धां मला विलंब करावयाचा नाहीं. घोडे तयार करवा, आपण एकदम प्रतापपुरचा मार्ग धरूं या. एकदा आपण वाटेस लागलों, म्हणजे आम्हाला वाटेल तितकें बोलावयास वेळ सांपडेल.'

दुर्मुखानें नम्रतेनें शेखरास प्रणाम केला, आणि तो प्रवासाच्या तयारीसाठीं निघून गेला. त्यानंतर एक घटका लोटण्याच्या सुमारास शेखर आपल्या एका अनुचरासह भृगुकच्छनगरांतून बाहेर पडून त्यानें प्रतापपुरचा मार्ग धरिला.

प्रकरण ३४ वें.

अढळ प्रेम.

ज्या दिवशीं राजकुमार शेखर दुर्मुखासह भृगुकच्छ नगराहून प्रतापपुरीं यावयास निघाला, त्याच दिवशीं प्रतापपुरच्या राजवाड्यांत पुढील हकीकत घडून आली.

त्या दिवशीं तिसरे प्रहरीं प्रियंवदा नित्यक्रमाणें आपल्या दिवाणखान्यांत बसली होती. पण तिचें मन थाऱ्यावर नव्हतें. दोन तीन मोठमोठे अश्रुबिंदु तिच्या गालांवर चमकत होते, त्यांवरून ती कसल्या तरी दुःखदायक विचारांत मग्न झालेली होती, हें उघड दिसून येत होतें. तिची मुद्रा बरीच निस्तेज आणि सचिंत दिसत होती. तिच्या मुखकमलावर नेहमीं जें स्मित चमकत असे, त्याची नुसती छायासुद्धां आज दिसत नव्हती. यावरून तिच्या हृदयांत मोठेंच दुःख सांठवलेलें असावें, असें सहज दिसून येत होते.

थोड्या वेळानें त्या दिवाणखान्याचा दरवाजा हळूच उघडून राणी मेधावती तेथें आली. प्रियंवदा यावेळीं आपल्याशींच चाललेल्या विचारांत इतकी गढून गेली होती कीं, आपल्या दिवाणखान्याचा दरवाजा कोणीं उघडला, हें सुद्धां तिच्या ध्यानीं आलें नाहीं; यामुळें राणी मेधावतीला स्वस्थपणें तिच्यापाशीं उभें राहून तिची सर्व स्थिति सावकाश पाहून घेतां आली. बऱ्याच वेळानें प्रियंवदेनें आपली मान वर उचलली, त्यावेळीं आपल्या आत्याबाईला किंवा भावी सासवेला समोर पाहून ती एकदम चमकली.

राणी मेधावती प्रियंवदेजवळ जाऊन तिच्या अंगावरून हात फिरवून म्हणाली,-'प्रियंवदे, तुला कष्टी पाहून माझ्या मनाला फारच खेद होत आहे.'

गहिंवरलेल्या स्वरानें प्रियंवदा बोलली,-'माझ्या मनाला दुःख होतें हें पाहून तुम्हांस जरी खेद होत असला तरी आश्चर्य वाटत नसेल.जी गोष्ट आपण माझ्या मनांत भरवून दिली, तीच मीं आतां विसरून जावी, असें तुमचें मला सांगणें आहे, पण ती गोष्ट माझ्यानें कशी बरें विसरवेल ? आपण त्यांच्यावर विनाकारण दोषारोप करीत आहां. मला त्यांना एक बोटभर चिठी सुद्धां लिहूं देत नाहीं—'

मेधावती मध्येंच म्हणाली,-'आम्ही शेखरावर विनाकारण दोषारोप करीत आहों, असें तूं कशावरून म्हणतेस ? खरेंच सांगतें, ईश्वराच्या दयेनें तो जर निरपराधी आहे असें सिद्ध झालें, तर त्या गोष्टीचा आम्हांस आनंदच होईल. आमच्या कानांवर ज्या गोष्टी आल्या आहेत, त्यांवरून शेखराच्या दुराचरणाबद्दल आमच्या मनाची खात्री पटली आहे.'

प्रियंवदा किंचित् आवेशानें म्हणाली,–' पंण त्यांच्या संबंधानें खोट्या नाट्या गोष्टी आपणांस सांगून आपले कान फुंकणारे हे आहेत तरी कोण, हें मला समजलें पाहिजे होतें. मीं हाच प्रश्न अपणास यापूर्वी पुष्कळदां विचारला, पण आपण त्याचें उत्तर—' मेधावती म्हणाली, ' पुष्कळ गोष्टींचा विचार करतां या तुझ्या प्रश्नाचें उत्तर आह्माला इतक्यांतच देतां येत नाहीं, तरी पण मी तुला इतकेंच विचारतें कीं, आमच्या मनाची पक्की खात्री झाल्यावांचून आह्मी प्रत्यक्ष आपल्या पोटच्या मुलावर विनाकारण दोष ठेवूं असें तुला वाटतें काय ?'

प्रियंवदा बोलली,–' ईश्वर करो, आणि असली कल्पना माझ्या मनांत कधींही न येवो. आपण त्यांच्यावर विनाकारण रागावणार नाहीं अशी माझ्या मनाची खात्री आहे, पण कोणीं खोट्या नाठ्या गोष्टी सांगून आपणांस फसवीत नसेल कशावरून ?'

मेधावती म्हणाली,–' या बाबतींत आमची फसगत झाली असती, तर त्याचा आम्हांस आनंदच झाला असता, पण दुर्दैवानें आम्हांला जीं माणसें मिळालीं आहेत, तीं खोटीं ठरणें अशक्य आहे. प्रियंवदे, तुझें शेखरावर किती प्रेम आहे, हें मी जाणून आहें. पण काय करणार ! तो असा उनाड मुलगा निघेल, असें कोणाच्या स्वप्नींसुद्धां आलें नव्हतें. त्याच्याशीं तुझें लग्न करून तुझ्या साऱ्या जन्माची माती आम्ही कशी बरें होऊं देऊं ? म्हणून सांगतें, तूं त्याला विसरण्याचा प्रयत्न कर ! '

प्रियंवदा आवेशानें बोलली,–' तसें होणें अगदीं अशक्य आहे ! शिवाय, ते निरपराधी आहेत, अशी माझ्या मनाची खात्री आहे. कोणीं कांहीं जरी सांगितलें, तरी तें माझ्या मनाला अगदीं खरें वाटणार नाहीं. माझ्या मनाची अशी खात्री आहे कीं, कोणी तरी दुष्टानें त्यांच्या संबंधानें अगदीं खोट्या गोष्टी आपणांस कळविल्या असतील, किंवा त्यांच्या वागणुकीचा भलताच अर्थ आपल्या मनांत भरवून दिला असेल ! '

मेधावती करड्या मुद्रेनें प्रियंवदेकडे पहात म्हणाली,–' प्रियंवदे, तूं जर आपलेंच म्हणणें खरें धरून बसलीस, तर तुझा मला राग आल्याखेरीज राहणार नाहीं. पण तुझें मन आधींच उद्विग्न झालें असतां त्यांत आपल्या रागाची भर घालण्याची माझी इच्छा नाहीं. यासाठीं मी काय म्हणतें, तें नीट ऐकून घे. मी आज याच गोष्टीसंबंधानें तुझ्याशीं शांतपणें चार शब्द बोलावयास येथें आलें आहें.

प्रियंवदा मध्येंच म्हणाली,–' आपण त्यांच्यासंबंधानें आणखी कांहीं भलभलत्या गोष्टी मला ऐकाविणार आहां, असें मला वाटतें. आत्याबाई, मी तुमच्या पायां पडतें. कृपा करून आपण मला भलताच उपदेश करूं नका. खरच सांगतें, त्यांच्या अंगीं सत्य, दया, औदार्य वगैरे जे गुण आहेत, त्यांची आपणांस अजून खरी पारखच झालेली नाहीं, म्हणून त्यांच्या संबंधानें आपलें मन शंकित झालेलें आहे ! '

मेधावती किंचित् कोपयुक्त स्वरानें म्हणाली,–' दुधखुळे पोरी, तुला या जगाचा काडीभर तरी अनुभव आहे काय ? तुझ्यापेक्षां कांहीं तरी अधिक पावसाळे मला गेले आहेत. तुला अजून जगाचा अनुभव नसल्यामुळें सर्व माणसें आपल्यासारखींच सरळ स्वभावाचीं असतील, असें वाटतें. पण हा तुझा भ्रम आहे. जीं माणसें खरोखरच उलट्या काळजाचीं असतात, त्यांनाच बाह्य देखाव्यासाठीं मोठा साळसूदपणा धरावा लागतो. यापुढें जर तूं शेखरावर विश्वास ठेवशील, तर तुला पश्चात्ताप करीत बसण्याची वेळ येईल ! आपल्या पोटच्या मुलासंबंधानें असे उद्गार काढण्याचा ईश्वरानें मजवर प्रसंग आणला, याचें मला किती वाईट वाटत आहे, हें तुला काय सांगूं ! पण मी तरी काय करूं ? ज्या गोष्टी आमच्या डोळ्यांसमोर उभ्या आहेत, त्यांच्याकडे

कानाडोळा करून कसें चालेल? बरें मी आतां जें काय सांगणार आहें, तें मुकाट्यानें ऐकण्याची इच्छा आहे कीं नाहीं, हें मला प्रथमच सांग पाहूं ?'

मेधावतीबरोबर वादविवाद करून तिचें मन वळणें शक्य नाहीं, ही प्रियंवदेच्या मनाची खात्री होतीच; आणि आपण जरी नाहीं म्हटलें, तरी तिच्या मनांत जें काय सांगावयाचें आहे तें सांगितल्याशिवाय ती परत जाणार नाहीं, अशीही तिच्या मनाची खात्री असल्यामुळें ती जें काय बोलेल तें आपण मुकाट्यानें ऐकून घ्यावें, असा प्रियंवदेनें मनाशीं बेत केला; आणि कांहीं उत्तर न देतां ती खालीं मान घालून स्तब्ध बसली.

नंतर मेधावती म्हणाली,–' प्रियंवदे, तूं कांहीं मला परकी नाहींस! तूं प्रत्यक्ष माझ्या भावाची कन्या आहेस, म्हणून मीही तुला आपल्या मुलीप्रमाणेंच मानितें. तुझ्या कल्याणाची मला काळजी आहे, हें मी आपल्या तोंडानें बोलून दाखविलें पाहिजे, असें नाहीं. कालच वृषपुरीं जाणें झालें होतें, तेव्हां तिकडून तुझ्या आजोबांना (वृषपर्वाला) शेखरासंबंधाच्या सर्व कागाळ्या समजल्या आहेत. शेखराचें दुर्वर्तन असें अकस्मात् कानीं आल्यामुळें त्यांना फार वाईट वाटलें. शेखरासंबंधानें आमची निराशा झाल्यामुळें, तुझ्या विवाहासंबंधानें आम्हाला दुसऱ्या रीतीनें विचार करणें जरूर झालें. माझे दोन मुलगे असतां तुला दुसऱ्या कुलांत देणें आम्हाला इष्ट कसें बरें वाटेल? शेखर जरी इतका नादान निघाला, तरी माझा चूडामणि गुणांचा आहे, म्हणून त्याच्याशीं तुझा विवाह करावा, असें आम्ही ठरविलें आहे. चूडामणीची जी सोयरीक सध्यां जमलेली आहे, ती आम्ही होईल तितकें करून रद्द करूं, पण तसें न जमल्यास प्रथम चूडामणीशीं तुझा विवाह करूं आणि नंतर तो संबंध घडवून आणूं. यासाठीं तूं आतां शेखराला आपल्या मनांत थारा न देतां चूडामणि हाच आपला पति होणार, असें समज!'

प्रियंवदा हें भाषण जरी मुकाट्यानें ऐकत होती, तरी तिला या भाषणांतील प्रत्येक शब्द बाणाप्रमाणें टोंचत होता. तिच्या नेत्रांतून एकसारख्या अश्रुधारा वाहात असून, ती शून्य दृष्टीनें मेधावतीकडे पाहात होती. आपलें उत्तर ऐकून घेण्यासाठीं मेधावती थांबली आहे, असें लक्ष्यांत येतांच प्रियंवदा दृढनिश्चयदर्शक स्वरानें म्हणाली,–'असें होणें अशक्य आहे!'

हें उत्तर मेधावतीला न रुचल्यामुळें चिडल्यासारखी होऊन ती प्रियंवदेला म्हणाली,–' प्रियंवदे, तूं इतकी हट्टी निपजशील अशी माझी अगदीं कल्पना नव्हती. आम्ही सर्व वडील माणसें–जी गोष्ट तुझ्या कल्याणाची आहे–तीच तुला करावयास सांगत आहों, असें असतां तूं आपलाच हेका धरून बसलीस तर तुझा निभाव लागेल, असें का तुला वाटतें ?'

थोडा वेळ विचार करून प्रियंवदा म्हणाली,–' आत्याबाई, तुम्ही मला आणखी कितीही उपदेश केला, तरी तो व्यर्थच जाणार, असें स्पष्टपणें बोलून दाखविणें मला भाग पडत आहे, त्यास माझा नाइलाज आहे. आपणां सर्वांच्या दृष्टीनें जरी माझे भावी पति (शेखर) दोषी दिसत असले, तरी, ईश्वराच्या दृष्टीनें ते निर्दोषीच ठरतील, अशी माझ्या मनाची खात्री आहे. परमेश्वर न्यायी आहे, तो त्यांच्यावर आलेल्या दोषांचें निरसन केल्याखेरीज रहाणार नाहीं. ते दोषी नाहींत, हें तर सिद्ध होईलच. पण माझ्या दुर्दैवानें तसें न झाल्यास मी आपला सर्व जन्म अविवाहित स्थितींतच घालवीन! मीं त्यांस जीं वचनें दिलीं आहेत, तीं मोडून मी दुसऱ्याची पत्नी प्राणांतीही होणार नाहीं! आत्याबाई, माझ्या मनाची अशी खात्री आहे कीं, आज ना उद्यां केव्हा तरी त्यांच्यावर आलेल्या दोषांचें निरसन

होऊन आपण त्यांस विनाकारण दोष दिला, असें उघड बोलून दाखविण्याचा आपणांवर प्रसंग येईल ! मी हें विचार केल्याखेरीज उगीच कांहींतरी बरळत आहें, असें जर आपल्यास वाटत असेल, तर ती आपली चूक आहे, असें मी स्पष्ट सांगतें. त्यांच्या गुप्त शत्रूंचीं जरी हवीं तीं कारस्थानें चालू असलीं, तरी त्यांच्या शत्रूंशीं टक्कर देऊन त्यांचे सर्व बेत हाणून पाडण्यास त्यांचे मित्र एका पायांवर तयार आहेत; इतकेंच नव्हे, तर त्यांच्यावर लादलेल्या दोषांचें निरसन करण्याची तयारीही झालेली आहे ! '

हें प्रियंवदेचें भाषण ऐकून राणी मेधावती आश्चर्यानें चकित होऊन तिच्याकडे पाहूं लागली. तिचें हें भाषण उगीच पोकळ नसून त्यांत कांहीं तरी खोल अर्थ असला पाहिजे, अशी राणीच्या मनाची खात्री झाली; आणि ती म्हणाली,–' प्रियंवदे, या तुझ्या भाषणाचा अर्थ तरी काय समजावयाचा ? ' प्रियंवदेनें कांहींच उत्तर दिलें नाहीं. दुःखाच्या आवेगामुळें, आपण जितकें बोलणें अगत्य होतें, त्याहून थोडें अधिक बोललों, असें तिच्या ध्यानीं येऊन ती स्तब्ध राहिली.

ती बोलत नाहीं असें पाहून मेधावती पुढें म्हणाली,–' आतां कां बोलत नाहींस ? यावरून तूं उगीच कांहीं तरी बोलून गेली असावीस, असें मला वाटतें. बरें, मी आतां तुला जो प्रश्न विचारला त्याचें तूं सरळ उत्तर देणार आहेस, कीं उगीच कांहीं तरी भकत बसणार आहेस ! '

प्रियंवदा थोडा वेळ स्तब्ध राहून नंतर म्हणाली,–' मला या प्रश्नाचें उत्तर देण्यापूर्वी आजोबांची भेट घेतली पाहिजे. त्यांची भेट झाल्याखेरीज मला या प्रश्नाचें उत्तर देतां येत नाहीं. आपण मला वृषपुरीं केव्हां पाठविणार ? '

मेधावती म्हणाली,–' वृषपुरीं जाऊन अधिक काय होणार आहे ? आम्हीं जें ठरविलें आहे, तें त्यांच्या विचारानेंच ठरविलें आहे. यावरून तुझा आमच्यावर विश्वास नाहीं, हें उघड दिसत आहे ! '

प्रियंवदा बोलली,–' आपल्यावर माझा विश्वास नाहीं, असें नाहीं. पण आपल्या कानांवर ज्या कांहीं गोष्टी आल्या आहेत, त्या आपणांस खऱ्या वाटत असल्यामुळें, आपण मला भलतीच गोष्ट करावयास सांगत आहां. आत्याबाई, प्रेम म्हणजे काय, हें आपणांस माहीत असेलच ! वाटेल तेव्हां वाटेल त्याचा स्वीकार करावा, अशा प्रकारची जर प्रेम ही वस्तु असती, तर आपल्या म्हणण्याप्रमाणें मला करतां आलें असतें. '

मेधावती आपल्यास आश्चर्य वाटतें असें दाखवीत म्हणाली,–' प्रियंवदे, तूं अशा प्रकारच्या उलट्या गोष्टी मला सांगशील, अशी माझी अगदीं कल्पना नव्हती. खरोखर, मला वाटतें, आज तुझें मन ताब्यावर नसावें.'

प्रियंवदा म्हणाली,–' माझें मन अगदीं चांगलें ताब्यावर आहे, आणि मी जें काय बोलत आहें, तें अगदीं विचारपूर्वक बोलत आहें. आजपर्यंत इतकें स्पष्ट भाषण करण्याचा मजवर कधींच प्रसंग आलेला नव्हता. मनुष्याची एकदां निराशा झाली, म्हणजे मग तें बेपर्वा होत असतें. आपणच सांगा, तुमचें हें भाषण ऐकल्यावर मीं आशा तरी कसली धरावी ? वास्तविक पाहिलें, तर माझ्या मुखांतून यापेक्षांही अधिक बेपर्वाईचीं भाषणें निघावयास हवीं होतीं, पण मी अजून तितकी निराश झालें नाहीं ! '

प्रियंवदेचें हें भाषण ऐकून मेधावतीला बरेंच आश्चर्य वाटलें, आणि आपला मान राखून घेण्यासाठीं उगीच बसणें जरूर आहे, असें तिनें आपल्याशीं ठरविलें. हें त्यांचें भाषण चाललें आहे, इतक्यांत, त्या ज्या दिवाणखान्यांत बसल्या होत्या, त्या दिवाणखान्याच्या खिडकींतून एक घोडेस्वार वाड्याकडे येत आहे, असें त्यांच्या नजरेस पडलें. तो स्वार वाड्याच्या देवडीवरून आंत आला, त्यावेळीं तो पंडित हेमचंद्र आहे, असें त्या

दोघींनाही ओळखिलें, आणि मेधावती म्हणाली,–' हेमचंद्र बहुधा तुझ्या आजोबांचें पत्र घेऊन आला असेल, असें वाटतें. '

हेमचंद्राच्या आगमनानें प्रियंवदेला फार आनंद झाला. प्रियंवदेला हेमचंद्राचा लहानपणापासून पुष्कळ दिवसांचा सहवास अस. ल्यामुळें तो तिला बंधूप्रमाणें प्रिय वाटत असे. शेखर प्रतापपुरांतून बाहेर गेल्यापासून रोज त्याच्या संबंधानें कांहीं ना कांहीं अप्रिय वार्ताच तिच्या कानांवर येत असल्यामुळें तिला प्रतापपुरीं राहण्याचा अगदीं कंटाळा आला होता. ती कधींच वृषपुरीं गेली असती, परंतु शेखरावरील संकटें टाळण्यासाठीं आपण प्रतापपुरीं राहणें अगत्याचें आहे, असें तिला वाटत असल्यामुळें ती अगदीं नाइलाजानें तेथें राहिली होती. शेखरासंबंधानें अप्रिय गोष्टी बोलणारीं सर्व माणसें तिला शत्रूप्रमाणें वाटत असल्यामुळें, हेमचंद्राच्या आगमनानें तिला फार हर्ष झाला. हेमचंद्राच्या सौजन्यावर आणि शहाणपणावर तिचा विश्वास असल्यामुळें आपल्या मनांतील गोष्टी उघडपणें बोलून दाखवावयास आपला मित्र आपल्यापाशीं आला याचा तिला मोठा आनंद झाला, यांत नवल नाहीं.

नंतर प्रियंवदा आणि मेधावती या दोघी माडीवरून खालीं उतरून बैठकीच्या दिवाणखान्यांत आल्या. तेथें दृढसंध आणि चूडामणि यांच्या शेखरासंबंधाच्या गोष्टी निकल्याच सुरू झाल्या होत्या. हेमचंद्रानें त्या दिवाणखान्यांत प्रवेश केलेला पाहतांच दृढसंध आणि चूडामणि यांनीं त्याचें योग्य शब्दांनीं स्वागत केलें; तथापि हेमचंद्राचा सरळ स्वभाव चूडामणीला माहीत असल्यामुळें, आणि सरळ स्वभावाचीं माणसें चूडामणीला अगदीं आवडत नसल्यामुळें, हेमचंद्राच्या आगमनानें चूडामणीला खरा आनंद मुळींच झाला नव्हता. त्याला पहातांच प्रियंवदेला मात्र अत्यानंद झाला, आणि तिनें जणुं काय आपला सख्खा भाऊ अकस्मात भेटावयास आला आहे, अशा रीतीनें त्याचें मनापासून स्वागत केलें.

औपचारिक प्रश्नोत्तरें झाल्यावर दृढसंधानें विचारिलें,–' पंडितराय, आज इकडे कोणीकडे येणें झालें ? आपण वृषपुराहून कांहीं निरोप घेऊन आलां आहां, कीं मीं पूर्वी बोलाविल्याप्रमाणें आपल्या समागमाचा लाभ देण्यासाठीं आपण येथें आलां आहां ? आपण कोणत्याही हेतूनें येथें आलां असलां, तरी आपल्या स्वागतामध्यें आमच्याकडून अंतर पडणार नाहीं ! '

हेमचंद्रानें स्मितपूर्वक उत्तर दिलें,–' वृषपति महाराजांच्या खुशालीखेरीज दुसरा निरोप नाहीं. आपल्या आज्ञेप्रमाणें कांहीं दिवस येथें घालविण्याच्या उद्देशानेंच मी आज येथें आलों आहें. '

दृढसंधानें पुनः हेमचंद्राचें स्वागत केलें, आणि त्याच्याशीं इकडच्या तिकडच्या गोष्टी बोलावयास त्यानें सुरुवात केली. सायंकाळपर्यंतचा वेळ गप्पागोष्टींमध्यें तेव्हांच निघून गेला. नंतर नित्याप्रमाणें चूडामणि घोड्यावर बसून फेरफटका करण्यासाठीं निघून गेला, आणि दृढसंधही आपल्या राज्यांतील भानगडीच्या गोष्टींचा खल करण्यासाठीं आपल्या विश्वासु अमात्यांसह खलबतखान्यांत जाऊन बसला. राणी मेधावतीही कांहीं गृहकृत्यासाठीं निघून गेली व हेमचंद्र आणि प्रियंवदा अशीं दोघेंच त्या दिवाणखान्यांत मागें राहिलीं. हेमचंद्र आणि प्रियंवदा हीं पुष्कळ दिवस एकमेकांच्या सहवासामध्यें राहिलीं असल्यामुळें, त्यांना परस्परांच्या स्वभावाची चांगली ओळख पटलेली होती, आणि तीं दोघें एकान्तामध्यें असलीं तरी कोणाच्या मनांत कोणत्याही प्रकारची शंका येण्याचा संभव नव्हता.

हेमचंद्रानें प्रियंवदेचें हृद्गत ओळखिलें असल्यामुळें त्यानें तिला म्हटलें,–' प्रियंवदे, तुला दुःखी पाहून मला फार खेद होत आहे. पण्हाचे दिवशीं दृढसंध महाराज वृषपुरीं आले

असतां त्यांनीं तुझ्या आजोबांस जें शेखरासंबंधाचें वर्तमान सांगितलें, तें ऐकून मला मोठें आश्चर्य वाटलें.'

प्रियंवदेनें माठ्या उत्सुकतेनें विचारलें,–'पंडितजी, आधीं मला सांगा, तुम्हीं जी हकीकत ऐकली, तिच्यावर तुमचा विश्वास बसला काय?'

हेमचंद्र म्हणाला,–'प्रियंवदे, माझा विश्वास? जर कोणी सूर्य हा थंड असतो, आणि चंद्राच्या किरणांनीं वणवे पेटतात, असें मला सांगितलें, तर त्या गोष्टीवर जितका माझा विश्वास बसेल, तितकाच माझा विश्वास त्या गोष्टीवर बसला आहे, असें समज! संपूर्ण पृथ्वीचें राज्य मिळत असल्यामुळें शेखर एकाद्या दुराचरणास प्रवृत्त झाला, असें जरी मला कोणी सांगितलें, तरी मी त्याची गणना मूर्खांतच करीन!'

प्रियंवदा आनंदानें म्हणाली,–'अहाहा! पंडितजी, हें आपलें भाषण म्हणजे अशा प्रकारचे समाधानाचे शब्द केव्हांही माझ्या कानीं पडले नव्हते. दुःखाचे वेळीं मित्राचें भाषण अमृताप्रमाणें उपयोगी पडतें, ही गोष्ट खरी आहे.'

आपणास प्रियंवदेनें नुसतें 'मित्र' या शब्दानें संबोधिलें, याचें हेमचंद्रास फारसें समाधान वाटलें नाहीं. हेमचंद्राच्या मनांत त्या कुमारिकेसंबंधानें मित्रत्वाहून उच्चवृत्ति वास करीत होती. त्याचें मन अत्यंत उदात्त असल्यामुळें त्यानें आपल्या मनोवृत्तींचा कोणासही थांग लागूं दिला नव्हता, पण त्याच्या मनांत प्रियंवदाविषयक प्रेम वास्तव्य करीत होतें. सध्यांच्या प्रसंगाचा फायदा घेऊन शेखराची नालस्ती केल्यास त्याच्यावरून तिचें मन उडेल, आणि नंतर कदाचित् आपण प्रयत्न केल्यास आपले हेतु पूर्ण होतील, असा अनुदार विचार त्याच्या मनास कधींही शिवला नाहीं. त्याचें मन जर कोणास माहीत असतें, आणि त्यानें अशा रीतीनें आपला फायदा करून घेण्याची मसलत त्याला सांगितली असती' तर हेमचंद्रानें त्या मनुष्याची गणना पशू मध्यें केली असती. प्रियंवदेसारख्या राजकन्येला शेखरासारखा राजकुमारच योग्य वर आहे, आपण तिच्या पाणिग्रहणास पात्र नाहीं, ही गोष्ट तो पुर्ती जाणून होता, आणि या प्रसंगीं आपले मनोविकार बाजूस ठेवून दुःखांत गढून गेलेल्या प्रियंवदेला सुखी करण्यासाठीं आपण तिच्या मनाला गोड वाटेल असें भाषण करणें हें आपलें कर्तव्य आहे, असें तो समजत होता. तिला गोड वाटेल असें भाषण करतांनासुद्धां तो सत्यास विसरत नव्हता, हें येथें सांगणें अवश्य आहे. तो म्हणाला,–'राजकन्ये, शेखराविरुद्ध कोणीं कांहीं जरी मला सांगितलें, तरी माझा विश्वास त्यावर बसावयाचा नाहीं. शेखराच्या सुखांत माती कालविण्यासाठीं कोणाचीं तरी रुष्णकारस्थानें चालू असावीं असा माझा पूर्ण समज आहे. हा सर्व प्रकार माझ्या ध्यानीं येतांच या गोष्टीपासून तुला किती दुःख होईल ही कल्पना एकदम माझ्या मनांत आली आणि तुझ्या मनाला धीर देण्यासाठीं व तुला समाधानच्या गोष्टी सांगण्यासाठीं आज मी मुद्दाम येथें आलों आहें. तसेंच या कारस्थानाच्या मुळाशीं कोण आहे, याचा पत्ता लावून त्याची फजिती करण्यासाठीं मी वाटेल तें करावयास तयार आहें.'

प्रियंवदेनें प्रश्न केला,–'पण ही हकीकत ऐकून आजोबांचा तिच्यावर विश्वास कसा बसला, याचें मला फार आश्चर्य वाटतें.'

हेमचंद्र म्हणाला,–'प्रत्यक्ष दृढसंधांनींच ती हकीकत त्यांस सांगितल्यामुळें त्यांना त्या गोष्टीवर विश्वास ठेवणें भाग पडलें. इतरांच्या तोंडून जर त्यांनीं हें वर्तमान ऐकलें असतें, तर त्यांनीं त्यावर अगदीं विश्वास ठेविला नसता. त्याचप्रमाणें शेखराविरुद्ध जीं कांहीं प्रमाणें दृढसंध महाराजांस मिळालीं आहेत, तीं वरवर विचार करणारास मोठीं

बलवत्तर वाटण्यासारखीं आहेत, यांत शंका नाहीं. माणसें म्हातारीं झालीं, म्हणजे त्यांचीं मनेंही म्हातारीं होत असतात आणि त्यांच्या मनांत आपल्या मुलांच्या कल्याणाविषयीं विशेष काळजी उत्पन्न होत असते. प्रत्यक्ष दृढसंधमहाराजांच्या मुखानें शेखराच्या दुर्वर्तनाची वातमी वृषपतिमहाराजांच्या कानांवर आलेली असल्यामुळें तुझ्या कल्याणासाठीं त्यांनीं दृढसंधमहाराजांच्या इच्छेप्रमाणें आपलें मत द्यावें, हें एका दृष्टीनें योग्यच आहे. दृढसंधमहाराज परत आल्यावर मीं तुझ्या आजोबांची गांठ घेऊन त्यांचें मन वळविण्याचा पुष्कळ प्रयत्न करून पाहिला, पण माझें बोलणें त्यांस रुचलें नाहीं.' नंतर थोडा वेळ थांबून हेमचंद्र बोलला,–'या सर्व कारस्थानाच्या मुळाशीं कोण असावें, यासंबंधानें थोडासा तर्क माझ्या मनांत येतो, पण मी जें नांव घेईन तें तूं बाहेर फोडतां नये.'

प्रियंवदा बोलली,–'हें काय सांगितलें पाहिजे ? माझ्याही मनांत एका माणसासंबंधानें शंका येत आहेत. अगोदर तुम्हीं कोणाचें तें नांव घ्या, मग मीही तुम्हांला माझी शंका कोणाविषयीं आहे, तें सांगेन.'

हेमचंद्र म्हणाला,–'या सर्व कारस्थानाच्या मुळाशीं चूडामणि आहे, असें माझी मनोदेवता मला सांगते. हा माझा तर्क जर चुकला, तर मला अगदीं वाईट न वाटतां उलट आनंदच होईल ! पण दुर्दैवानें हाच तर्क खरा ठरणार, अशी खात्री आहे !'

प्रियंवदा म्हणाली,–'होय ! माझ्याही मनांत त्याच्याच संबंधानें शंका येत आहे. पंडितजी, तुम्ही येथें आलां त्यावेळीं आत्याबाईचें माझ्याशीं जें भाषण झालें, तें ऐकून माझें मन शतधा विदीर्ण झालें ! मीं आपल्या तोंडानें ते शब्द उच्चारिले नाहींत तर ती गोष्ट तुम्हास समजावयाची नाहीं, म्हणून त्या काय म्हणत होत्या तें मी सांगतें. हिरा सोडून गारगोटी पदरांत बांधण्याचा त्यांचा मला उपदेश चालला होता!'

हेमचंद्र म्हणाला,–'सध्यां त्यांच्या बुद्धीला भ्रम झालेला असल्यामुळें, त्यांनीं तसा उपदेश करावा, यांत फारसें आश्चर्य नाहीं. परवां दृढसंध महाराज व तुझे आजोबा यांचें देखील यासंबंधानें बरेंच बोलणें झालें.'

डोळ्यांमध्यें अश्रुबिंदु चमकत असतां प्रियंवदा म्हणाली,–'ज्यांना माझ्या कल्याणाची काळजी, त्यांच्या डोळ्यांवरच जर अशी भुरळ पडली, तर माझा निभाव कसा लागणार !'

हेमचंद्र म्हणाला,–'प्रियंवदे, अशी कष्टी होऊं नको. त्यांचे बेत जरी कसेही झाले असले, तरी ईश्वराच्या मनांत जें असेल, तेंच घडून येईल. प्रयत्न करणें हें आपलें काम, पण ते सिद्धीस नेणें केवळ परमेश्वराच्या इच्छेवर अवलंबून आहे. तुझ्या आजोबांना तुझ्या कल्याणाची काळजी असल्यामुळें, तूं प्रतापपुरच्या राजघराण्यांत आपल्या कन्येच्या देखरेखी खालीं सदैव असावें, असें त्यांच्या मनांत आल्यास त्यांत नवल नाहीं. त्यांच्या दृष्टीनें शेखर काय किंवा चूडामणी काय दोन्ही सारखेच ! किंबहुना वडिलांमागें चूडामणीच राजसिंहासनावर अधिष्ठित व्हावयाचा असल्यामुळें शेखरापेक्षां तो त्यांना अधिक पसंत पडावा, हें व्यवहाराला अनुसरूनच आहे. यासाठीं तूं आपल्या आजोबांना दोष देणें, हें अगदीं योग्य होणार नाहीं.'

प्रियंवदा म्हणाली,–'ज्या गोष्टी होणार त्या कधीं चुकावयाच्या नाहींत, हा सिद्धांत असल्यामुळें मी आपल्या दैवालासुद्धां दोष लावीत नाहीं ! माझे आजोबा जो कांहीं विचार करितील तो माझ्या कल्याणाचाच असेल, यावद्दल माझ्या मनाला तिळमात्रही शंका नाहीं. पण मी मात्र एकदां दिलेलें वचन मोडून सत्यापासून कधीं-

ही भ्रष्ट होणार नाहीं. फार तर काय, त्यांचे (शेखराचे) शत्रु जे दोषारोप त्यांजवर करीत आहेत, ते जरी माझ्या दुर्दैवानें खरे ठरले, तरी मी त्यांच्या चरणीं अर्पण केलेलें आपलें मन तेथून परत घेणार नाहीं!'

हेमचंद्र म्हणाला,–'मीं ज्या गोष्टी ऐकिल्या, त्या गोष्टी शेखराच्या हातून कालत्रयीं देखील घडावयाच्या नाहींत, अशी माझ्या मनाची पूर्ण खात्री आहे.'

प्रियंवदा म्हणाली,–'आणि माझ्याही मनाची तशीच खात्री आहे, म्हणून सध्यां चाललेला प्रकार मला सहन होत नाहीं.'

हेमचंद्रानें गंभीरतेनें प्रश्न केला,–'प्रियंवदे, तुझ्यासाठीं मी काय करूं? मी शेखराची भेट घेऊन खरा प्रकार त्याच्यापासून समजून घेऊं काय? फक्त होय म्हण, कीं मी एकदम भृगुकच्छचा मार्ग धरतों.'

प्रियंवदा म्हणाली,–'मीं जरी होय म्हटलें, तरी त्याचा कांहीं उपयोग व्हावयाचा नाहीं. ते सध्यां भृगुकच्छ नगरीं असतील, असें मला वाटत नाहीं. त्यांना तेथून सुरथपुरीं जाण्याची आज्ञा झालेली आहे. परवां जें पत्र येथून गेलें, त्या पत्रामध्यें सर्व गोष्टी अगदीं स्पष्ट लिहिल्यामुळें तें पत्र वाचल्यावर स्वारी मुकाट्यानें सुरथपुरीं जाईल, असें मला वाटत नाहीं. सुरथपुरीं जाऊन राहणें ही शिक्षा असल्यामुळें, अपराध सिद्ध होईपर्यंत ती शिक्षा भोगण्यास स्वारी कधींही कबूल होणार नाहीं. आपण माझ्यासाठीं इतके श्रम सोसण्यास तयार झालां, हे मजवर आपले फार फार उपकार आहेत.' ती थोडा वेळ थांबून पुढें बोलली,–'त्यांचें रक्षण करणारे मित्र त्यांजपाशीं नाहींत असें मात्र आपण समजूं नका. त्यांच्या सुस्वभावानें त्यांनीं पुष्कळ मित्र जोडून ठेविले आहेत. त्यांपैकीं एकजण मोठ्या हुषारीनें डोळ्यांत तेल घालून त्यांच्या कल्याणासाठीं झटत आहे. पंडितजी, आपणांवर माझा विश्वास नाहीं म्हणून मी त्या मित्राचें नांव आपणांस सांगत नाहीं, असें आपण समजूं नये; त्या गृहस्थाला मीं ही गोष्ट गुप्त राखण्याचें वचन दिलें असल्यामुळें मला त्याचें नांव आपणांस सांगतां येत नाहीं, त्यास माझा नाइलाज आहे.'

हेमचंद्र म्हणाला,–'असें असेल तर माझा तरी त्या गृहस्थाचें नांव सांगण्याबद्दल तुला आग्रह कोठें आहे! या मित्राच्या साह्यानें शेखरामागचें ग्रहण सुटो, म्हणजे झालें!'

प्रियंवदा म्हणाली,–'त्यांच्यावरील सर्व दोषांचें निरसन होईल, अशी माझ्या मनाला खात्री वाटत आहे. मला पत्र लिहिण्याची परवानगी नाहीं, ही गोष्ट कदाचित् आपणांस माहीत नसेल. माझें एक पत्र जरी पोंचलें असतें, तरी त्यापासून तिकडे किती तरी समाधान झालें असतें. यांनीं जरी मला पत्र लिहिण्याची बंदी केली आहे, तरी देखील मी मघां सांगितलेल्या मित्राबरोबर एक लहानशी चिट्ठी पाठवावयाची ती मी पाठविलीच–पण मला लांबलचक पत्र लिहिण्यास वेळ सांपडला नाहीं, त्यामुळें सगळ्या गोष्टी लिहितां आल्या नाहींत.'

हेमचंद्र म्हणाला,–'तूं जी ही हकीकत सांगितलीस ती ऐकून मला फार आनंद होत आहे, आणि शेखराचें रक्षण करणारा निदान एक मित्र तरी तेथें आहे, हें ऐकून मला समाधान होत आहे. आपल्या वडिलांचें तशा प्रकारचें पत्र पाहिल्यावर शेखर मुकाट्यानें सुरथपुरीं जाईल, असें मलाहि वाटत नाहीं. तो मोठा मानी पुरुष आहे. तो एकदम येथें परत येऊन आपल्यावरील सर्व दोषांचें निरसन करील, आणि आपला छळ करणाराचें तोंड बंद करील, अशी माझ्या मनाची खात्री आहे.'

प्रियंवदा म्हणाली,–'मलाही तसेंच वाटतें. आमच्या अजमासाप्रमाणें; मध्यें कांहीं घोटाळा झाला नसल्यास, तें पत्र आजच त्यांच्या हातीं पोंचलें पाहिजे. पत्र पोंचल्यावर क्षणाचाही विलंब न करतां स्वारी मार्गस्थ

झाली असल्यास आणखी तीन दिवसांच्या आंत येथें येणें होईल. पंडितजी, तुम्हाला काय सांगूं ! अलीकडे मला खाणें-पिणें अगदीं सुचत नाहीं. हें संकट टळून सर्व दोषांचें निरसन होईल, आणि त्यांच्याशीं शत्रुत्व करणारांची फजिती उडेल, तेव्हांच माझ्या जिवाला बरें वाटेल. सध्यां या वाड्यांत रहावयाचें म्हणजे मला मेल्याहून मेल्या-सारखें वाटत आहे. ईश्वरा, अशा प्रकारचीं संकटें उत्पन्न करण्यांत तुझा जो कांहीं हेतु असेल, तो आम्हां पामरांना कसा समजणार ? माझा भार आतां सर्वस्वी तुजवर आहे ! असें बोलून तिनें आपल्या दोन्ही हातांनीं आपलें मुख झांकून घेतलें. आणि ती ओकसाबोकशीं रडूं लागली. त्यावेळची तिची स्थिति पाहून पाषाणाला सुद्धां पाझर सुटला असता, मग हेमचंद्रा-सारख्या सदयहृदयाच्या नेत्रांतून अश्रुधारा वाहूं लागाव्या, यांत आश्चर्य कसलें ?

त्या दिवशीं प्रियंवदा आणि हेमचंद्र यांचें याच विषयासंबंधानें बराच वेळ संभाषण चाललें होतें,पण त्यामध्यें विस्तारानें लिहिण्या-सारखें कांहींच नसल्यामुळें तें आम्ही येथें देत नाहीं. फक्त इतकेंच येथें सांगतों कीं, हेमचंद्राशीं झालेल्या भाषणानें तिचें मन बरेंच थाऱ्यावर आलें. कारण त्या सज्जन पुरुषानें तिच्याशीं भाषण करतांना शेखराच्या निरपराधीपणासंबंधानें आपल्या मनाला वाटत असलेली खात्री वारंवार व्यक्त केली होती. प्रसंगीं उपयोगी पडणारा आणखी एक मित्र ईश्वरानें आपल्यापाशीं पाठवून दिला या गोष्टीनेंही तिच्या मना-वरील दुःखाचें दडपण बरेंच हलकें झालें.

अशा रीतीनें तो दिवस निघून गेला, आणि विशेष वर्तमान घडून आल्यावांचून आणखी दोन दिवस निघून गेले. या दोन दिवसांत हेमचंद्राच्या संगतीमुळें तिला फारसें दुःख भासलें नाहीं. तिसरा दिवस उजाडला, आणि आज शेखर येणार असें तिचें मन तिला सांगूं लागलें. सकाळीं उठल्यापासून ती आपल्या दिवाणखान्याच्या खिडकींतून राजमार्गाकडे सारखी नजर लावून बसली होती. त्या रस्त्यानें घोड्यांच्या टापांचा आवाज ऐकूं आला कीं तिचें हृदय धडधडूं लागावें, पण तो स्वार शेखर नसून दुसराच कोणी आहे, असें तिला आढळून आलें म्हणजे तिनें दीर्घ सुसकारा सोडून निराशेनें मटकन खालीं बसावें, असें एकसारखें चाललें होतें. आपण खिडकी सोडून दूर गेल्यास आपली नजर चुकवून तो केव्हांच वाड्यांत येईल, आणि तितका त्याच्या दर्शनाला अधिक विलंब लागेल, असें मनांत येत असल्यामुळें फक्त दोनप्रहरीं भोजनाच्या-वेळीं मात्र ती खालीं उतरलीं होती. त्या दिवशीं तिनें हेमचंद्राची सुद्धां भेट घेतली नाहीं. 'ईश्वरा, त्यांना इकडे येण्याची बुद्धि दे, अशा प्रार्थनेची तिनें एकसारखी जपमाळ घेतली होती, असें म्हणावयास हरकत नाहीं.'

सायंकाळ झाली. रानांत चरावयास गेलेल्या गाई परत आल्या. राजवाड्यांत नोक-रीसाठीं येणारे लोक आपल्या घरीं निघून गेले; सूर्य मावळला, आणि पायांखालीं दिसे-नासें झालें, तेव्हां मात्र प्रियंवदेचा धीर सुटला. 'मन चिंती तें वैरी न चिंती' अशी म्हण आहे. आपल्या मनांत जे विकल्प उत्पन्न होत असतात, ते प्रत्यक्ष आपल्या शत्रूच्या कधीं ध्यानीं-मनीं देखील नसतात ! शेखर आज येऊन पोंचावा, अशी प्रियंवदेची कल्पना होती, पण सायंकाळ लोटेपर्यंत जेव्हां तो आला नाहीं, तेव्हां तिच्या मनांत अनेक प्रकारचे कल्पना-तरंग उद्भवूं लागले. आपल्या प्रिय-करावर प्रवासामध्यें एकादें संकट तर आलें नसेलना, अशी शंका तिच्या मनांत आली आणि ती त्या दिशेनें विचार करूं लागली. अगदीं भलत्या कल्पना तिच्या मनांत उत्पन्न होऊं लागल्या. तिच्या मनाची त्या वेळीं

जी स्थिति झाली होती, तशी जर एकाद्या कवीच्या मनाची स्थिति होईल, तर त्याच्या हातून अत्यंत सरस अशी 'संशय-रत्नमाला' बनेल यांत शंका नाहीं.'

बरीच रात्र होऊन गेली, आणि ताटांची तयारी झाली. आपणास क्षुधा नाहीं, असें तिनें दोन तीन निरोपांस उत्तर दिलें, पण राणी मेधावतीनें अतिशय आग्रह केल्या-वरून ती नाइलाजानें भोजनास गेली. ती भोजनगृहांत गेली असेल नसेल, तोंच घोड्यांच्या टापांचा ध्वनि तिच्या कानीं आला. अशावेळीं घोड्यांच्या टापांचा आवाज ऐकूं आल्यामुळें दृढसंधराजानें कोण आलें आहे याची चौकशी करविली, त्या-वरून राजपुत्र शेखर दुर्मुखासह वाड्यात येऊन दाखल झाला आहे, असें समजलें. तो आल्याचें वर्तमान कानीं पडतांच प्रियंव-देची मुद्रा प्रफुल्लित दिसूं लागली. भोज-नाचीं ताटें वाढलेलीं होतीं, तरी भोजनास प्रारंभ न करतां दृढसंधराजा एकदम उठला आणि त्यानें बैठकीच्या दिवाणखान्याचा मार्ग धरिला; अर्थात् हेमचंद्र, चूडामणि मेधावती आणि प्रियंवदा हीं सर्वजणें त्याच्या मागून निघालीं.

शेखर बैठकीच्या दिवाणखान्यांत आपल्या वडिलांची वाट पहात बसला होता. दृढसंध राजाला पहातांच शेखरानें नम्रतेनें त्याला प्रणाम केला, आणि म्हणाला,–'आपण मजवर जे दोषारोप केले आहेत, त्यांचें निरसन करण्यासाठीं मी येथें आलों आहे.'

हे त्याच्या मुखांतील शब्द ऐकून प्रियं-वदेला आपण जणुंकाय आनंदसागरांत पोंहत आहों, असें वाटलें, आणि ती आपल्या तृषित नेत्रांस त्याच्या दर्शनोदकानें तृप्त करिती झाली.

प्रकरण ३५ वें.

दोषारोप आणि दोषनिरसन.

आपला बंधु दृष्टीस पडतांच चूडामणीच्या अंगाचा जो तिळपापड उडाला होता आणि त्याची मुद्रा जी एकाद्या राक्षसाप्रमाणें क्रूर दिसत होती, तिचें वर्णन करणें अशक्य आहे. आपल्या बंधूऐवजीं जरी एकादा शत्रु त्याच्या नजरेस पडला असता, तरी त्याला इतकें वाईट वाटलें नसतें. जर त्याचे वडील त्याच्या डोळ्यांसमोर नसते, तर त्यानें यावेळीं शेखराच्या नरडीचा घोट देखील घेतला असता. पण करतो काय ! रुध्यांची वेळ मोठी आणीबाणीची असल्यामुळें त्याला आपले सर्व मनोविकार दाबून ठेवणें भाग पडलें. बाह्यतः सौम्यपणाचा डौल घालून चूडामणि म्हणाला;–'शेखर, आलास हें फार चांगलें झालें. तुझ्या वर्तनासंबंधानें जो आम्हां सर्वांचा गैरसमज झाला आहे, तो घालविलास म्हणजे फार समाधान वाटेल.'

नंतर दृढसंध म्हणाला,–'शेखर, माझ्या आज्ञेप्रमाणें तूं सुरथपुरीं न जातां प्रथम येथें आलास, याबद्दल मी तुला दोष देत नाहीं. तूं निमुटपणें सुरथपुरीं गेला असतास, तर तूं दोषी आहेस, याविषयीं कोणाच्याहीं मनांत संशय उरला नसता. आमच्या संशयाची निवृत्ति करण्यासाठीं तूं येथें आलास, याबद्दल मला आनंद होत आहे.'

मेधावती मध्येंच बोलली,–'तिकडे तारें वाढलेलीं तशींच टाकून अगोदर या गोष्टी कशाला ? शेखर आज वाटचालीच्या दग-दगीमुळें दमला असेल. आधीं जेवणें होऊं द्यात; मग रात्र हवी तेवढी रिकामी पडलेली आहे.' मेधावती राणीचें मन आपल्या पुत्रा-विषयीं जरी इतकें कलुषित झालेलें होतें, तरी शेखराला पाहतांच तिच्या मातृप्रेमास भरतें आलें, आणि त्यानें वाड्यांत पाऊल ठेवल्याबरोबर सर्वांनीं त्याजवर गहजब करावा, ही गोष्ट तिला आवडली नाहीं.

हें मातेचें भाषण ऐकून तो तेजस्वी राजपुत्र बोलला,–' माते, आपणां सर्वांचीं मनें मजविषयीं संशयात पडलेलीं असतां–आपण सर्वजणें मजवर कोपलां असतां–मला अन्न कसें गोड लागेल ? माझ्यावरील सर्व संशयांचें निराकरण झाल्याखेरीज मी तोंडांत अन्न घालणार नाहीं. फार काय, मी अगदीं निरपराधी आहें हें सिद्ध झाल्याखेरीज मी तोंडांत पाणी सुद्धां घेणार नाहीं ! '

हें त्याचें भाषण चालू असतां पंडित हेमचंद्र त्याजवाशीं आला, आणि म्हणाला,–' मित्रा, इतरांचा तुझ्यासंबंधानें कशीही कल्पना असो, माझ्या दृष्टीनें तूं निरपराधी आहेस ! ज्या अपराधांचा तुजवर आरोप आला आहे, तसले अपराध प्राणांतींही तुझ्या हातून घडावयाचे नाहींत, अशी माझ्या अंतःकरणाची खात्री आहे. मी तुझें मनापासून अभिनंदन करतों.'

शेखर म्हणाला,–' हें आपलें भाषण ऐकून मला फार आनंद होत आहे. माझी खात्री आहे, कीं आणखी थोड्याच वेळांत आपल्याप्रमाणेंच सर्वांच्या मनाची खात्री होईल.'

हें ऐकून दृढसंध म्हणाला,–' तुझ्या निरपराधीपणाविषयीं आमची खात्री व्हावी, अशीच आमच्या मनाची इच्छा आहे. तुझ्यासंबंधानें भलभलत्या गोष्टी माझ्या कानीं यावयास लागल्या, तेव्हांपासून मलाही अन्न गोड लागेनासें झालें आहे. तुझें सर्व भाषण ऐकून घेण्याची मलाही फार उत्कंठा लागली आहे. निरपराधी आहेस असें सिद्ध झालें, म्हणजे मी तुला पंक्तीला घेऊन आनंदानें भोजन करीन; पण तूं अपराधी आहेस असें सिद्ध झालें, तर मी यावज्जीव तुझें मुखावलोकन करणार नाहीं. तुझ्यावर जे आरोप आहेत, आणि तुझे अपराध सिद्ध करणारीं जीं प्रमाणें आमच्यापुढें आलीं आहेत, तीं खोडून काढणें तुला फार जड जाईल ! इंद्रराजाच्या दृष्टीनें जर तूं निर्दोषी ठरलास, तर माझें तुजवर पूर्ववत् प्रेम जडेल, इतकेंच नव्हे, तर तूं मला अधिक प्रिय होशील ! '

शेखरानें म्हटलें,–' अहो तात, मजकडे नीट पहा, म्हणजे मी निरपराधी आहें, अशी आपली खात्री पटेल ! मी जर अपराधी असतों, तर आपल्या समोर उभें राहण्याची मला छाती झाली नसती. आपण मजकडे तीक्ष्ण नजरेनें पाहूं लागल्याबरोबर माझी गाळण उडाली असती, माझे हात-पाय लटलटां कांपूं लागले असते, आणि माझ्या मुखावर काळोखी लोटली असती ! माझे अपराध भरपूर पुराव्यानें माझ्या पदरांत पडतील, असें जर मला वाटत असतें, तर हडसून खडसून पुराव्याचें माप पदरीं घेण्यासाठीं मी मुद्दाम येथें आलों असतों काय ?'

दृढसंध म्हणाला,–' असल्या भाषणांनीं या प्रकरणाचा निकाल लागावयाचा नाहीं. आमची खात्री होण्यास योग्य प्रमाणेंच मिळालीं पाहिजेत; तथापि तूं आपल्या तर्फे जीं प्रमाणें पुढें आणशील, त्यांचा मी सत्यास स्मरून विचार करीन. मी पक्षपात करीन, अशी तुला शंका सुद्धां यावयास नको. '

शेखर म्हणाला,–' आपण पक्षपात कराल, अशी शंका स्वप्नामध्यें सुद्धां माझ्या मनांत यावयाची नाहीं. माझी तयारी आहे; पण आधीं माझ्यावर आरोप काय आहेत, आणि ते आरोप करणारा कोण आहे, हें मला प्रथम समजलें पाहिजे. '

दृढसंध म्हणाला,–' तेंही समजेल ! तुजवर अपराध कोणते आहेत, हें तुला सांगण्यापूर्वी प्रियंवदेनें येथून गेलें पाहिजे.' असें बोलून त्यानें राणी मेधावतीला, प्रियंवदेला दुसरीकडे नेण्यास सांगितलें.

प्रियंवदेला त्या दिवाणखान्यांतून बाहेर जाण्याचें मोठें संकट पडलें. ती केविलवाण्या मुद्रेनें शेखराकडे पाहूं लागली. हें पाहून शेखर बोलला,–' होय, तुला येथून जाणं भाग आहे; कारण स्त्रियांसमोर ज्यांची चर्चा

होऊं नये, अशा कित्येक गोष्टींवर मला वादविवाद करावा लागणार आहे. तथापि तुला सध्यां इतकेंच सांगतों कीं, माझ्यावर आलेल्या सर्व आरोपांचें निराकरण करून मी लवकरच तुजपाशीं येईन ! '

प्रियंवदेनें पुनः एकदां शेखराकडे विश्वासयुक्त नजरेनें पाहिलें, आणि ती मेधावतीबरोबर निघून गेली. अर्थात् त्या दोघींमागून ज्या कित्येक दासी केवळ आपली उत्कंठा पूर्ण करून घेण्यासाठीं तेथें डोकावून पाहत होत्या, त्याही त्यांच्याबरोबर निघून गेल्या. हें पाहून तेथें जमलेल्या पुरुष मंडळीस देखील निघून जाणें भाग पडलें. आतां फक्त दृढसंध, दोघे राजपुत्र, हेमचंद्र आणि दुर्मुख इतकीच मंडळी त्या दिवाणखान्यांत शिल्लक राहिली. ही सर्व मंडळी इतका वेळ उभीच होती. दृढसंध मुख्यासनावर विराजमान झाल्यावर शेखराखेरीज बाकीचे सर्वजण आपापल्या योग्यतेप्रमाणें बाजूच्या आसनांवर बसले. शेखराची आपण पुर्ती फजीती करून टाकूं अशी चूडामणीच्या मनाची खात्री असल्यामुळें, तो आपल्या मनांत मांडे खात मोठ्या आढ्यतेनें छाती पुढें काढून डौलानें आपल्या आसनावर बसला होता शेखरानें अजून चूडामणीशीं मुळींच भाषण केलें नव्हतें. आपणांवर हें संकट उपस्थित करण्यांत चूडामणि प्रमुख आहे, अशी त्याच्या मनाची खात्री असल्यामुळें त्याच्याशीं भाषण करणें शेखरास अगदीं पसंत वाटलें नव्हतें. दुर्मुख अगदीं निर्विकार मुद्रेनें एका दूरच्या आसनावर बसला होता. चाललेल्या प्रकाराचें त्याच्या मनाला कांहींच वाटत नाहीं, असें त्याच्या मुद्रेवरून दिसत होतें.

आपल्या आसनावर बसल्यानंतर दृढसंध शेखरास म्हणाला,–' शेखर तूं उभा कां ? त्या आसनावर बस, आणि नंतर स्वस्थपणानें तुला काय बोलावयाचें असेल तें बोल. '

शेखर म्हणाला,–' नाहीं, मी बसावयाचा नाहीं आपण न्यायाधीश, आणि मी आरोपी अशी स्थिति आहे. आरोपी आणि फिर्यादी यांनीं न्यायाधीशासमोर उभें राहूनच आपलें भाषण केलें पाहिजे, अशी वहिवाट आहे. यासाठीं जो कोणी मजवर आरोप करीत असेल, त्यानेंही इच्छा असल्यास मजसमोर येऊन उभें राहवें, असें मी त्यास आह्वान करतों ! ' असें बोलून छाती पुढें काढून शेखर मोठ्या ऐटीनें उभाच राहिला.

नंतर दृढसंध म्हणाला,–' तुझी मर्जी ! तुजवर काय काय आरोप आहेत, हें तुला क्रमाक्रमानें समजेलच. प्रथमतः मी तुला असें विचारतों कीं, मीं तुला भृगुकच्छ नगरीं कोणत्या हेतूनें पाठविलें होतें, हें तुझ्या लक्ष्यांत आलें आहे काय ? '

शेखर म्हणाला,–' माझ्या मनांत कोणत्याही प्रकारची शंका नसल्यामुळें मीं या गोष्टीचा केव्हांच विचार केलेला नाहीं. खंडणीची रक्कम वसूल करण्यासाठीं कोणीतरी तेथें जाणें अवश्य होतें, या कामगिरीवर आपण माझी रवानगी केली, हा प्रकार अगदीं सरळ असल्यामुळें मला तिकडे पाठविण्यांत आपला विशिष्ट उद्देश असेल, असें मला केव्हांही वाटलें नव्हतें. '

दृढसंध म्हणाला,–' ही गोष्ट तुझ्या ध्यानीं आलेली नाहीं, त्या मला उघड सांगितली पाहिजे मणीशीं बंधुत्वाच्या नात्यास अ वर्तन कधीं केलेलें तुला आठवतें

शेखरानें क्षणक्षणित स्वरानें जब ' मी ईश्वरसाक्ष सांगतों कीं, ज्याच्य भाऊच्या मनास दुःख होईल असें माझ्या हातून घडलें नाहीं, किंवा माझ्या मुखांतून निघालेलें नाहीं. ' नं चूडामणीकडे पाहून म्हणाला,–' माझें खरें आहे, कीं खोटें आहे, हें तूंच सांग प

आपल्यास अतिशय खेद होत आहे, असें ढोंग करून चूडामणि म्हणाला,–' ही गोष्ट तूं मला न विचारतास तर बरें झालें असतें. *तूं जरी शपथ वाहून खोटें बोललास, तरी तूं माझा अनेक वेळां अपमान केला* आहेस, आणि अनेक वेळां तूं मुद्दाम मला पीडा दिली आहेस, हें स्पष्ट सांगणें मला भाग आहे. मी या गोष्टी गुप्तच ठेवणार होतों, पण वडिलांच्या अत्याग्रहास्तव मला त्या त्यांना सांगाव्या लागल्या!'

शेखर म्हणाला,–' तूं ज्या अर्थी मला माणसांतून उठविण्यासाठीं धडधडीत खोटें बोलून मजवर तुफान घेत आहेस, त्या अर्थी तुझ्या सगळ्या कृत्यांचा पाढा वाचणें मला भाग पडत आहे. त्यांतील पहिली गोष्ट म्हणजे, सुंदरपुर काबीज झालें, त्या दिवशीं तूं तेथील जिन्याच्या खोलींत माझी गांठ घेऊन जें कांहीं बोललास ती होय!'

अगदीं तिऱ्हाईतपणाचा आव घालून चूडामणि म्हणाला,–' असें अर्धवट कां बोलतोस? जें काय असेल तें स्पष्ट सांगून सोड, म्हणजे खरा कोण आणि खोटा कोण, याचा निकाल आपोआपच होईल!'

शेखर म्हणाला,–' ठीक आहे! ज्या
ी नसा आग्रहच आहे, त्या अर्थी मला
ायक गोष्ट वडिलांच्या कानांवर
आहे. नीट आठवण कर. त्या
तुझा मनापासून द्वेष करतों'
बोलला नाहींस? त्या दिवशीं
जय मिळाला, त्या जयास
अंशीं कारण झालों, ही गोष्ट
ली नाहीं. आमच्या सैन्यांतील
र प्रेम करतात, आणि माझ्या-
साहसाचीं कामें करण्यास तयार
या गोष्टींचें तुला वैषम्य वाटत होतें
सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हटली
मियंवदेचें प्रेम तुजवर न जडतां तें
र जडलें ही होय. या सर्व गोष्टींमुळें
' मी तुझा द्वेष करतों,–' असें तूं मला साफ सांगितलेंस कीं नाहीं.'

क्रोधानें दांत ओठ खात चूडामणि *बोलला,–' या सर्व गोष्टी खोट्या, अगदीं* साफ खोट्या आहेत!'

शेखर त्वेषानें बोलला,–' ईश्वरसाक्ष सांगतों, या सर्व गोष्टी अगदीं खऱ्या आहेत. या गोष्टी तूं त्या दिवशीं बोललास त्या वेळीं त्या ऐकण्यास तेथें तिसरें कोणी नव्हतें, म्हणून या गोष्टींचा निकाल शपथेवरच होणें जरूर आहे. मी क्षत्रियाचा बच्चा आहें! ही माझ्या कमरेस तरवार लटकत आहे, हा तरवार हेंच माझें दैवत. या तरवारी-वर हात ठेवून शपथेवर सांगतों कीं, मी सांगतों यांतील एक अक्षर देखील खोटें नाहीं. तूंही क्षत्रियाचा बच्चा आहेस. सत्याचें रक्षण करणें हें तुझेंही कर्तव्यच आहे. यासाठीं जर माझें बोलणें खोटें असेल तर आपल्या पित्यासमक्ष–राजा समक्ष न्यायासनासमोर, शपथेवर सांग पाहूं!'

शेखराचे हे आणीबाणीचे शब्द ऐकून चूडामणीचें तोंड गोरें मोरें झालें. आपणही त्याच्या प्रमाणें तरवारीवर हात ठेऊन शपथ घ्यावी असें एकदां त्याच्या मनांत आलें, पण तसें करावयास त्याला धैर्य होईना. तो जात्या शकुन, भूत, पिशाचें, कौल इत्यादि लोकभ्रमात्मक गोष्टींवर दृढ विश्वास ठेवणारा असल्यामुळें शपथ घेण्यास त्याला भय वाटूं लागलें. तरवारीवर हात ठेवून शपथ घेणें हें त्या कालीं भयंकर दिव्य समजलें जात असे. जर कोणी अशी शपथ घेतली, आणि ती खोटी असली, तर तो खोटी शपथ घेणारा माणूस जागच्या जागीं ठार होतो, असें त्या कालीं सर्व लोक मानीत असत. शेखरानें आव्हान केलें असतांही चूडामणि शपथ घेत नाहीं, ही गोष्ट दृढसंधाला विशेष महत्त्वाची वाटली आणि शेखराचें बोलणें खरें असावें, असें त्यास वाटूं लागलें.

नंतर दृढसंधानें विचारिलें,–' या गोष्टीचा विचार मी करीन. आतां तुला आणखी असा प्रश्न करितो कीं,–' माझ्या मागें तुझे पाय या सिंहासनाला लागूं देणार नाहीं.–' असें तूं चूडामणीला म्हटलें होतेंस कीं नाहीं ?'

अत्यंत आश्चर्यभरित दृष्टीनें शेखरानें उत्तर केलें,–' नाहीं ! कधींच नाहीं ! '

दृढसंधानें विचारलें,–' तूं मुद्दाम डोळे-झांक करून सुंदरपुरांतून आणि त्रिशूळ-पर्वताजवळच्या शिवालयांतून सरदार हल-धराला पळून जाण्यास साह्य केलेंस कीं नाहीं ?'

शेखर म्हणाला,–' ईश्वरसाक्ष सांगतों, मी तसें केलें नाहीं ! '

दृढसंधानें प्रश्न केला,–' बरें, सरदार हलधर येथें असतां आम्हीं पंडित हेम-चंद्रजीस चिलखतामध्यें लपवून ठेविलें होतें, ही गोष्ट तुला समजली असून ती तूं त्यास कळविली होतीस कीं नाहीं ? '

शेखरानें उत्तर केलें,–' हाही आरोप साफ खोटा आहे, असें मी शपथेवर सांगतों ! '

दृढसंध म्हणाला,–' तर मग आतां मी तुला भृगुकच्छशहरीं कां पाठविलें, याचें कारण सांगतों. सध्या मीं तुला जे प्रश्न विचारले आणि ज्यांचीं उत्तरें तूं आतां शपथे-वर दिलीं आहेस, ते अपराध तुझ्या हातून घडले अशी माझ्या मनाची कल्पना झाल्या-मुळें मीं तुला तिकडे पाठविलें होतें. तिकडे दुसरे कांहीं उद्योग नसल्यामुळें तुला आपल्या कृत्यांचा विचार करावयास योग्य संधि सांप-डेल आणि तुझ्या चुका तुझ्या लक्षांत येतील असें तुला तिकडे पाठविण्यांत माझें धोरण होतें. तुझ्याविषयीं आमच्या मनांत शंका असल्यामुळें तुझ्या सर्व कृत्यांवर नजर ठेवून तीं आम्हांला वारंवार कळविण्यासाठीं कोणातरी हुषार मनुष्याला तुजपाशीं ठेविणें जरूर होतें. ही माझी युक्ति नव्हे, ही युक्ति मला चूडामणीनें सुचविली; तथापि ती मला फार पसंत पडली, असा मनुष्य कोण हें मीं योजूं लागलों असतां चूडामणीनेंच मला एका माणसाचें नांव सांगितलें. तो मनुष्य हुषार आणि विश्वासु आहे, अशी माझ्याही मनाची खात्री असल्या-मुळें, मी त्याच माणसाची तुजवर नजर ठेवण्याचे कामीं योजना केली. '

शेखर आश्चर्यानें चकित होऊन म्हणाला,–' तर मग हा जो कोणी तुम्ही विश्वासु म्हणून योजिलेला मनुष्य तोच खोट्या चहाड्या सांगून माझी बदनामी करणारा असला पाहिजे ! असा हा चुगल-खोर विश्वासघातकी मनुष्य कोण आहे, तो येथें असल्यास माझ्यासमोर येऊं दे ! '

दृढसंध दटावीत म्हणाला,–' शेखर, गैरशिस्त शब्द उच्चारण्याचें कारण नाहीं. तुला अजून पुष्कळ आरोपांचें निरसन करावयाचें आहे. तें केल्यासेरीज तुला कोणाला दोष देण्याचा अधिकार पोंचत नाहीं. तूं अगोदर आपल्यावरील अपराध नाशार्चीद कर, आणि नंतर तुला कोणास दोष द्यावयाचा तो दे ! '

शेखरानें उत्तर केलें,–' तर मग असा कोण मजवर आरोप करणारा आहे, तो माझ्या पुढें येऊं दे ! '

दृढसंध बोलला,–' तो तुझ्या पुढेंच आहे. चल–दुर्मुखा, असा येथें उभा रहा ! '

दुर्मुखाचें नांव कानीं पडतांच शेखर आश्चर्यानें अगदीं गुंग होऊन गेला. आपण ज्यावर विश्वास ठेऊन हरएक कामीं ज्याच्या मसलतीप्रमाणें वागलों, तोच आपला गळा कापण्यास पुढें सरलेला पाहून शेखराच्या मनाला अत्यंत आश्चर्य वाटलें, आणि त्याच्या मुद्रेवर निराशेची छटाही उमटली.

हें पाहून चूडामणी म्हणाला,–' आतां पहा या राजश्रीची कशी तिरपिट उडाली आहे ती ! आतां मघांच्या गमजा कोठें दिसत नाहींत ! '

दृढसंध ओरडून म्हणाला,–' चूडामणी चूप रहा ! अशाप्रकारच्या भाषणांनीं माझें

मन कलुषित होईल, अशी तुला घमेंड असेल, तर ती व्यर्थ आहे !'

राजाज्ञेप्रमाणें आपल्या आसनावरून उठून दुर्मुख शेखरासमोर उभा राहिला. तथापि त्यानें आपली दृष्टि दृढसंध राजाकडे लाविली होती. शेखर त्याजकडे आश्चर्यानें, तिरस्कारानें आणि तुच्छ-दृष्टीनें पाहात होता; पण जणुं काय आपलें त्याच्याकडे लक्ष्यच नाहीं, असें दुर्मुख आपल्या मुद्रेवरून भासवीत होता. यावेळीं एकक्षण मात्र जी स्तब्धता झाली, तितक्या वेळांत आनंदमठामध्यें पहिल्या रात्रीं घडून आलेल्या सर्व गोष्टी शेखराच्या मनांत झट-क्यासरशा येऊन गेल्या, आणि दमयंतीला बातमी देणारा दुर्मुखच असावा, अशी शंका पूर्वी आपल्यास आली असतां आपण तिकडे दुर्लक्ष्य केलें, ही आपली मोठी चूक झाली, असें त्यास वाटलें.

नंतर दृढसंध राजा म्हणाला,–' दुर्मुखा ! तूं मला वेळोवेळीं मुद्दाम जासूद पाठवून ज्या कित्येक महत्त्वाच्या गोष्टी कळविल्या आहेस, त्यासंबंधानें मी तुला आतां प्रश्न करणार आहें. तुला जीं काय उत्तरें द्यावयाचीं असतील, तीं सत्यास स्मरून अगदीं निर्भय-पणानें दे. तूं ज्याच्याविरुद्ध साक्ष देत आहेस, त्याच्या हातून तुला यावज्जीव तिळ-मात्र इजा होणार नाहीं, ही खात्री ठेव. त्याचप्रमाणें मी हेंही तुला स्पष्टपणें सांगतों, कीं जर तूं माझ्यासमोर–मी न्याय करावयास बसलों असतां न्यायासनासमोर–जर खोटें सांगशील, तर तुला देहांतशिक्षा करीन ! विश्वासघाताची मला मोठी चीड आहे. जर तुझें बोलणें खरें ठरलें, तर तूं आमची मोठी कामगिरी बजाविलीस म्हणून मी तुला इनाम देईन; पण जर तुझी लुच्चेगिरी आढ-ळून आली, तर तुझा कडेलोट करीन, हें ध्या-नांत ठेऊन सत्यास स्मरून काय तें सांग.'

नेहमींप्रमाणें शांत मुद्रेनें आणि दमदार स्वरानें दुर्मुखानें उत्तर केलें,–' महाराज, मी आपल्या सर्व प्रश्नांचीं उत्तरें सत्यास स्मरून अगदीं खरीं खरीं देईन !'

दृढसंधानें विचारलें, ' ठीक आहे ! तूं भृगुकच्छनगरीं असतां शेखर एका स्त्रीच्या नादीं लागला होता कीं नाहीं ?'

दुर्मुख म्हणाला,–' होय ! '

दृढसंधानें विचारलें, 'त्या स्त्रीचें नांव-गांव तुला माहीत आहे ? असल्यास सांग !'

दुर्मुखानें उत्तर दिलें,–' राजकुमार शेखर भृगुकच्छनगरीं जिच्या नादीं लागले होते, ती स्त्री माझ्या चांगली माहितीची आहे. नारायणपुरचे राजे रणमत्त यांची पुतणी दमयंती, सध्यां तेथें असून आपले कुमार कित्येक दिवस तिच्या मागें लागले होत.'

हें ऐकून चूडामणी मध्येंच म्हणाला,– ' कोणाच्या ? आमच्या कट्टया शत्रूच्या कन्येच्या ? '

चूडामणीला गप राहण्याविषयीं नुसत्या नेत्रांनीं सूचना देऊन दृढसंधराजानें विचा-रलें,–' तूं सांगतोस, ही गोष्ट सिद्ध करा-यास तुजपाशीं पुरावा आहे काय ?'

दुर्मुखानें उत्तर दिलें, ' एके दिवशीं मी व चतुरक भृगुकच्छ नगराबाहेर–पुष्कळ दूर अंतरावर–घोड्यावरून फिरावयास गेलों असतां कुमार शेखर त्या राजकन्येबरोबर नाजूक गोष्टी बोलत होते, ही गोष्ट ते नाक-बूल करणार नाहींत, अशी माझी खात्री आहे.'

हें ऐकून शेखरास अत्यंत त्वेष आला तथापि तो मोठा विचारी असल्यामुळें आपलें मन आवरून शांतपणें म्हणाला,–' चालू द्या, शेवटपर्यंत ऐकून घेतल्याशिवाय मी मध्यें कांहींच बोलत नाहीं. मला जें कांहीं सांगा-वयाचें आहे, तें सर्व एकदमच सांगेन ! '

दृढसंधानें विचारलें,–' अंगठीची हकी-कत लिहिली होतीस ती काय आहे ?'

दुर्मुखानें उत्तर दिलें,–' यांनीं एके दिवशीं सकाळीं मला बोलावून ही अंगठी (असें बोलून त्यानें एक अंगठी दृढसं-

धाच्या हातीं दिली) मजपाशीं देऊन मला म्हटलें कीं दमयंतीनें आपल्या प्रेमाची खूण म्हणून ही अंगठी मला दिली आहे; मी जरी सध्यां तिच्या नादीं लागलों आहें, तरी प्रियंवदेशीं माझा विवाह ठरला असल्यामुळें ही अंगठी आपल्यापाशीं ठेऊं इच्छित नाहीं. ही तूं अगदीं गुप्तपणें तिची तिला परत दे.'

हें दुर्मुखाचें अस्खलित खोटें भाषण ऐकून शेखराच्या पायाचा जाळ मस्तकीं गेला, आणि त्याच्या नरडीचा घोट घ्यावा असें मनांत येऊन तो तटकन उभा राहिला आणि भयंकर गर्जना करीत ओरडला, 'अरे विश्वासघातक्या हरामखोरा!'

दृढसंधही तितक्याच जोरानें ओरडून म्हणाला,–' चूप रहा! मध्यें गडबड करशील तर खबरदार!'

शेखर आत्मसंयमन करून म्हणाला,–' होय; मी गप बसतों. मी मध्यें बोललों, ही माझी चूक आहे; अशी चूक मी पुनः करणार नाहीं.'

दृढसंध दुर्मुखास म्हणाला,–' माझा पुढचा प्रश्न ऐक. एका पडक्या देवालयांत शेखरानें तिची भेट घेतली, हें तुला माहीत आहे काय?'

दुर्मुखानें उत्तर केलें,–' एके रात्रीं यांनीं मला आपल्याबरोबर फिरावयासाठीं म्हणून बोलाविलें. आपण कोठें जाणार हें मला सांगून, ही गोष्ट गुप्त राखण्यासाठीं यांनीं मला आग्रहानें बजाविलें होतें. मी यांच्याबरोबर आनंदमठांत गेलों. तेथें दमयंती पूर्वीच आलेली होती. तेथें पुष्कळ वेळ हीं दोघें एकान्तीं होतीं. आपल्या बहिणीचें हें वर्तन विक्रमसेनास कोणत्या मार्गानें कळलें हें मला माहींत नाहीं, पण त्याला ही गोष्ट समजल्यामुळें तो एकाएकीं तेथें आला, पण त्यास हार खावी लागली.'

दृढसंध म्हणाला,–' आतां याहून महत्त्वाच्या दुसऱ्या गोष्टीविषयीं मी आतां तुला प्रश्न विचारतों. खंडणीच्या रकमेबद्दल तुला काय माहिती आहे सांग पाहूं?'

तो विश्वासघातकी दुर्मुख म्हणाला,–' यांनीं खंडणीची रकम आणलेली पहातांच तिच्या सुरक्षिततेची माझ्या मनांत काळजी उत्पन्न झाली, आणि ती रकम तेथील एखाद्या विश्वासु सावकाराच्या पेढीवर ठेवावी अशी मीं आपण होऊन यांस मसलत सांगितली; पण ती यांनीं ऐकली नाहीं. आपण यांच्या वर्तनावर देखरेख करावयासाठीं मला मुद्दाम यांच्याबरोबर पाठविलें असल्यामुळें हे कोठें जातात, काय करतात, हें मीं लक्ष्य लावून पाहत असे. हे उडाणटप्पू लोकांच्या नादीं लागले असें मला लवकरच समजून आलें. अधिक चौकशी करतां हे ज्या ठिकाणीं जातात, तो जुगाराचा अड्डा आहे असें मला समजलें. हे जुगार खेळण्यासाठीं जातात ही कल्पना माझ्या मनांत आल्याबरोबर मीं यांजपाशीं रकमेची चौकशी केली. मी यांना रकमेसंबंधाचा प्रश्न अगदीं स्पष्टपणें विचारला असल्यामुळें माझ्या त्या प्रश्नास सरळ उत्तर देणें यांस भागच पडलें आणि आपल्या शयनस्थानांतील एक फडताळ उघडून, मोठें आश्चर्य झाल्यासारखें दाखवून रकम चोरीस गेली, असें यांनीं मला सांगितलें. त्या वेळची यांची मुद्रा पाहूनच यांचें हें भाषण साफ खोटें आहे, अशी माझ्या मनाची तेव्हांच खात्री झाली आणि मनांत ज्या शंका आल्या होत्या, त्या खऱ्या ठरल्या हें पाहून मला फार खेद झाला. ही चोरीची गोष्ट कोठें न फोडण्याची यांनीं मला खरमरीत ताकीद देऊन ठेवली होती. एकदोन दिवसांत चोरीचा पत्ता लागेल, अशी यांनीं माझी खातरजमा करण्याचा यत्न केला; अर्थात् जुगारांतच एकादे वेळीं दैवयोगानें आपणांस द्रव्य मिळेल आणि तें आपण पुनः जागच्या जागीं ठेवूं अशी यांच्या मनाची कल्पना असावी असें एकदम माझ्या ध्यानांत

आलें; हा माझा तर्क चुकीचा असेल, तर चोरी झाल्याची गोष्ट यांनीं इतके दिवस आपल्यापासून गुप्त ठेवण्याचा प्रयत्न कां केला, याचा योग्य जबाब द्यावा.'

दृढसंधानें विचारलें,–' दुर्मुखा, तुला आणखी कांहीं सांगावयाचें आहे काय?'

दुर्मुखानें उत्तर केलें,–' फक्त दोन लागोपाठ रात्रीं हे शहरामध्यें कोठें भटकत होते, याचा मला पत्ता लागला नाहीं. दोन्ही प्रसंगीं हे तीनप्रहर रात्र उलटेपर्यंत बाहेर होते, आणि दोन्ही प्रसंगीं हे परत आले, तेव्हां यांच्या मुद्रेवर भीतीचीं चिन्हें स्पष्ट दिसून येत होतीं. पहिल्या रात्रीं हे कोठे भटकत होते याचा मला पत्ता न लागल्यामुळें मीं चतुरकाला यांच्या पाळतीवर ठेविलें होतें. त्याच्या दुसऱ्याच दिवशीं मोठ्या विलक्षण रीतीनें चतुरक नाहींसा झाला, तेव्हांपासून तो पुनः कोणाच्याही दृष्टीस पडला नाहीं!'

हें ऐकून दृढसंधानें अत्यंत दुःखयुक्त व आश्चर्यचकित मुद्रेनें दुर्मुखास म्हटलें,–' या तुझ्या भाषणावरून शेखरानेंच कांहीं युक्तीनें त्याला आपल्या मार्गांतून दूर केलें, असें म्हणण्याचा तर तुझा हेतु नाहींना?'

शेखर मोठ्या आवेशानें मध्येंच म्हणाला,–' ज्यानें इतका वेळ अस्खलित खोटें भाषण केलें, आणि ज्यानें मी कधीं स्वप्नांतसुद्धां केले नसलेले अपराध माझ्यावर लादले, तो चतुरकाच्या हत्येचें पाप माझ्या मस्तकीं लादण्यास कचरेल ही शंकासुद्धां नको! आपण सध्यां न्याय करावयास बसलां आहां म्हणून, नाहीं तर याचा प्राण मीं केव्हांच घेतला असता!'

दृढसंधही तितक्याच जोरानें ओरडून म्हणाला,–' गप्प रहा! मूर्खा, तुझ्यावर लागू होत असलेले अपराध किती भयंकर आहेत, याचा विचार कर! अशाप्रकारचा कुलांगार नूं निपजशील असें माझ्या स्वप्नांत सुद्धां आलें नव्हतें. आतां यावर तुझें म्हणणें काय आहे, हें मला ऐकून घेणें जरूर आहे. तुला जें काय सांगावयाचें आहे, तें अगदीं थोडक्यांत सांग. पोकळ पांडित्य किंवा दंभ यांचा माझ्या समोर तिळमात्रही उपयोग व्हावयाचा नाहीं, हें ध्यानांत ठेव.' दृढसंधाचें हें भाषण अशाप्रकारचें होतें कीं, शेखराच्या अपराधांबद्दल त्याच्या मनाची पूर्ण खात्री झालेली आहे, असें त्या भाषणावरून सर्वांच्या स्पष्टपणें ध्यानीं आलें.

हें वडिलांचें भाषण ऐकून चूडामणीला तर आनंदाच्या गुदगुल्याच होऊं लागल्या! तो मोठ्या आढ्यतेनें, तुच्छतेनें आणि तिरस्कारयुक्तदृष्टीनें शेखराकडे पाहूं लागला! हेमचंद्राला मात्र दुर्मुखाचें हें सर्व भाषण अगदीं खोटें असून, शेखर क्षणार्धांत त्या दोषांचें निरसन करील, असें वाटत होतें.

नंतर शेखर पुढें सरला, आणि म्हणाला,–' मला जें काय सांगावयाचें आहे, तें सांगण्यापूर्वी मी या माणसास कांहीं प्रश्न विचारणार आहें. कायहो, कारभारी, चोरीस गेलेली रक्कम वृषपतीच्या वाड्यांतील शंभुसेन नांवाच्या एका नोकरानें चोरली असावी, असा संशय तुम्हींच माझ्या मनांत भरविला कीं नाहीं?' आपणांस अत्यंत आश्चर्य झालें असें दाखवीत दुर्मुखानें उत्तर केलें,–' नाहीं! कधींच नाहीं!'

अत्यंत तिरस्कारयुक्त मुद्रेनें त्याजकडे पाहात शेखरानें विचारलें,–' तो शंभुसेन आपल्या एका सोबत्याबरोबर आनंदमठांत द्रव्याची वांटणी करण्यासाठीं जाणार आहे, असें तुम्ही मला सांगितलें कीं नाहीं?'

अगदीं शांतपणें दुर्मुखानें उत्तर दिलें,–' कधींच नाहीं!'

शेखरानें जोरानें विचारलें,–'नंतर थोड्याच दिवसांनीं तूं चतुरकाबद्दल माझ्या मनांत संशय उत्पन्न केलास कीं नाहीं? आणि त्या संशयाची निवृत्ति करून घेण्यासाठीं आम्ही त्यास प्रश्न करूं लागलों असतां दोन घट-

कांची मुदत मागून चतुरक पळून गेला, हें तरी तुला माहीत आहे कीं नाहीं ? '

दुर्मुखानें सणसणीत उत्तर दिलें,–' अशा प्रकारची एकादी गोष्ट माझ्या समक्ष झाली नाहीं. तुम्ही हे भलतेच प्रश्न मला विचारता !'

हीं उत्तरें ऐकून शेखर अगदीं बुचकळ्यांत पडला. दुर्मुखाचा नीचपणा इतका कळसाला पोंचलेला पाहून त्याची बुद्धि गुंग झाली. थोडावेळ स्तब्ध राहून शेखर म्हणाला, ' आतां या माणसाला प्रश्न विचारण्याची माझी इच्छा नाहीं. न्यायासनासमोर शपथेवर खोटें बोलणारा हा मनुष्य प्रत्यक्ष राक्षसच असला पाहिजे ! '

दृढसंध म्हणाला,–' शेखर, त्यानें तुझे अपराध उघडकीस आणिले, म्हणून तूं त्याला दुर्भीपणें करावींस हें अगदीं अयोग्य आहे. यापुढें माझ्या समक्ष तूं त्याला वाईट शब्द बोलूं नये, अशी माझी तुला आज्ञा आहे. हिंमत असेल, तर त्याचा खोटेपणा त्याच्या पदरीं घाला. ' हे शेवटचे शब्द उच्चारिते वेळचा दृढसंधाचा स्वर व त्याची मुद्रा यांवरून दुर्मुखाचें भाषण खोटें ठरणें अशक्य आहे, असें त्यास स्पष्ट दिसून आलें.

शेखरानें आपलें मन शांत केलें, आणि आपल्यावर आरोप कोणते आहेत, खराप्रकार निराळा असतां दुर्मुखानें वस्तुस्थितीचा विपर्यास कसा केला, कोणते मुद्दे आपण जोरानें सिद्ध केले पाहिजेत, आपण आपली हकीकत कोठपासून सांगितली पाहिजे, या गोष्टीचा आपल्या मनाशीं थोडक्यांत विचार केला, आणि त्यानें वेलावयास प्रारंभ केला. आपल्या ध्यानीं मनीं देखील नसतां सागरदत्ताकडे दमयंतीनें आपणांस कशा प्रसंगीं पाहिलें, नंतर तिनें आपणांस रस्त्यामध्यें कसें गांठलें, दुसरे दिवशीं आपण फिरावयास गेलों असतां गाडी कशी उलटली, त्या प्रसंगीं गाडींतील स्त्रिया कोण हें आपणांस माहित नसतांही केवळ भूतदयेनें आपण त्यांच्या साह्यास कसें गेलों, आपल्या खोलींत दमयंतीचें पत्र आणि अंगठी पाहून आपणास किती आश्चर्य वाटलें, आपण त्या वस्तु परत देण्यासाठीं दुर्मुखाच्या स्वाधीन कां केल्या, आपल्यास चोरी केल्हां आणि कशी उमगली, दुर्मुखानें शंभुसेनाविषयीं आपल्या मनांत कसा संशय उत्पन्न केला, त्या संशयामुळें उभयतां आनंदमठांत गेलों असतां तेथें विक्रमसेन येऊन काय प्रकार घडून आला, वगैरे गोष्टी जशा घडून आल्या तशा अनुक्रमानें त्यानें आपल्या वडिलांस सांगितल्या व दमयंतीकडून पैसे घेऊन त्यानेंच तिची आपली अशी लबाडीनें गांठ घालून दिली आणि त्यानेंच विक्रमसेनाला तेथें आणिलें असावें, असें सध्या आपणांस वाटत आहे, असें त्यानें सांगितलें. नंतर त्यानें चोरीची हकीकत ताबडतोब पत्रीं लिहून न कळविण्याचें कारण उघड करून सांगितलें. तसेंच आपण उनाड लोकांच्या नादीं लागल्याची गोष्ट खोटी आहे असें निक्षून सांगून आपण त्या शहरीं असतां रोज कायकाय केलें याचा हिशोब दिला. पुढें आपण मध्यरात्रीनंतर लागोपाठ बाहेर कां होतों, याचें कारण निवेदन करीत असतां प्रथम आपणांस जुलमानें गुप्त मंडळापुढें कसें नेलें, आणि तेथें आपणांस कोणत्या गोष्टी समजल्या, हें त्यानें अगदीं स्पष्टरीतीनें दृढसंधाला कळविलें. आपणांस निनांवीं पत्र आल्यामुळें आपण दक्षिणवेशीपाशीं गेलों असतां तेथून आपणांस जुलमानें आनंदमठांत कसें नेलें, तेथें ते आपणाकडून लग्नासंबंधी करार कसा करून घेणार होते, आपण साहसानें आपली मुक्तता करून घेण्यास प्रवृत्त झालों असतां एकाएकीं पिशाचदर्शन कसें झालें, आपले शत्रु कसे पळाले, वगैरे सर्व गोष्टी शेखरानें इत्थंभूत सांगून टाकिल्या. दुसरे दिवशीं तें निनांवी पत्र आपण कां जाळलें, दुर्मुखानें चतुरकासंबंधानें आपल्या मनांत संशय कसा भरवून दिला, चतुरक आपल्या वाग-

णुकीचें कारण दुर्मुखादेखत सांगण्यास कसा तयार नव्हता, आणि तो शेवटीं कसा पळाला इत्यादि गोष्टी सांगून शेखर उगीच राहिला.

या सर्व गोष्टी सांगावयास शेखराला एक घटकेहून अधिक वेळ लागला. दृढसंध राजानें अत्यंत गंभीरपणानें शेखराचें भाषण ऐकून घेतलें, पण तें आपणांस पसंत पडलें कीं नाहीं, हें त्यानें कोणाच्या लक्ष्यांत येऊं दिलें नाहीं. त्यामुळें शेखरासंबंधानें त्याचें मत काय झालें असावें हें कोणास समजलें नाहीं. चूडामणीच्या मुद्रेवरून शेखरानें सांगितलेली गोष्ट त्याला अगदीं बनावट वाटत होती, आणि तिजवर तो काडीमात्र विश्वास ठेवीत नव्हता, हें अगदीं उघड उघड दिसून येत होतें. शेखरानें सांगितलेल्या हकीकतीनें हेमचंद्राचें मात्र पूर्ण समाधान झालें होतें.

शेखर बोलावयाचा बंद झाल्यावर दृढसंध राजानें निःपक्षपाती न्यायाधीशास शोभेल अशा गंभीर मुद्रेनें आणि गंभीर स्वरानें बोलावयास प्रारंभ केला. त्यानें आरंभीं दुर्मुख आणि शेखर यांस 'तुम्हांस आणखी कांहीं सांगावयाचें आहे काय?' असा प्रश्न विचारला, व त्यांनीं 'नाहीं' असा जबाब दिल्यावर दृढसंध म्हणाला,–'शेखर, तुझें सर्व भाषण मीं लक्ष्यपूर्वक ऐकून घेतलें आहे, पण त्याच्या योगानें माझ्या मनाचें समाधान न होतां आणखी तीन चार शंका माझ्या मनांत उत्पन्न झाल्या आहेत. त्यांतील पहिली शंका अशी कीं, चोरी झाली हें तुला समजल्याबरोबर ती गोष्ट तूं ताबडतोब मला लिहून कळविली पाहिजे होतीस; तसें तूं केलें नाहींस, आणि तूं जुगाराच्या अड्ड्यांत जात होतास असें हा दुर्मुख म्हणतो, तें त्याचें म्हणणें तुला खोडून काढतां आलें नाहीं. अर्थात् जुगारामध्यें आपलें दैव उदयास येण्याची तूं वाट पहात नव्हतास, असें म्हणतां येत नाहीं. दुसरी शंका अशी कीं, दमयंतीनें जर तुझ्याशीं असें निर्लज्जपणाचें आचरण केलें होतें, तर तूं तिच्या आचरणावर पांघरूण घालण्याचा यत्न करावयास नको होता. तूं तिची फजिती केली नाहींस, यावरून तुझ्या मनांत तिच्याविषयीं प्रेमभाव होता, असें मानावयास जागा उरते. तिसरी शंका अशी कीं, तूं आपणास जें निनांवी पत्र आल्याचें सांगतोस तें पत्र नाहींसें करण्याचें तुला वास्तविक कारण नव्हतें. तें पत्र पुढें येत नाहीं, त्यामुळें त्याच्या अस्तित्वाबद्दल शंका रहाते. चवथी गोष्ट ही कीं, चतुरकानें चोरी केली असा संशय तुला आल्यावर किंवा दुर्मुखानें तुझ्या मनांत भरवून दिल्यावर–तूं त्याची तत्काल चौकशी केली पाहिजे होती. त्याला अशा स्थितींत मोकळें भटकूं देणें योग्य नव्हतें. बरें, नंतर ज्यावेळीं चतुरक सर्व कांहीं तुला एकट्याला सांगावयाला तयार झाला होता, त्यावेळीं त्याचें म्हणणें तूं ऐकून घ्यावयाचें होतेंस. तसेंच तूं जी भुताटकीची गोष्ट सांगतोस तीही फार विलक्षण दिसते. भुताटकी म्हणजे अगदींच खोटी, तिचें जगांत अस्तित्वच नाहीं, अशी माझी बिलकुल कल्पना नाहीं; आणि आनंदमठासंबंधाची दंतकथा खोटी आहे, तेथें मध्यरात्री भुतें उठत नसतील, असेंही माझें म्हणणें नाहीं; पण ज्या ठिकाणाची भताटकीबद्दल इतकी प्रसिद्धि आहे, त्याच ठिकाणीं विक्रमसेनानें तुला पकडून न्यावें, आणि तेथें त्यानें दमयंतीसह यावें, या गोष्टीवर माझा भरंवसा बसत नाहीं. अर्थात् आम्ही भुतांखेतांवर विश्वास ठेवतों, या पायावर तूं या गोष्टीची इमारत उभी केली असावीस! शेखर, इतकावेळपर्यंत तूं ज्या हकीकती सांगितल्यास, त्यांवर इतक्या शंका येत असल्यामुळें तुझें भाषण खरें असावें, असें माझें मन सांगत नाहीं. इतकेंच नव्हे, तर आपल्या विरुद्ध साक्षी देण्यास पुढें येईल, या भीतीनें तूं चतुरकाचा–पुढील शब्द उच्चारितांना मला अत्यंत खेद होत आहे.–तूं कदाचित् त्याचा खून सुद्धां केला असशील!

मूर्खा, तूं आतांपर्यंत जीं एकेक अघोर कृत्यें केलींस, त्यांवर चतुरकाचा खून करून तूं कळस चढविला आहेस! तुझ्यासारखा कुलांगार कारटा आमच्या कुळांत उत्पन्न झाला नसता, तरी बरें झालें असतें! चल, चालता हो, आपलें तोंडसुद्धां दाखवूं नकोस!'

दृढसंधानें आपल्या भाषणास प्रारंभ केला, त्यावेळीं तो सावकाश आणि गंभीरस्वरानें बोलत होता. पण उत्तरोत्तर त्याची गंभीरता नष्ट होत जाऊन तो क्रोधानें खवळून अत्यंत जलद आणि मेघगर्जनेसारख्या कानठाऱ्या बसण्याइतकें मोठ्यानें बोलूं लागला. यावेळचा देखावा अत्यंत भयानक आणि करुणाजनक होता. आपल्या पित्याचा क्रोध पाहून शेखराचे हातपाय कांपूं लागले; त्याचें तोंड भयानें काळें ठिक्कर पडलें, त्याच्या तोंडांतून शब्द निघेनासा झाला, आणि जणुं काय एखाद्या अघोर अपराध्याप्रमाणें त्याची अवस्था झाली!

" अशा स्थितींत थोडावेळ गेल्यावर शेखरानें दोन्ही हातांनीं आपलें तोंड झांकून घेतलें, आणि शब्द अडखळत असतां तो म्हणाला,–' हा अन्याय मी कसा सहन करूं! परमेश्वरा, तूं सर्वसाक्षी आणि न्यायी असतां हा धडधडीत अन्याय कसा घडूं देतोस! हाय हाय! मला वाटतें, आपण माझें मन पाहण्यासाठीं असें बोलत असाल! खुनासारखें भयंकर कृत्य माझ्या हातून घडेल हें आपल्याला कधींहि खरें वाटणार नाहीं!'

रागानें ज्याचे नेत्र लाल झाले आहेत, आणि ओठ थरथर कांपत आहेत, असा तो दृढसंध गर्जना करीत म्हणाला,–' तरमग चतुरक कोठें आहे? बोल लवकर! त्याचें काय झालें तें सांग! कारट्या, चतुरक कोठे आहे? चतुरकाचें वर्तमान समजल्याशिवाय तो जिवंत आहे हें सिद्ध झाल्याखेरीज तुझा निभाव लागणार नाहीं! बोल लवकर! चतुरकाचें काय झालें तें!'

याप्रमाणें दृढसंधाची गर्जना चालली आहे, इतक्यांत दिवाणखान्याचा दरवाजा धाडकन उघडला आणि दोन व्यक्ति आंत आल्या. एक अतिशय उंच व धष्टपुष्ट असून दुसरी चेहऱ्यानें गोंडस आणि सडपातळ होती. या दोघांकडे सर्वांच्या दृष्टि एकदम वळल्या, आणि त्यांपैकीं एक जांघिळ आणि दुसरा चतुरक आहे, हें सर्वांच्या एकदम ध्यानीं आलें. त्या दोघांस अशा आकस्मिकरीतीनें आणि आणीबाणीच्या प्रसंगीं तेथें आलेले पाहून तेथील सर्वांस जें आश्चर्य वाटलें, तें यथार्थ वर्णन करण्यास आमची लेखणी असमर्थ आहे.

जांघिळाला आकस्मिकरीतीनें तेथें आलेला पाहून तो समंध होऊन तर तेथें आला नसेलना, असें सर्वांच्या एकदम मनांत आलें. त्यांतल्या त्यांत दुर्मुख आणि चडामणि यांची तर त्यांस पाहून गाळणच उडाली! जांघिळ अकस्मात् येथें निर्माण झाला, तो आपल्या बऱ्यासाठीं नव्हे, हें तर त्यांच्या मनास तेव्हांच वाटून चुकलें! आपण ज्यांस मृत असें समजत होतों त्यांच्या दर्शनानें आपणावर एकादें अरिष्ट ओढवणार असें मनांत येऊन त्यांचे हातपाय कां
गले, आणि ते दोघेजण
परस्परांकडे पाहूं लागले.

चतुरकाला पाहतांच
झाला, आणि त्या
विचार झटक
मनाचाही
अंतःक
त्यां
:

पुढें झाला, आणि म्हणाला,–' चतुरका, तुझें स्वागत असो ! तूं आधीं मला कडकडून भेट कसा ! '

ही धनीसेवकांची भेट चालली असतां जांघिळानें फक्त एकवार दृढसंधराजापुढें मस्तक लववून त्याला प्रणाम केला, आणि तो एकदम दुर्मुखाकडे गेला. त्याजपाशीं जातांच जांघिळानें आपल्या अवाढव्य हातांनीं त्याची मानगुटी धरून एक हिसडा मारून त्याला म्हटलें,–" अरे नीचा, विश्वासघातक्या, हरामखोरा चोरा ! आतां तुझ्या गमजा मजपुढें कशा चालतात त्या पहातों ! "

अशा रीतीनें आपण त्या राक्षसी माणसाच्या तडाक्यांत सांपडलों, हें ध्यानीं येतांच त्या नीच दुर्मुखाचें अवसान सुटलें. जांघिळाच्या नुसत्या आवेशावरून आपली लुच्चेगिरी त्याला उमगली आहे, अशी त्याच्या मनाची खात्री झाली, आणि आतां नम्रता धारण केल्याखेरीज गत्यंतर नाहीं, हें ओळखून त्यानें जांघिळाचे पाय धरिले, आणि केविलवाण्या स्वरानें त्यास म्हणाला,– ' जांघिळा, मजवर दया कर ! मी भयंकर [illegible]मी आपले सर्व अपराध [illegible] माझे प्राण वांचीव ! दया कर ! '

[illegible]कडे विशेष लक्ष्य न [illegible]पुरुष दृढसंधाकडे [illegible]आपली खंड- [illegible]आपल्या [illegible]रांगोळी [illegible]लत

करविणारा–मला पापांत ढकलणारा–माझी बुद्धि भ्रष्ट करणारा–हा येथें माझ्यासमोर बसला आहे ! ' असें म्हणून त्यानें चूडामणीकडे हात केला.

हें दृष्टीस पडतांच एकाद्या भयंकर राक्षसाप्रमाणें गर्जना करीत चूडामणि ओरडला,– " खोटें–खोटें– अगदीं खोटें ! "

त्याहून मोठ्यानें गर्जना करीत जांघिळ ओरडला, ' खरें-खरें–अगदीं खरें–हा नीच दुर्मुख सांगतो हें अगदीं खरें आहे ! '

जांघिळाचें हें ठांसून दिलेलें उत्तर ऐकून चूडामणि पाण्यासारखा पातळ झाला. आतां पारडें फिरलें, हें त्याच्या एकदम ध्यानीं आलें, आणि त्याच्या मुद्रेवर सर्व अपराध अगदीं ढळढळीत अक्षरांनीं लिहिल्याप्रमाणें दिसूं लागलें.

हा सर्व प्रकार अवलोकन करून दृढसंधाच्या मनाची खात्री झाली, आणि तो आपल्या आसनावरून बाहु पसरून शेखरापाशीं आला; आणि म्हणाला,–' सुपुत्रा, ये, मला कडकडून भेट ! मी आज तुझ्यासंबंधानें धडधडीत अन्याय करावयास सिद्ध झालों असतां ईश्वरानें मला त्यापासून परावृत्त केलें, आणि तुझें रक्षण केलें, हे त्याचे आपणावर अनंत उपकार आहेत ! '

शेखरानें झेपावून पुढें होऊन आपल्या पित्याला कडकडून मिठी मारिली ! यावेळीं त्याच्या तोंडांतून एकहि शब्द बाहेर पडला नाहीं. आनंदानें त्याचा कंठ दाटून आला होता, आणि त्याच्या नेत्रांतून आनंदाश्रूंच्या धारा वाहूं लागल्या होत्या. दृढसंधाचीही अशीच अवस्था झाली होती. एवढा मोठा वीर, पण याप्रसंगीं दृढसंधाच्या नेत्रांतून अश्रुधारा वाहत असून तो एकाद्या लहान [illegible]प्रमाणें रडत होता. हा अपूर्व देखावा हेमचंद्राची तशीच अवस्था झाली.

[illegible] वेळ पुत्राला हृदयाशीं धरल्यावर [illegible]खराला म्हणाला,–' जा, धांव; हे वर्तमान तुझ्या मातेला आणि

भावी पत्नीला लवकर समजूं दे. तिचा जीव संशयानें अगदीं गळ्याजवळ येऊन राहिला असेल; तूं तिच्या दृष्टीस पडलास, म्हणजे तुझी मुद्राच खरा प्रकार तिला निवेदन करील! जा!'

पित्यापासून दूर होतांच प्रथम शेखरानें जांघिळाचे आभार मानिले. यावेळीं जांघिळाला अवर्णनीय आनंद होत होता. नंतर तो तेथून निघाला, आणि अंतःपुरामध्यें जेथें त्याची माता आणि भावी पत्नी या दोघी संशयानें व्यग्र होऊन बसल्या होत्या, तेथें तो आला. शेखराची आनंदित मुद्रा दृष्टीस पडतांच त्या दोघींनीं त्याच्यावरील दोषांचें निरसन झालें, हें एकदम ओळखिलें, आणि प्रियंवदेनें आपली भावी सासू जवळ आहे या गोष्टिकडे लक्ष न देतां, आपल्या भावी पतीस दृढालिंगन दिलें. परंतु शेखरानें तिला हळूच दूर करून तो प्रथम आपल्या मातेच्या पायां पडला. या ठिकाणीं प्रेमाचा अतिरेक झाला, हें सांगावयास नकोच. प्रेमाचा पहिला वेग कमी झाल्यावर शेखरानें झालेलें सर्व वर्तमान आपल्या मातेला थोडक्यांत सांगितलें. प्रत्यक्ष जांघिळ आला आहे, हें ऐकून तिला फार आश्चर्य वाटलें आणि आपण ऐकलेली त्याच्या आत्मघाताची बातमी एक तर खोटी उठली असावी किंवा तशी बातमी उठविण्यांत जांघिळाचा कांहीं विशिष्ट हेतु असावा, असें तिच्या मनांत आलें. प्रियंवदेला सर्व वर्तमान माहित असल्यामुळें, तिला अगदीं आश्चर्य वाटलें नाहीं. ती हळूच शेखरास म्हणाली, –' आपण भृगुकच्छ नगरीं असतां आपणाकडे माझी चिठी आणणारा कोण, हें आपल्या लक्ष्यांत आलेंच असेल.'

इतक्यांत पंडित हेमचंद्रही तेथें आला. त्याची मुद्रा अत्यंत हर्षपूर्ण दिसत होती. तो शेखरास म्हणाला,–' मित्रा, तुजवरील संकट टळलें, हें पाहून मला जो हर्ष होत आहे, तो तुजपाशीं व्यक्त करण्यासाठीं मी मुद्दाम येथें आलों आहें. तूं परत येईपर्यंत माझ्यानें दम धरवेना! शेखरावरील अपवादांचें निरसनें झालें, हें पाहून बाईसाहेब आपणांस, आणि या ताईसाहेबांस जो आनंद झाला आहे, त्या आनंदाच्या प्रसंगीं आपलें अभिनंदन करणें हें माझें कर्तव्य आहे.'

या आनंदामुळें त्या वाड्यांतील चूडामणि आणि दुर्मुख या दोघांखेरीज इतरांस बाहेरील जगाचें जणुंकाय विस्मरणच पडलें होतें, असें म्हणावयास हरकत नाहीं. हा आनंदउमाळा संपल्यावर खरी हकीकत राणी मेधावतीच्या कानीं येणें अपरिहार्य होतें. शेखराचा दुर्लौकिक करण्यांत मुख्यत्वेंकरून चूडामणि आणि दुर्मुख यांचें अंग होतें. वास्तविक पाहिलें तर चूडामणि हाच या दुष्कृत्याचा उत्पादक असून, दुर्मुख हा फक्त त्याच्या आज्ञेप्रमाणें नाचत होता, या गोष्टी जेव्हां राणी मेधावतीला समजल्या, तेव्हां तिला अत्यंत खेद झाला. प्रियंवदेला या गोष्टी पूर्वीच माहीत असल्यामुळें, तिला त्यापासून कांहींच वाटलें नाहीं. राणी मेधावतीचें साधारण मानानें शेखराहून चूडामणीवर अधिक प्रेम होतें, पण त्याचें हें नीच वर्तन तिच्या एकदम कानीं आल्यामुळें, आपण इतके दिवस शेखरासंबंधानें अनेक प्रकारच्या शंका घेतल्या आणि त्याला आपल्या जवळून दूर केलें, याबद्दल तिला फार वाईट वाटलें, आणि तिनें तसें बोलूनही दाखविलें, शेखरानें झाल्या गोष्टी विसरून जाण्याबद्दल तिला सांगितलें, आणि तिच्या मनाचें समाधान करण्याचा यत्न केला. चूडामणीच्या हातून अशी गोष्ट होऊं नये, पण झाली तेथें इलाज नाहीं, असें शेखरानें जेव्हां तिला सांगितलें, तेव्हां तिला त्याच्या सौजन्याचें आणि औदार्याचें मोठें आश्चर्य वाटलें. शेखरानें अगदीं लहानपणापासून आपण आपल्या बंधूचे अपराध विसरल्याबद्दल आपल्या मातेची खातरजमा केली. इतकें लक्ष्मीमात्र होईपर्यंत दुःखसंधही त्या ठिकाणीं आला,

आणि त्यानें चूडामणीनें आपले सर्व अपराध प्रांजलपणें कबूल केले, व आपण त्यास दुसरी आज्ञा करीपर्यंत राजवाड्यांतील एका दिवाणखान्यांत कैदेंत ठेविलें आहे, असें वर्तमान आपल्या पत्नीस कळविलें. हें वर्तमान कानीं पडतांच शेखरानें आपल्या पित्याचे पाय धरिले, आणि चूडामणीचा न्याय करितांना त्यावर कृपा करण्याची त्यानें आपल्या वडिलांस नम्रतेनें विनंति केली.

ती पुत्राची विनंति ऐकून दृढसंधराजाला अतिशय आनंद झाला, व तो अगदीं मोकळ्या मनानें बोलला,-'शेखरा, तुझें अंतःकरण म्हणजे औदार्याचा ठेवा आहे! तुझ्यासारखें रत्न माझ्या उदरीं निर्माण झालें, याचा मला अतिशय अभिमान वाटत आहे. मी तुला रत्न म्हणतों, पण पृथ्वींतील सर्व रत्नें तुजवरून ओंवाळून टाकावीं, अशी तुझी योग्यता आहे! ये, मला पुनः एकदां आलिंगन दे! खरेंच सांगतों, तुला आपल्यापासून क्षणमात्रही दूर करूं नये, असें मला वाटतें. आजपर्यंत तुझ्या अंतःकरणाची खरी परीक्षा मला झाली नाहीं, यावरून मी आपणास मोठा चतुर म्हणवितों, ती माझी घमेंड व्यर्थ होय! शेखरा, खरोखर सांगतों, मी तुझा अन्याय केला आहे! मी अपराधी असल्यामुळें तुझ्या सुंदर मुखाकडे टक लावून पहावयास मला लज्जा वाटते!'

यावर दृढसंध आणखी कांहीं बोलला असता, पण शेखरानें मध्येंच बोलावयास प्रारंभ करून त्याचें भाषण बंद पाडलें तो म्हणाला,-'अहो तात, असें भाषण आपण करूं नये! आपल्या मुखांतील जे उद्गार आतां माझ्या कानावर आले, त्यांपासून मला अत्यंत खेद होत आहे! आपणाकडे यांत काय दोष आहे? मनुष्य आपल्या कर्माचीं फळें भोगीत असतो, असें शास्त्रें सांगतात; त्याचें सत्यत्व याच गोष्टींत ढळढळीत दिसून येत आहे! मीं पूर्वजन्मीं कोणाला पीडा दिली असेल, त्या पीडेचें फळ आज मला भोगावें लागलें! त्यांत आपल्याकडे कोणत्याही प्रकारचा दोष येत नाहीं. आपण जी गोष्ट बुद्धिपूर्वक केलेली नाहीं, तिच्याबद्दल कष्टी होण्याचें आपणांस अगदीं कारण नाहीं. यासाठीं कृपा करून आपण असे शब्द पुनः उच्चारूं नयेत, अशी माझी आपल्या चरणांपाशीं नम्र विनंति आहे.'

दृढसंधानें आपल्या नेत्रांतील अश्रु पुशिले, आणि नंतर तो प्रियंवदेला म्हणाला,-'मुली, या एकंदर प्रकरणांत तुलाही निष्कारण कष्ट सहन करावे लागले. शेखराप्रमाणें तूंही सौजन्याची खाण आहेस म्हणून म्हणतों, तूं हे कष्ट विसरून जाशीलना?'

'यावर प्रियंवदेनें हें काय सांगितलें पाहिजे?' असें नम्रतेनें उत्तर देऊन तिनें आपल्या भावी श्वश्रूश्वशुरांस कष्टी न होण्याबद्दल अत्यंत नम्रपणें विनंति केली, आणि हें आनंदाचें वर्तमान आपल्या आजाला ताबडतोब कळविण्याची सूचना केली. त्यावर एका क्षणाचाही विलंब न करतां दृढसंध राजानें एका जासुदाबरोबर तितक्या रात्रींही झालेल्या हकीकतीचा निरोप वृषपतीकडे पाठविला. झालेल्या आनंदजनक-आणि चूडामणीच्या दुष्कृत्यामुळें उद्वेगजनक प्रकारामुळें सर्वांच्या क्षुधा नष्ट झाल्या होत्या.

वृषपुरीं जासूद रवाना झाल्यावर दृढसंध राजा पुनः अंतःपुरांत परत आला, आणि म्हणाला,-अजून आपणास दुर्मुखाच्या तोंडून त्याच्या सर्व दुष्कृत्यांचा पाढा ऐकून घ्यावयाचा आहे. तसेंच जांघिळ आणि चतुरक यांची सर्व हकीकत ऐकावयाची आहे, यासाठीं आपण तिकडेच जाऊं या!'

नंतर सर्व जणें पुनः बैठकीच्या दिवाणखान्यांत गेलीं. दुर्मुखाची मानगुटी जांघिळानें अजून सोडिली नव्हती. तो आपल्यास सोडण्यासाठीं त्याचीं आर्जवें करीतच होता, आणि मध्यस्ती करून आपली मुक्तता करविण्यासाठीं तो चतुरकाच्या विनवण्या करीत होता. जांघिळाच्या आगमनाची,

शेखर दोषयुक्त झाल्याची आणि दुर्मुख व चूडामणी यांनीं कांहीं भयंकर अपराध केल्याची बातमी राजवाड्यांत सर्वतोमुखी झाली असून, कित्येक विलक्षण गोष्टी आतां ऐकावयास सांपडतील अशा आशेनें राजवाड्यांतील चाकर माणसें आपल्या हातचे उद्योगधंदे सोडून बैठकीच्या दिवाणखान्यांत जमा झालीं होतीं. जांघिळास पाहिल्याबरोबर सर्व चाकर माणसें जागच्या जागीं थबकलीं. कारण जांघिळ कदाचित् पिशाच होऊन तर येथें आला नसेल ना, अशी त्यांच्या मनांत शंका आली होती; पण जांघिळानें आपली हकिकत सांगून आपण जिवंत असल्याबद्दल त्यांच्या मनाची खात्री केली.

दृढसंध, शेखर, हेमचंद्र, मेधावती आणि प्रियंवदा हीं सर्वजणें बैठकीच्या दिवाणखान्यांत आलेली दृष्टीस पडतांच, चाकर माणसें गलबला बंद करून आदबीनें बाजूस झालीं. नंतर जांघिळानें चतुरकाला दुर्मुखावर लक्ष ठेवण्यास सांगून तो पुढें झाला, त्यानें एकदम शेखराचे पाय धरिले. आणि म्हणाला,–'राजपुत्रा, मी महदपराधी आहें! त्यावेळीं माझें दुर्दैव ओढवलें, आणि तें नीच पणाचें कृत्य माझ्या हातून कसें घडलें, हें माझें मलाच समजत नाहीं. आपण युद्धांत गुंतलां असतां, मीं ज्यांचें रक्षण करावयाचें, त्यांना पीडा केली, हा माझा अपराध अक्षम्य तर खराच! पण आपलें औदार्य मोठें आहे, म्हणून माझ्या मनाला धीर चेऊन मी आपली मनोभावानें क्षमा मागत आहे!'

त्याचा हात धरून, व त्याला वर उठवून शेखर म्हणाला,–'जांघिळा, उठ, मी तुला तुझ्या त्या अपराधाची अगदीं मनोभावानें क्षमा करतों. अजून जरी मला सर्व गोष्टी समजल्या नाहींत, तरी, कित्येक दिवस तुझे माझ्या कल्याणासाठीं मनापासून झटून प्रयत्न चालले होते, हें माझ्या लक्ष्यांत आलें. तूं जो अपराध केला होतास, त्याच्या मानानें तूं मजवर केलेले उपकार अधिक आहेत. तूं आपल्या पापाचें क्षालन करण्यास योग्य प्रायश्चित घेतलें आहेस? आतां आपण मागील सर्व गोष्टी विसरून जाऊं या!'

जांघिळ सद्गदित अंतःकरणानें बोलला – 'राजपुत्रा, हें तुझें औदार्य पाहून मला असें वाटते कीं आपला देह तुजवरून ओंवाळून टाकावा!'

नंतर सर्व मंडळीं आपआपल्या जाग्यावर बसली. अपराधी दुर्मुख मात्र खालीं मान घालून उभा राहिला होता. जांघिळानें प्रथमतः आपला सर्व हकीकत निवेदन केला. नंतर दयेसाठीं विनवण्या करीत असलेल्या दुर्मुखानें आपल्या आपराधांचा पाढा वाचला या दोघांनीं सांगितलेल्या हकीकतींतिल उणेपणा चतुष्कानें भरून काढला, आणि अशा रीतीनें या सर्व प्रकरणाचा उलगडा झाला त्या तिघांनीं जी हकीकत सांगितली. ती जशीच्या तशीच प्रत्येकानें सांगितल्या प्रमाणें वेगवेगळी येथें दिल्यास ती वाचकांचे एकदम ध्यानीं येणार नाहीं, म्हणून आम्ही तसें न करतां ज्या अनुक्रमानें गोष्ट घडून आली, त्या अनुक्रमानें येथें सांगणार आहोंत.

प्रकरण ३६ वें.

उलगडा.

प्रियंवदेला 'पिशाच–सोपान' घाटांत सोडल्यावर जांघिळ त्रिशूल पर्वतावर चढला, आणि निराशेचे विचार त्याच्या मनांत आले. आपणास देशत्याग करावा लागणार या गोष्टीचा त्याला अत्यंत खेद झाला, आणि आपल्या जन्मभूमीचा त्याग करण्याचें त्याच्या जिवावर आलें,–या गोष्टी मागें एका प्रकरणामध्यें वाचकांनीं वाचलेल्या त्यांस आठवत असतीलच. त्यानें दरीपासून दूर जाण्याचा प्रयत्न केला, पण त्याचे पाय हालेनात. दरीभोंवतीं असलेल्या

डोंगरांच्या शिखरावरून त्यानें एकदोन हेलपाटे घातले; त्यावेळीं दरीपासून दूर गेल्यास आपण फार दिवस वांचणार नाहीं, असें त्याच्या मनांत आलें. अनेक प्रकारच्या विचारांचें त्याच्या मनांत काहूर माजलें असल्यामुळें तो अगदीं दीन होऊन गेला होता. मध्येंच त्याच्या मनांत एक विलक्षण विचार आला. तो स्वतः भुतांखेतांवर विश्वास ठेवणारा असल्यामुळें तसला विचार त्याच्या मनांत येणें हें अगदीं साहजिक होतें. प्रियंवदेचा आपण जो अन्याय केला आहे, त्याचें परिमार्जन करणें हें आपलें कर्तव्य आहे, असें त्यास वाटत होतें; आणि तें करण्याचा मार्ग शोधित असतां, असा एक विलक्षण विचार त्याच्या मनांत आला कीं, आपण जर राजवाड्याभोंवतीं गुप्तपणें फिरत्या घालीत असलों, तर केव्हांतरी प्रियंवदेचेंच काय, पण सर्व राजकुलाचें रक्षण करण्याची संधि आपणास प्राप्त होईल. राजकुलावर लवकरच एकादें संकट ओढवणार, अशी त्याच्या मनाची खात्री होती. कौलाचे प्रसंगीं त्याला जो साक्षात्कार झाला होता, त्याचें स्मरण त्याला वारंवार होत होतें. एकादेवेळीं शत्रु अचानक प्रतापपुरावर स्वारी करील, आणि बेसावध असलेल्या राजकुलाचा संहार होईल, अशी त्याला भीति वाटत होती. यासाठीं आपण गुप्तपणें पहारा करीत असलों म्हणजे असा एकादा प्रसंग आल्यास प्रथम आपणांस त्याची दाद लागेल, व आपणांस राजपुरुषांना सावध करतां येईल. असा त्यानें विचार केला, आणि दरीमध्यें गुप्तपणें राहून नजर ठेवण्याचा त्यानें निश्चय ठरविला.

पण ही गोष्ट साध्य कशी व्हावी, याची त्याला पंचाईत पडली. अडचण पडली कीं, युक्ति सुचते, असा साधारण नियम असल्यामुळें त्यालाही एक युक्ति सुचली, व तो अगदीं कांकूं न करतां एकदम दरीमध्यें उतरला. आपण मेलों अशी जर लोकांची कल्पना झाली, तर आपणास आपला कार्यभाग उरकून घेतां येईल, आणि आपल्या प्रिय जन्मभूमीचा त्याग करण्याचा आपणांवर प्रसंग येणार नाहीं, अशी त्याच्या मनाची खात्री झाल्यामुळें, त्यानें आपली युक्ति सिद्धीस नेण्याचा उद्योग आरंभिला. आपण मेलों अशी एकदा लोकांची कल्पना झाली, म्हणजे आपणास रात्रीं बेरात्रीं कोणी कोठेंही पाहिलें तरी त्यापासून अडचण पडणार नाहीं. जिवंत मनुष्य भलत्याच वेळीं भलत्याच स्थळीं लोकांच्या दृष्टीस पडल्यास त्या मनुष्याच्या हेतूंबद्दल लोकांच्या मनांत शंका उत्पन्न होतात, आणि त्या गोष्टीची चर्चा होऊन त्या मनुष्याचे हेतु तडीस जात नाहींत. तशी गोष्ट जो मनुष्य मेला अशी लोकांची कल्पना झाली, त्या माणसासंबंधानें होत नाहीं. साधारणपणें लोकांचा पिशाचावर भरंवसा असतो. निदान प्रतापपुरच्या दरींतील लोकांचा पिशाचांवर पूर्ण भरंवसा होता. त्यामुळें आपला बेत बिनहरकत सिद्धीस जाईल, असें जांघिळास वाटलें, यांत नवल नाहीं. रात्र होऊन चांगला काळोख पडेपर्यंत तो दरींतील एका खचदडांत लपून राहिला, आणि चांगला काळोख पडल्यावर तो आपल्या एका जिवलग मित्राच्या झोंपड्यांत गेला. आपल्या मित्राचें मन वळविण्यास त्याला फारसे प्रयास पडले नाहींत. जांघिळाच्या सांगण्याप्रमाणें त्याच्या मित्रानें जांघिळाच्या आत्महत्येची वार्ता प्रसिद्ध केली. आत्महत्या केलेलीं माणसें पिशाच होतात, ही सामान्य कल्पना असल्यामुळें ती जांघिळाच्या अगदीं पथ्यावर पडली. त्याच्या आत्महत्येची बातमी प्रसिद्ध झाल्यावर तो सर्व दरीमध्यें बेताबातानें सर्वत्र संचार करूं लागला. दिवसाचे वेळीं दरींतील एकाद्या घळीमध्यें तो निजून राही, व तेथें त्याचा मित्र त्याला अन्न नेऊन देत असे. रात्रीचे वेळीं तो बहुधा राजवाड्याच्या

काळचे वेळीं चांगला काळोख पडल्यावर तो राजवाड्यापाशीं हिंडत असतां आंत काय चाललें आहे, हें जाणण्याची इच्छा त्याच्या मनांत प्रबल झाली. तो राजवाड्याच्या मागच्या भागांत आला. तेथून तो पाहूं लागला, तों दुसऱ्या मजल्यावरील खिडकीतून उजेड दिसत आहे, आंत कोणी बोलत आहेत, व त्यांत शेखराचें नांव वारंवार निघत आहे, असें त्यास समजून आलें. त्यामुळें तें भाषण ऐकण्याची उत्कंठा त्याच्या मनांत जागृत झाली. तो असामान्य उंच असल्यामुळें खिडक्यांचे गज व भिंतीचे झुकते कठडे यांच्या साहाय्यानें विशेष त्रास पडल्यावांचून दुसऱ्या मजल्यापर्यंत वर चढला आणि तेथील एका खिडकीच्या आश्रयानें उभा राहून तो ऐकूं लागला असतां चूडामणि शेखरावर नसतें कुभांड रचीत आहे, असें त्यास ऐकूं आलें. चूडामणी केवळ मत्सरानें शेखरावर भलभलते आरोप करीत आहे, असें जांघिळाच्या तत्काळ ध्यानीं आलें. या प्रसंगीं आंतील भाषणें जांघिळास ऐकूं येत होतीं, पण त्याला आंत कोण कोण आहेत हें दिसत नव्हतें. आंत कोण आहेत हें एकदा पाहिलेलें असावें, अशा इच्छेनें जांघिळानें खिडकींत डोकाविलें, पण तितक्यांत चूडामणीची त्याजवर नजर गेली. त्यानें आपणांस पाहिलें, हें दृष्टीस पडतांच जांघिळ घाई घाईनें खालीं उतरला, आणि चूडामणीनें हाका मारून माणसें तेथें येऊन पोंचण्यापूर्वीच तो तेथून पुष्कळ अंतरावर गेला होता. म्हणून जेव्हां चाकर माणसें चूडामणीच्या सांगण्यावरून बागेंत शोध करूं लागलीं, तेव्हां त्यांस तेथें कोणीच आढळलें नाहीं.

प्रियंवदेला पिशाच सोपानामध्यें सोडून देते वेळीं, यापुढें आपण शेखराशीं शत्रुत्व करणार नाहीं, त्याच्याशीं मित्रभाव ठेवूं, असें जांघिळानें तिला वचन दिलेलें असल्यामुळें, या प्रसंगांतून त्याच्या बचावाची कांहीं तरी युक्ति काढली पाहिजे, असें त्याचें मन त्याला सांगूं लागलें. अशी युक्ति काय करावी याचा विचार करीत तो राजवाड्याभोंवतीं घिरट्या घालीत असतां राजवाड्याच्या पिछाडीस असलेल्या बागेमध्यें शिरत असलेलीं दोन माणसें त्याच्या दृष्टीस पडलीं. अशा अवेळीं काळोखामध्यें तीं माणसें कोणत्या कामासाठीं आलीं असावीं, असा प्रश्न साहजिकपणें त्याच्या मनांत उत्पन्न झाला, पण या प्रश्नाचें योग्य उत्तर त्याला सुचेना. अर्थात् त्या माणसांच्या पाळथीवर राहून त्यांचें भाषण आडून ऐकावें, असा विचार करून तो लपत छपत सावधपणानें बागेंत आला. हीं दोन माणसें म्हणजे चूडामणि आणि दुर्मुख असे दोघेजण होत, हें त्यांच्या आवाजावरून जांघिळाच्या लक्ष्यांत आलें, आणि तो आणखी जवळ जाऊन त्यांचें भाषण लक्ष्य लावून ऐकूं लागला. त्यावेळीं चूडामणीचें पुढील भाषण त्याच्या कानीं पडलें; 'माझ्या शिफारशीवरून तुला भृगुकच्छ नगरीं जावयास मिळत आहे, हें ध्यानीं ठेव. थोड्याच वेळानें माझे वडील तुला आपल्यापाशीं बोलावून तिकडे जावयास सांगतील, आणि तूं तिकडे गेल्यावर शेखराच्या वागणुकीवर बारकाईनें लक्ष्य ठेवण्याची कामगिरी ते मोठ्या विश्वासानें तुजवर सोंपवितील. मीं तुझ्या स्वभावाची जी परीक्षा केली आहे, तिजवरून तुझ्याहून दुसरा योग्य मनुष्य माझें काम करावयास शोधून सुद्धां सांपडणार नाहीं. पहा ! मी सांगतों तें काम करशील तर तुला बक्षिसही तसेंच मिळेल ! माझा पिता वृद्ध झाला आहे, तो केव्हांना केव्हां तरी मरणारच ! त्याच्या मागें मीच या गादीवर बसणार, ही गोष्ट अगदीं ठरल्यासारखी आहे. तूं माझी ही कामगिरी जर इमानेंइतबारें करशील, तर मी गादीवर बसल्यानंतर तुला आपला मुख्य प्रधान करीन. आमच्या राज्यांतील शक्य तें सर्वांत उंच पद तुला मिळेल ! असें

झाल्यावर आणखी तुला काय पाहिजे ? माझ्या मार्गांत मोठी अडचण आहे ती त्या शेखराची ! त्या सुंदर प्रियंवदेनें माझें मन चोरून नेलें आहे. तिची प्राप्ति मला झालीच पाहिजे. ती शेखराला मोठा सदाचरणी समजत असते, त्याच्या सदाचरणामुळेंच ती त्याजवर प्रेम करीत असते. म्हणून तो दुराचरणी आहे, असा डंका वाजला पाहिजे. यासाठीं तूं त्याच्याबरोबर भृगुकच्छ नगरींत गेल्यावर त्याचा उणेपणा शोधून काढण्याचा यत्न कर. तुला त्याच्या वर्तनामध्यें दोष देण्याला कोठेंच जागा सांपडली नाहीं, तर त्याच्या वर्तनाचा हवा तसा अर्थ करून त्याची बेअब्रू करण्याचा प्रयत्न कर. काय हवे ते प्रयत्न करून शेखराची फजिती कर आणि पुनः त्याचे पाय प्रतापपुरीं न लागतील अशा प्रयत्नास लाग. तूं ज्या गोष्टी सांगशील त्या अगदीं खऱ्या वाटाव्या इतकें मी आपल्या चातुर्यानें वडिलांचें मन कलुषित करून ठेवितों. तुझ्यासारख्या हुषार माणसाला हवे तितका प्रसंग मिळतील, नाहींतर ते तुला जुळवून आणतां येतील. हे आपले प्रयत्न फसल्यास पुढें परिणाम काय होईल, याची काळजी तूं अगदीं करूं नको. तूं मोठ्या सावधपणानें आणि गुप्तपणानें प्रयत्न कर, म्हणजे झालें; मग यशप्राप्तीची शंकाच नको.'

दुर्मुखानें चूडामणीचें भाषण मान्य केलें, आणि नंतर तें पुनः बागेंतून परत वाड्यांत गेले. अशा रीतीनें शेखराविरुद्ध चाललेलें कारस्थान जांघिळाला अकस्मात् उमगलें आणि त्याला फार वाईट वाटलें. त्यांचें हें कारस्थान आपण कसें बंद पाडावें याचा त्यानें आपल्या मनाशीं पूर्ण विचार केला, पण त्याला एकादा मार्ग दिसेना. म्हणून यापुढें जसा प्रसंग येईल तसें वागावें, असें त्यानें आपल्या मनाशीं ठरविलें.

दृढसंधाच्या आज्ञेप्रमाणें शेखर चतुरकासह आणि दुर्मुखासह भृगुकच्छ नगरींत पोंचला. तेथें गेल्यावर थोड्याच दिवसांत दुर्मुखाच्या मनाप्रमाणें योग जुळून यावयास प्रारंभ झाला. तो सागरदत्ताच्या वाड्यांतून शेखराबरोबर वृषपतीच्या वाड्यांत यावयास निघाला असतां वाटेंत शेखराला दमयंतीनें गांठलें. तिच्या त्या वेळच्या वर्तनावरून ती शेखरावर फिदा झाली आहे, हें त्या लबाड दुर्मुखाच्या तत्काल ध्यानीं आलें. शेखरानें तिच्या भाषणाकडे फारसें लक्ष्य दिलें नाहीं, आणि तो एकदम तिच्यापासून दूर झाला, हें दुर्मुखानें पाहिलें; पण तो लागलाच आपल्या धन्यामागून न जातां दमयंतीच्या मागून चालूं लागला. दुर्मुखाच्या वेषावरून तो शेखराचा सेवक असावा हें तिनें तत्काल ओळखिलें, आणि त्याची गांठ घेऊन त्याच्या हातावर थोडेंसें सोनें टाकून तिनें त्याला वश करून घेतलें. शेखराच्या हालचालींवर नजर ठेवून त्यानें तिला वारंवार भेटावें आणि त्यांनीं उभयांनीं मिळून शेखराला कोठें गांठावयाचें हें ठरवावें, असें ठरवून दुर्मुख दुसऱ्या वाटेनें वृषपतीच्या वाड्यांत परत आला. त्यानें दमयंतीचें राहण्याचें ठिकाण पाहून ठेवलेंच होतें तेथें तो तिला वारंवार भेटे, आणि अशा रीतीनें तो तिचा पगारी नोकर बनल्यामुळें त्या दोघांनाही आपापले गुप्त बेत सिद्धीस नेण्यास चांगलें फावलें.

दुर्मुख अत्यंत द्रव्यलोभी होता, द्रव्यासाठीं वाटेल तें कृत्य करण्याची त्याची तयारी होती, हें वाचकांच्या ध्यानीं आलें असेल. शेखरानें खंडणीची रक्कम वसूल करून आणून ती कपाटांत ठेविली, तेव्हांपासूनच त्याच्या तोंडास पाणी सुटलें होतें आणि साधल्यास ती रक्कम हातासालीं घालावयाची, असा त्यानें आपल्या मनाशीं निश्चय करून ठेविला होता. शेखर झोंपी गेला असतां त्याच्या शयनमंदिराचा दरवाजा उघडाच असतो, हें दुर्मुखाला समजल्यावर त्यानें मध्यरात्रीचे वेळीं तेथें हळूच प्रवेश केला, आणि मोठ्या सावधपणानें

शेखराच्या उशाखालची किल्ली घेऊन कपाट उघडुन त्यानें तेथील द्रव्य लांबविलें. शेखर त्या वेळीं झोंपेच्या भरांत असल्यामुळें त्याला हें त्याचें कृत्य उमगलें नाहीं. फक्त एकदां दुर्मुखाचे पाय मोठ्यानें वाजले, त्यावरून आपल्या शयनमंदिरांत कोणी आलें असावें, असा त्याला एकक्षणभर संशय आला, पण त्यावेळीं त्यानें आपल्या मनाची खात्री करून घेतली नाहीं.

दुर्मुखाला आपले दुष्ट हेतु साध्य करून घ्यावयास दुसऱ्याच दिवशीं एक चांगली संधि मिळाली. तो चतुरकासह फिरावयास गेला असतां, गाडीवर ओढवलेल्या संकटामुळें भ्यालेल्या स्त्रियांस साह्य करीत असलेला शेखर त्याच्या दृष्टीस पडला. दुर्मुखानें शेखराला ओळखल्यापासून त्याच्या कृत्यांवर त्यानें लांबूनच नजर ठेविली होती. प्रथम चतुरकाचें त्या गोष्टीकडे लक्ष्य नव्हतें, म्हणून त्या ठिकाणापासून बऱ्याच अंतरावर गेल्यानंतर त्यानें चतुरकाला तो प्रकार दुरून दाखविला, आणि ही कांहीं तरी आपुक-मापुकांची लीला असावी, असें त्यानें त्याच्या मनांत भरवून दिलें. नंतर शेखराची आणि त्या दोघांची वेशीपाशीं गांठ पडली, त्यावेळीं जरी शेखरानें खरा प्रकार त्यांस सांगितला होता, तरी तो खोटा असावा, असें चतुरकाच्या मनांत भरवून देण्याचा दुर्मुखाचा यत्न पुढें बरेंच दिवस चालला होता. परंतु आपला धनी अशा फंदांत पडेल, ही गोष्ट चतुरकाला केव्हांही खरी वाटली नव्हती. ही गोष्ट घडून आल्यानंतर दुर्मुखानें दमयंतीची भेट घेतली, त्या वेळीं तिनें एक पत्र आणि अंगठी त्याजपाशीं दिली, आणि त्यानेंच ती त्या रात्रीं शेखराच्या शयनमंदिरांतील चवरंगावर आणून ठेविली. दुसरे दिवशीं सकाळीं शेखरानें ती अंगठी पत्रासह सागरदत्ताकडे पोंचती करावयासाठीं चतुरकासह दुर्मुखाला पाठविलें, त्यावेळीं चतुरकाच्या समजुतीसाठीं तो सागरदत्ताच्या पेढीवर गेला. तेथें गेल्यावर चतुरकाला बाहेर बसवून दुर्मुख एकटाच आंत गेला, व पेढींवर असलेल्या एका कारकुनापाशीं थोडा वेळ इकडच्या तिकडच्या गप्पा मारून तो परत चतुरकापाशीं आला. शेखराची भेट झाल्यावर सागरदत्ताची भेट घेऊन त्याजपाशीं अंगठी व पत्र दिल्याचें वर्तमान, दुर्मुखानें अगदीं अस्खलित खोटें शेखराला सांगितलें. पुढें सायंकाळीं त्यानें दमयंतीची गांठ घेतली, व पुढें काय करावयाचें याबद्दल त्यांचा विचार ठरला. कसेंही करून त्यांची माझी एकवार एकांतीं गांठ घालून दे, असें तिनें त्यास सांगितलें. त्यानें तिची इच्छा पूर्ण करावयाचें तिला वचन दिलें, पण आपला फजिती न होतां तें वचन कसें पूर्ण करावयाचें याचा त्याला मोठा विचार पडला होता.

पुढें चोरी झाली ही गोष्ट शेखराला उमगली, त्यावेळीं दुर्मुखानें कोणत्याही प्रकारें आपल्या विषयीं त्याच्या मनांत शंका उत्पन्न होऊं न देतां मोठ्या युक्तीनें त्याच्या मनांत शंभुसेनाविषयीं संशय उत्पन्न करून दिला. शंभुसेन हा एक गरीब व साळस असा वृषपतीच्या वाड्यांतील नोकर होता. दुर्मुखानें मोठ्या चातुर्यानें जी याजना केली होती, तिच्यामुळें शेखराची आणि शंभुसेनाची प्रत्यक्ष भेट केव्हांच झाली नव्हती. दुर्मुखानें शंभुसेनावर आळ घालण्यासाठीं जी खटपट चालविली होती, त्याच खटपटीमध्यें दमयंतीची आणि शेखराची गांठ घालून देण्याची छानदार युक्ति त्याला सुचली. आनंदमठासंबंधानें ऐकलेल्या दंतकथेबद्दल शेखरानें बरीच चौकशी केली होती, म्हणून हेंच स्थळ त्यांच्या भेटीला योग्य आहे, असें दुर्मुखानें आपल्यापाशीं ठरविलें. कारण दमयंतीला पाहून आपण घाबरल्याचें निमित्त करून मूर्च्छित पडल्याचा बाहाणा केल्यास, ती गोष्ट अगदीं स्वाभाविक वाटून आपल्यावर कोणत्याच प्रकारचा संशय येणार नाहीं,

असें त्याच्या मनाला वाटलें होतें. अर्थात् शंभुसेन एका माणसाबरोबर बोलत असतां आपण त्यांचें बोलणें ऐकिलें, असें जें दुर्मुखानें शेखराला सांगितलें, तें अगदीं खोटें होतें. केवळ त्याला आनंदमठाकडे नेण्यासाठीं दुर्मुखानें ही एक युक्ति योजिली होती. शेखराच्या मनांत दुर्मुखाच्या इमानासंबंधानें तिळमात्रसुद्धां शंका नसल्यामुळें तो अचानक त्याच्या जाळ्यांत गुरफटला ! दमयंतीबद्दल दुर्मुखाला तिळमात्रसुद्धां काळजी वाटत नव्हती. तो तिच्याकडून मिळतील तितके पैसे उकळीत होता, आणि चूडामणीची इच्छा पूर्ण करण्यासाठीं तिचा शक्य तितक्या उत्तम रीतीनें तो उपयोग करून घेत होता. आपल्या धन्याचा प्रियंवदेशीं विवाह ठरला आहे, ही गोष्ट जरी त्याला पक्की माहीत होती, तरी त्यानें ती दमयंतीला कळविली नव्हती. कारण ती गोष्ट आपण तिला कळविल्यास ती कदाचित् त्याचा नाद सोडून देईल, व त्यामुळें आपल्या बेतांत कमीपणा येईल, असें त्याच्या मनांत आलें होतें. म्हणून तिला इतर मार्गांनीं ती गोष्ट समजेपर्यंत आपण त्यासंबंधानें तिच्यापाशीं एक अक्षरही काढावयाचें नाहीं, असा बेत त्यानें ठरविला होता. आनंदमठांत त्या दोघांचीं गांठ घालून द्यावयाची, हा त्याचा बेत ठरून त्याप्रमाणें त्यानें व्यवस्था केली, तोंच दमयंतीच्या मुखानें, विक्रमसेन तेथें आला असून तो सागरदत्ताच्या कन्येची, भेट घेण्यासाठीं तिकडे गेला आहे, असें त्यास समजलें हें ऐकल्यापासून दुर्मुखाला आणखी एक विचार सुचला. आपण त्यांच्या प्रेमासंबंधाच्या भेटीचीं वर्दी विक्रमसेनाला दिल्यास, तो आयत्या वेळीं तेथें येईल, व त्यामुळें शेखराची चांगली फजिती उडेल, असें त्याच्या मनांत आलें, म्हणून त्यानें एक निनावी पत्र तयार करून तें मार्ग सांगितल्याप्रमाणें मोठ्या सावधपणानें विक्रमसेनाच्या हातीं पोंचतें केलें.

नंतर रात्रीं जेव्हां शेखर आणि दुर्मुख हे दोघेजण आनंदमठामध्यें गेले, त्यावेळीं हद्दींत पाऊल ठेविल्यापासून आपणास फार भीति वाटत आहे, असें दुर्मुखानें ढोंग केलें होतें आणि तो शेखराच्या अगदीं जवळून चालत होता. त्यामुळें पुढें दमयंती दृष्टीस पडतांच त्यानें मूर्च्छित पडल्याचें सोंग घेतलें, हें शेखराला अगदीं उमगलें नाहीं. त्याला ती गोष्ट अगदीं साहजिक वाटली. त्यानंतर तेथें काय झालें, हें वाचकांस माहीत असल्यामुळें पुनरुक्ति करण्याचें कारण नाहीं. दमयंती तेथें कशी आली, याबद्दल विचार करीत असतां एकदां दुर्मुखाविषयीं शेखराच्या मनांत संशय उत्पन्न झाला होता, पण त्याच्या प्रश्नांस तिनें जीं उत्तरें दिलीं, त्यावरून त्याचा तो संशय नाहींसा झाला. दुर्मुखाचा सर्व बेत तडीस गेला, पण त्याच प्रसंगीं शेखराचा विवाह प्रियंवदेशीं ठरला आहे, ही गोष्ट दमयंतीला विक्रमसेनाच्या मुखानें समजली, व आपले विशिष्ट हेतु साध्य करण्यासाठीं दुर्मुख आपल्याशीं लबाडी करीत आहे, ही गोष्ट तिच्या ध्यानीं आली.

दुर्मुखानें झालेल्या सर्व हकीकतीला आपल्या इच्छेप्रमाणें स्वरूप देऊन त्यानें शेखराला न समजतां प्रतापपुराकडे जासुदाबरोबर पत्र रवाना केलें. तें पत्र वाचून दृढसंधाच्या मनामध्यें चूडामणीनें भरवून दिलेल्या संशयांत चांगलीच भर पडली, म्हणून त्यानें शेखराला पहिलें पत्र तशा प्रकारचें लिहिलें होतें; आणि प्रियंवदेला शेखराला पत्र पाठविण्याची त्यानें मनाई केली होती.

चूडामणीचे दुष्ट बेत हाणम पाडण्यासाठीं जांघिळ आपल्या मनाशीं विचार करीतच होता, पण त्याला कांहीं युक्ति सुचेना. भृगुकच्छ नगरांतून जासूद आले, आणि ते पुनः परत गेले, हें पाहून शेखराविरुद्ध सुरू असलेलें कृष्णकारस्थान जोरांत आहे, अशी त्याच्या मनाची खात्री झाली. एके

दिवशीं राणी मेधावती आणि प्रियंवदा राजवाड्याच्या पिछाडीस असलेल्या बागेमध्यें कांहीं बोलत बसल्या आहेत, असें राजवाड्याभोंवतीं छपून फिरत्या घालीत असलेल्या जांघिळाला आढळून आलें. राणी मेधावतीच्या भाषणानें प्रियंवदेला फार दुःख होत आहे, ही गोष्ट जांघिळाच्या लक्ष्यांत आली, व त्याला फार खेद झाला. प्रियंवदेच्या नेत्रांतून गळत असलेले अश्रुबिंदु पाहून त्याचें अंतःकरण द्रवलें, आणि त्याच्याही नेत्रांतून अश्रुधारा गळूं लागल्या. आपण आतां स्वस्थ बसल्यास शेखरावर भयंकर प्रसंग गुदरेल, ही गोष्ट त्याच्या मनाला जाचूं लागली. प्रियंवदेचा आपण भयंकर अपराध केला असतांही तिनें आपणाला क्षमा केली, आपणाला आग्रह करून प्रतापपुरीं बोलाविलें, व शेखराकडूनही क्षमा करविण्याचें वचन दिलें, या गोष्टी त्याच्या डोळ्यापुढें दिसूं लागल्या, व तिच्या सौजन्याच्या स्मरणानें त्याचें मन अगदीं कळवळून गेलें. सध्या शेखरावर कोणता प्रसंग गुजरला आहे, हें समजणें त्याला आवश्यक वाटल्यामुळें त्यानें जरा धिटाईनें वागण्याचा बेत केला. त्याच रात्रीं मोठ्या सावधपणानें ज्या दिवाणखान्यांत प्रियंवदा रात्रीं निजत असे, त्या दिवाणखान्याच्या खिडकीपाशीं तो आला. खिडकी आंतून बंद असल्या. मुळें जांघिळानें ती हळूच वाजविली, पण प्रियंवदेच्या मनांत चोराचा संशय येऊन तिनें ती एकदम उघडली नाहीं. नंतर जांघिळानें शपथ घेऊन आपण मित्र असल्याबद्दल तिला सांगितलें, तेव्हां तिनें भीतभीत खिडकी उघडली. खिडकीमध्यें जांघिळाला पाहून तिला जें आश्चर्य वाटलें, त्याची कल्पना वाचकांनींच करावी. आपल्या नजरेसमोर पिशाच आहे, अशी कल्पना तिच्या मनांत येऊन तिची भयानें बोबडी वळली, यामुळें प्रथम तिच्या मुखांतून शब्द बाहेर पडला नाहीं. आपण आत्महत्येची बातमी मुद्दाम पिकविली होती, असें जांघिळानें थोडक्यांत तिला सांगितलें, त्यामुळें तिची भीति नष्ट झाली. नंतर त्यानें चूडामणीचीं शेखराविरुद्ध कांहीं तरी कारस्थानें सुरू आहेत, ही गोष्ट तिला सांगितली, व आपण भृगुकच्छ नगरींत जाऊन शेखराला कांहीं मदत होईल तर करावी असें योजिलें आहे, असें तो तिला म्हणाला. तिनें आपणांस माहीत असलेल्या सर्व गोष्टी जांघिळास सांगितल्या होत्या. दुर्मुखाचें पत्र दृढसंधानें राणी मेधावती व प्रियंवदा या दोघींसही वाचून दाखविलें असल्यामुळें दमयंतीसंबंधाचें शेखराचें वर्तन आणि त्यानें खंडणीच्या पैक्याचा केलेला दुरुपयोग, या गोष्टी तिला समजल्या होत्या, पण हें पत्र दुर्मुखानें लिहिलें होतें, हें तिला समजलें नव्हतें. हें पत्र दुर्मुखानें लिहिलें हें जांघिळानें तेव्हांच ताडिलें, पण त्या वेळीं त्याला तिच्याबरोबर बोलत बसण्यास वेळ नसल्यामुळें त्यानें ती गोष्ट तिला सांगितली नाहीं. त्यानें तिला शेखराला एक पत्र लिहावयास सांगितलें. तिनें भराभर पांचचार ओळी लिहून तो कागद त्याजपाशीं दिला व त्याने भृगुकच्छ नगरीं जातांच प्रथम तो कागद शेखराच्या हातीं देण्याचें तिला वचन दिलें. तिनें त्याला खर्चासाठीं कांहीं द्रव्य दिलें, तें घेऊन तो खिडकींतून खालीं उतरला, व काळोखामध्यें दिसेनासा झाला.

प्रतापपुरांतून बाहेर पडल्यावर जांघिळानें एक घोडा पैदा केला, व रात्रीचा दिवस करून तो मोठ्या त्वरेनें भृगुकच्छ नगरींत जाऊन दाखल झाला. तेथें गेल्यावर एका गरीब शेतकऱ्याकडे त्यानें आपलें बिऱ्हाड ठेविलें, आणि तो वृषपतीच्या वाड्याभोंवतीं हिंडून शेखराच्या आणि दुर्मुखाच्या वर्तनावर बारकाईनें नजर ठेवूं लागला. अशा स्थितींत एक दोन दिवस गेल्यावर एके दिवशीं सायंकाळीं काळोख पडूं लागल्यावर चतुरक वाड्याच्या अंगणांत उगीच हिंडत आहे, असें

त्यास आढळलें. चतुरक फिरतां फिरतां रस्त्यापाशीं आला, हें पाहून जांघिळानें मोठ्या सावधपणानें हळूहळु आपण कोण हें त्याला कळविलें. जांघिळ अजून जिवंत आहे, हें पाहुन चतुरकाला फार आश्चर्य वाटलें, व आनंदही झाला. जांघिळाला ज्या गोष्टींची चतुरकापाशीं चौकशी करावयाची होती, त्या गोष्टी रस्त्यांत बोलणें त्या दोघांसही प्रशस्त न वाटल्यामुळें, चतुरकानें बरीच रात्र झाल्यावर त्याला मागल्या वाटेनें वाडयांत घेतलें. चतुरक इमानी आहे, अशी जांघिळाच्या मनाची खात्री असल्यामुळें त्यानें सर्व गोष्टी त्यास सांगितल्या. चूडामणि आणि दुर्मुख आपल्या धन्याला खाड्यांत लोटण्याचा प्रयत्न करीत आहेत, हें ऐकून त्याला फार दुःख झालें, आणि तो जांघिळाला मनोभावानें साह्य करण्यास सिद्ध झाला. प्रथमतः सर्व गोष्टी शेखराला सांगून त्याला सावध करावें असें त्या दोघांच्याही मनांत आलें, पण शेखराचा स्वभाव त्यांना माहीत असल्यामुळें तो असल्या गोष्टींवर एकदम विश्वास ठेवावयाचा नाहीं, असें त्यांस वाटल्यावरून चूडामणि व दुर्मुख यांची फाजिती करण्याचें योग्य साधन मिळाल्याखेरीज यासंबंधानें त्याला कांहीच कळवूं नये, असा त्यांनीं निश्चय ठरविला. झालेल्या सर्व गोष्टींचा विचार करितां खंडणीची रक्कम दुर्मुखाखेरीज दुसऱ्या कोणी चोरली नाहीं, अशी त्याच्या मनाची खात्री झाली, आणि तो त्याचा अपराध त्याच्या पदरीं घालण्याचीं साधनें शोधावयाचीं असा त्यांनीं बेत केला. जांघिळानें प्रियंवदेची चिट्ठी देण्यासाठीं चतुरकापाशीं दिली व आणखी बेत करण्यासाठीं जांघिळानें चतुरकाला दक्षिण-वेशीजवळच्या धर्मशाळेंत बोलाविलें.

दमयंती व विक्रमसेन यांचींही शेखराविरुद्ध कांहीं कारस्थानें सुरू असावीं असा जांघिळाला संशय आलेला असल्यामुळें त्यानें विक्रमसेनाच्या हालचालीवर लक्ष ठेविलें होतें. त्यामुळें शेखराला पुनः बलात्कारानें आनंदमठामध्यें नेऊन तेथें त्याजकडुन संमतिलेख लिहून घ्यावयाचा हा विक्रमसेनाचा हरदत्ताशीं ठरलेला बेत त्याला समजला. आपल्या कामास उपयोगी पडणारे लोक सदरहू धर्मशाळेंत मिळतील असें हरदत्तानें विक्रमसेनाला सांगितलें होतें, म्हणन जांघिळ त्या दोघांनीं ठरविलेल्या वेळापूर्वी त्या धर्मशाळेंत जाऊन पडून राहिला होता. त्या धर्मशाळेंत जें काय वर्तमान घडून आलें, तें आम्हीं पूर्वी सांगितलें आहेच. या प्रसंगीं नारायणपुरकर व प्रतापपुरकर यांमध्यें असलेलें वैर विसरून जांघिळानें विक्रमसेनाचा विश्वास संपादन केला व त्यानें दिलेलें द्रव्य घेऊन तो त्यानें सांगितलेली कामगिरी करावयास तयार झाला. अशा रीतीनें जांघिळाला त्यांचा सर्व बेत अथपासून इतिपर्यंत समजला, आणि तो बेत फसाविण्यासाठीं तो आपल्या मनाशीं विचार करूं लागला.

ठरल्याप्रमाणें चतुरक त्या धर्मशाळेमध्यें येऊन जांघिळाला भेटला. तेथें या नवीन उद्भवलेल्या संकटासंबंधानें त्यांचे विचार चालू झाले. त्या दोघांनीं याप्रसंगीं एकमेकाशीं मन मोकळें करून वादविवाद केला. एकानें एक युक्ति काढावी, दुसऱ्यानें तीवर शंका घ्याव्या, असें बराच वेळ चाललें होतें. आपल्या शब्दांवांचून शेखराची खात्री करण्याचें त्यांजपाशीं साधन नसल्यामुळें आपल्या भाषणावर त्याचा विश्वास बसेलच, असें त्यांस वाटेना, म्हणून त्यांनीं ती गोष्ट शेखराला कळवावयाची नाहीं असें ठरविलें. याच कारणामुळें सरकारांत ही गोष्ट कळविण्याचेंही त्यांना धैर्य होईना. त्यांनीं बराचवेळ भवति न भवति केल्यावर एक विलक्षण युक्ति जांघिळाच्या मनांत आली. ज्या अर्थी शेखराला आनंदमठामध्यें नेण्याचा त्याच्या शत्रूंचा विचार होता, त्या अर्थी आनंदमठासंबंधानें प्रचलित असलेला

दंतकथेचा या कामीं उपयोग करून घ्यावा, असें जांघिळाच्या मनांत आलें. वास्तविक पाहिलें तर जांघिळाचा भुतांखेतांवर जबरदस्त विश्वास असल्यामुळें आपण भुतांच्या कृत्याची नक्कल करावी अथवा भुतांचीं आपण चेष्टा करावी, ही गोष्ट त्याला पसंत नसावी. पण आपण ही गोष्ट राजीखुषीनें किंवा मजेखातर करीत नसून, केवळ नाइलाजानें दुसऱ्याच्या कल्याणासाठीं आपणास ती करावयाची असल्या कारणानें त्या गोष्टीनें आपण ज्यांची नक्कल करणार त्यांस राग येणार नाहीं, असें मनांत आणून अगदीं नाइलाजानें जांघिळ ती गोष्ट करावयास सिद्ध झाला. त्याला स्वतःला भुतांखेतांची भीति अगदीं वाटत नव्हती. चतुरकाला शेखराच्या सहवासानें भुतांच्या अस्तित्वाबद्दल पुष्कळ वेळां वादविवाद ऐकावयास मिळाले असल्यामुळें त्याचा भुतांवर मुळींच विश्वास नव्हता; म्हणून चतुरक जांघिळाला बोलला, ' या प्रसंगीं थोडक्यांत साध्य होण्यासारखा हा एकच मार्ग आपल्या पुढें आहे आपण जर या मार्गाचा अवलंब केला नाहीं, तर आपण दुसरें तिसरें कांहीं न करतां, या सर्व गोष्टी शेखरांच्या कानावर घातल्या पाहिजेत. पण असल्या गोष्टी त्यांना एकदम खऱ्या वाटतील असें मला वाटत नाहीं ! शिवाय या गोष्टी त्यांना सांगितल्यास ओघाओघानें दुर्मुखाच्या लघाडीबद्दलही आपणांस त्यांजपाशीं कांहीं गोष्टी सांगणें भाग पडेल. तसें केल्यास शत्रु सावध होतील, आणि त्यांचे बेत अधिक गुप्त होऊं लागतील. एकदा का दुर्मुख सावध झाला, तर त्यानें केलेल्या चोरीचा पत्ता काढणें अशक्य होईल, आणि आपली सर्व खटपट व्यर्थ जाईल ! '

थोड्यांत सांगावयाचें म्हणजे इतकेंच कीं, त्या दोघांनीं ती युक्ति करावयाचा ठराव केला, व रात्रीं योग्यवेळीं चतुरकानें जांघिळाला भेटावें असें ठरलें. जांघिळानें चतुरक गेल्यावर बाजारांत जाऊन भुतांचीं सोंगें घेण्यासाठीं अवश्य ते पदार्थ खरेदी केले. प्रहररात्र उलटून गेल्यावर चतुरक वृषपतीच्या वाड्यांतून बाहेर पडला, तो दक्षिणदेशीपाशीं येऊन पोंचला. इतक्यांत निनांवी पत्राप्रमाणें शेखरही त्या ठिकाणीं येऊन दाखल झाला. चतुरक थेट धर्मशाळेमध्यें गेला, तेथें जांघिळ त्याला भेटला. त्याला त्यानें अवश्य पदार्थ आणलेस काय ? असा प्रश्न केला. जांघिळानें होय म्हटल्यावर ते दोघे धर्मशाळेच्या पिच्छाडीच्या रस्त्यानें बाहेर पडले, हें सर्व शेखरानें पाहिलें, वगैरे गोष्टी आम्ही पूर्वी सांगितलेल्या वाचकांस माहीत आहेतच. धर्मशाळेंतून बाहेर पडल्यावर ते दोघे मोठ्या त्वरेनें आनंदमठाकडे गेले. त्यांच्या पूर्वीच विक्रमसेन, दमयंती आणि एक कायस्थ अशीं तिघें मठांत आलीं होतीं. त्यांच्या दृष्टीस न पडतां ते दोघे जण हळूच पडक्या विहिरींत उतरले. तेथें त्यांनीं पोषाक करून ते योग्य प्रसंगाची वाट पाहूं लागले. लवकरच घोड्यांच्या टापांचा शब्द त्यांच्या कानीं पडला, आणि शेखरानें मठापाशीं येतांच शपथेंतून मोकळा झाल्याचे जे उद्गार काढले, ते स्पष्टपणें जरी त्यांना ऐकूं आले नाहींत, तरी त्या शब्दावरून शत्रूंच्या जाळांत शेखर सांपडला आहे, असें त्यांस कळून आलें.

पुढें काय झालें, तें वाचकांस माहीतच आहे. त्या दोघांनीं भुतांच्या सोंगाची योग्य बतावणी केली, आणि त्यांचा इष्ट हेतु तडीसही गेला. वास्तविक पाहिलें तर दंतकथेंत सांगितल्याप्रमाणें जांघिळाच्या अंगावर त्यावेळीं चिलखत असलें पाहिजे होतें. पण आयत्या वेळीं त्यांचा हा बेत ठरल्याप्रमाणें त्याला चिलखत पैदा करतां आलें नाहीं, आणि जरी यदाकदाचित् एकादें त्याला मिळालें असतें, तरी तें त्याच्या अवाढव्य उंचीमुळें त्याच्या अंगास पुरलें असतें कीं नाहीं, याचा संशयच होता. तथापि या गोष्टीकडे कोणाचें लक्ष गेलें

नाहीं. शेखराच्या शत्रूंची भयानें दाणादाण उडाली. ज्याला जिकडे वाट सांपडली तिकडे तो पळत सुटला. अशा रीतीनें शेखराचीही संकटांतून मुक्तता झाली. तो घोडयावर बसून त्वरेनें निघून गेला, हें पाहून त्या दोघांस आनंद झाला. ते दोघे आनंदानें आरोळ्या मारीत मठाभोंवती फिरले व शत्रुपक्षांतील सर्व लोक पळून गेले अशी त्यांची खात्री झाल्यावर त्यांनीं शेजारच्या झाडींत जाऊन भुतांचे पोषाक टाकून दिले, आणि ते परत शहरांत आले.

दुसरे दिवशीं प्रातःकाळीं शेखर व चतुरक यांची गांठ पडली असतां जो प्रकार घडून आला, तो आम्हीं मागें लिहिलाच आहे. आपणावर प्रत्यक्ष शेखरानें नजर ठेविली होती, ही गोष्ट जेव्हां चतुरकाला अवचित समजली, तेव्हां त्याला मोठें आश्चर्य वाटून त्याच्या मनाचा गोंधळ उडाला, हें अगदीं साहजिक झालें. पण त्यामुळें शेखराच्या मनांत संशय उत्पन्न झाला. त्या प्रसगीं शेखर व दुर्मुख यांनीं त्याला जे प्रश्न विचारले, त्याचीं उत्तरें त्यांनीं दिलीं नाहींत, कारण, आपण खरें बोलल्यास दुर्मुख सावध होईल, व आपणांस त्याच्या लचाड्या त्याच्या पदरीं बांधतां येणार नाहींत, अशी त्याला भीति वाटत होती. आपल्या उत्तरांनीं शेखराचें समाधान होणार नाहीं, तो आपल्याला दोषी समजेल, त्याचा आपणावर इतराजी होईल, या सर्व गोष्टी जरी चतुरकाला स्पष्ट दिसत होत्या, तरी त्यानें आपल्या धन्याच्या कल्याणाकडे लक्ष्य देऊन त्या वेळीं मोठ्या धैर्यानें वर्तणूक केली. त्यानें तिनक्यांत विचार करून दोन घटकांची मुदत मागून घेतली. असें करण्यांत जांघिळाला भेटून त्याचें मत घेण्याची चतुरकाची इच्छा होती. जांघिळाची भेट होऊन त्याला सर्व गोष्टी सांगून झाल्यावर चतुरकानें पुनः वृषपतीच्या वाड्यांत परत न जातां, त्या दोघांनीं लपून त्याच शहरीं राहून दुर्मुखावर नजर ठेवण्याचें काम आपण करावें, असें ठरविलें.

त्या दोघांना जी मुख्य गोष्ट साध्य करावयाची होती, ती ही कीं, दुर्मुखानें चोरलेली खंडणीची रक्कम त्यानें कोठें ठेविली आहे, याचा तपास लावावयाचा. चोरी त्यानेंच केली, याबद्दलचा त्या दोघांच्या मनांत तिळमात्रही शंका नव्हती. या कामासाठीं दुर्मुखाच्या एकंदर हालचालींवर पूर्ण नजर ठेवणें त्यांस भाग होतें. चतुरकाला वृषपतीच्या वाड्याजवळ भटकतांना कोणीं पाहिलें असतें, तर ती गोष्ट शेखराच्या आणि दुर्मुखाच्या कानावर जाऊन त्याचा भलताच परिणाम झाला असता. चतुरकाला अजून मिसरूडसुद्धां फुटलेलीं नसल्यामुळें त्यानें स्त्रीवेष धारण केल्यास तो त्याला उत्तम शोभण्यासारखा होता, इतकेंच नव्हे, तर त्याला त्या रूपांतरामध्यें कोणीं ओळखिलें नसतें. पूर्वी त्यानें रेणुकेचा वेष घेतला होता, त्यावेळीं जांघिळानें त्याच्या रूपाची तारीफ केली होती, व त्यानेंच सध्या ही युक्ति चतुरकाला सांगितली होती. चतुरकानें स्त्रीवेष घेऊन वृषपतीच्या वाड्याजवळील एक सोयवार घर थोड्या दिवसांच्या मुदतीनें भाड्यानें घेतलें. घर घेतानाच त्या घराच्या एका खिडकींतून वृषपतीच्या वाड्यांतील पुष्कळ भागावर नजर पोंचते, हें त्यांनीं पाहून ठेविलें होतें. दुर्मुख व शेखर यांखेरीज जांघिळ कोणाच्या ओळखीचा नसल्यामुळें, तो मोठ्या धूर्तपणानें ज्या भागावर चतुरकाची नजर पोंचत नव्हती त्या भागावर पहारा करीत असे. अशारीतीनें दोनतीन दिवस गेले, पण त्यांना कांहींच दाद लागली नाहीं. चवथे दिवशीं एक सांडणीस्वार वृषपतीच्या वाड्यांत गेला, हें चतुरकानें पाहिलें, व तो प्रतापपुराहून आला असावा, असें अनुमान बांधिलें. सांडणीस्वार वाड्यांत आल्यावर थोड्याच वेळानें दुर्मुख त्या वाड्यांतून बाहेर पडला.

त्याबरोबर चतुरकानें जांघिळास खुण करून आपल्यापाशीं बोलावून तें वर्तमान त्यास सांगितलें. एका क्षणाचाही विलंब न करतां जांघिळानें दुर्मुखाचा पाठलाग केला. वृषप-तीच्या वाड्यांतून बाहेर पडल्यावर दुर्मुख एका सावकारच्या पेढीवर गेला व अगदीं थोडावेळ तेथें राहून तो पुनः पेढीवरून बाहेर पडला, हें जांघिळानें पाहिलें. दुर्मुख झपाट्यानें वृषपतीच्या वाड्यांत परत आला, त्यावेळीं शेखर व दुर्मुख या उभयतांचे घोडे जिनें चढवून तयार असलेले जांघिळाच्या नजरेस पडले. त्या घोड्याभोंवतीं वाड्यांतील चाकरमाणसें गोळा झालीं होतीं, आणि शेखर व दुर्मुख हे दोघे सर्वांचा निरोप घेत होते. अर्थात् ते दोघे प्रतापपुरीं जावयास सिद्ध झाले होते, ही गोष्ट जांघिळाच्या तात्काळ ध्यानीं आली.

शेखर व दुर्मुख भृगुकच्छ नगर सोडून चालते झाले, हें पाहिल्याबरोबर चतुरक व जांघिळ हे दोघेजण त्या सावकाराकडे गेले, व त्यांनीं प्रतापपुराच्या दुर्मुख या नांवाच्या गृहस्थाचा त्याच्याशीं देवघेवीचा व्यवहार आहे कीं काय, याची त्यांनीं त्या सावका-रापाशीं चौकशी केली. सावकार प्रामाणिक होता. त्यानें अगदीं आढेवेढे न घेतां दुर्मु-खानें अमुक रक्कम आपणापाशीं ठेविली आहे, असें त्यांस सांगितलें; व चतु-रकानेंही ती रक्कम दुर्मुखानें कोणत्या मार्गानें संपादन केली आहे, हें त्या सावकारास सांगितलें. त्यावर सावकारानें त्यांस सांगितलें कीं, 'मध्येंच कांहीं भानगडींचें काम उत्पन्न झाल्यामुळें आपणास प्रतापपुरीं जावयाचें आहे, व आपण आणखी आठपंधरा दिव-सांनीं येथें परत येऊन ही रक्कम घेऊन जाऊं, असें आतांच दुर्मुखानें आपणास सांगितलें.' चोरीस गेलेली रक्कम व ती पेढीवर आणून ठेवल्याची मिति यांचा तंतोतंत मेळ पडलेला पाहून दुर्मुखानें चोरी केली, याबद्दल त्या दोघांच्या मनांत कांडीमात्र संशय उरला नाहीं. म्हणून दृढसंध महाराजांकडून सदर रकमेची व्यवस्था काय करावयाची या संबंधानें लिहून येई-पर्यंत ती रक्कम कोणासही देऊं नये, असें त्यांनीं त्या सावकारास सांगितलें, व त्यानेंही ती गोष्ट कबूल केली.

नंतर चतुरक वृषपतीच्या वाड्यांत आला. कारण त्याचा घोडा तेथें होता. चतुरकाला पहातांच त्या वाड्यांत मोठी चळवळ उडाली, आणि तेथील सर्व सेवक त्याच्या भोंवतीं जमले. चतुरक चोरी करून पळाला, असा दुर्मुखानें त्या वाड्यांत बोभाटा केला असल्यामुळें त्याला सरकारांत गुजरावें असें तेथील सर्व चाकरमाणसांच्या मनांत आलें. परंतु चतुरकानें खरा चोर कोण, हें त्यांस सांगून त्यांच्या मनाची खात्री पटवून दिली. नंतर तो आपला घोडा घेऊन जांघिळापाशीं आला. जांघिळानें चतुरकासह एकदम प्रतापपुरचा मार्ग धरिला. त्यांनीं प्रवासा-मध्यें शेखर व दुर्मुख कोठें उतरतात, काय करतात, या गोष्टींवर नजर ठेविली होती. वाटेमध्यें शेखर आणि दुर्मुख जेथें मुकाम करीत, तेथेंच कोठें तरी जवळपास चतुरक आणि जांघिळ हे मुकाम करीत असत. अशा रीतीनें प्रवास करून ते दोघे ज्या दिवशीं शेखर प्रतापपुरीं येऊन दाखल झाला, त्याच दिवशीं तेथें येऊन पोंचले.

जांघिळ, चतुरक व दुर्मुख यांनीं आपल्या हकीकती सांगितल्या, त्यांवरून शेखराची मानहानि करण्यासाठीं केवढें कारस्थान उप-स्थित झालेलें होतें, ही गोष्ट दृढसंधास कळून आली. सर्व गोष्टींचा उलगडा झाल्या-नंतर शेखराला त्याच्या माता-पितरांनीं आनं-दानें पोटाशीं धरिलें, हें मुद्दाम सांगण्याचें कारणच नाहीं. आपल्या भावी पतीवरील संकटांचें निरसन होणार, अशी जरी प्रिय-वदेच्या मनाची खात्री होती, तरी मुद्दां तिला सर्व हकीकती ऐकून अतिशय आश्चर्य वाटलें, व आनंदही झाला. हेमचंद्रानें

अगदीं मोकळ्या मनानें आपला आनंद प्रदर्शित केला. जांघिळानें पूर्वी जो घोर अपराध केला होता, त्याचें प्रायश्चित्त घेण्यासाठींच जणुं काय शेखराला साह्य करून त्यानें त्याचें रक्षण केलें होतें, म्हणून दृढसंध व राणी मेधावती यांनीं त्याला पूर्वीच्या अपराधाची मनापासून क्षमा केली. इतकेंच नव्हे, तर त्याला मोठें बक्षिसही दिलें. त्याचप्रमाणें चतुरकाला आपला धनी दोषमुक्त झाला, हें पाहून जो आनंद झाला, त्यापुढें त्याला दृढसंधानें दिलेल्या शाबासक्या व बक्षिसें अगदीं तुच्छ वाटत होतीं.

या प्रसंगीं शेखरानें जें वर्तन केलें, त्यावरून त्याच्या औदार्याची खरी परीक्षा झाली, असें म्हणावयास हरकत नाहीं. चूडामणीनें जें हें दुष्कृत्य केलें होतें, त्याबद्दल त्याला शिक्षा काय करावी, असा प्रश्न जेव्हां उपस्थित झाला, तेव्हां शेखरानें आपल्या वडिलांचे पाय धरून, त्यांच्या विनवण्या करून, आपल्या गोड भाषेनें त्यांचें मन वळवून त्याला सर्व अपराध क्षमा करावे, असा आग्रह धरिला. सर्व लोकांसमक्ष त्याचें कारस्थान उघडकीस आलें, एवढीच शिक्षा त्याला पुरे, याहून अधिक शिक्षा करण्याचें कारण नाहीं, असें शेखरानें वारंवार आपल्या माता-पितरांस सांगितलें. तसेंच दुर्मुखाच्या अपराधाबद्दल दृढसंध राजा त्याला देहांत शिक्षा देण्यास प्रवृत्त झाला असतां, शेखरानें मध्यें पडून त्याचे प्राण वांचविले; तथापि दृढसंधानें दुर्मुखाला गाढवावर बसवून त्याची प्रतापपुरांतून धिंड काढून त्याला हद्दपार केलेंच.

शेखराचें हें औदार्याचें वर्तन पाहून दृढसंधाला अतिशय आनंद झाला असतां पुढील उद्गार त्याच्या मुखांतून बाहेर पडले. "शेखरा! तूं खरोखरच आमच्या कुळामध्यें कुलदीपक निर्माण झाला आहेस, यांत शंका नाहीं. तुझी खरी योग्यता न जाणतां आम्ही तुझा अनेक प्रकारें छळ केला, तुझ्याशीं आम्हीं अन्यायानें वागलों, ही गोष्ट माझ्या मनाला फार फार पीडा देत आहे. असें असतां अजूनही मीं अवश्य त्या गोष्टी केल्या नाहींत, तर ईश्वराच्या घरीं दोषी ठरेन! चूडामणीनें तुझा मानभंग करण्यासाठीं ज्या कल्पना माझ्या मनांत भरचून दिल्या होत्या, त्याच कल्पनांचा प्रयोग मी यापुढें त्याच्यावरच करणार आहें. त्यानें शिकविल्याप्रमाणें मी त्यालाच आतां कांहीं दिवस प्रतापपुरांतून बाहेर ठेवणार आहें. त्यानें एकदम भृगुकच्छ नगरीं जाऊन तेथें एकान्तवासामध्यें दिवस काढावे, व आपल्या अपराधांची शिक्षा भोगावी. तेथें गेल्यावर त्याला रहावयास राजवाडा मिळावयाचा नाहीं! त्यानें एकादें लहानसें घर भाड्यानें घ्यावें, आणि गरीबीनें दिवस काढावे. त्याचें आचरण सुधारलें आहे असें आमच्या निदर्शनास येईपर्यंत त्यानें तेथें राहिलें पाहिजे. दुर्मुखानें या दुष्ट कृत्यास साह्य केलें, याबद्दल त्याला खरोखर देहान्तशिक्षाच पाहिजे होती; पण शेखराच्या सूचनेकडे लक्ष्य देऊन मीं त्याला जीवदान देतों. येथून धिंड काढून त्याला हद्दपार केल्यानंतर त्यानें पुनः केव्हांही आमच्या राज्यांत पाऊल ठेवूं नये. तो जर या राज्यांत कोठेंही कोणाला आढळला, तर त्याला वाटेल त्यानें आमच्या आज्ञेची अपेक्षा न धरतां त्याचा बेलाशक प्राण घ्यावा," असें सांगून दुर्मुखाला उजाडेपर्यंत बंदोबस्तानें बंदिखान्यांत ठेवण्याची आज्ञा केली.

दुर्मुखाला आपली अशी अप्रतिष्ठा झालेली पाहून मेल्यापेक्षां मेल्यासारखें झालें. त्याला आपलें तोंड दाखविण्याची लाज वाटूं लागली! तो खालीं मान घालून मुकाट्यानें तेथून राजसेवकांबरोबर बाहेर पडला. नंतर दृढसंध हेमचंद्राला म्हणाला,–'पंडितजी, मी त्या नीच चूडामणीला जी शिक्षा दिली आहे, ती त्याला कळविण्याचें काम मी तुमच्याकडे सोंपवितों. हें काम करण्या-

सारखा दुसरा कोणी जर या प्रसंगीं येथें असता, तर मीं ही कामगिरी त्याच्याकडे सोंपविली असती. एका अर्थी तुमच्या-सारखा विद्वान पुरुष येथें आहे, हें मी मोठें भाग्यच समजतों. मीं त्याला जी शिक्षा दिली आहे, ती त्याला निवेदन करतांना त्याला उपदेशाच्या दोन गोष्टी सांगण्याची आवश्यकता आहे; आपण त्याला योग्य उपदेश करा! उद्यां उजाडण्यापूर्वी फक्त एक नोकर बरोबर घेऊन त्यानें एकदम भृगुकच्छ नगराचा मार्ग धरिला पाहिजे. तो तेथें जाऊन पोंचला म्हणजे मी हुंडीने त्याला अवश्य तितकी रक्कम पोंचती करीन!'

दृढसंध राजाची ही आज्ञा चूडामणीला कळविण्याचें हेमचंद्राच्या अगदीं जिवावर आलें होतें, पण नाइलाजानें त्याला ती गोष्ट करावी लागली. त्यानें ती शिक्षा चूडा-मणीला कळवितांना अगदीं सौम्य शब्दांचा उपयोग केला, व त्याला उपदेशाच्या दोन गोष्टीही सांगितल्या. या प्रसंगीं आपण वडिलांचा आज्ञाभंग केल्यास ते आपला गादीवरील वारसा नष्ट करितील, आणि शेखराला राज्यपद देतील, अशी भीति चूडा-मणीच्या अंतःकरणांत उत्पन्न होऊन त्यानें निमूटपणें वडिलांच्या आज्ञेप्रमाणें वागण्याचा विचार ठरविला. नंतर हेमचंद्रानें पुनः दृढ-संधाची गांठ घेऊन आज्ञेप्रमाणें वागावयास चूडामणि तयार आहे, असें त्यास कळविलें. चूडामणीच्या दुष्कृत्याबद्दल दृढसंधाच्या मनाची खात्री झालेली असल्यामुळें आपला पुत्र आपणांस सोडून दूर जाणार या गोष्टीचें त्याला मुळींच वाईट वाटलें नाहीं.

दुसरे दिवशीं प्रातःकाळीं चूडामणी प्रवा-साची तयारी करून भृगुकच्छ नगरीं जाव-यास सिद्ध झाला. त्यावेळीं दृढसंधानें त्याला आपलें वर्तन सुधारण्याचा थोडक्यांत उपदेश केला, आणि त्या शहरीं पोंचल्यानंतर अगदीं विलंब न करतां दुर्मुखानें चोरलेली खंडणीची रक्कम आपल्या हातीं घेण्याची दृढसंधानें चूडामणीस आज्ञा केली. तथापि ह्या गोष्टी त्या मानी राजानें स्वतां न करितां आपल्या पुरोहिताकडून करविल्या होत्या. राणी मेधावती सुद्धां त्या प्रसंगीं आपल्या पुत्राचा निरोप घ्यावयास पुढें झाली नाहीं. फक्त शेखरानें मात्र आपल्या बंधूचे सर्व अपराध विसरून त्याची मोकळ्या मनानें भेट घेतली, आणि गोड शब्दांनीं त्याच्या मनाचें सांत्वन करून त्याला त्याचे सर्व अपराध क्षमा केले. या प्रसंगीं त्या दुष्ट चूडामणीनें मोठा ढोंगी-पणाचा आव घातला, आणि मोठा गहिवर काढून आपलें सर्व अपराध विसरून जाण्या-बद्दल आपल्या बंधूची त्यानें पराकाष्ठेची विनवणी करण्याचा धोशा लाविला. वास्तविक पाहिलें तर त्या प्रसंगीं त्याच्या सर्वांगाचा भडका उडाला होता, आणि त्याच्या मनामध्यें पूर्वीहून सहस्रपटीनें अधिक बंधुद्वेष बाण-लेला होता; पण या वेळीं त्यानें इतक्या मोकळ्या मनानें आपल्या बंधूची भेट घेतली कीं, तो प्रकार पहात असलेल्या नोकर चाकरांस परमावधीचें आश्चर्य वाटलें, आणि चूडामणीला कृतकर्माचा पश्चात्ताप झाला आहे, असें त्या सर्वांच्या मनांत आल्या-वांचून राहिलें नाहीं. सध्या आपले ग्रह प्रति-कूल असून शेखराचे ग्रह अनुकूळ आहेत, आणि कांहीं दिवसांपूर्वी शेखरानें जीं शौर्याचीं आणि साहसाचीं कृत्यें केलीं होतीं, तीं सर्वांच्या डोळ्यांपुढें असल्यामुळें शेखर सर्वां-चा आवडता झाला आहे, अशा वेळीं जर आपण त्याच्याशीं तेढ धरिली, तर आपला हट्ट चालावयाचा नाहीं, हें तो जाणून होता.

फक्त एका नोकरासह चूडामणीनें प्रताप-पूर सोडिलें. प्रतापपुरच्या वेशीपर्यंत शेखर त्याला पोंचवावयास गेला होता. तो जेव्हां परत आला, आणि आपल्या खासगी दिवा-णखान्यांत बसला, तेव्हां त्याला चूडामणीच्या सर्व कृत्यांचें स्मरण होऊन त्याच्या दुरा-चरणाबद्दल फार खेद झाला. दुसरे दिवशीं थोड्याशा लवाजम्यासह वृषपति प्रतापपुरीं

आला. त्याला आपल्या दोन्हीं नातवांची हकीकत ऐकून फार आश्चर्य वाटलें, आणि दृढसंधानें सांगितलेली एकतर्फी हकीकत ऐकून आपण तिजवर विश्वास ठेविला, व शेखरासंबंधानें आपण शंका घेतल्या, याचें त्याला फार वाईट वाटलें.

वृषपति आल्या दिवसापासून प्रतापपुरच्या राजवाड्यांत मेजवान्यांची गर्दी उडाली. अनेक प्रकारचे मर्दानी खेळ व नाच गाणीं यांत सर्व लोक दंग होऊन गेले. वृषपति त्या वाड्यांत आठ दिवस राहिला होता, त्या आठ दिवसांत जिकडे तिकडे आनंदी आनंद सुरू होता, असें म्हणावयास हरकत नाहीं. याच वेळीं आणखी एक आनंदाची गोष्ट घडून आली. शेखर व प्रियंवदा यांच्या विवाहाचा वाङ्निश्चय झालेला होता, त्याप्रमाणें त्यांच्या विवाहविधीसाठीं या प्रसंगीं मूहूर्तनिश्चय करण्यांत आला. एक महिना गेल्यानंतर पहिल्याच मुहूर्तास त्यांचा विवाह व्हावयाचा होता. दोन राजघराण्यांमध्यें हा संबंध व्हावयाचा असल्यामुळें विवाहोत्सवाच्या तयारीस एक महिना अपुराच होता, तरी तेवढ्यांत सर्व सामग्री सिद्ध करण्यास उभयपक्षांनीं कमरा बांधिल्या.

तो सर्व महिना–महिना कसचा–पाऊण महिना शेखर आणि प्रियंवदा यांना मोठ्या आनंदाचा झाला. त्या दिवसांत त्यांनीं अनेक आनंददायक गोष्टी करून आपला वेळ घालविला. हेमचंद्राच्या सान्निध्यानें तर त्यांना अत्यानंद होत होता. वास्तविक पाहिलें तर हेमचंद्राचें प्रियंवदेवर प्रेम असल्यामुळें त्याला या विवाहापासून आनंद न होतां खेद व्हावयाचा, परंतु त्याचें मन मोठें असल्यामुळें त्यानें मोठ्या प्रयत्नानें आत्मसंयमन केलें होतें. प्रियंवदेला आपल्याहून शेखर हाच सर्वतोपरी योग्य वर आहे, अशी त्याच्या मनाची खात्री असल्यामुळें त्यानें प्रियंवदेचें कल्याण होत आहे, या गोष्टीचाच मोठा आनंद मानिला होता. त्या थोर पुरुषानें आपल्या मनांतील प्रेमविकार अगदीं दडपून टाकले असल्यामुळें त्याबद्दल कोणाच्याही मनांत केव्हांही संशय आला नव्हता. मुहूर्ताला आठ दिवस उरले, आणि वृषपतीनें आपल्या कन्येला बोलावणें पाठविलें. हेमचंद्र हा वृषपतीचा आश्रित असल्यामुळें त्यालाही शेखराचा समागम सोडून वृषपुरीं जावें लागलें.

विवाहमहोत्सवासाठीं दोन्ही राजांनीं आपापलीं शहरें शृंगारण्याचें काम जारीनें सुरू केलें. ही विवाहाची बातमी आसपासच्या पंचवीस कोस मुलखांत पसरली असल्यामुळें तितक्या प्रदेशांतील कलांमध्यें निपुण असलेले गुणिजन वृषपुरामध्यें गोळा झाले होते. त्यांपैकीं राजाश्रयास कोण पात्र आहेत यांची निवड करण्यांत हेमचंद्राचे दिवस भराभर निघून चालले होते. दोन्ही कुटुंबांतील माणसांचे दूरदूरचे नातलग सुद्धां आपापल्या परिवारांसह वृषपुरीं किंवा प्रतापपुरीं येऊं लागले होते. राजकुटुंबांतील मंडळीस या प्रसंगीं पुष्कळ मेहनत पडत होती. पण त्या श्रमांची पर्वा कोणींच केली नाहीं.

चूडामणी भृगुकच्छनगरीं निघून गेल्यावर त्यानें ज्या सावकाराकडे दुर्मुखानें खंडणीची रक्कम ठेविली होती, त्या सावकाराची भेट घेऊन खरा प्रकार त्याला सांगितला,–पण तो सांगतांना त्यानें आपलीं दुष्कृत्यें छपवून ठेविलीं होतीं, हें सांगावयास नको–आणि त्या सावकाराच्या मनाची योग्य खात्री पटवून देऊन त्यानें खंडणीची रक्कम वसूल केली, आणि रक्कम हातीं येतांच मुद्दाम जासुदाबरोबर दृढसंधाकडे पत्र रवाना केलें. भृगुकच्छ नगरीं गेल्याबर व्यर्थ वेळ न दवडितां चूडामणीनें ही महत्त्वाची कामगिरी केली, या गोष्टीचें दृढसंधाला बरें वाटलें, आणि त्यानें त्या रकमेचा खर्च करून कोणकोणत्या जिनसा खरेदी करावयाच्या त्याची यादी चूडामणीकडे पाठवून

दिली. दृढसंधानें पूर्वी शेखराला ज्या वस्तु खरेदी करावयास सांगितल्या होत्या, त्या यादीपेक्षां सध्यांच्या यादींत बराच फेरफार केलेला होता. पूर्वीच्या यादीमध्यें जितके युद्धोपयोगी पदार्थ होते, तितके सर्व सध्यांच्या यादींत होतेच. त्यांमध्यें दृढसंधानें कांहींच फेर केला नव्हता, पण इतर जिनसांमध्यें बराच फेर झाला होता. कारण लग्नसमारंभ जवळ आल्यामुळें तो उत्तमरीतीनें साजरा करण्यासाठीं अवश्य ते पदार्थ दृढसंधानें त्या यादींत नवीन दाखल केले होते. ही यादी घेऊन सांडणीस्वार मोठ्या जलदीनें भृगुकच्छनगरीं गेला. याप्रसंगीं दृढसंधानें चूडामणीला जें पत्र लिहिलें होतें, तें चूडामणीच्या कल्पनेपेक्षां पुष्कळ सौम्य होतें, त्यामुळें त्याच्या मनास थोडासा धीर आला. इतकें झालें, तरी त्या पत्रांत शेखराच्या विवाहासंबंधानें दृढसंधानें कांहींच लिहिलें नव्हतें. पत्र लिहितांना शेखर पित्यापाशीं होता, पण त्यानें सुद्धां चूडामणीला लग्नाला बोलाविण्याची सूचना वडिलांस केली नाहीं. कारण, आपलें प्रियंवदेवर प्रेम जडलें आहे, ही गोष्ट चूडामणीनें शेखरापाशीं उघडपणें बोलून दाखविली असल्यामुळें, लग्नाच्या वेळीं तो समक्ष हजर असल्यास त्या गोष्टीपासून त्याच्या मनास आनंद अगदीं न होतां त्याला अतिशय खेद होईल, आणि त्याच्या योगानें त्याच्या मनांतील मत्सरादि विकारांस उत्तेजन मिळून त्याच्या हातून आणखी दुष्कृत्यें घडतील, असें शेखराला वाटत होतें.

लग्नतिथीचे पूर्वीं दोन दिवस प्रतापपुरांतून राणी मेधावती थोडासा लवाजमा बरोबर घेऊन जमलेल्या नातेवाइक स्त्रीमंडळासह वृषपुरीं निघून गेली. ती गेल्यावर दुसरे दिवशीं मोठ्या थाटानें अनेक प्रकारच्या वाद्यांचे गजर व मंगलघोष सुरू असतां दरींतील भिल्लांसह वरानें प्रस्थान केलें. या वेळचा वरप्रस्थानाचा थाट अप्रतिम होता. स्वतः शेखर एका सज्जा घोड्यावर आरूढ झाला असून त्याचे जवळून वस्त्रालंकारांनीं भूषित झालेला दृढसंध उत्तम घोड्यावरून चालला होता. राजकुमाराजवळ दोन बाजूंस चतुरक व जांघिळ असे दोघेजण असून त्याचा घोडा दरींतील अवघड वाटेमधून ते संभाळून नेत होते. यावेळीं जांघिळाला अत्यानंद झाला असून तो वारंवार गर्जना करून शेखराचा जयजयकार करीत होता, व दरींतील इतर भिल्लही त्या धिप्पाड पुरुषाच्या आवाजाची स्पर्धा करण्याच्या हेतूनें मोठमोठ्यानें जयघोष करून दशादिशा दणाणून सोडीत होते. या जयघोषापुढें बिचारीं मंगलवाद्यें फिकीं पडल्यास त्यांत आश्चर्य कसलें? कशा रीतीनें प्रतापपुरांतून बाहेर पडलेला वर योग्य वेळीं वधूच्या शहरामध्यें प्रवेश करिता झाला.

वरदेवाच्या स्वागतासाठीं वृषपुरांतील सुवासिनी वस्त्रालंकारांनीं भूषित होऊन आपलीं लहान लहान अर्भकें कडेवर घेऊन रस्त्यावर धांवा घेत होत्या, व भीड मर्यादा थोडीशी बाजूला ठेवून आपल्या लहान मुलांना वरदेवाचें दर्शन करवीत होत्या. शेखर हा वृषपुरामध्यें सर्वांना प्रिय होताच. अशा मंगलप्रसंगीं मंगल वेष धारण करणाऱ्या राजपुत्राला पाहून सर्वांना आनंदाचें भरतें आलें, आणि शेखरावरून लिंबलोण उतरणाऱ्या व त्याला पंचारती ओवाळणाऱ्या स्त्रियांना पारितोषिकें देतां देतां दृढसंधानें नवीन ठेविलेल्या खासगी कारभाऱ्याची मोठी त्रेधा उडाली होती.

दुसरे दिवशीं सुमुहूर्तावर प्रियंवदा आणि शेखर यांचा विवाह झाला. विवाहकालीं मंगलवेषानें सुभूषित झालेली वधू स्वर्गींच्या देवांगनेप्रमाणें दिसत होती. तें परस्पर अनुरूप दांपत्य पाहून आबालवृद्धांस मोठें कौतुक वाटलें, आणि फार दिवसांनीं ब्रह्मदेवानें हा जोडा जमविला, असे उद्गार त्याप्रसंगीं पुष्कळांच्या मुखांतून बाहेर पडल्या-

खेरीज राहिले नाहींत. या शुभप्रसंगीं वृषपर्वानें आपलें सर्व राज्य आपल्या कन्येस आंदण दिलें. कोणत्याही प्रकारचें विघ्न न येतां तो मंगलसमारंभ पार पडला.

'कोणत्याही प्रकारचें विघ्न न येतां तो समारंभ पार पडला,–' असें मुद्दाम सांगण्याचें कारण इतकेंच कीं, बृहद्रथ राजाच्या मनांत प्रियंवदेशीं विवाह करावा असा विचार फार दिवस घोळत होता, आणि त्यानें पूर्वी तिच्यासाठीं मागणी देखील घातली होती. परंतु वृषपर्वानें बृहद्रथाची मागणी नाकारिली होती. त्यानंतर त्यानें प्रियंवदेला चोरून नेऊन तिच्याशीं आसुरी विवाह करण्याचा बेत केला होता, तो कसा फसला हें वाचकांस विदितच आहे. बृहद्रथाचा नुकताच पराभव झाला असल्यामुळें त्यानें या प्रसंगीं डोकें वर केलें नाहीं. तो झालेला तह मोडून कांहीं तरी विघ्न आणील असें दृढसंधाला वाटत असल्यामुळें त्यानें मोठ्या धूर्ततेनें सर्व योजना केल्या होत्या, व त्याच कारणामुळें त्यानें मोठ्या बंदोबस्तानें राणी मेधावतीसह सर्व स्त्रियांची एक दिवस अगोदर वृषपुरीं रवानगी केली होती. लग्नसमारंभ पार पडला, आणि योग्य वेळीं शेखर आपल्या पत्नीसह आनंदानें प्रतापपुरीं परत येता झाला.

प्रकरण ३७ वें.

मथुरेला पत्र.

चूडामणि भृगुकच्छ नगरीं गेला. त्यानें आपल्या बरोबर जो सेवक नेला होता. त्याला लिहितां वाचतां येत होतें, त्यामुळें चूडामणीला वारंवार पत्रें लिहून तेथील वर्तमान आपल्या वडिलांस सुखानें कळवितां येत असे. निंचराजा रत्नाकरावर स्वारी करणार, ही गोष्ट अगदीं ठरल्याप्रमाणेंच होती. या स्वारीसंबंधाच्या बातम्या चूडामणीला जशाजशा कळत, तशातशा तो आपल्या वडिलांस लिहून कळवीत असे.

प्रतापपुरांतून बाहेर पडल्यापासूस चूडामणीला एक मोठी भीति वाटत होती. कदाचित् आपला पिता आपणांस राज्यपदावर आरूढ होण्यास नालायक ठरवून आपल्या भावास आपल्या मागें गादीचा वारस करील, अशी शंका त्याच्या मनामध्यें वारंवार उत्पन्न होऊन तो नेहमीं त्या चिंतेमध्येंच निमग्न असे. शेखराचा प्रियंवदेशीं विवाह झाला, इतकेंच नव्हे तर वृषपर्वानें आपलें राज्य त्याला दिलें; ही गोष्ट जेव्हां त्याला समजली, तेव्हां तर त्याच्या अंगाची संतापानें लाही झाली. यदाकदाचित् वडिलांचें राज्य आपणांस मिळालें, तरी शेखरालाही आपल्या इतकेंच वैभव व सामर्थ्य प्राप्त झालें असल्यामुळें, तो पित्यामागें आपल्यावर चढाई करील व आपल्या राज्यांतील सर्व लोकांचें शेखरावर प्रेम असल्यामुळें ते सर्व त्याला साह्य करतील, असें वारंवार त्याच्या मनांत येऊं लागलें. 'जो तो आपल्या मनावरून दुसऱ्याच्या मनाची परीक्षा करीत असतो.' अशी जी एक म्हण आहे, ती चूडामणीसंबंधानें विचार करतां सत्य आहे, असें म्हणणें जरूर झालें होतें. आपल्याप्रमाणेंच साऱ्या जगांतील लोक कपटी, कृतघ्न आणि नीच आहेत असें त्यास वाटत होतें; आणि शेखराचें औदार्य अनेक वेळां त्याच्या दृष्टीस पडलें असूनही तो शेखराचें प्रत्येक कृत्य केवळ मानभावीपणाचें आहें, असें समजत होता.

शेखराचा पाडाव करण्यासाठीं चूडामणीनें जे जे प्रयत्न केले होते, ते सर्व फसले. त्या प्रयत्नांनीं त्याचा तिळभरही फायदा न होतां उलट शेखराची प्रतिष्ठा वाढली, ही-ही गोष्ट त्याला अत्यंत जाचत होती. शिवाय तो आपल्या पित्याच्या व प्रतापपुरच्या हद्दींतील सर्व राहिवाशांच्या मनांतून उतरला होता. आपल्याविषयीं कलुषित झालेलीं लोकांचीं मनें शुद्ध करण्यासाठीं आपण

कांहीं तरी चांगलें कृत्य केलें पाहिजे, असें त्याला वाटत होतें; पण त्याला कृतकर्माचा पश्चात्ताप झाल्यामुळें तो सन्मार्गाकडे वळला नसून आपल्या मनांतील विशिष्ट हेतु साध्य करण्यासाठीं आपण कांहीं तरी करावें, असें त्याला वाटत होतें. आपण एकादें महत्-कृत्य केल्यास वडील आपली शिक्षा कमी करून आपल्याला पुनः लवकर जवळ करतील, असें मनांत येऊन तो योग्य संधीची वाट पहात होता. त्यानें भृगुकच्छ नगरीं गेल्याबरोबर विलंब न करतां खंडणीची रक्कम पदरांत घेतली, मोठ्या दक्षतेनें वडिलांनीं लिहिलेल्या जिनसा खरेदी केल्या, आणि सर्व रकमेचा अगदीं बिनचूक हिशोच वडिलांकडे पाठवून दिला. त्यानें कित्येक हुषार लोकांशीं ओळखी करून घेतल्या आणि प्रस्तुत राजकारणासंबंधानें जितक्या बातम्या समजतील, तितक्या समजून घेऊन मोठ्या तारतम्यानें खऱ्या खोट्यांची निवड करून त्या वडिलांस कळविण्याचा क्रम सारखा सुरू ठेविला. तो स्वतः दररोज तेथील बंदरावर जाई आणि तेथें चंपावतीहून किंवा त्या नगरीच्या आसमंतातून भागांतून जीं गलबतें येत, त्या गलबतां वरील खलाशांकडून किंवा प्रवाश्यांकडून निंबराजाच्या राजकीय धोरणांसंबंधानें शक्य तितकी माहिती मिळवीत असे. या राजकारस्थानासंबंधानें आपण जर योग्य माहिती आपल्या वडिलांस कळविली, तर त्यांची मर्जी पुनः प्रसन्न होईल, अशी त्याच्या मनास खात्री वाटत होती. त्याच्याबरोबरचा नोकर हुषार असल्यामुळें तो चूडामणीच्या मनांत असलेल्या गोष्टी अगदीं तंतोतंत जुळवून त्या मोठ्या कुशलतेनें लिहीत असे. आपले इष्ट हेतु साध्य होण्यास आपणास असा नोकर मिळाला, याचा चूडामणीस फार आनंद वाटून तो त्या नोकराला वारंवार बक्षिसें देऊन खूष ठेवीत असे.

चूडामणीच्या मनांतील हेतु राजकारस्थानाती वेळही मोठी चांगली होत आहे, असें आणि निंबराज यांची लढाई होणारा यांचें तेक ठरल्यासारखें होतें, आणि एकदां ती लढाई सुरू झाली, म्हणजे बागलाणाहून राजांचीं परस्पर युद्धें व्हावयाचीं, हेंही निश्चित झाल्यासारखें होतें. या युद्धांमध्यें आपण नांव गाजवूं, अशी चूडामणीला मोठी उमेद होती. तो स्वतां मोठा शूर होता, हें मागील कथाभागावरून वाचकांच्या लक्ष्यांत आलेंच असेल. जरी तो शूर होता, तरी खऱ्या वीराच्या अंगीं निसर्गतः वास करणाऱ्या औदार्यादि गुणांचा त्याचे ठायीं अगदीं अभाव होता. शत्रूचा प्राण घ्यावा, आणि पुष्कळ रक्तपात करावा, एवढाच काय तो त्याच्या शौर्याचा प्रभाव दृष्टास पडत असे. कित्येक वेळां तो जिवावर उदार होऊन शत्रूशीं युद्ध करीत असे, पण अशा प्रसंगीं मानवी वृत्तीपेक्षां पशुवृत्ति त्याच्या ठिकाणीं अधिक दिसून येत असत. खरे वीरपुरुष शत्रु निःशस्त्र झाला, किंवा शरण आला, तर त्याच्यावर शस्त्र धरीत नाहींत, पण चूडामणि एकदां क्रोधानें अंध झाला, म्हणजे आपल्या शत्रूची अगदीं पर्वा करीत नसे. शत्रु शरण आला आहे, किंवा तो निःशस्त्र आहे, किंवा तो पळून जात आहे, किंवा तो वार्द्धक्यानें जर्जर झालेला आहे, याचा विचार न करतां तो बेलाशक त्याचा प्राण घेत असे. अशा प्रकारच्या आपल्या शौर्याचा चूडामणीला अभिमान असल्यामुळें उपस्थित होणाऱ्या लढाईंत पराक्रम दाखवून दरींतील रहिवाश्यांना प्रिय होण्याची व शेखरावर वर्चस्व स्थापित करण्याची तो मनोभावानें वाट पाहत होता. भावी युद्धामध्यें आपण तरवार गाजविल्यास आपल्यावर वडिलांची मर्जी पुनः खुष होईल, अशी त्याच्या मनास खात्री वाटत होती.

भृगुकच्छ नगरीं गेल्यापासून चूडामणीनें रत्नाकर राजाच्या पक्षाला अनुकूल अस-

खेरीज राहिले न्या भेटी घ्यावयाचा सपाटा वृषपतीनें आपलें ...ता. शहरांतील बड्या लोकांच्या आंदण दिलें ...स त्याला मुळींच प्रयास पडले न येतां तेर्‍ा. तो वृषपती राजाचा नातू होता, व ...तीचा भृगुकच्छ नगरांतील पुष्कळ सर- को... मानकऱ्यांशीं स्नेह होता. शिवाय तो स्वतां राजपुत्र होता, इतकेंच नव्हे. तर तो वडिलांच्या पश्चात् गादीचा वारस होता. त्यामुळें त्याची तेथील सरदार-मानकऱ्यांनीं उत्सुकतेनें भेट घेतली. रानटी भिल्लांच्या सहवासामध्यें तो लहानाचा थोर झालेला असल्यामुळें त्याला दरबारी रितिरिवाज फारसे माहीत नव्हते, तरी भृगुकच्छ नगरांतील लोक त्याच्या अडाणीपणाकडे दुर्लक्ष्य करून त्याचा योग्य मानमरातब ठेवीत असत. त्याच्या भाषणामध्यें रत्नाकर महाराजांच्या पक्षाचा अभिमान ओतप्रोत भरलेला असे, म्हणून त्या पक्षाचे अभिमानी त्याला मोठा मान देत असत. भावी युद्धाचे वेळीं भृगुकच्छ नगरावर स्वारी होण्याचा पूर्ण संभव असल्यामुळें, तेथील रत्नाकर राजाच्या प्रतिनिधीनें शहराचें बंदोबस्ताचें काम नेटानें सुरू केलें होतें. सध्यां त्या नगरामध्यें वीस हजार सैन्य जमलें होतें. तेथील प्रतिनिधीनें चूडामणीला एक मोठी असामी पत्करण्याचा आग्रह केला, व त्यानेंही प्रसंगाकडे नजर देऊन, पांच हजार सैन्याच्या आधिपत्याचा स्वीकार केला. अशा रीतीनें राजकारस्थानामध्यें आपला बराच प्रवेश झाला, या गोष्टीचा त्याला फार आनंद होऊन त्यानें या हकीकतीचें एक लांबलचक पत्र लिहवून तें मोठ्या त्वरेनें आपल्या वडिलांकडे पाठवून दिलें. हें पत्र वाचून दृढसंध राजालाही आनंद झाला व त्यानें या पत्राचें जें उत्तर चूडामणीला पाठविलें, त्यावरून त्याच्या मनांतील क्रोध बराच शांत झाला आहे, असें स्पष्ट दिसून येत होतें.

आणखी कित्येक दिवस गेले. निंबराजानें चंपावतीमध्यें आपलें सर्व सैन्य एकत्र केलें असून, तो लवकरच जलमार्गानें रत्नाकराची राजधानी जी सौराष्ट्रांतील वल्लभी नगरी तिजवर स्वारी करणार आहे, असें वर्तमान भृगुकच्छ नगरांत येऊन थडकलें. आणि तेथील नागरिकांत मोठी चळवळ उडाली. रत्नाकराच्या पक्षाच्या लोकांनीं आपली एक मोठी सभा भरवून तींत पुढें काय करावयाचें त्याचा दराव केला. सर्वानुमतें असें ठरलें कीं, रत्नाकर महाराजांच्या सर्व अनुयायांनीं वल्लभी नगरीमध्यें जाऊन प्रत्यक्ष राजाला भेटावें, आणि आपण किती साह्य करणार तें त्यांस समक्ष कळवावें. बागलाण प्रांतांतील जे संस्थानिक त्या सभेला हजर होते, त्यांना हें वर्तमान समजलेंच होतें; पण जे कोणी त्या सभेंत नव्हते किंवा ज्यांचे प्रतिनिधीही तेथें नव्हते,त्या सर्वांस हें वर्तमान कळवावें, असेंही त्या सभेंत ठरलें असल्यामुळें, तें वर्तमान चूडामणीनें दृढसधास कळविलें. हें पत्र दृढसंधाच्या हातीं आल्यावर पुढें काय करावयाचें याचा तो विचार करूं लागला. आपण स्वतां राजधानी सोडून वल्लभी येथें जाणें या प्रसंगीं उचित नाहीं, असें त्याला वाटत होतें. कारण आपण तिकडे निघून गेल्यावर जर बागलाणांत लढाई सुरू झाली, तर शेखरासारख्या अपक्व बुद्धीच्या तरुणावर फारच मोठा भार पडेल; शिवाय वृषपतीच्या राज्याचें रक्षण करणें हेंही आपलें कर्तव्य आहे, असे विचार त्याच्या मनांत घोळत होते. म्हणून वृषपतीच्या तर्फे व आपल्या तर्फे शेखरानेंच वल्लभी नगरीस जावें, असा त्यानें बेत केला, व तो वृषपतीला कळविला. त्यानें आपली संमति दिल्यावर शेखराची राजाधिराज रत्नाकर महाराजांचे दरबारीं रवानगी करण्याचा बेत कायम ठरला. शेखराचा नुकताच विवाह झाला असल्यामुळें त्यानें आपल्या पत्नीपासून दूर जावें, ही गोष्ट वृषपतीला योग्य वाटली नाहीं, म्हणून प्रियंवदेनेंही त्याच्याबरोबर जावें,

अशी त्यानें सूचना केली. ही सूचना त्या तरुण दांपत्यास किती आनंददायक वाटली असेल, याचा विचार करण्याचें काम आम्ही वाचकांवरच संपवितों.

शेखराच्या प्रवासाची तयारी झाली. शेखराबरोबर त्याचा सेवक चतुरक आणि प्रियंवदेबरोबर तिची सखी निपुणिका यांनीं जावें असें ठरलें असल्यामुळें त्यांनींही आपापली तयारी केली. वल्लभी नगरीं जावयाचें तें स्थलमार्गापेक्षां जलमार्गानें सोपें पडत असल्यामुळें शेखराला प्रथम घांट उतरून घांटासालच्या एकाद्या बंदरामध्यें जाणें जरूर होतें. म्हणून त्या कालीं जलमार्गानें व्यापार करणाऱ्या बंदरांमध्यें विशेष प्रसिद्ध असलेलें जें सुरथपुर नगर, तेथपर्यंत स्थलमार्गानें जाऊन तेथून गलबतांतून वल्लभी नगरीं जाण्याचा शेखरानें विचार ठरविला. तो जर प्रथम भृगुकच्छ नगरीं गेला असता व तेथून गलबतांत बसावयाचा त्यानें विचार केला असता, तर त्याला स्थलमार्गानें सुमारें चाळीस कोस अधिक लांब जावें लागलें असतें. त्या वेळच्या प्रवासाच्या साधनांचा विचार केल्यास एवढें अंतर टाळतां आल्यास फार फायदेशीर होतें, ही गोष्ट वाचकांच्या सहज ध्यानीं येईल.

प्रतापपुर सोडल्यानंतर शेखराला पहिला मुक्काम त्रिशूलपर्वताच्या शेजारीं असलेल्या शिवालयामध्यें करणें जरूर होतें. शेखर, प्रियंवदा, चतुरक आणि निपुणिका, हीं चौघें-जणें शिवालयांत आलेलीं पाहून मणिभद्राला फार आनंद झाला आणि त्यानें मोठ्या धांदलीनें त्यांची तरतूद लावून दिली. इतकेंच नव्हे, तर आपल्या नातीलाही त्यानें चतुरक आणि निपुणिका यांजपाशीं रहावयास सांगून त्यांना जें काय हवें असेल तें तत्काल मिळवून देण्याची तिला आज्ञा केली. ती मुलगी मोठी चोकस असल्यामुळें, शेखर सध्यां कोठें जात आहे, यासंबंधानें तिनें निपुणिकेच्या मुखानें बरीच माहिती काढून घेतली. त्यावरून कांहीं राजकारस्थानासाठीं शेखर वल्लभी नगरीं जात आहे, असें तिला समजलें. निपुणिका व मथुरा यांचें संभाषण चालू असतांच एक घोडेस्वार त्या शिवालयामध्यें आला. त्याच्या पेहेरावावरून तो सौराष्ट्रांतून आलेला असावा, असें अनुमान करतां येत होतें. त्याच्या एकंदर देखाव्यावरून तो नेहमीं जासुदाचें काम करीत असावा, असा तर्क करण्यास जागा होती. या स्वाराला देवळाच्या आवारामध्यें आलेला पाहातांच मणिभद्र पुढें झाला, आणि त्यानें त्याला घोडा बांधण्याची जागा दाखविली. घोडा बांधून स्वार धर्मशाळेमध्यें गेला, व दुकानांतील थोडेसे खाद्य पदार्थ विकत घेऊन त्यानें आपली क्षुधा शांत केली, आणि पाणी पिऊन तो जरा ताजातवाना झाला. नंतर त्याला मणिभद्रानें इकडे प्रवास करण्याचें कारण विचारलें असतां त्यानें उत्तर केलें,–'मी फार लांबून मोठ्या त्वरेनें प्रवास करून या शिवालयामध्यें रहात असलेल्या मथुरा नामक कुमारिकेची भेट घेण्यासाठीं येथें आलों आहें.'

हें ऐकून मणिभद्राला मोठें आश्चर्य वाटलें, आणि त्यानें विचारलें,–'काय? मथुरेची? माझ्या नातीची भेट घेण्यासाठीं तूं इतका दूर आला आहेस? मोठा चमत्कार म्हटला पाहिजे! अरे, ही पहा मथुरा इकडे आलीच!'

आपल्याकडे जासूद आला आहे, हें वर्तमान आपल्या पित्याच्या मुखानें ऐकतांच मथुरेला आपल्या पित्याला वाटलें होतें त्याहून अधिक आश्चर्य वाटलें, आणि ती मोठ्या विचारांत पडली; पण थोड्याच वेळांत कांहीं अस्पष्ट कल्पना तिच्या मनांत आली, आणि ती त्या जासुदाकडे अर्थपूर्ण दृष्टीनें अवलोकन करूं लागली. हें पाहून तो जासूद म्हणाला,–'कुमारिके, फक्त तुझ्याशीं मला चार शब्द बोलावयाचे आहेत. ज्यानें मला तुजकडे पाठविलें आहे, त्यानेंच तुला जो निरोप सांगितला आहे,

त्यांतील एक अक्षरसुद्धां इतरांच्या कानीं जातां नये, अशी ताकीद दिली आहे।'

मणिभद्र आश्चर्यानें चकित होऊन म्हणाला,–'माझ्या नातीला गुप्त निरोप? म्हणजे हें वर्तमान तरी काय आहे? असा हा निरोप पाठविणारा आहे तरी कोण?'

मथुरेनें अशापूर्ण दृष्टीनें आपल्या आज्याकडे पाहिलें, आणि ती त्या दूतास म्हणाली,–'असें जर आहे, तर मी पाहिजे तर त्या पलीकडच्या वडाच्या झाडापर्यंत येतें. आजोबा येथें उभे राहतील. तूं जें कांहीं मला सांगशील, तें तेथून यांस ऐकूं जाणार नाहीं.'

मथुरेचें हें भाषण मणिभद्राला मनापासून आवडलें नव्हतें, तरी आपल्या नातीवर त्याचा विश्वास असल्यामुळें त्यानें त्या गोष्टीस हरकत घेतली नाहीं. जासुदाचें भाषण ऐकून घेण्यास ती एकदम तयार झाली, यावरून हा जासूद कोणाकडून आला असावा, यासंबंधानें मथुरेला कांहीं तरी अधिक बातमी असावी, असें एकदां त्याच्या मनांत आल्याखेरीज राहिलें नाहीं. मथुरेच्या सूचनेवरून तो जासूद वडाच्या झाडाकडे निघाला, अर्थात् मथुरेलाही त्याच्या मागें तिकडे जाणें भाग झालें.

वडाखालीं पोंचल्यावर तो जासूद म्हणाला,–'वल्लभीनगरांतील एका मोठ्या सरदारानें मला तुझी भेट घेण्यासाठीं इकडे पाठविलें आहे. मी मोठ्या त्वरेनें जें काम करावयासाठीं आलों आहें, तें अशारीतीनें सिद्धीस गेलें, हें पाहून मला फार आनंद होत आहे.'

मथुरा म्हणाली,–'असें तें कोणतें काम?'

आपल्या कमरबंदांतून एक थैली बाहेर काढीत तो जासूद म्हणाला,–'त्या थोर सरदारांनीं आपणांस ही थैली दिली आहे.'

थैली बरीच जड असून तींत सोनें भरलेलें आहे, अशी थैली हातीं येतांच मथुरेची खात्री झाली. त्या प्रांतांतील रहिवाश्यांमध्यें विद्येचा अभावच होता, परंतु मथुरेला थोडेंसें वाचतां येत होतें. मणिभद्र हा मूळचा त्या प्रांतांतील रहिवाशी नसून तो स्वदेशीं चरितार्थ चालेनासा झाल्यामुळें त्या शिवालयांत दुकान घालून राहिला होता. त्यानें फावल्यावेळीं आपल्या नातीस अक्षर-ओळख करून दिली होती, त्यामुळें थैली हातीं घेतांच तिजवर आपलें नांव लिहिलेलें आहे, ही गोष्ट तिच्या चटकन ध्यानीं आली. तिनें ती थैली उघडली, तेव्हां त्या थैलींत एक पत्र आहे, असें तिला आढळून आलें. तिनें तें पत्र थैलींतून बाहेर काढल्यानंतर तो जासूद तिला म्हणाला.–'कुमारिके, तुला वाचतां येतें काय! तुला जर वाचतां येत नसेल, तर मी हें पत्र वाचून दाखवितों.'

मथुरा स्मित पूर्वक म्हणाली,–'मला हें पत्र वाचतां येईल.' असें बोलून तिनें तें पत्र उघडून वाचलें. तिनें तें पत्र वाचलें इतकेंच नव्हे, तर त्या पत्रांत जें काय लिहिलेलें होतें, त्याचा तिला चांगला अर्थ-बोध झाला, असें तिच्या मुद्रेवर उघड दिसत होतें. तें पत्र वाचून तिला अतिशय आनंद झालेला तिच्या मुद्रेवरून स्पष्ट दिसत होता. पत्र वाचून पाहिल्यानंतर ती क्षणमात्र स्तब्ध राहिली, आणि नंतर आपल्याशींच पुटपुटली,–'पण हें व्हावें कसें! मोठी पंचाईत दिसते!'

जासूद म्हणाला,–'तुला कसली पंचाईत पडली आहे, हें मला सांग, म्हणजे मी तुला साह्य करतां येतें कीं काय, हें पाहीन. हें पत्र लिहिणारानीं मला माझ्या कामगिरीबद्दल जी रक्कम दिली आहे, ती माझ्या श्रमांपेक्षां पुष्कळच अधिक असल्यामुळें, त्यांची इच्छा पूर्ण करण्यासाठीं मला आणखी मेहेनत घ्यावी लागली, तरी ती मी आनंदानें घेईन!'

मथुरा म्हणाली,–'तूं मला साह्य करा. वयास तयार झालास, हे तुझे मोठे उपकार

आहेत. परंतु माझें काम तुझ्या हातून होण्यासारखें नाहीं. तें माझें मलाच केलें पाहिजे.' इतक्यांत दुसरा कांहीं विचार तिच्या मनांत आल्यामुळें ती आपल्याशींच बोलली,–'–होय–असें केलें तर–जमेल असें दिसतें–तरी पण आपण स्वतां त्यांस भेटून आपल्या मनाची खात्री करून घेतली पाहिजे ! तसें झालें तर मोठी बहार होईल ! '

असें बोलत ती आपल्या पित्यापाशीं आली. या वेळीं तिची मुद्रा किंचित् सलज्ज दिसत होती. मणिभद्रानें तिला एक दोन प्रश्न विचारले, पण तिनें त्यांचीं स्पष्ट उत्तरें त्याला त्याच वेळीं दिलीं नाहींत. ती त्याच्याबरोबर घरांत गेली, व तिनें तें पत्र त्याच्या हातीं दिलें. तें पत्र वाचून मणिभद्राची स्थिति मोठी चमत्कारिक झाली ! हें पत्र वाचून झाल्यावर त्यांतील मजकुराचा आनंद मानावा, कीं खेद मानावा, याचा त्याला उलगडा करतां येईना ! तथापि पत्रातील गोष्ट सृष्टिक्रमाला अनुसरून असल्यामुळें ती आनंदाचीच समजणें जरूर आहे, असें आपल्या मनाचें समाधान करून घेणें त्याला प्राप्त होतें. त्यावेळीं आजोबा आणि नात यांचा जो काय संवाद झाला, तो आम्ही येथें लिहित नाहीं. योग्य वेळीं त्यासंबंधानें वाचकांस अधिक माहिती मिळेल. तथापि येथें इतकेंच सांगणें अवश्य आहे कीं, मथुरेला जी गोष्ट करणें जरूर वाटलें होतें, ती गोष्ट करावयाची परवानगी मिळविण्यास तिला बरेंच आत्मसंयमन, पुष्कळशा विनवण्या आणि थोडासा वादविवाद यांचा आश्रय करावा लागला होता. तिनें मोठ्या मिनतवारीनें आपल्या आज्याची परवानगी मिळविली. थैलींतून फक्त जरूर तेवढी रक्कम काढून घेऊन ती थैली तिनें आज्याच्या स्वाधीन केली, आपल्या नेत्रांतील अश्रु पुशिले, आणि ती पुनः शिवालयांत आली. ती सध्यां ज्या ठिकाणीं राजपुत्र शेखर आपल्या नूतन पत्नीसह पुढील प्रवासाच्या गोष्टी बोलत बसला होता, त्या ठिकाणीं आली. ती मोठ्या धाडसानें त्यांच्यापुढें येऊन उभी राहिली खरी, पण तिला त्यांच्याशीं बोलावयास धीर होईना. ती पायांच्या अंगठ्यानें जमिनीवर रेघा काढीत खालीं मान घालून उभी राहिली आहे, हें दृष्टीस पडतांच तिच्या मनामध्यें आपणांशीं कांहीं बोलावयाचें आहे, ही गोष्ट प्रियंवदेनें ताडिली आणि ती म्हणाली;– मथुरे, ये बैस; तूं फार उत्तम मुलगी आहेस, हें मला माहीत आहे. तुझ्या मनामध्यें आमच्याशीं कांहीं बोलावयाचें आहे असें दिसतें, तुला जें कांहीं बोलावयाचें असेल, तें मनांत भीड न धरतां खुशाल बोल.'

मथुरा भीत भीत म्हणाली,–'होय; मला आपल्यापाशीं एक देणगी मागावयाची आहे, आपण जर ती मला द्याल, तर मजवर फार उपकार होतील.'

तिच्याकडे सौम्य दृष्टीनें पहात प्रियंवदा म्हणाली,–' मथुरे, तुला काय पाहिजे तें कळूं दे. जर आम्हाला तें देतां येण्यासारखें असेल, तर तें देण्यास आम्हीं अगदीं अनमान करणार नाहीं. '

मथुरा हात जोडून म्हणाली,–' आपण वचन दिलें, तर मात्र मी मला देणगी कोणती पाहिजे, हें आपणास सांगेन ! '

प्रियंवदा बोलली,–' जर तूं मागशील तें आम्हांस देतां येणें शक्य असेल, तर आम्ही नाहीं म्हणणार नाहीं, एवढेंच वचन मी देतें.'

मथुरा म्हणाली,–' एवढें आपलें वचन मला मिळालें म्हणजे पुरे. मला काय पाहिजे तें मी आपणांस सांगतें. आपण वल्लभी नगरीस जात आहां, असें मीं आपल्या दासीच्या मुखानें ऐकिलें आहे. '

प्रियंवदा म्हणाली,–' होय; आम्ही तिकडेच जात आहों. तिकडून येतांना तुझ्यासाठीं एकादा अपूर्वाईचा पदार्थ आणावयाचा

असल्यास आम्ही परत येतांना तो तुला आणून देऊं !'

मथुरा म्हणाली,–' बाईसाहेब, मला तेथें मिळणाऱ्या एकाद्या पदार्थाची जरूर आहे, असें नाहीं. मला कांहीं कामानिमित्त तिकडेच जावयाचें आहे.'

प्रियंवदेनें मध्येंच विचारलें,–' काय म्हणतेस! तुला तिकडे जावयाचें आहे! मला वाटतें, तूं उगीच थट्टेनें मला कांहीं तरी विचारीत असशील. पण तुझ्या मुद्रेवरून तसें दिसत नाहीं. तुझ्या मुद्रेवरून तूं हें मनापासून बोलत असशील, असें दिसतें.'

मथुरा गंभीरतेनें बोलली,–'बाईसाहेब, आपणांसारख्या थोरांची म्यां पामरानें काय थट्टा करावी ? बाईसाहेब, मी अगदीं खरें सांगतें, कांहीं महत्त्वाच्या कामासाठीं मला वल्लभी नगरीस जाणें भाग आहे, आणि कृपा करून आपण मला तेथपर्यंत संभाळून न्यावें, एवढीच माझी आपल्या पायांपाशीं विनंति आहे.'

प्रियंवदा आपल्या पतीकडे पाहत म्हणाली,–' एवढीच जर तुझी इच्छा असेल, तर आम्हाला ती सहज पुरी करतां येईल! पण मी अगोदर विचारतें, तुझे आजोबा तुला तिकडे पाठविण्यास तयार आहेत का?

मथुरा बोलली,–' बाईसाहेब, मी त्यांची आज्ञा घेतल्यासेरीज आपल्या बरोबर पळून येत असेन, अशी जर आपल्याला शंका येत असेल, तर ती सहज दूर होण्यासारखी आहे. आजच एक जासूद वल्लभी नगरांतून पत्र घेऊन आला; वल्लभी नगर ही राजाधिराजांची राजधानी आहे, आणखी ती येथून फार दूर आहे, एवढीच कायती मला माहिती. काम फार महत्त्वाचें असल्यामुळें मला येथून मोठ्या जलदीनें तिकडे जाणें जरूर आहे. आजोबांचा वृद्धापकाळ झाला पडलें असतां आपल्या दासीच्या मुखांतून आपण तिकडेच जात आहां असें मला समजलें, म्हणून मी धांवत आपल्या पायांशीं विनंति करण्यासाठीं आलें आहें! आपण जर मला एवढी देणगी द्याल, तर मी जन्मभर आपले उपकार मानीन!'

प्रियंवदा बोलली,–' इतकें कां तुझें महत्त्वाचें काम आहे ?'

मथुरा म्हणाली,–' बाईसाहेब, माझें काम अत्यंत महत्त्वाचें आहे. कृपा करून आपण यासंबंधानें मला यावेळीं अधिक प्रश्न विचारूं नयेत, अशी माझी आपल्या पायांपाशीं विनंति आहे. इतक्या दूरचा प्रवास करणें हें फार खर्चाचें आणि धोक्याचें काम आहे, हें मी जाणून आहें. सुदैवानें कितीही खर्च पडला, तरी तो सोसण्याचें माझ्या अंगीं सामर्थ्य आहे, पण मी अबला असल्यामुळें इतक्या लांबीचा प्रवास एकटीनें करण्याचें मात्र मला धाडस नाहीं, म्हणून मी ही विनंति करीत आहें !'

प्रियंवदा बोलली,–' तुमची स्थिति काय आहे, हें आम्हांस समजत नाहीं असें नाहीं. इतक्या लांबीचा प्रवास करतांना जो खर्च लागेल तो तुम्हाला जड जाईल, अशी माझी कल्पना आहे.'

इतका वेळ पर्यंत चाललेलें स्त्रियांचें भाषण शेखर मुकाट्यानें ऐकत होता. तो आतां बोलला,–' मथुरे, आमच्या सोयतीनें वल्लभी नगरीं यावें अशी तुझी इच्छा आहे, व ही इच्छा पूर्ण करणें आम्हांस कोणत्याही रीतीनें अवघड नाहीं. जर तुला तुझे अजोबा आमच्याबरोबर पाठविण्यास तयार असले, तर तुला घेऊन जावयाला आम्हीं अगदीं अनमान करणार नाहीं.'

मथुरा मोठ्या हर्षानें [illegible] लावण्यासाठीं [illegible] भाग झाले, मुखानें आपणांस समजेल. माझी विनंति आहे. पुढे काय करावें, या पंचाइतींत मीं आपण मान्य केली, हे आपले मजवर अत्यंत

उपकार आहेत. माझी प्रवासाची तय[illegible] त्या खंदकामध्यें समुद्राचें मी अर्धघटकेच्या आंत करतें, आणि आ[illegible] खेळत असे. भोंवतालच्या अगदीं खोटी न करतां मी तयार राहतें[illegible] ोठे बुरूज बांधिले असून, [illegible] ार तोफा ठेविल्या होत्या. शहराच्या

मथुरा त्यांस नम्रतेनें नमन करू[illegible] [illegible]ागों एक अतिशय उंच बुरूज निघून गेली, आणि तिनें मोठ्या [illegible]ाजला होता; आणि त्यावर पांच तोफा आपल्याबरोबर घ्यावयाचे जरुरी[illegible]या होत्या. या तोफांचा मारा सुरू एकत्र करून त्यांचें गांठोडें बांधि[illegible]ा म्हणजे त्यांचे गोळे शहराबाहेर अर्ध-पुरापर्यंतचा जमिनीवरचा प्रवास नि[illegible]शावर जाऊन पडत. त्यामुळें शत्रुसैन्य बरोबर करावयाचा असल्यामुळे. [illegible]हराच्या तटाशीं भिडणें शक्य नव्हतें. तितक्यांत एका जवळच्या [illegible]तेथील रस्ते सरळ व रुंद असून, त्या एक घोडा विकत आणिला [illegible]रस्त्यांच्या दोन्ही बाजूंस अनेक पदार्थांमुळें करतेवेळीं मणिभद्रानें [illegible]शोभिवंत दिसणारीं लहानमोठीं दुकानें आशीर्वाद दिला; आ[illegible]न असत. या दुकानांमध्यें नेहमीं गिऱ्हाइ-नेण्याबद्दल शेखर व [illegible]ानें कांची गर्दी दृष्टीस पडे. शहरामध्यें देवालयें, अनेक वेळां विनंति [illegible]त्यांनीं धर्मशाळा, गोपुरें, श्रीमंत लोकांचे वाडे वगैरे आणि सद्गदित स्वरा[illegible]या वृद्ध भव्य आणि उत्कृष्ट इमारती तेथील कारा-पित्याचा निरोप [illegible] शेखर, गिरांच्या कौशल्याची साक्ष देत असत.
प्रियंवदा, चतुरक[illegible] यांच्या-बरोबर मार्गक[illegible]

शहराच्या मध्यभागीं असलेल्या बुरुजा-नजीक राजवाड्याची प्रचंड इमारत होती. या इमारतीला सहा मजले होते. राजवा-ड्याच्या चार टोंकांस चार अत्यंत उंच असे मनोरे उभे केलेले होते, त्यांमुळें तर त्या इमारतीला अवर्णनीय शोभा आलेली होती. या मुख्य राजवाड्यासंबंधीज राज्यां-तील अष्टप्रधान, सरदार, मानकरी, वगैरे लोकांच्या मोठमोठ्या हवेल्या तेथें पुष्कळ होत्या. त्यांच्या योगानें शहराला अतिशय शोभा आली होती.

प्राचीन काळीं [illegible] प्रकरणांमध्यें जीं कित्येक संपत्तिमान् नग[illegible]रीं, त्यांमध्यें सौराष्ट्र देशांतील वल्ल[illegible]रं हें प्रमुखत्वानें गणिलें जात असे. [illegible]अकारनरदेश आणि त्याच्या लगत्यास अर[illegible]त्या अरबी प्रांत यांवर राज्य करणारा सार्वभ[illegible]ाची कलाच नगरीमध्यें राहून राज्यका[illegible]अशक्यच असे; त्यामुळें तर या नगरी[illegible]वरील ही गंभीं होतेंच; पण त्याशिवाय तें[illegible] होती. कारण असल्यामुळें तेथें जलमार[illegible]राज इतर गोष्टींत पार चालत असे. त्या सामान्य माणसांच्या किंवा राज्यकारभार[illegible]पाव आपल्या मुद्रेवर नेक देशां-तील लोक [illegible]तो पुरुष दिसण्यांत[illegible]या नगरा-भोंवतीं काळ[illegible]मानी आणि धोरणी दिसत[illegible]ऐसा. लेला असून, दिवाणखान्यांत प्रवेश केल्यावर

अशा प्रकारच्या वल्लभीनगरांत राजपुत्र शेखर आपल्या बरोबरच्या सर्व मंडळींसह सुखरूप येऊन पोंचला; आणि निघण्या-पूर्वी ठरल्याप्रमाणें वल्लभीनगरांतील एका प्रतिष्ठित सरदाराकडे त्यानें आपलें बिऱ्हाड ठेविलें. शेखरानें बराच प्रवास केला होता, व अनेक मोठमोठीं शहरें पाहिलीं होतीं; पण या शहरांत पाऊल ठेवल्याबरोबर आपण[illegible]पर्जी[illegible]वडली[illegible]नाहीं. ही नगरीवरून-ण्याची पद्धति पाहून शेखराला त्या मुख्य

असल्यास आम्ही परत येतांना तो तुला आणून देऊं !'

मथुरा म्हणाली,–' बाईसाहेब, मला तेथें मिळणाऱ्या एकाद्या पदार्थाची जरूर आहे, असें नाहीं. मला कांहीं कामानिमित्त तिकडेच जावयाचें आहे.'

प्रियंवदेनें मध्येंच विचारलें,–' काय म्हणतेस ! तुला तिकडे जावयाचें आहे ! मला वाटतें, तूं उगीच थट्टेनें मला कांहीं तरी विचारीत असशील. पण तुझ्या मुद्रेवरून तसें दिसत नाहीं. तुझ्या मुद्रेवरून तूं हें मनापासून बोलत असशील, असें दिसतें.'

मथुरा गंभीरतेनें बोलली,–'बाईसाहेब, आपणांसारख्या थोरांची म्यां पामरानें काय थट्टा करावी ? बाईसाहेब, मी अगदीं खरें सांगतें, कांहीं महत्त्वाच्या कामासाठीं मला वल्लभी नगरीस जाणें भाग आहे, आणि रुपा करून आपण मला तेथपर्यंत संभाळून न्यावें, एवढीच माझी आपल्या पायांपाशीं विनंति आहे.'

प्रियंवदा आपल्या पतीकडे पाहत म्हणाली,–' एवढीच जर तुझी इच्छा असेल, तर आम्हाला ती सहज पुरी करतां येईल. पण मी अगोदर विचारतें, तुझे आजोबा तुला तिकडे पाठविण्यास तयार आहेत का ?

मथुरा बोलली,–' बाईसाहेब, मी त्यांची आज्ञा घेतल्याखेरीज आपल्या बरोबर पळून येत असेन, अशी जर आपल्याला शंका येत असेल, तर ती सहज दूर होण्यासारखी आहे. आजच एक जासूद वल्लभी नगरांतून पत्र घेऊन आला; वल्लभी नगर ही राजाधिराजांची राजधानी आहे, आणखी ती येथून फार दूर आहे, एवढीच कायती मला माहिती. काम फार महत्त्वाचें असल्यामुळें मला येथून मोठ्या जलदीनें तिकडे जाणें जरूर आहे. आजोबांचा वृद्धापकाळ झाला आहे, आणि येथील सर्व पसाऱ्याची व्यवस्था लावण्यासाठीं त्यांना येथें राहणें भाग झालें आहे. पुढें काय करावें, या पंचाइतींत मी पडलें असतां आपल्या दासीच्या मुखांतून आपण तिकडेच जात आहां असें मला समजलें, म्हणून मी धांवत आपल्या पायांशीं विनंति करण्यासाठीं आलें आहें !. आपण जर मला एवढी देणगी द्याल, तर मी जन्मभर आपले उपकार मानीन !'

प्रियंवदा बोलली,–' इतकें कां तुझें महत्त्वाचें काम आहे ?'

मथुरा म्हणाली,–' बाईसाहेब, माझें काम अत्यंत महत्त्वाचें आहे. कृपा करून आपण यासंबंधानें मला यावेळीं अधिक प्रश्न विचारूं नयेत, अशी माझी आपल्या पायांपाशीं विनंति आहे. इतक्या दूरचा प्रवास करणें हें फार खर्चाचें आणि धोक्याचें काम आहे, हें मी जाणून आहें. सुदैवानें कितीही खर्च पडला, तरी तो सोसण्याचें माझ्या अंगीं सामर्थ्य आहे, पण मी अबला असल्यामुळें इतक्या लांबीचा प्रवास एकटीनें करण्याचें मात्र मला धाडस नाहीं, म्हणून मी ही विनंति करीत आहें !'

प्रियंवदा बोलली,–' तुमची स्थिति काय आहे, हें आम्हांस समजत नाहीं असें नाहीं. इतक्या लांबीचा प्रवास करतांना जो खर्च लागेल तो तुम्हाला जड जाईल, अशी माझी कल्पना आहे.'

इतका वेळ पर्यंत चाललेलें त्या दोघींचें भाषण शेखर मुकाट्यानें ऐकत होता. तो आतां बोलला,–' मथुरे, आमच्या सोबतीनें वल्लभी नगरीं यावें अशी तुझी इच्छा आहे, व ही इच्छा पूर्ण करणें आम्हांस कोणत्याही रीतीनें अवघड नाहीं. जर तुला तुझे अजोबा आमच्याबरोबर पाठविण्यास तयार असले, तर तुला घेऊन जावयाला आम्हीं अगदीं अनमान करणार नाहीं.'

मथुरा मोठ्या हर्षानें बोलली,–' अजोबा मला पाठविण्यास कबूल आहेत, हें त्यांच्या मुखानें आपणांस समजेल. माझी विनंति आपण मान्य केली, हे आपले मजवर अत्यंत

उपकार आहेत. माझी प्रवासाची तय[illegible]
मी अर्धघटकेच्या आंत करतें, आणि आ[illegible]
अगदीं खोटी न करतां मी तयार राहतें.

मधुरा त्यांस नम्रतेनें नमन करू[illegible]
निघून गेली, आणि तिनें मोठ्या [illegible]
आपल्याबरोबर घ्यावयाचे जरुरी[illegible]
एकत्र करून त्यांचें गांठोडें बांधि[illegible]
पुरापर्यंतचा जमिनीवरचा प्रवास [illegible]
बरोबर करावयाचा असल्यामुळे,
तितक्यांत एका जवळच्या [illegible]
एक घोडा विकत आणिला, [illegible]
करतेवेळीं मणिभद्रानें [illegible]
आशीर्वाद दिला; आणि [illegible]न
नेण्याबद्दल शेखर व [illegible]नीं
अनेक वेळां विनंति के[illegible]त्रांनीं
आणि सद्गदित स्वरा[illegible]या वृद्ध
पित्याचा निरोप घे[illegible]शेखर,
प्रियंवदा, चतुरक[illegible]यांच्या-
बरोबर मार्गक[illegible]

[illegible]र.

प्राचीन काळीं [illegible]वतींमध्यें जीं कित्येक
संपत्तिमान् न[illegible]तीं, त्यांमध्यें सौराष्ट्र
देशांतील वल्ल[illegible]र हें प्रमुखत्वानें गणिलें
जात असे. [illegible]नरदेश आणि त्याच्या
लगत्यास अर[illegible] प्रांत यांवर राज्य
करणारा सार्व[illegible]च नगरीमध्यें
राहून राज्यका[illegible] असे; त्यामुळें
तर या नगरी[illegible] होतेंच; पण
त्याशिवाय तें[illegible] असल्यामुळें
तेथें जलमार[illegible]पार चालत
असे. त्या[illegible]च्या किंवा
राज्यकारभार[illegible]नेक देशां-
तील लोक [illegible]या नगरा-
भोंवतीं काळ[illegible] आणि
लेला असून,

त्या खंदकामध्यें समुद्राचें [illegible]
खेळत असे. भोंवतालच्या [illegible]
[illegible]ठे बुरूज बांधिले असून,
[illegible]र तोफा ठेविल्या होत्या. शहराच्या
[illegible] एक अतिशय उंच बुरूज
[illegible]ला होता; आणि त्यावर पांच तोफा
[illegible]या होत्या. या तोफांचा मारा सुरू
[illegible] म्हणजे त्यांचे गोळे शहराबाहेर अर्ध-
[illegible]शावर जाऊन पडत. त्यामुळें शत्रुसैन्य
शहराच्या तटाशीं भिडणें शक्य नव्हतें.
तेथील रस्ते सरळ व रुंद असून, त्या
रस्त्यांच्या दोन्ही बाजूंस अनेक पदार्थांमुळें
शोभिवंत दिसणारीं लहानमोठीं दुकानें
असत. या दुकानांमध्यें नेहमीं गिऱ्हाइ-
कांची गर्दी दृष्टीस पडे. शहरामध्यें देवालयें,
धर्मशाळा, गोपुरें, श्रीमंत लोकांचे वाडे वगैरे
भव्य आणि उत्कृष्ट इमारती तेथील कारा-
गिरांच्या कौशल्याची साक्ष देत असत.

शहराच्या मध्यभागीं असलेल्या बुरुजा-
नजीक राजवाड्याची प्रचंड इमारत होती.
या इमारतीला सहा मजले होते. राजवा-
ड्याच्या चार टोंकांस चार अत्यंत उंच
असे मनोरे उभे केलेले होते, त्यांमुळें तर
त्या इमारतीला अवर्णनीय शोभा आलेली
होती. या मुख्य राजवाड्याखेरीज राज्यां-
तील अष्टप्रधान, सरदार, मानकरी, वगैरे
लोकांच्या मोठमोठ्या हवेल्या तेथें पुष्कळ
होत्या. त्यांच्या योगानें शहराला अतिशय
शोभा आली होती.

अशा प्रकारच्या वल्लभीनगरांत राजपुत्र
शेखर आपल्या बरोबरच्या सर्व मंडळींसह
सुखरूप येऊन पोंचला; आणि निघण्या-
पूर्वी ठरल्याप्रमाणें वल्लभीनगरांतील एका
प्रतिष्ठित सरदाराकडे त्यानें आपलें बिऱ्हाड
ठेविलें. शेखरानें बराच प्रवास केला होता,
व अनेक मोठमोठीं शहरें पाहिलीं होतीं;
पण या शहरांत पाऊल ठेवल्याबरोबर
[illegible] या नगरीवरून

—ाल्याखेरीज राहिलें नाहीं. हे [illegible] अ ाहून प्रियंवदा, मथुरा आणि [illegible] या तर अगदीं भांबावून गेल्या. शे[illegible] ज्या दिवशीं त्या नगरांत प्रवेश केला. [illegible] दिवशीं तो कोठें बाहेर पडला [illegible] एक दिवस विश्रांति घेऊन नंतर आ[illegible] ज्या कामासाठीं आलों. त्या कामास प्रा[illegible] करावयाचा, असा त्यानें विचार केला हो[illegible] शहरांत येऊन सुमारें एक प्रहर लोटल्यावर मथुरेनें प्रियंवदेला एकटी गांठून तिनें तिचा मोठ्या नम्रतेनें निरोप घेतला. यावेळीं प्रियंवदेनें तिला आणखी कांहीं साह्य पाहिजे काय? असा प्रश्न केला होता. परंतु मथुरेला आतां त्यांच्या मदतीची अपेक्षा नव्हती. शहर सोडण्यापूर्वी पुनः भेटण्याचें आणि त्यावेळीं आपण येथें कोणत्या कामासाठीं आलें,हें सांगण्याचें कबूल करून मथुरा आपले इष्ट हेतुसिद्धीस्तव नगरामध्यें निघून गेली.

दुसरे दिवशीं तेथील दरबारी रिवाजाप्रमाणें शेखर प्रथमतः रत्नाकर महाराजांच्या मुख्य प्रधानाचे भेटीस गेला. या मुख्य प्रधानाचें सुंदरसेन असें नांव असून त्याचा दर्जा सर्व राष्ट्रांमध्यें मोठा होता. सुंदरसेनानें प्रथम भेट घेऊन आपली खातरजमा करून घेतल्याखेरीज कोणालाही रत्नाकर राजाला भेटतां येत नसे. सुंदरसेन ज्या हवेलींत राहत असे, ती हवेली मोठी असून तिच्या मुख्य दरवाज्यावर चौकी होती. या हवेलीपाशीं प्रथम शेखर आपल्या सेवकासह आला असतां, चतुरकाला प्रथम आपण खास राजवाड्यांतच आलों असा भ्रम झाला. परंतु सध्यां आपल्या समोर असलेला इमारत राजाची नसून, त्याच्या एका प्रधानाची आहे, असें आपल्या धन्याच्या मुखानें ऐकून त्याला फार आश्चर्य वाटलें. प्रतापपुरचा दृढसंधाचा वाडा या प्रधानाच्या हवेलीपुढें एखाद्या झोंपड्याप्रमाणें दिसला असता. शेखराला प्रधानाच्या वाड्यापढें [illegible]ीवाल्यानें चाणाक्षपणानें त्याला वाड्यांत [illegible] तेथें गेल्यावर मात्र शेखराला थोर [illegible]च्या भेटीस जातांना पडणाऱ्या त्रासाचा अनुभव आला. तो सध्यां ज्या ठिकाणीं [illegible] होता, त्या ठिकाणीं एक कारकून [illegible] सुंदरसेनाच्या भेटीस येणाऱ्यांची [illegible]रीत होता. या कारकुनानें शेख[illegible] नांवगांव विचारलें, आणि त्यानें [illegible]ल्याबरोबर वाड्याच्या दुसऱ्या [illegible]. या ठिकाणीं आणखी एक [illegible] दिसला: पण त्याजपाशीं [illegible] नांवगांवाचा पाढा वा[illegible]. पहिल्या कारकुनानें [illegible] शेखरासंबंधाची मा[illegible] हिती [illegible] कुनानें मोठ्या आदरानें [illegible]शीं बसविलें आणि त्याला [illegible]. नंतर त्यानें त्याला अ[illegible]पासाऱ्यांत नेलें. तेथें सुंदर[illegible]पास आलेले कित्येक लोक [illegible]. [illegible]र हा राजपुत्र होता, म्ह[illegible] त्याला त्या प्रधानाची भेट [illegible] दिवस, व किती महिने हो[illegible] असते, हें स्पष्ट सांगतां [illegible]. सुंदरसेनाची भेट घ्यावयासाठी [illegible]या माणसाला प्रथमतः बाहेरच्या देवड[illegible] वाटाण्याच्या अक्षता मिळत. देवडीव[illegible] हात मऊ झाल्यास तो त्या माणस[illegible]ेल्या कारकुनाकडे घेऊन जाई. [illegible] कारकुनाची ममजूत झाल्यास [illegible]साला दुसऱ्या कारकुनाकडे आ[illegible] कारकुनापर्यंत गेल्यावर [illegible]ाप्रमाणें भेट घेऊं इच्छि[illegible]शीं भेटीच्या नजराण्य[illegible] सट्टा करीत असे. हा [illegible]ा त्या माणसाला सुंदरसे[illegible]से; आणि सौदा जम[illegible] माणसाची आणि [illegible] भेट होणें हें

तिसऱ्या दिवाणखान्यांत शेखराला फार वेळ बसावें लागलें नाहीं. त्या दिवाणखान्यांत त्याच्या पूर्वी सुंदरसेनाची भेट घेण्यासाठीं कित्येक लोक चातकाप्रमाणें वाट पहात बसले होते, पण शेखराचें नशीब मोठें म्हणून त्याचा राजकुलांत जन्म झालेला होता. या एकाच कारणामुळें त्याला फार वेळ तिष्ठत बसावें लागलें नाहीं। सुंदरसेनाचा एक सेवक त्या दिवाणखान्यांत आला; आणि शेखराला बरोबर घेऊन तो त्या मुख्य प्रधानाच्या सन्निध गेला. शेखर सध्यां दिवाणखान्यांत आला होता, त्या दिवाणखान्यांतील वैभव पाहून त्याला क्षणमात्र आश्चर्य वाटल्यावेरीज राहिलें नाहीं. अमात्य सुंदरसेन एका उत्कृष्ट सुखासनावर बसून आपल्या शेजारीं बसलेल्या एका कारकुनाला कांहीं मजकूर लिहावयास सांगत होता.

अमात्य सुंदरसेनाचें वय सुमारें पन्नास वर्षांचें होतें. त्याचा बांधा उंच असून तो अंगानें मजबूद होता. त्याच्या अधिकाराचें तेज त्याच्या मुद्रेवर स्पष्ट दिसून येत होतें, असें म्हणावयास हरकत नाहीं. त्याच्या अधिकारप्रमाणें त्यांच्या अंगावर वस्त्रालंकारही उत्कृष्ट प्रकारचे होते. त्याचे ओंठ सर्वदा मिटलेले असून, त्याच्या मुखावर एकाद्या विशेष प्रसंगावेरीज कोणत्याही प्रकारचा मनोविकार दृग्गोचर होत नसे. यामुळें त्या मुत्सद्याच्या अंतःकरणामध्यें काय चाललें असावें, याची कल्पना करतां येणें जवळ जवळ अशक्यच होतें. तथापि त्याच्या मुद्रेवरील ही गंभीरता नैसर्गिक नसून कृत्रिम होती. कारण ज्या वेळीं तो राजकारणावेरीज इतर गोष्टींत मन घाली, तेव्हां इतर सामान्य माणसांप्रमाणेंच तो आपले मनोभाव आपल्या मुद्रेवर प्रकट होऊं देत असे. तो पुरुष दिसण्यांत पाणीदार, हुषार, अभिमानी आणि धोरणी दिसत असे. शेखरानें त्या दिवाणखान्यांत प्रवेश केल्यावर सुंदरसेनानें एकवार मोठ्या सूक्ष्म दृष्टीनें त्याच्या शरीराचें नखशिखान्त अवलोकन केलें. नंतर जवळील एका आसनाकडे हात दाखवून त्या अमात्यानें राजपुत्राला त्यावर बसण्याचा खूण केली. त्यावेळच्या त्याच्या आविर्भावावरून आपल्या हातीं असलेलें काम लवकर आटोपून आपल्याशीं बोलत बसण्याची त्याची इच्छा आहे, ही गोष्ट शेखराच्या पूर्णपणें ध्यानीं आली. शेखर आसनावर बसल्यावर अमात्यानें आपल्या कारकुनाशीं बोलावयास प्रारंभ केला.

अमात्य आपल्या कारकुनाला म्हणाला–'तर मग माळवा प्रांताची सुभेदारी, मिळविण्यासाठीं सध्यां आपल्याकडे दोन अर्ज आलेले आहेत, त्यांपैकीं एकजण दहा हजार व दुसरा पंधरा हजार नजराणा देण्यास तयार आहे. यांपैकीं जो पंधरा हजारांची रक्कम पटवील त्यालाच ती सुभेदारी मिळाली पाहिजे, हें उघड आहे. बरें आणखी कोणाकोणाचे अर्ज आले आहेत?'

कारकून म्हणाला,–'वेणुग्रामच्या इनामदाराच्या दोघां मुलांमध्यें आपसांत तंटा लागला असून, प्रत्येकजण इनामतीवर आपला वारसा सांगतो. या दोघां बंधूकडून नजराण्याची रक्कम सारखी आली आहे, तर त्यांपैकीं कोणाचा वारसा आपण मान्य करावयाचा?'

अमात्य सुंदरसेन बोलला,–'त्यांत फारसा विचार करण्याचें कारण नाहीं. त्या दोघांनाही येथें बोलवा, आणि त्यांची गांठ घेऊन नजराण्याची रक्कम कोण वाढविलो तें पहा. जो ज्यास्त नजराणा देईल त्यालाच वतन मिळेल!'

अशाप्रकारें तो मुख्य प्रधान आपल्या समक्ष केवळ द्रव्याकडे पाहून कामाचे निकाल करीत आहे, ही गोष्ट शेखराला अगदीं आवडली नाहीं. ही काम करण्याची पद्धति पाहून शेखराला त्या मुख्य

प्रधानाचा मोठा तिटकारा आला; तथापि या प्रसंगीं आपले मनोविकार दाबून ठेवण्यांतच मजा आहे, हें ओळखून जणुं काय चाललेल्या भाषणाकडे आपलें लक्ष्यच नाहीं, असें दाखवीत त्या दिवाणखान्यांतील एका सुंदर तसबिरीकडे पहात शेखर स्तब्ध बसून राहिला होता. अमात्याला जीं कामें करण्याचा अखत्यार होता, तीं कामें करतांना तो फक्त द्रव्याकडे लक्ष देत असे, ही गोष्ट जगजाहीर होती, असें म्हणावयास हरकत नाहीं. या अमात्याशीं व्यवहार करण्याचा दृढसंधाला कधींच प्रसंग आलेला नसल्यामुळें त्याच्या या स्वभावाची शेखराला अजून माहिती नव्हती. शेखरासारख्या राजपुत्रादेखत अशाप्रकारें सट्टे जुळवितांना त्या मुख्य प्रधानाला अगदीं दिक्कत वाटली नाहीं. फार तर काय, शेखर जर आपलें एकादें खासगी काम करून घेण्यासाठीं आपणाकडे आला असला, तर आपलें काम अमुक मार्गानें लवकर होईल, असें त्याच्या मनांत यावें, असाही या प्रसंगीं त्याचा उद्देश असावा, असें म्हणावयास हरकत नाहीं. शिवाय अशा रीतीनें उघड उघड कामें केल्यास हा सर्व प्रकार अगदीं रीतसर चालला आहे, असें सामान्य बुद्धीच्या माणसाला वाटण्याचा संभव होता.

अशा रीतीनें आणखी एक दोन सट्टे जमविल्यावर सुंदरसेनानें आपल्या कारकुनास रजा दिली. तो निघून गेल्यावर सुंदरसेन शेखराकडे वळला, आणि त्यानें त्याला प्रथम कुशल प्रश्न विचारले. नंतर तो त्यास म्हणाला,–"आपले वडील दृढसंध महाराज, हे आमच्या राज्याचे आधारस्तंभ आहेत, असें आम्ही समजतों. ते जसे शूर आहेत, तसेच ते या गादीचे अभिमानी आहेत. त्यांचे वडील चिरजीव, सध्यां आमच्या भृगुकच्छ नगरांतील सैन्यामध्यें नोकरीस राहिले आहेत, हीच गोष्ट आपल्या घराण्याला या गादीचा अभिमान आहे, हें सिद्ध करण्याला पुरे आहे. शिवाय या प्रसंगीं एकाद्या भलत्या सलत्या नोकराला त्यांनीं इकडे न पाठवितां, प्रत्यक्ष तुम्हांसच इकडे पाठविलें, यावरून देखील त्यांचा स्वामिनिष्ठा व्यक्त होत आहे. आपण दर्शनास आलां, या गोष्टीचा राजाधिराजांस फार आनंद होईल, आणि ते आपलें चांगलें स्वागत करतील अशी माझी खात्री आहे."

शेखर म्हणाला,–"आपल्या या भाषणानें मला फार आनंद होत आहे. आमची स्वामींच्या चरणीं किती निष्ठा आहे, हें आपणांस विदित आहे, हें एका अर्थीं फार चांगलें आहे. आमच्या प्रमाणेंच आमच्या शेजारचे वृषपति राजेही या गादीचे हितचिंतक आहेत, आणि त्यांचा आमचा नात्याचा संबंध असल्यामुळें आपली स्वामिनिष्ठा विदित करण्याचें काम त्यांनीं मजकडेच सोंपविलें आहे."

इतकें भाषण झाल्यावर त्या चाणाक्ष प्रधानानें आपली दृष्टि कांहीं वेळ शेखरावर रोंखून धरिली, आणि तो त्याजकडे बारकाईनें पाहूं लागला. या वेळीं तो मुत्सद्दी शेखराच्या बाह्य शरीराचें अवलोकन करीत नसून, तो त्याच्या स्वभावाची पारख करीत होता. नंतर एकाएकीं कांहीं आठवल्यासारखें करून तो शेखराला म्हणाला,–"अहो राजपुत्र, आपल्या बागलाणांतील संस्थानिकांचें सध्यांच्या कारस्थानासंबंधानें एकंदरीनें काय मत आहे?"

शेखर म्हणाला,–"मला जी माहिती मिळाली आहे, तिजवरून मला इतकेंच सांगतां येतें कीं, बागलाणांतील संस्थानिकांपैकीं सर्व जरी नाहींत, तरी बरेच संस्थानिक रत्नाकर महाराजांस अनुकूल आहेत. कांहीं थोडेसे संस्थानिक निंबराजाला अनुकूल असावेत; असें जरी आहे, तरी सध्यांच्या परिस्थितींत कांहीं

बदल न झाल्यास युद्धप्रसंगीं राजाधिराजांस बागलाणांतून चांगली मदत मिळेल, यांत शंका नाहीं.''

शेखराचें हें भाषण ऐकून त्या मुत्सद्यानें आपली मुद्रा इतकी गंभीर केली कीं, त्याच्या त्या वेळच्या मुद्रेवरून आपण सांगितलेलें वर्तमान त्याला प्रिय वाटलें, कीं अप्रिय वाटलें, याचा शेखराला उलगडा होईना. अशा रीतीनें थोडा वेळ स्तब्ध राहिल्यानंतर सुंदरसेन अमात्य त्यास म्हणाला,–'' तर मग प्रसंग पडल्यास बागलाणांतील बरेच संस्थानिक आमच्या महाराजांस साह्य करण्यास सिद्ध होतील, असें मानावयास हरकत दिसत नाहीं; तथापि बागलाणांपैकींसुंदरपुरकर बृहद्रथ, अर्कपुरकर भीमरथ आणि नारायणपुरकर रणमत्त हे तिघे संस्थानिक निंबराजाला अनुकूल आहेत, असें मला खात्रीलायक आधारावरून कळलें आहे.''

शेखर म्हणाला,–' आपल्याला जें कांहीं समजलें आहे, तें सत्य आहे, असें म्हणावयास मलाही कांहीं हरकत दिसत नाहीं.'

पुनः आपली तीक्ष्ण दृष्टि शेखरावर रोखून सुंदरसेनानें त्यास प्रश्न केला,–'बरें, अशी कल्पना करा, कीं उद्यां बागलाणांत युद्ध सुरू झालें, व तेथील संस्थानिक जर आपापल्या पक्षानें भांडूं लागले, तर त्यामध्यें बागलाणापुरताच विचार केला, तर जय कोणाचा होईल ! आमच्या महाराजांस अनुकूल असलेल्या संस्थानिकांचा जय होईल अशी तुम्हाला खात्री वाटते काय !'

शेखरानें उत्तर केलें,–' आज मितीस जेवढे राजे आमच्या पक्षाला अनुकूल आहेत, तेवढ्यांमध्यें जर आणखी फाटाफूट झाली नाहीं, तर आमच्या पक्षाचा केव्हांही पराजय व्हावयाचा नाहीं, अशी माझ्या मनाची पक्की खात्री आहे.'

सुंदरसेनानें विचारलें,–' तुमच्या पक्षांत फाटाफूट होण्याचा संभव आहे कीं काय ?'

शेखर म्हणाला,–' मी फार वर्षें बागलाणांत नसल्यामुळें माझा तेथील संस्थानिकांशीं प्रत्यक्ष परिचय नाहीं. यामुळें कोणाचीं मनें कशीं आहेत, हें समजण्याला मजपाशीं साधन नाहीं. तथापि आम्ही प्रतापपुरकर वत्सपुरकर आणि आमच्या राज्याच्या हद्दीला हद्द भिडलेले आणखी तीन संस्थानिक, एवढे तरी रत्नाकरमहाराजांचा पक्ष शेवटपर्यंत सोडणार नाहींत, एवढी खात्री मी देऊं शकेन. इतरांसंबंधानें मला जरी इतकी खात्री देतां आली नाहीं, तरी ते यापुढें निंबराजाच्या पक्षाला अनुकूल होतील, असें मला वाटत नाहीं.'

सुंदरसेनानें विचारलें,–' नुकतीच बागलाणामध्यें तुमची आणि सुंदरपुरकरांची लहानशी चकमक झडली. त्या चकमकींत तुम्हाला जय मिळून तुम्ही बृहद्रथराजाकडून आणि रणमत्ताकडून मोठी खंडणी वसूल करून घेतली, असें वर्तमान आम्हांस समजलें आहे.'

शेखरानें उत्तर केलें,–' होय; आपणास जें समजलें तें अगदीं खरें आहे. परंतु या प्रसंगीं बृहद्रथानें आमची आगळीक केली असल्यामुळें—'

किंचित् चेष्टायुक्त स्वरानें सुंदरसेन बोलला,–' आगळिक कोणाचीही असो; सध्यां दृढसंधराजानें मात्र लाट साधला खरा !' नंतर आपल्या आसनावरून उठत तो शेखरास म्हणाला,–' आपणांस राजदर्शनाची इच्छा आहे, असें मला समजलें आहे. मी आतां तिकडेच जाणार आहें. खालीं रथ तयार आहे. मजबरोबर आपण माझ्याच रथांत बसून वाड्यांत चला. आपल्या सेवकालाही रथामागें उभें राहण्यास जागा मिळेल.' असें बोलून त्यानें आपल्या कारकुनाला हाक मारिली, आणि त्याला रथ जोडून तयार आहे कीं नाहीं, हें पहावयास सांगितलें. त्या प्रमाणें कारकुनानें मोठ्या घाईघाईनें चौकशी करून रथ तयार असल्याची वर्दी दिली.

प्रधानाचा मोठा तिटकारा आला; तथापि या प्रसंगीं आपले मनोविकार दावून देवण्यांतच मजा आहे, हें ओळखून जणुं काय चाललेल्या भाषणाकडे आपलें लक्ष्यच नाहीं, असें दाखवीत त्या दिवाणखान्यांतील एका सुंदर तसविरीकडे पहात शेखर स्तब्ध बसून राहिला होता. अमात्याला जीं कामें करण्याचा अखत्यार होता, तीं कामें करतांना तो फक्त द्रव्याकडे लक्ष देत असे, ही गोष्ट जगजाहीर होती, असें म्हणावयास हरकत नाहीं. या अमात्याशीं व्यवहार करण्याचा दृढसंधाला कधींच प्रसंग आलेला नसल्यामुळें त्याच्या या स्वभावाची शेखराला अजून माहिती नव्हती. शेखरासारख्या राजपुत्रादेखत अशाप्रकारें सट्टे जुळवितांना त्या मुख्य प्रधानाला अगदीं दिक्कत वाटली नाहीं. फार तर काय, शेखर जर आपलें एकादें खासगी काम करून घेण्यासाठीं आपणाकडे आला असला, तर आपलें काम अमुक मार्गानें लवकर होईल, असें त्याच्या मनांत यावें, असाही या प्रसंगीं त्याचा उद्देश असावा, असें म्हणावयास हरकत नाहीं. शिवाय अशा रीतीनें उघड उघड कामें केल्यास हा सर्व प्रकार अगदीं रीतसर चालला आहे, असें सामान्य बुद्धीच्या माणसाला वाटण्याचा संभव होता.

अशा रीतीनें आणखी एक दोन सट्टे जमविल्यावर सुंदरसेनानें आपल्या कारकुनास रजा दिली. तो निघून गेल्यावर सुंदरसेन शेखराकडे वळला, आणि त्यानें त्याला प्रथम कुशल प्रश्न विचारले. नंतर तो त्यास म्हणाला,– "आपले वडील दृढसंध महाराज, हे आमच्या राज्याचे आधारस्तंभ आहेत, असें आम्ही समजतों. ते जसे शूर आहेत, तसेच ते या गादीचे अभिमानी आहेत. त्यांचे वडील चिरजीव, सध्यां आमच्या भृगुकच्छ नगरांतील सैन्यामध्यें नोकरीस राहिले आहेत, हीच गोष्ट आपल्या घराण्याला या गादीचा अभिमान आहे, हें सिद्ध करण्याला पुरे आहे. शिवाय या प्रसंगीं एकाद्या भलत्या सलत्या नोकराला त्यांनीं इकडे न पाठवितां, प्रत्यक्ष तुम्हांसच इकडे पाठविलें, यावरून देखील त्यांची स्वामिनिष्ठा व्यक्त होत आहे. आपण दर्शनास आलां, या गोष्टीचा राजाधिराजांस फार आनंद होईल, आणि ते आपलें चांगलें स्वागत करतील अशी माझी खात्री आहे."

शेखर म्हणाला,–"आपल्या या भाषणानें मला फार आनंद होत आहे. आमची स्वामींच्या चरणीं किती निष्ठा आहे, हें आपणांस विदित आहे, हें एका अर्थीं फार चांगलें आहे. आमच्या प्रमाणेंच आमच्या शेजारचे वृषपति राजेही या गादीचे हितचिंतक आहेत, आणि त्यांचा आमचा नात्याचा संबंध असल्यामुळें आपली स्वामिनिष्ठा विदित करण्याचें काम त्यांनीं मजकडेच सोंपविलें आहे."

इतकें भाषण झाल्यावर त्या चाणाक्ष प्रधानानें आपली दृष्टि कांहीं वेळ शेखरावर रोंखून धरिली, आणि तो त्याजकडे बारकाईनें पाहूं लागला. या वेळीं तो मुत्सद्दी शेखराच्या बाह्य शरीराचें अवलोकन करीत नसून, तो त्याच्या स्वभावाची पारख करीत होता. नंतर एकाएकीं कांहीं आठवल्यासारखें करून तो शेखराला म्हणाला,–"अहो राजपुत्र, आपल्या बागलाणांतील संस्थानिकांचें सध्यांच्या कारस्थानासंबंधानें एकंदरीनें काय मत आहे?"

शेखर म्हणाला,–"मला जी माहिती मिळाली आहे, तिजवरून मला इतकेंच सांगतां येतें कीं, बागलाणांतील संस्थानिकांपैकीं सर्व जरी नाहींत, तरी बरेच संस्थानिक रत्नाकर महाराजांस अनुकूल आहेत. कांहीं थोडेसे संस्थानिक निंबराजाला अनुकूल असावेत; असें जरी आहे, तरी सध्यांच्या परिस्थितींत कांहीं

बदल न झाल्यास युद्धप्रसंगीं राजाधिराजांस बागलाणांतून चांगली मदत मिळेल, यांत शंका नाहीं.'

शेसराचें हें भाषण ऐकून त्या मुत्सद्यानें आपली मुद्रा इतकी गंभीर केली कीं, त्याच्या त्या वेळच्या मुद्रेवरून आपण सांगितलेलें वर्तमान त्याला प्रिय वाटलें, कीं अप्रिय वाटलें, याचा शेखराला उलगडा होईना. अशा रीतीनें थोडा वेळ *स्तब्ध राहिल्यानंतर सुंदरसेन अमात्य त्यास* म्हणाला,–" तर मग प्रसंग पडल्यास बागलाणांतील बरेच संस्थानिक आमच्या महाराजांस साह्य करण्यास सिद्ध होतील, असें मानावयास हरकत दिसत नाहीं; तथापि बागलाणांपैकीं सुंदरपुरकर बृहद्रथ, अर्कपुरकर भीमरथ आणि नारायणपुरकर रणमत्त हे तिघे संस्थानिक निंबराजाला अनुकूल आहेत, असें मला खात्रीलायक आधारावरून कळलें आहे."

शेखर म्हणाला,–' आपल्याला जें कांहीं समजलें आहे, तें सत्य आहे, असें म्हणावयास मलाही कांहीं हरकत दिसत नाहीं.'

पुनः आपली तीक्ष्ण दृष्टि शेखरावर रोखून सुंदरसेनानें त्यास प्रश्न केला,–'बरें, अशी कल्पना करा, कीं उद्यां बागलाणांत युद्ध सुरू झालें, व तेथील संस्थानिक जर आपापल्या पक्षानें भांडूं लागले, तर त्यामध्यें बागलाणापुरताच विचार केला, तर जय कोणाचा होईल ! आमच्या महाराजांस अनुकूल असलेल्या संस्थानिकांचा जय होईल अशी तुम्हाला खात्री वाटते काय !'

शेखरानें उत्तर केलें,–' आज मित्तीस जेवढे राजे आमच्या पक्षाला अनुकूल आहेत, तेवढ्यांमध्यें जर आणखी फाटाफूट झाली नाहीं, तर आमच्या पक्षाचा केव्हांही पराजय व्हावयाचा नाहीं, अशी माझ्या मनाची पक्की खात्री आहे.'

सुंदरसेनानें विचारलें,–' तुमच्या पक्षांत फाटाफूट होण्याचा संभव आहे कीं काय ?'

शेखर म्हणाला,–' मी फार वर्षें बागलाणांत नसल्यामुळें माझा तेथील संस्थानिकांशीं प्रत्यक्ष परिचय नाहीं. यामुळें कोणाचीं मनें कशीं आहेत, हें समजण्याला मजपाशीं साधन नाहीं. तथापि आम्ही प्रतापपुरकर वत्सपुरकर आणि आमच्या राज्याच्या हद्दीला हद्द भिडलेले आणखी तीन संस्थानिक, एवढे तरी रत्नाकरमहाराजांचा पक्ष शेवटपर्यंत सोडणार नाहींत, एवढी खात्री मी देऊं शकेन. *इतरांसंबंधानें मला जरी इतकी खात्री देतां* आली नाहीं, तरी ते यापुढें निंबराजाच्या पक्षाला अनुकूल होतील, असें मला वाटत नाहीं.'

सुंदरसेनानें विचारलें,–' नुकतीच बागलाणामध्यें तुमची आणि सुंदरपुरकरांची लहानशी चकमक झडली. त्या चकमकींत तुम्हाला जय मिळून तुम्ही बृहद्रथराजाकडून आणि रणमत्ताकडून मोठी खंडणी वसूल करून घेतली, असें वर्तमान आम्हांस समजलें आहे.'

शेखरानें उत्तर केलें,–' होय; आपणास जें समजलें तें अगदीं खरें आहे. परंतु या प्रसंगीं बृहद्रथानें आमची आगळीक केली असल्यामुळें—'

किंचित् चेष्टायुक्त स्वरानें सुंदरसेन बोलला,–' आगळिक कोणाचीही असो; सध्यां दृढसंधराजानें मात्र लाट साधला खरा !' नंतर आपल्या आसनावरून उठत तो शेखरास म्हणाला,–' आपणांस राजदर्शनाची इच्छा आहे, असें मला समजलें आहे. मी आतां तिकडेच जाणार आहें. खालीं रथ तयार आहे. मजबरोबर आपण माझ्याच रथांत बसून वाड्यांत चला. आपल्या सेवकालाही रथामागें उभें राहण्यास जागा मिळेल.' असें बोलून त्यानें आपल्या कारकुनाला हाक मारिली, आणि त्याला रथ जोडून तयार आहे कीं नाहीं, हें पहावयास सांगितलें. त्या प्रमाणें कारकुनानें मोठ्या घाईघाईनें चौकशी करून रथ तयार असल्याची वर्दी दिली.

नंतर सुंदरसेनानें आपला दरबारी भपकेदार पोषाक अंगावर चढविला, आणि तो शेखरासह माडीवरून खालीं उतरला. यावेळीं सुद्धां सुंदरसेनानें आपल्या कारकुनास कित्येक कामांसंबंधानें सारखे हुकूम सोडण्याचा सपाटा सुरू ठेविला होता. सुंदरसेनानें गाडीवरून खालीं उतरून रथापाशीं येईपर्यंत कारकुनाला जितक्या गोष्टी सांगितल्या होत्या, तितक्या ध्यानांत धरणें हें फार अवघड काम होतें. सुंदरसेन अनेक कामांसंबंधानें एकामागून एक इतक्या जलदीनें आज्ञा करीत होता कीं, त्याची भेट घेण्यासाठीं जे लोक त्या वाड्यामध्यें जमलेले होते, त्यांना त्या आज्ञा ऐकून मोठा अचंबा वाटला, आणि इतक्या गोष्टींसंबंधानें तो सहज बोलत आहे, हें पाहून त्याच्या बुद्धीची तारीफ करण्यावांचून त्यांना गत्यंतरच नव्हतें. त्यापैकीं कित्येकांना तर आज्ञा करणाऱ्या त्या मुत्सद्याची तारीफ करावी, कीं प्रत्येक आज्ञेला हात जोडून, मान खालीं करून होय म्हणणाऱ्या त्या कारकुनाच्या लवचिक हाडांची तारीफ करादी, याचा थोडा पेंच पडला होता।

अनेक लोकांचे मुजरे घेत घेत सुंदरसेन शेखरासह रथापाशीं आला; ते दोघे रथांत बसल्यानंतर रथाच्या मागच्या बाजूला त्या दोघांचे दोन सेवक उभे राहिले. ह्या रथाला जिकडे तिकडे सोन्याचांदीनें शोभा आणिलेली होती. रथामध्यें मखमलीच्या गाद्या घातल्या होत्या, व त्या गाद्यांवर मऊ रेशमाची सुंदर वेलबुट्टी काढलेली होती. रथाला चार बळकट आणि वेगवान् घोडे लाविलेले असल्यामुळें, भरजरी पोषाक करून ऐटीनें आसनावर बसलेल्या सारथ्यानें हातांतील चाबकाचा नुसता इषारा केल्याबरोबर रथ वायुवेगानें पळूं लागला.

शहरांतील अनेक रस्ते एकामागून एक मागें टाकल्यानंतर सुंदरसेनाचा रथ राजवाड्यापाशीं येऊन दाखल झाला. राजवाड्याच्या प्रवेशद्वारावर सुमारें पन्नास हलकारे हातीं रंगीत काठ्या घेऊन दुतर्फा उभे होते. या हलकाऱ्यांच्या रांगांमधून त्यांचे मुजरे घेत शेखर आणि सुंदरसेन रथामधून चालले होते. वाड्यापुढील पटांगणामध्यें त्यांचा रथ थांबल्यानंतर ते दोघेजण रथांतून खालीं उतरले. सुंदरसेनाला पाहतांच भालदार चोपदारांनीं एकवार ललकारणी करून ते त्याला मार्ग दाखविण्यासाठीं त्याच्यापुढें चालूं लागले. राजाधिराज रत्नाकर महाराजांची स्वारी या वेळीं तिसऱ्या मजल्यावरील अंतःपुरामध्यें बसलेली असल्यामुळें त्यांची भेट घेण्यासाठीं सुंदरसेन आणि शेखर यांस राजवाड्याच्या पुढच्या भागांतील अनेक दिवाणखाने मागें टाकून मागच्या भागांतील एका दिवाणखान्यांत जावयाचें होतें. पहिल्या मजल्यावर जाण्यासाठीं जो जिना बांधलेलेला होता, तो अत्यंत विस्तृत असून काळ्या घोटीव दगडांनीं बांधिलेला होता. या जिन्याच्या प्रत्येक चौथ्या पायरीवर नखाशिखान्त शस्त्रांनीं लादलेला एकेक पाहारेकरी उभा होता. प्रत्येक पाहारेकरी आपल्या जागेवर इतका निश्चल उभा होता कीं, जर पुढून जात असलेल्या त्या दोघांस मुजरे केले नसते, तर तो जिवंत नसून एकादा पुतळा तेथें उभा केलेला आहे कीं काय, असा त्याला भास झाला असता. हा जिना चढून गेल्यावर ते दुसऱ्या मजल्यावरील एका दिवाणखान्यांत आले. या दिवाणखान्यांत एक सतरंजी टाकलेली होती. त्याशिवाय तेथें विशेष सामानसुमान कांहींच नव्हतें. तो दिवाणखाना मागें टाकून ते पुढें चालले असतां एकापेक्षां दुसरा अधिक, असे अनेक भव्य दिवाणखाने शेखराच्या दृष्टीस पडले. त्या वाड्यांतील अपार वैभव पाहून शेखराचे सुद्धां डोळे दिपले. पांच चार दिवाणखाने मागें टाकल्यावर त्यांस तिसऱ्या मजल्यावर जाण्याचा जिना लागला. हा

जिना संगमरवरी दगडांनीं बांधिलेला असून, तेथें सुद्धां प्रत्येक चवथ्या पायरीवर एकेक सशस्त्र शिपाई उभा होता. हा जिना चढून ते तिसऱ्या मजल्यावर गेले. तेथील प्रत्येक दिवाणखान्यांत ऐषआरामाच्या पदार्थांची इतकी समृद्धि होती कीं, तेथें असलेल्या पदार्थांपैकीं पुष्कळ पदार्थ शेखरानें आपल्या साऱ्या जन्मांत देखील पाहिलेले नव्हते. यां दिवाणखान्यांतील शोभिवंत पदार्थांकडे नुसती नजर टाकीत, शेखर सुंदरसेनाच्या मागून चालला होता. एक दोन दिवाणखाने मागें टाकल्यावर त्याला मंजुळ गायनाचा ध्वनि ऐकूं आला. अशा रीतीनें पुढें गेल्यावर ते अंतःपुरापाशीं आले. अंतःपुरामध्यें महाराजांच्या खास परवानगीवांचून कोणाही पुरुषास प्रवेश करण्याची सक्त मनाई होती, म्हणून त्या दोघांस तेथें कांहीं वेळ उभें रहावें लागलें. त्यांना आलेले पहातांच कंचुकी किंवा अंतःपुरावर देखरेख करणारा कामदार पुढें झाला, आणि सुंदरसेनाला प्रणाम करून त्यानें शेखरासंबंधानें थोडीशी चौकशी केली. नंतर तो अंतःपुरामध्यें गेला व थोड्याच वेळानें परत येऊन त्या दोघांस आपल्याबरोबर त्यानें आंत नेलें.

सध्यां ते ज्या ठिकाणीं आले होते, तो एक विस्तीर्ण दिवाणखाना असून शेखरानें पूर्वी पाहिलेल्या सर्व दिवाणखान्यांहून तो अतिशय सुशोभित होता. त्या दिवाणखान्याचे भिंतींस अनेक प्रकारचे रंग भरून काढलेल्या वेलबुट्ट्यांनीं शोभा आणिली होती. तेथें सोनें, रुपें, हस्तिदंत, रेशीम, मोत्यें, पाचू वगैरे मूल्यवान् पदार्थांखेरीज इतर पदार्थ दिसतच नव्हते, असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. त्या दिवाणखान्यामध्यें कित्येक हस्तिदंताचीं आसनें मांडून ठेविलेलीं असून, त्यांवर मखमलीचीं आच्छादनें घातलेलीं होतीं. यांपैकीं दोन आसनांवर ते दोघेजण बसले. या दिवाणखान्यापलीकडच्या एका दिवाणखान्यांत सध्यां एका उत्तम गाणारणीचें गाणें सुरू होतें. त्या गाण्याचा अर्थ जरी पूर्ण शृंगारपर होता, तरी गाणारणीचा आवाज अत्यंत मंजुळ असल्यामुळें तें गायन शेखराला ऐकावेंसें वाटत होतें.

ते दोघे सुमारें अर्धं घटका तेथें बसून राहिले होते. त्यानंतर भालदाराची एक ललकारणी त्यांस ऐकूं आली, तीवरून राजाधिराज रत्नाकर महाराजांची स्वारी येत आहे, असें त्यांस समजलें, आणि ते दोघेही मोठ्या घाईनें उठून उभे राहिले.

राजाधिराज रत्नाकर महाराजांचें वय सुमारें पस्तीस वर्षांचें होतें. वास्तविक पाहिलें, तर तो या वेळीं भरज्वानीमध्यें असल्यामुळें त्याचें शरीर चांगलें धष्टपुष्ट असावें; पण तें तसें नसून बरेंच कृश होतें व त्यावर अकालीं जरेचीं चिह्नें स्पष्ट दिसत होतीं. त्याच्या मस्तकाचे एकूनएक केस पिकले होते, आणि त्याच्या कपाळावर भलें मोठें टक्कल पडलें होतें. त्याच्या सर्वांगास सुरकुत्या पडलेल्या स्पष्ट दिसत होत्या. डोळे खोल गेले होते, आणि गालफडें बसलेलीं असून, त्यांचीं हाडें मात्र वर दिसत होतीं. जरी या प्रसंगीं त्याच्या अंगावर बहुमूल्य वस्त्रालंकार होते, तरी त्यामुळें त्याच्या देहाला विशेष शोभा येत नव्हती. त्याची मुद्रा बरीच उग्र दिसे; पण तिजवर राजतेज असल्यामुळें, त्या तेजानें मात्र ती उग्र दिसत नसे. तारुण्याचा दुरुपयोग केल्यामुळें त्याच्या शरीराची अशी दुर्दशा झालेली होती. यौवन, संपत्ति, अधिकार, आणि मूर्खत्व हीं विनाशाचीं चारही साधनें रत्नाकराला अनुकूल होतीं.

राजा अविचारी असला म्हणजे आपमतलबी माणसांचें चांगलें फावतें. रत्नाकर राजाला राज्यकारभाराचा मोठा तिटकारा असे, त्यामुळें अमात्य सुंदरसेन आणि न्यायमंत्री देवशर्मा, यांजवर राज्याचा सर्व

भार टाकून तो स्वतः अनेक प्रकारच्या विलासांमध्यें नेहमीं निमग्न असे. त्याच्या-भोंवतीं वारयोषितांचा मेळा नाहीं असें केव्हांही होत नसे. त्याची राणी शैवलिनी ही जरी अत्यंत सुंदर होती, तरी रत्नाकराचें तिजवर अगदीं प्रेम नव्हतें. बाह्यतः तो जरी तिचा मान राखी, तरी एकादी नाटकशाळा सन्निध असतां रत्नाकराला जसा आनंद होत असे, तसा त्याला तिच्या सहवासापासून होत नसे. नाटकशाळांसह मद्यपान करून द्यूतक्रीडा करण्यांत त्या राजाला स्वर्गसुखाहून अधिक सुख वाटत असे. आपल्या राज्यांत चाललें आहे काय, आणि आपल्या प्रजेचें रक्षण योग्य रीतीनें होत आहे किंवा नाहीं, याची तो कधींही चौकशी करीत नसे. आपल्या भांडारांत द्रव्य किती आहे, आणि आपल्या राज्याचा वसूल किती येतो, खर्च किती होतो, आपली प्रजा सुखी आहे कीं दुःखी आहे, इत्यादि गोष्टींचा त्यानें कधींही विचार केला नव्हता; आणि त्याच्या स्वार्थी प्रधानांनींही या गोष्टी त्याच्या कानांवर जाऊं न देण्याचा निश्चय केला होता. अमात्य सुंदरसेन आणि न्यायमंत्री देवशर्मा यांचें इतर बाबतींत जरी वैमनस्य होतें, तरी राज्यकारभारासंबंधीं कोणत्याही प्रकारची उद्वेगजनक वार्ता राजाच्या कानांवर जाऊं न देण्याच्या बाबतींत मात्र त्यांचें एकमत होतें. ते दोघे प्रधान परस्परांचें वैर करीत असत, पण हें वैर अद्यापि गुप्त होतें. त्या दोघां प्रधानांची परस्परांविरुद्ध जीं कारस्थानें चाललीं होतीं, त्यांचें वर्णन कथानुरोधानें पुढें येईलच.

शेखर आणि सुंदरसेन हे ज्या दिवाणखान्यांत बसले होते, त्या दिवाणखान्यांतील एका उच्चासनावर रत्नाकर राजा आरूढ झाला, आणि त्यानें त्या दोघांस दोन आसनांवर बसावयाची आज्ञा केली. ते दोघे आपापल्या आसनांवर बसतात न बसतात, तोंच न्यायमंत्री देवशर्मा त्या ठिकाणीं येऊन थडकला. देवशर्मा हा जातीनें ब्राह्मण असून, त्यानें त्यावेळच्या पद्धतीप्रमाणें अंगावर फक्त एक ऊर्णावस्त्र घेतलें होतें व मस्तकालाही तशाच प्रकारचें दुसरें वस्त्र गुंडाळलेलें होतें. देवशर्मा हा राजपुरोहित असून, त्याजकडे न्यायाधिशाचेंही काम असे, त्यामुळें अष्टप्रधानांमध्यें त्याची गणना होत असे. तो पुरोहित असल्यामुळें त्याला वारंवार राजवाड्यामध्यें येण्याचें काम पडे, म्हणून अंतःपुरांतील कांहीं विवाक्षित भाग खेरीज करून त्याला सर्व राजवाड्यांत वाटेल तिकडे फिरण्याची सदर परवानगी होती. सुंदरसेनाचें राजापाशीं फार वजन होतें. राजा बाह्यात्कारीं राणीचा मान राखीत असे, असें वर सांगितलेंच आहे, त्यामुळें देवशर्मा आपल्या मनांतील गोष्ट साध्य करणें झाल्यास राणीला मध्यें घालून आपलें काम करून घेत असे. राजाचें आपल्या पत्नीवर जरी प्रेम नव्हतें, तरी तो तिचा द्वेष करीत नसे, इतकें येथें सांगणें इष्ट आहे.

देवशर्मा तेथें आला, ही गोष्ट सुंदरसेनाला आवडली नाहीं; आणि आपल्या पूर्वीच सुंदरसेन राजापाशीं आलेला पाहून देवशर्म्यालाही वाईट वाटलें. पण त्या दोघां धूर्तांनीं आपापले मनोविकार दाबून ठेवून परस्परांचा योग्य शब्दांनीं मान-सन्मान केला; सुंदरसेन आणि शेखर राजाच्या डाव्या बाजूला आणि देवशर्मा उजव्या बाजूला, असे ते आपापल्या अधिकाराप्रमाणें आसनांवर अधिष्ठित झाले.

नंतर रत्नाकर राजा सुंदरसेनाकडे वळून म्हणाला,–'प्रधानजी, आज तुम्ही आपण होऊन आमच्या दर्शनास आलां म्हणून बरें झालें; नाहींतर आम्ही तुम्हांला आज पोलावणें पाठविणार होतों. आज आम्हांला पंचवीस हजार मोहरांची जरूर आहे; तेवढ्या ताबडतोब पाठवून द्या. बरें, तुमच्या बरोबरचा तरुण कोण आहे? आतां आम्हांला

आमच्या कंचुकानें यांचें कायसेसें नांव सांगितलें होतें, पण तें आमच्या ध्यानांत राहिलें नाहीं.'

सुंदरसेनानें उत्तर दिलें,–'वागलाणांतील महाशूर संस्थानिक जे दृढसंध महाराज त्यांचे हे कनिष्ठ चिरंजीव असून हे आपली स्वामिभक्ति प्रदर्शित करण्यासाठीं राजाधिराजांच्या चरणासन्निध आले आहेत.'

रत्नाकर बोलला,–'दृढसंध हे मोठे शूर असून त्यांना आमचा मोठा अभिमान आहे, असें आम्ही ऐकिलें आहे. त्यांचे हे चिरंजीव आपल्या वडिलांप्रमाणेंच तरवार-बहाद्दर निपजतील आणि आपल्या शौर्याचा स्वामिनिष्ठकडे उपयोग करितील, अशी आम्हांस उमेद आहे. वागलाणांतील लोक मोठे शूर असतात, असें आम्ही ऐकिलें आहे, तें सत्य आहे कीं नाहीं!'

सुंदरसेन बोलला,–'राजाधिराजांचें भाषण सर्वथैव खरें आहे!'

रत्नाकर बोलला,–'वागलाणामध्यें बहुतेक वस्ती भिल्लांची आहे, आणि तिकडील लोक मोठे धिप्पाड व रांकट असतात, असेंही आमच्या ऐकिवांत आहे, या तरुणासारखे सुंदर व उमदे पुरुष तिकडे असतील, अशी आमची कल्पना नव्हती.'

राजपुरोहित देवशर्मा बोलला,–'स्वामीचें भाषण यथार्थ आहे. वागलाणांतील क्षत्रिय तेवढे अस्सल क्षत्रिय असल्यामुळें त्यांच्या घराण्यांत मात्र अशीं, उमदीं माणसें निपजतात. या जहागिरदाराखेरीज इतर वस्ती भिल्ल, कातकरी, कोळी, वगैरे लोकांची असून ते लोक मोठे धिप्पाड, शूर, आज्ञाधारक आणि साहसी आहेत, अशी त्या लोकांची प्रसिद्धि आहे.'

रत्नाकर बोलला,–'एकून आम्ही ऐकलें तें कांहीं खोटें नव्हे. कायहो, दृढसंध राजाचे चिरंजीव, तुमचें कुशल आहेना? तुमच्या वागलाणाकडील वर्तमान काय आहे?'

शेखरानें मोठ्या नम्रतेनें रत्नगितलें प्रणाम करून आपण कोणत्या काम येथें आलों आहों, हें त्यास इत्थंभूत रीतीनें दन केलें. राजानेंही शेखराला कित्येक प्रश्न विचारले, आणि त्यानें त्या प्रश्नांचीं उत्तरें अगदीं मोकळ्या मनानें द्यावयास प्रारंभ केला. परंतु हें शेखराचें वर्तन तेथें असलेल्या दोघां मंत्र्यांस अगदीं आवडलें नाहीं. सध्यांच्या राजकारणासंबंधानें तुझें मत काय आहे, असा राजानें शेखराला प्रश्न केला असून तो त्या प्रश्नाचें उत्तर देण्याच्या बेतांत होता, इतक्यांत देवशर्मा मध्येंच म्हणाला,–'अरे तरुण गृहस्था, जरा थांब, आणि तूं सध्यां कोठें असून कोणाच्या प्रश्नाचीं उत्तरें देत आहेस, या गोष्टीचा शांतपणें विचार कर! तूं आतां असें सांगितलेंस कीं, वागलाणांतील बरेच संस्थानिक राजनिष्ठ आहेत, अर्थात् बाकीचे अराजानिष्ठ आहेत, असें म्हणण्याचा तुझा आशय दिसतो; परंतु स्वामींचा प्रभाव याच राज्यामध्यें काय, पण या राज्याबाहेर शेंकडों कोस गाजत असतां अशा प्रकारचे अराजक पुरुष तुमच्या वागलाणांत निपजतील तरी कसे?'

शेखर पूर्वीप्रमाणेंच शांतपणें बोलला,–'अहो सन्मान्य मंत्री, आपल्या भाषणाचा रोख माझ्या लक्ष्यांत आला; तथापि जी खरी गोष्ट आहे, ती बोलणें भाग आहे.'

राजपुरोहित अत्यंत गंभीरपणाचा आव घालीत बोलला,–'अरे तरुणा, 'न ब्रूयात्सत्यमप्रियम्' सत्य गोष्ट असून ती जर स्वामीच्या कर्णाला प्रिय वाटण्यासारखी नसेल, तर ती बोलूं नये, असें मनुस्मृतीचें वचन आहे, हें तुझ्या ध्यानीं नाहीं, असें दिसतें. तसेंच आपण राजनिष्ठ आहों असें भासविण्याकरितां इतरांवर अराजानिष्ठेचा आरोप करणें हा अपराध फार भयंकर आहे, हेंही तूं विसरला असशील! आमची खात्री आहे कीं, आमच्या सगळ्या राज्यांत स्वामिद्रोही पुरुष निपजावयाचाच नाहीं!'

भार वरानें उत्तर केलें,–' अहो मंत्री, ज्या-
विलास आपण होऊन बोलावयाचें असेल,
भोंवर्‌ विळीं अप्रिय बोलूं नये, ही गोष्ट जरी
के- खरी आहे, तरी आपणांस कोणीं प्रश्न
केला असतां त्याचें उत्तर देतांना आपण सत्य तेंच बोललें पाहिजे. अर्थात् राजाधिराज मला जे प्रश्न विचारतील, त्यांचीं उत्तरें जीं माझ्या मताप्रमाणें सत्य आहेत, तींच देणें हें माझें कर्तव्य आहे. '

पुरोहितानें शेखराच्या भाषणाला अडथळा केला; इतकेंच नव्हे; तर तो जें कांहीं सांगत होता, तें त्याला स्पष्टपणें बोलूं न देण्याचा त्या पुरोहितानें यत्न केला, ही गोष्ट राजाला रुचली नाहीं; म्हणून तो देवशर्म्याकडे रोषपूर्वक अवलोकन करीत शेखराला म्हणाला,–' या प्रसंगीं सत्य गोष्टी काय आहेत, त्या आम्हांला समजल्याच पाहिजेत. '

तथापि देवशर्मा मध्येंच बोलला,–' राजाधिराज, हा तरुण गृहस्थ याला स्वतःला जें काय वाटत आहे, तें आपणांस सांगत आहे, इकडे आपलें लक्ष्य असावें. या तरुणाचें मत खोटें आहे, असें आम्ही अनेक प्रमाणांवरून सिद्ध करून देऊं. ' '

रत्नाकर आढ्यतापूर्वक बोलला,–" तसेंही असेल कदाचित्! परंतु सध्यांच्या नाजुक प्रसंगीं आपण प्रत्येकाचें मत काय आहे हें शांतपणें ऐकून घेऊन त्याचा योग्य विचार केला पाहिजे. कदाचित् या तरुणाचेंच मत खरें असून तुम्हीं जीं प्रमाणें म्हणतां तींच खोटीं ठरणार नाहींत, आणि आपली फसगत होणार नाहीं, असें कशावरून म्हणावें! तो लबाड निंबराज आमच्याशीं लढाईची तयारी करीत आहे, ही गोष्ट अगदीं खोटी आहे, असें आठ दिवसांपूर्वी तुम्ही मोठ्या जोरानें प्रतिपादन करीत होतां, आणि आपल्या भाषणाच्या समर्थनासाठीं शेंकडों प्रमाणें दाखवीत होतां. परंतु तुमचीं तीं भाषणें सर्व व्यर्थ होऊन तो लबाड निंबराज युद्धाची तयारी करीत आहे, अशी तुमच्या मनाची आतां तरी खात्री झाली आहे कीं नाहीं?'

सुंदरसेन बोलला,–' तथापि ऐकलेल्या बातम्या साफ खोट्या असें समजून आम्हीं स्वस्थ मात्र बसलों नाहीं. निंबराजा जर आमच्याशीं युद्ध करूं लागेल, तर त्याच्याशीं दोन हात करून त्याला धूळ चारण्याची आमची तयारी आहे! '

रत्नाकर म्हणाला,–' तशी तुमची तयारी असणें हें अगदीं साहजिक आहे. निंबराजानें आमच्यावर स्वारी केली, तर तींत त्याचा पराजय होईल यांत शंकाच नाहीं. परंतु कोणतीही गोष्ट करण्यापूर्वी साधकबाधक प्रमाणांचा योग्य विचार केला पाहिजे, इतकेंच आमचें म्हणणें आहे. कां अमात्य! आमचें भाषण योग्य आहे कीं नाहीं? '

देवशर्मा म्हणाला,–' नाविष्णुः पृथिवीपतिः!' राजा म्हणजे प्रत्यक्ष विष्णूचा अवतार! त्याच्या मुखानें अयोग्य भाषण कधीं निघावयाचेंच नाहीं. '

सुंदरसेन बोलला,–' न्यायमंत्री यथार्थ बोलले! राजाधिराजांचें बुद्धिवैभव अलोट आहे, म्हणूनच आमच्या सारख्या सामान्य बुद्धीच्या माणसांच्या हातून एवढाली महत्त्वाचीं कामें पार पडत आहेत. '

रत्नाकर म्हणाला,–' म्हणूनच आम्हीं आतां या तरुणाला कित्येक प्रश्न विचारणार आहों. तो जीं उत्तरें देईल तीं आपण ऐकून घेऊं आणि त्यावरून आपणांस काय काय अनुमानें बांधितां येतील, हें आपण पाहूं. '

देवशर्मा अत्यंत गंभीरपणाचा आव घालून बोलला,–' राजाधिराज, आपण स्वता जर अशाप्रकारच्या निराधार गप्पांचा विचार करूं म्हणाल, तर आपणांला निरनिराळ्या असंबद्ध गप्पा ऐकावयाला सुद्धां वेळ पुरा पडणार नाहीं, मग विचार करण्याला फुरसद कोठून मिळणार! लोक पराचा कावळा करण्यांत मोठे कुशल असतात. या लढाईसंबंधानें रोजच्या रोज

ज्या बातम्या येतात त्या इतक्या असंभवनीय व मूर्खपणाच्या असतात कीं, आम्हाला त्या बातम्या सांगणाऱ्या लोकांची कींव येते ! '

सुंदरसेन म्हणाला,–'यांचें भाषण अगदीं खरें आहे. अलिकडे या युद्धासंबंधानें आमच्याकडे गुप्त बातम्या सांगणारे इतके लोक येतात कीं, त्यांच्या गप्पा ऐकून त्यांच्या खरेखोटेपणाचा निर्णय करण्यासाठीं मीं अत्यंत धूर्त अशा पांच माणसांची नेमणूक केली आहे, यण त्यांना खुद्द त्या गोष्टी ऐकण्यास सवड होईनाशी झाली आहे. म्हणून मला आणखी कांहीं हुषार माणसें त्या कामावर नेमणें जरूर झालें आहे. '

सुंदरसेन आणि देवशर्मा यांचें जरी आपसांत वैमनस्य होतें, तरी ते दोघे या वेळीं अगदीं एकमतानें बोलत होते. सुंदरसेन आपल्या विरुद्ध न जातां आपल्या भाषणास पुष्टि देत आहे, हें पाहून देवशर्म्याला फार समाधान होत होतें, आणि त्यानें तें आपलें समाधान सुंदरसेनाकडे हळूच दृष्टिक्षेप करून व्यक्त केलें. ही गोष्ट राजाच्या ध्यानीं आली नाहीं, परंतु ती शेखरानें पाहिली होती.

यानंतर राजाधिराजानें शेखराचे दोन प्रश्न विचारले, आणि [illegible] सरळ उत्तरें दिलीं [illegible] शेखराला [illegible] वडीलबंधु [illegible] गादीचा [illegible] दिसून [illegible] आपली स्वामिभक्ति [illegible] साठीं आपल्या पुत्राला आम्हांकडे पाठविलें हें फार चांगलें झालें. बरें, तूं एकटाच येथें आला आहेस कीं बरोबर आणखी लवाजमा आहे ? "

सुंदरसेनानें उत्तर दिलें, " हे राजपुत्र सहकुटुंब–आपल्या पत्नीसह–राजदर्शनासाठीं आलेले आहेत. यांचा नुकताच विवाह झाला असूनसुद्धां हे इतक्या दूरच्या प्रवासास निघाले, या गोष्टीवरून देसंमांगितलें स्वामिनिष्ठा व्यक्त होत आहे ! "

रत्नाकरानें विचारलें, " असें कां ? यांनीं सपत्नीक येथें आले आहेत का ? तर मग आम्हांला यांचा योग्य सत्कार केलाच पाहिजे ! इतक्या लहान वयामध्यें लग्न करून हे संसारांत पडले, हें एकाअर्थीं योग्यच झालें. बरें यांचा शरीरसंबंध कोणाशीं झाला आहे ? "

शेखरानें उत्तर दिलें, " माझ्या मातुलाची कन्या–श्रीमंत वृषपतींची नात— "

रत्नाकरानें मध्येंच म्हटलें, " कोणाची वृषपतीची ? याच वृषपतीच्या तर्फे तुम्ही स्वामिभक्ति प्रकट करण्यासाठीं येथें आलां आहां, असें नुकतेंच तुम्ही सांगितलें नव्हे ? "

शेखरानें नम्रतेनें उत्तर दिलें, " होय. "

रत्नाकरानें म्हटलें, " तर मग तुम्हां वल्लभीयतांचा योग्य सत्कार केला पाहिजे ! हे आज सह तुम्हीं येथें आहां, तोंपर्यंत[illegible], तरी वाड्यांत रहावयास आलें पाहिजे खात्री फक्त प्रियपत्नी आपल्या [illegible]चा ये या गोष्टीची करील ! [illegible] । भाषणावरून रहा[illegible] [illegible]यासारखे चतुर [illegible] सेवा करीत असतां [illegible]येथें किती [illegible]दक्षोपी घडून [illegible] कोहीं पुर्वी ठरलेलें नाहीं. जि असें [illegible] राजाधिराज चरणांपाशीं आश्रय देतील. तितका मुक्काम करणें हें माझें कर्तव्यच आहे. "डे

रत्नाकर राजा बोलला, ' ज्या अर्थीं तुम्ही उभयतां केवळ राजनिष्ठेनें प्रेरित होऊन येथें आलां आहां, त्याअर्थीं तुम्हीं दुसऱ्या ठिकाणीं वास करणें हें आम्हांस योग्य दिसत नाहीं. चार स्वतंत्र दिवाणखाने आणि कांहीं नोकर माणसं आपल्या दिमतीस देण्याची आतां कंचुकीला आम्ही आज्ञा करितों. तुम्ही सध्यां जेथें उतरलां असाल तेथून तुमचें सामानसुमान आणावयाचें असल्यास आमचा कारभारी तो सर्व व्यवस्था करील. '

भार [illegible] मध्येंच म्हणाला,–' राजाधिराज, विलास [illegible]ला स्वदेशीं जाण्याची घाई असभोंवतीं संभव असून, आपल्या मर्जीसाठीं, केवळ आपल्या आग्रहासाठीं, याला येथें रहावें लागणार आहे, असा माझा तर्क आहे. स्वतां स्वामींनीं आज्ञा केल्यावर ती पाळणें हें प्रत्येकाचें कर्तव्यच आहे, परंतु या तरुणाच्या मनांत खरोखरच आपला पाहुणचार घ्यावयाचा आहे की नाहीं, त्याचा उलगडा झाला असला म्हणजे बरें. '

यावर शेखर कांहीं बोलणार होता, पण तितक्यांत रत्नाकर राजा मध्येंच बोलला,– ' अहो पुरोहित, या तरुणाला इतकी जाण्याची घाई असेल असें मला वाटत नाहीं. इतक्या दूरचा प्रवास करून येथें आलेलें देवशेखर दांपत्य या आमच्या वैभवशाली शहरांत कांहीं दिवस विलासांत घालविल्याकाय तसेंच मागच्या पायांनीं मागें जाईल पाहिजे– ना तुमच्या मनांत आली तरी तथापि नीं आमच्या शहरची शोभा धिराज, हा [illegible] यदाकदाचित् काय वाटत असेल [illegible] आम्हीं या इकडे आपलें [illegible] मत खोटें आहे, [illegible] वरून सिद्ध क[illegible] गा.

रत्नाकर या उभयतां[illegible] असेल्या वाड्यांत राहिलेंच पाहि[illegible] मर्जी लवकरच युवराजांचा अन्नप्रा[illegible] स्कार व्हावयाचा आहे, तोही यांस पहावयास सांपडेल. '


असें भाषण करून रत्नाकर राजा आपल्या आसनावरून उठला, अर्थात् बाकीच्यांसही उठावें लागलें. राजानें शेखराला वाड्यांत रहावयास बोलाविलें, ही गोष्ट दोन्ही प्रधानांस आवडली नव्हती; परंतु रत्नाकर राजाच्या लहरी स्वभावापुढें त्यांचा इलाज चालत नसे. जी गोष्ट एकदां करावयाची असें राजानें म्हटलें, ती न करण्याविषयीं कोणीं कांहीं सांगितलें, तरी त्याचा उपयोग होत नसे; म्हणून त्या दोन्ही प्रधानांस त्यावेळीं मूग गिळून स्वस्थ बसणें भाग होतें. राजा पुनः अंतःपुरामध्यें गेला, आणि ऐषआरामामध्यें निमग्न झाला.

नंतर सुंदरसेन शेखराला म्हणाला,–' जर तुम्हाला दुसरें कांहीं काम नसेल, तर आमच्या रथांतून आमच्या वाड्याकडे जाऊं या, तेथून तुम्हाला तुमच्या बिऱ्हाडीं पोचविण्याची व्यवस्था आम्हीं करूं. '

हें सुंदरसेनाचें भाषण ऐकून देवशर्मा म्हणाला,–' जर अमात्यांची कांहीं हरकत नसेल, तर मीही त्यांच्या रथांतून त्यांच्या वाड्यापर्यंत येईन असें म्हणतों. कारण, मला या तरुणाला थोडासा उपदेश करावयाचा आहे ! '

देवशर्म्याची ही आगंतुकी पाहून सुंदरसेनाला आश्चर्य वाटलें, आणि त्यानें त्याजकडे अर्थपूर्ण दृष्टीनें अवलोकन केलें; परंतु देवशर्म्यानें कांहींच भाषण केलें नाहीं. अर्थात् त्याला आपल्या रथांतून नेणें सुंदरसेनाला भाग पडलें आणि तो म्हणाला,– ' आपली इच्छा असल्यास माझी कांहीं हरकत नाहीं. चलावें ! '

[illegible]त ते तिघे राजवाड्यांतून बाहेर [illegible] रथ सज्ज होतांच त्या[illegible]ि रथ चालू झाला.



अकल्पित

रथ चालू झाल्यानंतर बराच [illegible]यंत ते तिघे आपापल्या जागेवर स्तब्ध बसले होते. देवशर्म्याची मुद्रा गंभीर दिसत होती, आणि सुंदरसेन कांहीं तरी विचारांत निमग्न झाल्याप्रमाणें दिसत होता. राजाधिराजानें आपणांस राजवाड्यांत रहावयास बोलाविलें, ही गोष्ट देवशर्म्याला नापसंत असण्याचें कारण

काय असावें, याचा शेखर आपल्या मनाशीं विचार करीत होता.

कांहीं वेळानें देवशर्मा शेखरास म्हणाला,–'अहो तरुण राजपुत्र, यापुढें राजाधिराजांशीं जेव्हां जेव्हां भाषण करण्याचा प्रसंग येईल, तेव्हां तेव्हां तुम्हीं कोणत्या प्रकारें बोललें पाहिजे, यासंबंधानें तुम्हाला योग्य सूचना देणें जरूर आहे.'

शेखरानें सरळपणानें उत्तर केलें,–'अहो सन्मान्य पुरोहित, मी एक सरळ माणूस आहें, आणि आपणास कोणीं प्रश्न केला असतां त्याचें उत्तर जें सत्य असेल तेंच द्यावयाचें खोटें बोलावयाचें नाहीं, असा माझा निश्चय आहे!'

देवशर्मा बोलला,–'या तुमच्या भाषणावरून तुम्ही राजनीतीचा अभ्यास केला आहे असें मला वाटत नाहीं. राजनीतीला पूर्वकालीन महाकवींनीं वेश्येची उपमा दिली आहे, ही गोष्ट जर आपणास माहीत असती, तर मला इतकें उघड बोलण्याचा प्रसंग आला नसता. राजाधिराजांसारख्या थोर पुरुषांना उगीच कांही तरी काल्पनिक गोष्टी सांगून त्यांच्या मनांत विनाकारण भलभलत्या शंका उत्पन्न करणें हें अगदीं योग्य नाहीं. आम्ही राज्याच्या कल्याणासाठीं रात्रंदिवस झटत आहों, आणि राज्यांत घडुन येणारी प्रत्येक गोष्ट आम्हांस पूर्णपणें माहीत आहे. असें असून सर्वच गोष्टी आम्ही त्यांच्या कानांवर जाऊं देत नाहीं, याचें कारण कांहीं तरी असलें पाहिजे, ही गोष्ट तुमच्यासारख्या राजकुलोत्पन्न पुरुषाच्या ध्यानीं आली पाहिजे होती!'

शेखर किंचित् तिरस्कारदर्शक स्वरानें बोलला,–'परंतु आपल्यासारख्या मंत्र्यांनीं आपल्या राजाला अशा रीतीनें बेसावध राहूं देणें मला योग्य वाटत नाहीं.'

देवशर्मा किंचित् तीक्ष्ण स्वरानें म्हणाला,–'आम्ही राजाधिराजांना बेसावध ठेवीत नसून निष्कारण भीतीपासून सांगितलें ठेवूं इच्छितों.'

या सर्व संभाषणांवरून त्या तरुणाच्या मनांत काय असावें, या संबंधानें शेखराच्या मनांत थोडीशी शंका उत्पन्न झाली, आणि आपली शंका खरी आहे कीं खोटी आहे, हें कसून पाहण्यासाठीं तो म्हणाला,–'असें जरी असलें, तरी आपण जो मार्ग धरिला आहे, तो प्रशस्त आहे, असें मला वाटत नाहीं. प्रस्तुत राजकारस्थानासंबंधानें मुख्य मुख्य गोष्टी जगजाहीर होऊन कित्येक महिने लोटले असतां त्या महाराजांच्या कानांवर फक्त आठच दिवसांपूर्वी गेल्या, असें त्यांच्या मघांशीं निघालेल्या उद्गारांवरून मला उघड दिसून आलें; ही राजनीति कोठची?'

देवशर्मा बोलला,–'निंबराज वल्लभीनगरावर स्वारी करणार, ही वार्ता जरी आज कित्येक महिने लोकांत सुरू असली, तरी त्यासंबंधानें प्रधानमंडळाची खात्री फक्त आठ दिवसांपूर्वीच झाली; या गोष्टीची सत्यता अमात्य सुंदरसेनांच्या भाषणावरून देखील सिद्ध होईल!'

शेखर बोलला,–'यांच्यासारखे चतुर अमात्य सर्व राज्यकारभार करीत असतां प्रत्यक्ष आपल्या राज्यांत काय गोष्टी घडून येत आहेत, यांचें त्यांस ज्ञान नसेल, असें माझें मन मला सांगत नाहीं!'

हें त्याचें भाषण ऐकून देवशर्मा शेखराकडे खोंचून पाहत सुंदरसेनाला म्हणाला,–'अहो अमात्य, हे राजपुत्र काय भाषण करीत आहेत, आपणावर काय आरोप करीत आहेत, इकडे आपलें लक्ष्य आहे ना?'

सुंदरसेन अत्यंत शांतपणानें बोलला,–'यांच्या भाषणाकडे माझें पूर्ण लक्ष्य आहे. अहो राजपुत्र, मी जरी मुख्य प्रधान असून सर्व राज्याचीं सूत्रें हालवित असलों, तरी मलाही लोकांवर अवलंबून राहणें जरूर आहे. निंबराज आज कित्येक महिने युद्धाची

भार व्यर्थ रीत आहे, पण ती दुसऱ्याच विलासांतरी हेतूनें असावी, असें आम्हांस भोंवत होतें. खरें कीं खोटें हें हे न्यायमंत्रीच कोतील. ' तो देवशर्म्याकडे अर्थपूर्ण दृष्टीनें पाहत पुढें बोलला,–' आठ दिवसांपूर्वी यांची तमजून देखील अशीच होती. '

इतकीं भाषणें होत आहेत, तों रथ सुंदरसेनाच्या वाड्यापाशीं येऊन उभा राहिला. अर्थात् ते त्रिवर्ग खालीं उतरले. नंतर शेखराचा हात धरून सुंदरसेन त्याला म्हणाला,–' सध्या जरी उशीर बराच झाला आहे, तरी आपण घटकाभर मजबरोबर वाड्यांत येऊन आपल्या समागमाचा मला लाभ द्यावा, अशी माझी इच्छा आहे. '

देवशर्मा मध्येंच म्हणाला,–' मला एक जरूरीचें काम आतांच करावयाचें आहे, त्यास माझा नाइलाज आहे, नाहींतर मीही तुमच्या समागमाचा लाभ घेतला असता! '

शेखर म्हणाला,–' आपल्या या निमंत्रणाचा मीं स्वीकार केला पाहिजे, परंतु ज्याअर्थीं राजाधिराजांनीं मला राजवाड्यांत राहण्याची आज्ञा केली आहे, त्याअर्थी त्यांचे खासगी कारभारी मला नेण्याकरितां रथ घेऊन येतील, त्यावेळीं मीं तयार असलें पाहिजे;

यावर सुंदरसेनानें त्याला अधिक आग्रह केला नाहीं. तो इतकेंच म्हणाला,–' तुमची सबब योग्य आहे, म्हणून मी आतांच अधिक आग्रह करीत नाहीं; परंतु पुनः केव्हां तरी सवडीप्रमाणें आपण आपल्या समागमाचा लाभ दिला पाहिजे. '

शेखरानें योग्य उत्तर देऊन सुंदरसेनाच्यानिमंत्रणाचा स्वीकार केला, व त्यानें त्या दोघां राजपुरुषांस नम्रतेनें प्रणाम केला. सुंदरसेनानें मोकळ्या मनानें त्या प्रणामाचा स्वीकार केला. पण देवशर्म्यानें मात्र प्रणामाचा स्वीकार करीत असतां शेखराकडे मोठ्या कुत्सितानें अवलोकन केलें. देवशर्म्याचा स्वभाव शेखराला अगदीं आवडला नव्हता, ह्मणून हें त्याचें वर्तन त्या मोकळ्या मनाच्या तरुणाला अगदीं अयोग्य वाटलें, आणि त्याच्या मनांत त्या न्यायमंत्र्यासंबंधानें जी अप्रीति उत्पन्न झाली होती, तीमध्यें याप्रसंगीं अधिक भर पडली. तो ज्या थोर गृहस्थाकडे बिऱ्हाडास उतरला होता. त्या गृहस्थाकडे परत जात असतां वाटेनें त्याच्या मनांत अनेक प्रकारचे विचार घोळत होते. ते दोन्ही मंत्री राजकार्यामध्यें निष्णात् नसतील, असें त्याची मनोदेवता त्याला सांगेना. अर्थात् ते कपटी असून आपल्या मनांतील कांहीं विशिष्ट हेतु साध्य करण्यासाठीं ते राजाला खोट्या गोष्टी सांगत असावे, असें त्याच्या मनांत आलें, आणि आणखी थोडा विचार केल्यावर ते दोघेही. निंबराजाला फितूर असून मुद्दाम विश्वासघात करीत असावे, असेंही त्याच्या मनास वाटणें अगदीं साहजिक होतें.

बिऱ्हाडीं आल्यावर शेखरानें राजवाड्यांत घडून आलेलें सर्व वर्तमान प्रियंवदेला निवेदन केलें, शेखराला राजानें अशा रीतीनें राजवाड्यांत येऊन राहण्याचें आमंत्रण दिलें, या गोष्टीनें तिला फार आनंद झाला. राजाधिराजांनीं आपणांस वाड्यामध्यें राहावयास बोलाविलें, हा आपला मोठा सन्मान केला एवढ्याच गोष्टीचा तिला आनंद वाटत होता. वास्तविक पाहिलें तर राजवाड्यांत राहण्यापेक्षां शहरांतील मध्यम लोकांच्या वस्तींत कोठें तरी जागा पाहून तेथें स्वतंत्रपणानें रहावें हें त्या दांपत्यास अधिक पसंत होतें; परंतु राजाज्ञेला मान देणें हें आपलें कर्तव्य आहे, असें त्यांचें मत असल्यामुळें त्यांनीं राजवाड्यांत राहण्याचा विचार ठरविला. उभयतां एकत्र असल्यावर आपण एकाद्या राजवाड्यांत असलों काय, किंवा एकाद्या झोंपडींत असलों काय, दोन्ही आपल्यास सारखींच आहेत,असें त्यांस वाटत असल्यामुळें राजवाड्यांत रहावयाचें त्यांस मुळींच

वाईट वाटलें नाहीं. दोन प्रहरचें भोजन झाल्यावर थोडी विश्रांति घेऊन शेखर बाजार पेठेंत गेला, आणि त्यानें कित्येक वस्त्रालंकार खरेदी केले. कारण आपण ज्यांच्या सहवासाला जाणार त्यांच्या योग्यतेला आपल्या वेषानें कमीपणा येऊं नये, अशी त्याची इच्छा होती. खरेदी आटोपल्यावर तो बिऱ्हाडीं आला, त्या वेळीं चतुरकानें सुंदरसेनाकडून आलेली एक चिठी त्याचे हातीं दिली. या चिठीमध्यें सुंदरसेनानें मोठ्या नम्रपणानें पण आग्रहानें शेखराला प्रहररात्रीचे सुमारास आपल्या भेटीस बोलाविलें होतें. या चिठीप्रमाणें सुंदरसेनाची भेट घेणें शेखराला अवश्य असल्यामुळें त्यानें नेमल्या वेळीं चतुरकाला बरोबर घेऊन अमात्याच्या वाड्याकडे प्रयाण केलें. या प्रसंगीं शेखराला पूर्वीप्रमाणें परवानग्यासरवानग्यांचा त्रास पडला नाहीं. अमात्याचा खासगीकडील कारकून त्याची वाट पहात देवडीवर बसला होता, त्यानें शेखराला एकदम वाड्यांत नेलें, आणि ज्या दिवाणखान्यांत गुप्त कारस्थानें करण्यासाठीं सुंदरसेन बसत असे, त्या दिवाणखान्यांत त्यानें त्याला बसविलें. सकाळीं शेखराची व सुंदरसेनाची ज्या दिवाणखान्यांत भेट झाली होती, त्या मुख्य दिवाणखान्यापासून हा दिवाणखाना बराच दूर असून तेथें प्रवेश करण्यापूर्वी शेखराला एका अरुंद बोळांतून यावें लागलें. या ठिकाणीं ऐषआरामाच्या किंवा वैभव प्रदर्शित करणाऱ्या पदार्थांचा फारसा संग्रह नसून अगदीं जरुरीचे असे कित्येक पदार्थ तेथें होते. या दिवाणखान्यास दर्शनीं दरवाजा एकच होता. तो दरवाजा भला जाड असल्यामुळें तो लावून घेतल्यावर तेथील भाषण बाहेरील माणसास ऐकूं जाण्याचा फार थोडा संभव होता. दिवाणखान्याच्या भिंती भल्या भक्कम असून त्यांस खिडक्या अगदीं नव्हत्या, पण आंत हवा आणि उजेड येण्यासाठीं भिंतींच्या वरच्या बाजूस तिरपीं भोकें रा.. सांगितलें मजबुतीसाठीं त्या भोकांमध्यें लोखंडी गज उभे मारलेले होते. .रा.नें प्रकारच्या रचनेमुळें तो दिवाणखाना बरा उदास व भयाण दिसत असे; पण ५ प्रसंगीं तेथें रौप्य पात्रामध्यें तेजस्वी दीप लाविलेले असल्यामुळें तेथील उदासीनता पुष्कळ कमी झाली होती. शेखर जर दिवसा या स्थळीं आला असता तर ही जागा पाहून त्याच्या मनांत भीतिप्रद विचार उत्पन्न झाल्याखेरीज राहिले नसते.

या दिवाणखान्यांत तो बसल्याला फारसा वेळ झाला नाहीं, तोंच तेथें आसलेला एक चोर दरवाजा उघडला, आणि त्यांतून एक गृहस्थ त्या दिवाणखान्यांत आला. पण शेखर तेथें बसलेला आहे, हें दृष्टीस पडतांच तो मनुष्य चपापला, झटकन् मागें वळला, आणि त्यानें तेथील चोर-दरवाजा एकदम बंद करून घेतला. त्या उभयतांची या प्रसंगीं नुसती दृष्टादृष्ट झाली असेल, पण तेवढ्यांत तो गृहस्थ म्हणजे सरदार हलधराचा एकनिष्ठ सेवक सत्यरथ आहे, दुसरा कोणी नव्हे, अशी शेखराच्या मनाची पक्की खात्री झाली.

अशा रीतीनें सरदार हलधराच्या विश्वासु सेवकाचें अमात्य सुंदरसेनाच्या वाड्यांत अकल्पित दर्शन झाल्यामुळें शेखराचें मन गोंधळून गेलें. तो येथें कां आला असावा, याचा त्याला उलगडा होईना. अशा रीतीनें तो कांहीं वेळ विचार करीत बसल्यावर तेथील मुख्य दरवाज्यानें अमात्य सुंदरसेन आंत आला. त्याला आलेला पाहतांच शेखर आपल्या आसनावरून उठून उभा राहिला. अमात्य सुंदरसेन एका आसनावर बसल्यावर त्यानें शेखराला एका आसनावर बसावयास सांगितलें. तो बसल्यावर त्यांचा संवाद सुरू झाला.

प्रथमतः अमात्य सुंदरसेन शेखराला म्हणाला,—' अहो राजपुत्र, तुम्ही माझ्या

भार [illegible]न देऊन येथपर्यंत येण्याची विलास[illegible]तली,. हें फार उत्तम झालें. प्रस्तुत भोंव[illegible]रणासंबंधानें कित्येक गुप्त गोष्टींचा को[illegible] तुमच्यापाशीं खल करावयाचा आहे. यासाठीं तुम्हीं अगदीं मोकळ्या मनानें मजपाशीं भाषण केलें पाहिजे.'

शेखर म्हणाला,–'आपल्यासारख्या राजकार्यधुरंधर पुरुषांनीं आपण होऊन एकाद्यास भेटीस बोलाविणें हा त्याजवर मोठा अनुग्रहच होय. अशा रीतीनें आपण माझा बहुमान केला असतां मी जर आपल्या आज्ञेप्रमाणें येथें आलों नसतों, तर तो माझ्या हातून मोठा प्रमाद झाला असता. मला आजपर्यंत असत्य भाषण करण्याची संवय नसल्यामुळें आपण मला जे कांहीं प्रश्न कराल, त्यांचीं उत्तरें मी अगदीं सरळ देईन याबद्दल आपल्यास शंका घेण्याचें कारण नाहीं.' नंतर तो त्या राजपुरुषाकडे अत्यंत गंभीर दृष्टीनें पहात त्याला म्हणाला,–'आपण मला बोलाविलें असल्यामुळें मी होऊन आपणांस एकादा प्रश्न पहिल्या प्रथम विचारावा, हें जरी थोडें शिस्तीविरुद्ध आहे, तरी आपलें संभाषण सुरू होण्यापूर्वी मला एका विलक्षण गोष्टीसंबंधानें उलगडा करून घेणें अवश्य आहे. मी जी गोष्ट विचारणार आहे ती केवळ आपली जिज्ञासा तृप्त करून घ्यावयासाठीं विचारणार असून तिचा प्रस्तुतच्या राजकारणाशीं अगदीं निकट संबंध असल्यामुळें मला त्या संबंधानें शहानिशा करून घेणें अगदीं जरूर झालें आहे.'

शेखराकडे आश्चर्यानें पाहत सुंदरसेनानें विचारलें,–'ती गोष्ट जर तुम्हास इतकी महत्त्वाची वाटत आहे, तर तुम्ही तिच्या संबंधानें आपल्या मनाची खात्री करून घ्यावी हें अगदीं योग्य आहे.'

शेखर बोलला,–'मी येथें-याच दिवाणखान्यांत येऊन बसल्यावर पांचचार पळें लोटली असतील नसतील तोंच येथील चोर दरवाजा उघडून एक गृहस्थ एक क्षणभरच या दिवाणखान्यांत उभा राहिला—'

हें शेखराचें भाषण ऐकून सुंदरसेन चपापला आणि एका क्षणांत त्याचा पहिला नूर उतरून तो बावरल्याप्रमाणें दिसूं लागला,–'काय म्हणतां ? तुम्हीं कोणाला येथें पाहिलें' असे प्रश्न त्यानें शेखरास विचारिले, आणि आपलें बावरलेलें मन ताब्यावर आणण्याचा प्रयत्न करीत तो बोलला,–'तुम्ही जो चोरदरवाजा म्हणतां, तो तुमच्या समोरचा, कीं डाव्या बाजूचा ?'

आपलें भाषण ऐकून त्या अमात्याची अगदीं त्रेधा उडाली, ही गोष्ट शेखराच्या चांगलीच ध्यानांत आली, आणि त्याच्या इमानासंबंधानें त्याच्या मनांत जी शंका उत्पन्न झाली होती, तीस बळकटी आली. तो अमात्यास म्हणाला,–'तो मनुष्य माझ्या समोरचा दरवाजा उघडून आंत आला, व त्याचा चेहरा माझ्या दृष्टीस पडला.'

अमात्यानें जरी आपलें बावरलेलें मन ताब्यावर आणण्याचा प्रयत्न चालविला होता, तरी त्या प्रयत्नास अजून पुरतें यश आलें नव्हतें. त्यानें विचारलें, 'तो मनुष्य कोण असावा असें तुम्हांस वाटतें ?'

शेखरानें उत्तर केलें, 'जो मनुष्य आतां माझ्या नजरेस पडला, तो निंबराजाचा हस्तक आहे, अशी माझ्या मनाची खात्री आहे.'

अगदीं निष्काळजीपणाचा आव घालीत अमात्य बोलला,–'निंबराजाचा हस्तक येथें मजकडे येणें हें अगदीं अशक्य आहे ! मला वाटतें, तुम्हांला उगीच कांहीं तरी भास झाला असावा !' नंतर आपलें मन शांत करून आणि मध्येंच कांहीं स्मरण झाल्याचा आविर्भाव दाखवून अमात्य सुंदरसेन म्हणाला,–'होय होय ! कदाचित् असें झालें असेल ! आतां माझ्या चांगलें ध्यानीं आलें. तुम्ही आतां ज्याला येथें पाहिलें, तो निंबराजाचा हस्तक नसून खुद्द माझा

हस्तक आहे ! त्याला अकस्मात् येथें पाहून तुम्हांला इतकें आश्चर्य कां वाटलें हेंही आतां पूर्णपणें माझ्या ध्यानांत आलें आहे ! तुम्ही त्या सत्यरथाला येथें पाहिलें असावें ! '

हें त्या अमात्याचें शांतपणानें केलेलें भाषण ऐकून शेखर पुनः मोठ्या गूढांत पडला, आणि म्हणाला,–' काय म्हणतां ? सत्यरथ हा आपला हस्तक आहे ? असें असेल तर हें मोठें आश्चर्यच आहे ! '

अमात्य सुंदरसेन म्हणाला;–' त्यांत आश्चर्य कसचें ? आम्हा राजपुरुषाना किती कारस्थानें करावीं लाग[illegible]ठो याची कल्पना तुम्हां तरुणांस व्हावयाची नाहीं. हा सत्यरथ पूर्वी आपल्या यजमानाबरोबर तुमच्या बागलाणांत गेला असतां तेथें तुम्हीं याचें आणि याच्या धन्याचे तीन वेळ प्राण वांचविले आहेत, ही गोष्टही मला माहीत आहे ! '

शेखरानें किंचित् तिरस्कारपूर्वक त्याला प्रश्न केला, ' तर मग पूर्वी जेव्हां हा बागलाणांत आला होता, तेव्हांसुद्धां तुमचा हस्तक म्हणूनच हा येथें आला होता कीं काय ? '

शेखराच्या मनोवृत्तीकडे लक्ष्य न देतां सुंदरसेन त्याला एकदम म्हणाला, ' तो ज्यावेळीं बागलाणमध्यें गेला होता, तेव्हां कांहीं तो माझ्या नोकरीस नव्हता. त्यानंतर दोन महिन्यांनीं तो माझ्या नोकरीस राहिला. सध्यां तो माझा हस्तक आहे, आणि त्याच्या इमानावर माझा पूर्ण विश्वास आहे, इतकेंच तुम्हाला समजल्यावर तुमच्या शंकेचें निवारण होईल, असें मला वाटतें. ज्या अर्थी तुम्हाला मीं मित्रत्वानें येथें बोलाविलें आहे, त्या अर्थी तुम्ही मजशीं तशाच भावनेनें वागलें पाहिजे, आणि अकल्पित रीतीनें या माणसाचें तुम्हाला दर्शन झालें, ही गोष्ट तुम्हीं गुप्त ठेविली पाहिजे. सत्यरथ हा माझा गुप्त हेर आहे. या गोष्टीचा बभ्रा झाल्यास आमचें सर्व कार-स्थान व्यर्थ होईल, एवढें तुम्हाला सांगितलें म्हणजे पुरे. '

अमात्याला ऐकूं जाईल अशा स्वरानें पण आपल्याशींच शेखर बोलला,–' या जगाचा मला जसजसा अधिक अनुभव येत चालला आहे, तसतसे एकेक नवीन चमत्कार माझ्या दृष्टीस पडूं लागले आहेत ! ह्या जगांत इतकी लबाडी भरलेली असेल, अशी माझी अगदीं कल्पना नव्हती. या सत्यरथासंबंधानेंच पाहिलें, तर तो प्रतापपुरीं आला असतां आपल्या धन्याची इतक्या एकनिष्ठेनें सेवा करीत होता कीं त्याच्या केवळ स्वामिनिष्ठेकडे लक्ष्य देऊन आमच्या वडिलांनीं त्याची देहान्त शिक्षा माफ करून त्याला सोडून दिलें ! चारपांच महिन्यांपूर्वी जो सेवक प्रामाणिकपणाचा मूर्तिमंत पुतळा आहे असें आम्हांस वाटत होतें, तोच सेवक आज विरुद्ध पक्षाला फितूर झालेला माझ्या दृष्टीस पडत आहे ! जणुं काय पूर्वी आपण काय करीत होतों, या गोष्टीचें त्याला पूर्ण विस्मरण झालें असावें ! '

सुंदरसेन हास्यमुद्रा धारण करीत म्हणाला,–' मला माहीत असलेल्या सर्व गोष्टी जर तुम्हांला समजल्या, तर तुम्हाला याहून अधिक चमत्कार वाटेल ! पण मला सर्वच गुप्त गोष्टी तुम्हाला सांगतां येत नाहींत. असो; आतां पुनः तुम्ही त्या सत्यरथासंबंधानें अधिक गोष्टी बोलूं नयेत, अशी माझी इच्छा आहे. हा माझा वाडा म्हणजे एक अजब चीज आहे ! ह्या वाड्यामध्यें जे अनेक चमत्कार आहेत, त्यांतला एक चमत्कार हा आहे कीं, माझ्या शत्रूंचे हेर तर वाड्यांत असून त्यांचें माझ्या हालचालकडे नेहमीं लक्ष्य असतें ! सध्यां आपण एकमेकांशीं बसलों असून, मोठ्या विश्वासानें याच्यांत बसून बोलत आहों, पण आपलें हें भलजार प्रमाणें कोणी ऐकत नसेल असें म्हणण्याची अशी त्यांची

सत्यरथ हा सुंदरसेनाचा काय वाटेल तें ही गोष्ट ऐकून शेखराला तो सोडणार नाहींत !

वाटत होतें, पण तो जसजसा अधिक विचार करूं लागला, आणि दुर्मुखानें आपल्याशीं जें विश्वासघाताचें वर्तन केलें होतें, तें त्याला जेव्हां आठवलें, तेव्हां त्याला त्या गोष्टीचें आश्चर्य वाटेनासें झालें; आणि जगामध्यें अविश्वास इतका भरला आहे, याबद्दल त्याला फार वाईट वाटलें.

कांहीं वेळपर्यंत ते दोघेही स्तब्ध बसले होते, नंतर सुंदरसेन शेखरास म्हणाला,– 'आतां आपण हा विषय सोडून देऊन, मी ज्या कामासाठीं मुद्दाम तुम्हास येथें बोलावून आणलें आहे, त्या कामासंबंधानें बोलूं या, उद्यां सकाळीं तुम्ही राजवाड्यांत जाल; तेथें गेल्यावर राजाधिराज तुम्हांस आज निघालेल्या गोष्टीं संबंधानें प्रश्न विचारतील. त्याचप्रमाणें तुमची पत्नी आणि देवी शैवलिनी यांची भेट झाली म्हणजे त्याचेंसुद्धां याच विषयावर संभाषण सुरु होईल. तुम्हा उभयतांसही दरबारी रीतिरिवाज माहीत नसल्यामुळें तुमच्या हातून अनेक प्रमाद होण्याचा संभव आहे. तुम्ही सरळ मनाचीं माणसें असल्यामुळें फारसा विचार न करतां एकादी गोष्ट झटकन् बोलून जाल, पण तिचा मोठा भयंकर परिणाम होईल. मीं आपलें बहुतेक आयुष्य दरबारामध्यें घालविलें असल्यामुळें मला राजाधिराजांच्या स्वभावाची उत्तम परीक्षा झालेली आहे. यासाठीं मी तुम्हास जें कांहीं सांगतों, तें नीट ध्यानीं ठेवून त्याप्रमाणें वागा. जर तुमच्या मुखांतून एकादा [illegible]ताच शब्द निघून गेला, तर त्यामुळें [illegible]विचाराज्याला दुःखकारक परिणाम भोगमहत्त्वा प्रसंग येईल. तुम्ही सरळपणानें खरें संबंधानें बोलूं लागाल, आणि तें राजाधिध्यावा हें ऐणार नाहीं. थांबा–मध्यें बोलूं [illegible]य म्हणतों तें सर्व मुकाट्यानें शेखर बोलल्यानंतर तुम्हाला जें काय [illegible]खान्यांत येऊन [illegible]तें बोला. आपणास [illegible]टली असतील तस-याचा मी अगदीं उपदेश करीत नाहीं, आणि तसा उपदेश केल्यास तो तुम्हांस रुचावयाचा नाहीं, अशी माझ्या मनाची खात्री आहे. सत्य हें हिऱ्यासारखें आहे ही गोष्ट जरी खरी आहे, तरी नुसता हिरा नेत्रांस आनंददायक होत नाहीं. त्याला त्याहून कमी किमतीच्या सुवर्णाची संगति हवी असते. त्याप्रमाणेंच सत्याची गोष्ट आहे. सत्य हें निर्भेळ असेल, तर तें गोड लागत नाहीं. यासाठीं जरी आपणांस एकादी सत्य गोष्ट राजे लोकांस सांगावयाची असली, तरी ती एकदम न सांगतां ती जरा आड पड-/ द्यानें, वेळ प्रसंगाकडे लक्ष्य देऊन मोठ्या खुबीनें सांगावी लागते. राजे लोक हे अग्नीप्रमाणें असतात; अग्नीचा उपयोग करणारा पुरुष जर चतुर असेल, तर तो आपल्या चातुर्याच्या योगानें आपलें व इतरांचें कल्याण करून घेईल; पण तोच अग्नि जर मूर्खाच्या हातीं असला, तर तो मूर्ख आपल्या मूर्खपणानें आपला व इतरांचा नाश करील, यासाठीं राजे लोकांशीं मोठ्या चातुर्यानें, धोरणानें आणि दक्षतेनें वागून प्रसंग निभावून आपलें व इतरांचें कल्याण करून घेतलें पाहिजे. यासाठीं ज्या वेळीं तुम्हाला उद्यां राजाधिराजांशीं भाषण करण्याचा प्रसंग येईल, त्यावेळीं तुम्ही मोठ्या सावधपणानें वागून धर्मराजाप्रमाणें 'नरो वा कुंजरो वा,' अशा प्रकारचें भाषण करण्याची खबरदारी घेतली पाहिजे. हा माझा उपदेश नुसता तुम्हालाच नसून तो तुमच्या पत्नीनें ही ध्यानांत ठेवून देवी शैवलिनीशीं संभाषण केलें पाहिजे. तुम्हाला तुमच्या स्वतांच्या, राजाच्या आणि तुमच्या राष्ट्राच्या कल्याणाची काळजी असेल, तर तुम्ही या उपदेशाप्रमाणें वागाल, अशी मला उमेद आहे.'

असें बोलून सुंदरसेन उगीच बसला, हें पाहून शेखरानें एकदां तिरस्कारयुक्त दृष्टीनें त्याजकडे अवलोकन केलें, आणि नंतर तो त्यास म्हणाला,–'अहो अमात्य, इतका वेळ-

पर्यंत मीं तुमचें भाषण ऐकून घेतलें. पण खरेंच सांगतों, अशा प्रकारचें भाषण श्रवण करण्याचा जर मजवर प्रसंग आला नसता, तर मी ईश्वराचे मोठे उपकार मानिले असते. जीमध्यें असत्याचें इतकें प्राबल्य आहे कीं सत्याला आपल्या मुखावर बुरखा घेऊन वावरावें लागतें, त्या राजनीतीला मी दुरूनच नमस्कार करतों. असत्यानें भरलेल्या राजनीतीचा मी इतका तिरस्कार करतों कीं–'

सुंदरसेन हास्यमुखानें म्हणाला,–'असल्या राजनीतीचा असें आडपद्यानें म्हणण्यापेक्षां तुम्ही जरी आपल्या रोखठोक स्वभावाला अनुसरून प्रत्यक्ष आमचा तिरस्कार करतों असें म्हटलें तरी–'

शेखर न कचरतां म्हणाला,–' होय; ज्या अर्थी आपण मजवर स्पष्ट बोलण्याचा प्रसंग आणिला आहे, त्या अर्थी मीही आतां स्पष्टच बोलतों. आपलें हें पोकळ पांडित्य मला मुळींच पसंत पडलें नाहीं, इतकेंच नव्हे, तर आपण करीत असलेला हा असत्याचा उपदेश ऐकून आपल्या विश्वासुपणासंबंधानें माझें मन शंका घेतें. अहो अमात्य, मीं आजपर्यंत कधींही असत्य भाषण केलें नाहीं, आणि मला जरी केवढाही लाभ होत असला, तरी मी तें करणार नाहीं, असा माझा दृढनिश्चय आहे! त्याचप्रमाणें माझ्या पत्नीच्या मुखांतून ही असत्य भाषण निघावयाचें नाहीं, अशी माझ्या मनाची खात्री आहे! मी हा आपला उपदेश तिला कळविणार नाहीं, इतकेंच नव्हे तर मी राजाधिराजांची भेट झाल्यावर त्यांनीं विचारलेल्या प्रश्नांचीं अगदीं सत्य तींच उत्तरें देईन. मी अतिशयोक्ति करणार नाहीं, किंवा एकादी गोष्ट सांगतांना तिच्यामध्यें छाटाछाटही करणार नाहीं.' असें बोलून शेखर आपल्या आसनावरून उठला.

अगदीं तिऱ्हाईतपणाचा आव घालून हंसत हंसत सुंदरसेन बोलला,–'अहो राजपुत्र, माझ्या भाषणानें तुमचा बराच गैरसमज झाला आहे, असें दिसतें. मी काय बोललों त्यांतलें इंगित तुमच्या ध्यानांत आलें नाहीं! खालीं बसा आणि मी काय बोलतों तें नीट ऐकून घ्या. तुम्हाला अशा प्रकारचा उपदेश करून मला स्वतांला कोणत्याही प्रकारचा स्वार्थ साधावयाचा नाहीं! मी केवळ मित्रत्वानें तुम्हाला योग्य सूचना करून सावध करीत आहें! राजाधिराजांचा स्वभाव कसा आहे, हें जर तुम्हाला माहीत असतें, तर आमच्यासारख्या नेहमी त्यांच्या सन्निध असणारांस किती सावधपणानें वागावें लागतें, हें तुमच्या ध्यानीं आलें असतें.'

खालीं न बसतां उभ्यानेंच शेखर म्हणाला–' कोणाचा स्वभाव कसाही असला, तरी खेरपणानें वागणाराला त्याची पर्वा करण्याचें कारण नाहीं.'

सुंदरसेन धिमेपणानें बोलला,–' आज जरी तुम्हाला असें वाटत असलें, तरी आणखी आठ दहा दिवस येथें राहून दरबारी स्थितीचा अनुभव घेतल्यानंतर तुम्हाला आपोआप माझें भाषण योग्य आहे, असें वाटूं लागेल. तुमचा स्वभाव अगदीं साधा आहे, तुम्हाला दरबारी पांच पेंच माहीत नाहींत, म्हणून तुमचा केव्हां फसगत होईल याचा नेम नाहीं; यासाठीं तुम्हाला यावेळीं आणखी एक दोन गोष्टी सांगून सावध करणें जरूर आहे. महाराजांचा स्वभाव किती एककल्ली आहे, हें तुम्हास माहीत असण्याचा संभव नाहीं. त्यांच्याविरुद्ध जर कोणी भाषण करूं लागलें, तर तें त्यांना अगदीं आवडत नाहीं. एकदां त्यांनीं सूर्य पश्चिमेस उगवतो असें म्हटलें, तर ते शेवटपर्यंत आपलें तेंच धरून बसतील. मग त्यांना जरी कोणी हजार प्रमाणें दाखवून सूर्य पूर्वेस उगवतो, अशी त्यांची खात्री करून देण्यासाठीं काय वाटेल तें केलें, तरी ते आपला हेका सोडणार नाहींत!

त्यांचा स्वभाव इतका आग्रही आहे कीं, अगदीं प्राणांपर्यंत निंबराज आपणांवर स्वारी करील, ही गोष्ट त्यांस खरी देखील वाटेना ! आपल्या मताविरुद्ध भाषण करणें हा राजद्रोह होतो, असें ते समजतात; आणि केवळ अशाप्रकारें मतभेदाचें भाषण केल्यामुळें कित्येक लोकांना त्यांनीं देहान्त-शिक्षा दिलेल्या आहेत ! अशा प्रकारच्या दुराग्रही राजापाशीं किती सावधपणानें वागणें जरूर आहे, हें तुम्हीच विचार करून पहा. आजच्या बैठकीमध्यें राजाधिराजांची मर्जी प्रसन्न होती, एवढ्यावर जाऊं नका ! समुद्र शांत असला म्हणजे धनगराला सुद्धां त्यावरून नौका चालविण्याचा मोह उत्पन्न होतो, पण समुद्र एकदां खवळला म्हणजे पिढीजाद नावाड्याची देखील त्यामध्यें आहुती पडते. केवळ काल्पनिक राजद्रोहाच्या निमित्तानें आजपर्यंत किती लोक प्राणास मुकले आहेत, याची जर गणती कराल, तर तुमची मेधा उडेल, आणि अशा भयंकर दरबारामध्यें आपण पाऊल ठेवलें, या गोष्टीचा तुमचा तुम्हाला पश्चात्ताप होईल. माझें हें भाषण आपणांस गोड वाटत नाहीं, हें मी जाणून आहें. परंतु मी आपलें कर्तव्य केलें आहे. तुम्हाला पाहिल्यापासून तुमच्याविषयीं माझ्या मनांत स्नेहभाव उत्पन्न झाला आहे; तुम्ही मला कपटी समजा, विश्वासघातकी समजा, कीं राजद्रोही समजा, तुमच्याविषयीं माझ्या मनांत जो स्नेहभाव उत्पन्न झाला आहे, तो कमी व्हावयाचा नाहीं. '

हे शेवटचे शब्द उच्चारीत असतां सुंदरसेनही आपल्या आसनावरून उठला होता, कारण शेखर अजून उभाच होता. हें भाषण अगदीं मनोभावानें करीत आहे, असें त्याच्या शब्दोच्चारावर भासत होतें. यावेळचे त्याचे अंगविक्षेप इतके साधे होते, कीं तो हें भाषण कपटाने करीत असेल असें शेखराला वाटेना, म्हणून या मुत्सद्यासंबंधानें आपल्या मनांत आलेली शंका कदाचित् व्यर्थ असेल, असें शेखराच्या मनांत आलें आणि त्याचें मन गोंधळून गेलें. सुंदरसेन आपणास जो उपदेश करीत आहे, तो आपल्या कल्याणासाठीं केवळ मित्रभावानें प्रेरित होऊन करीत आहे, असें त्याला वाटूं लागलें, इतकेंच नव्हे. तर आपण थोड्या वेळापूर्वी त्याचा निषेध केला, हें योग्य झालें नाहीं, असेंही एकदा त्याच्या मनांत आलें. सुंदरसेनाची योग्यता, त्याचा अधिकार, त्याचें सामर्थ्य इत्यादि गोष्टींचा विचार करतां आपल्यासारख्या विशेष महत्त्व नसलेल्या मनुष्यास त्यानें अशा प्रकारचा उपदेश करण्यापासून त्याचा स्वतःचा कोणता फायदा व्हावयाचा आहे, असा प्रश्न शेखराच्या मनांत उत्पन्न झाला; केवळ आपल्या कल्याणासाठींच तो आपल्याला उपदेश करीत असावा, या खेरीज त्याचा दुसरा कोणताही हेतु शेखराला आढळेना.

अशारीतीनें शेखराच्या मनाचा गोंधळ उडालेला पाहून सुंदरसेन पुढें म्हणाला,– ' अहो राजपुत्र, मी आतां जें भाषण केलें तें कुटिल राजनीतीस योग्य असल्यामुळें तुमच्यासारख्या जगाचा अनुभव फार कमी असलेल्या तरुणांस तें रुचण्यासारखें नाहीं, हें मी जाणून आहें. परंतु मी असें कां बोललों, याचें कारण जर तुम्हास समजलें, तर मी तुम्हास वेळीं सावध केलें, याबद्दल तुम्ही माझे उपकार मानल्याखेरीज राहणार नाहीं, अशी माझ्या मनाची पूर्ण खात्री आहे. इतकावेळ मीं जो उपदेश केला त्याशिवाय आणखी एक महत्त्वाची गोष्ट तुम्हाला सांगावयाची आहे. ती गोष्ट हीच कीं देवशर्म्यासंबंधानें फार सावध रहा ! तो तुमचा शत्रु आहे, असें समजून त्याच्याशीं आपलें वर्तन ठेवा ! '

शेखरानें विचारलें,–' काय ? ते राजपुरोहित माझें शत्रुत्व करितात ! कदाचित तसें असेलही ! कारण आज माझें राजा-

धिराजांशीं भाषण चाललें असतां ते वारंवार मजकडे क्रुद्ध दृष्टीनें पाहात असत, ही गोष्ट माझ्या चांगली ध्यानांत आहे! राजाधिराजांशीं भाषण करीत असतां व पुढें आपल्या रथामध्यें बसल्यानंतरही त्यांचें जें भाषण चाललें होतें, तें मी केवळ त्यांच्या ब्राह्मणत्वाकडे लक्ष्य देऊन सहन केलें.'

गुप्त गोष्ट सांगत असल्याप्रमाणें आपला स्वर अगदीं हळू करून सुंदरसेन शेखरास म्हणाला,-'तुमचा स्वभाव त्याला आवडत नाहीं, यांत मला अगदीं शंका नाहीं. त्या देवशर्म्याचें देवी शैवलिनीपाशीं फार वजन असल्यामुळें त्याचें सामर्थ्य फार मोठें आहे; परंतु यासंबंधानें मला सध्या अधिक बोलतां येत नाहीं. दैवयोगानें तुम्ही राजदरबारीं आला असून तुम्हाला जगांतील विलक्षण गोष्टींचा अनुभव नुकता कोठें यावयाला लागला आहे. राजाचें दरबार म्हणजे वाघांचें रान, किंवा सर्पांचें बिळ, किंवा तुफान झालेला समुद्र आहे असें समजून तुम्हीं मोठ्या सावधपणानें वागाल, तर तुमचा निभाव लागेल. जरा का तुम्ही बेसावध राहिला तर देवशर्मा तुमचा केव्हां घात करील, याचा नेम नाहीं! मला जे सांगावयाचें होतें तें मीं सांगितलें आहे. यापुढें तुमची मर्जी. आतां आपण निरोप घेऊं या!'

इतकें भाषण झाल्यावर त्यांना परस्परांस नमन केलें, आणि ते दोघेही खलबत खान्याचा दरवाजा उघडून बाहेर आले. या वेळीं शेखराच्या मनाची मोठी चमत्कारिक स्थिति झालेली होती. सुंदरसेनाशीं झालेल्या संवादावरून शेखराला त्याच्या स्वभावाची पारख करतां येईना. तो मोठा राजकार्य धुरंधर पुरुष असावा, आणि राज्याच्या कल्याणासाठीं तो झटत असावा असें एकदा त्याच्या मनांत येई, तर दुसऱ्या क्षणीं तो मोठा कपटी आणि विश्वास घातकी पुरुष असावा असें त्यास वाटे. अशा प्रकारें त्याची मनोवृत्ति द्विधा झाली असतां तो सुंदरसेनाच्या वाड्यांतून बाहेर पडला. सुंदरसेनानें आपल्या कारकुनाला हाक मारून रथ जोडून आणावयाची आज्ञा केली; थोड्याच वेळानें शेखर आपल्या सेवकासह रथांत बसला, आणि आपल्या बिऱ्हाडीं येऊन दाखल झाला.

प्रकरण ४० वें.

राजदरबार.

दुसरे दिवशीं प्रातःकाळीं राजवाड्यांतून शेखराला नेण्यासाठीं रथ आला, आणि उत्तम प्रकारचे वस्त्रालंकार धारण करून शेखर आपल्या पत्नीसह रथामध्यें जाऊन बसला. रथाबरोबर दुसरी एक गाडी आलेली होती, तीमध्यें चतुरकानें शेखराचें सर्व सामान नेऊन ठेविलें, आणि तो निपुणिकेसह त्या गाडींमध्यें बसला. थोड्याच वेळानें तीं चौघेंजणें राजवाड्यांत जाऊन पोंचलीं. राजाज्ञेनें त्यांच्यासाठीं राजवाड्यांतील दुसऱ्या मजल्यावरील दोन उत्तम दिवाणखाने राखून ठेविलेले होते, त्यांमध्यें तीं दाखल झालीं.

तिसरे प्रहरीं राणी शैवलिनीचें प्रियंवदेला बोलावणें आलें, म्हणून आपल्या संग्रहांतील उत्तम प्रकारचे वस्त्रालंकार धारण करून ती राज्ञीदर्शनास जाण्यासाठीं तयार झाली. वास्तविक पाहिलें तर प्रियंवदेच्या सौंदर्याला वस्त्रालंकारांची फारशी जरूर नव्हती, तथापि राज्ञीदर्शनास जावयाचें असल्यामुळें तिनें मुद्दाम उत्तम वस्त्रालंकार धारण केले होते. अशा रीतीनें वस्त्रालंकारांनीं मंडित झालेल्या आपल्या पत्नीकडे पाहून शेखराला समाधान वाटलें.

राणीच्या तैनातीस असलेल्या एका कुल स्त्रीयेबरोबर प्रियंवदा अंतःपुरामध्यें

गेली. ती ज्या मार्गानें अंतःपुरामध्यें गेली, त्या मार्गांत कित्येक मोठमोठे दिवाणखाने होते. त्या दिवाणखान्यांतील ऐपआरामांचे आणि वैभवाचे पदार्थ पाहून प्रियंवदेला फार आश्चर्य वाटलें. अंतःपुरामधील थाटमाट पाहून तर तिला सध्यां आपण प्रत्यक्ष स्वर्गांतच आहों, असा भास झाला. राणी सध्यां आपल्या वयाच्या चार सख्यांसह तेथें गोष्टी बोलत बसलेली होती. या दिवाणखान्यांत जिकडे तिकडे आरसे, हंड्या, झुंबरें, देवादिकांचीं चित्रें, सुवर्णाचीं पात्रें यांची समृद्धि होती. ज्या हस्तिदंती झोंपाळ्यावर राणी आपल्या सख्यांसह बसलेली होती, त्या झोंपाळ्याचें नकशीकाम अत्यंत मनोवेधक असून, त्याला रुप्याच्या सांखळ्या लाविलेल्या होत्या. खालीं जमिनीवर उत्तम प्रकारचा गालीच्या अंथरलेला असून त्यावर मखमालीचीं गाद्या-लोंडें मांडलेलीं होतीं. राणी शैवलिनी आणि तिच्या सख्या अत्यंत सुंदर असून त्या वस्त्रालंकारांनीं मंडित झालेल्या असल्यामुळें त्या जणुं काय स्वर्गीतील देवांगना पृथ्वीवर अवतीर्ण झाल्या आहेत, असा भास होत होता. प्रियंवदा ही स्वतः रूपवती होती, म्हणून बरें झालें, नाहीं तर तिला येथें खट्टू होण्याचा प्रसंग आला असता. तसेंच तिनें सध्यां उत्तम वस्त्रालंकार धारण केले नसते, तर तिचें दैन्य दृष्टीस पडून तेथील स्त्रिया तिजबरोबर मोकळ्या मनानें बोलल्या असत्या कीं नाहीं, याची शंकाच होती! प्रियंवदेला पाहतांच राणीनें योग्य शब्दांनीं तिचें स्वागत केलें, व झोंपाळ्यावर आपल्या शेजारीं तिला जागा केली, आणि प्रियंवदा विनयपूर्वक राणीशेजारीं जाऊन बसली. नंतर राणी तिला म्हणाली,–'प्रियंवदाबाई तुमचें स्वागत असो! तुमच्या दर्शनानें आम्हाला फारच आनंद होत आहे. बागलाणासारख्या डोंगराळ मुलखांतील स्त्रिया इतक्या सुंदर असतील, अशी आमची कल्पना देखील नव्हती! तुमची भेट होईपर्यंत बागलाणांतील स्त्रियांसंबंधाच्या आमच्या कल्पना अपूर्ण होत्या, असें म्हणावयास हरकत नाहीं.'

प्रियंवदेला आपली स्तुति करून घेण्याची अगदीं संवय नसल्यामुळें राणीनें केलेली स्तुति ऐकून तिला जरा चमत्कारिक वाटलें; पण तेवढ्यानें कोठें निभावलें? राणीनें प्रियंवदेची स्तुति केली,* हें पाहून तिचा शब्द झेलण्यास तयार असलेल्या तोंडपुज्या सख्यांनीं प्रियंवदेवर स्तुतीचा वर्षाव केला, त्यामुळें तर ती अगदीं लज्जित झाली, आणि तिच्या मुखांतून वर्णोच्चार स्पष्ट येईनासा झाला. तिनें अव्यक्त शब्दांनीं राणी शैवलिनीचें प्रति–स्वागत केलें.

राज्ञीदर्शनापैकीं हा पहिला भाग आटोपला, आणि निराळ्या विषयास प्रारंभ झाला, हें पाहून प्रियंवदेला जरा बरें वाटलें आणि तिच्या मुखांतून स्पष्ट शब्दोच्चार होऊं लागला; तिच्या मनाला शांतता येऊन तिनें राणीच्या प्रश्नांची यथायोग्य पण सत्याचा अपलाप न करतां स्पष्टपणें उत्तरें दिलीं. त्यांवरून ती जशी रूपवती तशीच बुद्धिमती आहे, अशी सर्व सख्यांसह राणीची खात्री झाली. त्यावेळीं त्यांचीं जीं प्रश्नोत्तरें झालीं, तीं साधारणपणें रत्नाकर राजा व शेखर यांजमधील संवादाप्रमाणें असल्यामुळें तीं सर्व येथें देऊन आम्ही पुनरुक्तीचा दोष पदरीं घेत नाहीं.

प्रियंवदा राणीच्या भेटीस गेल्यानंतर थोड्याच वेळानें राजाधिराज रत्नाकराचा एक सेवक शेखराकडे आला; व "राजाधिराज आपणांस दर्शनासाठीं बोलावीत आहेत," असा त्यानें त्यास निरोप सांगितला, म्हणून शेखरही उत्तम पोषाक करून राजाच्या दर्शनास गेला. राजा व शेखर हे औपचारिक भाषणें बोलत आहेत, तोंच राजपुरोहित न्यायमंत्री देवशर्मा त्या

ठिकाणीं येऊन दाखल झाला. शेखर राजापाशीं आला, तेव्हां तेथें आणखी दोन तीन खुषमस्करे खासगीकडील सेवक होते.

राजानें शेखराला प्रश्न केला,–'तर मग निंबराज आमच्यावर स्वारी करणार ही गोष्ट निश्चित झाल्यासारखी आहे, असं म्हणावयास हरकत नाहीं, आणि युद्धाचे वेळीं बागलाणातील कित्येक संस्थानिक त्या निंबराजाच्या पक्षाला अनुकूल होतील, असेंही ठरल्यासारखेंच आहे. पण काय हो, तेवढे संस्थानिक फितूर झाले, म्हणून आमच्या पक्षास जय येणार नाहीं, असें तुम्हांस वाटतें कीं काय ?'

यावर शेखर कांहीं उत्तर देणार होता, पण तितक्यांत देवशर्मा मध्येंच म्हणाला,– 'राजाधिराजांच्या या प्रश्नाचें यथायोग्य उत्तर या खेडवळ तरुणास देतां यावयाचें नाहीं, अशी आमच्या मनाची खात्री आहे. ज्यांना आपल्या सर्व राज्याची यथार्थ माहिती असेल, तोच या प्रश्नाचें उत्तर देऊं शकेल !'

आपल्या संभाषणामध्यें देवशर्म्यानें तोंड घातलें, ही गोष्ट रत्नाकराला अगदीं आवडली नाहीं. त्याला नेहमीं राग झटकन् येत असे, त्याप्रमाणें त्याला यावेळींही आला, आणि त्याचे ओष्ठ स्फुरण पावूं लागले. तो देवशर्म्याला उद्देशून म्हणाला,–'तुमच्यासारखे मोठे शहाणे म्हणविणारे मंत्री माझें अन्न खात असतां त्यांनीं ही गोष्ट मला इतक्या दिवस कळवूं नये, याचें मला फार आश्चर्य वाटतें. तुम्ही ज्याला खेडवळ म्हणतां त्याला जितकी माहिती आहे, तितकी-सुद्धां तुम्हांस नसेल, इतके तुम्ही मूर्ख नसाल; अशी माझी पक्की खात्री आहे; असें असून तुम्हीं ज्याअर्थीं आम्हाला आतांपर्यंत कांहीं माहिती दिली नाहीं, त्याअर्थीं तुम्ही लबाड आहां असें म्हणणें आम्हांला भाग आहे. शिवाय कालपासून मी पहात आहें, हा राजपुत्र या प्रकरणासंबंधानें कांहीं बोलूं लागला, म्हणजे तुम्हीं त्याला पुरतें बोलूंसुद्धां देत नाहीं ! अर्थात् तुमच्या मनांत कपट आहे, यासंबंधानें मला तिळमात्र देखील शंका उरलेली नाहीं. आमच्याशीं जे हरामखोरी करतात, त्यांना आम्ही काय शिक्षा करतों, हें तुम्हाला माहीत असूनही तुम्ही ज्याअर्थीं असें आचरण करीत आहां, त्याअर्थीं तुम्हाला कडक शासन करणें जरूर आहे.–'

यापुढें रत्नाकरराजा आणखी कांहीं बोलला असता, पण तितक्यांत देवशर्मा पुढें झाला, आणि अत्यंत नम्रतापूर्वक म्हणाला,– 'राजाधिराज, आपला स्वभाव धीर आणि गंभीर आहे, अशी प्रसिद्धि आहे. आम्ही आजपर्यंत स्वामींस इतका कोप आलेला कधींच पाहिलेला नाहीं. राजाचा कोप कधींही व्यर्थ होत नसतो, असें शास्त्र सांगतें, यासाठीं जे आम्ही विश्वासानें राजसेवा करीत आहों, त्यांजवर स्वामींनीं कोप करूं नये; तो आपला कोप स्वामिद्रोह करणारासाठीं राखून ठेवावा.' असें बोलून त्यानें अर्थपूर्ण दृष्टीनें राजाकडे अवलोकन केलें.

किंचित् शांत होऊन रत्नाकर बोलला,– 'अहो पुरोहित, या तुमच्या भाषणावरून स्वामिद्रोह करणारीं माणसें आमच्या राष्ट्रांत आहेत, असें दिसतें. यासाठीं असें अर्धवट भाषण न करतां तुमच्या मनांत जें कांहीं असेल, तें तुम्हीं स्पष्ट बोलावें, अशी इकडून आज्ञा होत आहे.'

देवशर्मा म्हणाला,–'तें स्पष्ट बोलण्यासाठींच मी आज मुद्दाम स्वामींच्या चरणाजवळ आलों आहें.' असें बोलून देवशर्म्यानें मध्येंच कांहीं आठवल्यासारखें करून शेखराकडे पाहिलें, आणि किंचित् अधिकारदर्शक वाणीनें परंतु सौम्य मुद्रेनें शेखरास प्रश्न केला,–'अहो तरुण राजपुत्र, तुम्हीं राजाधिराजांस जें कांहीं सांगितलें, तें तुम्हीं आपल्या समजुतीप्रमाणें बरोबर सांगितलें, त्यासंबंधानें माझें सध्यां कांहीं म्हणणें नाहीं.

मी दुसऱ्या एका बाबतींत तुम्हाला कांहीं प्रश्न विचारणार आहें, त्याचीं तुम्हीं खरीं खरीं उत्तरें द्याल, अशी माझी खात्री आहे. कांहीं महिन्यांपूर्वी आपल्या बागलणांत एक महत्त्वाची गोष्ट घडून आली-ती गोष्ट म्हणजे कोणी सरदार हलधर या नांवाचा एक गृहस्थ आपल्या सत्यरथ नांवाच्या सेवकासह बागलाणांत आला होता. त्यावेळीं ते दोघेजण तुमच्या प्रतापपुरीं आले होते, असेंही मला खात्रीलायक आधारावरून कळलें आहे. ते दोघे ज्यावेळीं तुमच्या गांवीं आले, त्यावेळीं तुम्ही तेथें होतां काय?'

शेखरानें 'होय' असें उत्तर दिलें.

देवशर्मा म्हणाला,-'तर मग मी आतां त्या दोघांपैकीं सत्यरथ नांवाच्या माणसाचें वर्णन करितों. तुम्ही त्या माणसाला प्रत्यक्ष पाहिलें असल्यामुळें मी जें त्याचें वर्णन करितों, तें बरोबर जुळतें कीं नाहीं हें पहा.' असें बोलून देवशर्म्यानें सत्यरथाच्या रंगा-रूपाचें आणि अंगापिंडाचें अगदीं बरोबर वर्णन केलें. तें वर्णन सत्यरथाला बरोबर जुळलें, हें पाहून शेखरानें सत्यरथ अशा प्रकारचा मनुष्य आहे, असें सांगितलें.

आपणास समाधान झालें असें दाखवीत मोठ्या आढ्यतेनें देवशर्मा म्हणाला,-'या बाबतींत माझी फसगत झालेली नाहीं; अशी माझ्या मनाची खात्री होतीच! अहो, राजपुत्र, तुम्ही सत्याचे भक्त असल्यामुळें मीं विचारलेल्या प्रश्नाचें उत्तर देण्यास तुम्हीं कांकूं करणार नाहीं, अशी माझ्या मनाची खात्री होतीच. त्या सत्यरथाची ओळख पटण्यास तुमचा चांगला उपयोग झाला, ही मोठी आनंदाची गोष्ट आहे. या सत्यरथासंबंधानें मी आतां राजाधिराजांस जी गोष्ट सांगणार आहें, ती तुम्ही ऐकली म्हणजे माझ्या प्रश्नाचें महत्त्व तुमच्या लक्ष्यांत येऊन तुम्हाला मोठें आश्चर्य वाटेल!'

रत्नाकर राजाची उत्कंठा जागृत करण्याकरितां देवशर्म्यानें केलेला प्रयत्न सफल झाला. राजानें मोठ्या उतावळेपणानें त्यास म्हटलें, 'अहो पुरोहित, तुम्हाला जें काय सांगावयाचें आहे, तें चटकन् सांगून सोडा कसें?'

देवशर्मा बोलला,-'राजाधिराज, मी आतां जें सांगत आहें, तिकडे आपलें पूर्ण अवधान असावें. आपल्या प्रधानमंडळांतील मोठीं जबाबदारीचीं कामें करणारा एक मनुष्य आपल्या शत्रूस फितूर आहे, अशी फार दिवस मला शंका होती; आतां तर तो मनुष्य राजद्रोही आहे, अशाबद्दल माझ्या मनाची बालंबाल खात्री पटली आहे.'

रत्नाकर क्रोधानें गर्जना करीत म्हणाला, 'असा तो यमाच्या पाशांत मान अडकवून घेतलेला पुरुष कोण आहे, त्याचें नांव झटकन् सांगा पाहूं!'

देवशर्म्यानें थोडा वेळ घुटमळल्यासारखें केलें. तो फक्त एक दोन पळेंच स्तब्ध होता, पण तेवढ्या वेळांत राजाचा क्रोध अगदीं कळसास पोंचला होता. हें पाहून त्या न्यायमंत्र्यास समाधान झालें, आणि तो बोलला,-'माझें भाषण ऐकून राजाधिराजांस मोठा चमत्कार वाटेल, आणि कदाचित् मी खोटें सांगत असेन अशी शंका येईल. पण मी अगदीं सत्य तेंच सांगत आहें. माझी अशी खात्री आहे की सुंदरसेन त्या दुष्ट निंबराजाला अनुकूल आहे.'

देवशर्म्यानें सुंदरसेनाचें नांव घेतलेलें ऐकतांच शेखराखेरीज तेथें असलेल्या सर्वांच्या तोंडून आश्चर्याचे उद्गार बाहेर पडले, आणि ते सर्वजण परस्परांच्या तोंडांकडे टकमका पाहूं लागले. रत्नाकर राजा यावेळीं जरी क्रोधानें बेभान झालेला होता, तरी देवशर्म्याच्या मुखानें तो फितूर आहे, हें कानीं येतांच त्याच्या डोळ्यांपुढें झक्क झालें, आणि त्याची मुद्रा खाडकन् उतरली. एक क्षणभर अशा स्थितींत गेल्यावर त्याचा क्रोध पुनः जागृत झाला, आणि तो म्हणाला, "राजद्रोह करणारा, मग तो सुंदरसेन असो कीं दुसरा कोणी असो, तो अपराधी आहे,

असें ठरल्याबरोबर त्याला देहांत शिक्षा झालीच पाहिजे ! '

देवशर्मा अत्यंत गंभीर मुद्रा धारण करून बोलला, ' राजाधिराज, हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा असल्यामुळें या प्रश्नाचा तडका-फडकीं निकाल लावणें धोक्याचें आहे ! '

थोडावेळ थांबून रत्नाकर म्हणाला,– ' अहो पुरोहित, तुम्ही प्रत्यक्ष सुंदरसेनावर स्वामिद्रोहाचा आरोप करीत आहां, अर्थात् तुमच्यापाशीं प्रमाणेंही तशींच असलीं पाहिजेत ! '

देवशर्मा संथपणें म्हणाला,–" राजाधिराज, यावेळीं त्याचा राजद्रोह सिद्ध होण्या-इतका मजपाशीं पुरावा नाहीं, ही गोष्ट खरी, तरी पण जर आपण आज्ञा कराल, तर आजरात्रीं सुंदरसेनाचा अपराध सिद्ध करणारें जिवंत प्रमाण आपल्या हातीं येईल ! "

रत्नाकरानें विचारलें,–" जिवंत प्रमाण म्हणजे ? "

देवशर्मा बोलला,–"मी आतां ज्याच्या रूपरेखेचें वर्णन केलें, तो सत्यरथ ! "

सत्यरथाचें नांव ऐकून शेखराला अगदीं आश्चर्य वाटलें नव्हतें; कारण जेव्हां देव-शर्म्यानें सत्यरथाचें वर्णन केलें, तेव्हांच तो सुंदरसेनाच्या वाडयांत आहे, ही बातमी देवशर्म्याला कळली असावी, असें त्यानें अनुमान केलें होतें. सुंदरसेनानें सत्यरथ आपला हस्तक आहे, असें शेखराला सांगि-तलें असल्यामुळें शेखराचें मन द्विधा झालें होतें. शिवाय देवशर्म्याच्या इमानासंबंधानेंही त्याच्या मनांत शंका उत्पन्न झालेली असल्यामुळें, या बाबतींत आपण कांहीं न बोलतां स्वस्थ बसण्यांतच शहाणपणा आहे, असें शेखराच्या मनांत आलें आणि तो कांहीं न बोलतां उगीच बसला.

राजानें विचारलें,–" काय म्हणतां ? सत्यरथ आज सुंदरसेनाच्या वाडयांत आहे ?"

देवशर्म्यानें उत्तर केलें,–" राजाधिराज, सुंदरसेनाचा मला आज कित्येक दिवस संशय येत असल्यामुळें, [illegible] निवृत्ति करण्यासाठीं म्हणून [illegible] एक हेर सुंदरसेनाच्या वाडयांत ठेविला आहे, या माझ्या हेरानें मला वारंवार [illegible] कळविल्या, त्यांवरून माझ्या संशयांत [illegible] पडत चालली. कालरोजीं निंबराजाचा एक हस्तक सुंदरसेनाकडे आला, आणि त्याला सुंदरसेनानें आपल्या वाडयांतील खलबत-खान्याजवळच्या एका दिवाणखान्यांत मोठ्या गुप्तपणानें लपवून ठेविलें आहे, अशी बातमी हेरानें मला सांगितली. तेव्हांपासून तो माझा हेर त्या लपलेल्या माणसावर पाळत राखीत आहे. माझ्या हेरानें या माणसाचें वर्णन आजच सकाळीं मजपाशीं केलें. हें वर्णन ऐकतांच अशाच कोणा माणसाचें वर्णन मीं पूर्वी ऐकिलें होतें, असें मला आठ-वलें, आणि बागलाणांत आलेल्या सत्यरथाचें मला स्मरण झालें. परंतु तेवढ्यानें माझ्या मनाची खात्री पटेना, म्हणून मी आतां या राजपुत्राच्या तोंडून आपली खात्री करून घेतली. "

राजा म्हणाला,–" असें असेल तर या सत्यरथाला आतांच्या आतां कैद करून आणून त्याला सूर्य अस्तास जाण्यापूर्वी फांसावर चढविलें पाहिजे. "

राजानें ही शिक्षा फरमाविलेली ऐकून शेखराला बरेंच वाईट वाटलें, आणि आपण सत्यरथाची ओळख पटण्यास पर्यायानें कारण झालों, याचें त्याला फार वाईट वाटलें.

देवशर्मा अत्यंत गंभीर मुद्रा धारण करून म्हणाला,–' राजाधिराज, या सेवकाची चर-णापाशीं थोडी विनंति आहे, तिकडे लक्ष्य असावें. मी जी जी गोष्ट करतों ती ती पूर्ण विचार करून मोठ्या सावधपणानें करीत असतों, ही गोष्ट स्वामींस विदित आहेच ! हे राजपुत्र काल सुंदरसेनाबरोबर येथून परत गेले, त्या वेळीं मी मुद्दाम त्यांच्याबरोबर त्यांच्या वाड्यापर्यंत गेलों होतों. असें करण्यांत त्या वाड्याची टेह-

[illegible]कारी शिपाई एकदम त्या [illegible]स त्यांना अडथळा होण्याचा [illegible]कीं काय हें पहावें, असा माझा [illegible]. त्या वेळीं सुंदरसेनानें आपल्या [illegible]या कडेकोट बंदोबस्त ठेविला आहे, असें मला आढळून आलें. मी त्या वाड्याच्या आसमंतात् नजर टाकिली, त्या वेळीं जिकडे तिकडे सशस्त्र माणसें माझ्या दृष्टीस पडलीं. हा प्रकार पाहिल्याबरोबर अर्थात्च माझ्या मनांतील संशय दुणावला, आणि निंबराजाचा हस्तक आपल्याकडे आला आहे, या गोष्टीचा बभ्रा झाल्यास आणि त्याला पकडण्यासाठीं कोणीं प्रयत्न केल्यास सुंदरसेनानें आपल्या व त्या हस्तकाच्या बचावासाठीं हा बंदोबस्त केला असावा, असें साहजिकपणें माझ्या मनांत आलें. राजाधिराज, सुंदरसेन हा मोठा कपटी आणि धूर्त आहे. त्याचीं सर्व कारस्थानें मोठ्या गुप्तपणानें चालूं असल्यामुळें जरी माझ्या मनांत त्याच्याविषयीं पुष्कळ संशय आहे, तरी न्यायासनासमोर खात्री करून देण्यासारखें एकही प्रमाण माझ्या हातीं मिळालेलें नाहीं, हें मी प्रांजलपणें कबूल करतों! राजाधिराज, परिस्थिति अशा प्रकारची असल्यामुळें सुंदरसेनाचा राजद्रोह सिद्ध करण्याचें जें फक्त एकच साधन आपल्या हातीं लागावयाची वेळ आली आहे, तें साधन आपण मोठ्या सावधगिरीनें हस्तगत करून घेतलें पाहिजे. सुंदरसेनाचा खरा स्वभाव लोकांस समजला नसल्यामुळें त्याजवर सर्वांचा विश्वास आहे. आपल्या राज्यांतील बहुतेक सरदार-मानकरी त्याला मोठा मान देत असतात. त्याच्या शब्दाबरोबर प्राण देण्यास सिद्ध होणारे लोक त्याजपाशीं पुष्कळ आहेत. अशा प्रकारच्या स्थितीमध्यें त्याच्यावर अपराध शाबीद करण्यासारखीं जोरदार प्रमाणें मिळाल्याखेरीज त्याच्या बाबतींत जाणें राज्याला अपायकारक होईल, तो उलट आपल्यावर अन्यायाचा आरोप करील, आणि अगदीं उघडपणें आपल्या अनुयायांसह निंबराजाला जाऊन मिळेल! असें झाल्यास मोठा अनर्थ होणार आहे. जर आपण भरादिवसा सुंदरसेनाच्या वाड्याची झडती ध्यावयास शिपाई पाठवाल तर त्याचा गवगवा होईल, आणि कितीही सावधपणा राखला, तरी तो निंबराजाचा हस्तक पळून जाईल; किंवा आपण आतां घाईघाईनें त्या सत्यरथाला पकडण्यासाठीं शिपाई पाठविले, आणि तो सध्यां वाड्यांत नसला तर? यासाठीं त्याला पकडावयाचा बेत मध्यरात्रीपर्यंत तहकूब ठेवावा, आणि सत्यरथ वाड्यांत आहे, अशी आपली खात्री करून घेऊन नंतर आपण सुंदरसेनाच्या वाड्यास एकदम शिपायांचा गराडा द्यावा. राजाधिराज, सध्यांच्या प्रसंगीं आपण किती सावधपणा ठेविला पाहिजे, तें मीं आपल्या बुद्धीप्रमाणें चरणीं निवेदन केलें आहे; याउपर स्वामींची मर्जी!"

राजा म्हणाला,–" वास्तविक म्हणाल तर अशा प्रकारच्या गोष्टी तडकाफडकीं केल्यास त्यांचा फार छान उपयोग होतो; तथापि तुमची जर मध्यरात्रीपर्यंत वाट पहाण्याचीच इच्छा असेल,तर आमची त्यास हरकत नाहीं."

अशा प्रकारचा संवाद झाल्यानंतर राजानें सर्वांस निरोप दिला, व ते सर्वजण आपापल्या स्थळीं निघून गेले. शेखर आपल्या दिवाणखान्यांत गेल्यावर त्यानें हा सर्व प्रकार आपल्या पत्नीस सांगितला; त्यांनीं त्यासंबंधानें बरीच चर्चा केली. शेवटीं शेखर म्हणाला, "यासंबंधानें माझें मन संशयामध्यें गटकळ्या खाऊं लागलें आहे. देवशर्मा आणि सुंदरसेन हे दोघेही कपटी असल्यामुळें, मला कोणाचा पक्ष खरा आहे, हें अगदीं समजत नाहीं. तसेंच हा सत्यरथ निंबराजाचा हस्तक आहे कीं सुंदरसेनाचा हस्तक आहे, हें ठरविणेंही मोठें कठीण आहे.

प्रियंवदा म्हणाली,–" तें कसेंही असो, सध्यां दोन माणसांच्या गळ्यास फांस लागला आहे, यांत मात्र संशय नाहीं. सत्यरथ हा जरी खरोखर राजद्रोही असला, आणि त्याला देहांतशिक्षा झाली, तरी ती गोष्ट आपणास पसंत पडणार नाहीं, अशी माझ्या मनाची खात्री आहे!"

शेखर बोलला, "होय; एका माणसानें दुसऱ्या माणसाचा प्राण घ्यावा, ही गोष्ट मला अगदीं पसंत नाहीं! लढाईचे प्रसंगीं, किंवा जुलूम-जबरीचे प्रसंगीं एका माणसाला दुसऱ्याचा प्राण घेणें भाग पडतें हें खरें; तरी अशा प्रसंगीं सुद्धां जितका रक्तपात टळेल तितका टाळणें हें प्रत्येकाचें कर्तव्य-कर्म आहे. जोंपर्यंत मेलेलें मनुष्य मनुष्यांस जिवंत करतां येत नाहीं, तोंपर्यंत एकानें दुसऱ्याचा प्राण घेणें हें कधींही योग्य होणार नाहीं. या आर्यावर्तामध्यें जे निर्बंधकार होऊन गेले, त्यांनीं देहांतशिक्षा अगदीं भयंकर अपराधांस सांगितली आहे, ही गोष्ट जरी खरी आहे, तरी ही शिक्षा देणारा पुरुष विचारी असला पाहिजे, या गोष्टीवर त्यांचा मोठा कटाक्ष आहे."

प्रियंवदा बोलली,–" पण या शास्त्राच्या गोष्टींचा येथें काय उपयोग! जेथें असत्य भाषण करण्याचें पाप वाटत नाहीं, इतकेंच नव्हे, तर असत्य भाषण आणि कपटाचें वर्तन हेंच जीवितरक्षणाचें साधन [illegible] आहे, त्या भयंकर स्थळाप[illegible]ण दूर असावें तितकें बरें, अ[illegible] आहे!" इतक्यांत बाहेरच्[illegible]चे पाय वाजलेले त्यांस ऐ[illegible]न त्यांनीं आपलें संभाषण

इत[illegible] दरवाजा उघडला, आणि [illegible]रा भेटीस आली आहे, अ[illegible]. मथुरा आपल्या आनंदी [illegible] दोघांस प्रिय झाली असल्य[illegible]ची आनंदानें भेट घेतली. आजच्या प्रसंगीं मथुरेच्या अंगावर उत्तम प्रकारचे वस्त्रालंकार असून तिची मुद्रा आनंदानें सुप्रसन्न दिसत होती. शेखर आणि प्रियंवदा यांच्या समोर आल्या. बरोबर मथुरेनें त्यांस मोठ्या नम्रतेनें प्रणाम केला, आणि ती बाजूला उभी राहिली.

तिला प्रियंवदा म्हणाली,–' कुमारिके, तुझें कुशल आहेना?'

मथुरा हळूच एकदां वर पाहून बोलली,– " ताईसाहेब, मी आतां कुमारिका नाहीं! माझा विवाह झालेला आहे, आणि मी आतां लवकरच आपल्या पतीसह स्वगृहीं जाणार आहें!"

शेखर बोलला,–" मथुराबाई, हें वर्तमान ऐकून आम्हाला फार आनंद होत आहे; मला वाटतें, तूं बागलाणांतून येथें विवाहासाठींच आली असशील!"

मथुरा म्हणाली,–" होय महाराज; येथें माझे मातुळ राहत असतात, त्यांनीं माझ्या आज्याला पत्र लिहून मला इकडे बोलाविलें होतें. आपण बागलाणांतील शिवालयांत उतरलां होतां, त्याच दिवशीं माझ्या आजोबांस तें पत्र मिळालें; त्यांत लग्नासाठीं मला इकडे येण्याविषयीं त्यांनीं लिहिलें होतें."

प्रियंवदा म्हणाली,–" मथुरे, तूं बरीच लबाड आहेस। तूं लग्नासाठीं येथें आलीस, हें तुला माहीत असूनही तूं आम्हास त्यासंबंधानें अगदीं दाद दिली नाहींस! एवढी तुला आमची भीति कां वाटली? कदाचित् तसें सांगितल्यास आम्ही समारंभास येऊं आणि मग तुझ्या मामाला आमच्या स्वागतासाठीं अधिक खर्च करावा लागेल, अशी तुला भीति पडली होती कीं काय?"

मथुरा म्हणाली,–" होय; मला भीति वाटत होती, ही गोष्ट तर खरीच; पण आपण म्हणतां तशा प्रकारची ती भीति नसून अगदीं वेगळ्याच तऱ्हेची भीति माझ्या मनांत होती! सुदैवानें मला जे पति लाभले आहेत, त्यांच्यावर लक्ष्मीची

मर्जी सुप्रसन्न असल्यामुळें अधिक खर्चाची भीति बाळगण्याचें कारण नाहीं. ताईसाहेब, मी ही गोष्ट आपणांस कळविणें हें माझें कर्तव्य होतें, ही गोष्ट मला माहीत आहे; पण माझ्या विवाहाचा प्रस्तुतच्या राजकारणाशीं अगदीं निकट संबंध असल्यामुळें अगदीं गुप्तपणानें पार पाडणें अपरिहार्य होतें. ताईसाहेब, मी उद्यांच आपल्या पतीसह दूरदेशीं जाणार आहें, म्हणून मुद्दाम आज आपल्या दर्शनासाठीं येथें आलें आहें."

हें मथुरेचें भाषण श्रवण करून शेखराच्या मनांत एक मोठी चमत्कारिक शंका उत्पन्न झाली. सत्यरथाच्या गोष्टी नुकत्याच सुरू असल्यामुळें तोच कदाचित् मथुरेचा पति असावा, असें एकदम त्याच्या मनांत आलें, आणि पूर्वी तिनें शिवालयामधून सरदार हलधर आणि सत्यरथ यांना मोठ्या चतुराईनें व साहसानें पळवून लावलें होतें, या गोष्टीची त्याला आठवण होऊन त्याच्या शंकेस बळकटी आली. तसेंच बागलाणांतून वल्लभीनगरीस येण्याची तिला इतकी घाई झाली होती, याचें कारण सत्यरथाला या राजधानीमध्यें फार दिवस राहण्याची सवड नसावी, आणि येथेंच तिच्या मामाच्या घरीं लग्नसोहळा उरकून घ्यावा अशी त्याची इच्छा असावी, असें शेखराच्या मनांत आलें; शिवाय राजकारस्थानामुळें लग्न गुप्तपणें होणें जरूर होतें, आणि उद्यां आपण दूरदेशीं जाणार असें ती म्हणाली, यावरून आपली शंका खरी असावी, असें त्यास हजार दिशांनीं वाटूं लागलें, आणि तो तिच्याकडे अर्थपूर्ण दृष्टीनें पाहूं लागला.

शेखर अशा रीतीनें तिजकडे पहात असतां प्रियंवदा आश्चर्यानें आपल्या पतीच्या मनांत काय आलें असावें, तें समजून घेण्याचा यत्न करीत होती, आणि आपल्या विवाहांतील इंगित शेखराच्या ध्यानीं आलें असावें, असें मनांत येऊन मथुरा भ्यालेल्या हरिणीप्रमाणें चंचल नेत्रांनीं त्याजकडे अवलोकन करीत होती.

नंतर शेखर मथुरेला म्हणाला,–'बाई, मजवर विश्वास ठेव, आणि खरें बोल. मी तुला मित्र आहें; तुझ्या कल्याणासाठीं मी तुला जे प्रश्न करतों, त्याचीं उत्तरें देण्याचें टाळूं नको ! खरें सांग, पूर्वी आमच्या हातून ज्याची तूं मोठ्या साहसानें मुक्तता केलीस, त्या सत्यरथाशींच तुझा विवाह झाला आहे कीं काय !'

मथुरा भयभीत दृष्टीनेंच त्याजकडे पहात म्हणाली,–'महाराज, आपला तर्क खरा आहे ! पण मी आपल्या पायां पडतें. आपल्या पुढें पदर पसरतें.', असें बोलत असतां गाहिंवर येऊन तिच्या मुखानें शब्द येईनासा झाला. तिनें झटकन् पुढें होऊन प्रियंवदेचे पाय धरिले.

शेखर गंभीरपणानें बोलला,–'बाई, भिऊं नको, तुला आमच्या हातून यत्किंचित्सुद्धां पीडा होणार नाहीं."

मथुरेनें आपले पाय धरिले, ती आपणांस शरण आली, अर्थात् तिचें रक्षण करणें हें आपलें कर्तव्य आहे, असें प्रियंवदेच्या मनांत आलें. नवोढा पत्नीचें आपल्या पतीवर किती प्रेम असतें, आणि स्त्रियांचें जीवित सर्वस्वी पतीवर कसें अवलंबून असतें, या गोष्टींचा विचार प्रियंवदेच्या मनांत सारखा जागृत असल्यामुळें तिला मथुरेची [illegible] आली, यांत अगदीं आश्चर्य [illegible] सजल नेत्रांनीं आपल्या [illegible] म्हटलें, "ही भोळी मुलगी [illegible] यानंतर पहिल्यानेंच आप[illegible] आली आहे. हिचें आपण [illegible] पाहिजे ! हाय ! हाय ! ! अ[illegible], सध्यां तुजवर केवढें संक[illegible] याची तुला कल्पनाही [illegible] प्रसंग प्रत्यक्ष वेन्यावर दे[illegible]

प्रियंवदेचें हें भाषण ऐकून मथुरेच्या भीतीस पारावार नाहींसा झाला. ती अगदीं गयांवयां करीत म्हणाली,–" ताईसाहेब, दया करा! दया करा! मी आपली बहीण आहें असें समजा, आणि सध्यां मजवर काय प्रसंग आहे, हें कळवून माझें त्यांतून रक्षण करा!'

शेखर बोलला,–" बाई, तुजवर आलेला प्रसंग फार भयंकर आहे, यांत शंका नाहीं."

प्रियंवदा म्हणाली,–" तिजवर भयंकर प्रसंग गुजरला आहे, म्हणूनच तिचें रक्षण करणें अवश्य आहे!"

शेखर बोलला,–" होय, प्रिये, निदान या मथुरेच्या कल्याणासाठीं तरी त्याचा प्राण वांचविणें आम्हांस भाग आहे!"

त्या उभयतांचीं हीं भाषणें ऐकत असतां मथुरेची पांचावर धारण बसली होती. तिची मुद्रा या वेळीं इतकी काळवंडली होती कीं, अर्ध घटकेपूर्वी तिचा आनंदी चेहरा ज्यांच्या दृष्टीस पडला होता, त्यांनीं तिला यावेळीं पाहिलें असतें, तर पूर्वीची तीच ही मथुरा असें त्यांस ओळखतां आलें नसतें! तिचे हातपाय थरथर कांपत होते, तिच्या सर्वांगास दरदरून घाम सुटला होता, नेत्रांतील तेज नष्ट झालें असून त्यांतून अश्रुधारा वाहत होत्या, आणि मधून मधून हुंदके येत असल्यामुळें तिचा उरःप्रदेश खालीं–वर होत होता. अशाप्रकारची तिची करुणाजनक स्थिति पाहून प्रत्यक्ष पाषाणाचेंसुद्धां हृदय द्रवलें असतें, मग शेखरासारख्या सहृदय पुरुषाचें आणि जातिवयोधर्मांनें सहानुभूतिल असलेल्या प्रियंवदेचें हृदय द्रवलें, यांत आश्चर्य कसचें!

थोड्याच पळांच्या अवधीनें शेखर बोलला,–' मथुरे, मी काय सांगतों, तें नीट ऐकून घे. तुझा पति सत्यरथ सध्यां सुंदरसेनाच्या वाड्यांत गुप्तपणें राहत असतो, ही गोष्ट स्वतः महाराजांच्या कानावर गेली आहे; यांत असें मजकडे टक लावून पाहूं नको! मीं जरी काल त्याला तेथें पाहिलें होतें, तरी तें वर्तमान कांहीं माझ्या मुखानें राजाधिराजांस समजलेलें नाहीं. तूं दुसऱ्याच एका मार्गानें त्यांच्या कानावर गेलें आहे!'

मथुरा बोलली,–' महाराज, आपल्याविषयीं माझ्या मनांत एकक्षणभर संशय आला खरा; कारण आपली–त्यांची काल भेट झाली, हें मला त्यांच्याच मुखांतून समजलें होतें.'

शेखर बोलला,–' सत्यरथाला मीं तेथें पाहिलें, ही गोष्ट एक सुंदरसेन आणि दुसरी माझी पत्नी यांशिवाय तिसऱ्या माणसाला माझ्या मुखानें समजलेली नाहीं. मथुरे, नुकताच मी राजाधिराजांच्या भेटीस गेलों असतां तेथें देवशर्म्यानें ही गोष्ट राजाधिराजांच्या कानावर घातली. त्यावेळींसुद्धां मीं या गोष्टीसंबंधानें कोणत्याही प्रकारचें भाषण केलें नाहीं, हें फार उत्तम झालें, असें मला वाटूं लागलें आहे. मीं त्या वेळीं यासंबंधानें कांहींच बोललों नाहीं, याचें कारण इतकेंच आहे कीं, मला सध्यां या दरबारांत सुरू असलेल्या कुटिल कारस्थानांचा अगदीं कंटाळा आला आहे! केव्हां एकदां मी येथून बाहेर निघेन, तो सुदिन! मथुरे, आज मध्यरात्रीचे सुमारास तइया पतीला कैद करण्यासाठीं सरकारचे शिपाई सुंदरसेनाच्या वाड्यावर छापा घालणार आहेत!'

किंचित् धीर येऊन मथुरा बोलली,–' तर मग अजून पुष्कळ अवकाश आहे. येतें तर मी! हे आपले उपकार मी जन्मभर विसरणार नाहीं. ताईसाहेब, आपण आज मला चुडेदान दिलें आहे, याबद्दल ईश्वर तुम्हां उभयतांना सदैव आनंदांत ठेवील!'

शेखर म्हणाला,–" होय; अजून अवकाश पुष्कळ आहे. तुम्ही जर शहाणपणानें वागाल, तर तुम्हाला आपलें अजून

उत्तम प्रकारें रक्षण करून घेण्यास मध्यरात्री-पर्यंतचा वेळ कांहीं कमी नाहीं. :'

प्रियंवदा बोलली, "असें जरी आहे, तरी तुला आतां वेळ घालवितां नये. जा! ईश्वर तुझें कल्याण करील!"

" ताईसाहेब, आपले उभयतांचे आम्हांवर जे उपकार आहेत, ते या जन्मीं फिटणें अशक्यच आहे! ईश्वर आपलें सदैव कल्याण करील!" असें म्हणून मथुरेनें पुनः एकदां नम्रतेनें त्यांस नमन केलें, आणि ती आपल्या त्या महत्त्वाच्या उद्योगासाठीं घाईनें निघून गेली. आपल्या हातून एक परोपकाराचें कृत्य घडलें, असें मनांत येऊन शेखर आणि प्रियंवदा यांस अत्यानंद झाला. त्यांनीं त्या वेळीं परस्परांकडे ज्या दृष्टीनें अवलोकन केलें, त्या दृष्टीचें वर्णन करण्यास किंवा या वेळीं त्यांच्या मनांत उत्पन्न झालेल्या मनोविकारांचें चित्र काढण्यास हें आमचें कलम असमर्थ आहे!

प्रकरण ४१ वें.

देवशर्म्याचा हेर, आणि सुंदरसेनाचा हेर.

वरील प्रसंग घडून आला त्यावेळीं सूर्यास्ताला अगदीं थोडा अवकाश होता. त्यानंतर आणखी दोन घटकांनीं म्हणजे रस्त्यांमध्यें चांगला काळोख पडला असतां सर्वांग कृष्णवस्त्रानें आच्छादित केलेला एक मनुष्य सुंदरसेनाच्या वाड्यांतून बाहेर पडला, आणि तो तडक एकामागून एक रस्ता संपवून राजवाड्याच्या पिछाडीस येऊन दाखल झाला. त्या ठिकाणीं एक लहानसें दार होतें, त्या दरवाज्यापाशीं येऊन तो मनुष्य थोडावेळ उभा राहिल्यावर एका सेवकानें तो दरवाजा उघडला, आणि कृष्णवस्त्राच्छादित मनुष्याला त्यानें आंत घेतलें. या प्रसंगीं त्यांच्यापैकीं एकालाही भाषण करावें लागलें नाहीं. कारण ते दोघेही परस्परांच्या चांगले परिचयाचे होते. दरवाजा उघडणाऱ्या सेवकामागून आच्छादन घेतलेला सेवक एका अरुंद जिन्यानें दुसऱ्या मजल्यावर गेला. हा जिना जरी अरुंद होता, तरी त्यामध्यें दिवे लावून चांगला प्रकाश केलेला होता. बुरखेवाला गृहस्थ दुसऱ्या मजल्यावर गेल्यावर तेथील एक दोन दिवाणखाने मागें टाकून तो दुसऱ्या एका प्रशस्त दिवाणखान्यामध्यें आला. या दिवाणखान्यांतील भिंतीपाशीं एक उत्तम प्रकारचें आसन मांडलेलें असून त्या आसनावर एक साठीच्या जवळजवळ वयाचा गृहस्थ बसलेला होता. या गृहस्थापुढें एक मोठी थोरली पोथी असून तिचें एक पत्र हातीं घेऊन तो लोडावर कलंडून वाचनांत निमग्न झाल्याप्रमाणें दिसत होता. तो बाह्यत्कारीं जरी वाचीत आहे असें दिसत होतें, तरी तो मधून मधून दिवाणखान्याच्या दरवाज्याकडे पहात होता, यावरून तो कोणाची तरी वाट पहात बसला होता, हें उघड दिसत होतें. हा गृहस्थ देवशर्माच होता. तो राजपुरोहित असल्यामुळें नेहमीं राजवाड्यांतच रहात असे. बुरखेवाला दिवाणखान्यांत येतांच देवशर्म्यानें हातांतील पोथीचें पत्र बाजूस ठेवून दिलें, आणि तो नीट उठून बसला. हें पाहून नवीन आलेल्या माणसानें आपल्या मुखावरील आच्छादन काढून टाकलें, आणि त्यानें देवशर्म्यास लवून नमन केलें.

देवशर्म्यानें सुंदरसेनाच्या वाड्यांत आपला हेर आहे, असें पूर्वी राजापाशीं सांगितलें होतें, हें वाचकांस आठवत असेल. तोच हा हेर सध्यां देवशर्म्याला सुंदरसेनाच्या वाड्यांतील गुप्त गोष्टी सांगावयास इकडे आला होता. या हेराचें नांव सूचिमुख असें होतें. रीतीप्रमाणें देवशर्म्यानें त्याला आशीर्वाद दिल्यानंतर विचारलें, 'सूचिमुखा, आतां काय नवीन वर्तमान आणिलें आहेस?'

तो हेर म्हणाला,–'महाराज, आपण मला सुंदरसेनाच्या वाड्यांत आलेल्या ज्या मनुष्यावर पहारा करण्याचें काम सांगितलें होतें, आणि आपल्या आज्ञेप्रमाणें ज्या गृहस्थाचें मीं अगदीं बारकाईनें वर्णन केलें होतें, तो गृहस्थ–'

देवशर्म्यानें उतावळेपणानें विचारलें,–'त्या गृहस्थाचें काय झालें ? तो अजून वाड्यांत आहेना ?'

सूचिमुखानें उत्तर केलें,–'तो मनुष्य आज संध्याकाळीं सूर्यास्ताच्या सुमारास त्या वाड्यांतून कोठें निघून गेला, तो अद्यापि परत आला नाहीं.'

हें ऐकून देवशर्म्याच्या पोटांत धस्त झालें ! अगदीं घाबऱ्या घाबऱ्या स्वरानें तो म्हणाला,–'तो अजून परत आला नाहीं, असें म्हणतोस, यावरून तो त्या वाड्यांतून कायमचा निघून गेला कीं काय ?'

हेर म्हणाला,–'तें मी कसें सांगूं ? तो गृहस्थ वाड्यांत आल्यापासून नेहमीं आपले सर्व व्यवहार अत्यंत गुप्ततेनें करीत असल्यामुळें मला त्यांपैकीं फारच थोडे समजले, आणि जेवढें मला समजलें, तेवढें मीं आपणांस वारंवार निवेदन केलेंच आहे.'

देवशर्मा बोलला,–'सूचिमुखा, तूं आणलेलें हें वर्तमान माझ्या हेतूंस अतिशय अनिष्ट आहे ! हा माणूस जर आज सरकारच्या हातीं लागला असता, तर त्या नीच सुंदरसेनाचा विश्वासघातकीपणा सर्व जगाच्या निदर्शनास आला असता !' नंतर थोडावेळ विचार करून तो म्हणाला,–'बरें, कदाचित् आणखी गुप्तता राखण्यासाठीं त्या लबाड सुंदरसेनानें त्याला दुसरीकडे कोठें तर लपविलें नसेल ना ?'

सूचिमुखानें उत्तर केलें,–'महाराज, तो सध्या त्या वाड्यांत नाहीं, याबद्दल मीं आपल्या मनाची पुरती खात्री करून घेतली आहे. मीं आज सायंकाळपासून त्यावर चांगली नजर ठेविली असल्यामुळें तो वाड्यांतून बाहेर गेला, हें मीं प्रत्यक्ष पाहिलें, आणि तो वाड्यांतून बाहेर पडल्यानंतर मी मुद्दाम गच्चीवर जाऊन तेथून तो कोणीकडे जात आहे, हें पाहण्याचा प्रयत्न केला, त्यावरून शहराच्या पश्चिमभागाकडे तो गेला, असें मला आढळून आलें. मला वाटतें, तो काल जेथें गेला होता, तेथेंच आजही गेला असेल. आपणाला त्या माणसाला हस्तगत करून घेण्याची किती जरूर आहे, याची मला पूर्ण कल्पना असल्यामुळें मी त्याचा पाठलाग करावा असा बेत करून गच्चीवरून खालीं उतरलों, तोंच मला अमात्यांची स्वारी बाहेरून वाड्यांत येतांना दिसली. तितक्यांत त्यांनीं मला—आपल्या प्रियपात्राकडे–कोठें तें आपणास माहितच आहे–पाठवून दिलें, त्यामुळें माझा नाईलाज झाला. नाहीं तर मी त्याचा पाठलाग केल्याखेरीज राहिलों नसतों !'

देवशर्मा थोडा वेळ स्तब्ध बसला, आणि विचारांत निमग्न झाला. नंतर त्यानें आपल्या हेरास प्रश्न केला, 'बरें, काल सायंकाळीं तो असाच बाहेर पडल्यानंतर कोठें गेला होता, याचा तूं शोध काढलास ? त्या वेळीं तूं ज्या घरापर्यंत त्याचा पाठलाग केलास तें घर कोणाचें आहे, त्यांत माणसें कोण कोण राहतात, वगैरे गोष्टींचा शोध केलाच असशील. त्या ठिकाणीं जर आणखी शोध केला तर ?'

सूचिमुख म्हणाला,–'महाराज, काल सायंकाळीं तो गृहस्थ अमात्यांच्या वाड्यांतून बाहेर पडल्यानंतर मीं त्याचा पाठलाग केला, आणि तो ज्या घरांत शिरला तें घर कोणाचें असावें, याचा शोध करूं लागलों; पण मला काल त्या संबंधानें विशेष बातमी लागली नाहीं; म्हणून आज सकाळीं मी वेळांत वेळ करून त्या घरीं गेलों, आणि चौकशी केली. प्रथमतः तो घरवाला मला दाद लागूं देईना, पण मीं जेव्हां त्याला

धाक दपटशा दिला, आणि थोडी बक्षिसाची लालूच दाखविली, तेव्हां त्यानें एक विलक्षणच प्रकार मला सांगितला ! काल सकाळीं एक गृहस्थ त्याजकडे आला, आणि त्यानें त्याला आपल्या मुलीचें एका गृहस्थाबरोबर गुप्तपणानें लग्न लावावयाचें आहे, म्हणून तेवढा संस्कार होईपर्यंत घर भाड्यानें देण्याची गळ घातली. घरवाल्याला द्रव्यलोभ सुटेना, म्हणून त्यानें ती गोष्ट कबूल केली. मुलीचें लग्न करणारा गृहस्थ आपली स्त्री, कन्या, उपाध्याय, सर्व साहित्य वगैरे तयारीसह तेथें आला, आणि उपाध्यानें लग्नविधि पैकीं कित्येक संस्कार उरकून घेतले. सायंकालाचे सुमारास या लग्नासाठीं सुमारें दहा बारा मंडळी आली होती. त्यांतील एक दोन चांगले प्रतिष्ठित उमराव होते, आणि बाकीचे भिक्षुक ब्राह्मण होते. या प्रतिष्ठित दिसणाऱ्या गृहस्थांपैकीं एका गृहस्थानें आपला पोशाख उतरून विवाहास योग्य वस्त्रालंकार धारण केले. मुलीकडच्या उपाध्यायाच्या एका स्नेह्यानें नवऱ्याचे कडील पूर्व रुत्यें उरकून घेतली, आणि कोणत्याही प्रकारचें शास्त्रोक्त कर्म न चुकतां अगदीं विधिपूर्वक त्या वधुवरांचा विवाह लागला ! घरवाला म्हणाला, अशा प्रकारें मुकाट्यानें–बाद्यांचा किंवा स्त्रीपुरुषांचा गलबला न होतां तो विवाह पार पडला, आणि लागलीच सर्व मंडळी निघून गेली ! महाराज, त्या घरवाल्यानें सांगितलेली ही हकीकत ऐकून मलाही मोठें आश्चर्य वाटलें. माझा तर्क असा आहे कीं, आमात्यांच्या वाडयांत आलेला तो नवरा गृहस्थ या लग्नासाठींच तेथें गेलेला असावा. '

देवशर्मा म्हणाला,–'किंवा त्याच गृहस्थाचा तेथें विवाह झाला असेल। एरव्हीं इतक्या गुप्तपणानें आमात्याच्या वाडयांत राहणारा तो गृहस्थ सध्यांच्या परिस्थितींत दुसऱ्या कोणाच्या विवाहासाठीं तेथें जाईल, असें माझी मनोदेवता मला सांगत नाहीं. पूर्वीचि जुळलेलें असून वराला परदेशीं जाण्याची घाई असावी; जातेवेळीं तो आपल्या वधूला बरोबर नेणार असावा; तो गृहस्थ श्रीमान् असावा, त्याला मुलगी देणारा गृहस्थ कुलीन असावा; वराला या नगरामध्यें पुष्कळ लोक ओळखीत असावे, इतके तर्क या गुप्तलग्नावरून उत्पन्न होतात, आणि त्या संपूर्ण तर्कांवरून असा सिद्धांत निघतो कीं, आपण ज्या गृहस्थाची अपेक्षा करीत आहों, त्याच गृहस्थाचा काल विवाह झाला असला पाहिजे. ज्या अर्थीं त्यानें कालच्या काल आपला विवाह उरकून घेतला, त्या अर्थीं तो मनुष्य आज स्वदेशीं जाण्यासाठीच सुंदरसेनाच्या वाड्यांतून बाहेर पडून गेला असला पाहिजे ! हा माझी तर्कपरंपरा चुकावयाची नाहींच; तथापि तूं आतां परत गेलास म्हणजे पुनः लक्ष्य ठेवून तो परत आला आहे कीं काय हें पहा, आणि जर तो गृहस्थ अजून सुंदरसेनाच्या वाड्यांत असला, तर तूं आपल्या नोकरीची पर्वा न करतां बेलाशक रात्रीं अपरात्रीं केव्हांही येऊन मला भेट. हा गृहस्थ जर आमच्या हातीं लागला, तर आपणां उभयतांचें जन्माचें कल्याण होईल. तूं आणि मी उभयतां महत्पदास चढूं ! जा, अजूनही प्रयत्न कर ! '

नंतर देवशर्म्यानें आपल्या भैरव नामक सेवकाला हाक मारिली. तो आल्यावर देवशर्मा त्यास म्हणाला,–' भैरवा, असाच्या असाच सेनाध्यक्षाकडे जा, आणि त्याला सांग कीं मीं नुकतीच जी आज्ञा केली होती, तीप्रमाणें वागण्याचें कारण नाहीं. '

भैरवानें प्रणाम केला आणि तो आपल्या कामास निघून गेला. नंतर थोडावेळपर्यंत देवशर्मा विचारांत निमग्न झाला.

नंतर तो सूचिमुखास म्हणाला,–' तो सत्यरथ आपल्या हातून निसटला, याबद्दल मला अगदीं संशय वाटत नाहीं. तो मोठा धूर्त पुरुष आहे. आपण त्याचा पाठलाग करण्याचा

प्रयत्न केल्यास तोही व्यर्थ जाईल,असें दिसतें. या प्रसंगीं सुंदरसेन माझ्या हातून निसटून गेला, याचें मला वाईट वाटतें. मी राजाजवळ तर त्याची नालस्ती करून चुकलों आहें, आणि माझ्याजवळ त्याचा अपराध सिद्ध होण्यासारखा कांहींच पुरावा नाहीं! तथापि एवढ्यानें कांहीं झालें नाहीं. त्याला म्हणावें, तूं काय समजला आहेस? आज नाहीं उद्यां केव्हांतरी माझ्या तावडींत सांपडशीलच! आज मी फसलों, याचा त्याला मोठा आनंद होईल, आणि या आनंदानें शेफारून जाऊन तो आणखी कांहीं तरी साहसाचें कृत्य करील! सूचिमुखा, तूं आपलें काम हुषारीनें कर! जर सुंदरसेन माझ्या हातीं सांपडण्यासारखें एखादें साधन प्राप्त करून देशील, तर तुझ्या जन्माचें दारिद्र्य नाहींसें होईल!' असें म्हणून त्यानें आपल्या बाजूस असलेली पेटी उघडून तींतून एक थैली बाहेर काढिली, आणि तींतील एक मुठभर मोहरा सूचिमुखास देऊन तो पुढें बोलला, 'सूचिमुखा, आजचा बेत जरी फसला, तरी तूं आपली कामगिरी चोख बजाविली आहेस, म्हणून तुला उत्तेजन येण्यासाठीं मी आज तुला हें थोडें बक्षिस देत आहें. जर आजची कामगिरी सिद्धीस जाऊन तो लचाड सत्यरथ माझ्या हातीं सांपडला असता, तर मीं ही सगळी थैली तुला बक्षिस दिली असती!'

सूचिमुखानें तें द्रव्य घेतलें, व नम्रपणानें देवशर्म्यास प्रणाम केला, आणि आपलें सर्वांग कृष्ण वस्त्रानें आच्छादित करून तो आल्या वाटेनें बाहेर पडला.

'तो निघून गेल्यावर दिवाणखान्यांत एकटा बसलेला देवशर्मा आपल्याशींच बोलला,-" सुंदरसेन आज माझ्या हातून सुटला आहे, पण तो दुसऱ्यांना फसविण्यासाठीं जीं जाळीं तयार करीत आहे, त्या जाळ्यांत सांपडल्याखेरीज राहणार नाहीं. रत्नाकर महाराज राज्यभ्रष्ट होऊन निंबराज या गादीवर बसणार, अशी सुंदरसेनाच्या मनाची खात्री आहे, असें दिसतें. हा कृतघ्न सुंदरसेन महत्पदाच्या आशेनें काय हवें तें कृत्य करण्यास तयार होईल! त्याच्या मनांत एकादी जहागिरी मिळवावयाची आहे. पण म्हणावें, तुझे सर्व बेत जागच्या जागींच नाहींसे होतील! महाराजांचा स्वभाव अगदीं उतावळा असल्यामुळें निंबराजाचें कारस्थान त्यांच्यापासून गुप्त ठेवणें आम्हाला भाग होतें. निंबराज आपल्यावर स्वारी करणार असें जर आम्हीं महाराजांस पूर्वी सांगितलें असतें, तर त्यांनीं मूर्खपणानें आपलें बलाबल न पाहतां एकदम युद्धास प्रारंभ केला असता, अशी आम्हांस भीति असल्यामुळें सैन्याची योग्य व्यवस्था होईपर्यंत ती गोष्ट महाराजांपासून गुप्त ठेवणें अगत्याचें वाटलें; पण त्या गोष्टीचा या नीच अमात्यानें असा दुरुपयोग केला. राज्याच्या सर्व कारभाराचा ज्याच्या मस्तकावर भार तो अशा रीतीनें फितूर होईल, हें कोणासही खरें वाटणार नाहीं! सध्यांच्या स्थितीचा विचार केला तर निंबराजानें आमच्या राज्यांत जिकडे तिकडे फितुरी केलेली असल्यामुळें रत्नाकर महाराजांचे पाय सिंहासनावर टिकतील, असें दिसत नाहीं. अशा वेळीं जर आपण आपली तुंबडी भरून घेतली नाहीं, तर शहाणपण तें काय? या सुंदरसेनाची फितुरी राजाधिराजांपाशीं सिद्ध करून दिली, तर त्यांत माझा चांगला फायदा होईल. मला महाराज मुख्य प्रधान करितील; असें झाल्यावर जर मी स्वतांचा फायदा करून घेतला नाहीं, तर ती चूक माझी!' अशा प्रकारचे विचार त्याच्या मनांत घोळत असतां त्याचा सेवक भैरव तेथें आला. त्याला पाहतांच देवशर्म्यानें विचारलें,-'कायरे, आज्ञेप्रमाणें व्यवस्था केलीस?'

भैरव बोलला,-' होय; सुंदरसेनाच्या वाड्यावर छापा घालण्याचा आजचा बेत

रहित झाला आहे, असें मीं सेनाध्यक्षांस सांगितलें. '

देवशर्म्यानें विचारलें,–' तर मग तूं आतां येथें कां आला आहेस ! '

भैरव बोलला,–' देवी शैवलिनीची एकदासी आतां आपणांस बोलवावयास आली होती. देवी सध्यां युवराजाला बरें नसल्यामुळें हवालदिल होऊन त्यांच्यापाशीं बसल्या आहेत ! '

देवशर्म्यानें विचारलें,–' कांहीं विशेष आहे कीं काय ? '

भैरव बोलला,–' होय; युवराजाला एका प्रहराच्या आंत अपस्माराचे तीन झटके आले ! त्यामुळें सर्वांच्या तोंडचें पाणी पळालें आहे ! '

देवशर्मा बोलला,–' तर मग मला तिकडे गेलेंच पाहिजे. ' असें बोलून त्यानें आपल्या पुढें असलेली पोथी गुंडाळून ठेविली, कांहीं कामाकाजाचे कागद तेथें पडले होते ते पेटींत घालून ती बंद केली, आणि तो आपल्या दिवाणखान्यांतून बाहेर पडला.

एकामागून एक दिवाणखाना मागें टाकीत तो अंत:पुरांतील ज्या दिवाणखान्यांत राजपुत्राला ठेवित असत, त्या दिवाणखान्यामध्यें गेला. त्या ठिकाणीं युवराजांची दाई, अंत:पुरातील कित्येक परिचारिका, देवी शैवालिनी आणि रत्नाकर राजा इतकीं माणसें बसलेलीं होतीं. आजारानें व्याकुल झालेल्या युवराजाला मांडीवर घेऊन देवी शैवलिनी दु:खित अंत:करणानें पुत्रमुखाकडे पाहत बसलेली होती. युवराजाचें वय फक्त सहा महिन्यांचें होतें. तो मुलगा जन्मास आला त्याच वेळीं अगदीं अशक्त होता. तेव्हांपासून आठचार दिवसांनीं त्याला अपस्माराचे झटके येतच असत त्याची प्रकृति अशा प्रकारची असल्यामुळें राजवाड्यामध्यें दोन राजवैद्य नेहमीं राहत असत. राजाधिराज रत्नाकर बाहेरख्याली असल्यामुळें त्याच्या शरीरप्रकृतीची दुर्दशा झालेली होती; त्याचा विवाह झाल्यास पुष्कळ वर्षें लोटलीं, तरी त्याला संतति होईना. जसजशी वर्षांमागून वर्षें लोटत चाललीं तसतशी राजा-राणीस संततीची निराशा वाटूं लागली. अशा स्थितींत या राजपुत्राचा जन्म झालेला असल्यामुळें राजाराणींस त्याला कोठें ठेवूं आणि कोठें न ठेवूं असें वाटत असे. पुत्रप्राप्ति झाल्यापासून राजाचें राणीवर जरा जरा प्रेमही जडत चाललें होतें; यामुळें राणीला तर फारच आनंद होत होता. आपल्या मागें आपल्या वंशास वारस झाला, या गोष्टीमुळें रत्नाकराला जणुं काय त्रिभुवनाचें राज्य मिळाल्यासारखें वाटत होतें, आणि या त्याच्या आनंदाचा फायदा घेऊन त्याच्या धूर्त मंत्र्यांनीं त्याला राजकारस्थानांपासून दूर ठेविलें होतें. आपणावर निंबराजानें स्वारी करून जरी कदाचित् आपणांस पदच्युत केलें, तरी आपला पुत्र हयात असल्यास आपले विश्वासु मंत्री त्या मुलाच्या नांवानें राज्याची द्वाही फिरवून आपली परंपरा कायम राखितील असें मनांत येऊन त्याला बरेंच समाधान वाटत असे. दरबारांतील मंत्र्यांनीं आपला तळीराम गार करण्यासाठीं,किंवा राजकारस्थानांविषयींच्या अज्ञानामुळें, किंवा आपल्या प्रजेच्या राजनिष्ठेवर फाजील विश्वास ठेवून किंवा निंबराजाच्या सामर्थ्याची योग्यता बरोबर न समजल्यामुळें राजाला खोट्या नाट्या गोष्टी सांगून त्याला त्यांनीं खऱ्या स्थितीचा पत्ता लागूं दिला नव्हता. आतां कोठें राजाराणी जागीं व्हावयास लागलीं होतीं, पण अशा प्रसंगीं त्यांच्या सुखाचें स्थान जें पुत्र तोच आजारी असल्यामुळें त्यांना त्याच्या वांचून इतर गोष्टी फारशा सुचत नव्हत्या.

देवशर्मा त्या ठिकाणीं जाऊन पोंचला, आणि त्यानें राजपुत्राची प्रकृति पहावयास प्रारंभ केला. त्याला स्वताला वैद्यकीय

ज्ञान नव्हतें, अर्थात् त्याच्या त्या उद्योगाचा विशेष उपयोग कांहीं नव्हता. तथापि त्यानें त्या अर्भकाची प्रकृति पाहून राजाराणींस धीर दिला. इतक्यांत राजवैद्यही तेथें आले, त्यांनीं तेथील माणसांस दूर करून ते युवराजापाशीं जाऊन बसले, आणि त्यांनीं नेहमींप्रमाणें उपचार करण्यास प्रारंभ केला. सुदैवानें युवराजाला गुण भासूं लागला. त्याच्या डोळ्यांवरची झांपड उडाली, त्यानें डोळे उघडले, आणि तो सावध झाल्यासारखा दिसूं लागला. आपला पुत्र सावध झालेला पाहून त्या पितरांस किति बरें आनंद झाला असेल! राजवैद्य येऊन औषधोपचार सुरू झाल्यानंतर राजपुरोहितानें मोठ्या गंभीरवाणीनें ज्वरस्तोत्रांसारखीं आरोग्यदायक समजलीं जाणारीं स्तोत्रें वगैरे म्हणून भस्म मंत्रून तें युवराजाला लाविलें. तो अद्यापि तोंडानें कांहीं मंत्र म्हणतच होता. युवराजाला गुण आला, हें दृष्टीस पडतांच वैद्य आपापल्या जागीं निघून गेले.

नंतर राजा देवशर्म्याला म्हणाला,-' अहो पुरोहित, आतांचा हा प्रसंग निभावला, हे आपणांवर ईश्वराचे मोठे उपकार आहेत. बरें, सुंदरसेनाच्या घरावर छापा घालावयाचा होता, त्याचें काय झालें!'

देवशर्मा अत्यंत गंभीरतेनें बोलला,-' राजाधिराज, आजच्या प्रसंगीं सुंदरसेन आपल्या हातीं लागत नाहीं, हें कळविण्याचा मजवर प्रसंग आला याचें मला फार वाईट वाटत आहे. सायंकाळापूर्वीच सत्यरथ सुंदरसेनाच्या वाड्यांतून निघून गेला.'

हें ऐकून राजाला मोठा राग आला जणुं काय आतां आपल्या पुत्राची प्रकृति बिघडली होती, व त्यामुळें आपणांस खेद झाला होता, ही गोष्ट तो साफ विसरून गेल्या प्रमाणें दिसत होता! त्यानें मोठ्या जोरानें देवशर्म्याला म्हटलें,-' काय म्हणतां! तो हरामखोर आमच्या हातांतून निसटून गेला! असें झालें तरी कसें!'

देवशर्मा बोलला,-' तें कांहीं मला सांगतां येत नाहीं! आमचा बेत त्या सुंदरसेनास समजला, आणि त्यानें त्या हरामखोरास पळवून लावलें, कीं तो त्याचें काम आटोपलें म्हणून येथून निघून गेला, हें समजत नाहीं!'

रत्नाकरराजा म्हणाला,-'तो पळाला म्हणून काय झालें? आपण त्या सुंदरसेनालाच पकडून त्याचा जबाब विचारूं! त्याची एवढी प्रतिष्ठा कसली!'

देवशर्मा बोलला, 'राजाधिराज, सुंदरसेनावर अपराध शाबीद करण्यासारखा आपल्यापाशीं कांहींच पुरावा नाहीं, हें मीं चरणांपाशीं पूर्वीच निवेदन केलें आहे, सुंदरसेनासारख्या सर्व राज्याचा कारभार शिरावर घेणाऱ्या मुत्सद्यास जर आपण एकदम कैद केलें, तर त्याचा मोठा बोभाट होईल, आणि आपणांस जर त्याचा अपराध सिद्ध करतां आला नाहीं, तर आपल्या न्यायबुद्धीवरील प्रजेचा भरंवसा उडेल, ही गोष्ट स्वामींच्या लक्ष्यांत असेलच!'

रत्नाकर म्हणाला,-'तथापि अशा प्रकारच्या लबाड माणसास आम्हीं जवळ कसें ठेवावें? त्याच्या हातीं सर्व राज्याचीं सुत्रें कशीं द्यावीं? आणि तो जें कांहीं करील त्याला आम्ही संमति कशी द्यावी?'

देवशर्मा बोलला,-'राजाधिराज, प्रसंगाकडे पाहून सर्व गोष्टी केल्या पाहिजेत. काल-देश-वर्तमानाकडे लक्ष्य देऊन आपण सर्व कांहीं केलें पाहिजे, असें शास्त्रवचन आहे.' असें बोलून देवशर्म्यानें आपल्या भाषणाच्या पुष्ट्यर्थ पुष्कळ प्रमाणें पुढें आणिलीं; तें त्याचें सर्व पांडित्य येथें उतरून घेण्याची आह्मास जरूर वाटत नाहीं.

देवशर्म्याच्या पांडित्यानें राजाचा कोप शांत झाला; आणि तो ह्मणाला,-'ठीक आहे.

यावेळीं आम्ही स्वस्थ बसतों.' असें भाषण करीत असतां दाईच्या मांडीवर झोंपीं गेलेल्या युवराजाकडे त्याचें लक्ष्य गेलें, आणि तो म्हणाला,-'ईश्वराच्या दयेनें आतांचा प्रसंग निभावला. अशा प्रकारचा प्रसंग वैऱ्यावर सुद्धां येऊं नये. मघांशीं आमच्या तोंडचें पाणी पळालें होतें.'

राजपुरोहित देवशर्मा अत्यंत गंभीर स्वरानें बोलला,-''होय; प्रसंग मोठा बिकट आला होता खरा.'

युवराजासंबंधानें विषय सुरू झालेला पाहून राणी शैवलिनी म्हणाली,-'ज्योतीष्यांनीं अन्नप्राशन संस्काराला जो मुहूर्त सांगितला आहे, त्याला फक्त दहाच दिवस उरले आहेत. हा संस्कार आयुष्यवर्धक आहे, असें म्हणतात!'

देवशर्मा बोलला,-होय; शास्त्रांनीं जीं जीं धर्मकृत्यें सांगितलीं आहेत, तीं तीं विधिपूर्वक आणि श्रद्धायुक्त अंतःकरणानें केलीं असतां कल्याणकारक होतात. शिवाय त्या संस्काराच्या प्रसंगीं सर्वारिष्टशांति करावी, अशी माझी सूचना आहे. सर्व प्रकारचीं अरिष्टें केवळ देवतांच्या कोपामुळें उत्पन्न होत असतात, यासाठीं आपण भक्तियुक्त-अंतःकरणानें देवतांचा कोप शांत होईल, अशीं धर्मकृत्यें अवश्य केलीं पाहिजेत.'

देवशर्म्याच्या या भाषणास राजा-राणींचा रुकार पडला, हें सांगणें नकोच! अन्नप्राशन संस्काराचे वेळीं कोणकोणतीं धर्मकृत्यें करावयाचीं हें त्यानें ठरविलें, आणि नंतर तो स्वस्थानीं निघून गेला.

आणखी पांचसहा दिवस लोटले. नेहमींप्रमाणें राज्यकारभाराची सुनावणी करण्यासाठीं सुंदरसेन दररोज राजवाड्यांत जातच होता, आणि देवशर्म्याच्या उपदेशाप्रमाणें रत्नाकर राजा त्याच्याशीं बाहेरून सरळपणानें वागतच होता. देवशर्म्याचा हेर ज्याप्रमाणें सुंदरसेनाच्या वाड्यांत होता, त्याप्रमाणेंच सुंदरसेनाचा हेर राजवाड्यांत असून, तो त्यास तेथील महत्त्वाच्या गोष्टी कळवीत असे. त्यावरून आपल्याविषयीं राजाच्या मनांत संशय आलेला आहे, ही गोष्ट सुंदरसेन पूर्णपणें जाणून होता, आणि तो मोठ्या सावधपणानें आपले विश्वासघातकी बेत पार पाडीत होता. देवशर्मा होतां होईल तों सुंदरसेनाची भेट टाळीत असे, पण आपण असें मुद्दाम करतों असें मात्र तो बाहेर दिसूं देत नसे. या पांचसहा दिवसांत शेखराची व सुंदरसेनाची गांठ पडली नव्हती. वास्तविक पाहिलें तर राज्यकारभाराचीं व आपलीं स्वतांचीं फितुरीचीं कामें करण्यांत सुंदरसेनाचा बहुतके वेळ जात असे. म्हणून त्याला शेखराची भेट घेण्यास सवड झाली नाहीं; नाहींतर त्यानें शेखराची वारंवार भेट घेतली असती. कारण शेखरासंबंधानें कांहीं एक विशिष्ट गोष्ट सुंदरसेनाला साध्य करून घ्यावयाची होती, हें एकंदर प्रकारावरून चाणाक्ष वाचकांच्या ध्यानीं आलेंच असेल!

ह्या पांच सहा दिवसांत विशेष सांगण्यासारखी एखादी गोष्ट घडून आली नसल्यामुळें ते दिवस शेखराला मोठ्या शांततेचे वाटले, आणि या शहरांत अधिक दिवस काढण्याचें कृत्य त्यांना पूर्वी जें संकटाचें वाटत होतें, तितकें वाटेनासें झालें. नेमल्यावेळीं राजाधिराजाच्या मुदपाकखान्यांतून त्यांच्याकडे ताटें पोंचतीं होत, आणि त्यांची सर्व प्रकारची व्यवस्था बिनबोभाट होत असे. शेखराला आपल्या वाड्यांत बोलावून आणून त्याचा पाहुणचार करण्यांत रत्नाकराला एक विशिष्ट हेतु साध्य करावयाचा होता. तो हेतु असा कीं, शेखर स्वदेशीं गेल्यावर तेथें त्यानें आपली स्तुति करावी, आणि तेथील लोकांचें मन आपणाकडे वळावें. राजवाड्यांत रहावयास आल्यानंतर आपल्या स्वातंत्र्यामध्यें व्यत्यय येईल, असें शेखर आणि प्रियंवदा यांस पूर्वी वाटत होतें, पण तसें कांहीं झालें नाहीं. त्यांना

राजवाड्यामध्यें सर्वप्रकारची मोकळीक होतीं, इतकेंच नव्हे, तर त्यांनीं तोंडांतून शब्द काढण्याचा अवकाश, कीं लागलीच त्यांची इच्छा पूर्ण होत असे. या अवधींत फक्त पांचचार वेळां रत्नाकर राजानें शेखराला व शैवलिनी राणीनें प्रियंवदेला भेटीस बोलाविलें होतें, आणि एक दोन वेळां युवराजाचें दर्शन होण्याचा दुर्मिळ योगही रत्नाकरराजानें जुळवून आणिला होता. अलीकडील काळांतसुद्धां आपलें मूल परक्याच्या दृष्टीस पडूं न देण्याविषयीं श्रीमंतांपासून गरिबांपर्यंत सर्वांचे प्रयत्न चाललेले असतात. हाच प्रकार प्राचीनकाळीं फार जारी सुरू होता, त्यामुळें युवराजाचें दर्शन घेण्याचा योग ज्यांना लाभे, त्यांना हा आपला मोठा सन्मान झाला, असें वाटणें हें अगदीं साहजिक होतें. रत्नाकर राजानें आपला अशारीतीनें सन्मान केला, या गोष्टीचा जरी त्या दंपत्यास आनंद झाला होता, तरी परस्परांच्या समागमामध्यें असतांना त्यांस जो आनंद होत असे, त्या आनंदापुढें या आनंदाचें त्यांस अगदीं महत्त्व वाटत नव्हतें, असें म्हणावयास हरकत नाहीं.

अशा प्रकारें आणखी दोन तीन दिवस गेले. अन्नप्राशन संस्कार ज्या दिवशीं व्हावयाचा असें ठरलें होतें, त्याचे पूर्व दिवशीं सुंदरसेनाची शेखराला चिठी आली, आणि त्या चिठीप्रमाणें शेखर अमात्याला भेटावयासाठीं चतुरकासह त्याचे वाड्यांत गेला. यावेळीं जवळ जवळ प्रहररात्रीचा समय होता. सुंदरसेनाचा कारकून पूर्वी प्रमाणचें या वेळीं शेखराची वाट पाहत बसला होता, त्यानें शेखर दृष्टीस पडतांच त्याला सुंदरसेनाच्या वाड्यांतील पूर्वीसांगितलेल्या खलबतखान्यांत नेऊन बसविलें. गेल्या आठ दिवसांत शेखराचें मत पालटण्यासारखी कोणतीच गोष्ट घडून आलेली नसल्यामुळें, सुंदरसेनाविषयीं शेखराच्या मनांतील संशयाचें निराकारण झालेलें नव्हतें. सत्यरथ हा खरोखरच सुंदर सेनाचा हस्तक असल्यास, सुंदरसेन राजाधिराजांची सेवा इमानेइतबारें करीत असावा, पण तो सत्यरथ जर खरोखरच निंबराजाचा सेवक असला, तर सुंदरसेन राजाशीं विश्वासघातकी वर्तन करीत असावा, असें त्याच्या मनांत वारंवार येत होतें. तो जेव्हां जेव्हां या गोष्टीचा विचार करी, तेव्हां तेव्हां सुंदरसेन विश्वासु नसून विश्वासघातकी असावा, असेंच त्याचें मन त्याला सांगें, पण शेखराचा स्वभाव उदार असल्यामुळें आपल्या मनाची प्रत्यक्ष पुराव्यानें खात्री पटल्याखेरीज तो आपल्या मनांत अनुदार विचारांस थारा देत नसे. ज्यावेळीं आपण सुंदरसेनापाशीं सत्यरथाचें नांव काढलें, त्यावेळीं तो फारच दचकला, ही गोष्ट शेखराच्या मनांतून जाईना. सत्यरथ हा आपला हस्तक आहे, असें जरी सुंदरसेनानें आपणांस ठांसून सांगितलें होतें, तरी तें केवळ वेळ मारून नेण्यासाठीं त्यानें त्या वेळीं अगदीं खोटें सांगितलें नसेल कशावरून, अशी शंका त्याच्या मनांत येऊन त्याला सुंदरसेन हा भयंकर माणूस असावा असें वाटे; तथापि त्याच्या मनाची खात्री पटली नसल्यामुळें त्यानें सुंदरसेनाच्या चिठीस मान दिला, व तो आज त्याच्या वाड्यांत आला.

शेखर खलबतखान्यांत बसल्यास फार वेळ झाला नाहीं, तोंच सुंदरसेन त्या ठिकाणीं आला, आणि पहिल्या भेटीच्या वेळेपेक्षां अधिक सलगी दाखवीत त्यानें शेखराचें आगतस्वागत केलें. शिष्टाचाराचे प्रकार आटोपल्यावर सुंदरसेन त्यास म्हणाला,–'अहो राजपुत्र, तुमच्याविषयीं माझ्या मनांत स्नेहभाव उत्पन्न झाला आहे, असें मागील भेटीच्या प्रसंगीं मीं आपणांपाशीं स्पष्ट बोलून दाखविलें असूनही मी गेल्या आठ दिवसांत आपली मुलाखत घेतली नाहीं, याचें आपणांस मोठें आश्चर्य वाटत असेल, आणि कदाचित् मीं त्या-

वेळीं लोंडापुरतें कांहीं तरी बोलून आपणांस विसरून गेलों असेन, असेंही कदाचित् तुमच्या मनांत आलें असेल; पण वास्तविक प्रकार तसा नाहीं. गेल्या आठ दिवसांत मला कामांमुळें आपली भेट घ्यावयास अवकाशच सांपडला नाहीं. मला तुमच्याशीं पुष्कळ गोष्टी बोलावयाच्या आहेत; त्यांपैकीं पहिली आणि मुख्य गोष्ट ही कीं आपण त्या दिवशीं योग्य सूचना देऊन त्या माणसाचें–कोणाचें हें स्पष्ट सांगण्याची गरज नाहीं–रक्षण केलें, हे तुमचे मजवर मोठे उपकार झाले आहेत. तुम्ही केवळ भूतदयेनें प्रेरित होऊन त्या गृहस्थाला योग्य वेळीं इशारत दिली म्हणून एक मोठा प्रसंग निभावला. त्या माणसासंबंधानें राजाधिराजांपाशीं तुम्ही चुगली केली असेल, अशी शंका एक क्षणमात्र सुद्धां माझ्या मनास शिवली नव्हती. राजाधिराजांना ही बातमी सांगणारा चहाडखोर कोण आहे, हें माझ्या चांगलें लक्ष्यांत आलें आहे. देवशर्म्यासंबंधानें सावध रहाण्याविषयीं मीं तुम्हाला सूचना दिली होती, ही गोष्ट तुमच्या ध्यानीं असेलच! तो माझा कट्टा शत्रु आहे; हें मी जाणून आहें. या वाड्यांतील माझ्या नोकरांपैकीं एकादा नोकर त्याला अनुकूल असावा, आणि तोच येथें होणाऱ्या गोष्टी देवशर्म्यास सांगत असावा, याबद्दल माझ्या मनांत काडीभरसुद्धां शंका नाहीं; पण लचाड माणूस कोण आहे, हें मात्र माझ्या ध्यानांत येत नाहीं.' असें म्हणून सुंदरसेन थोडा वेळ स्वस्थ बसला; परंतु शेखरानें कांहींच उत्तर दिलें नाहीं; म्हणून तो पुढें बोलला,–'अलीकडे राजाधिराजांचें मन स्वच्छ नाहीं, त्यांच्या मनांत मजविषयीं पूर्ण संशय उत्पन्न झालेला आहे, ही गोष्टही मी पुरी जाणून आहें! अलीकडे त्यांचें मजशीं ढोंगीपणाचें वर्तन असतें, ही गोष्ट माझ्या पूर्ण लक्ष्यांत आहे! परंतु मी ज्याप्रमाणें त्या नीच देवशर्म्याची पर्वा करीत नाहीं, त्याप्रमाणेंच राजाच्या ढोंगालाही भीक घालीत नाहीं! सध्यां माझ्या हातीं केवढा अधिकार आहे, आणि माझें सामर्थ्य केवढें आहे, याची त्यांस कल्पना नसेल! आज मी करीन तें होणार आहे! आज जर मीं सूत्रें हालवितांना समजून उमजून घोटाळा केला, तर राजाचे डोळे पांढरे होण्याचा प्रसंग येईल! राज्यांतील बहुतेक सरदार-मानकरी आज माझ्या अध्यां वचनांत आहेत! मी जर स्वस्थ बसलों, तर दोन दिवसांत विलक्षण चमत्कार दृष्टीस पडतील! इतकें माझें सामर्थ्य आहे, म्हणून ठीक आहे, नाहीं तर त्या दुष्ट देवदशर्म्यानें आणि ढोंगी राजानें माझी उचल बांगडी केव्हांच केली असती!'

या आपल्या भाषणाचा शेखराच्या मनावर काय परिणाम होतो हें पाहण्यासाठीं सुंदरसेन थोडावेळ थांबला, आणि तो अभिमानपूर्वक त्याच्याकडे पाहूं लागला. परंतु आपल्या इच्छे प्रमाणें त्याच्या मुद्रेवर अनुकूल परिणाम झाला नसून तो तिरस्कारयुक्त दृष्टीनें आपणांकडे पाहत आहे, असें त्यास आढळून आलें. या प्रसंगीं शेखराच्या मनाची मोठी चमत्कारिक स्थिति झाली होती. अशा रीतीनें आत्मस्तुतिपर भाषण करण्यांत सुंदरसेनाचा हेतु काय असावा, हें त्याच्या लक्ष्यांत मुळींच आलें नव्हतें म्हणून तो कांहींच न बोलतां मुकाट्यानें त्याचें भाषण ऐकून घेत होता.

नंतर सुंदरसेन म्हणाला,–'जसा देवशर्म्याचा हेर माझ्या वाड्यामध्यें आहे, तसाच माझा हेरही राजवाड्यांत असून देवशर्म्याचीं सर्व कारकारस्थानें मला माहीत आहेत!'

हें ऐकून शेखर मध्येंच म्हणाला,–'मला वाटतें, आपण या बाबतींत माझ्यापाशीं अधिक न बोलाल तर बरें! ज्या अर्थीं मी राजाधिराजांचा प्रजाजन आहें, आणि सध्यां

त्यांच्या आदरातिथ्याचा अनुभव घेत आहें, त्या अर्थी या गोष्टी माझ्या कानावर न येतील तर चांगलें. मला एकाच्या चहाड्या दुसऱ्यापाशीं सांगण्याची संवय नाहीं. मी चहाडखोर माणसाचा तिरस्कार करतों हें जरी खरें आहे, तरी प्रसंगविशेषीं मला आपल्या कर्तव्यनिष्ठेला अनुसरून आपलें कर्तव्यकर्म म्हणून या सर्व गोष्टी राजाधिराजांच्या कानांवर घालणें जरूर पडेल.'

अतिशय सलगी दाखवीत सुंदरसेन बोलला,–' आपल्याकडून अशी गोष्ट होणार नाहीं, अशी माझी खात्री आहे. ज्यानें केवळ परोपकारार्थ–भूतदयेनें प्रेरित होऊन–एका स्त्रीला संकटाची सूचना देऊन तिच्या पतीचें रक्षण केलें, तो गृहस्थ माझ्यासारख्या सरळ मनाच्या मित्रानें आपण होऊन सांगितलेल्या गुप्त गोष्टी उघडकीस आणील, असें माझी मनोदेवता मला सांगत नाहीं. ! '

शेखरानें उत्तर केलें,–' माझें त्यावेळचें वर्तन योग्य होतें, असें मी म्हणत नाहीं. मीं त्या स्त्रीला सूचना देऊन तिच्या पतीचें रक्षण केलें खरें, पण मी त्यावेळीं राजाधिराजांचा थोडाच द्रोह केला, ही गोष्ट चांगली केली नाहीं, हें मी जाणून आहें. सत्यरथाचे प्राण वांचविण्यांत माझा कांहीं विशिष्ट हेतु होता, असें जर आपल्या मनांत येत असेल, तर ती आपली अगदीं चूक आहे, असें मी साफ सांगतों ! त्या अल्लड आणि तरुण स्त्रीच्या साऱ्या जन्माचें मातेरें होऊं नये, एवढ्याचसाठीं मीं जाणून बुजून अन्यायाची गोष्ट केली होती. तिच्याऐवजीं कोणी दुसरी स्त्री आणि सत्यरथाऐवजीं दुसरा कोणीही पुरुष अशा संकटांत सांपडला असता, तर केवळ भूतदयेसाठीं मीं तसेंच केलें असतें. माझ्या त्या वर्तनाचा आपण मुद्दाम विपरीत अर्थ करणार नाहीं, अशी मी आशा बाळगितों ! '

सुंदरसेन म्हणाला, ' सध्यां ज्वर या विषयासंबंधानें मीं अधिक बोलूं नये अशी आपली इच्छा असेल, तर मी आतां दुसऱ्या विषयास आरंभ करतों. मी आज आपणास येथें बोलाविलें तें उगीच वेळ गमतीसाठीं वा कांहीं तरी गप्पा मारण्यासाठीं नसून मला कांहीं अत्यंत महत्त्वाच्या गोष्टींचा तुमच्यापाशीं ऊहापोह करावयाचा आहे. मला सांगा, तुम्हीं वाड्यांतून इकडे येण्यास निघालां त्याच्या अगोदर–सुमारें एका प्रहरापूर्वी–राजवाड्यांत एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट घडून आली, ती तुमच्या कानावर आलीच असेल?

त्याच्याकडे आश्चर्यानें पहात शेखर बोलला,–' तशी सांगण्यासारखी विशेष महत्त्वाची गोष्ट आज राजवाड्यांत घडून आलेली माझ्या ऐकण्यांत नाहीं. आजची विशेष गोष्ट म्हणजे युवराजाला दोनतीन वेळां अपस्माराचे झटके आले, एवढेंच; पण त्यांत नवीन कांहीं आहे, असें नाहीं. मी राजवाड्यांत रहावयास आल्यापासून युवराजाला असे झटके पांच सात वेळ आले. पण प्रत्येक वेळीं वैद्यांच्या चातुर्यामुळें निभावत गेलें, हे ईश्वराचे उपकारच होत ! '

सुंदरसेन थोडा वेळ थांबला, आणि चमत्कारिक दृष्टीनें शेखराकडे पहात म्हणाला,–' प्रत्येक मनुष्यास आपल्या सर्व आयुष्यामध्यें आपला फायदा करून घेण्याची एकादीच संधि केव्हांतरी प्राप्त होत असते. ही संधि जर त्यानें गमाविली, तर त्याला जन्मभर पश्चात्ताप करीत बसावें लागतें. अहो राजपुत्र, मी आतां जें कांहीं बोलत आहें, तिकडे आपण नीट लक्ष द्या, आणि कृपा करून मध्यें अडथळा न करतां माझें सर्व भाषण ऐकून घ्या. नंतर तुम्हांस जें काय बोलावयाचें असेल तें बोला. आपण एका बलाढ्य संस्थानिकांचे चिरंजीव असल्यामुळें तुमचें बागलाणांत बरेंच महत्त्व असणें हें साहाजिक आहे. आपल्या वडिलांचे आणि आपल्या श्वशुराचे प्रतिनिधी म्हणून तुम्ही राजदरबारीं आलां, तुमचा दरबारांत नव्हे तर प्रत्यक्ष राजवाड्यांत प्रवेश झाला, आणि

तुह्मांला राजाचा स्वभाव कसा काय आहे, हें पाहण्याची संधि अनायासानें प्राप्त झाली आहे. तुह्मीं येथून आपल्या राज्यांत गेल्यावर राजासंबंधानें जें कांहीं सांगाल; त्यावर सर्वांचा विश्वास बसेल, आणि आपण पुढें कसें वागावें, यासंबंधानें आपल्या पित्याला आणि दुसऱ्या संस्थानिकांना योग्य विचार करतां येईल. तुह्मीं जर राजासंबंधानें चांगलें बोललां तर तुमच्या कंपूंतील संस्थानिक त्यांस साह्य करण्यास तयार होतील, आणि तुह्मीं जर त्यांच्या संबंधानें आपलें वाईट मत प्रदर्शित केलें, तर ते सर्व संस्थानिक त्यांचा पक्ष सोडून देऊन निंबराजाच्या पक्षाला अनुकूल होतील किंवा उदासीन राहतील. सध्यांच्या प्रसंगीं तुमच्या शब्दाचें महत्त्व फार मोठें आहे. निंबराज रत्नाकर गजावर आतां लौकरच स्वारी करणार, हें अगदीं ठरल्यासारखें आहे. त्याची सर्व तयारी झाली आहे, आणि आतां ही गोष्ट अगदीं उघड झाली आहे; तिच्यामध्यें आतां गुप्तता राहिलेली नाहीं. अशा प्रसंगीं आपण पुढें काय करावें, यांचा विचार तुम्हीं केलाच असेल. भावी युद्धामध्यें निंबराजाचा विजय होणार ही गोष्ट ठरल्यासारखीच आहे!'

सुंदरसेनाचें भाषण संपलें नव्हतें, तरी शेखर मध्येंच म्हणाला,—'अहो अमात्य, तुम्ही स्वतां या राज्याचे आधारस्तंभ आणि सूत्रधार असतां भावी युद्धामध्यें शत्रूचा जय होईल असें सात्रीनें सांगावें, ही तुमची आश्चर्याचीच नव्हे, तर मोठी दुर्दैवाची गोष्ट आहे! आपला कमकुवतपणा जर तुम्हास समजत आहे, तर तुम्ही आपलें सामर्थ्य वाढविण्याचा प्रयत्न कां करीत नाहीं? बरें, आपला जय होणार नाहीं, असें तुम्हास तरी कशावरून व कां वाटतें?'

सुंदरसेनानें उत्तर केलें,—'आपल्या राज्यांत खालपासून वरपर्यंत जिकडे तिकडे फितुरी झालेली आहे. आमच्या सैन्यामध्यें आमच्या राजाला अनुकूल असे फारच थोडे लोक उरले आहेत. जी लष्कराची तीच आरमाराची व्यवस्था आहे. रत्नाकर राजाच्या उधळेपणामुळें खजिना रिकामा पडला आहे. एक वर्षाचा सैन्याचा पगार द्यावयाचा आहे, यामुळें असलेल्या सैन्यांतील लोक नोकऱ्या सोडून भराभर निघून जात आहेत! अशी स्थिति असल्यामुळें सैन्यामध्यें नवीन भरती करण्याची गोष्ट मनांत मुद्धां आणावयास नको! अशा स्थितीमध्यें मी आपला अधिकार सोडून दुसऱ्या शहाण्या माणसासाठीं अमात्यपद रिकामें कां करीत नाहीं, असें कदाचित् तुम्ही विचाराल, म्हणून मीच सांगतों, कीं सध्यांच्या प्रसंगीं माझ्याखेरीज दुसरा कोणी कारभार चालवूं म्हणेल, तर तीन दिवसांत त्याची तिरपीट उडेल! वस्तुस्थिति कायम राखण्यासाठीं मला किती श्रम करावे लागत आहेत, याची कल्पना माझ्याखेरीज इतरांस व्हावयाची नाहीं. मीं मारलेल्या गांठी दुसऱ्यास सोडतां यावयाच्या नाहींत! माझ्याखेरीज दुसरा कोणी जर प्रधानपदावर आरूढ झाला, तर त्याला जें होईल तें स्वस्थ बसून पाहण्याखेरीज दुसरें कांहीं करतां येणार नाहीं!'

या त्याच्या भाषणाचा शेखराला अगदीं कंटाळा आला होता, म्हणून तो म्हणाला,—'अहो अमात्य, आतां या गोष्टी माझ्यानें ऐकवत नाहींत. मला वाटतें, आपण आतां परस्परांचा निरोप घ्यावा!' असें म्हणून तो आपल्या आसनावरून उठून उभा राहिला.

सुंदरसेन म्हणाला,—'थांबा; मला आणखी कांहीं गोष्टी तुमच्याशीं बोलावयाच्या आहेत. मी एक बाजू तुमच्या पुढें मांडिली तशीच दुसरी बाजूही तुमच्या पुढें मला स्पष्टपणें मांडणें जरूर आहे. तुमची सत्यावर निष्ठा आहे, अर्थात् तुम्ही स्वदेशीं गेल्यावर ज्या गोष्टी तुम्ही येथें पाहिल्या किंवा ऐकिल्या असतील, त्यांचें तिकडे यथार्थ

वर्णन कराल, ही गोष्ट मला कबूल आहे. परंतु ज्या कित्येक विलक्षण गोष्टी दरबारामध्यें घडून आल्या आहेत, किंवा सध्यां घडत आहेत, त्यांचें तुम्हाला यथार्थ ज्ञान झाल्यावांचून केवळ बाह्य गोष्टींवर विश्वास ठेवून जर तुम्ही राजदरबाराचें चित्र काढूं लागलां, तर तें यथायोग्य निघणार नाहीं. तुम्हाला रत्नाकर महाराजांचीं कारस्थानें अजून पुरतीं उमगलेलीं नाहींत. देवशर्म्याच्या नीचपणाचा तुम्हास अनुभव आलेला नाहीं. तुम्ही ज्या कामासाठीं येथें आलां, तें कामही अजून झालें नाही असें म्हटलें तरी चालेल. तुम्ही केवळ राजनिष्ठा व्यक्त करण्यासाठींच येथें आलां नसाल; तुमचें जर तेवढेंच काम असतें, तर तें तुम्हाला नुसत्या पत्रानें सुद्धां करतां आलें असतें. अर्थात् दरबारची स्थिति प्रत्यक्ष पाहावी, असाही तुमचा हेतु असला पाहिजे, हें उघड आहे. येथील कारस्थानांचा थोडा बहुत मासला पाहिल्या खेरीज जर तुम्ही परत गेलां, आणि रत्नाकर महाराजांच्या चांगुलपणाच्या गोष्टी तेवढ्याच तुम्ही निकडील लोकांस सांगितल्या, तर तुम्ही आपल्या [illegible] श्वशुरांना [illegible] परो[illegible] आणि [illegible] ते सर्व [illegible] माणसानें [illegible] सेवा करण्याची [illegible]

शेखर ह्मणा[illegible]य, आतां तुम्ही शेवटीं जे [illegible] ते खरे करून दाखविण्या[illegible]मच्या शिरावर आहे. रत्नाक[illegible]तीं तरवार घेणें हें अगदीं [illegible] माझी खात्री करा, ह्मणजे [illegible] शांतपणें ऐकून घेईन । एक[illegible] ची खात्री झाली, ह्मणजे मा[illegible] त्या प्रकारचें होईल, याची [illegible] कल्पना करतां येत असेलच.'

सुंदरसेन बोलला,—'आपण खात्री करून घेण्यास सिद्ध झालां एवढेंच मला पुरें । मी आपली अशी खात्री पटवून देतों, कीं आपण पुनः त्या राजाचें नांव सुद्धां काढणार नाहीं । आपली खात्री पटवून देण्याला आज फार चांगली संधि प्राप्त झालेली आहे. मात्र मी आपणांस नेईन तिकडे आपण मजबरोबर आलें पाहिजे. आपला सेवक आपण परत येईपर्यंत या वाड्यांतच बसेल.'

शेखर बोलला,—'तथापि येथून बाहेर पडण्यापूर्वी आपणांस पुढें कोठें जावयाचें आहे, यासंबंधानें थोडी तरी कल्पना माझ्या मनांत आल्याखेरीज मी आपल्या बरोबर येण्याचें कबूल करणार नाहीं. राजकारणांत पडून आपला जीव धोक्यांत घालावा कीं न घालावा हा सांप्रत मोठा प्रश्न आहे !'

सुंदरसेन ह्मणाला,—'आपला जीव धोक्यांत पडेल अशी शंका सुद्धां आपल्याला घ्यावयाला नको ! खरें ह्मणाल, तर विनाकारण आपला जीव धोक्यांत घालावा [illegible] गोष्ट मलाही अगदीं [illegible] विनाकारण [illegible] बसाल, तर आपला शब्द खरा करण्याचा तुमच्या अंगीं ताकद नाहीं, असें मी समजेन !'

शेखर अभिमानपूर्वक बोलला,—'चला तर ! तुमच्या बरोबर पाहिजे तेथें येण्याची माझी तयारी आहे !'

नंतर सुंदरसेनानें शेखराला आपल्या वस्त्रागारामध्यें नेलें. तेथें अनेक प्रकारचीं वस्त्रें व्यवस्थित रीतीनें खुंट्यांवर टेविलेलीं शेखराच्या दृष्टीस पडलीं. या ठिकाणीं वस्त्रांचें एक लहानसें प्रदर्शनच मांडलेलें [illegible] असें म्हणावयास हरकत नाहीं. निरनिराळ्या प्रकारचे अंगरखे, विजारी, पागोटीं, दुपेटे, शेले, वगैरे बहुमोल वस्त्रें तर तेथें

होतींच; शिवाय अगदीं गरीब माणसांच्या अंगावर असणारीं घोंगड्या, धोतरें, वाकळी, वगैरे वस्त्रेंही तेथें होतीं. हा वस्त्रसंग्रह पाहून शेखराला मोठें आश्चर्य वाटलें. सुंदरसेनानें यापैकीं सामान्य प्रतीच्या सेवकास शोभण्यासारखीं वस्त्रें अंगावर धारण केलीं, आणि शेखरालाही तसें करावयास सांगितलें. दोघांचेंही वेषांतर झाल्यावर सुंदरसेन शेखराला बरोबर घेऊन आपल्या वाड्याच्या पाठीमागच्या भागांत आला. तेथें एक जिना होता. त्या जिन्यानें खालीं उतरून ते बगीच्यांत आले, आणि तेथून पलीकडच्या लहान रस्त्यावर ते येऊन पोंचले. नंतर सुंदरसेन पुढें आणि शेखर त्याच्या मागें असे बे दोघेजण झपाझप चालूं लागले, आणि अर्ध घटकेच्या आंत ते राजवाड्याच्या पिछाडीकडे येऊन पोंचले.

देवशर्म्याचा सुंदरसेनाच्या वाड्यांतील हेर पूर्वी ज्या मार्गानें राजवाड्यांत शिरला होता, त्याच मार्गानें हे दोघेजण राजवाड्यांत [illegible] पाहिलें सूचिमुखास दर[illegible] माणसांच्या [illegible] मजल्यावर गेले. [illegible] देवशर्म्याच्या दिवाणखान्यांत गेले. बुसऱ्या कित्येक दिवाणखान्यांतून पुढें चालले होते. अशा रीतीनें काहीं वेळ पुढें गेल्यावर त्यांना वाट दाखविणारा मनुष्य थांबला, आणि म्हणाला,–'महाराज, आपणांस थोडा वेळ येथें राहणें जरूर आहे.'

सुंदरसेन म्हणाला,–'हरकत नाहीं, भैरवा, आम्हीं येथें उभे राहतों. पण तूं आमचा विनाकारण खोळंबा मात्र करूं नकोस!'

भैरवानें मोठ्या नम्रतेनें 'होय' असें उत्तर केलें, आणि तो तेथील एक जि[illegible] चढून वर गेला. नंतर सुंदरसेनानें ते [illegible] जण उभे होते त्या दिवाणखान्याचा दरवाजा [illegible] बंद करून घेतला. कारण जर कोणी या भागांत आलें आणि त्यानें आपणांस येथें पाहिलें, तर मोठा घोटाळा होईल अशी त्याच्या मनांत भीति उत्पन्न झालेली होती.

थोडा वेळ गेल्यावर शेखर सुंदरसेनास बोलला,–'मी आपल्या बरोबर येथें आलों हें चरें केलें नाहीं, असें आतां मला वाटूं लागलें आहे. खाल्या घरचे वांसे मोजण्यासारखा हा प्रकार होत आहे! मला आपल्या बरोबर येथें येण्याची बुद्धि कशी झाली, या गोष्टीचें मोठें आश्चर्य वाटत आहे.'

सुंदरसेन म्हणाला,–'आतां असें बोलून कांहीं उपयोग नाहीं. तुम्ही मजबरोबर येथें आलां हें फार चांगलें झालें. आतां येथें तुम्हाला जी गोष्ट पहावयास सांपडेल तिचें महत्त्व किती आहे, हें तुमचें तुम्हांलाच कळून येईल. देवशर्म्याचा हेर जसा माझ्या वाड्यांत आहे, तसा माझा हेर राजवाड्यांत आहे, असें मी तुम्हांस आतांच सांगितलें होतें, हें तुम्हांस आठवत असेलच. माझा एकच हेर काय, पण माझे कित्येक हेर येथें आहेत, हें आतां लवकरच तुमच्या लक्षांत येईल!' आतां आपण लवकर [illegible] जाऊं. तेथें [illegible] तुम्ही [illegible] डणार [illegible] तुम्हांला तेथील [illegible] अनेक कारणांनीं आपणा[illegible] नाहीं.

शेखर बोलला, 'अमात्य, मला वाटतें, [illegible] परत–'

सुंदरसेन म्हणाला,–'आतां परत जाण[illegible] नका! आतां जी गो[illegible]डेल, ती इतकी महविनाकारण खोळंबा मात्र करूं नका!' [illegible] ही गोष्ट कळल्याबद्दल [illegible] आनंद होईल!'

[illegible] भैरव परत आला, आणि [illegible] दोघांला आपल्या बरोबर [illegible] केली. पूर्वी ज्या जिन्यानें [illegible] गेला होता, त्याच जिन्यानें त्याचे

मागून ते दोघे तिसऱ्या मजल्यावर गेले. या भागामध्यें रौप्यपात्रांत लाविलेले दिवे जिकडे तिकडे तेवत असल्यामुळें काळोख अगदीं नव्हता. आपण सध्यां ज्या भागांत आलों आहों, तो भाग अंतःपुरापैकीं असावा असें शेखराच्या मनांत येऊन आपण अशा रीतीनें प्रवेश केला, हें बरें केलें नाहीं, असें त्याला वाटूं लागलें. परंतु आतां त्याच्या या विचाराचा कांहींच उपयोग नव्हता. ते सध्यां एका दिवाणखान्याच्या दरवाज्यापाशीं आले असून, भैरवानें त्या दरवाज्यावर हळूच तीन टिचक्या मारल्या, आणि आंतील माणसानें तो दरवाजा उघडला. दरवाजा उघडणारी एक बाई होती. या बाईकडे पाहतांच युवराजाच्या दाईच्या तैनातींत असलेली दासी ती हीच असें शेखरानें ओळखिलें. या ठिकाणीं आल्यावर सुंदरसेनानें आपल्या मुखावरील वेष्टण दूर केलें असल्यामुळें त्या दासीनें सुंदरसेनाला तत्काळ ओळखिलें. तिनें आपल्या नाकावर बोट ठेवून त्याला गप राहण्याची खूण केली, आणि तिनें खुणेनेंच त्या दोघांना आपल्या मागें बोलाविलें. ते दोघे आंत गेल्यावर दासीनें तें दरवाजा लावून घेतला; शेखराचा चेहरा स्पष्ट दिसत नसल्यामुळें तिनें सुंदरसेनाला हा कोण असें खुणेनें विचारिलें, आणि सुंदरसेनानेंही अगदीं घोगऱ्या आवाजानें 'एक मित्र' असें उत्तर दिलें. तेवढ्यानें तिचें समाधान झालें, आणि त्यांना आपल्याबरोबर घेऊन ती पुढें चालली. प्रथमतः एक मोठा दिवाणखाना त्यांस लागला. त्या दिवाणखान्यांतून पुढें गेल्यावर ते एका लहानशा कोठडीवजा खोलींत येऊन उभे राहिले.

त्या कोठडीला एक खिडकी होती, त्या खिडकीपाशीं तिनें त्या दोघांस उभें केलें, आणि तेथून त्यांस पलीकडच्या दिवाणखान्यांतील बिछान्याकडे पहावयास सांगितलें, त्या दिवाणखान्यांतील बिछान्यावर एक मूल निजल्याप्रमाणें आडवें ठेवलेलें होतें; आणि त्याच्या उशागतीं आणि त्याच्या पायांशीं दोन स्त्रिया बसलेल्या होत्या. त्या दिवाणखान्याची रचना पाहून आपण पूर्वी येथें आलों होतों, या गोष्टीचें शेखराला स्मरण झालें; आ[illegible] बिछान्यावरील मुलाकडे लक्ष[illegible] लागला. थोडयाच वेळांत तें [illegible] युवराजच होय, ही गोष्ट त्या [illegible] आली; आणि [illegible] परंतु आणखी [illegible] मूल जिवंत [illegible] आली आहे, [illegible] आहे, आणि त्या[illegible] ही गोष्ट त्या[illegible] त्याला मोठें आ[illegible]

इतक्यांत सुंद[illegible] रीतीनें दाबून [illegible] राजकुमार, तु[illegible] त्याबद्दल आपली [illegible]

शेखराचें सा[illegible] कडे होतें; तें [illegible] मुलाकडे पाहत [illegible] होतें. तेथून तें [illegible] अंतरावर होतें, तरी बिछान्यापाशीं उजेड भरपूर असल्यामुळें तें त्यांस स्पष्ट दिसत होतें. त्या मुलाचा अंत होऊन एक प्रहर लोटला होता, त्यामुळें त्यावर प्रेतकळा इतकी आली होती कीं, तें जिवंत असेल, अशी शंका शेखराच्या मनांत मुळींच उत्पन्न झाली नाहीं, तथापि तो दोन घटकांपूर्वी वाड्यांतून बाहेर पडला, त्या वेळीं त्याला युवराजाच्या मरणाची बातमी मुळींच समजलेली नव्हती; म्हणून हा प्रकार पाहून त्याला फार आश्चर्य वाटलें; आणि त्यानें त्यासंबंधानें आपल्या मनाची पुर्ती खात्री करून घेतली. युवराजाचें प्रेत पाहून शेखराला फार वाईट वाटलें, आणि तो खिडकींतून मागें परतला,

नंतर सुंदरसेन त्याला म्हणाला,–' पहा, आपली पुर्ती खात्री करून घ्या ! नाहीं तर तुम्हाला पुढें मागें भ्रम उत्पन्न होईल ! '

शेखर बोलला,–'युवराजाचा अंत झाला, [illegible] मनाची पुर्ती खात्री झाली [illegible] हा प्रकार मला दाखविण्यांत कोणता, हें माझ्या लक्ष्यांत [illegible] आधिक वेळ [illegible] आहे. आपण [illegible] बोलला म्हणजे [illegible] सांगेन; पण [illegible] च्या मृत्यूसंबं- [illegible] र नाहीं ना ? '

[illegible] भयंकर चिन्हें [illegible] स्पष्ट दिसत [illegible] राहत नाहीं.'

[illegible] शेखर त्या [illegible] आणि ते [illegible] तून रस्त्यावर [illegible] सुंदरसेनानें [illegible] आणि त्यानें [illegible] एक मोहरांची थैली त्याला बक्षिस केली. भैरवानें सुंदरसेनाला प्रणाम केला; आणि तो राजवाड्यांत परत गेला. सुंदरसेनानें शेखराचा हात धरून झपाट्यानें चालावयास प्रारंभ केला. त्याला आपल्या वाड्यांत जाण्याची अतिशय त्वरा झालेली असल्यामुळें तो इतकीं जलद पावलें उचलीत होता कीं, त्याच्या बरोबरीनें चालणें शेखराला बरेंच कठीण पडलें. थोड्याच वेळांत ते सुंदरसेनाच्या वस्त्रागारांत आले, व त्यांनीं पुनः आपापले नेहमींचे वेष धारण केले.

नंतर शेखरानें म्हटलें,–' अहो अमात्य, आपण मला तें युवराजाचें प्रेत दाखविण्यासाठीं मुद्दाम राजवाड्यांत नेलें, याचें कारण माझ्या ध्यानांत आलें नाहीं ! '

किंचित् हास्ययुक्त स्वरानें सुंदरसेन बोलला,–' मीं तुम्हाला तेथें नेलें याचें कारण सांगावयाला फार वेळ लागावयाचा नाहीं ! परंतु अहो राजपुत्र, आतां जें काय आपण तेथें पाहिलें, त्याचा आपण मुखावाटे उच्चार करूं नये, अशी आपणांस माझी सूचना आहे. आपण भलत्या सलत्या माणसांपाशीं जर ही गोष्ट बोललां, तर आपल्या मानेस फांस बसलाच असें समजा ! आपण कदाचित् आपल्या पत्नीपासून ही गोष्ट लपवून ठेवणार नाहीं; पण ही गोष्ट तिला सांगतांना ती तिच्या मुखानें आणखी कोणास समजणार नाहीं, अशी आपली खात्री करून घ्या ! तुम्हाला प्रत्यक्ष राजवाड्यांत दिवस काढावयाचे आहेत ! जर का चुकून तुमच्या मुखांतून एकादा शब्द बाहेर पडला, फार तर काय, तुम्ही रत्नाकरासमोर गेलां असतां जर का तुमच्या मुद्रेवरून तुम्हाला ही गोष्ट माहीत असावी असा त्याला संशय आला, तर तो दुष्ट राजा तुमचे प्राण घ्यावयास एका पळाचा सुद्धां विलंब करणार नाहीं ! '

शेखरानें गंभीरतेनें विचारलें,–' राजाधिराजांच्या मनांतून युवराजाच्या मृत्यूचें वर्तमान गुप्त राखावयाचें आहे कीं काय ? '

सुंदरसेनानें उत्तर दिलें,–' त्या नीच देवशर्म्यानें त्याला तशी सक्त दिली आहे ! युवराजाचा अंत आज प्रहर दिवसाचे सुमारानें झाला; आणि अजून ही गोष्ट फक्त त्यांच्या अंतरंगांतील माणसांखेरीज कोणालाही माहीत नाहीं. जर ही गोष्ट त्यांच्या मनांतून गुप्त ठेवावयाची नसती, तर या वेळीं ती बातमी सर्व शहरांत वणव्यासारखी पसरली नसती काय ? तुम्हाला उद्यां मोठ्या सावधपणानें वागलें पाहिजे. उद्यां युवराजाचा अन्नप्राशनसंस्कार व्हावयाचा होता, हें तुम्हांस माहीत असेलच ! ठरल्याप्रमाणें उद्यां तुम्हाला त्या संस्कारासाठीं निमंत्रण येईलच. त्या वेळीं जर

तुम्ही लक्ष्यपूर्वक पहाल तर तेथें जवळ जवळ युवराजाच्या वयाचें एक मूल तुमच्या नजरेस पडेल ! युवराजाला जो व्याधि जडला होता, त्यांतून तो बरा होण्याची आशा नाहीं, हें राजा-राणींस कधींच कळून चुकलें होतें. सुमारें आज आठ दहा दिवस यासंबंधाचे त्यांचे विचार सुरू असून दुसरें मूल राजपुत्राऐवजीं ठेवण्याची युक्ति त्यांस देवशर्म्यानेंच सांगितली आहे ! त्यानेंच मोठ्या गुप्तपणानें एक युवराजाच्या वयाचें मूल पैदा करून आज आठ दिवस तें राजवाड्यांत ठेविलें आहे. आपणाला पुढें मूल होईल अशी रत्नाकराला आशा नाहीं; कारण त्यानें तारुण्याचा दुरुपयोग केल्यामुळें त्याला अनेक व्याधि जडले आहेत. सध्यांचा प्रसंग मोठा चमत्कारिक आहे. रत्नाकर राजा दुर्गुणी आणि दुष्ट असल्यामुळें प्रजेला तो अगदीं नकोसा झाला आहे; आणि याच समयास निंबराजा त्याच्यावर स्वारी करणार आहे. युवराज जर जिवंत असेल, तर त्याच्याकडे पाहून लोक आपला पक्ष सोडणार नाहींत, असें देवशर्म्यानें त्यांस सांगितलें आहे; आणि आपणांस पुत्र होण्याची आशा नसल्यामुळें मागें दत्तक पुत्र घेण्याचा प्रसंग येणारच, अर्थात् पुढें जो पुत्र दत्तक द्यावयाचा त्याऐवजीं एव्हांपासून एकाद्या अर्भकाचें संगोपन केलें म्हणून काय झालें, अशा विचारानें राजानें या कपट कारस्थानास आपली संमति दिली आहे ! तुम्हीं त्यांच्या पक्षास अगदीं मनोभावानें चिकटूं पाहतां, तो राजा असा आहे, आणि त्याचीं कारस्थानें अशा रीतीचीं आहेत ! अहो राजपुत्र, तुम्हीं या गोष्टीचा पूर्ण विचार करा ! मी उदयिक रात्रौ तुम्हाला पुनः येऊन भेटेन, त्यावेळीं या संबंधानें आपण अधिक बोलूं ! सध्यां आपण इतक्यावरच थांबावें, हें मला बरें वाटतें. आतां आपण परस्परांचा निरोप घेऊं या ! '

शेखर किंचित् खेदयुक्त वाणीनें असावी, 'मी जर या शहरीं आलों नसतों, तर याला चांगलें झालें असतें ! येथें आल्यापासून एकेक प्रकार मी पाहत आहें, त्यामुळें मला या दरबाराचा अगदीं वीट आला आहे ! मी उद्यांच्या उद्यां महाराजांची परवानगी घेऊन स्वदेशीं चालता झालों असतों, पण ते मला इतक्या लवकर जाऊं देतील असें वाटत नाहीं ! '

सुंदरसेन म्हणाला,—' तुमच्या मनामध्यें आपणांबद्दल पूज्यबुद्धि उत्पन्न व्हावी, आणि तुम्ही स्वदेशी गेल्यावर त्यांचे पोवाडे गावे, यासाठीं राजाला अजून कित्येक गोष्टी करावयाच्या असल्यामुळें तो तुम्हांला इतक्यांतच स्वदेशीं जाऊं देणार नाहीं ! शिवाय प्रत्यक्ष हा प्रकार तुम्हीं पाहिला असल्यामुळें स्वदेशीं गेल्यावर त्याच्यासंबंधानें तुम्ही काय गोष्टी सांगाल याचें भविष्य सांगण्यास मोठ्याशा ज्योतिषाची गरज पडावयाची नाहीं ! '

याप्रमाणें भांपणें झाल्यावर त्या दोघांनीं परस्परांचा निरोप घेतला, आणि शेखर त्या वाड्यांतून बाहेर पडला. सुंदरसेनानें त्याला पोंचविण्यासाठीं रथ तयार करविला. त्या रथांतून तो चतुरकासह राजवाड्यांत येऊन दाखल झाला. राजवाड्यांत आल्याबरोबर त्यानें प्रथम आपल्या पत्नीची भेट घेतली, आणि पाहिलेला सर्व प्रकार त्यानें तिला विदित केला. आपल्या पतीच्या मुखांतून ही गोष्ट ऐकून तिला फार आश्चर्य वाटलें, आणि खेदही झाला. प्रत्यक्ष आपलें मूल मृत्यु पावलें असतां तें दुःख गिळून जाऊन, दुसऱ्याचें मूल पुढें करून त्याचे आनंदानें संस्कार करण्यास सिद्ध झालेल्या राजाराणीचा तिला मोठा तिटकारा आला; आणि ही गुप्त गोष्ट आपणास समजली नसती तर बरें झालें असतें; असें तिला वाटूं लागलें. जणूं काय आपणावर महत्संकट ओढवणार असून त्याचें हें पूर्व चिन्ह आहे;

नंतर मनांत येऊन ती रडूं लागली; आपण जर आपल्या नीच कारस्थानापासून अलग राहिलों, तर आपल्यावर कोणत्याही प्रकारचें संकट येण्याचा संभव नाहीं; असें सांगून शेखरानें तिचें समाधान करण्याचा यत्न केला. या यत्नांत त्याला किती यश मिळालें, तें पुढील प्रकरणावरून समजून येईल.

प्रकरण ४२ वें.

अन्नप्राशनसंस्कार.

दुसरे दिवशीं प्रातःकाळीं राजवाड्यांत अन्नप्राशन संस्काराची मोठी धांदल उडाली होती. राजवाड्यांतील देवगृहामध्यें तोरणें उभारलीं असून, उत्तम प्रकारच्या रांगोळ्या घातल्या होत्या; आणि मुदपाकखान्यामध्यें आचाऱ्यांची तारांबळ उडाली होती. वाड्यांतील नोकरमाणसें मोठ्या घाईनें इकडून तिकडे हेलपाटे घालीत होतीं, आणि मंगलवाद्यांचे घोष सुरू झाले होते.

शेखराला हा संस्कार आज व्हावयाचा ही गोष्ट जरी माहीत होती, तरी गेल्या रात्रीं त्यानें जो प्रकार पाहिला होता, त्यामुळें हा संस्कार व्हावयाचा नाहीं, असें त्याच्या मनांत येत होतें. कारण सुंदरसेनानें जरी त्याला मुलाची अदलाबदल करण्याचा राजाचा विचार आहे असें सांगितलें होतें, तरी त्या गोष्टीवर त्याचा भरंवसा पूर्णपणें बसला नव्हता. पण जेव्हां चतुरकानें राजवाड्यांतील गडबडीचें शेखरापाशीं वर्णन केलें, तेव्हां त्याला फार आश्चर्य वाटलें, आणि खेदही झाला. त्यानें आपले मनोविकार मोठ्या कष्टानें आंवरून धरिले म्हणून बरें झालें, नाहींतर चतुरकाला आपल्या धन्याच्या मनांत कांहीं तरी चमत्कारिक विचार घोळत असावे, असा संशय झाला असता. हें वर्तमान ऐकल्यावर शेखरानें आपल्या पत्नीची एकान्तीं भेट घेतली, आणि त्यानें तिला हें वर्तमान स्वतां निवेदन केलें; कारण निपुणिकेच्या किंवा दुसऱ्या कोणाच्या मुखानें हें वर्तमान तिच्या कानीं गेल्यास तिच्या कोंवळ्या मनाला अत्यंत खेद होईल, आणि त्याचा परिणाम वाईट होईल, अशी त्याच्या मनांत भीति उत्पन्न झाली होती. शेखराच्या मुखानें हें वर्तमान ऐकतांच तिला फार आश्चर्य वाटलें, आणि अकल्पित भयानें ती थरथर कांपूं लागली. तिचें मुखमंडल निस्तेज झालें, आणि तोंडांतून एकही शब्द न काढतां ती आपल्या पतीच्या मुखाकडे दीनमुद्रेनें पाहूं लागली!

ही तिची अवस्था पाहून शेखर म्हणाला,–'प्रिये, धैर्य धर, आणि आपलें मन शांत कर! या प्रसंगीं आम्हाला आपलीं मनें शांत ठेवण्याची अत्यंत आवश्यकता आहे! आपणाला या प्रसंगीं मोठ्या सावधपणानें वागलें पाहिजे!'

आपलें बावरलेलें मन ताळ्यावर आणण्याचा प्रयत्न करीत प्रियंवदा म्हणाली,–'ज्यांनीं आपल्या प्रजेकडून धर्माचरण करवावयाचें तेच जर स्वतः असा भ्रष्टाकार करूं लागले, तर पुढें होणार तरी कसें? मी म्हणतें, धर्माची गोष्ट जरी बाजूला ठेविली, तरी प्रत्यक्ष आपल्या पोटचें मूल निवर्तलें असतां तें दुःख यांच्यानें दाबून तरी कसें ठेववतें? असें हें दुष्ट आणि अमानुष कृत्य ज्या ठिकाणीं होत आहे, त्या ठिकाणापासून जितकें दूर जावें तितकें बरें! मला वाटतें, या वाड्यांत माणसें नसून पिशाचेंच जिकडे तिकडे भरलेलीं आहेत!' असें बोलत ती भीतियुक्तदृष्टीनें आपल्या भोंवतीं पाहूं लागली.

शेखर म्हणाला,–'प्रिये, असें काय करतेस? आपलें मन आवर आणि धैर्य धर असें मी तुला सांगत आहेंना? मी जवळ असतां तूं इतकी कां भितेस?'

प्रियंवदा म्हणाली,–' आपण जवळ असतां मला कसलीही भीति नाहीं, हें खरें; तरी पण या पुढें या राजवाड्यांत रहावें, असें मला मुळींच वाटत नाहीं. असल्या या कपटकारस्थानांनीं बजबजलेल्या राजवाड्यापेक्षां आपल्या दरींतील एकादें झोंपडें बरें! हें वैभव नको, आणि हें पापही नको! खरेंच सांगतें, या पाप्यांच्या संगतीनें आमचीं मनेंसुद्धां पापी होऊन आम्ही देखील एकादें पापकर्म करण्यास प्रवृत्त होऊं, अशी माझ्या मनाला भीति वाटत आहे! यासाठीं आपण आतां येथें अधिक दिवस राहूं नये, अशी माझी विनंति आहे!'

शेखरानें उत्तर केलें,–' प्रिये, माझ्या सुद्धां मनांत असेंच आहे, काय सांगूं! मला या सर्व प्रकारांचा इतका तिटकारा आला आहे कीं, या नीच राजाचें हें कृष्णकर्म उघडकीस आणून त्याची फटफजिती करावी. मी जर तुझ्या प्रेमपाशामध्यें बद्ध झालों नसतों, तर आपल्या प्राणांची पर्वा न करतां सत्यासाठीं केवढेंही साहसकर्म करावयास प्रवृत्त झालों असतों. तो राजा आहे, या गोष्टीचा विचार न करतां मीं त्याला केव्हांच चिरडून टाकिलें असतें!'

अगदीं गयांवया करीत प्रियंवदा म्हणाली, ' प्राणनाथ, आपलें हें भाषण नुसतें ऐकून सुद्धां मला भीति वाटते! इतका वेळ आपण मला शांत होण्यास सांगत होतां, पण मी आतां आपणांस शांत व्हा असें सांगतें. आपणाला या प्रसंगीं किती त्वेष आला असेल हें मी जाणून आहें, पण आपण हा कोप नाहींसा केला पाहिजे!'

शेखर किंचित् शांतपणानें म्हणाला,– ' प्रिये, भिऊं नको! मी क्रोधाला वश होऊन भलती सलती गोष्ट कधींही करणार नाहीं! मला सध्यां अत्यंत त्वेष आला आहे, त्या नीच राजाविषयीं माझ्या मनांत तिरस्कार पूर्ण बाणला आहे, त्याच्या वाऱ्यास सुद्धां आपण उभें राहूं नये असें मला वाटत आहे, हें जरी खरें आहे, तरी अशावी, सध्यां आपण कोणत्या स्थितींत त्याला ही गोष्ट मी विसरलों नाहीं. प्रिये, आपण स्वदेशीं गेल्यावर जेव्हां आम्हांस आमचे वडील इकडील परिस्थितीसंबंधानें प्रश्न करतील, तेव्हां आपणांस हा सर्व प्रकार त्यांजपाशीं स्पष्टपणें मांडणें जरूर आहे. प्रश्न केले असतां त्यांचीं असत्य उत्तरें मी कधींही देणार नाहीं! असत्याची मला मोठी चीड आहे!'

प्रियंवदा म्हणाली,–' तो प्रसंग अजून दूर आहे! आणि आपण आपल्या वडिलांपाशीं ही गोष्ट बोललां तरी त्यामुळें, एकादा अनर्थ ओढवेल असेंही नाहीं. मनांत जी भीति वाटत आहे, ती सध्या जाला आपल्या प्रवासापुरती आहे! आपण विचार मोठ्या सावधपणानें वागलें पाहिजे, प्रियकरा, आपण येथें आहों, असतां! आपण या गोष्टीसंबंधानें वाच्यता झाला करावयाची नाहींच, पण एकंदरीत्या आपण मोठ्या विचारानें वागलें पाहिजे, हें मी सांगावें असें नाहीं. तथापि माझ्यानें असें बोलल्याशिवाय रहावतच नाहीं, यासाठीं मी अशी विनंति करतें कीं, आपण जोंपर्यंत या वाड्यांत रहात आहों, तोंपर्यंत आपण या नीचांच्या कपटकारस्थानांकडे अगदीं लक्ष्य देऊं नये! आपण सर्व गोष्टीसंबंधानें पूर्णपणें डोळेझांक करावी.'

शेखर म्हणाला, ' तुझें भाषण [illegible] खरें आहे! आपण मोठ्या सा[illegible] वागलें पाहिजे. आत्मसंयमन[illegible] खरा प्रसंग हा आहे. सध्या [illegible] डोळे असून आंधळें, क[illegible] आणि तोंड असून मुं[illegible] आला आहे! प्रिये, [illegible] राजे, राण्या, पुरोहि[illegible] हीं माणसें नसून [illegible] असें मानून मी [illegible] बोलून शेखर थोडा वेळ [illegible] राहिला.

नंतर [illegible] णाला, 'हे सगळे पुढचे विचार आप[illegible]जर केले खरे, पण सध्या आपणांवर [illegible]सून [illegible] प्रसंग येणार आहे, तो कसा निभावतो, याची मला मोठी काळजी पडली आहे ! यां आजच्या संस्काराला आम्हाला राजाचें बोलावणें येणार, आणि दोन प्रहरीं भोजनाच्या वेळींही पंक्तीस हजर रहावें लागणार, हा मोठा कठीण प्रसंग आमच्यावर आला आहे ! या दोन्ही प्रसंगीं हजर रहावें, असें माझें मन मला सांगत नाहीं ! तुलाही तसेंच वाटत असेल, याबद्दलही मला शंका नाहीं. अशा प्रकारची अधर्माची आणि अन्यायाची गोष्ट आपल्याडोळ्यानें पाहवणार नाहीं. हा प्रसंग कसा अन्नको, या फिकिरींत मी पडलों आहे. होती. 'तरी खोटें नाटें कारण सांगून वेळ उभारलीं नेणें ही गोष्ट मला अगदीं पसंत घातल्या तेव्हां हा प्रसंग कसा निभावतो !'

मध्यें आ[illegible]यंवदा सुद्धां चिंतातुर मुद्रेनें म्हणाली, वाड्यांतील[illegible] मोठा बिकट आला आहे खरा ! इकडून [illegible]संग कसा निभावणार हें मलाही समजत नाहीं. अशा प्रकारच्या गोष्टी प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनीं पहाण्यास मी अगदीं तयार नाहीं ! भयंकर ! फारच भयंकर !'

असे उद्गार काढून प्रियंवदा वेड्याप्रमाणें इकडे तिकडे पाहूं लागली, तिच्या मनांत अनेक प्रकारच्या विचारांचें काहूर उसळल्यामुळें तिचें मस्तक भणाणून गेलें, गेल्या [illegible]तीं तिनें हें वर्तमान ऐकल्यापासून तिच्या [illegible] तेज नाहींसें झालें होतें, पण ती [illegible] अधिकच फिकट दिसूं लागली [illegible], [illegible]ची स्थिति पाहून प्रथमतः [illegible] कांहीं वाटलें नव्हतें; कारण [illegible] गंगाजळाप्रमाणें स्वच्छ [illegible] प्रकारचें धर्मबाह्य आणि [illegible] मनाला त्रासदायक [illegible] नाहीं, असें त्याच्या [illegible]. तथापि पाहतां पाहतां [illegible] शिलक असेलेलें तेज नाहींसें होत चाललें; तिचे लालभडक ओठ पांढरें फटफटीत दिसूं लागले, आणि तिच्या सर्वांगास दरदरून घाम आला. तिच्या हातांपायांत कापरें भरलें, आणि ती आतां पडणार असें शेखराला वाटलें. त्यानें तात्काळ तिला सांवरून धरिलें म्हणून बरें झालें, नाहींतर ती धाडकन खालीं पडली असती. तिच्या चित्तांचा अत्यंत क्षोभ होऊन तिला मूर्च्छा आली होती ! शेखरानें तिला अंथरुणावर निजविलें, आणि निपुणिकेला व चतुरकाला हाक मारिली. त्यानें तिच्या मस्तकावर गार पाणी शिंपडलें, आणि थोडें तिच्या डोळ्यांस लावून कांहीं तिच्या मुखामध्येंही घातलें. तरी तिनें डोळे उघडले नाहींत, किंवा हालचालही केली नाहीं, त्यामुळें कदाचित ती गतप्राण तर झाली नसेल ना, अशी शंका त्याच्या मनांत आली. त्याचे डोळे पाण्यानें भरून आले. निपुणिका तितक्यांत पुढें झाली होती, पण काय प्रकार घडला, हें सांगण्यास त्याच्या मुखांतून बाहेर पडेना !

अशा स्थितींत पांचचार पळें गेल्यावर शेखरानें आपलें मन आवरलें, आणि चतुरकाला राजवैद्याला बोलावूं पाठविलें. राजवैद्य नेहमीं राजवाड्यांतच राहत असत; कारण खरा राजपुत्र जिवंत असतां त्याला अपस्माराचा केव्हां झटका येईल याचा नेम नसे, म्हणून त्यास नेहमीं राजवाड्यांत राहणें भाग पडे. हे राजवैद्य युवराजाचें मरण छपविण्याचे कामीं साथीदार असावे, असें शेखराला खात्रीनें वाटत होतें, आणि अशा प्रकारच्या लबाड माणसाचें साह्य घेण्यास त्याचें मन कचरत होतें, तथापि सध्याचा प्रसंग मोठा चमत्कारिक असल्यामुळें त्याला त्याच वैद्याला बोलावणें पाठवणें जरूर झालें होतें. थोड्याच वेळानें राजवाड्यांत नेहमीं राहतें असलेल्या दोन वैद्यांपैकीं एक जण चतुरकाबरोबर तेथें आला, पण, तो येण्यापूर्वीच प्रियंवदा शुद्धीवर

आली होती. वैद्यानें तिची प्रकृति पाहून तिला ज्वर आला आहे असें सांगितलें, आणि तिनें ज्वर निघेपर्यंत बिछाना सोडूं नये, हें अगदीं अवश्य आहे, असेंही त्यानें आपलें मत दिलें. प्रियंवदेला मूर्च्छा येण्याचें खरें कारण राजवैद्याला उमगलें नव्हतें, तथापि त्यानें आपल्या धंद्यास अनुसरून कांहीं तरी कारण सांगून वेळ मारून नेली. अर्थात् ही गोष्ट शेखराच्या पथ्यावर पडली. वैद्यानें औषधाची योजना केली, आणि आपण पुनः जरूर पडल्यास येऊन जाण्याचें वचन देऊन तो निघून गेला.

शेखर आपल्या पत्नीचा औषधोपचार करण्याच्या गर्दीत असतां राणीकडून प्रियंवदेला, आणि राजाकडून शेखराला अन्नप्राशन संस्कारासाठीं आमंत्रण देण्यास एक दासी आणि एक चोपदार अशीं दोन माणसें तेथें आलीं होतीं. परंतु शेखराची धांदल, आणि प्रियंवदेचा आजार त्यांना धडधडीत दिसत असल्यामुळें त्यांनीं निपुणिका व चतुरक यांजपाशीं राजाराणींचे निरोप सांगून तीं दोघें निघून गेलीं होतीं. प्रियंवदा सावध झाली, वैद्य निघून गेला, आणि शेखराचें बावरलेलें मन ताळ्यावर आलें, असें पाहून चतुरकानें शेखराला आमंत्रणाची वर्दी दिली. आपल्या पत्नीची प्रकृति अशी एकाएकीं बिघडली याचें शेखराला अत्यंत वाईट वाटत होतेंच, पण आपणाला समारंभाचें बोलावणें नाकारण्यास हें एक अगदीं उत्तम कारण मिळालें, या गोष्टीचा त्याला त्यांतल्यात्यांत मोठा आनंद झाला. जर यावेळीं प्रियंवदेची प्रकृति चांगली असती, तर त्या उभयतांसही त्या संस्कारास जाणें भाग झालें असतें. खोटें बोलण्याची त्याला संवय नव्हती, आणि खरें बोलून जिवावर प्रसंग आला असता! अशा संकटाच्या वेळीं हें अद्भुत कारण निर्माण झालें, याबद्दल त्यानें मनोभावानें ईश्वराचे आभार मानिले. आपल्याला सत्यापासून भ्रष्ट न करण्यासाठीं परमेश्वरानेंच अशी योजना केली असावी, असें त्याच्या मनांत आलें, आणि त्याला ईश्वरी करणीचें मोठें कौतुक वाटलें. ज्यांस नेहमीं खोटें बोलण्याची संवय असते, तीं माणसें बेधडक खोटें बोलतात, आणि त्याबद्दल कोणाच्या मनांत संशय येत नाहीं. परंतु ज्याला खोटें बोलण्याची संवय नसते, तें माणूस खोटें बोलण्याचा प्रयत्न करूं लागल्यास त्याला त्या कामीं यश येत नाहीं, आणि त्याची बहुधा फजिती होते. शेखरावर सध्यां असाच प्रसंग होता. त्यानें एकादें खोटें कारण सांगून तें पचलें नसतें, तर संशयास कारण झालें असतें, आणि आपली गुप्त गोष्ट शेखराला माहीत असावी असा नुसता संशय जरी त्या राजाला आला असता, तरी बिलकुल विचार न करतां नुसत्या संशयावरून त्यानें शेखराची रवानगी बंदिशाळेमध्यें केली असती! शेखराचा प्रियंवदेशीं नुकताच विवाह झाला होता आणि तिची काळजी घेण्यास त्याच्याइतक्या मायेचें दुसरें कोणी मनुष्यं तिच्यापाशीं नव्हतें. या दोन गोष्टींचा विचार करणारांस शेखर त्या समारंभास गेला नाहीं, याबद्दल आश्चर्य वाटलें नाहीं तथापि त्यानें एक चिठ्ठी लिहून आपणास समारंभास येतां येत नाहीं, याचें कारण राजाला कळविलें. या चिठीचें राजाकडून जें उत्तर आलें, त्यामध्यें 'तुम्हीं समारंभास न येण्याचें जें कारण लिहिलें तें यथायोग्य आहे, म्हणून आम्ही आग्रह करीत नाहीं,' असें स्पष्ट लिहिलेलें असून शिवाय, 'प्रियंवदेची योग्य शुश्रूषा व्हावी म्हणून आम्ही राजवैद्यांस आज्ञा केली आहे,' असाही मजकूर होता.

अन्नप्राशनाचा समारंभ बिनबोभाट पार पडला. आमंत्रित मंडळींस बसावयाची जागा संस्कार-स्थानापासून बऱ्याच अंतरावर मुद्दाम तयार केली असल्यामुळें संस्काराचे स्पष्ट दर्शन कोणासही होत नव्हतें, आणि त्यावेळेस

देवशर्मा स्वतः पौरोहित्य करीत असल्यामुळें तो त्या बालकाच्या आड बसून तें लोकांच्या नजरेस पडूं नये म्हणून बुद्धिपूर्वक यत्न करीत होता. जमलेल्या मंडळींत पूर्वी युवराजाचें दर्शन घडलेलीं सुदैवी माणसें फारच थोडीं असल्यामुळें, आणि त्यांनाही त्याचें दर्शन एक-दोन वेळांच घडलें असल्यामुळें, आपण पूर्वी पाहिलेलें बालक तें हें नसेल अशी शंका कोणाच्या मनांत येणें शक्य नव्हतें. समारंभास अष्टप्रधान, सरदार, मानकरी, अमीर, उमराव, शेटसावकार वगैरे पुष्कळ मंडळी जमलेली होती. त्यांपैकीं फक्त एका सुंदरसेनाखेरीज दुसऱ्या कोणालाही राजाचें कपट माहीत नव्हतें. लोकांचें संस्काराकडे फारसें लक्ष्य लागूं नये, त्यांचें लक्ष्य दुसरीकडे वेधावें, म्हणून लबाड देवशर्म्यानें सुंदर सुंदर कलावंतिणींचा एक ताफा तेथें हजर ठेविला असून त्या कलावंतिणींचें नृत्यगायन त्याप्रसंगीं सुरू होतें. सुंदरसेनानें संस्काराचे जागीं गेल्यावर बालकाकडे पाहून आपल्या मनाची पूर्ण खात्री करून घेतली, आणि गंभीर मुद्रा धारण करून तो नृत्यगायनामध्यें इतरांप्रमाणें निमग्न झाला. संस्कार आटोपल्यावर थोड्याच अवकाशानें भोजनसमारंभही मोठ्या थाटानें पार पडला.

प्रियंवदेच्या अंगांतील ज्वर हळुहळु उतरत चालला होता; आपणांस या अधर्माच्या व अन्यायाच्या समारंभास जावें लागणार, यांतून पार पडण्यास युक्ति काय करावी याचा विचार करीत असतां चित्तक्षोभ होऊन तिला मूर्च्छा आली होती, आणि त्याच कारणामुळें तिला ज्वरही आला होता. परंतु ती काळजी आतां उरली नसल्यामुळें, हळुहळु तिचें मन थाऱ्यावर येत चाललें. निपुणिका जेव्हां जेव्हां कांहीं कारणानें बाहेर जात असे, तेव्हां तेव्हां शेखर आपल्या पत्नीला समाधानाच्या गोष्टी सांगत असे, हेंच तिच्या आजाराचें खरें औषध होतें; वैद्यांच्या औषधाचा तिच्या आजाराला मुळींच उपयोग नव्हता. योग्य संधि मिळतांच राजाची परवानगी घेऊन होईल तितक्या लवकर स्वदेशीं परत जावयाचें असा आपण विचार ठराविला आहे, असें शेखरानें तिला सांगितलें, व त्याच्या योगानें तिच्या मनाचें बरेंच समाधान झालें.

त्याच दिवशीं प्रहर रात्रीचे सुमारास; सुंदरसेन आपल्या भेटीस आला आहे, अशी चतुरकानें शेखरास वर्दी दिली, सुंदरसेन स्वतः भेटीस आला असतां त्याची भेट घेणें शिष्टाचाराप्रमाणें शेखराला भाग झालें. म्हणूनच तो त्याच्या भेटीसाठीं आपल्या पत्नीजवळून दूर होऊन बाहेरच्या दिवाणखान्यांत आला. वास्तविक पाहिलें तर त्याला सुंदरसेनाचा तिटकारा आलेला होता, आणि त्याचें पुनः मुखावलोकनसुद्धां करूं नये, असें शेखराला वाटत होतें.

शिष्टाचाराप्रमाणें त्यांनीं परस्परांस नमन करून ते आपापल्या आसनांवर बसल्यावर सुंदरसेन किंचित् हास्यपूर्वक म्हणाला,-' आपल्या पत्नीची प्रकृति एकाएकीं बिघडल्याचें ऐकल्यामुळें, आतां त्यांची प्रकृति कशी आहे, याची चौकशी करण्याकरितां मी स्वतां येथें आलों आहें.'

शेखर बोलला,'-आम्हां परक्यांबद्दल आपण इतकें अगत्य दाखवितां हें पाहून मला फार समाधान होत आहे! माझ्या पत्नीची प्रकृति आतां पुष्कळ बरी आहे, हें कळविण्यासही मला फार आनंद वाटतो!'

सुंदरसेनानें मोठ्या चमत्कारिक मुद्रेनें आपल्या सभोंवतीं दृष्टि टाकून आपलें भाषण कोणी ऐकत नाहीं, अशी आपल्या मनाची खात्री करून घेतली, आणि अर्थपूर्ण दृष्टीनें शेखराकडे पाहून आणि त्याचा हात धरून तो म्हणाला,-' असें मला वाटलेंच होतें. ही आजारी पडण्याची युक्ति फार छान साधली! आजच्या समारंभाला हजर न राहण्याला याहून योग्य कारण मिळालेंच नसतें. आपलें हें कौशल्य पाहून मला फार

आनंद वाटतो; आपणांस मीं केलेला उपदेश ठसला ही फार चांगली गोष्ट झाली! "

शेखर अगदीं गंभीरपणानें म्हणाला,-'अहो अमात्य, आपली या बाबतींत अगदीं गैरसमजूत आहे, हें मी आपणास स्पष्ट सांगतों. माझ्या पत्नीनें आजाराचें ढोंग केलें नसून ती खरोखरच आजारी आहे! "

सुंदरसेनाला वेळ मारून नेण्याचें आणि आपलें बोलणें चटकन फिरविण्याचें कसब फार छान साधलेलें होतें. तो लगेच बोलला,-'असें जरी असलें, तरी हें दुखणें तुमच्या फार उपयोगी पडलें, असें म्हणणें भाग आहे. आणि त्यांतल्या त्यांत त्यांची प्रकृति इतक्या लवकर सुधारूं लागली, ही फार आनंदाची गोष्ट आहे. खरेंच सांगतों, आजच्या समारंभासाठीं वाड्यांत आल्यावर तुमची चौकशी केली, त्यावेळीं पत्नीच्या आजारामुळें तुम्हीं आलां नाहीं, असें समजलें; परंतु त्यावेळीं माझी कल्पना निराळी असल्यामुळें मी तावडतोब आपल्या भेटीस आलों नाहीं. आपली पत्नी खरोखर आजारी आहे, अशी माझी कल्पना असती, तर मी त्याचवेळीं आपलीं सर्व कामें बाजूस ठेवून अगोदर आपल्या साह्यास आलों असतों.'

सुंदरसेनानें आपल्या मनाचा मोकळेपणा दाखविण्यासाठीं जरी हें भाषण केलें होतें, तरी त्याचा शेखराच्या मनावर काडीभर तरी त्याचा शेखराच्या मनावर काडीभर तुळा इष्ट परिणाम झाला नव्हता. अर्थात् त्यानें यावेळीं नुसतें प्रसंगास शोभण्यासारखें उत्तर केलें, परंतु त्यानें सुंदरसेनाची स्तुति अगदीं केली नाहीं.

पुनः एकवार आपल्या भोंवतीं नजर टाकून सुंदरसेन बोलला,-'अहो राजपुत्र, आजच्या या समारंभासंबंधानें आपणांस काय वाटतें! बरें, मी विचारतों, आपण सध्यां येथें जें बोलूं तें कोणाच्या कानावर जाण्याचा तर संभव नाहीं ना? प्रस्तुत प्रसंगीं सावधपणा ठेवणें हें किती अगत्याचें आहे, हें आपण जाणतच अहां! "

शेखर बोलला,-' यासंबंधानें मला काय वाटतें असें आपण विचारतां, त्या अर्थीं मला जें काय वाटतें, तें मी स्पष्टपणें बोलतों. हें कृत्य करून राजाधिराजांनीं प्रजाजनाचा मोठा अपराध केला आहे, आणि त्यांच्या हातून जें हें पापकृत्य घडलें आहे, तें ईश्वराच्या घरीं कधींही रुजू होणार नाहीं. या त्यांच्या कृत्याची जेव्हां जेव्हां मला आठवण होतें, तेव्हां तेव्हां माझें मस्तक फिरून जातें! ही गोष्ट जर मला समजली नसती, तर फार चांगलें झालें असतें! अहो अमात्य, मी तुम्हांला असें विचारतों कीं, काल रात्रीं आपण आपल्या सामर्थ्यासंबंधानें मला ज्या गोष्टी सांगितल्या, त्या जर खऱ्या असतील, तर आपण एवढा अन्याय झालेला प्रत्यक्ष पाहत असूनही त्याचा प्रतीकार करण्याचा यत्न करीत नाहीं, हें कसें? आपल्यासेरीज या राज्यांतील एक काडीसुद्धां इकडची तिकडे हालावयाची नाहीं, आपणाला प्रधानपदावरून दूर करण्याचें राजाला धैर्य व्हावयाचें नाहीं, वगैरे ज्या गोष्टी तुम्ही सांगत होतां, त्या जर खऱ्या असत्या, तर हा अन्याय तुम्हीं उघड्या डोळ्यांनीं कधींही सहन केला नसता! '

अत्यंत गंभीरपणानें आणि शांतपणानें सुंदरसेन बोलला,-'या विषयासंबंधानें आपणां उभयतांनीं स्पष्टपणें भाषण करावयास ही फार उत्कृष्ट संधि आलेली आहे. अहो राजपुत्र, काल रात्रीं या राजवाड्यामध्यें झालेलें अमानुष कृत्य मीं तुम्हाला मुद्दाम कां दाखविलें, याचें कारण अद्यापि तुमच्या ध्यानांत आलें नसल्यामुळें मला तें प्रथम स्पष्ट करून सांगणें भाग आहे. युवराजांचें प्रेत मी तुम्हाला दाखविलें याचें एक कारण असें का, जीं माणसें सध्यां येथील सिंहासनावर मोठ्या दिमाखानें आरूढ होत असतात, तीं किती नीच आणि भयंकर आहेत, याची काहीं तरी कल्पना तुमच्या मनांत यावी! बरें, मी

आतां तुम्हाला आणखी असें विचारतों, कीं असल्या नीच पुरुषांचा पक्ष मीं सोडून दिला, तर त्यांत मजकडे कोणता दोष आहे ?'

शेखर मध्येंच म्हणाला,–'अहो अमात्य, आपण बोलतां हें भाषण राजद्रोही आहे ! अशा प्रकारचें भाषण प्रत्यक्ष राजवाड्यांत करणें हा तर भयंकर अपराध आहे !'

सुंदरसेन स्पष्टपणें बोलला,–'तसें सरें असेल-नव्हे तसें आहे,–हें मी कबूल करतों ! परंतु मी राजद्रोह करणारा पुरुष आहें, असें प्रसिद्ध करण्याची तुम्हाला छाती व्हावयाची नाहीं ! राजाची जी ही गुप्त गोष्ट तुम्हांस समजली आहे, तेवढींच तुमचें तोंड बंद करण्यास पुरे आहे !'

हें त्या प्रधानाचें भाषण ऐकून शेखरास क्रोध आला; त्यानें तरवारीच्या बंदास हात घातला, आणि तिरस्कारानें त्याजकडे पाहत तो त्यास म्हणाला,–'हें तुम्हीं माझ्याशीं–वीरश्रेष्ठ दृढसंध महाराजांच्या पुत्राशीं बोलत आहां, हें ध्यानांत असूं दे !'

अगदीं न डगमगतां सुंदरसेन पूर्वीहून अधिक गंभीर स्वरानें बोलला,–'सर्व कांहीं माझ्या ध्यानांत आहे ! मी कांहींसुद्धां विसरलों नाहीं ! पण आपण असे क्रुद्ध न होतां जर माझें भाषण शांतपणें ऐकून घ्याल तर बरें होईल ! अहो राजपुत्र, सध्यांच्या प्रसंगीं तुमचें हित आणि माझें हित हीं दोन्ही एकाच गोष्टीमध्यें एकवटलेलीं आहेत, हें अद्यापि तुमच्या ध्यानीं न आल्यामुळें त्यासंबंधानें तुमची समजूत घालणें या प्रसंगीं फार जरूर आहे. सध्यां तुम्हीं माझ्या कचाटींत पुरते सांपडलां आहां ! कसे तें ऐका. समजा, आपली गुप्त गोष्ट मला आणि तुम्हाला माहीत झाली आहे, असें जर मीं रत्नाकरापाशीं एकान्तीं बोललों, तर त्याचा परिणाम काय बरें होईल ? माझा अधिकार वाढेल, राजाचा सर्व खजिना माझ्या घरांत येईल, मला मोठमोठ्या जहागिऱ्या मिळतील, आणि राजाला माझ्या आज्ञेंत राहणें भाग पडेल ! पण तुमची अवस्था काय होईल ? तो राजा तुमची तुमच्या पत्नीसह एकदम बंदिशाळेमध्यें पाठवणी करील, आणि तेथें तुम्हाला कुजत पडून जन्म घालवावा लागेल ! राजा असें करील, यावद्दल शंकाच नको ! कारण माझ्यासारख्याला गुप्तपणें चिरडून टाकतां येणें हें राजाचा राजा आला, तरी सध्यांच्या प्रसंगीं शक्य नाहीं. पण तुमची स्थिति निराळी आहे ! तुम्ही सध्यां परदेशांत आहां. तुमची चौकशी करणारा एकही मित्र येथें नाहीं, अशा स्थितींत तुम्हाला राजानें कैदेंत टाकलें, तर तुम्ही कोठें आहां हें तुमच्या पित्याला कालत्रयीं देखील समजणार नाहीं ! असें झाल्यास पुढें तुमच्या नशीबीं काय लिहिलेलें आहे, हें सांगावयास फारशा विचाराची जरूर नाहीं !'

हें सुंदरसेनाचें भाषण ऐकून शेखराच्या अंतःकरणामध्यें झक्क प्रकाश पडला. त्या नीच माणसानें सध्यां आपणास एका भयंकर पर्वताच्या कड्यावर उभें केलें असून, तो आपणास खालीं लोटावयास तयार झाला आहे, असें त्याच्या मनांत आलें ! आपणावर आणि आपल्या प्रिय पत्नीवर अरिष्ट ओढवण्याचा संभव आहे, या नुसत्या विचारानेंच त्याच्या सर्वांगास घाम सुटला, आणि त्याचा नूर खाडकन उतरला. तथापि धैर्य धरून त्यानें आपलें मन शांत केलें, आणि तो त्या प्रधानास बोलला,–'मीं आतां लवकरच हें शहर सोडून स्वदेशीं जाण्याचा विचार केला आहे. मी एकदां हें शहर सोडून दूर गेल्यावर तुम्हाला येथें हवा तसा गोंधळ घालावयास मुळींच हरकत पडणार नाहीं !'

सुंदरसेन बोलला, 'तुम्ही येथून निघून गेलां म्हणजे माझें मोठेंसें कार्य होत आहे, असें नाहीं. तुम्ही या शहरांतून निघून जावें एवढीच जर माझी इच्छा असती, तर मीं ती कधींच पूर्ण करून घेतली असती !

तुम्ही येथें आल्यावर तुमच्या माझ्या भेटीचे जे योग मीं जुळवून आणले, त्यांचें कारण फार वेगळें आहे ! माझ्या मनांत कित्येक महत्त्वाच्या गोष्टी साध्य करून घ्यावयाच्या असल्यामुळेंच मीं सुद्धाम तुमची मैत्री संपादन करण्याचा प्रयत्न केला आहे. भावी युद्धामध्यें वागलाणांतील संस्थानिकांनीं रत्ना-कराला साह्य करणें किंवा उदासीन राहून अपरोक्ष रीतीनें निंबराजाला साह्य करणें हें नुस्त्या तुमच्या एका शब्दावर कसें अवलंबून आहे, ही गोष्ट मीं यापूर्वी एका प्रसंगीं स्पष्ट करून सांगितलीच आहे. खरें म्हणाल, तर भावी युद्धामध्यें तुमचे श्वशुर आणि वडील यांनीं आपल्या कंपूतील सर्व संस्थानिकांसह निंबराजाला साह्य करावें ही गोष्ट मला अत्यंत इष्ट आहे ! निदान त्यांनीं उदासीन राहणें हें तरी मला अत्यंत जरूर आहे, ही गोष्ट केवळ तुमच्या एका शब्दानें साध्य होईल अशी माझ्या मनाची खात्री असल्यामुळें मीं एवढें कारस्थान रचिलें आहे. नंतर चमत्कारिक तऱ्हेनें हास्य करून सुंदरसेनानें विचारलें,–'थोड्या महिन्यांत पूर्वी सरदार हलधर तुमच्या प्रतापपुरीं गेले होते, त्यावेळीं त्यांच्या मनांत काय हेतु होता, हें तुम्हास समजलें आहे काय ?'

शेखरानें उत्तर केलें,–'निंबराजाविषयीं वागलाणांतील संस्थानिकांचें मत काय आहे, हें समजून घेण्यासाठीं तो तिकडे आला असावा, असा आमचा तर्क आहे.'

सुंदरसेन म्हणाला,–'इतकाच त्यांचा हेतु नसून वागलणांतील कोणकोण संस्थानिक द्रव्यानें वश होतील, हेंही पाहण्याचा त्यांचा हेतु होता, आणि जे कोणी अशा रीतीनें–'

शेखर मध्येंच बोलला,–'अहो अमात्य, या गोष्टी मला कंशाला पाहिजेत ? या ऐकून घेऊन मला काय करावयाचें आहे ! या गोष्टी मला कळवून आणसी पेचांत आणावें, असा तुमचा हेतु नसेल कशावरून ? पंधरा दिवसांपूर्वी सत्यरथ हा आपला हस्तक आहे, असें मला [illegible] सांगितलें होतें, पण आजच्या [illegible] यावरून तो तुमचा हस्तक नसून [illegible] हेरच असला पाहिजे, अशा [illegible] विश्वासघातकी असल्यामुळें, तुम्ही [illegible] या राजधानीच्या शहरांतील [illegible] ढण्यासाठीं किंवा येथें फितुरी करण्यासाठीं तो येथें आलेला असावा, अशी माझी ठाम समजूत झालेली आहे !'

सुंदरसेन बोलला,–'मीं त्यावेळीं सत्यरथासंबंधानें तसें सांगितलें, याचें कारण अगदीं उघड आहे. त्या वेळीं माझा-तुमचा विशेष परिचय नव्हता, म्हणून मला तसें सांगावें लागलें. मी आपला नाश करण्यास प्रवृत्त झालों असेन, अशी शंका तुमच्या मनांत येत आहे, पण तुम्ही जरा थांबून नीट विचार कराल, तर तुमची ही शंका अस्थानीं आहे, असें तुमचें तुम्हालाच आढळून येईल. तुमचा नाश करून माझा कोणता फायदा होणार आहे ? तुम्ही माझी कोणत्याही गोष्टीमध्यें स्पर्धा करीत नाहीं, अर्थात् तुमचा नाश करून मला कांहींच मिळवावयाचें नाहीं. बरें, तुमच्या हातून माझें वांकडें होईल, अशी माझ्या मनांत भीति उत्पन्न होण्याचें कारण नाहीं. तुम्हाला माझें शत्रुत्व करतां येणार नाहीं, केल्यास त्याचा काय परिणाम होईल, हें मीं तुम्हास अगोदर सांगितलेंच आहे. तुमचा आमचा परस्पर स्नेहसंबंध जुळून यावा, हें मला अनेक कारणांनीं इष्ट आहे. थांबा, मी काय बोलतों तें स्वस्थपणें ऐकून घ्या. मध्यें बोलूं नका. मला जें सांगावयाचें आहे, तें मी अगदीं थोडक्यांत सांगतों.' असें बोलून त्या विश्वासघातकी राजपुरुषानें मोठ्या प्रौढपणाचा आव घालून भाषण करण्यास प्रारंभ केला. तो म्हणाला,–'वल्लभीच्या सिंहासनाला कीड लागून तें अगदीं कोरम झालें आहे.—

आणखी थोड्याच दिवसांत तें जमीनदोस्त होईल, यांत्रद्दल संशय नाहीं ! या राज्याचा जरी नाश झाला, तरी माझें महत्त्व अणुमात्रही कमी होणार नाहीं. रत्नाकर राजाला जशी माझी जरूर आहे, तशी किंवहुना त्याहून अधिक निंबराजाला लागणार. निंबराजाचा जो लाभ तो माझाच लाभ असल्यामुळें त्याला हें राज्य मिळावें, म्हणून माझे रात्रंदिवस प्रयत्न चालले आहेत; या माझ्या प्रयत्नांस जर तुम्ही साह्य कराल, तर त्यापासून तुम्हालाही मोठा लाभ होणार आहे ! यासाठीं तुम्ही आतां एकदम स्वदेशीं परत जा, तुम्हीं जें येथें प्रत्यक्ष पाहिलें आहे, तें आपल्या वडिलांस कळवा, आणि रत्नाकराच्या पक्षाला साह्य करणें हें ईश्वराच्या घरीं अन्यायाचें होईल, ही गोष्ट नीटपणें त्यांच्या मनांत भरवून द्या. तुमच्या साह्यानें जर बागलाणांतील संस्थानिक निंबराजाच्या पक्षाला अनुकूल झाले, अथवा निदान उदासीन तरी राहिले, तर मोठी बहार होणार आहे. एवढी कामगिरी जर तुमच्या साह्यानें पार पडली, तर तिच्यामुळें तुमचाही मोठा फायदा होणार आहे. तुमचें बागलाणांतील राज्य विस्तारानें जरी मोठें असलें तरी मुलूख सगळा वैराण असल्यामुळें फारसा फायदा होत नाहीं, ही गोष्ट धडधडीत दिसत आहे. आतां खुद्द तुमच्याविषयीं विचार केला, तर तुम्ही राजाचे लहान पुत्र असल्यामुळें गादीवर तुमचा वारसा पोंचत नाहीं. तुम्हाला जी कांहीं थोडीशी नेमणूक मिळेल तेवढीच ! तुम्हाला तुमच्या सासऱ्यानें आपलें संस्थान दिलें आहे, हें मला माहित आहे, पण त्या संस्थानचें उत्पन्न आणि खर्च यांची तोंडमिळवणी होत असेल कीं नाहीं याची शंकाच आहे. तुमच्या वडिलांच्या खजिन्यांत द्रव्याची नेहमीं ओढ असते, हें मला माहित आहे.त्यांना द्रव्य पाहिजे असेल, तर तें त्यांना मिळेल; त्यांना आपलें संस्थान वाढवावयाचें असेल, तर तेंही त्यांची इच्छा पूर्ण होईल; जर त्यांना राज्यकारभारामध्यें-अष्टप्रधानांमध्यें आसामी पाहिजे असेल तर तीही मिळेल; तुम्हां स्वतःला एकादें स्वतंत्र संस्थान तोडून देण्यांत येईल. राजदरबारीं तुमची मोठी प्रतिष्ठा होईल. तुम्ही तरुण आहां, तुम्हाला या जगांत आपलें सर्व आयुष्य काढावयाचें आहे. तुमचा संसार अजून वाढवयाचा आहे. माणसाच्या आयुष्यामध्यें आपला फायदा करून घेण्याची एकादीच संधि येत असते, ती जर आपण गमाविली,तर आपल्याला जन्मभर पश्चात्ताप करीत बसावें लागेल, हें तत्त्व मी तुम्हांस पूर्वी एकदां सांगितलेलेंच आहे. यासाठीं नीट विचार करा, आणि मग काय उत्तर द्यावयाचें तें द्या. '

हें त्याचें भाषण ऐकून शेखराला मोठा त्वेष आला होता, तरी प्रसंगाकडे नजर देऊन तें त्यानें निमूटपणें ऐकून घेतलें. मध्यें एकदोनदां आपलें भाषण बंद करा, असें सांगावयाचें त्याच्या तोंडांत आलें होतें, परंतु त्यानें आत्मसंयमन करून आपलें मन आवरून धरिलें. आपल्या संबंधानें सुंदरसेनाच्या मनांत काय आहे, हें त्यानें स्पष्टपणें बोलून दाखविलें, हें फार चांगलें झालें; असें त्याला वाटलें. कारण सध्यां आपण कोणत्या प्रसंगांत आहों, याचें त्याला त्यामुळें चांगलें ज्ञान झालें. सुंदरसेन स्तब्ध बसल्यावर शेखरानें थोडावेळ आपल्याशींच विचार केला. सध्यां आपण एका बदमाष माणसाच्या हातीं सांपडलों असून त्या माणसाशीं आपण उघडपणें वैर केल्यास त्याचा परिणाम फार वाईट झाल्यासेरीज रहावयाचा नाहीं, अशी त्याच्या मनाची खात्री झाली. आपण एकदां राजाची भेट घेऊन आपण राजधानींत पाऊल टेवल्यापासून पाहिलेला सर्व प्रकार त्याच्या कानावर घालावा, असें त्याच्या मनांत आलें, पण तसें करण्यास

एक मोठी थोरली अडचण त्याच्या पुढें उभी राहिली. सर्व हकीकत अगदीं खरीखरी सांगावयाची म्हणजे सत्यरथाच्या पत्नीला आपण वेळींच सावध करून त्याला पळून जाण्यास साह्य केलें, ही गोष्टहि त्याला सांगणें भाग पडेल, आणि तो आपला अन्याय असल्यामुळें राजा आपणांस जी शिक्षा करील ती मुकाट्यानें सहन करावी लागेल. बरें, असें केलें, आपण शिक्षा सोसण्यास तयार झालों, तरी तेवढ्यानें कोठें निभावतें ? राजाचें वर्म सुंदरसेनाला माहित असल्यामुळें राजाच्या हातून त्याचें पारिपत्य व्हावयाचें नाहीं तें नाहींच, आणि आपण मात्र विनाकारण संकटांत पडूं, असें त्याला वाटूं लागलें, आणि तो विचार त्यानें साफ सोडून दिला. शेवटीं आलेला प्रसंग युक्तीनें पार पाडला पाहिजे असा त्यानें विचार ठरविला व तो त्याला म्हणाला,—'अहो अमात्य, या आपल्या भाषणामध्यें बराच तथ्यांश आहे, यांत शंका नाहीं. आपण सध्यां ज्या गोष्टी सांगितल्या, त्यांचा मीं अशा दृष्टीनें पूर्वीं विचार केला नव्हता. यासाठीं मी आज या गोष्टीचा सावकाशपणें विचार करतों, आणि उद्यां आपणांस काय तो जबाब देईन.'

सुंदरसेन आनंदानें बोलला,—'कबूल ! आतां पासून आठ प्रहर तुम्हाला मी विचार करावयास फुरसद देतों. उद्यां बरोबर याच वेळीं तुम्ही मला माझ्या वाड्यांत येऊन भेटा. सध्याचा प्रसंग कोणता आहे, याचा नीट विचार करा. जर तुम्ही या प्रसंगीं निष्काळजी पणानें वागाल,तर त्याचा परिणाम फार वाईट होईल ! आज तुम्ही मला राजद्रोही असें समजत आहां, पण आणखी थोड्याच दिवसांनीं ही स्थिति साफ बदलेल आणि रत्नाकर राजा राज्यभ्रष्ट होऊन निंचराज येथील सिंहसनावर आरूढ झाल्यावर माझ्या राजनिष्ठेबद्दल संशय घेण्याची कोणाला छाती होईल ! उलट जे कोणी या राजाच्या पक्षाला चिकटून राहतील, त्यांना मात्र राजद्रोही म्हणून भयंकर शिक्षा होईल. यासाठीं आतां या गोष्टीचा नीट विचार करा ! मी येतों आतां !'

इतका प्रसंग घडून आल्यावर शिष्टाचारास मुळीं जागाच उरली नव्हती, म्हणून जाते वेळीं सुंदरसेनानें शेखराला किंवा शेखरानें सुंदरसेनाला मुलकी मान हालवून नमन देखील केलें नाहीं. सुंदरसेन निघून गेल्यावर शेखर कांहीं वेळ चिंतेमध्यें निमग्न झाला; परंतु पुढें काय करावयाचें हें त्यानें आपल्या मनाशीं बहुतेक ठरवून ठेविलेलें असल्यामुळें त्यानें आधिक विचार करीत बसण्यांत आपला वेळ घालविला नाहीं. सुंदरसेन निघून गेल्यावर दहा–पांच पळांनीं शेखर आपल्या पत्नीपाशीं गेला. झालेला सर्व वृत्तांत त्यानें आपल्या पत्नीस निवेदन केला, आणि पुढें त्यांना जें काय करावयाचें होतें, त्याच्या विचारास त्यांनीं प्रारंभ केला.

प्रकरण ४३ वें.

पलायन व कैद.

सुंदरसेनाशीं झालेलें आपलें सर्व भाषण शेखरानें प्रियंवदेला सांगितलें. त्या लबाड अमात्यानें आपल्या पतीला अशा रीतीनें कचाटींत धरिलें, या गोष्टीचा तिला अत्यंत खेद झाला. प्रियंवदेला दुराचरणाची भीति वाटत असे, इतकेंच काय तें. एरव्हीं तिचा स्वभाव भित्रा नव्हता, हें तिनें यापूर्वी एकवार दाखविलेल्या धैर्यावरून वाचकांच्या ध्यानीं असेलच. या प्रसंगीं आपणांवर कोणतें संकट आलेलें आहे, आणि त्याचा परिणाम काय होणार आहे, हें तिला ढळढळीत दिसत असल्यामुळें तिनें आपलें संपूर्ण धैर्य आपल्या साह्यास घेतलें, आणि भीतीचा त्याग करून, आपणास जणूं

काय या वेळीं मोठी गंमत वाटत आहे, अशा रीतीचा स्वर काढून ती म्हणाली,-'त्या लफंग्यानें आपणांस एक दिवसाची मुदत दिली आहे ना? तेवढ्या वेळांत आपणास काय हवें तें करितां येईल!'

शेखर बोलला,-'होय; प्रिये, खरेंच सांगतों, तो लवाड माणूस जेव्हां माझ्याशीं अपमानकारक भाषणें बोलूं लागला, त्या-वेळीं मला त्याचा अतिशय संताप आला होता! त्यावेळीं मीं अविचार केला नाहीं, म्हणूनच तो या वाड्यांतून जिवंत बाहेर पडला! मीं त्यावेळीं आत्मसंयमन करून आपले सर्व मनोविकार दाबून टाकिले असल्यामुळें स्वतःस मोठा धूर्त आणि कावेबाज समजणारा तो नीच मनुष्य साफ फसला! त्यानें मला जी लालूच दाखविली आहे, तिला मी भिईन, आणि राजनिष्ठेपासून पराङ्मुख होईन, असे तो आपल्या मनांत मांडे खात आहे! तो आपल्या मनावरून माझी परीक्षा करतो, इतकेंच नव्हे, तर वेळ पडेल तसें वागणारे, नशीबावर हवाला ठेवणारे, आणि साहस-कर्मांनीं आपली प्रतिष्ठा वाढवूं पहाणारे असे या जगामध्यें जे कित्येक बदफैली लोक असतात, त्यांपैकींच मी एक असेन, असें तो मला समजत आहे! पण या बाबतींत तो फसला! अगदीं पुरा पुरा फसला, यांत शंका नाहीं!'

प्रियंवदा म्हणाली,-'तो फसला, यांत तर शंकाच नाहीं. बरें, आतां आपण पुढें काय करावयाचें! आतां येथून पाय काढता घेण्याखेरीज दुसरा इलाज नाहीं, असें मला वाटतें.'

शेखर बोलला,-'होय, उद्यां सायंकाळच्या सुमारास हा वाडा सोडून चालतें व्हावयाचें, असा मीं विचार ठरविला आहे. उद्यां सकाळीं मी बंदरावर जाऊन येथून एकादें सुरथपुराकडे जाणारें गलबत आहे कीं काय, याची चौकशी करीन!'

प्रियंवदा मध्येंच बोलली,-'आपण जर आजच्या आज येथून दूर झालों असतों, तर फार चांगलें झालें असतें. त्या दुष्ट अमात्याच्या हेतूंला जर आपण अनुकूल झालों नाहीं, तर तो आपला नाश केल्या-खेरीज कधींही स्वस्थ बसावयाचा नाहीं या दुष्ट आणि कपटमय दरबारापासून आपण जितकें दूर असूं तितकें बरें! जर आपण राजाकडे निरोप माग-वयास गेलों, तर तो आपल्याला इतक्या घाईनें जाण्याचें कारण काय, असा प्रश्न विचारल्याखेरीज राहणार नाहीं! आपणास तसें कोणतेंही योग्य कारण दाखवितां याव-याचें नाहीं म्हणून आपण कोणास न विचा-रतां आजच्या आज एकदम आपला मार्ग सुधारावा, असें मला वाटतें. ईश्वराच्या दयेनें आपल्यापाशीं आज द्रव्य बरेंच आहे. आपण बंदरावर जाऊन एकदम गलबत ठरविलें, तरी साधण्यासारखें आहे.'

आपल्या पत्नीचें हें हिमतीचें आणि पोक्तपणाचें भाषण शेखरानें शेवटपर्यंत ऐकून घेतलें, आणि त्याला बरेंच समाधान वाटलें. तिची ही सूचना मान्य करणें अगदीं योग्य आहे, असें त्याला वाटलें; परंतु ती अद्यापि नीटशी बरी झालेली नसल्यामुळें, आजच्या आज तिला उघड्या हवेंत नेणें त्याला इष्ट वाटेना; म्हणून तो कांकूं करूं लागला.

त्याचें मन ओळखून प्रियंवदा म्हणाली,-'माझ्या प्रकृतिसंबंधानें काळजी करण्याचें कारण नाहीं. ज्या चिंतेनें माझी प्रकृति बिघडली होती, ती चिंता दूर झाल्यामुळें आतां माझी प्रकृति एकदम सुधारेल; या राजवाड्यांतील कोंदट हवेपेक्षां समुद्राची मोकळी हवा माझ्या प्रकृतीस अधिक हितावह होईल. आपण भर दिवसा हा वाडा सोडण्यापेक्षां रात्रीं आपण येथून बाहेर पडलों तर तें अधिक बरें, असें मला वाटतें. जर आपण उद्यां रात्रीपर्यंत येथें राहिलों,-

तर आपणाला त्या नीच अमात्याची भेट घेणें जरूर होईल, आणि त्याची भेट झाल्यावर आत्मसंरक्षणासाठीं त्याच्या बोलण्यास रुकार देणें आपणास भाग पडेल. यासाठीं आपण आजच्या आज येथून चालतें [illegible] पाहिजे. मी खरेंच सांगतें, अशा संशय[illegible] परिस्थितींत राहणें हें मला जितकें [illegible] कारक होईल, तितकें कांहीं उघड्या [illegible] राहण्यानें होणार नाहीं, अशी [illegible] खात्री आहे. शिवाय आपण [illegible] येथून निघून गेलों, तर ती [illegible] प्रधानाला उद्यां रात्रीं [illegible] नाहीं, आणि तेवढा [illegible] अधिक पल्ला गांठतां ये[illegible] येथून जावयाचें [illegible] गेल्यावर एक [illegible] सुंदरसेनाला ती बातमी क[illegible] लागलाच आमचा [illegible]

या [illegible] च्या दुसऱ्या युक्तिवादा[illegible] चें मन वळाविलें आणि तो [illegible] प्रमाणें वागण्यास तयार झाला. [illegible] चतुरक या उभयतांस त्यां[illegible] आपापल्या सामान सुमाना[illegible] करविली आणि प्रियंवदा[illegible] कार धारण करून प्रवासास त[illegible] हातातून सहज नेतां [illegible] कारचीं जरूरीचीं लहान ल[illegible] बांधिलीं. शेखर आणि प्रियंवदा[illegible] ड्यांतून बाहेर पडून बं[illegible] आणि निपुणिका व चतुरक [illegible] मारून आपल्या [illegible] बंदरावर आणावीं, [illegible] दहा घटका रात्र[illegible] दिवाणखान्यांतील [illegible]

राजवाड्यांतून [illegible] त्यांस मुळींच नड पड[illegible] नांना राजवाड्यांतून बाहेर [illegible] स व हवें तेव्हां परत घेण्या[illegible] क होती,

शेख[illegible] सह राजवाड्यांतून बाहे[illegible] कोणत्याही प्रकारचें [illegible] दोघें बंदरावर येऊन [illegible] प्रमाणें निपुणिका व चतु[illegible] यांचें सर्व सामान दोन खेपांत [illegible] आणिलें. वाड्यांत त्यांचा कोण[illegible] कारचा गुंता राहिला नाहीं. समुद्र[illegible] मोकळी हवा अंगास लागल्याबरोबर प्रियंवदेला इतकी हुषारी आली [illegible], आपण सकाळीं मूर्च्छित पडलों होतों, ही गोष्ट जणुं काय तिच्या ध्यानींही नव्हती!

बंदरावर गेल्याबरोबर शेखर लागलाच गलबताच्या शोधास लागला. सुदैवानें सुरथपुर बंदरांत जाणारें एक गलबत त्याला मिळालें, आणि इतक्या सहज रीतीनें आपली वल्लभीनगरांतून सुटका झाली, या गोष्टीचा त्या पति-पत्नीस फार आनंद झाला. तीं आतां ज्या गलबतांतून जाणार होतीं, त्या गलबताचें नांव 'ललिता गौरी' असें होतें. आपलें सर्व सामानसुमान हातीं आल्यावर तीं चौघें जणें गलबतांत जाऊन बसलीं, आणि तांडेलानें नांगर उचलून गलबत हांकारिलें. गलबताच्या खालच्या भागामध्यें चांगली सोय असल्यामुळें प्रियंवदेला समुद्रावरील जोराच्या वाऱ्याची भीति उरली नाहीं.

उजाडेपर्यंत 'ललितागौरी' गलबत एकसारखें चालत होतें. वारा जोरानें वाहत असल्यामुळें तें वल्लभीनगरापासून बऱ्याच अंतरावर येऊन पोंचलें; सूर्योदयाचे वेळची आकाशाची अवर्णनीय शोभा पाहण्यासाठीं शेखर आणि प्रियंवदा हीं परस्परांशेजारीं बसलीं असतां आपण एकदांची त्या कपटपाशांतून सुटून दूर झालों, हें मनांत येऊन त्या उभयतांना मोठा आनंद होऊं लागला. समुद्र शांत असल्यामुळें काळ्या भोर पाण्यावरून तें गलबत जणूं काय पक्ष्याप्रमाणें भराऱ्या मारीत चाललें होतें. आकाशांत अभ्रें नसल्यामुळें हें अगदीं

चकचकीत निळें दिसत नाही. दोन प्रहरच्यावेळीं आकाशाचा पसरलेपणा जसा दृष्टीला दुःसह वाटतो, त्यावेळीं वाटत नव्हता. सूर्य जरी क्षितिजाच्या वर आलेला नव्हता, तरी पूर्व दिशेकडे तांबडा लाल परंतु सौम्य प्रकाश पसरला होता. एकदां पूर्वेकडील तांबडेपणा आणि एकदां पश्चिमे कडील निळेपणा असे दोन आपापल्या परी शोभायमान दिसण्याचे देखावे त्यांचा अंतरात्मा प्रसन्न करीत होते, आणि प्रत्येक वस्तूमध्यें स्वतंत्र सौंदर्य निर्माण करणाऱ्या अगाध शक्तीचें स्मरण झाल्यामुळें त्या पति-पत्नींचीं अंतःकरणें भक्तिरसानें पूर्ण झालीं होतीं. हळूहळू पूर्वेकडच्या प्रदेशाचा तांबडा वर्ण कमी कमी होत जाऊन तो पिंवळा दिसूं लागला, आणि क्षितिजाशीं असलेल्या पर्वताचीं शिखरें एकामागून एक दृष्टीस पडूं लागलीं. इतकावेळपर्यंत तो पर्वत म्हणजे जणुं काय एक काजळाचा लोळ आडवा पडलेला आहे, असें वाटत होतें, परंतु उदयोन्मुख सूर्याचीं किरणें जसजशीं अनंत आकाशांत पसरत चाललीं, तसतसा पर्वताचा प्रत्येक भाग स्पष्ट दिसूं लागल्यामुळें, तो निव्वळ काळ्या पदार्थाचा बनलेला नसून त्याजवर दुसऱ्या कित्येक रंगांचें मिश्रण आहे, ही गोष्ट अनुभवास येऊं लागली. हळु हळु पर्वत आणि समुद्र यांच्यामध्यें असणाऱ्या सपाट प्रदेशांतील बागाइतांचा हिरवा रंग स्पष्ट होत चालला, आणि त्या बागेंतील नारळी-पोफळीच्या झाडांचे शेंडे बालरवीच्या आरक्त किरणांनीं चकचकीत दिसूं लागले, पूर्व दिशेकडील पिवळा रंगही नाहींसा झाला, आणि क्षितिजाजवळील बराच भाग अत्यंत तेजोमय दिसूं लागला. हा भाग इतका चकचकीत दिसत होता कीं, यापेक्षां कोणत्या विकसित स्थलांतून सूर्याचें बिंब वर येणार हें समजणें बरेंच कठीण झालें होतें. आणखी पांच-चार पळें लोटलीं, आणि तीं दोघें ज्या गलबतामध्यें बसलीं होतीं, त्या गलबताचें पांढरें शीड पिंवळ्या रंगाचें भासूं लागलें, आणि तितक्यांत पूर्व-क्षितिजाखालून लालभडक वर्तुळाचा वरचा भाग वर आला. ह्या वर्तुळाचा प्रकाश सौम्य होता कीं, जर ती सकाळची वेळ नसून पौर्णिमेच्या संध्याकाळची वेळ असती, व उदयास येत आहे, तो चंडांशु नसून हिमांशु चंद्रमा आहे, अशी शोभली असती. हळुहळु सूर्यबिंब क्षितिजावर आलें, तथापि त्याकडे पाहतांना नेत्रांस यावेळीं सूर्यबिंब पीडा होत नाही. मोठी मोठें दिसत होतें. अशी स्थिति होती. पण तेवढा पाण्यावर सूर्यबिंबापासून आलेला किरण त्यांच्या नेत्रांस त्रासदायक आणि इतका वेळपर्यंत सूर्यबिंब अद्वितीय तेजानें पति-पत्नींनीं आपापले हात जोडून भगवान् सूर्य-नारायणाला वंदन केलें, आणि त्यांनीं पूर्वेकडून दृष्टि दक्षिणेकडे वळविली, त्यावेळीं दक्षिण-बाजूकडे असलेल्या एका गलबताचें शीड त्यांस पडलें.

आणखी थोडी लोटली, वारा जरा तापू लागला, आणि गलबत झपाट्यानें चालूं लागलें. समोरून येत असलेलें गलबत जवळ येऊं लागलें, व साहजिकपणें त्यावरील कांहीं माहिती मिळाली तर, म्हणून शेखराच्या मनांत येऊन कांहीं प्रश्न आपल्या विचारले. त्यावरून रत्नाकर महाराजांच्या आरमारापैकीं-एक असून, सांगितलें. आणखी थोडा वेळ झाडेल म्हणाला,- हें गलबत या गलबताकडे येत आहे, कारण

थोड्या वेळापूर्वी गलबताचा जो रोंख होता तो आतां बदलला आहे. तें गलबत जर पूर्वीप्रमाणें आपला रोख न बदलतां सरळ चाललें असतें, तर तें आमच्या उजव्या बाजूनें पावकोसावरून गेलें असतें. मी मघांपासून पाहत आहें, त्या गलबताची नाळ नाळ आणि आमच्या गलबताची नाळ अगदीं सरळ-एका रेषेंत आहेत.'

शेखर बोलला,-'तर मग कदाचित् हें आरमारापैकीं गलबत नसून एकादें चांचेपणा करणारें गलबत तर नसेल ना?'

तांडेल बोलला,-'तसें कांहीं मला वाटत नाहीं. गलबताच्या रचनेवरून तें लढाऊ दिसतें. आणखी थोड्या वेळानें खरा प्रकार आपोआप समजेल.'

अशा प्रकारचीं त्यांचीं भाषणें चाललीं असतां समोरून येणाऱ्या गलबतानें आपलें एक शीड गुंडाळलें. त्यावरून तें गलबत आपल्या गलबताच्या अंगाशीं येणार अशी तांडेलच्या मनाची खात्री झाली. आपल्या गलबतापेक्षां समोरून येणाऱ्या गलबतास वारा अनुकूल असल्यामुळें तें आपणास गांठल्या खेरीज राहणार नाहीं. आपण चुकवाचुकवी करूं लागल्यास आपले तें श्रम व्यर्थ जातील-अशी तांडेलाच्या मनाची खात्री असल्यामुळें त्यानें आपल्या गलबताची दिशा बदलली नाहीं. थोड्या वेळानें तीं दोन्ही गलबतें जवळजवळ आलीं, आणि समोरून येणारें गलबत चांच्यांचें नसून लढाऊ आहे, अशी तांडेलाच्या मनाची खात्री होऊन त्याला समाधान वाटलें. शेखर उभा राहून समोरच्या गलबताकडे पाहूं लागला असतां त्या गलबतावरील एक माणूस हात हालवून आपल्या गलबताला जवळ बोलावीत आहे, असें त्याच्या नजरेस पडलें. त्या गलबतानें आपणास जवळ बोलाविलें, म्हणून तांडेल भ्याला नाहीं. तो सरळ व्यवहार करणारा माणूस असल्यामुळें तो त्या बोलावण्याकडे विशेष लक्ष्य न देतां पुढें चालला. आपल्या बोलावण्याप्रमाणें तो अंगाशीं येत नाहीं, हें पाहून लढाऊ गलबतानें एक तोफेचा बार काढला. लढाऊ गलबतानें तोफेचा आवाज काढल्यावर प्रत्येक गलबतानें ती जवळ येण्याची आज्ञा असें समजून तिला मान दिलाच पाहिजे, असा निर्बंध होता. ही आज्ञा अमान्य केल्यास लढाऊ गलबताला दुसऱ्या गलबतावर तोफांचे गोळे टाकण्याचा अधिकार असल्यामुळें आतां आपण पुढें गेल्यास धोका आहे, असें समजून तांडेलानें आपल्या गलबतावरील शीड उतरण्याचा हुकूम केला. खलाशांनीं शीड उतरल्यावर थोड्या वेळानें पण बऱ्याच कौशल्यानें तीं एकमेकांस भिडलीं.

समोरून येणारें गलबत आपल्या गलबताकडे येत आहे हें समजल्यामुळें प्रियंवदेला थोडी भीति वाटूं लागली होती. कदाचित् आपण वल्लभीहून पळून आल्यामुळें हें गलबत आपणांस धरण्यासाठीं तर आलें नसेल ना, असें तिच्या मनांत आलें होतें, परंतु येणारें गलबत समोरून येत असल्यामुळें ही शंका व्यर्थ आहे, असें शेखरानें तिला सांगून तिचें समाधान केलें होतें. गलबताशीं गलबत भिडल्यावर लढाऊ गलबतावरील अधिकारी बोडदावर आला, आणि त्यानें 'ललितागौरी' गलबताची चौकशी करण्यास प्रारंभ केला. या अधिकाऱ्याचें वय चाळिशीच्या जवळ जवळ असून तो दिसण्यांत मोठा भव्य आणि शूर दिसत असे. त्यानें तांडेलास विचारलें,-'या गलबताचें नांव काय?'

तांडेलानें उत्तर केलें,-'ललितागौरी!'

आरमारावरील अधिकाऱ्यानें विचारलें,-'काय! ललितागौरी? तर मग हें गलबत चंपावतीला जात असेल!'

तांडेल हंसून म्हणाला,-'सरदारसाहेब, आपला या बाबतींत गैरसमज होण्याचा संभव आहे! 'ललितागौरी' या नांवाचें

एक दुसरें गलबत असून तें चंपावतीहून वल्लभीच्या रोख्या करीत असतें! मी कधींच चंपावतीस गेलों नाहीं!'

अधिकारी म्हणाला,–'ललितागौरी' या एकाच नांवाचीं दोन गलबतें आहेत, हें मला अजून माहीत नव्हतें. बरें, तुमच्या गलबतावर उतारू कोण आहेत?'

तांडेल बोलला,–'बागलाणांतील प्रसिद्ध संस्थानिक दृढसंध यांचे चिरंजीव राजकुमार शेखर हे आपल्या पत्नीसह वल्लभीहून सुरथपुरा चालले आहेत.!'

अधिकारी बोलला,–'कोण दृढसंध महाराजांचे पुत्र?' नंतर थोडावेळ विचार करून तो शेखरास उद्देशून आणि मोठ्या ऐटीनें प्रणाम करून बोलला,–'अहो राजकुमार, आपल्या अकल्पित दर्शनानें मला फार आनंद होत आहे. आपला माझा जरी प्रत्यक्ष परिचय नाहीं, तरी आपल्या वडिलांची आणि माझी मैत्री आहे. तुमच्या विद्वत्तेच्या आणि शौर्याच्या कित्येक गोष्टी माझ्या कानांवर आल्या आहेत. तुमचें नांव मला समजलें, पण मी कोण हें तुम्हाला समजलें नाहीं, म्हणून मी आपलें नांव तुम्हाला सांगतों. मी राजाधिराज रत्नाकर महाराजांच्या आरमारांतील एक मोठा अधिकारी असून, माझें नांव हिरण्यगुप्त असें आहे.'

शेखरानें त्या अधिकाऱ्याला लवून प्रणाम केला, आणि आपण त्याच्या स्नेहाचा स्वीकार करण्यास सिद्ध आहों, असें त्यानें दर्शविलें. हिरण्यगुप्तानें विचारलें,–'आपण सुरथपुरीं चाललां आहां, असें दिसतें.'

शेखर बोलला,–'होय, मी प्रथम सुरथपुरीं उतरून तेथून बागलणांत जाणार.'

हिरण्यगुप्त बोलला,–'तुम्ही रत्नाकर महाराजांचे पूर्ण पक्षपाती आहां, हें मला माहीत आहे, म्हणून मला आपल्याशीं एक दोन महत्त्वाच्या गुप्त गोष्टी बोलावयाच्या आहेत. कृपा करून आपण जर आमच्या गलबतावर याल, तर तेथें आपणांस गुप्तपणें बोलत बसावयास उत्तम जागा सांपडेल; आपल्या पत्नीस लढाऊ गलबत कसें असतें, हें पाहण्याची उत्कंठा असेल; त्यांची इच्छा असेल, तर त्यांसही बरोबर घेऊन या, म्हणजे आमच्या या गलबतावरील पुष्कळ मौजेच्या गोष्टी तुम्हाला पहावयास मिळतील.'

शेखरानें आपल्या पत्नीकडे नजर टाकली. परंतु तिनें त्या लढाऊ गलबतावर जाण्याविषयीं फारशी उत्कंठा दाखविली नाहीं, अर्थात् शेखरही जरा कांकूं करूं लागला. हें पाहून हिरण्यगुप्त बोलला,–' अहो राजपुत्र, सध्यांचा प्रसंग कोणता आहे, हें तुम्हाला माहीत आहेच. तुमचे वडील बंधु सध्यां भृगुकच्छ नगरामध्यें असून ते राजाधिराज रत्नाकर महाराजांच्या सैन्यांतील एक मोठे अधिकारी आहेत. आपले वडील राजाधिराजांच्या पक्षाचे मोठे आधारस्तंभ असल्यामुळें सध्यां त्यांजवर मोठी जबाबदारी आहे. राज्यामध्यें जिकडे तिकडे फितुरीचे प्रयत्न चालले आहेत, आणि निंबराजाला अनुकूल असलेले बागलाणांतील कित्येक संस्थानिक तुमच्या वडिलांविरुद्ध कारस्थानें रचीत आहेत. मी राजाधिराजांचा एकनिष्ठ सेवक आणि आपल्या वडिलांचा हितचिंतक असल्यामुळें तुमच्या कल्याणाच्या आणि राज्याच्या हिताच्या संबंधाच्या ज्या गोष्टी मला समजल्या आहेत, त्या तुम्हाला कळविणें हें माझें कर्तव्य कर्म आहे. जर तुम्ही या प्रसंगीं कांकूं कराल, तर तुम्हांला पुढें पश्चात्ताप होईल! यावर आपली मर्जी!'

हिरण्यगुप्ताचें हें भाषण ऐकून शेखर लढाऊ गलबतावर जाण्यास सिद्ध झाला. आणि प्रियंवदाही त्याच्या बरोबर जावयास तयार झाली. शेखर प्रथम त्या गलबतावर चढला, आणि त्याने हात देऊन प्रियंवदेला वर घेतलें. हिरण्यगुप्तामागून तीं दोघें गलबताच्या खालच्या भागांत उतरलीं.

तेथें खोलीवजा प्रशस्त जागा तयार केलेली होती. शेखर आपल्या पत्नीसह या खोलींत आला. नंतर हिरण्यगुप्त त्या खोलीच्या दरवाज्यावर उभा राहिला; आणि त्यानें आपल्या हाताखालच्या अधिकाऱ्याला हाक मारून त्यानें त्याला कांहीं आज्ञा केली. नंतर तो पुनः आंत आला, आणि त्या पतिपत्नींपुढें मोठ्या आढ्यतेनें उभा राहून गंभीरवाणीनें म्हणाला,–' अहो राजकुमार ! सध्याच्या प्रसंगीं तुम्हाला बागलाणामध्यें परत जाऊं देणें मला अनेक गोष्टींनीं इष्ट वाटत नाहीं, म्हणून तुम्हाला कांहीं दिवस या गलबतावर राहणें भाग आहे ! '

आपल्या तरवारीला हात घालून तिचा बंद सोडीत तिरस्कारदर्शक स्वरानें गर्जना करीत शेखर म्हणाला,–' तुम्ही इतके नीच असाल अशी माझी कल्पना नव्हती ! ' हा चमत्कारिक प्रसंग पहातांच प्रियंवदेनें भीतीनें किंकाळी फोडली.

हिरण्यगुप्त अगदीं न भितां पूर्ववत् गंभीरपणानें बोलला,–' अहो तरुण राजपुत्र, आपल्या शौर्यासंबंधानें अनेक गोष्टी मीं ऐकल्या आहेत. आपण शूर आहां, अशी माझ्या मनाची खात्री असल्यामुळें रक्तपात टाळण्यासाठीं मीं मुद्दाम कपटमार्गाचा अवलंब केला आहे. आपणालाही रक्तपात करण्याचा कंटाळा आहे, हें मी जाणून आहें, यासाठीं आपण आल्या प्रसंगाला–'

शेखर म्हणाला,–' मी जर एकटा असतों तर या तुमच्या गलबतावरून आपला मार्ग मोकळा करून केव्हांच परत गेलों असतों ! परंतु या वेळीं–' असें म्हणून शेखरानें आपल्या पत्नीवर नजर टाकली.

हिरण्यगुप्त बोलला,–' आपल्या शौर्यासंबंधानें मला तिळमात्र शंका नाहीं, ही गोष्ट मी प्रांजलमनानें कबूल करतों. जरी कांहीं विशेष कारणामुळें तुम्हाला या गलबतावर घेणें मला भाग पडत आहे, तरी या ठिकाणीं आम्हीं आपला योग्य सन्मान ठेवूं. मीं आपल्याशीं अशा रीतीनें [illegible] याबद्दल मी आपली [illegible] मागतों. यापुढें आपण [illegible] च्याशीं मोकळ्या मनानें [illegible] आमची प्रार्थना आहे. '

इतकें त्यांचें भाषण होत [illegible] णिका आणि चतुरक हीं दोघें [illegible] आलीं. हिरण्यगुप्तानें आपल्या [illegible] अधिकाऱ्याला आज्ञा करून सा[illegible] कळवून त्यांना आपल्या गलबता[illegible] होतें. हिरण्यगुप्तानें आपल्य[illegible] जहाजावर अडकवून ठेविलें, [illegible] चतुरक आणि निपुणिकाहीं दुःस[illegible] सर्व सामान सुमान बरोबर घेऊ[illegible] गलबतावर आलीं, आणि 'ला[illegible] गलबत लढाऊ गलबतापासून दूर [illegible]

नंतर शेखर तिरस्कारयुक्त दृष्टी[illegible] गुप्तास म्हणाला,–' तुमच्या हातीं आम्हीं बंदिवान् आहों, हें तर सिद्धच आहे. परंतु तुम्हीं आम्हास कोणाच्या आज्ञेवरून कोठें नेत आहां, एवढें तरी खरें सांगाल काय ?'

हिरण्यगुप्तानें उत्तर केलें,–' आपण जरी सध्यां आमच्या हातीं कैदेंत असलां, तरी आपणास मोठ्या सन्मानानें वागविण्यांत येईल, हें मी आपणांस पूर्वीच सांगितलें आहे. तुम्हाला, तुमच्या पत्नीला, फार तर काय तुमच्या सेवकांना देखील येथें कोणत्याही गोष्टींचें न्यून पडणार नाहीं. '

शेखरानें पुनः विचारलें,–' अहो हिरण्यगुप्त, तें मीं पूर्वी ऐकलें आहे, पण तुम्ही आम्हांस कोणाच्या आज्ञेनें कैद केलें, आणि आम्हास कोठें नेणार, हें सांगावयाची तुमची इच्छा आहे काय ? '

हिरण्यगुप्त बोलला,–' मी तुम्हाला चंपावतीस नेणार आहें ! राजाधिराज निंबरांच्या आज्ञेनें तुम्हांस कैद केलें आहे ! '

वर लिहिलेल्या प्रकारासंबंधानें थोडा आणखी खुलासा करणें येथें अगत्याचें आहे. सरदार हिरण्यगुप्त हा रत्नाकर राजाकडे

[illegible] एक दुय्यम प्रतीचा [illegible]. सुंदरसेनानें राज्यांत फितुरी करून [illegible] प्रत्येक लोक निंबराजाच्या पगाला [illegible] करून ठेविले होते, त्यांपैकी [illegible] हा एक होता. हिरण्यगुप्त [illegible] होता, तें गलबत मोठें [illegible] त्याचा चाल फार जलद [illegible] गलबतावर नेहमीं तीनशेंपर्यंत [illegible], आणि दारूगोळा नेहमीं [illegible] असे. गलबतावर पहेलदार [illegible] दहा तोफा होत्या. आपल्या [illegible] नाऱ्यावर नेहमीं खेपा करून [illegible] पोचाविणें आणि चांचे [illegible] बंदोबस्त करणें, हीं दोन कामें [illegible] असत. अलीकडे कित्येक [illegible] गलबत आपली हद्द सोडून चंपा- [illegible] खेपा करीत असे. बाहेरून दास- [illegible] जरी निंबराजाच्या आरमाराच्या नेहळणीसाठीं म्हणून या खेपा असत, तरी तो केवळ सुंदरसेन आणि निंबराज यांचे परस्परांस निरोप कळाविण्यासाठीं या खेपा करीत असे. या गलबतावरील सर्व माणसें फितुर असून तें गलबत ज्या ज्या वेळीं चंपावतीकडे जाई, त्या त्या वेळीं त्या लोकांस निंबराजाकडून चांगलेंच द्रव्य मिळे. म्हणून ते हिरण्यगुप्ताच्या अंकीत असत.

सुंदरसेनाचीं पत्रें निंबराजाला, आणि निंबराजाचीं पत्रें सुंदरसेनाला पोंचाविण्याचें काम वीरबाहु या नांवाचा एक मनुष्य करीत असे. सुंदरसेन निंबराजाला पाठविण्याचीं पत्रें स्वतः लिहित नसे. सुंदरसेनाची अनंगसेना या नांवाची एक रखेली होती, तिजकडून तो आपलीं गुप्त पत्रें लिहवी, आणि वीरबाहु हा त्या वेश्येचा बंधु असल्यामुळें तो तीं पत्रें हिरण्यगुप्ताच्या गलबतावरून चंपावतीस नेई. सत्यरथ वल्लभी नगरास येऊन पुनः चंपावतीस परत गेला, तो याच गलबतावरून.

सत्यरथाला अगदीं घाईघाईनें वल्लभनगरीं सोडावें लागलें, त्यावेळीं हिरण्यगुप्ताचें गलबत वल्लभीनगरांत होतें. आणि वर सांगितलेला गुप्त पत्रव्यवहार करणारा वीरबाहूही त्याच नगरांत होता. सत्यरथावर जीवावरचा प्रसंग असल्यामुळें हिरण्यगुप्ताला त्याला घेऊन होईल तितक्या जलदीनें वल्लभीनगरापासून दूर जाणें अगत्याचें होते, आणि त्या प्रसंगीं सुंदरसेनाचीं पत्रें तायर नसल्यामुळें वीरबाहूला तेथेंच सोडून हिरण्यगुप्ताला गलबत हाकारावें लागलें. या वेळीं हिरण्यगुप्त सत्यरथाला चंपावतीस पोंचवून परत वल्लभीस चालला होता. जातांना भेटणाऱ्या गलबतांपैकीं एकाद्यामध्यें वीरबहु आहे कीं काय; याची चोकशी करण्यासाठीं हिरण्यगुप्तानें प्रत्येक गलबत अडवून चौकशी करण्याचा सपाटा लाविला होता. वीरबाहू कधीं कधीं ललितागौरी या नांवाच्या चंपावतीच्या व्यापारी गलबतावरून वल्लभीस जाये करीत असे, हें हिरण्यगुप्ताला माहीत होतें, परंतु त्यानें आजपर्यंत तें गलबत स्वतः कधींच पाहिलें नव्हतें. यामुळें शेखर ज्या गलबतावर होता, त्या गलबताचें नांव ललितागौरी आहे; असें समजतांच हिरण्यगुप्ताला मनांतून मोठा आनंद झाला, आणि त्यानें गलबतावरील उतारू कोण आहेत, याची चौकशी केली. शेखराचें नांव कानीं पडतांच त्याला पकडून चंपावतीस नेण्याची कल्पना एकदम त्याच्या मनांत आली. सत्यरथाच्या मुखांतून शेखरासंबंधाची पुष्कळ माहिती हिरण्यगुप्ताला समजली होती. तिच्या आधारावर त्यानें शेखराशीं प्रास्ताविक भाषण करून त्याच्या मनांत विश्वास उत्पन्न केला होता. शेखर निंबराजाच्या हातीं सांपडला, म्हणजे दृढसंधराजा त्याच्यासाठीं हव्यात्या अटी कबूल करील, आणि अशारीतीनें आपण निंबराजांची कामगिरी केली म्हणून तो आपल्यावर प्रसन्न होईल, याबद्दल त्याच्या मनांत शंका नव्हती.

हिरण्यगुप्तानें शेखराला बहुमानानें वागविलें. त्यानें आपल्या गलबतावरील उत्तमांत उत्तम जागा शेखराला दिली, आणि त्यानें चतुरक व निपुणिका या दोघांनाही उत्तमप्रकारें वागविलें. त्यानें शेखराला आपल्या गलबतावर घेतलें, त्याचे दुसरे दिवशीं तो मुद्दाम शेखराच्या भेटीस गेला; त्यावेळीं त्यानें शेखराला आपल्या मनांतील हेतु स्पष्टपणें सांगितला. दृढसंध आणि वृषपति हे दोघे रत्नाकराचा पक्ष सोडून निंबराजाच्या पक्षाला अनुकूल होतील; निदान उदासीन राहण्याचें कबूल करतील, तर आपण तुमची तत्काल मुक्तता करूं असें हिरण्यगुप्तानें त्याला सांगितलें, पण ती गोष्ट शेखरानें कबूल केली नाहीं. इतकेंच नव्हे, तर त्यानें उलट हिरण्यगुप्ताच्या विश्वासघातकी वर्तनाबद्दल त्याची पुष्कळ निर्भत्सना केली. हिरण्यगुप्त मोठा वस्ताद होता. त्यानें शेखरानें केलेल्या निंदेकडे अगदीं दुर्लक्ष्य करून, त्याच दिवशीं पुनः एकदां त्याची गांठ घेतली, आणि त्याजपाशीं पुनः पूर्वीप्रमाणें पाढा वाचला; तसेंच तो जर आपल्या वडिलांस पत्र पाठवून त्याचें उत्तर आणविणार असेल, तर त्याचें पत्र प्रतापपुरीं पोंचवून दृढसंधाचें उत्तर आणण्याची कामगिरी आपल्या शिरावर घ्यावयास तो तयार झाला. शेखरानें याही प्रसंगीं हिरण्यगुप्ताला पूर्वीप्रमाणेंच जबाब देऊन परत पाठविलें.

शेखर आणि प्रियंवदा हीं आपल्या जन्मभूमीमध्यें जावयास उत्सुक झालीं असल्यामुळें, ही परवशता त्यांना अत्यंत दुःसह झाली, तथापि आपण उभयतां परस्परांजवळ आहोंत, आपला वियोग झालेला नाहीं, एवढेंच त्या दुःखांत सुख मानून त्यांनीं आलेल्या प्रसंगास मोठ्या धैर्यानें पाठ दिली. आपल्या परवशतेसंबंधानें त्यांनीं हिरण्यगुप्तापाशीं एक चकारशब्द सुद्धां काढला नाहीं. ती दोघें एकांतीं असत, त्यावेळीं प्रियंवदा आपल्या स्त्रीस्वभावाला अनुसरून केव्हां केव्हां खेदाचे उद्गार काढीत असे. परंतु अशा प्रसंगीं शेखर असामान्य धैर्य धारण करून तिचें मोठ्या युक्तीनें आणि गोड शब्दांनीं समाधान करित असे.

शेखराला गलबतावर घेतल्यापासून हिरण्यगुप्ताचें लढाऊ गलबत आपला उत्तरेकडे जाण्याचा रोख बदलून तें दक्षिणेकडे जात होतें, हें आम्ही न सांगतांही वाचकांच्या लक्ष्यांत आलेंच असेल. वारा जरी फारसा अनुकूळ नव्हता, तरी तें गलबत चौथ्या दिवशीं चंपावती नगरापाशीं येऊन दाखल झालें.

आमचें कथानक ज्या काळांतील आहे, त्याकाळीं साऱ्या पश्चिम-किनाऱ्यावर जेवढीं उत्कृष्ट बंदरें होतीं, त्या सर्वांहून चंपावती हें उत्तम बंदर होतें. बंदरामध्यें खडक अगदीं नसून पाणी पुष्कळ असल्यामुळें कोणतेंही मोठे गलबत असलें, तरी तें सहज किनाऱ्याच्या अगदीं जवळ येई. त्यामुळें गलबतांतील माल किनाऱ्यावर नेण्यास किंवा किनाऱ्यावरील माल गलबतांत भरण्यास मोठी सोय होई. त्यामुळें महाराजांची बरीच व्यापारी आपलीं गलबतें मोठ्या खुषीनें बहुधा या बंदरीं लावीत असत. उत्तम व्यापार, एक लोकवस्ती आणि राज्यकारभाराचें मुख्य स्थान अशा तीन गोष्टींनीं चंपावतीनगरीं बरेंच महत्त्व आलेलें होतें. रत्नाकराचा आजा आणि निंबराजाचा पिता हे दोघे सावत्र बंधु होते. विलक्षण दैवयोगानें त्या दोघांचा एकाच वेळीं जन्म झालेला असून ते दोघे पट्टाभिषेक झालेल्या राणीसाहेरीज इतर राण्यांच्या पोटीं जन्माला आलेले असल्यामुळें सिंहासनावर हक्क कोणाचा असा प्रश्न उपस्थित झाला, म्हणून त्यांच्या वडिलांनीं राज्याचे दोन सारखे विभाग करून ते दोघांना देऊन टाकले होते. तथापि वल्लभीचें राज्य कोणी घ्यावें, असा एक प्रश्न उपस्थित झाला, त्यावेळीं राजानें आपल्या दोघा मुलांना हातीं धनुष्यबाण देऊन एका मैदानांत उभें केलें, आणि ज्याचा बाण

दूर जाईल, त्यानें वल्लभीच्या गादीवर बसावें, आणि दुसऱ्यानें चंपावती येथें आपली निराळी गादी स्थापावी, असें ठरविलें. दूर बाण गेल्यामुळें रत्नाकराचा आजा वल्लभीच्या गादीवर बसला, आणि निंबराजाच्या पित्यानें चंपावती येथें आपली गादी स्थापिली. चंपावतीची गादी नवीन असल्यामुळें निंबराजाच्या पित्याला ऐष आरामांस अजीबात फांटा देऊन राज्यव्यवस्थेकडे पूर्ण लक्ष्य द्यावें लागलें. निंबराज आपल्या पित्याच्या तालमेंत तयार झाला. साम, दाम, दंड आणि भेद हे चारी उपाय कोठें आणि कसे योजावे, ही कला निंबराजाला फार उत्तम साध्य झाली होती. चंपावतीचें राज्य नवीन असल्यामुळें त्याला [illegible] वर्षेपर्यंत परचक्राची भीति होती; [illegible]राज आणि त्याचा पिता या [illegible]भोळ्या चातुर्यानें आत्मरक्षण केलें [illegible]ण्यांत जरी, तर त्यांनीं आपली राज्यहेळणीसाठीं [illegible] वाढविली होती. इकडे खुद्द तो केवळ ई आयत्या गादीवर बसलेल्या परस्परांसच्या आजाला राज्यकारभारासंबंधांत नवीन असें कांहींच करावयाचें कितुरयामुळें तो स्वतां ख्यालीखुशालींत निमग्न चंपसे. त्याचा पुत्र कांहीं बरा निपजला असता, पण तो लवकरच मरण पावला, आणि रत्नाकर अल्पवयामध्यें सिंहासनावर आरूढ झाला. त्याला स्वतांच्या शरीराला सौख्य देण्याखेरीज आपलें एकादें विशेष कर्तव्य आहे, असें कधींच वाटत नसे. तो स्वतः राज्यकारभाराकडे मुळींच लक्ष्य देत नसे, त्यामुळें त्याच्या प्रधानांनीं राज्यांत हवातसा धुमाकूळ मांडिला होता. ही परिस्थिति निंबराजाच्या कानीं जातांच त्यानें तें राज्य आपल्या हातासालीं घालण्याचा यत्न सुरू केला.

चंपावतीची गादी स्थापन झाल्याला जवळ जवळ साठ वर्षें झालीं होतीं. परंतु येथील राजांचा बहुतेक काळ राज्यस्थापनेकडे खर्च झाला असल्यामुळें वल्लभींतील राजवाड्याप्रमाणें प्रचंड राजवाडा अद्यापि तेथें उभारलेला नव्हता. निंबराजाच्या पित्यानें खुद्द चंपावतींत जरी एक राजवाडा बांधिला होता, तरी तो नेहमीं तेथून चार कोसांवरील एका खेड्यामध्यें राहत असे. पित्याच्या मार्गे निंबराजानेंही तोच क्रम ठेविला होता. त्यामुळें विशेष प्रसंगीं मात्र तो चंपावतींतील राजवाड्यांत राही. इतर वेळीं तो त्या खेड्यामध्येंच राहात असे. तेथें त्यानें किल्लेवजा एक चळकट वाडा बांधिला होता; त्यानंतर कित्येक श्रीमान् गृहस्थांनींही आपापले वाडे तेथें बांधिले असल्यामुळें त्या खेड्यास एका लहानशा शहराचें स्वरूप आलें होतें.

चंपावती नगरामध्यें पंचवीस हजारांवर लोकवस्ती होती, आणि तेथें निंबराजाचें पांच हजार पर्यंत सैन्य नेहमीं तयार असे. शहर समुद्रकिनाऱ्यावर लांबच लांब पसरलेलें होतें. तेथील रस्ते फारसे रुंद नसल्यामुळें रस्त्यांत लोकांची नेहमीं गर्दी दिसून येई. व्यापार अतिशय मोठा चालत असल्यामुळें भररस्त्यांत मालाच्या राशी पडलेल्या असत. सकाळच्या वेळीं दुकानांपुढें आणि रस्त्यावर मालाची व गिऱ्हाइकांची गर्दी होत असे, आणि सायंकाळच्या वेळीं जिकडे तिकडे सोनेनाणें मोजून घेण्यांत व्यापारी गढून गेलेले दृष्टीस पडत. समुद्रकांठीं मोठमोठ्या नारळीच्या बागा असल्यामुळें शहराच्या अगदीं जवळ येईपर्यंत येथें एकादें मोठें शहर असेल, असें गलबतांतील माणसांच्या मुळींच लक्ष्यांत येत नसे. चंपावतीच्या दक्षिणेस एक मोठी खाडी असल्यामुळें त्या खाडींत पुष्कळ गलबतें उभीं करण्याची सोय होती. हिरण्यगुप्तानें आपलें गलबत खाडींत घालतेवेळीं त्यावर एक खुणेचें निशाण उभारलें होतें. गलबत खाडींत आल्यावर त्यानें नांगर सोडला, आणि गलबतावरील होडी पाण्यांत ढकलून शेखर व प्रियंवदा

यांस त्यांच्या नोकरांसह त्या होडींत घेतलें, आणि तो किनाऱ्यावर आला.

हिरण्यगुप्तानें खाडींत शिरतांना जें खुणेचें निशाण उभें केलें होतें, तें नगररक्षकांच्या दृष्टीस पडतांच त्यांनीं त्याबद्दल योग्य अधिकाऱ्यास वर्दी दिली होती; आणि हिरण्यगुप्त कैद्यांसह किनाऱ्यावर येतो तोंच तेथें एक राजकीय अधिकारी आपल्या सेवकांसहवर्तमान येऊन थडकला. हें पाहून हिरण्यगुप्त म्हणाला,–'आतां मी आपणास या अधिकाऱ्यांच्या स्वाधीन करितों. मी आपल्याशीं जें अन्यायाचें वर्तन केलें, त्याबद्दल आपली मनापासून क्षमा मागतों.'

शेखर बोलला,–'अहो हिरण्यगुप्त, आम्ही तुमच्या गलबतावर असतां तुम्हीं आम्हास चांगल्या रीतीनें वागविलें, हें मी प्रांजलपणें कबूल करतों, परंतु तुम्ही माझा जो अपराध केला आहे–तुम्ही अन्यायानें जे माझें स्वातंत्र्य हिरावून घेतलें आहे,–ती गोष्ट मात्र मी कधींही विसरणार नाहीं'

हिरण्यगुप्त किंचित् अभिमानपूर्वक बोलला,–'ज्या अर्थीं तुम्ही मला क्षमा करावयास तयार नाहीं, त्या अर्थीं मीही तुमच्या क्षमेची पर्वा करीत नाहीं!'

असें बोलून हिरण्यगुप्तानें निवळ शिष्टाचारासाठीं म्हणून शेखराला प्रणाम केला, आणि त्यानेंही अगदीं शांतपणानें त्याचा स्वीकार केला. नंतर हिरण्यगुप्त होडींत बसून आपल्या गलबताकडे निघून गेला.

नंतर त्या अधिकाऱ्यानें सभ्यपणानें शेखराला आपल्याबरोबर येण्याची सूचना केली, आणि तीं चौघेंजणें त्याच्या बरोबर शहरांत जाऊं लागलीं. शेखर आणि प्रियंवदा यांच्या मनाची या प्रसंगीं मोठी चमत्कारिक स्थिति झाली होती. तीं आपल्या जन्मभूमीपासून दूर असलेल्या देशांत येऊन पडलीं होतीं. तेथें त्यांची कोणाशीं ओळख नव्हती. निंबराज आपणांस सन्मानानें वागवील कीं आपल्यावर जुलूम करील, या गोष्टीची त्यांनां नीटशी कल्पना करतां येत नव्हती. अशा परिस्थितीमध्यें तीं त्या अधिकाऱ्यांच्या मागून चाललीं होतीं. कांहीं वेळानें तीं चौघेंजणें त्या अधिकाऱ्याच्या घरीं जाऊन पोंचलीं. त्यांस पुढें कोठें ठेवावयाचें हें ठरलेलें नसल्यामुळें त्या अधिकाऱ्यानें राजाची आज्ञा होईपर्यंत त्यांस आपल्या घरींच ठेवून घेण्याचा विचार केला. नंतर त्या अधिकाऱ्यानें तावडतोब निंबराजाकडे मनुष्य पाठवून हिरण्यगुप्तानें शेखराला आपल्या ताब्यांत दिल्याची वर्दी दिली; व त्याच मनुष्याबरोबर निंबराजानेंही आपल्या आज्ञा त्या अधिकाऱ्याला कळविल्या.

शेखर चंपावतीस येऊन पोंचला, त्या वेळीं सकाळची वेळ होती. त्याचें दोन प्रहरचें भोजन त्या अधिकाऱ्याकडे झालें. तिसरे प्रहरीं तो अधिकारी शेखरापाशीं येऊन त्यास म्हणाला,–'अहो राजपुत्र, येथून चार कोसांवर रेवतीक्षेत्र नांवाचें स्थान आहे, तेथें आपणांस नेण्याची मला महाराजांची आज्ञा झाली आहे. महाराजांची स्वारी बहुधा तेथेंच असते. तेथें महाराजांचा एक भव्य राजवाडा आहे आणि त्याशिवाय [illegible]येक श्रीमंतांच्या मोठमोठ्या इमारती तेथें आहेत, त्यांपैकीं एक स्वतंत्र इमारत महाराजांनीं आपल्या दिमतीस दिली आहे. आपल्यास येथें कां आणिलें, याचें कारण आपणांस माहीत आहेच. महाराजांची आपणांस तिकडे घेऊन येण्याची आज्ञा असल्यामुळें मी आपल्यापाशीं आलों आहे. रेवतीक्षेत्राकडे जाण्याचे दोन मार्ग आहेत; एक खाडींतून आणि दुसरा जमिनीवरून आपली जलमार्गानें जाण्याची इच्छा असल्यास नौका आणि स्थलमार्गानें जाण्याची इच्छा असल्यास रथ तयार आहे.'

शेखर बोलला,–"सभ्य आम्ही तुमच्या हातीं सांपडलों असल्यामुळें तुम्ही न्याल तिकडे येणें आम्हाला भाग आहे. आमची तयारी आहे. रथांतून तिकडे गेलें काय

किंवा नौकेंतून गेलें काय दोन्ही आम्हाला सारखींच!'

अधिकाऱ्यानें त्यांना रथांतूनच न्यावयाचें असें ठरविलें. असें करण्यांत ज्या मार्गानें रथ शहरांतून बाहेर पडेल, त्या मार्गांतील शोभा व निंबराजाचें वैभव ही पाहून त्याचा कांहीं तरी अनुकूल परिणाम त्यांच्या मनावर होईल, असा त्या अधिकाऱ्याचा हेतु होता. म्हणून शेखर आपल्या परिवारासह रथांत बसल्यावर ज्या ज्या रस्त्यांमध्यें व्यापार पुष्कळ चाले, त्या त्या रस्त्यांतून त्यानें तो रथ मुद्दाम नेण्याची सारथ्यास गुप्तपणें आज्ञा केली होती. रथ शहरांतून बाहेर पडल्यावर शहराबाहेर सैन्याची मोठी थोरली छावणी शेखराच्या दृष्टीस पडली तेथें सुमारें एक कोसभर एकसारखी तंबू, डेरे, राहुट्या, यांची रांगच रांग लागलेली होती. हें सर्व सैन्य गलबतांतून लवकरच वल्लभीनगरावर चाल करून जाणार आहे, असें त्या अधिकाऱ्यानें शेखरास सांगितलें. सुमारें दोन घटका रथांतून प्रवास केल्यावर शेखर रेवती क्षेत्रांत येऊन पोंचला. तेथील एका प्रशस्त इमारतींत शिरल्यावर तो अधिकारी शेखरास म्हणाला,—'अहो राजपुत्र, ही इमारत महाराजांनीं आपल्या सेवेस सादर केली आहे. जर आपण पळून जाणार नाहीं असें वचन द्याल तर—'

शेखर बोलला,—'मी कांहींच वचन देत नाहीं. मी तुमच्या राजाचा कोणताही अन्याय केलेला नसल्यामुळें मला कैदेंत ठेवण्याचा त्याला बिलकुल अधिकार पोंचत नाही! त्यानें केवळ अन्यायानें आणि बलात्कारानें—'

अधिकारी मध्येंच बोलला,—'महाराजांचा मी एकनिष्ठ सेवक असल्यामुळें आपण माझ्या समोर त्यांचे शब्द उच्चारूं नयेत, अशी माझी आपणांस विनंति आहे.'

नंतर थोड्या वेळानें शेखरानें प्रश्न केला,—'सरदार हलधर या नांवाचे एक गृहस्थ सध्यां चंपावतीमध्यें आहेत काय? असतील तर त्यांना मला एकदां भेटावयाचें आहे. त्या गृहस्थाचे मीं एक दोन वेळ प्राण वांचविले आहेत. त्याची भेट झाल्यास त्यांच्या मध्यस्थीनें आमची सुटका होण्याचा बराच संभव आहे.'

चमत्कारिक रीतीनें हास्य करून तो अधिकारी बोलला,—'सरदार हलधरांची आणि तुमची आज प्रहरत्रीच्या सुमारास गांठ पडेल. तोंपर्यंत मी आपल्याशीं कशा रीतीनें वागावें, याचा मला प्रथम निकाल करून घेतला पाहिजे. अहो राजपुत्र, सध्याच्या परिस्थितीचा आपण विचार केल्यास आपणाला दोन गोष्टींपैकीं एक गोष्ट करणें भाग आहे, असें स्पष्ट दिसून येईल. पहिली गोष्ट ही कीं, आपण पळून जाणार नाहीं, असें वचन दिल्या खेरीज आपणास या रेवती क्षेत्राच्या मर्यादेबाहेर पाऊल टाकतां येणार नाहीं. शिवाय आपल्या प्रत्येक हालचालीवर लक्ष्य ठेवण्याकरितां आम्हांस हेर ठेवावे लागतील, जोंपर्यंत आपण पळून जाण्याचा यत्न करणार नाहीं, तोंपर्यंत आपणांस कोणत्याही रीतीचा या हेरांकडून उपद्रव होणार नाहीं, तथापि तेवढ्यामुळेंच तुम्हाला या परतंत्रतेचें बरेंच दुःख होईल. दुसरी गोष्ट ही, कीं आपण पळून न जाण्याचें नुसतें वचन द्याल, तरी तें आम्हांस पुरें आहे. आपल्या वचनावर आमचा पूर्ण विश्वास आहे. आपण वचन दिल्यास आपल्या स्वातंत्र्याभध्यें अगदीं सुद्धां व्यत्यय येणार नाहीं. तर सांगा, आपणांस कोणती गोष्ट पसंत आहे?'

शेखर बोलला,—'सध्या मी इतकेंच वचन देतो कीं, जर आज रात्रीं सरदार हलधरांची व माझी भेट होणार आहे, असें तुम्ही सांगतां, तर त्यांची भेट होईपर्यंत

तरी मी येथून कोठें जाणार नाहीं. त्यांची जर आज भेट झाली नाहीं, तर उद्यांबद्दल मी आपणांस बांधून घेत नाहीं.'

'ठीक आहे! एवढें आपलें वचन पुरे आहे.' असें बोलून त्या अधिकाऱ्यानें शेखराला नम्रतेनें प्रणाम केला, आणि तो निघून गेला.

त्या दिवशीं सायंकाळीं दिवे लागल्यावर शेखर राहात होता त्या वाड्यांतील एक सेवक शेखरापाशीं आला, आणि 'महाराजांकडून एक थोर गृहस्थ आपल्या भेटीस आले आहेत,' अशी त्यानें त्यास वर्दी दिली. शेखरानें त्या गृहस्थाच्या भेटीची इच्छा प्रदर्शित करतांच पांच चार पळांत सत्यरथ त्याजपुढें येऊन उभा राहिला. या वेळीं सत्यरथाच्या अंगावर बहुमोल वस्त्रालंकार होते. त्यानें अगदीं मोकळ्या मनानें शेखर आणि प्रियंवदा यांना प्रणाम केला, आणि त्यांनीं दाखविलेल्या आसनावर तो मोठ्या आदबीनें बसला.

नंतर सत्यरथ म्हणाला,–'अहो राजपुत्र, आपणांशीं बोलावयास प्रारंभ करतांना आधीं तुम्ही मजवर जे अनंत उपकार करून माझ्या जन्माचा ऋणी करून ठेविलें आहे, त्या उपकारांबद्दल आपले मनःपूर्वक [illegible] मानणें हें माझें पवित्र कर्तव्य आहे. ज्या वेळीं माझी पत्नी आपल्या भेटीस गेली, त्यावेळीं तिचें माझें नातें आपल्याला केवळ असें माझ्या मनांत अगदींसुद्धां आलें नव्हतें. परंतु तिनें असावधपणानें माझें तिचें नातें आपल्यास सांगावें, ही गोष्ट केवळ परमेश्वराच्या कृपेनेंच घडून आली, असें समजलें पाहिजे. तिचा माझा संबंध आपल्याला समजला, ह्मणूनच माझी त्या वेळच्या जिवावरच्या प्रसंगांतून मुक्तता झाली. माझे यजमान आणि मी असे दोघे जण पूर्वी तुमच्या बागलाणांत आलों असतां तुम्ही आमच्यावर जे उपकार केले आहेत, त्यांमध्यें आपण वल्लभी नगरांत केलेल्या उपकारांची आणखी भर पडली आहे.'

शेखरानें विचारलें, 'बरें, आतां तुम्ही सरदार हलधरांकडून आलां, कीं आपण होऊन मला भेटावयास आलां?'

सत्यरथ ह्मणाला,–'मी आपल्या यजमानांच्या आज्ञेवरून आपल्यास राजवाड्यांत नेण्यासाठीं आलों आहें. तेंच आपण स्वतः तुमच्या भेटीस येणार होते, पंणं आज कामाची फार गर्दी असल्यामुळें त्यांनीं आपणांसच तिकडे बोलाविलें आहे. आपण राजवाड्यांत आल्यावर राजाधिराज निंबराजाची सुद्धां भेट होईल.'

शेखरानें विचारलें,–'सरदार हलधर आणि तुम्ही बागलणांत असतां तुमच्यावर काय काय प्रसंग ओढवले होते, ती सर्व हकीकत निंबराजांस माहीत आहे काय?

सत्यरथानें उत्तर केलें, 'होय! राजाज्ञा गोष्टी घडून आल्या [illegible] माहित नाहीं, अशी एकही गोष्ट माझ्या [illegible] जिच्याविषयीं [illegible] माहित, तितक्या [illegible] आहे.'

नंतर शेखर ह्मणाला,–'अहो सत्यरथ, सध्या [illegible] कोणता प्रसंग गुदरलेला आहे, हें आपणांस माहित आहे काय? [illegible] करून ओलीस ह्मणून येथें [illegible] निंबराजाच्या पक्षाला बागलाणांतील [illegible] उदासीन राहावें, ह्मणून [illegible] ओलीस ठेविलेलें आहे. या बाबतीत पूर्ण विचार करून [illegible] ठरविलें आहे, माझें एकट्याचें [illegible] व्हावयाचें असेल तें होवो; मी ह्मणून इतरांनी [illegible] हट्टी वा, असा [illegible] राहिला णार नाहीं. [illegible] तरी

सत्यरथ ह्मणाला, 'महाराज, मी हे साक्ष सांगतों कीं, [illegible] मुक्तता ह्मण्याचें माझ्या [illegible] असतें,

मी आपणांस एक क्षणभर देखील परतंत्रतेचें दुःख सहन करूं दिलें नसतें, पण काय करूं, जसा तुमचा चतुरक तसा मी ! महाराज मला जी आज्ञा करितील ती इमानानें पाळावी एवढेंच कायतें माझ्या हातीं आहे; त्यामुळें माझा नाइलाज आहे.'

शेखर बोलला,—' ही गोष्ट मला इतक्या स्पष्टरीतीनें सांगण्याचें कारण नाहीं. ही गोष्ट सांगितल्या खेरीजसुद्धां समजण्यासारखी आहे. परंतु मी विचारतों, तुमचे यजमान सरदार हलधर हें कसे काय आहेत ? त्यांच्या अंगीं थोडी बहुत कृतज्ञता वास करीतच असेल. यासाठीं निंबराजाची भेट घेण्यापूर्वी त्यांना भेटावें, असें माझ्या मनांत येतें. त्यांची प्रथम भेट घेऊन ते आमच्यासाठीं कांहीं मध्यस्थी करण्यास तयार असतील, तर पहावें, आणि मग निंबराजांची भेट व्यावी.'

[illegible]—' सरदार हलधर सध्या [illegible] तेथें त्यांची तुमची [illegible] झाल्यावर [illegible] एवढ्याची आपण[illegible] तुम्हाला या[illegible]

शेखरानें विचार[illegible] मानांचा स्वभाव [illegible] समजलेलें असलें म्हणजे बरें. [illegible] जो पूर्वी अल्प सहवास घडून [illegible] त्यांच्या स्वभावाची मला पा[illegible] हें मी स्पष्टपणें कबूल क[illegible] त्यांच्या गंभीरपणाच्या [illegible] पुष्कळ सद्गुण गुप्त अस[illegible] ठेवण्याचा[illegible]ना आहे.'

[illegible]थ अत्यंत [illegible]री [illegible]णि नाही ! त्या[illegible] बलात्कारानें—[illegible]क स्व[illegible] [illegible]मचे जरी[illegible] [illegible] आणि

अंधकारी म[illegible] मी एकनिष्ठ[illegible] माझ्या समे[illegible] नयेत, अशा[illegible] [illegible]र्गी सद्गुण [illegible]परंतु सारासार- [illegible]ां ते व्यवहाराकडे [illegible]ष लक्ष्य [illegible] [illegible] गोष्ट सांजलपणें कबूल करणें मला भाग आहे. यासाठीं त्यांच्यापाशीं शब्द टाकल्यास त्याचा उपयोग होईलच, अशी मात्र आपण खात्री बाळगूं नये. तुमच्यासाठीं ते आपल्या वजनाचा उपयोग करतीलच, असा विश्वास धरल्यास तुमची कदाचित् फसगत होण्याचा संभव आहे. मला परत जाण्याची घाई आहे, यासाठीं आपण जर मजबरोबर याल तर ठीक होईल ! '

शेखर बोलला,—' राजदर्शनास जातांना उत्तम वस्त्रालंकार धारण करून जावें अशी रीत आहे.—'

सत्यरथ मध्येंच बोलला,—' आमचे महाराज वस्त्रालंकारावरून माणसाची किंमत करीत नाहींत. ते स्वतां अगदीं साधा पोषाक करतात. यासाठीं तुम्हाला विशेष कांहीं करण्याची जरूर आहे, असें मला वाटत नाहीं. '

नंतर शेखर सत्यरथाबरोबर राजवाड्यांत जावयासाठीं आपल्या चिऱ्हाडांतून बाहेर पडला. सत्यरथ ज्या रथांतून आला होता, त्याच रथांत ते दोघेजण जाऊन बसले, आणि रथ चालूं लागला. थोड्याच वेळांत [illegible]चा रथ राजवाड्याशीं येऊन पोंचला. [illegible]यांतील राजवाड्याची आणि या [illegible]ची तुलना कोणी केली असती, [illegible] राजवाडा त्या राजवाड्यापुढें एखाद्या [illegible]ज्यासारखा भासला असता. या राजवाड्यापेक्षां चंपावतीमध्यें मोठमोठे वाडे पुष्कळ होते. शेखर सत्यरथामागून या वाड्यांत शिरला, पण वल्लभीतील राजवाड्यांतील जिन्यामध्यें प्रत्येक चौथ्या पायरीवर जसा एकेक हत्यारबंद शिपाई उभा होता, तसा येथें त्याच्या दृष्टीस पडला नाहीं. जिना चढून वर गेल्यावर त्याला दोनतीन दिवाणखान्यांतून जावें लागलें, पण त्यांपैकीं एकाही जागेंत ऐषआरामाचें किंवा वैभवाचें प्रदर्शन करण्यासाठीं मांडून ठेवलेल्या वस्तु दिसल्या नाहींत. तेथें जे पदार्थ होते, ते नेहमीच्या

उपयोगाला लागणारेच होते. तात्पर्य काय कीं या राजवाड्यामध्यें पोकळ डामडौल शेखराच्या दृष्टीस कोठेंही पडला नाहीं.

सध्या तो सत्यरथाबरोबर ज्या दिवाणखान्यांत आला होता, तेथें उत्तम प्रकारच्या वस्त्रालंकारांनीं भूषित झालेले दोन गृहस्थ बसले होते. त्यापैकीं एकाजवळ जाऊन सत्यरथानें त्याच्या कानांत कांहीं सांगितलें. तें ऐकून तो गहस्थ तेथून निघून गेला. सत्यरथ आणि शेखर यांस कांहीं वेळ त्याच दिवाणखान्यांत थांबावें लागलें, त्यामुळें तेथील भिंतींस जीं कित्येक सुंदर चित्रें टांगून ठेविलीं होतीं, त्यांजकडे शेखराचें मन वेधलें.

इतक्यांत गेलेला गहस्थ तथें परत आला आणि बोलला,–'राजाधिराज निंबराजांनीं आपणास दर्शनास येण्याची परवानगी दिली आहे, आपण मजबरोबर चलावें.'

असें बोलून त्या गृहस्थानें तेथील एक दरवरजा सावकाशपणें उघडला. त्या दरवाज्या पलीकडे एक भव्य आणि प्रशस्त दिवानखाना आहे, असें शेखरास आढळून आलें. या दिवाणखान्यामध्यें जिकडे तिकडे रुप्याच्या समया तेवत असून त्यांचा चकचकीत उजेड पडला होता. त्या दिवाणखान्याच्या दुसऱ्या टोंकास एक ओटा असून त्यावर मांडलेल्या भव्य सिंहासनावर एक पुरुष विराजमान झालेला होता. त्याचा पोषाक जरी मूल्यवान होता, तरी त्यामध्यें डामडौल अगदीं दिसत नव्हता. त्याच्या दोहोंबाजूस राजचिन्हें धारण करणारे तीन तीन सेवक उभे होते.

परंतु या सिंहासनावर बसलेला पुरुष कोण होता? त्याच्याकडे नजर जातांच त्याची शेखराला ओळख पटली, आणि तो चकित झाला. आपण पाहांत आहो हा खरा प्रकार आहे, कीं आपण स्वप्नांत असून हा आपणांस निवळ भ्रम होत आहे, याचा त्याला अंदाज करतां येईना. सिंहासनावर बसलेला गृहस्थ सरदार हलधरच आहे, याबद्दल त्याच्या मनास शंका उरली नव्हती! सिंहासनावर बसण्याचा निंबराजाचा हक्क असतां त्याच्या जागीं सरदार हलधर बसला आहे, हें कसें?

पण अशा संशयांत शेखराला फार वेळ रहावें लागलें नाहीं. शेखरानें पुढें होऊन प्रमाण करतांच भालदारांनीं त्याच्याकडे लक्ष्य देण्यासाठीं दरबारी रीती प्रमाणें जी ललकारणी केली, तिजवरून खरा प्रकार एकदम त्याच्या ध्यानीं आला, आणि सरदार हलधर या नांवाचा कोणी एकादा वेगळा गृहस्थ नसून प्रत्यक्ष निंबराजानेंच तें नांव धारण केलें होतें, अशी त्याच्या मनाची खात्री पटली.

प्रकरण ४४ वें.

जशास तसें!

मागील प्रकरणांत सांगितलेली गोष्ट घडून आल्यानंतर सुमारें एक महिन्यानें वल्लभीनगरांत पुढील प्रकार घडून आला.

एके दिवशीं प्रहर रात्रीचे सुमारास पूर्वी एक दोनदां उल्लेख केलेल्या राजवाड्याच्या पिछाडीच्या लहान दरवाज्यापशीं सर्वांग कृष्णवस्त्रामध्यें आच्छादित केलेला एक मनुष्य येऊन उभा राहिला, त्याला [illegible] शर्म्याचा सेवक भैरव यानें दरवाजा आंत घेतलें.

कृष्णवस्त्रानें सर्वांग आच्छादलेला [illegible] मनुष्य सूचिमुख हाच होता, [illegible] सुंदरसेनाचा सेवक होता, [illegible] धन्याच्या सर्व गुप्त गो[illegible] असे, आणि भैरव [illegible] असून आपल्या [illegible] सेनाला सांगत[illegible] तें पत्र तूं माहीत आहेच

भैरव म्हणाला,–'मित्रा ये, आपण आज स्वस्थपणें चार घटका बोलत बसूं. अलीकडे आपणां उभयतांना स्वस्थपणें गप्पा मारावयास फावलेंच नाहीं !'

सूचिमुख म्हणाला–' मी आज तेवढ्यासाठींच येथें आलों आहें. त्यासेरीज दुसरेंही एक महत्त्वाचें काम आहेच !'

अशाप्रकारचीं एक दोन प्रास्ताविक भाषणें झाल्यावर ते दोघे तेथील जिना चढून वर गेले. परंतु ते त्या मजल्यावरील एकाद्या प्रशस्त दालनांत न जातां तेथें माणसांचा राबता फार कमी असे, अशा एका दालनांत शिरले.

तेथें जाऊन ते बसल्यावर भैरव बोलला,–' सध्यां येथील राजकारस्थानें ऐन रंगांत आलेलीं दिसतात. जो कांहीं आपला फायदा करून घ्यावयाचा त्याला हींच वेळ फार चांगली आहे. आणखी थोड्या दिवसांनीं ही संधि नाहींशी होईल. चालू कारस्थानें आतां लवकरच संपतील, असें म्हणावयास कांहींच हरकत नाहीं. '

सूचिमुख बोलला,–' अगदीं माझ्या मनांतील गोष्ट बोललास. सुंदरसेनाला आज जीं चंपावतीचीं पत्रें आलीं, त्यांवरून निंबराजाचें सैन्य इकडे येण्यासाठीं एक-दोन दिवसांत गलबतावर चढणार असें दिसतें.'

भैरव बोलला,–'ही जर बातमी खरी [illegible], तर येथील राजकारणें आटोपलीं, [illegible]णावयास हरकत नाहीं. एकदां पु[illegible] झाली, म्हणजे आमच्या धन्याचें अन्या[illegible]ईं कोणीं सांगावें ?'

देवशर्म्या [illegible] बोलला,–' असें खरें; सुंदर नाहीं ! [illegible]पर अलीकडे पूर्वीप्रमाणें हुषारी बलात्कार[illegible]निंबराजाचा विजय झाल्यास

अ[illegible]च्या [illegible]ी आपल्याकडे राहील मी [illegible]ी त्याच्या मनांत माझ्[illegible]ण थोड्या दिवसांपूर्वी [illegible] शिवाय देवनेयेण लक्ष्य [illegible]स्थांत आहे,

अशी त्याच्या मनाची खात्री झालेली दिसते. 'जर तो हेर कोण आहे हें आपल्याला उमगेल, तर त्यास आपण कोणत्या ना कोणत्या तरी कारणानें सुळावर दिल्याखेरीज सोडणार नाहीं,' असे प्रत्यक्ष त्याच्या तोंडचे शब्द मीं ऐकले आहेत. अलीकडे तो मजकडे संशयित दृष्टीनें पाहत असतो, पण मी कसला वस्ताद ! माझ्या मनांत काय आहे, हें मी आपल्या मुद्रेवरून त्याच्या मुळींच लक्ष्यांत येऊं देत नाहीं.'

भैरव बोलला,–' पण तुझें नांव मीं त्याच्याजवळ सांगितलें असेल, असें तर तुझ्या मनांत येत नाहीं ना ?'

सूचिमुख बोलला,–' असें जर एक क्षणभर माझ्या मनांत आलें असतें, तर मी येथें तुझ्याशीं गप्पा मारावयास आलोंच नसतों ! याच्या पूर्वीच तुला कोठें तरी एकाद्या गल्लींत गांठून तेथें ही माझी कट्यार मीं केव्हांच तुझ्या काळजांत खुपसली असती !'

भैरव बोलला,–'मीं जर तुझ्याशीं विश्वासघाताचें वर्तन केलें असतें, तर मी याहूनसुद्धां भयंकर शिक्षेस पात्र झालों असतों. पण खरेंच सांगतों, माझ्या हातून तुझा विश्वासघात व्हावयाचा नाहीं. कारण आपणां उभयतांचे हितसंबंध एकच आहेत. एकाचा जो फायदा तो दुसऱ्याचा फायदा, आणि एकाचा जो तोटा, तोच दुसऱ्याचा तोटा. या गोष्टीचा आपण उभयतांनीं पूर्ण विचार करूनच हीं हेराचीं कामें पत्करलीं आहेत. आजपर्यंत सुंदरसेनानें देवशर्म्याचा आपल्या वाड्यांत हेर कोण आहे, असें मला पुष्कळदां विचारलें, पण तुझें नांव मीं कधींच सांगितलें नाहीं. '

सूचिमुख बोलला,–' त्याचप्रमाणें देवशर्म्यानें आपल्या गुप्त गोष्टी सुंदरसेनास कोण कळवितो हें मला पुष्कळदां विचारलें, पण त्याला तुझें नांव मीही सांगितलेलें नाहीं। आपण आपल्या धन्यांशीं बेइमान झालों, से

आपापल्या फायद्यासाठीं झालों. आम्ही परस्परांशीं बेइमान झालों असतों, तर आपला त्यांत कांहींच फायदा झाला नसता. आपण एकमेकांशीं इमानानें वागलों म्हणून आज चार पैसे आपल्या गांठीस पडले. पण भैरवा, आतां लवकरच आपणास या हेरांच्या नोकऱ्या सोडाव्या लागणार; मग पुढें काय करावयाचें, याचा तूं विचार केलास कां?'

भैरव बोलला,–'त्यांत विचार कसला करावयाचा? अपण जे दोन पैसे गांठीं बांधिले आहेत, तेवढ्यावर कोठें तरी एकाद्या खेड्यांत बसून निर्वाह करावयाचा.'

सूचिमुख बोलला,–'माझाही विचार तोच आहे. पण मी म्हणतों, जोंपर्यंत आपला हात चालत आहे, तोंपर्यंत तो कां चालवूं नये? आपणास आतां या शहरांतून कोठें तरी जावें लागणार, हें तर ठरलेलेंच आहे. परंतु त्यापूर्वी जर आपला फायदा होण्याची एकादि संधि चालून येत असली, तर ती दवडावी काय म्हणून? मी एक महत्त्वाच्या गोष्टी संबंधानें तुझ्याशीं बोलणार आहें, असें तुला आतां सांगितलें, तें तुझ्या लक्ष्यांत आलें असेलच.'

भैरव बोलला,–'तूं सांगणार ती गोष्ट महत्त्वाची असेल कदाचित्; पण तिच्यापासून कांहीं लभ्यांश होण्यासारखा आहे का?'

विश्वासदर्शक स्वरानें सूचिमुख म्हणाला,–'लभ्यांश होण्यासारखा आहे, म्हणूनच तिचें महत्त्व! बरें, मी विचारतों, देवशर्मा अजून सुंदरसेनाला पाण्यांत पाहतो ना?'

भैरव म्हणाला,–'सुंदरसेनाचा नाश होत असला, तर तो करावयासाठीं माझा धनी आपल्या आयुष्याचीं दहा वर्षें खुद्दा खर्ची घालील.'

सूचिमुख बोलला,–'तर मग त्याची इच्छा आपणांस पूर्ण करितां येईल. सुंदरसेनाची खोड मोडण्याचें साधन आज माझ्या हातीं तयार आहे. शिवाय ज्या अर्थीं माझ्याविषयीं त्याच्या मनांत संशय उत्पन्न झाला आहे, त्या अर्थीं त्यानें माझा गळा कापण्यापूर्वीं मीच त्याचा कापला, तर त्यांत काय वाईट झालें?'

भैरव उत्साहपूर्वक बोलला,–'पण असें काय साधन तुझ्यापाशीं आहे, तें मला समजूं दे तर खरें! खरेंच सांगतों, अशा प्रकारचें साधन जर तुझ्यापाशीं खरोखरच असलें, तर तुझ्यापायांशीं पैशाचे ढीगच्या ढीग पडतील!'

सूचिमुख बोलला,–'अशी माझ्या मनाची खात्री आहे, म्हणूनच मी ही गोष्ट फार महत्त्वाची आहे, असें म्हणतों. सुंदरसेनाच्या नाशाचें मजपाशीं काय साधन आहे हें मी तुला सांगतों. आज दोनप्रहरीं अनंगसेनेकडून–अनंगसेना म्हणजे कोण? सांग पाहूं!'

भैरव हंसत हंसत बोलला,–'एवढें का मला माहीत नाहीं! अनंगसेना म्हणजे सुंदरसेनाचें प्रेमपात्र! तिचा भाऊ वीरबाहु हासुद्धां मला माहीत आहे.'

सूचिमुख बोलला,–'हें तुला माहीत आहे, म्हणून मला तेवढें तरी सांगावयास नको. आज दोन प्रहरीं अनंगसेनेकडून एक सेवक आमच्या यजमानास देण्यासाठीं एक पत्र घेऊन आला. मी आपल्या यजमानाच्या अंतरंगांतील असल्यामुळें त्यानें मला हें पत्र दिलें. पत्रावरील अक्षर पाहतांच तें पत्र लिहिणारा वीरबाहूच असावा, असें माझ्या मनांत आलें. वीरबाहूचीं पत्रें सुंदरसेनास पुष्कळ येत असतात. तीं बहुतेक माझ्या हातून जातात, म्हणून त्याचें अक्षर माझ्या ओळखीचें आहे. हल्लीं बरेच दिवस वीरबाहू चंपावतीमध्यें राहिला आहे. अर्थात् या पत्रामध्यें कांहीं तरी गुप्त गोष्टी असाव्या, असें मला वाटलें.'

भैरव बोलला,–'आणि तें पत्र तूं उघडून वाचलेंस?'...

सूचिमुख म्हणाला,–' होय; मध्यें बोलूं नको. मी काय सांगतों, तेवढें ऐक. अनंगसेनेच्या सेवकानें तें पत्र माझ्या हातीं दिलें, तेव्हां तेथें तिसरें कोणी नव्हतें. मी तसाच माझ्या खासगी खोलींत गेलों, आणि दार लावून पत्र वाचण्याख प्रारंभ केला. तुला काय सांगूं? तें पत्र वाचीत असतां क्षणोक्षणीं मला आनंदाच्या उकाळ्या येत होत्या. सुंदरसेन राजद्रोही आहे, हें सिद्ध करण्याइतका पुरावा त्या पत्रांत आहे. हें पत्र जर देवशर्म्याच्या हातीं गेलें, तर त्याला हर्षवायूच होईल!'

भैरव आनंदानें टाळी वाजवून बोलला,–'हें पत्र आतां तुझ्यापाशीं आहे का? असेल तर मला दाखीव. असलें पत्र खरेदी करावयास माझा धनी द्रव्याकडे अगदीं पाहणार नाहीं, ही माझ्या मनाची पक्की खात्री आहे.'

सूचिमुख बोलला,–'माझ्याही मनाची अशी खात्री आहे, म्हणूनच मी आतां येथें आलों आहें. हें पत्र मीच स्वतां देवशर्म्यापाशीं नेलें असतें, पण तुझ्याशीं कपट करण्याचा माझा हेतु नाहीं. आपला उभयतांचाही फायदा व्हावा, आणि येथून कोठें तरी दूर जाऊन आपले आयुष्याचे दिवस आपणांस सुखांत काढतां यावे, म्हणून मी तुजपाशीं आलों आहें. हें पत्र माझ्या हातीं आलें होतें, हें सुंदरसेनाला लवकरच उमगेल, आणि तो माझा शोध करावयास लागेल. त्यापूर्वी मला हें शहर सोडून बरेंच दूर जाणें जरूर आहे. जर मी त्याच्या हातीं सांपडलों, तर तो माझा प्राण घेतल्याशिवाय राहणार नाहीं! त्याला माझा संशय येऊं लागला आहे, असें मीं तुला आतांच सांगितलें. सुंदरसेनाचा स्वभाव किती दुष्ट आहे, याची कल्पना तुलाही करतां येईल! नुसत्या संशयावरूनच तो माझा प्राण घेण्यास कमी करणार नाहीं! यामुळें मला येथून प्राण काढण्याची घाई आहे. माझें म्हणणें काय आहे, तें ऐकून घे. हें पत्र आज तूं माझ्यापासून विकत घ्यावें, आणि तें तूं वाटेल त्या किंमतीस देवशर्म्याला विकावें! यांत काय गैर आहे?'

सूचिमुखाचें हें भाषण ऐकून भैरवाच्या तोंडास पाणी सुटलें, आणि तो उत्सुकतेनें म्हणाला,–' आधीं मला तें पत्र पाहूं दे तर खरें!'

सूचिमुख बोलला,–' अरे बाबा, हळु बोल! कोणीं ऐकलें तर घात होईल!' असें बोलत असतां त्यानें आपल्या अंगरख्याच्या खिशांतून एक पत्र काढून तें भैरवाच्या हातीं दिलें, आणि त्याला म्हटलें,–' अरे थांब, इतकी घाई नको, नाहींतर पत्र फाटेल. आतां तूं सावकाशपणें आपल्याशीं हें पत्र वाच, आणि मीं सांगितलें तें खरें आहे कीं नाहीं तें पहा!'

एखाद्या आधाशाप्रमाणें तें पत्र वाचून भैरव म्हणाला,–' होय, तूं म्हणतोस तें खरें; या पत्रांतील मुद्दे सुंदरसेनाला नाकबूल करतां येणें अगदीं अशक्य आहे! या पत्रानें एकच काय पण दहा हजार सुंदरसेनांचा चक्काचूर उडेल! बरें, या पत्राची तूं काय किंमत करतोस?'

सूचिमुख बोलला,–' असल्या पत्रासाठीं देवशर्मा वाटेल तितकें द्रव्य खर्च करील, असें तूंच आतां म्हणाला होतास–पण मी कांहीं फार मागत नाहीं! फक्त पांचशें मोहरा तूं मला दे!'

भैरव बोलला,–' काय पांचशें मोहरा? म्हणजे आजपर्यंत मीं जें कांहीं मिळविलें आहे, तें सगळेंच तुझ्या पदरांत ओतूं कीं काय?'

सूचिमुख बोलला–' छट्! उगीच माझ्याजवळ थापा नकोत! तूं अगदीं कांहीं नाहीं तरी आजपर्यंत दोन हजार मोहरांची पुंजी जमविली आहेस! सुंदरसेन म्हणजे तुला एक सोन्याची खाणच सांपडली होती! शाहूकालचा पातेरा जसा जमा करितात,

तसें तूं आजपर्यंत द्रव्य जमा केलें आहेस ! या पत्राची किंमत मीं पांचशें मोहरा ही अगदीं कमी सांगितली ! मी यांत एक कवडीसुद्धां कमी घेणार नाहीं ! मी स्वतां जर देवशर्म्याकडे गेलों, तर हजार नव्हे दोन हजार मोहरासुद्धां त्याच्याकडून काढीन, अशी माझ्या मनाची खात्री आहे!'

भैरव बोलला,–' तें सगळें खरें, पण हें पत्र तूं कोठून आणलेंस असें माझ्या धन्यानें मला विचारलें, तर मी काय सांगूं ? हें पत्र माझ्यापाशीं पाहून मीच त्याच्या गुप्त बातम्या सुंदरसेनाला कळवीत असेन, अशी शंका त्याच्या मनांत येणार नाहीं काय ? '

सूचिमुख बोलला–' हें तुझें बोलणें ऐकून मला फार आश्चर्य वाटतें ! आज तुझी अक्कल कोठें भीक मागायला गेली आहे, असें दिसतें इतकें तुझ्या अकलेचें गुळ-खोबरें कसें झालें ? हें पत्र तुझ्या हातीं कसें आलें, हेंच ना ? समज, तूं आज मोती चौकांत गेला होतास. तेथें अनंगसेना गाडींतून आली होती. ती गाडींतून उतरत असतां त्या धांदलींत तिच्या अंगावरच्या वस्त्रांतून हें पत्र गळून पडलें. तें तिच्या बरोबरच्या चेटाला उमगलें नाहीं. तूं तें उचललेंस आणि वाचलेंस ! बरें, इतकें सांगूनसुद्धां तुझ्याबद्दल त्याला संशय आला आहे असें तुला वाटलें, तर तूं झक मारायला येथें रहातोस काय म्हणून ? माझ्यासारखाच तूं येथून सूं बाल्या कर म्हणजे झालें ! या हजार मोहरा आणि तुझ्यापाशीं असलेली शिल्लक एवढ्यावर तुला जन्मभर वाटेल तें करतां येईल ! '

थोडा वेळ विचार करून भैरव बोलला,–' खरें म्हणतोस. ही तुझी युक्ति ठीक दिसते. पण आतांच तुला पांचशें मोहरा दिल्या पाहिजेत ! अरे, इकडे पहा, मी तुझा जुना मित्र आहें म्हणून–'

सूचिमुख बोलला,–' अगदीं बोलूं नको. मी यांत एक कवडीसुद्धां कमी घेणार नाहीं. असा डगमगतोस कां ? तूं त्या देवशर्म्याजवळ हजारांऐवजीं दीड हजार माग ! तुला ज्यास्ती किंमत मिळाली, म्हणून मी कांहीं मग तुझ्याशीं वाटणी मागायला येत नाहीं ! हें पहा, मला काय तें लवकर कळूं दे, उशीर होतो. नाहीं तर मी आतांच देवशर्म्याकडे जातों कसा–मग मात्र मला मिळेल त्यांतील–'

भैरव बोलला,–' अरे थांब, इतका अगदीं धीर सोडूं नको. काय म्हणतोस पांचशें मोहरा ? थांब, मी आतां घेऊन येतों. ' असें म्हणून तो उठला, आणि आपल्या खासगी खोलींत जाऊन पांचशें मोहराची थैली घेऊन परत आला. सूचिमुखानें मोहरा मोजून घेतल्या आणि तें पत्र भैरवाच्या हवालीं केलें.

मोहरा पदरांत बांधून घेत असतां सूचिमुख बोलला,–' या सोन्याच्या पिंवळ्या रंगानें डोळ्याला, आणि स्पर्शानें शरीराला जसा आनंद होतो, तसा या जगांतील इतर पदार्थांपासून मला कधींच आनंद होत नाहीं ! बरें मित्रा, मी आतां तुझा अखेरचा निरोप घेतों. आतां यापुढें आपल्या भेटीचा योग कधीं येईल तो येवो ! हा आपला सौदा जमणार अशी माझी खात्री असल्यामुळें मी सुंदरसेनाच्या वाड्यांतून बाहेर पडतांनांच आपली सगळी बाड–बिछाद गोळा करून येथें आलों आहें. आतां मला पुनः त्या सुंदरसेनाचें आणि देवशर्म्याचें तोंड सुद्धां पहावयास नको ! बरें तर; मी येतों आतां ! '

असें बोलून त्या उभयतांनीं प्रेमपूर्वक परस्परांचा निरोप घेतला. राजवाड्याच्या दरवाज्यापर्यंत सूचिमुखाला पोंचवून नंतर भैरव पुनः वर आला आणि देवशर्मा आपल्या दिवाणखान्यांत आहे कीं नाहीं, याची त्यानें चौकशी केली. देवशर्मा सध्यां रत्नाकरापाशीं कांहीं खलबत करीत होता. निंबराजाचें सैन्य चंपावतीहून निघालें, अशी बातमी

कित्येक व्यापारी गलबतावरील तांडेलांच्या मुखानें वल्लभी नगरांत प्रसिद्ध झाली असल्यामुळें त्यासंबंधानें देवशर्मा आणि रत्नाकर यांचें खलबत चाललें होतें. ज्याप्रमाणें घराला आग लागल्यावर विहीर कोठें खणावयाची हा विचार करणें हें मूर्खपणाचें आणि निरर्थक असतें, त्याप्रमाणेंच निंबराजाचें सैन्य आपल्यावर चालून आलें, ही गोष्ट समजल्यानंतर पुढें काय करावें, या गोष्टींचा विचार निरर्थक होता.

रत्नाकराशीं निरर्थक गोष्टींचा बराच वेळ खल झाल्यानंतर सुमारें दीड प्रहर रात्रीं देवशर्मा आपल्या दिवाणखान्यांत आला. तो आला हें पाहतांच भैरव त्याजपाशीं गेला, आणि आपण मोठी कामगिरी बजाविल्याचा आंव घालून व पुष्कळ आढेवेढे घेऊन भैरवानें तें पत्र देवशर्म्याला दाखविलें. हें पत्र वाचून देवशर्म्याला जणुं काय आपले बेचाळीस पूर्वज स्वर्गीं गेले, इतका आनंद झाला. आजपर्यंत सुंदरसेनाच्या विश्वासघातकीपणासंबंधानें प्रत्यक्ष पुरावा त्याच्या हातीं नसल्यामुळें तो त्याचें उघडपणें शत्रुत्व करण्यास भीत होता, पण हें पत्र आतां आपल्या हस्तगत झालें म्हणजे आपण एका क्षणार्धांत त्याला धुळीस मिळवूं, अशी त्याच्या मनाची खात्री झाली. अर्थात् भैरवानें दीड हजार मोहरा मागितल्या तेवढ्या देवशर्म्यानें त्याला मोठ्या खुषीनें दिल्या, यांत आश्चर्य नाहीं. त्या मोहरा हातीं पडल्यावर उजाडण्यापूर्वीच भैरवानें ठरल्याप्रमाणें वल्लभी नगरीस अखेरचा राम राम ठोकला.

या पत्रामुळें सुंदरसेनाची शेंडी आपल्या हातीं आली, असें देवशर्मा आपल्या मनांत मांडे खात होता, पण जशी त्याची गुप्त गोष्ट आपणास माहीत आहे, तशी आपली आणि राजाची गुप्त गोष्ट सुंदरसेनाला माहीत आहे, ही गोष्ट त्याला ठाऊक नव्हती.

दुसरे दिवशीं सूर्योदयापूर्वी सुंदरसेन आपल्या शयनगृहांतील मृदुशय्येवर पडला असतां त्याचा सेवक दरवाजा वाजवूं लागला, त्यामुळें सुंदरसेनाला बिछाना सोडून उठणें भाग झालें. त्याच्या सेवकानें 'राजवाड्यांतून एक दूत आला असून राजाधिराजांनीं कांहीं जरूरीच्या कामासाठीं आपणांस बोलाविलें आहे, असें तो सांगत आहे,' अशी सुंदरसेनास वर्दी दिली. हें एकाएकीं निकडीचें बोलावणें आलेलें पाहून निंबराजाच्या स्वारीसंबंधानें एकादें महत्त्वाचें काम उपस्थित झाल्यामुळें राजानें आपणास बोलाविलें आहे, कीं आपल्या वर्तनासंबंधानें एकादी गोष्ट उघडकीस आल्यामुळें त्यानें आपणास बोलाविलें आहे, याचा त्याला उमज पडेना! सुंदरसेन आपलीं कारस्थानें मोठ्या शिताफीनें करीत असे, तो होतां होईल तोंपर्यंत आपलें कपटकारस्थान तोंडानेंच भागवीत असें, अगदीं नाइलाज होई, तेव्हां मात्र तो यासंबंधानें स्वतः काळ्यावर पांढरें करी. बहुधा त्याचा या बाबतींतील पत्रव्यवहार त्याची रखेली अनंगसेना हीच करीत असे. अशा प्रकारें तो मोठ्या सावधपणानें वागत असल्यामुळें, हें राजाकडील बोलावणें आपलें कारस्थान उघडकीस आल्यामुळें आलेलें नसावें, असें तो आपल्या मनाशीं समजला.

तथापि राजाकडे जाण्यापूर्वी एकदां अनंगसेनेची गांठ घ्यावी, असा विचार करून त्यानें राजदूताला थोडें जाण्यास सांगितलें, आणि आपला रथ सिद्ध करवून तो प्रथम अनंगसेनेकडे गेला. अनंगसेना अजून घोरत पडली होती. सुंदरसेन इतक्या सकाळीं आपल्याकडे आला, याचें तिला फार आश्चर्य वाटलें सुंदरसेनानें 'आपणास राजवाड्यांत अगदीं निकडीचें बोलावणें आल्यामुळें आपण आतां निकडे जात आहों, परंतु आपल्यासंबंधानें राजाच्या मनांस संशय येण्यासारखें कांहीं

कारण झालेलें नाहीं ना, अशी आपल्या मनाची खात्री करून घेण्यासाठीं आपण येथें आलों,' असें तिला सांगितलें.

त्यावर अनंगसेना म्हणाली,-'आपण काल रात्रींच येथें याल असें मला वाटलें होतें, आणि मीं पुष्कळ वेळ आपली वाट पाहत बसलें होतें.'

सुंदरसेन बोलला,-'काल महाराजांनी सर्व मंत्र्यांस एकत्र बोलावून निंबराजाच्या स्वारीसंबंधानें खलबत चालविलें होतें. तेथून परत यावयास बरीच रात्र झाली. बरें, तुझ्या भावाचें अलीकडे बरेच दिवसांत पत्र नाहीं, हें कसें ?'

अनंगसेना अत्यंत आश्चर्यचकित होऊन म्हणाली,-'म्हणजे ? याचा अर्थ काय ? माझ्या भावाचें कालच पत्र आलें, आणि तें माझ्या सेवकानें खुद्द तुमच्या सूचि-मुखाच्या हातीं दिलें. असें असून आपण बरेच दिवसांत त्याच्याकडून पत्र नाहीं म्हणतां, हें कसें ?'

सुंदरसेनानेंही आश्चर्यानें विचारलें,-'काय म्हणतेस ? काल पत्र आलें होतें ? काल रात्रीं मला सूचिमुखानें पत्र दिलें नाहीं; इतकेंच नव्हे, तर काल रात्रीपासून सूचिमुख नजरेस देखील पडला नाहीं !'

अनंगसेना भयभीत होऊन म्हणाली,-'त्या सूचिमुखानें तर आपला घात केला नसेल ना ?'

सुंदरसेन जरी मनांतून घाबरला होता, तरी बाहेरून शांतपणाचा आव घालून म्हणाला,-'आतां घाबरून काय होणार ? तुझी शंका बरोबर असेल, असें मलाही वाटतें. सूचिमुख लबाड असावा, आणि तो आमच्या गुप्त गोष्टी देवशर्म्याला कळ-वीत असावा, असा आज थोडे दिवस मला संशय येत होता. सूचिमुखानें लबाडीनें तें पत्र जर देवशर्म्याच्या हातीं दिलें असलें, तर थोडासा त्रास होईल खरा ! पण मला यात्रेनें, रात्रीं मला वाड्यांतून परत यावयास रात्र झालेली असल्यामुळें तो कंटाळून झोंपी गेला असेल, आणि त्यामुळें माझी भेट झाली नसेल ! असेंही असण्याचा संभव आहे !'

अनंगसेना म्हणाली,-'परंतु त्यानें विश्वासघात केला असला, तर कसें ?'

सुंदरसेन बोलला,-'त्यानें जरी तें पत्र देवशर्म्याच्या हातीं दिलें असलें, आणि तें यावेळीं प्रत्यक्ष राजाच्या हातीं गेलें असलें, तरी आपणांस इतकें भिण्याचें कारण नाहीं.'

अनंगसेनेनें विचारलें,-'तें कसें काय ?'

सुंदरसेन बोलला,-'देवशर्मा आणि राजा या दोघांचीं शेंडी आपल्या हातीं आहे हें तूं विसरलीस कीं काय ? मी आतां काय बोलतों, इकडे लक्ष्य दे. मी येथून आतां थेट राजवाड्यांत जातों. मी आणखी दोन घटकाच्या आंत तेथून परत येईन, तेव्हां याच रस्त्यानें आपल्या वाड्यांत जाईन; किंवा मी सुरक्षित असल्यास ही माझी अंगठी तुजकडे पाठवून देईन. आणखी दोन घटका गेल्यावर जर मी तुला दिसलों नाहीं, किंवा या अंगठीसह माझा निरोप तुला समजला नाहीं, तर पुढें माझी मुक्तता करणें हें सर्वस्वी तुझ्या हातीं आहे.'

अनंगसेनेनें विचारलें,-'तें कसें ?'

सुंदरसेन बोलला,-'तूं लागलीच एका क्षणाचाही विलंब न करतां राजवाड्यांत जा; आणि महाराजांची भेट घे. तुम्हा गुणिजनांस हवें त्यावेळीं राजाला भेटण्याची सध्यां तरी सरकार परवानगी आहे, हें एका अर्थी बरें आहे ! तुझी-त्यांची भेट झाली, म्हणजे तूं प्रथम सरळपणानें माझी मुक्तता करण्याची त्यास विनंति कर; तो ऐकणार नाहींच ! व अगदीं आणीबाणीची वेळ आली, म्हणजे राजाची गुप्त गोष्ट फोड-ण्याची त्यास भीति घाल, म्हणजे तो चटकन ताळ्यावर येईल ! हें एवढें काम तुझ्या हातून होईल ना ?

अनंगसेना डौलानें म्हणाली,–'हें काम. मी सहज करीन!'

सुंदरसेन बोलला,–'पण पहा, नीट विचार कर! त्या गोडबोल्या रत्नाकराशीं गांठ आहे! तो तुला कांहीं तरी लालुच दाखवील, त्या लालुचीला तूं भुललीस तर माझा जीव जाईल, ही गोष्ट ध्यानांत ठेव.'

अनंगसेनेनें उत्तर केलें,–'त्याच्या भुलथापीस मी फसेन, इतकी मी वेडी नाहीं. रत्नाकरानें जरी मोठी जहागिरी देण्याची मला आशा दाखविली, तरी मी फसणार नाहीं! सध्यां हें राज्य म्हणजे अळवावरचें पाणी आहे, हें मी जाणून आहें! रत्नाकरानें आज जरी मला मोठें बक्षिस दिलें, तरी तें उद्यां राज्यक्रांति झाल्यावर मला पचावयाचें नाहीं, हें मी जाणुन आहे. यासाठीं तुम्ही खुशाल माझ्यावर विश्वास ठेवा. मी तुमचा घात करणार नाहीं, ही तुमची खात्री असूं द्या.'

अशारीतीनें त्या दोघांनीं पुढें काय करावयाचें याचा विचार केल्यावर सुंदरसेन आपल्या रथामध्यें बसून राजवाड्यांत गेला. नेहमींप्रमाणें अत्यंत गंभीर मुद्रा धारण करून तो राजापाशीं उभा राहिला यावेळीं राजा एकटा नसून देवशर्मा त्याजपाशीं बसलेला होता. त्याच्या मुद्रेवरून त्याच्या मनांत आपल्याविषयीं पाप आलेलें आहे, असें त्यानें तत्काळ ओळखिलें. राजाची मुद्रा क्रुद्ध दिसत होती, आणि देवशर्माही त्याजकडे तीव्र दृष्टीनें पाहत होता.

सुंदरसेनानें नेहमींप्रमाणें राजाला प्रणाम केला, पण राजानें मात्र नेहमींप्रमाणें त्याच्या प्रणामाचा स्वीकार केला नाहीं. राजानें त्यास नुसतें या–बसा देखील म्हटलें नाहीं. तो क्रुद्ध मुद्रेनें सुंदरसेनाकडे पाहत त्याला म्हणाला,–'अमात्य, तुम्ही या गादीचे मोठे हितचिंतक आहां म्हणून मी तुम्हाला एका बाबतींत सल्ला विचारणार आहें. कल्पना करा, कीं आम्ही पूर्णपणें विश्वास ठेवून राज्यांतील मोठमोठीं कामें ज्याच्याकडे सोंपविलीं, तो मनुष्य जर विश्वासघातकी आहे,अशी आमच्या मनाची खात्री झाली, तर त्या माणसाला आम्ही कोणती शिक्षा द्यावी?'

सुंदरसेन अगदीं न डगमगतां खणखणित स्वरानें बोलला,–'अशा माणसाला न्यायासनापुढें आणून देहान्त शिक्षा करणें हेंच शासन योग्य होईल.'

रत्नाकर राजा बोलला,–'काय? त्याला न्यायासनापुढें आणावयाचें! त्याला न्यायासनापुढें आणून त्याची चौकशी करणें हें मोठें त्रासाचें काम आहे. शिवाय न्यायाधीश त्याचा पक्षपात करणार नाहीं, असें तरी कशावरून? अशा प्रकारच्या नीचाला मीं स्वतः एकदम शिक्षा केली तर?'

देवशर्मा म्हणाला,–'आजपर्यंत असें अमात्यांनीं पुष्कळ वेळां केलें आहे. जी माणसें आपल्या कारभारांत ढवळाढवळ करतात असें त्यांस वाटलें, त्यांना त्यांनीं आजपर्यंत अनेक वेळां चौकशी न करतां हव्या त्या दिक्षा दिल्या आहेत; अर्थात् ते या वेळीं या बाबतींत हरकत घेणार नाहींत, अशी आमची खात्री आहे!'

अत्यंत गंभीरपणानें, निश्चयानें आणि शांतपणानें सुंदरसेनानें उत्तर केलें,–'निग्रहानुग्रहाविषयीं महाराज समर्थच आहेत! त्यांनीं एकाद्याला शिक्षा केली, तर त्यांस त्याबद्दल दोष देण्याची कोणाची प्राज्ञा आहे!' सुंदरसेन असें बोलला हें खरें, पण या वेळीं त्याच्या हृदयांत धडकी भरली नव्हती, असें नाहीं.

राजा बोलला,–'तर मग या आज्ञापत्रावर आमच्या सहीखालीं तुम्ही आपली सही करालच!' असें बोलून राजानें लिहून तयार असलेलें आज्ञापत्र सुंदरसेनाच्या हातीं दिलें. या आज्ञापत्रामध्यें फक्त अपराधी माणसाचें नांव मात्र लिहिलेलें नव्हतें. तेवढी जागा मोकळी सोडलेली होती.

सुंदरसेनानें तें आज्ञापत्र हातीं घेतलें, आणि लेखणी हातीं घेऊन सही करण्याचा आव घातला; पण तो तितक्यांत चमकल्यासारखें करून बोलला,–' राजाधिराज, हें आज्ञापत्र लिहितांना थोडी गलती झालेली दिसते. यावर अपराध्याचें नांव नाहीं ! '

रत्नाकर त्याजकडे चमत्कारिक मुद्रेनें पहात म्हणाला,–' कांहीं हरकत नाहीं ! आम्ही तें नांव मागाहून भरूं ! '

सुंदरसेनानें आपल्या हातांतील लेखणी खालीं ठेविली; आणि मोठ्या डौलानें छाती पुढें काढून तो आढ्यतेनें म्हणाला, ' राजाधिराज ! या आपल्या विश्वासु सेवकापाशीं इतकी गुप्तता राखण्याचें कारण नाहीं ! ज्या अर्थी आपण याकामीं माझें साह्य घेत आहां, त्याअर्थी अपराधी कोण हें मला समजलेंच पाहिजे ! '

रत्नाकर राजा बोलला,–' आजपर्यंत तुम्हीं शेकडों वेळां निवळ कोऱ्या कागदावर आमच्या सह्या घेतल्या असतील ! असें असतां आम्ही आज फक्त एका कागदावर तुमची सही मागत आहों, ती करावयास तुम्ही हरकत घेणार नाहीं, अशी आमची खात्री आहे ! '

सुंदरसेन गंभीरपणानें बोलला,–'राजाधिराज, मीं जरी पूर्वी कोऱ्या कागदावर आपल्या सह्या घेतल्या असल्या, तरी त्यांचा मीं दुरुपयोग कधींही केला नाहीं. जर केला असता, तर मला शिक्षा करणार आपण समर्थ होतां ! मला जसा आपण जाब विचारला असता, तसा आपणास जाब विचारण्याचा मला अधिकार आहे काय ? राजाच्या हातून जरी चुकून एकादें अकार्य घडलें, तरी त्याचा दोष त्याजकडे न येतां तो सर्व प्रधानांच्या शिरावर पडत असतो ! '

हें सुंदरसेनाचें भाषण ऐकून राजाच्या क्रोधांत भर पडली, आणि त्यानें संतापून विचारलें,–' तर मग तुम्ही या कागदावर सही करणार कीं नाहीं, काय तें सांगा पाहूं ! '

सुंदरसेनानें उत्तर दिलें,–' राजाधिराज, आपण जी गोष्ट कराल ती राज्याच्या हिताचीच असेल, याबद्दल मला फारशी शंका नाहीं; तरी पण मोकळ्या जागेंत कोणाचें नांव घालावयाचें हें मला प्रथम समजलें पाहिजे.'

रत्नाकर राजा बोलला,–' तर मग मी सांगतों तें नांव तेथें तुम्हीच आपल्या हातानें लिहा ! '

सुंदरसेन म्हणाला,–' माझी तयारी आहे ! ' हें उत्तर सुंदरसेनानें इतक्या शिताफीनें दिलें होतें कीं, त्यावेळची त्याची गंभीरता आणि शांतता पाहून राजा व देवशर्मा हे दोघेही आश्चर्यानें चकित झाले.

सुंदरसेनाला राजानें विचारलें,–" लेखणी घेतलीत ? शाईत बुडविलीत ? सगळी तयारी झाली ? ठीक आहे. लिहा तर मग मोकळ्या जागेंत—लिहा—अमात्य सुंदरसेन—'

हें ऐकतांच सुंदरसेनानें आपणास अत्यंत आश्चर्य वाटलें आहे असें दाखविलें. पण त्या वेळीं त्याच्या मुद्रेवर भीतीचा लवलेशही दिसत नव्हता ! त्यानें आपल्या हातांतील लेखणी फेंकून तो स्तब्ध उभा राहिला.

इतक्यांत देवशर्म्यानें तीन वेळां मोठ्यानें टाळ्या वाजविल्या. त्याबरोबर पलीकडच्या दिवाणखान्याचें दार उघडून दहा-बारा सशस्त्र शिपायांनीं तेथें प्रवेश केला. सुंदरसेनाला तोंडांतून शब्द काढण्याचा अवकाश न देतां त्या शिपायांनीं त्याच्यावर हल्ला करून त्याच्या मुसक्या बांधिल्या.

' चला ! या हरामखोराला एकदम बंदिखान्यांत घेऊन जा ! ' असें रत्नाकर राजा मोठ्यानें ओरडला. ती आज्ञा ऐकतांच ते सशस्त्र शिपाई सुंदरसेनास घेऊन राजवाड्याच्या पिछाडीकडील जिन्यानें खालीं उत

रले. जिन्यासाळीं एक घुरळ्याची गाडी उभी होती, त्या गाडींत त्याला घालून, त्याला कोणी ओळखूं नये म्हणून गाडीचे पडदे सोडून त्या राजसेवकांनीं मोठ्या सावधपणानें बंदिखान्याकडे गाडी हाकिली.

ठरल्याप्रमाणें अनंगसेनेनें दोन घटका वाट पाहिली, पण सुंदरसेनाचा समाचार तिला समजला नाहीं. म्हणून तिनें तो आपल्या वाड्यांत आला आहे कीं काय, हें पाहण्यासाठीं एका सेवकास तिकडे पाठविलें. तों सेवक अर्ध्या घटकेच्या आंत परत आला, आणि म्हणाला,–' सुंदरसेनावर कांहींतरी संकट आलें असावें यांत शंका नाहीं. सध्यां त्यांच्या वाड्याभोंवतीं सैनिकांचा वेढा पडलेला आहे. '

अनंगसेना म्हणाली,–' जा; माझी गाडी जोडावयास सांग ! मला याच पावलीं राजवाड्यांत जाववायचें आहे ! '

नंतर ती आपल्या अंतर्गृहामध्यें गेली, आणि आपल्या संग्रहांतील अत्यंत मूल्यवान् वस्त्रालंकार तिनें निवडून ते धारण केले, आणि द्वारापाशीं वाट पाहत असलेल्या गाडींत बसून ती लडक राजवाड्यांत गली.

रत्नाकर राजाला भेटावयाचें झाल्यास पुरुषांस मोठी पंचाईत पडत असे, पण वेश्यांस त्याला भेटावयाचें असल्यास त्यांना मुळींच त्रास पडत नसे. त्यानें त्या कामावर एका स्वतंत्र नोकराची योजना केली होती. अनंगसेना राजवाड्यांत गेल्याबरोबर तिनें या नोकराची भेट घेतली, आणि राजाकडे वर्दी पोंचविली. अनंगसेनेचा सुंदरसेनाशीं संबंध आहे, ही गोष्ट राजाला माहीत नसल्यामुळें त्याच्या मनांत शंका उत्पन्न झाली नाहीं, त्यानें तिची ताबडतोब एकांतीं भेट घेतली. अनंगसेननें राजाला प्रणाम केला; त्या प्रणामाचा स्वीकार करून राजानें विचारिले, 'तुझेंच नांव अनंगसेना असें आहे काय ! असें असेल, तर हें नांव अगदीं सार्थ आहे, असें मी समजतों. बरें कां आलीं होतीस सांग पाहूं ! '

तिनें उत्तर केलें,–'माझे यजमान अमात्य सुंदरसेन यांजवर महाराजांची खप्पा मर्जी झाली आहे, असें मला समजलें, म्हणून त्यांच्या संबंधानें कांहीं बोलण्यासाठीं मी चरणांपाशीं आलें आहें ! '

राजा विनोदपूर्वक बोलला,'–सुंदरसेनापाशीं अशा प्रकारचे नाजूक मध्यस्थ आहेत असें मला माहीत नव्हतें. बरें तुझें काय म्हणणें आहे ! "

तिनें उत्तर केलें, ' आपण त्यांना एकदम सोडून दिलें पाहिजे ! '

राजानें आश्चर्यानें विचारलें,–'काय त्या नीचाला, विश्वासघातकयाला मी शिक्षा केल्या वांचून सोडून देऊं ? अनंगसेने, तुला भुलून मी राजकार्याचा घात करण्यास तयार होईन, असें तुला वाटतें कीं काय ? तसें असेल तर ती तुझी चूक आहे ! '

अनंगसेना अभिमानपूर्वक बोलली,–'राजाधिराज, मी स्वरूपानें कशींही असलें तरी केवळ तेवढ्यावरच एवढी गोष्ट मी साध्य करून घेईन, असा अभिमान मला मुळींच नाहीं ! पण माझी खात्री आहे कीं, आपण माझें भाषण ऐकून घेतल्यावर माझी विनंति मान्य करणें आपणांस भाग पडेल ! '

रत्नाकर म्हणाला,–'तूं तर आम्हास धमक्याच देऊं लागलीस ! तुझा कंठ जरी कोकिलेप्रमाणें मंजूळ आहे, तरी त्यांतून उत्पन्न होणारे शब्द मात्र कठोर आहेत ! बरें, तुला काय सांगावयाचें तें स्पष्ट बोल पाहूं ? ' अनंगसेना बोलली,–' सुंदरसेनाला आपण एकदम बंधमुक्त केलें पाहिजे ? '

रत्नाकर म्हणाला,–'तें माझ्या ध्यानीं आलें, पण मी जर त्यांना मुक्त केलें नाहीं तर?' अनंगसेना बोलली,–' तें आपणास फार जड जाईल ! सुंदरसेनाचा नाश झाला कीं आपला नाश झाला, असें समजा ! याहून स्पष्ट बोलूं कीं काय ? '

किंचित् क्रोधयुक्त वाणीनें रत्नाकर बोलला,-'अनंगसेने, तुझ्या मनांत काय असेल तें स्पष्ट बोल पाहूं ?'

अनंगसेना ह्मणाली,-'ऐका तर ! आपली एक गुप्त गोष्ट मला माहित आहे ! ती जर मीं उघड केली, तर आपणांस मोठा पश्चात्ताप होईल !'

अधिक क्रोधानें रत्नाकर बोलला,-'काय म्हणतेस ? माझी गुप्त गोष्ट तुला माहीत आहे ! मूर्खे, तूं सध्यां कोणापुढें उभी आहेस आणि काय बोलत आहेस, याचा तूं विचार केला आहेस काय ?'

अनंगसेना बोलली,-'मी या गोष्टीचा पूर्ण विचार करूनच येथें आलें आहें आपली माझी इतक्या सहज रीतीनें भेट होईल, हें मला माहित होतेंच; परंतु आपण या वेळीं जर माझी भेट घेतली नसती तर मी एक लहानशी चिठी लिहून युवराजासंबंधाच्या सऱ्या हकीकतीचा तींत उल्लेख केला असता ह्मणजे आपण एकदां नव्हे दहादां सुद्धां माझी भेट घेतली असती ! बरें, पण मी आतां विचारतें, आपण त्यांची मुक्तता करणार कीं नाहीं ?'

रत्नाकर अत्यंत संतापून बोलला,-'अनंगसेने, तूं मोठ्या घमेंडींत आहेस ! पण थांब ! मी आतां तुझी सुद्धां सुंदरसेनाकडेच रवानगी करून देतों ? तुमचा दोघांचाही एकदम शिरच्छेद केला, तर मोठी बहार होणार आहे !'

अनंगसेना ह्मणाली,-'महाराज, या नुसत्या तोंडच्या गोष्टी आहेत ! मी इतकी मूर्ख आहें, असें तुम्ही समजतां कीं काय ? तुम्ही कांहींतरी असें बोलाल, नव्हे करण्यास प्रवृत्त व्हाल अशी शंका माझ्या मनांत पूर्वीच आली असल्यामुळें, जर तुम्ही माझा नाश करूं लागला तर तुमचा सूड घेण्याची बरोबर तयारी करून नंतर मी येथें आलें आहें. मला येथून जाववयास नुसता एक पत्रकेथा विलंब झाला पुरे, कीं मी माझ्या एका जिवलग मित्राजवळ जें मोहरबंद पत्र दिलें आहे, तें, तो उघडील, आणि तुमचीं भयकर पापकृत्यें अर्ध्या घटकेंत चव्हाट्यावर येतील !'

हें तिचें भाषण ऐकून रत्नाकर आपल्या मनांत चरकला. त्याचा सर्व क्रोध नष्ट होऊन तोच उलट भेदरल्याप्रमाणें दिसूं लागला. तथापि उसनें अवसान आणून तो बोलला, 'हें पत्र पहा ! यावरून सुंदरसेन कशा प्रकारचा माणूस आहे, हें तुला समजून येईल !' अनंगसेना म्हणाली,-'मीं हें पत्र कालचं वाचलें आहे ! यांतील प्रत्येक अक्षर मला माहीत आहे !'

रत्नाकर बोलला,-'हें पत्र आमच्यापाशीं आहे हें तूं प्रत्यक्ष पाहतच आहेस ! या पत्रांतील मजकूर प्रसिद्ध झाला, म्हणजे सुंदरसेनाला शिक्षा केल्याबद्दल आम्हाला कोणीही दोष देणार नाहीं ! त्याची शेंडी आमच्या हातांत पक्की सांपडली आहे !'

अनंगसेना बोलली,-'महाराज, असें आपल्यास वाटत असेल कदाचित्; पण मी यावर काय बोलतें तें ऐकून घ्या ! आपण जर सुंदरसेनाला देहांताशिक्षा देऊं लागलां तर आम्ही आपला गुप्त गोष्ट उघडकीस आणूं, त्याचवेळीं, आपलें गुप्त कृत्य सुंदरसेनाला कळलें, त्याचा प्राण घ्यावयाची आपणांस जरूर भासली म्हणून त्याच्यावर केलें, कुमांड घेण्यासाठीं तुम्ही हें पत्र मुद्दल तयार केलें आहे, अशी आम्ही आभार ओरड करूं, म्हणजे मग या पत्रफेड म्हणून काडीची सुद्धां किंमत देणार नाहीं आणि प्रतापअस्सल आहे, हें सिद्ध करणें कम ठेवण्याचें जाईल ! किंबहुना तसें आपलेलें. आणि तांही यावयाचें नाहीं ! पण प्रसंग संपला. त्याचें प्रेत कोठें पुरलें आहे, हें फिरण्याची कोठून आलें, कोणीं आणलें, हे तो कोठें आम्हाला वाटेल तशा सिद्ध करून ठेव येतील ! प्रत्यक्ष आपल्या मुलाचें मुंड होतें. न भरणाऱ्या—'

हें तिचें भाषण ऐकून राजाची मोठी त्रेधा उडाली ! आपला साह्यकर्ता देवशर्मा जर यावेळीं आपल्याजवळ असता, तर त्यानें यावेळीं अडचणींतून आपला बचाव करण्यासाठीं कांहींतरी युक्ति काढिली असती, असें राजाच्या मनांत आलें. सध्याचा प्रसंग निभावण्यासाठीं कांहींतरी तडजोड करणें अवश्य आहे, असें त्याला वाटलें, आणि तो म्हणाला,–' बरें, मी तुला विचारतों, मी जर यासंबंधानें कांहीं बोललों, तर तें सुंदरसेन कबूल करील अशी खात्री तूं देतेस काय ? '

अनंगसेना बोलली;–' होय; त्यांच्या संबंधानें मीच खात्री देतें ! आज सकाळीं आपल्याकडून त्यांस बोलावणें आलें, त्याच वेळीं आल्यावर कांहींतरी तोहमत आली असावी, अशी शंका त्यांच्या मनांत आली, म्हणून ते प्रथम माझ्याकडे आले, आणि आम्हीं दोघांनीं पुढें काय करावयाचें याचा विचार केला; नंतर ते इकडे आले. '

रत्नाकर म्हणाला,–' सुंदरसेन शत्रूला फितूर असल्यामुळें त्याला आम्ही दूर करणार हें तर ठरलेलेंच आहे. ही गोष्ट प्रथम कबूल असेल, तर मग पुढें कायतें अधिक बोलावयाचें ! '

पुरु[illegible] अनंगसेना म्हणाली,–' ते आपण होऊन वेश्यांच्या जागेचा राजीनामा देतील; परंतु मुळींच प्रथम मी सांगतें त्या गोष्टी कबूल एका स्वतंत्र देजेत. आपण त्यांची आतांच्या अनंगसेना रा[illegible]न मुक्तता केली पाहिजे. यापुढें या नोकराची [illegible]संकट आणणार नाहीं, असें वर्दी पोंचविली. देलें पाहिजे अर्थात् जोंपर्यंत संबंध आहे, ही गुप्त गोष्ट उघडकीस आणणार ल्यामुळें त्याच्या, आपलीही गुप्त गोष्ट आम्ही नाहीं, त्यानें तिला. '
तली. अनंग
प्रणामाचा कर राजानें थोडा वेळ विचार केला 'तुझेंच तो म्हणाला,–' या सर्व गोष्टी मला असें ल[illegible] आहेत. '

अनंगसेना बोलली,–' आणखी एक सांगावयाचें राहिलें. आपल्या हातीं जें पत्र सांपडलें आहे, तें आपण परत दिलें पाहिजे ! '

राजानें तत्काल उत्तर केलें,–' तेवढें मात्र व्हावयाचें नाहीं ! आमची गुप्त गोष्ट जोंपर्यंत तुमच्या हृदयांत आहे, तोंपर्यंत हें पत्र आमच्या हातीं असलेंच पाहिजे. हें पत्र तुमच्यापाशीं दिल्यावर तुम्हाला माहीत असलेल्या गुप्त गोष्टीच्या बळावर तुम्ही आजच्यासारखे प्रसंग नेहमीं आणाल ! जसें आमचें वर्म तुमच्या हातीं आहे, तसें तुमचें वर्म आमच्या हातीं असणें जरूर आहे ! '

अनंगसेना थोडावेळ विचार करून म्हणाली,–' तें पत्र जर आपण परत देत नाहीं, तर सुंदरसेन जो राजीनामा देतील त्यामध्यें ते आपल्या मनाप्रमाणें जागा सोडण्याचीं कारणें लिहितील. आपल्या आज्ञेवरून त्यांना राजीनामा देणें भाग पडत आहे, अशा प्रकारच्या मजकूर त्यांत असतां कामा नये ! '

रत्नाकर राजा बोलला,–' त्याला आमची हरकत नाहीं. मात्र त्यामध्यें आमच्या गुप्त गोष्टीचा यत्किंचितही उल्लेख असतां नये ! सुंदरसेनाची बंदिशाळेमध्यें रवानगी करतांना आम्ही फार सावधपणानें वागलों आहों. त्यानें आपणांस बंदिशाळेंत घातलें होतें, ही गोष्ट आपण होऊन प्रसिद्ध केल्याखेरीज कोणास कळावयाची नाहीं. बरें आणखी काय तुझें म्हणणें आहे ? '

अनंगसेना म्हणाली,–' आणखी माझें म्हणणें कांहीं नाहीं. आपण आतां या घटकेस त्यांची मुक्तता करून त्यांच्या वाड्यावरील पहारा उठविला पाहिजे. '

राजानें तत्काल आपल्या हातानें आज्ञापत्र लिहून तें आपल्या चोपदाराकडून बंदिशाळेच्या अधिकाऱ्याकडे रवाना केलें, आणि दुसऱ्या एका सेवकाला तोंडी आज्ञा करून सुंदरसेनाच्या वाड्यावरील पहारेकऱ्यांस परत बोलाविलें. नंतर तो म्हणाला,–' आम्ही

आपल्याकडून माघार घेतली आहे. मात्र आतां सुंदरसेन आपल्या वाड्यांत पोंचल्या पासून एका घटकेच्या आंत त्याच्याकडून राजीनामा आणि शिक्केमोर्तबें परत आलीं पाहिजेत !'

ज्या कामासाठीं आपण येथें आलों, तें काम आपल्या मनाप्रमाणें तडीस गेलें, हें पाहून अनंगसेनेला मोठें समाधान झालें, आणि ती राजाला मुजरा करून राजवाड्यांतून बाहेर पडली.

थोड्याच वेळानें देवशर्म्याची आणि राजाची भेट झाली, त्यावेळीं राजानें सर्व हकीकत त्याला सांगितली, आणि सुंदरसेनानें सोडलेल्या अमात्यपदावर आरूढ होण्याची त्याला आज्ञा केली. आपली फार दिवसांची इच्छा पूर्ण झाली, या गोष्टीचा देवशर्म्याला आनंद झाला, आणि पाण्याच्या बुडबुड्याइतक्या क्षणभंगुर आयुष्य असलेल्या अमात्यपदावर तो मोठ्या आनंदानें आरूढ झाला !

प्रकरण ४२ वें.

शेखराचें पलायन.

शेखराला विश्वासघातानें चंपावती नजीक रेवती क्षेत्रामध्यें नजर कैदेंत ठेवलें, या गोष्टीस एक महिना झाला, असें मागील प्रकरणाच्या आरंभीं आम्ही सांगितलें आहे. शेखराला तेथें जरी कैदेंत ठेविलें होतें, तरी त्याला तेथें कोणत्याही गोष्टीची वाण नव्हती, फक्त त्याला रेवती क्षेत्राच्या मर्यादेबाहेर पाऊल टाकण्यास मात्र प्रतिबंध होता. त्या मर्यादेच्या आंत त्याला वाटेल तेव्हां हवें तेथें जाण्याची मुभा होती.

पुढील कथाभागास प्रारंभ करण्यापूर्वी शेखर ज्याला सरदार हलधर असें समजत होता, त्या निंबराजाचा व त्याची भेट झाली त्यावेळीं तेथें काय झालें, हें प्रथम सांगणें अवश्य आहे. निंबराजाची गांठ पडल्यावर शेखरानें आपली मुक्तता करण्याविषयीं परोपरीनें विनंति केली, पण निंबराजानें ती मान्य केली नाहीं. निंबराज हा धर्मनीतीपेक्षां राजनीतीला अधिक महत्त्व देत असे, त्यामुळें अशा रीतीनें स्वकार्यासाठीं शेखराला अडकवून ठेवणें, हें त्याला अन्याय्याचें वाटलें नाहीं. प्रथम भेटीचे वेळीं त्यानें आपल्या नेहमींच्या मितभाषी स्वभावास अनुसरून आपल्या मनांतील हेतु शेखराला कळविला. बागलाणांतील रत्नाकराच्या पक्षाच्या संस्थानिकांनीं उदासीन रहावें, अशी निंबराजाची इच्छा होती. दृढसंध आणि वृषपति यांचें त्या संस्थानिकांवर वजन असल्यामुळें त्यांचें मन वळविण्याची कामगिरी शेखरानें पत्करिली असतां, तर निंबराजानें त्याची तत्काल मुक्तता केली असती. शेखराला जरी रत्नाकराचा आणि त्याच्या राज्यकारभाराचा मनापासून तिटकारा आला होता, तरी त्याच्यावर स्वारी करून त्याचें राज्य घेण्याचा निंबराजाला अधिकार नसल्यामुळें ती गोष्टही त्याला पसंत नव्हती, म्हणून त्यानें निंबराजाच्या अटी कबूल केल्या नाहींत. अशा प्रकारची अट कबूल करण्यापेक्षां आपण बंदिवासाचें दुःख खुशाल सहन करूं असें शेखरानें निक्षून सांगितलें, आपले तीन वेळ प्राण वांचविल्याबद्दल निंबराजानें त्याचे मनापासून आभार मानिले, आणि त्या उपकारांची फेड म्हणून राज्यक्रांति झाल्यानंतर वृषपुर आणि प्रतापपुर हीं दोन्ही संस्थानें कायम ठेवण्याचें निंबराजानें त्यास वचन दिलें. आणि अशा रीतीनें पहिल्या भेटीचा प्रसंग संपला.

रेवती-क्षेत्रामध्यें पाहिजे तेथें फिरण्याची शेखरास परवानगी होती, तथापि तो कोठें जातो, काय करतो, ह्यावर सक्त नजर ठेवण्यासाठीं निंबराजानें पुष्कळ हेर ठेविले होते. विशेषेंकरून चतुरक आणि निपुणिका यांजवर हेरांची पूर्ण नजर होती. कारण लांच

देऊन नोकरांस सेवाधर्मापासून भ्रष्ट करण्याचें पापकृत्य शेखर स्वतां करणार नाहीं, अशी निंबराजाची खात्री असल्यामुळें त्यानें शेखरापेक्षां त्याच्या सेवकांवर करडी नजर ठेवण्याचा हुकूम केला होता. या चौघांची निंबराजाच्या खासगीकडून तैनात सुरू होती, आणि प्रतिष्ठित पाहुण्यांप्रमाणें त्यांची बरदास्त होत असे. शेखरानें सत्यरथाच्या मध्यस्थीनें आपल्या वडिलांस पत्र लिहिण्याची परवानगी मिळविली होती, आणि सत्यरथानेंच त्याचें पत्र प्रतापपुरीं पोंचविण्याचें पत्करिलें होतें शेखर चंपावतीस आल्यापासून सुमारें एक महिना पुरा होण्याचे सुमारास त्याच्या पत्राचीं दोन उत्तरें आलीं. एक दृढसंधाचें, आणि दुसरें वृषपर्वाचें. या दोन्ही पत्रांमध्यें खुशालीचा मजकूर असून शिवाय शेखरानें कैद पत्करिली, पण निंबराजाच्या भलत्याच गोष्टींला अनुमोदन दिलें नाहीं, याबद्दल दृढसंधानें त्याला शाबासकी दिली होती.

शेखर आणि प्रियंवदा यांना अशा रीतीनें अटकेंत रहावें लागलें याचें सत्यरथास मनापासून वाईट वाटत होतें, आणि तो वारंवार तसें बोलूनही दाखवी. त्याची पत्नी मथुरा ही दररोज त्यांच्या भेटीस जात असे. आपल्या सौभाग्याचें रक्षण करणाऱ्या त्या उदार दांपत्यावर अशा प्रकारचा प्रसंग गुदरला म्हणून तिच्या नेत्रांतून अश्रुधारा वाहत असत! तिनें एक दोन वेळां प्रियंवदेशीं भाषण करतांना त्यांच्या पलायनासंबंधानें वाटाघाट चालविली होती. तिचा पति जर या गोष्टीस अनुकूल असता, तर तिनें हरप्रयत्नानें त्या दोघांस नेथून पळवून लाविलें असतें. सत्यरथानें कित्येक वर्षें निंबराजाची सेवा विश्वासानें केली होती, आणि निंबराजाही त्याला सेवकाप्रमाणें न वागविता एकाद्या मित्राप्रमाणें वागवीत असे. त्यामुळें सत्यरथाला आपल्या धन्याच्या इच्छेविरुद्ध वर्तन करण्यास धैर्य होईना!

शेखरानें परतंत्रतेचें दुःख एक महिनाभर सहन केल्यावर एके दिवशीं तिसरे प्रहरीं सत्यरथ त्याच्या भेटीस आला, आणि त्यानें त्यास सांगितलें, "उद्यां आमचें सैन्य वल्लभीवर स्वारी करावयास जाण्यासाठीं गलबतांत बसणार; त्याच सैन्याबरोबर आपणास वल्लभी येथें न्यावयाचें, असा आमच्या महाराजांचा विचार आहे. महाराज स्वतः ज्या गलबतामधून जाणार त्याच गलबतामधून आपणास नेणार असल्यामुळें आपणांस प्रवासाचें फारसे कष्ट होणार नाहींत. उदयिक प्रातःकालीं येथून निघावयाचें असल्यामुळें आपण तयार असावें अशी सूचना देण्यासाठीं मी आज येथें आलों आहे."

यावर शेखर फारसें कांहीं बोलला नाहीं. त्यानें फक्त 'आपली तयारी आहे,' एवढेंच उत्तर दिलें. सत्यरथानें आपली स्थिति शेखराच्या कानांवर पूर्वीच घातली असल्यामुळें शेखर आपल्या सद्यःस्थितिसंबंधानें त्यापाशीं वाटाघाट करीत बसत नसे.

रेवती-क्षेत्रामध्यें एक मोठें थोरलें देवीचें देवालय होतें. या देवीच्या दर्शनासाठीं शेखर दररोज सायंकालीं आपल्या पत्नीसह जात असे. सायंकालीं त्या देवळामध्यें पुराण चाले; तें ऐकावयास शेखर आणि प्रियंवदा हीं मोठ्या आदरानें बसत असत. एक महिनाभर ज्याच्या मुखानें पुराणश्रवण केलें त्या पुराणिकाला आपण कांहीं तरी पारितोषिक दिलें पाहिजे, असें त्या दिवशीं शेखराच्या मनांत आलें. त्यानें वल्लभी नगरामध्यें जे वस्त्रालंकार खरेदी केले होते, त्यांपैकीं आपल्या आणि पुराणिकाच्या योग्यतेला शोभण्यासारखे असे एक दोन पदार्थ बाहेर काढले, आणि ते बरोबर घेऊन तो देवालयांत गेला होता. प्रियंवदाही निपुणिकेला बरोबर घेऊन

देवालयांत गेली होती. पुराण आटोपल्यावर आणि पुराणिकाची संभावना केल्यावर तीं परत यावयास निघालीं असतां समोरून एक गृहस्थ येत असलेला त्यांच्या दृष्टीस पडला. समोरून येणाऱ्या गृहस्थाची आणि शेखराची दृष्टादृष्ट झाल्याबरोबर त्या गृहस्थानें शेखराला नुसता नेत्रसंकेत केला, त्याबरोबर शेखरानें त्याच्या मनांतील हेतु ओळखिला. या गृहस्थाचा पोषाख चंपावतींतील सामान्यप्रतीच्या गृहस्थाप्रमाणें होता हें पाहून आपणाला येथें कोणी ओळखूं नये; फार तर काय, आपण त्याला ओळखिलें असतांही तसें दाखवूं नये, असें त्या गृहस्थाच्या मनांत आहे, हें शेखरानें जाणिलें; आणि तो तसाच पुढें चालला. प्रियंवदेनेंही त्याला पाहिलें, पण तिलाही त्या गृहस्थानें स्वस्थ राहण्याची सूचना केली आणि शेखर व प्रियंवदा हीं दोघेंही मागें न पाहतां आपल्या निवासस्थानीं निघून गेलीं.

तीं ज्या घरांत राहत होतीं, त्या घरांत गेल्यावर तीं दोघें प्रथम एकान्तीं गेलीं, व आपलें भाषण कोणी ऐकत नाहीं, अशी त्यांनीं आपल्या मनाची खात्री करून घेतल्यावर प्रियंवदा बोलली,-' पंडित हेमचंद्र येथें आले आहेत, ते कां बरें आले असावे ?'

शेखरानें उत्तर केलें,-' पांडितजी कांहीं तरी उद्देशानें येथें आले असावे, यांत शंका नाहीं. ते जर नुसते आम्हांस भेटावयासच आले असते, तर त्यांना इतकी गुप्तता बाळगण्याचें कारण नव्हतें. यावरून ते कांहीं तरी खटपटींत असावे, असा अंदाज करण्यास हरकत दिसत नाहीं. '

प्रियंवदा बोलली,-' ईश्वर करो, आणि त्यांच्या प्रयत्नास यश येवो ! परंतु वेळ तर फार थोडा राहिला ! उद्यां सकाळीं आपणांस गलबतांत बसावयाचें आहे ! '

हें त्यांचें बोलणें सुरू आहे, तोंच निपुणिकेनें सत्यरथाची पत्नी मधुरा आपल्या भेटीस आली आहे, अशी त्यांस वर्दी दिली.

मधुरेच्या मुद्रेवर या वेळीं उत्सुकतेचीं चिन्हें स्पष्ट दिसत होतीं. ती बोलावयास घुटमळते, हें पाहून प्रियंवदा तिला म्हणाली,-' कां आली होतीस ? आणि तूं अशी बावरल्यासारखी कां दिसतेस ? '

मधुरा बोलली,-' मी येथें महत्त्वाच्या कामासाठीं आलें आहें, मला आतां येथें थांबावयास फारसा वेळ नाहीं, यासाठीं मी जें काय सांगतें, तें ऐकून घ्यावें, अशी माझी विनंति आहे ! '

प्रियंवदा बोलली,-' तुला जें काय सांगावयाचें आहे, तें सांग. आमची ऐकण्याची तयारी आहे ! '

मधुरा बोलली,-' ताईसाहेब, जरा हळु बोला; आपलें बोलणें कोणाच्या कानीं जातां नये ! आपल्या परिचयाचे एक गृहस्थ आज येथें आले आहेत, हें आपणास माहीतच आहे. त्यांच्या साह्यानें आपली मुक्तता करण्याची आम्हीं युक्ति योजली आहे.'

प्रियंवदा बोलली,-' बाई, ही तूं अत्यानंदाची बातमी आम्हांस कळविलीस, हे तुझे आमच्यावर मोठे उपकार आहेत ! '

मधुरा म्हणाली,-' उपकार कसचे ! आपण मजवर जे उपकार केले आहेत, त्यांची ही अंशतः फेड आहे !'

शेखरानें विचारलें,-' तुझ्या पतीनें तुझी विनंति मान्य केली असावी, असें दिसतें ! '

मधुरेनें उत्तर केलें,-" या बाबतींत त्यांचें अंग अगदीं नाहीं. मीं अगदीं केवळ आपल्या मतानें ही गोष्ट करीत आहें, तथापि ही गोष्ट जर का सरकारच्या कानावर गेली तर पुढें काय होईल, याचा नेम आतांच सांगवत नाहीं ! "

शेखर बोलला,-" जर या प्रकरणांत तुझ्यावर कांहीं संकट येण्याचा संभव असेल, तर तूं ही गोष्ट करूं नये, अशी आमची इच्छा आहे. तुला दुःखांत ढकलून आपण सुखी व्हावें, असा आपलपोटेपणाचा

विचार आमच्या मनाला कधींही शिवावयाचा नाहीं । ”

मधुरा बोलली,–‘ त्यासंबंधानें आपण अधिक चर्चा करूं नये ! माझा विचार मी पूर्णपणें केला आहे. माझ्या पतीचें मजवर प्रेम आहे, त्या प्रेमाच्या जोरावर मी आपला बचाव सहज करून घेईन. पूर्वी शिवालयामध्यें महाराज आपल्या हातीं कैदी असतां, मीं त्यांना पळवून लाविलें होतें; या गोष्टीचा जर त्यांनीं विचार केला, तर ते या माझ्या कृतीबद्दल मला विशेष शिक्षा करितील, असें माझें मन मला सांगत नाहीं ! आपले स्नेही हेमचंद्र हे बरोबर प्रहर रात्रीं येथें येतील. त्यांनीं स्वतांसाठीं राजाधिराजांच्या चोपदाराचा वेष मिळविला आहे. ते त्या वेषानें येथें येऊन घरवाल्याची भेट घेऊन महाराजांच्या आज्ञेवरून आपणांस घेऊन जाण्यासाठीं आलों आहें असें सांगतील, आणि नंतर ते तुम्हांस येऊन भेटतील. तुम्हीं चौघांनीं अगदीं आपल्या जरूरीपुरतें सामानसुमान बरोबर घेऊन चोपदाराचा वेष घेतलेल्या तुमच्या मित्राबरोबर येथून बाहेर पडावें: पुढें कोठें जावयाचें आणि काय करावयाचें तें आपले मित्र आपणांस सांगताल. ’

शेखरानें विचारलें,–‘ पण आमच्यावर नजर ठेवण्याकरतां जो एक हेर येथें असतो त्याचें कसें करणार ? आमच्यावर नेहमीं एका माणसाची नजर असते. आमच्यापासून थोड्या अंतरावर नेहमीं एक मनुष्य असतो, हें आम्ही जाणून आहों ! ’

मथुरा बोलली,–‘ आम्ही त्याला लांच देऊन वश करून घेतलें आहे. आपण लोभास गुंतलों म्हणून आपणांस निंबराजा कडक शिक्षा देईल, अशी त्याला साहजिक भीति असल्यामुळें तोही आपणांबरोबरच चंपावती सोडणार आहे. ’

शेखर म्हणाला,–‘ आणखी एक अडचण राहिली. रेवती–[illegible] भोंवतीं तट असल्यामुळें आम्हाला कोणत्या तरी दरवाज्यानें बाहेर पडावें लागणार. प्रत्येक दरवाज्यावर पहारेकरी असतो ! ’

मथुरा मध्येंच बोलली,–‘ त्याचीही आपणास भीति नाहीं त्यालासुद्धां आम्ही फितूर केलें आहे, बरें आतां जातें. आपण चौघेजणें एकदां नौकेंत बसून चंपावतीपर्यंत जाऊन तेथें गलबतांत बसलों म्हणजे माझा जीव थंड होईल ! ’

प्रियंवदेनें मथुरेचा निरोप घेतांना आपल्या हातांतील एक बहुमोल अंगठी आपली खूण म्हणून तिला दिली, आणि तिनेंही त्या प्रेमचिन्हाचा स्वीकार केला. ‘ हेमचंद्र येईल त्या वेळीं तयारी असूं या ’ असें पुनः एकदां सांगून मथुरा पुढील व्यवस्थेसाठीं निघून गेली.

आतां आपली येथून मुक्तता होणार अशी त्या दोघांना बरीच खात्री वाटूं लागली. योजलेली युक्ति फार चांगली आहे, ती योजितांना पुढें येणाऱ्या संकटांचा पूर्ण विचार केला गेला आहे, असें मनांत येऊन त्यांना फार आनंद होत होता. शेखरानें निपुणिका आणि चतुरक यांस आपल्यापाशीं बोलावून हें वर्तमान सांगितलें, व योग्यवेळ येतांच तयार असण्याची त्यांस सूचना दिली. त्यांनाही या परतंत्रतेचा कंटाळा आला होता, त्यामुळें हें वर्तमान ऐकून त्यांसही फार आनंद झाला.

प्रहर रात्रीचे सुमारास घराचा धनी शेखरापाशीं आला, आणि त्यानें महाराजांचा एक चोपदार आपणांस बोलावण्यास आला आहे, असें शेखरास सांगितलें. हेमचंद्र चोपदाराच्या वेषानें आपणांस भेटावयास येणार हें शेखराला पूर्वीच ठाऊक असल्यामुळें तो ज्या वेळीं त्याच्या समोर आला, त्यावेळीं शेखरानें आपणांस विशेष आनंद झाल्यासारखें दाखविलें नाहीं. निंबराजाचा निरोप घेऊन एकादा साधारण प्रतीचा नोकर आपल्या समोर आला असतां जसें शेखरानें

त्याच्याशीं आपलें वर्तन ठेविलें असतें, तसंच याप्रसंगीं त्यानें हेमचंद्रापाशीं आपलें वर्तन ठेविलें होतें.

हेमचंद्रही यावेळीं मोठ्या सावधपणानें वागत होता. घरधनी जवळ असल्यामुळें त्यानें अगदीं गभीर मुद्रा धारण करून शेखरास म्हटलें, 'महाराज, आपणां उभयतांस आणि आपल्या सेवकांस राजवाड्यांत घेऊन येण्याची मला राजाधिराजांनी आज्ञा केली आहे. अशा अपरात्रीं आपणास त्रास पडत आहे, ही गोष्ट राजाधिराजांच्या ध्यानीं आली नाहीं. परंतु कांहीं विशेष कारणामुळें त्यांना आपल्या ठरलेल्या बेतांत थोडा फरक करावा लागत आहे. आपणांस येथून उद्यां सकाळीं निघावयाचें अशी सूचना मिळाली होती. पण बेत बदलल्यामुळें त्यांनीं आपणांस आतांच बोलाविलें आहे.'

शेखर गंभीर स्वरानें बोलला,–'ज्या अर्थीं आम्ही सध्यां त्यांच्या हातीं सांपडलों आहों त्याअर्थीं ते आम्हांस जसें वागवितील तसें वागणें आम्हांस भाग आहे.' नंतर तो घरवाल्यास बोलला,–'महाराज, आपण कृपा करून आमच्या सेवकांस इकडे पाठवून द्याल काय?'

'होय' असें म्हणून घरवाला तेथून निघून गेला. त्याबरोबर शेखर हेमचंद्राला मोठ्या आनंदानें कडकडून भेटला. आपला बंधु फार दिवसांनीं भेटला असतां जसा भावंडांना आनंद होतो, तसा यावेळीं हेमचंद्राला आणि त्या दांपत्याला झाला होता. तथापि हा आनंद व्यक्त करण्यास वेळ अगदीं थोडा होता; कारण निपुणिका आणि चतुरक यांस बोलावून घरवाला लवकरच तेथें आला, तीं चौघेजणें हेमचंद्राघरोघर त्या घरास अखेरचा रामराम ठोकून गंभीर मुद्रा धारण करून तेथून बाहेर पडलीं.

तीं पांचजणें यावेळीं मोठ्या रस्त्यावर आलीं होतीं. आपल्या पलायनाच्या नाटकांतील पहिला प्रवेश निर्विघ्नपणें पार पडला, याचा त्यांस फार आनंद होता. तीं सुमारें शंभर पावलें पुढें गेलीं असतील, तोंच आणखी एक मनुष्य त्यांच्यामध्यें येऊन मिसळला त्याला पाहतांच, आपल्यावर पाळत ठेवून नेहमीं आपल्यापासून कांहीं अंतरावर चालत असणारा मनुष्य हाच, असें शेखरानें तत्काल ओळखिलें. त्या माणसानें तोंडांतून एकही शब्द बाहेर काढला नाहीं. तो मुकाट्यानें हेमचंद्राबरोबर चालत होता.

अशा रीतीनें सुमारें पाव घटका चालल्यावर तीं रेवती क्षेत्राभोंवती असलेल्या तटाच्या एका दरवाज्यापाशीं आला त्या दरवाज्यावर यावेळीं एकच पहारेकरी आहे, असें त्यांस आढळून आलें. आपल्या बरोबर आणलेली एक मोहरांची थैली हेमचंद्रानें त्या पहारेकऱ्याच्या हातीं दिली. दुसरें दिवशीं लष्कराचा तळ हलावयाचा असल्यामुळें रेवती-क्षेत्रांतील सरकारी लोकांची मोठी धांदल उडालेली होता म्हणून रोजच्या प्रमाणें आज पहारा सक्त नव्हता, आपल्या पलायनांतील हाही भाग सुरळीत पार पडला, याचा त्या सर्वांस मोठा आनंद झाला.

रेवती-क्षेत्रांतून चंपावतीस जाण्याचे दोन मार्ग होते. एक जवळच्या खाडींतून, आणि दुसरा जमिनीवरून. त्यांपैकीं सध्या त्यांस खाडींतील मार्ग धरावयाचा असल्यामुळें तीं सहा माणसें सध्यां बंदरावर आलीं. या ठिकाणीं मधुरा त्यांस भेटली. तिनें यावेळीं आपलें सर्व अंग कृष्णवस्त्रानें अच्छादित करून घेतलें होतें बंदरावर यावेळीं मोठी धांदल उडालेली होती. उद्यां जें लष्कर निघावयाचें होतें, त्याच्या तयारीसाठीं कित्येक गलबतें आपापली तयारी करण्यांत निमग्न झालेलीं तेथें दृष्टीस पडत होतीं. सुदैवानें या मंडळीकडे कोणाचें लक्ष्य गेलें नाहीं. मधुरेनें त्या सर्वांस आपल्या मार्गे यावयास सांगितलें. तीं सर्वजणें थोड्याच वेळानें जेथें जाऊन उभीं राहिलीं, तेथें इतर लोकांची गर्दी अगदीं नव्हती.

खाडीमध्यें एक पडाव नांगरलेला होता, त्या पडाववाल्यास मथुरेनें इशारत केली, त्याबरोबर तो पडाव तीराशीं आला, आणि शेखर, प्रियंवदा व मथुरा यांखेरीज सर्व माणसें त्या पडावांत जाऊन बसलीं.

गद्गदित स्वरानें मथुरेनें त्यांचा निरोप घेतला, त्यावेळीं ती त्यांस बोलली,–' ताईसाहेब, आतां आपणांस कोणत्याही प्रकारची भीति उरली नाहीं. आम्हीं योजिलेली युक्ति पूर्णपणें सिद्धीस गेली, हें पाहून मला फार आनंद होत आहे! या, आतां माझें गरीबाचें आपणांस स्मरण असूं द्या! ईश्वर आपणांस सुखी राखो!'

प्रियंवदाही गद्गदित वाणीनें तिला म्हणाली,–' मथुरे, तूं आमच्यावर आज जे उपकार केले आहेस, त्यांचें विस्मरण आमच्या साऱ्या जन्मांत आम्हांला होणार नाहीं! ईश्वर तुझेंही कल्याण करील!'

मथुरा बोलली,–'आपण मजवर जे उपकार केले आहेत, त्यांची अर्धी देखील फेड माझ्या हातून झाली नाहीं. ताईसाहेब, आपल्या चरणापाशीं माझी दुसरी एक विनंति आहे. मी एक पत्र आपल्यापाशीं देतें, तेवढें आपण कृपा करून माझ्या आजोबांच्या हातीं द्यावें, आणि माझी खुशाली आपण त्यांना कळवावी. ईश्वरदयेनें त्यांची माझी पुनः कधीं भेट होईल तीं खरी! तथापि तसा प्रसंग लवकरच येईल, असें माझें अनुमान आहे.'

प्रियंवदेनें पत्र आपल्या हातीं घेतलें आणि तें तिच्या आज्यास पोंचविण्याचें वचन दिलें. त्या दोघींनीं अश्रुपूर्ण नेत्रांनीं परस्परांस आलिंगन दिलें आणि पुनः परम्परांचा निरोप घेतला मथुरेनें शेखराला प्रणाम केला आणि त्यानेंही गोड शब्दांनी तिचा निरोप घेतला. नंतर ती दाखें पडावांत बसली. पडाव चालू झाला, हें पाहतांच मथुरेनें तीरावरून हात हालवून पुनः एकदां त्यांचा निरोप घेतला, आणि ती मोठ्या जलदीनें रेवती-क्षेत्राकडे निघून गेली.

पडावामध्यें चार खलाशी जोरानें वल्हीं मारीत होते, त्यामुळें तो मोठ्या वेगानें खाडींतून चालला होता. थोड्या वेळानें तो पडाव एका मोठ्या गलबतापाशीं आला. गलबतावरील तांडेलानें गलबतावरून पडावांत दोरी फेकली, व त्या दोरीच्या साह्यानें तो पडाव गलबताच्या अंगाशीं आला. आणि शेखर, प्रियंवदा, निपुणिका, चतुरक, हेमचंद्र आणि त्यांच्यावरोबर आलेला हेर इतकीं माणसें गलबतावर चढलीं. हेमचंद्र याच गलबतावरून सुरथपुरांतून चंपावतीस आला होता. ज्या हेतूनें तो इकडे आला होता, तो त्याचा हेतु साध्य झाला, याचा त्याला अतिशय आनंद होत होता, हें सांगणें नकोच. तीं सर्वजणें गलबतावर बसल्याबरोबर तांडेलानें नांगर उचलिला, आणि शीड उभारून गलबत हांकारिलें. सुदैवानें त्यावेळीं वाराही अनुकूल असल्यामुळें चंपावती मागें टाकून तें गलबत समुद्रामध्यें शिरलें.

तीं रात्र गेली, दुसरा दिवस उजाडला, आणि गलबत चंपावतीपासून सुमारें पंचवीस कोस दूर गेलें. प्रहर दिवसाच्या सुमारास वाऱ्याचा झोंक बदलला, आणि समुद्रावर क्षणोक्षणीं मोठमोठ्या लाटा उठूं लागल्या. हीं व अशाच प्रकारचीं कित्येक लक्षणें दिसूं लागल्याबरोबर त्या गलबतावरील कसलेल्या तांडेलानें लवकरच मोठें वादळ होणार अशी आपल्या मनाशीं गांठ मारिली, आणि आपल्या गलबताचें मुकाणूं तडीकडे वळविलें. तांडेलानें सावधपणा ठेविला म्हणून बरें झालें, किनाऱ्यापाशीं गलबत येऊन पोंचतें न पोंचतें तोंच वादळास प्रारंभ झाला. तांडेलानें जेथें गलबत आणून लावलें, तेथें जरी एकादा गांव नव्हता, तरी बंदरसोय चांगली होती. तांडेलानें नांगर टाकून गलबत उभें केलें.

गलबतावरील होडी पाण्यांत सोडिली, आणि सर्व माणसें किनाऱ्यावर येऊन उतरलीं तोंच वारा जोराचा सुटला. मेघ गर्जना होऊं लागली, आणि पाऊसही पडूं लागला. गलबत ज्या ठिकाणीं उभें राहिलें होतें, तेथून एक कोसावर कांहीं झोंपडीं त्यांच्या दृष्टीस पडलीं, आणि तांडेल खलाशासह सर्व माणसें त्या झोंपड्यांत गेलीं.

या प्रसंगीं झालेलें वादळ मोठें जोराचें होतें. इतकेंच नव्हे, तर त्यानें पुष्कळ प्रदेश व्यापिला असून तें तीन दिवस एकसारखें सुरू होतें. चंपावतीपाशीं तर वादळानें पुष्कळच नुकसान केलें होतें. जीं गलबतें त्या दिवशीं लष्कर घेऊन जाणार होतीं, त्या गलबतांची बंदरांत गर्दी झालेली असल्यामुळें पुष्कळ गलबतें एकमेकावर आपटून त्यांना मोठी इजा झाली. वादळामुळें निंबराजाला त्या दिवशींचा आपला बेत रहित करावा लागला. शेखराच्या पलायनाचें वर्तमान निंबराजाला दुसरे दिवशीं सकाळींच समजलें. त्याबरोबर त्यानें दोन गलबतें त्याचा पाठलाग करण्यासाठीं पाठविलीं होतीं, परंतु वादळ सुरू झाल्याबरोबर ती गलबतें परत चंपावतीस आलीं. तीन दिवसांनीं वादळ शांत झालें, तरी देखील निंबराजाला आपलें सैन्य ताबडतोब हालविता आलें नाहीं. वादळामध्यें झालेली नासधूस भरून काढण्यासाठीं आणखी एक आठवडा लागला. स्वारीच्या आरंभींच हें विघ्न आलें, हा मोठा अपशकुन झाला, असें त्याचे कित्येक सैनिक बोलूं लागले; परंतु त्या दृढनिश्चयी पुरुषानें तिकडे मुळींच लक्ष्य दिलें नाहीं.

ज्या दिवशीं वादळ शांत झालें, त्याच दिवशीं शेखर आपल्या गलबतांत बसला, आणि त्याचा सुरथपुरापर्यंतचा जलप्रवास निर्विघ्नपणें पार पडला.

प्रकरण ४६ वें.

राज्यक्रांति-प्रारंभ.

मागील प्रकरणामध्यें सांगितलेला प्रकार घडून आल्यानंतर सुमारें पंधरा दिवसांनीं एक दिवशीं सकाळच्या प्रहरीं वल्लभी शहरामध्यें मोठी चळवळ उडाली होती. बायकामुलें घरांचीं दारें लावून घेऊन घरामध्यें गुपचुप बसलीं होतीं. आणि शूर पुरुष हातांमध्यें हत्यारें घेऊन शहरांत हिंडत होते. शहरांतील प्रसिद्ध ठिकाणीं मोठमोठ्या अक्षरांनीं लिहिलेले कागद चिकटविलेले असून त्या कागदांतील मजकूर वाचून पाहण्यासाठीं लोकांचे थव्यांचे थवे जमले होते रत्नाकर राजाचा सरा औरस पुत्र सुमारें दोन महिन्यांपूर्वी अपस्माराच्या विकारानें वारला असून राजानें ती बातमी गुप्त ठेविली, व राजपुत्र म्हणून एक भलतेंच मूल पुढें केलें. ही व आणखी अनेक प्रकारच्या रत्नाकर-राजाच्या जुलमाच्या गोष्टी त्या कागदावर लिहिलेल्या होत्या. या कागदावर निंबराजाचा शिक्का असून, आपण रत्नाकराच्या जुलुमांतून प्रजेला मुक्त करण्यासाठीं वल्लभीवर चाल करून येत आहों, असेंही त्यानें त्या कागदांत म्हटलें होतें. ह्या कागदांतील कित्येक जुलमांच्या गोष्टी इतक्या विलक्षण होत्या कीं, त्या वाचून त्यांच्या खरेखोटेपणाविषयीं लोकांचीं मनें साशंक झालीं. लोक अशा प्रकारें चर्चा करीत आहेत, तोंच बंदराच्या दिशेनें तोफांचे आवाज लोकांच्या कानीं येऊं लागले, आणि निंबराजाचें सैन्य वल्लभीपासून थोड्या अंतरावर आलें, अशी बातमी शहरामध्यें प्रत्येक माणसाच्या मुखांतून ऐकूं येऊं लागली. तोफांचे धडाके होत असतां पुष्कळ लोक बंदरावर जाऊन उभे राहिले होते. आपल्या सैन्याचें आगमन वल्लभीतील लोकांस कळावें, म्हणून निंबरा-

जानें आपल्या तोफांचे वायचार काढण्यास प्रारंभ केला होता.

शत्रु आपल्यावर चाल करून येत आहे. हें वर्तमान देवशर्मा आणि रत्नाकर यांच्या कानांवर जातांच त्यांची भयानें गाळण उडाली ! लागलाच त्यांनीं सेनापतीला निरोप पाठविला, आणि युद्धास प्रारंभ करण्याचा त्यास हुकूम केला. सेनापति निघून गेल्यावर रत्नाकर आणि देवशर्मा हे राजवाड्याच्या गच्चीवर जाऊन तेथून पुढें काय प्रकार होतो हें पाहूं लागले.

रत्नाकराच्या सैन्यामध्यें जिकडे तिकडे फितुरी झालेली होती, परंतु विलासमग्न राजाला तिची वार्ताही नव्हती । देवशर्म्याला फितुरीची बातमी समजली होती, पण ती इतक्या उशीरानें समजली होती कीं, 'बैल गला आणि झोंपा केला' या म्हणीप्रमाणें आतां ती समजून आणि न समजून उपयोग सारखाच होता ! मात्र देवशर्म्यानें आपल्या हातीं अधिकार आल्या दिवसापासून आपलें घर भरण्याचा सारखा सपाटा सुरू केला होता.

राजाज्ञेप्रमाणें सेनापति राजवाड्यांतून बाहेर पडल्यावर त्यानें आपल्या हातांखालच्या सैन्यास एकत्र होण्याची इशारत म्हणून तेथील निशाण–काठीवर निशाण–उभें केलें. वास्तविक पाहिलें तर त्याला आपल्या सैन्याला इशारत करण्याची जरूरच नव्हती सकाळपासून युद्धाचें वर्तमान शहरांतील सर्व लोकांस समजलें असल्यामुळें बहुतेक लोक हातीं शस्त्रें घेऊन किल्ल्याच्या तटाप शीं आलेले होतेच, तथापि निशाणाची इशारत झाल्याबरोबर सर्व सैन्य एकत्र झालें.

सैन्य एकत्र झालेलें पाहतांच सेनापतीनें आपल्या शहरावर सिंघराजा चालून आल्याचें वर्तमान सर्वांस जाहिर केलें, आणि सर्वांस युद्धास तयार होण्याची आज्ञा केली.

सेनापतीची आज्ञा ऐकतांच पांच–चार दुष्यम प्रतीचे सरदार पुढें झाले आणि त्यांनीं त्यांजपाशीं आपापल्या थकलेल्या पगाराची बाकी मागण्यास प्रारंभ केला. अर्थात् सेनापतीनें युद्ध संपल्यावर पगार मिळेल असें त्यांस उत्तर दिलें. तेव्हां 'आजच्या युद्धामध्यें आम्हीं जगतों कीं मरतों याची आपणास खात्री नसल्यामुळें आजच्या आज पगार मिळाला, तर आम्हीं शस्त्र धरूं नाहीं तर आम्हीं युद्धास येणार नाहीं, असा कित्येक सैनिकांनी जबाब दिला.

सेनापतीनें त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला, पण त्याचा तो प्रयत्न व्यर्थ गेला. बेरं म्हटलें तर सेनापति स्वतः फितूर होता, आणि त्यानें आयत्या वेळीं हें सगळें नाटक चालविलें होतें. अर्थात् सैनिकांची समजूत त्याच्यानें होईना. शेवटीं महाराजांची गांठ घेऊन कायतें सांगतों, असें त्यानें त्यांस आश्वासन देऊन तो एकदम वाड्यांत गेला. राजानें सेनापतीचें बोलणें ऐकतांच देवशर्म्याकडे नजर टाकिली. देवशर्म्यानें सेनापतीपाशीं चौकशी केली, त्या वेळीं सैन्याच्या पगाराची पांच लाख बाकी थकलेली आहे, असें त्यास समजलें. परंतु हें समजून तरी काय उपयोग होता? खजिन्यामध्यें एक लाखमुद्रा शिल्लक नव्हती. सैन्यानें आयत्यावेळीं पगारासाठीं नडविलें, आतां वेळ मोठा बिकट आली, हें देवशर्म्यानें तत्काल ओळखिलें, आणि तो खजिन्यांत शिल्लक किती आहे, हें पाहण्यासाठीं म्हणून राजापासून दूर झाला. बराच वेळ झाला तरी देवशर्मा परत आला नाहीं! या स्वारीचा परिणाम काय होणार हें देवशर्म्यानें ओळखिलें असल्यामुळें त्यानें पलायनाचा मार्ग सुलभकारक समजून त्याचाच आश्रय केला होता !

बराच वेळ गेला, पण देवशर्मा परत आला नाहीं. त्यामुळें राजा मोठ्या काळजींत पडला. इकडे राजवाड्यांत गेलेला सेनापति परत आला नाहीं, हें पाहून सैन्यांतील लोक राजवाड्यापाशीं जमले.

पुढें काय करावें हें राजाला उमगेना, व त्यानें सेनापतीला कोणत्याही रीतीनें ही वेळ निभावण्याची विनति केली. सेनापतीनें राजाशीं वाद घालीत न बसतां खरी स्थिति लोकांच्या कानीं घालून कांहीं उपयोग होतो कीं काय, हें पाहण्याच्या निमित्तानें तोही एकदम खालीं आला.

सेनापती मागून सर्व घोळका पुनः निशाणाच्या बुरुजाकडे परत गेला. तेथें पोंचतांच सेनापतीनें सध्यां पगार मिळत नाहीं असें सैनिकांस कळविलें, आणि युद्धास सिद्ध व्हावयास आज्ञा केली. त्याच्या या आज्ञेप्रमाणें खरे स्वामिनिष्ठ सैनिक तेवढें निशाणापाशीं एकत्र झाले, आणि सेनापतीच्या आज्ञेची वाट पाहूं लागले. आपल्या सैन्यांतील फितूर किती आणि स्वामिनिष्ट किती, याचा अद्यापि सेनापतीलाही चांगलासा अंदाज नव्हता. पण आतां फितूर नसलेले जे लोक होते, तेवढेच निशाणापाशीं गोळा झाले, आणि बाकीचे एका बाजूस राहिले. फितूर झालेल्यांची संख्या अधिक आहे, आणि राजसेवेसाठीं केवळ राजनिष्ठेनें युद्धास सिद्ध झालेले लोक थोडे आहेत, अशी सेनापतीची खात्री पटतांच तो त्या सर्व लोकांस उद्देशून म्हणाला,–'निंबराजानें आपल्याबरोबर येथें दहा हजार निवडक लोक युद्धासाठीं आणिले आहेत याबद्दल माझ्या मनास तिळमात्रही शंका वाटत नाहीं. एवढ्या प्रचंड सैन्याशीं सध्यां निशाणाखालीं एकत्र झालेल्या मूठभर लोकांनीं सामना द्यावयाचा, म्हणजे जाणून बुजून अग्नींत उडी घालण्याइतकें हें कर्म साहसाचें आहे. एवढ्या सैन्याचा शत्रूशीं लढतांना निभाव लागावयाचा नाहीं, हें उघड दिसत असतां आपण युद्धास प्रवृत्त व्हावें असें माझें मन मला सांगत नाहीं!'

इतक्यांत जमलेल्या सैनिकांपैकीं एकजण म्हणाला,–'अशा रीतीनें अमंगळ भाषण करून युद्धास सिद्ध झालेल्या सैन्याचा हिरमोड प्रत्यक्ष सेनापतीनें करावा, ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे. शत्रूचें सैन्य पुष्कळ असलें तरी तें समुद्रामध्यें आहे, आणि आम्ही बळकट अशा किल्ल्यांत आहों, याचा सेनापतींनीं विचार केला पाहिजे.'

सेनापति बोलला,–'आपण सध्यां बळकट किल्ल्यांत आहों ही गोष्ट खरी, तथापि शत्रूच्या तोफा आमच्या तोफांपेक्षां उत्तम असून, त्यांचे सैनिकही मोठे शूर आहेत!'

हें ऐकून आणखी एक सैनिक बोलला,–'ज्या अर्थी हे शत्रूची अशा रीतीनें स्तुति करतात, त्या अर्थी हे शत्रूला फितूर असल्या पाहिजेत!'

सेनापति क्रोधाचा आवेश आणून बोलला,–'ज्या अर्थी माझ्या हाताखालच्या लोकांना माझें बोलणें रुचत नाहीं, त्या अर्थी मीं आतां कांहीं बोलूं नये हेंच उत्तम, असें समजतों. असल्या अमर्यादि सैन्याचें स्वामित्व स्वीकारण्यापेक्षां आपण आपला अधिकार सोडून देणें हेंच मला इष्ट वाटतें! माझ्या जागीं दुसरा कोणी असता, तर त्यानेंही असेंच केलें असतें!'

आणखी एक सैनिक बोलला,–'नालायक मनुष्यानें आपण बाजूला होऊन आपली जागा रिकामी करावी, हें खऱ्या माणुसकीचें लक्षण आहे! आम्हीं ज्या अर्थी आजपर्यंत या गादीचें अन्न खाल्लें आहे, त्या अर्थी मरेपर्यंत या गादीच्या हितासाठीं श्रम करणारच! तुमच्या मनांतून जर शत्रूला जाऊन मिळावयाचें असेल, तर उघड उघड तसें कां करीत नाहीं!'

वाचक हो, युद्धाच्या सुरुवातीलाच अशा प्रकारचा प्रसंग घडून आला असतां त्या युद्धाचा परिणाम काय व्हावा याचा तर्क तुम्हीं आपल्या मनाशीं केलाच असेल सेनापति फितूर झालेला असल्यामुळें मुद्दाम तंटा उपस्थित करून स्वामिनिष्ठ सैनिकांपासून अलग राहण्यासाठीं तो जारीनें प्रयत्न करूं लागला. अशा रीतीनें जें

शाब्दिक भांडण सुरू झालें, तें विकोपास जातां जातां शत्रूशीं युद्ध व्हावयाचें बाजूस राहून वल्लभी शहरांतील सैनिकांचें आपसांत युद्ध सुरूं झालें! सेनापति स्वतः फितूर असल्यामुळें फितूर असलेलें सैन्य त्याच्या बाजूला आलें, आणि स्वामिनिष्ट सैनिक एकत्र होऊन ते फितूर सैन्याशीं सामना देण्यास एकाजागीं गोळा झाले. त्यांच्यापैकीं जो सर्वांत मानानें श्रेष्ठ होता, त्याला त्यांनीं आपला सेनापति केलें, आणि वल्लभी नगरांतील सैन्य आपसांत भांडूं लागलें,

न्य एकत्र करण्यासाठीं निशाण चढवि-यापासून दोन घटकांच्या आंत वल्लभी शहरांत यादवी सुरू करतों, असें सेनापतीनें निंबराजास वचन दिलें होतें. त्याप्रमाणें शहरांत यादवी सुरू होतांच सेनापतीनें निंबराजास इषारत देण्यासाठीं तोफांचे तीन आवाज काढले. ते आवाज कानीं पडतांच चंपावतीकर सैन्याचीं गलबतें पुढें सरसावलीं, आणि तोफांचा मारा करीत बंदरांत घुसलीं.

आरमारामध्येंही फितुरी झाली असल्यामुळें थेट वल्लभीबंदरांत येईपर्यंत निंबराजाच्या सैन्याला समुद्रामध्यें अडथळा झाला नाहीं, ही गोष्ट वाचकांच्या ध्यानीं आलीच असेल. शहरामध्यें आपसांत युद्ध सुरू असल्यामुळें निंबराजाच्या सैन्याला शहरांत शिरण्यास मुळींच अडचण पडली नाहीं. निंबराजाचें सैन्य शहरांत शिरत आहे, हें ध्यानीं येतांच आपसांत लढण्याचें बंद करून रत्नाकर राजाचे कित्येक इमानी सरदार राजवाड्याकडे धांवले आणि त्यांनीं खरा प्रकार राजाच्या कानावर घातला. यावेळीं आपण पळून गेलों तरच आपला कांहीं निभाव लागेल, अशी रत्नाकराच्या मनाची खात्री पटली, आणि तो त्या विचारास लागला. तबडतोब राजानें अंगावरील राजभूषणें काढून टेविलीं, आणि सामान्य प्रतीचा पोषाक त्यानें धारण केला. राणीनेंही तसेंच केलें, आणि तीं उभयतां राजवाड्याच्या मागच्या दरवाज्यानें बाहेर पडून आपल्या इमानी सरदारांच्या साह्यानें वल्लभी नगरांतून जीव बचावून बाहेर पडलीं! वास्तविक पाहिलें तर यावेळीं राज्यक्रांतीचा आरंभ आणि शेवट एकदमच झाला होता. रत्नाकर राजा एकदां स्थानभ्रष्ट झाला तो झालाच! त्याच्या अनुयायांनीं केवळ आपलें कर्तव्य म्हणून पुष्कळ दिवस युद्ध सुरू ठेविलें होतें, पण रत्नाकराचे पाय पुनः वल्लभीच्या सिंहासनास लागले नाहींत!

केवळ अविचारामुळें, अभिमानामुळें, आणि ऐषआरामांत निमग्न राहून राज्यव्यवस्थेकडे पूर्ण दुर्लक्ष्य केल्यामुळेंच रत्नाकराचा अशा रीतीनें नाश झाला!

* * *

आतां आपण भृगुकच्छ नगराकडे काय वर्तमान झालें, तें पाहूं. वल्लभीच्या राज्यांतील दुसरें महत्त्वाचें शहर भृगुकच्छ हेंच होतें वल्लभी हें राजधानीचें शहर असल्यामुळें निंबराजानें आपलें बहुतेक कारस्थान तेथेंच रचिलें होतें. राजा एकदां स्थानभ्रष्ट झाला, म्हणजे आपलें बहुतेक कार्य झालें, असें त्याला वाटत असल्यानें निंबराजानें रत्नाकरासच पहिला शह दिला होता, तथापि त्याचें भृगुकच्छ नगराकडे अगदीं दुर्लक्ष्य नव्हतें. त्या शहरांत निंबराजाचे अनुयायी पुष्कळ होते, आणि त्यांच्या तेथें गुप्त सभाही भरत. त्यांनीं निंबराजाच्या आज्ञेवरून शेखरास पकडून एकदां आपल्या सभेंत नेऊन तेथें त्याचें हृद्गत उघड करून घेतलें, तो प्रकार या कथेच्या पूर्वार्द्धांत वर्णिलेला वाचकांच्या लक्ष्यांत असेलच.

निंबराजाचें सैन्य वल्लभीवर चाल करून गेलें, आणि रत्नाकरानें तेथून पलायन केलें, हें वर्तमान थोड्याच दिवसांनीं भृगुकच्छ नगरीं पोंचलें. भृगुकच्छ नगरांत रत्नाकराचें जें सैन्य होतें, त्या सैन्यावरील मुख्य अधिकारी फितूर झालेला नव्हता. त्या अधिकाऱ्यानें वल्लभी पडल्याचें वर्तमान ऐकतांच

आपलें सर्व सैन्य एकत्र केलें, आणि जे लोक फितूर झाले असल्यामुळें युद्धास तयार नव्हते, त्यांस त्यानें एकदम रजा दिली. या अधिकाऱ्याचें नांव गोवर्धन असें होतें. सैन्याच्या बळावर आपला विश्वास असला, तरी प्रजेची आपल्यास अनुकूलता नसल्यास आपले सर्व प्रयत्न व्यर्थ जातील, असें त्या शहाण्या पुरुषास वाटत असल्यामुळें त्यानें एके दिवशीं भृगुकच्छ नगरांतील प्रतिष्ठित लोकांस एकत्र जमवून युद्धानें आपलें रक्षण करून घ्यावयाचें, कीं मुकाट्यानें शहर निंबराजाच्या स्वाधीन करावयाचें, असा प्रश्न त्यांच्यापुढें ठेविला. शहरांतही दोन पक्ष झालेले असल्यामुळें सभेंतही मतभेद झाला. शेवटीं प्रत्येक पक्षांतील पुढारी असे कित्येक लोक निवडून त्यांनीं आपसांत विचार करून या प्रश्नाचा निकाल करावा असें त्या सभेंत ठरलें. ही तोड निघाली खरी, पण तिचा तत्काल उपयोग झाला नाहीं. प्रत्येक पक्षांतील लोक आपल्यावरच सध्या जबाबदारी मोठी पडली आहे, आणि राष्ट्राचें मत कांय आहे, हें आपल्यास समजल्यासेरीज आपणास या प्रश्नाचा निकाल लावतां यावयाचा नाहीं, असें म्हणूं लागले. अर्थात् त्यांचा निकाल लांबणीवर पडला ही जी मध्यें फुरसत मिळाली. तिचा प्रत्येक पक्षानें योग्य उपयोग करून घेतला. फितूर पक्षानें वल्लभी येथें दूत पाठवून झालेलें वर्तमान निंबराजाच्या कानावर घातलें, आणि आपला पक्ष कमकुवत असल्यामुळें आपणांस मदतीची अपेक्षा आहे, असें त्यास कळविलें. निंबराजानें आपल्या वीरसेन नांवाच्या एका दुय्यम सेनापतीला पांच हजार सैन्य घेऊन भृगुकच्छ नगरावर हल्ला करण्याचा हुकूम केला. त्याचप्रमाणें रत्नाकर राजाच्या पक्षांतील लोकांनीं बागलाणांतील व इतर संस्थानिकांस पत्रें लिहून त्यांची मदत मागितली.

त्यानंतर एके दिवशीं प्रातःकाळीं निंबराजाचें सैन्य आपल्या शहरावर चाल करून येत आहे, हें वर्तमान शहरांतील लोकांस समजलें. त्यावेळीं रत्नाकर राजाच्या पक्षांतील गोवर्धनाच्या अनुयायांनीं एकदम लढाईस प्रारंभ करावा, अशी सूचना केली. ही सूचना करण्यांत चूडामणि प्रमुख होता, हें सांगणें नकोच. परंतु गोवर्धन हा विचारी पुरुष असल्यामुळें त्यानें ती मसलत ऐकिली नाहीं. त्याला विनाकारण रक्तपात करण्याचा कंटाळा होता, व आपणांस लवकरच चोंहींकडून मदत मिळेल, आणि नेमलेल्या पंचाइतींत आपल्या पक्षाचें वर्चस्व होईल, अशी त्याच्या मनास खात्री वाटत असल्यामुळें त्यानें एकदम युद्धास प्रारंभ करण्याचें साफ नाकारिलें.

नेमलेल्या दिवशीं पंचायत-सभा भरली आणि त्या सभेमध्यें निंबराजाच्या पक्षाचें प्राबल्य होऊन निंबराजाचें वर्चस्व कबूल करावें, असें बहुमतानें ठरलें. आणि त्याप्रमाणें पंचायतीच्या मुख्यानें गोवर्धनाकडे निरोप पाठवून भृगुकच्छ नगरांतील रत्नाकराचें निशाण उतरून तेथें निंबराजाचें निशाण चढवावें, अशी त्यास सूचना केली!

हें वर्तमान ऐकून गोवर्धनाला फार वाईट वाटलें, आणि रक्तपात टाळण्यासाठीं तो शूर पण दयाळु अंतःकरणाचा पुरुष निशाण उतरण्यास सिद्ध झाला. पण त्याच्या अनुयायांनीं मोठा गवगवा करून आणि त्याला धमक्या घालून तसें करूं दिलें नाहीं. बागलाणांतील संस्थानिकांकडून जरी अद्यापि मदत आली नव्हती, तरी ती लवकर येईल, तोंपर्यंत आपण वाट पाहिली पाहिजे, असा चूडामणीनें आग्रह धरिला शेवटीं आपला नाइलाज होईपर्यंत शहराचें रक्षण करावयाचें, अशी गोवर्धनाच्या अनुयायांनीं त्याजकडून शपथ घेवविली. गोवर्धनानें एकदां शपथ घेतल्यावर तो ती मोडणार नाहीं, अशी त्याच्या

अनुयायांची खात्री असल्यामुळें गोवर्धनानें शपथ घेतलेली पाहतांच त्याच्या अनुयायांचें समाधान झालें. तथापि त्याच्या अनुयायां मध्यें चूडामणीसारखीं अविश्वासु माणसें नव्हतीं असें नाहीं. या अविश्वासु मंडळींनीं आपसांत खलबत करून चूडामणीला गोवर्धनावर नजर ठेवण्यासाठीं हेर नेमलें, आणि त्या अविचारी राजपुत्रानें 'गोवर्धन आपली शपथ मोडण्यास तयार झाल्यास त्याचा तत्काल वध करीन, अशी शपथ घेतली!

गोवर्धन निशाण उतरीत नाहीं हें समजल्याबरोबर वीरसेनानें समुद्राच्या बाजूनें आणि शहरांतील फितूर लष्करानें बाहेर पडून जमिनीवरून भृगुकच्छ नगरास वेढा दिला. वेढा बसून पंधरा दिवस झाले. इतक्या अवधींत लहान लहान चकमकी पुष्कळ झडल्या, पण कोणाचाही विजय झाला नाहीं. अशा स्थितींत वेढा घालणाऱ्या सेनापतीला भृगुकच्छ नगरांतील लोकांच्या साहाय्यासाठीं बागलाणांतील सैन्य मोठ्या त्वरेनें येत आहे, अशी बातमी समजली. शहरांत कोंडलेल्या लोकांचें बाहेरच्या लोकांशीं दळण-वळण बंद झालेंच होतें, म्हणून रक्तपात न करतां आंतील लोक दुष्काळानें जेरीस येत तोंपर्यंत दम धरावयाचा, असा वीरसेनाचा विचार होता. पण आंतील लोकांस मदत येत आहे, ही बातमी समजतांच आतां आपण स्वस्थ बसून उपयोगी नाहीं, अशी त्याच्या मनाची खात्री झाली. बागलाणांतील लोकांच्या शौर्याच्या अनेक गोष्टी त्यानें पूर्वी ऐकल्या होत्या, त्यामुळें तें सैन्य येण्यापूर्वी आपण भृगुकच्छ हस्तगत करून घेणें अगदीं जरूर आहे, असें त्यास वाटत होतें.

वीरसेनानें आपलें सैन्य आणखी पुढें आणिलें, आणि मोठ्या जोरानें शहरावर हल्ला केला जमिनीच्या बाजूच्या सैन्यानेंही लगट केली, आणि दोन्ही पक्ष परस्परांवर आपापल्या शस्त्रास्त्रांचा भडिमार करूं लागले. अशा रीतीनें प्रत्यक्ष युद्ध जुंपलें असतां चूडामणीला फार आनंद झाला, त्याची रक्तपात करण्याची नैसर्गिक बुद्धि जागृत झाली, आणि त्यानें कित्येक प्रसंगीं आपल्या शौर्याची कमाल केली. दिवसेंदिवस शहरांतील अन्नसामग्री संपत चालली. निंबराजाच्या पक्षाचे कित्येक लोक अद्यापि शहरांत होते, त्यांनीं संधि साधून विश्वासघातानें धान्याचा आणि युद्ध सामग्रीचा नाश करण्याचा क्रम सुरु केला. एकामागून एक दिवस लोटत चालले, तसतसा किल्ल्यांत कोंडलेल्या सैन्याचा दम सुटूं लागला. अपेक्षित साह्यही वेळेवर पोंचण्याचा रंग दिसेना. अर्थात् आतां पुढें काय करावयाचें याचा सर्वांनीं एकत्र जमून अखेरचा विचार करावयाचा प्रसंग आपोआप प्राप्त झाला!

म्हणून एके दिवशीं सायंकाळीं युद्ध संपून किल्ल्यांतील सर्व सैनिक परत आले असतां सेनापति गोवर्धनानें आपल्या हाताखालच्या दुय्यम सैनिकांपैकीं मुख्य अशा कित्येकांस आपल्या वाड्यांत पाचारण करून किल्ला शत्रूच्या स्वाधीन करावयाचा कीं नाहीं, याचा विचार करावयाचा बेत केला. गोवर्धनाच्या बोलावण्याप्रमाणें एकंदर चोवीस सरदार त्याच्या वाड्यांत आले, आणि तो स्वतः पंचविसावा. हे सर्व सरदार किंवा सैनिक आपापल्या योग्यतेप्रमाणें उजव्या किंवा डाव्या बाजूस बसले असून सर्वांच्या मध्यभागीं स्वतः गोवर्धन बसला होता, आणि चूडामणि हा राजपुत्र असून दुय्यम सेनापति असल्यामुळें तो त्याच्या जवळच उजव्या बाजूस बसला होता. जमलेले सर्व गृहस्थ शूर असून रत्नाकर राजाच्या पक्षाचे कट्टे अभिमानी होते. स्वतः गोवर्धन हा मोठा लढवय्या असून युद्ध कलेमध्यें निष्णात होता. त्याच्या कौशल्यामुळेंच भृगुकच्छाचें इतके दिवस संरक्षण झालें होतें. वास्तविक पाहिलें तर, पहिल्यानें

जेव्हां सभा भरून बहुतेक लोक रत्नाकराचा पक्ष सोडून निंबराजाच्या पक्षाला अनुकूल झाले आहेत, ही गोष्ट त्याच्या ध्यानीं आली, लेव्हांच या युद्धाच्या परिणाम काय होणार याचा अंदाज त्यानें केला होता. पण 'खरे धैर्यवान् पुरुष अंगीकृत कार्याचा अखेरपर्यंत त्याग करीत नाहींत,' या सिद्धांताची सत्यता सिद्ध करण्यासाठींच तो लढत होता.

निमंत्रित मंडळी जमल्यावर गोवर्धनानें मोठ्या शांतपणानें, गंभीरपणानें आणि धिमेपणानें भाषण करून युक्तिवादानें सध्याच्या प्रसंगीं किल्ला शत्रूच्या स्वाधीन करण्याची किती आवश्यता आहे, ही गोष्ट सर्वांच्या मनांत स्पष्टपणें बिंबवून देण्याचा प्रयत्न केला. 'सध्यां जर आपण होऊन किल्ला शत्रूच्या स्वाधीन केला, तर आपल्या सैन्याची खराबी होणार नाहीं आणि आपसांत शस्त्रास्त्रांसह येथून दुसरीकडे जाण्यास परवानगी मिळेल; आपण येथून एकदां बाहेर पडलों, म्हणजे आपणांस कांहीं तरी बंदोबस्ताच्या जागीं जाऊन आपल्या पक्षाचे लोक जमवितां येतील, आणि नव्या दमानें शत्रूंची खोड मोडतां येईल,' असें त्यानें आपल्या अनुयायांस सांगितलें; आणि आपलें भाषण समाप्त केलें.

हें त्याचें बोलणें सर्वांस पटल्यासारखें दिसलें तो उगीच राहिल्यावर सुमारें दहा पळेंपर्यंत कोणीं कांहींच भाषण केलें नाहीं. इतका वेळ गेला आणि कोणी बोललें नाहीं हें पाहून त्यानें सर्वांस पुढें काय करावयाचें हें आपसांत ठरवावयास सांगितलें. हें ऐकून राजपुत्र चूडामणि आपल्या जाग्यावरून पुढें सरसावला, आणि त्यानें मोठ्या तीक्ष्ण स्वरानें वीरश्रीपूर्वक भाषण करण्यास प्रारंभ केला. राजपुत्र चूडामणि हा वीरपुरुष आहे अशी सर्वांची खात्री होती, म्हणून तो बोलावयास उठला हें पाहतांच सर्वजण त्याचें भाषण लक्ष्यपूर्वक ऐकूं लागले. चूडामणीची मुद्रा नेहमींच उग्र दिसत असे, पण या प्रसंगीं ती अधिक उग्र दिसूं लागली होती.

त्यानें बोलण्यास प्रारंभ करतांना प्रथम गोवर्धनानें 'अगदीं नाइलाज होईपर्यंत किल्ला लढवीन' अशी शपथ घेतली होती, तिचें सर्वांस स्मरण दिलें. बागलाणांतील संस्थानिकाची आपणांस लवकरच मदत येईल, शत्रूवर किल्ल्याच्या आंतून आणि बाहेरून एकाच वेळीं शस्त्रास्त्रांचा भडिमार सुरू झाला म्हणजे ते आपोआपच जेरीस येतील, आणि वेढा उठवून चालतें होण्याखेरीज त्यांस गत्यंतरच राहणार नाहीं, असें त्यानें मोठ्या जोरानें प्रतिपादन केलें. आम्ही किल्ला शत्रूच्या स्वाधीन केल्यास शत्रू आम्हास वाटेल तिकडे जाऊं देतील, अशी कल्पना करणें हें चुकीचें आहे, आणि जर ते तसें करतील असें मानिलें, तर त्याचें सामर्थ्य आपल्याहून कमी असलें पाहिजे, ही गोष्ट त्यानें आपल्या सोबत्यांच्या मनामध्यें भरवून दिली; तसेंच आणखी आठ-चार दिवस दम धरल्यास शत्रू वेढा उठवून निघून जातील, असें आपलें मन त्यानें ठांसून सांगितलें.

या त्याच्या भाषणाचा त्याच्या सोबत्यांवर हलका परिणाम झाला असें नाहीं. चूडामणीचें भाषण जरी जोरदार होतें, तरी त्यामध्यें नुसता पोकळ आवेश होता असें नाहीं. त्याचें बोलणें युक्तीस धरून असल्यामुळें गोवर्धनाच्या बोलण्यापेक्षां याचें बोलणें खरें असावें, असें त्या सैनिकांस वाटूं लागलें, आणि ते गोंधळून गेले. गोवर्धनाचें भाषण ऐकून किल्ला शत्रूच्या स्वाधीन करावा, असें त्यांस वाटूं लागलें होतें; पण चूडामणीचें हें भाषण ऐकल्यापासून त्यांचें मन द्विधा झालें, आणि या गोष्टीचा दोन्ही बाजूंनीं आणखी विचार करणें बहुतेकांस जरूर झालें. तेथें जमलेल्या सैनिकांपैकीं कोणी गोवर्धनाचा पक्ष घेऊन त्याचें समर्थन करूं लागले, तर

कोणी चूडामणीच्या पक्षाचें प्रतिपादन करूं लागले. अशा रीतीनें भर मध्यरात्रीचा समय झाला, तरी उपस्थित झालेल्या प्रश्नाचा निकाल होण्याचें चिन्ह दिसेना.

आणखी एक घटकाभर कडाक्याचा वादविवाद झाला. नंतर गोवर्धनानें सर्वांचीं मतें घेऊन बहुमताप्रमाणें वागावयाचें असा आपल्या मनाशीं विचार ठरविला. त्या ठिकाणीं बरोबर पंचवीस मंडळी जमलेली होती, हें आम्ही पूर्वीच सांगितलें आहे. गोवर्धनानें सर्वांना विनंति करून वादविवाद बंद करविला, आणि तो म्हणाला,–'आपण जर अशा रीतीनें वाद करीत बसलों तर या प्रश्नाचा केव्हांही निकाल लागावयाचा नाहीं. इतका वेळ जेवढी खटपट झाली तेवढी पुरे आहे. आपण सध्यां येथें पंचवीसजण आहोंत, यांपैकीं माझें बोलणें मान्य करणारे किती व या राजपुत्राचें बोलणें मान्य करणारे किती, हें पाहून ज्यांची संख्या ज्यास्त भरेल त्यांच्या मताप्रमाणें पुढें काय करणें तें करावें, अशी माझी इच्छा आहे; या गोष्टीस तुमची संमति आहे काय ?

यावर कोणीं आपली नापसंती दर्शविली नाहीं, म्हणून गोवर्धनानें प्रत्येकाला प्रश्न करून त्याचें मत काय आहे, हें विचारण्याचा क्रम सुरू केला. पहिल्या सैनिकापासून आरंभ करून तो प्रत्येकाचें मत विचारूं लागला असतां किल्ला सोडून निघून जावें, ही गोष्ट पहिल्या दहांपैकीं सातानीं कबूल केली. असाच प्रकार पुढें झाल्यास किल्ला सोडावा असें म्हणणारांचें बहुमत होणार, हें चूडामणीला स्पष्ट दिसूं लागलें, आणि त्याला अतिशय खेद झाला. तो अगदीं लक्ष्यपूर्वक प्रत्येकाचें उत्तर ऐकूं लागला. पण जेव्हां गोवर्धन त्याच्या आसपासच्या मंडळीचीं मतें विचारूं लागला, तेव्हां आपल्या मताप्रमाणें बरींच मतें पडत आहेत असें त्यास आढळून आलें, आणि आनंदानें त्याची कळी उमलूं लागली. झालें ! सर्व मतें विचारून झालीं, आणि हिशोब करतां दोघांच्याही बाजूस सारखी मंडळी झाली ! गोवर्धनाला अनुकूल चारा ! चूडामणीला अनुकूल चाराच. याप्रमाणें चोविसांचीं मतें काय आहेत, हें तर ठरलेंच. आतां फक्त एकट्या गोवर्धनानें स्वतांचें मत स्पष्ट बोलून दाखवावयाचें एवढेंच उरलें होतें ! दोन्ही पक्षांचीं मतें सारखीं झाल्यामुळें त्या विचारी गोवर्धनाला मोठा पेंच पडला ! आपल्या एकट्याच्या मतामुळें बारा असामींचीं मतें व्यर्थ जाणार ! जमलेल्या चोवीसांपैकीं बारा मात्र विचारी आणि बारा अविचारी असें परोक्ष रीतीनें दर्शित करण्याचा आपणावर प्रसंग आला, ह्याचें त्याला फार वाईट वाटलें.'

शेवटीं अत्यंत गंभीरता धारण करून तो म्हणाला,–'मित्रहो, आपणांसर्वांमध्यें अशा रीतीनें विरोध उत्पन्न होऊन शेवटीं त्याचा निकाल केवळ माझ्या एकट्याच्या मताप्रमाणें होणार, याचें मला फार वाईट वाटत आहे ! किल्ला शत्रूच्या स्वाधीन करावा, असें माझें प्रथमपासून म्हणणें आहे, अर्थात् माझें मत काय आहे, हें मीं आपल्या तोंडानें सांगावयास हवें असें नाहीं परंतु या प्रसंगीं मला मोठा पेंच पडला आहे ! माझ्यावर या प्रसंगीं मोठें संकट आलें आहे ! अशा रीतीनें दुफळीच्या प्रसंगीं मी जर माझ्या पूर्वीच्या मताला चिकटून राहिलों, तर ही मंडळी मजवर भित्रेपणाचा आरोप करण्यास चुकणार नाहीं. यापेक्षां तुमच्या पैकीं जर कोणाचे मत बदललें, आणि एका बाजूला तेरा व दुसऱ्या बाजूला अकरा झाले, तर माझ्यावरचें हें संकट दूर होईल, आणि तुम्हापैकीं पुष्कळांच्या मर्जीप्रमाणें वागण्याचा बहुमान मला प्राप्त होईल. सध्याच्या प्रसंगीं मी एकटा जें काय बोलेन, तें सर्वांनीं मुकाट्यानें मान्य केलें पाहिजे असें

झालें आहे. तथापि दुर्दैवानें या प्रसंगीं मजवर जो प्रसंग आला आहे, त्याला तोंड देणें हें माझें कर्तव्य,' मी 'आपल्या अंतःकरणाला मी आपल्या 'सदसद्विवेकाला, मी आपल्या राजधर्माला स्मरून करण्याचा निश्चय करतो ! ईश्वरा, मी जें कांहीं करीत आहें, तें अगदीं तुझ्या साक्षीनें इमानें इतबारें-'

हें त्याचें भाषण ऐकून चूडामणी मध्येंच म्हणाला,-' अहो सेनाध्यक्ष, आपण पूर्वीं जी शपथ घेतली आहे, तिचें आपणांस स्मरण असेलच नसल्यास नीट आठवण करा, आणि नंतर आपलें मत काय द्यावयाचें तें द्या !'

शांतपणें आणि गंभीरपणें सेनापती गोवर्धन बोलला,-' मी जी काय शपथ घेतली होती, ती अक्षरशः पाळली आहे ! मी त्या शपथेंतून केंव्हांच मुक्त झालों आहें. जोंपर्यंत किल्ल्याचें रक्षण करतां येणें शक्य असेल, तोंपर्यंत त्याचें मी रक्षण करीन अशी शपथ मीं घेतली होती-'

चूडामणी मध्येंच बोलला,-' पोकळ वाक्पांडित्य करून जरी तुम्ही शपथ झुगारून देऊं पाहात असलां, तरी मी मात्र तें ऐकून घेणार नाहीं ! कारण मीं सुद्धां अशीच एक शपथ घेतली आहे, आणि मी ती अक्षरशः पाळीन !'

अत्यंत गंभीरतापूर्वक गोवर्धन बोलला 'तुम्ही काय शपथ घेतली आहे, हें मला मुळींच माहित नाहीं. हें भाषण तुम्ही मला टोचून बोलण्यासाठीं करीत नसाल, तुम्ही केवळ आपल्या राजनिष्ठेसाठींच कांहीं तरी शपथ घेतली असून तिचा उल्लेख करीत असाल, अशी मी आशा करतों. परंतु तुम्हीं कांहीं जरी बोललां, तरी मला जें करावेंसें वाटतें-माझा मनोदेवता-माझी सदसद्विवेकबुद्धि मला जें काय करावयास सांगते, तेंच मी करीन ! सध्याच्या परिस्थितीचा विचार केला असतां या प्रसंगीं शत्रूच्या हातीं देणें हेंच माझें कर्तव्य आहें, हें मी स्पष्टपणें सांगतों !

'तर मग मलाही आपली शपथ पूरी करणें भाग आहे !' अशी गर्जना करून चूडामणी आपल्या जाग्यावरून उठला, आणि डोळ्याचें पातें लवतें न लवतें इतक्या अवधींत त्यानें आपली लांब व तीक्ष्ण धारेची तरवार सरकन म्यानांतून बाहेर काढली ! जणूं काय आकाशांतून विजेचा लोळ खालीं उतरावा, अशा रीतीनें त्याची ती तरवार तेथील एकाच दिव्याच्या प्रकाशांत क्षणमात्र चमकली, आणि दुसऱ्या क्षणीं गैरसावध असलेल्या गोवर्धनाचें शिर धडापासून वेगळें होऊन तें खालीं पडलें !'

'खून ! खून !' 'सूड ! सूड !!' 'धरा ! त्याचा प्राण घ्या !' अशा प्रकारच्या भयंकर शब्दांनीं तो दिवाणखाना एका क्षणांत दणाणून गेला. तेवींस तरवारी एकदम म्यानांतून बाहेर पडल्या, आणि त्या चूडामणीचें रक्त प्राशन करण्यास तयार झाल्या !

या वेळीं आपलें सर्व युद्धकौशल्य प्रकटण्याचें करणें चूडामणीस भाग पडलें. त्याची तरवार ही भिंगरीसारखी तळपूं लागली. तथापि तेवींस वीरांशीं आपला एकट्याचा निभाव लागावयाचा नाहीं, हें चूडामणीच्या तात्काळला ध्यानीं आलें, आणि पुढें आत्मसंरक्षण कसेंबरोबर करावयाचें याचा त्यानें एका क्षणांत विचार केला. हा भयंकर प्रकार ज्या दिवाणखान्यांत घडून आला, त्या दिवाणखान्यांत फक्त एकच दिवा होता. चूडामणीनें ओट्या चलाखीनें तो दिवा मालवून टाकला, आणि तेथील भयानक [illegible] पांघरूण पडलें. [illegible] मुळें सर्वांना [illegible] ग झालें. काय [illegible] राहून आलागण्याची [illegible] लागली. इतक्यांत [illegible] दरवाजा वाजला. त्या [illegible] सोर पळून चालला ! पाठलाग

करा ! मूड ! मूड !! मूड !!! ' असे शब्द सर्वांच्या मुखांतून एकसमयावच्छेदेंकरून बाहेर पडले. इतक्यांत तेथील दरवाजा बंद केल्याचा व त्यास बाहेरून कडी घातल्याचा आवाज सर्वांस ऐकूं आला. दरवाजा मजबूत व कडीही मक्कम असल्यामुळें आंत कोंडलेल्या सैनिकांस तो फोडावयास फारच श्रम करावे लागले !

अंगावर खून चढलेला चूडामणी दडादड जिना उतरून एकदाचा खालीं आला या वेळीं त्याच्या मनाची मोठी विलक्षण स्थिति झाली होती. आपल्या या साहसाचें सर्वांस कौतुक वाटेल-आपल्या या महत्कृत्याबद्दल सर्वजण आपली तारीफ करतील. असें त्यास प्रथम वाटलें होतें. पण आपला तो तर्क साफ चुकला, असें त्यास आढळून आलें. आपलें तें कृत्य कोणास पसंत नर पडलें नाहींच, पण उलट सर्व लोक आपल्यावर उलटले, हें पाहून तो आपल्या मनांत चरकला आतां यापुढें आपण त्यांच्या हातीं सांपडल्यास आपली धडगत नाहीं, अशी त्याची एकाक्षणार्धांत खात्री झाली, आणि तो अगदीं निराश झाला ! आपल्या हातांखालचें सैन्य सुद्धां यापुढें आपला बचाव करण्यास समर्थ होणार नाहीं, हें एकदम त्याच्या लक्षांत आलें. कोंडून ठेवलेले लोक दरवाजा फोडून केव्हां बाहेर पडतील, आणि आपला केव्हां घात करतील, याचा नेम नाहीं, असें मनांत येऊन तो क्षणोक्षणीं मार्ग पाहूं लागला. अशा स्थितींत रक्तानें माखलेली तरवार [illegible] असलेला चूडामणी कसा बसा [illegible] खालीं आला.

वा[illegible] तो [illegible] घालतो न घालतो [illegible] आणि वीरांच्या गर्जना [illegible] त्याच्या कानीं पडला. हा [illegible] ड्न येत असल्यामुळे [illegible] चालला असावा, हें एकदम [illegible] आलें. शत्रूनें गच्चीच्या वरील [illegible] नाहीं हा नेहमींचा शिरस्ता मोडून किल्ल्यांतील लोक बेसावध असतांना किल्ल्यावर छापा घातला, आणि शत्रूचे लोक आंत घुसत असलेले पाहून आपलें सैन्य त्यांच्याशीं लढत आहे, ही गोष्ट चूडामणीच्या तात्काळ ध्यानीं आली.

युद्धांतील वीरांच्या गर्जना कानीं पडल्या. बरोबर पूर्वीच्या साहसानें गरम झालेल्या चूडामणीच्या रक्तास जणूं काय उकळी फुटली, आणि तो बाहेरच्या काळोखास न जुमानतां तडक युद्धाच्या गर्दीकडे पळत चालला. किल्ल्यांतील लोक सावध झाले, त्यांनीं मशाली पेटविल्या आणि तेही आपआपलीं हत्यारें घेऊन युद्धास निघाले. चूडामणी तटापाशीं गेला, त्यावेळीं पुष्कळ शत्रू आंत घुसले आहेत, आणि किल्ल्यांतील लोक आपले अधिकारी अद्यापि आले नाहींत. म्हणून खोळंबून न बसतां मोठ्या शौर्यानें लढत आहेत असें त्यास आढळून आलें. चूडामणी यावेळीं एखाद्या राक्षसाप्रमाणें लढत होता. त्याच्या शौर्याची किल्ल्यांतील लोकांना चांगली ओळख होती; म्हणून चूडामणी स्वतः लढत आहे, हें दृष्टीस पडल्याबरोबर त्या लोकांना हुर्प आली, आणि अर्ध घटकेच्या आंत लढाईचा रंग पालटला. किल्ल्यांतील लोक बेसावध असतां आपण हल्ला केल्यास आपला जय होईल, ही गोष्ट वीरसेनास प्रथम जितकी सोपी वाटत होती, तितकीच ती आतां कठीण वाटूं लागली.

किल्ल्याच्या तटापाशीं तुंबळ युद्ध चाललें असतां तो कोलाहल दिवाणखान्यांत कोंडलेल्या वीरांच्या कानीं आला, आणि त्यांनीं आटोकाट प्रयत्न करून दरवाजा फोडून ते वाड्याच्या अंगणांत आले. मोकळ्या जागीं येतांच त्यांनीं प्रथम पुढें काय करावयाचें याचा उभ्याउभ्या विचार केला. सध्यांच्या प्रसंगीं आत्मसंरक्षणासाठीं, आणि जयहानि होऊं नये म्हणून युद्ध बंद करून [illegible] शत्रूच्या हातीं शरणागत असा त्यांनीं

त्यावेळीं दंडधर म्हणाला,—'दृढसंध महाराज हे बागलाणामधीलच काय, पण आमच्या सर्व राजपुत्रांमध्ये महिल्या प्रतीचे संस्थानिक आहेत, तसेच ते मानानें मोठे आहेत, तसेच ते अनुभवानेंही मोठे आहेत. अशा स्थितींत, जर ते येथें असते, तर आम्हांला त्यांनाच आपले सेनाध्यक्ष नेमणें अगत्याचें होतें. ते स्वतः आले नाहींत, तरी त्यांनीं आपल्या पुत्राला इकडे पाठविलें. हेंही आपलें भाग्यच केलें. आपले पुत्र कर्ते झाले म्हणजे आपल्यावरील जबाबदारी त्यांच्यावर पडते. प्रत्येक पित्याचें कर्तव्यच आहे. त्यांनीं अर्थी आपलें कर्तव्य केलें आहे. अर्थी त्या थोर पुरुषाच्या सन्मानार्थ आम्हींही आपलें कर्तव्य केलें पाहिजे. म्हणून राजपुत्राला आपण सर्वांनी सेनापतींच्या ठिकाणीं समजून यांचा योग्य सन्मान केलाच पाहिजे. यासाठीं यांनीं हा बहुमानाचा स्वीकार करावा अशी माझी विनंति आहे.'

त्यावर शेखर लगेच बोलला,—'हे सेनापति माझ्या परामर्श्याविषयासंबंधानें जें काय बोलले, तें योग्यच आहे. पण त्यांच्या अंगीं शतांशसुद्धां मान नाहीं. शिवाय सध्यां हे थोर पुरुष आपणा सर्वांच्या सुदैवानें आपणांमध्ये नाहींत, आणि त्यांनीं जो आदेश दिला आहे, त्याला ते सर्वथैव पात्र असतां मी कर्तव्यकर्म इमानें झालों, तर जर त्यांना बाजूस ठेवीं यांच्या तो मोठा अन्याय देववत नाहीं!' सूचनेला मान

शेखरानें तरी दंडधरासह बाकीच्या सैन्याचा आग्रह सोडला नाहीं. आपला हट्ट शिकस्त करणें म्हणण्याची सोडिला नाहीं. आपला हट्ट सैनापतीचा जानें शेखराला करणें

झालें. शेखर हा मानमरातबाचा फारसा भुकेला नव्हता, म्हणूनच तो नको म्हणत होता असें नव्हे, तर केवळ अगदीं नाइलाजानें वडिलांची आज्ञा म्हणून तो या मोहिमेवर आला होता. स्वतः रत्नाकर या व्यक्तीवरून आणि त्याच्या एकंदर राज्यव्यवस्थेवरून त्याचें मन साफ उडालें होतें, म्हणून या मोहिमेसंबंधानें आपणावर जितकी जबाबदारी कमी असेल तितकें बरें, असें त्यास वाटत होतें, म्हणून तो नको म्हणत होता. परंतु जेव्हां त्याला सेनापतिपदाचा स्वीकार करावा लागला, तेव्हां सत्यनिष्ठेसाठीं त्याला रत्नाकरासंबंधाचा तिटकारा बाजूस ठेवून अंगीकृत कार्य इमानें इतबारें करणें जरूर झालें. ज्या बैठकींत त्याच्याकडे सेनापतित्व आलें, त्याच बैठकीस त्यानें पुढें काय करावयाचें याचा विचार सुरू केला. त्यानें असें प्रतिपादन केलें कीं, वीरसेन जोंपर्यंत आपल्यापासून जवळ आहे, तोंपर्यंत तो आपणांस त्रास दिल्याखेरीज राहणार नाहीं. यासाठीं अगोदर त्याचा पुरा मोड केला पाहिजे. हा त्याचा विचार सर्वांस मानवला, आणि त्याच बैठकींत वीरसेन ज्या गांवचा आश्रय धरून बसला होता, त्या गांवाला एकदम वेढा घालावयाचा असा विचार ठरला. शेखराची सेनापतीचे जागीं नेमणूक झालेली असल्यामुळें ही मोहीम त्यानें स्वतः पार पाडावी असें ठरलें, आणि दुसरें सहा हजार सैन्य घेऊन शेखर तिकडे गेला.

ज्या गांवाचा आश्रय करून वीरसेन बसला होता, त्या गांवाचें नांव महीपुर असें होतें. हें गांव बरेंच मोठें असून त्याच्या भोंवतीं मजबूद तट होता. म्हणूनच वीरसेन या गांवामध्यें राहिला होता. या गांवाच्या तीन बाजूस मोठे मोठे डोंगर आणि चवथ्या बाजूस सपाट प्रदेश होता. या सपाट प्रदेशामध्यें एक मोठें जीर्ण प्राचीन देवालय असून त्या देवालया-

भोंवतीं दगडी धर्मशाळा होत्या. शेखरानें महीपुरास वेढा घातल्यावर त्यानें आपल्यासाठीं निराळा तंबू न मारतां तो या देवालयामध्यें राहिला होता. त्याच्या हाताखालच्या सैनिकांनीं आपणासाठीं जे तंबू उभारलेले होते, ते आपापल्या सोईप्रमाणें आपल्या हाताखालचें सैन्य जेथें जेथें वेढा देऊन बसलें होतें तेथें तेथें उभारले होते होतां होईल तितका प्रयत्न करून रक्तपात टाळावा, ही शेखराची इच्छा असल्यामुळें, शेखरानें महीपुरास वेढा घातल्यानंतर एक दूत पाठवून शरण येण्याविषयीं वीरसेनास निरोप पाठविला. या निरोपाचा कांहीं उपयोग झाला नाहीं, म्हणून शेखराला पुढील उद्योग मोठ्या नेटानें करावा लागला.

सध्यां शेखराच्या मनाची स्थिति काय होती, हें येथें सांगणें भाग आहे. चूडामणीचा कांहींच पत्ता लागत नसल्यामुळें त्याला फार वाईट वाटत होतें. चूडामणीनें त्याचे जरी इतके अपराध केले होते, तरी ते सर्व तो विसरून गेला होता. तथापि आपल्या भावानें जें घोर कृत्य केलें त्याचें त्याला फार वाईट वाटे. या मोहिमेवर येण्या पूर्वीच म्हणजे शेखर प्रतापपुरीं असतांनाच चूडामणीच्या घोर कृत्याचें वर्तमान त्यास व त्याच्या पित्यास समजलें होतें, परंतु तें अगदीं संक्षेपानें समजलें होतें. युद्धाचे वेळीं परिस्थिति फार नाजूक झालेली असते, त्यावेळीं कोणचा मनुष्य काय कृत्य करील याचा नेम नसतो, म्हणूनच चूडामणीनें गोवर्धनाचा प्राण घेतला असावा, असें समजून त्यावद्दल दृढसंधाला फारसें वाईट वाटलें नव्हतें, आणि त्यानें आपल्या पुत्राच्या त्या वर्तनासंबंधानें तिरस्कारही प्रदर्शित केला नव्हता. चूडामणीनें गोवर्धनाचा अन्यायानें प्राण घेतला असेल, असें दृढसंधाला वाटत नव्हतें. पण आपला बंधु किती अविचारी आहे, ही गोष्ट शेखरास चांगली माहीत असल्यामुळें चूडामणीनें तें कृत्य केवळ अविचारानेच केलें असावें, असें त्यास वाटत होतें. शेखर जेव्हां या मोहिमेवर आला, तेव्हा [illegible] चूडामणीच्या कृत्याचें यथार्थ [illegible] गुकच्छ नगर शत्रूच्या हातीं [illegible] ही पक्षांतील लोकांनीं चूडामणीचा [illegible] शोध केला असतांही त्याचा [illegible] नव्हता. यावरून तो जिवंत आहे [illegible], या गोष्टीचा शेखराला उलगडा [illegible] मा, म्हणून तो मोठ्या फिकिरीत होता. शेखर मोठा न्यायी पुरुष असल्यामुळें [illegible] धूस त्याच्या अपराधाबद्दल [illegible] होणें योग्य आहे, हें जाणून [illegible] चूडामणीनें जिवंत राहून [illegible] त्ताप करावा, आणि पश्चात्ताप [illegible] शुद्ध झाल्यावर मग त्याला [illegible] ाली तरी ती त्यानें मोठ्या [illegible] करावी, असें शेखरास वाटत [illegible]

शेखराच्या [illegible] थतेस एवढेंच एक कारण [illegible] सध्यां ज्या महत्कार्याचा [illegible] शिरावर घेतला होता, तें त्या [illegible] वडत नव्हतें. केवळ वडिलां [illegible] मान देऊन तो या मोहिमेवर [illegible] ग येथें आल्या वर सगळ्या [illegible] च्याच शिरावर पडला. [illegible] निंबराजाच्या हातीं जाऊं [illegible] जिवापाड श्रम करीत होता [illegible] जुलमी आहे, किंवा राज्य [illegible] क नाहीं, असें शेखराला केव्हां [illegible] उलटपक्षीं राज्यसूत्रें त्या [illegible] ाम्यास प्रजेची आवादानी होत [illegible] वाटत होतें. परंतु निंबराजाचा [illegible] राज्य त्याच्या हातीं गेल्यास मुंद [illegible] नारायणपुरकर हे आपले [illegible] वैरी प्रबळ होऊन आपल्या [illegible] करतील, असें वारंवार त्या [illegible] येऊन हें नावडतें मोहिमेचें [illegible] मोठ्या जिकिरीनें करावें [illegible] डिलांच्या

आज्ञाप्रमाणें त्याला या मोहिमेवर येणें भाग पडलेंच होतें, परंतु जरी वडिलांची आज्ञा नसती, तरी क्षात्रधर्मास अनुसरून त्याला या मोहिमेवर येणें जरूर झालें असतें. त्या वेळच्या क्षात्रधर्माच्या समजुती फार तीव्र असल्यामुळें जर शेखरानें या मोहिमेवर जावयास मागें घेतलें असतें, तर त्याला सर्व लोकांनीं भ्याड म्हटलें असतें. त्यानें पूर्वी जे पराक्रम केले होते, त्याचा कोणीही विचार केला नसता. 'संभावितस्य चाकीर्तिर्मरणादतिरिच्यते' या गीतावचनाप्रमाणें शेखराला आपल्या अपकीर्तीचें मरणाहून अधिक दुःख झालें असतें.

शेखराच्या मनाला जी अस्वस्थता वाटत होती, तिजमध्यें नवविवाहित पत्नीच्या वियोगदुःखाचीही भर पडलेली होती. ती स्वतः वीरकन्या आणि वीरपत्नी असल्यामुळें तिनें शेखराच्या प्रस्थानाच्या वेळीं त्याला मोठ्या बाणेदारपणानें परवानगी दिली होती हें खरें, तथापि वियोगदुःखानें त्यावेळीं तिचे नेत्र अश्रुपूर्ण झाल्याखेरीज राहिले नव्हते. वी[illegible]या नात्यानें तिला आपला पति युद्धाला चालला या गोष्टीचा आनंद वाटत होता, पण पतिनिष्ठा तिच्या अंतःकरणांत उज्ज्वल असल्यामुळें आपल्या पतीच्या गमनास अनुमोदन देऊन तिला खेद होणें, हें अपरिहार्य होतें.

अशा प्रका[illegible]स्थिति अस[illegible] शेखर या मोहिमेवर आला होता, [illegible] देखील त्यानें हातीं घेतलेलें मोठ्या नेटानें चालू ठेविलें होतें नांची अशी रीतच असते कीं, हातीं घेण्यापूर्वीच ते त्यासंबं[illegible] करितात आणि तें काम हातीं घ्यावें न घ्यावें हें ठरवितात. नाइलाजानें त्यांस एकादें काम करावें लागलें तरी तें तें मोठ्या इमानानें करीत असतात. सध्यां शेखरानें जरी या मोहिमेचें काम नाइलाजानें आपल्या शिरावर घेतलें होतें, तरी तो अगदीं मनत होता. त्याला आधिकार मिळ धराला मोठा प्रत्येक गोष्ट प्रसंगीं शेख असून त्या सै काम दक्षतेनें घातल्यानंतर सु ण्यासारखी एका कारण किल्ल्याम असेल, आणि अशी शेखराची क अगदीं आयत्या वेळ पांच हजार आणि शहर शत्रूंनीं रोख दर भराभर खजिना अ मुळें आपल नाहीं ही गो त्यानें शत्रू शक्य ते प्रय[illegible] इलाज चालेना. [illegible] काय, [illegible] ठिकाणीं [illegible] एकाही प्रयत्नांत यश [illegible]

[illegible] रात्रीं दहा घटकांचे सुमारास [illegible] त्याच्या ओरींत एकटाच बसला [illegible] त्याच्या पुढें कागदपत्रांचे मोठ[illegible] ठेवलेले होते. निरनिराळ्या [illegible] सरदारांकडून जीं पत्रें आलीं [illegible], किंवा त्याच्या पक्षांतील लोकांनीं जीं [illegible] त्याला पत्रें पाठविलीं होतीं, तीं वाचून त्यांचे जबाब लिहिण्यांत तो अगदीं गढून गेला होता. बराच वेळ काम केल्यावर त्याला थकवा आला म्हणून त्यानें आपल्या पुढचे कागद बाजूला ढकलले, आणि

भधिक काम
ाला कधींही
कांहींना कांहीं
असतात.
.ऱ्या मनाचे
। पुढें एक
कें भणाणून
दिव्याचें तेज
डोळे मिटून
लोडावर डोकें
ला आपल्या
त्याच्या सद्यः-
मनांत अनेक
मे. आपला बंधु
तर तो कोठें
। आपली
त्यानें जो
अपराधा-
असेल
न त्याच्या-
ून काढ-
आपल्या
मनांत
चाल मे. हिंसेसंबं-
झाले
दर पळस्थलीचा विचा
एक टिपण करून ठेविलें ह
अत्यंत महत्त्वाचें होतें. त्या
सध्यां आपल्या पक्षांतील लोक को
शत्रूचे लोक कोठें आहेत. शत्रूवर
कोणत्या स्थळीं चाल करून गेलों अ
आपल्या मदतीस कोठून किती लोक येती
आणि शत्रुला स्वसंरक्षणार्थ कोठें कशी मद
मागवितां येईल, या गोष्टीचा मोठ्या
चातुर्यानें त्यानें आढावा काढला होता. या
टिपणामध्यें रत्नाकर राजाच्या पक्षाचे
लोक कोठें किती आहेत, आणि निंब-
राजाच्या पक्षाचे लोक कोण कोठें आहेत,
याचें मोठ्या बारकाईनें टांचण केलेलें होतें.

इतकेंच नव्हे, तर महीपुरीं विजय झाल्या-
नंतर पुढें कोठें जावयाचें, आणि शत्रूस
शह कोठून कसा द्यावयाचा; याचा पूर्ण
विचार करून भृगुकच्छ पुनः आपल्या
ताब्यांत घेईपर्यंत कोणत्या मार्गानें जाव-
याचें, याचा शेखरानें पूर्ण खुलासा करून
ठेविला होता. त्याचप्रमाणें कांहीं अक-
ल्पित गोष्ट घडून आल्यामुळें जर मही-
पुरच्या वेढ्यांतून शत्रु निसटला, किंवा
आपणांस वेढा उठवून जाणें जरूर झालें,
तर आपण कोठें जावयाचें आणि काय
करावयाचें, या गोष्टींचाही उल्लेख त्या टिप-
णामध्यें होता. या मोहिमेसंबंधाचे विचार
त्याच्या मनांत घोळूं लागल्याबरोबर त्याला
या टांचणाचें स्मरण झालें, आणि त्या-
टांचणांत टिपून ठेवण्यासारख्या एक
दोन गोष्टी त्याच्या मनांत आल्या, म्हणून
तसें करण्याच्या इच्छेनें त्यानें आपले
मिटलेले डोळे उघडले. तों आपल्या पुढें
असलेला दिवा बराच वेळ वात सारलेली
नसल्यामुळें अगदीं मंद झाला असून
आपल्या भोंवतीं जिकडे तिकडे बराच
काळोख पसरला आहे, असें त्याला आढ-
ळून आलें. इतक्यांत आपल्या ओरीचा
दरवाजा उघडून कोणी तरी आंत येत आहे,
असा त्याला भास झाला. प्रथमतः त्याला
असें वाटलें कीं, आंत येणारा मनुष्य आपला
एक चतुरक अस[illegible], येणारा मनुष्य
पेक्षां उंचेला आहे, हीं गोष्ट त्याच्या
ध्यानीं आली, आणि तो चतुरक
च कोणी आहे, अशी त्याची
येणारी व्यक्ति अत्यंत धिमे-
पाऊल पुढें टाकीत सावकाश
आणि त्या व्यक्तीच्या अंगावरील
चमत्कारिक होता. हें पाहून शेख-
राच्या मनांत शंका आली, आणि त्यानें
'कोण आहे?' असें जोरानें विचारलें.

परंतु येणाऱ्या इसमानें उत्तर केलें नाहीं.
तो तसाच धिमेपणानें एकेक पाऊल पुढें

पुढें येत होता. हें पाहून शेखर पूर्वीप्रमाणें जोरानें बोलला,–'कोण आहेस तूं? बोलत कां नाहींस? खबरदार एक पाऊल पुढें टाकशील तर जड जाईल!' असें बोलून शेखरानें जवळच असलेल्या आपल्या तरवारीचा बंद सोडिला; पण तरवार कांहीं म्यानांतून बाहेर काढिली नाहीं. येत असलेल्या व्यक्तीचा वेष इतका कांहीं चमत्कारीक होता कीं, आपण सध्यां पाहत आहों तो जिवंत मनुष्य आहे, किंवा पिशाच्च आहे, याचा त्याच्या मनांत एक क्षणमात्र संशय आल्याखेरीज राहिला नाहीं.

पिशाचाचा संशय येऊन जातो न जातो तोंच एक कल्पना त्याच्या मनांत उत्पन्न झाली. शत्रूनें आपला प्राण घेण्यासाठीं अशा अपरात्रीं एकादा मारेकरी तर पाठवला नसेल ना, अशी शंका त्याच्या मनांत येणें हें त्याप्रसंगीं अगदीं साहाजिक होतें. शेखर जरी शूर आणि साहसी पुरुष होता, तरी ही शंका मनांत आल्याबरोबर त्याच्या मनास चरका बसल्याखेरीज राहिला नाहीं. अशी शंका त्याच्या मनांत आली, तरी सुद्धां त्यानें आपली तरवार म्यानांतून बाहेर काढली नाहीं. कारण असल्या क्षुद्र मारेकऱ्याच्या रक्तानें आपले हात विटाळावे, हें त्याच्या मानी स्वभावास मुळींच रुचण्यासारखें नव्हतें. वेळ पडल्यास तयारी असावी म्हणून त्यानें आपला तरवारीजवळचा हात मात्र मागें घेतला नव्हता. एक दोन पळें झालीं तरी ती व्यक्ति पुढें आली नाहीं; पण तेवढ्या वेळांत त्या व्यक्तीच्या मुखावर आच्छादन आहे, असें त्यास आढळून आलें; म्हणून तो पुनः म्हणाला,–"मी तुला पुनः आज्ञा करतों, तूं कोण आहेस तें सांग, तुझ्या मुखावर आच्छादन काय म्हणून?

तरी देखील त्या व्यक्तीनें उत्तर दिलें नाहीं. त्या गूढ पुरुषानें अगदीं सावकाशपणें आपले दोन्ही हात पांघरुणांतून बाहेर काढले व अगदीं मंदगतीनें आपल्या मस्तकाकडे नेले, आणि आपल्या मुखावरील आच्छादन हळु हळु दूर करण्यास प्रारंभ केला. दिव्याच्या मंद प्रकाशामध्यें त्या पुरुषाचा पांढरा फटफटीत चेहरा हळु हळु व्यक्त होऊं लागला, आणि शेखराच्या मनांतील मारेकऱ्याची शंका पार नाहींशी होऊन तिच्या ऐवजीं पुनः पिशाचाची शंका प्रबळ होऊं लागली. आपल्या पुढें जिवंत मनुष्य नसून एकादें पिशाच उभें असावें, असें त्याला वाटूं लागलें. त्याचा चेहरा जसजसा स्पष्ट दिसूं लागला, तशीतशी त्याच्या मनांतील पिशाचाची शंका अधिकाधिक दृढ होऊं लागली! आणखी एक पळ लोटण्यापूर्वीच आपणापुढें खरोखर एक पिशाच उभें आहे, अशी [illegible] समजूत झाली!"

शेखराचा भुतांवर [illegible] विश्वास नव्हता, सरीसुद्धां या [illegible] मनाची मोठी विलक्षण स्थिति [illegible] लोक ज्याला मृत समजत होते, तो [illegible] अशा अपरात्रीं, अशा चमत्कारिक [illegible] आपल्यापुढें उभा राहिलेला [illegible] आणि त्याच्या मुद्रेवरील क्षुद्र [illegible] पाहून शेखराच्या बुद्धीस पिशाचाचा [illegible] यांत कांहींच आश्चर्य नाहीं. [illegible] तीक्ष्ण दृष्टीनें टक लावून पाहत [illegible] पहातां समोरील आकृति उत्तरोत्तर [illegible] लक्ष्यांत अधिकाधिक भरूं लागली, आणि त्या आकृतीचे ठिकाणीं शेखराला चूडामणि दिसूं लागला! त्याच्या मुद्रेवर प्रेतकळा ओतप्रोत भरून राहिली असल्यामुळें आपला बंधु मृत झाला असावा, असें जें कित्येक वेळां त्याला वाटत असे तें अगदीं खरें आहे अशी त्याची खात्री पटली; त्याला फार खेद झाला. त्याच्या आंतड्यांस पीळ पडूं लागला, आणि त्याची मुद्रा दुःखानें काळवंडून गेली. इतकें झालें, तरी त्या धैर्यवान् पुरुषाच्या मनाला भीतीचा नुसता स्पर्शही झाला नव्हता.

आणखी एक दोन पळें लोटल्यावर शेखरानें आपलें बावरलेलें मन ताब्यावर आणिलें, आणि अत्यंत गंभीर स्वरानें त्यानें विचारिलें, " प्रिय बंधो ! तुझी ही अशी अवस्था पाहून मला फार खेद होतो ! तूं जिवंत आहेसना ? कीं तुझ्या मनांतील एकादी इच्छा पूर्ण न झाल्यामुळें तुला पिशाचयोनि प्राप्त झालेली आहे ? "

तरी देखील त्या आकृतीनें स्पष्ट उत्तर दिलें नाहीं. तिचे ओठ मात्र थोडेसे हालले, परंतु दीपप्रकाश उत्तरोत्तर अधिकाधिक मंद मंद होत असल्यामुळें शेखराला कांहींच अर्थबोध झाला नाहीं. त्या आकृतीनें फक्त आपला [illegible] उचलिला, व शेखराला आपल्या [illegible] खूण केली, आणि लागलाच [illegible] रस्ता धरिला. शेखरानें [illegible] करतां तो एकदम आपल्या [illegible] गेला. आपला बंधु एकाद्या [illegible] देण्यासाठीं येथें आला [illegible] त्याची एकादी इच्छा पूर्ण [illegible] म्हणून, त्यासाठीं तो आ[illegible]हे ? असे दोन तर्क [illegible] आले; पण त्यांचें निराकरण [illegible] तो थांबला नाहीं. [illegible] आणि त्या आकृती [illegible]. फार तर काय, आपण [illegible] जात आहों, ही गोष्ट सुद्धां त्याच्या मनांत आली नाहीं, आणि जरी कदाचित ती गोष्ट त्याच्या ध्यानीं आली असती, तरी देखील तो तेवढ्यासाठीं वेळ मोडण्यास तयार झाला नसता.

बंधूच्या आकृतीमागून शेखर देवालयाच्या आवारांत आला. बाहेर मंद मंद चंद्रप्रकाश पडला होता. पावसाळा नुकताच संपला असल्यामुळें जमीन अद्यापि मऊ होती. त्यामुळें त्यांच्या पावलांचा आवाज झाला नाहीं. शेखराला चोरेजावीची हौस अगदीं नसल्यामुळें त्यानें देवळावर चौकी पहारा बसविला नव्हता. आणि तेथें चौकी पहाऱ्याची गरजही नव्हती. मध्यरात्रीचा समय असल्यामुळें जिकडे तिकडे शांतता पसरलेली होती. अशा वेळीं तो त्या आकृतीमागून चालला असल्यामुळें ती गोष्ट कोणालाही समजणें शक्य नव्हतें. देवळाच्या महाद्वारांतून ते दोघे बाहेर पडले. पुढील आकृतीनें जवळच्या डोंगराकडे जाणारा रस्ता धरिला. थोडा वेळ सरळ रस्त्यानें गेल्यावर त्या आकृतीनें तो मार्ग सोडला आणि ती आकृति तेथील नुकत्याच एका कापलेल्या शेतांतून पुढें जाऊं लागली. लवकरच ती आकृति एका झाडींत शिरली. या भागांत चंद्रप्रकाश अगदीं तुरळक असल्यामुळें बराच काळोख होता, तरी शेखर अगदीं निर्भय चित्तानें त्या आकृतीमागून चाललाच होता. अशारीतीनें अर्धघटका चालल्यावर ते दोघे एका टेंकडीच्या पायथ्याशीं आले, आणि ती टेंकडी चढूं लागले.

प्रकरण ४८ वें.

हरवलेला सेनापति.

दुसरे दिवशीं सूर्योदयापूर्वीच चतुरक जागा झाला, आणि आपला धनी उठला कीं नाहीं हें पाहण्यासाठीं तो त्याच्या ओरींत आला; पण शेखर तेथें नव्हता, म्हणून तो पुनः आपल्या दुसऱ्या उद्योगास लागला. थोड्या वेळानें दंडधराकडील एक सेवक चतुरकापाशीं आला, आणि तो आपल्या धन्याच्या आज्ञेवरून शेखराची चवकशी करूं लागला. कारण त्या दिवशीं सकाळींच सर्व प्रमुख सैनिकांनीं एकत्र होऊन पुढें काय करावयाचें याचा नक्की ठराव करावयाचा होता. वेढा घालून बरेच दिवस झाले असतांही शत्रु शरण येत नाहीं, म्हणून आपण होऊन शहरावर स्वारी करावी, असें कित्येकांचें म्हणणें होतें; पण उतावीळ करा-

वयाची नाहीं, असा शेखराचा विचार असल्यामुळें त्यानें एकेक दिवस पुढें लोटण्याचा क्रम सुरू टेविला होता. वास्तविक पाहिलें तर शत्रूवर चालून जावें कीं न जावें हा विचार रात्रीं ठरवून सकाळींच स्वारीस आरंभ व्हावयाचा; पण एकदोन दिवसांत शत्रु आपण होऊन युद्धास प्रवृत्त होतील, असें शेखराला वाटत असल्यामुळें मुद्दाम एक दिवस फुकट जावा म्हणून, त्या दिवशीं सकाळची वेळ केवळ वाटाघाट करण्यांत घालवावयाची अशा उद्देशानें त्यानें सर्व प्रमुख सैनिकांस रात्रीं नीट विचार करून, व आपापला निश्चय ठरवून सूर्योदयाबरोबर एकत्र होण्याची सूचना दिली होती. त्याप्रमाणें सर्व प्रमुख सैनिक दंडधराच्या तंबूंत एकत्र झाले असून त्यांनीं शेखराकडे सूचना पाठविली होती; दंडधराचा दूत आल्यावर चतुरक पुनः ओरींत गेला. पण शेखर तेथें त्याच्या दृष्टीस पडला नाहीं,

आणखी एक घटका गेली, तरी शेखराचा कोठें थांग लागेना, यामुळें सर्व छावण्यांतून त्याचा शोध करणें जरूर झालें. तो जेथें जेथें जाण्याचा संभव होता, तेथें तेथें चौकशी झाली, पण व्यर्थ! अर्थात् सर्व सैनिक मोठ्या गूढांत पडले. शेखराचा पत्ता नाहीं, हें समजतांच जांघिळाचें मन फारच व्यग्र झालें, आणि तो त्याच्या शोधास लागला. त्यानें प्रथम ओरीची तपासणी केली, त्यावेळीं शेखर रात्रीं बिछान्यावर निजला असल्याचें कांहींच चिह्न त्याला दिसलें नाहीं. दिवा कोणीच मालविला नसल्यामुळें त्याची वात पार जळून गेलेली जांघिळाच्या दृष्टीस पडली. समईत राहणाऱ्या तेलाच्या अंदाजावरून दिवा तेवत असतांच शेखर ओरींतून बाहेर पडला असावा, असें त्यानें एकदम अनुमान केलें त्याचा पोषाक जागच्याजागीं होता, त्याची तरवारही त्याच्या आसनापाशींच होती; आणि तो जे कागद पाहत होता, ते जागच्याजागीं अस्ताव्यस्त पडलेले होते, या चिन्हांवरून तो येथून घाईघाईनें निघून गेला होता, हेंही जांघिळाच्या लक्ष्यांत आलें. म्हणून त्यानें तो रात्रीं कोठें गेला होता कीं काय याची चौकशी केली, पण प्रहर रात्रीनंतर शेखराला पाहिल्याचें कोणांही सांगेना. अर्थात् शेखराचा कोणी तरी विश्वासघात केला असावा, असें जांघिळाच्या मनानें घेतलें त्यानें तत्काळ आसपासचा प्रदेश शोधण्यासाठीं आपल्या सैन्यांतील माणसें रवाना [illegible] आणि तो स्वतःही त्याच काम[illegible]. देवळाच्या आवारास दोन [illegible] त्यांपैकीं महाद्वार शेखराच्यो [illegible] जवळ असल्यामुळें त्या द्वारांतून तो बाहेर पडला असावा, असा तर्क [illegible] महाद्वारांतून बाहेर पडला.

सेनापति [illegible] नाहींसा झाला, ही बातमी [illegible] वणव्यासारखी पसरली, [illegible] सैनिक हवालदील झाले. शेखर अशा [illegible] अकस्मात् नाहींसा झाला, हें पक्कें [illegible] अनेक तर्क सुरू झाले. [illegible] शेखर शत्रूला फितूर झाला, [illegible] छावणी सोडून निघून [illegible], असाही तर्क केला होता. [illegible] या तर्काचा परिणाम फार वाईट [illegible] राजपुत्रासंबंधाचे अनुदार विचार [illegible] पुरकर आणि वत्सपुरकर भिल्ल सैनिकांस पटले नाहींत, त्यामुळें त्यांचीं मनें बिथरलीं. दंडधराला मात्र अशी शंका मुळींच आली नाहीं. त्यानें द्युम्यम सेनापति या नात्यानें शेखराच्या ओरींतील सर्व कागदपत्रें आपल्या ताब्यांत घेतलीं. त्या कागदांमध्यें शेखरानें केलेलें मोहिमेसंबंधाचें टांचण अगदीं वरच होतें. नुसतें तें टांचण पाहिल्याबरोबरच शेखर या मोहिमेबद्दल किती काळजी घेत होता, हें दंडधराच्या लक्ष्यांत आलें, आणि शेखर फितूर झाला असेल अशी शंका जर त्याच्या मनांत केव्हां आली असली, तर तिचें निराकारण

झालें. दंडधरानें कित्येक विश्वासु सैनिकांस तो कागद दाखवून शेखरावरील आक्षेपाचें निरसन केलें. तो परत येईपर्यंत आपण काय करावें, याचा त्यांस मोठा विचार पडला. ते सर्वजण दंडधराच्या तंबूंत एकत्र जमून त्यांनीं पुढील बेत सुरू केले.

जांघिळमामा हा शिकारीच्या कामीं मोठा तरबेज असल्यामुळें तो पावलांच्या खुणा ओळखण्यांत मोठा पटाईत होता. देवालयाच्या महाद्वारामधून बाहेर पडल्यावर त्यानें प्रथम सरळ मार्ग [illegible] तो थोडा वेळ त्या मार्गानें [illegible] तेथपर्यंत गेला तेथपर्यंतच्या [illegible] सैनिकांची बरीच रहदारी [illegible] त्यावर पुष्कळच पावलांच्या खुणा [illegible] पण सध्यां तो जेथें [illegible] पावलांच्या खुणा फारच थोड्या [illegible], आणि त्या खुणांपैकीं दोन माणसांच्या [illegible] खुणा हळूहळू रस्त्याचा [illegible] एका बाजूकडे जातां जातां [illegible] शालेल्या आहेत, असें [illegible] आलें. त्यावरून कोणी तरी [illegible] माणसें रस्ता सोडून बाजूच्या शेतांत [illegible] त्या जागीं त्याच्या लक्ष्यांत [illegible] जांघिळानेंही रस्ता सोडिला [illegible] काप लेल्या शेतांत उतरला [illegible] माती भुसभुशीत आणि ओलसर असल्यामुळें तिच्यावर दोन माणसांच्या पावलांच्या खुणा अगदीं स्पष्ट दिसत होत्या, आणि त्या खुणांवरून तेथून जाणारे माणूस समोरच्या झाडीकडे जात असले पाहिजेत असा त्यानें सहजच तर्क केला. या खुणा अगदीं ताज्या दिसत असल्यामुळें हीं माणसें कांहीं वेळापूर्वी अर्थात् अपरात्रीं या जागेंतून गेलीं असावीं, या त्याच्या अनुमानास बळकटी आली, आणि तो मोठ्या उत्साहानें त्या देशांतून पुढें चालला. झाडीपाशीं आल्यावर मात्र जांघिळाचें काम फार चिकट झालें; कारण तेथें जिकडे तिकडे झाडांचा पालेरा पडलेला असल्यामुळें पावलांचा माग लागेनासा झाला होता. अर्थात् शेतांतील पावलांच्या खुणांच्या शोकावरून केवळ अनुमानानेंच त्याला झाडींत शोध करणें भाग झालें होतें. आपण जिकडे जात आहों तिकडेच तीं माणसें गेलीं कीं नाहींत, हें पाहण्यासाठीं तो आपल्या दोन्ही बाजूंच्या प्रदेशाकडे लक्ष्यपूर्वक अवलोकन करीत चालला होता, म्हणून एका कांटेरी झाडाला अडलेली एक चिंधी त्याच्या नजरेस पडली. ही चिंधी हातीं घेऊन त्यानें बारकाईनें तिचें निरीक्षण केलें; कापडाची सफाई आणि सुताचा तलमपणा, यांवरून तें वस्त्र धारण करणारा पुरुष श्रीमान् घराण्यांतील असावा असा तर्क साहजिकपणें त्याच्या मनांत आला, आणि इतक्या अवघड जागीं येण्याचें श्रीमान् पुरुषाला एवढें काय कारण झालें असावें असा प्रश्न त्याच्यापुढें उभा राहिला. ज्या ठिकाणीं ही चिंधी अडकलेली होती, तेथें त्याच कांटेरी झाडाची एक फांदी मोडलेली त्याच्या दृष्टीस पडली. त्या फांदीचीं पानें अद्यापि सुकलीं नव्हतीं, किंवा त्यांचा रंगही पालटला नव्हता, यावरून ती फांदी मोडल्यापासून तिजवर ऊन पडलेलें नव्हतें, ही गोष्ट जांघिळाच्या ध्यानीं आली, आणि अपरात्रीं या रस्त्यानें जाणारा श्रीमान् पुरुष शेखरच असला पाहिजे, अशी त्याच्या मनाला खात्री वाटूं लागली. शेखर स्वभावतः साहसी असल्यामुळें त्याला या प्रदेशांत कोणी तरी शत्रु छळून बसल्याची बातमी लागली, आणि तो अपरात्रीं एकटा आपली खात्री करून घेण्यासाठीं त्या बातमीदाराबरोबर बाहेर पडला असावा, असें एकदां त्याच्या मनांत आलें, पण तितक्यांत शेखरानें आपली तरवार बरोबर घेतली नव्हती, या गोष्टीची त्याला आठवण होऊन हा आपला तर्क चुकीचा आहे, असें त्यास वाटलें, आणि शेखराच्या त्या कृतीचें दुसरें कांहीं तरी कारण शोधण्यांत गुंग होऊन जांघिळ तसाच

विचार ठरविला. ते सर्वजण एकजुटीनें निशाणाखालीं गेले आणि त्यांनीं किल्ला स्वाधीन केल्याची खूण म्हणून निशाण खालीं उतरलें. निशाण उतरल्याची बातमी सुमारें दहा पांच पळांच्या आंतच सर्व सैन्यास समजली आणि लढाई बंद झाली.

आपले प्रमुख गोवर्धनाच्या वाड्यांत एकत्र जमून विचार करीत आहेत, ही गोष्ट किल्ल्यांतील सैन्यास माहीत असल्यामुळें किल्ल्यावरील निशाण एकदम खालीं उतरलेलें पाहून कोणासही आश्चर्य वाटलें नाहीं. सुमारें अर्ध्या घटकेच्या आंत निंबराजाचा सेनापति किल्ल्यांत शिरला, आणि त्याची व किल्ला ताब्यांत देणाऱ्या तेवीस सैनिकांची गांठ पडली. किल्ल्यांतील फौज हत्यारें खालीं ठेवीत असेल तर आपण सर्वांस जीवदान देऊं असें वीरसेनानें सांगितलें, व त्याचें तें भाषण तेवीस सैनिकांनीं मान्य केलें. याच वेळीं चूडामणीनें गोवर्धनाचा खून केल्याचें वर्तमान दोन्ही सैन्यांतील लोकांस समजलें, आणि तें वर्तमान वणव्याप्रमाणें सर्व किल्ल्यांत पसरलें. चूडामणीच्या त्या कृत्याचा सर्वांस तिटकारा आला. त्यांतल्यात्यांत जे सैनिक प्रत्यक्ष गोवर्धनाच्या हाताखालीं होते, त्यांना तर या कृत्याचा मोठा संताप आला, आणि ते चिडून जाऊन त्याचा शोध करूं लागले. अजून त्यांनीं आपलीं हत्यारें शत्रूच्या स्वाधीन केलेलीं नव्हतीं. त्यांनी वीरसेनाची भेट घेऊन आपल्या सेनापतीचा ज्यानें खून केला, त्या नराधमाचा प्राण घेतल्याबरोबर आम्हीं आपलीं हत्यारें खुषीनें स्वाधीन करूं अशी त्याला विनंति केली, आणि वीरसेना लाही चूडामणीच्या नीच कृत्यामुळें त्वेष आला असल्यामुळें त्यानें त्या लोकांचीं हत्यारें तात्काळ काढून घेतलीं नाहींत. जिकडे तिकडे मशालीच मशाली झळकूं लागल्या, आणि 'तो नीच, खुनी, विश्वासघातकी, अधमाधम चूडामणी कोठें आहे, त्याला पकडा! त्याला जिवंत जाळलें पाहिजे! त्याला मुसतें फांशीं चढवून भागणार नाहीं! दरवाजे बंद करा! घरान् घर शोधून त्याला हुडकून काढा! अशा प्रकारचा एकच कल्होळ सुरू झाला!

सर्व किल्ल्यामध्यें येथून तेथून एकच गोंधळ सुरू झाला. प्रत्येकजण चूडामणीचा शोध करण्यासाठीं प्रयत्न करीत होता. मशाली इकडून तिकडे आणि तिकडून इकडे नाचत होत्या. आपण हत्यारबंद असून शत्रू आपल्या समीप आहे, त्याच्याशीं आपण दोन हात करावे, असें यावेळीं कोणाच्याही मनांत येत नव्हतें. प्रत्येकाला चूडामणीला गांठून त्याचा प्राण घेण्याची उत्कंठा लागली होती. कित्येक लोक जिवंत माणसांमध्यें त्याचा शोध करीत होते, तर कित्येक लोक चूडामणी ज्या ठिकाणीं लढत होता, त्या ठिकाणचीं प्रेतें शोधून त्यांत त्याचें प्रेत तरी सापडतें कीं काय याचा शोध करीत होते. अशारीतीनें सर्वांनीं एकमतानें त्याचा बराच वेळ शोध केला, पण त्याचा कोठें मागमूसही लागला नाहीं.

शेवटीं सर्व सैनिकांनीं आपल्या दहा तुकड्या केल्या व शहराचे दहा विभाग करून शहरांतील प्रत्येक घराची कसून झडती घेतली; पण व्यर्थ! सूर्योदय झाला, तरी चूडामणीचा पत्ता लागला नाहीं.

प्रकरण ४७ वें.

बलभुवनाची लढाई.

भृगुकच्छ नगर निंबराजाच्या स्वाधीन झाल्यावर रत्नाकर राजाच्या पक्षाची सर्व मंडळी त्या शहरांतून बाहेर पडली. त्या सर्वांनीं भृगुकच्छ नगरापासून सुमारें तीस कोसांवर असलेल्या बलभुवन नामक लहानशा शहरामध्यें जाऊन पुनः नवीन दमानें राजकार्यास आरंभ केला. त्यांनीं आपल्यापैकीं दंडधर या नांवाच्या एका शूर व

साहसी सरदाराची सेनापतीचे जागी योजना करून त्यांनीं सैन्यांची व हत्याराची जुळवाजुळव चालविली. बलभुवन हें शहर वल्लभीपासून शंभर कोसांवर असल्यामुळें तेथील लोकांस रत्नाकराच्या जुलमी रुत्यांचा फारसा अनुभव आलेला नव्हता. शिवाय कोणत्याही देशांतील लोक आपला राजा कसाही असला तरी तो जाऊन परकी लोकांनीं आपणांवर राज्य करावें असें कधींही इच्छित नाहींत. अशी वस्तुस्थिति असल्यामुळें बलभुवन आणि त्याचा आसपासचा प्रदेश यांतील लोक रत्नाकराच्या पक्षाचे खरे पुरस्कर्ते होते. आपल्या राज्यावर चंपावतीच्या राजानें स्वारी केली व आपल्या राजाचा पराभव झाला; हें वर्तमान त्या प्रदेशांतील लोकांस पसंत पडले नाहीं, त्यामुळें दंडधराला सैन्याची जुळवाजुळव करण्यास फारसे प्रयास पडले नाहींत. सैन्याच्या खर्चासाठीं जें द्रव्य पाहिजे होते तें खर्च करण्यास कित्येक सावकार लोक पुढें झाले, आणि अडचण निवारण झाली.

दंडधर हा स्वतः बलभुवन नगरांतील रहिवासी होता. तो मोठा शूर आहे, अशी त्याची त्या प्रदेशांत मोठी ख्याति होती. अशा प्रकारच्या पुरुषानें सैन्याचा अधिकार आपल्या हातीं घेतला असल्यामुळें पुष्कळ शूर लोक त्याच्यापाशीं गोळा झाले. रत्नाकर राजा सध्यां पदभ्रष्ट झालेला आहे, त्याला पुनः गादीवर बसविण्यांत जर आपल्याला यश आलें, तर आपली मोठी कीर्ति होईल, आणि आपणास मोठा लाभ होईल, ही आशा प्रत्येकास असल्यामुळें पुष्कळ लोक आपल्या पदरचा खर्च करून राजाच्या वतीनें लढावयासाठीं एकत्र झाले होते. दंडधरानें रत्नाकर राजाचा प्रथम शोध केला. तो वल्लभीनगरापासून सुमारें साठ कोस पूर्वेस असलेल्या नंदपुरनामक शहरीं राहत होता. तेथें माणसें पाठवून दंडधरानें आज्ञापत्रें आणवून आपला सेनाध्यक्षाचे जागीं नेमणूक करून घेतली, आणि त्या आज्ञापत्राचे जोरावर दंडधरानें आपल्या पक्षांतील प्रत्येक गृहस्थापासून शक्य तीं मदत मिळविण्याचा उपक्रम सुरू केला. त्यानें पुनः एकदां बागलाणांतील सर्व संस्थानिकांकडे रत्नाकराच्या मोतबासह आज्ञापत्रें पाठवून त्याची मदत मागितली. त्यानें पाठविलेल्या दूतापैकीं एक दूत प्रतापपुरीं गेला होता.

आतां प्रथम युद्धाचें वर्तमान बाजूस ठेऊन आपण शेखराकडे वळूं. त्याला आपण वादळामध्यें चंपावतीपासून दूर पंचवीस तीस कोसांवर सोडलें होतें. वादळ शांत झाल्यावर तो आपल्याबरोबरच्या पांच मंडळीसह पुनः गलबतांत बसला व मध्यें कोणत्याही प्रकारचें संकट न येतां सुरथपुर बंदरांत येऊन पोंचला. चंपावतीहून त्याच्या बरोबर जो निंबराजाचा फितूर झालेला दूत आला होता, त्याला प्रतापपुरीं जाण्याचें प्रयोजन नसल्यामुळें हेमचंद्रानें दिलेलें द्रव्य घेऊन तो सुरथपुरींच राहिला, आणि बाकीचीं मंडळी बागलाणांत गेली. त्रिशूळ पर्वतावरील शिवालयांत आल्यावर शेखरानें मथुरेचें पत्र मणिभद्रास दिलें. आपल्या नातीची खुशाली ऐकून मणिभद्राला फार आनंद झाला, आणि त्यानें शेखराचें मोठ्या आनंदानें स्वागत केलें. सत्यरथाचें निंबराजापाशीं मोठें वजन आहे, आणि मथुरा तेथें मोठ्या वैभवाचा उपभोग घेत आहे, हें ऐकून वृद्ध मणिभद्राला समाधान वाटलें.

दोन तीन महिने अनेक प्रकारचीं संकटें सोसल्यावर पुनः आपण आपल्या वाड्यांत सुखरूप परत आलों, या गोष्टीचा शेखराला, प्रियंवदेला आणि निपुणिका व चतुरक यांना फार आनंद होत होता. तीं पिशाचसोपान घांटानें दरीमध्यें उतरूं लागलीं असतां त्या दरींतील कित्येक भिल्लांनीं त्यांना पाहिलें, आणि आनंदानें त्यांनीं त्यांचें स्वागत केलें. शेखराला निंबराजानें चंपावतीस कैदेंत

ठेविलें आहे, हें क[illegible]या राज्यांतील सर्व लोकां[illegible]सल्यामुळें आपल्या पत्नीसहव[illegible] आला, या गोष्टीचा त्यांना [illegible], आणि त्यांच्या आनंदाच्या [illegible] दरी दणाणून सोडावी, यांत [illegible] रोखराच्या आगमनाचें शुभ [illegible] संधाला कळविल्यास आपण[illegible] मिळेल, असें वाटत अ[illegible] भिल्ल आनंदानें पिशाचसो[illegible] घालतिच प्रतापपुराकडे धांवत सुटले. त्यामुळेंशेखराच्या आगमनाचें वर्तमान त्याच्या पूर्वीच प्रतापपुरामध्यें जाऊन पोंचलें. दृढसंध राजाला हें वर्तमान समजतांच आपल्या पुत्राला सामोरें जाण्याची त्यानें तयारी केली. सुमारें अर्ध घटकेच्या आंत किल्ल्यांतील शेंपन्नास माणसें राजवाड्यापुढें गोळा झालीं, जिकडे तिकडे मंगलवाद्यें वाजूं लागलीं, आणि जमलेले लोक वेशीपाशीं उभे राहून शेखराची वाट पाहूं लागले. त्यांना फार वेळ वाट पाहात राहावें लागलें नाहीं. शेखर लवकरच त्यांच्या दृष्टीस पडला, आणि त्यांनीं शेखराच्या जयजयकारानें आकाशपाताळ एक करून सोडलें.

शेखराच्या आगमनानें आनंदित होऊन दृढसंधराजानें चार दिवस मोठा उत्साह केला. त्यानें या प्रसंगीं द्रव्याकडे विशेष लक्ष्य न देतां दानधर्म पुष्कळ केला आणि आपल्या सैन्यांतील लोकांस पुष्कळ बक्षिसें तसेंच दृढसंधानें आपल्या सैन्यासाठीं जीं उत्तम प्रकारचीं शस्त्रास्त्रें भृगुकच्छ नगरांतून खरेदी करून आणिली होतीं, तीं त्यानें याच आनंदाचे प्रसंगीं सैन्यास दिलीं.

प्रतापपुर सोडल्यापासून पुनः परत येईपर्यंत आपल्या प्रवासामध्यें ज्या ज्या गोष्टी घडून आल्या होत्या, त्या त्या शेखरानें आपल्या पित्याला निवेदन केल्या. त्यावेळीं रत्नाकरराजानें आपला पुत्र मृत झाला असतां त्याच्याऐवजीं दुसरेंच एक मूल पुढें केलें, ही गोष्ट ऐकून दृढसंधाला रत्नाकराचा मोठा तिटकारा आला. त्याचप्रमाणें रत्नाकर राजाचें प्रधानमंडळ किती दुशेस गेले होतें, यांचें जेव्हां शेखरानें आपल्या पित्यापाशीं वर्णन केलें, तेव्हां तर दृढसंध राजाच्या अंगाचा संतापानें तिळपापड उडाला. तसेंच फितुर हिरण्यदत्तानें आपणास विश्वासघातानें पकडून चंपावतीस नेलें, हें वर्तमान शेखरानें त्याला सांगितलें तेव्हां दृढसंधाला इतका कोप आला कीं, या वेळीं जरी शंभर हिरण्यगुप्त त्याच्या समोर असते, तरी त्या सर्वांचें त्याच्या क्रोधाग्नींत भस्म झालें असतें!

शेखराच्या आगमनाचें वर्तमान वृषपतीला कळलें असल्यामुळें तोही आपल्या जामातास भेटण्यासाठीं प्रतापपुरास आला. प्रत्येक प्रकारच्या राजकारणामध्यें वृषपती आपल्या जामाताच्या मनाप्रमाणें वागत असे, तरी दृढसंध राजा आपल्या सासऱ्याला विचारल्याखेरीज कोणतीही महत्त्वाची गोष्ट करीत नसे. शेखरानें सांगितलेलें वर्तमान ऐकून पुढें आपण कोणता मार्ग धरावयाचा याचा दृढसंधाला मोठा विचार पडला. अर्थात् आपला सासरा, पुत्र आणि प्रधानमंडळ यांचें विचार काय आहेत, हें पाहाणें त्याला जरूर झालें होतें. त्यानें एके दिवशीं आपल्या विश्वासांतील सर्व मंडळी एकत्र केली, आणि खलबतखान्यामध्यें बसून पुढें काय करावें याचा विचार चालविला. रत्नाकर राजा जुलमी आणि कपटी असल्यामुळें तो राज्यभ्रष्ट झाला याचबद्दल दृढसंधाला अगदीं वाईट वाटत नव्हतें. आणि रत्नाकर निपुत्रिक असल्यामुळें त्याचा पक्ष घेणें किंवा न घेणें हें सारखेंच होतें. रत्नाकर कसाही असला तरी निंबराजानें त्याच्यावर स्वारी करून त्याचें राज्य बळकावून घेणें, हें कृत्य न्यायाचें नसल्यामुळें निंबराजाला साह्य करावें, हें कधीं चुकूनसुद्धां त्याच्या मनांत आलें

साह्सी सरदाराची सेनापतीचे जागी योजना करून त्यांनीं सैन्यांची व हत्याराची जुळवाजुळव चालविली. वलभुवन हें शहर वल्लभीपासून शंभर कोसांवर असल्यामुळें तेथील लोकांस रत्नाकराच्या जुलमी रुत्यांचा फारसा अनुभव आलेला नव्हता. शिवाय कोणत्याही देशांतील लोक आपला राजा कसाही असला तरी तो जाऊन परकी लोकांनीं आपणांवर राज्य करावें असें कधींही इच्छित नाहींत. अशी वस्तुस्थिति असल्यामुळें वलभुवन आणि त्याचा आसपासचा प्रदेश यांतील लोक रत्नाकराच्या पक्षाचे खरे पुरस्कर्ते होते. आपल्या राज्यावर चंपावतीच्या राजानें स्वारी केली व आपल्या राजाचा पराभव झाला; हें वर्तमान त्या प्रदेशांतील लोकांस पसंत पडले नाहीं, त्यामुळें दंडधराला सैन्याची जुळवाजुळव करण्यास फारसे प्रयास पडले नाहींत. सैन्याच्या खर्चासाठीं जें द्रव्य पाहिजे होते तें खर्च करण्यास कित्येक सावकार लोक पुढें झाले, आणि अडचण निवारण झाली.

दंडधर हा स्वतः वलभुवन नगरांतील रहिवासी होता. तो मोठा शूर आहे, अशी त्याची त्या प्रदेशांत मोठी ख्याति होती. अशा प्रकारच्या पुरुषानें सैन्याचा अधिकार आपल्या हातीं घेतला असल्यामुळें पुष्कळ शूर लोक त्याच्यापाशीं गोळा झाले. रत्नाकर राजा सध्यां पदभ्रष्ट झालेला आहे, त्याला पुनः गादीवर बसविण्यांत जर आपल्याला यश आलें, तर आपली मोठी कीर्ति होईल, आणि आपणास मोठा लाभ होईल, ही आशा प्रत्येकास असल्यामुळें पुष्कळ लोक आपल्या पदरचा खर्च करून राजाच्या वतीनें लढावयासाठीं एकत्र झाले होते. दंडधरानें रत्नाकर राजाचा प्रथम शोध केला. तो वल्लभीनगरापासून सुमारें साठ कोस पूर्वेस असलेल्या नंदपुरनामक शहरीं राहत होता. तेथें माणसें पाठवून दंडधराने आज्ञापत्रें आणवून आपला सेनाध्यक्षाचे जागीं नेमणूक करून घेतली, आणि त्या आज्ञापत्राचे जोरावर दंडधरानें आपल्या पक्षांतील प्रत्येक गृहस्थापासून शक्य तितकें धन मिळविण्याचा उपक्रम सुरू केला. त्यानें पुनः एकदां बागलाणांतील सर्व संस्थानिकांकडे रत्नाकराच्या मोर्तबासह आज्ञापत्रें पाठवून त्याची मदत मागितली. त्यानें पाठविलेल्या दूतापैकीं एक दूत प्रतापपुरीं गेला होता.

आतां प्रथम युद्धाचें वर्तमान बाजूस ठेवून आपण शेखराकडे वळूं. त्याला आपण वादळामध्यें चंपावतीपासून दूर पंचवीस तीस कोसांवर सोडलें होतें. वादळ शांत झाल्यावर तो आपल्याबरोबरच्या पांच मंडळीसह पुनः गलबतांत बसला व मध्यें कोणत्याही प्रकारचें संकट न येतां सुरथपुर बंदरांत येऊन पोंचला. चंपावतीहून त्याच्या बरोबर जो निंबराजाचा फितूर झालेला दूत आला होता, त्याला प्रतापपुरीं जाण्याचें प्रयोजन नसल्यामुळें हेमचंद्रानें दिलेलें द्रव्य घेऊन तो सुरथपुरींच राहिला, आणि बाकीचीं मंडळी बागलाणांत गेली. त्रिशूळ पर्वतावरील शिवालयांत आल्यावर शेखरानें मथुरेचें पत्र मणिभद्रास दिलें. आपल्या नातीची खुशाली ऐकून मणिभद्राला फार आनंद झाला, आणि त्यानें शेखराचें मोठ्या आनंदानें स्वागत केलें. सत्यरथाचें निंबराजापाशीं मोठें वजन आहे, आणि मथुरा तेथें मोठ्या वैभवाचा उपभोग घेत आहे, हें ऐकून वृद्ध मणिभद्राला समाधान वाटलें.

दोन तीन महिने अनेक प्रकारचीं संकटें सोसल्यावर पुनः आपण आपल्या वाड्यांत सुखरूप परत आलों, या गोष्टीचा शेखराला, प्रियंवदेला आणि निपुणिका व चतुरक यांना फार आनंद होत होता. तीं पिशाचसोपान घांटानें दरीमध्यें उतरूं लागलीं असतां त्या दरींतील कित्येक भिल्लांनीं त्यांना पाहिलें, आणि आनंदानें त्यांनीं त्यांचें स्वागत केलें. शेखराला निंबराजानें चंपावतीस कैदेंत

ठेविलें आहे, हें व[illegible]या राज्यांतील सर्व लोकां[illegible]सल्यामुळें आपल्या पत्नीसह[illegible] आला, या गोष्टीचा त्यांना [illegible] आणि त्यांच्या आनंदाच्या [illegible] दरी दणाणून सोडावी, यांत [illegible]रोखराच्या आगमनाचें शुभ [illegible]संधाला कळविल्यास आपणास [illegible] मिळेल, असें वाटत अ[illegible] भिल्ल आनंदानें पिशाचसो[illegible] घालतिच प्रतापपुराकडे धांवत [illegible]. त्यामुळेंशेखराच्या आगमनाचें वर्तमान त्याच्या पूर्वीच प्रतापपुरामध्यें जाऊन पोंचलें. दृढसंध राजाला हें वर्तमान समजतांच आपल्या पुत्राला सामोरें जाण्याची त्यानें तयारी केली. सुमारें अर्ध घटकेच्या आंत किल्ल्यांतील शेंपन्नास माणसें राजवाड्यापुढें गोळा झालीं, जिकडे तिकडे मंगलवाद्यें वाजूं लागलीं, आणि जमलेले लोक वेशीपाशीं उभे राहून शेखराची वाट पाहूं लागले. त्यांना फार वेळ वाट पाहात राहावें लागलें नाहीं. शेखर लवकरच त्यांच्या दृष्टीस पडला, आणि त्यांनीं शेखराच्या जयजयकारानें आकाशपाताळ एक करून सोडलें.

शेखराच्या आगमनानें आनंदित होऊन दृढसंधराजानें चार दिवस मोठा उत्साह केला. त्यानें या प्रसंगीं द्रव्याकडे विशेष लक्ष्य न देतां दानधर्म पुष्कळ केला आणि आपल्या सैन्यांतील लोकांस पुष्कळ बक्षिसें तसेंच दृढसंधानें आपल्या सैन्यासाठीं जीं उत्तम प्रकारचीं शस्त्रास्त्रें भृगुकच्छ नगरांतून खरेदी करून आणिली होतीं, तीं त्यानें याच आनंदाचे प्रसंगीं सैन्यास दिलीं.

प्रतापपुर सोडल्यापासून पुनः परत येईपर्यंत आपल्या प्रवासामध्यें ज्या ज्या गोष्टी घडून आल्या होत्या, त्या त्या शेखरानें आपल्या पित्याला निवेदन केल्या. त्यावेळीं रत्नाकरराजानें आपला पुत्र मृत झाला असतां त्याच्याऐवजीं दुसरेंच एक मूल पुढें केलें, ही गोष्ट ऐकून दृढसंधाला रत्नाकराचा मोठा तिटकारा आला. त्याचप्रमाणें रत्नाकर राजाचें प्रधानमंडळ किती दोष गेले होतें, यांचें जेव्हां शेखरानें आपल्या पित्यापाशीं वर्णन केलें, तेव्हां तर दृढसंध राजाच्या अंगाचा संतापानें तिळपापड उडाला. तसेंच फितुर हिरण्यदत्तानें आपणास विश्वासघातानें पकडून चंपावर्तीस नेलें, हें वर्तमान शेखरानें त्याला सांगितलें तेव्हां दृढसंधाला इतका कोप आला कीं, या वेळीं जरी शंभर हिरण्यगुप्त त्याच्या समोर असते, तरी त्या सर्वांचें त्याच्या क्रोधाग्नींत भस्म झालें असतें!

शेखराच्या आगमनाचें वर्तमान वृषपतीला कळलें असल्यामुळें तोही आपल्या जामातास भेटण्यासाठीं प्रतापपुरास आला. प्रत्येक प्रकारच्या राजकारणामध्यें वृषपती आपल्या जामाताच्या मताप्रमाणें वागत असे, तरी दृढसंध राजा आपल्या सासऱ्याला विचारल्याखेरीज कोणतीही महत्त्वाची गोष्ट करीत नसे. शेखरानें सांगितलेलें वर्तमान ऐकून पुढें आपण कोणता मार्ग धरावयाचा याचा दृढसंधाला मोठा विचार पडला. अर्थात् आपला सासरा, पुत्र आणि प्रधानमंडळ यांचें विचार काय आहेत, हें पाहाणें त्याला जरूर झालें होतें. त्यानें एके दिवशीं आपल्या विश्वासांतील सर्व मंडळी एकत्र केली, आणि खलबतखान्यामध्यें बसून पुढें काय करावें याचा विचार चालविला. रत्नाकर राजा जुलमी आणि कपटी असल्यामुळें तो राज्यभ्रष्ट झाला याबद्दल दृढसंधाला अगदीं वाईट वाटत नव्हतें. आणि रत्नाकर निपुत्रिक असल्यामुळें त्याचा पक्ष घेणें किंवा न घेणें हें सारखेंच होतें. रत्नाकर कसाही असला तरी निंबराजानें त्याच्यावर स्वारी करून त्याचें राज्य बळकावून घेणें, हें कृत्य न्यायाचें नसल्यामुळें निंबराजाला साह्य करावें, हें कधीं चुकूनसुद्धां त्याच्या मनांत आलें

नव्हतें. आतां तिसरा मार्ग म्हणजे उदासीनतेचा; परंतु त्या वीर पुरुषाला तो पसंत पडण्यासारखा नव्हता. म्हणून आपल्या विश्वासू सेवकांचा आणि नातलगाचा विचार घेऊन पुढें काय करावयाचें हें ठरविणें त्याला जरूर झालें होतें. शिवाय बागलाणांतील कित्येक संस्थानिक राजकारणामध्यें त्याच्या घोरणाप्रमाणें वागणारे असल्यामुळें यावेळीं आपल्यावर फार मोठी जबाबदारी पडत आहे हें तो ओळखून होता. आपल्या शेजारचे सुंदरपुरकर, नारायणपुरकर आणि अर्कपुरकर हे तिघे संस्थानिक निंबराजाच्या पक्षाला अनुकूल आहेत, ही त्याच्या मनाची खात्री होती, व त्या तिघांना आणखीही कित्येक संस्थानिक अनुकूल असतील अशी शंका त्याच्या मनास येत होती. आपण उदासीन राहिल्यास निदान सुंदरपूरकर आणि नारायणपुरकर हे आपले उघड शत्रू असल्यामुळें आपल्यास तो त्रास देण्यास मागेंपुढें पाहणार नाहींत, ह्याही गोष्टीचा त्याला या प्रसंगीं विचार करणें जरूर होतें.

सर्व मंडळी खलबतखान्यामध्यें बसली असतां या सर्व गोष्टींबद्दल त्यांनीं पुष्कळ खल केला. शेवटीं आपण होऊन निंबराजाशीं लढाईस न जातां रत्नाकराच्या पक्षांतील इतर लोक काय करतात तें पहावयाचें आणि आपल्या पक्षाचा विजय होईल असा संभव दिसल्यास आपण हातीं शस्त्र घ्यावयाचें, असा त्यांनी विचार ठरविला. निंबराजानें आपणाबरोबर किती सैन्य आणिलें आहे, आणि त्याला आपल्या राज्यांतील फितूर झालेलें किती सैन्य मिळालें आहे, हें अजून दृढसंधाला समजलेलें नव्हतें. अर्थात् त्याला असाच विचार करणें जरूर होतें. शेखराला जेव्हां दृढसंधानें त्याचें मत विचारलें, तेव्हां त्यानें पुत्रधर्माला अनुसरून दृढसंघ आपणास जी आज्ञा करील ती मुकाट्यानें मान्य करण्याचें कबूल केलें. वास्तविक पाहिलें तर या प्रसंगीं आपण उदासीनच रहावें असें [illegible] होतें, आणि हेमचंद्राचें [illegible] होतें.

भृगुकच्छ [illegible] पडला, त्याच सुमारास [illegible] येऊन दाखल झाला [illegible] तो आल्यावर लागलेंच पुढें काय [illegible] यासंबंधाचा त्यांचा विचा[illegible] आप[illegible] सर्व लोकांपाशीं मदत मा[illegible] यांच्या मदतीस कोठचेंच सै[illegible] याचें तेथील लोकांस मोठें आश्चर्य वाटत होतें; पण त्यांत आश्चर्य करण्यासारखें कांहींच नव्हतें. गोवर्धनानें पाठविलेल्या पत्रांपैकीं बरींच पत्रें शत्रूच्या हातीं लागल्यामुळें त्यांचा कांहींच उपयोग झाला नव्हता. त्यामुळें किल्ला शत्रूच्या हातीं लागला. त्या किल्ल्यांतील लोकांनीं बलभुवन शहरीं आपले लोक एकत्र करावयाचे असा विचार करून जिकडे तिकडे पत्रें पाठविलीं, आणि ती मात्र सर्वांस पोंचली. यांपैकीं एक पत्र प्रतापपुरी येऊन पोंचल्यायर दृढसंधानें एक हजार लोकांसह शेखराची मोहिमेवर रवानगी करून दिली.

बलभुवन शहरामध्यें आठ दिवसांच्या आंत सुमारें पांच हजार सैन्य जमा झालें, आणि एक दोन दिवसांत पांच हजार तरी जमेल असा अंदाजही दिसूं लागला, यामुळें नवीन सेनापति जो दंडधर त्याला फार आनंद झाला, आणि त्यानें मोठ्या बंदोबस्तानें शहराची दाणदुजी केली. बागलाणांतील सैन्य अजून बलभुवनास येऊन पोंचलें नव्हतें, तरी प्रतापुरचें सैन्य दरींतून बाहेर पडल्याची बातमी दंडधराला समजली होती. त्यामुळें तो मोठ्या उत्साहानें युद्धाची तयारी करीत होता.

निंबराजाचा सेनापति वीरसेन कांहीं स्वस्थ बसला नव्हता. भृगुकच्छ नगर त्याच्या हातीं लागल्याबरोबर त्यानें तेथील पुरा बंदोबस्त केला. आणि शत्रूची हालचाल कोठें आहे, याची चौकशी तो मोठ्या

सावधपणानें करीत होता. बलभुवन हें आपल्या शत्रूचें मुख्य स्थान होत आहे, आणि तेथें पुष्कळ सैन्य जमत आहे, अशा बातम्या त्याला रोजच्या रोज समजूं लागल्या. अर्थात् जोंपर्यंत शत्रुपक्ष बळकट झाला नाहीं, तोंपर्यंत आपण त्याचा पाडाव केला पाहिजे, असा वीरसेनानें विचार केला, आणि भृगुकच्छामध्यें आणि त्याच्या आसपासच्या वीस पंचवीस कोसांमध्यें शत्रूंचा प्रवेश होऊं नये असा बंदोबस्त करून तो शक्य तितकें सैन्य बरोबर घेऊन बलभुवन-शहराकडे चालला. त्यानें आपल्या बरोबरच्या दहा हजार सैन्यापैकीं तीन हजार सैन्य भृगुकच्छ व त्याच्या आसपासचा प्रदेश यांच्या रक्षणासाठीं ठेविलें होतें, आणि सात हजार सैन्यानिशीं तो बलभुवन शहरावर चाल करून जात होता.

सर्व परिस्थितीचा योग्य विचार करून बलभुवन शहराचा आश्रय करून युद्ध करण्यापेक्षां उघड्या मैदानांत शत्रूबरोबर युद्ध केलें असतां तें अधिक फायदेशीर होईल असें दंडधरानें ठरविलें, आणि त्याच्या इतर सोबत्यांचें मतही तसेंच असल्यामुळें, वीरसेन आपल्यावर चाल करून येत आहे, हें वर्तमान समजतांच दंडधरानें शहरापासून चार कोसांवर त्याला गांठावें असा बेत केला. दंडधरानें जी जागा पसंत केली होती, ती बरीच डोंगराळ असल्यामुळें बलभुवनाकडे येणाऱ्या वीरसेनाला दंडधर पुढें आल्याची बातमी जरी अगोदर समजती, तरी त्यानें दंडधराला झुकांडी देऊन भलत्याच वाटेनें शहराकडे जाणें शक्य नव्हतें.

दंडधरानें आपल्या जवळच्या पांच हजार सैन्यापैकीं फक्त अडीच हजार सैन्य आपल्याबरोबर घेतलें, आणि तो योजिलेल्या जागेकडे एकदम चालता झाला. निंबराजाच्या वीरसेन सेनापतीला बलभुवनामध्यें फक्त दोन हजार सैन्य जमलें आहे, अशी बातमी समजली होती, आणि आपण त्या शहरावर हल्ला करीपर्यंत तेथें फार तर आणखी दोन हजार सैन्य जमेल, एवढ्या सैन्याला आपलें सात हजार सैन्य हां हां म्हणतां पिटाळून लावील असा त्याचा अंदाज होता; म्हणून तो मोठ्या त्वरेनें आणि ईर्षेनें चाल करून येत होता. दंडधरानें आपलें हेर फिरते ठेविले असून वीरसेन त्या ठिकाणीं केव्हां येऊन पोंचेल, याचा त्यानें बरोबर अंदाज बांधिला होता. त्या अंदाजाप्रमाणें वीरसेन त्या जागीं येतांच दंडधरानें एकदम युद्धास प्रारंभ केला. वीरसेनाला दंडधराच्या बेनाचा मागमूस देखील लागला नव्हता, म्हणून तो अगदीं बेसावध होता. त्याचें सैन्य जिकडे तिकडे पसरलेलें होतें, आणि ज्यावर त्याचें सर्व कौशल्य अवलंबून होतें, तो तोफखाना तर फारच मागें राहिला होता. स्वतः वीरसेन आपल्या सैन्याच्या मध्यभागीं होता, यामुळें शत्रु फारच जवळ असून त्यानें युद्धास प्रारंभ केला, ही बातमी त्याला लष्करच्च समजली आणि तो प्रथम मोठ्या विचारांत पडला. तथापि आपल्यापाशीं सैन्य पुष्कळ आहे, असा त्याला दम होता, म्हणून त्यानें तोफखान्याची वाट पाहण्यांत वेळ न घालवितां एकदम युद्धास प्रारंभ केला.

दंडधरानें अडचणीची जागा पसंत केली असल्यामुळें त्यांचा त्या युद्धांत पुष्कळ फायदा झाला. आपलें सैन्य व्यवस्थित ठेवून वीरसेनाचें जेवढें सैन्य पुढें येईल, तेवढ्याचा तो तत्काल समाचार घेत असे. यामुळें वीरसेन मोठ्या फिकीरींत पडला. आपलें सैन्य कितीही असलें, तरी या अडचणीच्या जागीं त्याचा कांहीं उपयोग व्हावयाचा नाहीं, असें त्यास आढळून आलें, आणि त्यानें आपलें सैन्य मागें घेण्याचा विचार केला. सध्यां दोन्ही सैन्यें ज्या ठिकाणीं होतीं, त्या ठिकाणीं त्या दोन्ही सैन्यांमध्यें एक मोठा आडवा डोंगर होता. त्या डोंगराजवळीकडे जाण्याची दोन्ही सैन्यांस अगदीं

सोय नव्हती. जें सैन्य डोंगर उतरण्याचा प्रयत्न करील, त्याचा पराभव व्हावयाचा अशी स्थिति असल्यामुळें लढाईस फारसा रंग भरत नव्हता. वीरसेनानें कित्येक लोक त्या पर्वताची पाहणी करण्यासाठीं पाठविले, आणि जर एकादा पलीकडे जाण्याचा मार्ग सांपडला,तर त्या मार्गानें डोंगराच्या पलीकडे जाऊन पलीकडच्या मैदानांत युद्ध करावयाचें असा वीरसेनानें विचार केला. वीरसेन सध्यां ज्या ठिकाणीं होता, तेथून एक दिवसाच्या वाटेवर आपलें सैन्य पलीकडे नेण्यासारखा एक मार्ग त्याला उमगला, म्हणून त्यानें आपल्या हाताखालच्या एका हुषार सैनिकाला दोन हजार सैन्यासह युद्ध चालू ठेवण्याची आज्ञा केली, आणि बाकीचें साडेचार हजार सैन्य घेऊन एके दिवशीं रात्रीं त्यानें नवीन सांपडलेल्या मार्गाकडे कूच केलें. अडचणीच्या जागीं सांपडल्यामुळें त्याच्या सैन्यांतील हुमारें पांचशें लोक कामीं आले होते.

वीरसेन ज्या दिवशीं डोंगरापलीकडे जाण्यास निघाला, त्याच्या दुसऱ्या दिवशीं दोन प्रहरीं तो डोंगरांतून बाहेर पडला; दंडधराच्या सैन्याच्या पिछाडीवर हल्ला करावयाचा बेत करून त्यानें आपलें सैन्य दुसऱ्या दिवशीं सकाळपर्यंत मोठ्या त्वरेनें आणि गुप्तपणानें इच्छित स्थळीं आणलें, आणि एकदम युद्धास प्रारंभ केला. दंडधराचें सर्व सैन्य मध्यें आणि त्याच्या भोंवतीं शत्रूचा वेढा, अशी स्थिति झाली. घनघोर युद्ध सुरू झालें. चारी बाजूंनीं आपणांस शत्रूंनीं वेढिलें, हें पाहून दंडधर मोठ्या फिकीरींत पडला. बलभुवन तेथून जरी पांचच कोस दूर होतें, तरी तेथें निरोप पाठवून तेथील सैन्य आपल्या मदतीस बोलाविण्याचीही सोय उरली नव्हती ! अशाप्रसंगीं जर आपण शत्रूशीं झगडत पांच कोसांचा पल्ला गांठला तर आपला बचाव होईल, ही गोष्ट त्याच्या डोळ्यांपुढें दिसत असूनही त्याला तसें करतां येईना, अर्थात् या आणीबाणीच्या प्रसंगीं मरेपर्यंत लढून शत्रूच्या सैन्याची नासाडी तरी करावी, किंवा हत्यारें खालीं ठेवून शत्रूस शरण तरी जावें, यासेरीज तिसरा मार्ग दंडधराला उरला नव्हता; पहिल्याच युद्धांत असें अपशय आल्यास पुढें काय होईल हें त्याला उघड उघड दिसत असल्यामुळें त्यानें शरण न जातां अखेरपर्यंत लढण्याचा विचार ठरविला, आणि तो स्वतः सर्व फौजेमध्यें हिंडून आपल्या लोकांस मोठ्या ईर्ष्येनें उत्तेजन देऊं लागला. वीरसेनाच्या सैन्यानें दंडधराला मोठ्या सकाळींच गांठलें होतें, त्यामुळें हें युद्ध सर्व दिवसभर होणार ही गोष्ट ठरल्यासारखी होती. दंडधरानें दोन प्रहरपर्यंत मोठ्या आवेशानें युद्ध केलें. त्याच्या सैन्याला जिवावर उदार होऊन लढावें लागत असल्यामुळें वीरसेनाच्या सैन्याचा एकसारखा नाश होत होता. तरी पण ही स्थिति फार वेळ टिकणें शक्य नव्हतें. वीरसेनाचें सैन्य त्याच्या सैन्याच्या जवळ जवळ दुप्पट असल्यामुळें आपला पराभव होणार ही गोष्ट याला ढळढळीत दिसत होती.

दोन प्रहरची वेळ झाली; सूर्यनारायण आपल्या प्रखर तेजानें तळपूं लागला; दोन प्रहरच्या उन्हामुळें दोन्ही सैन्यांतील लोकांचे प्राण कासावीस होऊं लागले; माघार घेणें एकालाही शक्य नव्हतें. आपण या वेळीं माघार घेतल्यास शत्रू हातचा निसटेल, ही वीरसेनाला भीति होती, म्हणून तोही आपल्या सैन्यामध्यें फिरून आपल्या लोकांस उत्तेजन देतच होता.

अशा प्रकारें युद्ध ऐन रंगांत आलें असतां पूर्वदिशेकडे आकाशांत धुळीचे ढग उठण्यास प्रारंभ झाला. प्रथमतः तर ही धूळ वादळानें उठत असेल, असें दोन्ही सैन्यांस वाटलें; पण थोड्याच वेळांत हा त्यांचा भ्रम दूर झाला. त्या दिशेकडून कोणाचें तरी सैन्य मोठ्या वेगानें धांवत येत आहे,

अशी दोन्ही सैन्यांची खात्री झाली, तथापि येत असलेलें सैन्य शत्रुपक्षाचें आहे, कीं, मित्रपक्षांचें आहे, याचा दोन्ही सैन्यांतील लोकांस उमज पडेना. वीरसेनाला मात्र हें सैन्य आपल्या पक्षाचें नसून शत्रूचेंच असावें असें निःसंशय वाटत होतें. तरी त्यानें न डगमगतां आपल्या सैन्यास उत्तेजन देऊन येत असलेलें सैन्य आपल्याच मदतीस येत आहे, असें भासविण्याचा यत्न केला. त्यामुळें त्याच्या सैन्यास जोर येऊन तें निकरानें लढूं लागलें. पण ही त्याची युक्ति फार वेळ चालली नाहीं. नवीन सैन्य युद्धभूमीवर येतांच हें सैन्य कोणत्या पक्षाचें आहे, याचा उलगडा झाला !

दंडधराला मोठा आनंद झाला. आलेलें सैन्य आपल्या पक्षाचें आहे, हें पाहून त्याच्या सैन्याचें अवसान दुप्पट झालें, आणि तें सैन्य मोठमोठ्या गर्जना करीत शत्रुसैन्याचा संहार करूं लागलें. आपला विजय होणार याबद्दल दंडधराला शंका उरली नाहीं; तो विजेसारखा सर्व सैन्यांत फिरून आपल्या लोकांस उत्तेजन देतच होता.

वीरसेनाचा जरी धीर सुटला होता, तरी तोही आपल्या सैन्यांत फिरून 'शाबास ! वीरहो ! आजचा तुमचा पराक्रम अवर्णनीय आहे ! जोर धरा ! आपण दोन्ही सैन्यांचा एकदम फडशा उडवूं या ! आज जर तुम्ही शत्रूचा पराभव केला, तर शत्रूचा नायनाट होईल ! यासाठीं धीर सोडूं नका !' अशा रीतीनें आपल्या सैन्यास उत्तेजन देत होता, तरी आपणास या युद्धामध्यें मागें पाय घेणें जरूर आहे, असें त्यास वाटतच होतें.

नवीन आलेलें सैन्य ताज्या दमाचें होतें. युद्धाची जागा अवघड नसून मोकळी होती, त्यामुळें त्या सैन्यास आपला पराक्रम दाखविण्यास ही संधि फार उत्तम मिळाली होती. नवीन आलेल्या लोकांच्या अंगावर वस्त्रांचा जरी बहुतेक अभावच होता, तरी ते लोक मोठे धिप्पाड, सशक्त आणि क्रूर दिसत होते. फार तर काय, या नवीन सैन्यांतील एकेक माणूस वीरसेनाच्या चार चार माणसांस भारी होता, असें म्हटलें असतां अतिशयोक्ति होणार नाहीं जणुं काय रावणाच्या सैन्यांतील राक्षस मानवी रूपें धारण करून भूतलावर अवतीर्ण झाले आहेत, असें वीरसेनाच्या लोकांस वाटूं लागलें. सुमारें अर्ध घटकेच्या आंत युद्धाचा रंग पालटला. आणि आतां जर आपण लवकर येथून पोबारा केला नाहीं, तर आपल्या सर्व सैन्याचा संहार होईल ही गोष्ट दोन प्रहरच्या कडकडीत उन्हाइतकीच वीरसेनाला झोंबूं लागली, आणि त्यानें आपल्या सैन्यास युद्ध बंद करून पलायन करण्याची आज्ञा केली.

हें नवीन आलेलें सैन्य प्रतापपुरकर आणि वत्सपुरकर यांचें असून राजपुत्र शेखर त्या सैन्यावरचा अधिपति आहे, हें दंडधराच्या सैन्याला समजतांच ते लोक आनंदानें शेफरून गेले, यांत आश्चर्य नाहीं. प्रतापपुरकर आणि वत्सपुरकर या दोन संस्थानिकांच्या राज्यांतील भिल्ल मोठे शूर आणि रांकट आहेत, अशी मोठी प्रसिद्धि होती. ते लोक युद्धकलेंत मोठे कुशल होते, ही गोष्ट निर्विवाद होती. ते लोक जसे शूर होते, तसे ते आज्ञाधारकही होते. शत्रूसैन्य पळावयास लागलें, हें पाहतांच शेखरानें आपल्या भिल्लांस युद्ध बंद करण्याची आज्ञा केली. थोड्याच वेळांत दंडधर आणि शेखर यांची भेट झाली, त्यावेळीं शत्रूचा पाठलाग करावा, असें दंडधराचें म्हणणें पडलें; पण शेखरानें त्या गोष्टीस आपली संमति दिली नाहीं. अर्थात् दंडधराला आपला शब्द मागें घेणें भाग पडलें.

शत्रु पळून गेल्यावर दंडधरानें आपल्या सैन्याची गणती केली, त्यावरून आपल्या सैन्याची जितकी खराबी व्हावी असा त्याचा अंदाज होता, त्याहून फारच थोडी खराबी झाली आहे, असें त्यास आढळून आलें. त्याच्या अंदाजें हजार सैन्यापैकीं

फक्त सातशें लोक कमी आले होते, व सुमारें चारशें लोक जखमी झाले होते. वीरसेनाच्या सैन्याचा मात्र अतिशय नाश झाला होता. त्याचे सुमारें दोन हजार लोक ठार झाले असून पांचशें लोक जखमी झालेले दंडधराच्या हातीं लागले. याशिवाय दंडधरास यावेळीं एक मोठा थोरला लाभ झाला. वीरसेनाला आपल्या लोकांचा कसा बसा प्राणवांचवून पळून जाणें भाग अस-ल्यामुळें त्याला आपला तोफखाना मागें टाकावा लागला. जरी वीरसेनानें जातां जातां आपल्या तोफा निकामी करण्याचा प्रयत्न केला होता, तरी सुमारें पंचवीस तोफा चांगल्या स्थितींत असलेल्या दंडध-राच्यां हातीं लागल्या, आणि दारूगोळाही त्येाला भरपूर मिळाला. जातां जातां आपल्या दारूला आग घालून जावयाचा वीरसेनाचा बेत होता, पण तसें केलें असतां आपल्याच सैन्याचा नाश होण्याची त्याला भीति वाटली, आणि नाइलाजानें त्याला दारूगोळा टाकून चालतें व्हावें लागलें. तोफा आणि दारूगोळा हातीं लागला हा आपल्यास मोठाच लाभ झाला. असें दंडधराला वाटलें, आणि तो शेखरासह मोठ्या आनंदानें बलभुवन शहरांत परत आला.

शेखराच्या सैन्यामध्यें यावेळीं जांघिळ-मामाकडे दुय्यम सेनापतीचा अधिकार होता. त्याचें तें अवाढव्य शरीर पाहून इतर सैन्यांतील लोकांस मोठें आश्चर्य वाटे. आणि असल्या राक्षसाशीं उघड मैदाना-मध्यें अर्धघटिका द्वंद्व युद्धकरून शेखरानें विजय संपादन केला, ही गोष्ट जेव्हां एकाद्याच्या कानावर जाई तेव्हां तर शेख-राच्या कौशल्याचें ऐकणारास परमावधीचें आश्चर्य वाटून त्याच्या मुखांतून धन्यवाद बाहेर पडत. शेखराचा एकनिष्ठ सेवक चतु-रकही यावेळीं शेखराबरोबर होता.

वर सांगितलेलें युद्ध झाल्यावर शेखरानें आपल्या वडिलांस पत्र लिहून विजयाचें आनंदवृत्त ताबडतोब कळविलें. यानंतर दोन तीन दिवसांमध्यें सांगण्यासारखी विशेष गोष्ट घडून आली नाहीं. फक्त पळून गेलेलें सैन्य बलभुवन शहरापासून दहा कोसांवरील एका खेडेवजा शहराचा आश्रय करून बसलें आहे, असें वर्तमान बलभुवनांतील सैनिकांस समजलें, आणि त्या दोन तीन दिवसांत त्या शहरांत आणखी सुमारें दोन हजार सैन्य येऊन पोंचलें. यावेळीं बलभुवनामध्यें सुमारें दहा हजार सैन्य गोळा झालें होतें. झालेल्या लढाईमध्यें सैन्याला फार श्रम झाले होते. त्या श्रमांचा परिहार होण्यासाठीं सैन्याला दोन दिवस विश्रांति देणें फार जरूर होतें. या दोन दिवसांत मुख्य मुख्य सैनिक एकत्र जमून पुढें काय करावें, याचा विचार करीत बसत. त्यावेळीं शेखर जें कांहीं भाषण करी तें सर्वांला आवडे, इतकेंच नव्हे, तर युद्धकलेमध्यें तो फार निष्णात आहे, अशी ऐकणाराची तेव्हांच खात्री पटे. यामुळें शेखराला मुख्य सेनापती नेमावें, आणि त्याच्या धोरणानें वागावें, असें पुष्कळांस वाटूं लागलें. कित्येकांनीं दंडधरापाशीं ही गोष्ट काढली. दंडधर हा खरा शूर पुरुष असून तो मोठा चतुर होता. तो खरा कार्यकर्ता होता. शत्रूचा पराभव व्हावा; आणि रत्नाकर पुनः गादी-वर बसावा, एवढीच कायती त्याची इच्छा होती. आपणाला लोकांनीं सेनापति म्हणावें, आपणाला मानसन्मान द्यावा; अशी त्याला महत्त्वकांक्षा नव्हती, म्हणून त्यानें मोठ्या आनंदानें आपला अधिकार सोडावयाचे आपण होऊन कबूल केलें. तिसरे दिवशीं पुढील विचाराकरितां सर्व सैनिक एकत्र जमले, त्यावेळीं दंडधरानें स्वतः पुढें होऊन शेखरानें सेनापतीचें पद-स्वीकारावें, अशी त्यास विनंति केली.

पुढें चालला. लवकरच तो त्या झाडींतून बाहेर पडला, आणि तेथें त्याला पुनः पावलें दिसूं लागलीं.

जांघिळ मामा सध्यां एका टेंकडीच्या पायथ्यापाशीं येऊन दाखल झाला होता. येथें पुनः जमीन धुळीची असल्यामुळें पावलें स्पष्ट दिसूं लागलीं, त्यामुळें त्याला उमेद वाटूं लागली. आणि तो झपाट्यानें पुढें चालला. थोड्याच वेळानें एका ओढ्याच्या पाण्याचा खळखळाट त्याच्या कानावर आला. ज्या दिशेकडुन पाण्याचा शब्द त्याच्या कानावर येत होता, त्याच दिशेकडे तीं पावलें जात आहेत, असें त्यास आढळून आलें. आणखी थोडें पुढें गेल्यावर आपण ज्या टेंकडीवर आलों आहों, त्या टेंकडीला वळसा घालून एक बराच मोठा ओढा पलीकडच्या दरीकडे जात आहे, असें त्यास दिसलें. जातां जातां एकदम पावलांची दिशा बदलली, आणि आपण ज्यांचा माग काढीत आहों, तीं माणसें टेंकडीवर गेलीं आहेत, असें त्यास आढळून आलें. टेंकडी चढूं लागल्यावर मात्र जांघिळाला बरेच प्रयास करावे लागले. कारण टेकडीवर जिकडे तिकडे तुरळक तुरळक गवत असून तें खाण्यासाठीं येणाऱ्या जनावरांनीं त्यांपैकीं बरेंच गवत पायांखालीं तुडविलेलें असल्यामुळें त्या गवतावर पावलांच्या खुणा उमटणें शक्य नव्हतें. अशा स्थितीमध्यें असताही जांघिळानें धीर सोडला नाहीं. मधून मधून जें एकादें पाऊल कोठें तरी उमटलेलें दिसे, तेवढ्यावर नजर ठेवून त्यानें त्या टेकडीच्या शिखरापर्यंत माग काढिला. टेंकडीवर गेल्यानंतरही त्याला बराच प्रयास करावा लागला; पण त्याला यश आलें, आणि तो एका तुटलेल्या कड्याच्या दरडीवर येऊन उभा राहिला. या ठिकाणीं बरेंच गवत असून तें पुष्कळ ठिकाणीं तुडविलेलें आहे, ही गोष्ट त्याच्या ध्यानीं आली, आणि तेथील परिस्थितीचें चारकाईनें अवलोकन केल्यावर या ठिकाणीं दोन माणसांची झटापट झाली असावी, असें त्यास आढळून आलें. एका माणसाला दुसरा मनुष्य कड्याकडे ओढीत आहे, आणि दुसरा मनुष्य मोठ्या जोरानें मागें ओढ घेत आहे, अशा स्थितींत त्या दोन्ही माणसांचा बराच काळ गेला असावा, हें जणुं काय एखाद्या कागदावर लिहिलेलें एकाद्यानें सहज वाचावें, त्याप्रमाणें शिकारीमध्यें आयुष्य घालविलेल्या त्या महाबलाढ्य पुरुषानें त्या ठिकाणीं स्पष्टपणें वाचलें. शेवटीं एकानें दुसऱ्याला त्या कड्यावरून खालीं लोटलें, अशी जांघिळाच्या मनाची खात्री झाली, आणि तो कड्याखालीं पाहूं लागला. कडा अगदीं सरळ तुटलेला असल्यामुळें कड्याबरोबर खालीं नजर पोंचण्यासाठीं त्याला तेथें जमिनीवर निजावें लागलें. त्या ठिकाणीं सुमारें वीस हात सारखा कडा तुटलेला असून, त्याच्या खालीं कांहीं झुडपें उगवलेलीं होतीं, त्यामुळें त्या झुडपांखालीं काय आहे, हें मात्र त्याला दिसलें नाहीं, तथापि तेथील एक-दोन झुडपें नुकतींच उपटलेलीं त्याला दिसलीं; त्यांपैकीं एक तर पालें वर आणि पाला खालीं, अशा उलट्या स्थितींत तेथें लोंबत होतें. हें पाहून याच ठिकाणीं वरून खालीं कोणी तरी पडलें खास, याबद्दल जांघिळाच्या मनांत कांहींच शंका उरली नाहीं.

या कड्याखालीं शेखराचें प्रेतच आपल्या दृष्टीस पडणार, असें मनांत येऊन जांघिळाला अतिशय दुःख झालें, आणि त्याच्या नेत्रांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. तो वर उठला, आणि खालीं उतरण्यास कोठें सोईची वाट आहे कीं काय हें पाहूं लागला. इतका वेळ त्याचें सर्व लक्ष्य पावलांच्या खुणांकडे असल्यामुळें तो ज्या जागेवर होता, त्या जागेच्या आसमंतात् नजर टाकण्यास त्याला फुरसदच झाली नाहीं. आतां त्याला खालीं उतरण्यासाठीं रस्ता शोधावयाचा असल्यामुळें त्यानें त्या कड्याच्या आसपास नजर टाकली, त्यावेळीं कड्याखालीं असणाऱ्या

दरींतून एक ओढा वाहत आहे, आणि त्या ओढ्यापलीकडे एक रस्ता आहे असें त्यास आढळून आलें. इतकेंच नव्हे तर त्या रस्त्यानें कांहीं माणसें चाललीं आहेत, असें त्याच्या नजरेस पडलें. त्या माणसांच्या वेषांवरून आपण देवळाच्या पश्चिम द्वाराच्या मार्गानें जे लोक शोधास पाठविले होते, तेच हे आहेत, अशी त्याची खात्री झाली. आणि आपल्या प्रचंड आवाजानें त्यानें चतुरकाला हांक मारिली. तो उंचावर आणि चतुरक खोलांत असल्यामुळें त्याची हांक त्याला स्पष्ट ऐकूं गेली, व तो आपल्याबरोबरच्या माणसांसह त्या टेंकडीकडे वळला. चतुरकाची सर्व टोळी ओढ्याच्या पलीकडच्या तीरावर येऊन पोंचली. ओढ्याला पाणी पुष्कळ नसल्यामुळें तेथें उतार होता, पण पलीकडच्या बाजूला तुटलेली दरड असल्यामुळें पलीकडे जाण्यापासून कांहींच फायदा नव्हता. जांघिळ जेथें उभा होता, तेथें सुमारें वीस हात खोल तुटलेला कडा होता. त्या कडयाखालीं सुमारें पांच हात रुंदीची जागा अमून तिजवर कित्येक झुडपें उगवलेलीं होतीं, आणि त्या झुडपांपलीकडे पुनः तुटलेली दरड होती. किंवा तुटलेली दरड ही एक पायरी, झुडपांची जागा ही पायरीवरील जागा, आणि वरचा कडा ही दुसरी पायरी अशी त्या जागेची रचना होती. शेसराचा शोध करावयासाठीं कड्याखालच्या किंवा दरडीवरच्या झुडपांमध्यें जाणें त्यांस भाग होतें. खालीं उतरण्यासारखें एक ठिकाण ठरवून जांघिळ तेथून सावकाशपणें खालीं उतरला. जांघिळ हा अतिशय उंच पुरुष असल्यामुळेंच त्याला तेथून खालीं उतरतां आलें. दुसऱ्या कोणा सामान्य उंच माणसाला तेथून उतरतां आलें नसतें. खालीं उतरल्यावर तो मोठ्या जलदीनें झुडपांमध्यें शिरला. हीं झुडपें चांगलीं एक पुरुष उंचीचीं वाढलेलीं होतीं. त्या झुडपांतून पुढें गेल्यावर त्याला तेथें एक मनुष्य पडलेलें आढळलें, शक्य तितक्या त्वरेनें तो त्याजपाशीं गेला, तोंच तो मोठ्या दुःखानें ओरडला! तो ज्याचा शोध करीत होता, तोच शेसर या ठिकाणीं अस्ताव्यस्त पडलेला होता!

त्याच्याकडे दृष्टि जातांच तो जिवंत नसावा, असें एकदम जांघिळाच्या मनांत आलें, आणि त्याचे काळजाला चरका बसला. त्यानें एकदम पुढें होऊन अस्ताव्यस्त पडलेल्या शेसराला तेथें असलेल्या शक्य तितक्या चांगल्या जमिनीवर निजविलें, आणि तो त्याची तपासणी करूं लागला. त्याचें सर्वांग थंडगार पडलेलें होतें, डावा पाय सुजून फारच मोठा झाला होता, व डोळे मिटलेले होते. बराच वेळ जांघिळानें त्याजकडे लक्ष्य लावून पाहिलें, पण तो जिवंत असल्याचें कांहींच चिह्न त्याला आढळेना. उलटपक्षीं त्याच्या मुखावरील तेज नाहींसें झालेलें नव्हतें, किंवा त्याच्या मुद्रेवर प्रेतकळाही आलेली नव्हती. तो शेसराची तपासणी करीत आहे, इतक्यांत बरोबरच्या माणसांसह चतुरकही तेथें येऊन पोंचला. सुदैवानें त्या ठिकाणीं येण्याला ओढ्याच्या बाजूनें एक लहानशी पाऊलवाट होती, आणि ती चतुरकाच्या टोळीला उमगली, व त्या वाटेनें ते सर्वजण आले होते. आपल्या धन्याची ती अवस्था दृष्टीस पडतांच चतुरकाच्या नेत्रांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. त्याचे पाय जणुं काय मोडल्यासारखे होऊन तो मटकन खालीं बसला, आणि एकाद्या अर्भकाप्रमाणें तो ओक्साबोक्सीं रडूं लागला. पण तितक्यांत जांघिळाच्या मुखांतून आनंदाची आरोळी बाहेर पडली, आणि तो ओरडला. 'हे अजून जिवंत आहेत! जय चामुंडे! तूंच आतां यांचें रक्षण कर!' नंतर तो चतुरकाला म्हणाला,–'थांब रडूं नको, हे पहा यांचे ओठ हालत आहेत; हे बोलण्याचा प्रयत्न करीत आहेत, असें दिसतें.'

हें ऐकतांच चतुरकाचें दुःख कमी होऊन त्याचें रडें बंद झालें, आणि तो आपल्या धन्याकडे पाहूं लागला. यावेळीं शेखरानें आपले डोळे किंचित् उघडले असून तो ओठ हालवून बोलण्याचा प्रयत्न करीत आहे, असें चतुरकास आढळून आलें. शेखर जिवंत आहे, अशी खात्री पटतांच त्या सर्वांना मोठा आनंद झाला, आणि ते आपल्याला सुचतील ते प्रयत्न करून त्याला शुद्धीवर आणण्याचे उपाय योजूं लागले.

शेखर सध्यां ज्या जागीं पडलेला होता, ती जागा मोठी अडचणीची असल्यामुळें त्यांनीं त्याला सावधपणानें तेथून उचलून ओढ्याच्या कांठीं आणलें. तेथें त्यांनीं सपाट जागेवर आपल्या अंगावरील वस्त्रें टाकून त्याच्यासाठीं मऊ बिछाना तयार केला, आणि त्यावर त्याला ठेविलें. एक जण ओढ्याकडे गेला व त्यानें आपल्या अंगावरील वस्त्र पाण्यांत भिजवून तें पाणी त्याच्या मस्तकावर पिळिलें, आणि थोडें ओठ्यांस लाविलें. दुसऱ्या एकानें त्याचे हात पाय हळुहळु चोळून त्यांना गरमपणा आणण्याचा प्रयत्न चालविला. असे ज्याला सुचले ते त्यानें प्रयत्न केले, त्यामुळें कांहीं वेळानें त्यानें डोळे उघडिले, आणि तो इकडे तिकडे पाहूं लागला; पण त्यानें कोणास ओळखिलें, किंवा तो शुद्धीवर आहे, असें मात्र त्याच्या मुद्रेवर दिसत नव्हतें. आपण सध्यां कोठें आहों, आणि आपली स्थिति काय आहे, याचें त्यास अगदीं भान नव्हतें. तथापि तो जिवंत आहे, एवढ्या एकाच गोष्टीचें त्याच्या अनुयायांस समाधान वाटत होतें. कांहीं वेळानें त्यानें वेदना होत असल्याचीं चिन्हें दाखविलीं, एकदोन वेळां थुंकला, आणि पुनः डोळे मिटून घेऊन निश्चेष्ट पडला!

शेखराचा शोध लागल्यास सुमारें एक घटका झाली, तरी तो शुद्धीवर आला नाहीं. जांबिळानें पुनः एकदां त्याच्या सर्व शरीराची तपासणी केली, पण जबरदस्त दुखापत झाल्याचें एकही चिह्न त्याला आढळून आलें नाहीं. फक्त त्याच्या डाव्या पायाला बरीच सूज आलेली होती. पण तेवढ्या सुजेवरून शेखराला कांहीं अपाय होईल, त्याच्या जिवास धोका येईल, असें कांहीं कोणास वाटलें नाहीं. यावेळीं सुमारें दहा घटका दिवस आला होता, आणि ऊनही बरेंच कडक भासूं लागलें होतें. त्यामुळें शेखराला छावणींमध्यें नेऊन ठेवणें अत्यंत जरूर आहे, असें त्याच्या अनुयायांस वाटलें. पण शेखराला उचलून नेतांना त्याला इजा होणार नाहीं, असें कांहीं साधन त्यांजपाशीं नव्हतें. म्हणून त्यांनीं आपल्या अंगावरील वस्त्रें, आणि तेथील झाडांच्या फांद्या, यांच्या साह्यानें झोळीसारखें साधन निर्माण करून त्यांनीं त्याला त्यांत निजविलें, आणि मोठ्या सावधपणानें एकेक पाऊल उचलीत ते मोठ्या रस्त्यावर आले. याच सुमारास त्यांना टेकडीपलीकडे मोठा गलबला ऐकूं आला, आणि त्यांस मोठें आश्चर्य वाटलें. युद्धभूमीपासून ते सध्यां दीड कोस अंतरावर असल्यामुळें तेथील गलबला त्यांस ऐकूं येणें शक्य नव्हतें. आपणापासून हजार दीडहजार पावलांवर हा गलबला होत आहे, याबद्दल त्यांच्या मनास शंका नसल्यामुळें ते भयचकित मुद्रेनें एकमेकांकडे पाहूं लागले. आपल्या सैन्याचा पराभव होऊन तें पळत असावें, असें एकदम सर्वांच्या मनांत आलें. पण ती गोष्ट एकमेकांस बोलून दाखविण्यास त्यांना धैर्य होईना!

पण त्यांना अशा संशयांत फार वेळ रहावें लागलें नाहीं. लवकरच एक सैन्याची टोळी त्यांच्या नजरेस पडली. ती टोळी जरी अगदीं धांवतच नव्हती, तर बऱ्याच जलदीनें आपलें पाऊल उचलीत होती. त्यामुळें ती त्यांच्या नजरेच्या आटोक्यांत यावयास फारसा विलंब लागला नाहीं. ती टोळी जशी जवळ आली, तसे त्या टोळींतील लोक आपले अनुयायी आहेत, असें जांबि-

ळास आढळून आलें, आणि त्यानें प्रचंड गर्जना करून म्हटलें,-'अहो सैनिक हो, थांबा ! उभे रहा ! मित्रांनो, हे पहा आपले धनी येथें आहेत !'

जांघिळाची आरोळी त्या सैनिकांच्या कानीं जातांच ते सर्व एकदम उभे राहिले. ही टोळी प्रतापपुरकर आणि वत्सपुरकर यांचीच होती. जांघिळाच्या शब्दानें त्यांचे डोळे त्यांच्याकडे वळले, आणि शेखराला उचलून आणीत असल्याचा देखावा पाहून हा प्रकार काय असावा, हें बहुतेक त्यांच्या लक्ष्यांत आलें. ते सर्व लोक जांघिळाच्या भोंवतीं जमा झाले. ही टोळी येत असलेली पाहून जांघिळ व चतुरक यांनीं शेखराला खालीं ठेविलें. शेखराची ती अवस्था पाहून टोळींतील कित्येक भिल्लांच्या नेत्रांतून अश्रु आले, कित्येक संतापानें शेखराची अशी स्थिति करणाराचा सूड घेण्याविषयीं आवेशानें अद्वातद्वा ओरडूं लागले, आणि कित्येक निराशेनें कपाळास हात लावून दुःखामध्यें निमग्न झाले. आपला धनी मृत झाला, असेंच टोळींतील बहुतेकांना वाटलें, आणि तेथें मोठा हाहाःकार उडाला ! पण शेखर जिवंत आहे, असें जेव्हां जांघिळानें स्पष्टपणें सर्वांस सांगितलें, तेव्हां त्या भिल्लांस थोडेसें समाधान वाटलें, आणि त्यांचा गलबला थोडा शांत झाला.

सुदैवानें या टोळीबरोबर एक शस्त्रवैद्य हजर होता. लढाईच्या वेळीं जखमी झालेल्या आपल्या भिल्लांच्या औषधपाण्याची तत्काळ व्यवस्था व्हावी, म्हणून वृषपति आणि दृढसंघ यांनीं एकमेकांच्या विचारें शेसराबरोबर एका हुषार वैद्याची रवानगी केली होती. तो शस्त्रवैद्य पुढें झाला, त्यानें प्रथम शेसराच्या अंगावरील वस्त्रें दूर केलीं, आणि त्यानें त्याची तपासणी करण्यास प्रारंभ केला. ही तपासणी संपवून तो शस्त्रवैद्य काय सांगतो, हें ऐकण्यासाठीं सर्व भिल्ल अगदीं आतुर झालेले होते. वैद्याची तपासणी संपली, आणि त्यानें शेखराला भीति नाहीं असें सांगितलें. त्याबरोबर सर्व भिल्लांनीं चामुंडेचा जयजयकार करून आकाशपाताळ एक करून सोडलें. शस्त्रवैद्यानें गलबला बंद करण्याची सर्वांस आज्ञा केली. शेखराच्या शरीरांतील रक्त मस्तकाकडे चढल्यामुळें त्याला प्रबल मूर्च्छा आलेली होती, म्हणून रक्ताभिसरण नीट सुरू होण्यासाठीं थोडेसें रक्त काढणें भाग होतें. त्या कुशल शस्त्रवैद्यानें आपल्याजवळचें एक नस्तर काढलें, आणि शिरावेध करून रक्त काढण्यास प्रारंभ केला. हे वैद्याचे उपचार चालू असतां चतुरक वैद्याला साह्य करीत होता, त्यामुळें जांघिळाला थोडी फुरसद मिळाली, आणि त्यानें छावणीकडील वर्तमान भिल्लांस विचारून घेतलें.

भिल्लांच्या सांगण्यावरून जांघिळाला असें कळून आलें कीं, शत्रूच्या सैन्यांतील एक हेर आपल्या सैन्यांत आला असून शेखर नाहींसा झाल्याचें वर्तमान त्यानें शत्रूला कळविलें. शत्रूचा सेनापति नाहींसा झाला, हें वर्तमान वीरसेनाला समजतांच त्यानें क्षणार्धाचा विलंब न करितां एकदम तटाचे दरवाजे उघडून थेट देवळावर चाल केली. आपल्या पक्षाचे लोक शेखरासंबंधानें वाटाघाट करीत बसलेले होते, त्यांना शत्रु आपल्या अंगाशीं भिडेपर्यंत त्याची दादच लागली नाहीं. प्रतापपुरकर आणि वत्सपुरकर यांचीं मनें दुःखित झालेलीं असल्यामुळें शेखराचा पत्ता लागेपर्यंत युद्ध करण्याचें त्यांनीं नाकारलें. वेडा घालणाऱ्या लोकांत या भिल्लांचाच भरणा विशेष असल्यामुळें त्यांनीं युद्धांतून अंग काढल्याबरोबर बाकीच्या सैन्याचे हातपाय लंगडे पडले, आणि शत्रूनें दंडधरासह कित्येक सैनिकांना कैद केलें. प्रतापपुरकर आणि वत्सपुरकर यांना शत्रूची भीति वाटत नव्हती, पण शत्रूला त्यांची भीति वाटत असल्यामुळें त्याच्या वाटेस कोणी गेलें नाहीं; म्हणून ते शेखराचे अनु-

यायी भिल्ल मुकाट्यानें शत्रूपासून दूर चालले होते. आपल्याच पक्षांतील कोणा तरी शत्रूला फितूर असून त्यानें शेखराचा घात केला असावा, अशी जबर शंका भिल्लांच्या मनांत उद्भवली असल्यामुळें ते अगदीं विथरून गेले होते. आपल्या पक्षांतील लोकांनीं अशा रीतीनें युद्धांतून अंग काढलें ही गोष्ट जांघिळाला नापसंत वाटली नाहीं. शेखराचा घात करणारा नीच मनुष्य आपल्याच पक्षांतील आहे, असें जांघिळासही वाटत होतें; असले नीच पुरुष जेथें आहेत, तेथून आपण दूर असावें, हीच गोष्ट त्याला पसंत होती, म्हणून त्यानें आपल्या भिल्लांस तिळमात्र दूषण दिलें नाहीं. शत्रु आपल्या वाटेस गेले नाहींत, तर आपण होऊन त्यांची कळ काढावयाची नाहीं, असें ठरवून व आपल्यास शक्य तितकी व्यवस्थित रचना करून त्यानें त्यांस परत प्रतापपुरीं जाण्याची आज्ञा केली.

शेखराचें रक्त निघाल्यावर तो शुद्धीवर आल्याचीं लक्षणें दिसूं लागलीं. त्याच्या डाव्या पायांच्या गुडघ्याचा सांधा निसटला होता. त्याशिवाय त्याच्या देहाला कोणत्याही प्रकारची इजा झालेली नव्हती. जांघिळानें कित्येक हुषार व चपळ लोक शेजारच्या गांवीं पाठवून तेथून एक डोली आणविली, आणि तींत शेखराला बसवून त्या सर्व सैन्यानें प्रतापपुरचा मार्ग धरिला.

प्रकरण ४९ वें.

पुनरागमन.

मागील प्रकरणांत सांगितलेली हकीकत घडून आल्यानंतर सुमारें तीन दिवसांनीं प्रतापपुरामध्यें पुढील प्रकार घडून आला. चूडामणि भृगुकच्छ नगरांतून नाहींसा झाल्याचें वर्तमान दृढसंधाला कळल्यापासून त्याला आपल्या पुत्राची मोठी काळजी वाटत होती, आणि त्या काळजीचा त्याच्या शरीरावर परिणाम होऊन तो हळु हळु क्षीण होत चालला होता. यावेळीं त्याच्या दोन्ही पुत्रांपैकीं एकही जवळ नसल्यामुळें त्याला फार वाईट वाटत होतें. आपला पति दिवसेंदिवस क्षीण होत चालला, हें पाहून राणी मेधावती तर अतिशयच कष्टी झाली होती. तिला आपल्या पुत्रांची काळजी असून आणखी त्या काळजींत पतीच्या काळजीची भर पडली होती. परंतु दृढसंधराजाइतकी ती क्षीण झालेली नव्हती. यावेळीं प्रियंवदेनें आपल्या सासू-सासऱ्यांची शुश्रूषा उत्तम प्रकारें केली. दृढसंध जोंपर्यंत हिंडत फिरत होता, तोंपर्यंत प्रियंवदेस थोडासा निकामा वेळ मिळत असे; पण दृढसंधानें बिछाना धरल्यापासून ती एकसारखी त्याजपाशीं बसून राहत असे. दृढसंधाकडे नोकरचाकरांची वाण होती असें नाहीं. तरी नोकर माणसांनीं केलेली शुश्रूषा, आणि काळजीच्या नातलगांनीं केलेली शुश्रूषा यांमध्यें महदंतर असतें. आपला जांवई आजारी आहे, हें वर्तमान समजल्याबरोबर वृषपति हेमचंद्रासह प्रतापपुरींच येऊन राहिला होता. हेमचंद्र मोठा विद्वान् आणि विचारी पुरुष असल्यामुळें तो वारंवार अनेक प्रकारचा उपदेश करून दृढसंध राजाची समजूत करीत असे. हेमचंद्र आल्यापासून प्रियंवदेला थोडी फुरसद मिळूं लागली, पण ती फुरसद मिळाल्यामुळें तिला वारंवार आपल्या पतीचें स्मरण होऊन तिचा तेवढा वेळ वियोगजन्य दुःखामध्यें जाऊं लागला ! तात्पर्य काय कीं प्रतापपुरचा राजवाडा थोड्या दिवसांपूर्वी उत्साहाचें आणि आनंदाचें माहेरघर बनला होता, तोच राजवाडा सध्या काळजींचें निवासस्थान बनला होता !

मागील प्रकरणांतील हकीकत घडून आल्यानंतर चवथे दिवशीं सायंकाळीं दृढसंधराजा बिछान्यावर पडला असून प्रियंवदा आणि मेधावती अशा दोघीजणी त्याच्यापाशीं बसलेल्या होत्या. फार उजेडाचा दृढसंधाला त्रास होत असे, म्हणून त्याच्यापाशीं

एक मंद दिवा तेवत होता; त्यामुळें बरीच उदासीनता पसरली होती, आणि दृढसंधाचा आधींच निस्तेज झालेली मुद्रा अधिकच निस्तेज दिसत होती. आपल्या पुत्रांचें कांहीं वर्तमान समजलें कीं नाहीं, याची चौकशी तो राणी मेधावतीपाशीं करीत होता; इतक्यांत हेमचंद्र आणि वृषपति तेथें आले; त्यांनीं एक दोन दिवसांपूर्वी जें एक शेसराचें पत्र आलें होतें, त्यांतील मजकूर पुनः एकदां त्याला सांगितला; शेसरानें योजिलेल्या मोहिमेंत त्याला यश येऊन त्याची मोठी कीर्ति होईल, असें सांगून त्यांनीं चालू लढाईसंबंधानें बरीच वाटाघाट सुरू केली. दृढसंध हा स्वतः कसलेला योद्धा असल्यामुळें त्याला वा गोष्टी मनापासून आवडल्या आणि त्याला थोडी हुषारी वाटली, हें सांगणें नकोच.

युद्धासंबंधाच्या गोष्टी ऐन रंगांत आल्या असतां त्या दिवाणखाण्याचें दार उघडून एक तरुण पुरुष आंत आला. तो सरळ दृढसंधाच्या बिछान्यापाशीं जाऊन त्यानें दृढसंधाला आणि मेधावतीला प्रणाम केला, आणि तो म्हणाला,–'अहो तात, या बालकाकडे कृपादृष्टीनें अवलोकन करा! माते, तुझाही या तुझ्या पुत्राला आशीर्वाद असूं दे! अरेरे! पण तातांची ही काय दशा झाली आहे!'

हा तरुण पुरुष चूडामणीच होता, हें वाचकांच्या ध्यानीं आलें असेल. त्यानें वडिलांच्या क्षीणतेकडे पाहून आश्चर्याचे उद्गार काढले होते, पण तो स्वतः किती क्षीण झाला होता? त्याचा पूर्वीचा अंगलोट नाहींसा होऊन त्याच्या देहामध्यें नुसतें अस्थिचर्म मात्र उरलें होतें. त्याचे डोळे पांढरे फटफटीत आणि निस्तेज झाल्यामुळें ते अगदीं चकचकीत दिसत असून त्याचीं गालफडें बसलीं होतीं. या त्याच्या शारीरिक देखाव्यांत भर घालण्यासाठींच जणुं काय त्याच्या अंगावरील व्रणांच्या चिंध्या झाल्या होत्या! त्याची मुद्रा इतकी भेसूर दिसत होती कीं, जणुं काय हें एकादें बोलतें चालतें प्रेत आहे, असेंच एखाद्याला वाटलें असतें! त्याचें शरीर इतकें खंगलें होतें, तरी त्याचा दुष्टपणा अणुमात्र कमी झाला नसून 'अशक्तं दुर्जनम्' या म्हणीप्रमाणें त्याच्या दुर्जनत्वाला मात्र रगडून भर पडली होती! त्यानें आपल्या पित्याची अशी अवस्था पाहतांच मोठ्या मानभावीपणानें हुंदके काढून रडावयास प्रारंभ केला.

चूडामणि असा एकाएकीं तेथें आला, या गोष्टीचें सर्वांस मोठें आश्चर्य वाटलें, आणि त्यांस आनंदही झाला. हेमचंद्र आणि प्रियंवदा यांना जरी चूडामणीचा स्वभाव आणि त्याचें वर्तन हीं अगदीं आवडत नव्हतीं, तरी तो जिवंत असूं नये, असें मात्र कधीं स्वप्नांतसुद्धां त्यांच्या मनांत आलेलें नव्हतें, तो जिवंत परत आला, या गोष्टीचा त्यांना मनापासून आनंद झाला. दृढसंध आणि मेधावती यांचें चूडामणीवर किती प्रेम होतें, हें वाचकांस येथें नवीन सांगण्याची जरूर नाहीं. जणुं काय आपल्या शरीराला सोडून गेलेला आपला प्राण पुनः आपल्या शरीरांत परत आला, असा त्यांस आनंद झाला. वैद्याच्या शंभर मात्रांनीं जें काम झालें नव्हतें, तें नुसतें त्याच्या दर्शनानें झालें. एका क्षणाच्यापूर्वी निस्तेज आणि उदासीन दिसणारी दृढसंधाची मुद्रा सतेज आणि उल्हासयुक्त दिसूं लागली. मेधावतीनें तर झटकन पुढें होऊन आपल्या आनंदाश्रूंनीं त्याला स्नान घातलें. वृषपतीनेंही आपल्या नातवास आलिंगन दिलें. हेमचंद्रानें मधुर भाषणानें त्याचें स्वागत केलें, आणि प्रियंवदेनेंही स्मितमुखानें आपला आनंद व्यक्त केला. वृषपति आणि हेमचंद्र यांनीं त्याचें स्वागत केलें हें खरें, पण आनंदाचा पहिला क्षण संपतांच त्यानें पूर्वी जें शेसराशीं नीचपणानें वर्तन केलें होतें त्याचें, आणि त्यानें नुकताच अविचारानें गोवर्धनाचा खून केला

होता, त्याचें त्यांस स्मरण झालें; त्याच्या दुष्ट स्वभावाचा त्यांस तिरस्कार वाटल्यावांचून राहिला नाहीं. तथापि ही वेळ तिरस्कार व्यक्त करण्यास योग्य नाहीं. हें ते दोघेही जाणून असल्यामुळें त्यांनीं आपल्या मनांतील विचार बाहेर दिसूं दिले नाहींत.

चूडामणीचें मन त्याला खात असल्यामुळें आपल्याविषयीं कोणाला काय वाटत असेल हें तो पक्कें जाणून होता. म्हणून आपल्या-संबंधानें सर्वांच्या मनांत अनुकूल ग्रह उत्पन्न करण्यासाठीं तो आपण होऊन बोलला,–'माते, मी आतांपर्यंत जे कष्ट सहन केले आहेत, त्याचें यथार्थ वर्णन करणें हें माझ्या शक्तीबाहेरचें काम आहे!' हे शब्द उच्चारीत असतां जणुं काय एकाद्या गांजलेल्या माणसाप्रमाणें त्यानें तेथील एका आसनावर धाडकन् आपलें अंग टाकिलें.

वृद्ध दृढसंधराजा आपल्या बिछान्यावर उठून बसला आणि म्हणाला,–'मुला, तुझें सर्व वर्तमान मला ऐकूं दे! इतक्या दिवसांत तुझें कांहींच वर्तमान आम्हांला न समजल्या-मुळें आमची काय अवस्था झाली आहे, हें तर तूं पाहतच आहेस! तूं सुद्धां अलीकडे बरेच कष्ट सोसले आहेस, हें तुझ्या या कृश शरीरावरून व्यक्त होत आहे! यासाठीं तुझी सर्व हकीकत मला ऐकूं दे!'

अगदीं मोकळेपणाचा आव घालीत तो मानभावी तरुण म्हणाला,–'बरें, मी आधीं विचारतों, शेखराचें काय वर्तमान आहे? तो खुशाल आहेना? खरेंच सांगतों, गेल्या सालीं मीं त्यांचा जो महदपराध केला, त्या-बद्दल मला एकसारखा पश्चात्ताप होत असतो!'

दृढसंध म्हणाला,–'त्या झाल्या गेल्या गोष्टींची आठवण आतांच कशाला पाहिजे? तुझे सर्व अपराध आम्हीं पोटांत घातले आहेत, आणि शेखरही ते विसरून गेला आहे, यासाठीं आतां त्या गोष्टी राहूं देत. बरें, पण तूं जर शेखरासंबंधानें माहिती विचारतोस, तर आधीं सांग, त्यानें संपादन केलेल्या विजयांची वार्ता तुला अजून कशी समजली नाहीं? तूं आलास तरी कोणत्या मार्गानें?'

चूडामणि अत्यंत आश्चर्य झाल्यासारखें दाखवून बोलला,–'खरोखरच सांगतों, बल-भुवनच्या लढाईनंतर मला शेखराचें वर्तमान कांहींच समजलें नाहीं! बलभुवनापाशीं शेख-रानें मोठा विजय संपादन केला, आणि दंडधरानें सर्वानुमतें आपला सेनापतीचा अधिकार त्याला दिला, एवढेंच काय तें मला समजलें आहे. आपलें दर्शन झालें हें फार चांगलें झालें. मीही उद्यांच्या उद्यां आपल्या आज्ञेनें शेखराच्या साह्यास जाईन असें म्हणत आहें. मी जरी सध्यां शरीरानें अशक्त झालों असलों, तरी माझें मन खंबीर आहे. शेखरानें महीपुरास वेढा घातला, इतकें वर्तमान मात्र मला समजलें आहे. तो पूर्वी-प्रमाणेंच तेथेंही आपली तरवार गाजवील, ही माझी खात्री आहे. म्हणूनच त्याच्या विजयांचें वर्तमान ऐकण्यास मी उत्सुक झालों आहें. अलीकडची तीन चार दिवसां-तील हकीकत काय ती मला समजली नाहीं. त्याच्यापूर्वी त्यानें केलेल्या पराक्रमाचा डंका सर्वत्र गाजत असतां त्याचा पराक्रम मला समजला नाहीं असें होईल तरी कसें!

दृढसंध वीरश्रीनें बोलला,–'शेखर तसाच पराक्रमी आहे! तूं परत आलास, हें फार चांगलें झालें. दोन दिवसांपूर्वी एक दूत त्याचें पत्र घेऊन आला, त्यावरून मही-पुरच्या वेढ्याचें काम त्यानें मोठ्या उत्सा-हानें चालविलें आहे, असें हे पंडितराय सांगत होते. मी आतां लवकरच बरा होईन. शेखर तिकडे एकटा युद्धास गेला असतां-त्या लहान मुलास मोहिमेवर पाठवून आपण घरीं बसावें हें मला बरें वाटत नाहीं. आणखी चार पांच दिवसांनीं आपण एक-दमच मोहिमेवर जाऊं.'

हें त्याचें भाषण मेधावतीला आवडलें नाहीं. म्हणून ती प्रत्यक्ष म्हणाली,–'तूं

मोहिमेच्या गोष्टी आधीं राहूं देत ! चूडामणि आज मोठ्या सायासानें आमच्या दृष्टीस पडला आहे. त्याचें वर्तमान अगोदर ऐकिलें पाहिजे !'

चूडामणि बोलला,-'माझी हकीकत कांहीं फारशी मोठी नाहीं. ती मला अगदीं थोडक्यांत सांगतां येईल ! भृगुकच्छ नगराला शत्रूचा वेढा पडला असतां मी तेथें किती मेहनत घेतली, हें आपल्या कानीं आलेंच असेल, पण तेथें आयत्या वेळीं जी एक महत्त्वाची गोष्ट घडून आली, तिजमुळें आमची सर्व मेहनत व्यर्थ गेली, इतकेंच नव्हे, तर आमच्या शत्रूनीं तिचा भलताच अर्थ करून माझ्या कीर्तीला कलंक लावण्याचा प्रयत्न चालविला आहे, हेंही मी जाणून आहें. मी त्या लबाड गोवर्धनास देहान्त शिक्षा दिली, म्हणून मजवरच पुष्कळ लोक रागावले आहेत !'

हे त्याचे शब्द ऐकून प्रियंवदेच्या अंगावर कांटाच उभा राहिला. तिनें यापूर्वी जें वर्तमान ऐकलें होतें, त्यावरून चूडामणीनें गोवर्धनाचा निष्कारण खून केला, अशी तिच्या मनाची ठाम समजूत झालेली होती. अर्थात् या वेळचें त्याचें तें धाष्ट्यं पाहून तिला मोठा चमत्कार वाटला, आणि ती किंचित् तिरस्कारदर्शक मुद्रेनें त्याच्याकडे पाहूं लागली. आपलें भाषण कोणास कितपत रुचतें हें पाहण्यासाठीं चूडामणि तेथील प्रत्येकाची मुद्रा लक्ष्यपूर्वक पाहत असतां प्रियंवदा आपणाकडे तिरस्कारयुक्त दृष्टीनें पाहत आहे, ही गोष्ट त्याच्या ध्यानीं आल्यासेरीज राहिली नाहीं. त्याचप्रमाणें आपलें मन त्यानें ओळखलें ही गोष्टही प्रियंवदेला स्पष्ट कळली.

एका प्रियंवदेखेरीज इतरांस आपली गोष्ट पटेल अशी चूडामणीची खात्री झाली, आणि तो मोठ्या उमेदीनें आणि गंभीरपणें आपली हकीकत पुढें सांगूं लागला. तो म्हणाला,-'गोवर्धन शत्रूला फितूर झाला होता. आम्हीं जर त्याच्यावर पूर्वीपासून लक्ष्य ठेविलें नसतें, तर त्यानें तें शहर नुसता वेढा पडल्याबरोबर शत्रूच्या ताब्यांत केलें असतें ! तो नीच बाहेरून मोठा विश्वासाचा आव घाली, पण आंतून त्याचा सर्व ओढा शत्रूकडे ! ज्या रात्रीं मीं त्याला शिक्षा केली, त्याच रात्रीं त्याच्या फितुरीसंबंधानें माझ्या मनाची अगदीं पक्की खात्री होऊन गेली असल्यामुळें माझा कोध अनावर झाला, आणि असल्या पाजी माणसाला राजाज्ञेनें जी शिक्षा झाली असती, तीच शिक्षा मीं त्याला दिली. हें माझें आचरण त्याच्याभोंवतीं कुत्र्यासारखें शेपूट हालवीत वसणाऱ्या भ्याड पुरुषांस किंवा त्याच्यासारख्या शत्रूला फितूर असलेल्या माणसांस आवडलें नाहीं आणि ते माझी अपकीर्ति करण्यास प्रवृत्त झाले आहेत, हें मी जाणून आहें. पण मी त्या नीचांची अगदीं पर्वा करीत नाहीं. मीं माझें कर्तव्य केलें आहे असें माझी मनोदेवता मला सांगत आहे ! हें माझें कर्तव्य मोठें नाजुक, बिकट, त्रासदायक, कठोरपणाचें आणि न्यायनिष्ठुरतेचें असल्यामुळें माझ्या शत्रूंना माझी निंदा करावयास चांगलें फावत आहे. लढाईतील प्रसंग मोठे आणीबाणीचे असतात ! जरा थोडी नजरचूक झाली, तरी पुरे, तेवढ्या चुकीनें संपूर्ण राज्याची राखरांगोळी उडून जाते. यासाठीं आपलें कर्तव्य अगदीं वेळच्या वेळीं हाताबरोबर करून टाकलें पाहिजे. मीं जें केलें, तें अगदीं न्यायानें केलें, अशी माझ्या मनाची खात्री असल्यामुळें मी आपल्या त्या कृत्यासंबंधानें आणखी कांहीं बोलत नाहीं. मीं भृगुकच्छ सोडल्यावर किती हाल सोसले, हेंच आतां सांगतों. मी ज्या रात्रीं गोवर्धनाला शिक्षा केली, त्याच रात्रीं-नव्हे त्याच घटकेस-शत्रूच्या शिपायांनीं भृगुकच्छ नगर काबीज केलें, हें तुम्हांस समजलेंच असेल.'

हेमचंद्राला हें चूडामणीचें भाषण अगदीं रुचलें नाहीं. दुसऱ्याचें मन दुखावेल अशा

रीतीनें भाषण करण्याची त्याला जरी साऱ्या जन्मांत संवय नव्हती, तरी यासंगीं त्याच्यानें उगीच बसवेना. मर्मभेद होण्यासारखा स्वर काढून तो बोलला,–'अहो राजपुत्र, गोवर्धन फितूर होता, असें जें तुम्ही म्हणतां, तें मला खरें वाटत नाहीं. गोवर्धन जर खरोखरच फितूर असता, तर दोन घटका रात्रीपासून मध्यरात्रीपर्यंत बाकीच्या सैनिकांची समजूत घालण्याचा खटाटोप करीत तो कां बसला असता?'

हेमचंद्राच्या या प्रश्नावरून त्याला गोवर्धनाच्या खुनासंबंधाची सर्व माहिती असावी, असें चूडामणीच्या तत्काल ध्यानीं आलें, आणि त्या बुद्धिमान् पुरुषाबरोबर वादविवाद करीत बसल्यास त्यांत बाजू अंगावर येईल, असें चूडामणीच्या मनांत येऊन 'शेषं कोपेन पूरयेत्' या मार्गाचा अवलंब करून तो म्हणाला,–'पंडितराय, या बाबतींत तुमच्याशीं वादविवाद करण्याची माझी इच्छा नाहीं. हा तुमचा विषय नव्हे. तुमच्या पुस्तकांतील विषय जसा आम्हांस समजत नाहीं, तसा हा युद्धाचा विषय तुम्हांस अगदीं समजत नाहीं. यासाठीं तुम्ही या बाबतींत मध्यें तोंड घालण्याचें कारण नाहीं!'

हें त्याचें उत्तर ऐकून हेमचंद्राला त्याचा मोठा राग आला होता, पण प्रसंगाकडे लक्ष्य देऊन तो स्वस्थ राहिला. हेमचंद्र जसा विद्वान् होता, तसा शूरही होता, हें वाचकांच्या ध्यानीं असेलच; परंतु केवळ दृढसंधाच्या मनास खेद होईल, यासाठींच त्यानें यावेळीं माघार घेतली.

नंतर चूडामणि म्हणाला,–'मी आतां आपली हकीकत पुढें सांगतों. गोवर्धनाला योग्य शिक्षा करून मी त्याच्या वाड्याच्या अंगणांत आलों, त्यावेळीं शत्रूनें शहरांत प्रवेश केला आहे, असें मला आढळून आलें. गोवर्धनाच्या वाड्यांत सर्व प्रमुख सैनिक एकत्र झालेले असल्यामुळें आमच्या सैन्यास कोणी नियंता नव्हता, म्हणून शत्रूनें शहरांत घुसून मोठा अनर्थ मांडिला होता. यावेळीं मी शत्रूच्या तडाक्यांत एकटा सांपडलों असल्यामुळें मोठ्या शौर्यानें मला आपला मार्ग मोकळा करून घ्यावा लागला. मी तसाच लढत लढत शत्रूच्या एका टोळींतून बाहेर पडलों, इतक्यांत आमच्या पक्षाच्या लोकांनीं आपलें निशाण उतरून किल्ला शत्रूच्या स्वाधीन केल्याची बातमी शत्रूला कळविली, व त्यांनीं युद्ध बंद केलें. याप्रसंगीं मला बऱ्याच जखमा झाल्या होत्या. लढाई थांबली हें पाहून मी आपल्या निवासस्थानीं जावयास निघालों. मी आजोबांच्या वाड्याकडे जात असतां वाटेंतच आमच्या पक्षांतील आणि शत्रूच्या पक्षांतील लोक एकजुटीनें माझा शोध करीत आहेत, आणि माझ्यामागें धरणें सुटलें आहे, हें मला समजलें. म्हणून मी वाड्याकडे न जातां गर्दीत घुसून शहरांतून बाहेर पडण्याचा यत्न केला. तो माझा यत्न ईश्वरकृपेनें सिद्धीस गेला. मी शहरांतून बाहेर पडल्यावर सुमारें एक घटकाभर सारखा धांवत होतों. मी कोठें चाललों आहें, आणि मला पुढें कोठें जावयाचें आहे, याचें मला त्यावेळीं अगदीं भान नव्हतें. भृगुकच्छ शहरापासून सुमारें दीड कोस दूर गेल्यावर मला थकवा आला; माझे पाय उचलत नाहींसे झाले, माझ्या डोळ्यांपुढें काजवे चमकूं लागले, माझी स्मृति नष्ट झाली, आणि मी बेशुद्ध होऊन खालीं पडलों! मी पुनः शुद्धीवर आलों, त्यावेळीं मी अंथरुणावर आहें, असें मला आढळून आलें. मीं आसपास नजर टाकली, त्यावरून मी एका झोंपड्यांत आहें, असें तत्काल माझ्या लक्ष्यांत आलें. त्या झोंपड्याचा मालक एक गरीब कुणबी होता. तो मोठा उदार अंतःकरणाचा पुरुष असल्यामुळें त्यानें रस्त्यावरून मला उचलून आणून आपल्या घरांत आश्रय दिला होता. मला धरून देणारास मोठें बक्षीस मिळेल, अशी वीरसेनानें दंवडी पिटली असतांही त्या कुणब्यानें लोभास वश न होतां मला आश्रय

दिला. मी सुमारें पाऊण महिना त्या खोंपड्यांत लोळत पडलों होतों. पाऊण महिन्यानंतर मला थोडी थोडी शक्ति येऊं लागली. माझ्या अंगावरील जखमाही बऱ्या झाल्या होत्या. यापुढें भृगुकच्छ नगराच्या इतकें जवळ राहणें धोक्याचें आहे, असें मनांत येऊन मी त्या कुणब्याची रजा घेतली. मला इतकेंच वाईट वाटतें कीं ज्यानें माझा प्राण वांचविला, त्या कुणब्याला देण्यासाठीं त्यावेळीं माझ्यापाशीं द्रव्य नव्हतें, म्हणून मला त्या कुणब्याचे उपकार शिरावर घेऊन आपला मार्ग धरणें भाग पडलें.'

दृढबंध बोलला,–'काहीं हरकत नाहीं. आपण अजूनसुद्धां त्या कुणब्याच्या उपकाराची शक्य तितकी फेड करूं.'

चूडामणि बोलला,–' होय; माझ्याही मनांत तसेंच आहे. मी त्या कुणब्याच्या घरांतून बाहेर पडल्यावर माझ्या विपत्तीस खरा प्रारंभ झाला. बक्षिसाच्या आशेनें मला कोणी पकडील, ही भीति निरंतर माझ्यापुढें असल्यामुळें मला आपला प्रवास फक्त रात्रीच्या वेळींच करणें भाग झालें. अंगांत ताकद नाहीं, जवळ द्रव्य नाहीं, आपलें नांव सांगण्याची चोरी, अशा स्थितींत मीं कसे दिवस घालविले, यांचें मी अधिक वर्णन करीत बसत नाहीं. दिवसाची कोठें तरी एकाद्या खेड्यापाड्यांतील देवळांत अगर धर्मशाळेंत वस्ती करावी, क्षुधा शांत करण्यासाठीं याचना करावी, रात्र झाल्याबरोबर काळोखांतून अनवाणी आपटत धुपटत ठेंचा खात कोस दोन कोसांची मजल मारावी, असें करीत करीत मी एकदाचा आपल्या पायांशीं येऊन पोंचलों !'

अशा रीतीनें चूडामणि आपल्या अविचाराची काहणी सांगत आहे, इतक्यांत एक देवडीवाला मोठ्या घाईनें तेथें आला, आणि घाबऱ्या घाबऱ्या स्वरानें बोलला,–'महाराज, छोटे राजकुमार परत आले व आपलें सर्व सैन्यही परत आलें, अशी बातमी झाली आहे !'

हें अकल्पित वर्तमान ऐकून सर्वांस फार आश्चर्य वाटलें. हें वर्तमान आनंदाचें समजावयाचें कीं दुःखाचें समजावयाचें, याचा पिंवंवदेला उलगडा होईना. ती मोठ्या बुचकळ्यांत पडली.

हें वर्तमान ऐकून चूडामणीची मात्र मोठी त्रेधा उडाली। वधस्तंभापाशीं नेलेल्या अपराध्याचें काळीज जसें धडधडत असेतें, त्याप्रमाणें त्याचें काळीज धडधडूं लागलें। त्याचे हातपाय जणुं काय लटके पडल्याप्रमाणें झाले आणि त्याच्या तोंडास कोरड पडली ! ' कोण ? शेखर ? ' हे दोनच शब्द त्यानें तोंडातून बाहेर काढले; यावेळीं त्याची जी चमत्कारिक स्थिति झाली होती, ती फक्त प्रियंवदा आणि हेमचंद्र यांच्या मात्र ध्यानीं आली होती.

आपल्या प्रियतमाचें आपणास दर्शन होणार म्हणून मोठ्या आनंदानें आणि गडबडीनें प्रियंवदा दुसऱ्या मजल्याचा जिना उतरून खालीं आली. तथापि आपला पति एकाएकीं परत येण्याचें कारण तिच्या ध्यानांत आलें नसल्यामुळें तिचें मन संशयांत गोते खात होतें. ती थोरल्या दरवाज्यापाशीं उभी राहून तेथील समोरच्या देवडीकडे पाहूं लागली, पण शेखर तिच्या दृष्टीस पडला नाहीं. देवडीच्या दरवाज्यांतून कित्येक सशस्त्र भिल्ल एकसारखे आंत येऊन त्यांनीं सर्व अंगण भरून टाकलें; थोड्या अवकाशानें एक टोळी अंगणामध्यें आली. ती टोळी पाहतांच प्रियंवदेच्या उरांत धस्स झालें, आणि तिनें आंत येत असलेल्या आपल्या माहेरच्या शस्त्रवैद्यापाशीं आपल्या पतीची चौकशी केली.

वैद्य तिला म्हणाला,–' ताईसाहेब, काळजी करण्याचें कारण नाहीं. राजकुमार शेखराला अपघातानें थोडी इजा झाली आहे, म्हणून त्यांस डोलींतून आणलें आहे.'

हें ऐकल्याबरोबर त्या प्रेमळ पत्नीस दम कसा निघावा ? ती एकदम डोलीपाशीं गेली,

आणि तिनें डोलीवर टाकलेलें वस्त्र बाजूस सारून आंत डोकावून पाहिलें, त्यावेळीं आपला पति आंत पडलेला आहे, असें तिला आढळून आलें. आपली पत्नी आपल्यापाशीं आलेली दृष्टीस पडतांच शेखराला फार आनंद झाला, आणि तो तिला म्हणाला,–'प्रिये, भिण्याचें कारण नाहीं. मी लवकरच बरा होईन.' हे शब्द जरी त्यानें मोठ्या उत्साहानें उच्चारिले होते, तरी त्याचा शब्द खोल गेलेला असल्यामुळें ते प्रियंवदेला अस्पष्टच ऐकूं आले.

आपल्या पतीची अशी दशा पाहून प्रियंवदेला खेद झाला, आणि तिच्या नेत्रांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. मध्यें चारच दिवस गेले होते, पण तेवढ्या चारच दिवसांत शेखराचें शरीर अत्यंत कृश झालें होतें. डोळे खोल गेले होते, आणि मुखावरील तेज अगदीं नाहींसें झालें होतें. प्रियंवदा आपल्या पतीकडे जात आहे, हें पाहिल्याबरोबर शस्त्रवैद्यही डोलीपाशीं उभा राहिला, आणि त्यानें प्रियंवदेचें समाधान करण्याचा यत्न केला. अपघातामुळें–किंवा विश्वासघातामुळें–शेखर बऱ्याच उंचावरून पडला, पण ईश्वरदयेनें नुसत्या पायांच्या सांध्यावरच निभावलें, नाहीं तर वेळ मोठी कठीण आली होती, असें त्यानें तिला सांगितलें. आपल्या पतीला पायाखेरीज दुसरीकडे कोठें इजा झालेली नाहीं, हें समजतांच प्रियंवदेला थोडा धीर आला, आणि ती डोलीपासून दूर झाली.

नंतर कित्येक भिल्लांनीं त्याला डोलींतून काढून राजवाड्यांतील एका प्रशस्त दिवाणखान्यांत आणून त्यास तेथील मऊ बिछान्यावर निजाविलें. दृढसंघाच्या दिवाणखान्यांतून प्रियंवदा बाहेर पडतांच चूडामणि आणि हेमचंद्र हेही तिच्या मागोमाग खालीं आले होते. शेखराला आंत आणितांना चूडामणीनें त्याच्यावर नजर टाकिली, त्यावरून तो बाहेरला शुद्धीवर आहे, हें त्याच्या ध्यानीं आलें होतें. दुसऱ्यानें जेव्हां चूडामणीनें आपल्या बंधूकडे नजर टाकिली, त्यावेळीं शेखराची नजर आपल्याकडे आहे, असें त्यास आढळून आलें. त्या दोघां बंधूंची अशी नजरानजर होतांच त्या उभयतांना काय वाटलें असेल, याचें आम्हीं वर्णन करण्यापेक्षां वाचकांनींच कल्पना केलेली बरी! यावेळीं एका प्रियंवदेखेरीज दुसऱ्या कोणाचेंही लक्ष्य त्यांच्याकडे नव्हतें. ती एकसारखी आपल्या पतीकडे पाहत त्याच्यापाशीं उभी राहिली होती व बाकीच्या लोकांची शेखराच्या व्यवस्थेसाठीं मोठी धांदल उडाली होती. आपल्या पतीनें आपल्या वडील बंधूकडे पाहतांच त्याच्या मुद्रेवर जें त्रासाचें स्पष्ट चिह्न उमटलें, तें तिच्या नजरेस पडलें असल्यामुळें तिनें सहजगत्या चूडामणीकडे पाहिलें, त्यावेळीं तो गोंधळून गेला आहे, इतकेंच नव्हे, तर भीतीचीं चिह्नें त्याच्या मुद्रेवर स्पष्ट दिसत आहेत, असें तिला आढळून आलें. चूडामणीच्या स्वभावाची तिला पक्की ओळख पटलेली असल्यामुळें त्याच्या त्या वेळच्या गोंधळण्यावरून शेखराच्या अपघाताशीं चूडामणीचा जवळचा संबंध असला पाहिजे, असें तिच्या मनानें घेतलें. थोड्या वेळानें प्रियंवदा तेथून कांहीं आगत्याची वस्तु आणण्यासाठीं निघून गेली असतां चूडामणि एकदम आपल्या धाकट्या बंधूपाशीं गेला, आणि त्यानें त्याचे एकदम पाय धरिले व डोळ्यांत अश्रु आणून दीनवाणीनें चूडामणि शेखराला म्हणाला,–'शेखर! या वेळीं माझी मान सर्वस्वीं तुझ्या हातीं आहे. तूंच आतां माझ्या प्राणांचें आणि माझ्या अब्रूचें रक्षण कर! तूं [illegible] करशील, तर मी सान्या [illegible] वाटेस जाणार नाहीं! मी [illegible] आज येथून तीर्थयात्रेला [illegible] माझी अब्रू वांचीव!'

शेखर बोलला,– [illegible] सर्व अपराध क्षमा केले [illegible], मी तुझें नांव घेणार [illegible]

यावर चूडामणीनें त्याचे आभार मानिले, आणि तो त्याच्या बिछान्यापासून दूर झाला; पण तो दूर होतो, इतक्यांत प्रियंवदा पुनः तेथें आली. चूडामणीच्या मुद्रेवरूनच तो शेखरापाशीं कांहीं तरी बोलत असावा, असें तिनें जाणिलें होतें. तिनें त्यासंबंधानें आपल्या पतीला कांहीं प्रश्न न विचारतां ती गोष्ट मनांत घालून ठेविली. तथापि चूडामणीच्या त्या वेळच्या एकंदर वर्तनावरून आपल्या पतीच्या अपघाताशीं त्याचा निकट संबंध असावा, असें पुनः तिच्या मनांत आल्यावेरीज राहिलें नाहीं.

लवकरच दृढसंघ आणि मेधावती हीं दोघें शेखरापाशीं आलीं. आपल्या पुत्राची अशी अवस्था पाहून त्यांना फार खेद झाला. राजा व राणी यांच्या मागून राजवाड्यांतील नोकर माणसेंही शेखराच्या समाचारासाठीं त्या दिवाणखान्यांत आलीं होतीं, पण शस्त्रवैद्यानें तेथें गलबला होऊं नये म्हणून सर्वांस तेथून बाहेर काढून लाविलें. फक्त राजा, राणी, चूडामणि, प्रियंवदा आणि हेमचंद्र यांस मात्र त्यानें राहूं दिलें. शेखराला योग्य औषधोपचार केल्यावर फक्त मायेच्या एका माणसानें रात्रीं त्याजपाशीं रहावें, असें वैद्यानें सांगितलें. तें ऐकून राणीनें स्वतः तेथें राहण्याची आपली इच्छा प्रकट केली; पण प्रियंवदेनें आपणच राहणार असा आग्रह धरिला. कारण मेधावतीनें दृढसंघाच्या शुश्रूषेसाठीं त्याजपाशीं राहणें हें इष्ट होतें. अर्थात् त्या दोघींनीं आपापल्या पतीपाशीं राहणें योग्य अधिक आग्रह धरिला [illegible] आपल्या पतीपाशीं [illegible] माणसें आपल्या [illegible]

[illegible]धिळ व चतुरक यांस आपल्या [illegible]खराच्या अपघातासंबंधानें [illegible]त्या उभयतांनीं आपणा[illegible] असलेली सर्व हकीकत राजाला निवेदन केली. त्यांनीं सांगितलेली सर्व हकीकत ऐकून घेतल्यावर आपणास मोठा त्वेष आला आहे असा आविर्भाव करून, चूडामणि ओरडून म्हणाला,–'पण हें कृत्य करणारा कोण, हें समजलें पाहिजे! असलें नीच कृत्य करणाराचा सूड घेण्यास मी अगदीं एका पायावर तयार आहें. पण कायरे जांधिळा, हें कृत्य करणारा कोण असावा! हा नीच मनुष्य शत्रुपक्षाकडील असला पाहिजे, कीं शेखराचा उत्कर्ष सहन न झाल्यामुळें त्याचा नाश करण्यास प्रवृत्त झालेला कोणी आमच्याच सैन्यांतील हितशत्रु असला पाहिजे!'

जांधिळ बोलला,–'त्यासंबंधानें आमचा कांहींच तर्क चालत नाहीं. या गोष्टीचा उलगडा केव्हां होईल तो होवो!'

चूडामणि बोलला,–'पण शेखरानें काय सांगितलें! आपला घात करणारा कोण हें त्याला माहीत असेलच.'

जांधिळ म्हणाला,–'ते आज सकाळींच चांगले शुद्धीवर आले. त्यांनीं यासंबंधानें कांहीं सांगितलें असतें, पण वैद्यराजांनीं त्यांना बोलण्याची परवानगी दिली नाहीं. पण खरेंच सांगतों, जर का हें कृत्य करणारा कोण हें मला समजेल, तर मी त्याचा प्राण घेण्यास एका क्षणाचाही विलंब करणार नाहीं.'

चूडामणि मोठ्या आवेशानें बोलला,–'नाहीं! नाहीं! मी तुला तसें करूं देणार नाहीं!!! माझ्या भावाबद्दल शत्रूचा सूड घेणें हें माझें कर्तव्य आहे! तें मलाच केलें पाहिजे! हा नीच पुरुष कोण आहे, हें शेखराच्या मुखानें आपणांस लवकरच कळेल. त्या नीचाचें नांव समजलें, म्हणजे आपणांस पुढचा मार्ग सुलभ होईल.'

वृषपति आणि हेमचंद्र हा संवाद ऐकत होते, पण वृषपतीला या गूढाचा उलगडा करतां येत नसल्यामुळें तो उगीच बसला होता. हेमचंद्राच्या मनांत चूडामणीविषयीं

थोडी शंका उत्पन्न झाली होती, पण ती निराधार असल्यामुळें त्यालाही उगीच वसणें जरूर झालें होतें.

इकडे प्रियंवदा आपल्या पतीपाशीं बसली असतां अनेक प्रकारच्या विचारांनीं तिचें अंतःकरण व्याप्त होऊन गेलें होतें. आपल्या पतीची ती शोचनीय स्थिति पाहून तिच्या नेत्रांतून अश्रु वाहत होते, पण आपण दुःखी आहों, हें आपल्या पतीच्या दृष्टीस पडल्यास त्याला दुःख होईल, असा विचार करून तिनें आपले अश्रु मोठ्या कष्टानें आंवरिले. शेखराला अधिक बोलण्याची ताकद नसल्यामुळें त्यानें अगदीं मोजक्या शब्दांनीं तिचें शांतवन केलें. परंतु आपला घात करणारा कोण हें सांगितलें नाहीं.

आणखी तीन चार दिवस गेले. शस्त्रवैद्याच्या कुशलतेमुळें आणि प्रियंवदेच्या शुश्रूषेमुळें शेखराला बराच आराम पडला. आपले दोन्ही पुत्र आपल्यापाशीं असल्यामुळें दृढसंधाची काळजी नाहींशी झाली होती; आणि शेखराची प्रकृति रोजच्या रोज सुधारत असल्यामुळें तीही चिंता दूर झाली, म्हणून त्याची प्रकृति झपाट्यानें बरी होत चालली होती. पांचव्या दिवशीं जेव्हां त्या पिता-पुत्रांची भेट झाली, तेव्हां आपल्या पुत्राची ती स्थिति पाहून दृढसंधाला फार वाईट वाटलें. या भेटीच्या प्रसंगीं, ' आपण जर अशा प्रसंगांत सांपडलों नसतों, तर मोहिमेचा शेवट लागल्याखेरीज परत आलों नसतों; इतकेंच नव्हे, तर आपण स्वतःनें विजय संपादन केला असता, ' असें शेखरानें आपल्या पित्याला सांगितलें.

त्यावर दृढसंध बोलला,—'मुला, तूं मोहिमेच्या गोष्टी मनांत आणून उगीच कष्टी होऊं नको! तूं अशा रीतीनें परत आलास म्हणून कोणीही दोष देणार नाहीं. तूं जो पराक्रम गाजविला आहेस, त्यावद्दल तुझे मित्रच काय, पण तुझे शत्रु देखील तुझी स्तुति करतील. तूं या मोहिमेसंबंधानें जें एक टांचण करून ठेविलें होतेंस, त्यासंबंधाची माहिती मला चतुरकाचे तोंडून समजली आहे. त्या टांचणाप्रमाणें सर्व गोष्टी अगदीं बराबर घडून आल्या असत्या, असें माझेंही मत आहे. शेखर, तूं आपलें युद्धकौशल्य आणि पराक्रम यांचा योग्य उपयोग केला आहेस. हें नसतें विघ्न जर मध्यें उपस्थित झालें नसतें, तर तुझ्या हातून रत्नाकराचा त्याच्या राज्यावर पुनः स्थापना झालीच असती, हें मी खात्रीनें सांगतों. तूं माझा पुत्र म्हणून मी तुझी उगीच तारीफ करतों असें नाहीं. मीं स्वतां अनेक मोहिमा अंगावर घेऊन पार पाडल्या आहेत, त्यांवरून मला पुष्कळ अनुभव आले आहेत. त्या अनुभवांवरून मी तुझ्या चातुर्याची प्रशंसा करीत आहें. असो; या युद्धाच्या गोष्टी राहूं देत. तुझा असा विश्वासघात कोणीं केला, हें तूं अद्यापि आम्हांला सांगितलें नाहींस!'

हा संवाद चालू असतां प्रियंवदा तेथेंच होती. ती मध्येंच म्हणाली,—' फार बोलण्याचे श्रम प्रकृतीस सहन होणार नाहींत, असें वैद्यराजांचें सांगणें असल्यामुळें आतां या गोष्टी पुरे कराव्या, अशी माझी विनंति आहे. एवढया बोलण्याच्या श्रमानें देखील अंगावर घामाचे बिंदु दिसूं लागले आहेत.'

प्रियंवदेनें केलेली ही सूचना शेखराच्या पथ्यावर पडली. ती असें कां बोलली, हें स्पष्टपणें जरी नाहीं, तरी अल्पांशानें शेखराच्या ध्यानीं आलें होतें. त्यानें स्मितपूर्वक तिजकडे अवलोकन करून तिच्या भाषणास आपली मान्यता दर्शविली त्याच्या मुखावर यावेळीं धर्मबिंदु खरोखरच चमकत होते. प्रियंवदेची सूचना योग्य असल्यामुळें दृढसंधानेंही तें भाषण तितक्यावरच सोडून दिलें, आणि तो उद्योगास निघून गेला.

आणखी चार आठ दिवस गेले चूडामणि दररोज दिवसांतून एक दोन वेळ आपल्या

बंधूच्या समाचारास जाऊन त्याच्या दुःखानें आपणांस फार कष्ट होत आहेत, असें ढोंग करीत असे. तथापि त्यानें शेखराला त्याजवर गुजरलेल्या संकटाचें कारण एकदांही विचारलें नाहीं, ही गोष्ट प्रियंवदेच्या ध्यानांत पूर्णपणें आली होती. त्याच्यासेरीज दुसरा कोणी शेखराच्या समाचारास येई, तो त्याला त्याच्या संकटाचें कारण विचारल्यावांचून राहत नसे; अर्थात् या गोष्टीसंबंधानें चूडामणीला घरीच माहिती असावी, असा तिनें आपल्या मनाचा निश्चय करून ठेविला होता. ती चूडामणीचा स्वभाव पक्का ओळखून होती. तिचें त्याचें कधींच पटत नसे, याचीं कारणें वाचकांस माहीतच आहेत. त्याच्या दुष्ट कृत्यांचा तिला अनेकवार चांगला अनुभव आलेला होता. आपल्या पतीचा विश्वासघात यदाकदाचित् चुडामणीनें स्वतां केला नसला, तरी त्या गोष्टींत त्याचें अंग असलें पाहिजे, अशी तिच्या मनाची ठाम समजूत झालेली होती. तो रोजच्या रोज आपल्या पतीच्या भेटीस येतो, या गोष्टीची तिला फार भीति वाटे. न जाणो, आपला पति असा परस्वाधीन असतां त्या नीचानें त्याचा प्राणघात केला तर! अशी शंका तिच्या मनांत येत असल्यामुळें चूडामणि त्या दिवाणखान्यांत आला, म्हणजे ती आपल्या पतीच्या जितकें जवळ राहतां येईल तितकी जवळ राहत असे, आणि चूडामणीच्या प्रत्येक कृत्यावर बारकाईनें नजर ठेवीत असे. कदाचित् तो आपल्या पतीच्या औषधामध्यें विषमुद्धां घालील, अशी शंकाही तिच्या मनांत आल्यासेरीज राहिली नाहीं. सज्जनांच्या मनाची स्थिति मोठी चमत्कारिक असते. त्यांचीं मनें लोण्याहून मऊ आणि वज्राहून कठोर असतात, असें सत्कवि म्हणतात, तें अगदीं यथार्थ आहे!

चूडामणि समाचारास येई, तेव्हां शेखराच्या मनाची मोठी चमत्कारिक स्थिति होत असे. त्यानें जरी त्याच्या अपराधांची त्यास क्षमा केली होती, तरी त्याला मनांतून आपल्या बंधचा मोठा तिटकारा आला होता. चूडामणि भेटीस आला म्हणजे शेखराला फार वाईट वाटे. इतकेंच नव्हे, तर त्याच्या मनांत भीतिसुद्धां उत्पन्न होई. आपण सध्यां दुर्बल झालों आहोंत; या आपल्या स्थितीचा फायदा घेण्यास तो अनमान करणार नाहीं, असें त्याच्या मनांत येई. पण तो ज्या ज्या वेळीं आपल्या समाचारास येई; त्या त्या वेळीं आपली पत्नी आपल्यापाशीं असते, याचा त्यास मोठा आनंद होत असे.

शेखराची प्रकृति दिवसेंदिवस सुधारत चालली खरी, पण त्याबरोबरच त्याच्या मनांतील एक काळजीही वाढत चालली. तो बराच बरा झाला, आणि बोलण्याचे श्रम सोसण्याची त्याला ताकद आली, तेव्हां त्याला आपल्यावर आलेल्या संकटांविषयीं लोकांचें गूढ उकलणें भाग आहे असें वाटूं लागलें. एके दिवशीं रात्रीं जिकडे तिकडे सामसूम झाल्यावर तो आपल्या पत्नीस म्हणाला,—'प्रिये, मी मोहिमेवर गेल्यापासून झालेल्या सर्व गोष्टी तूं मला विचारून घेतल्यास, पण एका महत्त्वाच्या गोष्टीसंबंधानें तूं मला कांहींच विचारलें नाहींस हें कसें?'

किंचित् हास्यवदन करून प्रियंवदा बोलली,—'आपल्या प्रश्नाचा रोख माझ्या ध्यानीं आला. मी त्या गोष्टीसंबंधानें आपणांस प्रश्न केला नाहीं, याचें कारण इतकेंच कीं त्यासंबंधानें कोणी आपणाजवळ प्रश्न काढला, म्हणजे त्याचें आपणास बरें वाटत नाहीं, हें माझ्या कधींच ध्यानीं आलें आहे; आणि आपणांस असें कां वाटतें, याबद्दल देखील माझ्या मनांत थोडीशी कल्पना आलेली आहे. यासाठीं मीं त्यासंबंधानें आपणांस कांहीं विचारावयाचें नाहीं, असें आपल्या मनाशीं ठरवून ठेविलें आहे. ती गोष्ट जर अनेक कारणांमुळें गुप्त ठेवणें आपणास जरूर वाटत असेल, तर मी आपणास

सांगेंत की, आपण तीं मजपाशीं देखील बोलूं नये।'

शेखर आपल्या पत्नीचा हात आपल्या हातीं धरून म्हणाला,–'प्रिये, या तुझ्या भाषणावरून खरा प्रकार तुझ्या लक्षांत आला असावा असें दिसतें. हें जर खरें असेल, तर ही गोष्ट आपल्या मुखानें तुला सांगण्याचा माझ्यावरील बिकट प्रसंग ईश्वरानेंच निभावला, असें म्हटलें पाहिजे.'

प्रियंवदा बोलली,–'माझ्या मनांत जी शंका उत्पन्न झाली आहे, ती जर खोटी असेल, तर मला त्यामुळें वाईट न वाटतां आनदच होईल! ईश्वर करो, आणि माझी कल्पना खोटी ठरो!'

शेखर गंभीरवाणीनें बोलला,–'पण तसें होईल असें वाटत नाहीं. तुझ्या मनांत जें काय असेल, तें तूं अगदीं स्पष्टपणें बोलून दाखीव. सांग पाहूं! तुला कोणाचा संशय येतो?'

प्रियंवदा घुटमळत हळूच बोलली,–'मला आपल्या बंधूचाच संशय येतो!'

शेखरानें त्यावर स्पष्ट असें कांहींच उत्तर दिलें नाहीं. तो फक्त खेदयुक्त दृष्टीनें तिजकडे पाहूं लागला. त्यावेळची त्याची मुद्रा पाहून आपला तर्क अगदीं बरोबर आहे, अशी प्रियवंदेच्या मनाची खात्री पटली.

कांहींवेळ गेल्यावर शेखर तिला म्हणाला,–'प्रिये; पण तूं त्याला क्षमा करशील ना? मी त्याचा अपराध छपविण्यासाठीं किती प्रयत्न करीत आहें, हें तूं पहातच आहेस!'

प्रियंवदा हळूच पण तीक्ष्ण स्वरानें म्हणाली,–'क्षमा! असल्या नीचाला क्षमा! ही क्षमा अगदीं अनाठायीं होणार आहे सर्पाला दूध पाजण्यासारखा हा प्रकार घडत आहे! मी साफ सांगेन, मी त्याला या अपराधाची क्षमा कधींही करणार नाहीं. इतकें साधुत्व अजून माझ्या अंगीं बाणलें नाहीं! परंतु आपली जर इतकी उत्कट इच्छा आहे, तर मी आपल्या जिवांत जीव आहे तोंपर्यंत ही गोष्ट कोणापाशीं बोलणार नाहीं, एवढें आपणास वचन देतें. पण मला मात्र त्याच्या या अपराधाचा कधींही विसर पडणार नाहीं.'

शेखर आनंदानें बोलला,–'इतकें तूं केलेंस तरी पुरें आहे! त्यानें मी येथें आलों त्याच दिवशीं आपलें रक्षण करण्याविषयीं माझी विनवणी केली, आणि मीही त्याला तसें वचन दिलें आहे. ही गोष्ट मीं कोणापाशीं सांगूं नये, असें त्यानें त्यावेळीं मला म्हटलें असतें, तर तुला वगळून मीं तें कबूल केलें असतें. तूंच विचार कर, खरा प्रकार जर आपल्या वृद्ध मातापितरांस कळला, तर त्यांस किती बरें दुःख होईल, यासाठीं तूं आपल्या आजाजवळ किंवा हेमचंद्राजवळ सुद्धां ही गोष्ट बोलतां नये, अशी माझी तुजपाशीं विनंति आहे.'

प्रियंवदा बोलली,–'आपण जी आज्ञा कराल, ती शिरसा मान्य करणें, हा माझा धर्मच आहे. यापुढें माझ्या मुखानें यांपैकीं एक अक्षर देखील बाहेर पडणार नाहीं.'

याप्रमाणें त्यांचें प्रास्ताविक भाषण झाल्यानंतर शेखरानें अपघाताची जी हकीकत आपल्या पत्नीस सांगितली, तींतील वाचकांस माहीत नसलेला तेवढाच भाग येथें देतों. चूडामणीला विशाच समजून आपण टेंकडीच्या शिखरावर गेलों, इतकें सांगून झाल्यावर शेखर म्हणाला,–'मी ज्या वेळीं त्या टेकडीच्या शिखरावर जाऊन पोंचलों, त्याचवेळीं चंद्राच्या आड एक मोठें ढग येऊन तेथें बराच काळोख पडला. चूडामणि तेथें एकदम उभा राहिला, अर्थात् मीही तेथें उभा राहिलों. त्यावेळीं माझें मन अगदीं गांगरून गेलें होतें. तेथें उभें राहिल्याबरोबर जणुंकाय पुढील संकटाची सूचना झाल्यामुळेंच माझें हृदय जोरानें धडधडूं लागलें. इतक्यांत त्यानें आपल्या अंगावरचें आच्छादन एकदम फेंकून दिलें. त्यावेळीं त्याची मुद्रा मला इतकी भयंकर दिसत होती कीं,

जणूं काय एकादा राक्षस मजपुढें उभा आहे, असा मला भास झाला ! त्याची ती भयंकर आणि क्रूर मुद्रा पाहून मी आश्चर्यानें गुंग होऊन गेलों असतां, वाघ ज्याप्रमाणें एकाद्या सावजावर झडप घालतो, त्याप्रमाणें त्यानें मजवर झडप घातली. मी त्याच्या हातून निसटण्याचा प्रयत्न करूं लागलों, पण भीतीनें माझें पाय लटके पडल्यामुळें माझा इलाज चालेना ! आपला आतां प्राणान्त होणार, असें मला वाटूं लागलें. आपण ज्याच्या मागून आलों, तें पिशाच नसून प्रत्यक्ष आपला भाऊच आहे, अशी मनाची खात्री पटली ! पण तितक्यांत माझे जमिनीचे पाय सुटले, आणि मी एकदम कड्यासालीं कोसळलों.'

हे शब्द उच्चारीत असतां शेखराच्या अंगावर शहारे उठले. जणुं काय हा प्रसंग आतांच घडून येत आहे, असें त्याला वाटत होतें. प्रियंवदाही भीतीनें गांगरून गेली असल्यामुळें ती म्हणाली,—'पुरे पुरे ! हें भयंकर वृत्त माझ्यानें ऐकवत नाहीं.'

शेखर बोलला,—'हें भयंकर तर खरेंच, पण हें कृत्य प्रत्यक्ष माझ्या बंधूनें केलें असल्यामुळें तें अधिकच भयंकर झालें आहे. तथापि या प्रसंगीं त्यासंबंधानें जें काय बोलावयाचें तें बोलून सोडलें पाहिजे. कारण यापुढें साऱ्या जन्मांत ही गोष्ट पुनः आपल्या मुखांतून बाहेर काढावयाची नाहीं, असा मीं निश्चय केला आहे हें कृत्य करण्यांत त्याचा हेतु काय असावा, याचें मीं जें अनुमान केलें आहे, तें तुजपाशीं सांगतों. माझा एकाएकीं बहुमान झाला, मी सेनापती झालों, ही गोष्ट त्याला सहन झाली नाहीं. त्यामुळें त्यानें माझा असा घात केला ! केवळ द्वेषानें प्रेरित होऊन त्यानें हें भयंकर कृत्य केलें असावें, असें माझें मन मला सांगतें. याशिवाय दुसरें एकादें कारण असेल, असें मला वाटत नाहीं.'

प्रियंवदा बोलली,—'हें सगळें झालें, पण आतां आपण या अपघाताचें कारण काय सांगणार ? आपणांस जोंपर्यंत शक्ति नव्हती, तोंपर्यंत सगळें ठीक होतें पण आतां कांहीं तरी सांगून सर्वांस पडलेल्या या गूढाचा उलगडा करणें अगत्याचें आहे.'

शेखरानें उत्तर दिलें,—'उद्यां मी एकदां सर्वांची कशीतरी समजूत घालून त्यांचें समाधान करणार आहें. शत्रूचें सैन्य त्या टेंकडीपलीकडे उतरलें आहे, अशी बातमी सांगण्यासाठीं आमच्या पक्षांतील एक सैनिक मजपाशीं आला, (त्याचें नांव मला माहित नाहीं,) आणि तो माझ्या तोंडओळखीचा असल्यामुळें मी त्याच्यावर विश्वास ठेवून त्याच्यामागून त्या टेंकडीवर गेलों, आणि तेथें त्यानें विश्वासघात केला, असें कांहीं तरी सांगून मी हा प्रसंग निभावून नेईन. साऱ्या जन्मांत खोटें भाषण करण्याचा हा मजवर पहिलाच प्रसंग आला आहे ! मी समजून उमजून हें असत्य भाषण करणार आहें ! पण तें स्वार्थासाठीं किंवा कोणाच्या नाशासाठीं करणार नसल्यामुळें मी ईश्वराचे घरीं दोषी ठरणार नाहीं ! मीं हें खोटें भाषण करणार याबद्दल मला माझें मन दोष देणार नाहीं.'

दुसरे दिवशीं शेखरानें ठरल्याप्रमाणें सर्व गोष्टी सांगितल्या. पण एका हेमचंद्राखेरीज इतरांना त्या गोष्टीसंबंधानें शंका आली नाहीं. त्यानें मात्र शेखरानें सांगितलेली हकीकत बनावट आहे, हें ताडलें होतें, पण तसें त्यानें त्याच वेळीं बोलून दाखविलें नाहीं. शेखर रात्रीच्या वेळीं हत्यार बरोबर घेतल्यावांचून बाहेर पडला, अर्थात् तो ज्याच्याबरोबर जात होता, त्याची त्याला चांगली ओळख होती; इतकेंच नव्हे, तर त्याचा त्या मनुष्यावर पूर्ण भरंवसा होता; आणि कड्यावर गेल्यानंतर शेखरानें केलेलें वर्तन त्याच्या शक्तीस, पराक्रमास आणि युद्धकौशल्यास शोभण्यासारखें नव्हतें; या गोष्टीचा हेम

चंद्राला बरोबर अर्थ लागेना. चूडामणीसंबंधानें हेमचंद्राच्या मनांत शंका उद्भवलेली होती, ती शंका या उलगड्यानें अधिक बळकट झाली, आणि दुसरे दिवशीं जेव्हां शेखराची व त्याची भेट झाली, त्यावेळीं हेमचंद्रानें शेखराच्या औदार्याची तारीफ केली, पण तें औदार्य अनाठायीं झालें, म्हणून त्यानें त्यास दोष दिला. हेमचंद्रानें आपला संशय शेखरापाशीं सांगितला, पण शेखरानें कांहीं तरी उत्तरें देऊन हेमचंद्राला गप्प बसविलें, आणि आपल्या मनांतील तो संशय कोणाजवळ उघड न करण्याची त्यानें त्याची विनंति केली.

या दुखण्यांतून बरें होण्यास शेखरास सुमारें तीन महिने अंथरुणांत लोळत पडावें लागलें. सुदैवानें त्याचा पाय चांगला बरा झाला, आणि त्याच्या अंगांत कोणतीही खोड राहिली नाहीं. तो बरा झाल्यानंतर आपल्या पत्नीसह वत्सपुरीं जाऊन राहिला. तथापि योग्य कारण पडेल, तेव्हां तो प्रतापपुरीं येऊन आपल्या वडिलांपाशीं राहत असे. शेखराचें चूडामणीशीं बाह्यात्कारी वर्तन जरी बंधुत्वाच्या नात्यानें असे, तरी मनांतून तो त्याला अगदीं कंटाळलेला होता. मात्र चूडामणीच्या अंतःकरणांत जसा शेखरासंबंधानें द्वेष बाणला होता, तसा शेखराच्या मनांत द्वेष मात्र उत्पन्न झाला नाहीं.

* * *

मागें लिहिलेल्या गोष्टी घडून आल्यास आणखी दोन वर्षें लोटलीं. या दोन वर्षांत सांगण्यासारख्या ज्या गोष्टी झाल्या त्या येणेंप्रमाणें:-चूडामणीचें ठरलेल्या कुमारिकेशीं लग्न झालें. शेखराला पुत्रप्राप्ति होऊन तो पुत्र सध्यां चांगला सहा महिन्यांचा झाला होता निंबराज आणि रत्नाकर यांजमधील लढाईचा शेवट होऊन रत्नाकर निंबराजाच्या हातीं लागला; त्याला त्यानें पूर्वीच्या वैभवास साजेल अशी तहाइयात नेमणूक करून दिली. शेखर अपघातानें आजारी पडून मोहिमेवरून परत आला, त्यानंतर सुमारें सहा महिन्यांनींच रत्नाकराच्या पक्षाचा पूर्ण पराजय झाला होता. शेखरानें जें युद्धासंबंधाचें टांचण केलें होतें, तें महीपुरच्या लढाईत वीरसेनाच्या हातीं लागलें; आणि त्यावरून शत्रुपक्षाचें सामर्थ्य किती आहे, आणि त्यांचे पुढचे बेत काय आहेत, हें वीरसेनास कळून आलें. वीरसेनानें महीपुरच्या लढाईत हातीं लागलेल्या सैनिकांस कैद करून राजकीय कैदी म्हणून मोठ्या बंदोबस्तानें व गुप्तपणानें वल्लभीस पाठवून दिलें. त्यामुळें रत्नाकराचा पक्ष लंगडा पडला.

या मोहिमेस आरंभ झाल्यापासून तीन महिन्यांच्या आंतच रत्नाकराच्या पक्षाचे तीन सेनापती झाले, आणि त्या तिघांच्याही युद्ध कौशल्याचा लाभ एका चूडामणीच्या अविचारामुळें रत्नाकराच्या पक्षास मिळाला नाहीं. पहिला सेनापति गोवर्धन; त्याचा चूडामणीनें स्वतः खून केला दुसरा सेनापति दंडधर; त्याला बंदिवास प्राप्त झाला, आणि तिसरा शेखर; त्याची व्यवस्था काय झाली, हें सांगावयासच नको. शेखरानें योजिलेली व्यवस्था जर मधल्या संकटामुळें शत्रूस समजली नसती, तर निंबराजाला आपला गाशा गुंडाळून चंपावतीचा मार्ग धरावा लागला असता, यांत बिलकुल शंका नव्हती. प्रतापपुरकर आणि वत्सपुरकर यांचें सैन्य केवळ मिळालें असल्यामुळें तें संकट, हाल, अपेष्टा सहन करणारें, चलाख आणि स्वतःच्या जिवाची पर्वा न करणारें होतें. तें आपला पराक्रम दाखवीत असे. या सैन्याचा आधार नाहींसा झाल्याबरोबर बागलाणांतील रत्नाकराचा पक्ष अगदीं फिका पडला. दृढसंध आणि वृषपति यांच्या पावलांवर आपलें पाऊल ठेवून राजकारस्थानें करणाऱ्या इतर संस्थानिकांनीं त्यांचें सैन्य युद्धांतून परत आणिलें व तें पुनः युद्धास येण्याची आशा नाहीं, असें पाहतांच आपापलें सैन्यही परत नेलें. यामुळें रत्नाकाराचा पक्ष फिका पडला.

आणि केवळ बंधुद्वेषामुळें निंबराजास वल्लभीचें राज्य सहज प्राप्त झालें.

प्रकरण ९० वें.

सुवर्णशृंखला.

निंबराज वल्लभीच्या गादीवर बसल्यानंतर दोन वर्षांनीं पुढील हकीकत घडून आली. एके दिवशीं प्रातःकाळीं सुंदरपुराहून एक दूत सोनानदीच्या मुखाकडील मार्गानें प्रतापपुरीं आला, तो एकदम राजवाड्याकडे गेला. बृहद्रथाचा दूत दृढसंधाकडे आला, हें पाहून प्रतापपुरांतील लोकांस मोठें आश्चर्य वाटलें. तो दूत ज्यावेळी प्रतापपुरच्या हद्दींत आला, त्यावेळीं हद्दीवरील पहारेकऱ्यानें त्याची कसून तपासणी केल्याखेरीज त्याला आंत येऊं दिलें नव्हतें. हा दूत निःशस्त्र असून त्याजपाशीं दृढसंधराजाला देण्यासाठी बृहद्रथानें दिलेली एक थैली होती. ही थैली पाहतांच पहारेकऱ्यानें त्याला आंत सोडिलें होतें.

त्या दिवशीं शेखर प्रतापपुरींच होता. बृहद्रथाचा दूत राजवाड्यांत आल्यावर त्यानें दृढसंधाला थैली दिली, व ती उघडून दृढसंधानें तींतील पत्र शेखराच्या हातीं दिलें शेखरानें तें वाचलें, त्याचा सारांश येणेंप्रमाणें:—बृहद्रथ, निंबराजाच्या आज्ञेवरून दृढसंधाला भेटावयास येणार होता. कारण, बागलाणांतील जे संस्थानिक युद्धाचे वेळीं उदासीन राहिले होते, त्यांना देण्यासाठीं निंबराजानें मोठमोठ्या रकमा बृहद्रथाकडे पाठवून दिल्या होत्या. दृढसंध उदासीन राहिला म्हणूनच इतर संस्थानिक युद्धास गेले नाहींत, असें त्या पत्रांत लिहिलें असून दृढसंधाचा शाब्दिक गौरवही त्या पत्रामध्यें पुष्कळच केलेला होता.

आपल्या उदासीनतेचा भलताच अर्थ समजून निंबराजानें आपणाकडे द्रव्य पाठविलें, या गोष्टीची शेखराला भारी चीड आली. चूडामणीनें मोठमोठ्यानें ओरडाओरड करून आपल्या मनांतील त्वेष व्यक्त केला. दृढसंधालाही हा आपला मोठा अपमान झाला असें वाटत होतें, पण त्यानें गंभीर मुद्रा धारण करून आपला क्रोध प्रकट केला नाहीं.

पत्र वाचून झाल्यावर दृढसंध त्या दूताला म्हणाला,—'कांहीं महत्त्वाच्या कामासाठीं तुझा धनी आमची भेट घेण्याची इच्छा करीत आहे; यासाठीं त्याची भेट घेण्याची आमची तयारी आहे, असें त्याला कळीव. ही भेट कोठें व्हावी, असेंही त्यानें विचारलें आहे. त्यावर माझें उत्तर त्याला असें सांग कीं, तो जर प्रतापपुरीं येत असेल तर आम्ही त्याचें योग्य आदरातिथ्य करून त्याची भेट घेऊं. पण आम्ही मात्र सुंदरपुरीं येणार नाहीं, ज्याअर्थीं पूर्वी आम्ही त्याचे शत्रु म्हणून विजयानंदानें त्याच्या राजधानींत प्रवेश केला होता. त्याअर्थीं आतां मित्र किंवा पाहुणे म्हणून तेथें जावें, हें आम्हांस योग्य दिसत नाहीं. यासाठीं जेव्हां त्यास आमच्या भेटीस येण्याची इच्छा असेल, तेव्हां त्यानें खुशाल प्रतापपुरीं यावें. आम्ही त्याची इच्छा असेल तेव्हां त्याची भेट घ्यावयास तयार आहों!'

दूत बोलला,—'आपण असें उत्तर द्याल अशी आमच्या महाराजांची खात्री असल्यामुळें त्यांनीं मला आपणास असें कळविण्याची आज्ञा केली आहे कीं, ते उद्यां दोनप्रहरीं फक्त दोन सेवकांसह राजाधिराजांच्या कामासाठीं येथें आपल्या भेटीस येतील.'

दृढसंधानें ती गोष्ट मान्य केल्यावर तो दूत निघून गेला.

इकडे वत्सपुरीं वृषपतीलाही बृहद्रथाकडून अशीच थैली गेली होती, परंतु दृढसंधाचा विचार घेतल्याखेरीज वृषपति कोणतीही गोष्ट करीत नसल्यामुळें त्यानें खासंबंधानें जें कांहीं उत्तर द्यावयाचें तें उद्यां देऊं, असें बृहद्रथाला कळविलें होतें. नंतर सायंकाळीं

हेमचंद्राला बरोबर घेऊन तो प्रतापपुरीं आला. दुसरे दिवशीं बृहद्रथ प्रतापपुरीं येणार हें वृषपतीला समजल्यावर आपणास जें काय उत्तर द्यावयाचें तें येथें समक्षच द्यावयाचें असा त्यानें विचार केला, आणि त्या रात्रीं तो प्रतापपुरींच वस्तीस राहिला.

बृहद्रथ जरी दृढसंधाचा शत्रु होता, तरी तो मानानें त्याच्या बरोबरीचा असल्यामुळें त्याच्या व आपल्या उभयतांच्या योग्यतेस शोभेल असें त्याचें स्वागत करणें हें दृढसंध राजाचें कर्तव्य होतें. म्हणून दृढसंधानें आपल्या नोकरचाकरांस आज्ञा करून त्यांजकडून त्याच्या स्वागताची तयारी करविली, आणि त्याच्यासाठीं उत्कृष्ट मेजवानीचीही सिद्धता ठेविली. ठरल्याप्रमाणें दुसरे दिवशीं उमदा पोषाक केलेल्या दोघां तरुण सेवकांसह सुंदर अश्वावर आरूढ होऊन बृहद्रथ राजा प्रतापपुरीं येऊन दाखल झाला. आदरातिथ्य करण्याचे कामीं प्रतापपुरचे लोक मोठे हुषार होते, त्यांनीं त्याचें स्वागत तर केलेंच, पण दृढसंधराजा, आपले दोघे पुत्र, वृषपति आणि हेमचंद्र यांसह वेशीपर्यंत सामोरा गेला होता बृहद्रथराजाला आपलें येथें इतकें स्वागत होईल असें वाटलें नव्हतें. तथापि या स्वागतानें त्याला फारसा आनंद झाला असें मात्र नाहीं; तरी त्यानें बाह्यात्कारीं आनंद दाखवून असें वर्तन केलें कीं, जर त्यावेळीं एकादा तिऱ्हाईत तेथें असता, तर या दोन राजांमध्यें पूर्वी वैरभाव होता, असें त्याच्या ध्यानांत अगदीं आलें नसतें.

मेजवानी आटोपल्यावर सर्व मंडळी राजसभेमध्यें आली. दृढसंधानें बृहद्रथ आणि वृषपति यांना आपल्या बरोबरीचीं आसनें ठेविलीं होतीं. त्या आसनांवर ते तिघे बसल्यावर शेखर, चूडामणि, हेमचंद्र, जांघिळ आणि इतर महत्त्वाची मंडळी आपापल्या आसनांवर बसली; नंतर दृढसंधराजानें उपस्थित झालेल्या प्रकरणासंबंधानें बोलावयास प्रारंभ केला.

दृढसंधाचें प्रास्ताविक भाषण संपल्यावर बृहद्रथ म्हणाला,–'मी ज्या कार्यासाठीं येथें आलों आंह तें बहुतेक आपल्या ध्यानीं पूर्वीच आलेलें आहे. आपण उभयतांनीं गेल्या दोन वर्षे उदासीन राहून सर्व बागलाणांत शांतता राखिली, आणि आपल्या पक्षांतील इतर अनुयायांनीं आपलें अनुकरण केलें, याबद्दल राजाधिराजांना मोठा संतोष होत आहे. ज्या ज्या संस्थानिकांनी राजाधिराज निंबराजमहाराजांचें वर्चस्व कबूल करून राज्यांत स्वस्थता राखिली, त्यांना अल्प पारितोषिक म्हणून कांहीं रकमा देण्याचें त्यांनीं योजिलें आहे. त्यांनीं ही कामगिरी मजकडे सोंपाविली, म्हणून मलाही फार आनंद होत आहे. आतां आपणांस माझा पहिला प्रश्न असा आहे कीं, राजाधिराजांनीं जी रक्कम आपणांकडे पाठविली आहे, तिचा स्वीकार करण्याची आपली मर्जी आहेना?'

दृढसंध बोलला,–'मी आपल्या स्वतांच्या आणि या माझ्या पूज्य श्वशुरांच्या वतीनें आपणांस उलट असा प्रश्न करितों कीं, राजाधिराजपदावर आरूढ झालेल्या निंबराजांनीं जी ही रक्कम आमच्याकडे पाठविली आहे, ती आम्हीं स्वीकारल्यास आम्हाला कांहीं अटी कबूल करणें माग पडल कीं काय?'

बृहद्रथ बोलला,–'तसें कांहीं नाहीं; तथापि ही रक्कम आपण स्वीकारिली, म्हणजे आपण राजाधिराजांचें सार्वभौमत्व स्वीकारलें, असें होऊन आपणास यापुढें एक राजनिष्ठादर्शक विवक्षित शपथ घेण्याचें कारण उरणार नाहीं.'

दृढसंधराजानें उत्तर केलें,–'ज्याअर्थी आज दोन वर्षांत नवीन राजाविरुद्ध कोणीं चळवळ चालविली नाहीं, सर्वांनींच त्यांच्या सत्तेचा निमूटपणें स्वीकार केला आहे त्याअर्थी आम्हालाही वृथा अभिमान सोडून देऊन त्यांच्या सत्तेला नम्र होणें भाग आहे. प्रजाजनांपैकीं पुष्कळांनीं जो मार्ग स्वीकारला, तोच इतरांनीं स्वीकारावा, हें सरळ आहे. शपथ

घेण्यास आम्ही तयार आहों. बरें, ही देणगी स्वीकारण्यास आणखी कांहीं अटी आहेत कीं काय ?'

वृहद्रथ बोलला,–'दृढसंधमहाराज, सध्यां सगळाच मनु पालटला आहे. ही गोष्ट आपल्या लक्ष्यांत पूर्णपणें उतरली हें पाहून मलाही मोठें समाधान वाटत आहे. वारा पाहील तशी पाठ दिली पाहिजे ! दोन वर्षांपूर्वीची स्थिति आतां पालटली आहे. त्यावेळीं आपला पक्ष जोरदार होता, आतां आमचा पक्ष जोरदार आहे, हें आपल्या ध्यानीं आलें हें चरें झालें. तीन वर्षांपूर्वी आपण आमच्याकडून जी खंडणी दांडगाईनें वसूल केली होती,तेवढी रक्कम वजा करूनसुद्धां आपणास जें द्रव्य मिळेल, तें कांहीं थोडें असणार नाहीं. '

दृढसंध कपाळास आठ्या घालून किंचित् उंच स्वरानें बोलला,–' निंबमहाराज अशी अन्यायाची गोष्ट करतील असें मला वाटत नाहीं. त्यांच्या मनांतून आमची राजानिष्ठा जर सरोसरच विकत घ्यावयाची असेल, तर मात्र आम्ही त्या गोष्टीस प्राणांतींही कबूल नाहीं. एकदां आम्ही आपल्या बाहुबलानें जी खंडणी तुमच्याकडून योग्य मार्गानें वसूल करून घेतली, ती परत द्या, असें सांगण्यास निंबराजाला काय अधिकार पोंचतो ? तुम्ही आम्हांस अमुक रक्कम द्या, असें जर आम्हीं आपल्या मुखानें त्यांच्यापाशीं मागणें केलें असतें, आणि त्यांनीं आम्हांस तुमच्याकडून घेतलेली रक्कम वजा करावयाची आज्ञा केली असती, तर तें कदाचित् योग्य झालें असतें. हा तुमचा आमचा खासगी संबंध असून ही गोष्ट निंबराजाचें राज्य सुरू होण्यापूर्वी घडून आलेली असल्यामुळें तिच्यासंबंधानें त्यानें आज्ञा करणें म्हणजे केवळ जुलूम आहे। आम्ही सार्वभौमाची योग्य आज्ञा मान्य करूं, पण त्याचा जुलूम मात्र सहन करणार नाहीं ! यासाठीं मी स्पष्ट सांगतों कीं, तुमच्याकडून लढाईची खंडणी म्हणून घेतलेल्या रकमेपैकीं एक पै देसील मी परत करण्यास कबूल नाहीं. याउपर जें काय होणें असेल तें होईल.'

वृहद्रथ बोलला,–'अहो दृढसंध महाराज, आपण जरा विचार कराल, आणि सध्यां परिस्थिति काय आहे हें लक्ष्यांत घ्याल, तर आपल्या मुखांतून असे शब्द बाहेर पडणार नाहींत, अशी माझी खात्री आहे. सध्यां आपल्या मुलखाच्या आसपास राजाधिराजाचें किती सैन्य फिरत आहे, याची आपणांस कल्पनाही नसावी. सध्यां बागलणांत दहा हजार सैन्य असून स्वतः वीरसेन–'

दृढसंध बोलला,–'त्या वीरसेनाची थोरवी निदान आमच्यापाशीं तरी सांगूं नका ! बलभुवनच्या लढाईत एका घटकेंत त्याला ज्यानें पळवून लाविलें, तो वीर येथें तुमच्यासमोर बसला आहे। ही गोष्ट आपल्या स्मरणांतून गेली असावी, असें दिसतें.'

वृहद्रथ बोलला,–'मला सर्व गोष्टींचें स्मरण आहे। मी मागें घडून आलेल्या गोष्टींतील एकही गोष्ट विसरलों नाहीं. तसें जरी पूर्वी कांहीं झालें असलें, तरी सध्यां पूर्वीप्रमाणेंच गोष्टी घडून येतील, असा अभिमान धरणें हें अदूरदर्शित्वाचें होईल.'

दृढसंध बोलला,–'यासंबंधानें अधिक वादविवाद करण्यांत कांहींच हंशील नाहीं, म्हणून मी त्या भरीस पडत नाहीं. मी एवढें मात्र स्पष्ट सांगतों कीं, पूर्वी आम्ही जी खंडणी तरवारीच्या जोरावर तुमच्याकडून वसूल केली आहे, तीपैकीं एक पैसुद्धां परत देण्याची आमची इच्छा नाहीं. सध्यां तुमचा पक्ष जोरावर आहे, हें तर तुम्हीं उघड उघड बोलून दाखविलेंच आहे. तुमची रक्कम वजा करून राजाधिराजांची देणगी न स्वीकारल्यास जो काय परिणाम होईल तो जगाच्या दृष्टीस पडेलच. जोंपर्यंत आमच्या दरींतील भिल्लांच्या मनगटांत जोर आहे, जोंपर्यंत आमच्या तरवारीच्या धारा बोथट झाल्या नाहींत, आणि जोंपर्यंत आमचें क्षात्रतेज नष्ट झालेलें नाहीं, तोंपर्यंत तुमच्याकडून

आपल्या बाहुबलानें वसूल केलेल्या खंडणीपकीं एक फुटकी कवडीही तुम्हास परत मिळावयाची नाहीं !'

वृषपतीही जोरानें बोलला,–'ज्या अर्थीं तुमच्याकडून आलेली खंडणी आम्हीं दोघांनीं वांटून घेतली आहे, त्याअर्थीं माझेंही आपल्या प्रश्नास तेंच उत्तर समजा !'

बृहद्रथराजा शांतपणें बोलला,–'अहो दृढसंध, शांत व्हा ! नीट विचार करा ! मी आज आपल्याकडे मित्र व पाहुणा म्हणून आलों असल्यामुळें मीही आपणांस धमक्या देऊं इच्छित नाहीं. परंतु आपणा उभयतांमध्यें पूर्वी जो एक मित्रत्वाचा तह झालेला आहे, तो मोडूं नये, अशी माझी मनापासून इच्छा आहे. यासाठीं मी पुनः शेवटचें विचारतों, राजाधिराजांची ही अट तुम्हाला मान्य नाहींना ?'

दृढसंध म्हणाला,–'मला जें काय सांगावयाचें होतें, तें मीं पूर्वी सांगितलेंच आहे. वास्तविक म्हणाल, तर या निंबराजाच्या हेतूला आमचें केव्हांही साह्य नव्हतें; केवळ परिस्थिति एकाएकीं पालटल्यामुळेंच आम्हाला उदासीन राहणें भाग पडलें होतें ! काल जेव्हां आपलें पत्र आम्हीं वाचलें तेव्हांच या रकमेचा स्वीकार करूं नये, असें आम्हाला वाटलें होतें. पण सर्व गोष्टींचा नीट विचार करून तिचा स्वीकार करावा, असा आम्हीं बेत केला होता. आम्हांला लांच देऊन आमचीं मनें वळवून घेण्याची निंबराजाची इच्छा कधींही सफल व्हावयाची नाहीं. निंबराजाचें सामर्थ्य मोठें असल्यामुळें त्याचें वर्चस्व कबूल करणें आम्हांस भाग आहे. राजनिष्ठेची शपथ द्यावी लागेल हें आम्हीं जाणून आहों. आम्ही शपथ घेऊं, आणि ती पाळूंही. पण त्या शपथेनें आमचे देहमात्र बद्ध होतील ! आमचे हात निंबराजाविरुद्ध तरवार धरणार नाहींत; पण आमचें मन मात्र त्याचें वर्चस्व मान्य करणार नाहीं. निंबराजा आमचे देह जिंकील आणि त्यावर सत्ता चालवील, पण आमचीं मनें मात्र त्याला कधींही जिंकितां यावयाचीं नाहींत, आणि त्यांवर त्याची सत्ताही चालावयाची नाहीं ! निंबराजानें कोणतीही अट न घालतां जरी आम्हास द्रव्य दिलें असतें, तरी तें घेतांना आमच्या हातास कांपरें भरलें असतें; पण आतां तुम्ही जी अट घालीत आहां ती कबूल करून आम्ही एक छदाम सुद्धां घेणार नाहीं ! याशिवाय तुम्हाला आणखी कांहीं बोलावयाचें असेल तर बोला. तें ऐकण्यास आमची तयारी आहे. आणखी कांहीं बोलावयाचें उरलें नसेल, तर आपण आतां ही सभा बरखास्त करावी, हेंच बरें.'

बृहद्रथ बोलला,–'ठीक आहे ! मर्जी आपली ! माझे कर्तव्य मीं केलें आहे, मी हें आपलें भाषण राजाधिराजांच्या कानावर घालीन; मग त्याचा काय परिणाम होतो, तें आपोआपच दृष्टीस पडेल !' असें अगदीं संथपणें भाषण करून बृहद्रथ आपल्या आसनावरून उठला. सभेचें काम संपलें, आणि बृहद्रथ सुंदरपुरीं निघून गेला.

आतां आपण यापुढें कोणता मार्ग धरावा हा दृढसंधाला मोठा विचार पडला. बृहद्रथाचें व त्याचें पिढीजाद वैर असल्यामुळें तो निंबराजाला आपल्याविषयीं खोटें नाटें सांगून त्याचें मन कलुषित करील, ही तर त्याच्या मनांत भीति होतीच; पण त्याशिवाय सध्यां परिस्थिति बदलेली असल्यामुळें तो पूर्वीची मानहानि भरून काढण्यासाठीं आपल्यावर स्वारी करण्यास कमी करणार नाहीं, असेंही त्यास वाटूं लागलें. बृहद्रथ आणि दृढसंध यांच्यामध्यें तीन साडेतीन वर्षांपूर्वी जो तह झाला होता, त्यामध्यें अमुक वर्षेपर्यंत आपण तुमच्या वाटेस जाणार नाहीं, असें बृहद्रथानें दृढसंधाला लिहून दिलें होतें. परंतु तेवढ्यावर विश्वास ठेवून आपण स्वस्थ राहिल्यास आपली फसगत होईल हें दृढसंध जाणून होता. राजनीति सामान्य नीतीहून अगदीं भिन्न असते. राजे लोक हवे तेव्हां हवे तसे

तह करतात, आणि ते केलेले तह आपणच हवे तेव्हां मोडीत असतात. ज्याच्या मनगटाला जोर असेल, त्याचा न्याय! असा प्रकार असल्यामुळें आपण फार सावध राहणें जरूर आहे, असें दृढसंधाला वाटूं लागलें कदाचित् बृहद्रथानें तह मोडला नाहीं, तर तो निंबराजाकडून सैन्य आणवून आपण बाजूस राहून लढाई उपस्थित करील, अशीही दृढसंधाला मोठी भीति होती. बृहद्रथ आणि त्याच्या पक्षांतील इतर संस्थानिक आपापलीं सैन्यें एकत्र करून जरी प्रतापपुरावर चालून आले, तरी आपल्यापुढें त्यांचा निभाव लागावयाचा नाहीं हें दृढसंध जरी जाणून होता, तरी बृहद्रथाला निंबराजाकडून हवी तितकी मदत मिळेल व त्या मदतीच्या जोरावर आपला पाडाव होईल. असें मनांत येऊन त्याला काळजी लागली,

यदाकदाचित् लढाईचा प्रसंग प्राप्त झाल्यास आपली तयारी असावी, म्हणून दृढसंधराजानें वृषपतीला वत्सपुरीं जाण्याची सूचना केली, आणि त्या सूचनेप्रमाणें त्याच दिवशीं सायंकाळीं शेखरासह तो आपल्या राजधानीकडे चालता झाला. प्रतापपुरावर एकदम चाल करून तें शहर काबीज करणें, हें शत्रूचें सैन्य कितीही असलें तरी अशक्यच होतें. कारण दरींत शिरण्याचे जे फक्त दोनच मार्ग होते, तेवढे रोखून धरल्यावर शत्रूचा सर्व प्रयत्न फुकट झाला असता. प्रतापपुर काबीज करण्याचा मार्ग म्हणजे दरींतील दोन्ही मार्गांवर नाकेबंदी करून, बाहेरील व्यवहार बंद पाडून दरींतील लोकांचें अन्न संपेपर्यंत वाट पहात स्वस्थ बसावयाचें, एवढाच असल्यामुळें दृढसंधानें दरींतील जवळजवळ दहा हजार वस्तीस एक वर्ष पुरेल इतकी अन्नसामग्री जमविण्याचा बेत केला. सुमारें सहा महिने पुरेल इतकें धान्य दरींतील लोकांच्या संग्रहांत होतेंच. दरींतील शेळ्यामेंढ्यांवर कसाचसा तीन महिने निर्वाह झाला असता, अर्थात् तीन महिने पुरण्याइतकी अन्नसामग्री मिळविणें दृढसंधाला जरूर झालें असल्यामुळें त्यानें आपल्या शहरांतील व्यापाऱ्यांस द्रव्य देऊन त्यांस धान्य खरेदीसाठीं पाठवून दिलें. तसेंच निंबराजाचें सैन्य आपल्या आजूबाजूस किती आहे, याची चौकशी करण्यासाठीं आपले हेरही पाठवून दिले. सुमारें पंधरा दिवसांत तीन महिने पुरण्याइतकें धान्य प्रतापपुरांतील कोठारांत जमा झालें, आणि बातमी काढण्यासाठीं पाठविलेले हेरही परत आले. त्यावरून सुंदरपुरच्या किल्ल्यांत अदमासापेक्षां कमी सैन्य आहे, प्रतापपुरच्या उत्तरेस वीस कोसांवर निंबराजाचें पांच हजार सैन्य तळ देऊन बसलें आहे, नारायणपुरांतही विक्रमसेन ज्या सैन्याचा अधिकारी होता, तें सुमारें एक हजार सैन्य उतरलेलें आहे, अर्कपूरच्या भीमरथापाशीं सैन्याची तयारी अगदीं बेताचीच आहे, असें दृढसंधाला समजून आलें.

या सर्व सैन्याचा विचार करतां आपले लोक जरी शूर आहेत, तरी इतक्या शत्रूपुढें त्यांचा निभाव लागावयाचा नाहीं, अशी दृढसंधाची खात्री झाली. शिवाय लढाईला प्रारंभ करण्यास योग्य असें कारणही उपस्थित झालेलें नव्हतें. आपण रत्नाकर राजाच्या वर्तानें युद्धास सिद्ध झालों आहों असें म्हणावें, तर रत्नाकर सध्यां वल्लभी येथें नजरकैदेंत नेमणुकीचा उपभोग घेत स्वस्थ बसला होता. दृढसंधाच्या पक्षांतील इतर संस्थानिकांस या प्रसंगीं युद्ध करण्यापेक्षां शांतता ठेवणें हेंच अधिक प्रिय वाटत होतें. अशा स्थितींत केवळ वत्सपुरकरांच्या मदतीनें युद्धास सिद्ध होणें, हें वेडेपणाचें कृत्य होईल, असें दृढसंधाला आढळून आलें. अर्थात् आयत्या वेळीं जसा प्रसंग येईल तसें वागावयाचें असें ठरवून दृढसंधाला स्वस्थ बसणें भाग झालें.

आणखी आठ दिवस गेले. परंतु प्रतापपुरावर कोणी हल्ला केला नाहीं कीं त्यास

वेढाही घातला नाहीं. याच सुमारास निंबराजानें आपली सत्ता कबूल करण्याविषयीं सर्व संस्थानिकांस आज्ञापत्रें पाठवून सर्वांनीं विवक्षित स्थलीं जाऊन तेथें नेमलेल्या अधिकाऱ्यांपुढें शपथा घ्याव्या, असे सर्वांस हुकूम केले. बृहद्रथ हा निंबराजाला पहिल्यापासून अनुकूल असल्यामुळें त्यानें बागलाणांतील सर्व आज्ञापत्रें बृहद्रथाकडे पाठविलीं होतीं. बृहद्रथानें तीं सर्व संस्थानिकांस पोंचवावयाचीं होतीं. जे कोणी संस्थानिक आज्ञापत्रांत दाखल केलेल्या मुदतींत शपथा घेणार नाहींत, त्यांना देहान्तशिक्षा केली जाईल, आणि त्यांचे राजवाडे उध्वस्त करून त्यांचीं संस्थानें खालसा केलीं जातील, अशी निंबराजानें धमकी दिली होती. त्यामुळें ज्या ज्या संस्थानिकांच्या हातीं तीं आज्ञापत्रें गेलीं, त्यांनीं एका घटकेचाही विलंब न करतां एकदम आपल्याला जवळ व सोईवार असलेल्या स्थळीं जाऊन तेथील निंबराजानें नेमलेल्या अधिकाऱ्यांपाशीं शपथ घेतली.

हीं सर्व आज्ञापत्रें प्रथम बृहद्रथाकडे आलेलीं असल्यामुळें, त्यानें दृढसंधाचें आज्ञापत्र मागें ठेवून बाकीचीं आज्ञापत्रें मोठ्या त्वरेनें प्रत्येकाकडे पाठविलीं. दृढसंधाचें आज्ञापत्र त्या आज्ञापत्रांतील मुदत संपण्यापूर्वीं दोन प्रहराचे सुमारास त्याचे हातीं पडलें हें आज्ञापत्र दृढसंधाकडे उशीरां पांठविण्यांत बृहद्रथ राजाचा काय कावा होता, हें वाचकांच्या ध्यानीं आलेंच असेल. शपथा घेवविण्याचा ज्यांस अधिकार होता, ते सर्व लोक फक्त बृहद्रथ आणि रणमत्त-खेरीज करून प्रतापपुरापासून निदान एका दिवसाच्या वाटेवर होते, त्यामुळें दृढसंधाला त्यांजकडे शपथ घ्यावयास जाणें शक्य नव्हतें. बृहद्रथ आणि रणमत्त हेच दोघे काय ते प्रतापपुरापासून जवळ होते. दृढसंध आपल्याकडे शपथ घ्यावयास आला म्हणजे अर्थात् आपली योग्यता अधिक आणि त्याची कमी, हें अपरोक्ष रीतीनें सिद्ध झालें; वरें तो आपल्याकडे आला नाहीं, तर त्याला नेमलेल्या मुदतींत शपथ घेता येणार नाहीं, आणि दृढसंधानें शपथ घेतली नाहीं, म्हणजे निंबराजाच्या आज्ञापत्राप्रमाणें प्रतापपुर उद्ध्वस्त करण्याला आपणाला आयतेंच कारण सांपडेल, असें बृहद्रथाला वाटत असून आपला दुहेरी कावा साध्य करण्यासाठीं त्यानें दृढसंधाच्या नांवचें आज्ञापत्र मुद्दाम इतक्या उशीरानें पाठविलें होतें.

आज्ञापत्र इतक्या उशीरानें आलें, हें पाहतांच बृहद्रथाच्या मनांत काय आहे, हें दृढसंधानें तत्काल जाणलें. पुढें काय करावयाचें याचा विचार करण्यास अगदीं वेळ नव्हता. पुढें [redacted] रणमत्त [redacted] यांस [redacted] निश्चय [redacted] घोड्यावर [redacted] सांगितलेल्या ठिकाणांमध्यें सुदर्शनपुर किंवा नारायणपुर यांसेंगीज जें एक ठिकाण अगदीं जवळचें होतें, तेथें जावयास तो निघाला. त्या ठिकाणीं निंबराजाचा सेनापति वीरसेन ह्याचा तळ असून तें ठिकाण प्रतापपुरापासून वीस कोसांच्या पल्ल्यावर होतें, हें आम्ही पूर्वीं सांगितलेंच आहे.

दुसरे दिवशीं सूर्योदयापूर्वीं वीरसेनाच्या तळावर जाऊन पोंचावयाचें असल्यामुळें दृढसंध आपल्या घोड्याच्या जिवाकडे न पाहतां एकसारखा दौडत चालला. प्रदेश डोंगराळ आणि रस्ता खडकाळ असल्यामुळें हा त्याचा प्रवास फार बिकट झाला होता. मध्यरात्रीचे सुमारास त्याचा घोडा थकला, तरी दृढसंधराजानें जवळच्या खेड्यांत जाऊन तेथून एक घोडा पैदा केला, आणि तो तसाच पुढें चालला. तथापि सूर्योदयापूर्वीं त्याला तळावर पोंचतां आलें नाहीं. फक्त एकच घटका त्याला उशीर झाला होता.

वीरसेन हा खरा वीर पुरुष होता. त्याचा शेखरानें पराभव केला होता, तरी त्याच्या

मनांत दृढसंधाविषयीं किंवा शेखराविषयीं द्वेषभाव उत्पन्न झाला नव्हता. त्यानें दृढसंधाचें यथायोग्य स्वागत केलें. दृढसंधानें आपल्या आगमनाचें कारण वीरसेनाला सांगितलें, व आपणाला आज्ञापत्र उशीरां देण्यांत बृहद्रथाचा काय हेतु असावा, हेंही त्यानें त्याच्या कानावर घातलें. वीरसेनाला बृहद्रथाच्या नीचपणाचा मोठा राग आला, हें खरें; पण आज्ञापत्रांतील अवधि टळून गेल्यानंतर आलेल्या दृढसंधाच्या शपथेचा स्वीकार कसा करावा, हें त्याला मोठें कोडें पडलें. [redacted] लागला [redacted] देईल, [redacted] दृढ- [redacted] आणि त्याच्यातर्फे निंबराजापाशीं मध्यस्थी करण्याचेंही वचन दिलें. वीरसेनानें दृढसंधाचें शपथपत्र निराळ्या थैलींत घातलें, दृढसंधा खेरीज इतर कांहीं संस्थानिकांनीं वीरसेनापाशीं शपथा घेतल्या होत्या, त्या शपथांचे कागद त्यानें एका वेगळ्या थैलींत पूर्वीच बंद करून ठेविले होते. वीरसेनानें जर कपट करावयाचें मनांत आणिलें असतें, तर त्याला इतरांच्या शपथपत्रांमध्यें दृढसंधाचें शपथपत्र घुसडून देतां आलें असतें. पण वीरसेन हा सत्यप्रिय पुरुष असल्यामुळें आणि आपण शिफारस केल्यास आपला शब्द खालीं पडणार नाहीं, अशी त्याच्या मनास खात्री वाटत असल्यामुळें त्यानें दृढसंधाचें शपथपत्र निराळ्या थैलींत घातलें, आणि त्याच बैठकीस दृढसंधाचीं उशीराचीं कारणें नमूद करून आपल्या अनुकूल अभिप्रायासह त्यानें एक विनंतिपत्र निंबराजाला लिहिलें. नंतर दृढसंधाचें पुनः गोड शब्दांनीं स्वागत करून त्याला एक दिवस विश्रांतीसाठीं आपणाकडे राहवून घेऊन वीरसेनानें त्याची मोठ्या इतमामानें प्रतापपुरीं रवानगी करून दिली.

प्रतापपुरीं परत आल्यावर दृढसंधानें वत्सपुराहून शेखर आणि हेमचंद्र यांना बोलावून आणिलें. वृषपतीचें आज्ञापत्र वेळेवर पोंचलें असल्यामुळें त्यानें योग्य अधिकाऱ्यापुढें मुदत भरण्यापूर्वीच शपथ घेतली होती, असें शेखराच्या मुखानें दृढसंधाला समजलें, आणि त्याच्यासंबंधाची दृढसंधाची काळजी दूर झाली. नंतर झालेली सर्व हकीकत दृढसंधानें त्या दोघांस सांगितली, आणि एकंदर हकीकतीचें खुलासेवार पत्र तयार करून तें निंबराजाकडे हेमचंद्राचरोबर पाठविण्याचा आपला विचार त्यांस कळविला. शेखर आणि हेमचंद्र हे दोघेही मोठे हुषार पुरुष असल्यामुळें त्यांनीं आपणांकडे कमीपणा अगदीं न घेतां किंवा फाजील नम्रता न दाखवितां प्रत्येक मुद्याचें यथायोग्य विवेचन करून एक मुद्देसूद पत्र तयार केलें. निंबराजानें जी रक्कम पाठविली होती, तिचा स्वीकार न करण्याचें कारण व शपथ घेण्यास फक्त एक घटका उशीर झाला याचें कारण लिहित असतां, त्यानीं बृहद्रथाच्या पदरीं दोष तर बांधिलाच होता; पण त्यानीं त्या पत्रांत बृहद्रथाची व्यर्थ निंदा अगदीं केली नव्हती. हें पत्र लिहून झाल्यावर शेखरानें तें दृढसंधाला वाचून दाखविलें. पत्र लिहिण्याची त्या दोघांची हुषारी पाहून दृढसंधानें त्यांस शाबासकी दिली, आणि हेमचंद्राला पुष्कळ द्रव्य देऊन दृढसंधानें त्याची वल्लभीस निंबराजाकडे रवानगी करून दिली.

प्रकरण ५१ वें.

बृहद्रथ आणि विक्रमसेन.

मागील प्रकरणामध्यें सांगितलेली हकीकत घडून आल्यास सुमारें दोन महिने झाल्यावर एके दिवशीं सायंकाळीं नारायणपुरकर रणमत्ताचा पुतण्या विक्रमसेन आपल्या उमद्या घोड्यावर स्वार होऊन फक्त एका सेवकासह सुंदरपुरचे देवडीवर आला, आणि त्यानें बृहद्रथाची चौकशी केली. त्यावेळीं पाहारेकऱ्यानें मोठ्या नम्रतेनें त्याला प्रणाम करून बृहद्रथमहाराज आपलीच मार्गप्रतीक्षा करीत बसले आहेत, आणि आपण येथें येतांच एकदम आपणांस सभागृहामध्यें घेऊन येण्याची त्यांनीं अमात्यांस आज्ञा केली असल्यामुळें राजवाड्याच्या देवडीवर तेही आपलें स्वागत करण्यासाठीं उभे राहिले आहेत, असें त्या पाहारेकऱ्यानें सांगितलें. तें ऐकून विक्रमसेनानें आपल्या जवळच्या थैलींतून दोन मोहरा पाहारेकऱ्याच्या हातावर टाकिल्या, आणि तो तसाच पुढें झाला.

विक्रमसेनाची हकीकत या कथानकाच्या पूर्वार्धांत जितकी आली आहे, तिच्या पुढची येथें सांगणें जरूर आहे. भृगुकच्छ नगरांतील सागरदत्ताची कन्या आनंदी, इच्या द्रव्यास आणि रूपास भुलून त्यानें तिच्याशीं सुमारें तीन वर्षांपूर्वी विवाह केला होता. हा विवाह झाल्यानंतर तो सुमारें एक वर्षभर भृगुकच्छनगरामध्यें राहात होता, तरी त्याच्या समागमाचें सौख्य आनंदीस फारसें लाभलें नाहीं. त्याचा स्वभाव व्यसनी आणि उडाऊ होता, हें वाचकांस स्मरतच असेल. तो भृगुकच्छनगरीं असला, तरी त्याचे पुष्कळ दिवस उडाऊ आणि चैनबाज स्नेह्यांच्या संगतींत जात असल्यामुळें आपल्या पत्नीची भेट घेण्यास त्याला तीन तीन दिवसांत फुरसदच होत नसे! दोन तीन दिवसांनीं मात्र त्याला आपल्या पत्नीची भेट घेणें एका कारणामुळें जरूर होत असे. त्यानें तिच्याशीं केवळ द्रव्यासाठींच विवाह केला होता, त्यामुळें त्याच्या चैनीस जें द्रव्य लागे, तें द्रव्य मागून घेण्यासाठीं त्याला आनंदीची भेट घेणें भाग पडे. तिनें आपल्या स्त्रीधर्माला अनुसरून आपल्या हातीं असलेलें बरेंच द्रव्य त्याला देऊन संपवून टाकल्यानंतर तिला द्रव्यासाठीं आपल्या पित्यापाशीं वारंवार मागण्या करण्याचा प्रसंग येऊं लागला. सागरदत्त व्यापारी असल्यामुळें त्याला द्रव्याची खरी किंमत कळत असे, अर्थात् तो नेहमीं आपल्या कन्येला द्रव्य देत नसे. यामुळें हळूहळू त्या पतिपत्नींचा कलह होऊं लागला. त्यांचा विवाह झाल्यानंतर सुमारें एक वर्षानें आनंदीस सुंदर पुत्र झाला. तेव्हां सागरदत्ताला फार आनंद झाला, आणि त्यानें आपली सर्व मालमत्ता आपल्या त्या नातवाला तो वयांत आल्यावर मिळावी, असें मृत्युपत्र करून ठेवलें. त्यानें आपल्या उत्पन्नापैकीं कांहीं भाग आपल्या कन्येला तोडून देऊन तिला आणि तिच्या पतीला थाटामाटानें राहण्याची तजवीज करून ठेविली होती. ही व्यवस्था झाल्यामुळें विक्रमसेनाची द्रव्याच्या बाबतींत अगदीं निराशा झाली, आणि त्यानें आपल्या पत्नीचा संबंध बहुतेक तोडूनच टाकला, असें म्हटलें तरी हरकत नाहीं. स्त्रिया या कितीही सहनशील असल्या तरी त्यांच्या सहनशीलतेस मर्यादाही असतेच. त्याप्रमाणें आनंदीला आपल्या पतीच्या दुर्भीषणांचा अगदीं वीट आला, आणि तीही त्याच्या संगतीची आशा सोडून पति जिवंत असतां जणुं काय विधवेप्रमाणें केवळ आपल्या पुत्राकडे पाहून कसातरी काळ घालवीत होती!

दमयंतीचें आचरण मर्यादेपलीकडचें असल्यामुळें तिला अद्यापि कोणी चांगल्या घराण्यांतील तरुणानें मागणी घातली नव्हती आणि तिच्या प्रेमाचा ओघ भलत्याच दिशेनें वाहल्यामुळें त्याची दुर्दशा झाली होती, म्हणून तीही आपल्या विवाहाविषयीं

उत्सुक झालेली नव्हती. तिच्या अमर्याद आचरणाचा सर्व शहरभर डंका वाजत होता, आणि केव्हां केव्हां हा बोभाटा विक्रमसेनाचे कानावर जात असे. परंतु तो तिकडे फारसें लक्ष्य देत नसे. शेखर आणि प्रियवंदा यांचा सूड घेण्यासाठीं त्या दोघांनीं आनंदमठांतील समाधीपुढें जेव्हां भयंकर शपथ घेतली, तेव्हांच परस्परांनीं परस्परांच्या वर्तनासंबंधानें चौकशी करूं नये, असा त्यांचा ठराव झाला होता, हें वाचकांच्या ध्यानीं असेलच. त्या दिवसापासून ती आपल्या प्रेमाचा धिक्कार करणाऱ्या शेखराचा आणि जिच्यामुळें त्याचें प्रेम आपणांस लाभलें नाहीं, असें ती समजत होती, त्या प्रियवंदेचा सूड घेण्याची ती योग्य संधि पाहत होती. विक्रमसेनानें जरी तिच्याबरोबरच शपथ घेतली होती, तरी ती केवळ तिच्या मिंधेसाठीं ,आणि आपल्या स्वार्थासाठींच घेतली असल्यामुळें त्याला वारंवार आपल्या शपथेचें विस्मरण होत असे, पण दमयंतीच्या मनांत वैर पक्कें बाणलें असल्यामुळें ती वारंवार त्याची निर्भत्सना करून त्याच्या मनांतील द्वेष प्रज्वलित करीत असे. वाचकांच्या नजरेसमोर बराच वेळ नसलेल्या या कथानकातील प्रमुख पात्रांच्यासंबंधानें एवढी माहिती येथें सांगणें अवश्य असल्यामुळें ती येथें सांगून आम्ही आतां मुख्य गोष्टीकडे वळतों.

विक्रमसेन मुख्य देवडीवर आला, त्यावेळीं बृहद्रथाचा एक अधिकारी त्याची वाट पहात प्रवेशद्वारांतच उभा होता. त्यानें विक्रमसेनाला प्रणाम करून एकदम सभागृहांत नेलें. बृहद्रथराजानें मुद्दाम बोलाविल्यावरून विक्रमसेन आज येथें आला होता. बृहद्रथानें त्याचें मोठ्या प्रेमानें स्वागत केलें. त्यांना कांहीं गुप्त गोष्टी बोलावयाच्या असल्यामुळें त्यांनीं तेथील नोकरचाकरांस आपापल्या स्थानीं पाठवून दिल्यावर त्यांचें पुढीलप्रमाणें संभाषण झालें.

विक्रमसेनानें विचारलें,–'तर मग आपल्या पत्रावरून फार दिवसांची आमची आशा पूर्ण होणार असें दिसतें.'

बृहद्रथ बोलला,–'अशी तशी नव्हे, आपली इच्छा अगदीं सोळा आणे पूर्ण होणार ! हा बेत मोठा नामी उतरला आहे !'

विक्रमसेन एकाद्या राक्षसाप्रमाणें विकट हास्य करील आणि शब्दांवर विशेष प्रकारें जोर देत म्हणाला,–' तर मग आमच्या पराभवाबद्दल, आमच्या मानहानीबद्दल आणि–'इतकें बोलून तो मध्येंच थांबला. आपल्या बहिणीच्या अवहेलनेबद्दल तो कांहीं तरी बोलणार होता, पण त्यासंबंधानें भाषण करणें याप्रसंगीं उचित नाहीं, असें समजून तो मध्येंच थांबला होता. नंतर तो बोलला,–' या शत्रूचीं पाळेंमुळें साफ खणून टाकल्याशिवाय तो आम्हांस स्वास्थ्य देणार नाहीं, हें उघड आहे !'

बृहद्रथ बोलला,–' त्या दुष्टाचा समूळ उच्छेद करण्यासाठीं मला इतके श्रम सोसावे लागले ! पण सुदैवानें शेवटीं आपला कार्यभाग झाला.'

विक्रमसेनानें विचारलें,–' बेर, पण आपल्या इच्छेप्रमाणें निंबराजाचें आज्ञापत्र आहे ना ?'

बृहद्रथ बोलला,–' होय; त्या आज्ञापत्रामध्यें आपणांस जें काय पाहिजे होतें, तें सर्व आहे. हें आज्ञापत्र मिळविण्यासाठीं मला फारच श्रम करावे लागले. मी येथून वल्लभीनगरीं गेल्यावर निंबराजाची गांठ घेतली, आणि आम्ही त्याच्यासाठीं किती प्रयत्न करीत होतों, याचा पाढा सावकाशपणें त्याजपाशीं वाचला. आम्ही तीन वर्षांपूर्वी भृगुकच्छनगरीं जें गुप्त मंडळ स्थापन केलें होतें, त्यासंबंधानें निंबराजाला अद्यापि मुळींच माहिती नव्हती, असें मला भेटीच्या वेळीं आढळून आलें.'

विक्रमसेन बोलला,–' त्यावेळीं हरदत्ताचा वाडा आपल्या फारच उपयोगी पडला. त्या

वाड्याची थोडी मोडतोड करून आपल्या हरदत्ताच्या वाड्यासमोरच पकडलें होतें, पण त्याचे डोळे बांधून त्याला आम्हीं पांचार गल्ल्यांतून फिरवून पुनः तेथेंच आणल्यामुळें त्याला आमचें गुप्तस्थळ हरदत्ताच्या वाड्यांत असेल, अशी शंकाहुद्दा आली नाहीं. त्या गुप्तस्थळीं आमचा कारभार होई तो मोठ्या गंभीरपणानें होई, आणि तेथील भयाण देखावा पाहून नवखा मनुष्य गोंधळून जाऊन एकदम आमच्या पक्षाला मिळे, यांत नवल नाहीं.'

बृहद्रथ बोलला,–'हरदत्ताला त्याच्या कामगिरीबद्दल लहानशी जहागिरी देण्याचे निंबराजानें वचन दिलें आहे. जहागिरीचे कोठची द्यावयाची आणि किती उत्पन्नाची द्यावयाची याबद्दल विचार चालू आहे. लवकरच सनदा तयार होऊन त्या हरदत्ताचे हातीं पडतील.'

विक्रमसेन आनंदानें बोलला,–'हें फार चांगलें झालें. मीं त्याला बरीच रक्कम कर्जाऊ दिली आहे, तिची फेड होण्याचें साधन त्याच्या हातीं आलें, आतां माझ्या रकमेस धोका नाहीं. बरें; या मलत्याच गोष्टी आतां राहूं देत. आपण ज्या मुख्य कामासाठीं येथें बसलों आहों, त्यासंबंधानेंच आतां बोलूं या. तुम्हीं तें आज्ञापत्र कसें मिळविलें, हें सांगा पाहूं ?'

बृहद्रथानें उत्तर केलें,–'निंबराजाची आणि माझी गांठ पडल्यावर मीं दृढसंधासंबंधाच्या खोट्यानाट्या गोष्टी सांगून त्याचें मन कलुषित करण्याचा प्रयत्न केला. वृषपतीसंबंधानें मी उगीच बसलों होतों, असें मात्र तूं समजूं नको ! त्या दोघांसंबंधानें निंबराजाच्या मनांत अप्रीति उत्पन्न केल्यानंतर मी मुख्य मुद्यावर आलों. निंबराजानें गुप्त स्थल करावें लागलें, म्हणून हरदत्ता दृढसंधाला बक्षीस म्हणून जी रक्कम पाठ-त्यावेळीं फार वाईट वाटत होतें. तें गुप्त स्थ वेळी होती, ती त्यानें नाकारली, असें तयार करतांना हरदत्ताचें जें नुकस जेव्हां मीं निंबराजाला सांगितलें, तेव्हां दृढ-झालें, तें भरून निघण्याची तजवीज तुम संधानें हा आपला मोठा अपमान केला, केलीच असेल. त्या दिवशीं शेखराला आम असें त्यास वाटलें. दृढसंधानें ती रक्कम का नाकारली, हें मात्र मीं त्याला कळविलें नाहीं.'

विक्रमसेन हंसत बोलला,–'बरोबरच आहे. निंबराजानें दृढसंधाला देण्यासाठीं जी रक्कम पाठविली होती ती सर्व त्याला द्यावयाची होती, पण दृढसंधानें पूर्वी आमच्याकडून वसूल केलेली रक्कम वजा करून बाकी राहिलेला पैका त्याला द्यावा, अशी राजाची आज्ञा नव्हती; अर्थात् दृढसंधानें तो पैका घेण्याचें कां नाकबूल केलें, याचें खरें कारण तुम्हांला राजापाशीं सांगतां येणें शक्यच नव्हतें.'

बृहद्रथ बोलला,–'दृढसंधानें द्रव्य घेण्याचें नाकारलें, याचें कारण निंबराजानें मला मुळींच विचारलें नाहीं. कारण दृढसंधाचा रत्नाकराचा कट्टा अभिमानी आहे, ही गोष्ट राजाला माहीत आहे. दृढसंधासारख्या मानी पुरुषाला ती रक्कम घेणें साहजिकच अयोग्य वाटलें, अशी निंबराजाची कल्पना झाली. मी आपलें कर्तव्य मोठ्या सावधपणानें करीत होतों. दृढसंधानें ती रक्कम घेतली नाहीं; इतकेंच नव्हे, तर त्यानें त्या संबंधीं फार दुर्भाषणें केलीं, असें मीं राजाला सांगितलें, आणि दृढसंधाला शिक्षा करण्याचीं आज्ञापत्रें मीं मागितलीं. परंतु राजानें शपथेचा निकाल होईपर्यंत थांबून त्यानंतर काय तें करावयाचें असा विचार केला.'

विक्रमसेनानें विचारलें,–'काय हो, दृढसंधानें शपथ घेतली काय ? तुम्हीं शपथेसंबंधाचें आज्ञापत्र दृढसंधाला अगदीं उशीरां पोंचावे, आणि त्याच्या मनांतून शपथ द्यावयाची असली तर त्यानें आम्हाकडेच यावें, अशी युक्ति केली होती, तिचा कितपत उपयोग झाला ?'

बृहद्रथ बोलला,–'माझ्या युक्तीचा फार छान उपयोग झाला. तो आमच्याकडे शपथ घ्यावयास येणार नाहीं, हें तर ठरलेलेंच होतें; पण जरी तो यदाकदाचित् आला असता, तरी आपण त्याचें शपथपत्र राजाकडे थोडेंच पाठविणार होतों! तो लचाड दृढसंध मोठ्या त्वरेनें वीरसेनाच्या छावणींत गेला! तरी त्याला एक घटका उशीर झालाच. त्यानें वीरसेनापाशीं राजनिष्ठेची शपथ घेतली, पण ती उशीरां घेतली असल्यामुळें वीरसेनाला इतर लोकांच्या शपथपत्रांबरोबर दृढसंधाचें शपथपत्र निंबराजाकडे पाठविण्याचें मोठें संकट पडलें. ज्या दिवशीं सर्व शपथपत्रें वल्लभीस पोंचलीं, त्या दिवशीं मी तेथें हजर होतों. निंबराजाचा खासगी कारभारी माझ्या किती परिचयाचा आहे. हें तुला माहीत आहेच. त्यानें दृढसंधाचें तेवढें शपथपत्र बाजूस ठेवून बाकीचीं निंबराजास सादर केलीं. तो तीं शपथपत्रें मोठ्या उत्कंठेनें पाहूं लागला, पण त्यांत दृढसंधाचें शपथपत्र नव्हतें. मी त्याप्रसंगीं निंबराजाजवळ होतोंच. मीं आपल्या भाषणानें राजाच्या मनांत दृढसंधाविषयीं द्वेषबुद्धी उत्पन्न केलीच होती, तींत याप्रसंगीं आणखी भर घातली. त्यामुळें माझें काम झालें! ठरल्याप्रमाणें दृढसंधाला पारिपत्य करण्याचीं आज्ञापत्रें राजानें तयार करविलीं.'

विक्रमसेनानें विचारलें,–'पण दृढसंधाच्या शपथपत्राचें काय झालें? तें राजापासून कसें छपवून ठेवतां आलें?'

बृहद्रथ बोलला,–'तें निदान चार दिवस तरी राजाच्या दृष्टीस पडूं नये, असा बंदोबस्त मीं करून ठेविला आहे. यासाठीं आपण या आज्ञापत्राचा उपयोग मोठ्या त्वरेनें करून घेतला पाहिजे.'

विक्रमसेनानें विचारलें,–'या आज्ञापत्रांत आपल्या इच्छेप्रमाणें सर्व मजकूर आहे ना?'

बृहद्रथ बोलला,–'अगदीं पूर्णपणें आपणास हवा तसा मजकूर त्या आज्ञापत्रांत आहे, असें म्हणतां येत नाहीं. शेखराचें नांव त्यांतून वगळिलें आहे!'

विक्रमसेन चिडल्याप्रमाणें होऊन म्हणाला,–'मग त्या आज्ञापत्राचा उपयोग काय? आपला सगळा डोळा ज्याच्यावर त्याचेंच नांव जर आज्ञापत्रामध्यें नाहीं, तर तें आज्ञापत्र अगदीं कवडीमोलाचें आहे, असें मी समजतों! आमचा मुख्य शत्रु काय तो शेखर! भीमरथाचा पोषाक काढून त्यानेंच तुमचा विश्वासघात केला, ही गोष्ट तुम्ही विसरलां असें दिसतें.'

बृहद्रथ बोलला,–'मी कांहीं विसरलों नाहीं! माझ्या सगळें कांहीं लक्ष्यांत आहे. आज्ञापत्र माझ्या हातीं पडतांच मीं तें वाचून पाहिलें; शेखराचें नांव त्यामध्यें मुद्दाम वगळिलें आहे, हें मला आढळून आल्याबरोबर मीं त्यासंबंधानें आपल्याकडून शक्य तितके प्रयत्न करून पाहिले. सुंदरपुरच्या लढाईच्या दिवशीं शेखरानें आम्हांस कसें फसविलें, हें निंबराजाला माहीत होतेंच; कारण तो स्वतः त्या दिवशीं तेथें हजर होता, म्हणून मी त्या गोष्टीची त्याला आठवण करून दिली. त्याशिवाय शेखरानें बलभुवनच्या लढाईत वीरसेनाच्या सैन्याची कत्तल केली होती, त्या गोष्टीचेंही मीं त्याला स्मरण दिलें. त्याचप्रमाणें शेखरानें पुढील महीपुरच्या वेढ्याच्या वेळीं जी योजना तयार केली होती, ती आपणास किती घातक होती, हें निंबराजापुढें मांडून शेखर जिवंत आहे तोंपर्यंत तो स्वस्थ बसावयाचा नाहीं, तो आपणांस फार पीडा देईल, असें त्यांस सांगून पाहिलें, पण त्याचा कांहींच उपयोग झाला नाहीं. पूर्वी शेखरानें निंबराजाचा दोन तीन वेळां प्राण वांचविला, म्हणून त्यानें शेखराला त्याचा प्राण न घेण्याचें वचन दिलें असल्यामुळें, या आज्ञापत्रांत त्यानें त्याचें नांव घातलें नाहीं.'

विक्रमसेन क्रोधानें फणफणत म्हणाला,–'म्हणूनच या आज्ञापत्राचा आपणांस कांहीं

उपयोग नाहीं, असें मी म्हणतों ! शेसराला जिवंत ठेवून त्याच्या कुटुंबांतील इतर माणसांचा वध करावयाचा, म्हणजे सर्पाला दुखवून जिवंत सोडण्यासारखें होणार आहे !'

बृहद्रथ बोलला,-' थांब, असा उतावळा होऊं नको ! माझ्या मनांत ही गोष्ट आली नाहीं, असें तूं समजतोस कीं काय ? आज्ञापत्र वाचतांच ही गोष्ट माझ्या मनांत आली, आणि शेखर हा राज्याला किती भयंकर मनुष्य आहे, हें मीं राजाच्या ध्यानीं आणून देण्याचा प्रयत्न केला. शेवटीं असें सांगितलें कीं, शेसराचा प्राण वांचवून आम्ही जर प्रतापपुरच्या वाड्यांतील लोकांची कत्तल करावी असें मनांत आणलें, तर ती गोष्ट आम्हांस केव्हांही साध्य व्हावयाची नाहीं. अर्थात् तो जिवंत आहे, तोंपर्यंत या आज्ञापत्राचा कांहींच उपयोग व्हावयाचा नाहीं. ही गोष्ट निंबराजाला पटली, आणि तो मोठ्या विचारांत पडला. शेखराचें लग्न झाल्यापासून तो नेहमीं वृषपुरीं रहात असतो, ही गोष्ट त्याला माहीत असल्यामुळें निंबराजानें शेखर वृषपुरीं असतां प्रतापपुरचें काम उरकून घ्यावें, असें मला सांगितलें. त्यावर मीं म्हटलें, प्रतापपुरावर हल्ला करून तें शहर जिंकून मग तेथील लोकांची कत्तल करावयाची ही गोष्ट अशक्य आहे. अर्थात् दृढसंधावर घाला घालावयाचा तो एकदम घातला पाहिजे. दृढसंधाची तयारी नेहमीं फार उत्तम असते; तेव्हां आम्हांला छापा घालण्याची संधि केव्हां तरी मिळणार; अशा वेळीं शेखर प्रतापपुरीं असतां आम्ही छापा घातला, तर आमची सर्व मेहनत व्यर्थ जाईल. इतकेंच नव्हे, तर तो आम्ही केलेल्या अन्यायाबद्दल आमचा सूड घेतल्यासेरीज राहणार नाहीं. तरी देसील निंबराजा आपला आग्रह सोडीना. शेवटीं मीं ही कामगिरी आपल्यावर नको, असें राजाला साफ सांगितलें. तेव्हां त्याचा नाइलाज झाला. दृढसंधाला शिक्षा तर करावयाचीच, पण उघड उघड आपले लोक पाठवून करावयाची नाहीं, अशी निंबराजाची इच्छा असल्यामुळें त्यानें आज्ञापत्रामध्यें आणखी शोध घालून ' या आज्ञापत्राप्रमाणें शिक्षा देण्याचे कामीं जे कोणी जाणून बुजून हरकत करतील, त्यांनासुद्धां त्याच वेळीं देहांतशिक्षा देणें नाइलाजानें भाग पडेल ' असा मजकूर राजानें लिहिला. आपण जरा युक्तीनें वागलों, म्हणजे आपल्या सर्व इच्छा खात्रीनें पूर्ण होतील ! आतां यावर तुझें काय म्हणणें आहे ?'

विक्रमसेन म्हणाला,-' मला एकदां तें आज्ञापत्र पाहिलें पाहिजे, म्हणजे माझें पूर्ण समाधान होईल. तें आज्ञापत्र आपल्यापाशीं असेलच.'

बृहद्रथ आपल्या आसनावरून उठला आणि त्यानें आपलें खासगी दप्तर सोडून त्यांतून एक कागद बाहेर काढिला, आणि म्हणाला,-' हें पहा ! यावरून आपणांस आपल्या सर्व इच्छा पूर्ण करून घेतां येतील. ही राजाची सही, आणि ही त्याची मोहोर.'

विक्रमसेन तें आज्ञापत्र मोठ्या उत्कंठेनें वाचूं लागला. आज्ञापत्र बरेंच लांब होतें, आणि त्यामध्यें दृढसंधाला अशी भयंकर शिक्षा करण्याचीं कारणें बरींच विस्तारानें लिहिलेलीं होतीं. तें आज्ञापत्र वाचून विक्रमसेनाचें समाधान झालें. तो म्हणाला,-' सूड उगविण्याला हें उत्तम साधन आपल्या हातीं लागलें आहे खरें. याचा जर आपण योग्य उपयोग करून घेतला नाहीं, तर तो मूर्खपणा आमचा होईल ! बरें; आपण पुढें काय बेत योजिला आहे ?'

बृहद्रथ म्हणाला,-' मीं अद्यापि कांहींच विचार केलेला नाहीं. या गोष्टींत आपणां उभयतांचेंही हित असल्यामुळें जो विचार करणें तो परस्परांच्या अनुमतानें केला पाहिजे. न जाणो, एकानें कांहीं युक्ति काढली, आणि दुर्दैवानें ती फसली, तर दुसऱ्याला शब्द ठेवण्यास जागा उरूं नये,

एवढ्यासाठींच मीं आज मुद्दाम तुला येथें बोलावून आणलें आहे. तर आतां तुझा विचार काय आहे, तें सांग पाहूं !'

विक्रमसेन मोठ्या आढ्यतेनें बोलला,–'हें कृत्य एका झपाट्यासरसें उरकून घेतलें पाहिजे. दिरंगाई करतां नये. न जाणो, दृढसंधाचें शपथपत्र योग्य वेळेपूर्वी राजाच्या नजरेस पडलें, आणि त्यानें आपली आज्ञा बदलली, तर सगळी मेहनत आणि मोठ्या प्रयासानें जुळवून आणलेली ही सोन्यासारखी संधि व्यर्थ जाईल ! तसेंच हा आपला उद्देश केवळ शक्तीच्या जोरावर साध्य व्हावयाचा नाहीं. आम्ही जर पुष्कळ सैन्य घेऊन प्रतापपुरावर चाल करून गेलों, तर दृढसंध लढाईस उभा राहील, आणि मग आपले हेतु जागच्याजागीं विरघळून जातील ! दृढसंधानें एक वर्ष वेढा पडला तरी पुरेल इतकी अन्नसामुग्री प्रतापपुरामध्यें जमवून ठेविली आहे, अशी मला बातमी लागली आहे.'

बृहद्रथ बोलला,–'हें सगळें मी पूर्वीच बोललों आहें ! तूं पुढें काय युक्ति सुचवितोस ती मला पाहूं दे.'

यानंतर त्यांनीं बराच वेळ खलबत करून आपला हेतु कोणत्या मार्गानें साध्य करावयाचा हें ठरविलें. त्यांनीं काय ठरविलें हें कथाप्रसंगानें वाचकांस कळून येईलच.

नंतर बृहद्रथ बोलला,–'जर का ही युक्ति फसली, तर मात्र मोठी पंचाईत होईल. आम्हीं तीन वर्षांपूर्वी जो तहनामा लिहून दिला आहे, त्याची मुदत अजून भरावयाची आहे.'

विक्रमसेन निष्काळजीपणानें बोलला,–'त्यावेळीं त्याच्या मनगटांत जोर होता, म्हणून त्यानें जुलमानें आमच्याकडून काय हवें तें लिहून घेतलें. आम्ही त्यावेळीं अडचणींत सांपडून जें लिहून दिलें तें आतांही कबूल केलेंच पाहिजे, असें मला मुळींच वाटत नाहीं. शिवाय आज माझ्या हाताखालीं खुद्द निंबराजाच्या सैन्यांतील पांचशें लोक आहेत. त्यांपैकीं शंभर लोक मी बरोबर घेऊन गेलों, तर खुद्द आमचें सैन्य नेलें असें होत नसल्यामुळें आणि आम्ही जें काय करीत आहों, तें राजाधिराजांच्या आज्ञेनें करीत असल्यामुळें त्या तहनाम्यांतील अटी आम्हीं मोडल्या असें मुळींच होत नाहीं. राजाधिराजांच्या या आज्ञापत्रापुढें पूर्वीचे सर्व तहनामे अगदीं कवडीमोलाचे आहेत !'

बृहद्रथ बोलला,–'असें खरें; ही आपली युक्ति तडीस जाण्यास मला आणखी एक अडचण दिसते. तिचा आपण याच बैठकीस विचार केला पाहिजे !'

विक्रमसेन बोलला,–'ती अडचण कोणती?'

बृहद्रथ बोलला,–'तुला जें आणखी सैन्य प्रतापपुरीं अगदीं ऐन्या वेळीं न्यावें लागेल, तें नेण्याला मार्गही गुप्त पाहिजे. तो मार्ग दाखविण्यासाठीं आम्हाला एकाद्या घरभेद्याची जरूर आहे. प्रतापपुरीं गेल्यावर मग मी एकादा घरभेद्या मिळवीन अशी तुझी कल्पना असेल, आणि ती सिद्धीस जाईल असें तूं समजत असलास, तर ती तुझी चूक होईल.'

विक्रमसेन बोलला,–'त्याची नको काळजी ! मीं त्यासंबंधानें पूर्वीच योजना करून ठेविली आहे !'

बृहद्रथानें विचारलें,–'ती कोणती ?'

विक्रमसेनानें उत्तर दिलें,–'प्रतापपुरामध्यें पूर्वी मोठ्या अधिकारावर असलेला, परंतु आतां हद्दपार झालेला एक पक्का लफंगा माणूस माझ्या माहितींत आहे. त्याचें अर्धे आयुष्य प्रतापपुरांत गेलें असल्यामुळें त्याला त्या दरींतील प्रत्येक जागा चांगली माहित आहे. त्या माणसाला कामापुरता हातीं धरण्याचा माझा विचार ठरलेला आहे.'

बृहद्रथ बोलला,–'आतां माझी शंका दूर झाली. आपल्या योजनेप्रमाणें आपला हेतु सोळा आणे सिद्धीस जाईल, असें माझें मन आतां मला सांगत आहे.'

प्रकरण ५२ वें.

विक्रमसेनाचा दरींत प्रवेश.

दुसरे दिवशीं मोठ्या सकाळींच विक्रमसेन आपल्याबरोबर निंबराजाच्या लष्करापैकीं शंभर लोकांची एक तुकडी बरोबर घेऊन प्रतापपुरच्या दरीमध्यें प्रवेश करण्याच्या सोनानदीच्या मुखाकडील द्वारापाशीं येऊन दाखल झाला. या वेळीं तेथें फक्त दोन मिल्ल पहाऱ्यावर होते. आपला कट्टा शत्रु विक्रमसेन फक्त शंभर लोक घेऊन दरींत येत आहे, हें पाहून त्या पहारेकऱ्याला मोठें आश्चर्य वाटलें. विक्रमसेनाबरोबरचे मुटभर लोक पाहून तो शत्रुत्वानें येथें आला असेल, असें त्यांच्या मनांत क्षणमात्रही आलें नाहीं. दरीच्या तोंडाशीं आल्याबरोबर विक्रमसेनानें आपल्या बरोबरच्या लोकांस उभें राहण्याचा हुकूम केला.

त्याला एका पहारेकऱ्यानें विचारलें,—'तुम्ही इकडे कां आलां आहां ?'

विक्रमसेनानें उत्तर दिलें,—'राजाधिराज निंबराजाच्या आज्ञेनें दृढसंधराजाकडून खंडणी वसूल करण्यासाठीं मी आलों आहें. शिवाय या प्रदेशाची नवीन पाहणी करून खंडणी वाढवावयाची कीं कमी करावयाची हेंही ठरवावयाचें आहे.'

पहारेकऱ्यानें विचारलें,—'आपल्याबरोबर इतके लोक काय म्हणून? हे सर्व शिपाई खुद्द निंबराजाच्या सैन्यांतील दिसतात !'

विक्रमसेनानें उत्तर केलें,—'राजाधिराजांच्या सैन्यांतील मी एक मोठा अधिकारी असून माझ्या हातीं नेहमीं पांच हजार सैन्य असतें, हें तुम्हांस माहीत नाहीं काय ? हे सर्व लोक माझ्या हाताखालीं आहेत; अलीकडे या सर्व बागलाणांतील महसूल वसूल करण्याची कामगिरी राजाधिराजांनीं मजकडे सोंपिली असल्यामुळें मदतीसाठीं नेहमीं शंभर लोक बरोबर नेण्याची राजाधिराजांची मला आज्ञा आहे. तुम्ही ज्याप्रमाणें दृढसंध राजाचे एकनिष्ठ सेवक आहां, त्याप्रमाणें मी राजाधिराजांचा एकनिष्ठ सेवक आहें. तुम्हांला ज्याप्रमाणें आपल्या धन्याची आज्ञा पाळावी लागते, त्याप्रमाणें मलाही राजाधिराजांची आज्ञा पाळावी लागते !'

पहारेकरी बोलला,—'तुमचें म्हणणें बरोबर आहे. आम्हाला आमच्या राजाची अशी आज्ञा आहे कीं, ज्या ज्या वेळीं आमच्या मनांत शंका येईल त्या त्या वेळीं दरींत शिरणाऱ्या प्रत्येक मनुष्याकडून आम्ही शपथ घेववावी. जर तुम्हाला दरींत प्रवेश करावयाचा असेल, तर तुम्ही प्रथम आपल्या तरवारीवर हात ठेवून 'आम्ही केवळ मित्रत्वानेंच दरींत प्रवेश करीत आहों, दरींत असतांना आम्ही कोणत्याही प्रकारचें विश्वासघाताचें वर्तन करणार नाहीं' अशी तुम्ही शपथ घेतली पाहिजे. जर तुम्ही अशी शपथ घ्यावयास तयार नसाल, तर आम्ही आतांच आपल्या सैन्याला शत्रूची वर्दी देऊं। आमची खूण पोंचल्यानंतर एका घटकेच्या आंत पांचशें सशस्त्र शूर मिल्ल तुम्हाला शिक्षा करण्यास तयार असलेले तुमच्या दृष्टीस पडतील !'

सोनानदीच्या मुखाकडून दरींत प्रवेश करण्याचा जो मार्ग होता, त्या मार्गावर दृढसंधानें सह्या तट बांधिला असून तेथें एक भक्कम दरवाजा तयार केला होता. त्या दरवाजानजीक एक मोठा बुरुज बांधिलेला असून त्यावर एक तोफ ठेविलेली होती. त्या दिशेनें शत्रु चालून येत आहे, अशी तेथील पहारेकऱ्यांची खात्री झाल्याबरोबर त्यांनीं त्या तोफेस बत्ती द्यावयाची असें ठरविलेलें होतें. ह्या तोफेचा आवाज कानीं पडतांच सर्व सैन्यांनीं एका घटकेच्या आंत युद्धास सिद्ध व्हावें, अशी दृढसंधाची सर्वांस सक्त ताकीद होती. दरवाजा नेहमीं बंद असे. पहारेकऱ्यानें नेहमीं जेथें बसावयाचें ती जागा बंदोबस्ताची होती. शत्रूनें पहारेकऱ्यांस

ठार करण्याचे प्रयत्न सुरू केल्यास त्या प्रयत्नांस यश येण्यापूर्वी पहारेकऱ्याला तोफ डागण्यास जरूर तितका वेळ सहज मिळावा, अशी दृढसंधानें तेथें मोठ्या चातुर्यानें योजना करून ठेविली होती.

विक्रमसेन म्हणाला,–'तशी शपथ घेण्याची माझी तयारी आहे. मी शिपाईगडी आहें; एकदां शपथ घेतली, म्हणजे ती आम्ही शिपाईगडी प्राणांतींही मोडीत नसतों! मी आपल्या तरवारीची शपथ घेऊन सांगतों की मी सध्या शत्रुत्वाच्या हेतूनें तुमच्या राज्यांत प्रवेश करूं इच्छित नाहीं. मी केवळ राजाधिराजांच्या आज्ञेवरूनच येथें आलों आहें. पूर्वीपासून चालत आलेलें वैर बाजूस ठेवून केवळ मित्रत्वाच्या नात्यानें दृढसंध-राजांची भेट घेण्याचा आज प्रसंग आला, म्हणून मला फार आनंद होत आहे!'

पहारेकरी म्हणाला,–'होयं; असा प्रसंग फार दिवसांनीं आला खरा; हा परिणामी दोघांसही सुखकर होवो, म्हणजे झालें. ज्या अर्थीं तुमच्यापाशीं फक्त शंभरच लोक आहेत, आणि तुम्हीं शपथही घेतली आहे, त्या अर्थी मला दरवाजा उघडणें भाग आहे त्या दरवाजा उघडल्यानंतरही मी दाखवीन त्याच मार्गानें तुम्ही शहराकडे गेलें पाहिजे; असें करण्यास आपण हरकत घेणार नाहीं, ही माझी खात्री आहे.'

विक्रमसेन बोलला,–'तुमच्या राज्यांत यावयाचें म्हणजे तुमचे कायदे पाळले पाहिजेत, हें मी जाणून आहें. त्यांचा अतिक्रम मी करणार नाहीं. शिवाय तुमच्यापैकीं कोणी बरोबर असला म्हणजे आमच्या आगमनाचें वर्तमान दृढसंध राजाला तितकें लवकर समजेल. मी तर तुझ्यामागून येतच आहें, पण आम्ही शहराच्या वेशीपाशीं आलों, म्हणजे तूं पुढें जाऊन दृढसंधराजाला वर्दी कळीव. पूर्वी मी लढाईतील कैदी या नात्यानें प्रतापपुरीं असतां त्यांनीं मला मोठ्या सन्मानानें वागविलें होतें, यावरून याही प्रसंगीं ते माझा योग्य सन्मान ठेवितील अशी मला खात्री आहे. यासाठीं आतां सर्व शंका सोडून देऊन दरवाजा उघड!'

पहारेकऱ्यानें दरवाजा उघडून त्याच्या बरोबरच्या लोकांसह विक्रमसेनाला आंत घेतलें. नंतर तो पहारेकरी पुढें, आणि विक्रमसेन त्याच्यामागें, अशा रीतीनें ते प्रतापपुरचा मार्ग क्रमूं लागले. ते ज्या वेळीं प्रतापपुरच्या वेशीपाशीं आले, तेव्हां पहारेकऱ्यानें त्यांना तेथें उभें केलें, आणि तो तडक राजवाड्याकडे गेला.

सोनानदीच्या मुखाजवळील दरवाज्यावरील पहारेकरी आपल्या दर्शनास आल्याची दृढसंधाला वर्दी पोंचताच दृढसंधानें त्याला आपल्याजवळ बोलाविलें. दृढसंधापाशीं सध्या त्याचे दोन्ही पुत्र, जांधिळ आणि दुसरे एकदोन सेवक इतकीं माणसें होतीं. राजपुत्र चूडामणी आपलीं हत्यारें वगैरे वगैरे कमरेस बांधून शिकारीस जाण्याच्या बेतांत होता. पहारेकऱ्यानें दृढसंधाला प्रणाम करून झाल्या गोष्टीची वर्दी दिली. तें वर्तमान ऐकून तेथें असलेल्या सर्वांना फार आश्चर्य वाटलें. विक्रमसेनाचें नांव कानीं पडतांच जांधिळानें तर एकाद्या राक्षसाप्रमाणें विकाळ आरोळी मारिली. तिच्या योगानें सर्व राजवाडा दणाणून गेला! ही त्यांची आरोळी ऐकून सर्वांना मोठी भीति वाटली, व ते जांधिळाकडे पाहूं लागले.

या वेळीं अंगांत भूतसंचार झाल्याप्रमाणें जांधिळाची मुद्रा विलक्षण दिसत होती. त्याचे भयंकर दिसणारे नेत्र अगदीं रक्तासारखे लाल झालेले होते. तो कांहीं विशिष्ट प्रकारें हातवारे करीत होता. त्याजकडे पाहतांच तो सध्या शुद्धीवर नसून त्याच्या अंगांत अगम्य शक्तिचा संचार झाला आहे, असें सर्वांस आढळून आलें थोडा वेळ अंगाला आळेपिळे देऊन झाल्यावर तो गर्जना करीत बोलला,–'दृढसंध राजा! सावध हो! सावध

हो ! पूर्वी तूं चामुंडेला कौल लाविला होतास, त्या वेळीं तिनें जो दृष्टांत दिला होता, तो सत्य होण्याची वेळ अगदीं जवळ आली आहे ! अलीकडे कित्येक दिवस चामुंडा देवीच्या अंगावर रक्ताचे डाग पडलेले दिसत आहेत ! गरुडपक्षी भयानें विह्वल होऊन रात्रीचे मोठमोठ्यानें ओरडत असतात ! दिवसा ढवळ्या घुबडें या राजवाड्यावर येऊन बसत असतात, पण तिकडे तुझें लक्ष्य नाहीं ! देवी चामुंडा आज तुला सावध राहण्याविषयीं सूचना देत आहे ! राजा, तुला आपला घात व्हावा अशी इच्छा असेल, तरच या कृष्णसर्पाला आपल्या वाड्यांत आश्रय दे ! विचार कसला करतोस ?'

असें बोलत असतां जांघिळ एकदम उभा राहिला, आणि इकडे तिकडे कोठें न पाहतां एकदम दरवाजा उघडून तो राजवाड्याच्या मुख्य दरवाज्याकडे धांवत गेला.

जांघिळाचें हें कृत्य पाहत सर्वजण अगदीं चित्राप्रमाणें स्तब्ध बसले होते. तो गेला, तरी दृढसंध राजा विचारांत निमग्न होऊन कांहीं पळें स्वस्थच बसला होता. कोणालाही बोलण्यास धैर्य होत नसल्यामुळें सर्वजण त्याच्या मुखाकडे दृष्टि लावून तो आतां काय बोलतो हें ऐकण्यास अत्यंत आतुर झाल्याप्रमाणें दिसत होते.

थोडा वेळ गेल्यावर दृढसंध राजा निश्चयदर्शक स्वरानें म्हणाला,–'जें काय होणार असेल तें होईल ! विक्रमसेन ज्या अर्थी निंबराजाच्या आज्ञेनें येथें आला आहे, त्या अर्थी आपण त्याला सन्मानपूर्वक शहरांत घेतलेंच पाहिजे ! निंबराजांची साम्राज्यसत्ता मान्य करून मी ज्या अर्थी राजनिष्ठेची शपथ घेतली आहे, त्या अर्थी राजाधिराजांच्या आज्ञेला मान देणें हें माझें कर्तव्य आहे ! या प्रसंगीं मी जर विक्रमसेनाचा अपमान केला, तर तो प्रत्यक्ष निंबराजांचा अपमान होणार आहे. राज्यक्रांति सुरू झाल्यापासून तीन वर्षांची खंडणी द्यावयाची राहिली आहे, ती दिलीच पाहिजे. आमच्या मुलखाची पहाणी करण्याची निंबराजांची इच्छा असल्यास त्यानें ती खुशाल करावी. वारंवार पहाणी करून कारभार योग्य आहे कीं नाहीं हें ठरविणें हें राजाचें कर्तव्यच आहे. तें आपलें कर्तव्य तो करीत असतां मी त्याला नको असें कोणत्या आधारानें म्हणूं ? शिवाय आपण मित्रभावानें येत आहों, अशी विक्रमसेनानें शपथही घेतली आहे !'

पहारेकरी म्हणाला,–'होय महाराज ! त्यानें आपल्या तरवारीवर हात ठेवून मित्रत्वाची शपथ घेतली आहे.'

चूडामणि तिरस्कारदर्शक वाणीनें बोलला,–'विक्रमसेनासारख्या नीच शत्रूच्या शपथेला मी कवडीचीसुद्धां किंमत देत नाहीं. माझें मत असें आहे कीं, आपण जांघिळाच्या मुखानें आतां जे उद्गार निघाले आहेत, तिकडे लक्ष्य ठेवून मोठ्या सावधपणानें वागणें जरूर आहे. मला वाटतें कीं, आपण आतांच्या आतां दोनतीनशें लोक जमा करून या सर्वांची एकदम कत्तल करून टाकावी. विषाची परीक्षा पाहत बसण्यांत हांशील नाहीं !'

दृढसंध निश्चयदर्शक स्वरानें बोलला,–'चूडामणि, तुझा हा विचार मला अगदीं पसंत नाहीं. ज्या अर्थी मीं राजनिष्ठेची शपथ घेतली आहे, त्याअर्थी मला ईश्वरास स्मरून न्यायानें वागणें जरूर आहे. विक्रमसेनाच्या मनांत कपट आहे, असें जरी गृहीत धरिलें, तरी त्याच्याबरोबर फक्त शंभर लोक आहेत. तेवढ्या लोकांच्या साह्यानें तो काय करणार आहे ? शिवाय आपण या लोकांवर चांगली नजर ठेवूं, म्हणजे झालें. आपण सावध राहिलों म्हणजे ते आमचें काय करणार ? कांहीं जरी झालें, तरी आज मित्रत्वाच्या नात्यानें आपण होऊन आलेल्या विक्रमसेनाची भेट घेणें हें फार अगत्याचें आहे.'

असें बोलून दृढसंध उठला, आणि आपल्या आठ दहा सेवकांसह विक्रमसेनाचें स्वागत करण्यासाठीं तो प्रतापपुरच्या वेशीकडे निघाला. या प्रसंगीं विक्रमसेनानें आपल्याबरोबर जे लोक आणले होते, ते पायदळांपैकीं होते, आणि स्वतः तोही पायीं चालतच प्रतापपुरीं आला होता. वेशीपाशीं आल्याबरोबर विक्रमसेनानें प्रथम आपण पुढें होऊन दृढसंधाला प्रणाम केला, आणि आपल्या लोकांसही त्यानें दृढसंधाला प्रणाम करावयाला आज्ञा केली. दृढसंध राजानेंही मोठ्या गंभीरपणानें त्या प्रणामांचा स्वीकार केला, आणि आपणही त्यांस नमन केलें. विक्रमसेनाचें त्या वेळचें आचरण आणि त्याची मुद्रा यांवरून दृढसंधाच्या मनांत त्याच्याविषयीं अनुकूल ग्रह उत्पन्न झाला. तो या प्रसंगीं शत्रुत्वानें आपणाकडे आला नसून मित्रत्वानेंच आला असावा, असें दृढसंधाला वाटलें. त्यानें आदरपूर्वक विक्रमसेनाला आंत घेतलें आणि ते दोघे संस्थानिक हातांत हात घालून राजवाड्याकडे आले.

राजवाड्यापुढील अंगणांत विक्रमसेनाचे शिपाई उभे राहिले, आणि ते दोघे संस्थानिक राजवाड्यांतील मुख्य दिवाणखान्यांत जाऊन तेथील योग्य आसनांवर बसले. मंतर विक्रमसेन बोलला,–'अहो दृढसंध महाराज, मीं आपणांकडे जो निरोप पाठविला होता, त्यानें आपलें समाधान झालें ना? जे खरे शूर पुरुष असतात, त्यांना शत्रुत्वानें केव्हां वागावें, आणि मित्रत्वानें केव्हां वागावें, हें चांगलें समजत असतें. ज्या वेळीं युद्धाचा प्रसंग उपस्थित झालेला असतो, त्यावेळीं एकमेकांनीं एकमेकांचें शत्रुत्व करावें, हें सरळच आहे. पण इतर प्रसंगीं त्यांनीं मित्रत्वानें कां वागूं नये? ज्या अर्थीं राजाधिराजांच्या आज्ञेनें आज मला मित्रत्वाच्या नात्यानें येण्याची संधि प्राप्त झालेली आहे, त्याअर्थीं मित्रत्वाच्या भाषणास प्रथम मींच प्रारंभ करावा, हें उचित आहे. जोंपर्यंत माझें येथें राहणें होईल, तोंपर्यंत मी आपल्याशीं मित्रत्वानेंच वागेन; आपणही आपल्या मित्रत्वाचा लाभ मला दिला पाहिजे, अशी माझी विनंति आहे.'

दृढसंध गंभीरवाणीनें बोलला,–'अहो विक्रमसेन, ज्या अर्थीं तुम्ही अगदीं सरळ मनानें मित्रत्वाची अपेक्षा करीत आहां, त्या अर्थीं मलाही तुमच्या शब्दास मान दिलाच पाहिजे. तुम्ही जोंपर्यंत येथें रहाल, तोंपर्यंत मी आपला पूर्वीचा संबंध साफ विसरून गेलों आहें, असें समजून माझ्या पाहुणचाराचा मोकळ्या मनानें स्वीकार करावा, अशी माझी मनापासून इच्छा आहे.'

नंतर विक्रमसेन शेखराकडे पाहून त्यास म्हणाला,–'अहो राजकुमार, तुमच्या शौर्यासंबंधानें आणि औदार्यासंबंधानें पुष्कळ गोष्टी माझ्या कानांवर आल्या आहेत. आज आपल्याकडे येऊन आपल्याशीं सहवास करण्याचा प्रसंग आला हें फार चांगलें झालें. तसेच हे चूडामणि; यांनीं तर आपला पराक्रम पुष्कळ वेळां व्यक्त केला आहे, तेव्हां यांच्या शौर्याबद्दल विशेष कांहीं बोलावयास नको. अहो शेखर, पूर्वी एकदां तुमचा-आमचा कांहीं कारणावरून सटका उडाला होता, त्याचें तुम्हांस स्मरण आहे काय? त्यावेळीं तुमच्या युद्धकौशल्याचा मला चांगलाच अनुभव आला होता! पण आतां त्या गोष्टीसंबंधानें अधिक चर्चा करून काय करावयाचें आहे? त्यावेळीं मला जसा आपल्या शौर्याचा तसाच औदार्याचाही अनुभव आलेला आहे. त्यावरून मला असा भरंवसा वाटतो कीं, आपणापाशीं मित्रत्वाची याचना केल्यास तिचा उपयोग झाल्यावांचून राहणार नाहीं.'

हें सर्व भाषण विक्रमसेनानें इतक्या मोकळेपणानें केलें कीं, तें ऐकून त्याच्या मनाच्या मोकळेपणाविषयीं आणि त्याच्या

सौजन्याविषयीं शंका घेणारा माणूस स्वतः पक्का ढोंगी आणि कपटी असला पाहिजे होता. असला एक माणूस त्या प्रसंगीं तेथें होताही. चूडामणीला मात्र हें त्याचें भाषण कपटाचें आहे, असें वाटत होतें, आणि तो त्याच्यावर विश्वास ठेवण्यास अगदीं राजी नव्हता. तथापि विक्रमसेनाविरुद्ध एकादें विधान करावयास त्याला याप्रसंगीं मोठी अडचण पडली असती. त्याच्यावर आपण विश्वास ठेविल्यास आपला घात होईल, असें त्याला जरी वाटत होतें, तरी त्याला 'असें कां' म्हणून कोणीं विचारल्यास त्याला त्याचें उत्तर देतां येण्यासारखें नव्हतें. या वेळीं जर विक्रमसेनासेरीज दुसरा कोणी शत्रुपक्षाचा गृहस्थ तेथें असता, तरी सुद्धां त्याच्यासंबंधानें चूडामणीच्या मनांत अशाच प्रकारची कल्पना आली असती. आपल्या शत्रूकडे औदार्ययुक्त दृष्टीनें पाहण्याची त्याला कधीं कल्पनासुद्धां नव्हती!

परंतु शेखराचा स्वभाव त्याच्या अगदीं उलट होता. तो औदार्याचा मूर्तिमंत पुतळाच होता. प्रत्येक मनुष्य आपल्या मनावरून दुसऱ्याची परीक्षा करीत असतो. शेखराचें मन स्वभावतः निर्मळ असल्यामुळें त्याला प्रत्येक माणसासंबंधानें विशेष अनुभव येईपर्यंत प्रत्येक मनुष्य सरळ स्वभावाचा आहे, असें वाटत असे. प्रत्येक माणसाला आपण लबाड समजून त्याच्याशीं लबाडीनें वागण्यापेक्षां प्रत्येक मनुष्य सच्चा आहे, असें समजून त्याच्याशीं सचोटीनें वागणें हें शेखराला अधिक आवडत असे. आपल्या पित्यानें विक्रमसेनाचें मोकळ्या मनानें स्वागत केलें, हें पाहून शेखरानेंही आपल्या पित्याचें अनुकरण करण्याचा निश्चय केला होता.

अशा प्रकारचीं प्रास्ताविक भाषणें आटोपल्यावर विक्रमसेन दृढसंधराजाला उद्देशून बोलला,—'मी येथें कोणत्या उद्देशानें आलों आहें, हें आपणांस [illegible] आपणाकडे तीन व[illegible] निघत आहे, व ती [illegible] आहे, याबद्दल माझी खात्री [illegible] साठीं मला इकडे येण्याची [illegible] नव्हती, पण राजाधिराज निंबमहाराजांची सत्ता सुरू झाल्यापासून त्यांनीं आपल्या प्रजेला सुख होण्याचे जे अनेक उपाय योजिले आहेत, त्यांपैकींच नवीन प्रतबंदी हा एक उपाय आहे. ही नवीन प्रतबंदी करण्यांत आपलें उत्पन्न वाढविण्याचा त्यांचा उद्देश नसून प्रजेपासून आपण जो कर घेतों, तो योग्य आहे कीं नाहीं, हें पहावें असा आहे. जमिनीची पहाणी करून तिचा मगदूर ठरविणारा एक विशिष्ट अधिकारी लवकर येथें येईल. एवढ्याच कामासाठीं मी येथें आलों असल्यामुळें मला आपल्याबरोबर शंभर माणसें घेऊन येण्याची अगदीं जरूर नव्हती. हीं माणसें मीं आपणास भिवविण्यासाठीं किंवा आत्मसंरक्षणासाठीं आणलीं असतील असें कोणाच्याही मनांत यावयास नको. कारण त्या दोन्ही कामासाठीं हीं मूठभर माणसें अगदीं अपुरीं आहेत. असें असून हीं माणसें मीं आपल्या बरोबर कां आणिलीं असा प्रश्न साहजिक उत्पन्न होतो; त्याचें उत्तर असें आहे कीं, ही माझ्या हातासालच्या पायदळाची एक टोळी या दरींत रम्य प्रदेश पाहून चार दिवस शिकारीमध्यें घालविण्यासाठीं येथें आली आहे. सध्यां आमच्या प्रांतांतील सैन्यास राजाधिराजांनीं दोन महिन्यांची रजा दिली आहे. जे सैनिक याच प्रांतांतील किंवा येथून जवळच्या प्रांतांतील होते, ते सर्व आपापल्या घरीं आपल्या मुलांमाणसांच्या सहवासाचें सुख भोगण्यासाठीं गेले आहेत. परंतु ज्या लोकांचीं घरें दूरदेशीं असल्यामुळें त्यांस प्रवासाचा त्रास आणि खर्च मोठा आहे, तेवढे लोक मात्र येथेंच राहिले आहेत, त्यांपैकीं

ज्यां[illegible]य प्रदेश पाहण्या[illegible]ना मी आपल्य[illegible]ळा आहे. शिवाय [illegible] कामासाठीं जेथें जे[illegible] तेथें बरोबर शंभर माणसें घेऊ[illegible]ची मला अजाही आहे. आपली गे[illegible], पण इतर कित्येकांस नवीन प्रतबं[illegible] फार अनिष्ट वाटते, आणि ते कित्येक प्रसं[illegible] दंगा करण्यास प्रवृत्त होतात, म्हणून [illegible] लोकांना जरब दाखविण्यासाठीं सैनिक[illegible] एक लहानशी टोळी बरोबर असणें पुष्[illegible] प्रसंगीं जरूर होतें. मी आपल्याकडे प[illegible] ण्याच्या नात्यानें एकटाच आलों न[illegible] आणखी शंभर पाहुणे आणले आहेत! गोष्ट जरी थोडी अनुचित आहे, [illegible] आपल्या दिलदारपणावर विश्वास ठेवून मीं केली आहे. तथापि या पाहुण्यांचा अ[illegible] णांस फारसा त्रास पडणार नाहीं; का[illegible] आपण त्यांना जेथें रहावयास सांगाल, ते खुषीनें राहतील. थोडक्यांत सांगाव[illegible] म्हणजे इतकेंच कीं, सध्यांच्या प्र[illegible] मी मित्रत्वानें आपणांकडे आलों आहें, [illegible] अर्थी आमच्या पाहुणचारांत जरी आप[illegible] कडून थोडा कमीपणा झाला, तरी अ[illegible] उणें पाहण्याचा माझा अगदीं हेतु नाहीं

दृढसंध अगदीं मोकळ्या मनानें बोल[illegible] 'तुम्ही आतां जें भाषण केलें आहे, तें स्वस्थपणें ऐकून घेतलें असल्यामुळें म[illegible] मनांत आतां तुमच्यासंबंधानें कोणत[illegible] प्रकारची शंका उरलेली नाहीं. याउपर[illegible] मी शंका घेईन, तर तुमच्यासारख्या गृहस्थाचा आणि वीरपुरुषाचा अप[illegible] केल्यासारखें होणार आहे. मी तुमच्[illegible] मित्रत्वानेंच वागेन, असें मी तुम्हाला सांगतों. ईश्वराच्या दयेनें मला आज [illegible] कमी नाहीं! तुमची आणि तुमच्याबरोब[illegible] सैनिकांची सेवा करण्याचा आज अकल्पित लाभ मिळाला आहे, तो मी घालविणार नाहीं. माझे कारभारी सर्वांची [illegible] व्यवस्था करतील. तुम्ही स्वतां हा वाडा आपला आहे असें समजून येथेंच राहून आपल्या पंक्तीचा लाभ आम्हांस दिला पाहिजे.'

अशा रीतीनें विक्रमसेनाचा राजवाड्यामध्यें प्रवेश झाला. जोधिळाच्या म्हणण्याप्रमाणें दृढसंधानें कृष्णसर्पाला आपल्या खोलींत रहावयाला जागा दिली!

आणखी दोन दिवस गेले, पण या दोन दिवसांत विक्रमसेनाच्या किंवा त्याच्या अनुयायांच्या आचरणावरून किंवा कृतीवरून त्यांच्या मनांतील कपटाची कोणासही शंका आली नाहीं. त्या लबाड विक्रमसेनानें आपल्या भाषणांत साखर पेरून राजवाड्यांतील प्रत्येक माणसाला मोहून टाकण्याचा क्रम सुरू ठेविला होता. स्वभावतः निष्कपटी असलेल्या दृढसंधाच्या मनांत, किंवा राजवाड्यांतील कोणत्याही रहिवाश्याच्या मनांत विक्रमसेनाच्या कपटाची शंका उत्पन्न झाली नाहीं, आणि ते अगदीं बेसावध राहिले. विक्रमसेन प्रतापपुरीं कोणत्या हेतूनें आला आहे, यांतील मर्म त्याच्या अनुयायांपैकीं एकासही माहीत नव्हतें. त्या सर्वांना तो केवळ खंडणी वसूल करण्यासाठीं आणि नवीन प्रतबंदी करण्यासाठींच येथें आला आहे, असें वाटत होतें.

पहिल्याच दिवशीं जेव्हां या सैनिकांची आणि दरींतील भिल्लांची गांठ पडली, तेव्हां त्या भिल्लांच्या मनांत त्या सैनिकांविषयीं साहजिकपणें संशय उत्पन्न झाला, आणि ते त्यांच्याशीं मोकळ्या मनानें वागेनात. परंतु स्वतः दृढसंध विक्रमसेनाशीं मित्रत्वाच्या नात्यानें वागत आहे, ही गोष्ट त्यांच्या लक्ष्यांत आली, तेव्हां ते त्यांच्याशीं मोकळ्या मनानें वागूं लागले. शिवाय विक्रमसेनानें दरींत येण्यापूर्वी आपल्या सैनिकांस भिल्लांशीं मित्रत्वानें वागण्याची सूचना दिलेली होती, आणि त्या सैनिकांना त्यांचा हेतु माहीत नसल्यामुळें त्यांच्या मनांत कपटही नव्हतें.

मराठी ग्राणे

म्हणून ते सैनिक दरींतिल भिल्लांशीं मोकळ्या मनानें वागत होते. 'समानशीलव्यसनेषु सख्यम्' या संस्कृत म्हणप्रमाणें त्या दोन्ही शूर लोकांचा दोनच दिवसांत परस्परांशीं चांगला स्नेह जमला.

या प्रसंगीं सर्व दरींत विक्रमसेन किंवा त्याचे सैनिक यांवर अगदीं भरंवसा न ठेवणारीं अशीं फक्त दोनच माणसें होतीं. एक चूडामणि आणि दुसरा जांघिळ; पण त्या दोघांचें परस्परांशीं अगदीं जमत नसे. आपला पूर्वीचा सर्व बेत जांघिळानें उघडकीस आणला, आणि आपली फजिती केली, म्हणून चूडामणि जांघिळाचा द्वेष करीत असे. त्याचप्रमाणें जांघिळाच्या मनांत चूडामणीविषयीं तिळमात्र आदरबुद्धि वसत नव्हती. ते दोघे विशेष प्रसंगाखेरीज परस्परांशीं भाषणसुद्धां करीत नसत. ते दोघे जर या प्रसंगीं एकमेकांना अनुकूल असते, तर त्यांनीं विक्रमसेनाची लबाडी उघडकीस आणण्यासाठीं कांहीं तरी प्रयत्न केले असते. चूडामणीनें आपले दोन्ही दिवस शिकार करण्यांतच घालविले, आणि जांघिळ एकाद्या भ्रमिष्टाप्रमाणें ते दोन दिवस दरीमध्यें जिकडे तिकडे भटकत होता.

विक्रमसेन राजवाड्यांतच राहत होता. त्याच्या तैनातीस म्हणून दृढसंधानें त्याच्या हाताखालच्या दोन सैनिकांस राजवाड्यांत राहण्याची परवानगी दिली होती. विक्रमसेनानें आपल्या तैनातीस म्हणून जे दोघे सैनिक निवडले होते, ते दिसण्यांत चांगले गोरेगोमटे दिसत असत, पण शौर्याचा आणि धैर्याचा त्यांच्या अंगीं पूर्ण अभाव होता. त्यांनीं आपलें आयुष्य अनेक प्रकारचीं नीच कृत्यें करण्यामध्यें घालविलें असल्यामुळें विक्रमसेनाला आपला घातकी बेत साध्य करण्यास ते फार चांगले साथीदार होते. त्यांचीं नावें 'करट' आणि 'बलिपुष्ट' अशीं होतीं. या दोघांशिवाय 'कलविंक' या नांवाचा [illegible] एक विश्वासु अनुयायी होता. हा तिसरा माणूस राजवाड्यांत राहत नसे. तो इतर सैनिकांमध्येंच राहत असल्यामुळें त्याला भेटण्यासाठीं म्हणून करट आणि बलिपुष्ट हे वारंवार राजवाड्यांतून बाहेर आणि बाहेरून आंत पुष्कळ खेपा घालीत असत. आपले इष्ट हेतु साध्य करण्यास ही गोष्ट विक्रमसेनाच्या पथ्यावर पडली होती. विक्रमसेनानें या कलविंकाला रोज रात्रीं आठ नऊ घटकांचे सुमारास आपल्या भेटीस येण्याची आज्ञा केली होती, त्याप्रमाणें तो दोन दिवस न चुकतां त्यास येऊन भेटला.

तिसरे दिवशीं सकाळींच विक्रमसेनानें दृढसंधाची भेट घेतली, आणि आपणास फार दिवस पाहुणचार घेत रहावें लागणार असा संभव असल्याचें त्यानें राजास सांगितलें. जामिनीची पाहणी करणारा अधिकारी अद्यापि आला नाहीं, याबद्दल त्यानें आश्चर्य प्रदर्शित केलें. तो अधिकारी आल्यावर आपणास फार दिवस लागणार नाहींत, असें जेव्हां त्यानें दृढसंधाला सांगितलें, त्यावेळीं दृढसंधानें मोठ्या आदरानें कोणत्याही प्रकारचा संकोच न धरण्याबद्दल त्यांची विनंति केली, आणि जितके दिवस तो तेथें राहणार असेल, तितके दिवस आपण त्याचा योग्य आदरसत्कार करूं अशी त्यानें त्याची खातरजमा केली.

त्याच दिवशीं सायंकाळीं पहाणी करणारा अधिकारी प्रतापपुरीं येऊन दाखल झाला. दृढसंधानें त्यालाही मोठ्या आदरानें आपल्या वाड्यांत उतरून घेतलें, आणि त्याची व आपल्या वसुली कारकुनाची गांठ घालून देऊन जमाबंदीसंबंधानें त्याला पाहिजे असलेली माहिती देण्याची आज्ञा केली. हा अधिकारी मोठा हुषार होता. विक्रमसेनानें इतर बाबतींत जरी पूर्णपणें कपटाचें वर्तन केलें होतें, तरी या बाबतींत त्यानें फारशी

लबाडी केलेली, म्हणती. निंबराजानें या माणसाला आज्ञापत्र देऊन सर्व बागलाणाची पहाणी करण्याचा अधिकार खरोखरच दिला होता, व त्याला लागेल ती मदत देण्याची विक्रमसेनाला आज्ञा केली होती. आपल्या मनांतील दुष्ट हेतु साध्य करून घेण्यासाठीं विक्रमसेनानें त्याचा उपयोग करून घेण्याचा बेत केला होता. या अधिकाऱ्यानें आपल्या बरोबर एक मलें थोरलें दफ्तर आणलें होतें. त्यांतील कागद आपल्यापुढें ठेवून एका कागदावर भराभर लिहावयास प्रारंभ केला. त्याचप्रमाणें जमीनमहसुलाचे बाबतींत त्यानें दृढसंधाला कित्येक प्रश्न केले, आणि राजानें दिलेलीं सर्व उत्तरें त्यानें लिहून घेतलीं. राज्याचा विस्तार, लोकसंख्या, गुरेंढोरें, वगैरेसंबंधानें आपणांस जरूर असलेली माहिती त्यानें राजास विचारली. दृढसंधानें बहुतेक माहिती तोंडानेंच अचूक सांगितली. दृढसंधाला जरी लिहितां वाचतां येत नव्हतें, तरी त्याला व्यवहारज्ञान उत्तम होतें, आणि त्याची बुद्धि तीव्र असल्यामुळें एकदोन वेळां कानावर आलेली माहिती तो कधीं विसरत नसे. अशा रीतीनें आपणांस पाहिजे होती ती सर्व माहिती गोळा केल्यावर या माहितीचा मेळ पाहण्यासाठीं राज्यांतील थोड्याबहुत भागांत स्वतः फिरून आपली खात्री करून घेण्याची अधिकाऱ्यानें इच्छा प्रदर्शित केली. ज्याप्रमाणें कागदी माहिती घेऊन झाल्यानंतर प्रत्यक्ष पहाणी करून ती माहिती बरोबर आहे कीं नाहीं हें स्वतः पाहणें हें त्या अधिकाऱ्याचें कर्तव्य होतें, त्याचप्रमाणें त्या अधिकाऱ्याबरोबर स्वतां फिरून त्यानें मिळविलेली माहिती खरी आहे, अशी आपली खात्री करून घेणें हें विक्रमसेनाचें कर्तव्य होतें. अशा प्रकारची स्वतंत्र पाहणी ज्या संस्थानांत होत असेल, तेथील संस्थानिकानें किंवा त्याच्या एकाद्या नोकरानें पहाणी करणाऱ्या अधिकाऱ्याबरोबर हजर राहूं नये, अशी निंबराजाच्या आज्ञापत्रांत स्पष्ट आज्ञा होती. अशी आज्ञा असण्याचें कारण हें कीं, तो अधिकारी ज्या वेळीं प्रजेवरील कर योग्य आहेत कीं अयोग्य आहेत, याची तपासणी करीत असेल, त्यावेळीं प्रजेला त्या अधिकाऱ्यापाशीं मन मोकळें करून बोलतां यावें. निंबराजाची ही आज्ञा मोठ्या चतुराईची असल्यामुळें दृढसंधाला त्या दोघांना आपल्या राज्यांत वाटेल तिकडे फिरण्याची मोकळीक देणें जरूर झालें होतें.

वास्तविक पाहिलें, तर दृढसंधाच्या राज्याची तपासणी करण्याचा त्या दोघांचाही इरादा नसून फक्त आपणांस कोठें तरी एकान्तीं बोलत बसावयास मिळावें, अशी त्यांची इच्छा होती. विक्रमसेन केवळ दृढसंधाला विश्वास दाखवून बेसावध ठेवण्यासाठीं थोड्याशा लोकांनिशीं पुढें आला होता. आपला पुढील बेत योग्य रीतीनें सिद्धीस जाण्यासाठीं प्रतापपुरांतून बाहेर व बाहेरून आंत निरनिराळ्या वेळीं बातमी पोंचणें इष्ट असल्यामुळें हा पहाणीचा अधिकारी दोन दिवस मागाहून प्रतापपुरीं आला होता. राजाची परवानगी घेऊन ते दोघे घोड्यांवर स्वार होऊन प्रतापपुरच्या वेशींतून बाहेर पडले. वेशीबाहेर जिकडे तिकडे भिल्ल लोकांच्या झोंपड्या दिसत होत्या. त्या उमयतांनीं एकाद्या झोंपडीपाशीं उभें रहावें, तेथील भिल्लांस कांहीं प्रश्न विचारावे, आपल्याजवळचे कागद काढून त्यांशीं मेळ पाहावा, असें करीत ते पुढें चालले होते.

शेवटीं ते पिशाच सोपान घाटाच्या पायथ्यापाशीं येऊन पोंचले. या ठिकाणीं झोंपडीं अगदीं तुरळक होतीं. त्या घाटांत आल्यावर जेथून आपलें भाषण कोणाच्या कानीं पडणार नाहीं अशी त्यांच्या मनाची पक्की खात्री होती, अशा जागीं बसून त्यांनीं बोलावयास प्रारंभ केला. प्रथम विक्रमसेन म्हणाला,-' हें नाटक आतां पुरें झालें. आपण सध्यां जें

महत्त्वाचें काम हातीं घेतलें आहे, त्यासंबंधानें बोलूं या. मला आधीं नारायणपुरची बातमी समजली पाहिजे !'

तो अधिकारी बोलला,–'आपली बहीण दमयंती कालच नारायणपुरीं येऊन पोंचली.'

विक्रमसेनानें विचारलें,–'आणखी तो दुसरा मनुष्य–दुर्मुख ?'

अधिकारी म्हणाला,–'तोही त्यांच्याच बरोबर आला आहे. त्याला भृगुकच्छ नगरांतून शोधून काढतांना त्यांना फारच प्रयास करावे लागले.'

विक्रमसेन बोलला,–'तसें असेल कदाचित्, पण तो तेथें आहे हें मला पक्कें माहीत होतें. दृढसंधानें त्याला येथून हांकून लावल्यावर तो एकदम तेथेंच गेला. तेथें तीन चार वेळां माझी आणि त्याची भेट झाली होती. तो त्यावेळीं पैशासंबंधानें मोठ्या अडचणींत सांपडला होता. तसेंच तेथें दमयंतीची आणि त्याची एकदोनदां भेट झाली होती.'

तो अधिकारी बोलला,–'यावेळीं बुद्धा तो अगदीं दीनावस्थेमध्यें होता. त्यानें पूर्वी एका सावकाराकडे कारकुनी पत्करिली होती, पण तेथें पैशाची अफरातफर केल्यामुळें सरकारांतून त्याला कैदेची शिक्षा झाली होती. पण परवां झालेल्या राज्यारोहणप्रसंगीं त्याची मुक्तता झाली.'

विक्रमसेन बोलला,–'तो महा नीच मनुष्य आहे, हें मी जाणून आहें. तो याप्रसंगीं तरी इमानास जागला म्हणजे पुरे ! दमयंतीनें त्याच्यासंबंधानें आपली नीट खात्री करून घेतली आहे ना ?'

अधिकारी बोलला,–'असल्या माणसावर वाजवीपेक्षां ज्यास्त विश्वास टाकणें बरें नाहीं हें खरें, पण असलीं माणसें बऱ्याच्या आशेनें काय हवें तें करण्यास सिद्ध होतात. याप्रसंगीं तो इमानें इतबारें आपलें काम करील असें मानावयास मला हरकत दिसत नाहीं.'

विक्रमसेनानें विचारलें,–'बृहद्रथाकडील काय वर्तमान आहे ?'

त्यानें उत्तर केलें,–'तेही कालच नारायणपुरीं येऊन पोंचले.'

विक्रमसेन बोलला,–'हें ठीक झालें. घरें सैन्याची तयारी झाली ना ?'

तो म्हणाला,–'झाली. सुमारें पांचशें लोक नारायणपुरच्या हद्दीवर दबा धरून बसले आहेत. सूचना मिळाल्यापासून दोन घटकांच्या आंत ते दरीच्या वेशीजवळच्या दरवाज्यापाशीं येऊन दाखल होतील.'

विक्रमसेन बोलला,–'येथपर्यंतचा सर्व बेत तर अगदीं बरोबर जमला ! आजची रात्र येथें राहणें तुम्हांस जरूरच आहे. उद्यां तिसरे प्रहरीं तुम्ही येथून निघालां तर संध्याकाळपर्यंत तुम्ही नारायणपुरीं सहज पोंचाल !'

अधिकारी बोलला,–'होय; तेथपर्यंतचा रस्ता माझ्या पूर्ण लक्ष्यांत आहे.'

विक्रमसेन बोलला,–'ठीक आहे. उद्यां सायंकाळपर्यंत तुम्ही नारायणपुरीं जाऊन पोंचणें हें फार अगत्याचें आहे. आपल्या मनांतील बेत उद्यांच्या उद्यां तडीस नेणें जरूर आहे. आतां अधिक दिवसगत लावल्यास सगळेंच फसेल ! तो दुर्मुख सध्यां नारायणपुरीं आला आहे, असें वर्तमान जर येथें समजलें, तर मोठा घोटाळा उडेल. तसेंच निंबराजाकडूनही मनाईहुकूम सुटण्याचा संभव नाहीं, असें नाहीं. मीं आज तीन दिवस येथें किती सावधपणानें घालवीत आहें हें माझें मला ठाऊक ! मी ज्या हेतूनें येथें आलों, तो हेतु पूर्णपणें साध्य झाला असें समजावयास आतां हरकत दिसत नाहीं. मी पाहणी करण्याच्या हेतूनेंच येथें आलों आहें, अशी आतां येथून तेथून झाडून साऱ्या लोकांची खात्री पटली आहे. आतां माझ्या आगमनासंबंधानें कोणाच्या मनांत शंका असेल, असें मानण्याचें कारण नाहीं. आज आपलें भोजणीसंबंधाचें मुख्य

काम आटोपलें. मी कांहीं तरी सबबीवर उद्यांची रात्र येथें काढीन. परवांचे दिवशीं मला येथें राहण्याचें वास्तविक कारण दाखवितां येणार नाहीं. यासाठीं आपण आपला हेतु उद्यां रात्रींच पार पाडिला पाहिजे.

अधिकारी बोलला,–' आपले हेतु केव्हां साध्य करून घ्यावे हें पाहणें तुमचें काम आहे. परंतु मला बृहद्रथ महाराजांचा एक निरोप अजून आपणांस कळवावयाचा आहे.'

विक्रमसेनानें विचारिलें,–' तो कोणता ?'

अधिकारी बोलला,–' एकंदर सहाशें सैन्य तुमचा बेत सिद्धीस जावयास पुरे आहेना, इतकेंच त्यांनीं मला मुद्दाम विचारावयास सांगितलें आहे. '

विक्रमसेन म्हणाला,–' त्यांस अशी शंका कां यावी, हें मला समजत नाहीं. वास्तविक पाहिलें; तर आपला हेतु साध्य होण्यास इतक्या लोकांचीसुद्धां गरज नाहीं. परंतु आपणांस फक्त परत जातांना मार्ग मोकळा पाहिजे, म्हणून एवढी तयारी ठेवावयाची ! हें कृत्य ऐन मध्यरात्रीं सर्व लोक गाढ निद्रेत वश असतां करावयाचें आहे. आमचें काम उरकण्यास पुरती एक घटकासुद्धां लागावयाची नाहीं !'

अधिकाऱ्यानें विचारलें,–' आणखी एक राहिलें. त्या दुर्मुखानें इकडे केव्हां यावयाचें ! वेळ नेमकी असली पाहिजे !'

विक्रमसेन म्हणाला,–' तेंही मी सांगणारच होतों. हें कृत्य बरोबर मध्यरात्रीं करावयाचें असल्यामुळें त्यानें मध्यरात्रीपूर्वी थोडा वेळ राजवाड्याच्या जवळ येऊन दाखल झालें पाहिजे. माझ्या खुणेबरोबर–'

अधिकारी बोलला,–' ती खूण समजलेली असली म्हणजे बरें.'

विक्रमसेनानें सांगितलें,–' मी सांगतों, तें नीट ध्यानांत घ्या. मला सध्यां दृढसंधानें त्या दिवाणखान्यांत रहावयास जागा दिली आहे, तो दिवाणखाना–सोनानदीकडे तोंड करून उभें राहिलें असतां–वाड्याच्या उजव्या मागांत दुसऱ्या मजल्यावर आहे. त्या दिवाणखान्याला एकंदर तीन खिडक्या आहेत. त्यांपैकीं एक खिडकी मी अर्धवट उघडी ठेवीन. मी त्या खिडकीसमोर एक दिवा लावून ठेवीन. राजवाड्यांतील सर्व माणसें आपापल्या जागीं निजावयास गेलीं, म्हणजे मी प्रथम तो दिवा मालवून टाकीन आणि सुमारें बारा घटका रात्रीचे सुमारास पुनः लावीन. त्या बाजूला आणखी एक दोन दिवाणखाने आहेत, त्या दिवाणखान्यांत जर कोणी मध्येंच दिवा लावला, तर तो पाहून कदाचित् दुर्मुखाची चूक होण्याचा संभव आहे, म्हणून मी काय सांगतों, इकडे लक्ष्य असूं द्या. मीं दिवा लाविला, म्हणजे त्या दिव्यासमोर इकडून तिकडे येरझाऱ्या घालीत राहीन, म्हणजे तो दिवा त्याला आळींपाळीनें एकदां दिसेल आणि एकदां दिसेनासा होईल. ही खूण दृष्टीस पडली म्हणजे त्यानें आपल्याबरोबरचे लोक घेऊन मोठ्या त्वरेनें आणि होतां होईल तितक्या गुप्तपणानें राजवाड्याकडे यावें. मीं काय सांगितलें तें आपल्या ध्यानीं आलें ना ? '

अधिकारी बोलला,–'माझी अगदीं सोळाआणे समजूत पडली !'

इतकें संभाषण झाल्यावर ते दोघे राजवाड्याकडे आले. त्या दोघां लबाडांनीं आपलें सर्व कृष्णकारस्थान इतक्या शितापीनें चालविलें होतें कीं, त्यांच्या मनांत एकादा दुष्ट हेतु असेल, अशी शंका कोणासही आली नाहीं. चूडामणि स्वतः कृष्णकारस्थानांत प्रवीण होता, तरी तो देखील या प्रसंगीं साफ फसला. मोजणीदार आपल्या कामांत निपुण असल्यामुळें झालेला प्रकार अगदीं स्वाभाविक आहे, असेंच त्यास वाटलें.

प्रकरण ५३ वें.

कृष्णकारस्थान-कत्तल.

दुसरे दिवशीं दोनप्रहर उलटल्यावर पहाणी करणारा अधिकारी आपलें काम संपवून परत गेला; परंतु नवीन कर वाढवायाचे कीं कमी करावयाचें हें ठराविण्याचें काम विक्रमसेनानें आपल्यावर घेतलें असल्यामुळें तें काम त्या सगळ्या दिवसांत संपवून दुसऱ्या दिवशीं सकाळींच आपण परत जाणार, असें त्यानें दृढसंधाला सांगितलें. ही सबब योग्य असल्यामुळें पहाणी करणारा अधिकारी निघून गेल्यावरही विक्रमसेन तेथें राहिला, याचें कोणास आश्चर्य वाटलें नाहीं. विक्रमसेन आणि दृढसंध हे दोघे दोन प्रहरपासून नवीन प्रतबंदीसंबंधानें चर्चा करीत बसले होते. दृढसंधराजाच्या कारकीर्दीत प्रतापपुरच्या राज्याचें उत्पन्न वाढलेलें स्पष्ट दिसत असल्यामुळें, सार्वभौमाला देण्याची खंडणी त्या मानानें अधिक ठरणें हें अपरिहार्य होतें. पण खंडणी किती वाढवावी, हें ठरतांना पुष्कळच वादविवाद झाला. या वेळीं विक्रमसेनानें मोठें तारीफ करण्यासारखें वर्तन केलें होतें. यावेळच्या त्याच्या वर्तनावरून दृढसंधाच्या मनांत त्याच्याविषयीं अनुकूल ग्रह उत्पन्न झाला होता. दिवे लावण्याची वेळ होऊन गेली, तरी त्यांचा वादविवाद चाललाच होता. पुढें भोजनाची वेळ झाली, त्यावेळीं विक्रमसेनानें आपला पक्ष थोडा नमता घेऊन तडजोडीनें खंडणीची रक्कम थोडीशी वाढविली, आणि काम संपवून भोजनें उरकून घेतलीं. भोजनोत्तर सबंध दिवसाच्या कामाच्या त्रासामुळें आपलें मस्तक दुखत आहे, असें निमित्त करून विक्रमसेन निजावयाच्या निमिषानें आपल्या दिवाणखान्यांत निघून गेला. जातेवेळीं त्यानें दृढसंधाची आणि शेखराची तारीफ केली, आणि अशा प्रकारच्या सज्जन, शूर व विचारी पुरुषांशीं केवल पिढीजाद वैर असल्यामुळें आपणही पुढें तें वैर तसेंच चालवावें, हें मूर्खपणाचें आहे, असें त्यानें उघड बोलून दाखविलें; आणि गेल्या चार दिवसांत आपण जो आदरातिथ्याचा अनुभव घेतला, तो आम्ही कधींही विसरणार नाहीं, असें सांगून त्यानें दृढसंधाची मोठ्या प्रेमानें रजा घेतली होती.

तो आपल्या दिवाणखान्यांत जाऊन पोंचल्यानंतर रोजच्यारोज सैनिकांची वर्दी देणारा कलविंक त्याला भेटण्यासाठीं नित्याप्रमाणें तेथें आला. यापूर्वी हा मनुष्य जेव्हां रात्रीची वर्दी देण्यास येत असे, तेव्हां त्याला जें काय सांगावयाचें असे, तें विक्रमसेन दृढसंधादेखत सांगत असे. पण आज त्याला जें कांहीं सांगावयाचें होतें, तें अत्यंत गुप्त असल्यामुळें विक्रमसेनानें मुद्दाम कपाळ दुखत असल्याचें ढोंग केलें होतें. कलविंक विक्रमसेनासमोर आल्यावर मोठ्या नम्रतेनें प्रणाम करून आज्ञेची वाट पाहत उभा राहिला असतां त्यावेळच्या विक्रमसेनाच्या मुद्रेवरून त्याच्या मनांत कांहीं विशेष गोष्ट घोळत आहे, असें कलविंकाच्या एकदम ध्यानीं आलें.

त्याच्याकडे तीक्ष्ण दृष्टीनें पाहत विक्रमसेनानें त्यास प्रश्न केला,–'कलविंका, तूं राजाधिराज निंबमहाराजांचा एकनिष्ठ सेवक आहेस, हें खरें कीं नाहीं?'

अत्यंत आश्चर्ययुक्त मुद्रेनें कलविंकानें उत्तर केलें,–'मीं आजपर्यंत राजाधिराजांच्या सैन्यामध्यें जी नोकरी केली आहे, तीच माझ्या इमानाची साक्षी देण्यास पुरे आहे.'

विक्रमसेन बोलला,–'होय; तुझ्या आजपर्यंतच्या वर्तनावरून तूं मोठा हुषार, प्रामाणिक आणि सावधपणानें आपलें काम करणारा आहेस, असें म्हणावयास हरकत नाहीं. आपण मोठ्या नांवलौकिकास चढावें,

व चार पैसे आपल्या गांठीं पडावे,अशी तुझी उमेद असेलच !'

कलविंक उत्साहानें बोलला,–'आपली हुषारी दाखविण्याची योग्य संधि येऊं द्या, कीं माझ्या अंगीं काय कर्तबगारी आहे, हें आपल्या नजरेस पडेल. आपण कसलीही बिकट कामगिरी मला सांगा, मी ती मोठ्या शिताफीनें पार पाडीन !'

समाधानयुक्त नजरेनें विक्रमसेन बोलला,–'हा तुझा उत्साह पाहून मला फार आनंद होत आहे. तुझा फायदा होण्याचा प्रसंग आला, तर तूं कोणतीही कामगिरी बजाविण्यास अनमान करणार नाहींस, हें ऐकून मला फार समाधान वाटत आहे.'

हें त्याचें भाषण ऐकून त्याच्या मनांत कांहीं तरी विचाराची गोष्ट घोळत असावी, ही कलविंकाची कल्पना दृढ झाली. तो म्हणाला,–'होय; मी राजाधिराजांची कोणतीही कामगिरी करण्यास सिद्ध आहें !'

त्याच्याकडे तीक्ष्ण दृष्टीनें पाहत विक्रमसेन म्हणाला,–'आज रात्रीं मला राजाधिराजांची एक फार महत्त्वाची कामगिरी बजावावयाची आहे.' नंतर आपला स्वर बदलून तो अगदीं हलक्या स्वरानें बोलला,–'दृढसंधराजा राजद्रोही आहे, अशी राजाधिराजांच्या मनाची खात्री झाली असल्यामुळें त्याचा निःपात करणें जरूर झालें आहे.'

आपणाला आतां एकादी महत्त्वाची गोष्ट समजणार अशी कलविंकाची कल्पना होती, परंतु ती गोष्ट इतकी विलक्षण असेल असें त्याच्या ध्यानीं-मनीं देखील नव्हतें ! अर्थात् ही भयंकर गोष्ट ऐकून त्याला मोठें आश्चर्य वाटलें, व तो विक्रमसेनाकडे टकमका पाहूं लागला. आपलें भाषण ऐकून तें खरें आहे कीं खोटें आहे, अशी शंका त्याच्या मनांत उद्भवली आहे, असें विक्रमसेनाच्या ध्यानीं आलें. विक्रमसेनानें यावेळीं अत्यंत गंभीर मुद्रा धारण केली असल्यामुळें तो हें मनापासून बोलत आहे, केवळ आपलें मन पाहण्यासाठीं कांहीं तरी बोलत नाहीं, अशी कलविंकाच्या मनाची खात्री झाली.

आपल्या भाषणांतील एक शब्द कोणाच्या कानीं पडला तर मोठा घात होईल, यासाठीं अगदीं अतिशय बारीक स्वरानें आणि इकडे तिकडे बारकाईनें पाहत विक्रमसेन बोलला,–'होय ! मी सांगतों तें अगदीं खरें आहे. दृढसंध आणि त्याचा परिवार या सर्वांस एकदम देहांतशिक्षा करण्याची महाराजांची मला आज्ञा झाली आहे, आणि हें कृत्य आजच्या आज उरकून घ्यावयाचें असा मीं बेत केला आहे ! मीं दिलेल्या खुणेबरोबर सर्व लोकांनीं तयार होऊन एकदम या वाड्यांत घुसावें, अशी तजवीज करणें हें तुझें काम आहे. करट आणि बलिपुष्ट ह्या दोघांना ही राजाज्ञा माहीत आहे. अगदीं योग्य वेळ येईपर्यंत हा बेत गुप्त राखणें अगत्याचें असल्यामुळें, आपण या दरींत कोणत्या उद्देशानें आलों, हें मीं कोणाला कळूं दिलें नव्हतें. करट आणि बलिपुष्ट या दोघांस मीं आजच आपला हेतु कळविला. ते दोघे माझ्या खास तैनातीस असल्यामुळें सैन्याला वर्दी देण्याचें काम त्यांच्याकडे सोंपविल्यास त्यासंबंधानें राजवाड्यांतील लोकांच्या मनांत संशय उत्पन्न होण्याचा संभव आहे. म्हणून हें काम मी मुद्दाम तुजकडे देत आहें. हें काम तूं इमानानें पार पाडलेंस, म्हणजे त्यापासून तुझा फार फायदा होईल !'

हें ऐकून कलविंक म्हणाला,–'ज्या अर्थीं मी आपल्या हाताखालीं नोकरी करीत आहें, त्या अर्थीं आपण कराल ती आज्ञा पाळणें हें माझें कर्तव्य आहे, असें मी समजतों. परंतु आतां आपण मला जी आज्ञा करीत आहां ती मोठी चमत्कारिक दिसते–'

किंचित् स्मित करून विक्रमसेन बोलला,–'तुझ्या मनांत कोणती शंका आली आहे, हें मी जाणून आहें. तुझ्या या

शंकेचें निवारण करावयास मला उशीर लागावयाचा नाहीं.' असें बोलून त्यानें आपल्याबरोबर आणलेली एक लहानशी पेटी उघडली, आणि त्या पेटींतून एक कागद बाहेर काढून तो त्यानें कलविंकाच्या हातामध्यें दिला; नंतर तो म्हणाला,–' तुला या आज्ञापत्रांतील मजकूर वाचण्याइतकें ज्ञान आहे, हें एका अर्थीं बरें आहे ! यांतील मजकूर वाच आणि आपल्या मनाची खात्री करून घे !'

कलविंकानें तें आज्ञापत्र आपल्या हातीं घेतलें, आणि दिव्याजवळ जाऊन तें वाचण्यास प्रारंभ केला. तें सर्व वाचून झाल्यावर तो गंभीरपणें बोलला,–' हें कर्म अघोर आहे, यांत शंका नाहीं ! तथापि ज्या अर्थीं राजाधिराजांची तशी आज्ञा आहे, त्या अर्थीं तें करणें भाग आहे !'

विक्रमसेन बोलला,–' इतकेंच नव्हे, तर आम्ही राजाज्ञेप्रमाणें वर्तन केलें नाहीं, तर आम्हांसही राजाधिराज अशीच शिक्षा करतील. हें कृत्य कसें उरकावयाचें याचा बेत मीं आपल्या मनांत योजून ठेविला आहे, तो सर्व तुला सांगतों. त्याचप्रमाणें मी तुम्हाला आयत्या वेळीं जी खूण देणार आहें, तीही तुला सांगून ठेवितों.'

असें बोलून त्यानें पुनः आपली पेटी उघडली आणि तींतून एक सुमारें नारळाएवढा गोळा बाहेर काढला, आणि तो कलविंकास म्हणाला,–'हा पहा! हा बाराच्या दारूचा एक फटाका आहे. हा पेटविला म्हणजे याचा मोठा थोरला आवाज होईल, आणि तो निदान अर्धकोस तरी ऐकूं जाईलच. आपल्या लोकांची छावणी येथून पावकोसावर दूर नाहीं. हा आवाज ऐकूं येतांच सर्वांनीं आपापल्या शस्त्रास्त्रांसह सिद्ध होऊन धांवत राजवाड्याकडे यावें. आज राजवाड्यांत सुमारें पन्नास माणसें असतील नसतील. या फटाक्याचा आवाज ऐकूं आल्याबरोबर तीं माणसें जागीं होतील आणि आवाज कसला झाला याचा शोध करूं लागतील. तीं त्या धांदलींत आहेत, इतक्यांत तुम्ही सर्वांनीं राजवाड्यांत घुसून कत्तल करण्यास प्रारंभ करावा. तुम्ही वाड्यांत शिराल त्याच वेळीं मी तुम्हांस भेटेन. भिण्याचें कारण नाहीं. मीं आणखी पांचशें सैन्य मागाविलें आहे, व तें आणखी दोन घटकांच्या आंत येथें येऊन दाखल होईल. आणखी एक गोष्ट तुम्हांस आतांच केली पाहिजे. येथून अर्ध कोशावर दरींतून आंत शिरण्याच्या मार्गावर दोन पहारेकरी असतात, त्यांचा प्राण घेऊन तेथील दरवाजा मोकळा करणें हें फार जरूरीचें काम आहे. तुम्ही पांचसहा हत्यारबंद माणसें ताबडतोब तिकडे पाठवून द्या. त्या माणसांनीं आपण कांहीं जरूरीच्या कामासाठीं नारायणपुरीं जात आहों, असें त्या पहारेकऱ्यांस सांगावें, म्हणजे ते अधिक चौकशी करूं लागतील. ते तुमच्याशीं बोलूं लागले कीं तुम्हीं त्यांचा बेलाशक प्राण घेऊन तेथील दरवाजा उघडावा ! तेथें एक तोफ आहे, त्या तोफेस त्यांनीं बत्ती देण्यापूर्वी तुम्हीं त्यांचा प्राण घेतला पाहिजे, हें ध्यानांत ठेवा. याप्रसंगीं केवळ राजाज्ञेकडे लक्ष्य ठेवून तुम्ही आपल्या मनांतील दयामाया पार विसरून गेलें पाहिजे ! हें काम आज्ञेप्रमाणें पार पडलें, म्हणजे तुम्हां सर्वांना मोठा फायदा होईल !'

कलविंक निघून गेल्यावर विक्रमसेनानें आपल्या दिवाणखान्यांतील दिवा मालवून टाकला. दिवा पुनः लावण्याचीं साधनें त्याजपाशीं तयारच होतीं. नंतर तो आपल्या बिछान्यावर जाऊन पडला. परंतु आपणास कदाचित् झोंप आली तर आपला सगळा बेत फसेल, अशी शंका त्याच्या मनांत आली; पण त्याला अशा प्रसंगीं झोंप येणें शक्य तरी होतें काय ? सूड उगविण्याचे जे घोर विचार त्याच्या मनांत घोळत होते, तेच त्याच्या झोंपेचा नाश करण्यास पुरे होते !

माणसी एक घटका लोटली, आणि राजवाड्यांतील सर्व माणसें विश्रांति घेण्यासाठीं आपापल्या दिवाणखान्यांत गेलीं.

शेखरही आपल्या दिवाणखान्यांत जाऊन आपल्या बिछान्यावर पडला. तो आतां तेथील दिवा मालविणार होता, इतक्यांत त्याच्या दिवाणखान्याच्या दरवाज्यावर कोणीं धक्की मारलेली त्याला ऐकूं आली, म्हणून तो उठला, आणि त्यानें दरवाजा उघडिला. तोंच आपला सेवक चतुरक त्याच्या दृष्टीस पडला. त्याला शेखर म्हणाला,–'चतुरका, कां आला होतास ?'

चतुरकानें उत्तर केलें,–'आपल्या झोपेमध्यें व्यत्यय आणावा लागला, याचें मला फार वाईट वाटतें. परंतु आतांच माणिभद्राची कन्या येथें येऊन पोंचली, तिला कांहीं महत्त्वाच्या बाबतींत आतांच्या आतां आपली भेट घ्यावयाची आहे.'

प्रियंवदा आपल्या पुत्रासह त्या दिवाणखान्यास लागून असलेल्या दुसऱ्या दिवाणखान्यांत होती. चतुरकाचें भाषण कानीं पडतांच ती आपल्या पतीपाशीं आली, आणि म्हणाली,–'ती जर इतक्या जरूरीनें आपली भेट घ्यावयाची असें म्हणते, तर आपण तिची भेट घेणें अगत्याचें आहे.'

चतुरक म्हणाला,–'आतां रात्र बरीच झाली असल्यामुळें उद्यां प्रातःकाळीं आपली भेट होईल असें मीं तिला सांगितलें, पण तिचें काम अत्यंत महत्त्वाचें असल्यामुळें आपली भेट आतांच घेण्याचा तिचा निश्चय झालेला आहे.'

प्रियंवदा बोलली,–'असें आहे, तर तिला इकडे घेऊन ये.'

दहा पांच पळें लोटण्यापूर्वीच मथुरा त्यांच्यापुढें येऊन उभी राहिली. तिच्या अंगावरील वस्त्रें धुळीनें भरून अगदीं खराब झालीं होतीं, आणि ती फारच थकल्यासारखी दिसत होती. ती पायींच येथें आली होती, आणि दरींतून येतांना वाटेंत काळोख असल्यामुळें तिच्या पायांस ठेंचा लागलेल्या असून त्यांतून रक्त गळत होतें ! तिची मुद्रा या प्रसंगीं अगदीं मेदरून गेल्यासारखी दिसत होती. तिला अशा स्थितीमध्यें पाहून त्या दंपत्याला मोठें आश्चर्य वाटलें. तिचे हातपाय थरथर कांपत असून ती वेडयासारखी त्यांच्याकडे पाहत होती. तिच्या या स्थितीवरून सध्यां तिच्यावर एकादें संकट आलें आहे, कीं आपल्यावर एकादें संकट आल्यामुळें ती त्यासंबंधानें आपणांस सावध करण्यासाठीं येथें आली आहे, याचा शेखरास उमज पडेना.

नंतर प्रियंवदा तिला म्हणाली,–'मथुरे, ही तुझी स्थिति पाहून माझ्या अंतःकरणांत भीति उत्पन्न झाली आहे; तूं ज्या अर्थीं इतक्या घाईघाईनें अंधारांतून ठेंचा खात अशा अपरात्रीं येथें येऊन पोंचली आहेस, त्या अर्थीं तुझें तसेंच कांहीं तरी महत्त्वाचें काम असलें पाहिजे !'

मथुरा अडखळत बोलली,–'ताईसाहेब, मी मोठ्या जलदीनें वल्लभीनगरींतून रात्रीचा दिवस करून धंडीवाऱ्याला न जुमानतां केवळ आपल्या भेटीसाठीं येथें आलें आहे. मी आज दोनप्रहरीं शिवालयांत येऊन पोंचलें. तेथें फक्त जेवण करून मी लागलीच पायीं चालत येथें आलें. आपल्यासाठीं मला आणखी जरी त्रास पडता, तरी मी मोठ्या आनंदानें सहन केला असता !'

प्रियंवदा बोलली,–'हें तुझें आमच्यावरचें प्रेम पाहून मला फार आनंद वाटत आहे. पण तूं इतक्या जलदीनें कां आलीस याचें कारण कळलें नाहीं !'

मथुरा बोलली,–'ताईसाहेब, आपल्या राजघराण्यावर मोठें संकट गुजरणार आहे ! आपल्यावर काय संकट येणार हें कांहीं माझ्या पतींनीं मला सांगितलें नाहीं, परंतु आपल्या शत्रूंचीं राजदरबारांत आपल्या नाशासाठीं कारस्थानें चाललीं आहेत !–'

'शत्रूंचीं कारस्थानें' हे शब्द कानीं पडतांच शेखर आणि प्रियंवदा हीं आपल्या मनांत चरकलीं, आणि त्यांनीं भयचकित दृष्टीनें परस्परांकडे अवलोकन केलें. विक्रमसेनासंबंधानें त्या उभयतांच्या मनांत एकदम शंका उत्पन्न झाली!

मथुरा म्हणाली,–'आपल्या शत्रूंचीं भयंकर कारस्थानें चालली आहेत, यांत तिळभरसुद्धां शंका नाहीं! हीं कारस्थानें फार भयंकर असल्यामुळें माझ्या पतींनीं एका क्षणाचाही विलंब न करतां आपणांस सावध करण्यासाठीं मला इकडे पाठवून दिलें आहे. आपल्यावर कोणतें संकट गुदरणार हें कदाचित् त्यांस माहीत असेल, परंतु त्यांनीं मला कांहीं विशेष सांगितलें नाहीं, पण आपल्या शत्रूंनीं निंबराजाकडून कांहीं आज्ञापत्रें संपादन केलीं आहेत. कांहीं राजकारणांसाठीं माझे पति चंपावती येथें गेले असतां आपल्या शत्रूंनीं आपला कावा साधिला आहे. या संकटाचा परिहार करण्यासाठीं त्यांचे शक्य ते प्रयत्न चालले आहेत, त्या प्रयत्नांस यश येण्यापूर्वीच जर शत्रूंनीं आपला कावा साधिला, तर अनर्थ होईल, म्हणून त्यांनीं आपणांस सावध करण्यासाठीं मला मोठ्या तांतडीनें इकडे पाठविलें आहे!'

शेखर थोडा वेळ विचार करून बोलला,–'ज्या अर्थीं सत्यरथानें इतर कोणाला इकडे न पाठवितां तुला स्वतःला पाठविलें आहे, त्या अर्थीं आमच्या शत्रूचें कांहीं तरी भयंकर कारस्थान त्याला उमगलें असावें, यांत कांहीं शंका नाहीं!'

मथुरा विलक्षण मुद्रा करीत म्हणाली,–'महाराज, सावध व्हा; आणि नीट विचार करून शत्रूचें काय कारस्थान चालू आहे याचा पत्ता काढा! प्रसंग मोठा बिकट आहे. चालू घटकेचा देखील भरंवसा नाहीं. कारण मी येथें येऊन पोंचण्यापूर्वीसुद्धां कदाचित् आपण आपल्या शत्रूच्या कारस्थानांस बळी पडलां असाल, अशी शंका माझ्या मनांत एकसारखी येत होती. कारण मी येथें येऊन आपणांस सावध करीपर्यंत आपल्यावर संकट येऊन आपला घात झाला नसेल, असाही माझ्या पतीस भरंवसा नव्हता,–'

शेखर बोलला,–'तुझ्या भाषणांत पुष्कळ तथ्यांश आहे, यांत शंका नाहीं. कारण आमचा पिढीजाद हाडवैरी विक्रमसेन सध्यां मोठ्या मित्रत्वानेंच या वाड्यांत रहात आहे–'

मथुरा भीतीनें थरथर कांपत म्हणाली,–'काय! तो नीच विक्रमसेन सध्यां येथें आहे! हें जर मला अगोदर समजतें, तर मीं आपल्या घरीं जेवणासाठीं वेळ मोडला, तोही मोडिला नसता! माझ्या बाबांनीं हें मला कसें सांगितलें नाहीं! किंवा ही गोष्ट अद्यापि त्यांच्या कानांवर गेली नसेल; नाहीं तर निंबराजाच्या सैन्याची एक हुमारें दोनशें लोकांची टोळी प्रतापपुरच्या पश्चिमदिशेकडे निघून गेली, हें वर्तमान त्यानें मला सांगितलें, तेव्हांच–'

शेखरानें मोठ्या आश्चर्यानें विचारलें,–'काय म्हणतेस! निंबराजाच्या सैन्यांतील आणखी दोनशें लोक या दरीच्या पश्चिमेकडे गेले आहेत! तर मग आमच्या शत्रूंचीं कांहीं तरी कारस्थानें चालली आहेत, यांत शंकाच नाहीं. इतका वेळपर्यंत फाजील विश्वास ठेवून मी आंधळा झालों होतों, पण आतां माझे डोळे चांगले उघडले आहेत! तथापि अजूनसुद्धां एकादी गोष्ट एकदम करणें हें फार धोक्याचें आहे. जर का विक्रमसेन लबाडीनें येथें आला आहे, असा आमच्या भिल्लांच्या मनांत नुसता संशय आला, तरी ते विक्रमसेनाचा आणि त्याच्या शिपायांचा प्राण घेण्यास कमी करणार नाहींत. आतां येथें बसून उपयोग नाहीं. आजची रात्र निभावली म्हणजे झालें! कारण विक्रमसेन उद्यां येथून जाणार आहे. जर त्याच्या मनांत कपट असलें, तर

तो आज रात्रींच आमचा घात करील! मी स्वतः बाहेर जाऊन सर्व बंदोबस्त नीट आहे कीं नाहीं, तें आपल्या डोळ्यांनीं पाहून येतों. त्याप्रमाणेंच पांच चार हुषार माणसें पाठवून आमच्या सैनिकांपैकीं प्रमुखांस सावध राहण्याची सूचना देतों.' नंतर तो प्रियवंदेला बोलला,–'आतां मी जातों, या तुझ्या मैत्रिणीची योग्य बरदास्त ठेव. मी लवकरच परत येईन.'

तिनें होय, असें सांगितल्यावर शेखर एकदम आपल्या दिवाणखान्यांतून बाहेर पडून तेथील जिना उतरून खालीं गेला. आपला पति जवळ होता, तोंपर्यंत प्रियंवदेला फारशी भीति वाटली नव्हती. पण तो गेल्याबरोबर अकल्पित भीतीनें तिचें हृदय धडधडूं लागलें. तथापि तिनें आपल्या पतीला मागें बोलाविलें नाहीं.

शेखर तळमजल्यावर आला, आणि त्यानें चतुरकाला आपल्या बरोबर येण्याची आज्ञा केली. चतुरक तत्काल आपल्या धन्याबरोबर राजवाड्यांतुन बाहेर पडला; अंगणांत आल्यावर चतुरकाला शेखरानें 'आपल्यावर येणाऱ्या संकटाची बातमी देऊन आपणांस सावध करण्यासाठीं मथुरा येथें आली आहे,' असें सांगितलें.

तेव्हां चतुरक म्हणाला,–'महाराज, आज सायंकाळीं आम्ही सुमारें दहाबारा सेवक एकत्र जमून गप्पा मारीत असतां जांधिळमामा आमच्यापाशीं आला, त्यानें आम्हांला सावध राहावयाची सूचना दिली, आणि कौल घेतल्यावर दुसरे दिवशीं त्यानें जें भयंकर भविष्य सांगितलें होतें, त्याच भविष्याचा पाढा पुनः वाचला. महाराजांनीं विक्रमसेनाला राजवाड्यांत राहण्यास थारा दिला, हें फार वाईट केलें, असें तो बोलला.'

शेखर म्हणाला,–'त्यानें पूर्वी देखील एकदोन प्रसंगीं असेच उद्गार काढले होते, पण तिकडे लक्ष्य देणें आम्हांस कित्येक कारणांनीं महत्त्वाचें वाटलें नाहीं. परंतु आतां मात्र त्याच्या भविष्यवाणींत कांहीं तरी तथ्यांश असावा, असें आमच्या मनांत येऊं लागलें आहे; पण आतां या गोष्टी बोलण्यांत कांहींच फायदा नाहीं.'

असें बोलत असतां ते दोघे पुढील देवडीवर आले होते. येथें दोन पहारेकरी उभे होते. त्यांनीं शेखराला ओळखिल्याबरोबर लवून प्रणाम केला. शेखरानें त्यांना हुषारीनें पाहरा करावयास सांगून तो चतुरकासह तेथून बाहेर पडला.

शेखर हा जात्याच मोठा धारिष्टवान् होता. इतकेंच नव्हे, तर ज्यावेळीं त्याच्यावर एकादा प्रसंग गुजरे, त्यावेळीं त्याला दुप्पट अवसान येत असे. इतर लोक जरी धारिष्टवान् असतात, तरी त्यांच्यावर एकाएकीं अकल्पित संकट आलें म्हणजे त्यांचें अवसान सुटतें, पण शेखराचें असें कधींही होत नसे. याप्रसंगीं दुसरा कोणी असता, तर त्याचे हातपाय लटके पडले असते, आणि त्याचें जाग्यावरून एक पाऊलसुद्धां उचललें नसतें. पण यावेळीं तो मोठ्या धैर्यानें व अगदीं धिमेपणानें एकेक पाऊल उचलून नेहमींप्रमाणें चालत होता. मनःक्षोभ झाल्यामुळें त्याचें पाऊल भराभर उठत नव्हतें, किंवा तो घाबरलेला असल्यामुळें त्याचें पाऊल सावकाशही पडत नव्हतें. एकाद्या विचारी गृहस्थाप्रमाणें सर्व प्रकारच्या साधकबाधक प्रमाणांचा विचार करीत आणि जेवढा प्रदेश त्या काळोखामध्यें नजरेस पडेल, तेवढा न्याहाळून पाहत तो सोनानदीच्या तीरानें चालला होता. कांहीं वेळ गेल्यानंतर ज्या ठिकाणीं चामुंडेच्या देवालयाकडे जाण्याचा रस्ता फुटत होता, त्या ठिकाणीं तो येऊन पोंचला. तेथें त्यानें पिशाचसोपान घाट सोडून दुसरा रस्ता धरिला आणि त्या रस्त्यानें तो डोंगर चढूं लागला. मथुरेनें सांगितलेल्या बातमीवरून दरीच्या पश्चिमेकडील डोंगरापलीकडून निंबराजाचें सैन्य येईल, असा त्याला संभव

वाटत होता, म्हणून त्या बाजूचा आपला बंदोबस्त चोख आहे कीं नाहीं, हें पाहाण्यासाठीं तो डोंगर चढून पलीकडे जाण्याचा त्याचा विचार होता. अर्ध्या वाटेवर जाऊन पोंचल्यावर तो एका ठिकाणीं उभा राहिला. आणि तेथून त्यानें शहराकडे नजर टाकली, त्यावेळीं तिकडे सर्वत्र सामसूम आहे, असें त्यास आढळून आलें. फक्त दोनतीन झोपड्यांमध्यें अद्यापि उजेड दिसत होता, तिकडे लक्ष्य देणें त्याला जरूर वाटलें नाहीं. तो तसाच पुढें चालला होता; दरीमध्यें जिकडे तिकडे शांतता पसरली असून मानवी प्राण्याचा शब्द त्याच्या कानावर पडेनासा झाला होता. सध्यां तो ज्या ठिकाणीं आला होता, तेथें सोनानदीचा खळखळाट, दोन्ही बाजूंच्या पर्वतांवरून खालीं उडया घेत असलेल्या ओढयांचा दणदणाट, राळेचा ककंश स्वर आणि मधूनमधून चाललेली कोल्हेकुई, यांचा मिश्रित शब्द मात्र जोरानें ऐकूं येत होता. जिकडेतिकडे गडद काळोख पडला असतां आकाशांतील तारकाप्रकाशानें जेवढा मार्ग दिसेल तेवढया मार्गानें तो झपाट्यानें डोंगरावर चढत होता.

चतुरकासह शेखर पुढें पुढें चालला होता, तरी त्या दोघांचें फारसें भाषण होत नव्हतें. ते दोघेही धिमेपणानें चामुंडेच्या देवालयाकडे चालले होते. ते पुढें जात असतां एकाएकीं एकाद्या रानटी जनावराच्या शब्दाप्रमाणें ककंश ध्वनि त्यांच्या कानीं पडला. ते एकदम थडकले, आणि ऐकूं लागले, त्यावेळीं तोच शब्द त्यांस पुनः ऐकूं आला. तो ध्वनि पुनः थांबला, जणुं काय सोनानदीच्या गंभीर स्वरामध्यें तो एकवटून गेला असावा! थोडया वेळानें तो ध्वनि पुनः ऐकूं येऊं लागला, आणि त्यामध्यें एकाद्या मानवी प्राण्याच्या शब्दाचें मिश्रण होत आहे, असा त्यांस भास झाला, हा ध्वनि कोठून येतो, हें पाहण्यासाठीं ते आपली दृष्टि चोहींकडे टाकीत असतां समोरच्या बाजूस देवळापाशीं असलेला देहांतशिक्षेचे अपराधी फांशीं देण्याचा विजेनें अर्धा जळून गेलेला व काळाकुट्ट दिसणारा प्रचंड वृक्ष त्यांच्या नजरेस पडला. आपण ऐकलेला ध्वनि याच वृक्षाकडून येत असावा असें वाटून तें दोघे गंभीरपणानें तिकडे निघाले. शेखराइतकें धाडस चतुरकाच्या अंगीं नसल्यामुळें तो यावेळीं शेखराच्या अगदीं जवळ राहण्याचा प्रयत्न करीत होता. थोडा वेळ गेल्यावर चतुरकाच्या अंतःकरणांत भीति उत्पन्न झाल्यामुळें त्यानें सेव्यसेवकभाव बाजूला ठेवून आपल्या धन्याचा हात धरिला, आणि शेखरानेंही त्याचें मनोगत जाणून त्याला आपला हात धरूं दिला. यावेळीं चतुरकाला जवळच्या ओढयामध्यें आत्महत्त्या करून मेलेल्या माणसांची आठवण झाली असल्यामुळें त्याच्या सर्वांगास दरदरून घाम सुटला होता. अशा स्थितींत त्यांची दृष्टि जळक्या वृक्षावर एकच उरलेल्या आडव्या फांदीकडे गेली, आणि त्या फांदीच्या शेंडयाला एक काळीकुट्ट-आजूबाजूच्या काळोखामध्येंही स्पष्ट काळी दिसणारी-अशी एक आकृति लोंबत असलेली त्यांच्या दृष्टीस पडली. ती पाहून, त्या फांदीवर पूर्वी फांशीं दिलेलीं माणसें रोज रात्रीं पिशाचरूपानें लोंबकळत असतात, या दंतकथेचें चतुरकास स्मरण झालें, आणि त्याचा शेखरानें धरलेला हातही थरथर कांपूं लागला; हें पाहून शेखरानें अगदीं थोडया शब्दांत त्याला धीर दिला, आणि तितक्यांतच त्या खांदीस लोंबत असलेलें प्रचंड जंगी वडवाघूळ आपले पंख फडफडावीत एकदम निघून गेलें. आपण पाहिलेली आकृति पिशाचाची नसून तें नुसतें एक वडवाघूळ होतें, ही खात्री पटल्याबरोबर चतुरकाला थोडें अवसान आलें, आणि त्याचा कंप नाहींसा झाला. ते आणखी थोडेसे पुढें गेले. त्या वाघुळाच्या पंखांचा फडफडाट त्यांना ऐकूं येईनासा झाला; पण तितक्यांत

चतुरकाच्या भीतीला आणखी एक कारण उपस्थित झालें. आपल्यासमोर थोड्याच अंतरावर माणसाच्या पावलांसारखीं पावलें वाजत आहेत, असा स्पष्ट ध्वनि त्यांच्या कानावर आला, आणि चतुरकानें पुनः शेखराच्या अंगाशीं लगट केली. त्याच वेळीं चतुरकाला त्या स्थानासंबंधाच्या आणखी एका भयंकर दंतकथेची आठवण होऊन त्याची पुनः घाबरगुंडी उडाली. उत्तरोत्तर तो पावलांचा शब्द अधिकाधिक जवळ जवळ येऊं लागला, त्यामुळें तर चतुरकाचा पाय जमिनीपासून सुटेनासाच झाला! त्याचप्रमाणें त्यांना पूर्वी ऐकूं येत असलेला चमत्कारिक शब्दही समोरच्या दिशेनेंच पुनः ऐकूं येऊं लागला. चतुरकाची इतकी अवस्था झाली, तरी शेखराच्या मनांत तिळमात्र भीति उत्पन्न झालेली नव्हती. चतुरकाचे पाय उचलत नाहींत हें पाहून शेखराला तेथें उभें राहणें भाग झालें; ते दोघे तेथें उभे राहून पांच चार पळें लोटेपर्यंत तो पावलांचा शब्द प्रतिक्षणीं अधिक जवळ ऐकूं येत आहे, असें त्यांस आढळून आलें, व शेवटीं त्या काळोखांतून एक भयंकर, काळीकुट्ट व असामान्य उंच मानवी आकृति आपल्याकडे येतांना त्यांच्या दृष्टीस पडली. ती आकृति दृष्टिमर्यादेमध्यें येतांच "कोण तो? जांघिळ? होय, तोच हा!' असें शेखर मोठ्यानें बोलला. तो असें बोलला, म्हणून बरें झालें. नाहीं तर चतुरक भीतीनें घेरी येऊन त्यावेळीं एकदम बेशुद्धच पडला असता!

'अशा अपरात्रीं येथें येऊन माझें नांव कोणीं घेतलें?' असें जरा सोंचून विचारीत जांघिळमामा त्या दोघांपाशीं आला. त्यानें त्या काळोखांतही शेखराला व चतुरकाला तत्काल ओळखिलें, आणि तो म्हणाला,-'तुम्ही अशा अपरात्रीं येथें कां आलां आहां? या ठिकाणीं पिशाचें एकत्र जमून जें काय भाषण करीत असतात, तें ऐकण्यासाठीं तुम्ही येथें आलां आहां काय? येथें वाहत असलेल्या वाऱ्याच्या प्रत्येक झुळुकीबरोबर 'सावध रहा! सावध रहा!! सावध रहा!!!' असे जे स्पष्ट शब्द मला ऐकूं येत आहेत, ते तुम्हासही ऐकूं आले ना? मला सांगा, तुम्ही असें अपरात्रीं येथें कां आलां?'

शेखरानें त्यास हटकून म्हटलें,-'मीही तुला असेंच विचारतों, तूं इतक्या अपरात्रीं येथें कां आला आहेस? तूं अलीकडे असा भलभलत्या वेळीं भटकत कां असतोस? आणि जो भेटेल त्याच्याशीं भयप्रद भाषणें कां करीत असतोस?'

जांघिळमामा क्रोधानें जळफळत ओरडला,-'राजपुत्रा! मी असा रात्रीं बेरात्रीं कां भटकत असतों, याचें कारण तुला पक्कें माहीत असतां तूं पुनः मला असा प्रश्न विचारतोस, याचें मला फार आश्चर्य वाटतें. राजपुत्रा, अजून सावध हो! तुझ्या घरावर केवढें संकट आलें आहे, याचा नीट विचार कर! पण आतां विचार करण्यास अवधि कोठें आहे! या घटकेलाच काय होईल याचा नेम कोणी सांगावा? चला तुम्हाला चमत्कार पहावयाचा असेल, तर तो आतांच दाखवितों. या समोरच्या जळक्या वृक्षाखालीं जाऊन मी नेहमींप्रमाणें पडतों, म्हणजे तेथें पिशाचांशीं माझें काय संभाषण होतें, तें तुम्हालाही ऐकूं येईल!'

शेखर बोलला,-'जांघिळा, तुझें बोलणें खोटें असेल, असें मी अगदीं म्हणत नाहीं. परंतु तूं पिशाचकल्पनेकडे वाजवीपेक्षां अधिक लक्ष्य देऊन आपल्या कर्तव्यापासून पराङ्मुख होत आहेस. तूं आपल्या कल्पनाशक्तीचा अगदीं दुरुपयोग करीत आहेत! अशा भयाणजागीं भटकण्यापेक्षां तूं जर आपल्या बुद्धिसामर्थ्यांचा योग्य उपयोग करून सध्यां आपले शत्रु काय करीत आहेत याचा पत्ता लाविला असतास, तर तुला पुष्कळ गोष्टी समजून आल्या असत्या,

आणि येणारें संकट टळलें असतें. आपल्या शत्रूंचीं भयंकर कारस्थानें चालू असून आपल्यावर कांहीं तरी भयंकर संकट येणार, असें मलाही समजलें आहे!'

जांघिळ गंभीर स्वरानें बोलला,-' मीं आतां जें ऐकिलें, तें खरें आहे काय? आतांचे हे शब्द प्रत्यक्ष राजपुत्र शेखराच्या मुखांतूनच बाहेर पडले काय? तर मग आतां मात्र तुमचे डोळे उघडले, असें म्हटलें पाहिजे!'

शेखर म्हणाला,-' होय; आतां माझे डोळे उघडले आहेत खरे! पण आमच्या शत्रूंचीं कारस्थानें काय चाललीं आहेत, या गोष्टीबद्दल तुजप्रमाणेंच माझ्या डोळ्यांसमोर अजूनही काळोखच आहे! काळोखांत डोळे उघडून तरी काय उपयोग?'

जांघिळानें विचारलें,-' पण आपल्या नाशास प्रवृत्त झालेला शत्रु कोण, हें तरी आपल्या ध्यानीं आलें आहे काय?'

शेखर बोलला,-' होय! पण मी ज्याचें नांव घेणार आहें, त्याच्यासंबंधानें मजकडून अन्याय न होवो! सध्यां आपला शत्रु विक्रमसेन बाहेरून मोठें मित्रत्व दाखवीत आहे, पण त्याच्या पोटांत कांहीं वेगळेंच असावें, असें मला वाटूं लागलें आहे. सुमारें दोन घटकांपूर्वी त्याच्या दुष्ट हेतूसंबंधानें मला सूचना मिळाली, म्हणून मी दरींतील बंदोबस्त बरोबर आहे कीं नाहीं, हें पाहण्यासाठीं असा अपरात्रीं येथें आलों आहें!'

जांघिळानें विचारलें,-' आपल्याला अशी सूचना कोणीं दिली?'

शेखरानें उत्तर दिलें,-' मणिभद्राची कन्या आणि सत्यरथाची पत्नी मथुरा ही आतांच येथें येऊन पोंचली. मला सूचना देण्यासाठीं ती वल्लभीहून मोठ्या त्वरेनें येथें आली आहे!'

जांघिळ बोलला,-' पुरे पुरे! एवढी सूचना पुष्कळ झाली. चला;आपण आतांच्या आतां त्या विक्रमसेनाला अंथरुणांतून खेंचून त्याच्याकडून त्याचें सगळें ढोंग बाहेर काढूं या! त्याच्याबरोबरचे शंभर सैनिक आहेत, त्यांची कत्तल करण्यास एक घटका देखील लागावयाची नाहीं! चला! आपण याच पावलीं राजवाडयाकडे जाऊन एवढें कृत्य उरकून टाकूं या!'

'जांघिळा, शांत हो! शांत हो! नुसत्या संशयावर असें साहस करणें न्यायाचें होणार नाहीं!' पुढें तो एकदम म्हणाला,-' चल मागें फीर! मी तुझ्या राजाचा पुत्र, आणि तूं ज्या सैन्यांत आहेस, त्या सैन्याचा सेनापति या नात्यानें तुला मागें फिरण्याची आज्ञा करितों! हें तुझें बोलणें फार अविचाराचें आहे!'

जांघिळ एकदम उभा राहिला, आणि पूर्वीहून हलक्या व खेदयुक्त स्वरानें बोलला,-' ज्या अर्थी तुम्ही मला अशी आज्ञा करीत आहां; त्या अर्थी मला ती मान्य करणें भाग आहे! परंतु तुम्ही माझें ऐकत नाहीं, त्यामुळें तुमच्यावर व इतरांवर काय प्रसंग गुजरणार इकडे तुमचें लक्ष्य आहे ना?'

शेखर म्हणाला,-' जांघिळा, तुझ्या स्वामिभक्तीवर माझा विश्वास नसता, तर खरोखर सांगतों; हे तुझे शब्द ऐकून मला तुझा मारी राग आला असता! चल आपण दोघे मिळून राजवाडयास प्रदक्षिणा घालून भोंवतालचा सर्व प्रदेश तपासून नंतर मंडयांत जाऊं. तेथें गच्चीवर बसून आपण सर्व रात्रभर चोहींकडे नजर ठेवूं. उद्यां सकाळीं विक्रमसेन परत जाणारच आहे!'

असें बोलून शेखर भराभर पुढें जाऊ लागला. सध्यां ते मंडयाच्या उत्तरेच्या बाजूस होते. थोडया वेळानें तिघे मंडयाच्या थेट पश्चिमेच्या म्हणजे पिछाडीच्या बाजूस आले. शेखर आजूबाजूच्या प्रदेशाचें निरीक्षण करीत पुढें चालला होता, आणि ते दोघेजण मुकाट्यानें त्याच्या मागून चालले होते. ते सुमारें एक घटकाभर अशा रीतीनें

पुढें गेल्यावर जांघिळ मध्येंच ओरडला, त्यामुळें शेखर एकदम उभा राहिला.

जांघिळ ओरडून म्हणाला,–'अहो राजपुत्र, तो समोरचा दिवा एकदां दिसतो, व एकदां दिसेनासा होतो, तिकडे लक्ष्य द्या! हा दिवा तर वाड्यांतीलच आहे! होय; दिवा राजवाड्यांतील आहे, यांत तर शंकाच नाहीं, पण हा असा मधूनमधून दिसेनासा कां बरें होतो?'

त्याच्या या भाषणानें त्या दोघांचें लक्ष त्या दिव्याकडे वळलें, आणि जांघिळाच्या म्हणण्याप्रमाणें तो दिवा मधूनमधून सारख्या प्रमाणानें दिसेनासा होत आहे, ही गोष्ट त्यांच्या दृष्टीस पडली. शेखर सुमारें पांच चार पळें त्या दिव्याकडे पाहत असतां तितक्यांत तीन चार वेळां तो दिवा मधूनमधून दिसेनासा झाला.

नंतर शेखर बोलला,–'ही गोष्ट फारशी महत्त्वाची आहे, असें मला वाटत नाहीं. हा दिवा असा कां दिसतो, हें माझ्या ध्यानीं आलें. या दिव्यासमोरून कोणी मागें पुढें खेपा घालीत आहे, म्हणून तो मनुष्य दिव्यासमोर आला म्हणजे तो दिवा आपणांस दिसेनासा होतो, व तो बाजूस गेला म्हणजे तो पुनः आड येईपर्यंत दिवा आपणांस दिसत असतो; त्यांत कांहीं विशेष नाहीं!'

जांघिळ बोलला,–'पण यापूर्वी वाड्यांत कोठेंही दिवा दिसत नव्हता. हा दिवा आतांच कसा दिसूं लागला?'

ही गोष्ट शेखराच्याही एकदम ध्यानांत आली. त्यानेंही थोड्या वेळापूर्वी राजवाड्याकडे नजर टाकली, त्यावेळीं तेथें दिवा नव्हता. अशा अपरात्रीं दिवा लावून त्याच्या पुढें येरझाऱ्या कोण घालीत असावा, हें त्याच्या ध्यानीं येऊन तो बोलला,–'ही जरा विचाराची गोष्ट आहे खरी. आपण प्रथम राजवाड्यांत जाऊन हा प्रकार काय आहे, याची चौकशी करूं या, आणि नंतर पाहिजे तर पुनः आपण तपासासाठीं बाहेर पडूं. पण जांघिळा, ध्यानांत धर! तसाच प्रसंग आल्याशिवाय एकादी दांडगाईची गोष्ट करावयाची तुला माझी परवानगी नाहीं. वाड्यांत गेल्यानंतर माझ्या आज्ञेबरोबरीज तूं विक्रमसेनाच्या अंगावर चालून जातां नये, हें ध्यानांत असूं दे!'

यावर जांघिळानें स्पष्ट असें कांहींच उत्तर दिलें नाहीं. फक्त एकाद्या हिंस्र पशूप्रमाणें तो एकदां गुरगुरला, त्यावरून आपलें बोलणें त्याला रुचलें नाहीं, हें शेखराच्या ध्यानीं आलें, पण त्यानें त्याजकडे अधिक लक्ष्य दिलें नाहीं. ते आपल्या मार्गानें तसेच पुढें चालले होते. कांहीं वेळानें राजवाड्याकडे जाण्याचा रस्ता जेथें फुटत होता, तेथें ते आले, आणि त्यांनीं तेथून राजवाड्याकडे उतरावयास प्रारंभ केला. पण ते दहा वीस पावलें पुढें गेले असतील नसतील, तोंच जांघिळानें शेखराचा हात धरून त्याला उभें केलें. हा असें कां करतो, हें शेखराच्या ध्यानीं आलें नाहीं, म्हणून तो पुनः राजवाड्याकडे पाहूं लागला. ते उभे होते तेथून त्यांस विशेष कांहीं दिसलें नाहीं, म्हणून ते लक्ष्य देऊन ऐकूं लागले. थोड्याच वेळानें दक्षिणदिशेकडून पुष्कळ लोक चालत येत असतां जसा त्यांच्या पावलांचा दणदणाट होतो; तशा प्रकारचा अस्पष्ट शब्द त्यांना ऐकूं येऊं लागला. हा आपणांस भ्रम तर होत नसेलना, असें त्यांच्या मनांत येऊन ते पुनः नीटपणें ऐकूं लागले, त्यावेळीं आपण भ्रमांत नसून आपणांस खरोखरच पुष्कळ पावलांचा शब्द ऐकूं येत आहे, अशी त्यांच्या मनाची खात्री झाली. थोड्या वेळानें तो शब्द त्यांस अधिकाधिक स्पष्ट ऐकूं येऊं लागला, इतकेंच नव्हे, तर त्यामध्यें आणखी हत्यारें एकमेकांस लागून जसा शब्द निघतो, तशा ध्वनींचें मिश्रण आहे, असेंही त्यांस ऐकूं आलें. पण यावेळीं काळोख मिट्ट पडला

असल्यामुळें त्यांस दक्षिणेकडे कांहीं दिसेना! फक्त त्यांना तेवढा ध्वनि मात्र काय तो ऐकूं येत होता, आणि तिकडून शंपन्नास माणसें येत असावीं, असा तर्क करतां येत होता. तसेंच त्यांनीं पूर्वी पाहिलेला दिवा अजूनसुद्धां मधूनमधून दिसेनासा होतच होता. हा दिवा राजवाड्यांतील आहे, याबद्दल त्यांस तिळमात्र शंका नव्हती, पण तो कोणत्या भागांतील कोणत्या जागीं आहे, हें मात्र त्यांस ठरवितां येत नव्हतें. शेखराच्या मनाला क्षुब्ध करणाऱ्या गोष्टी एकामागूनएक सारख्या घडून येत होत्या, पण त्यांचा खरा अर्थ मात्र अजूनही त्याच्या ध्यानीं येत नव्हता!

क्षणोक्षणीं तो शेंकडों पावलांचा आवाज अधिकाधिक स्पष्ट ऐकूं येऊं लागला, त्यावरून शत्रूचें सैन्य दरींत आलें असून, तें त्वरेनें राजवाडयाकडे जात आहे, ही गोष्ट त्यांच्या मनांत येणें अगदीं अशक्य नव्हतें. पण असें झालें तरी कसें? दरींतील प्रवेशद्वारावरील पहारेकऱ्यांनीं शत्रूची चाहूल लागतांच तेथील तोफ कशी डागिली नाहीं? दरीमध्यें प्रवेश करण्याच्या प्रत्येक वाटेवर पहारा असतां आणि त्या पहारेकऱ्यांच्या हातीं बंदुका असतां त्यांनीं एकही आवाज काढला नाहीं, असें कसें झालें! कसेंही असो! कोणी तरी विश्वासघात केला, याबद्दल त्याच्या मनास संशय उरला नाहीं. धनुष्यापासून सुटलेला बाण जसा वेगानें पुढें जात असतो, त्याप्रमाणें अनेक विचार शेखराच्या मनांत क्षणार्धांत येऊन गेले. याप्रसंगीं मात्र त्याच्या धैर्यानें कच खाल्ली! आतां त्याचें धैर्य सुटलें, आणि तो कंपित स्वरानें आपल्या दोघां अनुयायांस म्हणाला,—'शत्रूचा छापा आला आहे. यासाठीं त्यांच्यापूर्वी आपण राजवाड्यांत पोंचलें पाहिजे.'

बंदुकींतून ज्याप्रमाणें गोळ्या सुटाव्या, त्याप्रमाणें ते तिघेजण मोठ्या वेगानें पळत सुटले. पण थोड्याच वेळांत आपल्यापुढें एक शत्रूची टोळी जात आहे, असें त्यांच्या ध्यानीं आलें. अर्थात् त्यांनीं जो पावलांचा शब्द ऐकिला, तो येणाऱ्या टोळीचा होता. यावेळीं ते मोठ्या जोरानें धांवत असल्यामुळें त्यांच्या पावलांचा शब्द आतां शत्रूच्या टोळीला ऐकूं आला, आणि पुढील टोळी एकदम उभी राहिली. इतकेंच नव्हे, तर त्या टोळींतील लोकांनीं या तिघांच्या भोंवतीं गराडा दिला, हें ध्यानीं येतांच तिघांच्याही तरवारी विजेप्रमाणें म्यानांतून बाहेर पडल्या! प्रसंग मोठा बिकट होता! त्यांच्या दसपट शत्रूंचा त्यांच्याभोंवतीं गराडा पडलेला होता. हा गराडा फोडून आपला मार्ग मोकळा करून घेणें त्यांस जरूर होतें; आणि तसें त्यांनीं केलेंही! शेखराच्या गरगर फिरणाऱ्या तरवारीनें सुमारें दोन हात रुंदीचा मार्ग मोकळा केला, चतुरकाच्या तरवारीनें शेखराच्या पृष्ठभागाचें रक्षण झालें, आणि जणुं काय या लोकींचा राक्षसच असलेल्या जांघिळानें आपल्या अद्वितीय युद्धकौशल्यानें चतुरकाचें व आपलें रक्षण करून तो त्यांच्या मागोमाग टोळीचा गराडा फोडून बाहेर पडला. सुमारें पांच चार पळें लोटण्यापूर्वीच ते शत्रूंच्या गराड्यांतून बाहेर पडले; पण खरी आणीबाणीची वेळ काय ती आतांच होती. त्यांना शत्रूंशीं लढून नुसतें आत्मरक्षण करावयाचें नव्हतें, तर त्यांना शुकांडी देऊन त्यांच्यापूर्वी राजवाड्यांत पोंचावयाचें होतें. शत्रूजवळ यावेळीं बंदुका नव्हत्या असें नाहीं, पण राजवाड्याच्या अंगणांत येऊन दाखल होईपर्यंत कोणीही बंदुकीचा आवाज काढतां नये, किंवा दुसऱ्या कोणत्याही प्रकारचा ध्वनि निर्माण करतां नये, अशी त्यांस विक्रमसेनाची सक्त ताकीद होती. आपल्याशीं लढून गराडा फोडून जाणारा वीर पुरुष शेखर आहे, अशी शंका जर कदाचित् त्या सैनिकांस आली असती, तर त्यांनीं विक्रमसेनाचा हुकूम मोडूनसुद्धां त्याच्यावर गोळ्या

झाडल्या असत्या. कारण यावेळीं आपण राजवाड्यावर कोणत्या हेतूनें छापा घालीत आहों, हें त्या सैनिकांस माहीत होतें. इतकेंच नव्हे, तर ' राजकुलांतील इतर सर्व माणसें हातून निसटलीं तरी चालतील, पण हरप्रयत्नानें शेखराचा प्राण घेतलाच पाहिजे' असा नारायणपुरांतून तें सैन्य बाहेर पडलें, त्यावेळीं बृहद्रथानें त्यांस सक्त हुकूम सोडिला होता. अर्थात् यावेळीं जर त्यांस शेखराची ओळख पटली, तर त्याचा प्राणांत होण्यास पळभर देखील विलंब लागला नसता. सुदैवानें आणि मोठ्या शर्थीनें ते तिघे शत्रूचा गराडा फोडून बाहेर पडले, आणि पुढें पळत चालले. ते तिघे अत्यंत वेगानें पुढें चालले असतां शत्रूंनीं त्यांचा पाठलाग आरंभिला, पण दरींतील वाटांची शत्रूंस अगदीं माहिती नसल्यामुळें, त्यांना त्यांस झुकांडी देण्यास वेळ लागला नाहीं.

पण ते शत्रूसमोरून असे पळाले काय म्हणून ? निदान जांघिळ व चतुरक हे दोघे तरी काय म्हणून पळत होते ? हे मरेपर्यंत शत्रूंशीं कां लढले नाहींत ? याचें कारण इतकेंच कीं, त्या काळोखामध्येंसुद्धां त्यांनीं आपल्याबरोबर लढणारे सैनिक निंबराजाच्या सैन्यांतील आहेत, असें ओळखिलें होतें. आणि त्यांच्यापैकींच शंभर लोक राजवाड्यापासून जवळच तळ देऊन उतरले आहेत, ही गोष्ट त्यांच्या डोळ्यांपुढें ढळढळीत दिसत होती. अर्थात् आपले प्राण असे फुकट घालवावे, हें त्यांस कसें बरें वाटावें ? त्यांनीं आपला मार्ग मोकळा करून घेतांना कसें तरी एकदां राजवाड्यापाशीं पोंचावें, आपल्या धन्याला आणि आपल्या सोबत्यांना संकटाची सूचना देऊन सावध करावें, आणि नंतर आपण स्वामिकार्यांत देह घालवावा, असा विचार करून मोठ्या वेगानें ते पळत होते.

ज्या ठिकाणीं शत्रूंच्या पुढच्या टोळीची आणि त्यांची गांठ पडली, तें ठिकाण राजवाड्यापासून सुमारें पावकोसावर होतें. शत्रूची वाटेंत गांठ न पडती, तर ते सरळ पुढच्या मार्गानें राजवाड्याच्या मुख्य दरवाज्यापाशीं आले असते. पण त्यांना आतां तो मार्ग सोडून देऊन आडवाटेनें पळावें लागल्यामुळें, ते आतां राजवाड्याच्या पिछाडीच्या भागांत जाऊन पोंचणार होते. ते सध्यां ज्या मार्गानें पळत होते, त्या मार्गाच्या आजूबाजूला एकही झोंपडें किंवा घर नव्हतें. अर्थात् ओरडाओरड करून कोणाला सूचना देणें त्यांना शक्य नव्हतें. ते जात होते, तिकडील मनुष्यवस्तीची पहिली जागा म्हणजे राजवाडाच असल्यामुळें, ते तिकडे धूम ठोकीत होते. धांवण्याचा वेग सर्वांचा सारखा नसल्यामुळें त्या तिघांमध्यें लवकरच अंतर पडलें. शेखर सर्वांत चपळ व सुडसुडीत असल्यामुळें, सर्वांच्या पुढें पळत होता. जांघिळाचा देह जरी विशाल होता, तरी त्याच्या तंगड्या लांब लांब असल्यामुळें तो बरेंच अंतर तोडीत होता, त्यामुळें तोही बराच पुढें गेला होता. पण चतुरक तितका चपळ नव्हता, उंच नव्हता, किंवा सशक्तही नव्हता, म्हणून तो सर्वांच्या मागें पडला होता. धनुष्यापासून सुटलेला बाण, तोफेंतून सुटलेली गोळी, सर्पावर झडप घालणारा गरुडपक्षी, किंवा पारधी-कुत्रा मागें लागलेला ससा, जसा मोठ्या वेगानें पळत असतो, तशा वेगानें किंबहुना त्याहूनही अधिक वेगानें शेखर पळत असल्यामुळें, त्यानें दहा पळांच्या आंतच आपल्या अनुयायांस मागें टाकलें !

शेखरानें आपल्या अनुयायांस मागें टाकलें, पण त्याचे विचार मागें पडले होते काय ! ते कसचे मागें पडतात ! त्याच्या मनाचा यावेळीं गोंधळ उडाला होता. शेंकडों विचार त्याच्या मनामध्यें विद्युद्वेगानें येऊन जात होते. त्याचें मस्तक विचारांनीं भ्रमूं लागलें होतें. त्याचा देह पळत होता, पण त्याचें मन यावेळीं राजवाड्यांतील प्रत्येक

दिवाणखान्यांत शिरून तेथें सर्व व्यवस्थित आहे कीं नाहीं, हें पाहत होतें. पण त्या विचाऱ्या निर्जीव मनाला चर्मचक्षूच्या साह्यावांचून काय दिसणार होतें ? ते चर्मचक्षु तर देहाबरोबर मागें होते ! त्या देहाला आपल्या मनाइतकी अप्रतिहत गति नाहीं, म्हणून त्याला वारंवार खेद होत होता. हा छापा घालण्यांत शत्रूचा कोणता उद्देश असावा ? शत्रु किती असावे ? निंबराजाच्या लोकांनीं आपलें शत्रुत्व कां करावें ? राजवाड्यांतील माणसांना नुसतें कैद करण्याचा त्यांचा उद्देश असावा, कीं त्यांचा प्राण घेण्याचा त्यांचा उद्देश असावा ? आपणांस सर्वांस कैद करून शत्रु नेतील, हाच विचार त्याच्या मनाला फार भयंकर वाटला, मग कत्तल करतील, हें मनांत येऊन त्याला काय बरें वाटलें असेल ? वाचकहो ! याची कल्पना करण्याचें काम आम्ही आतां तुम्हांवरच संपवितों ! त्याचें धैर्य अढळ होतें, म्हणूनच त्याचे पाय लुले पडले नाहींत; त्याचें धैर्य अचाट होतें, म्हणूनच अनेक प्रकारच्या विचारांनीं त्याचें मस्तक भ्रमून गेलें नाहीं; त्याचें धैर्य असामान्य होतें, म्हणूनच अजूनही आपण आपल्या प्रिय माणसांचें रक्षण करूं अशी त्याला हिंमत वाटत होती ! जणुं काय तुफानी वाऱ्याच्या सोंसाट्यांत सांपडलेल्या पिसाप्रमाणें तो उडत चालला होता. त्याचे पाय मधूनमधून पृथ्वीला स्पर्श करीत होते, म्हणूनच तो पक्ष्यांप्रमाणें उडत नव्हता असें म्हणणें जरूर आहे. ती वाट नेहमींची त्याच्या पायांसालची असल्यामुळें आपलें पाऊल चुकेल अशी त्याला भीतीही वाटत नव्हती. साधारण नियम असा आहे, कीं मनुष्य अंधेरांत चांचपडत चालला असला म्हणजे आपलें पाऊल उंचसखल भागावर अडखळेल अशी त्याला क्षणोक्षणीं भीति वाटत असते, आणि तो सावकाश व जपून चालत असतो, पण जो मनुष्य निर्भयपणें प्रत्येक पाऊल जोरानें आणि धिमेपणानें टाकीत असतो, त्याचें पाऊल अंधारांतही नेहमीं सरळच पडत असतें. अनेक प्रकारचे विचार-अनेक प्रकारच्या कल्पना-अनेक प्रकारच्या मानसिक पीडा-सहन करीत शेखर चाललाच होता !

पण-अरे देवा ! हा कसला भयंकर उजेड-आणि-आवाज ? ही काय तोफ ! कीं मेघगर्जना ! कीं विद्युत्पात ! कीं भूमिस्फोट ! ! ! हा एवढा आवाज तरी कसला झाला ? आणि हा उजेड ! ही काय वीज चमकली ? छेः छेः ही आग ! हा आगीचा लोळ ! आणि त्यानंतर झालेला भयंकर आणि कानठाळे बसविणारा आवाज ! ! आगीचा लोळ दृष्टीस पडल्याबरोबर आणि याच्यामागोमाग सर्व दरी दुमदुमवून टाकणारा आवाज कानीं पडल्याबरोबर त्याचा शब्द ऐकावयास तेथें कोणी नव्हतें, तरी 'घात ! घात ! ! घात ! ! !' असे त्रिवार उद्गार त्याच्या मुखांतून बाहेर पडले ! आपणाला वाड्यांत प्रवेश करावयास अजून निदान अर्ध घटका तरी खात्रीनें लागणार ! तेवढ्यांत तिकडे काय अनर्थ गुजरेल ! हा विचार त्याच्या मनांत आला, आणि आतां मात्र त्याचें अवसान गळालें ! आपला पूज्य वृद्ध पिता, अर्भक पुत्र, तरुण आणि प्रेमळ पत्नी, आणि कसा कां असेना, आपला वडील बंधु, या सर्वांचें त्यांस एकसमयावच्छेदेंकरून स्मरण झालें ! तसेंच ज्यांनीं आपली आजन्म इमानें इतबारें सेवा केली, ते आपले सर्व नोकर आतां मृत्युमुखांत पडणार ! आपण जर वावेळीं वाड्यांत असतों, तर या सर्वांच्या केसास धक्का लागण्यापूर्वीच यांचें रक्षण करण्यास आपले प्राण खर्ची घातले असते, असें मनांत येऊन दुःखातिशयामुळें आपले पाय उचलत नाहींसे झाले आहेत; असें त्याला वाटूं लागलें. पण हा केवळ त्याच्या कल्पनाशक्तीचा खेळ होता ! त्याला आपण जितक्या वेगानें गेलों तर बरें होईल असें वाटत होतें, तितक्या

वेगांन पळतां येत नव्हतें, म्हणून दुःखानें आपली शक्ति नष्ट झाली असें त्यास वाटत होतें; परंतु त्याच्या वयाच्या शक्तीच्या व देहाच्या मानानें तो अतिशय जलद पळतच होता!

पळतां पळतां हा आवाज कसला याबद्दल तो आपल्याशीं विचार करीतच होता; तो स्वतः युद्धकलेमध्यें निपुण असल्यामुळें, शत्रूनें आपल्या लोकांस सूचना देण्यासाठीं हा सुरुंगाचा बार उडविला असावा, असें एकदम त्याच्या ध्यानांत आलें. विक्रमसेनाच्या धरोवरचे शंभर लोक हा आवाज कानीं पडल्यानंतर जरी आपल्या तळावरून वाड्याकडे जावयास निघाले, तरी ते आपल्यापूर्वी तेथें जाऊन पोंचतील आणि घात करितील, ही गोष्ट एकसारखी त्याच्या हृदयास शल्याप्रमाणें टोंचूं लागली.

आणखी दहा पळें तो एकसारखा धांवला, तोंच राजवाड्यांतून प्राणांतसमयींच्या भयानक आणि हृदयद्रावक किंकाळ्या एकामागून एक त्याच्या कानीं पडूं लागल्या! या आरोळ्यांनीं जणुं काय राजवाड्याच्या चिंधड्या उडत आहेत, असा त्याला भास होऊं लागला! तो जसजसा पुढें पुढें चालला, तसतशा या किंकाळ्या अधिकाधिक ऐकूं येऊं लागल्या!! अशा प्रकारच्या करुणाजनक आणि पाषाणालासुद्धां द्रव आणणाऱ्या किंकाळ्या त्यानें कधीं आपल्या साऱ्या जन्मांत ऐकिल्या नव्हत्या! हरहर! काय हें मानवी क्रौर्य! कोण हा मानवी नीचपणा! हेंच का मनुष्याचें मनुष्यपण?

* * * *

मनुष्यप्राण्यानें आपण सर्व प्राण्यांत श्रेष्ठ अशी बढाई वाटेल तितकी मारावी, पण त्यानें जोंपर्यंत क्रौर्याचा त्याग केला नाहीं, क्रोध सोडून दिला नाहीं, तृष्णा आवरली नाहीं, काम जिंकला नाहीं, लोभाची रास्तरांगोळी केली नाहीं, आणि तमोगुणाला तिलांजुली दिला नाहीं, तोपर्यंत हीं त्याची सर्व बढाई व्यर्थ होय! ह्या वृत्ति जोंपर्यंत मनुष्याच्या मनांतून नष्ट झाल्या नाहींत, तोंपर्यंत जरी तो आपलें नाक वर करून चालत असला, तरी त्याच्यापेक्षां आपलीं नाकें खालीं करून चालणारें पशूच श्रेष्ठ होत!

* * * *

सुरुंगाचा धडाकां ऐकल्याबरोबर विक्रमसेनाचे शंभर लोक मोठ्या वेगानें राजवाड्याकडे पळत सुटले. धडाका ऐकून भयग्रस्त झालेले पहारेकरी आपलें काम सोडून जिकडून आवाज ऐकूं आला तिकडे धांवत गेले! परंतु आपल्यामागून राजवाड्याच्या मुख्य द्वारांतून शस्त्रास्त्रांनीं सज्ज झालेले लोक एकसारखे आंत घुसत आहेत, हें पाहून भयानें त्यांची बोबडी वळली! तितक्यांत ते शत्रूच्या दृष्टीस पडले, व त्यांनीं क्षणार्धाचा विलंब न करतां प्रथम त्या पहारेकऱ्यांचा बळी घेतला!

ज्या वेळीं तो भयानक आवाज झाला, त्यावेळीं राजवाड्यातील सर्व माणसें निद्रेमध्यें निमग्न झालीं होतीं. आपल्यावर एकादें संकट येईल हें एक प्रियंवदा व दुसरी मथुरा या दोघींवांचून कोणाच्या ध्यानींमनींसुद्धां नव्हतें. त्यामुळें एकाएकीं मोठा थोरला आवाज कानीं पडल्याबरोबर सर्व माणसें एकदम खडबडून जागीं झालीं. फक्त त्या दोघीमात्र अजून जाग्या होत्या, त्यामुळें सुरुंग उडतांक्षणीं उत्पन्न झालेला भयानक प्रकाश त्यांच्या मात्र त्यांच्या दृष्टीस पडला होता; किंवा प्रकाश आणि आवाज, यांचें ज्ञान त्यांस एकदमच झालें, असें म्हणावयास हरकत नाहीं. सुरुंग उडाला, हें पाहतांच विक्रमसेन आपल्या दिवाणखान्यांतून बाहेर पडला. यावेळीं त्याच्या हातांत नागवी तरवार तर होतीच, पण प्रसंग पडल्यास आपली तयारी असावी, म्हणून त्यानें आपल्या कमरबंदांत दोन भरलेले तमंचेहीं अडकविले होते. अशा रीतीनें आयुधांनीं सिद्ध होऊन आपल्या टोळीच्या आधिपत्या-

साठीं तो मोठ्या त्वरेनें दुसऱ्या मजल्यावरून खालीं आला.

त्या प्रसंगीं राजवाड्यांतील सर्व लोकांची भयानें कशी तिरपिट उडाली असेल, याची कल्पना वाचकांनींच करावी ! जर आह्मी याप्रसंगीं प्रत्येक माणसाला जी भीति वाटली, त्यांच्या मनांत जे सहस्रावधि विचार येऊन गेले, त्यांची जी धांदल उडाली, आणि त्यांनीं जो आकांत केला, त्याचें वर्णन करूं म्हटलें, तर किती तरी मजकूर लिहावा लागेल, आणि तितका लिहूनसुद्धां त्या प्रसंगाचें यथार्थ चित्र वाचकांच्या नेत्रापुढें आम्हांस उभें करतां यावयाचें नाहीं. जेथें सुरुंगाचा धडाका उडाला, तेथून चूडामणीचा दिवाणखाना अगदीं जवळ असल्यामुळें, तो एकदम जागा झाला. तो इतका लवकर जागा झाला होता कीं सुरुंग उडण्यापूर्वीच पेटलेल्या दारूचा प्रकाशसुद्धां क्षणमात्र त्याच्या डोळ्यांसमोर चमकला ! त्याच्या डोळ्यांस तें तेज सहन झालें नाहीं, आणि त्यानें आपले डोळे झांकून घेतले. क्षणार्धानें जेव्हां त्यानें आपले नेत्र पुनः उघडिले, त्या वेळीं त्याला आपल्या भोंवतालचा काळोख फारच भयाण भासूं लागला. त्याच्या अंगांतील रक्त गरम होऊन तें रुपाड्यानें त्याच्या मस्तकांत चढूं लागलें असल्यामुळें, आपल्या छातीवर कोणी तरी मोठें थोरलें दडपण ठेविलें आहे, असें त्यास वाटत होतें; म्हणून त्यानें मोठ्या जोरानें बिछान्यावरून उसळी मारून आपण मोकळे आहों कीं, बांधलेले आहों, याबद्दल आपल्या मनाची खात्री करून घेतली. आपण मोकळे आहों, हें ध्यानीं येऊन त्याला थोडी हुषारी वाटली. पण सध्यां खोलींत अंधार असल्यामुळें त्याची दिशाभूल झाली. तो प्रथम आपली तरवार शोधूं लागला. अंधेरांत हातानें चांचपून त्यानें आपली तरवार हातीं घेतली, पण दिवाणखान्याचा दरवाजा त्याला नेमका सांपडेना. तो शोधून काढण्यास त्याला बराच वेळ मोडावा लागला !

हीच स्थिति त्याच्यापासून थोड्याच अंतरावरील दिवाणखान्यांत सुखनिद्रा घेत असलेल्या राजाराणींची झाली ! राणीनें तर भयानें किंकाळीच फोडली ! दृढसंध हा कसलेला व विचारी योद्धा असल्यामुळें, चुडामणीप्रमाणें गांगरून गेला नाहीं. त्यानें आपल्या तरवारीस काळोखांतच हात घालून नेमकी आपल्या हातीं घेतली. आपल्या पतीनें दरवाजा उघडला असून, तो घाईघाईनें बाहेर जात आहे, हें तिच्या ध्यानीं आलें. आणि ती भीतीनें कांहीं शब्द बोलली, पण सुरुंगाच्या भयानक आवाजानें त्या वृद्ध राजाच्या कानठाळ्या बसलेल्या असल्यामुळें तिचे शब्द त्याला मुळींच ऐकूं आले नाहींत; आणि जरी ते त्याला ऐकूं आले असते, तरी त्यानें तिकडे लक्ष्यही दिलें नसतें. रात्रीच्या वेळीं कोठें तरी अपघात झाला असावा, असें प्रथम त्याच्या मनांत आलें असल्यामुळें, तो आपल्या दिवाणखान्याचा दरवाजा उघडून बाहेर आला, आणि त्यानें एकदम जिना उतरावयास प्रारंभ केला. तोंच त्याला राजवाड्याच्या पूर्व भागांतून विक्रमसेनाच्या तरवारींस बळी पडलेल्या नोकरांच्या विकराळ आरोळ्या ऐकूं आल्या !

शेखर निघून गेल्यावर प्रियंवदेनें मथुरेला आपल्याजवळचीं उत्तम वस्त्रें परिधान करावयास दिलीं. तसेंच निपुणिकेला सांगून तिच्या भोजनाचीही तिनें व्यवस्था लाविली. ती राजवाड्यांत अगदीं आयत्या वेळीं आली असल्यामुळें तिच्यासाठीं वेगळ्या दिवाणखान्यांत शय्येची व्यवस्था अशा अपरात्रीं करणें बरेंच त्रासाचें आहे, असें प्रियंवदेला वाटलें. तिनें तुसती आज्ञा केली असती, तर चाकरमाणसांनीं तिची सर्व तरतूद योग्य रीतीनें लावून दिली असती, पण अशा अपरात्रीं चाकरमाणसांस त्रास देणें प्रियंवदेला योग्य वाटलें नाहीं. चंपावतीमध्यें पतीसह

केदेंत असतांना त्या दोघींची चांगलीच मैत्री जमलेली होती, अर्थात् आपल्या मैत्रिणीला आपल्या दिवाणखान्यांत ठेवून घेणें तिला अगदीं गैर वाटलें नाहीं. आणि मथुरेलाही तें पसंत पडलें. कारण त्या दोघींना याप्रसंगीं परस्परांचा समागम इष्ट वाटत होता. शेखर बाहेर गेल्यामुळें प्रियंवदेला करमत नाहींसें झालें होतें, म्हणून त्या दोघी पुष्कळ वेळपर्यंत सुख-दुःखाच्या गोष्टी बोलत बसल्या होत्या. मथुरेला अलीकडे पांच चार दिवसांत स्वस्थ झोंप लागली नव्हती; शिवाय ती ज्या कामासाठीं इतक्या जलदीनें आली, तें कामही जवळजवळ सिद्धीस गेलें असल्यामुळें तिला लवकरच झोंप येऊं लागली; आणि ती प्रियंवदेच्या बिछान्यावरच झोंपी गेली. हें पाहून तेथील पाळण्यांत निजलेल्या मुलाला आपल्यापाशीं घेऊन शेजारच्या दिवाणखान्यांतील शेखराच्या बिछान्यावर प्रियंवदा जाऊन पडली. आपल्यावर असें संकट तरी कोठचें येणार, याचा विचार करीत ती तळमळत पडली असतां, एकाएकीं मोठा थोरला आवाज झालेला तिच्या कानीं पडला, त्याबरोबर ती दचकून उठली. तिचा लहानगा पुत्र-सध्यां दोन वर्षांचा झालेला-त्या आवाजानें जागा होऊन मोठ्यानें रडूं लागला होता, पण आपली माता आपल्याजवळ आहे हें दृष्टीस पडतांच त्याचें रडें थांबलें. ज्या अर्थी अशा अपरात्रीं राजवाड्याच्या जवळ एवढा मोठा आवाज झाला, त्याअर्थी कांहीं तरी दगा आहे, असें एकदम तिच्या मनांत आलें. तिनें पटकन आपल्या अर्भकाला कडेवर घेतलें, व तेथील दिवा हातांत घेऊन तिनें एकदम पिछाडीच्या जिन्याचा मार्ग धरिला यावेळीं ती इतकी भांबावून गेली होती कीं, आपल्या शय्येवर मथुरा निजलेली आहे, ही गोष्ट ती अगदींच विसरून गेली!

विक्रमसेन हत्यारबंध होऊन खालीं आल्यावर तेथें त्याच्या दोघां सेवकांची व त्यांची गांठ पडली, आणि त्या तिघांनीं दरवाज्यावरील पहारेकऱ्यांस व इतर नोकरांस ठार करून ते अंगणांत आले. इतक्यांत त्याचे शंभर लोकही अंगणांत येऊन पोंचले; त्यांना त्यानें वाड्यांत घुसून कत्तल करण्याचा हुकूम केला. ते लोक वाड्यांत जाऊन पांच चार माणसांचा प्राण घेतात न घेतात, तोंच बाहेरच्या बाजूला नवीन आलेली एक टोळी येऊन दाखल झाली. या टोळीचे अग्रभागीं दुर्मुख असून, त्यानें यावेळीं राजसैन्यांतील अधिकाऱ्याप्रमाणें वेष धारण केला होता, आणि आपली ओळख पटूं नये म्हणून कृत्रिम दाढीमिशी लाविली होती. विक्रमसेनानें एक दोन शब्द बोलून अगदीं वेळेवर येऊन पोंचल्याबद्दल त्याला शाबासकी दिली, तोंच त्याची नजर त्याच्या* जवळ उभा असलेल्या एका तरुण सैनिका* कडे वळली, त्या सैनिकाचें वय अगदीं लहान होतें. त्याच्या ओंठावर एकही केस दिसत नव्हता. त्यानें आपल्या मस्तकास एक मरजरी मंदील गुंडाळिला होता, तरी त्यांतून त्याच्या मस्तकाचे काळेभोर व लांब सडक केश बाहेर पडले असून, ते त्याच्या स्कंधप्रदेशावर लोळत होते. त्याचे डोळे काळेभोर असून ते अद्वितीय शौर्यानें चमकत होते. त्याच्या कमरेस एक लांब तरवार होती, आणि हातांत एक तीक्ष्ण धारेचा जंबिया होता. या तरुणाकडे लक्ष्य जातांच विक्रमसेनानें ही आपली बहीण दमयंती पुरुषवेषानें आली आहे, असें तत्काल ओळखिलें!

विक्रमसेन तिला म्हणाला,-'शेवटीं तूं आपला हट्ट पुरा केलास! तुला मीं येऊं नको असें सांगितलें असतां तूं तें ऐकिलें नाहींस!'

ती मोठ्या त्वेषानें एकाद्या नागिणीप्रमाणें फूत्कार करीत म्हणाली,-'मी आज अडीच वर्षें ज्या वेळेची वाट पहात बसलें होतें, ती वेळ प्राप्त झाली असतां स्वस्थ कशी बसेन! माझा बळी माझ्याच हातानें पडला पाहिजे!'

विक्रमसेन बोलला,-' पण प्रसंग मोठा आणीबाणीचा आहे. सावधपणानें वाग, एवढीच सूचना मी आतां तुला देत आहें, तीं नीट ध्यानीं असूं दे !'

इतकें त्यांचें संभाषण होत आहे, तोंच राजवाड्यांतून चूडामणीची गर्जना त्याच्या कानीं आली, म्हणून आपल्या शिपायांसह तो आंत घुसला. विक्रमसेन आंत जाण्यापूर्वी सुमारें शंभर शिपाई राजवाड्यांत घुसले होते, आणि जीं कोणी राजवाड्यांतील माणसें त्यांच्या नजरेस पडतील त्यांचा प्राण घेण्यास त्यांनीं प्रारंभ केला होता. दृढसंध, चूडामणि, शेखर वगैरे राजघराण्यांतील माणसें दुसऱ्या मजल्यावर निजत असतात, हें दुर्मुखाच्या तोंडून कत्तल करावयास आलेल्या शिपायांस पूर्वीच समजलें असल्यामुळें, त्यांनीं एकदम मुख्य जिन्याकडे धांव घेतली होती. ते जिन्यापाशीं जाऊन पोंचतांत न पोंचतात, तोंच तेथें एकाद्या राक्षसाप्रमाणें गर्जना करीत आणि विद्युल्लतेप्रमाणें आपली तरवार गरगर फिरवीत असलेला चूडामणि त्यांच्या नजरेस पडला. चूडामणि हा मनानें कितीही अधम असला, तरी धैर्यानें आणि शौर्यानें तो वीर पुरुष होता, यांत संशय नाहीं. तो यावेळीं क्रोधानें बेफाम झाला असल्यामुळें प्राणाची पर्वा न करितां युद्ध करीत होता. याप्रसंगीं सुमारें वीस शिपायांनीं त्याला गराडा घातला असून, तो तितक्यांसही आपल्या तरवारीचें पाणी दाखवीत होता. त्यानें दहापांच पळांच्या आत पांच सहा शिपाई जमीनदोस्त केले ! इतक्यांत 'शाबास ! शाबास !' असा दृढसंधाचा उत्तेजक शब्द त्याच्या कानीं पडला, आणि त्याला दुप्पट अवसान आलें. ज्याप्रमाणें जिवावर उदार झालेला सिंह पारध्यांवर तुटून पडतो, त्याप्रमाणें दृढसंधराजाही मोठ्या त्वेषानें शत्रूवर चालून गेला, आणि चूडामणीपाशीं येऊन त्यानें शत्रुसंहाराचें काम सुरू केलें. यावेळीं त्या पिता-पुत्रांचें असामान्य रणकौशल्य पाहून शत्रु आश्चर्यानें गुंग होऊन गेले. त्या दोघांनीं सुमारें दहा पांच पळांत पंचविसांवर शिपाई यमसदनीं पाठविले. इतक्यांत जिन्यांतून पावलें वाजलेलीं शत्रूंस ऐकूं आलीं, व तिकडे त्यांची नजर गेली असतां राणी मेधावती आपलीं वस्त्रें गच्च बांधून हातीं तरवार घेऊन राक्षसांचा वध करणाऱ्या चंडिकेप्रमाणें जणुं काय आकाशांतून खालीं उतरत आहे, असा त्यांस भास झाला ! दुसऱ्याक्षणीं तिनेंही आपलें हस्तकौशल्य दाखविण्यास प्रारंभ केला !

यावेळीं ते पिता-पुत्र रक्तानें माखून लालभडक झाले होते. त्यांच्यावर वार करण्यास जो जो शिपाई पुढें जाई, त्याचा त्याचा मुर्दाच पडे ! त्या दोघांपुढें यावेळीं मुर्द्यांचा ढीग पडला होता, तथापि त्या मुर्द्यांवरून चालत जाऊन कित्येक शिपाई त्या पिता-पुत्रांवर वार करण्याचा प्रयत्न करीतच होते. तरवारीनें यांच्याशीं युद्ध करून आपला निभाव लागावयाचा नाहीं, हें लवकरच विक्रमसेनाच्या ध्यानीं आलें, आणि त्यानें आपल्या कमरेचा तमंचा हातीं घेऊन त्याचा चूडामणीवर नेम धरून तो झाडला, त्याबरोबर त्यांतील गोळी नेमकी चूडामणीच्या स्कंधप्रदेशांत शिरून तो विह्वल होऊन खालीं पडला !

इतक्या शत्रूंबरोबर आपला निभाव लागावयाचा नाहीं, हें दृढसंध केव्हांच जाणून होता. पण होईल तितका प्रयत्न करून आपला देह पडण्यापूर्वी शत्रूचा नाश करावयाचा, असा त्याचा निश्चय झालेला असल्यामुळें, तो जिवाची फारशी पर्वा न करितां लढत होता. पण आपल्या पुत्राला वर्मी गोळी लागून तो खालीं पडला, हें दृष्टीस पडतांच तो आपल्या शत्रूंकडे दुर्लक्ष्य करून आपल्या पुत्राच्या रक्षणार्थ धांवला. पण तितक्यांत त्यालाही एक गोळी लागली, आणि तो आपल्या पुत्राच्या अंगावर पडला! हें पाहतांच राणी मेधावतीही आपल्या पति-

पुत्रांपाशीं आली, आणि शत्रूंच्या तरवारींपासून त्यांचा अंत होण्यापूर्वी आपला अंत व्हावा, म्हणून तिनें आपल्या देहाचें त्या उभयतांवर आच्छादन घातलें ! हा हृदयद्रावक देखावा अवलोकन करून कित्येक शिपायांच्या हातांतिल तरवारी गळून पडल्या, पण त्या पाषाणाला–त्या मांगाला–त्या कसायाला–विक्रमसेनाला–त्याचें कांहींच वाटलें नाहीं. आपले शिपाई स्तब्ध उभे राहिले, हें पाहून तो पाषाणहृदयी–नव्हे–शून्यहृदयी विक्रमसेन पुढें झाला आणि स्त्रीहत्येची शंका मनांत न आणतां त्यानें आपल्या हातांतील तरवारीनें त्या स्त्रीचे–त्या अबलेचे–त्या वीरपत्नीचे आणि वीरमातेचे तुकडे तुकडे केले ! इतकेंच नव्हे, तर त्या अधमाधमानें घायाळ होऊन मृतप्राय पडलेल्या पिता–पुत्रांवर वारांवर वार करून आपल्या अमानुष क्रौर्याचें व आपल्या निर्लज्जपणाचें आपल्या शिपायांसमोर प्रदर्शन केलें. हा हिडिस आणि नामर्दपणाचा प्रकार त्याच्या शिपायांच्यानें पाहवेना, म्हणून ते सुद्धां तेथून एकदम मागें परतले !

हें पाहून विक्रमसेन रागानें दांत ओठ खात ओरडला,–'अरे ! इतक्यांत मागें कोठें जातां ? अजून सर्वांत अत्यंत जलाल आणि विषारी सर्पाचें मस्तक ठेंचावयाचें आहे ! त्याचा जर तुम्हीं प्राण घेतला नाहीं, तर तो तुम्हांला आतां या दरींतून बाहेर पडूं देणार नाहीं ! त्याचा प्राण घेण्यासाठीं तर हा सगळा खटाटोप !'

हे शब्द त्याच्या तोंडातून बाहेर पडतात न पडतात, तोंच शेखर तेथें येऊन दाखल झाला. सुदैवानें मातृ–पितृ–बंधुवधाचा अघोर प्रसंग संपून गेल्यावर तो तेथें येऊन पोंचला होता. त्यानें जर तो प्रकार आपल्या डोळ्यांनीं पाहिला असता, तर त्याचें सर्व धैर्य नष्ट होऊन केवळ दुःखावेगानेंच त्याचें हृदय फुटून त्याचा अंत झाला असता. तो असा एकाएकीं आपल्यासमोर आलेला पाहून विक्रमसेन प्रथमतः गांगरून गेला. पण तितक्यांत त्यानें धैर्य धरिलें, आणि त्याच्याशीं झगडण्यास प्रारंभ केला. हें पाहून त्याच्या हाताखालचे शिपाईही मागें परतले. शेखराच्या पराक्रमाचें वर्णन ज्यांच्या ज्यांच्या कानावर आलें होतें, त्यांना त्यांना अशा वीरपुरुषाबरोबर दोन हात करणें हें मोठ्या शौर्याचें आहे, इतकेंच नव्हे, तर अशा पुरुषाबरोबर युद्ध केल्यास आपला लौकिक होणार आहे, ही गोष्ट मनांत आल्यामुळेंच ते मागें परतून युद्धास सिद्ध झाले होते. विक्रमसेनाच्या आज्ञेनें ते मागें फिरले नव्हते. त्या सर्वांनीं शेखराभोंवतीं गराडा घातला, व पुनः घोर युद्धास प्रारंभ केला. देवसेनानी कार्तिकेयाप्रमाणें तो तरुण कुमार निर्भय अंतःकरणानें शत्रूचा संहार करूं लागला. लवकरच त्याचा सर्व देह लालभडक झाला, पण तो त्याच्या देहाला जखमा लागल्यामुळें नव्हे ! त्याच्याशीं युद्ध करणारे सैनिक त्याच्या पायांशीं आपलीं शिरकमलें वाहत असतां आपल्या रक्तानें त्याला स्नान घालित होते ! दृढसंध आणि चूडामणि यांचें शौर्य पाहून त्या सैनिकांच्या अंतःकरणांवर जो परिणाम झाला होता, तो शेखराच्या शौर्यानें फिक्का पडला ! ते दोघे शौर्यानें लढत होते हें खरें, पण ते क्रोधवश होऊन देहभान विसरून लढत होते; परंतु शेखर अशा खडतर प्रसंगीं प्रत्येक शत्रूवर पूर्ण अवधान ठेवून लढत होता !

पण असा प्रकार किती वेळ निभावणार ? शेंकडों शत्रूंपुढें एकटा आत्मसंरक्षण किती वेळ करणार ? वेळ मोठी आणीबाणीची आली होती. तो नुकताच धांवत आला असल्यामुळें त्याची शक्ति क्षीण झालेली होती. आपलें अवसान सुटूं लागलें, हें त्याच्या ध्यानांत आलें. यापुढें आपल्या प्राणांची आशा सोडून द्यावी, असें त्याच्या मनांत येऊं लागलें, इतक्यांत त्याच्या मागच्या बाजूस भयंकर किंकाळी ऐकूं आली; आपला

विश्वासु सेवक आणि अद्वितीय वीर जांघिळ आपल्या साह्यास आला, असें शेखराला आढळून आलें.

इतक्यांत 'महाराज! या दुष्टांनीं सर्व राजकुलाचा विध्वंस केला आहे! निदान तुम्ही तरी आपले प्राण वांचवा! दृढसंध महाराज तर आपल्या प्रजेला सोडून गेलेच आहेत! त्यांच्यामागें त्यांना तिलांजुलि यावयास आपल्यावांचून कोणी उरलें नाहीं! आपले, आपल्या पत्नीचे आणि आपल्या पुत्राचे प्राण वांचवा! अजून वरच्या मजल्यावर शत्रूचा प्रवेश झाला नाहीं!' असे कोणा स्त्रीचे शब्द त्याच्या कानीं पडले.

आपल्या प्रियतमेचें आणि पुत्राचें शेखराला या निपुणिकेच्या शब्दांनीं स्मरण झालें! आपण पुढें काय करावें याचा शेखराला क्षणमात्र विचार पडला! शत्रूसमोरून पळून गेल्यास क्षात्रधर्माला बट्टा लागेल, व न गेल्यास पत्नी आणि पुत्र यांचा घात होईल, अशा अडचणींत त्याचें मन द्विधा झालें. इतक्यांत जांघिळ गर्जता करून म्हणाला,—'राजपुत्रा, विचार कसला करतोस! जा! आपल्या पत्नीचें आणि पुत्राचें रक्षण कर! एकट्याला शेंकडों लोकांनीं गांठून त्याचा प्राण घेण्याचा प्रयत्न करणें हें युद्ध नव्हे; याप्रसंगीं तूं मागें परतलास तरी तुला कोणी दोष देणार नाहीं! जा! जा! पळ! मी एकटा शत्रूचा समाचार घेतों.'

असें बोलत जांघिळानें शत्रूंचा गराडा फोडून शेखराला मार्ग मोकळा करून दिला! आणि तो अचाट पुरुष आपल्या तरवारीनें प्रळयकाळच्या महारुद्राप्रमाणें किंवा किरातरूप धारण करणाऱ्या शंकराप्रमाणें शत्रुसैन्याचा संहार करूं लागला. त्यानें पहिल्या सडाक्यास विक्रमसेनावर लगट केली. विक्रमसेन त्या राक्षसी भिल्लास पाहिल्याबरोबरच घाबरून गेला! तो एकेक पाऊल मागें मागें घेऊं लागला. इतर सैनिकांचीही तीच अवस्था झाली.

राजवाड्यांत शिरल्यापासून फक्त चारच वीरपुरुषांशीं त्या शिपायांची गांठ पडली, पण त्या चार वीरांनीं वीस वीस, पंचवीस पंचवीस शिपायांशीं एकट्यानें लढून शौर्याची कमाल केली! यांच्याप्रमाणेंच जर या दरींतील इतर भिल्ल असतील, तर आपणांपैकीं एक तरी शिपाई झालेलें वर्तमान सांगण्यास परत जाईल कीं नाहीं, याची विक्रमसेनाच्या सैनिकांच्या मनांत शंका उत्पन्न झाली! जांघिळाचा वार ज्या ज्या शिपायावर पडला तो तो जमिनदोस्तच झाला! विक्रमसेनानें कसा बसा आपला जीव वांचविला आणि तो मागें झाला; नंतर तो मोठ्यानें ओरडून म्हणाला,—'पहातां काय! गोळ्या झाडा! एरव्हीं इलाज नाहीं!'

विक्रमसेनाच्या हातासालच्या सर्व लोकांपाशीं जरी नाहींत तरी पुष्कळांशीं बंदुकी होत्या, पण इतका वेळ त्यांचा उपयोग करण्यासारखा प्रसंगच आला नाहीं. जे शिपाई पुढें लढत होते, त्यांना आपल्या बंदुकीस हात घालण्यासुद्धां सवड नव्हती, आणि जे मागें होते, त्यांना गोळ्या झाडण्यास वाव नव्हता. गोळी झाडल्यास ती शत्रूला लागण्यापेक्षां आपल्या पक्षांतील शिपायास लागण्याचा संभव अधिक होता. यामुळें त्यांच्या बंदुकी असून—नसून सारख्याच झाल्या होत्या. विक्रमसेनानें हुकूम केला म्हणून नव्हे, तर या राक्षसापासून आपले प्राण वांचविण्यासाठीं कित्येक शिपायांनीं गोळ्या स्वकीयांस लागतील ही भीति बाजूस ठेवून एकदम आपल्या बंदुकी झाडल्या! त्यांतील दोनतीन गोळ्या जांघिळाला लागल्यामुळें तो विकलगात्र होऊन जमिनीवर पडला!

ज्याचें मस्तक भ्रमत आहे, हृदयांत सहस्रावधि विंचू डसल्याप्रमाणें अनिवार यातना होत आहेत, आपल्या पत्नीचें आणि पुत्राचें काय झालें असेल, या नुसत्या शंकेनेंच ज्याला वज्रपाताप्रमाणें दुःख होत आहे, असा शेखर मोठ्या जलदीनें—शिपायांची

प्रेतें तुडवीत जिना चढून वर गेला। तो इकडे तिकडे न पाहतां एकदम आपल्या शय्यागारांत घुसला, तोंच तेथें विलक्षण देखावा त्याच्या नजरेस पडला। जिचे केंस पाठीवर लोंळत असल्यामुळें आणि कमी उंचीमुळें पुरुषवेष धारण केला असतांही ही स्त्री आहे असें एकदम लक्ष्यांत येत आहे, अशी एका हातीं नागवा संजीर आणि दुसऱ्या हातीं दिवा असलेली दमयंती त्याच्या दृष्टीस पडली। ती आपल्या पत्नीच्या पलंगापाशीं उभी असून त्या पलंगावर आपली पत्नी निजली आहे, हें दृष्टीस पडतांच तो दचकला, आणि मोठ्या वेगानें पुढें धांवला। तरी तितक्यांत त्या घातकी स्त्रीचा जंबियासह हात खालीं झालाच! दमयंतीनें शेखर शय्यागारांत घुसत आहे हें पाहून इतकी त्वरा केली होती! दुसऱ्याक्षणीं त्याच संजिराचा नेम धरून ती शेखराकडे मागें वळली. पण शेखरानें तिचा हात धरून तिच्या हातांतील जंबिया काढून घेतला, आणि तो त्यानें लांब झुगारून दिला.

ती झटक्यासरशीं शेखराच्या हातून निसटली, आणि विकट हास्य करून म्हणाली,– 'नीचा, जिच्यावर फिदा होऊन तूं माझ्या प्रेमाचा तिरस्कार केलास, तिचा प्राण घेऊन मीं आपला सूड उगविला आहे! आतां मी मेलें तरी सुखानें मरेन.' असें बोलून ती तेथून एकदम पळत सुटली। ती जरी तेथें आणखी कांहीं वेळ उभी असती, तरी शेखरानें तिच्याकडे ढुंकून देखील पाहिलें नसतें.

सध्यां तेथें काळोख मिट्ट पडला होता. तरी शेखराला दिवा लावण्याचीं साधनें कोठें आहेत हें माहीत असल्यामुळें त्यानें शक्य तितक्या जलदीनें दिवा लाविला, आणि तो आपल्या पत्नीच्या पलंगापाशीं गेला.

पण पलगांवर कोण होतें? जखमेनें रक्तबंबाळ झालेली मथुरा तेथें होती!

प्रियवंदा आणि बालक हीं कोठें गेलीं?

प्रकरण ५४ वें.

दुःखांत सुख.

त्या रात्रीं शेखरावर इतकीं संकटें आलीं होतीं, इतके भयंकर प्रसंग त्याच्या नजरेस आले होते, इतका रक्तपात त्याच्या दृष्टीस पडला होता, कीं ज्यावेळीं दमयंतीनें मथुरेच्या शरीरांत आपला जंबिया खुपसला त्यावेळीं त्याला त्या गोष्टीचें बिलकुल आश्चर्य वाटलें नाहीं! इतर प्रसंगीं हें अघोर कृत्य पाहून त्याच्या शरिरावर भयानें कांटा उभा राहिला असता; पण या प्रसंगीं त्याचें मन निर्ढावलेलें असल्यामुळें त्याच्या मनास त्या गोष्टीचें विशेष दुःख झालें नाहीं, किंवा त्याला त्वेषही आला नाहीं. त्यांतल्यात्यांत दमयंतीनें जिच्यावर हत्यार धरिलें होतें, तीं आपली पत्नी नव्हे असें जेव्हां त्याच्या लक्ष्यांत आलें, तेव्हां त्याला किंचित् समाधान वाटलें असल्यास त्यांत मोठेंसें नवल नाहीं. दमयंतीच्या शस्त्रप्रहारानें केवढा अनर्थ केला आहे, हें तो हातीं दिवा घेऊन पाहूं लागला, त्यावेळीं त्याला असें आढळून आलें कीं, आपल्या बळीच्या उरांत जंबिया मारतांना दमयंतीचा नेम चुकला असून, तो जंबिया उरांत न घुसतां फक्त तिच्या दंडांतच घुसला आहे! मथुरा मेली, ही आपली प्रथम कल्पना चुकीची असून ती अद्यापि जिवंत आहे! ही गोष्ट ध्यानीं येतांच शेखराच्या अंतःकरणांतील भूतदया जागृत झाली, व त्यानें ती जखम तपासण्यास प्रारंभ केला. त्यावेळीं जखम जरी बरीच मोठी आहे, तरी तिचा प्राणांत करण्यास पुरेशी मोठी नाहीं, हें त्याच्या ध्यानीं आलें. त्यानें लागलीच वस्त्राची एक पट्टी फाडून तिची जखम बांधिली. यावेळीं मथुरा सावध होऊं लागली होती.

वाड्यांत एवढी धामधूम झाली असतां मथुरा अद्यापि बिछान्यांतच होती, याचें

कारण सांगणें येथें अवश्य आहे. सुरुंगाचा धडाका उडाल्याबरोबर ती जागी झाली, आणि पलंगावरून खालीं उतरून ती दिवाणखान्याच्या बाहेर येण्यासाठीं दरवाज्याकडे धांवली; पण ती त्या दिवाणखान्यांतच काय, तर त्या राजवाड्यांत नवखी असल्यामुळें तिला दरवाजा सांपडला नाहीं. त्या दिवाणखान्यांत दिवा नव्हता, असें आम्ही पूर्वी सांगितलेंच आहे. सुरुंग उडाल्यानंतर सुमारें दहापांच पळांच्या आंतच खालच्या मजल्यांतून विक्राळ किंकाळ्या तिच्या कानावर आल्या. तीं ज्या संकटाची सूचना देण्यासाठीं येथें आलीं होतीं, त्या संकटास प्रारंभ झाला, असें एकदम तिच्या मनांत आलें. राजवाड्यांत चालू असलेला हाहाःकार तिच्या कानावर अधिकाधिक आदळूं लागला. येथून आपण बाहेर पडावें म्हणून ती अधिक आतुर होऊन दरवाजा शोधूं लागली, पण तिचा तो प्रयत्न यशस्वी झाला नाहीं. हृदयद्रावक किंकाळ्या, शस्त्रांचा खणखणाट आणि वीरगर्जना यांचा कोलाहल तिच्या कोंवळ्या अंतःकरणास दुःसह झाला! तिचें मस्तक भ्रमूं लागलें, तिच्या डोळ्यांसमोर काजवे चमकूं लागले, अंगास दरदरून घाम सुटला; आपणास मूर्च्छा येत आहे, असें तत्काल तिच्या ध्यानांत आलें, आणि ती पलंगाकडे निघाली; सुदैवानें पलंग तिला सांपडला, आणि त्यावर ती जाऊन पडली, तोंच तिला मूर्च्छा आली, रक्तमोक्ष करणें हा उपाय प्रबल मूर्च्छेवर कित्येक वेळां फार गुणकारक होत असतो. दमयंतीच्या शस्त्रप्रहारानें तिच्या दंडांतून बरेंच रक्त वाहून गेल्यामुळें ती शुद्धीवर आली, हें पाहतांच तिचें रक्षण करणें हें आपलें कर्तव्य आहे, असें त्याला वाटूं लागलें. राजवाड्यांत यापुढें राहणें धोक्याचें आहे, हें त्याला ढळढळीत दिसत होतें; अर्थात् तिला तेथून बाहेर काढणें त्याला अवश्य वाटलें. राजवाड्यांतील दंगा बराच शांत झाला आहे, ही गोष्टही त्याच्या ध्यानीं आली. शेखरानें मथुरेला खांद्यावर टाकिलें, आणि तो थोरल्या जिन्याकडे येऊं लागला. तोच त्याला चमत्कारिक घाण आली! आपल्या विपत्तींत आणखी भर घालण्यासाठीं मृत्यूबरोबर अग्नीनेंही येथें आगमन केलें आहे, ही गोष्ट त्याच्या ध्यानीं आली. तों झटक्यासरसा मागें परतला, आणि राजवाड्यांतील मागच्या भागांत जो जिना होता, तिकडे त्यानें धांव घेतली! त्या जिन्यावरून तो खालीं उतरला, तोंच राजवाड्याच्या पुढील मागास आग लागल्यामुळें तेथें भडकलेल्या ज्वाला त्याच्या नजरेस पडल्या! या वेळीं आपले आणि मथुरेचे प्राण वांचविणें हीच गोष्ट काय ती त्याच्या नजरेसमोर असल्यामुळें, त्यानें एकदम राजवाड्याच्या पिछाडीचा मार्ग धरिला. या बाजूस शत्रूचे लोक असतील, अशी त्याची कल्पना होती, पण तसा कांहीं प्रकार तेथें त्याच्या दृष्टीस पडला नाहीं. तो सपाट्यानें बाहेर पडला, आणि राजवाड्याच्या पिछाडीस असलेला डोंगर चढण्यास त्यानें प्रारंभ केला. तेथून त्यानें फक्त एकदांच मागें नजर टाकली, त्यावेळीं राजवाड्याच्या अघाडीचा भाग अग्नीनें पूर्णपणें व्यापून टाकला आहे, असें त्याच्या नजरेस पडलें, आणि त्याचक्षणीं शहरांतील व दरींतील भिल्ल मोठ्या त्वरेनें हातीं चुडी, दिवट्या, मशाली घेऊन राजवाड्याकडे धांव घेत आहेत, असें त्याच्या नजरेस आलें. शेखराला डोंगराकडे सोडून देऊन आपण आतां जरा विक्रमसेनाकडे वळूं.

कालस्वरूपी जांघिळाशीं युद्ध करतांना विक्रमसेन आणि त्याचे सैनिक यांची किती धांदल उडाली होती, तें आम्हीं वर सांगितलेंच आहे. विक्रमसेन कसाबसा आपला जीव घेऊन त्या अडचणीच्या जाग्यांतून बाहेर पडला. बाहेरील अंगणांत त्यानें पाय ठेवला, त्याच वेळीं जांघिळाचा गोळीनें अंत

झाला होता. शेखर आयत्या वेळीं आपल्या हातून निसटला, याचें त्याला फार वाईट वाटत होतें. म्हणून त्यानें पुनः आपल्या सैनिकांस वाड्यांत घुसण्याचा हुकूम केला, पण त्यानें निर्लज्जपणानें स्त्रीहत्या केली, ही गोष्ट त्या सैनिकांस मुळींच आवडली नसल्यामुळें त्यांनीं त्याची आज्ञा ऐकिली नाहीं. शिवाय त्याच वेळीं शहरांतील कित्येक हत्यारबंद लोक राजवाड्याच्या पुढील देवडीवरून आंत घुसूं लागले होते, आणि दरींतील इतर भिल्लही आपापल्या शस्त्रास्त्रांनीं सज्ज होऊन राजवाड्याकडे धांवून येत होते. तोफेचा आवाज कानीं पडल्याबरोबर सर्व सैनिकांनीं एका क्षणाचाही विलंब न करितां राजवाड्यापुढील अंगणांत जमा व्हावें, अशी दृढसंधाची शिस्त असल्यामुळें, विक्रमसेनानें उडविलेल्या सुरुंगाचा धडाका कानीं पडतांच तो आवाज तोफेचा झाला असावा, अशा समजुतीनें सर्व भिल्ल सैनिक त्वरेनें राजवाड्याकडे धांव घेत होते. जशा प्रसंगीं आपण राजवाड्यांत प्रवेश केल्यास कोंडून पडल्यामुळें आयतेच शत्रूच्या हातीं लागूं, ही गोष्ट विक्रमसेनाच्या तत्काल ध्यानीं आली, आणि त्यानें तो बेत रहित केला विक्रमसेनाच्या सहाशें सैन्यापैकीं सुमारें पाऊणशें लोक कामीं आले होते. दृढसंध, चूडामणि, शेखर आणि जांघिळ या चारच पुरुषांनीं एवढा अनर्थ केला होता. शेखर अद्यापि जिवंत असल्यामुळें तो जर पुनः आपल्या सैन्यासह युद्धास आला, तर आपल्या सवा पांचशें सैन्यापैकीं झालेल्या प्रकाराची बातमी नारायणपुरीं जाऊन सांगण्यास एक तरी माणूस जिवंत राहील कीं नाहीं, याची विक्रमसेनाला शंका वाटूं लागली म्हणून त्यानें राजवाड्यास आग घालून पळून जाण्याचा बेत केला. राजवाडा फार जुनाट असल्यामुळें जुन्या लांकडांस पेट घेण्यास फारसा अवकाश लागला नाहीं. राजवाड्याच्या अंगणांत प्रवेश करावयास द्वार एकच होतें, आणि त्या द्वारांतून एका वेळीं फक्त पांचसहा माणसेंच काय तीं आंत येणें शक्य होतें. त्यामुळें विक्रमसेनाच्या सैनिकांना राजवाडा पेटेपर्यंत मिळांना थांबवून धरणें कठिण पडलें नाहीं. राजवाड्यानें चांगला पेट घेतला, हें पाहून विक्रमसेनानें आपल्या लोकांस मागें फिरण्याचा हुकूम केला. शत्रूचें सैन्य पळूं लागलें, हें पाहून कित्येक भिल्लांनीं त्यांचा पाठलाग करण्याचा बेत केला, पण राजवाड्याला आग लागलेली दृष्टीस पडतांच त्यांना मोठें वाईट वाटलें. अगोदर आग विझविण्याचा प्रयत्न करावा कीं अगोदर शत्रूचा पाठलाग करावा, हा त्यांना मोठा विचार पडला. या वेळीं त्यांना योग्य मसलत सांगण्यास सेनापतीची फार जरूर होती. ज्यावेळीं सैन्य मोहिमेवर निघे, त्यावेळीं राजकुलांतील पुरुषाकडे सैन्याचा मुख्य अधिकार असे; पण इतर वेळीं जांघिळ हा त्यांचा मुख्य असे. जांघिळ किंवा राजकुलांतील एकही पुरुष आपणास आज्ञा करण्यास पुढें येत नाहीं, या गोष्टीचा त्यांस मोठा विस्मय वाटला; अर्थात् याप्रसंगीं त्या सैनिकांना नियंता नसल्यामुळें ज्याला शत्रूचा पाठलाग करणें इष्ट वाटलें, ते शत्रूच्या मागें लागले, आणि आग विझविणें हें ज्यांना इष्ट वाटलें, ते त्या उद्योगास लागले. विक्रमसेन मोठ्या त्वरेनें सोनानदीच्या मार्गानें पुढें चालला असतां पाठलाग करणाऱ्या सैन्यानें त्याच्या पिछाडीचा पुष्कळच नाश केला, तरी तो कसाबसा आपल्या निमेशिमे लोकांनिशीं एकदांचा दरींतून बाहेर पडला.

इकडे राजवाड्यास लागलेली आग विझविण्याचा भिल्लांनीं पुष्कळ प्रयत्न केला, पण त्या प्रयत्नास यश आलें नाहीं. आग उत्तरोत्तर भडकत चालली, आणि तिनें राजवाड्याचा सर्व भाग व्यापून टाकला.

मथुरेला खांद्यावर टाकून शेखर डोंगर चढत असतां अनेक प्रकारच्या खेदयुक्त विचारांनीं त्याचें मन व्यग्र होऊन गेलें होतें.

झालेला हा सर्व प्रकार खरा आहे, कीं आपण हें एकादें स्वप्न पाहत आहों, याचा त्याला उलगडा करतां येईना ! झालेला एकंदर प्रकार इतक्या जलदीनें घडून आला होता कीं, मध्यें विचार करण्यास त्याला अणुमात्र वेळ झाला नव्हता. हा सर्व प्रकार खरा नसून हें स्वप्न आहे, किंवा हा भ्रम आहे, असें ज्यावेळीं प्रथमच त्याच्या मनांत आलें, त्यावेळीं त्यानें पुनः एकवार मागें दृष्टी फेंकली, त्याबरोबर राजवाड्याच्या गगनचुंबी ज्वाला त्याच्या दृष्टीस पडल्या ! वास्तविक पाहिलें तर या ज्वाला पाहण्यासाठीं त्याला मागें वळून पाहण्याची देखील जरूर नव्हती. तो उभा होता, त्या जागेवर लख्ख प्रकाश पडला असून, त्या थंडीच्या वेळींसुद्धां पेटलेल्या अग्नीच्या भडाक्यानें तेथें उष्मा होत होता. आपले शत्रु पळून जात असून आपले शिपाई मिळ त्यांचा पाठलाग करीत आहेत, ही गोष्ट लवकरच त्याच्या ध्यानीं आली, आणि त्याला थोडा धीर आला. आपण या वेळीं शत्रूंशीं दोन हात करावयाचे टाकून अशा रीतीनें मागें पाय घेतला, याचें त्याला फार वाईट वाटलें. अजूनही आपण शत्रूवर चालून जावें, असें त्याच्या मनांत येऊं लागलें, पण तो या वेळीं एकटा नव्हता. मथुरेचें जड ओझें त्याच्या अंगावर होतें. ती जरी यावेळीं सावध झालेली होती, तरी तिला अशक्तता फार आलेली असल्यामुळें, आत्मरक्षण करून घेण्यास ती अगदीं असमर्थ होती. तिला आपण एकटी अपरात्रीं रानांत टाकल्यास एकादें कोल्हें अगर रानटी जनावर तिच्या अंगाचे लचके तोडण्यास कमी करणार नाहीं, असें त्याच्या मनांत आलें. तो सध्यां ज्या दिशेकडे चालला होता, त्या दिशेस कोणाचें घर किंवा झोंपडें एकही नव्हतें. जर असतें, तर त्यानें मथुरेला तेथें ठेवून तो लढाईस निघून गेला असता. अर्थात् त्याला तो विचार सोडून द्यावा लागला.

आपली माता, आपला पिता, आपला बंधु, यांचा अशा रीतीनें अंत झालेला पाहून त्याच्या हृदयास ज्या वेदना होत होत्या, त्यांवर जणुं काय कळसच म्हणून आपल्या पत्नीची आणि पुत्राची कांहींच वार्ता त्याला कळली नव्हती. आपला जंबिया मथुरेच्या शरीरांत भोंसकतांना दमयंतीनें जे उद्गार काढले होतें, त्यांवरून निदान दमयंतीच्या हातून तरी आपल्या पत्नीचा अंत झाला नाहीं, असें त्याला वाटत होतें. ती ज्या अर्थीं एवढ्या गर्दीतून नेमकी आपल्या दिवाणखान्यांत आली, त्याअर्थीं तिला कोणी तरी घरभेद्या अनुकूल असला पाहिजे आणि असा घरभेद्या तिला अनुकूल असताही ज्याअर्थीं तिला आपला हेतु सिद्धीस नेतां आला नाहीं, त्या अर्थीं राजवाड्यांत गडबड सुरू होण्यापूर्वीच आपल्या पत्नीनें पुत्रासह तेथून पाय काढला असला पाहिजे, असें त्याच्या मनांत आलें. पण ती आपल्या दिवाणखान्यांतून बाहेर पडून दुसऱ्या एकाद्या दिवाणखान्यांत जाऊन लपून बसली असली तर ! अतिप्रेम मनांत वागत असलें म्हणजे प्रेमविषयक वस्तूसंबंधानें अनेक प्रकारच्या दुःखदायक शंका मनुष्याच्या मनांत येत असतात. त्यावेळीं शेखराच्या मनांत दुःखाचा जो कहर झाला होता, त्याचें यथार्थ वर्णन करणें अशक्य असल्यामुळें केवळ त्याच्या मानसिक स्थितीचें नुसतें दिग्दर्शन करून पुढें सरणें आम्हांस भाग आहे. एक प्रहरापूर्वीं जो राजपुत्र प्रत्येक प्रकारच्या कौटुंबिक सुखाचा अनुभव घेत होता, किंवा इहलोकींच्या सुखदायक गोष्टींपैकीं ज्याला एकीचीही उणीव नव्हती, तोच राजपुत्र निदान या घटकेस तरी त्या सर्व गोष्टींस पारखा झाला होता !

आपल्या नाजूक ओझ्यासह तो तसाच कांहीं वेळ पुढें चालला होता. सुमारें पाव कोस दूर गेल्यावर आतां आपण पुढें कां जावें असें त्याच्या मनांत आलें. आपल्या

मार्गे शत्रु नाहींत, किंवा आगीचें किंवा कोणत्याही प्रकारें भय नाहीं, असें असतां आपण इतका वेळ अशा रीतीनें पुढें पुढें कां चाललों आहों, याचें कारण त्याच्या ध्यानीं येईना. त्याचें मन याप्रसंगीं इतकें भांवावून गेलें होतें कीं, आपण सध्यां काय करीत आहों, याचें त्याला मुळींच भान नव्हतें. जणुं काय कत्तलीच्या स्थळापासून किंवा अग्निमुखीं पडलेल्या राजवाड्यापासून दूर जाणें हेंच आपलें कर्तव्य आहे, असें त्याच्या मनानें घेतलें होतें. पण आतां यापुढें ओझें घेऊन डोंगर चढण्याचे श्रम करणें हें वेडेपणाचें काम आहे, असें त्याच्या मनांत आलें. त्यानें तेथेंच थोडी मऊ आणि सपाट जमीन पाहून तिजवर मथुरेस ठेविलें. त्यानें यावेळीं असें केलें म्हणून बरें झालें. नाहींतर मथुरेच्या दंडाची पट्टी ढिली पडल्यामुळें जखमेंतून रक्त वाहत आहे, हें त्याच्या ध्यानांत आलें नसतें. त्यानें तिला खालीं ठेविलें, आणि तो तिची जखम पुनः तपासूं लागला. सैल पडलेली पट्टी त्यानें पुनः बांधिली. मथुरा जरी सावध होत आहे, तरी तिची प्रकृति फारच अशक्त झाली आहे, ही गोष्ट त्याच्या ध्यानीं आली. त्यानें आपल्या अंगावरचीं वस्त्रें जमिनीवर अंथरून त्यांवर मथुरेला ठेविलें; तिच्या मुखांत आणि मस्तकावर घालण्यासाठीं पाणी मिळाल्यास त्याचा फार उपयोग होईल असें त्याला वाटलें, आणि त्यानें जवळच्या एका ओढ्याकडे जाणारा मार्ग धरिला. तो सध्यां ज्या डोंगरावर आला होता, त्यावर पाण्याचा दुष्काळ नव्हता, म्हणून त्याला पाणी लवकरच मिळालें. त्याला स्वतःला तहान लागलेली असल्यामुळें तो स्वतः यथेच्छ पाणी प्याला, आणि आपल्या अंगावरील एक वस्त्र भिजवून घेऊन तो परत मथुरेपाशीं आला. त्यानें त्या उदकाचा योग्य उपयोग केला. थोड्या वेळानें मथुरा सावध झाली, आणि आपल्याभोंवतीं पाहूं लागली; परंतु तिला तेथील देखावा फारच चमत्कारिक वाटला. तिची यावेळची तीं स्थिति पाहून शेखरानें तिला आश्वासन दिलें. राजवाड्याची आग डोंगरावर, चोंहींकडे फांकली असल्यामुळें त्या ठिकाणीं सूर्यप्रकाशाप्रमाणें लख्ख उजेड पडला होता. आपल्याप्रमाणेंच राजवाड्यांतून कोणी माणसें पळून येऊन त्यांनीं या डोंगराचा आश्रय केला नसेल ना, अशी शंका शेखराच्या अंतःकरणांत उद्भवली, आणि आपली दृष्टि पोंचेल, तितका प्रदेश तो सावकाशपणें पाहूं लागला.

तो डोंगराचें सूक्ष्म दृष्टीनें निरीक्षण करीत असतां तेथून बऱ्याच अंतरावर एक स्त्री उभी असलेली त्याच्या दृष्टीस पडली. ही आपली पत्नीच असेल, असें एकदम त्याच्या मनांत आलें. मथुरा यावेळीं बरीच शुद्धीवर आलेली होती, म्हणून ती स्त्री कोण आहे, याचा तपास करून परत येईपर्यंत तिला तेथेंच ठेवण्यास त्याला हरकत वाटली नाहीं, आणि तो मोठ्या जलदीनें तिकडे निघाला. शेखर आपणांकडे येत आहे असें दृष्टीस पडतांच पुढील स्त्री मोठ्या त्वरेनें पावलें उचलून पळूं लागली ! हें मोठें लचांड झालें ! त्या दोघांमध्यें अंतर पुष्कळ असल्यामुळें ओरडण्याचा कांहींच उपयोग नव्हता. शेखराची शक्ति यावेळीं बरीच क्षीण झाली होती, तरी अंतःकरणांत उत्पन्न झालेल्या आशेमुळें त्याला जोर चढला व तो मोठ्या त्वरेनें चालूं लागला. आपला शब्द तिला ऐकूं येईल इतकें अंतर तोडल्यावर तो ओरडून म्हणाला,—'हे स्त्रिये, तुला मजपासून भीति बाळगण्याचें कारण नाहीं. मी राजपुत्र शेखर असून तूं जर आमच्याच पक्षांतील असशील, तर तुला मी याप्रसंगीं शक्य तें साहाय्य करीन.'

हे त्याचे सगळे शब्द त्या स्त्रीच्या कानावर गेले असतील कीं नाहीं, याची शंकाच होती, पण शेखरानें आपल्या नांवावर विशेष जोर देऊन तो शब्द उच्चारिला असल्यामुळें,

तेवढाच तिला ऐकूं आला होता; म्हणून ती स्त्री उभी राहिली. हें पाहून तो तिच्यापाशीं आला, त्यावेळीं ही निपुणिका आहे, असें त्याला आढळून आलें. तिला पाहून त्याला जरी प्रथम निराशा वाटली, तरी या कत्तलींत तिचा प्राण वांचला, याचा त्याला आनंद झाला.

त्या प्रसंगीं त्या उभयतांचें काय भाषण झालें असेल, हें आम्ही विस्तारानें सांगत नाहीं. शेखर विक्रमसेनाशीं जिवावर उदार होऊन लढत असतां निपुणिकेनें त्याला जी सूचना दिली होती, ती एका दाढीवाल्यासह एक पुरुषवेष घेतलेली स्त्री वरच्या मजल्यावर जात आहे, ही गोष्ट तिच्या नजरेस पडल्यामुळेंच तिनें दिली होती. राजवाड्यांत कत्तल सुरू झालेली तिनें प्रत्यक्ष पाहिली असल्यामुळें तिनें मागच्या दरवाज्यांतून पाय काढून आत्मरक्षणासाठीं डोंगराचा मार्ग धरिला होता. याशिवाय शेखराला तिच्या मुखानें एक आशाजनक बातमी ऐकूं आली. सुमारें अर्ध घटकेपूर्वी म्हणजे राजवाड्याच्या पहिल्या ज्वालेनें डोंगरांत प्रकाश पडला त्या वेळीं आपल्या पुढें आणखी एक स्त्री जात आहे, असें आपणांस आढळून आलें, असें तिनें शेखराला सांगितलें. अर्थात् शेखराच्या अंतःकरणांत पुनः आशा उत्पन्न झाली. त्यानें जेथें मथुरेला ठेविलें होतें, त्या जागेच्या खाणाखुणा निपुणिकेला सांगून तिला तिकडे पाठवून दिलें, आणि तिनें दाखविलेल्या दिशेनें तो आपल्या पत्नीच्या शोधार्थ निघाला.

आजूबाजूस प्रत्येक झाडाखालीं किंवा मनुष्यास बसण्यासारखी सोईची जागा जेथें जेथें दिसली, तेथें तेथें नजर टाकीत शेखर पुढें चालला असतां, थोड्याच वेळानें त्याला चमत्कारिक ध्वनि ऐकूं आला. त्या ध्वनीच्या अनुरोधानें तो पुढें चालला असतां बालकाच्या रोदनाचा शब्द त्याला उत्तरोत्तर स्पष्ट ऐकूं येऊं लागला. आणखी शंपन्नास पावलें पुढें गेल्यावर हा रोदनस्वर आपल्या पुत्राचाच आहे, असें त्याच्या ध्यानीं आलें, आणि त्याचें हृदय आनंदानें उचंबळूं लागलें।

जणुं काय त्याच्या अंगांत अद्वितीय शक्तीचा प्रवेश झाला. तो मोठ्या सपाट्यानें रोदनस्वराच्या आधारानें पळत सुटला, आणि पांच चार पळांतच त्यानें आपल्या पुत्राला आपल्या हृदयाशीं आंवळून धरिलें। याप्रसंगीं प्रियंवदेनें किती हर्षानें आपल्या पतीला आलिंगन दिलें असेल बरें! याप्रसंगीं ती उभयतां आपण जणुं काय प्रत्यक्ष नंदनवनांत आहों, असें समजत होतीं. कित्येक वर्षे लोटल्यानंतर पति-पत्नींची भेट झाली असतां जसा त्यांना आनंद होत असतो, त्याहून शतपट आनंद त्यांना या प्रसंगीं झाला होता. नुकताच घडून आलेला भयंकर-राक्षसी-अमानुष-जणुं काय प्रलय काळचा भास उत्पन्न करणारा प्रकार त्यांच्या मनांतून पार नाहींसा होऊन गेला होता! आपण तिघें याप्रसंगीं जिवंत राहिलों, या गोष्टीचा त्यांना जो आनंद वाटत होता, त्यापुढें शेखर आपल्या माता-पितरांच्या वधाचें दुःख विसरून गेला होता, असें म्हणावयास हरकत नाहीं। ज्याला मानवी स्वभावाच्या स्वार्थाची कल्पना यथार्थ झाली असेल, तो सहृदय वाचक याप्रसंगीं शेखराला इतका आनंद झाल्याबद्दल दोष देणार नाहीं.

परंतु हा त्यांचा आनंदाचा उमाळा फार वेळ टिकणें शक्य नव्हतें. आपण निघून आल्यानंतर राजवाड्यांत काय काय प्रकार घडला, त्यासंबंधाचे प्रश्नांवर प्रश्न विचारण्यास प्रियंवदेनें प्रारंभ केला. बिचारा शेखर त्या प्रश्नांचीं काय उत्तरें देणार! राजवाड्यांतील सर्व देखावा एका क्षणार्धांत त्याच्या नजरेसमोर दिसूं लागला! त्याच्या मुखांतून शब्द बाहेर पडेना! आपल्या हातांनीं आपलें तोंड झांकून घेऊन तो ढळढळां रडूं लागला! ही त्या वीरपुरुषाची अवस्था पाहून प्रियंवदेनें झालेल्या प्रकाराचें तत्काल अनुमान केलें, आणि तीही हृदय-

द्रावक किंकाळ्या फोडून रडूं लागली। प्रसंग असा विलक्षण होता कीं, त्या उभयतांना एकमेकांचें समाधान आपापल्या अश्रूंनींच करणें जरूर होतें. हा प्रकार बंद होण्यास लवकरच एक कारण घडून आलें. आपलीं माता-पितरें आपल्यासारखीं रडत असलेलीं त्या अर्भकानें यापूर्वी कधींच पाहिलीं नसल्यामुळें हा देखावा दृष्टीस पडतांच तोही रडूं लागला. अर्थात् आपलें मन आणि रोदन आंवरून आपल्या लहानग्याचें समाधान करणें त्यांस जरूर झालें; व त्यांनीं धैर्य धरून आपल्या मुलाला उगें करण्याचा प्रयत्न केला. नंतर आपण पुढें काय करावयाचें हा विचार त्यांच्या मनांत आला.

प्रियंवदा येथें कशी आली होती, हें सांगणें फारसें कठिण नाहीं. सालीं चाललेली ओरड कानीं पडतांच प्रियंवदेनें आपल्या मुलास कडेवर घेतलें, आणि तिनें मागच्या जिन्याकडे धांव घेतली. त्या जिन्यानें तळमजल्यावर आल्याबरोबर तिनें राजवाड्यांतून बाहेर पडण्याचा जो दरवाजा प्रथम तिच्या दृष्टीस पडला, त्यांतून बाहेर पडून डोंगराचा मार्ग धरिला. राजवाड्याच्या पिछाडीस पुष्कळ दरवाजे होते. त्यामुळें ज्या वेळीं शेखर राजवाड्यांत शिरला, त्याच वेळीं प्रियंवदा बाहेर पडली असतांही, त्यांची चुकामूक पडली होती. राजवाड्यांतून बाहेर पडल्याबरोबर तिनें हातांतील दिवा मालवून टाकून दिला, आणि एकदम ती डोंगर चढूं लागली. राजवाड्यांतील भयंकर प्रसंगांत सांपडलेल्या माणसांच्या किंकाळ्या जसजशा तिच्या कानांवर अधिकाधिक पडूं लागल्या, तसतशी ती अधिकाधिक वेगानें पुढें पुढें चालली.

राजवाड्यांत परत जाण्याची गोष्ट त्यांना आतां मनांतसुद्धां आणावयास नको होती. अर्थात् शहरांतील एकाद्या प्रतिष्ठित गृहस्थाच्या घरीं मथुरेला ठेवून आपण वत्सपुरीं जावें, असा त्यांनीं बेत केला. तीं सध्यां राजवाड्यापासून सुमारें अर्धा कोस दूर होतीं. तेथून निम्मे अंतरावर शेखरानें मथुरेला ठेविलें होतें. आपल्या पत्नीसह आणि पुत्रासह शेखर मोठ्या त्वरेनें मथुरेपाशीं आला. त्या वेळीं मथुरेपाशीं एकटी निपुणिका नसून आणखी एक तरुण तेथें उभा आहे, असें त्याला लांबूनच दिसलें. कदाचित् तो तरुण पुरुष शत्रुपक्षांतील तर नसेल ना, असें शेखराच्या एकदम मनांत आलें, आणि त्याचा हात तरवारीकडे वळला. पण आणखी थोडें पुढें आल्यावर त्याला चतुरकाची ओळख पटली, आणि आपला इमानी सेवक या अनर्थांतून बचावला, याचा त्याला आनंद झाला.

शेखर, जांघिळ आणि चतुरक हे तिघेजण शत्रूची फळी फोडून राजवाड्याकडे धांवत सुटले, पण चतुरकाचा धांवतांना त्या दोघांबरोबर निभाव लागला नाहीं, आणि तो मागें पडला, हें आम्ही पूर्वी सांगितलेंच आहे. तो आपल्या सामर्थ्याप्रमाणें धांवत असतां काळोखामध्यें त्याचा पाय वांकडा पडल्यामुळें तो मुरडला, आणि त्याला चालतां येईनासें झालें. तो पडल्या जाग्यावरून कसाबसा उठला, पण त्याच्यानें पुढें पाऊल टाकवेना. अर्थात् त्याला एका पावलावर भार टाकून राजवाड्यापर्यंतचा पल्ला गांठणें जरूर होतें. पण तो लंगडत लंगडत सुमारें शंपन्नास पावलें पुढें गेला असेल नसेल, तोंच त्याला राजवाड्यांतील हृदयद्रावक किंकाळ्या ऐकूं आल्या. थोड्या वेळानें प्रियंवदा आपल्या मुलास कडेवर घेऊन डोंगरांतून पळतांना दिसली, त्यावरून राजवाड्यांत कांहीं तरी प्रळय घडला असावा, असें त्याच्या मनांत आलें. त्यानें तिला मोठमोठ्यानें हांका मारिल्या, पण त्यावेळीं प्रियंवदेचें मन थाऱ्यावर नसल्यामुळें, तिला त्याची एकही हाक ऐकूं आली नाहीं, आणि ती सपाट्यानें पुढें निघून गेली. म्हणून चतुरकही राजवाड्याकडे न जातां

मागें परतून प्रियंवदा जिकडे गेली, तिकडे जावयास निघाला; पण त्याचा एक पाय निकामी झाला असल्यामुळें, त्याच्यानें तिला गांठवलें नाहीं. एका पायावर भार घेऊन जात असतां थोड्या वेळानें त्याचा तोही पाय दमला, आणि त्याला मध्येंच विश्रांति घेणें जरूर झालें. शेखरानें जेथें मथुरेला ठेविलें होतें, त्या जागेपासून थोड्याच अंतरावर असलेल्या एका झाडाआड बसून तो आपल्या पायांची तपासणी करीत असल्यामुळें शेखरावर त्याची नजर गेली नाहीं. परंतु निपुणिका जेव्हां शेखराच्या सांगण्याप्रमाणें मथुरेपाशीं आली, तेव्हां त्याची नजर तिजवर गेली, आणि त्यानें तिला हांक मारिली. निपुणिका आणि चतुरक यांचें अलीकडे परस्परांवर प्रेम जडत चाललें असल्यामुळें अशा स्थितींत एकमेकांची भेट झाली, या गोष्टीचा त्या उभयतांसही मोठा हर्ष झाला होता.

या भयंकर प्रसंगांतून नांव घेण्यासारखीं माणसें निभावलीं तीं एवढींच ! यांच्याशिवाय आणखी पांचचार दासी फार तर बचावल्या असतील ! कारण सुरुंगाचा धडाका उडतांच जीं माणसें राजवाड्याच्या पिछाडीकडे आलीं, त्यांना शत्रूंचा उपसर्ग झाला नव्हता; पण आवाज कशाचा झाला हें पाहण्यासाठीं जीं चाकरमाणसें राजवाड्याच्या पुढच्या दरवाज्याकडे गेलीं होतीं, तीं सर्व विक्रमसेनाच्या आणि त्याच्या सेवकांच्या तरवारींस बळीं पडलीं !

हा सर्व बंधुद्वेषाचा परिणाम ! या कथानकास प्रारंभ झाल्यापासून आतांपर्यंत ज्या ज्या गोष्टी घडून आल्या, त्या त्या वाचकांच्या स्मरणांत असतीलच. चूडामणीनें जर शेखराचा द्वेष केला नसता, आणि आपल्या द्वेषबुद्धीस महीपुरच्या लढाईच्या वेळीं जर त्यानें शेखराचा बळी दिला नसता, तर निंबराजाचें राज्य झालें नसतें, आणि बृहद्रथ व विक्रमसेन यांस असलें नीच कारस्थान करण्यास संधीच सांपडली नसती. प्रथमतः 'सरदार हलधर' या नांवानें जेव्हां निंबराज प्रतापपुरीं आला होता, तेव्हां जर चूडामणीनें त्याच्याशीं केवळ बंधुद्वेषानें प्रेरित होऊन माणुसकीला न शोभण्यासारखें वर्तन केलें नसतें, तर त्याच्याविषयीं निंबराजाच्या मनांत इतका वैरभाव बाणला नसता. शेखराचें वर्तन हलधराशीं किंवा निंबराजाशीं मित्रत्वाचें होतें, म्हणूनच चूडामणीचें वर्तन त्याच्याशीं शत्रुत्वाचें होतें, निंबराजाचे प्राण वांचवावे अशी शेखराची इच्छा होती, म्हणूनच त्याचा प्राण घ्यावा असें चूडामणीस वाटत होतें. शेखरावर त्यानें नसतें कुभांड रचून दुर्मुखासारख्या नीच आणि विश्वासघातकी माणसाबरोबर त्याला भृगुकच्छ-नगरीं पाठविलें नसतें, तर दमयंतीची व शेखराची भेट होऊन तिचें वैर संपादन करण्याचा त्याच्यावर प्रसंगच आला नसता. त्याचप्रमाणें चूडामणीवर दृढसंधाची अवकृपा झाली नसती, आणि त्याला भृगुकच्छ-नगरांतील राजकारस्थानांत पडून खुनासारखें अघोर कृत्य करून आपल्या अब्रूस काळें लावून घेण्याची संधि आली नसती. हे दोघे शूर बंधु जर एकोप्यानें वागले असते, तर रत्नाकर राजाला बंधमुक्त करून त्यांनीं पुनः खात्रीनें त्याला गादीवर बसविलें असतें, आणि हेमचंद्रासारख्या विद्वान् पुरुषाच्या साह्यानें त्यांनीं राज्याचा कारभार सुयंत्र चालविला असता. चूडामणीनें बंधुद्वेषानें प्रेरित होऊन शेखराच्या नाशासाठीं जेवढे प्रयत्न केले, तेवढे सर्व त्याच्याच समूळ नाशाला कारण झाले.

त्या चौघांच्या भेटी झाल्यावर प्रथम शेखर राजवाड्यापाशीं आला. राजवाड्यांतील कत्तलींत त्याचा अंत झाला असेल असें तेथें जमलेल्या प्रजाजनांस वाटत होतें, पण तो जिवंत दृष्टीस पडताच सर्वांला मोठा आनंद झाला. त्यांना राजवाडा शिरविण्याच्या कामीं यश आलें नाहीं; तो एकसारखा पेट-

तच होता. शेखरानें आपल्या प्रजेपैकीं एका थोर गृहस्थास तीन डोल्या आणावयाची आज्ञा केली, व त्या तयार होऊन येतांच त्यानें मथुरा, चतुरक व आपली पत्नी यांस शहरांत आणिलें. इतका प्रळय घडून आला असतां यापुढें प्रतापपुरीं रहावें असें शेखरास वाटेना. शिवाय आपण या प्रसंगांतून वांचलों ही बातमी शत्रूच्या कानीं गेल्यावर ते पुनः प्रतापपुरावर हल्ला करतील, अशी धास्तीही त्याच्या मनांत वागत असल्यामुळें, पत्नीसह व पुत्रासह रातोरात वत्सपुरीं जावयाचा त्यानें विचार केला. ज्या थोर गृहस्थानें डोल्या दिल्या होत्या, त्याच्याच घरीं मथुरेला आणि चतुरकाला ठेवून निपुणिकेला त्यांच्या सेवेस राहण्याची आज्ञा केली आणि एका कुशल वैद्याला त्या दोघांना योग्य उपचार करण्याची विनंति करून शेखरानें कित्येक सशस्त्र भिल्लांसह रातोरात–किंवा पंहाटेच्या वेळीं वत्सपुरचा मार्ग धरिला.

प्रकरण ५५ वें.

विश्वासघातकी.

दरींतील भयंकर कृत्य संपविल्यानंतर ते मनुष्याचें रूप धारण करणारे राक्षस आपल्या हातांखालच्या लोकांसह नारायणपुराकडे चालते झाले. वाटेनें जात असतां दरींतील भिल्लांनीं पाठलाग करून त्यांचा बराच नाश केला होता. बृहद्रथ आणि रणमत्त हे दोघेजण विक्रमसेन आपली कामगिरी बजावून केव्हां येतो, याची वाट पाहत नारायणपुरच्या राजवाड्यांत बसले होते. विक्रमसेन जेव्हां त्यांच्या दृष्टीस पडला, आणि हातीं घेतलेलें काम पूर्णपणें सिद्धीस गेलें, असें जेव्हां त्यानें त्यांस सांगितलें, तेव्हां बृहद्रथ आणि रणमत्त यांस फार आनंद झाला, आणि त्यांनीं विक्रमसेनाला मोठी शाबासकी दिली. या कृत्याला प्रारंभ करतांना त्या त्रिवर्गांनां आपला किती नाश होईल, यासंबंधानें जो अंदाज केला होता, त्याहून अधिक नुकसान झालें आहे, असें जरी त्यांस आढळून आलें, तरी कार्यसिद्धीपुढें त्याचें त्यांस फारसें महत्त्व वाटलें नाहीं. परंतु सुमारें प्रहर दीड प्रहर दिवस येण्यापूर्वीच त्यांच्या आनंदांत विरजण पडलें त्याच दिवशीं वत्सपुराहून एक फेरीवाला व्यापारी नारायणपुरीं आला, आणि त्यानें शेखर आपल्या पत्नीसह आणि पुत्रासह वत्सपुरीं सुखरूप पोंचल्याचें वर्तमान प्रसिद्ध केलें! आपण एवढा खटाटोप ज्याच्यासाठीं केला, तो आपला मुख्य शत्रु आपल्या हातून निसटला, याचें त्या तिघांस फार वाईट वाटलें; पण हा वृत्तांत जेव्हां दमयंतीच्या कानावर गेला, तेव्हां तिच्या अंगाचा जो संताप झाला–जो जळफळाट झाला–निराशेनें तिला ज्या वेदना झाल्या, त्याचें यथार्थ वर्णन करणें कठीण आहे. या बातमीवर प्रथम तर तिचा विश्वासच बसेना; पण ज्या फेरीवाल्यानें ही बातमी आणली, त्यानें पत्नीसह व पुत्रासह शेखरानें वत्सपुरामध्यें प्रवेश केला, ही गोष्ट धडधडीत आपल्या डोळ्यांनीं पाहिली असल्यामुळें त्या गोष्टीसंबंधानें शंका घेण्यांत फारसें हंशील नव्हतें. अर्थात् आपण प्रियंवदा म्हणून जिच्या काळजांत जंबिया खुपसला, ती स्त्री दुसरीच कोणी असली पाहिजे, असें मानणें दमयंतीला भाग झालें; आणि आपल्या मनांतील हेतु साध्य न होतां आपले हात मात्र मानवी रक्तानें निष्कारण विटाळले, या गोष्टीचा तिला खेद झाला. शेखराच्या दिवाणखान्यांत आपण प्रवेश केला, यावद्दल तिला तिळमात्र शंका नव्हती. दुर्मुखानें तो दिवाणखाना आपणांस बरोबर दाखविला होता, अशी तिच्या मनाची खात्री होती. कारण आपण जेव्हां त्या स्त्रीच्या उरांत खंजीर खुपसला, त्यावेळीं प्रत्यक्ष शेखर तेथें उभा होता, हें तिला पक्कें स्मरत होतें! शेखराच्या पाविऱ्यासंबं-

धानें तिच्या मनांत तिळमात्रही शंका आली नाहीं, आणि जरी तशी शंका तिच्या मनांत आली असती, तरी शेखर अशा प्रकारच्या स्त्रीला प्रत्यक्ष आपल्या पत्नीच्या मंदिरांत नेईल ही गोष्ट तिला असंभवनीय वाटत होती. आपल्या हातून चुकून भलत्याच स्त्रीचा खून घडला, ही गोष्ट मात्र आतां तिच्या अंतःकरणास टोंचूं लागली होती खरी.

दमयंतीचें मन जरी कितीही कठोर असलें, मत्सरामुळें ती प्रियंवदेचा प्राण घेण्यास जरी उत्सुक झालेली होती, तरी आपल्या हातून एका निरपराधी स्त्रीचा खून झाला, या गोष्टीची तिच्या मनास एकसारखी तळमळ लागून राहिली होती. पण या तळमळीमुळें तिच्या मत्सराग्नींत मात्र अधिक भर पडली. एवींतेवीं आपले हात रक्तानें विटाळले खरे, मग अजूनसुद्धां आपण प्रयत्न करून प्रियंवदेचा प्राण कां घेऊ नये, असें वारंवार तिच्या मनांत येऊं लागलें. ज्याप्रमाणें प्रतापपुरावर घाला घालून तेथील माणसांची कत्तल करण्यांत आली, त्याचप्रमाणें वत्सपुरावर छापा घालून तेथील माणसांची कत्तल करण्यास ती आपल्या बंधूस उत्तेजन देऊं लागली. पण विक्रमसेनाला तसें करण्यास धैर्य होईना. निंबराजाचें जें आज्ञापत्र त्याजपाशीं होतें तें फक्त प्रतापपुरकरांपुरतेंच होतें; म्हणून जर आपण वत्सपुरकरांवर चढाई करून गेलों, तर त्याचा परिणाम फार वाईट होईल, ही गोष्ट तो जाणून होता. शिवाय आपण प्रतापपुरकरांस जसें विश्वास दाखवून फशीं पाडलें, तसें वत्सपुरकरांस फशीं पाडतां येणें शक्य नसल्यामुळें, एकादी निकराची लढाई दिल्याखेरीज आपला तेथें प्रवेश होणार नाहीं; ही ही गोष्ट त्याच्या डोळ्यांसमोर स्पष्ट दिसत होती म्हणून त्यानें दमयंतीच्या भाषणास रुकार दिला नाहीं. अर्थात् आपल्या मनाशीं जळफळत स्वस्थ बसणें दमयंतीला भाग पडलें.

दोनप्रहरीं भोजनें झाल्यावर विक्रमसेनानें दुर्मुखाला आपल्यासमोर बोलावून आणिलें. गेल्या रात्रींच्या भयंकर कृत्यामध्यें त्याच्याकडे कोणती कामगिरी होती, हें वाचकांच्या ध्यानीं आलेंच असेल. दमयंतीचे हेतु साध्य होण्यासाठीं प्रियंवदा कोणत्या दिवाणखान्यांत निजत असते, हें तिला दाखविण्याकरितां वेषांतर करून तो दमयंतीबरोबर गेला होता. दमयंतीला शेखराचा व त्याच्या पत्नीचा दिवाणखाना दाखवून तो पुनः मागच्या वाटेनें खालीं येऊन सैन्यामध्यें मिसळला होता. याप्रसंगीं त्यानें जरी वेषांतर केलें होतें, तरी आपणास कोणी ओळखतील कीं काय, अशी भीति त्याच्या मनांत एकसारखी वागत असल्यामुळें, दमयंती आपलें अघोर कृत्य करून परत येईपर्यंतही तो तिजपाशीं थांबला नव्हता. इतकेंच नव्हे, तर राजवाड्याच्या अंगणामध्यें कित्येक सशस्त्र भिल्ल प्रवेश करीत आहेत, ही गोष्ट त्याच्या दृष्टीस पडतांच त्यानें सर्वांपूर्वी नारायणपुरचा रस्ता धरिला होता। त्यानें केलेल्या कामगिरीबद्दल त्याला ठरलेलें बक्षिस देऊन घालवून देण्यासाठीं विक्रमसेनानें त्याला आतां आपल्यापाशीं बोलाविलें होतें.

विक्रमसेनानें जरी या नीच मनुष्यास कामापुरतें हातीं धरिलें होतें, तरी तसल्या विश्वासघातकी माणसास आपल्याजवळ फार वेळ थारा देणें योग्य नाहीं, हें तो पक्कें जाणून होता. विक्रमसेनानें एक सोन्यानें भरलेली थैली त्याच्या स्वाधीन केली, आणि आपली कामगिरी योग्य रीतीनें बजाविल्याबद्दल त्याला शाबासकी देऊन त्याला निघून जावयास सांगितलें.

दुर्मुख अन्यायानें संपादन केलेलें द्रव्य घेऊन जावयास सिद्ध झाला असतां, कांहीं आठवण झाल्यामुळें विक्रमसेनानें त्याला परत बोलाविलें, आणि तो त्यास म्हणाला,–'तुला आतां येथून भृगुकच्छनगरीं जावयाचें आहे, म्हणून तूं जर अर्कपुरावरून जाणार अस-

शील तर आणखी एक कामगिरी तुला मी सांगणार आहें. तुला आजची रात्र एकाद्या खेड्यापाड्यांत काढण्यापेक्षां अर्कपुरच्या राजवाड्यांत काढावयास मिळाली, तर तें तुला सुखाचें होईल. यासाठीं तूं मुद्दाम तिकडून जा, आणि मी जें एक पत्र देतों, तें तूं भीमरथाला दे. भीमरथाचें आणि दृढसंधाचें पूर्वापार वैर असल्यामुळें, आपल्या शत्रूचा अशा रीतीनें निःपात झालेला ऐकून त्याला फार आनंद होईल, आणि तोही तुला चांगलें बक्षिस देईल।'

हें ऐकून दुर्मुख आनंदानें म्हणाला,–'कामांत काम होऊन मला जर त्यांत लाभ होण्याचा संभव आहे, तर मी ही कामगिरी मोठ्या आनंदानें पार पाडण्यास सिद्ध आहें. आपलें पत्र मी त्यांच्या हातीं नेऊन देईन.'

नंतर विक्रमसेनानें दुर्मुखापाशीं एक पत्र देऊन त्याची रवानगी केली. यावेळीं सुमारें दोन प्रहर दिवस उलटून चार घटका झाल्या होत्या. दुर्मुखाचा बहुतेक जन्म जरी बागलाणांतच गेलेला होता, तरी तो आपल्या साऱ्या जन्मांत कधीं अर्कपुरीं गेला नव्हता. यामुळें तिकडे जाण्याचा मार्ग त्याला ठाऊक नव्हता. परंतु त्या द्रव्यलोभ्याला भीमरथापासून चांगलें बक्षिस मिळण्याची आशा असल्यामुळें, तों अर्कपुरीं जावयास आनंदानें सिद्ध झाला होता. त्यानें अन्यायानें जें द्रव्य संपादन केलें होतें, त्याचा उपभोग कोणत्या मार्गानें घ्यावयाचा याविषयीं तो आपल्या मनांत शेकडों बेत करीत मार्गक्रमण करीत होता. त्याला जरी अर्कपुरचा मार्ग माहीत नव्हता, तरी आपणांस वाटेमध्यें कोणीतरी भेटेल, आणि त्याला विचारून आपण मुक्कामावर जाऊं अशी त्याला खात्री होती. त्याप्रमाणें वाटेंत त्याला एक माणूस भेटला, आणि त्यानें ज्या खाणाखुणा सांगितल्या त्यावर लक्ष्य देऊन तो पुढें चालला होता. सायंकाळचे सुमारास तो ज्या ठिकाणीं येऊन पोंचला, त्या ठिकाणीं दोन रस्ते फुटले होते. त्यांपैकीं कोणत्या रस्त्यानें जावें याचा त्याला विचार पडला. आपणांस येथें कोणी भेटेल अशा आशेनें तो तेथें कांहीं वेळ थांबला, पण त्याची निराशा झाली. शेवटीं अजमासानें एक रस्ता धरणें त्याला भाग पडलें, आणि तो त्या रस्त्यानें पुढें चालला. सूर्य मावळला, संधिप्रकाश संपला, तरी त्याला जवळपास एकादें शहर–निदान खेडें–असल्याचा मागमूस लागेना. अर्थात् आपण वाट चुकलों ही गोष्ट त्याच्या ध्यानीं आली, आणि तो एका जागीं उभा राहून विचार करूं लागला. काळोख तर मी म्हणत होता! अशा अपरात्रीं आपण परत फिरल्यास आपणांस खरा मार्ग सांपडेल कीं नाहीं ही शंका त्याच्या मनांत उत्पन्न झाली. शेवटीं, ज्या अर्थीं आपल्या पायांखालचा मार्ग इतका मळलेला आहे, त्याअर्थीं तो कोठें वस्तीकडेच जात असावा, असा तर्क करून तो पुढें निघाला. आणखी सुमारें एक घटकाभर पुढें गेल्यावर 'कोण आहे तिकडे?' असा दरडावणीचा शब्द त्याच्या कानीं पडला.

हा दरडावणीचा शब्द कानीं पडतांच दुर्मुख दचकून उभा राहिला, आणि हा शब्द कोठून ऐकूं आला हें तो डोळे ताणून पाहूं लागला. थोड्याच वेळानें त्या काळोखांतून एक धिप्पाड पुरुष आपणाकडे येत आहे, असें त्यास आढळून आलें. हें पाहून दुर्मुखानें आपल्या तरवारीस हात घातला, पण तितक्यांत तो नवखा माणूस ओरडला,–'अहो वाटसरू, तुम्ही कोठें चालला आहां! अशा अपरात्रीं इकडच्या प्रदेशांत भटकण्याचें काय कारण?'

दुर्मुखानें उत्तर केलें,–'वाट चुकल्यामुळें मी या प्रदेशांत आलों आहें; तुमचा शब्द ऐकून मला फार आनंद होत आहे. आपलें घर येथून जर जवळच कोठें असलें तर कृपा करून आजची रात्र मला आपल्या घरीं रहावयास जागा द्या. आपले मजवर

फार उपकार होतील. किंवा आजची रात्र काढण्यासारखी निवाऱ्याची जागा जर आपण मला दाखवाल तर–'

हें दुर्मुखाचें भाषण चाललें असतां तो नवखा मनुष्य त्याच्या अगदीं जवळ येऊन उभा राहिला होता. ते दोघेजण सध्यां ज्या जागीं उभे होते, त्या जागीं झाडी जरा कमी असल्यामुळें त्यांना परस्परांकडे पाहण्यास योग्य संधि सांपडली. दुर्मुखापुढें असलेला पुरुष धिप्पाड, तरुण आणि सुमारें पंचविशीच्या सुमाराचा होता. त्याच्या वेषावरून तो गरीब असावा असें स्पष्ट दिसून येत होतें. त्याच्या खांद्यावर एक भली लांब बंदूक असून त्याच्या बगलेस एक तोस्दान अडकविलेलें होतें व हातांत एक भली भक्कम उंच काठी होती. या त्याच्या वेषावरून तो या प्रदेशांत शिकारीसाठीं आला असावा असें दुर्मुखानें एकदम अनुमान केलें.

तो शिकारी पुरुष दुर्मुखाला म्हणाला,–' तुम्ही सध्यां या जंगलांत असल्यामुळें आणखी चार कोस पुढें गेल्यावांचून तुम्हाला एखादें खेडें दिसावयाचें नाहीं. तथापि मज गरीबाकडे येण्याची तुमची इच्छा असेल, तर ओली कोरडी भाकर आणि निजावयापुरती निवाऱ्याची जागा तुम्हाला मिळेल! जर तुम्हाला पुढें जावयाची घाई असेल तर मला तसें सांगा, म्हणजे मी हवा तर तुमच्या सोबतीस आणि रस्ता दाखविण्यास तुमच्याबरोबर येतों. माझ्या श्रमाबद्दल तुम्हीं मला एकाद्या दिवसाच्या निर्वाहापुरतें द्रव्य दिलें म्हणजे पुरे. मग सांगा, आपली कशी काय मर्जी आहे?'

दुर्मुख बोलला,–' हें तुझें मोकळेपणाचें भाषण ऐकून मला फार आनंद होत आहे. अशा अपरात्रीं काळोखांतून चार पांच कोस लांबचा प्रवास करणें हें फार बिकट काम असल्यामुळें तसें करण्यास माझें मन घेत नाहीं, म्हणून तुझ्या घरीं येऊन आजची रात्र घालवावी असें मला वाटतें. आतां भोजनाविषयीं म्हणशील तर मला त्याची विशेष आवश्यकता आहे असें नाहीं.'

तो शिकारी पुरुष बोलला,–' जशी आपली मर्जी! माझ्यासारख्या गरीबाच्या झोंपड्यास आपल्यासारख्या मोठ्या पुरुषाचे पाय लागणार हें पाहून मला त्या गोष्टीचा फार आनंद होत आहे. चला तर; जरा लवकर पाऊल उचला, म्हणजे आपण योग्य वेळीं घरीं जाऊन पोंचूं. आपणांस उशीर झाल्यास माझी म्हातारी आई झोंपी जाण्याचा संभव आहे!'

नंतर दुर्मुख मोठ्या आनंदानें त्या शिकारी तरुणाबरोबर जाऊं लागला. आपण संकटांत सांपडलों असतां ईश्वरानेंच हा मनुष्य आपल्यापाशीं पाठविला असें एकदां त्याच्या मनांत आलें. वास्तविक पाहिलें तर दुर्मुखासारख्या पापी पुरुषाला ईश्वराची आठवण सुद्धां होऊं नये! वाचकहो, दुर्मुखाची आणि त्या शिकारी पुरुषाची अशा अपरात्रीं भेट घालून देण्यांत ईश्वराची काय बरें इच्छा होती? दुर्मुखाचीं कृत्यें ईश्वराला आवडल्यामुळें त्याजवर प्रसन्न होऊन त्याचें रक्षण करण्यासाठीं ईश्वरानें ह्या दोघांची सांगड घालून दिली होती, कीं त्याचीं कृत्यें ईश्वरासा आवडलीं नसल्यामुळें, त्याला पापाची शिक्षा करण्याकरितां ही सांगड ईश्वरानें घालून दिली होती, हें लवकरच स्पष्ट होईल.

थोड्याच वेळानें ते दोघेजण एका झोंपड्यापाशीं आले. या स्थानाला झोंपडें म्हणण्यापेक्षां मोडकें घर असें म्हणणें बरें. त्या घरापाशीं आल्यावर दुर्मुखाला घेऊन येणाऱ्या तरुणानें दारावर धक्की मारिली. त्याबरोबर आंत असलेल्या एका थेरडीनें तें दार उघडलें. ती बरीच उंच व कृश होती, तरी तिला अजून पोंक आलेलें नव्हतें. तिनें आदराचे शब्द उच्चारून दुर्मुखाला आंत घेतलें, आणि आपला पुत्र वराह लवकर परत आला याबद्दल आनंद प्रदर्शित केला. बरीच रात्र झालेली असल्यामुळें

आपला पुत्र शिकारीहून परत केव्हां येतो, याची ती वाट पहात बसली होती. दुर्मुखानें त्या दरवाजांतून आंत पाऊल टाकलें, तोंच कुत्र्याचें गुरगुरणें त्याच्या कानीं पडलें; त्या गुरगुरण्याच्या भयंकर शब्दावरून जवळच एकादा शिकारी कुत्रा असावा असें एकदम त्याच्या ध्यानीं आलें, आणि तो थबकून जागच्याजागीं उभा राहिला. पाहुणा आंत यावयास भितो हीं गोष्ट म्हातारीच्या लक्ष्यांत आली, आणि ती म्हणाली,—'महाराज, भिण्याचें कारण नाहीं. कुत्रा चांगला घट्ट बांधलेला आहे. हा माझा मुलगा सर्व दिवसभर शिकारीसाठीं भटकत असतो, त्यावेळीं हें इमानी जनावर माझ्या रक्षणासाठीं उपयोगी पडतें.'

दुर्मुख बोलला,—'असें असेल तर ठीक आहे. नाहींतर शिकारी कुत्रा मोकळा असतांना परकी माणसानें एकाद्या घरांत पाऊल ठेवणें किती धोक्याचें आहे, हें मला चांगलें माहीत आहे।'

म्हातारीमागून ते दोघेजण आंत गेले; ते सध्यां त्या घराला एकाला एक लागून असलेल्या तीन खोल्यांपैकीं मधल्या खोलींत आले होते. वराहानें एक फाटकें घोंगडें जमिनीवर टाकून दुर्मुखाला त्यावर बसावयास सांगितलें आणि त्यानें मारून आणलेली शिकार आपल्या आईच्या अंगावर टाकून तिला तें मांस भाजून तयार करावयास सांगितलें. दुर्मुखानें आपणास क्षुधा नाहीं असें जरी त्या म्हातारीस सांगितलें, तरी तिनें आपल्या पुत्राबरोबर दोन घांस खाण्याचा त्याला फार आग्रह केला, म्हणून त्यानेंही त्यांतील थोडेसें मांस भक्षण केलें. नंतर वराहानें दुर्मुखाबरोबर इकडच्या तिकडच्या गोष्टी बोलावयास प्रारंभ केला. बोलतांना मोकळेपणा आणि अघळपघळपणा दाखविण्याची कला वराहाला चांगली साध्य झाली होती. गेल्या रात्रीं प्रतापपुरच्या दरींत घडून आलेल्या भयंकर कत्तलीची बातमी एका दिवसांत पुष्कळ दूर पसरली असल्यामुळें ती वराहाच्या कानीं आली होती, म्हणून त्यासंबंधानें त्यानें दुर्मुखाला पुष्कळ प्रश्न विचारले. परंतु दुर्मुखानें आपणांस माहीत असलेली सर्व बातमी त्याला न सांगतां 'असें ऐकतों' 'असें झालें असावें,' 'असें लोक बोलतात' वगैरे वाक्यांचा उपयोग करून आपणास त्यासंबंधानें फारशी माहिती आहे, असें दाखविलें नाहीं. कारण आपण सध्यां ज्या मिळाशीं बोलत आहों, तो जर कदाचित् प्रतापपुरकरांचा पक्षपाती असला, तर आपल्या भाषणानें त्याच्या मनाला दुःख होऊन कदाचित् आपला त्याला संशय यावयाचा, असें त्याच्या मनास वाटत होतें. आपल्या मनोभावनांचा पत्ता लोकांस लागूं न देण्याच्या कामीं दुर्मुख किती तरबेज होता, हें वाचकांस माहीत आहेच. त्यांचें मांसभक्षण होईपर्यंत अशा प्रकारच्या गोष्टी चालल्या होत्या. नंतर दुर्मुखानें आपणांस झोंप येत आहे, असें सांगितल्यावरून त्याच्या बिछान्याची तजवीज करण्यासाठीं वराह पलीकडच्या खोलींत गेला. थोड्याच वेळानें दुर्मुख वराहामागून त्या खोलींत गेला. पहिल्या दोन खोल्यांपेक्षां ही तिसरी खोली कांहींतरी बरी असेल, असें त्याला वाटलें होतें, पण त्याची त्यासंबंधानें निराशा झाली.

या कथानकाच्या पूर्वार्धामध्यें एकदोन वेळ या मोडक्या घराचा संबंध आलेला असल्यामुळें, त्यासंबंधानें येथें अधिक सांगण्याचें कारण नाहीं. निजावयाच्या खोलींत जातांच दुर्मुखानें एकदां आपल्यासभोंवार नजर टाकली, आणि तो तेथील बिछान्यावर जाऊन पडला. या जागेमध्यें आपणास दगा होईल, अशी कल्पना एकदांहुद्दां त्याच्या मनांत आली नाहीं. गेल्या रात्रीं सर्व रात्रभर जागरण झालें होतें, व हा वेळपर्यंत त्याला झोंप घेण्यास सवड मिळाली नसल्यामुळें, नुसतें शोंपेकडे त्याचें मन

लागलें होतें. चालण्याच्या श्रमानें आपलें अंग आडवें होतें केव्हां आणि आपणांस झोंप लागते केव्हां, असें त्यास झालें होतें; त्यामुळें पूर्वी निंबराज आणि सत्यरथ या झोंपडींत आले असतां, त्या खोलींतील बिछान्याची चमत्कारिक रचना पाहून जसें त्यांचें मन संशययुक्त झालें होतें, तसें दुर्मुखाचें झालें नाहीं. त्या खोलींत गेल्यावर त्यानें प्रथम बिछान्यावर लोळण घेतली, आणि आपल्याजवळची थैली नीट उशाशीं घेतली. तो बिछान्यावर पडल्यानंतर त्याला लवकरच गाढ झोंप लागली.

दुर्मुख निजला, पण ती थेरडी आणि वराह जागींच होतीं. मध्यरात्रीचे सुमारास वराहानें दिवा लाविला. त्या दोघांच्या मनांत एकच विचार असल्यामुळें नुसती परस्परांची नजरानजर झाल्याबरोबर एकमेकांनीं एकमेकांचें हृद्गत ओळखिलें. आपण दिवा लावल्यामुळें आपला पाहुणा जागा झाला आहे कीं काय, याची खात्री करून घेण्यासाठीं त्यांनीं प्रथम कानोसा घेतला, पण दुर्मुख स्वस्थ घोरत पडला आहे अशी त्यांच्या मनाची खात्री होतांच त्यांनीं कुजबुजण्यास प्रारंभ केला.

म्हातारीनें विचारलें,–' या शिकारींत कांहीं लभ्यांश होण्यासारखा आहे का ?'

वराह म्हणाला,–' होय; आहे तर ! त्याच्यापाशीं जी एक पिशवी आहे, तींत बराच ऐवज असावा, अशी माझ्या मनाची खात्री आहे. खरेंच सांगतों, असलें सावज आज कित्येक वर्षांत आमच्या हातीं लागलें नव्हतें. काय असेल तें असो, अलीकडे या वाटेनें फारसे वाटसरू येतच नाहींत !'

थेरडी म्हणाली,–' असें कां होतें समजत नाहीं. मागें सुमारें दोन अडीच वर्षांपूर्वी ते दोन प्रवासी आमच्या हातून निसटले, त्यानंतर आम्हाला अजूनपर्यंत चांगलीशी शिकार सांपडली नाहीं. त्या दिवशीं ते दोघे कसे निसटले हें तुझ्या ध्यानांत असेलच !'

वराह बोलला,–' ती गोष्ट मी मेलों तरी विसरणार नाहीं ! ते दोघे पळून गेले, तेव्हांपासून सुमारें चार-सहा महिनेपर्यंत माझ्या जिवांत जीव नव्हता ! त्यांनीं जर भीमरथाला त्यावेळीं सरोसरच वर्दी दिली असती, तर मोठा घात झाला असता. त्यांपैकीं एकाच्या अंगावर तर प्रत्यक्ष भीमरथ राजाचा पोषाक होता ! त्या प्रसंगांतून आम्हीं अजीबात कशीं निसटलों, याचें अजूनसुद्धां मोठें आश्चर्य वाटतें !'

थेरडी बोलली,–' त्याच दिवशीं सुंदरपुरची लढाई झाली, व त्या प्रसंगीं एक परकी सरदार बृहद्रथाच्या वाड्यांतून पळून गेला, असें आम्हांस मागून नाहीं का समजलें ? ते दोघे जर खरोखर या प्रांतांतील असते, तर त्यांनीं सरकारांत वर्दी देऊन आमचा घात कधींच केला असता. निदान आम्हाला हें ठिकाण सोडून कोठें तरी पळून जाणें भाग झालें असतें.'

वराह बोलला,–' बरें, आतां त्या जुन्या गोष्टी बोलून काय करावयाचें ?'

थेरडी म्हणाली,–' बरें ! राहिलें ! आजची शिकार साधावयाला फारशी मेहनत पडणार नाहीं, असें दिसतें. तूं आपली बंदूक भरून तयार ठेव म्हणजे झालें. मी प्रथम आंत जाईन आणि त्याची पिशवी हातीं लागते का पाहीन ! यदाकदाचित् तो जागा झाला, तर तुझी तयारी असूं दे म्हणजे झालें.'

वराह बोलला,–' मी आतां बंदूक भरून आणतों. तोंपर्यंत तूं त्यानें खोलीच्या दाराला कडी लाविली आहे कीं काय हें पाहून ठेव. कडी लाविली असली, तर ती कशी काढावी हें तुला माहीत आहेच !'

थेरडी हंसत म्हणाली,–' त्या दरवाज्याची कडी बाहेरून कशी निघते, हें प्रथम तुला मींच दाखविलें म्हणून बरें ! जा तर ! आतां उगीच उशीर नको. दमूनभागून आलेल्या माणसाची पहिली झोंप मोठी गाढ असते.

म्हणून तो जागा झाला नाहीं तोंपर्यंत आपलें काम उरकून घ्यावें हें बरें.'

असें म्हणून ती थेरडी, दुर्मुख निजला होता त्या खोलीच्या दाराशीं जाऊन कानोसा घेऊं लागली. दुर्मुख एकसारखा घोरत असल्यामुळें त्याला गाढ झोंप लागली आहे, अशी तिची खात्री झाली. तिनें खोलीचें दार हळूच ढकलून पाहिलें, त्यावरून दारास आंतून कडी नाहीं, ही गोष्टही तिच्या लक्ष्यांत आली.

तितक्यांत आपली बंदूक घेऊन वराह त्या ठिकाणीं आला. त्यांना आंत प्रवेश करण्यास यावेळीं कोणत्याही प्रकारचा अडथळा नव्हता. मोठ्या सावधपणानें अगदीं हळुहळु तिनें तो दरवाजा उघडला, आणि वराह आंत पाऊल टाकणार, तोंच तिनें त्याच्या खांद्यावर हात ठेवून त्याला पुढें न जाण्याची खूण केली. तीं दोघें अगदीं स्तब्ध उभीं राहिलीं. आपला बळी जागा झाल्याची तिला शंका आली, म्हणून तिनें आपणास अशी खूण केली असावी, असें त्याला वाटलें, पण बिछान्यावरील माणसाचा घोरण्याचा शब्द एकसारखा ऐकूं येत असल्यामुळें ती शंका व्यर्थ आहे, असें त्याच्या मनांत येतें न येतें, तोंच तिनें त्याला मागें येण्याची खूण केली. अर्थात् तो मागें सरला. तीं दोघें पुनः परत पहिल्या खोलींत दिव्यापाशीं आलीं. त्या प्रकाशामध्यें आल्याबरोबर आपल्या म्हातारीच्या मनांत कसली तरी भीति उत्पन्न झाली आहे, ही गोष्ट त्यानें तत्काल ओळखिली. त्या खोलीच्या टोकास जी एक खिडकी होती, त्या खिडकीपाशीं जाऊन ती म्हातारडी बाहेर डोकावूं लागली. पण बाहेर घनदाट काळोख पडलेला असल्यामुळें तिला परत यावें लागलें.

वराहानें विचारलें,–'हें तूं आयत्या वेळीं काय आरंभिलें आहेस?'

थेरडीनें उत्तर केलें,–'आम्ही या खोलींत पाऊल टाकणार होतों, त्याच वेळेस या पलीकडच्या मैदानांत घोड्यांच्या टापा वाजल्याचा मला भास झाला.'

वराह म्हणाला,–'अलीकडे तुला म्हातारचळ लागला असावा असें दिसतें. घोड्यांच्या टापा जर खरोखरच वाजल्या असत्या तर त्या मला कशा ऐकूं आल्या नसत्या? तुला उगीच कांहीं तरी भ्रम झाला असावा।'

म्हातारी बोलली,–'तसेंही असेल कदाचित्! पण खरेंच सांगतें, अलीकडे मला भुतांची वारंवार भीति वाटत असते. तूंच सांग, आजपर्यंत या घरांत किती बळी–'

वराह दांत–ओंठ खात पण हळूच म्हणाला,–'पुरे कर ही वटवट! मला कोणी भुतांखेतांच्या गोष्टी सांगू लागलें कीं, मोठा राग येतो! तुला कदाचित् भुतांची भीति वाटत असेल, पण मला मात्र ती भीति मुळींच वाटत नाहीं. आतां नाहीं तो कोठें घोड्यांच्या टापांचा आवाज ऐकूं येत? समज, जरी तुझ्या म्हणण्याप्रमाणें तसा आवाज ऐकूं येत असला तर त्यांत काय बिघडलें? अशीच एकादी आणखी शिकार चालून येत नसेल कशावरून? चल, आपलें काम आटोपून जर कोणी आणखी एखादा वाटसरू येत असला, तर त्याच्यासाठीं बिछाना रिकामा करून ठेवूं या।'

म्हातारी तर यावेळीं बरीच घाबरल्यासारखी दिसत होती. ती आपल्या मुलाचीं आर्जवें करीत म्हणाली,–'खरेंच सांगतें, निदान आज तरी तूं ही गोष्ट करूं नको! काय असेल तें असो, आजच्या या कृत्यांत आपणांस यश येईल असें मला वाटत नाहीं. इतकेंच नव्हे, तर आज कांहीं तरी मोठें संकट गुजरणार असें माझें मन मला सांगत आहे!'

वराहानें हळूच पण जळफळत म्हटलें,–'आज तुला असें झालें आहे तरी काय? इतक्यांतच तुला असें वेड कसें लागलें? आजपर्यंत आम्हीं इतक्या शिकारी साधल्या असतील, पण तुझा असा भित्रेपणा यापूर्वी

माझ्या कधींच नजरेस पडला नव्हता. प्रत्येक वेळीं तूं पुढें होऊन–'

म्हातारी गयांवयां करीत बोलली,–'तें खरें, पण आज माझें मन कचरत आहे! आपणांवर लवकरच भयंकर संकट येणार असें मला वाटूं लागलें आहे. यासाठीं–'

वराह बोलला,–'तुझ्या या भित्रेपणामुळें मी हातची शिकार गमविणार नाहीं. तुला भीति वाटत असेल तर तूं खुशाल येथें बसून रहा. मी आतां हां हां म्हणतां एकटाच एवढें काम पार करून टाकतों. गेल्या दोन वर्षांत आपणांस किती कर्ज झालें आहे, हें विसरलीस कीं काय? उद्यां सावकाराचा शिपाई दाराशीं धरणें धरून बसेल त्याला काय देशील?'

आपल्या पुत्राचें हें निकराचें भाषण ऐकून म्हातारी उगीच बसली. तिला आपल्या लेकाचा हट्टी स्वभाव माहीत होता. वराह आपलें घातकी कृत्य करण्यास निघाला, हें पाहून तीही त्याच्यामागून जाऊं लागली. तीं दोघें अगदीं धिमेपणानें आपल्या पावलांचा आवाज होऊं न देतां तिसऱ्या खोलींत शिरलीं. आपला नेम चुकूं नये, म्हणून वराहानें दिवा अशा रीतीनें एका ठिकाणीं ठेविला होता कीं त्याचा प्रकाश बळीच्या तोंडावर न पडतां फक्त त्याच्या खालच्या शरीरावर पडावा. दुर्मुखाला गाढ झोंप लागली होती, पण यावेळीं त्याचें डोकें उशाखालीं असलेल्या पिशवीवरून थोडें बाजूस झालेलें होतें. त्या पिशवीकडे नजर जातांच वराहाला स्फुरण आलें; आणि त्यानें आपल्या बंदुकीचा त्याच्या डोक्यावर नेम धरिला.

नंतर त्यानें म्हातारीस पुढें होऊन ती थैली काढून घ्यावयास सांगितलें. ती पुढें झाली खरी, पण तिचे हात-पाय थरथर कांपूं लागले. आतां लवकरच आपणांवर एकादें संकट गुजरणार आहे, अशी जी तिच्या मनाची समजूत झाली होती, ती तिच्या मनांतून कांहीं केल्या जाईना! तिनें जेव्हां बिछान्याकडे जाण्यासाठीं पाऊल पुढें घातलें त्यावेळीं जणुं काय आपण वधस्तंभापाशीं जात आहों, असें तिला भय वाटत होतें. तिनें दुर्मुखाच्या उशाखालच्या थैलीस हात घातला आणि ती काढूनही घेतली. पण तितक्यांत ती थैली खालीं पटली, आणि तिच्यामध्यें असलेल्या नाण्यांचा आवाज झाला. या आवाजामुळें दुर्मुख जागा झाला, आणि तो आतां त्या थैरडीच्या नरडीस हात घालणार तोंच वराहानें बंदूक झाडली, त्यामुळें तो गतप्राण होऊन खालीं पडला!

'सोनें! सोनें! लाट उडाली! अशी शिकार आपल्या साऱ्या जन्मांत आपणांस मिळाली नव्हती!' असें ओरडत वराहानें ती थैली प्रथम उचलून घेतली. ती थैली वाजली, तेव्हां जो नाद झाला, त्या नादावरूनच त्यानें तींत सोन्याचीं नाणीं भरलेलीं असावीं असें ओळखलें होतें. तो आपल्या आईकडे पाहत म्हणाला,–'पण तूं आज असें काय करतेस? जसा काय आजचा हा प्रसंग पहिलाच! आजपर्यंत तूं स्वतांसुद्धां अशी शिकार साधली आहेस!'

थैरडी म्हणाली,–'तें खरें, पण मला आज कसेंसेंच वाटत आहे! असो! झालें तें झालें. आतां यापुढें मात्र पुनः असलें कर्म करावयाचें नाहीं, असा मी निश्चय करतें!'

वराह निष्काळजीपणें बोलला,–'पुढचें पुढें, पण आतां याची पुढली व्यवस्था केली पाहिजे.'

असें बोलून वराहानें प्रेताच्या अंगावरील वस्त्रें काढून घेतलीं, आणि बिछान्याची फळी पाडून प्रेत खालच्या विहिरींत ढकलून दिलें. प्रेत विहिरींत पडतांच आंतील पाण्यामध्यें मोठा आवाज झाला. नंतर तो बोलला,–आजची गोळी बरोबर मस्तकांत शिरली असल्यामुळें, नेहमींप्रमाणें पुष्कळ रक्त सांडलें नाहीं. अर्थात् रक्तानें न भिजलेले कपडे टाकून देण्याची जरूर नाहीं.

आतां आपण याच्या खिशांत काय काय आहे हें पाहूं या. पुष्कळ वेळां वाटसरांच्या वस्त्रांमध्यें मोठ्या मौजेच्या जिनसा सांपडतात.

असें म्हणून तो त्या वस्त्रांची तपासणी करीत असतां त्याला एक रेशमी मोहोरबंद थैली सांपडली. या थैलींत कांहींतरी महत्त्वाचा पदार्थ असेल असें वाटून त्यानें ती थैली उघडली, पण आंत एका पत्राखेरीज दुसरें कांहीं नाहीं हें पाहून त्याची निराशा झाली. त्यानें तो कागद तेथेंच टाकला, आणि तो दुसऱ्या वस्त्रांची तपासणी करूं लागला, तोंच म्हातारीनें चपापल्यासारखी मुद्रा करून आपल्या पुत्राकडे पाहिलें. यावेळीं क्षणमात्र त्याचेंही मन बावरल्यासारखें झालें, व तो म्हणाला,–'होय, मलाही घोड्यांच्या टापांचा शब्द ऐकूं आला खरा! पण मला वाटतें, आपली एकादा वाटसरू चुकून माकून आला असेल; यासाठीं तूं बाहेर जाऊन पहा, तोंपर्यंत मी येथील निरवानिरव करून मुद्दापत्ता नाहींसा करून टाकतों.'

इतक्यांत बाहेरील दरवाज्यावर धक्की बसली. इतकेंच नव्हे, तर तें दार मोडून पडलें, असें त्यांना ऐकूं आलें. वराह आपली बंदूक घेऊन उठणार, तोंच तें सर्व घर निंबराजाच्या खासगी सैन्यांतील शिपायांनीं भरून गेलें!

इतक्यांत–'पहातां काय? पकडा या हरामखोरांना!'–असे शब्द त्यांच्या कानांवर पडले, आणि तीं माय-लेकरें त्या मनुष्याकडे पाहूं लागलीं, त्यावेळीं सुमारें तीन वर्षांपूर्वीं आपल्या हातून निसटून गेलेला तोच गृहस्थ सध्यां आपल्या पुढें उभा आहे, असें त्यांस आढळून आलें.

त्यांनीं त्याला बरोबर ओळखलें होतें, निंबराजाच्या खासगीकडील लोक बरोबर घेऊन त्याचा खासगी कारभारी सत्यरथच तेथें आलेला होता!

तेथील सर्व देखावा पाहिल्याबरोबर या नीचांनीं नुकताच कोणाचा तरी प्राण घेतला असावा, ही गोष्ट सत्यरथाच्या एकदम ध्यानीं आली. नुकताच झालेला बंदुकीचा आवाजही त्यांनीं ऐकला असल्यामुळें, ते सर्वजण मोठ्या त्वरेनें त्या मोडक्या घरांत घुसले होते. बिछान्याची फळी पडलेली होती, आणि तेथें जीं थोडींशीं वस्त्रें पडलेलीं होतीं, त्यांपैकीं कांहींवर घडलेला भयंकर प्रकार दर्शविणारे रक्ताचे डागही स्पष्ट दिसत होते. तसेंच वराहाच्या पुढें एक द्रव्यानें भरलेली थैली असून तेथें जवळच एक पत्रव्यवहाराची रिकामी रेशमी थैली पडलेली होती.

त्याच्या बरोबरच्या सरकारी शिपायांनीं त्या दोघांना चतुर्भुज तर केलेंच होतें. वरील सर्व प्रकार पाहिल्याबरोबर सत्यरथ त्वेषानें त्याला म्हणाला,–'अरे नीचा, आतां तूं अघोर कर्म केलेंस कीं नाहीं, खरें सांग! तूं कोणाचा प्राण घेतलास बोल लवकर!'

म्हातारडी गयांवया करीत बोलली,–'महाराज दया करा! दया करा! आम्हाला प्राणदान द्या! मी सगळें कांहीं सांगतें, पण आमचे प्राण वांचवा!'

हें ऐकून वराह उर्मटपणानें बोलला,–'थेरडे, अशी रडतेस काय म्हणून? तूं हवा तितका कंठशोष केलास, म्हणून हे आम्हांस फांशीं दिल्याखेरीज सोडतील कीं काय!'

म्हातारडी थरथरां कांपत बोलली,–'फांशीं! महाराज मी पायां पडतें! मला फांशीं देऊं नका! आम्हीं आतां एका माणसाचा प्राण घेतला हें मी कबूल करतें–तो कोण हें आम्हास माहीत नाहीं–हा एक कागद त्याच्यापाशीं होता, त्यावरून कदाचित् तो कोण होता, हें आपणांस समजेल–आम्ही पुनः असें करणार नाहीं! दया करा! दया करा!'

सत्यरथानें म्हातारीच्या तोंडांतले सर्व शब्द पुरते बाहेर पडण्यापूर्वीच तें पत्र घेऊन

वाचण्यास प्रारंभ केला होता. पत्रामध्यें पुढील मजकूर होता.

'राजश्रियाविराजित सकलसामंत शिरोमणि क्षत्रियकुलावतंस अर्कपुराधीश भीमरथ महाराज यांचे चरणीं विज्ञप्ति–

महाराज, आमचे स्नेही बृहद्रथ महाराज यांनीं आमचे सर्व बेत पूर्वी तुमच्या कानावर घातलेच होते. आपणां सर्वांचे हाडवैरी जे प्रतापपुरकर यांचा निःपात करण्यासाठीं आम्हीं जे प्रयत्न चालविले होते, त्यांना पूर्णपणें जरी नाहीं तरी बरेंच यश मिळालें, हें ऐकून आपणांसही आनंद होईल, असें जाणून झालेल्या गोष्टीबद्दल सध्यां घाईघाईनें चार ओळी लिहितों. राजाधिराजांकडून संपादन केलेल्या आज्ञापत्राप्रमाणें दृढसंधाला व त्याच्या पोरांना देहांतशिक्षा देण्यासाठीं मी स्वतः काल रात्रीं सुमारें पांचशें शिपाई मागवून आपला इष्ट हेतु सिद्धीस नेला. तो नीच दृढसंध आणि त्याचा तो उर्मट पोरगा चूडामणि हे दोघे तर आमच्या तरवारीस बळी पडलेच! फक्त दुःखाची गोष्ट इतकीच कीं, शेखर मात्र आपल्या पत्नीसह पळून गेला!

त्याच्या पत्नीचा आणि पोराचा प्राण घेण्याची आमची मसलत मोठ्या चमत्कारिक योगायोगानें फसली. प्रियंवदेचा प्राण घेण्यासाठीं जो कोणी गेला होता, त्याच्या हातानें तेथें भलत्याच एका स्त्रीचा प्राणांत झाला! ही नवखी स्त्री कोण असावी आणि ती प्रियंवदेच्या दिवाणखान्यांत कशी आली असावी, याचा उलगडा अजून झाला नाहीं.

झालेलें वृत्त थोडक्यांत निवेदन केलें आहे; ईश्वरदयेनें पुनः भेटीचा योग येईल, त्यावेळीं अधिक वर्तमान समजेल.'

अशा तऱ्हेचा मजकूर त्या पत्रांत असून त्या पत्रावर विक्रमसेनाचें नांव होतें.

या पत्रांतील मजकूर वाचून सत्यरथाच्या काळजांत धस्स झालें! एवढा प्रयत्न करून रात्रीचा दिवस करून, तो जी गोष्ट टाळण्यासाठीं आला होता, ती तर अगोदरच होऊन चुकली होती! शिवाय पत्राचे शेवटीं अनोळखी स्त्रीचा जो उल्लेख होता, तो वाचून तर त्याच्या हृदयास चरकाच बसला. कां तें वाचकांच्या लक्ष्यांत आलेंच असेल!

हें पत्र वाचतांच प्रथम त्यानें दुसरें कांहीं केलें नाहीं; अगोदर तो त्या घरांतून बाहेर पडला, आणि आपल्या घोड्यांवर स्वार झाला. नंतर त्यानें खुनी माणसांवर पहारा करण्यासाठीं दहा सशस्त्र शिपायांस त्या मोडक्या घरांत राहण्याची आज्ञा केली, आणि बाकीचे लोक बरोबर घेऊन त्यानें मोठ्या त्वरेनें त्रिशूल पर्वतावरील देवालयाचा मार्ग आक्रमिण्याचा हुकूम केला.

प्रकरण ५६ वें.

चौकशी.

आपल्या धन्याबरोबर बागलाणामध्यें प्रवास करीत असतां सत्यरथ पूर्वी एकदां या मोडक्या घरांत आला होता, आणि त्यावेळीं तेथें घडून आलेल्या प्रकारावरून त्या घरांत खुनी माणसें राहत असतात, ही गोष्ट त्याला माहीत होती, हें वाचकांस स्मरतच असेल. दृढसंधाला निंबराजानें जी शिक्षा केली होती, ती अन्यायाची आहे, असें समजल्यावरून तो ती शिक्षा रद्द करण्यासाठीं निंबराजाचीं आज्ञापत्रें घेऊन मोठ्या त्वरेनें या प्रसंगीं बागलाणांत आला होता. तसेंच या मोडक्या घरांतील माणसांस कैद करून त्यांचा न्याय करण्यासाठीं योग्य अधिकाऱ्यांच्या हवालीं करावें असाही त्याचा हेतु होता, व हा हेतु साध्य करण्यासाठीं तो मुद्दाम याच रस्त्यानें नारायणपुराकडे जात होता.

प्रतापपुरचें वर्तमान तर त्याला या मोडक्या घरांतच समजलें, त्यामुळें आतां नारायणपुरीं जाण्याचें त्याला कारण उरलें नाहीं. मागील प्रकरणांत सांगितलेल्या पत्रांत

जो एका स्त्रीचा उल्लेख होता, तो वाचून त्याला आपल्या पत्नीचें स्मरण झालें, आणि सरळ नारायणपुरीं जाण्याचा विचार रहित करून त्यानें प्रथम शिवालयांत जाऊन आपल्या सासऱ्याची भेट घेण्याचा बेत केला व मोठ्या त्वरेनें त्यानें तो मार्ग धरिला.

सत्यरथ शिवालयांत आला, त्यावेळीं त्याचा सासरा मणिभद्र दुःखामध्यें निमग्न झालेला त्याच्या दृष्टीस पडला. आपली नात प्रतापपुरीं गेली, त्याच रात्रीं प्रतापपुरची वाताहत झाली, ही गोष्ट त्यानें सत्यरथाला सांगितली. प्रतापपुरच्या भयंकर प्रसंगांतून कोणकोण निभावलीं, हें अजून त्याला समजलें नव्हतें. आपली नात जर जिवंत असती तर ती यापूर्वीच परत आली असती, असा त्याचा तर्क होता; तरी ज्या-अर्थीं अद्यापि परत आली नाहीं, किंवा तिनें नुसता निरोप पाठवून आपली खुशाली कळविली नाहीं, त्या अर्थीं ती जिवंत नसावी अशी मणिभद्राच्या मनाची समजूत झाली होती. त्यानें आपल्या मनाची खात्री करून घेण्यासाठीं एक मनुष्य प्रतापपुरीं पाठविला होता, पण तेथील लोक आपल्याच दुःखांत चूर असल्यामुळें त्या मनुष्याला तेथें विशेष कांहींच बातमी समजली नाहीं. शेखर आणि प्रियंवदा हींच काय तीं राजवाड्यांतील माणसें त्या प्रसंगांतून बचावलीं, एवढीच गोष्ट त्या माणसाला समजली, आणि तो तेवढीच बातमी बरोबर घेऊन शिवालयांत परत आला होता.

त्या घोर प्रसंगांतून निभावून शेखर वत्सपुरीं गेला; पण तेथें गेल्यावर त्याला पुष्कळ महत्त्वाचीं कामें करावयाचीं असल्यामुळें, त्याला मथुरेचें वर्तमान तिच्या आज्यास कळविण्याची सवड झाली नाहीं. मथुरा तर जखमेनें परस्वाधीन होऊन बिछान्यावर पडलेली असल्यामुळें तिनें आपल्या पित्याला आपली हकीकत कळविणें शक्य नव्हतें. म्हणून मणिभद्राला प्रतापपुरचा घोर प्रसंग ओढवून मध्यें एक दिवस चार प्रहर लोटले होते, तरी मथुरेचें कांहींच वर्तमान समजलें नव्हतें.

मथुरा शिवालयांत परत आलेली नाहीं, व तिची खुशालीही तिच्या आज्याला कळली नाहीं, अर्थात् विक्रमसेनानें भीमरथाच्या पत्रांत जो मजकूर लिहिलेला होता, तोच खरा आहे, असें सत्यरथाला साहजिकपणें वाटलें, आणि त्याला अत्यंत खेद झाला. आपण जर राजकारस्थानांत पडलों नसतों, तर आपल्या पत्नीवर असा अकालिक मृत्यु ओढवला नसता, असें त्याच्या मनांत आलें. तसेंच नारायणपुरकर आणि सुंदरपुरकर यांनीं प्रतापपुरकरांविरुद्ध जें कृष्णकारस्थान रचिलें होतें, त्या कारस्थानाचा परिणाम आपणास भोगावा लागला, याचा त्याला मोठा संताप येऊन त्यानें त्या दोघांचा, निदान एकाचा तरी सूड उगविण्याचा विचार केला. मणिभद्राशीं दोन शब्द बोलून त्याचें समाधान करण्यास किंवा त्याच्याबरोबर दुःखाचा विभागी होण्यास तो तेथें फार वेळ राहिला नाहीं. त्यानें आपल्या घोड्यावर खोगीर चढविण्याचा आपल्या बरोबरच्या सैनिकांस हुकूम करून रातोरात नारायणपुरचा मार्ग धरिला. शिवालयांतून नारायणपुरास जाण्याचा मार्ग प्रतापपुरच्या उत्तरेस असलेल्या पर्वतापलीकडून असल्यामुळें त्याला पिशाचसोपान उतरण्याची जरूर नव्हती.

दुसरे दिवशीं प्रहराच्या सुमारास सत्यरथ नारायणपुरीं पोंचला. तो तेथें पोंचला त्यापूर्वी थोडाच वेळ बृहद्रथ आपल्या किल्ल्यांत गेला होता. राजवाड्यापाशीं आल्यावर, आपण निंबराजाकडून कांहीं महत्त्वाच्या कामासाठीं विक्रमसेनाची भेट घ्यावयास आलों आहों, अशी सत्यरथानें वर्दी दिली. निंबराजाच्या सेवकाला योग्य असा तेथील सेवकांनीं सत्यरथाचा सत्कार केला. थोड्याच वेळानें विक्रमसेन आणि सत्यरथ यांची गांठ पडली. त्या दोघांची पूर्वीची

ओळख अगदीं नव्हती, त्यामुळें सत्यरथाची मुद्रा पाहून त्याला दुःख होत असावें, असें विक्रमसेनाला वाटलें नाहीं. सत्यरथानें आपलें मन शक्य तितकें आंवरून धरून विक्रमसेनाशीं औपचारिक भाषण केलें.

प्रथमतः विक्रमसेन म्हणाला,–'राजाधिराज निंबराजांकडून आलेल्या सेवकाचें यथायोग्य स्वागत करणें हें आमचें कर्तव्य आहे, आणि तें कर्तव्य करण्यास मी तयार आहें. वास्तविक पाहिलें तर आपल्यासारख्या थोर गृहस्थांची महाराजांनीं (म्हणजे विक्रमसेनाचा चुलता रणमत्त ह्यानें) गांठ घ्यावयाची, परंतु त्यांची प्रकृति थोडी बिघडलेली असल्यामुळें त्यांनीं आपल्या सत्काराची मला आज्ञा केली आहे.'

सत्यरथ बोलला,–'आपण माझें जें आदरातिथ्य केलें त्याला मी पात्र नसल्यामुळें मी आपला बहुमान झाला असेंच समजत आहें. थोड्याच दिवसांपूर्वी राजाधिराज निंबमहाराजांनीं प्रतापपुरकरांसंबंधानें जीं आज्ञापत्रें दिलीं होतीं, त्याप्रमाणें सर्व गोष्टी घडून आल्या कीं नाहींत, हें पाहण्यासाठीं मी राजाधिराजांच्या आज्ञेनें येथें आलों आहें. राजाधिराजांच्या आज्ञा बऱ्याच अंशीं सिद्धीस गेल्या, हें मला वाटेमध्यें समजलेंच आहे; तथापि आपण स्वतः या कामीं नियुक्त पुरुष असल्यामुळें आपल्या मुखानें सर्व वर्तमान ऐकणें जरूर आहे.'

नंतर विक्रमसेनानें सत्यरथाला प्रतापपुरीं झालेल्या अघोर प्रसंगाचें इत्थंभूत वर्तमान निवेदन केलें. फक्त त्या प्रसंगीं दमयंतीनें केलेलें भयंकर कृत्य मात्र त्यानें सत्यरथापासून चोरून ठेविलें.

तें ऐकल्यावर सत्यरथ बोलला,–'तथापि मला आणखी ज्या एक दोन गोष्टी अर्धवट समजल्या आहेत, त्या पुऱ्या समजून घ्यावयाच्या आहेत. तुम्ही एक पत्र देऊन जो दूत अर्कपूरकर भीमरथ राजाकडे पाठविला होता, त्याचा वांटेत खून झाल्यामुळें—'

विक्रमसेनानें आश्चर्यानें विचारिलें,–'काय म्हणतां! त्या दुर्मुखाचा खून झाला?' नंतर पुनः गंभीर मुद्रा धारण करून तो म्हणाला,–'सध्यां जरी त्या दुष्ट माणसाचा आम्हाला थोडासा उपयोग झाला, तरी त्याची पूर्वीचीं कर्में अत्यंत नीचपणाचीं असल्यामुळें, त्याला झाली ती शिक्षा योग्य झाली! त्याचा असा अंत झाला याचें आम्हांस तिळमात्र वाईट वाटत नाहीं. पण कायहो, त्याचा खून कोणीं केला?'

सत्यरथानें मोडक्या घरांतील सर्व वर्तमान विक्रमसेनाला सांगून व तेथें मिळालेलें पत्र दाखवून म्हटलें,–'या पत्राच्या शेवटीं जो एक उल्लेख केलेला आहे, त्याचा अर्थ काय?'

विक्रमसेन मनाचा मोकळेपणा दाखवीत बोलला,–'तुम्ही कोणत्या गोष्टीसंबंधानें प्रश्न करीत आहां, हें अजून नीटसें माझ्या ध्यानीं आलें नाहीं. मला जर तो मजकूर दाखवाल तर त्याचा अर्थ मी लागलाच सांगेन.'

सत्यरथ तें पत्र दाखवीत म्हणाला,–**'प्रियंवदेचा प्राण घेण्यासाठीं जो कोणी तेथें गेला होता, त्याच्या हातानें तेथें भलत्याच एका स्त्रीचा प्राणान्त झाला; ही नवखी स्त्री कोण असावी, आणि ती प्रियंवदेच्या दिवाणखान्यांत कशी आली असावी याचा उलगडा अजून झाला नाहीं.'** असें जें या पत्राच्या शेवटीं लिहिलेलें आहे, त्याचा अर्थ काय?'

हा प्रश्न ऐकून विक्रमसेन मोठ्या विचारांत पडला. आपल्या बहिणीनें खूड उगविण्याच्या इच्छेनें जें कृत्य केलें होतें, त्याची वाच्यता सत्यरथासारख्या परकी माणसापाशीं करणें हें त्याच्या जिवावर आलें, व तो प्रसंग मारून नेण्यासाठीं

बोलला,–'अहो राजसेवक, हें पत्र एका मित्रानें दुसऱ्या मित्रास लिहिलेलें असल्यामुळें त्यामध्यें असा संदिग्ध मजकूर असणें साहजिक आहे. शिवाय हें पत्र खासगी असल्यामुळें त्यांतील मजकुरासंबंधानें वाटाघाट करणें योग्य होणार नाहीं.'

सत्यरथ बोलला,–'तुमचें म्हणणें बरोबर आहे, एकाद्याचें खासगी पत्र दुसऱ्यानें वाचणें हें अयोग्य कृत्य आहे, हें मी जाणून आहे. परंतु हें पत्र मला ज्या प्रसंगीं मिळालें त्या प्रसंगीं मीं तें वाचून पाहणें अगत्याचें होतें, तरी सुद्धां मी इतकें सांगतों कीं, जर त्यावेळीं हें पत्र उघडें नसतें–हें थैलींत असून त्यावर मोहोर असती–तर मीं त्या-प्रसंगीं देखील थैली उघडुन हें पत्र वाचलें नसतें. पण ज्या अर्थीं हें थैलींतून बाहेर पडलेलें माझ्या हातीं आलें, त्या अर्थीं मेलेल्या मनुष्यासंबंधानें अधिक माहिती मिळविण्यासाठीं मीं हें वाचून पाहिलें. या पत्रावरून असें दिसतें कीं, त्या दिवशीं कोणी अनोळखी स्त्री प्रतापपुरच्या वाडयांत आली असून तेथें तिचा घात झाला असावा. हें पत्र आपण स्वतां लिहिलें आहे, आणि आपणांस यासंबंधानें अधिक माहितीही असणें शक्य आहे–'

विक्रमसेन मध्येंच म्हणाला,–'अहो सत्यरथ, यासंबंधानें अधिक चौकशी करण्यांत आपला हेतु काय आहे, याची बरोबर कल्पना माझ्या मनांत आल्यावांचून माझ्या मुखानें आपणांस ज्यास्त माहिती मिळणें शक्य नाहीं !'

सत्यरथ बोलला,–'माझें तुमच्याशीं वैर असणें संभवनीयच नाहीं. कल्पना करा कीं, जर मी तुमचा वैरी असतों, तर राजाधिराजांनीं माझी या कामगिरीवर योजनाच केली नसती ! राजाधिराजांच्या आज्ञेनें किंवा इच्छेनें ज्या गोष्टी घडून आलेल्या आहेत, त्यांसंबंधानें वादविवाद करण्याची किंवा तुम्हांस दोष देण्याची माझी अगदीं इच्छा नाहीं. प्रतापपुरच्या राजवाडयांत जीं कोणी माणसें सांपडतील त्यांस देहान्त शिक्षा देण्याची निंबमहाराजांची इच्छा आज्ञापत्रांत स्पष्ट नमूद केलेली होती, हें मला माहीत आहे. अर्थात् तेथें ज्यांचे प्राण गेले त्यांच्यासंबंधानें आपणांस जाब विचारण्यासाठीं मी आपणांस हा प्रश्न करीत नाहीं, हें आपल्या ध्यानीं आलेंच असेल ! मी केवळ मित्रत्वानेंच हा प्रश्न आपणांस विचारीत आहें. शिवाय मी येथून परत गेल्यावर राजाधिराजांस इकडचें वृत्त निवेदन करीन, त्यावेळीं मला कदाचित् महाराज यासंबंधानें अधिक प्रश्न करितील'—

विक्रमसेन बोलला,–'पुरे पुरे ! अहो सत्यरथ, तुमच्या हेतूसंबंधानें शंका घेण्यास मी कधींही प्रवृत्त होणार नाहीं. या पत्रामध्यें ज्या गोष्टीचा उल्लेख आहे, ती गोष्ट जरा नाजूक असल्यामुळें—'

सत्यरथ अत्यंत गंभीरतेनें बोलला,–'ती गोष्ट जरी कितीही नाजूक असली, तरी ती माझ्यापासून तिसऱ्या कानास समजावयाची नाहीं, ही आपली खात्री असूं द्या ! विश्वासानें विश्वास वाढतो; आपण जर मजवर विश्वास ठेवाल, तर राजाधिराजांपाशीं मी आपली स्तुतीच करीन, व राजाधिराजांना सांगण्यासारख्या गोष्टी असतील, तितक्याच मी त्यांस सांगेन.'

थोडा विचार करून विक्रमसेन म्हणाला,–'तुमच्यासारख्या नेहमीं राजाधिराजांसन्निध असणाऱ्या पुरुषाला जरी आमच्या गुप्त गोष्टी समजल्या, तरी त्यांपासून आमचा तोटा होणार नाहीं. शिवाय एका शिपाईगड्यानें दुसऱ्यावर विश्वास ठेविलाच पाहिजे. ज्या माणसाच्या हातून अनोळखी स्त्रीचा प्राणघात झाला, ती एक स्त्रीच आहे ! ही स्त्री कोणी भलती सलती नसून प्रत्यक्ष माझी बहीण दमयंतीच होय ! तिचें प्रेम शेखरावर जडलें; पण त्या नीचानें तिच्या प्रेमाचा धिक्कार केला. इतकेंच नव्हे, तर,

त्या दोघांची पूर्वी एकदोन वेळ भेट झाली, त्या प्रसंगीं त्या दुष्टानें तिची निर्भर्त्सना केली. त्यामुळें त्या प्रेमाचें रूपांतर होऊन त्या दोघांमध्यें वैर उत्पन्न झालें. आपला अव्हेर करून त्यानें प्रियंवदेशीं विवाह केला, या गोष्टीची चीड येऊन माझी बहीण सूड उगविण्याची संधि पाहूं लागली ! स्त्रियांच्या मनांत एकदां मत्सर उत्पन्न झाला, म्हणजे त्यांच्या हातून कोणतें अघोर कृत्य व्हावयाचें नाहीं ? परवाचे दिवशीं आम्ही प्रतापपुरावर छापा घालण्यासाठीं निघालों असतां दमयंती पुरुषवेषानें आमच्याबरोबर आली. प्रियंवदेमुळें आपल्या प्रेमाचा शेखरानें धिक्कार केला, ही गोष्ट तिचें अंतःकरण जाळीत असल्यामुळें दमयंती अंतःपुरांत शिरली,–

सत्यरथ मध्येंच म्हणाला,–'पुढें काय झालें असेल, त्याचा अंदाज करणें फारसें कठीण नाहीं.' हे शब्द त्यानें बाहेरून मोठ्या शांतपणानें उच्चारिले होते, पण आंतून त्याचें अंतःकरण सारखें जळत होतें.

नंतर विक्रमसेन म्हणाला,–'दमयंतीबरोबर जो तेथील माहितगार मनुष्य होता, त्यानें तिला प्रियंवदेचा दिवाणखाना दाखविला; त्या दिवाणखान्यांतील पलंगावर एक स्त्री निजलेली होती. दमयंतीनें आपला खंजीर तिच्या छातींत खुपसला, पण हें कृत्य होऊन गेल्यानंतर तिला सारी गोष्ट कळून आली. दमयंतीच्या खंजीरास बळी पडलेली स्त्री कोण हें आम्हांला अजूनही समजलें नाहीं.'

ही हकीकत ऐकल्यावर सत्यरथ थोडा वेळ स्तब्ध राहिला. नंतर त्यानें विक्रमसेनाला प्रश्न केला,–'ही आपली बहीण सध्यां येथें असेलच !'

हा त्याचा प्रश्न ऐकून विक्रमसेनाला फार आश्चर्य वाटलें. इतकेंच नव्हे, तर सत्यरथाच्या मनांत तिची भेट घ्यावयाचा विचार असावा, असेंही त्यानें अनुमान केलें. नंतर तो म्हणाला,–'होय; ती येथेंच आहे. परंतु या तुमच्या प्रश्नाचा हेतु माझ्याबरोबर ध्यानीं आला नाहीं.'

सत्यरथ बोलला,–'हा प्रश्न करण्याचें कारण मी लवकरच सांगेन. पण आधीं सांगा, जी अनोळखी स्त्री मरण पावली, तिचा चेहरामोहरा कसा होता, हें आपल्या बहिणीनें आपणांस सांगितलें आहे काय ? मयत स्त्री कोण असावी, हें समजणें फार अगत्याचें आहे.'

विक्रमसेन बोलला,–'मीं त्यासंबंधानें फारशी चौकशी केली नाहीं. तथापि यासंबंधानें आपणांस जी काय माहिती पाहिजे असेल, ती मी वाटेल तर आतांच तिला विचारून येतों.'

सत्यरथ म्हणाला,–'पण मी विचारतों, प्रत्यक्ष मलाच तिची भेट घेतां येणें कठीण पडेल कीं काय ? माझ्यासारख्या परकी गृहस्थानें अशी सलगी दासविणें शिष्टाचारास योग्य होणार नाहीं; हें खरें आहे, तथापि–'

विक्रमसेनाला आपला पूर्वीचा तर्क बरोबर आहे, असें आढळून आलें; आणि तो म्हणाला,–'अहो सत्यरथ, दमयंतीनें मूर्खपणानें जें कृत्य केलें, त्याचा पाढा परकी गृहस्थासमोर तिच्या मुखानें वाचविणें योग्य होईल काय ?'

सत्यरथ बोलला,–'तुमचें म्हणणें खरें आहे; पण सध्यांचा प्रसंग मोठा नाजूक आहे. ज्या अर्थीं तुम्ही मजवर विश्वास ठेवून इतका वेळ भाषण केलें, त्या अर्थीं मलाही एक गुप्त गोष्ट तुमच्यापाशीं सांगितली पाहिजे. शेखर पूर्वी चंपावतीमध्यें बंदींत होता, ही गोष्ट तुम्हाला माहीत असेलच. तेथें असतां तेथील एका सरदाराच्या स्त्रीशीं त्याचा प्रेमसंबंध जडला, व ती गोष्ट उघडकीस आली. असल्या गोष्टी चवाठ्यावर आणण्यापेक्षां त्यांवर पांघरूण घालणें किती इष्ट असतें हें आपणांस माहीत असेलच. ती स्त्री दुसरें पंधरा दिवसांपूर्वी चंपावतींतून

एकाएकीं नाहींशी झाली. तिचा शोध करण्याचा कोणीं प्रयत्न केला नाहीं हें खरें, पण तिचें पुढें काय झालें, हें अनेक कारणांमुळें मला समजणें जरूर आहे. पहा; विचार करा. माझा हा उद्देश जर तुमच्या हातून सिद्धीस गेला, तर मी तुमचा जन्माचा मित्र होईन. माझ्यासारख्या सतत राजाधिराजांजवळ राहणाऱ्या मित्राचा तुम्हांस किती उपयोग होईल, हें मीं सांगितलें पाहिजे असें नाहीं.' सत्यरथानें या वेळीं ही अगदीं अस्खलित खोटी गोष्ट विक्रमसेनास सांगितली होती हें वाचकांच्या ध्यानीं आलेंच असेल.

परंतु या गोष्टीचा उपयोग फारच उत्तम झाला. शेखर जरी जिवंत असला, तरी त्याच्या कीर्तीस कलंक लावणारी गोष्ट आपणास समजली, याचा विक्रमसेनाला मोठा आनंद झाला. आपल्या बहिणीची आणि सत्यरथाची भेट झाल्यास या गोष्टीसंबंधानें आपणांस अधिक माहिती मिळेल, असें मनांत येऊन तो नीच विक्रमसेन, दमयंती आणि सत्यरथ यांची भेट करून देण्यास तयार झाला. तो म्हणाला,–'ज्या अर्थीं आपणाला तिची भेट घेणें अगत्याचें आहे, त्या अर्थीं मी आतांच तिला येथें बोलावून आणतों.'

सत्यरथानें होय म्हटल्यावर विक्रमसेन निघून गेला. सत्यरथ सध्यां ज्या दिवाणखान्यांत बसला होता, तेथें लिहिण्याचें साहित्य तयार होतें, तें घेऊन सत्यरथानें एक लहानशी चिठी लिहिली व तिची लहानशी गुंडाळी करून ती आपल्यापाशीं ठेविली. थोड्याच वेळानें विक्रमसेन आपल्या बहिणीसह तेथें आला. सत्यरथानें विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें दमयंतीनें चोख दिलीं. तिचें त्या वेळचें निर्भीडपणाचें वर्तन पाहून आपण योजिलेला बेत सिद्धीस जाईल, अशी सत्यरथाच्या मनाची खात्री झाली. योग्य संधि पाहून त्यानें आपल्या जवळची चिठी दमयंतीपुढें टाकली, आणि ती उचलून घावयास त्यानें तिला संकेत केला. दमयंतीनें ती चिठी घेतली. कांहीं वेळानें त्यांचें त्या वेळचें भाषण संपलें.

दमयंती त्या दिवाणखान्यांतून बाहेर पडल्याबरोबर तिनें ती चिठी उघडून वाचली, तींत पुढीलप्रमाणें मजकूर होता:–

'तूं ज्याचा द्वेष करितेस, त्याचा प्राण घेण्याची योग्य संधि जर तुला हवी असेल, तर आज दोन प्रहरीं तूं मला समोरच्या बागेंत येऊन भेट.'

ही चिठी वाचून दमयंतीला फार हर्ष वाटला, हें सांगणें नकोच. चिठीप्रमाणें दोन प्रहरीं दमयंती बागेंत गेली सत्यरथ तिची वाट पाहत तेथें बसलेला होता त्याला पहातांच ती म्हणाली, 'तुमच्या चिठीप्रमाणें मी येथें आलें आहें?'

सत्यरथ बोलला,–'मला या बागेसंबंधानें फारशी माहिती नाहीं म्हणून विचारतों, आपण येथें जें काय बोलूं तें कोणाच्या कानावर जाण्याचा संभव नाहीं ना?'

दमयंती म्हणाली,–'नाहीं; सध्यां आपण आहों ही जागा फारशी वहिवाटीची नाहीं. शिवाय मी उभी आहें, त्यामुळें इकडे कोणी येत असलें तर तें मला चटकन दिसेल.'

सत्यरथ बोलला,–'बाईसाहेब, आपला माझा जरी परिचय नाहीं, तरी सध्यांच्या प्रसंगीं मी आपली अशा रीतीनें भेट घेण्यास तयार झालों आहें, यांतील कारण माझ्या चिठीवरून आपल्या ध्यानीं आलें असेलच. माझ्या मनांत जो हेतु साध्य करून घ्यावयाचा आहे, तो तर मी आपणांस थोडक्यांत कळविलाच आहे. अर्थात् या प्रसंगीं किती सावधपणा ठेवणें जरूर आहे, हें आपल्या लक्ष्यांत आलेंच असेल.'

दमयंतीनें सत्यरथावर आपली दृष्टि रोखून त्याच्या मनांत सध्यां काय चाललें असावें हें पाहण्याचा यत्न केला. ती आपणाकडे अशा रीतीनें पाहत आहे, हें ध्यानीं आलें असूनही सत्यरथ बावरला नाहीं, किंवा

त्याच्या मुद्देमध्यें अगदीं फेर झाला नाहीं. नंतर ती म्हणाली,–' तुम्ही जें काय सांगाल तें मीं खरें कशावरून समजावें ? '

सत्यरथ बोलला,–' असा संशय आपल्या मनांत येणें हें अगदीं साहजिक आहे. त्या नीच शेखरानें माझें किती नुकसान केलें आहे, हें मीं पूर्वी स्पष्ट सांगितलेंच आहे; माझ्या अपमानाचा सूड मीं स्वतः उगवावा हें जरी योग्य आहे, तरी केवळ निंबराजाची मर्जी राखण्यासाठीं त्या नीचाचा प्राण मला उघडपणें घेतां येत नाहीं. शेखराचे प्राण वांचविण्याची निंबराजाची किती उत्कट इच्छा आहे, हें आज्ञापत्रावरून तुमच्या ध्यानीं आलेंच असेल. सूड घेण्याची इच्छा एकदां उत्पन्न झाली, म्हणजे मनुष्य काय करील हें कोणीं सांगावें ? माझ्याविषयीं तुमच्या मनांत जरी संशय उत्पन्न झाला, आणि तुमचें–माझें मत जुळलें नाहीं, तरी त्यांत माझें अगदीं नुकसान नाहीं. ज्याअर्थीं तुमचें–त्याचें वैर बाणलेलें आहे, त्याअर्थीं मीं सांगितलेली गोष्ट त्याच्या कानावर जावयाची नाहीं, ही माझी खात्री आहे. तुमच्यासारखी साहसी आणि स्वाभिमानी स्त्री आपले हेतु पूर्ण होण्याची अनायासें प्राप्त होणारी संधि कधींही व्यर्थ घालविणार नाहीं, अशी माझ्या मनाची खात्री आहे. '

दमयंतानें विचारलें,–' ज्या स्त्रीचा माझ्या हातून चुकून प्राण गेला, त्या स्त्रीसंबंधानें इतकी बारकाईनें चौकशी तुम्ही कां केली, याचें कारण मला समजलें पाहिजे. '

सत्यरथ बोलला,–' ती एका सरदाराची स्त्री असून त्या सरदाराच्या अब्रूचें रक्षण करण्यासाठीं ही गोष्ट गुप्त ठेवणें जरूर आहे. तुम्ही ज्या स्त्रीचें वर्णन केलें, त्यावरून ती तीच असावी, अशी माझ्या मनाची खात्री झाली आहे. प्रतापपुरच्या राजवाड्यांत एका परकी स्त्रीचा प्राण गेला, ही गोष्ट जितकी गुप्त राहील तितकी ती राजाधिराजांनाही इष्टच आहे. ' असें बोलून सत्यरथ थोडा वेळ थांबला आणि नंतर म्हणाला,–' परवांच्या प्रसंगीं जर त्या नीच शेखराचा प्राण गेला असता, तर तें किती चांगलें झालें असतें ! '

दमयंती म्हणाली,–' अशी जर तुमची इच्छा आहे, तर ती तुम्ही स्वतः पूर्ण करून कां घेत नाहीं ? तुमच्यापाशीं बरेंच सैन्य आहे; माझ्या भावाजवळही पुष्कळ लोक आहेत; तो नीच सध्यांपुरता तरी अडचणींत सांपडला आहे; अशा वेळीं जर त्याच्यावर हल्ला केला, तर तुमचा हेतु सहज सिद्धीस जाणार आहे ! '

सत्यरथ बोलला,–' परंतु तसें आतांच करतां येत नाहीं. शेखराचे प्राण वांचवावे अशी निंबराजाची इच्छा असल्यामुळें जर आम्ही आज वत्सपुरावर छापा घातला, तर त्याचा परिणाम फार भयंकर होईल ! ' किंचित् थांबून सत्यरथ म्हणाला,–' शेखराचा प्राण तर गेलाच पाहिजे ! '

दमयंती ईर्ष्येनें म्हणाली,–' होय; ज्यानें माझा अपमान केला–ज्यानें माझा छळ केला–त्याचा प्राण तर गेलाच पाहिजे !– पण माझ्या खासगी गोष्टी तुमच्यासारख्या परकी गृहस्थाला सांगून काय उपयोग ? '

सत्यरथानें उत्तर केलें,–' कां ? उपयोग कां नाहीं ? तुम्ही आपलें मन मोकळें करून मजबरोबर बोलाल, तर त्याचा फारच उपयोग होईल. '

दमयंतीनें विचारलें,–' तो कसा ? '

सत्यरथ बोलला,–' त्याच्या नाशाचा उपाय मी आपणांस सांगेन ! माझा आणि शेखराचा कोणत्या कारणावरून द्वेष पडला हें निंबराजाला माहीत आहे. मी या प्रदेशांत आलों असतां त्याचा घात झाला, ही गोष्ट जर निंबराजाला समजली, तर तो माझाच संशय घेईल; यासाठीं ही गोष्ट परस्पर तिसऱ्याकडून करविणें मला इष्ट आहे. '

दमयंतीनें विचारलें,–' तें तुम्ही कसें काय करविणार ? '

सत्यरथ बोलला,–'मी आतां जें काय सांगेन तें तिसऱ्या कानाला कळणार नाहीं, असें वचन देत असाल, आणि त्या दुष्टाचा प्राण घेण्याचें स्वतः आपल्या शिरावर घ्याल तर मी माझा बेत आपणांस कळवीन !'

दमयंती ईर्ष्येनें म्हणाली,–'माझ्या मनांतील फार दिवसांचा इष्ट हेतु सिद्धीस जाण्याची संधि अनायासें प्राप्त झाली असतां ती मी गमावीन, तर ती गोष्ट मूर्खपणाची होईल. मी तुमच्यावर विश्वास ठेवून तुम्हास वचन देतें ! एवीं तेवीं माझे हात रक्तानें विटाळलेच आहेत; तर आपला उद्देश तरी कां साधूं नये ?'

सत्यरथ बोलला,–'बाईसाहेब, हें तुमचें धैर्य पाहून मला फार आनंद होत आहे. पण पहा ! ही गोष्ट तिसऱ्या माणसाला समजतां नये–फार तर काय, आपल्या बंधूला देखील ही गोष्ट कळतां नये !'

दमयंती बोलली,–'ठीक आहे ! मी त्याला त्यांतील एक अक्षरही कळविणार नाहीं!'

सत्यरथ म्हणाला,–'बाईसाहेब, पहा ! अजून नीट विचार करा ! नाहीं तर आयत्या वेळीं मागें घ्याल ! तुमच्या मनांतील प्रीतीचे विचार आयत्यावेळीं जागृत होतील ! आपले हात-पाय कांपूं लागतील–'

अत्यंत अभिमानपूर्वक दमयंती म्हणाली,–'तुम्हाला अजून माझ्या मनाची बरोबर पारख करतां आली नाहीं, म्हणून तुम्ही अशा भलत्यासलत्या शंका काढीत आहां–'

सत्यरथ बोलला,–'बाईसाहेब, माफ करा ! क्षणमात्र माझ्या मनांत आपल्या दुर्बलतेविषयीं शंका आली, पण ती आतां पार नाहींशी झाली आहे. मी आतां मुद्यावर येतों. मी आज शेखराला जेथें बोलावीन. तेथें त्यानें आलें पाहिजे, असें साधन आज माझ्यापाशीं आहे. मी त्याला फासांत अडकवीन; पण पुढचें कृत्य तुमच्या हातानें उरकलें पाहिजे.'

हें ऐकून दमयंतीचे नेत्र विलक्षण तेजानें चकाकूं लागले. ती एकाद्या राक्षसीप्रमाणें क्रूर दिसूं लागली. ती अत्यानंदानें म्हणाली,–'केव्हां आणि कोठें ? सांगा, म्हणजे माझी तयारी आहे ! एका क्षणाचा उशीर न करतां नेमलेल्या वेळीं मी तेथें येईन !'

किंचित् विचार केल्यासारखें करून सत्यरथ म्हणाला,–'त्रिशूल–पर्वताजवळील शिवालयाची जागा या कृत्यास फार चांगली आहे. तेथें बरोबर मध्यरात्रीच्या सुमारास तुम्ही या, म्हणजे तुमचा शत्रु कोठें आहे हें मी दाखवीन. पण इतक्या लांबचा प्रवास तुम्हाला एकट्यानें होईल ना ?'

दमयंती म्हणाली,–'त्याची काळजी नको ! मध्यरात्रीचे सुमारास मी पुरुषवेषानें तेथें येईन !'

सत्यरथ बोलला,–'ठीक आहे ! तुमच्या बंधूशीं माझें थोडें काम आहे. तेवढें केल्यावर मी येथून एकदम वत्सपुरीं जाईन, आणि त्या नीच शेखराला आपल्या जाळ्यांत गुंतवून नेमलेल्या जागीं घेऊन जाईन. अजून नीट विचार करा, ही गोष्ट फार गुप्तपणानें झाली पाहिजे. ही गोष्ट तिसऱ्या माणसास न कळविण्याचें तुम्हीं वचन दिलें आहे, तें लक्ष्यांत आहे ना ?'

दमयंती म्हणाली,–'त्याची आतां तुम्हांस काळजी नको ! मी बरोबर मध्यरात्रीं तेथें येऊन तुम्हांस भेटेन.'

इतकें त्यांचें संभाषण झाल्यावर प्रथम दमयंती राजवाड्यांत गेली व ती गेल्यावर नंतर सत्यरथ बागेंतून बाहेर पडला. तो राजवाड्यांत आल्यावर त्यानें प्रथम विक्रमसेनाची भेट घेतली. उभयतां एकान्तस्थळीं बसल्यावर सत्यरथ अत्यंत गंभीर मुद्रा धारण करून विक्रमसेनास म्हणाला,–'अहो विक्रमसेन, तुम्ही माझ्यावर विश्वास ठेवून मला ज्या गोष्टी सांगितल्या, त्यांवरून माझ्या अंतःकरणांतही तुमच्याविषयीं विश्वास उत्पन्न झाला आहे. राजाधिराजांनीं मला–त्यांच्या

अंतरंगांतील सेवकाला-याप्रसंगीं इकडे कशासाठीं पाठविलें, हें आपल्या ध्यानीं आलें आहे काय ?'

विक्रमसेन बोलला -' त्यांनीं दिलेल्या आज्ञापत्राप्रमाणें सर्व गोष्टी घडुन आल्या कीं नाहींत, हें पाहण्यासाठींच त्यानीं तुम्हास इकडे पाठविलें असावें.'

सत्यरथ अत्यंत गंभीर मुद्रा धारण करून म्हणाला -' माझ्या आगमनाचा हेतु फार गंभीराळा आहे, व तो आतां उघडपणें सांगण्याची वेळ आली आहे. पण सांगा, आपलें भाषण येथून दुसऱ्याच्या कानावर जाण्याचा संभव नाहीं ना ?'

विक्रमसेन म्हणाला,-' नाहीं. तथापि आपण एकदां खात्री करून घेऊं.' असें म्हणून तो दिवाणखान्याच्या दरवाज्यापाशी गेला, व तो दरवाजा उघडून तेथें कोणी नाहीं अशी त्यानें आपल्या मनाची खात्री करून घेतली. नंतर ते दोघे एका खिडकीपाशीं उभे राहिले, व तेथें त्यांचें पुढील भाषण झालें.

सत्यरथ म्हणाला,-' मला इकडे पाठविण्यांत राजाधिराजांचा मोठा खोल हेतु आहे. प्रतापपुरकर हे बागलाणांत प्रबल असल्यामुळें त्यांचा निःपात करणें राजाधिराजांना फार अगत्याचें वाटत होतें. तो त्यांचा हेतु बहुतेक सिद्धीस गेला. पण अजून एक काटा राहिला आहे. ज्यानें बलभुवनचे लढाईचे वेळीं मोठ्या चातुर्यानें पुढील योजना तयार केल्या होत्या, आणि ज्याच्या शौर्यामुळें आमच्या सेनापतीला एकदोन ठिकाणीं माघार घ्यावी लागली, तो पुरुष अजून जिवंत आहे. राजाधिराज पूर्वी एकदां बागलाणांत आले होते, त्यावेळीं शेखरानें त्यांचे प्राण वांचविले असल्यामुळें, कृतज्ञता दाखविण्यासाठीं राजाधिराजांना शेखराचें नाव आज्ञापत्रामध्यें लिहिणें बरोबर वाटलें नाहीं. परंतु त्यानें जिवंत रहावें व आपणांस वारंवार पीडा करावी, ही गोष्ट राजाधिराजांना अगदीं इष्ट वाटत नाहीं. म्हणून त्यांनीं मला गुप्त आज्ञा करून मुद्दाम इकडे पाठविलें आहे. स्वजनांचा नाश झाल्यामुळें शेखराला संताप येईल, आणि त्या संतापाच्या भरांत जर त्यानें निंबराजाचा सूड घेण्याची प्रतिज्ञा केली, तर राज्यांत मोठा बखेडा उत्पन्न होईल. यासाठीं तवा तापलेला आहे, तोंच त्यावर त्या पोराची पोळी भाजून घ्यावी अशी राजाधिराजांची इच्छा आहे.'

विक्रमसेन बोलला,-' तर मग परवांप्रमाणें आज रात्रीं वत्सपुरावर छापा घातला पाहिजे.'

सत्यरथ बोलला,-' छेः छेः वत्सपुरावर हल्ला करण्याची राजाधिराजांची आज्ञा नाहीं हें काम फार गुप्त रीतीनें पार केलें पाहिजे. हें काम कसें उरकून घ्यावयाचें याचा विचार मीं केला आहे. मी काय सांगतों, तिकडे तुमचें पूर्ण लक्ष्य असूं द्या. शेखरानें माझाही प्राण वांचविला असल्यामुळें, मला स्वतःला पुढें होऊन हें कृत्य करतां येत नाहीं, म्हणून हें काम तुम्हीं केलें पाहिजे. हें काम पार पडल्यास तुम्हाला तुम्ही मागाल तथें पंचवीस हजारांची जहागीर मिळेल.'

विक्रमसेन उतावळेपणानें बोलला,-' जहागिरीसाठीं मी हपापलेला नाहीं. शत्रूचे प्राण घेण्यांत मला जो आनंद होईल, तो शंभर जहागिऱ्यांनीं होणार नाहीं. राजाधिराजांची आज्ञा ऐकण्यास माझें मन फारच उत्सुक झालें आहे. तुमचा बेत काय तो लवकर समजूं द्या.'

सत्यरथ बोलला,-' तर मग आणखी चार घटकांनीं तुम्ही येथून गुप्तपणानें बाहेर पडुन एकदम त्रिशूल-पर्वतावरील शिवालयाचा मार्ग धरा. तेथें गेल्यावर धर्मशाळेच्या पूर्वेकडील खोलींत तुम्ही उतरा. त्या मणिभद्राबरोबर किंवा दुसऱ्या कोणाबरोबर फारसें भाषण करूं नका. तो मोठा धूर्त पुरुष आहे. जर एकादा भलताच शब्द चुकून तुमच्या तोंडांतून बाहेर पडला, तर तेवढ्यानेंच तो

तुमच्याविषयीं संशय घेईल. तुमच्या हातून हें कृत्य झालें असें कोणालाही समजतां नये. फार तर काय, शेखराच्या घातासंबंधीं हपापलेली तुमची बहीण दमयंती हिलासुद्धां यांतील एक अक्षर पूर्वी कळतां नये. तिला जर तुमचा उद्देश कळला, तर तिची सूड उगविण्याची इच्छा प्रबल होईल, आणि तिच्या वर्तनांत फेर पडेल. मी काय म्हणतों तें तमच्या ध्यानीं आलेंच असेल. तर मग ही गोष्ट गुप्त राखण्याचें वचन द्या पाहूं.'

विक्रमसेन म्हणाला,–' हवी तर मी पाहिजे तसली शपथ वाहतों !'

सत्यरथ म्हणाला,–' शपथेचें कारण नाहीं ! माझा तुमच्या वचनावर विश्वास आहे. तुमच्या मागोमाग मी येथून निघून वत्सपुरीं जातों, आणि शेखराला थापा मारून शिवालयांत घेऊन येतों. प्रहररात्रीचे सुमारास मी शिवालयांत येऊन तुम्हांस भेटेन. तोंपर्यंत जर मी आलों नाहीं, तर आपला बेत आज रात्रीं जमत नाहीं असें समजून स्वस्थ निजा. निदान उद्यां रात्रीं तरी हें काम पार करावयाचें. मी काय सांगतों तें ध्यानीं आलें ना ?'

विक्रमसेन म्हणाला,–' होय; तुम्ही आज प्रहररात्रीं शिवालयांत आलां नाहीं, तर आजचा बेत रहित झाला असें मी समजेन. तथापि माझी अशी इच्छा आहे कीं, हें काम जितकें लवकर हातावेगळें होईल तितकें बरें.'

सत्यरथ म्हणाला,–' माझी इच्छासुद्धां अशीच आहे. हजार वाटांनीं मी त्याला घेऊन आजच शिवालयांत येतों. ठरलें तर; आतां आपण आपापल्या उद्योगास लागूं.'

ठरल्याप्रमाणें विक्रमसेन आपल्या घोड्यावर स्वार होऊन त्रिशूल–पर्वतावरील शिवालयाकडे निघून गेला. नंतर सत्यरथानें एक पत्र लिहून आपल्याबरोबर घेतलें, आणि तोही नारायणपुरांतून आपल्या वाटाड्यासह बाहेर पडला, नारायणपुरचे हद्दीवर आल्यावर त्यानें वाटाड्याजवळ तें पत्र देऊन त्याला वत्सपुरीं शेखराकडे पाठवून दिलें, आणि तो त्रिशूल–पर्वताकडे वळला. शिवालयापाशीं आल्यावर सरळ मार्गानें तो धर्मशाळेकडे गेला नाहीं. तो मागच्या मार्गानें आंत शिरला, आणि विक्रमसेनाच्या दृष्टीस न पडतां त्यानें मणिभद्राची गांठ घेतली, त्याला जो बेत साधावयाचा होता, त्याचा आपल्या सासऱ्याला थांग–पत्ता लागूं न देतां त्यानें त्याला कित्येक सूचना दिल्या.

आतां आपण नारायणपुराकडे वळूं. हें सत्यरथानें केलेल्या उठावणीप्रमाणें बरोबर सायंकाळचे सुमारास पुरुषवेषानें दमयंती राजवाड्यांतून बाहेर पडली, आणि घोड्यावर स्वार होऊन तिनें एकटीनें त्रिशूल–पर्वताचा मार्ग धरिला. तीं बहीण–भावंडे एकाच हेतूनें प्रेरित होऊन एकाच ठिकाणीं गेलीं किंवा जात होतीं, तरी त्या दोघांस एकमेकांच्या हेतूचा थांग-पत्ता अगदीं नव्हता. राजवाड्यांतून बाहेर पडतांना आपण कोठें जात आहों, हें आपल्या चुलत्यास कळविणें जरूर आहे असें विक्रमसेनाला वाटून त्यानें कांहीं महत्त्वाच्या कामासाठीं आपण बृहद्रथाची भेट घेण्यासाठीं सुंदरपुरीं जात आहों अशी थाप मारिली होती; पण दमयंतीला अशी कांहीं संभवनीय सबब सांगतां येणें शक्य नसल्यामुळें, आपल्या विश्वासांतील मोतद्दाराकडून घोड्यावर सामान चढवून ती चोरून राजवाड्यांतून बाहेर पडली होती. भर तिनसांजाचे वेळीं जंगली व डोंगराळ प्रदेशांतून प्रवास करीत असतां तिच्या मनास भीतीचा लेशही शिवला नाहीं. उलट आपल्या मनांत फार दिवस पेटत असलेल्या वैराग्नीला आज आहुती मिळणार या गोष्टीचा तिला अत्यानंद होत होता, व त्यापुढें तिच्या मनांत इतर कोणतेही विचार येत नव्हते.

प्रहररात्र उलटून गेली, तरी सत्यरथ व विक्रमसेन यांची भेट झाली नाहीं. आणखी

दोन घटका गेल्या आणि विक्रमसेनाला आजचा बेत रहित झाला असावा असें वाटलें. तो त्या खोलींत एकटा व स्वस्थ बसला असल्यामुळें आणि ज्या कामासाठीं तो तेथें गेला होता, तें काम साध्य होण्याचा रंग दिसत नाहीं, असें बहुतेक ठरल्यामुळें, त्याला हळुहळु झोंप येऊं लागली.

दमयंती निर्धास्तपणें आपला घोडा पिटाळीत त्रिशूल–पर्वताकडे चालली होती. तिच्या शरीरांतील रक्त गरम झालें होतें, आणि तिला विशेष प्रकारचा अवर्णनीय आनंद वाटत होता. मध्यरात्रीचे सुमारास सत्यरथ शिवालयाच्या मागच्या रस्त्यानें बाहेर पडला, आणि सुमारें पांचशें पावलांवर तिची वाट पाहत उभा राहिला. त्याला तेथें फार वेळ तिष्ठत उभें रहावें लागलें नाहीं. लवकरच दमयंती त्याच्या दृष्टीस पडली, आणि तिला घेऊन तो पुनः मागच्या दरवाज्यानें शिवालयांत आला. जातांना त्यानें तिचा घोडा तेथील एका झुडपास अडकवून ठेविला. आंत आल्यावर सत्यरथानें दमयंतीस देवळांतील एका खांबाआड उभें रहावयास सांगून तो धर्मशाळेकडे गेला. नंतर थोड्याच वेळानें तो दमयंतीपाशीं परत येऊन तिला म्हणाला,–'आपल्या कार्यांत आपणांस यश येणार यांत शंका नाहीं. तो हरामखोर त्या समोरच्या खोलींत स्वस्थ निजला आहे. मीं जो बेत योजिला होता, तो माझ्याकडून अगदीं सोळा आणे पार पडला आहे. आतां पुढचें काम तुमचें आहे. पहा ! अजून विचार करा ! तुमचें मन कचरत नाहीं ना ?'

दमयंती आपल्या कमरेच्या म्यानांतून कट्यार उपसून तो हात सत्यरथासमोर धरून त्यास म्हणाली,–'हा माझा हात थोडा तरी कांपत आहे कीं काय हें तुम्हींच पहा ! याच खंजिरानें मीं पूर्वी त्या नीच प्रियंवदेचा प्राण घेणार होतें, पण दुर्दैवानें तो माझा बेत फसला. पण आतां मात्र माझे फार दिवसांचे हेतु सफल होणार म्हणून मला या प्रसंगीं दुप्पट अवसान आलें आहे.'

हा तिचा आवेश पाहून सत्यरथाला फार आनंद झाला, व ज्या हातानें आणि ज्या खंजिरानें आपल्या प्रिय पत्नीचा प्राण गेला त्याच हातानें व त्याच खंजिरानें विक्रमसेनाचा प्राण जाणार, हा गोष्ट मनांत येऊन सत्यरथाला फार समाधान वाटलें.

नंतर तो तिला म्हणाला,–'चला तर माझ्यामागून ! आपल्याबरोबर दिवा घेण्याची जरूर नाहीं. तो त्या समोरच्या खोलींत गाढ निजलेला आहे. त्या खोलींत तो एकटाच आहे. आंत शिरल्याबरोबर उजव्या हातास गाशा पसरून तो त्यावर निजला आहे. दार उघडें असलें, म्हणजे तो कोठें आहे हें तुम्हाला आपोआप दिसेल अशा प्रकारचें कृत्य काळोखांत करणें हेंच योग्य आहे जर तुमच्या हातीं दिवा असला, आणि त्याचा उजेड त्याच्या डोळ्यांवर पडला, तर तो खडबडून जागा होईल, आणि आपला सर्व बेत फुकट जाईल. त्या खोलीच्या दरवाज्याचीं झडपें उघडतांना वाजूं नयेत, म्हणून मीं त्याला दिवसा तेल लावून ठेविलें आहे. मी येथें उभा राहतों. तुम्ही पुढें व्हा.'

यावेळीं जर तेथें चांगला उजेड असता, तर दमयंतीची मेसूर मुद्रा दृष्टीस पडल्याबरोबर सत्यरथ दचकलाच असता. तिच्या अंगांतील रक्त गरम झालें असून तें तिच्या सर्व शरीरांत वेगानें फिरत होतें. तिचे डोळे लालभडक व धुंद झाले होते. आपण सध्यां जें कृत्य करणार तें किती पापमय आहे, याची कल्पना देखील तिच्या मनांत येत नव्हती. जणुं काय आपल्या सर्व जन्माचें साफल्य या एकाच प्रसंगावर अवलंबून आहे, असें तिच्या मनांत येत असून ती अगदीं धिमेपणानें एकेक पाऊल टाकीत पुढें निघाली. हें तिचें साहस पाहून सत्यरथाला तशाही प्रसंगीं आश्चर्य वाटल्यावांचून राहिलें नाहीं, इतकेंच नव्हे, तर असल्या

स्त्रीच्या हातून आपण भयंकर कर्म करविणार, या गोष्टीचें त्याला अगदीं वाईट वाटलें नाहीं.

मध्यें न थबकतां धिम्या पावलांनीं दमयंती धर्मशाळेंत गेली. तिच्या उजव्या हातीं संजीर असल्यामुळें तिनें डाव्या हातानें खोलीचें दार उघडिलें. सत्यरथानें सांगितल्याप्रमाणें दरवाजा वाजला नाहीं, या गोष्टींचा तिला फार आनंद झाला. आपलें पाऊल वाजूं न देतां ती दोनतीन पावलें पुढें गेली, तोंच तिच्या पायांला निजलेल्या माणसाच्या अंथरुणाचा स्पर्श झाला; तो उभी राहिली. उघडलेल्या दरवाज्यांतुन जेवढा प्रकाश आंत पडला होता, तेवढ्याच प्रकाशानें तेथें कोणी निजलें आहे, असें तिच्या लक्ष्यांत आलें. सुमारें पांच-चार पळें निश्चळ उभें राहून तिनें निजलेल्या माणसाचें डोकें कोठें आहे, पाय कोठें आहेत, हें नीट लक्ष्यांत घेतल. तसेंच त्या माणसाला अगदीं गाढ झोंप लागली आहे, अशीही तिनें तेवढ्या अवधींत आपल्या मनाची खात्री करून घेतली. तिनें संजिराची मूठ आपल्या हातांत गच्च धरिली, आणि आपल्या अंगावरिल वस्त्रें आवरून आपला उजवा हात शक्य तितका मागें नेला. यावेळीं आपल्या अंगी विलक्षण शक्ति आली आहे, असें तिला वाटूं लागलें. तिनें आपले नेत्र निजलेल्या माणसाच्या छातीवर रोखून धरिले, आणि तिनें मोठ्या जोरानें तो संजीर त्याच्या छातींत खुपसला! तिचा नेम अगदीं बरोबर साधला! संजीर नेमका काळजांत घुसल्यामुळें, बिचाऱ्या बळीच्या मुखांतून किंकाळी बाहेर पडण्यापूर्वीच त्याचा प्राण गेला! त्याच्या मुखांतून फक्त थोडासा घरघर शब्द बाहेर पडला. आणि पुनः त्या खोलींत सामसूम झालें!

आतां माझ तिचें अवसान सुटलें; तथापि ही गोष्ट आपल्या हातून घडली नसती, तर बरें झालें असतें असें मात्र तिच्या मनांत आलें नाहीं. आपला नेम बरोबर साधला व आपला हेतु पूर्णपणें साध्य झाला कीं नाहीं, हें पाहण्यासाठीं ती थोडा वेळ तेथेंच उभी राहिली. आपलें काम झालें हें लवकरच तिच्या ध्यानीं आलें. मृताची धडपड केव्हांच थांबली होती! मृताच्या छातींत शिरलेला संजीर तसाच ठेवून ती पुनः पाऊल न वाजवितां त्या खोलींतून बाहेर आली.

धर्मशाळेच्या बाहेर सत्यरथ तिची वाट पाहत उभा होता. ती बाहेर आली हें पाहतांच त्यानें तिला विचारलें,—'काम झालें?'

दमयंतीनें उत्तर केलें,—'होय! माझी फार दिवसांची इच्छा पूर्ण झाली! ज्यानें माझ्या प्रेमाचा धिक्कार केला, तो नीच शेखर आज माझ्या हातून प्राणास मुकला!'

सत्यरथ म्हणाला,—'एवढ्यानें तुझी तृषता कशी होईल? आपल्या शत्रूचें प्रेत प्रत्यक्ष पाहिल्याखेरीज तुझ्या मनास पूर्ण समाधान होणार नाहीं. त्या पलीकडच्या खोलींत दिवा आहे तो घे, आणि एकदां त्या प्रेताचें दर्शन घे!'

दमयंती म्हणाली,—'बरोबर! त्या माझ्या शत्रूला अंतकाळीं किती वेदना झाल्या, हें त्याचा चेहरा पाहिल्याखेरीज समजावयाचें नाहीं. यासाठीं त्याचें प्रेत मला प्रत्यक्ष पाहिलेंच पाहिजे!'

असें बोलून दमयंती धर्मशाळेंतील दुसऱ्या एका खोलींत गेली, व सत्यरथानें दाखविलेला दिवा घेऊन परत आली. ती पुनः प्रेताच्या खोलींत गेली असेल नसेल, तोंच सत्यरथानें जोरानें शीळ फुंकली; त्याबरोबर देवळाच्या व धर्मशाळेच्या आसपास लपून बसलेले कित्येक शिपाई धर्मशाळेसभोर गोळा झाले. इतक्यांत त्या सर्वांस एक भयंकर किंकाळी ऐकूं आली.

मानवी रूप धारण करणारी जणुं काय राक्षसीच अशी ती दमयंती मोठ्या उत्सुकतेनें आपल्या बळीचें दर्शन घ्यावयास

गेली असतां तेथें तिच्या काय दृष्टीस पडलें! तेथें शेखराचें प्रेत नसून आपण आपल्या हातानें ज्याच्या छातींत खंजीर भोंसकिला, तो आपला सख्खा भाऊ गतप्राण होऊन, पडलेला आहे ! ! !

प्रकरण ५७ वें.

शेवट !

दमयंतीच्या मुखांतील आरोळी ऐकून त्या खोलींत घुसलेल्या शिपायांच्या दृष्टीस जो देखावा दिसला तो फारच भयंकर होता। विक्रमसेनाच्या रक्तानें सर्व अंथरूण माखलें असून अंतकाळाच्या तीव्र व असह्य वेदनांनीं त्याची-प्रेताची-मुद्रा फारच भेसूर दिसत होती ! दमयंतीच्या हातांतील दिवा खालीं पडला असून, तिचें सर्वांग थरथर कांपत होतें. भीतीनें तिचा चेहरा पांढरा फटफटीत दिसत होता. आरोळी मारतांना वांसलेलें तिचें तोंड अद्यापि उघडेंच होतें. तिच्या डोळ्यांतील सर्व तेज अगदीं नष्ट झालें होतें. या कल्पनातीत भयंकर प्रकारानें तिचें देहभान नष्ट होत चाललें होतें, व कोणीं तरी तिला सांवरिलें नसतें, तर ती धाडकन् जमिनीवर पडलीच असती.

त्या राक्षसीचें धैर्य क्षणमात्र तिला सोडून गेलें होतें खरें, पण आपल्या अंगास कोणाचा तरी स्पर्श झाला, हें ध्यानीं येतांच ती देह भानावर आली. आपली किंवा सत्यरथाची कांहींतरी चूक झाल्यामुळें आपल्या हातून हें भयंकर कृत्य झालें असावें, असें क्षणभर तिच्या मनांत आलें, पण सत्यरथाकडे तिची नजर जातांच सारा प्रकार एकदम तिच्या ध्यानीं आला. सत्यरथ यावेळीं चमत्कारिक दृष्टीनें पाहत होता. आपणाकडे पाहून त्याला समाधान वाटत आहे, ही गोष्ट तिच्या मनांत यावयास एका क्षणाचाही विलंब लागला नाहीं. सत्यरथानें विश्वासघातानें आपल्याकडून हें कृत्य करविलें याबद्दल तिच्या मनांत संशय उरला नाहीं. हे सर्व विचार एका क्षणांत तिच्या मनांत आले, आणि दुसऱ्या क्षणीं ती बेहोष होऊन तिला धरणाऱ्या शिपायाच्या अंगावर पडली.

ही गडबड ऐकून मणिभद्र मोठ्या धांदलीनें तेथें आला होता. हा भयंकर देखावा दृष्टीस पडतांच त्या म्हाताऱ्याची मोठी त्रेधा उडाली, व हा काय प्रकार आहे, असा त्यानें आपल्या जांवयास प्रश्न केला.

सत्यरथानें उत्तर केलें,–'ज्या दुष्टेनें माझ्या पत्नीचा नाहक प्राण घेतला, त्या नीच स्त्रीचा सूड मीं उगविला !'

आपली नात जिवंत असेल अशी जी थोडीशी आशा अजून त्या वृद्ध मणिभद्राच्या अंतःकरणांत वसत होती, ती सत्यरथाच्या भाषणानें पार नाहींशी झाली, व त्याला फार दुःख झालें.

* * *

दुसरे दिवशीं सकाळींच सत्यरथाच्या चिठीप्रमाणें शेखर शिवालयांत आला; त्यावेळीं आपली पत्नी अजून जिवंत आहे, इतकेंच नव्हे, तर तिचा जखम फारशी असाध्य नाहीं; ही गोष्ट सत्यरथाला समजली, आणि आपण दुःखावेगामध्यें अनुचित गोष्ट केली, याचें त्याला थोडें वाईट वाटलें; तथापि दमयंतीच्या स्वभावाची त्याला पुरी ओळख पटली असल्यामुळें झाल्या गोष्टीबद्दल त्याला मुळींच पश्चात्ताप वाटला नाहीं. शेखर इतका दयाळु, पण त्यानें जेव्हां हें वर्तमान ऐकलें, तेव्हां सत्यरथाला तिळमात्र दोष दिला नाहीं. 'सर्व गोष्टी ईश्वरी इच्छेनुरूप होत असतात,' इतकेच शब्द त्याच्या मुखांतून यासंबंधानें निघाले होते.

दोन प्रहरीं सत्यरथानें एक पत्र लिहून झालेलें सर्व वर्तमान रणमत्ताला कळविलें, आणि माणसें पाठवून आपल्या पुतण्याचें प्रेत घेऊन जाण्याची त्यास सूचना केली. झालेल्या या प्रकारामुळें दमयंतीला वेड लागलें

असल्यामुळें, तिलाही मोठ्या बंदोबस्तानें नारायणपुरीं नेणें जरूर झालें होतें.

रणमत्ताला पत्र लिहिल्यावर सत्यरथ शेखराबरोबर प्रथम वत्सपुरी गेला. आपल्या पतीच्या दर्शनानें मथुरेला पुष्कळ हुषारी वाटली. शिवालयामध्यें घडून आलेला प्रकार जेव्हां प्रियंवदेच्या कानीं पडला, तेव्हां तिलाही त्याबद्दल फारसें वाईट वाटलें नाहीं. आपल्या सर्व कुटुंबाचा ज्वानें दोन दिवसांपूर्वी विश्वासानें घात केला, त्याचा इतक्या लवकर अशा रीतीनें नाश झाला, ही गोष्ट अगदीं न्यायाची झाली, असेंच तिला वाटलें. ही गोष्ट जर आणखी चार सहा महिन्यांनीं झाली असती; तर प्रियंवदा आणि शेखर या दोघांनींही सत्यरथाला त्याच्या कपटी वर्तनाबद्दल दोष दिला असता. पण यासंबंधीं त्यांचीं मनें दुःखानें जळत असल्यामुळें त्यांना या गोष्टीचें कौतुक वाटलें नाहीं. हें मनुष्यस्वभावांतील दोषच होय!

आतांपर्यंत सांगितलेलें कथानक येथें संपलें; तथापि या कथानकांतील वैशिष्ट्यपूर्ण पात्रांसंबंधानें चार शब्द येथें सांगणें जरूर आहे. मोडक्या घरांतील धेरडी आणि तिचा पोर वराह यांस सत्यरथाच्या शिपायांनीं कैद करून न्यायाधिशापुढें नेलें. त्या मोडक्या घराची झडती झाली, त्यापैकीं तेथें एक सुमारें वीस हात खोल विहीर आढळली. या विहिरींत पाणी पुष्कळ होतें. ती विहीर ज्यावेळीं सरकारी लोकांनीं उपसली, त्यावेळीं तींत सुमारें पंधरा माणसांचीं हाडें सांपडलीं! इतके खून आजपर्यंत त्या दोघांनीं जिरविले होते! ती विहीर बुजवून व तें घर पाडून जागा मोकळी केल्यावर तेथें न्यायाधिशानें वधस्तंभ उभा करविला आणि त्यावर त्या दोघांस फांशीं दिलें. त्यांचीं प्रेतें त्या स्तंभावर कित्येक दिवस लटकत होतीं!

वृद्ध मणिभद्र शिवालयांतील दुकानदारांचा धंदा सांडून सत्यरथाबरोबर चंपावतीस गेला. निंबराजानें सत्यरथाची एका मोठ्या प्रांताच्या सुभेदारीवर नेमणूक केली होती. मणिभद्रानें वृद्धपणीं आपले दिवस आपलीं पोतवंडें सभाळण्यांत व ईश्वरभक्ति करण्यांत आनंदानें घालविले. मथुरेची जखम लवकरच बरी झाली, हें सांगण्याची जरूरच नाहीं.

विक्रमसेनाच्या मरणामुळें आनंदीला फार दुःख झालें. तिला एक पुत्र झाला होता, तोच सागरदत्ताच्या अफाट संपत्तीचा आणि नारायणपुरच्या जहागिरीचा वारस झाला. तिनें आपलें वैधव्य अनेक प्रकारचीं सत्कृत्यें करून घालविलें.

आपल्या वडिलांचें आणि बंधूचें उत्तरकार्य केल्यावर शेखर पुनः प्रतापपुरीं गेला नाहीं. त्यानें प्रतापपुरचें आणि वत्सपुरचें हीं दोन्ही राज्यें एकत्र करून आपल्या प्रजेचें न्यायानें पालन केलें. दृढसंधाच्या मृत्यूनंतर सुमारें एक वर्षानें बृहद्रथानें शेखराबरोबर युद्ध केलें, पण त्यांत त्याचा पराभव झाला. कांहीं कारण नसतां बृहद्रथानें युद्ध सुरू केलें म्हणून निंबराजाला त्याचा राग आला. आणि शेखरानें जिंकून घेतलेलें सुंदरपुरचें राज्य निंबराजानें शेखराला दिलें. निंबराजानें या अन्यायाबद्दल बृहद्रथाला जन्मभर नजरकैदेंत ठेविलें. शेखराला त्यापुढें कोणत्याही प्रकारची विपत्ति भोगावी लागली नाहीं. त्याच्या शौर्याचा निंबराजाला अनुभव आलेला असल्यामुळें युद्धाचे वेळीं तो नेहमीं शेखराला साह्यासाठीं बोलावीत असे. शेखराचें पुढील सर्व आयुष्य, संपत्ति, संतति, वैभव आणि अधिकार यांचा उपभोग घेण्यांत आनंदानें गेलें.

निंबराजानें रत्नाकराच्या वेळच्या सर्व लोकांस दूर करून नवे लोक नेमले आणि प्रजेच्या सुखासाठीं त्यानें उत्तम प्रकारचे बंदोबस्त केले. त्यामुळें झालेली राज्यक्रांति सर्व प्रजेला हितकर वाटली. निंबराज गादीवर आला त्यावेळीं आपली मुख्य प्रधानकीवर नेमणूक होईल, असें विश्वासघातकी सुंदरसेनास वाटलें होतें, पण त्याला